# एकटाच चोखाळतो मी माझी वाट रे . . .

## अथवा 'नोआखालीत गांधीजी'

**(गांधीजींच्या धर्मयात्रेची दैनंदिनी)**

**मनुबहेन गांधी**

अनुवाद

**ब्रिजमोहन हेडा**

# प्रस्तावना

संपूर्ण मानव समाज अखंड आणि एक असूनही अनेक आधारांवर त्याचे वेगवेगळे समूह संगठित झाले आहेत. हे संघटित घटक त्याचे भाग असतानाही अनेकदा त्यांच्यात संघर्ष झाल्याशिवाय राहत नाही. मानवसमाजाच्या या भयंकर संघर्षात गुतलेल्या दोन घटकांमध्ये न्यायान्यायाचा प्रश्न उपस्थित होत असतो आणि मग अन्यायनिवारणाचा प्रश्न उपस्थित होत असतो.

या अन्यायनिवारणावरील इलाज म्हणून मानवसमाज वेगवेगळ्या प्रसंगी हिंसेचा प्रयोग करत आला आहे. परंतु हिंसेने अन्याय दूर झाल्याचा काही काळ भास होत असतो हे जरी खरे असले तरी वास्तवात हिंसेने कोणताही अन्याय दूर होत नाही असाच अनुभव येत असतो. एकूण पाहता वेगवेगळ्या इतर प्रकारांनी अन्याय सुरूच राहत असतो अथवा नवीन रूप घेऊन त्याचा प्रस्फोट होत असतो.

माणसाच्या वेगवेगळ्या समूहात मतभेद, श्रद्धाभेद आणि विरोध राहणे अशीच मानवसमाजाची घडण आहे. हे भेद वा विरोध शमवल्याशिवाय मानवसमाजाचे जीवन सुखसमाधानाने चालू शकत नाही. उलट असे म्हणता येईल की हे भेद वा विरोध शमवणे हीच माणसाची प्रकृती आहे. परंतु अन्यायनिवारणाचा उपाय वा भेद वा विरोध शमवण्याचा उपाय हिंसाच असेल तर भेद आणि विरोध कधीही शमणार नाहीत, अन्यायनिवारणसुद्धा कधीही होणार नाही.

यामुळे भेद वा विरोध शमवण्याकरिता तसेच अन्यायनिवारणाकरिता हिंसेच्या उपाययोजनेऐवजी दुसरी काही उपाययोजना आहे की नाही असा प्रश्न मानवसमाजासमोर उभा राहिला आहे.

व्यक्तिव्यक्तीच्या अथवा माणसामाणसांच्या लहानलहान समूहातील भेद वा विरोधमूलक संघर्षाचे शमन करण्याकरिता हिंसेऐवजी अहिंसेचा वा प्रेमाचा इलाज करून पाहण्याचा यशस्वी प्रयोग होत आला आहे हे खरे आहे. परंतु मानवसमाजाचा भाग असलेल्या मोठमोठ्या घटकांमधील विरोध शमवण्याकरिता हे प्रयोग विशेषत्वाने झाले नाहीत. गांधीजींनी आपल्या जीवनात अखंड साधना हे भेद वा विरोध शमवण्याकरिता तसेच अन्यायनिवारणार्थ अहिंसेच्या म्हणजेच प्रेमाच्या उपाययोजनेला व्यावहारिक रूप देण्याचा प्रयत्न केला. हिंदू समाजातील अंतर्गत विरोध शमवण्याकरिता आणि इंग्रज आणि हिंदुस्थानी जनतेतील अन्यायावर आधारित संबंधांमुळे जे भेद निर्माण झाले होते ते शमवण्याच्या इलाजाचा हा प्रयोग गांधीजींनी आपल्या जीवनात यशस्वीपणे करून दाखवला होता. असेही म्हणता येईल की मानवसमाजाचे खरे ऐक्य सिद्ध करण्याकरिता आवश्यक अशा प्रेमाद्वारे विरोधशमनाचा अथवा अन्यायनिवारणाचा मार्ग मानवसमाजाला दाखवणे हे त्यांचे जीवनकार्य होते.

हे कार्य करता करता त्यांच्या जीवनाच्या अखेरच्या भागात हिंदुस्थानी जनतेचे दोन अंतर्गत भाग असलेल्या हिंदू आणि मुसलमान समाजात सुरू असलेल्या विरोधाने उग्र रूप धारण केले होते आणि त्याचा भयंकर परिचय सर्वात आधी बंगालमध्ये आणि नंतर पूर्व पंजाबमध्ये झाला होता.

आपल्या जीवनकार्याशी प्रामाणिक राहून या विरोधातून निर्माण झालेल्या भयंकर परिस्थितीतून मार्ग काढण्याकरिता अहिंसक इलाजाचा म्हणजेच प्रेमाच्या इलाजाचे आव्हान गांधीजींनी ताबडतोब स्वीकारले.

त्यांच्या जीवनातील हा अखेरचा प्रयोग किती आणि कसा यशस्वी झाला याची इथे चर्चा करण्याची आवश्यकता नाही. परंतु अहिंसेच्या कार्यपद्धतीच्या भावी विकासाच्या दृष्टीने या प्रयोगाचे मूल्य फार मोठे आहे. यामुळे या प्रयोगादरम्यान गांधीजी ज्या प्रकारचे जीवन व्यतीत

करत होते आणि जो परमपुरुषार्थ आचरत होते त्याची दररोजची नोंद भावी पिढ्यांना कळली पाहिजे ही गोष्ट स्वतः गांधीजींनासुद्धा महत्त्वाची वाटत होती.

आणि यामुळे त्यांनी सुरुवातीलाच आपल्या सेवेकरिता आणि आपल्या अंगभर कामकाजात मदत करण्याकरिता श्री मनुबहेन गांधींना ठेवले होते. गांधीजीजवळ असताना नोआखाली आणि इतर ठिकाणी असताना त्यांची जी दिनचर्या होती तिची दैनंदिन नोद त्यांनी ठेवली आहे. या पुस्तकात नोआखालीत गांधीजींनी जी पदयात्रा केली तिचा अहवाल मनुबहेनने रोजनिशीच्या स्वरूपात दिला आहे.

या रोजनिशीत गांधीजींची दिनचर्या, माणसांकडून काम घेण्याची त्यांची पद्धत आणि त्यांचा सर्वात मोठा विशेष म्हणजे आपल्याला आवश्यक असलेल्या माणसांना शिकवण्याची वज्रासारखी कठोर तसेच कुसुमासारखी मृदू पद्धती. असे अनेक रोचक दृष्टिकोन या दैनंदिनीतून अभिव्यक्त होतात. परंतु जीवनाच्या अखेरच्या भागात स्वीकारलेल्या जीवितकार्यात यशस्वी होण्याकरिता त्यांनी जे एकहाती प्रयोग केले त्यांची हकिगत मानवसमाजाच्या भावी विकासाच्या दृष्टीने सर्वाधिक महत्त्वाची आहे. मनुबहेन गांधींनी अतिशय काळजीपूर्वक आणि चिकाटीने संग्रहित केलेल्या या हकिगतीकरिता अहिंसक कार्यपद्धती यशस्वी करण्याच्या दृष्टीने प्रयोग करण्याची इच्छा असणारा कोणीही नेहमीकरिता ऋणी असेल.

मोरारजी देसाई,

मुंबई, ४ जानेवारी १९५४

# अनुवादकाचे प्रास्ताविक

महात्मा गांधींच्या संकलित साहित्याचा अनुवाद करत असताना अनेकदा मनूबहेन गांधींच्या पुस्तकांमधून उद्धृत केलेल्या काही भागाचा अनुवाद मला करावा लागला होता. यामुळे मुंबईच्या नाना चौकातील गांधी बुकडेपोमध्ये मला बरेच वर्षांपूर्वी 'बिहार पछी दिल्ली' हे पुस्तक आढळताच मी ते विकत घेतले. परंतु गांधी संकलित साहित्याचा अनुवाद पूर्ण होईपर्यंत इतर कोणत्याही पुस्तकाच्या अनुवादाला हात लावायचा नाही असे मी ठरवले होते. आता ते काम संपल्यामुळे स्वाभाविकपणेच मला या पुस्तकाची आठवण झाली आणि तसे मी मुंबई सर्वोदय कार्यालयाचे आदरणीय श्री तुलसीदासजी सोमैय्या यांना या पुस्तकाचा अनुवाद करत असल्यासंबंधी सांगितले. लगेच त्यांनी मला मनुबहेनचची सगळी पुस्तके पाठवून दिली.

खरे म्हणजे माझ्यात गुजराती पुस्तकाचा अनुवाद करण्याची क्षमता नाही. अनुवादाकरिता मूळ भाषेतील बारकावे पकडण्याची क्षमता हवी असते. मला तर गुजराती भाषेतील बारकावेच काय ढोबळ ज्ञानसुद्धा नाही. परंतु तरीही मी हे काम करायचे ठरवले. असे करताना मला इथे राहणारे श्री जयेंद्र दोषी यांची मदत होईल याबद्दल विश्वास वाटत होता. माझे त्यांचे संबंध भावासारखे आहेत. आणि गुजराती भाषेत कुठेही अडचण आली तर ते निश्चित मदत करतील अशी मला खात्री होती. तसेच त्यांनी केलेही आणि त्यांच्या मदतीमुळेच या खंडाचा अनुवाद मी पूर्ण करू शकलो. शक्य आहे आहे की माझ्या अज्ञानामुळे या अनुवादात काही उणिवाही राहून गेल्या असतील. जर त्या दाखवून देण्यात आल्या तर पुढील आवृत्तीत मी त्या दुरुस्त करीन.

माझ्या या अनुवादाच्या कामात माझ्या पत्नीची तर नेहमीच मदत होत असते. ती माझा वेळ अजून कशात वाया जाऊ नये म्हणून सदैव दक्ष असते. संगणकावर लिहीत असताना मुलांची मदत घ्यावीच लागत असते. तेसुद्धा विनातक्रार ही मदत करत असतात.

मनुबहेन गांधींनी लिहिलेल्या दैनंदिन्यांचा एक भाग म्हणजे हे पुस्तक. या दैनंदिन्यांमधून गांधींजींचे जितके जवळून दर्शन होते तितके माझ्या वाचनातील इतर कोणत्याही पुस्तकांमधून मला झाले नाही. याचबरोबर या दैनंदिन्यांना एक मर्यादाही आहे. ती म्हणजे घटना जरी त्याच दिवशी घडलेल्या असल्या तरी माणसाला त्यांतील शब्दंशब्द जसाच्या तसा आठवेल तसाच तो लिहील ही एक गोष्ट आणि दुसरी म्हणजे कोणत्याही साहित्यकृतीवर लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव पडत असतोच, मग तो लेखक कितीही तटस्थ भावनेने लिहो.आणि दैनंदिनीमध्येतर लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा अजून प्रभाव पडत असतो. यामुळे या दैनंदिन्यांमध्येसुद्धा गांधीजींच्या व्यक्तिमत्वाचे जे काही चित्रण आहे ते मनूबहेन गांधींना गांधीजी जे दिसले तोपर्यंत सीमित आहे. गांधीजींनी या काळात लिहिलेला बराचसा भाग जो या दैनंदिनीत आलेला नाही तो महात्मा गांधी संकलित साहित्यातून मी घेतला आहे आणि तो पुरवणी म्हणून दिला आहे. शक्यतोवर दैनंदिनीतील आणि पुरवणीतील मजुकुराची पुनरावृत्ती होऊ नये याची मी काळजी घेतली आहे.

यापैकी कोणाचेही ऋण मी फेडू शकत नाही, फेडण्याची इच्छाही नाही. अनेक वेळा ऋणमुक्त होण्यापेक्षा ऋणात राहणे हेच आपल्याकरिता आणि समोरच्याकरिता आनंददायी होत असते.

ब्रिजमोहन हेडा
San Jose, CA, USA
brijmohanheda@gmail.com
Whats App. no. +1 408 348 3870

# अनुक्रमणिका

प्रस्तावना - मोरारजी देसाई

१. तो धन्य दिवस

२. स्वार्पणाची दीक्षा

३. काम सांभाळले

४. नोंदीचे महत्त्व

५. तीन अमूल्य पाठ

६. पंडितजी भेटायला आले

७. पदयात्रेची तयारी

८. एकला जाने रे

९. कठोर परीक्षा

# १. तो धन्य दिवस

१९४६च्या ऑक्टोबर महिन्यात कौटुंबिक कामाच्या निमित्ताने मला उदेपूरला जावे लागले. त्या वेळी देशात अद्भुत फेरबदल होणे सुरू होते. बंगालमध्ये भयानक दंगलींचा स्फोट व्हायला सुरुवात झाली होती. याचा प्रतिघात बिहारमध्ये झाला. आणि बापूजींना बंगालमध्ये जावे लागले. त्या दरम्यानं मला त्यांनी उदेपूरला पत्र लिहिले -

२३ ऑक्टोबर १९४६

चि. मनूडी,

तू उदयपूरहून लिहिलेले पत्र मला काल मिळाले. आता मी एकदोन दिवसात बंगालमध्ये जाणार आहे असे वाटते. . त्यापूर्वी तू आली असतीस तर मला आनंद झाला असता. परंतु आता तुझ्या इच्छेप्रमाणे तू कर. ज्या कशामुळे तू सुखी होशील, तुझी प्रकृती पूर्ववत होईल व तुला सेवाकार्य करता येण्याइतकी शक्ती येईल त्याने  माझे समाधान होईल.

उनियाचे समाधान होईल तितके दिवस राहा. त्या दिवसात तुझी प्रकृती चांगली व्हायला पाहिजे. तेथील हवामान वाखाणण्यासारखे आहे.

बापूचे आशीर्वाद

बापूजी कलकत्त्याला गेल्यानंतर मी कुठे आहे याची कल्पना नसल्यामुळे बापूंनी माझ्या पिताश्रींना पत्र लिहिले -

चि. जयसुखलाल,

मला चि. मनूचे आणि त्याचबरोबर तू तिला लिहिलेले अशी दोन्ही पत्रे मिळाली. तिने लिहिल्याप्रमाणे मी दोन्ही पत्र यासोबत परत करत आहे. मनूडी तिथे पोहोचली की नाही हे निश्चितपणे माहीत नसल्यामुळे मी तुला हे लिहीत आहे. तिला वेगळे पत्र लिहिण्याकरिता मला

वेळ नाही. मला तर हे पत्रसुद्धा लिहिण्याकरिता वेळ नव्हता असे मी म्हणेन. परंतु लिहिणे भाग आहे . . .

*   *   *

माझे हे पत्र मी तीन हप्त्यात लिहिले आहे. हे शेवटचे पत्र असेल अशी मला भीती वाटते. बिहारच्या लोकांचे हृदयपरिवर्तन चांगल्या बाजूने झाले नाही तर तेथील घटनांचा मूक साक्षीदार होऊन मी राहू शकणार नाही हा निर्णय मला घ्यावा लागेल असे वाटते. सध्याही माझे अर्धउपोषणासारखे काही तरी सुरू आहे. या अर्धउपोषणाचे मुख्य कारण माझी प्रकृती आहे. परंतु बिहार मला संपूर्ण उपोषणाकडे नेणार आहे. मी परवा नोआखालीला जाईन. आजकाल मी फार कमी पत्रे लिहीत असतो. इथे आल्यानंतर मी लिहिलेले हे सर्वात लांब पत्र आहे. यामुळे या दिवसात मनू माझ्याबरोबर असली पाहिजे. परंतु आता तिचे इथे येणे अशक्यसे दिसते. ईश्वर कृपेने तिला कोणताही त्रास न होवो आणि ती व्याधीमुक्त होवो. बाकीचे वर्तमानपत्रात पाहशील.

बापूचे आशीर्वाद

डिसेंबरच्या १ तारखेला मी महुवाला पोहोचले तेव्हा माझ्या वडिलांना बापूजींनी लिहिलेले हे पत्र मी वाचले, आणि त्याच रात्री रेडिओद्वारे बातमी मिळाली की बापूजींनी स्वतःला आणि आपल्या वेगवेगळ्या सहकाऱ्यांना वेगवेगळ्या गावात ठेवले आहे. ‘मनूचे स्थान माझ्याजवळच आहे’ हे वाचून काही काळ माझे हृदय भरून आले. विचार केला की बापूजी जर मला आपली वैयक्तिक सेवा करण्याकरिता ठेवत असतील तर? परंतु आता ही गोष्ट कदाचित अशक्यप्रायही असू शकेल. ज्याने आपल्या सहकाऱ्यांना वेगळे केले ते बापूजी मला इतक्या दूरवरून थोडेच बोलावतील?

या विचाराने मला झोप येत नव्हती. पिताश्रींना उठवले. त्यांना विचारले. म्हणाले, तू लिही तर खरे. सेवा करण्याची तुझी भावना खरी असेल तर ती निश्चितच फलीभूत होईल. या शब्दांनी मला खूप प्रोत्साहन मिळाले. आणि रात्री दीड वाजता मी पत्र लिहिले. त्यात स्पष्ट लिहिले की 'तुम्हाला जर मला तेथील एखाद्या गावात ठेवायचे असेल तर मला यायचे नाही. तसे तर इथे बसूनही मी शक्य तितके काम करतेच आहे. परंतु तुम्ही जर तुमची वैयक्तिक सेवा करू देण्याच्या अटीवर मला येऊ देऊ इच्छित असाल तर माझी इच्छा आहे. आणि मग तुमची पदयात्रा सुरू होण्यापूर्वी तिथे पोहोचता यावे म्हणून मला तारेने तसे कळवा. मी वचन देते की तुम्हाला कितीही मोठा जरी धोका पत्करावा लागत असेल तर मीसुद्धा तो पत्करीन.'

कोणाला माहीत रात्रीच्या दीडेक वाजता लिहिलेले ते पत्र कोणत्या शुभमुहूर्तावर लिहिले होते की ते फलीभूत झाले. ११-१२-१९४६ला दुरून तारवाल्याला येताना पाहून मनातून अतिसय आनंद वाटू लागला. आणि तार फोडताच ती बापूजींचीच तार निघाली. तार पुढील प्रमाणे होती-

रामगंज,

डिसेंबर ११, १९४६

जयसुखलाल गांधी द्वारा शेफर्ड महुवा

मनूने माझ्याबरोबर राहावे असे तुला आणि मनूला खरोखरच वाटत असेल तर तुझ्या जोखमीवर तू तिला माझ्याबरोबर राहण्याकरिता आणू शकतो. येण्याची तार खादी प्रतिष्ठान, कॉलेज चौक, कलकत्ता या पत्त्यावर कर.

बापू

ही तार वाचली आणि मोटीबाच्या आणि माझ्या आईवडिलांच्या आशीर्वादाचे हे फळ आहे असेच मला जाणवले. अगदी असंभव गोष्ट जेव्हा शक्य होते तेव्हा जशा भावना आपल्या मनात निर्माण होतात तशाच भावनांचा मला अनुभव आला, आणि ईश्वराच्या या अहर्निश उपकाराने हृदय पूर्णपणे धन्यधन्य झाले.

माझ्या वडिलांनी भावनगरला तार करून रजेकरिता अर्ज केला. या दरम्यान मी बापूजींना जे पत्र लिहिले होते त्या पत्राच उत्तर, ज्यामुळे मी नोआखालीला पोहोचले ते, बापूजींनी मला परत पाठवले  आणि मला ते 'आयुषयभर' जपून ठेवायला सांगितले. त्या पत्रात माझा लेखी निर्धार होता. यीमुळे कदाचित हे पत्र जपून ठेव असे सांगण्यामागील त्यांचा उद्देश असू शकेल. मी दिलेली लेखी कबुली पुढीलप्रमाणे होती -

महुवा,

१२- १२- १९४६

परम पूज्य बापूंच्या सेवेत,

तुमची तार काल सायंकाळी मिळाली. तुम्ही मला वैयक्तिक सेवा करण्याची अमूल्य संधी दिली आहे हे कळल्याने मला खूप आनंद झाला आहे. पू. भाईंनी (माझे पिताश्री) भावनगरला तार करून १५ दिवसांची सुटी मागितली आहे. ती मिळेल. आणि लवकरात लवकर ते मला तिथे २२-२३ तारखेपर्यंत पोहोचवतील. तिथे पोहोचण्यापूर्वी खादी प्रतिष्ठानच्या पत्त्यावर मी तुम्हाला तारेने कळवीन.

तुम्ही इतकी लांब तार करण्याची विशेष आवश्यकता नव्हती. तुमच्या या प्रवासात मी तुमच्याबरोबर राहावे असे भाईंनी आणि मी मिळूनच  पसंत केले आहे. आणि तुम्ही मला जर वैयक्तिक सेवा करण्याची संधी देणे पसंत कराल तर तिथे येण्याचा आणि त्यामागील जोखमीचा

आम्ही प्रामाणिकपणे विचार केला असल्याचे मी माझ्या मागील पत्रात लिहिलेच आहे. हे केवळ तुम्ही येण्याची परवानगी द्यावी म्हणून.

आज मला तुमचे एक वाक्य आठवते. एके काळी कांताबहेन माझ्या जवळच्या मैत्रीणीसारख्या होत्या. आणि मी म्हणाले, बापू, आता तर मी एकटी पडली आहे. तेव्हा तुम्ही म्हणाला होता - 'तू आणि मी एकटेच राहणार आहो मी जिवंत आहे तोपर्यंत तू एकटी कशी?' आणि मग तुम्ही मला 'आपूर्यमाण' या श्लोकाचा अर्थ समजावून सांगितला होता. तो दिवस खरोखर आला आहे. मी तर ईश्वराला प्रार्थना करते की त्याने मला तुमची अखेरपर्यंत सेवा करण्याची शक्ती द्यावी.

तुमचे एक पत्र (भाईला पाठवलेले ) मिळाले आहे. मी तर मूर्खच आहे अशी शंका तुम्हाला का वाटते? मी जर दीडशहाणी असते तर तुमच्या कशी कामी पडू शकत असते ! परंतु ईश्वर मूर्खाचाच वाली असतो असे मला वाटते. अशा प्रकारे माझे लाडके नाव तर ठरले ! पण असो, जे आहे ते आहे. तुम्ही शहाणी कराल ना? सध्या तर तुमची वैयक्तिक सेवा मिळण्याच्या आशेतच मी सर्व काही विसरले आहे. सेवा करता करता छर्रे खावे लागले तर तेही खाईन. मी येण्यापूर्वीच तुम्ही पदयात्रेकरिता निघालेले नसाल असेच मी समजते. त्यापूर्वी मी पोहोचेन अशी आशा आहे. अधिक काय लिहू? तुमची प्रकृती चांगली असेल अशीच अपेक्षा करते. इतकेच.

लिहिणार तुमची मुलगी मनूडी, दंडवत, प्रणाम

आम्ही १५ - १२ - '४६ ला कलकत्त्याकरिता रवाना झालो. कलकत्त्याहून नोआखालीला जाण्याकरिता आमच्या बरोबर एक मार्गदर्शक आला. कलकत्त्याहून काझिरखिलला, जिथे गांधी छावणीचे मुख्य पथक होते, पोहोचण्याकरिता २४ तास लागले. आणि प्रवाससुद्धा खूपच कठीण होता. अखेरीस १९ - १२ - '४६ ला दुपारी तीनेक वाजता बापूजींचा मुक्काम असलेल्या

श्रीरामपूरला आम्ही पोहोचलो. हा धन्य दिवस जीवनातील एक सोनेरी दिवस म्हणून माझ्या अंतःकरणात कोरला गेलेला आहे.

## २. स्वार्पणाची दीक्षा

श्रीरामपूर,

१९- १२ - १९४६

दुपारी तीनेक वाजताच्या सुमारास आम्ही जेव्हा बापूजींजवळ पोहोचलो तेव्हा बापूजी एका पाटावर बसून एकटेच चरखा फिरवत होते आणि आजूबाजूला आझाद हिंद फौजेचे म्हणजे आय. एन. ए.चे काही बंधूं, कर्नल जीवनसिंगजी वगैरें बापूजींना प्रश्न विचारत होते. त्या सर्वांची बापूजींच्या या कामात सहभागी होण्याची इच्छा होती. ते गोष्टीत तल्लीन झालेले होते.

आम्ही त्या झोपडीत प्रवेश केला. झोपडीच्या उंबरठ्यापासून चारेक फूट अंतरावर बापूजींची बैठक होती. तिथून मी सरळ बापूजींना प्रणाम करण्याकरिता धावत गेले. आणि बापूजींनी पाठीवर जोरात थोपटले, कान पकडला आणि त्यांची एक प्रेमळ चापटी गालावर पडली. गालगुच्चा घेत ते म्हणाले, 'अखेरीस पोहोचलीस ना !' कर्नलसाहेबांना म्हणाले 'ही पोरगी इथे मरायची तयारी करून आली आहे. यामुळे तुम्हा सर्वांचे दोन मिनिट घेतले! आता तुम्ही सांगा!'

पाचसात मिनिटात ते सर्व गेले. मग माझ्या प्रकृतीची विचारपूस केली. मी विचारले, 'तुम्हाला कशी वाटते?' 'जशीच्या तशीच आहेस. केवळ काही वजन वाढले आहे असे वाटते.' त्यानंतर ते माझ्या पिताश्रींना म्हणाले -

केव्हा निघालास? रस्त्यात गर्दी तर नव्हती? मनूडीचे पत्र मला मिळाले. ही दिल्लीत आली होती तेव्हाही माझ्याजवळ राहण्याकरिता हिला खूप समजावण्याचा प्रयत्न केला होता. परंतु तेव्हा उमियाकडे जाण्याची हिची इच्छा होती. मला एक पत्र लिहून मोकळी झाली. हे मला फार आवडले. याबाबतीत मनूला मी बरेच काही लिहिलेसुद्धा आहे. मग तर बंगालमध्ये यावे लागले. इथे तर करायचे वा मरायचे आहे. याकरिता मनू तयार असेल

असे मला खात्रीपूर्वक वाटत नव्हते. पण मग मनूचे पत्र मला मिळाले. या पत्राचे उत्तर तारेने मागितले होते म्हणून तार केली.आणि आता हिची परीक्षा आहे. मी याला हिंदू-मुसलमानांच्या ऐक्याचा यज्ञ संबोधत असतो आणि या यज्ञात वाईटपणाला मुळीच वाव नाही. यामुळे मनूत जर किंचितही मलीनपणा असेल तर हिचे फार वाईट हाल होतील. हे सर्व तुम्ही समजून घ्या. अजूनही हिला परतण्याची इच्छा असेल तर ही तुझ्याबरोबर परतू शकते. नंतर वाईट अवस्था झाल्यानंतर परतण्यापेक्षा आताच परतणे चांगले.

वरील सांगितल्यानंतर माझ्याकडे पाहत बापूजी म्हणाले, ‘जयसुखलालला मी जे सांगितले ते जर तुला चांगले कळले नसेल तर याच्याकडून परत समजून घे. इथे तुझी खूप कठोर परीक्षा होणार आहे.’

तेवढ्यात कुलरंजनबाबू आल्यामुळे हे बोलणे इथेच थांबले. अंधार होऊ लागल्यामुळे भाईंना (माझ्या पिताश्रींना) जायला सांगितले. माझे अंथरुण आलेले नव्हते. मी बापूजींजवळ राहायला आलेले असल्यामुळे बापूजींनी तर मला इथेच राहायला सांगितले. भाईना म्हणाले, ‘इथे तर यज्ञ आहे. मी तुझी झोपायची वा खाण्याची व्यवस्था करू शकणार नाही. यामुळे तू काझीरखिलला परत जा. मनूचे अंथरूण ठेवून जा.’

माझे अंथरुण आलेले नसल्यामुळे बापूजींनी एक सतरंजी काढून दिली. साडेनऊ वाजता बापूजी झोपले. रात्री बरोबर १२।। वाजता माझ्या डोक्यावर हात फिरवत बापूजींनी मला उठवले - ‘मनूडी, जागी आहेस काय? मला तुझ्याशी बोलायचे आहे. तू तुझा धर्म समजून घे आणि जयप्रकाशबरोबर बोलून जो निर्णय घ्यायचा असेल तो चटकन घे. त्यालासुद्धा फार सुटी नाही हे लक्षात ठेव.’ (ही गोष्ट ‘बापू मारी मां’मध्येही आढळेल.)

काल सायंकाळी मी इथे आले. बापूजींनी या सगळ्या ज्या गोष्टी सांगितल्या त्यावरून येथील काय परिस्थिती आहे, किती अद्भुत कार्य करायचे आहे, विविध प्रकारच्या कसकशा

अडचणींचा सामना करावा लागणार आहे वगैरे सर्व गोष्टींचे वर्णन करणे अशक्य आहे. परंतु आखा भगतचे या परिस्थितीला अचूक लागू पडणारे पुढील भजन आहे.

अकल कला खेलत नर ज्ञानी!

जैसेही नाव फिरे दसों दिश,

ध्रुव तारे पर रहत निशानी . . . अकल.

चलन वलन अवनी पर वाकी,

मन की सूरत अकाश ठहरानी,

तत्त्व-समास भयो हे स्वतंतर,

जैसे हिम होत है पानी, . . . अकल.

छूपी आदि अंत नहीं पायो,

आई न सकत जहां मन बानी,

ता घर स्थिती भई है जिनकी,

कही न जात ऐसी अकथ कहानी . . . अकल.

अजब खेल अद्भुत अनुपम है,

जाकु है पहचान पुरानी,

गगनही गेब भया नर बोले,

एही अखा जानत कोई ज्ञानी . . . इकल.

श्रीरामपूर,

२०.१२-१९४६, शुक्रवार

बापूजींनी परत मला साडेतीन वाजता प्रार्थनेकरिता उठवले. त्याआधी बापूजींना जाग आलेली होती. त्या दिवसाची बापूजींनी रोजनिशी लिहिली. त्यात बापूजींनी लिहिले -

आज सकाळी १२.३० वाजता उठलो, मनूला १२.४५ ला उठवले. तिला धर्माबद्दल बरेच समजावून सांगितले. जयसुखलालशी बोलायलाही सांगितले. तिला जर तिचा निश्चय बदलायचा असेल तर ती बदलवू शकते. परंतु आवेगाच्या भरात जरी निर्णय घेतला असेल तरी तो निर्णय घेतल्यानंतर मग ती जोखीम पत्करायलाच पाहिजे. इथे एकाचे दोन होऊ शकत नाही. जयसुखलालला माझेही मत सांग. परंतु जयसुखलालने तर सर्व काही तुझ्यावर सोडले आहे आणि पुढेही सोडेल. अशा प्रकारे गोष्टीत सव्वा वाजला. आणि मग परत तीन वाजता प्रार्थनेकरिता उठलो.

इतके बापूजींनी आपल्या स्वतःच्या हाताने रोजनिशीत लिहिले आणि माझ्याकडून जे लिहवून घेतले  होते त्याची नकल केली. मला पिताश्रींना निरोप देऊन यायला सांगितले. तेवढ्यात साडेतीन वाजले. प्रार्थना झाली. आज प्रार्थनेत दोन्ही वेळा मला भजन म्हणण्याबद्दल आणि गीतापाठ करण्याबद्दल सुचवले. प्रार्थनेत निर्मळबाबू आणि परसरामजी होते.

प्रार्थनेनंतर मला परत रात्रीच्या गोष्टीबद्दल विचार करायला सांगितले. मी माझा निर्धार सांगून दिला - 'माझ्याकरिता तर जिथे तुम्ही तिथे मी' ही माझी अट जर तुम्हाला मान्य असेल तर तुम्ही हवी ती माझी परीक्षा घ्या वा अट टाका, मला सर्व मान्य आहे. भाईंनी तर लहानपणापासूनच मला पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे. माझ्याकडे कधीही शंकेच्या नजरेने पाहिलेले नाही. यामुळे तुम्ही तर त्यांच्या इच्छेपेक्षा माझ्या इच्छेला महत्त्व द्यायला पाहिजे.

मी बापूजींकरिता गरम पाणी करायला गेले तेवढ्या वेळेत बापूजींनी मला चिठ्ठी लिहिली-

चि. मनुडी,

तुझे वचन पाळशील. माझ्यापासून एकही विचार लपवू नकोस. विचारीन त्याचे स्पष्ट आणि खरे उत्तर देशील. आज मी जे पाऊल उचलतो आहे ते खूप विचार केल्यानंतर उचलले आहे. त्याचा तुझ्या मनावर जो काही प्रभाव पडला असेल ते मला लिहून

सांगशील. मी तर तुला सर्व विचार सांगत असतोच. जे काही मी सांगतो वा मागतो त्यात तुझे भलेच माझ्यासमोर असते. इतके तुझ्या मनावर कोरून ठेव.

बापू

(मी म्हणाले की मला ज्या काही अडचणी वा जो काही त्रास सहन करावा तो मी मरेपर्यंत सहन करीन. माझी तुमच्यावर पूर्ण श्रद्धा आहे, विश्वास आहे. आणि तुम्ही नोआखालीचे जसजसे भयंकर चित्रण करता तसतसे माझे मन दृढ होत जाते. इतके मी बापूजींना लिहिले.) सर्व काही जर असे असेल तर मला विचारण्यासारखे काहीही राहत नाही. केवळ समजण्यासारखे राहते. श्रद्धा जर खरोखरच या पातळीपर्यंत गेलेली असेल तर तू सुरक्षित आहेस. या महायज्ञात तू तूझी भूमिका पूर्णपणे पार पाडशील, - मूर्ख आहेस म्हणून. हे जपून ठेव. कळणार नाही ते मला विचार.

बापू

साडेसात वाजता बापूजी फिरायला निघाले. फिरता फिरता मला म्हणाले, 'मी तुला इथे केवळ माझ्या सेवेकरिताच बोलावले आहे असे समजू नकोस. माझी सेवा तर तू करशीलच. परंतु इथे लहानशा मुलींपासून तर म्हाताऱ्या स्त्रियांपर्यंत कोणीही सुरक्षित नाही. त्यात तुझ्यासारख्या १६-१७ वर्षाच्या तरुण मुलीला मी जर माझ्याजवळ ठेवले आणि तुला जर एखाद्या गुंड त्रास देऊ लागला आणि तू जर त्याचा सामना शोर्याने करू शकली अथवा मेलीस तर मी नाचेन. तुला बोलावण्यामागे हासुद्धा प्रयोग करून पाहण्याचा माझा हेतू आहे.'

नोआखालीत कुठेकुठे वेळूचे पूल ओलांडावे लागत असतात. बापूजी जी पदयात्रा करणार होते त्या यात्रेत असे पूल ओलांडावे लागणार होते. यामुळे असे पूल ओलांडण्याचीसुद्धा ते सवय करत होते. अशा पुलांवरून ते मुलाप्रमाणे सहजपणे चालू शकत होते खरे, पण कुठे नकळत पाय घसरला तर माणूस खाली खाईतच पडायचा.

फिरून आल्यानंतर बापूजींचे पाय धुतले. मालीश केली. मालीस सुरू असताना बापूजी अर्धा तास झोपले. आंघोळीनंतर बापूजी १० वाजता जेवत होते. तेव्हा माझे पिताश्री निघण्यापूर्वी त्यांचा निरोप घेण्याकरिता आले. बापू म्हणाले - 'मनुडी काही एकटीदुकटी नाही. मी हिच्याबरोबर खूप खूप गोष्टी केल्या. आता तू सुखात जा. हिची काळजी करू नकोस.'

भाई म्हणाले, 'आता तुम्ही हिला हिची इच्छा असेल तितके दिवस ठेवू शकता. आणि तुमच्याजवळ जर ही असेल तर मला चिंता करण्याचे कारण काय?'

बापू - मला असे वाटते की जोपर्यंत मी जिवंत आहे तोपर्यंत मी हिला जा म्हणणार नाही. ही कंटाळली तर गोष्ट वेगळी. परंतु माझे तर अभयदान आहे की ही मला सोडू शकते, पण मी हिला सोडणार नाही. शिवाय आम्हा दोघांमधून कोणी मेला तर? मेला तर काय? शरीर वेगळे होईल, आत्मा तर अमर आहे ना? माझी तर तीव्र इच्छा आहे की या पोरीत जे सुप्त गुण मला आढळले आहेत ते प्रकाशात आणावे.

माझे पिताश्री ११।। वाजता महुवाला जाण्याकरिता रवाना झाले. माझ्याबरोबर असलेले जास्तीचे सामान मी त्यांच्याबरोबर परत पाठवले. ते सामान परत पाठवण्याची सूचना बापूजींनी केली होती. ३ वाजता कताई करत असताना मला माझी डायरी वाचून दाखवण्याची सूचना बापूजींनी केली. मी म्हणाले, 'माझीच डायरी मीच दाखवायला पाहिजे काय?'

बापू म्हणाले, 'नेहमी तू स्वतःची चूक स्वतःच जेव्हा कबूल करतेस तेव्हा तुझी जितकी उन्नती होते तितकी उन्नती कागदात लिहिल्याने वा कोणा तिसऱ्या माणसाद्वारे कबूल केल्याने होत नसते. असे असले तरी तू वाचत जा. यामुळे तुला कितपत समजले याचा मला अंदाज येत जाईल. आणि मग मी सही करत जाईन. अशाने माझा वाचण्याचा वेळ वाया जाणार नाही, डोळे वाचतील, आणि तुला तर माझी कोणतीसुद्धा सेवा करायचीच आहे तर तू हीसुद्धा सेवा करशील. ही पण एक सेवाच आहे असे समजून तू वाचत जा.'

मी माझी कालची दैनंदिनी वाचून दाखवली. कताई करून बापूजींनी सही केली.

चार वाजता किती तरी पत्रे लिहवून घेतली. ‘महादेव, प्रभाकडून मी जे काम घेत होतो ते तुझ्याकडून घेतो आहे.’

सायंकाळच्या प्रार्थनेनंतर आज दिवसभरातील गंभीर गोष्टी ऐकल्यानंतर मी ही गंभीर जबाबदारी घेणे मला शोभेल काय याचा विचार करू लागले. गंभीरपणे हाच विचार करत मी बसले होते.

बापूजी म्हणाले - ‘तू का इतकी गंभीर होऊन बसली आहेस? तुझ्या आईपासून तू काहीही जर लपवून ठेवले तर तू पाप करशील. मनात बेकार विचार येवो की चांगले, तू मला सर्व काही सांगत जा.’

मी - ‘आज तुम्ही . . . ला पत्र लिहिवून घेतले आणि त्याशिवाय माझ्याकडून तुम्ही किती तरी काम घेण्याची अपेक्षा करत आहा. माझ्यावर ही जी सगळी जबाबदारी आली आहे ती सर्व मी पेलू शकेन की नाही याचा मी विचार करत होते.’

बापू - ही चिंता आपण का करावी? काळजी करून चालणार नाही. भावना शुद्ध असेल तर सर्व काही चांगले होईल. आपण तर सर्व काही ईश्वरालाच सोपवायचे आहे ना? त्याच्याजवळ अंतःकरणपूर्वक प्रार्थना केली तर शक्ती येईलच. रामनामाचा जप कर. रामावर पूर्ण विश्वास ठेव. लहान मुलाप्रमाणे हे काम त्याला सोपव. भूक लागली की मूल रडते. आई त्याला दूध पाजते. परंतु लहान मूल मात्र आपली भूक कशी शमेल याची ती काळजी करत नसते. ती काळजी आईला असते. अशाच प्रकारे तू कामाची काळजी करशील तर तुझे निभूच शकणार नाही. हे ओझे तू माझ्यावर आणि ईश्वरावर सोड आणि तो जी कोणती शक्ती देईल त्याप्रमाणे करत जा.

सायंकाळच्या प्रार्थनासभेत सर्व लोकांसमोर भजन म्हणण्याची ही माझी पहिलीच वेळ होती. यामुळे भजन गात असताना मी थरथरत होते. त्याचीसुद्धा बापूजींना चांगलीच कल्पना

होती. म्हणाले, 'प्रार्थना करण्याकरिता वा गाण्याकरिता नसते. प्रार्थनेत भावना आली तरच ऐकणारांवर तिचा भव्य प्रभाव पडत असतो. दोनचार दिवस म्हणशील तर तुझा संकोच निघून जाईल.'

रात्री साडेआठ वाजता बापूजींनी बंगाली बाराखडी लिहिली. टपाल ऐकला. वर्तमानपत्रे ऐकली. आजपासून मी बापूजींचे बरेच काम सांभाळले.

ईश्वराची माझ्यावर किती कृपाआहे? पू. मोटीबालासुद्धा अशा एकांतात बापूजींची सेवा करण्याची संधी मिळाली होती. आणि आज या महापुरुषाच्या अशा घोर तपश्चर्येच्या काळात त्याच्यासोबत राहण्याची ही सुसंधी मला मिळाली आहे. सत्याचाच जय होत असतो ही गोष्ट मी प्रत्यक्ष अनुभवते आहे. ईश्वराला प्रार्थते आहे की माझी त्यांच्यावर अशीच श्रद्धा राहू दे आणि मला मिळणारा प्रसाद पचवण्याची पात्रता मला दे.

(बापू श्रीरामपूर, २०-१२-'४६)

(बापूजींनी रात्री साडेनऊ वाजता माझी आजची डायरी वाचली आणि तिच्यावर वरीलप्रमाणे लही केली.)

# ३. काम सांभाळले

श्रीरामपूर,

२१-१२-'४६, शनिवार

प्रार्थना साडेतीन वाजता होत असते. पण आम्ही त्यापेक्षा थोडे आधीच उठलो. दातण करत असताना काल बापूजींनी माझ्याकडून जी पत्रे लिहवून घेतली होती ती ऐकली. माझ्या रोजनिशीवर सही केली. तेवढ्यात प्रार्थनेची वेळ झाली.

प्रार्थनेनंतर बापूजींनी गरम पाणी (आणि) मध घेतले आणि निर्मळदांनी प्रार्थनाप्रवचनात घटनांचा अहवाल लिहिला होता तो दुरुस्त केला. यातच सगळा वेळ गेला. सात वाजता मोसंबीचा रस घेऊन फिरायला निघाले. आज दूरवर फिरायला गेले होते. मी तसेच इतर काही वार्ताहर बापूजींसोबत होतो. जवळपास ४० मिनिट फिरता फिरता बापूजींनी मला गीतेच्या अभ्यासासंबंधी प्रश्न विचारले. मी म्हणाले, तुरुंगातून सुटका झाल्यानंतर मी गीतेचा पद्धतशीर अभ्यास मुळीच केला नाही. माझ्या मनाप्रमाणे मी गीतेचा जमेल तसा खराखोटा अर्थ लावत होते. इतराेकडून मला हा अर्थ समजावून घेण्याची इच्छा नव्हती कारण इतर कोणी हव्या त्या विषयात हवे त्याचे जरी गुरू झाले तरी मला मात्र गीतेच्या अभ्यासात तुम्हालाच गुरू करायचे होते. याचे बापूजींना दुःख झाले. माझी समजूत घालत ते म्हणाले,

या इच्छेमागे तुझा खोटा मोह आहे. चांगली गोष्ट शिकण्याकरिता हजारोच काय लाखो गुरूसुद्धा का करू नये? आणि एखाद्या लहान मुलाकडूनही आपण शिकू शकतो. चांगली गोष्ट शिकण्यात लाज कसली? पण जाग आली तेव्हाच सकाळ. आता आपण आजपासूनच गीता सुरू करायला पाहिजे. उच्चारात फार काटेकोरपणा नाही. परंतु गीतेचा अर्थ माहीत नाही हे मला फार बोचते. तू दररोज पाच श्लोक लिहून काढायचे. तुला माहीत आहे की तिसरा अध्याय यज्ञाचा आहे. यज्ञात भगवान म्हणतात की जो माणूस यज्ञाशिवाय खातो तो चोरीचे खात असतो. हे तर

फार महत्त्वाचे वचन आहे. चोरीचे अन्न खाणे म्हणजे कच्चा पारा खाणे. कच्चा पारा पचू शकत नाही. तो खाल्ला तर फुटून निघतो. यज्ञाशिवाय माणूस घटकाभर जरी राहिला तरी तो चोर ठरतो. यामुळे आपण सर्वांनी यज्ञ केला पाहिजे. सुदैवाने ज्याचे हृदय संवेदनशील आहे त्याच्याकरिता यज्ञ अगदी सहज गोष्ट आहे. आणि यज्ञाकरिता नसते धनाची वा संपत्तीची गरज, नसते बुद्धीची वा शिक्षणाची गरज. यज्ञ म्हणजे कोणतेही परोपकारी काम. ज्याचे संपूर्ण जीवन यज्ञमय असते, ज्याला आपण चांगला म्हणतो तो चोरीचे अन्न खात नसतो. यामुळे जे लहान यज्ञ करतात ते लहान चोरी करतात असे म्हणता येईल. अशा प्रकारे सूक्ष्मपणे विचार केला तर आपण सर्वच लहानमोठी चोरी तर करतच असतो. ज्याने पूर्णपणे स्वार्थाचा पूर्णपणे त्याग केला आहे त्यानेच पूर्ण यज्ञ केला असे म्हणता येईल. स्वार्थाचा त्याग करणे म्हणजे मीपणाचा, माझेपणाचा त्याग करणे. ती भावना मनातून काढून टाकणे. हा माझा भाऊ, तो दुसरा परका, ही माझी बहीण, ती दुसरी परकी अशी भावना मनात राहायलाच नको. सामान्यपणे माणूस जे काही करू शकतो ते त्याने कृष्णार्पण करावे. जी कोणती तो सेवा करतो ती सर्व ईश्वराने आपल्याला सेवक म्हणून ठेवलेले सेवक म्हणून आपण करतो आहे असेच त्याने समजावे. असा माणूस नित्य सुखी राहतो. त्याच्याकरिता सर्व सुखदुःख समानच असतात. तो आपले शरीर, मन, बुद्धी सर्वच परमार्थाकरिता वापरतो. असा परिपूर्ण यज्ञ आपल्यासारखे सर्व करू शकत नाही. आखा भगतसारखी सेवा असेल तर करावी अशी भावना ज्याच्या मनात असेल त्याने असे कोणते कार्य केले पाहिजे? असे विचारले असता कताईच असे मुख्य कार्य आहे आणि ही एकच अशी सेवा आहे, मेहनत आहे की जी परमार्थाच्या दृष्टीने असंख्य लोक एकाच वेळी वा हवे तेव्हा करू शकतात. ही मेहनत जगाकरिता, देशाकरिता कोणालाही करता येऊ शकते. आणि हिच्यामुळे आपण असंख्य गरिबांचे पोट भरू शकते. आंधळे, बहिरे, मूक, श्रीमंत, मुले, म्हातारे असा कोणीही सहजपणे ही मेहनत करू शकतो आणि प्रत्येक जण आपापल्या रामाचे नाव घेऊ शकतो. मला तर जेव्हापासून चरख्याचा शोध लागला आहे तेव्हापासून ही एक गोष्ट मी पाठ

करून ठेवली आहे. तूसुद्धा गीतेचे श्लोक कंठस्थ करून ते आचरणात उतरवशील तेव्हाच तुला अशा प्रकारे गीतेचा अर्थ समजावून सांगण्याची माझी इच्छा आहे. केवळ व्याकरणाच्या दृष्टीने नाही. हे तर तुला कोणीही शिकवून दाखला देऊ शकतो. आणि यज्ञाचा खरा अर्थसुद्धा समजून घे. यज्ञात चरखा आणि चरख्यात यज्ञ आहे.

घरी आल्यानंतर ही संपूर्ण गोष्ट अतिशय गंभीरपणे आणि चांगल्या प्रकारे समजावून सांगितली. घरी आल्यानंतर बापूजींचे चिखलाने भरलेले पाय धुतले आणि त्यांनी बंगाली बाराखडी लिहिली. याच वेळात मी बापूजींच्या मालीशची तयारी केली आणि आंघोळीकरिता पाणी गरम करायला ठेवले.

८ वाजता मालीश करत असताना बापूजी २० मिनिट झोपले. बापूजींना खूप थकवा आहे. मालीश, आंघोळ वगैरेनंतर जेवता जेवता सुऱ्हावर्दीसाहेबांना पत्र लिहायला लावले. जेवणात ८ औंस दूध, भाजी आणि बार्ली (जव) बरीच आलेली असल्यामुळे ती वाटून तिची भाकरी करायला सांगतले होते, ती भाकरी घेतली. तसेच उद्या बार्ली भाजीबरोबर कुकरमध्येच शिजव असे सुचवले.

इथल्या ज्या डोशीमाचे बापूजी पाहुणे होते ते फार प्रेमळ आहेत. परंतु मला त्यांची भाषा कळत नव्हती. त्यांना माझी कळत नव्हती. खाणाखुणांनी आग्रहपूर्वक जेवू घालायचे.

आजपासून मीसुद्धा बंगाली शिकायला सुरुवात केली आहे. गांधीजी म्हणाले, ‘आपल्या दोघांमधून पहिला नंबर कोणाचा ते पाहू’.

बापूजी आराम घेण्याकरिता १ वाजता झोपले. मी त्यांचे पाय तुपाने चोळले. आराम करता करता सुऱ्हावर्दीसाहेबांचे पत्र तपासले. मग माझी नोंदवही तपासली. ती त्यांना आवडली. परंतु वेळे अभावी थोडक्यात लिही. मुख्य मुद्याचे टाचण कर अशी सूचना बापूजींनी केली. ते म्हणाले

की इतके थोडक्यात लिहिलेले मला आवडते. माझ्या लेखनाचा अभ्यास कर आणि यज्ञाची गोष्ट अधिक समजूनउमजून लिही.

दोन वाजता बापूजी जागे झाले. १५ मिनिट पडून होते. तीन वाजता बिरलाजींच्या पेढीतर्फे फळे आली. एक शिंपीसुद्धा आला. माझ्याकरिता पंजाबी पोषाख शिवायला दिला. ३.१५ वाजता पोटावर आणि डोक्यावर माती घेतली. आणि त्याच वेळी बिहारच्या श्रीकृष्ण सिंहना मजकूर सांगून माझ्याकडून पत्र लिहवून घेतले. या दरम्यान बापूजींनी पाचेक मिनिट एक डुलकी घेतली आणि मग मुलाखती सुरू झाल्या. झमान, अतिरिक्त जिल्हाधिकारी, मेजर स्ट्राईकर, दा. दासगुप्ता, आणि तीन रिलीफ अधिकारी आले. पदयात्रा कोणत्या रस्त्याने करावी यासंबंधात बापूजींनी त्यांच्याशी चर्चा केली. दंडाधिकारी झमानबरोबर झालेल्या गोष्टीत निर्वासितांकडून कशा प्रकारे काम घ्यावे हे सांगताना बापूजी म्हणाले की ‘सरकार त्यांच्यावर काम करण्याची बळजबरी करू शकत नाही. ते करतील तर वेगळी गेष्ट आहे. खरे पाहता हे काम वेगवेगळ्या संस्थांद्वारे व्हायला पाहिजे.’

मुलाखत पाच वाजेपर्यंत चालली. पाच वाजता प्रार्थनेत गेलो. पावसामुळे संख्या फार नव्हती. तरीही ५०-६० बंधुभगिनी असतीलच. अजून लोकांची भीती गेलेली नाही. आपण बापूंच्या आश्रयाला गेलो असे जर मुसलमानांना कळले तर कदाचित ते आपल्याला मारून टाकतील अशा भीतीने हिंदूंच्या मनात घर केले होते.

प्रार्थनेनंतर सुशीलाबहेन आल्या होत्या. यामुळे बराच वेळ त्यांच्याबरोबर गोष्टी करण्यात गेला. त्या त्यांच्या गावामधून आल्या होत्या.

फिरून आल्यानंतर बापूजींनी दूध आणि अंगूर घेतले. इथे खाकरा करण्याचे कोणतेही साधन नसल्यामुळे आज खाकरे केले नाही. बापूजींना डोशी नारळाचा संदेश देऊन गेले होते. त्याचा एक काप घेतला.

बापूजींची कताई अर्धवट राहिली होती. यामुळे त्यांनी ८।। ते ९।। कातले. एकूण तार १६० (दुहेरी ८०) झाले. बापूजींनी त्यांची रोजनिशी लिहिली. माझी पडल्या पडल्या ऐकली. सकाळी सही करण्याकरिता गादीजवळ ठेवण्याची सूचना केली.

बापूजींचे अंथरुण मी एकटी तयार करत होते. एवढ्यात ते हाततोंड धुऊन स्नानघरातून आले, चादर टाकायला मदत केली. मी खूप नाही म्हणाले, पण म्हणाले, ‘यात मला सूक्ष्म अहंकार दिसतो. बापूंना त्रास होईल म्हणून तू प्रेमाने नाही म्हणतेस. परंतु तुला आणि मला हे काम हातोहात पूर्ण करायचे आहे. अशात मी हे काम एकटीच करीन असा जर तुझा आग्रह असेल तर तू लवकरच आजारी पडशील आणि माझी सेवा अडून पडेल. आणि ही चादर टाकण्यात मला अशी कोणती मेहनत करावी लागते? यामुळे तुला सुचेल ते तू कर आणि मला सुचेल ते मी करीन.’

बापूजींना गादीवर चादर टाकताना पाहवत नव्हते इतके ते करुण दृश्य होते. लगेच माझ्या मनात विचार आला, ‘मोटीबा असत्या तर?’ परंतु बापूजींना चादर टाकण्यापासून अडवण्याची हिंमत माझ्यात नव्हती.

साडेनऊ वाजता बापूजी अंथरुणात पडले. अर्धा तास वर्तमानपत्रे ऐकली. सर्व काम लवकर आटोपण्याकरिता मला सांगितले. मला म्हणाले की ‘तू तुझे काम लवकर आटोपत जा म्हणजे मी झोपतो तेव्हाच तूही झोपू शकशील. आणि नाही तर काम अर्धवट पडून राहू देत जा. जर तू असे केले नाही तर मलाही तुझी काळजी वाटत राहील आणि तुझीही झोप होणार नाही’. या बोलण्यामागे दोन काळज्या होत्या. एक तर खूप जागून काम करत राहिल्याने प्रकृतीला हानी पोहोचण्याची शक्यता होती. आणि दुसरी याहूनही विशेष मोठी काळजी अशी होती की हा भाग वेगळ्याच प्रकारचा आहे आणि विशेषेकरून तरुण हिंदू मुलींकरिता भयप्रद आहे असे समजले जाते. यामुळे सावध असलेला माणूस नेहमीच सुखी असतो असे जे म्हणतात तेच खरे. यामुळे बापूजी अंथरुणावर पडल्याबरोबर त्याच्या डोक्याला तेल चोळले, पाय दाबले, प्रणाम केला

आणि झोपले. इथे आल्यानंतरचा आजचा तिसरा दिवस आहे. आणि आजपासून मी बरेचसे काम सांभाळलेले असल्यामुळे मनात समाधानाची भावना आहे.

श्रीरामपूर,

२२-१२-’४६, रविवार

रात्री दीडेक वाजता बाजूजींना जाग आली. मला उठवले. बापूजी म्हणाले, ‘दिवा आणि लिहिण्याचे साहित्य आणून दे आणि मग झोप’. हे सर्व देऊन मी परत झोपले. परत अडीच वाजता उठवले. त्यांनी जी बरीच पत्रे लिहिली होती ती त्यांना वाचून दाखवली. आणि मग त्यांनी त्यावर सह्या केल्या. आज बापूजींनी लिहिलेली किती तरी पत्रे अतिशय महत्त्वाची आणि हृदयद्रावक आहेत. एका पत्रात ते लिहितात,

> “तुझी दोन पत्रे मिळाली. भाई . . . भाईवर माझी पूर्ण नजर आहे. मी इथे बराच स्थिरावलो आहे असे वाटते तर . . . भाईसारख्या अनेकांचा सेवेकरिता उपयोग करता येईल. आणि असे करणे मला आवडतेही. निर्भयी होण्याकरिता तुम्ही जे लिहिता ते वास्तविक जरी असले तरी ते तुमच्या तोंडी शोभत नाही. अशा प्रकारे ओळखीचे असलेले गुन्हेगार सुटत असतील तर मग लोकांना निर्भय व्हायला आणि राहायला आवडायला पाहिजे. हे शिक्षण जोपर्यंत आपण पचवणार नाही तोपर्यंत आपण पंगू राहणार आहो. इथे हिंसा-अहिंसेचा भेद विसरून जा. हिंसावाद्यांनी हवे तर शौर्याने हिंसा करणे शिकावे. अहिंसावाद्यांनी तर अशा वेळीच अहिंसेचा प्रभाव दाखवून दिला पाहिजे. निर्बळाच्या अहिंसेला अहिंसा हे नाव ठेवून आपण या शक्तीला बदनाम केले आहे. आणि आपला घाबरटपणातून आपल्याला सुचलेली ही युक्ती आहे असे म्हणता येईल. ही युक्ती आपण शिकलो ! आणि यामुळे मनातून मला माझ्याबद्दल भीती वाटू लागली आहे की योगायोगाने वा शक्य आहे की नकळतपणे, अहिंसेच्या निमित्ताने वा नावाने घाबरवण्याची

ही युक्तीच मीसुद्धा शिकलो असेन आणि शिकवत असेन ! यामुळे मी स्वतःला तपासण्याकरिता वा माझी खरीखुरी परीक्षा घेण्याकरिता आलो असेन. माझ्याजवळ पोलीस वगैरे आहेत. आणि आता शीख भाईसुद्धा आलेले आहेत. परसराम आणि निर्मळबाबू तर आहेतच. मनूडी परवा आली आहे. हे तिच्याकडूनच लिहवून घेतो आहे. यामुळेच तर कदाचित मी बेफिकीर होऊन फिरत नसेन? सुज्ञाला फार काय सांगायचे?

बापूचे आशीर्वाद”

*  *  *

दुसरे पत्रसुद्धा असेच होते. त्यात नोआखालीचे करुण चित्र आले आहे.

चि. . . .

“तुम्ही प्यारेलालला लिहिलेले पत्र काल सरळ मला मिळाले. प्यारेलाल आणि इतर सर्व आपापल्या कर्तव्यात व्यग्र असून मृत्यूबरोबर खेळत आहेत. आम्ही जेव्हा एका ठिकाणी गोळा होऊ तेव्हाच तो तुम्हाला काही तरी लिहू वा पाठवू शकेल. तो सध्या असे करू शकत नाही. तुमचे पत्र काझिरखिलला गेले होते; त्यामुळे तिथून ते माझ्याकडे पाठवण्यात आले. प्यारेलालला तुमच्या पत्राची माहिती नाही. तो अधूनमधून प्रसंगोपात मला भेटायला येत असतो आणि यानंतर जेव्हा तो येईल तेव्हा तो हे पत्र वाचेल.

“मी या पत्राचा मजकूर सकाळी ३ वाजता सांगत आहे. यानंतर सकाळी ४ वाजता मी हाततोंड धुईन आणि त्यानंतर प्रार्थना. सध्या हाच दररोजचा कार्यक्रम आहे. ईश्वराची इच्छा असेल तरच माझे हे सुरू राहील. ते काहीही असले तरी माझ्या प्रकृतीची चिंता करण्याचे कारण नाही. शरीराकडून आपण जी मागणी करू त्याला शरीर प्रतिसाद देत असते, परंतु माझी परीक्षा होत आहे. माझ्या सत्य आणि अहिंसेला पारड्यात ठेवून त्यांचे मोजमाप सुरू आहे. हे मोजमाप इतके काटेकोरपणे सुरू आहे की एखादा सोन्याचांदीचा

व्यापारीही इतके काटेकोर मोजमाप करणार नाही. ते इतक्या सूक्ष्मपणे होत आहे की केसाच्या जाडीच्या एक शतांश भागाचीही त्यात नोंद होऊ शकेल. सत्य आणि अहिंसा हे स्वतः कधीही अपूर्ण असू शकत नाहीत. जर कुठे उणीव असेल तर ती माझ्यात असली पाहिजे कारण मी स्वतःहोऊन त्यांचा प्रतिनिधी झालो आहे; असे असेल तर त्याने मला घेऊन जायला पाहिजे आणि इतर कोणा प्रतिनिधीच्या माध्यमातून काम करायला पाहिजे.

"प्यारेलाल माझ्याकरिता जे काम करत होता ते मी करू शकत नाही आणि माझ्याबरोबर असलेल्या व्यक्तींनाही अजून ते करणे जमलेले नाही याचा मला खेद होतो. परंतु दोघेही फार हुशार आहेत. यामुळे त्यांना ते जमू शकेल अशी मला आशा आहे. मनूच्या स्वतःच्या इच्छेप्रमाणे तीन वा चार दिवसांपूर्वी जयसुखलाल तिला इथे सोडून गेला आहे. तिच्या अटीवर मी तिला इथे येऊन राहण्याची परवानगी दिली आहे आणि माझ्याबरोबर तिची जगण्याची आणि आवश्यकता पडली तर मरण्याचीही तयारी आहे. आता ताण येऊ नये म्हणून अंथरुणावर पडून डोळे मिटून या पत्राचा मजकूर मी तिलाच लिहून घेण्याकरिता सांगत आहे. सुचेतासुद्धा (सुचेता कृपलानी) खोलीत आहे. ती अजूनही झोपलेली आहे आणि मी या पत्राचा मजकूर लाकडी फळीवर पडून हळू आवाजात सांगत आहे. तीन माणसे सहजपणे झोपू शकतील इतका हा तक्तपोस रूंद आहे. मी माझे सर्व काम यावरच करत असतो. तुम्ही माझ्याकडे पाठवलेल्या तारेला काहीही अर्थ नाही. इथे अतिशयोक्तीला सीमा नाही. असे नाही की लोक जाणूनबुजून अतिशयोक्ती करतात; त्यांना तर अतिशयोक्ती काय असते हेही माहीत नसते. स्थानिक वनस्पतीप्रमाणे त्यांची कल्पनाशक्तीही चोहोकडे बेसुमार फोफावत असते. माझ्या चोहोकडे नारळाची आणि पोफळीची झाडे आहेत व त्यांच्या सावलीत विविध प्रकारच्या हिरव्या भाज्या उगवत असतात. येथील सर्व नद्या सिंधू, गंगा आणि ब्रह्मपुत्रासारख्या

विशाल आहेत. त्या आपले पाणी बंगालच्या उपसागरात ओतत असतात. तुम्हाला तार पाठवणाराला तुम्ही जर उत्तर दिले नसेल तर तुम्ही त्याला त्याने केलेल्या विधानाचा पुरावा मागा. घटनेप्रमाणे केंद्र सरकारला प्रांतांच्या कारभारात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नसला तरी पुरावा मिळाला तर केंद्र सरकार काही करू शकेल असे तुम्ही त्याला सांगावे असा माझा तुम्हाला सल्ला आहे. आणि अजून सांगा : 'तिथे तुमच्यामध्ये गांधी आहे व ते तुमचे ऐकणार नाही हे अशक्य आहे. परंतु ते सत्य आणि अहिंसेचे भक्त असल्यामुळे तुमची निराशा होण्याची शक्यता आहे. परंतु ते जर तुमचा अपेक्षाभंग करत असतील तर आम्ही त्यांचे शिष्य तुमचे समाधान कसे काय करू शकू? परंतु आमच्याकडून शक्य असेल ते आम्ही करू.' मी इथे असल्यामुळे कोणीही येथील समस्या तिथे आणू नये असे कोणालाही म्हणू नका उलट त्यांना सांगा की गांधी तिथे असले तरी आम्ही काही तरी करण्याचा प्रयत्न करू. त्यांच्या विरोधात जाऊनही काही करणे आवश्यक असेल तर तसे करणे हा आमचा धर्म आहे कारण गांधींनी आम्हांला हेच शिकवले आहे. त्यांना हे कळू शकले तर पाहा आणि त्यांना काय विचारायचे आहे ते मला सांगा.

"येथील परिस्थितीत अनेक अडचणी आणि समस्या आहेत. सत्याचा कुठेही मागमूससुद्धा नाही. हिंसा अहिंसेचे रूप धारण करते आणि धर्माच्या नावावर घृणित अपराध केले जातात. परंतु अशाच परिस्थितीत सत्य आणि अहिंसा यांची परीक्षा होत असते. मला हे माहीत आहे आणि म्हणूनच मी इथे आहे. मला बोलावू नका. मी जर येथून घाबरून पळून गेलो तर ते माझे दुर्दैव असेल; परंतु अशी दुर्दैवाची वेळ आपल्या देशावर येईल असे मला वाटत नाही. मी इथे करण्याकरिता वा मरण्याकरिता आलो आहे. काल रेडिओवर बातमी आली होती की . . . माझ्याशी सल्लामसलत करण्याकरिता येत आहेत.

हे चांगले आहे. प्रत्येकाला मी भेटण्याची आवश्यकता काय? ते काहीही असले तरी तुमच्यापैकी कोणालाही मला काहीही विचारायचे असेल तर विचारू शकता.

"मी भट्टीत आहे. यामुळे यात काय होते आणि सत्य काय आहे हे मला चांगल्या प्रकारे कळते. . . तुम्ही बिहार [मुस्लिम] लीगचा अहवाल पाहिला असेल. . . . ना त्याबद्दल लिहिले आहे . . .यात निम्मे जरी खरे असेल तरी ते भीषण आहे. बिहारच्या घटनांची अशी निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे की त्याबद्दल कोणीही शंका घेऊ शकणार नाही याबद्दल मला मुळीच शंका नाही. यात एका दिवसाचाही उशीर होऊ नये. या आरोपात जे काही तथ्य असेल ते सरळ सरळ मान्य करण्यात यावे. आणि इतर बाबी आयोगाकडे सोपवण्यात याव्या. तुमच्या मंत्रिमंडळातील मुस्लिम लीग सदस्यांशी यासंबंधात तुम्ही चर्चा करा. माझा सुऱ्हावर्दींशी पत्रव्यवहार सुरू आहे व तो सुरूच राहील. तो पूर्ण झालेला नाही. . . .तुमच्यावर कामाचे किती दडपण आहे हे मला इथे इतक्या लांबवरूनही कळते. परंतु काही गोष्टी अशा असतात की कामाचे कितीही दडपण असले तरी माणसाला त्या कराव्याच लागतात. तुम्हाला सर्व माहिती देत राहणे हे त्यातील एक काम आहे.

बापूचे आशीर्वाद."

अशा निरव शांततेत बापूजींनी लिहिलेल्या पत्रांमधून त्यांची हृदयव्यथा सहजपणे समजू शकते.

ठीक चार वाजता प्रार्थना झाली.

## ४. नोंदींचे महत्त्व

तारीख २२ ही मोटी बाची मासिक मृत्यूतारीख. यामुळे आज संपूर्ण गीतापारायण झाले. सुशीलाबहेन असल्यामुळे हे फार चांगल्या पद्धतीने झाले. गीतापाठ सुरू असतानाच प्यारेलालजी आणि मि. इंग्लंड (एक इंग्रज मित्र) आपल्या गावामधून चालत येऊन इथे पोहोचले.

प्रार्थनेनंतर ते सांगत होते की दोन वाजता चालायला सुरुवात केली होती. परंतु रस्ता चुकल्यामुळे स्वाभाविकपणेच उशीर झाला. मि. इंग्लंडला प्रार्थनेचा क्रम पाहण्याची इच्छा होती. यामुळे ते लवकर निघाले होते. मि. इंग्लंडना बापूजींना काही प्रश्न विचारायचे होते. त्यांनासुद्धा बापूजींनी गरम पाणी आणि मध प्यायला लावले. त्यांना ते फार आवडले असे त्या बिचाऱ्यांच्या चेहऱ्यावरून तरी वाटत नव्हते. बापूजींनी तासेकभर प्यारेलालबरोबरच गोष्टी केल्या. साडेसहा वाजता फळांचा रस घेऊन फिरायला निघालो. परंतु बापूजी मात्र प्यारेलालजींबरोबरच गोष्टी करत होते.

फिरून आल्यानंतर दररोजप्रमाणेच कार्यक्रम राहिला. मालीश, आंघोळ वगैरे. मालीश सुरू असताना बापूजी बरोबर एक तास झोपले. रात्री ते दीडेक वाजता झोपले होते. यामुळे खूप थकवा आहे.

जेवणात जव, भाजी, आठ औंस दूध, एक ग्रेपफ्रूट एवढे घेतले. जेवणापूर्वीच पणियालाला जाण्याचा कार्यक्रम भाईंनी ठरवला होता. परंतु बापूजींची तशी इच्छा नव्हती. यामुळे आपल्याला वेळीच निरोप न मिळाल्यामुळे येऊ शकत नाही असे तेथील लोकांना कळवून त्यांनी त्यांची माफी मागितली, आणि लोकांना मिळूनमिसळून राहण्याची, हिंदूंना अस्पृश्यता न पाळण्याविषयी, कोणत्याही जातिजमातीच्या माणसाची उत्पत्ती एकाच शक्तीपासून झालेली असल्यामुळे सर्वांशी बंधुभावाने वागण्याची विनंती केली.

साडेबारा वाजता बापूजींनी पडल्या पडल्या सुऱ्हावर्दीसाहेबांना पाठवावयाच्या पत्राचे श्रुतलेखन करवून घेतले . . . मी पायांना तूप चोळले. दीड ते दोन झोपले. दोन वाजता नारळाचे पाणी घेतले. नंतर मालीशच्या टेबलवर बाहेर उन्हात बापूजींनी कताई केली. आज थंडी वाजत होती. कताई करत असताना मी केलेली नोंद ऐकली. मुख्य मुद्दा थोडक्यात नोंदवायला मला सांगितले. मी म्हणाले, पण तुमचा शब्दंशब्द जर आठवण ठेवून मी लिहिला तर मला त्याचा उपयोग करता येणार नाही काय?

बापू म्हणाले, मी जर मेलो तर माझा वारसा म्हणून तू ते जपून ठेवू शकशील. महादेवने असेच केले होते. त्याची इच्छा तर माझ्या मांडीवर मरायची होती तसेच माझ्या गोष्टी लिहायची होती. त्यांतीलच त्याची एक इच्छा ईश्वराने पूर्ण केली. यामुळे तूसुद्धा माझी कथा लिहिण्याच्या गडबडघाईत नाहीस ना? (बापूजी ही गोष्ट अगदी स्वाभाविक विनोदात सहजपणे बोलून गेले होते, परंतु आज ते दृश्य डोळ्यासमोर उभे राहिले तर डोळ्यात पाणी उभे राहते.)

मी म्हणाले, मी इतकी मोठी लेखिका होऊ शकली तर अजून काय पाहिजे?

बापू म्हणाले, 'असे असेल तर मी ज्या कोणाशी बोलतो त्याची नोंद घ्यायला तू शिकायला पाहिजे. लिहिण्याची ओढ तर तुला आहेच. असे असले तरी या उद्दिष्टापर्यंत तू कशी पोहोचशील? असे जरी असले तरी मला आवडेल असे हे काम आहे. तुला या कामात खूप खूप शिकायला मिळेल.'

माझ्या प्रकृतीसंबंधात बापूजी म्हणाले, 'आता मी तुझ्या आईसारखा आहे. यामुळे तुझी जी काही तक्रार असेल ती तू मला मनमोकळेपणाने सांगत जा. मला तर वाटते की एखाद्या पुरुषालासुद्धा मुलीची आई होऊन तिच्या सर्व प्रकारच्या समस्यांवर उपाययोजना सांगता येऊ शकतात. तुझ्या माध्यमातून मी हा अनुभव घेऊ इच्छितो.'

कातत असतानाच बापूजींनी बरोबर एक तास नोंदवहीबद्दल खूप काही समजावून सांगितले. सव्वा तीन वाजता सतीशबाबू आणि त्यांची पत्नी हेमप्रभादेवी (मां) आले.

सध्या जे काही सुरू आहे त्यासंबंधी त्यांच्याशी गोष्टी केल्या. बापूजींना सात वाजता मौन घ्यायचे होते. पौणेपाच वाजता बापूजींनी भाजी दूध आणि फळांमध्ये दोन संत्री घेतली. प्रार्थनेनंतर फिरले. फिरत असताना मि. इंग्लंडबरोबर गोष्टी केल्या. त्यांना परत पाठवले. साडेसहा वाजता फिरून आल्यानंतर गरम पाणी आणि मध घेतले. नंतर साडेसहा वाजता वर्तमानपत्रांकरिता पाठवायचे प्रार्थनाप्रवचन दुरुस्त करायला बसले. त्या वेळी बापूजींनी कातलेल्या सूताचे ८० तार झाले होते. अशा प्रकारे आज एका तासात त्यांनी 15० तार सुताची कताई केली होती. अंथरुण टाकले. साडे आठ वाजता बापूजी अंथरुणावर पडले. अंथरुणावर पडल्या पडल्या बंगालीचा पाठ केला. बाराखडी लिहिली. मी पाय दाबले, तेल चोळले आणि साडेदहा वाजता झोपले.

श्रीरामपूर,

२३-१२-'४६, सोमवार

आज तर पू. बापूजींचा मौनवार आहे. यामुळे लवकर उठायचे नव्हते. प्रार्थनेच्या वेळीच बापूजींनी मला उठवले. प्रार्थनेनंतर गरम पाणी पिता पिता बापूजींनी रोजनिशी लिहिली. त्यात लिहिले होते -

आज चांगली झोप लागली. सव्वातीन वाजता उठलो. दुःखी होतो. येथील काम कसे पूर्ण होईल? माझ्या अहिंसेनुसार किती आणि कसे? माझ्या अहिंसेला हे ज्ञान आहे काय आणि किती आहे.

गरम पाणी आणि मध घेऊन बापूजींनी स्वतःच टपाल लिहिला. आजच्या टपालात साने गुरुजींना सहभोजनाविषयी लिहिले. ठक्करबापा, मणिलालकाका (दक्षिण आफ्रिका) यांना पत्रे लिहिली. आणि माझ्या पिताश्रींना मी इथे आल्यानंतर बापूजींनी पहिलेच पत्र लिहिले -

"चि. जयसुखलाल,

मनूडीने मला आज सकाळी ६ वाजताच आठवण दिली आणि मी हे लिहितो आहे. मौनवार आहे ना?

"भाई रतिलालने धुनाई आणि तुणाई केलेल्या पेळूंचा नमुना तू मला दिला. मी त्या सर्वांचे सूत कातले. चांगले होते. अशा बारीक कताईकरिता पेळू मोठे होतात आणि ते एखाद्या पानात वा कागदात धरावे लागतात. भाई रतिलालचा उपक्रम यशस्वी होवो,

"मनूडी मजेत आहे आणि ती मला समाधान देते आहे. ती मला सांगत होती की परमानंद गांधी (गांधीजींचे चुलत भाऊ) जितक्या गोड आवाजात रामायण म्हणत असत तितक्याच गोड आवाजात तू रामायण म्हणत असतो. मी जेव्हा हे ऐकले तेव्हा मला पश्चात्ताप झाला. मला जर हे आधी. माहीत असते तर मी तुला निश्चितच थांबायला आणि काही भाग म्हणून दाखवायला सांगितले असते. परमानंद भाईंचा गोड आवाज अजूनही माझ्या कानात घुमतो. तू त्यांना पाहिले असशील असे मला वाटत नाही. कालिदासला (परमानंद गांधींचा मुलगा.) त्यातील थोडासा वारसा मिळाला आहे. आता ईश्वराची इच्छा असेल तेव्हाच आपली भेट होईल. माझी सूचना लक्षात ठेव.

बापूचे आशीर्वाद."

'ईश्वराची इच्छा असेल तेव्हाच आपली भेट होईल.' - परंतु ही भेट कधीच होऊ शकली नाही. बापूजींनी माझ्यावर अट घातली होती की 'हा तर यज्ञ आहे. आपल्या पौराणिक यज्ञात सर्व प्रकारची पवित्रता आवश्यक होती. त्यात काम क्रोध, मोह, लोभ इत्यादींचा त्याग करावा

लागत असतो. यामुळे दोन महिन्यांनंतर जर तुला तुझ्या बापाला वा बहिणींना भेटायला पाहिजे असा मोह झाला तर कसे होईल? मग मी तुला नापास करीन.' माझ्याकरिता ही परीक्षा होती. आणि ईश्वरकृपेने मी या परीक्षेत उत्तीर्ण झाले असे बापूजींना वाटले. तसेच १९४६ मध्ये आम्हा सगळ्यांना कराचीला जायचे होते. त्याआधी माझ्या पिताश्रींना बापूजींनी भेटायला बोलावले. परंतु दुर्दैवाने बापूजींनी बिरलाभवनमध्ये जेव्हा अखेरचा निरोप घेतला तेव्हाच ते येऊन पोहोचू शकले. माझे पिताश्री भेटीच्या उल्हासात महुवाहून रवाना झाले होते, परंतु ईश्वराने त्यांची भेट होऊ दिली नाही ! ईश्वराची लीला अशी अनाकलनीय असते.

# ५. तीन अमूल्य पाठ

श्रीरामपूर,

२४-१२-’४६, सोमवार

आज सकाळी बापूजींनी मला तीन वाजता उठवले. . . . ला पत्र लिहियला लावले. तेवढ्यात प्रार्थनेची वेळ झाल्यामुळे काम सोडले. तोंड वगैरे धुतल्यानंतर प्रार्थना वगैरेंचा नित्यक्रम. गरम पाणी आणि मध घेऊन बापूजींनी आपली रोजनिशी लिहिली. साडेसहा वाजता अननसचा रस घेतला. तेवढ्यात प्यारेलालजी त्यांच्या गावातून आले. सुचेताबहेन कृपलानीसुद्धा आल्या होत्या. फिरत असताना पूर्ण वेळ त्यांच्याबरोबरच गोष्टी सुरू होत्या. आणि मालीशच्या वेळी ते दोघेही आपापल्या गावी गेले.

बापूजींना आज आंघोळ करून येतायेताच साडेबारा वाजून गेले. एक वाजता कुठे जेवू शकले. दररोजपेक्षा जेवायला आज वेळ झाला. माणसाच्या हातून किती तरी टपाल कलकत्त्याला पाठवायचा असल्यामुळे असे झाले होते. त्यात पुष्कळ वेळ गेला. नारळाच्या तेलापासून प्यारेलालजींनी काढलेले लोणी ते ठेवून गेले होते. जेवणात ते लोणी आणि एक खाकरा घेतला. हे लोणी खरे लोणी वा तुपाची गरज चांगल्या प्रकारे भागवू करते. यामुळे दूध केवळ सहा औंसच घेतले.

जेवत असताना कर्नल जीवनसिंगजीबरोबर गोष्टी केल्या. यानंतर बापूजींच्या पायांची तुपाने मालीश करण्याकरिता माझे सगळे काम संपवल्यानंतर दोन वाजताच जाऊ शकले होते. अजूनही मी जेवलेले नसल्यामुळे बापूजी नाराज झाले आणि उद्यापासून ताट घेऊऩ त्यांच्याजवळच जेवायला बसायला सांगितले. इथे दुपारचे जेवण फार उशिरा घेण्याची पद्धत आहे. सकाळी चांगली न्याहरी करतात, दुपारी तीन की साडेतीन वाजता जेवतात आणि सायंकाळी एक तर केवळ फराळ करतात वा उशिरा जेवतात.

बापूजी मात्र म्हणाले, ‘ही पद्धत जर आपल्याला परवडू शकत नसेल तर ती आपण सोडून द्यायला पाहिजे. लवकर उठायचे आणि रात्री दहा की साडेदहा वाजता जेवायचे हे शरीरात जहर टाकण्यासारखे आहे.’

तुपाची मालीश पाच मिनिटच करू दिली. आणि यापुढे सायंकाळी जेवण करताना फलाहार करण्यासंबंधी सुचवले. दुपारी अडीच ते तीन बापूजी झोपले. तीन वाजता नारळाचे पाणी घेऊन काही पत्रे लिहवून घेतली. साडेतीन वाजता कताई केली. साडेचार वाजता पोटावर आणि कपाळावर माती घेतली. बापूजींना बराच थकवा जाणवतो आहे. माती घेतली असताना दोनदा डुलकी घेतली. माझी डायरी ऐकली. अजून थोडक्यात लिहिण्याची सूचना केली.

पाऊणेपाच वाजता सुचिताबहेन वगैरे आले. त्यांनी बापूजींबरोबर खाजगीत चर्चा केली.

सायंकाळच्या जेवणात आठ औंस दूध, एक केळ, आणि एक ग्रेपफ्रूट घेतले. रात्री दहा वाजता बापूजी अंथरुणावर पडले.

कालच्या बापूजींच्या रोजनिशीची नकल करण्याकरिता थांबल्यामुळे मी अकरा वाजता झोपले. थंडी आणि पाऊस दोन्हीही फार जोरात आहेत.

(बापू. श्रीरामपूर)

२५ - १२ - ‘४७

श्रीरामपूर,

२५ - १२ - '४६

आजसुद्धा बापूजी रात्रभर झोपले. प्रार्थनेकरिता साडेतीन वाजता अर्ध्या तासाकरिता उठले होते. तोंड धुतल्यानंतर प्रार्थनेकरिता पाचेक मिनिट वेळ होता. तेवढ्या वेळेत त्यांनी माझ्या दैनंदिनीवर सही केली आणि बंगाली बाराखडी लिहिली.

प्रार्थनेनंतर बापूजी दहाएक मिनिटे झोपल. रस घेऊन कालच्या काही पत्रांवर सह्या केल्या. आणि मलासुद्धा लवकर बंगाली शिकून घ्यायला सांगितले.

सात वाजता फिरायला निघाले. तेव्हा लावण्यलताबहेन आणि मि. इंग्संड आले. त्यांनी ढाक्याच्या ग्लेन ऍंड ऍंथनीकडून नाताळची भेट आणली होती. या भेटीत साबण, रुमाल, रेझर, कात्री, थैली अशा वस्तू होत्या. त्यांचे समाधान व्हावे म्हणून मी आजपासूनच रेझर वापरीन असे आश्वासन बापूजींनी त्यांना दिले. (बापूजींनी हाच रेझर संपूर्ण पदयात्रेत वापरला होता. ही गोष्ट जेव्हा रेझर देणाऱ्या बंधूंना कळली तेव्हा त्यांना खूप आनंद झाला.)

आजकाल फिरतअसताना बापूजी एक पूल ओलांडण्याचा सराव करत असतात. परंतु हा पूल फार लहान होता. यात्रेत मात्र याहून फार मोठे पूल येणार होते. ते ओलांडता यावे म्हणून बापूजी हा सराव करत होते. मलासुद्धा हा सराव चागल्या प्रकारे करून घ्यायला सांगितले.

दुपारी मी तूप चोळत होते. त्या वेळी बापूजी डावपेच असलेले किती तरी इंग्रजी पत्रव्यवहार पाहत होते. ते काम पूर्ण झाल्यानंतर मी बापूजींना म्हणाले, 'तुम्ही मला कॉलेजमध्ये जाऊ दिले असते आणि मला बी. ए. वा एम. ए. करू दिले असते तर मीसुद्धा तुम्ही हे जे इंग्रजीतील काम करत आहा ते सहजपणे करू शकले असते.'

यावर बापूजी म्हणाले, 'मला तर तुला शिकवायचेही होते आणि सोबत अनुभवही घेऊ द्यायचा होता त्याचे काय?'

मी म्हणाले, 'महादेवकाका इतके शिकलेले होते म्हणूनच ते तुमचे वैयक्तिक सचिव म्हणून काम करू शकले ना? आणि इतरही जे इतके मोठे लोक आहेत त्या सर्वांनी पदवी मिळवली आहे. यामुळेच ते इतके वर चढले आहेत ना?'

बापूजी हसले. 'मोठे तितके खोटे. डिग्री ऐवजी तू उपाधी हा शब्द वापर. आणि उपाधी ही खरोखर उपाधीच असते. मी बॅरिस्टर झालो याचा पश्चात्ताप मला आजपर्यंत आहे, आणि म्हणूनच मी . . . ना या उपाधींच्या भानगडीत टाकले ना याचा मला आनंद होतो. मला माहीत असते की यामुळे लोकांना समाधान तर मुळीच मिळत नाही.' आणि खरे सांगायचे तर मी बॅरिस्टर आहे हे तर आजकाल माझ्या ध्यानीमनीही नसते. यामुळे माझ्या या अनुभवावरून मी इतरांना या उपाधीपासून वाचवत असतो. हो, भाषा म्हणून बरेच काही जाणवायलाच पाहिजे. परंतु आजच्या विद्यापीठातील शिक्षणात जी घोकंपट्टी करावी लागत असते तीच मला खुपत असते. गावांमध्ये किती तरी काम पडले आहे. विद्यार्थी स्वतः वाचनपठन केल्यानंतर जितका वेळ काढू शकत असतील आणि त्या वेळात रचनात्मक काम करत असतील तर देशाचा चेहरामोहरा बदलून जाईल. हो, या वाचनामागे ज्ञानेषणा असेल तर गोष्ट वेगळी. असे असेल तर ज्ञानातून वाचन आणि वाचनातून ज्ञान असा मंत्र असायला पाहिजे. परंतु आजच्या विद्यार्थ्यात परीक्षेनंतर वाचन आणि वाचनानंतर परीक्षा ही दृष्टी असते. आणि नंतर? आणि नंतर या ज्ञानाचा उपयोग करून ते पैसा कमावण्यामागे लागतात. कोणी डॉक्टर होतो, कोणी वकील वा बॅरिस्टर किंवा एंजिनिअर. आणि उत्तीर्ण झाल्यानंतर नोकरीची शोधाशोध चालते. माणूस कितीही का शिकेना अखेरीस त्याच्या नशीबी हेच असते. या संपूर्ण शिक्षणानंतर मोठ्यात मोठी नोकरी मिळवणे हेच त्याचे ध्येय असते. यात अपवाद असतातच. चाळीस कोटी प्रजेत सर्वच्या सर्व असे करतात असे म्हणायचा माझा हेतू नाही. परंतु शिक्षणानंतर आज हाच नियम झाला आहे. अमूक अभ्यास केला तरच सेवा करता येते हाच भ्रम आहे. कोणत्याही परिस्थितीत जरी असलो तरी माणूस सेवा करू शकतो. ईश्वराने माणसाला अशी शक्ती दिली आहे की कोणी निमित्त सांगूच शकत नाही. नाही

तर माणसाची जातच इतकी भयंकर आहे की त्याला जर काही करायचे नसेल तर तो निमित्त शोधून काढत असतो. तू पाहशील की कोणाजवळ पैसा असतो, तर कोणी शारीरिक काम करू शकतो, कोणी बौद्धिक काम करतो तर कोणाची जीभ, हात, पाय, डोळे, कान, वगैरेसुद्धा सेवेचे काम करू शकतात. हे तर मी तुला केवळ उदाहरण दिले आहे. अशाच किती तरी शक्ती आपल्यामध्ये आहेत. त्या कृष्णार्पण केल्या की आपल्याला पुरेपूर फळ मिळते. ज्याची शक्ती करोड देण्याची असते आणि त्याने अर्धा करोडच दिले तर त्याला ५०% गुणच मिळतील. परंतु ज्याची शक्ती केवळ एक पै देण्याची असेल आणि त्याने जरी एकच पै दिली तर त्याला १००% गुण मिळतील.

वर्तन साफ असले पाहिजे, स्वार्थबुद्धीने आणि भीतीने माणूस जे काही करतो तिला सेवा समजता येऊ शकत नाही. जी गोष्ट ईश्वराला समर्पित असते तिच्यात स्वार्थाला स्थानच नसते. अशी सेवा करणाराच्या शक्तीत दिवसेंदिवस वाढ होत असते. ते जो उद्योग करत असतात तोसुद्धा सेवाभावनेने. अशा प्रकारे जे सेवापरायण असतात त्यांच्या हसण्याबोलण्यात, खाण्यापिण्यात, प्रत्येक क्रियेत सेवाभाव भरलेला असतो. यामुळे क्याचे कोणतेही कार्य निर्दोष असते. अशा भक्ताला ईश्वर आवश्यक ती सर्व प्रकारची शक्ती देत असतो. हे सांगण्याकरिताच हा श्लोक आहे -

अनन्यश्चिंतयंतो मा ये जना पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम ।।
मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयन्तः परस्परम् ।
कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च ।।
तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् ।
वदामि बुद्धियोगं तं येनमामुपयान्ति ते ।।

**(जे लोक अनन्यभावाने माझे चिंतन करत असतात, ज्यांचा नित्य माझ्यातच वास असतो, जे मला सतत भजत असतात, त्यांच्या योगक्षेमाची मी सतत काळजी घेत असतो. यामुळे फलाशा सोडून माझे काम करा.माझ्यात ज्याचे चित्त नेहमीच रमत असते आणि जो माझ्याकरिता प्राणार्पण करणारा असतो एकमेकांना उपदेश करत असताना माझेच कीर्तन करत असतात, जे समाधानात आणि आनंदात राहतात आणि माझ्यात तल्लीन होऊन जातात, माझी प्रेमाने भक्ती करतात त्यांना मी ज्ञान देत असतो आणि त्या ज्ञानाद्वारे ते मला प्राप्त करत असतात.)**

या श्लोकाचा तू विचार कर. तुझ्याकरिता हा फार जड आहे. यामुळे याकरिता महाश्रद्धेची आवश्यकता आहे. ईश्वराचे काम करत असताना तू मिळवलेल्या पदवीचा तू कसा आणि काय उपयोग करशील? मला तुझ्या मनावर हेच ठसवायचे आहे. आणि कदाचित तू जर शिकत असतीस, महाविद्यालयात जात असतीस तर तू काय झाली असतीस? माझे चालले असते तर मी महाविद्यालयामधील सर्वच मुलामुलींना या हिंसक दंगलीत कामाला लावले असते. आपल्या विद्यार्थ्यांमधील मोह जर खरोखरच गेला तर संपूर्ण जगाच्या नकाशात तू पाहशील की जो हिंदुस्थान बिंदूमात्र आहे तो समुद्रासारखे होऊन जाईल. “माणसाने अंथरुण पाहून पाय पसरावे” हा सुंदर वाक्प्रचार काही केवळ लहान कुटुंबांकरिताच नाही, तो मोठमोठ्या देशांनाही लागू पडतो. जसा देश असेल तशी रीतभात असली पाहिजे, तसे कामकाज असले पाहिजे. परंतु इंग्रजाचे जे अनुकरण करू नये ते आपल्याला करावे लागत आहे. “हंस कावळ्यासारखा चालू लागला तर हंस मरूनच जाईल. परंतु तो जर स्वतःची चाल चालेल तर त्यामुळे तो जिंकेल.” ही गोष्ट तुला माहीत आहे ना? गोष्टीसद्धा केवळ गोष्टींकरिता नसतात. त्यांच्यात किती महान उद्देश भरलेला असतो ! हिंदुस्थानातही अर्थातर पुष्कळ वाईट प्रथा आहेत. असे असूनही हिंदुस्थान जर स्वतःच्या चालीने चालेल वा गती ठेवील तर कल्पनाही करता येणार नाही असे स्थान त्याला मिळेल.

'हिंदुस्थानची संस्कृती अतुलनीय आहे हे याचे कारण आहे. मी तर तुला जसजसा गीता समजावून सांगत जातो तसतसा तिच्यातून नवीन अर्थ निघत जातो. परंतु आज जर इतकेच पचवशील तर तितके पुरे आहे. हे लिहून काढ. पण लिहायचे म्हणून लिहू नकोस. गीतेचा अर्थ अंमलात आणण्याकरिता. आजचा संपूर्ण पाठ गीतेवर आधारलेला आहे.'

एका लहानशा विनोदावरून जीवनाचा पाठ म्हणून पंचवीस मिनिट ही अमृतवाणी ऐकायला मिळाली. नंतर वेळ झाला म्हणून उठून गेले.

आज बापूजी झोपू शकले नाही याचे मला वाईट वाटले. हे मी सांगण्यापूर्वीच बापूजी म्हणाले, 'मी झोपू शकलो नाही म्हणून तू वाईट वाटून घेऊ नकोस. ईश्वर मला कसा निभवून घेतो हे त्याचे त्याला माहीत. मला तर नवलच वाटते. सकाळी उठलो. मालीश सुरू असताना सतीशबाबू पदयात्रेसंबंधी बोलायला आले होते. यामुळे झोपू शकलो नाही. आणि आता तू सहज विनोद केला त्यावरून माझ्या हृदयात जे भरलेले होते ते सर्व तुझ्यावर ओतले. आता मला छान वाटते. जा आता, नारळाचे पाणी आण. देवाची इच्छा असेल तर माती घेता घेताच झोपून जाईन'.

जवळपास चार वाजता एक सामाजिक कार्यकर्त्याला, जो इथे फार चांगले काम करत होता, माझ्याकरिता शिंप्याकडे एक पंजाबी शैलीचा पोषाख करायला टाकायला सांगितले होते. ते ते कपडे घेऊन आले. त्यांनी बिल घ्यायला नकार दिला. बापूजींबद्दलच्या भक्तीमुळेच त्याने हे बिल घ्यायला नकार दिला होता. मी बापूजींच्या कुटुंबातील मुलगी होते आणि बापूजींनी माझी ओळख नात म्हणून करून दिलेली असल्यामुळे त्यांची पैसे घेण्याची इच्छा नव्हती.

परंतु इथे तर हिशेबच वेगळा होता. बापूजींनी विचारले, 'तू कुठून आणशील? तुझ्याजवळ जो पैसा आहे तो सार्वजनिक कार्याकरिता आहे. तो मी जरी असेन तरी माझ्या गरजेकरिता तू एक पैसुद्धा व्यर्थ खर्च करायला नको. शिवाय या पोरीच्या वडिलांची परिस्थिती हा खर्च करू शकण्यासारखी आहे. . . . समाजिक कार्यकर्त्याने सार्वजनिक पैसा कसा वापरावा याचा

कटाक्षाने विचार केला पाहिजे. आज तू मनूकरिता असे म्हणाला, उद्या तू तुझ्या नातलगाकरिता असे करणार नाही याची काय खात्री? लक्षात ठेव की मी तुला चांगला ओळखत असल्यामुळे मला तुझ्याबद्दल कोणतीही शंका नाही. तुला मी हे सर्व प्रेमाने सांगतो आहे. यामुळेच मी तुम्हांला वेळीच सावध केले आहे.'

हा आज मिळालेला दुसरा पाठ होता. असाच एक सुंदर पाठ रात्री मिळाला. माझ्याजवळ एक पश्मिना शालीचा तुकडा होता. तो रात्री थंडीमुळे बापूजी डोक्याला बांधत असत. प्रार्थनेतून आल्यानंतर आज हा जीर्ण झालेला तुकडा बापूजींना न देता नवीन गरम तुकडा दिला. पण बापूजी त्याला कबूल झाले नाही. म्हणाले, 'तू एक कौडी कमावत नाही, ना मी कमावतो. ना तुझ्याप्रमाणे माझ्या बापकमाईवर माझा खर्च चालतो. मी तर गरीब माणूस आहे. अशा प्रकारे शाल फेकून देणे कसे परवडेल? आणि या शालीला ठिगळ लावतो.' असे म्हणून बापूजींनी त्या शालीला ठिगळ लावले. अशात रात्रीचे साडे अकरा होऊन गेले.

बापूजींनी ठिगळ इतके सुंदर जोडले होते की तितके सुंदर एखादा शिंपी वा एखादा कुशल भगिनीच जोडू शकली असती. त्यांचा शिवणसुद्धा तितकीच सरळ होती.

हा असा महापुरुष होता की त्याने ठरवले असते तर पश्मिनाचे तुकडे मिळवू शकला असता. परंतु त्यांनी तर तर या ठिगळ लावलेल्या शालीचाच संपूर्ण पदयात्रेत उपयोग केला. हिंदुस्थानचे ठिगळ जोडणारे बापू, अनेक क्लेशपूर्ण वातावरणातही सर्वांना जोडून ठेवणारे बापू म्हणाले, 'सांग, 'माझी परीक्षा घेतल्यानंतर मला चांगले शिवणकाम येते की नाही? (सुदैवाने हा सुईदोरा आणि ठिगळ लावलेली ही शाल मला मिळालेल्या अनेक पाठांची आठवण म्हणून माझ्याजवळ जपून ठेवलेली आहे.)

आज दिवसभरात एकामागून एक असे तीन पाठ मला मिळाले.

# ६. पंडितजी भेटायला आले

श्रीरामपूर,

२६ - १२ - '४६

बापूजी आज तीन वाजता उठले. . . . ना बापूजींनी पत्रे लिहायला लावली. खूप थंडी होती. बापूजी पडल्या पडल्या श्रुतलेखन करवून घेत होते. एक दोन वेळा डुलकी लागली होती. बापूजींची अशी डुलकी लागली की मी त्यांच्या दैनंदिनीची नकल माझ्या स्वतःकरिता करून टाकत असते. दोन दिवसांपासून नकल करायची राहून गेली होती. इतकी व्यर्थ मेहनत करू नको असे बापूजी मला म्हणाले होते. त्यावर मी म्हणाले, तुमच्या डायरीत तुम्ही माझा उल्लेख करत असता. त्याची जर मी नकल केली तर ती माझ्याजवळ आयुष्यभर राहील. याकरिता मी नकल करत असते. प्रार्थनेत आज . . . नव्हते. काल रात्री काझिरखिलला गेल्यानंतर परत आले नाही. बापूजी फार व्यथित झाले. प्रार्थनेनंतर . . . विषयी . . . शी गोष्टी केल्या, आणि मग कालचे प्रार्थनाप्रवचन दुरुस्त केले. मी पाणी दिले. मी कालची रोजनिशी लिहिली. अर्धा तास कताई केली. साडेसात वाजता आम्ही फिरायला निघालो. फिरत असताना बापूजी विचारात मग्न होते. . . . शीच गोष्टी केल्या. दररोजप्रमाणे पूल ओलांडण्याचा सराव करत असतात. पाय धूत असताना . . . ला . . . प्रार्थनेत हजर नसल्याबद्दल विचारले. त्यांच्याबरोबर गोष्टी केल्या. . . . विचारून न गेल्याबद्दल बापू . . . ' ते . . . ना म्हणाले, 'त्यांच्यावर माझा कोणताही हक्क नाही. माझ्या एखाद्या मुलाप्रमाणे ते राहत होते. यामुळे इतके सांगणे त्यांचे कर्तव्य होते. कोणी मला सोडले तर मी फार खुश होतो. ही पोरगीही मला सोडू शकते. परंतु मी तर हिला वचन दिले आहे की जोपर्यंत मी जिवंत आहे तोपर्यंत हिला सोडणार नाही. यामुळे मी हिला सोडणार नाही. तू मला सोडू शकतो. तीसुद्धा मला सोडू शकते. यातच माझी परीक्षा आहे. ईश्वराला कदाचित माझी परीक्षा घ्यायची असेल. यामुळे तर तो असे अकल्पित प्रसंग उभे करून राहिलेला नाही ना? . . .

ना असे वाटते की मी . . . मध्ये राहण्यात चूक केली आहे. परंतु माझे काय मत आहे? परंतु माझी कसोटी यातच आहे.' बापूजींनी अतिशय गंभीरपणे . . . समोर आपले हृदय उघडे केले.

या गोष्टी ऐकण्याकरिता मी उभी असल्यामुळे मला आंघोळीला उशीर झाला. जेवायच्याआधी बापूजींच्या पायांना तुपाची मालीश करायला मी बसले. बापूजींनी माझ्यावर ठपका ठेवला. ते म्हणाले, 'हे मला पटले नाही. कितीही जरी रसाळ गोष्टी असल्या तरी तू तुझ्या नियमांचा भग होऊ द्यायला नको. परंतु . . . ला सांगितलेल्या गोष्टी तूसुद्धा समजून घेण्यासारख्या तर होत्याच, यामुळे त्याबद्दल तुला माफी. तू माझ्या पायाला तूप चोळत असल्यामुळे तुला माफ करण्याची इच्छा तर होतीच. परंतु तशी तुझी इच्छा नसल्यामुऴे हा सर्व वेळ मी तू किती कौशल्याने याला प्रतिसाद देते हे पाहत होतो. याचा अर्थ असा नाही की मी कसा तरी घाईघाईत जेवण करायला येणार होतो.'

पं. जवाहरलालजी २७ला येणार येणार आहेत अशी बातमी तारेने आली आहे. त्यांच्या सुरक्षिततेविषयी आणि व्यवस्थेविषयी निर्मळदांबरोबर चर्चा केली. बापूजींचा कमोड घेऊन जायला मला सांगितले. आणि जेवणाची व्यवस्था आझाद हिंद फौजेचे कर्नल जीवनसिंगजी करणार होते.

दुपारी माझी कालची आणि आजची अर्धवट रोजनिशी ऐकली. त्यांनी स्वतः ती वरवर पाहिली. अजून सही केली नाही. सायंकाळी जास्त खाऊ नये म्हणून गरम पाणी आणि मधच घेतले. पाणी पिऊन बापूजींनी अर्धा तास कताई केली.

बापूजी वापरत होते तो नॅपकिन अगदीच जीर्ण झाला होता. नवीन नॅपकीन देण्याआधी मी खूप विचार केला. बुद्धी कशी वापरावी काही सुचेना. आणि या नॅपकीनला जोड लावून तो बापूजींना द्यावा म्हणजे मागे शालीसारखे जे झाले होते तसे होणार माही असे मला वाटले. खूप विचार केला पण बुद्धी चालली नाही, अखेरीस नवीन नॅपकीन त्यांच्या हाती ठेवला. बापूजी

म्हणाले, 'अजून जुना चालला असता.' (माझ्या मनात होतेच की बापूजींनी काहीही केले तरी आता जीर्ण झालेला नॅपकिन द्यायचाच नाही. आणि तो जोडण्याकरितासुद्धा काहीही नव्हते. आणि अशा अडचणीच्या परिस्थितीत तुरपाई करायचे साधनसुद्धा नव्हते. मग मी विशेष असे काय करू शकत होते.) यामुळे ताबडतोब मी उत्तर दिले की मी खूप अक्कल चालवली होती. परंतु हा टाकून देण्याशिवाय उपाय नव्हता. आता काय करायचे ते तुम्हीच पाहा.

बापूजी हसले. कान पकडून म्हणाले, 'पण हा रुमाल नवीन करून मी अजून दोन महिने चालवला तर?

मी म्हणाले, 'पण तुम्ही हा चालवूच शकणार नाही.'

अखेरीस त्यांनी तो रुमाल दुप्पट केला. वरून तो चौरस होईल असा बरोबर जोडला. आणि रफू केला. (या रुमालाचे आयुष्य तर दोन महिन्यांनी वाढलेच, परंतु मी नंतर हट्टच धरला आणि एक नमुना म्हणून मला हा जपून ठेवायचा आहे असे म्हणून मी तो घेऊन टाकला. हा नॅपकीन इतका सुंदर झाला आहे की वरून पाहिले तर दुलईत पंजा टाकायची जी पद्धत आहे त्याप्रमाणे तो चौरस करून चोहोकडून जोडला.)

बापूजींच्या या कौशल्याचा आणि कलात्मक काटकसरीचा पाठ कालच्या शालीच्या पाठानंतर आज वेगळ्याच प्रकारे मिळाला.

एक बहीण मुंबईत डॉक्टर आहे. ती नोआखालीत सेवा करण्याकरिता येण्याबद्दल म्हणते आहे. परंतु बापूजी तिला म्हणाले - तुम्ही आधी सुऱ्हावर्दीसाहेबांची परवानगी घ्या, मग खुशाल येऊ शकता.

बापूजी रात्री साडेनऊ वाजता झोपले. त्याआधी माझी रोजनिशी पूर्ण ऐकली. सही केली, मग अंथरुणावर पडले.

(बापू)

श्रीरामपूर,

२७ - १२ - '४६

बापूजी आज रात्री दोन वाजताच उठले. मला उठवले. माझ्या छीटचा पंजाबी सलवारकुरता तयार झाला होता. बापूजींनी विचारले, 'या छीटकरिता कोणत्या प्रकारची खादी घेतली होती? त्याबद्दल . . .  ला सांगिले होते?'

मी म्हणाले, 'हे कापड . . . ने आणले नाही. तुम्ही बिरलाजींच्या माणसाला सांगितले होते. त्यांनी आणले.'

मग तर यात नक्कीच दोष असेल? छीट चांगली आणली होती आणि सलवारकुरताही घालून फाडला होता. पण हे कपडे घातले तर आपण चांगले दिसतो ही भावना जर मनात असेल तर हे कपडे काढून टाक. ज्याप्रमाणे माणूस स्वादाकरिता अन्न आंबट, गोड, तिखट वगैरे करतो, पण त्याचे शरीर एक देवस्थान असते, त्याचा उपयोग सेवेकरिता झाला पाहिजे. आपले शरीर पौष्टिक पदार्थ खाल्ल्याने टिकू शकते. अशी वृत्ती अंगी बाणवली पाहिजे. असे केले तर माणसाचे जीवन भव्य होते. हीच गोष्ट कापडाची आहे. कपडे शरीर झाकण्याकरिता, शरीराचे थंडीगरमीपासून रक्षण करण्याकरिता असतात. फॅशन दाखवण्याकरिता नाही. आज तर सर्व फॅशन मागे लागले आहेत. मुली बिनबाह्यांचे पोलके घालतात. तलम साड्या नेसतात. पोलकेसुद्धा तलम कापडाचे आणि शरीराला घट्ट धरून ठेवतील असे असतात. मला तर असे इतस्ततः भरकटणे खूप दिसत असते आणि मनातून मी दुःखी होत असतो. आपली संस्कृती या भगिनीच गमावतील.

'तंग कपडे घातल्यामुळे श्वासोच्छ्वास चांगल्या प्रकारे करता येत नाही. त्यामुळे फुफ्फुस खराब होतात. परिणामी क्षयासारखे रोग होतात. हिंदुस्थानात पुरुषांपेक्षाही स्त्रिया या रोगाला जास्त बळी पडतात. त्याची जी अनेक कारणे आहेत त्यापैकी एक कारण हेसुद्धा आहे.

'केसांचेसुद्धा असेच आहे. मी तुला केसांच्या साधेपणाबद्दलसुद्धा सांगितले होते. केसात जितका साधेपणा असेल तितके केस सुंदर वाटतील. केससुद्धा माणसाच्या रक्षणार्थ आहेत. ईश्वराने जे काही दिले आहे ते सदुपयोगाकरिताच दिले आहे. कोणतीही गोष्ट बेकार नाही.

'तुला सांगायची दुसरी गोष्ट ही आहे की तू . . . शी वा इतर कोणाशी गोष्टी करण्यात वेळ वाया घालवत जाऊ नको. तुझे वय . . . आहे. आणि मी तर माझेच उदाहरण तुला देतो. समवयस्क मुलांच्या कुसंगतीत पडल्यामुळे मी मांसाहार केला होता आणि (सोन्याच्या) कड्याची चोरी केली होती. समवयस्कांमध्ये जर समंजसपणाची शक्ती असेल आणि एकमेकांच्या गुणांचेच अनुसरण करायचे, अवगुणांचे नाही असा निर्धार असेल तर दोघांचीही उन्नती होत असते. नाही तर सामान्यपणे आपण अवगुणच शिकतो आणि दोघांचाही अधःपात होत जातो. आवश्यक तितक्याच लोकांबरोबर गोष्टी कराव्या. . . . गुण अवगुणांना काढून टाकू शकतात, परंतु अवगुण अवगुणांना कसे काढून टाकू शकतील? . . . खूप कुशल आहे. असे असले तरी माणसात कोणता ना कोणता असा दोष शिरूनच जात असतो की जो जो सगळ्यांना आच्छादून टाकत असतो. पण मला वाटते की माणसाची परीक्षा घेण्यासाठीच ईश्वर माणसात असा अवगुण टाकून देतो आणि मग त्याची परीक्षा घेत राहतो. माणसाच्या लक्षात जर तो अवगुण येईल तर मग काय सांगायचे? मग तो माणूस माणूस राहत नाही, तो तर अनंत शक्तीत लीन होऊन जात असतो. अशा मनुष्यत्वात भव्यता असते.

मानवजीवनाचे हे तत्त्वज्ञान बापूजींनी रात्री अडीच ते साडेतीनच्या दरम्यान समजावून सांगितले. प्रार्थनेला थोडा वेळ होता. तेवढ्या वेळात माझ्या दोन दिवसांच्या दैनंदिनींवर सह्या केल्या. मला म्हणाले, 'तू इतकी लांब रोजनिशी लिहू शकतेस याची मला कल्पना नव्हती. मला आवडली. तू मला ही दररोज वाचायला लावत जा आणि आठवण ठेवून माझी सही घेत जा. या सहीची किंमत तुला आज कळणार नाही, परंतु भविष्यात मी तुला दिवसेंदिवस जे काही देत असतो त्यात मी माझे हृदय ओतलेले असते. ते सुरक्षित राहिले पाहिजे. यामुळे तुझे कच्चे वय

पाहता या सर्व नोंदींवर माझी सही असणे आवश्यक आहे. परंतु मी तुझ्या रोजनिशीवर सही करतो म्हणून तू फुगून गेली असे होऊ नये. किती तरी वेळा असे वाटते. की मी तर आई जशी मुलीला शिकवत असते तसा तुला शिकवतो आहे.'

जवाहरलालजी येणार असल्यामुळे त्यांच्याकरिता हा खड्डयाचा संडास तयार करायला लावला. त्यात बापूजींनी काही सुधारणा सुचवल्या. त्या करवण्यात सकाळचा बराच वेळ गेला.

बाकीचा दिनक्रम जवळपास दररोजप्रमाणे चालला. जेवणात सकाळी रोजप्रमाणेच पदार्थ घेतले. सायंकाळी दुधाबरोबर एक खाकरा घेतला. बापूजी म्हणत होते, आज आज दिवसभार बापूजी खूप बोलत होते. . . . शी गोष्टी करत होते. आणि त्या जवळपास खाजगीप्रमाणेच होत्या. यामुळे मला सुटी मिळाल्यासारखे होते. माझे लिहिण्याचे बरेचसे काम मी पूर्ण करून टाकले.

. . . ने ऍंटिप्लोजेस्टाईन मागवले होते. परंतु बापूजींनी काळी माती घेऊन तिला पातळ कापडाने चाळायला लावली आणि ती माती . . . ला दिली. ती माती गरम करून ती भिजेल इतके तिच्यात पाणी टाकायला लावले. ती गरम करून ऍंटिप्लोजेस्टाईनच्या लेपाप्रमाणे लावायला सांगितले. मातीच्या या ऍंटिप्लोजेस्टाईनमध्ये फार गुण आहेत अशी बापूजींची मान्यता आहे.

(बापू)

बापूजींनी त्यांच्या रोजनिशीत लिहिले -

आज सकाळी दोन वाजता उठलो. २। वाजता मनुडीला उठवले. तिला . . . विषयी समजावून सांगितले. कपड्यांच्या, केसांच्या साधेपणाबद्दल. तसेच . . . कोणाबरोबर गोष्टी करत बसण्यासंबंधीही. . . आणि अनेकदा सोबतीचाही प्रभाव पडत असतो. त्याविषयी बोललो. सहीबद्दल समजावून सांगितले. तिला व्यवस्थित कळले. प्रार्थनेनंतर बापूजींनी . . . शी गोष्टी केल्या. त्यात चांगलाच वेळ गेला. बंगाली पाठ केला. एवढ्यात

५।।। वाजून गेले. . . . आजारी आहे. तिला पत्रात लिहिले की, वैद्य, डॉक्टर बाहेरून बोलावू नकोस. पंचतत्त्वांना परमेश्वरी कृपेचा आधार असेल तोपर्यंतच ते टिकाव धरतील.

ठक्कर बापा आले. जवाहरलालजी वगैरे येणार आहेत. परंतु रात्रीचे साडेनऊ वाजेपर्यंत तरी आले नव्हते. बापांबरोबर थोड्या गोष्टी. साडेनऊ वाजता झोपायची तयारी.

श्रीरामपूर,

२८ - १२ - '४६

आज रात्री बापूजी अडीच वाजताच उठून गेले होते. परंतु मला त्यांनी थोपटून झोपवले. आणि आज त्यांनी स्वतःच सर्व लेखनकाम केले. प्रार्थनेच्या वेळी त्यांनी मला उठवले. प्रार्थना वगैरे नित्यक्रम रोजप्रमाणे.

साडेसात वाजता फिरत असताना जवाहरलालजी आणि मृदुलाबहेन आले. तेसुद्धा बापूजींबरोबर फिरायला आले. पूल ओलांडण्याचा बापूजी जो सराव करत होते त्याची पडितजींना खूप गंमत वाटली. पंडितजी तर दोन पावलात तो पूल ओलांडून गेले. परतत असताना त्यांची व्यवस्था बरोबर आहे की नाही याकडे नीट लक्ष ठेवायला बापूजींनी मला सांगितले होते. बापूजींच्या सांगण्यानुसार बापूजींचा कमोड मी पंडितजींच्या राहण्याच्या ठिकाणी घेऊन गेले होते. हे पाहून पंडितजी माझ्यावर नाराज झाले. म्हणाले 'यामुळे बापूंना किती त्रास होईल हे कळण्याइतकीही तुला अक्कल नाही काय? बापूंचा कमोड आम्ही कसा वापरू शकतो? मी इतका नाजूक माणूस नाही ! '

मी म्हणाले, "लेकीन बापूने कहा इसलिए मै लायी".

पंडितजी अजूनच नाराज होत ते म्हणाले, 'तू बापूंची नाराजी सहन करायला पाहिजे होती. बापूंना सांभाळण्याची जबाबदारी तुझी आहे ! मग त्यांना कशाची किती आवश्यकता आहे हे

पाहणे तुझे काम आहे ना? बापू तर असे आहेत की स्वतः त्रास सहन करतील पण दुसऱ्याच्या सगळ्या गरजांची काळजी घेतील ! असे आहेत बापू ! परंतु तरीही मी म्हणेन की मी तर तरुण माणूस आहे. कुठेही जाऊ शकेन. परंतु बापूच्या गरजेच्या या ज्या गोष्टी आहेत त्या तू कोणालाही द्यायला नको. बापूंनी मारून जरी टाकले तरी तू घाबरू नको. बापू मारणार नाही.'

हे शेवटचे वाक्य बोलत असताना पंडितच्या चेहऱ्यावरील नाराजीचे भाव बदलले आणि एकदम विनोदाचे भाव आले. मुलाला रागावल्यानंतर वडील अनेकदा प्रेमाने त्याला समजावत असतात तसेच. मला अतिशय प्रेमपूर्वक समजावून सांगत म्हणाले, 'जा आणि बापूंना सांग की जवाहरलाल मनाई करून राहिले आहेत ! नंतर त्यांनी बापूंजींची प्रकृती कशी असते, जेवणात काय घेतात वगैरे विचारपूस केली.'

पंडितजींच्या बापूंबद्दलच्या भक्तीबद्दल कोणाला माहीत नाही? परंतु तिचे साक्षात दर्शन झाल्यानंतर पावनता अनुभवली. उपदेशाच्या या किती तरी शब्दांमध्ये त्यांच्या भावपूर्ण हृदयातील जोम होता, तर काही वाक्यात अतिशय हळूवार शब्दांतून सौम्य भावाभिव्यक्ती झाली होती. त्याचबरोबर त्यांच्या विनोदी शब्दांचा ध्वनी अजूनही कानात गुंजारव करतो आहे.

बापूजी काही तरी लिहिण्यात मग्न झालेले होते. या वेळेचा उपयोग करून पंडितजी जे म्हणाले होते ते लिहून घेण्याची मला संधी मिळाली. मालीश, आंघोळ इत्यादी बापूजींची कामे अजून व्हायचीच आहेत. आज खूप उशीर होईल अशी शक्यता आहे. मालीश सुरू असताना मी बापूजींना वरील गोष्ट सांगितली. बापूजी इतकेच म्हणाले - हा माणूस असाच आहे. आता हा कमोड वापरणार नाही. राहू दे.

ठक्करबापांची प्रकृती चांगली नसूनही ते इथे येऊन पोहोचले आहेत. बापू म्हणाले, 'सध्या हे असे काही काम करत आहेत की चांगले चांगले तरुणसुद्धा यांच्यासमोर लाजतील.'

जेवत असताना बापूजी पंडतजींशी गोष्टी करत होते. त्यांना खाकरा आणि प्यारेलालजींनी विशषत्वाने तयार केलेले खोपऱ्याचे लोणी दिले. पंडितजींना ते चाखायला लावले. ते सांगत असताना बापूजी म्हणाले, ‘ज्या माणसाजवळ नारळपाक असेल त्याला अन्नधान्याची गरजच नाही. नाराळाचे पाणीसुद्धा अन्न म्हणून वापरता येऊ शकते. नारळाचे दूध खाता येऊ शकते. नारळाचे तेल सहजपणे काढता येऊ शकते. आजच्या भेसळ केलेल्या तुपापेक्षा तर ते खूप पौष्टिक असते. शिवाय त्याचे जे खोपरे निघते त्याची मिठाई करता येते. (या मिठाईला बंगालीत संदेश म्हणतात. त्या मिठाईचीसुद्धा पंडितजींना चव घ्यायला लावली.) हिदुस्थानात असा पुष्कळ प्रदेश आहे की जिथे ताडगुळाचा, नारळाचा उद्योग विकसित करता येऊ शकतो. आणि असे करून बरेच धान्य वाचवता येऊ शकते. बंगालमध्ये असा भरपूर निसर्ग असूनही आज बंगाल कंगालीच्या अवस्थेत आला आहे. लोकांचा आळसच याकरिता कारणीभूत आहे. मला तरी याकरिता दुसरे कारण दिसत नाही. आपल्याला निसर्गाने तर अमाप दिले आहे, पण माणसाचा आळस त्याला खात चालला आहे.’ या गोष्टीनंतर जवळपास दीड तास त्यांनी खाजगीत चर्चा केली.

एखादा शहाणासुरता मुलगा असावा. वडिलांपासून त्याला थोडा वेळ दूर जावे लागावे आणि बापलेकाची जेव्हा परत भेट होते तेव्हा बापाच्या गैरहजेरीत जे काही बरेवाईच झालेले असते ते सर्व जेव्हा मुलगा बापाला प्रामाणिकपणे सांगतो तेव्हा आणि त्याच्याकडून योग्य मार्गदर्शन मिळवतो तसे हे दृश्य होते. हे दोघेजण या मातीच्या झोपडीत एका गादीवर बसून देशाच्या भूत, वर्तमान आणि भविष्यकालीन समस्यांची आता यावेळी चर्चा करत होते. दिल्ली सोडून बापूजी इथे आले तेव्हापासून ज्या काही घटना घडल्या होत्या, देशात आता जे काही घडणे सुरू आहे आणि पुढे जे काही घडण्याची शक्यता असेल, त्यातून कोणता मार्ग काढावा, तो कसा काढावा यासंबंधी विचारविनिमय करत होते ! यासंबंधी पंडितजी बापूजींकडून मार्गदर्शन घेत होते. मला किंचित जरी चित्रकलेची आवड असती तरी मी शब्दांमधून ते अभिव्यक्त करण्याचा

प्रयत्न करण्याऐवजी चित्रच काढत बसले असते. इतके भव्य ते दृश्य होते. जवळपास ११ वाजतापासून तर ३.३० पर्यंत पंडितजी, शंकररावजी, कृपलानीजी वगैरे पाहूण्याबरोबर एकामागून एक विषयावर विचारविनिमय करण्यातच हा सगळा वेळ गेला.

या पाहूण्याचा वेळ वाया जाऊ नये म्हणून आणि उद्या ३.३० वाजताच चर्चेला सुरुवात करता यावी म्हणून बापूजींनी दुपारी ३.३० वाजताच मौन घेतले. सायंकाळच्या प्रार्थनेत सर्व पाहुणे आले होते आणि जवाहरलालजी आणि कृपलानीजींनी भाषणे केली.

सायंकाळी थकवा आलेला असल्यामुळे बापूजींनी सहा औंस दूध आणि फळेच घेतली. रात्री साडेनऊ वाजता राम मनोहर लोहिया आले.

बापूजी रात्री साडेनऊ नंतर झोपले.

श्रीरामपूर,

२९ - १२ - '४६

आज बापूजी ३.४५ वाजता उठले. पंडितजीकरिता काही लेखन करायला सुरुवात केली. तेवढ्यात प्रार्थनेची वेळ झाली. प्रार्थना वगैरे नित्यकर्मानंतर बापूजींनी परवाचे भाषण दुरुस्त केले.

७.३० वाजता फिरायला निघालो. फिरताना सर्वच सोबत होते. बापूंचे मौन असल्यामुळे विशेष अशी कोणतीही चर्चा झाली नाही. बाकी मालीश, आंघोळीनंतर ११ ते १पर्यंत बापूजी पंडितजींबरोबर होते. पंडितजींना जे काही सांगायचे होते ते ते सांगत होते आणि बापूजींना जर काही विचारायचे असले तर ते लिहून विचारत होते. दोन ते अडीचपर्यंत बापूजींनी आराम केला. पाहूण्यांची गर्दी झालेली होती. यामुळे बापूजींनी माती घेतली तेव्हाच तूप चोळायचीसुद्धा सूचना केली. उठल्यानंतर लगेच परत पंडितजींना बोलावले. अडीच ते चार पंडितजींबरोबर. प्रार्थनेनंतर

पंडितजी, शंकररावजी, मृदुलाबहेन, कृपलानीजी या सर्वांबरोबर चर्चा केली. आजसुद्धा सायंकाळचे जेवण हलकेच घेतले. बिहारमधील दंगलींमुळे बापूजी फार दुःखी झाले आहेत.

पू. ठक्करबापांना आज ताप आला नाही. दिवसभरात आज बापू कताई करू शकले नव्हते. यामुळे आता नऊ वाजलेले असताना ते कताई करायला बसले. कताई करत असतानाच वार्ताहरांकडून वर्तमानपत्रे ऐकत होते. आणि मी जवळ बसून माझी डायरी लिहीते आहे. साडेनऊवाजेपर्यंत कताई केल्यानंतर बापूजींनी काही लेखनकाम केले आणि साडेनऊ वाजता ते अंथरुणावर पडले.

श्रीरामपूर,

३०- १२ - '४६

बापूजी अडीच वाजता उठले आणि तेव्हापासून पंडितजींकरिता लिहून राहिले आहेत. मी माझे लिहायला बसले आहे. आजकाल वेळ नसल्यामुळे त्यांनी माझ्या नोंदी पाहिल्या नाही. आजकाल बापूजींचे जीवनमंथन आखा भगतने गाईलेल्या भजनाच्या दिशेने सुरू आहे. समुद्रात नावाडी तर पाहिजे त्या दिशेने नाव वल्हवतो, परंतु तांडेलाची नजर मात्र आकाशातील त्या ध्रुवताऱ्याकडेच असते. आणि त्याच खुणेने मग नावाडी आपली नाव वल्हवत असतो. बापूजींची भूमिका आज अशीच आहे. त्यांनी आपले दिशादर्शक होकायंत्र सत्य - ईश्वर - रामनामाचाजप यांना केले आहे.

आज साडेसात वाजता पंडितजी आणि इतर पाहुणेमंडळी रवाना झाली. फिरून आल्यानंतर कळले की कृपलानीजी त्यांची पेटी विसरले आहेत. ती आता फेनीबरोबर पाठवण्यात येईल. बापूजींना गेल्या तीन दिवसांचा थकवा जाणवतो आहे. रोज अडीच की तीन वाजता उठून कामाला भिडत असतात. हे बापूजींकरिता फार जास्त होऊन राहिले आहे. सायंकाळी कताई करत असताना माझी गेल्या तीन दिवसांची जी नोंद मी दैनंदिनीत केली होती

ती वाचून काढली. शिवाय टपाल वाचवून घेतले. बापूजी म्हणाले, 'मी तुझी डायरी दररोज वाचत नव्हतो असे वाटतच नाही.'

मी म्हणाले, 'तुम्हाला वेळ कुठे होता?'

बापूजी म्हणाले, 'परंतु प्यारेलालने सांगितल्यामुळे मी समधानी आहे. तोसुद्धा तुला चांगले मार्गदर्शन करू शकतो.' आज दुसरे काहीही वेगळे झाले नव्हते.

(बापू. छान लिहिले आहे. ३१ - १२ - ४५)

ता. क. - २८ - २९ - ३०तारखेची माझी रोजनिशी ता. ३१-१२-४५च्या आज सकाळी एकदम वरीलप्रमाणे सही केली आहे.

# ७. यात्रेची तयारी

श्रीरामपूर,

३१ - १२ - '४६

बापूजी प्रार्थनेच्या थोडे आधीच उठले होते. प्रार्थनेला अजून जवळपास पंधरा मिनिट वेळ होता. त्या दरम्यान त्यांनी माझी नोंद पाहिली. सही केली. मला म्हणाले, 'तू फार लांब लिहितेस, पण लिहितेस छान.'

मी म्हणाले, 'थोडक्यात लिहिते. मग ही वही संपल्यानंतर भाईंना पाठवीन. पण इतके लांब लिहिले नाही तर इथे काय सुरू आहे हे भाईंना कसे कळेल?'

बापू हसत हसत म्हणाले, 'पडल्या पडल्या जे लिहिणे आवडते ते . . . '

प्रार्थनेनंतर गरम पाणी पिऊन मग टपाल लिहिले. ७ वाजता प्यारेलालजी त्यांच्या गावातून आले. त्यांच्याशी बोलून मग फिरायला गेलो.

९.३० ला मालीश सुरू असताना मी बापूजींना म्हणाले, 'सुऱ्हावर्दीसारख्या सरसहा खोटे बोलणाऱ्याबरोबर तुम्ही कसे काय काम करू शकता?' माझा हा प्रश्न तर बाजूला राहिला पण मला नवीन पाठ ऐकायला मिळाला.

बापूजी - 'तू 'सुऱ्हावर्दी' कसे काय म्हणू शकतेस? सुऱ्हावर्दीसाहेब म्हणायला पाहिजे. ते कसेही जरी असले तरी आज ते उच्च पदावर आहेत. शिवाय दुसऱ्या दृष्टीने पाहिले तर तुझ्यापेक्षा वयाने मोठे आहेत. अशा प्रकारची सवय आपल्या लोकांमध्ये आजकाल बरील आढळू लागली आहे.अपल्यामध्ये जोपर्यंत विवेकबुद्धीची उणीव असेल तोपर्यंत आपण मागेच राहू. पश्चिमेतील लोकांना जर एखाद्या नोकराला एखादी गोष्ट आणायला जरी सांगायचे असेल तरी ते 'प्लीज' असे आधी म्हणूनच त्याला ती वस्तू आणायला सांगत असतात. आणि काम झाल्यानंतर ते 'थँक्यू' म्हणाल्याशिवाय राहत नाहीत. हे तर मी तुला एक उदाहरण दिले आहे. परंतु आपल्या

लोकांमध्ये असे नाही. भाषेत विवेकाची ही चूक तर होऊ द्यायलाच नको. अशा प्रकारच्या पद्धती आपल्यामध्ये पुष्कळच आहेत. आणि त्याकडे कोणी क्वचितच लक्ष देतो. दिले तर ते े भाग्यच समजायचे. परंतु मी तर भाषिक अविवेकाला सूक्ष्म हिंसाच म्हणेन आणि मोहरी एवढी चूकही मला पर्वताएवढी दिसते. ही वाईट सवय काही लहानसहान नाही. आपल्यापेक्षा जे उच्चपदस्थ असतील वा वयाने मोठे असतील त्यांच्याकरिता सन्माननीय भाषाच वापरली पाहिजे. अशी सवय जर प्रत्येकाला लागली तर आपला देश जो आज मागासलेला गणला जातो त्याचा उद्धार होईल. अशा सवयी आपण लहानपणापासून लावल्या पाहिजे.'

माझ्या चुकीमुळे मिळालेला हा वस्तुपाठ चांगल्या चांगल्या शाळेत तरी मिळतो की नाही याबद्दल शंका आहे.

आजच्या आहारात बापूजींनी फेरफार करायला लावला. दुपारी खाकरा घेणे बंद केले आणि त्याऐवजी पाच बदामा वाटून भाजीत टाकायला लावल्या. पाच काजू घेतले. सायंकाळी फळे आणि एक औंस गूळ घेतला.

श्रीरामपूर,

२ - १ - '४७

सोबत घ्यायचे सर्व सामान मी बांधले. याचप्रमाणे माझ्यासमोर महत्त्वाच्या कागदपत्रांनी भरलेली एक मोठी शबनम पिशवी ठेवण्यात आली.

बरोबर साडेसात वाजता बापूजींनी श्रीरामपूर सोडले. मी बापूजींची मोठी शबनम पिशवी घेऊन जवळच्या रस्त्याने ३० मिनिटात म्हणजे आठ वाजता चंडीपूरला पोहोचले. चंडीपूरला येऊन मी बापूजींच्या मालीशची तयारी केली. कूकर लावला आणि भांडी स्वच्छ केली. बापूजींबरोबर सुशीलाबहेन होत्या. रामधून सुरू होती आणि इतर कीर्तन करणारेसुद्धा कीर्तन

करत येत होते. बापूजी इथे ८.५० ला पोहोचले. बापूजींचा इथे ज्या घरात मुक्काम आहे त्या घरातील भगिनीनी बापूजींना ओवाळले आणि त्यांना हार घातला.

डी. एस. पी. अब्दुल्लासाहेब आले. बापूजी त्यांना म्हणाले, 'ही सैन्यातील माणसे आहेत. तेसुद्धा सोबत असलेले मला पटत नाही. शोभतही नाही. माझा राखणदार तर फार मोठा आहे. तो आहे - ईश्वर. मी तर खुदावरच सर्व काही सोडले आहे. त्याला आवश्यक वाटत असेल तर तो ठेवील, नाही तर उचलून घेईल.'

मालीश, स्नान, भोजन आणि आराम केला. बापूजी उठले तेव्हा जवळपास ४.५० झाले होते.जेवणात इथेच तयार झालेले ताजे मुरमुरे, वाफाळलेली भाजी, एक ग्रेपफ्रूट आणि दूध घेतले. एक वाजता नारळाचे पाणी घेतले. २ ते ३ कताई केली. कताई केल्यानंतर माती घेतली . . . त्याच वेळी गोष्टी सुरू होत्या. . . . शी गोष्टी केल्या. स्त्रियांना घरी परतायला उशीर होऊ नये म्हणून सायंकाळी साडेचार वाजताच प्रार्थना झाली. प्रार्थनेत भगिनींची संख्या चांगली होती. प्रार्थनेमधून येऊन बापूजींनी भाजी, जव आणि दूध घेतले. जव भाजीत टाकले होते. परंतु बापूजींकरिता ते चावणे कठीण झाले.

आज सुशीलाबहेन राहत असलल्या गावात फिरायला गेलो. त्या गावाचे नाव चांगेरगाव आहे. ते चंडीपूरजवळच आहे. एक मोठा तंबू आहे. त्यात इतरही राहतात आणि एका खोलीत बापूजी स्वतः राहतात. सुशीलाबहेनने आणि इतरांनी गावातील माणसांशी गप्पागोष्टी केल्या. आम्ही अकस्मात गेलो होतो. यामुळे सुशीलाबहेन खूप खुश झाल्या. परतत असताना तर बापूजींनी खूप धावपळ करायला लावली. पन्नास मिनिटात परत आलो. जात असताना सव्वा तास लागला होता. आल्यानंतर मी बापूजींचे पाय धुतले. रामफळ खात असताना बापूजींना मी माझी रोजनिशी ऐकवली. बंगाली पाठ केला. आणि थकवा आल्यामुळे पाय लांब केले. नऊ वाजले. तेवढ्यात बाबा (सतीशबाबू) आले.

चंडीपूर

३ - १ - '४७

आज बापूजी आधी उठले नव्हते. सव्वा तीन वाजता उठले. तोंड धुताधुता काही विशेष प्रसंगाच्या निमित्ताने मला म्हणाले, 'माझे मानसशास्त्राचे ज्ञान असे आहे की आपण जर एखादे काम करत असू आणि त्याचे अपेक्षित परिणाम येत नसतील तर तो दोष आपला आहे असे समजावे. आणि मग असे का झाले नाही याचा आपण सूक्ष्मपणे विचार केला पाहिजे. त्याचे उत्तर तू मग शांतपणे माग. तुला उत्तर मिळाल्याशिवाय राहणार नाही. तू जर इतका विचार करणारी झालीस तर माझे काम किती चमकेल? तुझ्याकरिता हे फार मोठे काम आहे. परंतु प्रयत्न करशील तर तू हे सहजपणे करू शकशील. ज्या दिवसापासून आपण सर्व आपले दोष पाहू लागू त्या दिवसानंतर आपल्याला अशा भांडणतंट्यात, मारामाऱ्यात पडण्याचे सुचणारच नाही, केवळ जगाचे भले कशात आहे हेच सुचेल. आज आपल्या डोक्याला काहीही काम नाही, आपण एकमेकांचे दोष एकमेकांवर ढकलतो. हे सर्व आपण जाणूनबुजून करतो असा माझ्या सांगण्याचा अर्थ नाही. परंतु असे स्वाभाविकपणे होऊन जात असते. ज्याप्रमाणे विस्तवाला हात लागला की आपण तो चटकन मागे घेतो त्याप्रमाणे. हात मागे घ्यायचा की नाही याचा विचार करावा लागत नसतो. अशाच प्रकारे सध्या जे अमानुषी काम सुरू आहे ते तर असे वाटते की स्वाभाविक झाले आहे. घटना अशा प्रकारे घडू लागल्या आहेत. परंतु एक हिंदू मुसलमानाला का मारतो आहे याबद्दल आपण विचार केला पाहिजे. वा एक मुसलमान एका हिंदूला का मारतो आहे? या वादळाची जबाबदारी माझ्या मते संपूर्ण हिंदुस्थानची आहे. या वेळी माझे हृदय कोणत्या बाजूने आहे असे प्रत्येक हिंदूने स्वतःला विचारले पाहिजे. ते शुद्ध आहे की अशुद्ध? प्रत्येक हिंदुस्थानीला मी माझा भाऊ समजतो की नाही? एक हिंदू जरी असा विचार करत असेल की एखादा मुसलमान मेला तर बरे होईल वा एक मुसलमान जरी असा विचार करत असेल की एखादा तरी हिंदू मेला तर बरे होईल. मग असा विचार करणारी व्यक्ती स्वतः जरी सुरा भोसकत

नसेल, दुसऱ्याचे अनहित चिंतत असेल तर ते वर्तन प्रत्यक्ष सुरा भोसकण्यापेक्षाही हलकटपणाचे असेल. हा जो हलकटपणाचा विचार आहे तो सुरा भोसकण्यापेक्षाही अधिक क्रूरपणाचा आणि घातकी आहे. याचे कारण अशा विचारांमुळे मन घाणेरडे होते आणि मग या घाणीचे सूक्ष्मतम अणुरेणू वातावरणात घाण पसरवतात आणि ते संपूर्ण वातावरण दुषित करतात. उदाहरणार्थ घरात जर काही घाण असेल तर - एखादा क्षयरोग झालेला रोगी असेल आणि कोणाला माहीतही नसेल की या माणसाला खरोखर क्षयरोग आहे, आणि सुरुवातीला या माणसालाही आपल्याला क्षयरोग झालेला आहे हे जरी माहीत नसेल तरी हा माणूस वाटेल तिथे थुंकेल आणि घाण करील. त्या घाणीवर हळूहळू माशा बसतात आणि त्या क्षयाचे आणि इतर जंतू पसरवतात. कल्पना कर की तुझ्या शरीरात रोगाशी लढणारे जे जंतू आहेत ते कमी पडतील. तू चांगली असशील. पण या माशा तुझ्या डोक्यावर येऊन बसतील आणि त्या तिथे हे विषारी जंतू पसरवतील. तुलासुद्धा याची कल्पना नसेल.  परंतु तुझ्या दुर्बल शरीरात हे अन्न जाईल आणि परिणामी तुला क्षयरोग होईल.'

[अशा प्रकारे आज हिंदुस्थान दुर्बल आहे. त्याच्यात रोगाशी लढणारे जंतू - विचारवंत निःस्वार्थी, सेवाभावी लोक नाहीत, फुटीचे, बेबनावाचे वातावरण आहे. यामुळे आपले विचार फार संकुचित झाले आहेत. आणि मन, वाचा जशी इच्छा करतील तसेच कर्म होईल.]

'हे सूक्ष्म विज्ञान आहे. यामुळेच माझ्या दृष्टीने हे मनाचे विज्ञान आहे. आपल्यामध्ये वाक्प्रचार आहे - मन शुद्ध तर उंबरठ्याशी गंगा (मन चंगा तो कठौत में गांगा). यामुळे तू तुझ्या मनाची, विचाराची बारकाईने तपासणी कर. . . .हे करायचे की ते करायचे, . . . का वापरायचे नाही? हे मी तुला दोष देण्याकरिता सांगून राहिलेलो नसून आपले विचार कोणते रूप घेऊ शकतात हे तुला दाखवून देण्याचा मी प्रयत्न करून राहिलेलो आहे.'

तोंड धुता धुता एका लहानशा गोष्टीवरून बापूजींनी संपूर्ण देशातील वातावरणातसुद्धा आपले मन, इच्छा वगैरेंचा यात किती सहभाग असतो आणि प्रत्येक माणसाची जशी इच्छा

असते तसा तो कसा काम करत असतो याबद्दलची विचारमालिका मला समजावून सांगितली. आता हिंदूमुसलमानांमध्ये वैमनस्य निर्माण झाले आहे. त्याकरिता बापूजी देशातील प्रत्येक माणसाच्या मनाला, विचाराला अतिशय जबाबदार समजतात. हे सहजपणे समजावे म्हणून उदाहरणासह समजावून सांगतात. बापूजी तर अशा लहानशा चुकांच्या प्रसंगांना, सामान्यपणे तर ज्यांना कदाचित चुकीचे समजलेही जाणार नाही, पहाडासारखे करतात. बापूजी नेहमी सांगत असतात की माणसाला जर पुढे जायचे असेल तर त्याने लहानशा चुकीकडे पहाडाप्रमाणे पाहायला पाहिजे आणि ती चूक दुरुस्त करायला पाहिजे आणि ती परत होणार नाही याची काळजी घ्यायला पाहिजे. ही गोष्ट अगदी खरी आहे.

रोजप्रमाणे प्रार्थना झाली. आज प्रार्थनेत प्यारेलालजी होते. यामुळे प्रार्थनेत भजन आणि गीतापाठ त्यांनीच करायला लावले. बापूजी गरम पाणी प्याले आणि त्यांच्याबरोबर गोष्टी केल्या. निर्मळदांबरोबरसुद्धा गोष्टी केल्या. आश्रमाला टपाल लिहिला. मीसुद्धा टपाल लिहिला. सकाळच्या गोष्टींची नोंद केली.

सकाळी येथील हरिजन वस्तीचा, ज्यांना नमोशुद्र म्हणत असतात, मोहल्ला पाहायला गेलो. थरकाप व्हावा असे अमानुष कृत्य करण्यात आले होते. सोबत आझाद हिंद फौजेचे देवनाथ दास आणि कर्नल जीवनसिंगजी होते. परतल्यानंतर बापूजींचे पाय धुतले. पाय धुतल्यानंतर बापूजी कालचे प्रार्थनाप्रवचन दुरुस्त करायला बसले. यामुळे मालीशला खूप उशीर झाला. मालीश सुरू असताना प्यारेलालजीसोबत गोष्टी केल्या.

आज जेवणात ८ औंस दूध, जव, संदेश (खोबऱ्याचा) आणि थोडीशी कच्ची भाजी घेतली.

जेवणाच्या वेळी मी जवळ बसले नव्हते. प्यारेलालजी असल्यामुळे आणि बारा वाजून गेलेले असल्यामुळे बापूजींनी मला आंघोळ, कपडे धुणे वगैरे आटोपून घ्यायला सांगितले. मी सगळे आटोपून आले आणि बापूजींची जेवण केलेली भांडी घासून साफ करायला घेऊन गेले.

बापजींच्या पायांना तूप चोळले. बापूजी अर्धा तास झोपले. येथील नकाशा पाहिला. दुपारी अमियबाबू (रविंद्रनाथांचे सचिव) आले. बापूजींनी त्यांच्याशी जवळपास एक तास गोष्टी केल्या. देशात रोग रजःकणाप्रमाणे कसे पसरू लागले आहेत हे जसे मला आज सकाळी समजावून सांगितले होते तसेच त्यांनाही धाराप्रवाही भाषेत सांगितले.

तीन वाजता स्त्रियांच्या सभेत बापूजी आणि मी गेलो. सभेत पुष्कळ भगिनी आल्या होत्या. अस्पृश्यता आणि पावित्र्यासंबंधी बापूजी फार सुंदर बोलले. ते म्हणाले, 'भगिनी जेव्हा हे कार्य करतील तेव्हाच देशाची उन्नती होईल'.

चार वाजता पोटावर माती घेत असताना बिहारचे काही भाई, व्होल्टनसाहेब, आणि सिन्हा आले. त्यांच्याशी जवळपास पाच वाजेपर्यंत चर्चा चालली. बापूजींनी चौकशी आयोग नेमण्यासंबंधी खूप जोर लावला. नोआखालीलाही लाजवील अशा घटना बिहारमध्ये घडल्या होत्या. आणि अंतर्गत सडण आहे असेही वाटत होते.

गोष्टी सुरू असतानाच बापूजींना दूध, भाजी आणि फळे घ्यायची होती. यामुळे त्यांनी साडेचार वाजता माती काढली. पाऊणेपाच वाजता खायला सुरुवात केली. दुधात एक औंस बार्ली टाकली. हे सगळे मिश्रण पिऊन टाकले. ५.१२ला खाणे पूर्ण झाले आणि मग प्रार्थनेत गेले. काल हे थोडे आधी झाले होते. यामुळे आज प्रार्थना थोडी उशिरा ठेवली होती. तिथून सरळ रामकृष्णवाडीत फिरायला गेले. आल्यानंतर बापूजींचे पाय धुतले. बापूजींनी वर्तमानपत्रे ऐकली. दरम्यान मी माझे रात्रीचे कामकाज पूर्ण केले. कातायला बसले. १०० तार झाले.

आज दिवसभर मला इतके काही काम होते की सकाळी घरून आलेली डाक मी रात्री बापूजींचे पाय दाबून तेलाची मालीश केल्यानंतर रात्रीच्या दहा वाजताच पाहू शकले. आणि मग ही रोजनिशी पूर्ण केली. (आता अकराचे टोल पडत आहेत.) खूप आनंद मिळतो. खूप शिकायला

आणि पाहायलाही मिळते. अशा प्रकारे दररोजचे सर्व काम रोजच्या रोज पूर्ण करण्यात अडचण येणार नाही असे वाटते.

बापूजी सकाळी अगदी मोठ्या पहाटेसच उठवत असतात. यामुळे झोपायच्या आधी विनोदात मी बापूजींना म्हणाले, ‘आज जर तुम्ही माझ्याआधी उठू शकला नाही तर देवासमोर मी एक दिवा लावीन. पाहू मी जिंकते की बापूजी जिंकतात ते.’

बापूजी हसत म्हणाले, ‘देव काही असा  लालची नाही.’

(बरोबर समजले आहे. परंतु माझ्या दृष्टीने थोडी सुधारणा आवश्यक आहे - बापू, ५-१-’४७ चंडीपूर)

बापूजींनी त्यांच्या रोजनिशीत तर दिवसभराचा कार्यक्रम आणि कोणकोण आले होते तेच लिहिले आहे.

सकाळी नमोशुद्रांच्या वस्तीत गेलो होतो. ती वस्ती पाहिल्यानंतर त्यांच्या विचारमालिकेत एक वाक्य टाकावे लागते - ‘फिरत असताना नमोशुद्रांच्या मोहल्ल्यात केलेले नुकसान पाहिले. धर्माच्या नावाने वा स्वार्थाने प्रेरित होऊन माणूस असे नुकसान कसे काय करू शकतो असा विचार सहजच मनात आला.’

चंडीपूर

४ - १ - ‘४७

बापूजी दोन वाजता उठले. दिवा लावायला लावला. मी बापूजींना म्हणाले, ‘माझा दिवा फळला नाही.’ तुम्ही रात्री उशीरा झोपता आणि दोन वाजता उठून जाता. मग मी दिवा लावता. दिवा मंद ठेवला तर काय हरकत आहे? रोज सकाळी थंडीत दिवा लावताना हात थिजून जातात.

‘अगं, मुलांना जर थंडी वाजली तर ‘बकरेच शेत खाऊन टाकतील’ हे तुला माहीत आहे काय? तू म्हणतेस ते तर खरेच आहे, पण इतके मोठे घासलेट कोण देईल? ना तू कमाई करून

देतेस, ना मी कमाई करतो. तुला तर घासलेट जाळणे तेवढे सुचते कारण तुझा बाप महुवात कमावतो ना? परंतु तुला माहीत आहे काय की दिवा विझवल्यामुळे माझे दोन काम होतात. एक तर मी दिवा लावला की तितक्या वेळात तुझी झोप उडून जाते. दुसरी गोष्ट म्हणजे मी काही जरी लिहायला लावले तर डुलकी न घेता ते लिहू शकतेस. आणि शिवाय घासलेटची बचत तर होतेच. याप्रमाणे माझे तर एक पथ, दोन काम होतात. पण याचा अर्थ तुला माहीत आहे? एक पथ आणि दोन काजमध्ये असे काही आहे काय की त्यात पथ एक असेल आणि काज नेहमीच दोनच असतील? दोन काज म्हणजे दोनच काम समजण्याची आवश्यकता नाही. असा कोणता पथ आहे की ज्यात केवळ दोन उद्दिष्टांचीच पूर्ती होते? दोन काम म्हणजे केवळ दोनच काम असे समजू नये. दोन काम म्हणजे अनेक वा शंभर कामही असू शकतात. इथे हजारो माणसांचा जरी विनाश होत आहे तरी यांच्यातील एकालाही आपण जाऊ द्यायला नको असा विचार सहजच मनात येतो. शरीराला गरज असेल तेवढीच झोप, तेवढाच आहार. अशा प्रकारे आपण आपल्या शारीरिक गरजा सीमित कराव्या. "आजनो लहावो लिजीए रे, काल कोणे दीठी छे?" (आज आलेल्या संधीचा उपयोग करून घ्या, उद्याचे कोणी पाहिले आहे?) या भजनानुसार एका क्षणानंतरही काय होईल याची आपल्याला कुठे कल्पना आहे? मी तुला हे समजावून सांगतो आहे, आणि ईश्वराने ठरवले तर तो याच क्षणी मला वा तुला उचलून घेऊ शकतो. यामुळे ही ओळ चांगल्याप्रकारे समजून घेण्यासारखी आहे. यातून असा सुवर्णमार्ग कोणता काढता येईल की ज्याद्वारे जे करायचे आहे ते सर्व चांगले काम पूर्ण करून टाकता येतील? हा मार्ग केवळ परोपकाराचाच आहे. परोपकार म्हणजे शेजाऱ्यांची सेवा. परोपकार म्हणजे ईश्वराची सेवा. परंतु ईश्वरभक्ती केवळ टिळा लावल्याने वा जपमाळ फिरवल्याने होत नाही. सध्या तर टिळा लावून कोणाला तरी सुऱ्याने भोसकणे सुरू आहे. याला तर दंभ वा वृथाभिमानच म्हणता येईल. परंतु नरसी भगत म्हणतात - "भक्ती शीश तणुं साटुं छे." (भक्ती म्हणजे, डोके, देह सर्व काही सेवेकरिता आहेत.) इतके तुला कळले तर तुझ्या शरीराकडून जर कधी परोपकार होऊ शकले

नाही तर तुझे मन काय करील? उठताना, बसताना, खाताना, पिताना, हसताना, खेळताना मन संपूर्ण विश्वाचे कल्याण इच्छील आणि आपल्या हाती जी सेवा असेल ती तो माणूस पूर्ण करील. आता तुला तर भरपूर समजावून सांगितले आणि तू शिकलीस. मी तर तुला एका लहानशा विनोदावरून हा पाठ समजावून सांगितला. आपल्या वाक्प्रचारांध्ये असा गूढ अर्थ भरलेला असतो.’

मग त्यांनी स्वतःच दिवा विझवून लिहायला सुरुवात केली. मला जोरदार सर्दीपडसे झालेले असल्यामुळे त्यांनी मला झोपायला जायला सांगितले. मी झोपले. प्रार्थनेच्या वेळी बापूजींनी मला उठवले. दातण, प्रार्थना रोजप्रमाणे झाले. माझा घसा बसलेला असल्यामुळे आजही प्यारेलालजींनीच प्रार्थना संचालित केली. ते त्यांच्या गावावरून चालत आले होते. आज तर अमियबाबू आणि त्यांचे मित्रही प्रार्थनेत होते. एवढ्यात बिहारसंबंधीसुद्धा फार गूढ प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्या सर्वांची माहिती असावी म्हणून प्यारेलालजी जवळपास मोठ्या पहाटेसच बापूजींकडे आले होते. बापूजींशी बोलून ते आपल्या गावात परत जातील.

दररोजप्रमाणे साडेसात वाजता फिरायला निघाले. उत्तर चागेरगावात बापूजींच्या हस्ते एका शाळेचे उद्घाटन होणार होते. बापूजी तिथे फिरतच गेले होते. फिरत असताना रस्ताभर अमियबाबूंबरोबरच बापूजी गोष्टी करत होते. सध्या जे वातावरण सुरू आहे त्याच्या अनुषंगानेच गतकाळातील गोष्टी केल्या.

तिथून परतलो तेव्हा एक वाजून गेले होते. बापूजींचे पाय धुऊन मी मालीश, आंघोळ वगैरेंची तयारी केली. भाजीचा कुकर लावला. खाकरे पण करून घेतले. पण अजूनही बापूजींच्या गोष्टी संपल्याच नव्हत्या. आझाद हिंद फौजेचे कर्नल जीवनसिंगजी आणि देवदासनाथ होते. अखेरीस माझ्याकडून राहवले गेले नाही. मी म्हणाले, ‘आता तर बापूंना सोडा. दोन वाजता उठले आहेत. खूप उशीर झाला आहे. मग मालीशकरिता घाई करू लागतात.’ यामुळे बापूजी हसत हसत म्हणाले, ‘ही पोरगी ऐकणार नाही. यामुळे ही म्हणते तसेच आपण

करायला पाहिजे ! गुजरातीत वाक्प्रचार आहे ना की ऊस गोड लागला तर तो मुळापासून खाऊ नये. आणि ही पोरगी रागावली तर माझी सेवा कोण करील? यामुळे हिच्याकरिता तरी आपण गोष्टी थांबवायला पाहिजे.' असे हसत हसत म्हणून गोड भाषेत त्यांना निरोप दिला.

मलासुद्धा बापूजींची ही गोष्ट आवडली. बापूजी बोलत असताना मनातल्या मनात हसत आहेत असे वाटत होते.

मालीश करत असताना बापूजी पंधरा मिनिट झोपले आणि मग ताजेतवाने झाले. माझा थकवा पूर्णपणे गेला. रात्री दोन वाजतापासून तर सकाळच्या नऊ वाजेपर्यंत बापूजींचे सारखे काम सुरू होते. आणि त्यातही बहुतेक बोलण्याचेच. बापूजींकरिता हे फारच होते असे म्हणता येईल. खाण्यात दोन खाकरे, भाजी, दूध आणि थोडीशी पपई आणि संदेशचा एक काप एवढेच घेतले. बापूजींनी मला मुरमुरे, पोहे, नारळाचे तेल वगैरे कसे आहेत हे पाहायला सांगितले. आणि चांगले असतील तर सोबत घे म्हणजे तुला रोज रोज खाकरे तयार करण्याची मेहनत करावी लागणार नाही असे ते म्हणाले. मुरमुरे करून ठेवले तर ८-१५ दिवस चालतील आणि आपले काम भागेल. माझ्याकरिता तर मुरमुरे अशी गोष्ट आहे की ते गव्हाच्या ठिकाणी सहज चालू शकतात.

जेवण करून बापूजी जवळपास पाऊण तास झोपले. कातत असताना माझी ही दोनतीन दिवसांची नोंदवही ऐकली. बापूजींनी नोंदीवही एका लाकडी फळीवर ठेवली आणि तिन्ही दिवसांच्या नोंदीवर एकच सही केली आणि ही नोंदवही एका फळीवर ठेवून दे असे म्हणाले,

शोरेन दाने एक छान धनुषटकळी बनवली आहे. तिच्यावर बापूंनी कताई केली. कताई करून ग्रामसभेत गेले. चार वाजता बापूजींना माती देऊन मी सायंकाळच्या स्वयंपाकाची तयारी करण्याकरिता गेले. आज बापूजी डोळ्यांची जळजळ होत असल्याची तक्रार करत होते.

डोळ्यांवरसुद्धा माती घेतली. एवढ्यात बापूजी फार विचारमग्न दिसतात. खूप थकलेले आहेत. सायंकाळी सहा औंस दूध आणि थोडीशी भाजी घेतली.

सायंकाळी प्रार्थनेत चांगली उपस्थिती होती. जवळपास दहा वाजता झोपलो. अंथरुणावर तर साडेनऊ वाजताच पडलो होतो. मीसुद्धा आज साडेदहाच्या आधीच झोपले होते. मलासुद्धा पडशामुळे ताप आहे. बापूजींना हे आवडले नाही. झोपायच्या आधी म्हणाले, 'आज तरी मेहरबानी करून लवकर झोपलीस तर मला आवडेल.' यावरून बापूजींना माझी खूप काळजी वाटत आहे हे माझ्या लक्षात आले. काहीसुद्धा वाद न घालता बरेचसे काम तसेच पडून राहू देऊन मी झोपून गेले. अजून बापूजींच्या सुताला पीळ भरायचा होता, काही पत्रांच्या नकला करायच्या होत्या आणि वर्तमानपत्रातील कात्रणे फाईलमध्ये लावायचे काम बाकी होते. उद्या पूर्ण करीन.

(बापू, ५ - १ - '४७, चंडीपूर)

चंडीपूर

५ - १ - '४७

बापूजी अडीच वाजता उठले. मला उठवले. सर्वात पहिले काम म्हणजे माझी चारपाच दिवसांची रोजनिशी वरवर पाहून तिच्यावर सही केली. ३-१-४७च्या रोजनिशीत भाषेच्या दृष्टीने कोणत्या सुधारणा करता येऊ शकतात ते दाखवले (व्याकरणाच्या काही चुका). थोड्याशा धनादेशांवर (चेकवर) सह्या केल्या आणि सर्व हिशेब कसे ठेवावे हेसुद्धा समजावून सांगितले.बापूजींनी स्वतःच आश्रमाला काही पत्रे लिहिली. दररोजप्रमाणे साडेसात वाजता आम्ही फिरायला निघालो. फिरत असताना रस्ताभर सुधीरदादाशी गोष्टी करत होते. विदेशातील दूत वा

वकील म्हणून वा मंत्रिमंडळाला उपयोगी पडतील अशा काही सूचना त्यांना देत होते आणि मार्गदर्शन करत होते. सुधीरदा अतिशय सरळ स्वभावाचे आणि साधे गृहस्थ आहेत.

जिथे खून झाले होते तिथे गेले होतो. सर्व काही उजाड आणि विराण पडले होते. हाडेसुद्धा पडली होती. तिथून येऊन बापूजींनी पाय धुतले. बापूजी आणि सुधीरदांच्या गोष्टी बराच वेळ सुरू होत्या. यामुळे मालीशकरिता खूप वेळ झाला. मालीश चटकन उरकायला लावली. जेवत असताना . . . ला बापूजींनी बोलावले. त्यांनी जाण्याची इच्छा दाखवली. मलासुद्धा ही गोष्ट कळावी म्हणून बापूजी म्हणाले, 'इथे काहीही खाजगी नसते ही गोष्ट तू समजून घ्यावी अशी माझी इच्छा आहे. यामुळे इथेच बस.' बापूजी पुढे म्हणाले, 'मला असे वाटते की तु रजेवर आलेला आहेस. हा . . . वर असीम प्रेम करतो. तू माझ्या माघारी संन्यास घेतला आहे. तुझ्या भक्तीपूर्ण भावनेमुळे मी तुला पूर्ण मोकळीक दिली. मी तर तुला पुत्राप्रमाणे समजतो आणि समजेन. सध्या तू उत्तेजित झालेला असल्यामुळे तुला फार समजावून सांगणे व्यर्थ आहे. हेही शक्य आहे की मला माझी चूक कळत नसेल.'

बापूजींनी जेवणात २ खाकरे, ८ औंस दूध, खोबऱ्याचे लोणी, थोडीशी कच्ची भाजी आणि दोन संत्री घेतली. जेवण करून आराम करण्याकरिता आडवे झाले. मी पाय चोळत होते. तेव्हाच मला म्हणाले, 'आज एका पायाला अडीच मिनिट असे मिळून दोन पाय ५ मिनिटात पूर्ण करायचे आहेत. तू अजून आंघोळ केलेली नाही? केव्हा आंघोळ करशील, कपडे धुशील? आज तर कपड्यांचा ढीग काढला आहे. भांडीसुद्धा खूप घासायची आहेत. तुला सविस्तर लिहिता यावे म्हणून . . . ची गोष्ट तुला समजावून सांगणे फार आवश्यक होते. अशा लोकांशी बोलशील तर माझा वेळही वाचेल.

बापूजींच्या पायांना तूप चोळले. चरखा तयार केला. उठल्यानंतर नारळाचे पाणी द्यायचे शोरेनदाला सांगून न्हाणेधुणे करायला गेले. इथे जेवायची वेळ सामान्यपणे अडीचतीनची आहे. आणि मी माझे कामकाज अडीच वाजता संपवले. बापूजींना दररोज इतक्या उशिरा जेवणे

आवडत नाही. यामुळे मी आधी जेवून घेत असते. परंतु आज तर याला अपवाद होता. यामुळे या घरातील लोकांबरोबर जेवले. यामुळे दीदी, शोरेनदा खूप खुश झाले. परंतु बापूजींना जेव्हा हे कळले तेव्हा ते म्हणाले, 'अवेळी जेवण्यापेक्षा तर न जेवता दूध घेतले असते वा त्याऐवजी फळे, नारळाचे पाणी असे काही हलके घेतले असते तर मला जास्त आवडले असते. हे तर अजून आजारी पडण्याचे लक्षण आहे. तू जर इथेच आजारी पडलीस तर माझे केलेसवरलेले सर्व धुतले जाईल. जेवू की नाही इतके तर तू मला विचारायचे होते? अजून तुला सर्दी आहे आणि तू इतका मोठा कपड्यांचा भारा धुतला. पण आता हे सर्व काही सोडून जर तू आराम करशील तर मला ते आवडेल आणि . . . च्या गोष्टी समजावून सांगण्याकरिता आजचा तुझा वेळ वाया घालवणारा मीच असल्यामुळे तू असे केले तर माझेही समाधान होईल. मी तुला अडवले तरी कशाकरिता? पण मला राहवले नाही. असो, झाले ते झाले. हे तर भविष्यात असे घडू नये म्हणून इतके सगळे सांगावे लागले.'

कताई करून बापूजी कारागिरांच्या सभेकरिता गेले. मला घेऊन गेले नाही. मला झोपायला सांगितले, मी झोपून गेले. बापूजींनी येऊन चार वाजता उठवले. तुला एखाद्या मुडद्याप्रमाणे झोपलेली पाहून तू किती थकलेली आहेस हे माझ्या लक्षात आले. सकाळी अडीच वाजतापासून मी तुला उठवले आहे. यामुळे थकवा आला. हा काही दोष नाही. परंतु चढत राहशील आणि मग पडलीस तर मरशील. आणि मीही मरेन.'

सायंकाळच्या जेवणात बापूजींनी अननसाचा रस, आठ औंस दूध आणि एक औंस गूळ घेतला. प्रार्थना चांगेरगावात होती. तिथून एका मुसलमान भाईकडे गेलो.

चारूदा, बाबा, मां आले. यात्रेला सुरुवात होणार होती. त्याबद्दल चर्चा झाली. बापूजी म्हणाले, 'काझिरखिल छावणीत माझ्या सेवेत कोणी राहावे अशी माझी इच्छा नाही. आणि माझ्याबरोबर जे वार्ताहर असतात त्यांनाही सांगा की त्यांना जर स्वतःच्या खर्चाने, स्वतःच्या जोखमीवर आणि हिशेबाने राहायचे असेल तरच त्यांनी इथे राहावे. अनेकदा असेसुद्धा होऊ

शकते की या लोकांची गणना माझ्याबरोबर असलेल्या लोकांमध्ये केली जाईल. यामुळे या वार्ताहरांना चांगल्याप्रकारे समजावून सांगितले पाहिजे. . . . यांनी तर जायचे निश्चित ठरवले आहे. . . . चे फार निभू शकणार नाही. यामुळे त्यांनी जायला पाहिजे. परंतु मनू आणि निर्मळबाबू इतक्यांचीच माझ्याबरोबरच्या लोकांमध्ये गणना होईल.'

बाबा (सतीशबाबू), मां (हेमप्रभादेवी, सतीशबाबूंची पत्नी) या दोघांना बापूजींनी जास्तीच्या वस्तू सोपवल्या.

रात्री प्रार्थनासभेतून आल्यानंतर बापूजी खूप थकले होते. अर्धा औंस गूळ आणि एक ग्रेपफ्रुट एवढेच घेतले. मौन घेऊन खूप कागदपत्रे तपासली. बापूजी दहा वाजता झोपले.

सायंकाळनंतर मौन असल्यामुळे बापूजींजवळ विशेष काम नव्हते. आता दररोज एकाच गावात मुक्काम राहणार असल्यामुळे कमीतकमी सामान घेण्याकरिता खूप प्रयत्न करावा लागला.

चंडीपूर

६ - १ - '४७, सोमवार

बापूजी आज विशेष लवकर उठले नव्हते. बरोबर प्रार्थनेच्या वेळीच उठले. मौनवार असल्यामुळे बापूजींनी लिहिण्याचे काम स्वतःच केले. प्रार्थना वगैरे नित्यकर्मांनंतर रस घेतला. नंतर परत कागदपत्रे वाचता वाचता त्यांचा डोळा लागला. कदाचित काल नेहमीपेक्षा त्यांना जास्त चालावे लागले होते त्याचासुद्धा हा थकवा असू शकेल. पाय दाबण्याकरितासुद्धा खुणेनेच सांगितले. मी पाचेक मिनिट पाय दाबले असतील तोच बापूजींना गाढ झोप लागली. साडेसहा वाजता उठले. एक कार्यकर्ता भाऊ आजारी पडल्यामुळे मी आणि बापूजी साडेसात वाजता त्यांना भेटायला गेलो. तिथे बापूजींनी त्यांना लिहून काही सूचना केल्या. गरम पाणी, मध आणि त्यांत किंचितसा सोडा टाकून ते मिश्रण वारंवार घ्यायला सांगितले. दुसरे काहीही खायला नाही

सांगितले. पोटावर माती घ्यायचीसुद्धा सूचना केली. तिथून परतायला पूर्ण एक तास लागला. पाय धुऊन सरळ मालीश केली. मालीश सुरू असताना बापूजींना २५ मिनिट झोप लागली होती.

आज बापूजी प्रार्थनेत अनवाणी आले. मी कारण विचारले तर मौन संपल्यानंतर सांगतो म्हणाले. बापूजींनी रात्री आपले काम आधीच आवरले. आणि ८ वाजता बाबा आणि माननीय अरुणभाईंशी (सतीशबाबूंचा मुलगा) गोष्टी केल्या.

बापूजींचे पाय उलून त्यांना भागा पडल्या आहेत. तिथे हेझलीन लावले. प्यारेलालजी आले. त्यांच्याशी जवळपास दहा वाजेपर्यंत गोष्टी केल्या. बापूजी रात्री पडले होते, मी त्यांच्या पायाला तेल चोळत होते तेव्हा ते मला वहाणा का घातल्या नाही ते सांगू लागले. आपण हिंदू मंदिरात, मशिदीत वा चर्चमध्ये जात असलो तर पायात वहाणा घालत नाही. त्यात मला तर अशा दरिद्रनारायणाजवळ जायचे आहे की ज्यांचे सर्वस्व लुबाडले गेले आहे, ज्यांच्या निर्दोष स्त्रियांची, मुलांची कत्तल करण्यात आली आहे, ज्यांच्याजवळ लाज झाकण्यापुरतेसुद्धा कपडे नाहीत. आज आपल्याला अशा भूमीवर जायचे आहे की जिथे अनेक निर्दोषांची पवित्र हाडे पडलेली आहेत. अशा भूमीवरून आपल्याला चालायचे आहे आणि आपल्याला अशा लोकांच्या भेटी घ्यायच्या आहेत. माझ्याकरिता ही पवित्र यात्रा आहे. (उद्यापासून माझा नियमित प्रवास सुरू होणार आहे.) तिथे मी वहाणा कसा घालू?

हे शब्द् बोलत असताना आपण लोणी काढत असताना ताक जसे घुसळले जाते तशीच परिस्थिती बापूजींच्या हृदयाची झाली होती. ही पदयात्राच बापूजींची कशी पवित्र यात्रा झाली हेच आपल्याला समजून घ्यायचे आहे.

(बापू. मासिमपूर, ८-१-'४७)

## ८. एकटाच चोखाळतो मी माझी वाट रे . . .

चंडीपूर

७ - १ - ‘४७

आजचा दिवस यात्रेचा संस्मरणीय दिवस असल्यामुळे बापूजींनी प्रार्थनेत ‘वैष्णवजन’ हे भजन गायला सांगितले. आणि त्यात प्रत्येक कडव्याच्या शेवटी ‘ख्रिस्तीजन’, ‘पारसीजन’, ‘शीखजन’, ‘मुस्लिमजन’ आणि ‘हरिना जन तो तेने कहिये, पीड पराये जाने रे’ हे शब्द जोडून गायला सांगितले.

प्रार्थनेनंतर जवळपास एक तास बापूजी आणि प्यारेलालजी यांच्यात गोष्टी सुरू होत्या. मी सामानसुमान ठीक करण्याकरिता थांबले होते.

बापूजींनी आज . . . ला लिहिलेले पत्र हृदयस्पर्शी आहे आणि त्यात येथील भरपूर चित्रण केले आहे. त्या पत्राची बापूजींनी मला नकल करायला लावली. त्यात लिहिले होते,

. . ., माझ्या प्रकृतीची काळजी करू नको. या दिवसात मी किती तरी काम करू शकतो. असे काम किती दिवस करू शकेन हे ईश्वरालाच माहीत. खेडा येथे मी आजारी पडलो हा माझा मूर्खपणा होता. ज्ञानाचा अभाव आणि रसनेचा लगाम ढिला सोडला होता. दर क्षणी मला जाणवत असते की मी पाच गोष्टी खावो वा एक, मी जर स्वादेंद्रियाच्या अधीन झालो तर आतापर्यंत खाण्यापिण्याच्या ज्या नियमांचे मी पालन केले ते सर्व वाया जातील. तरीही मी सांगतो की ... आणि ... माझ्याबद्दल काळजी करू नका. माझी काळजी घेणारा एक सर्वशक्तिमान वैद्य आपल्या डोक्यावर आहे. तितके पुरे आहे. मला तुझे ... बद्दल पत्र मिळाले. उत्तरकरिता मला म्हणू नको. मी काही पत्र लिहितो हे खरे आहे परंतु ते मी फार लवकर उठतो म्हणून. मी येथील सर्व काम पूर्ण करू शकत नाही. परंतु त्याचीसुद्धा मी काळजी करत नाही.

मला 'हरिजन' मिळतो परंतु तो वाचायला वेळ मिळत नाही याची मला लाज वाटते. . . . आपापल्या खेड्यात आहेत. बरेवाईट काही दिसले तर सांगेनच. येथील काम कठीण आहे. काळोखातून मला माझा मार्ग शोधावा लागतो. परंतु “माझ्याकरिता एक पाऊल पुरेसे आहे.” हे सर्व केवळ प्रास्ताविक आहे.

सव्वासात वाजता बापूजी उठले. न्हाणीघरात गेले. इतक्या वेळेत बापूजी ज्या गादीवर बसले होते त्याचा बिस्तरा बांधला आणि पाचेक मिनिटात बापूजी बाहेर आले. इतक्या वेळात घरातील आणि इतर भगिनींनी बापूजींना कुंकू लावले, आरती केली. आणि एकीकडे मी आणि दुसरीकडे बापूंची लाकडाची काठी. बापूजी अनवाणी होते.

आजचा दिवस माझ्या जीवनात ऐतिहासिक झाला आहे. याच्या आनंदाची तर कोणी कल्पनाही करू शकणार नाही आणि बापूजींच्या या अद्भुत महायज्ञात बापूजींची काठी व्हायचा प्रसंग माझ्या जीवनात कधीकाळी येईल असे तर मी कधीही गृहीत धरले नव्हते.

बरोबर ७।। वाजताच्या टोल्यावर 'तारी ए हाक सुणी कोई ना आवे तो एकलो जाने रे (तुझी ही हाक कोणीही जर ऐकत नसेल तर तुला एकट्यालाच तुझी वाट चोखाळत जायचे आहे रे . . .)' हे कडवे होताच बापूजींनी घराबाहेर आपले अनवाणी पाऊल ठेवले. हे तर 'परथम पहेलू मस्तक मूकी वळती लेवू नाम' या चरणातील ओळीचेच सजीव चित्रण होते. 'एकला चलो' या भजनानंतर एकानंतर एक रामधून गातागाता आम्ही मार्ग कापत होतो. तुलसीदासजींनी गाईले आहे की 'दंडक वन प्रभु पावन कीनो ऋषियन त्रास मिटाई. . .' (प्रभू रामचंद्रांनी दंडकारण्य पवित्र करून ऋषींचा त्रास मिटवला होता.) अशाच प्रकारचे हेसुद्धा एक नवीन अरण्यच होते. आणि अनेक निर्दोषांना सहन करावे लागलेले अत्याचार आणि त्रास मिटवण्याकरिता जणू काय बापूजीच चालले नव्हते ! सोबत पुढे सैन्याचे लोक होते, नंतर वृत्तपत्रांचे वार्ताहर होते, आणि

त्यांच्या मागे बापूजी आणि मी. एका वेळी सोबत दोन माणसे मुश्किलीने चालू शकतील इतकी ही वाट अरुंद होती. परंतु मार्ग फार रमणीय होता. नारळाची आणि सुपारीची हिरवीगार पाने बापूजींसमोर नम्र होऊन जणू काय त्यांचे स्वागत करत होती. चोहोकडे गर्द हिरवीगार वनराई पसरलेली होती. आणि हा महापुरुष या वनराईतून जात असताना या प्रसंगाचा साक्षी राहण्याकरिता समोरच्या लालगुलाबी आकाशातून भव्य अरुणादय होत होता. आणि त्या अरुणोदयाचे सुंदर प्रतिबिंब सरोवरात पडलेले होते.

ठीकठिकाणी असेच सुंदर झरे होते. माझ्या मनात तर विचार आला की आजची ही सोनेरी आणि भव्य संधी कोणत्या पुण्याईमुळे अनुभवायला मिळते आहे? पूज्य मोटी बाचे आशीर्वाद आणि माझ्या आईवडिलांचा त्यांच्याबद्दलचा भक्तिभाव याचेच हे फळ आहे. अशाच अनेक भावभावनांनी मी आनंदविभोर झालेले होते. ईश्वराला एकच प्रार्थना करते की हे प्रभो! या कसोटीतून मला पार पाड ! रस्त्यात ज्या ठिकाणी थांबलो तिथे चांगेर गावातून सुशीलाबहेन येणार होत्या, पण त्या वेगळ्याच मार्गाने गेल्या.

मासिमपूर,

७ - १ - '४७

आता या वेळी बापूजी कातत आहेत आणि मी इथे लिहायला बसले आहे. इथे आम्ही नऊ वाजता पोहोचलो. इथे विशेष कोणाचे घर नव्हते. जिकडे पाहावे तिकडे जळालेल्या घरे आणि इमारती होत्या. निर्मळदा आधीच येऊन पोहोचले होते. निर्मळदांनी स्वतःचे सामान तर स्वतःच उचलले होते. अतिशय तत्त्वनिष्ठ माणूस आहे.

बाबा (सतीश चंद्र दास गुप्ता) आणि त्यांच्या मंडळीनी 'घडी करता येईल अशी एक झोपडी' (फोल्डिंग हट) तयार केली होती. ती उपयोगात आणली. खाली गवत होते, वर चटई टाकली. दोन खाटा होत्या. एक बापूजींसाठी आणि एक माझ्यासाठी. झोपडीला लहान लहान

खिडक्या आणि जाळ्या ठेवल्या होत्या. खूप व्यवस्था असलेली ही रमणीय झोपडी आहे. वर तिरंगी राष्ट्रध्वज फडकत होता.

सकाळी आल्याबरोबर बापूजींनी ही झोपडी पाहिली. नंतर झोपडीबाहेर एका पाटावर बापूजींचे पाय गरम पाण्याने धूत असताना (बापूजी अनवाणी चालत आल्यामुळे त्यांचे पाय संवेदनशील झाले होते. बापूजी पायांचे तळवे हाताइतके स्वच्छ ठेवायचे. तळव्याला किंचितही मळ वा डाग नव्हता.) बापूजी म्हणाले,

तू पाहतेस ना की सतीशबाबूंनी माझ्याकरिता हा महाल तयार करण्याकरिता किती मेहनत घेतली आहे? कोणाला हा उचलून एका ठिकाणाहून जर दुसऱ्या ठिकाणी न्यायचा असेल तर तो तसे सहजपणे नेऊ शकतो. त्याचे असे लहान लहान भाग केले आहेत की एखादा लहान मुलगासुद्धा यांतील एकेक भाग उचलू शकतो. इतके ते माझ्यावर आपल्या प्रेमाचा वर्षाव करत असतात. परंतु इतक्या सगळ्या अफाट प्रेमाचा स्वीकार कसा करता येऊ शकतो? यामुळे हा महाल या ठिकाणाहून दुसऱ्या कोणत्याही गावी न्यायचा नाही असे मी माझ्या मनात ठरवले आहे. हा महाल एक लहानसा दवाखाना तयार करण्याकरिता वा अशाच इतर कोणत्या तरी कामाकरिता वापरता येईल. मी तर ज्या कोणत्या ठिकाणी जाईन तिथे मला जे काही सहजपणे मिळू शकेल त्या आधारावर आरामात पडून राहीन. नाही तर शेवटी इथे सगळे वृक्ष किती मोठमोठे आहेत? ते काय आपल्याला नाही म्हणतील? त्यांच्याखाली आरामात पडून राहू. रामजीला जसे निभवायचे असेल तसे निभवील. त्याची काळजी आपण का करावी? गावांमध्ये आपले जे कार्यकर्ते जाऊन बसले आहेत त्यांनासुद्धा मी असेच म्हणेन की तेथील लोक तुम्हांला जे खायलाप्यायला देतील, जसे ते कुंटुंबातील लोकांना खाऊ घालतात तशाच प्रकारे त्यांचे कुटुंबीय होऊन तुम्ही राहा. आम्ही कोणी तरी आहो अथवा आम्ही तुमची सेवा करण्याकरिता आलेलो असल्यामुळे तुमच्यावर उपकार करतो आहो अशी भावना दाखवण्याकरिता नाही. आणि जर तुम्ही अशी भावना दाखवाल तर तुमचे तिथे निभूच शकणार नाही. तुम्ही जर आजारी

पडला तर औषधपाण्याकरिता गावकरी देतील त्यावर वा पंचमहाभूते देतील त्यावर समाधान माना. तुमच्याकरिता काय आणि माझ्याकरिता काय हाच नियम आहे. तुला जे काही म्हणायचे असेल ते म्हण, पण असा निश्चिय केला तर त्यांचे परिणाम निश्चितच अद्भुत होतील याबद्दल माझ्या मनात शंका नाही.

बापूजींचे पाय धुऊन मी मालीश केली. मालीश सुरू असताना बापूजींचा वीस मिनिट डोळा लागला होता. दोन वाजता उठले होते. रात्रीच्या दोन वाजतापासून तर पाऊणेदहा वाजेपर्यंत बापूजी सतत आठ (जसे आहे तसे.) तास काम करत होते. आंघोळ वगैरे आटोपेपर्यंत साडेअकरा वाजले. आज पहिलाच दिवस असल्यामुळे हे सर्व आटोपण्याकरिता वेळ लागत गेला. जेवणात दूध आठ औंस, वाफाळलेली भाजी, दोन खाकरे आणि एक ग्रेपफ्रूट घेतले.

जेवणाच्या वेळी सुशीलाबहेन आणि प्यारेलालजी बसलेले असल्यामुळे मी आंघोळ, धुणे आणि इतर काम करायला गेले. तीन वाजता बंगाली पाठ करत असताना बापूजी अर्धा तास झोपून गेले. मलासुद्धा पायांना तूप चोळून झोपायला जायला सांगितले. परंतु अजून माझे दुसरे काम राहिलेले असल्यामुळे मी झोपले नाही. बापूजी साडेतीन वाजता उठले. नारळपाणी घेतले. टपाल पाहिला, वाचला. बापूजींनी त्यांच्या दैनंदिनीत यांसंबंधी थोडीशी नोंद केली. पाउणेचार वाजता माती घेतली. अब्दुल्लासाहेब, झमानसाहेब यांच्याबरोबर निर्वासितांसंबंधी गोष्टी केल्या. आणि माती घेत नाही तोच 'मदतसमितीची सभा सुरू झाली. परंतु मी तिच्यात भाग घेऊ शकले नाही. मी जर तिच्यात बसले असते तर महत्त्वाची जी सर्व कामे होती ती करायची राहून गेली असती. यामुळे भाग घेण्याची इच्छा असूनही मी भाग घेऊ शकले नाही. अन्नदाबाबूंबरोबर जवळपास दोन तास निर्वासितांसंबंधी चर्चा चालली. बापूजींचे मत होते - काही दान तर केलेच पाहिजे हे जरी खरे असले तरी निर्वासितांनी दान घेण्यापेक्षा स्वावलंबनाकडे वळायला पाहिजे. पण केवळ दानावर राहणे म्हणजे 'फुकटाचे खायचे आणि मशिदीत झोपायचे' अशी आपली वृत्ती होईल.

बरोबर पाच वाजता आम्ही प्रार्थनेकरिता गेलो. प्रार्थनेत रामधून सुरू केली की मुसलमानभाई प्रार्थनेमधून निघून जाऊ लागले. परंतु प्रार्थना सुरूच राहिली. प्रार्थनेआधी सायंकाळी बापूजींनी एक कुस्करलेले केळ आणि आठ औंस दूध घेतले, आणि सायंकाळी साडेसात वाजता एक औंस गूळ घेतला.

दर्शनार्थी आणि मुलाखतीर्थी एकामागून एक येतच होते. परंतु साडेनऊनंतर निर्मळदा सर्वांना नाही म्हणाले. हे काम तर खरोखर निर्मळदाच पार पाडू शकत होते.

बापूजी थोडेसे फिरल्यानंतर त्यांचे पाय धुतले. बापूजींनी बंगाली पाठ केला. अंथरुण टाकायचे वगैरे रात्रीचे कामकाज मी पूर्ण केले. साडेनऊ वाजता बापूजी अंथरुणावर पडले. बापूजींचे पाय दाबले, त्यांच्या डोक्याला तेल चोळले आणि मग नोंद करण्याकरिता मी अर्धा तास सुटी मागितली. उशिरातउशिरा दहा वाजता झोप असे बापूजी म्हणाले. आजची नोंद तुटक तुटक लिहिली आहे. सर्व काम पूर्ण होऊ शकणार नाही, काही राहून जाईल अशी भीती वाटत होती. परंतु आज तर कशाचीच काही विशेष अडचण नव्हती. सकाळी मालीश आणि स्वयंपाकाची एकच वेळ होती. मी कुकर लावायला थांबले तर तितक्या वेळेत बापूजींना उशीर व्हायचा. बापूजींनी खाकरे वरखाली करून ठेवण्याची सूचना केली. खाकऱ्याऐवजी मुरमुरे चालवता येतील. परंतु मी याला नकार दिला. यामुळे बापूजी म्हणाले की खाकरे वरखाली करून ठेव म्हणजे उद्या कामाचा विशेष ताण पडणार नाही.

ईश्वरकृपेने आजचा दिवस निर्विघ्नपणे खूप चांगल्या प्रकारे पार पडला.

बापूजींच्या डायरीची नकल केली. बरोबर दहा वाजले आहेत. बापूजींना दिलेल्या वचनाप्रमाणे मीसुद्धा आता झोपायला जाते आहे.

फतेहपूर,

८ - १ - '४७

बापूजींनी मला दोन वाजता उठवले. जाजूजींना पत्र लिहायला लावले. त्यात . . . च्या पत्राचा उल्लेख केला. बिहारविषयी राजेंद्रबाबूजींकरिता एक पत्र लिहवून घेतले. मग माझी डायरी ऐकली. आता दररोज रोजनिशी ऐकली जाईल म्हणून सही करा असे मी म्हणाले. म्हणाले, “महादेव-प्रभा जसे काम करत होते तसे तुला शिकवण्याची इच्छा आहे. तू बरेच काही शिकली आहेस, पण अजून बरेच काही शिल्लक आहे”. बापूजींनी टपाल लिहायला लावला. मग मी तो परत वाचून दाखवला. इतक्यात प्रार्थनेची वेळसुद्धा होऊन गेली.

प्रार्थनेनंतर तीनचार दिवसांच्या माझ्या दैनंदिनीवर सही केली, आणि मग निर्मळदांबरोबर काम केले.

बरोबर सात वाजता आम्ही मासिमपूरहून इथे येण्याकरिता निघालो, सोबत किती तरी स्थानिक स्वयंसेवक होते. थोडे थोडे सामान सर्वांनी उचलून घेतले. साडेआठ वाजता इथे पोहोचलो. रस्त्यात मुसलमानभाई भेटत होते. बापूजी सगळ्यांना सलाम करायचे. परंतु हे लोक तर जणू काय काही दिसतच नाही अशा प्रकारे निघून जायचे. मी बापूजींना म्हणाले, “या लोकांना जर तुमच्या सलामची किंमत नाही तर तुम्ही यांना सलाम का करता?” बापूजी म्हणाले, “असे केल्याने आपण काय गमावणार आहो? केव्हा तरी तुला हे निश्चितच कळेल. आपण नम्रपणा कधीही सोडू नये. या लोकांना तर आपले शत्रू आले आहेत असेच वाटते. जेव्हा की मी मात्र कोणाचाही शत्रू नाही, पण सर्वांचा मित्र आहे, सेवक आहे हे मला त्यांना दाखवून द्यायचे आहे. आणि माझा हा दावा तेव्हाच सिद्ध होईल जेव्हा माझ्यात आणि माझ्याबरोबर असणाऱ्या माझ्या सहकाऱ्यांमध्ये पूर्ण नम्रता असेल . . .”

कालप्रमाणेच रस्त्यात धून, भजन इत्यादी चालले.

येथील एका शाळेत आम्ही उतरलो होतो. ही शाळा मुसलमानांची आहे. बापूजी पाय धूत नाही तोच काही मुसलमान बापूजींशी गोष्टी करायला आले. मला तर वाटत होते की ते केवळ गप्पा मारायलाच आले होते. परंतु बापूजी अतिश धीराने त्यांचे बोलणे ऐकून घेत होते. ते लोक बापूजींशी बोलत होते इतक्या वेळात मी बापूजींच्या आंघोळीकरिता एक खांब उभा करून त्याच्या चोहोकडे कनात बांधली आणि मालीशकरिता तेलाची व्यवस्थाही केली. या न्हाणीघरात कमोडसुद्धा ठेवला. बापूजींकरिता भाजीसुद्धा वाफाळायला ठेवला आणि खाकरेही करून टाकले. आमच्याबरोबर जीवनसिंगजींच्या नेतृत्वाखालील आझाद हिंद सेनेची एक तुकडीसुद्धा आहे. या लोकांनी बाहेर दगडाची चूल तयार केली आणि त्यावर ते दाळ आणि पराटे तयार करत होते. अशाच प्रकारची एक चूल तयार करून तिच्यावर बापूजींच्या आंघोळीकरिता पाणि ठेवले. वारा आणि थंडी खूप होती. मालीश करत असताना बापूजी झोपू शकले नाही. मालीश सुरू असताना बापूजी म्हणाले, "हे लोक किती मूर्खासारखे बडबडत होते ! जणू काय ते अगदी निर्दोष; आहेत?" साडेअकरा वाजता सर्व कामकाज आटोपून बापूजींना जेवू घातले आणि मग आंघोळ, धुणी वगैरे करायला गेले. बापूजींनी जेवणात तीन खाकरे, आठ औंस दूध, भाजी-यीस्ट आणि एक ग्रेपफ्रूट घेतले.

इथे पाण्याचीसुद्धा खूप टंचाई आहे. बाहेरून बादलीने पाणी आणावे लागते. ते आणले. माझे आणि बापूजींचे कपडे धुतले आणि आघोळ केली. तोवर एक वाजून गेला. मग जेवले. आज तर सरदार जीवनसिंगजींनी दाळ आणि पराटेच खाल्ले. पराटे पंजाबी होते. इतके जाड की मुश्किलीने अर्धा पराटा खाता येईल. परंतु जीवनजी तीन दगड ठेवून मजेत पराठे शेकत होते. सर्व मिळून हातभार लावत काम करत होते.

बापूजींना जमिनीवर पाय घासताना पाहून त्यांच्या पायाला चीर पडल्याचे व त्यातून रक्त येत असल्याचे लक्षात आले. त्या चिरेत  तूप भरले. माझ्या डोळ्यात अश्रू आले. अंगठ्याच्या सांध्यात तर खोलवर चीर पडली होती. या वयात बापूजींना किती कठीण कसोटीतून जावे

लागत आहे ! हिंदुस्थानचे काय दुर्दैव आहे की तो या महापुरुषाला ओळखू शकला नाही? ईश्वर मोठ्या माणसांचे असे हाल का करत असतो? रामचंद्रजींनी ननवास भोगला म्हणूनच ईश्वरावतार म्हणून आज त्यांची पूजा होते. अशा प्रकारे जगाला पाठ शिकवायला ईश्वर अवतार घेत असतो. जेव्हा जेव्हा अधर्म पसरतो तेव्हा तेव्हा ईश्वराला अवतार घ्यावाच लागतो.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानामधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।।

गीतेतील कंठस्थ केलेला हा श्लोक समोर आला. आज परिस्थिती अगदी या श्लोकात सांगितल्या सारखीच आहे. दुपारी कताई करून माती घेतलेली असतानाच बापूजी मुसलमान बंधूंबरोबर गोष्टी करत होते. गोष्टी सुरू असताना बापूजी त्यांना म्हणाले, "तुम्ही जर हिंदूंचा स्वीकार करणार नाही तर माझी परिस्थिती बिकट होईल. इथे तुम्ही बहुमतात असल्यामुळे एकट्या हिंदूला मारता. असे तर एखादा लहान मुलगासुद्धा करू शकतो. असे हलकटपणाचे काम करा असे कुराण शरीफमध्ये कुठे लिहिले आहे हे मला सांगा. मी तर कुराण शरीफचा अभ्यासू आहे. आणि शिवाय मुसलमानांबरोबर माझी गाढ मेत्री राहिलेली आहे. आजसुद्धा ही जशी माझी पोरगी आहे तशाच अनेक मुसलमान मुली आहेत. त्यांतील एक अमतुस्सलाम आहे. ती इथेच उपवास करते आहे. तिला तर तुम्ही ओळखताच. माझ्याकरिता जीव देईल अशी ही पोरगी आहे. यामुळे तुम्हांला माझी विनंती आहे की जो कोणी असे अनुचित वर्तन करत असेल त्याला सावध करा. असे केल्याने तुमचे भवितव्य उज्ज्वल होईल."

नंतर त्या मुसलमामान भाईंनी बिहार आणि इतर ठिकाणांबद्दल तक्रारी केल्या. या दरम्यान बापूजींना झोप न आवरता आल्यामुळे त्यांचा तोल गेला. बापूजी रात्री दोन वाजता उठले होते. यामुळे ते खूप थकून गेले होते. परंतु तोल गेल्याबद्दल बापूजींनी त्या भाईंची माफी मागितली. नम्रपणाचे असे वेगवेगळे पाठ मिळत असतात.

चार वाजता बापूजींनी दूध, फळे, तीन संत्री आणि थोडीशी भाजी घेतली. त्यानंतर बापूजी प्रार्थनेत गेले. प्रार्थनेत मुसलमानभाईसुद्धा होते. प्रार्थनेमधून येत असताना हरेरामजी भेटले. (हे हरेरामजी बिरलाजींकडे नोकर होते. हरिजन आहेत. दिल्लीत बापूजींची खूप सेवा करत होते. बिरलाजींनी यांना बापूजींची सेवा करण्याकरिता इथे पाठवले होते. आता हरेरामजी बापूजींच्या सेवेशी एकरूप झालेले होते.)

हरेरामजी बापूजींना प्रमाण करायला आले होते. तुम्ही इथे कसे काय आला वगैरे बापूजींनी विचारपूस केली. बापूजी त्यांना नकार देत म्हणाले, “ही तर तपश्चर्या आहे. मी जर बिरलाजींना म्हणालो की मला स्वयंपाकी, मोटर, गाडी, विमान नोकरचाकर पोहोचवा तर ते सर्व पाठवतील. हे सर्व भाऊ असे आहेत. परंतु याला यज्ञ म्हणता येणार नाही. यज्ञात अडचणी तर येतच असतात. आणि अडचणींशिवाय तप कसे म्हणता येईल?” इतके म्हणून बापूजींनी त्यांना निरोप दिला.

बिचारे अतिशय निराश झाले. माझ्याजवळ येऊन म्हणाले, “मला ठेवून घ्यायला तुम्ही बापूजींना सांगा ना.” मी म्हणाले, “बापूजी जर बिरलाजींचे ऐकणार नसतील तर माझे काय ऐकतील? आणि मी जर असे काही म्हणायला गेले तर मलाच काढून टाकतील ना?”

फिरत असताना एका मुसलमानभाईच्या आग्रहामुळे त्यांच्या घरी गेलो. जाताना आणि परतताना बापूजी फार वेगात चालत होते. सुशीलाबहेन आल्या आहेत.

फिरून आल्यानंतर बापूजींनी गरम पाणी आणि मध घेतले. प्रार्थनाप्रवचन आणि टपाल पाहिले. सुशीलाबहेनकडून थोडेसे श्रुतलेखन करवून घेतले.

मी माझी दैनंदिनी लिहिली. बापूजींचे आणि माझे अंथरूण घातले. उघडलेले सामान परत बांधले. बापूजींचे पाय धुतले. बापूजी दहा वाजता अंथरुणावर पडले. नंतर त्यांचे पाय दाबले. डोक्याला तेल चोळले. त्यांना झोप लागल्यानंतर चरख्यावरील सूत काढले. मीसुद्धा कातले.

तेव्हा साडेदहा वाजून गेले होते. बापूजींना हे आवडले नाही. ते म्हणाले, "मी झोपायला गेल्यानंतर तुला मी साठसत्तर मिनिट जागायची सूट दिलेली नाही. काही काम जर झाले नाही तर दुसऱ्या दिवशी मला तसे सांग."

मी १०।। वाजता झोपले.

(बापू. ९ - १ -'४७, फतेहपूर)

दासपाडा,

९ - १ - '४७

आजसुद्धा फतेहपूरमध्ये बापूजींनी मला दोन वाजता उठवले होते. रात्री लवकर झोपण्याबद्दल सांगितले. मग दिवा लावून जाजूजींनी चरखा संघाचा जो लांब अहवाल पाठवला होता तो वाचण्यात बापूजींचा बराच वेळ गेला आणि तेवढ्यातच प्रार्थनेची वेळ झाली.

प्रार्थनेनंतर माझ्या दैनंदिनीवर बापूजींची सही घेतली. बापूजींना गरम पाणी आणि मध देऊन रस काढायला गेले. तितक्या वेळेत काल लिहिलेल्या टपालावर बापूजींनी सह्या केल्या आणि त्यांतील दुरुस्त्या सांगितल्या.

फतेहपूरहून इथे येण्याकरिता आम्ही बरोबर ७.३५ ला निघालो. इथे एक लहानशी झोपडी होती, पण ती खूप स्वच्छ होती. एक म्हातारा सोडला तर घरात एकही माणूस नव्हता. या दंगलीत यांचे बरेच काही होमले गेले आहे. नारळाच्या पानाचे छत आहे. कूबासारखे (आफ्रिकेतील झुलूंच्या झोपडीसारखे) वाटते. बापूजींना हा कुबा फार आवडला.

बापूजींचे पाय धुऊन मालीश, आंघोळ वगैरेंची तयारी केली. आज तर सरदाजींच्या माणसांनीच आंघोळ आणि मालीशकरिता खांबाला पडदा लावला. कर्नल जीवनसिंगजींनी बापूजींकरिता भाजी साफ करून चिरून दिली. भाजीचा कुकर मी कसा लावते हे त्यांनी रस घेऊन पाहिले. मी बापूजींना सरदारजींबद्दल सांगितले. त्यावर बापूजी म्हणाले,

“हे तर जबर सैनिक आहेत. सुभाषबाबूंबरोबर यांनी काम केले आहे. यांना तलवार, बंदूक वगैरेंचे डावपेच खूप चांगले येतात. पण इथे हे अहिंसक होऊन बसले आहेत. हे काही असेतसे माणूस नाहीत. परंतु माझ्याजवळ असे अनेक सैनिक राहिलेले आहेत. आफ्रिकेतील लढाईत जे सैन्य होते त्या सर्वांना आपापले काम करावे लागत होत. प्रत्येक काम धावपळ करत करावे लागत असे. त्यात चांगले चांगले शिकलेले हिंदुस्थानी स्वयंपाक करायचे, आणि गोरेसुद्धा त्यांच्या उत्साहात सहभागी व्हायचे. यामुळे जीवनसिंगजींना जर स्वयंपाक आला नसता तर मला नवल वाटले असते. ते स्वयंपाक करतात त्यात मला काहीही विशेष वाटत नाही. ते सैनिक आहेत, यामुळे त्यांना सर्व काम तर यायलाच पाहिजे.”

मालीश सुरू असताना बापूजी २०-२५ मिनिट झोपले. आंघोळ आटोपली तेव्हा १० वाजून गेले होते. जेवत असताना मारवाडी रिलीफ सोसायटीच्या एका भाईने काही पुस्तकेआणली होत्या, ती पाहिली.

जेवणात तीन खाकरे, भाजी, दूध, संत्री, आणि खोपऱ्याच्या संदेशाचे दोन काप घेतले.

बापूजींना जेऊ घातल्यानंतर मी आंघोळ केली, कपडे धुतले, जेवले. तेवढ्यात ४।। वाजून गेले. बापूजी लेखनाच्या कामात गुंतलेले असल्यामुळे मी त्यांची भाडी घासली आणि (चरख्यावरून वा टकळीवरू) सूत काढले. मग बापूजींच्या पायांना तूप चोळले. बापूजींकरिता गूळ तयार केला. आज बकरीचे दूध जवळपास अडीच शेर (एक शेर एक किलोपेक्षा थोडा कमी असतो.) नंतर काही पत्रांची नकल केली. थोडा वेळ झोपले. तीन-साडेतीन वाजता बापूजींनी उठवले. साडेतीन वाजता बापूजींना माती लावून पाय दाबले. सायंकाळी बापूजी भाजी घेणार नव्हते. दूध आणि खजूर घेणार होते. मी बापूजींच्या रोजनिशीची नकल केली. सामानाची

बांधाबूंध केली. एवढ्या कामात साडेचार वाजले. बापूजींना दूध देऊन मी माझे कामकाज केले. तेवढ्यात प्रार्थनेची वेळ झाली.

प्रार्थनेनंतर स्थानिक मुसलमानभाई भेटायला आले. बापूजींनी शांतता समिती नेमायची सूचना केली.

प्रार्थनेत फार कमी माणसे आली होती. त्याबद्दल बापूजी प्रार्थनेत म्हणाले -

"तुम्ही इतके कमी आहा हे मला आवडलेही आणि आवडले नाहीही. आवडले याकरिता की मला तोंड दाखवण्याकरिता येणापेक्षा तर न येणे चांगले. परंतु मी एक अशी गोष्ट ऐकली आहे की 'प्रार्थनेकरिता जाल तर पकडले जाल वा माझ्याबरोबर जे पोलीस आहेत ते मारतील'. या भीतीमुळे बरेच लोक आले नाहीत. मला तुम्हा सर्वांना सांगायचे आहे की मुसलमान असे म्हणतात की गांधीला आम्ही कुठेही थांबू देणार नाही. तर तुम्हांला जर पोलिसांची खोटी भीती वाटत असेल तर सरकारवर दडपण आणून तुम्ही त्यांना काढून टाकायला लावू शकता. मी तर तुमचा मित्र आहे. तुम्हांला कोणालाही पकडून द्यायला वा त्रास द्यायला मी आलेलो नाही."

बापूजी आणि मी साडेनऊ वाजता झोपलो. रोजप्रमाणे मी पाय दाबले, तेल चोळले आणि मग लगेच झोपले. यामुळे ते खूप खुश झाले. म्हणाले, "हं, इतक्या लवकर झोपू लागशील तर माझ्या आनंदाला पारावार राहणार नाही. परंतु ('शेठनी शिखामण झांपा सुधी तो नही रहेने?') शिकवण तात्पुरती तर राहणार नाही ना? आपण हा वाक्प्रचार बदलवून शिकवलेले जीवनभर आठवण ठेवीन असा निर्धार केला पाहिजे."

(बापू. १०-१-'४७, दासपाडा)

दासपाडा,

१०-१-'४७

रोजप्रमाणे बापूजीं दोन वाजता उठले. मलाही उठवले. गुजरातीतूनच टपाल लिहायला लावला. मावळणकरदादा, मणिलालकाका, सुशीलाकाकी, रामदासकाका आणि कहानला. तेवढ्यात प्रार्थनेची वेळ होत आली. तोंड वगैरे धुऊन प्रार्थना केली. प्रार्थनेनंतर मधपाणी घेता घेता बापूजींनी माझ्याशी जवळपास चाळीस मिनिट गोष्टी केल्या.

आज बापूजींचे बोलणे पराकोटीच्या नम्रतेला पोहोचले होते. "माझा आरोप तुझ्यावर होता. हा पूर्णपणे खोटा आरोप मी तुझ्यावर केला होता असेच मी म्हणेन. तुझ्यापेक्षा खूप मोठा असलेला मी, तुझा आजोबा असलेला मी तुझी माफी कसा मागू शकतो? तरीही तुझी माफी मागतो आहे ही गोष्ट खोटी नाही. परंतु तुझी अशी इच्छा नाही. माझे आत्मसमाधान यामुळे झाले की मी नकळत तुझ्यावर तुला चिरडून टाकले तेव्हा कुठे मी तुला ओळखले. . . . ची गोष्ट मी आज मान्य करतो आणि तुझी ओळख पटल्याबद्दल आज मला आनंद होतो. मनुडीला हे सांगायचे की नाही? सांगितले तर ती फुगून तर जाणार नाही? हा विचार कालपासून माझ्या डोक्यात सारखा घोळत होता. मग असाही विचार आला की नंतर तू उडून गेली तर? घड्याळात पाहिले. दोन वाजले होते. वाटले की चल जा, मनूडीला उठव आणि तुझे निर्दोषित्व मला मान्य आहे असे तिला सांगणे तुझा धर्म आहे. कदाचित अशात मी मेलो तर? कारण अजून चोहोकडे मला अंधार दिसतो आहे. जिकडेतिकडे असत्यच भरले आहे. एकीकडे बिहारमध्ये दावानलाचा स्फोट झालेला आहे. काही केल्या त्याचा अंत होऊन राहिलेला नाही. अशात माझा कसा टिकाव लागेल? मार्ग कुठून काढता येईल हे सांगता येत नाही. तू खरी आहेस म्हणूनच तर तू रोज दहाअकरा वाजता झोपतेस आणि दोन की अडीच वाजता मी तुला उठवतो. तू काम करतेस, तुला किंचितही आराम मिळत नाही. असे असूनही ईश्वर कसा निभवतो हेच आश्चर्य आहे. यामुळे

तुला हे सगळे सांगितले. आणि असे समज की या जगात मी जर नसलो तर निदान तुझ्याबद्दलच चांगले विचार तुला सांगून टाकावे असे एकाएकी वाटले."

आदर्श विवाहासंबंधीचे आपले विचार सांगताना बापूजी म्हणाले -

"लग्न करणे हे पाप नाही. पण आज याला आपण पापासारखे करून टाकले आहे. विवाहकरण्यायोग्य स्त्री-पुरुष सोबत येतात म्हणून तर या जगातील जीवनचक्र सुरू आहे. ते चालवण्यात, इतकेच नाही तर जगातील दुःख दूर करण्यात विवाहसंस्था मदतरूप आहे. एका गाडीला दोन पाय असतात. परंतु विवाहित होण्याने विषयवासनेचे पोषण होते. खूप मुले होतात, ते इकडेतिकडे भटकत असतात, खाण्याची मारामार असते तर दूध कुठून मिळणार? पतिपत्नी आपसात बाचाबाची करतात, भांडतात. अशा या वातावरणात त्यांचे शरीर तकलादू होऊन जात असते. यामुळे विवाह करण्याआधी मी मुलांना विचार करायला सांगेन. लग्न केल्यानंतर ब्रह्मचारी राहणे अधर्म वाटतो. दोघेही जण विचारपूर्वक ब्रह्मचर्य पाळून आपले जीवन व्यतीत करत असतील तर ते किती उच्च पातळीवर जातील? मी जो काही उच्च पातळीवर चढलो आहे तो मी बॅरिस्टर झालो म्हणून नाही आणि बा इतकी उंच चढली कारण ती माझी पत्नी होती म्हणूनही नाही. लोकांनी मला महात्मा हे पद दिले आहे त्याचे श्रेय पूर्णपणे बाला आहे. ब्रह्मचर्य पाळण्याकरिता माणसाने निर्विकार असायला पाहिजे. जो निर्विकार असेल त्याच्यासमोर अप्सरा जरी येऊन उभी राहिली तरी त्याची नजर दुषित होणार नाही. जो निर्विकारी असेल त्याच्यात क्रोध, मोह, असत्य, हिंसा, चोरी, खोटेपणा, परिग्रह, असा कोणताही दोष असूच शकत नाही. अथवा मी तर इथपर्यंत म्हणेन की हे अवगुण अशा माणसात प्रवेशूच शकत नाहीत. या सर्वांबरोबर जर मनात रामजी खेळत असतील तर माणूस आजारी तर काय त्याला कधी फोडफुंशीही होणार नाही. एखाद्या मित्राची भेट घ्यायला जात असल्याप्रमाणे

रामजीचे नाव घेऊन तो मृत्यूला भेटायला जाईल. आजाराच्या धाकाने हा कधीही मरणार नाही. हा झाला वैवाहिक जीवनाचा मोठा लाभ. पण असा लाभ तर कोणी क्वचितच घेऊ शकत असतो. हा लाभ घेण्याइतका आपला आत्मा प्रबळ नसेल तर काहीही होणार नाही. . . . नाही तर . . . च्या सारखे हाल होतील.

"ज्याप्रमाणे एखादे काम करायचे असेल तर उदाहरणार्थ बाजरीची भाकरी कशी करतात माहीत आहे? माझ्या आईने केलेल्या भाकरीची चव मला अजूनही आठवते. आता तर भाकरी फळीवर थापून करतात. माझी आई, बा, टाळ्या वाजवल्याप्रमाणे दोन हातांनी थापटून भाकरीला आकार द्यायच्या. त्यांना फळीची गरज वाटत नसे. परंतु आता हात काम करत नसल्यामुळे कदाचित फळीची गरज पडत असेल. परंतु भाकरीत खरा गोडवा तर जेव्हा ती हाताने करतात तेव्हाच येतो. तुला या स्वादाची कदाचित कल्पनाही नसेल.

"अशा प्रकारे . . . दुप्पट शक्तीने अधिक सेवा करण्याकरिता विवाह असा विवाहाचा माझा अर्थ आहे. याप्रमाणे सेवा म्हणजे देशसेवा करणे. देशसेवेचा असा अर्थ नाही की मंत्री होऊ तरच सेवा होईल. घर सांभाळणे हीसुद्धा देशसेवा आहे. उदाहरणार्थ आपण स्वयंपाक करतो. तर स्वयंपाक अशा प्रकारे केला पाहिजे की अशा कठीण प्रसंगी अन्नाचा एक कणही वाया जायला नको. आपण जर आपल्या शरीराकडे थोडे बारकाईने पाहिले तर हे तत्त्व सिद्ध करणारी उदाहरणे तिथून मिळू शकतील. कपडे अशा प्रकारे घातले पाहिजे की त्यामुळे शरीराचे रक्षण झाले पाहिजे. आपल्या देशातील एकासुद्धा माणसावर नागडा वा उपाशीतापाशी राहायची वेळ यायला नको. प्रत्येकाने आवश्यकता असेल इतकाच संग्रह केला पाहिजे. आजकाल बऱ्याच घरात लोक काटकसर तर करतात, पण ते इतका काही संग्रह करतात की त्यामुळे ती गोष्ट एक तर इतरांना मिळू शकत नाही वा त्यांना ती फार महाग विकत घ्यावी लागते. हिला स्वार्थी काटकसर

म्हणतात. याकरिता आपण अशी वृत्ती धारण करणे शिकलो पाहिजे की आपण जे काही करतो ते देश दृष्टीत ठेवून केले पाहिजे. अशा प्रकारे जर गृहीणी वागेल तर माझ्या दृष्टीने ती फार मोठी देशसेवा करत असेल. आज तर देशसेवेचे नाव मोठे झाले आहे. वर्तमानपत्रात नाव आणि फोटो आला वा तुरुंगात जाऊन आलो की वा मंत्री झालो की तीच खरी देशसेवा. यामुळे प्रत्येकाला मंत्री होऊन सत्ता हाती घ्यायची इच्छा आहे. खरे मंत्री मग कोणते काम करू शकतील? मंत्र्यांचीसुद्धा देशाला गरज असते. परंतु मंत्रीपदाला पात्र असेल तरच तो शोभेल. ते सुशोभित व्हावे म्हणून आपण कर्तव्य केले पाहिजे. इतके कळले तर एका अशिक्षितहून अशिक्षित स्त्रीसुद्धा देशसेवा करू शकत असते असे विचार तुलाच अशा प्रकारे समजावून सांगतो आहे. . . . ला दिले ते खरे. पण थोडे वेगळ्या प्रकारे. त्यांची राहणीही वेगळी होती. त्या विवाहित होत्या. तू अजून लहान आहेस. तू सत्तर वर्षांची जरी झालीस तरी माझ्याकरिता सहासात वर्षांची बालिकाच राहशील. . . .

नोआखालीतील हा यज्ञ लवकर संपेल ही गोष्ट तर आकाशकुसुमासारखीच वाटते. यामुळे हिला काही अर्थ नाही. हिंदू-मुसलमानातील वैमनस्य नेहमीकरिता नाहीसे होईल अशा प्रकरचे शेखचिल्ली सारखे स्वप्न मी पाहू शकत नही. हे तेव्हाच होईल जेव्हा माझ्यात परिपूर्णता येईल. परंतु सध्या तरी माझ्या हृदयात या पातळीपर्यंतचे रामनाम रुजले आहे असा माझा दावा नाही. प्रयत्न सुरू आहे.

आजच्या या सर्व गोष्टींवरून तू गंभीर होण्याचे काहीही कारण नाही. आई म्हणून मी माझे कर्तव्य पार पाडतो आहे. माझ्या मनात जे भरलेले आहे ते तुला देऊन राहिलो आहे. तुझ्या दैनंदिनीत तू हे विचारपूर्वक लिहिशील. मला भीती वाटते की आजच्या या गोष्टी तुझ्याकरिता कदाचित कठीण असतील. शिवाय एका गोष्टीतून दुसऱ्या अनेक गोष्टी निघाल्या. परंतु आजची

गोष्ट तुझे जीवन घडवणाऱ्या पायासारखी आहे. मी जर मेलो तर तुझ्याकरिता, जयसुखलालकरिता, तुझ्या बहिणींकरिता आहे. पुरुष असतानाही मी तुझी आई झालो आहे. यामुळे या गोष्टी तुला सांगितल्यामुळे माझ्या डोक्यावर हे जे ओझे होते ते हलके झाले.

(चांगले लिहिले, थोडे लांब झाले आहे, बापू. लामचर, ११ - १ - '४७)

जगतपूर,

१० - १ - '४७

वरील गोष्ट बापूजींनी मोठ्या पहाटे सांगितली होती. ती लिहिण्यात माझा पूर्ण एक तास गेला. प्रार्थनेनंतर बापूजी प्रवचन तपासायच्या आणि आपल्या वैयक्तिक कामाला लागले. यामुळे त्यांना उशीर झाला. तेवढ्या वेळात मी माझे लेखन संपवले. बापूजींनी ते अजून पाहिले नाही. बापूजींना लांब वाटेल अशी भीती मला वाटत होती. बापूजी ७.४० ला बाहेर आले आणि आमची यात्रा सुरू झाली. बंगाली पाठ लिहिण्यात ७.३० नंतरही १० मिनिट लागले. सामान्यपणे यात्रा सुरू करण्याची वेळ ७.३०ची ठरवली आहे.

दासपाड्याहून इथे येण्याच्या आमच्या मार्गाची साफसफाई करण्यात आली होती. परंतु मुसलमामान बांधवांनी गाईम्हशी वगैरे जनावरांच्या शेणाने आणि मलमुत्राने तो रस्ता परत घाणेरडा केला होता. असे त्यांनी जाणूनबुजाून केले असेही ऐकिवात आले. बापूजी म्हणाले, “हे मला आवडले. अशा प्रकारे त्यांचा माझ्यावरील रोष जर बाहेर पडत असेल तर त्यात काही वाईट नाही.”

हे झोपडे एका हिंदूचे आहे. इथे आल्यानंतर दररोजप्रमाणे मालीश, आंघोळ वगैरे सर्व कार्यक्रम आटोपण्यात साडेदहा वाजून गेले. मालीश करताना बापूजी चाळीस मिनिट झोपले होते. सकाळचे अकरा वाजता जेवण. जेवणात दोन खाकरे, भाजी, दूध आणि अननस घेतले.

साडेबारा ते एक आराम केला. एक वाजता उठून नारळाचे पाणी घेतले आणि कताई केली. दोन वाजता प्यारेलालजी आले. त्यांच्याबरोबर गोष्टी केल्या. तेवढ्यात काही भगिनी भेटायला आल्या. अनेक भगिनींशी लग्न करून त्यांना मुसलमान केले गेले होते. काही भगिनींच्या पतीचे आणि मुलांचे खून करण्यात आले होते. यामुळे त्या दुःखी होत्या. बापूजींजवळ हुंदके देत देत त्या आपल्या हृदयातील व्यथा रित्या करत होत्या. बापू म्हणाले, “तुम्ही हुंदके देऊन देऊन रडत आहा आणि मी तसा रडत नाही इतकाच तुमच्यात आणि माझ्यात फरक आहे. माझे हृदयसुद्धा रडत आहे. तुमचे दुःख हे माझे दुःख आहे. यामुळेच इथे आलो आहे. तुम्हांला आश्वासित करता येईल असे रामनामाशिवाय दुसरे कोणतेही औषध नाही. हे सगळ्यात श्रेष्ठ औषध आहे. हवे तितके रडा परंतु गेलेले परत मिळणार नाही. हे जर समजून घ्याल तर अशा प्रकारच्या दुःखाकरिता कारण राहणार नाही.”

हे आश्वासक शब्द बापूजींच्या तोडून अतिशय गंभीरपणे बाहेर पडत होते. आणि जसजसे बापूजी बोलत जात होते तसतसे वातावरण गंभीर होत चालले होते. या भगिनी जेव्हा भेटायला आल्या तेव्हा चांगल्या चांगल्या माणसांनाही आपल्या भावना नियंत्रणात ठेवता येऊ नये इतके वातावरण करुणामय झाले होते.

साडेतीन ते चार बापूजींनी माती घेतली. काही लोक भेट घेण्याकरिता आले होते. त्यांना भेटले. पाठवावयाच्या पत्रांवर सह्या केल्या.

सायंकाळी बापूजींनी केवळ गूळच घेतला. दूध, फळे सर्वच सोडले. म्हणाले, “आज या बहिणी भेटायला आल्या होत्या. ते दृश्यच असे होते की काही केल्या ते डोळ्यांसमोरून जाऊन राहिलेले नाही. अजून असे किती दृश्य नशिबात आहेत कोणाला माहीत !”

बाकी रोजप्रमाणे प्रार्थना. तिथून आल्यानंतर फिरले. प्रवचन पाहिले. मुलाखतीकरिता लोक आले होते. आठ वाजता पडल्या पडल्या वर्तमानपत्रे पाहिली.

जवळपास दहा वाजता बापूजी झोपले.

मी माझे सामान गोळा करून त्यांची बांधाबांध केली. ही रोजनिशी पूर्ण केली. साडेदहा वाजले आहेत. झोपायची तयारी. बापूजींचे एकशेवीस तार झाले आहेत.

बापूजींच्या पायाला हेझलीन लावण्याकरिता बाबांनी पाठवले आहे. झोपत असताना आजे ते लावले आणि पट्टी बांधली.

लामचर,

११ - १- '४७

जगतपूरमध्ये रात्र गेली. दोन वाजता बापूजींनी मला उठवले. मला रोजनिशी लिहिण्यासंबंधी विचारले. मग पत्रांचे श्रुतलेखन करवून घेतले. पहिले पत्र माधवदासमामांना (कस्तुरबा गांधीच्या भावाला) लिहायला लावले. आणि दुसरे . . . ला लिहायला लावले. प्रार्थनेची वेळ होताच लिहवून घेणे थांबवले. तोंड वगैरे धुऊन प्रार्थना केली. तोंड धूत असताना बापूजींनी मला आज जेवणात तू काय घेणार आहेस असे विचारले. इतक्या सगळ्या कामातही माझ्या अगदी लहानसहान गोष्टींकडेसुद्धा बापूजींचे कटाक्षाने लक्ष असते. प्रार्थनेनंतर बापूजींना गरम पाणी दिले. रस तयार करून भांडी घासून सामान तयार केले. सकाळी मला चांगल्यापैकी वेळ मिळाला. सकाळी आवश्यक असलेल्या गोष्टी रात्रीच मी बांधून ठेवल्या होत्या. साडेसात झाल्याबरोबर बापूजींनी उठायची तयारी केली. बापूजींनी कातलेल्या सूताला पीळ दिला. बापूजी न्हाणीघरात गेले तेवढ्या वेळात त्यांचा जो बिस्तरा बांधायचा राहून गेला होता तो बांधला. ठीक सात चाळीस झाले तेव्हा आम्ही जगतपूर सोडले.

रस्त्यात भजन, रामधून सुरू होते. रस्त्यात पूर्णपणे जळून गेलेले एक घर पाहिले. तिथे रक्ताचे डागसुद्धा होते. ते जुने असावे असे वाटत होते.

मी माझी कालची रोजनिशी लिहिलेली आहे असे बापूजींना सांगितले. इथे पोहोचताच टपाल आणि माझी डायरी हे दोन्ही बापूजींच्या टेबलवर ठेवले. बापूजींनी पाय धुऊन पत्रे तपासून त्यांच्यावर सह्या केल्या. मालीश सुरू असताना माझी दैनंदिनी तपासली. परंतु थकवा असल्यामुळे बापूजी झोपून गेले. आंघोळीनंतर जेवत असताना मी माझी डायरी वाचून दाखवली. थोडक्यात लिहिण्याबद्दल बापूजी सांगत होते. परंतु मला ते पसंत नाही. मी म्हणाले, मला तुमचा शब्दंशब्द लिहायचा आहे. बापू म्हणतात, "हा तुझा चुकीचा मोह आहे. पण मला काही तुझे लग्न करून द्यायचे नाही. तू जितके अधिक लिहिशील तितकी तुझ्या अक्षरांमध्ये सुधारणा होईल अशी माझी मान्यता आहे."

जेवता जेवता माझ्या रोजनिशीवर सही केली. तेव्हासुद्धा लांब आहे असे म्हणून माझ्यावर टीका केली. परंतु एकूण पाहता बापूजींना मी लिहिलेले आवडले. लगेच लिहिलेले असल्यामुळे विशेष असे काही मी विसरले नव्हते.

जेवणात भाजी, बारा औंस दूध, पाच बदाम, तसेच पाच काजूची जी चटणी करायला लावली होती ती घेतली. बदाम आणि काजू जयंतीभाईंनी कराचीहून पाठवले होते. ते पार्सल रखडत रखडत आज मिळाले होते.

बापूजींच्या उजव्या पायाचा अंगठा दुखत होता. दुसरे काही करता येऊ शकत नव्हते.

जगतपूरहून लामचरचा रस्ता खूपच बेकार होता. जमीनीत फार चढउतार होते आणि खोदलेल्या शेतांमधून आम्हांला चालावे लागत होते. एक नवीन फेरबदल असा होता की आज पहिल्यांदाच रस्त्यात भेटलेला प्रत्येक मुसलमान बापूजींचा सलाम घेत होता आणि परत सलाम करत होता.

बापूजी वर्तमानपत्रे ऐकता ऐकता झोपून गेले. दहा वाजता परत उठले. त्या दरम्यान मी दैनंदिनी लिहिली आणि घरी टपाल लिहिला. मी चरख्यावरील सूत काढत होते तोच बापूजी जागे

झाले. बापूजी न्हाणीघरात गेल्यानंतर मी अंथरुण घातले. बापूजी साडेदहा वाजता अंथरुणावर पडले. बापूजींच्या डोक्यावर तेल चोळले, पाय दाबले. रोजप्रमाणे मी त्यांना प्रणाम केला. त्यांनी माझ्या पाठीवरून वात्सल्यपूर्ण हात फिरवला. मी केव्हा झोपले ते मला कळलेच नाही. खूप काम राहिले होते. पण रात्री झोप लागायला मला पाच मिनिटसुद्धा लागले नाही.

कारपाडा,

१२ - १ - '४७

रोज दीडदोन वाजता उठल्यामुळे बापूजींच्या प्रकृतीवर परिणाम होईल असे सुशीलाबहेन नाय्यरना वाटत असल्यामुळे काल त्यांनी  बापूजींना असे करायला मनाई केली. अखेरीस बापूजींनी हे कबूल केले आणि लवकर उठायचे नाही असे त्यांनी ठरवले. परंतु त्यांच्या सवयीप्रमाणे आज ते परत दीड वाजता उठून गेले. प्रार्थनेनंतर गरम पाणी आणि मध घेतले. त्याचबरोबर रसही घेतला. सुशीलाबहेनबरोबर गोष्टी करायच्या असल्यामुळे दुसरे काही लेखनाचे काम करवून घेतले नाही.

लामचरहून आम्ही सातचाळीसला निघालो होतो. आठपंचेचाळीसला इथे पोहोचलो. रस्त्यात . . . बरोबर सुरू असलेल्या गोष्टीत त्यांनी सर्वांना एक होऊन सोबत चालायला सांगितले. कारपाड्यात तेथील बंधुभगिनींनी भव्य स्वागत केले. सुशीलाबहेन पैकडे (सुशीलाबहेन पै सध्या कस्तुरबा स्मारक ट्रस्टच्या सचीव आहेत. परंतु नोआखालीत बापूजींबरोबर जितके कार्यकर्ते होते त्या सर्वांना प्रत्येकी एकेक गाव सोपवण्यात आले होते. त्यानुसार सुशीलाबहेन पैंना हे गाव सोपवण्यात आले होते.) असलेले हे गाव आहे. त्यांनी गावातील लोकांवर आपल्या प्रभावाची खूप छाप पाडली आहे. विशेषतः भगिनींना आणि मुलींना त्यांच्याबद्दल खूप आदर वाटतो.

त्यांनी बापूजींच्या मालीशकरिता आणि आंघोळीकरिता फार चांगली व्यवस्था केली होती. तिथे पोहोचताच बापूजी मालीश आणि आंघोळीकरिता गेले. मालीश आणि आंघोळीनंतर जेवणात भाजी, संदेश, दूध, पाच बदाम आणि पाच काजू घेतले. हे बदाम काजू सुशीलाबहेनने किती तरी दिवसांपासून बापूजींकरिता जपून ठेवले होते. बापूजी आपल्या घरी आले की त्यांना हे द्यायचे असे त्यांनी ठरवले होते. बापू म्हणाले, “हे तर शबरीच्या बोरासारखे झाले.”

दुपारी स्त्रियांची सभा होती. बापूजींनी त्यांना कातण्याची विनंती केली. भगिनींची उपस्थिती खूप मोठी होती. यामुळे दुपारचा सर्व वेळ या सभेतच गेला. सायंकाळी दूध आणि थोडीशी पपई घेतली. आज बापूजींनी जवळपास पंचेचाळीस मिनिटात १५० तार कताई केली. धनुष टकळीने कातले होते. सायंकाळी थकवा वाटत असल्यामुळे जवळपास ८।। वाजता झोपून गेले. सायंकाळी सहा ते सहा मौन घेतले. सरदार निरंजनसिंह गिल आले आहेत.

(बापू. नारायणपूर, १५ - १ - ‘४७)

शाहपूर,

१३ - १ - ‘४७

चार वाजता उठलो. आज सकाळची प्रार्थना कारपाड्यात सुशीलाबहेन पैनी करवली होती. प्रार्थनेनंतर नेहमीप्रमाणे गरम पाणी आणि मध घेतले. काहीमखाना एक तार पाठवली. अमतुस्सलामबेन उपवास करून राहिलेल्या असल्यामुळे त्यासंबंधीची ही तार होती. टपाल वाचता वाचता बापूजी झोपले. बरोबर साडेसात वाजता उठले. आणि ७.४० वाजता कारपाड्याहून आम्ही इथे यायला निघालो. निघण्यापूर्वी सुशीलाबहेनने सर्वांच्या कपाळाला कुंकू लावले. दोन्ही सुशीलाबहेन बापूजींबरोबर होत्या. डॉ. सुशीलाबहेन नाय्यर आणि सुशीलाबहेन पै. प्यारेलालजीसुद्धा सोबत होते. चालत असताना त्यांनी मला गीतेच्या बाराव्या अध्यायाविषयीचे प्रश्न समजावून सांगितले.

बरोबर साडेआठ वाजता आम्ही इथे पोहोचलो. आज मालीश, आंघोळ हे सर्व मीच करविले. जेवणात दोन खाकरे, आठ औंस दूध, निंबू, कच्ची भाजी, आणि संदेशचा एक काप इतके घेतले होते. जेवत असताना . . . शी खाजगी गोष्टी सुरू असल्यामुळे मी आंघोळ, धुणी धुणे या माझ्या कामांकरिता निघून गेले आणि ते सर्व लवकर आटोपले. बापूजी जेवून उन्हात झोपले. डोक्यावर सावली केली होती. सहाएक वाजेपर्यंत बाहेरच उघड्यावरच होते. दुपारी सुचेताबहेन आल्या. त्यांनी सांगितलेल्या गोष्टी इतक्या काही भयानक होत्या की थरकाप उडावा. क्रूर पद्धतीने हिंदू बहिणींची अब्रू घेण्यात आली होती. डॉ. सुशीलाबहेन शव तपासायला गेल्या आणि अमतुस्सलामबहेनला तपासून साडेचार वाजता परत आल्या.

सायंकाळी आठ औंस दूध आणि आठ खजूर वाफाळून घेतले.

प्रार्थनेनंतर आधी फिरून आलो. सव्वाआठ वाजता बापूजींचे पाय धुतले आणि बापूजी अंथरुणावर पडले. बापूजींचे आंगठे आता चांगले आहेत. बापूजी म्हणाले, “तुम्ही सर्वांनी माझी सेवा करून करून मला नाजूक करून टाकले आहे. इतके की माझे पायसुद्धा नाजूक झाले आहेत. याचे फळ तर मलाच भोगावे लागणार आहेत ना?”

(बापू. नारायणपूर, १५ - १ - ‘४७)

भटियालपूर,

१४ - १ - ‘४७

दररोजप्रमाणे बापूजी आज चार वाजता उठले. प्रार्थनेनंतर शाहपूरच्या घरमालकिणीशी गोष्टी केल्या. घरमालकीण बापूजींना म्हणाली, “मला भीती वाटते.” बापूजी म्हणाले, “तुला जर भीती वाटत असेल तर हा देश सोडणे तुझा धर्म आहे. जिथे भीती वाटते तिथे राहू नये.”

बापूजींना गरम पाणी दिले आणि मग अननसाचा रस दिला. रस घेतल्यानंतर बापूजींनी बंगाली बाराखडी लिहिली. लिहीत असतानाच त्यांना झोप आली. ७.३५ला बापूजी उठले आणि भटियालपूरला येण्याकरिता आम्ही निघालो.

आज हे गाव प्यारेलालकडे आहे. रस्त्यात काही मुसलमानांच्या घरी आम्ही दोघेही पाच पाच मिनिट थांबलो. मी मुसलमान भगिनींना भेटायला आत जात असे, परंतु मला आत येताना पाहून मुसलमान स्त्रिया पळून जायच्या. असे असले तरी मी आत जाऊन त्यांच्याशी बोलायचे. बापूजींना भेटायची विनंती करायचे - “तुमच्या अंगणाला एका संतमहात्म्याचे पाय लागले आहेत. असे असतानाही तुम्ही दर्शन घेतल्याशिवाय कशा राहू शकता?” एका वाडीतील बहिणी आधी हो म्हणाल्या, परंतु नंतर त्यांनी नकार दिला. परंतु त्या दूर उभ्या राहून पाहत होत्या. दुसऱ्या एका वाडीत तर भगिनींनी बापूजींबरोबर फोटो काढण्याची मागणी केली. बापू मध्ये खुर्चीवर बसले आहेत आणि त्या बहिणी आजूबाजूला उभ्या आहेत असा त्या कुटुंबातील एका मुलाने फोटो काढला. बापूजींबद्दल त्या बहिणीच्या आणि त्या घरातील पुरुषांच्या मनात भक्तिभाव आहे असे वाटत होते. बापूजी कधीही फोटोसाठी विशिष्ट पद्धतीने बसत वा उभे राहत नसत. परंतु अशा प्रकारे फोटो घेण्याकरिता या बहिणींना सूट देण्याचा हा बापूजींच्या जीवनातील पहिलाच प्रसंग होता.

भटियालपूरला आम्ही साडेनऊ वाजता पोहोचलो. दोन्ही सुशीलाबहेन होत्या. डॉ. सुशीलाबहेनने बापूजींची मालीश केली. मी बापूजींना आंघोळ घातली. बापूजींकरिता आज प्यारेलालजींनी खाकरे केले होते. बापूजींनी आठ औंस दूध, दोन खाकरे आणि कच्ची भाजी घेतली. दुपारी निरंजनसिंह गिल आले. इथे ठाकुरचे एक मंदिर आहे. त्यातील मूर्ती उचलून नेण्यात आली होती. बापूजींच्या हस्ते त्या मूर्तीची परत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. या कार्यक्रमाला पुष्कळ मुसलमानसुद्धा आले होते. मुसलमानांनी जी मूर्ती उचलून नेली होती त्याच मूर्तीची परत प्राणप्रतिष्ठा होणे ही काही लहानसहान गोष्ट नव्हती. आणि मुसलमानांनी प्रतिज्ञा

केली की आमच्या जीवाचे मोल देऊनही आम्ही या मंदिराचे रक्षण करू. आरती झाली आणि प्रसाद वाटला. . .

बाकी रोजप्रमाणे प्रार्थना वगैरेचा क्रम चालला. सायंकाळच्या जेवणात केवळ दूध आणि वाफाळलेले सफरचंद घेतले. रात्री दहा वाजता झोपलो.

(बापू. नारायणपूर, १५ - १ - '४७)

# ९. सत्त्वपरीक्षा

नारायणपूर,

१५ - १ - ‘४७

रोजप्रमाणे आजही बापूजी सकाळी चार वाजताच उठले होते. पण ‘तीन वाजतापासून जागा आहे’ असे ते सांगत होते. प्रार्थना आणि दैनंदिन नित्यक्रम रोजप्रमाणे. . . . आणि इथे येण्याकरिता आम्ही सात वाजून पस्तीस मिनिटांनी भटियालपूर सोडले. रस्त्यात वेगळ्या मार्गाने सुशीलाबहेन आपल्या गावी गेल्या.

इथे येऊन पाय धुऊन बापूजींच्या आंघोळीची तयारी करत होते तर बापूजींचा पाय घासण्याचा जो दगड होता तो मी त्यांच्या ‘खाण्याच्या पेटीत’ ठेवत असे. परंतु तो काही सापडेना. खूप शोधाशोध केली, पण तरीही तो काही सापडला नाही. बापूजींना सांगितले तर बापूजी म्हणाले, “तू फार मोठी चूक केली आहे. एकदा मनूडी हरवली तर चालेल, पण दगड हरवला तर ते कसे चालेल? माझी तर इच्छा आहे की तू जाऊन तो दगड शोधून आणावा. आणि माझ्याकरिता खाण्याकरिता तयार करायला निर्मळबाबूंना सांग. पण दगड शोधायला मात्र तू स्वतःच जायला पाहिजे. असे करशील तर तू परत कधीही काहीही विसरणार नाही, यातच तुझी परीक्षा होईल. मी तुला निर्भयतेचा पाठ किती शिकवला आहे? तो तू किती पचवला आहे?”

मी एखाद्या स्वयंसेवकाला सोबत नेण्यासंबंधी म्हणाले तर ते साफ नाही म्हणाले. आणि मीसुद्धा थोडी रागातच बापूजींना आत सोडून निघून गेले. कदाचित कोणी पकडले तर अशी भीती मला वाटत होतीच. नारळराई दाट होती. आणि रस्ता आडवातिडवा होता. पण पोहोचले खरे. आणि भटियालपूरहून इथे येत असताना एका वाडीत बापूजींचे पाय फार थंड पडले होते. यामुळे पाय धुवायला तो दगड काढला होता. तिथे पोहोचले. तेथील आजीबाईंनी तो दगड फेकूनच दिला होता. परंतु तो लवकरच सापडला. तो घेऊन मी एक वाजता बापूजींजवळ आले.

रस्त्यात रामनाम तर अशी घेत होते की जसे आयुष्यात कधीही घेतले नव्हते. असे करून तो दगड बापूजींसमोर टाकला. भूक पण खूप कडाडून लागली होती. आजपासून बापूजींची अमुक सेवा सुटली म्हणून होणाऱ्या दुःखालाही पारावार नव्हता. यामुळे तो दगड बापूंसमोर नेऊन मी बापूजींसमोर आदळला होता. “हा घ्या तुमचा दगड” असे म्हणून मी रडू लागले.

बापूजी खळखळाट करत हसले. मला वाटले माझा जीव इतका हातातोंडाशी आला होता आणि बापूजी हसत आहेत ! मग म्हणाले, “आज तुझी परीक्षा झाली. ईश्वर जे करतो ते चांगल्याकरिता. पहिल्याच दिवशी तुला सांगितले होते ना की माझ्या यज्ञात सहभागी होणे हे फार हिंमतीचे काम आहे. थोडीशी जरी हारलीस तरी नापास होशील. यामुळे तुला परत जायचे असेल तर जा. तुला या गोष्टीची आठवण राहील ना? या निमित्ताने तुझी परीक्षा झाली आणि माझ्या मते तू उत्तीर्ण झालीस. यामुळे मी किती खुश झालो याची तुला काय कल्पना? याशिवाय तू एक सुंदर पाठ शिकलीस ना? परंतु प्रत्येक उपयोगी गोष्ट जपून ठेवायला शीक.”

मी म्हणाले, “बापूजी, मी जर कधी हृदयापासून रामनाम घेतले असेल तर ते आज घेतले आहे.”

बापूजी म्हणाले, “हो, ज्याला दुःख होते त्यालाच ईश्वराची आठवण होत असते. आणि शिवाय त्याची दया किती असीम आहे की माणूस जरी सुखात त्याची आठवण करत नसला आणि दुःखात जरी त्याने त्याची थोडीशीही आठवण केली तरी तो त्याला त्यातून पार पाडतो.”

अशा प्रकारे अकल्पितपणे माझ्यावर आलेल्या या संकटाने दुपारपर्यंतचा माझा सगळा वेळ घेतला आणि मी दुसरे काहीही करू शकले नाही.

दीड वाजता बापूजी म्हणाले की तुला भूक लागलेली असेल. खायचे असेल तर खाऊन घे. पण मी तर म्हणेन की नारळाचे पाणी वा एखादे फळ घे आणि थोडा वेळ आराम कर. असे केले तर तुझा थकवा निघून जाईल.

मी नकार दिला. कपडे धुतले. खूप काम पडलेले होते. ते सर्व आटोपूनच मी जेवायचा विचार केला होता. परंतु बापूजींना ते आवडले नाही.

बापूजींनी दोन्ही पारडे समान केले. एकीकडे अशा उन्हात मला तो दगड इतक्या दूरवरून आणायला पाठवले आणि आता आल्यानंतर काही हलके खाऊ घालून मला झोपायला लावले. बापूजींचे सर्व काम हे असे असते. आणि यातूनच माणूस खरोखरी घडत जात असतो.

रोजप्रमाणे सायंकाळी प्रार्थना झाली. प्रार्थनेनंतर फिरता फिरता बापूजी म्हणाले, “तुला जर आज गुंडांनी पकडले असते आणि तू त्यामुळे मेली असतीस तर मी तर नाचलो असतो. परंतु तू जर घाबरून पळत आली असतीस तर मला तर ते मुळीच आवडले नसते. आज सकाळच्या प्रसंगातून मला तुझी परीक्षा घ्यायची होती. असे समजूनच मी तुला पाठवले होते. तुला एकटीदुकटीला पाठवताना मी किती जोखीम पत्करली होती हे तुझ्या लक्षात येत नाही काय? पण मी विचार करत होते की ही पोरगी तर ‘एकला चलो रे’ हे गीत अतिशय निष्पापपणे म्हणते खरी, पण हिने खरोखर ते किती पचवले असेल? पण ईश्वर कृपेने तू तो दगड विसरलीस, यामुळे माझ्या मनात जी इच्छा होती ते काम झाले. आजच्या प्रसंगावरून मी किती कठोर होऊ शकतो हे तू लक्षात घे. याची मलासुद्धा कल्ना आहे आणि तुला तर हे कळलेच आहे.”

बापूजींनी लामचर येथील रोजनिशी पाहिली नव्हती. यामुळे फिरून आल्यानंतर वीस मिनिटात बापूजींनी ती डायरी पाहिली. लगेच सही करून टाकली.

मग वर्तमानपत्रे ऐकली. आणि साडेनऊ वाजता झोपायची तयारी. आज बापूजींनी १२० तार कताई केली. रोजप्रमाणे जेवण. सायंकाळी सहा औंस दूध घेतले. दोन औंस कमी केले.

(बापू. १५ - १ - ‘४७. नारायणपुरा)

रामदेवपूर,

१६ - १ - '४७

आज रात्री तीन वाजता बापूजींनी मला उठवले. मी शरीराची गुंडाळी करून झोपले होते. यामुळे त्यांनी मला सरळ झोपायला सांगितले. मग म्हणाले, "आतापर्यंत तर तू माझ्यावर श्रद्धा ठेवून सर्व काही करत होतीस. परंतु आता तू जे काही करशील ते समजूनउमजून करशील, ज्ञानपूर्वक करशील तर तुझे रंगरूपच बदलून जाईल. श्रद्धा अंधश्रद्धा असू नये. ज्ञानपूर्वक श्रद्धा असली पाहिजे. याप्रमाणे एखादा माणूस कितीही जरी शिकला तरी उदा. शब्द वा बाराखडी शिकण्यावर तर त्याची श्रद्धा असते, परंतु तो बाराखडीचे ज्ञान मिळवत नाही, ऱ्हस्व, दीर्घ, मात्रा, शून्य, अल्पविराम, वगैरे का, कुठे हे समजून घेतल्याशिवाय जर तो पुढे जाईल तर अनेकदा अर्थाचा अनर्थ होईल. याचप्रमाणे तूसुद्धा केवळ श्रद्धा न ठेवता श्रद्धेत ज्ञान मिसळले पाहिजे. गीतेत श्लोक आहेत ना की -"

यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुते ।
ज्ञानाग्निः सर्वकर्माणी भस्मसातकुरुते तथा ।।
न हि ज्ञानेन सदृश्यं पवित्रमिह विद्यते ।
तत्स्वयं योग संसिद्धः कालेनात्मनी विन्दति ।।
श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः ।
ज्ञानं लब्ध्वा परांशांतिमचिरेणाधिगच्छति ।।
अज्ञश्चाश्रद्धानश्च संशयात्मा विनश्यति ।
नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ।।

म्हणजे श्रद्धा. अशी ज्ञानपूर्वक श्रद्धा मिळवण्याचा तू प्रयत्न कर.

इतक्या प्रार्थनेची वेळ झली. यामुळे प्रार्थनेनंतर निर्मळदांनी प्रार्थनाप्रवचनांचा अनुवाद करून दाखवला. दैनंदिनी लिहीत होते तोच . . . आले. त्यांच्या गावात प्राथमिक तयारी कशी

करायची हे विचारून ते गेले. साडेसात वाजता नारायणपूर सोडले. तिथून हे गाव दूर आहे असे म्हणता येईल. खूप थंडी होती. उन्हात अगदीच जोर नव्हता. रस्त्यात बापूजींच्या उजव्या पायाची पट्टी निघून गेली होती. थोडेसे चालल्यानंतर ही गोष्ट लक्षात आली. बापूजी म्हणाले, “ही पट्टी तर शोधावीच लागेल”. कर्नल जीवनसिंहजींचा एक माणूस अर्ध्यात गेला आणि ती पट्टी शोधून घेऊन आला. यामुळे बापूजी खुश झाले. म्हणाले, “हे मला फार आवडले. आपल्या आळसाच्या कारणाने हिंदुस्थानची कापडाची एक चिंधी जरी वाया गेली तर किती हिंदुस्थानचे किती नुकसान होईल?”

रस्त्यात एका वाडीत एका भगिनीने पाय धुण्याकरिता गरम पाणी करून ठेवले होते. त्याने पाय धुऊन बापूजी मुसलमानांच्या वाडीतही गेले. इथे आम्ही ८।। वाजता पोहोचलो. पाय धुवायचे पाणी तयार होते. हे गाव कनूभाईंचे होते. त्यांनी सुंदर व्यवस्था केली होती. न्हाणीघर, मालीशाची जागासुद्धा तयार ठेवली होती. या गावात आल्यानंतर मला विशेष काही तयारी करावी लागली नव्हती. पाय धुतले. बापूजींना दांडियारास (काठेवाडी) दाखवला. कनूभाईंनी गावातील स्थानिक मुलांना हा काठियावाडी दांडियारास करणे फार चांगल्या पद्धतीने शिकवले होते, आणि सियास्वामी की जय, प्यारे राघव की जय, बोलो हनुमान कृपालू की जय, जय, जय - अशा प्रकारची ही धून तालावर बरोबर रास तयार केला होता. यामुळे बापूजींचे पाय धुताच त्यांना हा रास दाखवला. यामुळे बापूजींचा वेळसुद्धा वाचला. बापूजींना हे फार आवडले.

आज बापूजींची मालीश करू द्यायची . . . नी मागणी केली. मला विचारले असता मी म्हणाले, “तुम्हाला सेवा करायची असेल तर जरूर करा.” बापूजींची कोणतीही सेवा करायची संधी मिळाली तर त्याचा आनंद काही वेगळाच असतो हे मला माहीत आहे. यामुळे मी नाही म्हणू शकले नाही. परंतु बापूजींना हे आवडले नाही. म्हणाले -

माझ्या स्वभावात एका विशिष्ट पद्धतीने चालणे मला आवडते. त्यात फेरफार झालेला मला आवडत नाही. मला आज हा फेरबदल आवडला नाही. तू हे सांगणे तुझे कर्तव्य होते आणि एखादी गोष्ट खरी असेल तर तसे समोरच्याला स्पष्टपणे सांगण्याची हिंमत तुझ्यात असायला पाहिजे होती. तू सांगायला पाहिजे होते की बापूंची सेवा ही मुख्य गोष्ट नाही. तुम्ही या गावाची सेवा करत आहा ती मुख्य गोष्ट आहे. यात तुम्ही जर थोडोसेही विचलित व्हाल तर तुम्ही तितकेच पाप कराल. शिवाय बापूंची सेवा कराल तर गावाची सेवा करण्याच्या वेळेची चोरी करूनच ती सेवा कराल ! कल्पना करा की बापू आलेच नसते तर तुम्ही या वेळेत गावाची किती तरी सेवा केली असती की नाही? असे आणि अशा प्रकारे सांगण्याची हिंमत तुझ्यात ज्या दिवशी येईल त्या दिवशी मी समजेन की आता तुझे सर्व काही ठीक आहे. खरी गोष्टी कोणाला खोटी वाटते की चांगली वाटते त्याचा विचार करू नये. हं, आपण आपल्या मर्यादेत राहून हे चांगल्या भाषेत सांगायला पाहिजे इतकेच. कोणाला चांगले वाटावे म्हणून जर आपण नियम तोडू लागलो तर जगात आपण पुढे जाऊच शकणार नाही. तुला माहीत आहे ना की मुलांना नेहमी गोड गोडच आवडत असते. असे असले तरी त्याची प्रकृती चांगली राहण्याच्या दृष्टीने आई निष्ठुर होऊन त्याला कडू औषधसुद्धा देत असते?

मालीश, आंघोळ वगैरे आटोपल्यानंतर बापूजी आत गेले. जेवले आत, आणि जेवून बाहेर उन्हात आले. जेवणात दररोजप्रमाणे होते - थोडे मुरमुरे, आठ औंस दूध, खाकरे, भाजी आणि खोबऱ्याचा संदेश.

दुपारी तीनेक वाजता कताई करत असताना काही भगिनी आल्या. त्यांनी कातलेल्या सुताची खादी गांधीजींना भेट दिली. बापूजी त्यांना म्हणाले, “तुम्ही तुमच्या कुटुंबाकरिता अशाच प्रकारे कताई करून खादी तयार केली पाहिजे. मुसलमान भगिनींना भेटून त्यांना तुमच्या बहिणी करा. तुमच्या नावाने जर तुमची कला पसरली पाहिजे. असे कराल तर या प्रदेशात मुसलमानांचे

बहुमत आहे असे न म्हणता हिंदू-मुसलमानांचा यात समान सहभाग आहे असे लोक म्हणतील. तुम्ही भगिनीमंडळी तर खूप काम करू शकता. पुरुष इतके काम करू शकणार नाहीत."

या भगिनी गेल्यानंतर बापूजींनी माती घेतली. माती घेतलेली असतानाच किती तरी पत्रांचे श्रुतलेखन करवून घेतले. उठल्यानंतर रामफळ आणि दूध नासवून त्याचे पाणी घेतले. प्रार्थनेनंतर प्रवचन लिहिले. रेड्डीजींनी कथकली नृत्य केले. वर्तमानपत्रे ऐकली. साडेदहा वाजता बापूजी झोपले.

(बापू. पाराकोट, १७ - १ - '४७, शुक्रवार)

पाराकोट,

१७ - १ - '४७

रोजप्रमाणे प्रार्थना. उठल्यानंतर रोजप्रमाणे बापूजींना गरम पाणी आणि मध दिले. बापूजी १० मिनिट झोपले. उठून अननसचा रस घेतला. इथे येण्याकरिता आम्ही ७.४० ला निघालो. आज पाराकोट आणि रामदेवपूर अशी दोन ठिकाणची भजनमंडळी गोळा झाली होती. रस्त्यात नासधूस करण्यात आलेली अनेक घरे होती. साडेआठ वाजता इथे पोहोचलो. बापूंचे पाय धुऊन त्यांच्या मालीशची आणि आंघोळीची तयारी केली. अजून उन्ह पडलेले नसल्यामुळे बापूजींनी थोडे काम केले. बापूजींची मालीश आणि आंघोळ आटोपली तेव्हा अकरा वाजून गेले होते. जेवणात दररोजप्रमाणेच घेतले.

बापूजी उन्हात जाऊन बसले आणि उन्हातच त्यांचा डोळा लागला. बापूजींचे पाय चोळले, कपडे धुतले, भांडी घासली. या सर्व कामात एक तास गेला. दोन वाजता बापूजी उठले. त्यांना नारळाचे पाणी दिले. साडेतीन वाजता माती घेतली. चार वाजता भगिनींच्या सभेत गेले. सभेत भगिनींना कताई करण्याची, मुसलमान स्त्रियांना भेटण्याची आणि घरआंगण स्वच्छ ठेवण्याची विनंती केली. साडेचार वाजता सभेतून आल्यानंतर केळी, दूध आणि प्रून्स घेतले. ते खाऊन

प्रार्थनासभेत गेले. प्रार्थनेनंतर तिथून सरळच एका मुसलमान वस्तीत गेले. बाकी खूप थकवा आला होता. येऊन पाय धुतले आणि मग प्रार्थनाप्रवचन तपासले. बंगाली पाठ केला. इतक्यात नऊ वाजून गेले. मी पाय चेपत असतानाच बापूजी वात्सल्यपूर्ण आवाजात म्हणाले, "तू जर थकली तर मला सांग. मी तर तुझ्याकडून निष्ठुर होऊन काम घेत असल्याचे आज माझ्या तेव्हा लक्षात आले जेव्हा तू माझ्या आंघोळीकरिता पाण्याने भरलेली बादली घेऊन धावत येत असलेली मी तुला पाहिली. हे जेव्हा मी पाहिले तेव्हा कोणतेही काम करण्याचा तुला संकोच वाटत नाही हे माझ्या लक्षात आले. पण तू आजारी पडलीस तर ते बरोबर होणार नाही हे समजून घे. तुला दुपारी अर्धा तास झोपवलेच पाहिजे असे मला तीव्रतेने वाटते. परंतु मी तुझ्याकरिता इतकाही वेळ काढू शकत नाही याचे मला आश्चर्यही वाटते आणि दुःखही होते. पण तू जर मला मदत करशील तर मी तुझ्याकरिता अर्धा तास आनंदाने काढेन. तुला मी एका मिनिटाचीही फुरसत मिळू देत नाही. मला ही गोष्ट आवडतेही. परंतु तुझ्यावर जर याचे ओझे पडत नसेल तर मला काही म्हणायचे नाही."

मी म्हणाले, तुम्ही याची काळजी करू नका. मला यातून बरेच काही शिकायला मिळते. असे बोलता बोलता बापूजींना झोप लागली. मला झोपायला अकरा वाजले.

एक सख्खी आई जसा आपल्यावर प्रेमाचा वर्षाव करील तसे बापूजींचे हे बोलणे होते. बापूजींच्या आजच्या शब्दाशब्दामधून प्रेमाचे अमृत झरत होते. इतक्या सगळ्या काळज्यांमध्ये त्यांना माझ्यासारखीच्या लहानसहान काळज्यासुद्धा त्यांना तितक्याच तीव्रतेने जाणवत होत्या. मला सकाळी पाणी भरून येताना पाहून त्यांना ती गोष्ट किती लागली होती ! अशा प्रेमळ आणि गोड आईप्रमाणे बापूजींना माझी जी काळजी वाटत होती तशी काळजी कोणता पुरुष करू शकेल? परंतु बापूजींनी वारंवार सांगितले आहे की मी, 'सत्य, अपरिग्रह, अस्पृश्यता, अहिंसा यासारखे जे अनेक आदर्श माझ्या नजरेसमोर ठेवले होते तसाच 'पुरुषसुद्धा आई होऊ शकतो' हा आदर्श मी माझ्यासमोर ठेवला आहे आणि तो मला शिकायचा आहे. ज्या वेळी पुरुषांची

स्त्रियांकडे पाहण्याची दृष्टी आईसारखी गोड होईल तर आपली भव्य संस्कृती टिकाव धरू शकेल.' आणि आज मी या अनुभवामधून खरोखरच जाते आहे. शिवाय बापूजी माझीच आई होऊन हा प्रयोग करत असल्यामुळे मला ही गोष्ट महद्भाग्याची वाटते आणि यामुळे मी मनातून खूप आनंदले आहे.

(बापू. बादलकोट, १८ - १ - '४७, शनिवार)

बादलकोट,

१८ - १ - '४७

आज बापूजी सव्वातीन वाजताच जागे होते. मला उठवून म्हणाले, "आत तर अशी काही गाढ झोप लागली होती की मध्ये मला एकदाही उठावे लागले नाही. हे मला फार आवडले." प्रार्थनेनंतर बापूजींनी आपले भाषण लिहून काढले आणि मग . . . ला, . . . ला पत्रे लिहवून घेण्यात सगळा वेळ गेला. शेवटची केवळ दहा मिनिट आडवे झाले होते. आम्ही पाराकोट १०.३५ला सोडले होते. रस्त्यात एका मुसलमानाच्या घरी थांबलो होतो. त्या सर्वांना सलाम करून निघालो. इथे आल्यानंतर दररोजप्रमाणे काम चालले. मालीश, आंघोळ वगैरे दहा वाजता आटोपले. बापूजींनी खाकरा, भाजी, दूध रोजप्रमाणे घेतले.

माझ्या कामकाजातून मी दोन वाजता मोकळी झाले. अडीच वाजता माती घेतली. बापूजींचे पाय दाबले आणि मीसुद्धा पंधरा मिनिट झोपले. तीन वाजता भगिनींची सभा होती, भगिनी खूप होत्या.

सायंकाळी दूध आणि एक केळच घेतले. प्रार्थना वगैरे नित्यक्रमाप्रमाणे चालले. जवळपास दहा वाजता बापूजी झोपले. आता बापूजींचे पाय बरेच चांगले आहेत. हळूहळू ते चांगले होत आहेत. इतक्या कामकाजाच्या मानाने प्रकृती चांगली आहे. आणि त्यातही आहार इतका कमी केला आहे. तरीही इतके सगळे काम करतात. झोप कमी करून टाकली आहे.

आणि थंडी तर इतकी काही कडाक्याची पडली आहे की विचारू नका ! ईश्वरच यांना शक्ती पुरवतो आहे हे स्पष्टपणे जाणवते.

आताकोरा,

१९ - १ - '४७

रोजप्रमाणे साडेतीन वाजता उठवले. तोंड वगैरे धुतल्यानंतर प्रार्थना झाली. आज पाणी गरम करायला वेळ लागला. यामुळे बापूजी फळांचा रससुद्धा उशिरा घेऊ शकत होते. रात्री मी इंधन आत घ्यायला विसरले होते. (दवाने ओले होऊ नये म्हणून दररोज मी थोडेसे इंधन आत घेत असे.) यामुळे इंधन ओले झाले होते. माझ्या ओढणीचा काठ फाडून मी तो दिव्यातील रॉकेलमध्ये बुडवला. हे बापूजी मागाहून पाहत होते याची मला कल्पनाच नव्हती. परंतु जशी आगपेटीतून काडी काढली तसे बापूजी म्हणाले, मला हा काठ तर दाखव.

पू.बापूजींनी तो उचलून पाहिल्या. मला म्हणाले, 'हा धुऊन टाक. असे केल्याने या काठातील तेल वाया जाईल खरे. पण तेल वाचवायचे तर हा नाडा वाया जाईल आणि नाडा वाचवायचा तर तेल वाया जाईल.  यामुळे तितका काठ नाडा म्हणून वापरणे चांगले. मी किती लोभी आहे हे तुला माहीत आहे ना? यामुळे हा काठ उन्हात वाळू घाल. पाणी गरम व्हायला वेळ लागला तर काय हरकत आहे.? एक तर हा  काठ किती तरी घासलेट प्याला आहे. या शिवाय ओढणीच्या या काठाकडे माझे लक्ष गेले नसते तर तो जळून गेला असता ना?.

मी म्हणाले, "पण आता हा लोभ काय कामाचा?

बापूजी - हो, तू उदार बापाची पोरगी आहेस, परंतु मला बाप कुठे आहे की जो मला पैसे देईल? माझ्या विनोदात नेहमी गांभीर्य असते. ते ओळखणे जर तू शिकलीस तर तितके पुरे होईल.

मी तो नाडा धुतला आणि तो वाळू घातला. परंतु त्यापूर्वी दोनतीनदा विचारपूससुद्धा केली. आणि जेव्हा हा नाडा वाळला आणि त्याचा उपयोग करू लागले तेव्हा कुठे हे प्रकरण थांबले.

मग बापूजी त्यांच्या टपालाच्या कामाकडे वळले आणि मी माझ्या कामाकडे. काल यिस्टची बाटली फुटली होती, यामुळे प्रत्येक गोष्ट सोबत ठेवायला बापूजींनी सांगितले. पुढे पाठवायला ते नाही म्हणाले. ७.३५ ला बादलकोट सोडले. आजचा रस्ता खूपच वाईट होता. सरदार जीवनसिंगजी दोनदा घसरून पडले. पायवाट इतकी अरुंद होती होती की मी आणि बापूजी मोठ्या मुश्किलीने सोबत चालू शकत होतो, कुठे कुठे तर पू.बापूजींना मला सोडून आपल्या लाकडाच्या काठीच्या आधाराने चालावे लागत होते. शिवाय हा रस्ता कार्यकर्त्यांनी जरी रात्री साफ केला होता तरी मुसलमान मुलांनी तो परत घाणेरडा करून टाकला होता. एकदोन लोकांनी ही गोष्ट आपल्या डोळ्यांनी पाहिली होती. मी थोडी मागे राहिले असताना बापूजी ही घाण पानांनी साफ करत होते. बापूजी अकस्मात थांबल्यामुळे मला ते दिसले. एकामागे एक ओळीने चालता येईल असाच तो रस्ता होता. मला बापूजींची चीड आली. मी म्हणाले, तुम्ही मला असे का लाजवता? मला सांगण्याऐवजी तुम्हीच ही घाण का साफ केली? यावर बापूजी हसले आणि म्हणाले, “ही सर्व कामे करताना मला किती आनंद होत असतो हे तुला काय माहीत? तुला जर हे माहीत असते तर तू असे चिडून म्हणाली नसतीस.”

गावातील लोक हे दृश्य पाहत होते. यामुळे जगाला वंदनीय असलेला पूज्य बापूजींसारखा माणूस ही घाण साफ करतो आणि हे अडाणी लोक एखाद्या पुतळ्याप्रमाणे उभे राहून त्यांच्याकडे केवळ टकमक पाहत आहेत याचाही मला राग आला होता. यांना थोडीशीही लाजलज्जा नव्हती काय? असा विचार त्या रागाच्या भरात माझ्या मनात आला.

परंतु पूज्य बापूजी म्हणाले, “तुला उद्या असे काम करावे लागणार नाही, कोणतेही काम हलके नाही हा पाठ त्यांना मिळालेला असल्यामुळे तू पाहशील की उद्या तुला या रस्त्यावरील

घाण साफ करावी लागणार नाही. आणि केवळ माझ्याकरताच हा रस्ता साफ करण्यात येत असेल तर मला ती गोष्ट बोचेल."

मी म्हणाले उद्या ते करतील आणि मग त्यांनी केले नाही तर तुम्ही काय कराल?

बापूजी म्हणाले, "मी तुला रस्ता घाणेरडा आहे काय हे पाहायला पाठवीन आणि तो जर घाणेरडा असेल तर तो साफ करायला मी स्वतः परत येईन. अस्वच्छता दूर करून साफसफाई करणे हा तर माझा धंदाच आहे."

बापूजींनी सांगितलेली ही गोष्ट किती खरी होती याचे वर्णन मी कसे करू? परंतु या लहानशा अस्वच्छतेपासून तर जीवनातील, व्यवहारातील, राजकीय कारभारातील, धार्मिक अशा अनेक अस्वच्छता दूर करणे हा तर त्यांचा धंदाच होता. आणि अनेक प्रकारे आपल्याला त्यांनी स्वच्छही केले आहे. हे सर्व तर मी पाहतेच आहे. विशेष गोष्ट तर ही आहे की ज्या गोष्टीला आपण क्षुल्लक आणि बेकार गोष्ट समजतो तिलाच बापूजी महत्त्वाची आणि मुद्द्याची गोष्ट असल्याचे सिद्ध करून दाखवतात.

रस्त्यात एक मदरसाची शाळा उन्हात सुरू होती. तिथे आम्ही पोहोचलो तेव्हा रस्ता अरुंद होता. यामुळे कर्नल जीवनसिंगजींचा पाय घसरला आणि ते पडले. असे पहाडी आणि कसलेले शरीर आणि शिवाय लष्करी शिपाई ! तेच जर या रस्त्यावर घसरून पडत असतील तर पूज्य बापूजींकरिता हा रस्ता किती भयावह असेल याची कल्पना आपण करू शकतो. बापूजी खूप हसले. म्हणाले, "सागरालाच आग लागली तर कोण विझवू शकेल?"

मदरशात मुलामुलींना आम्ही पाहायला गेलो तर मागेमागे जाऊ लागले. पूज्य बापूजींनी सर्वांना सलाम करायचा प्रयत्न केला. पण कोणीही सलाम केला नाही. अब्दुल्लासाहेबांनी त्या सर्वांना आपले काम सुरू ठवायला सांगितले होते. माझ्या मनात सहज विचार आला की नशिबात असेल तेच मिळेल ना? नरसी महेतांनी बरोबर लिहिले आहे, 'ज्याच्या नशिबी जे असेल

तेच मिळेल . . . ' पूज्यनीय बापूजींसारख्या पवित्र पुरुषाचे दर्शनच दुर्लभ असते. त्याऐवजी कोणतीही मेहनत करता असा माणूस येऊन समोर उभा राहतो. पण यांना अज्ञानाने आंधळे केलेले होते. असे असते एकेकाचे दैव !

आताकोरा जवळपास दोन मैल आहे. परंतु तिथे पोहोचायला एक तास लागला.

इथे आल्यानंतर नेहमीप्रमाणे मी बापूजींचे पाय धुतले आणि माझ्या कामाला लागले. उन्ह नव्हते, यामुळे मालीश, आंघोळ यांना वेळ लागला. मधल्या वेळात बापूजींनी इतर कामकाज आटोपले. मी मालीश करत होते आणि बापूजी स्वतःच स्वतःची हजामत करत होते. एकाच वेळी दोन्ही काम आटोपले.

सायंकाळी एका म्हाताऱ्या माणसाच्या घरी गेलो. शरीराने अशक्त होता, पण बापूजींसमोर उभा राहिला. बापूजींनी प्रेमाने त्याच्या गालावर एक हळुवार चापटी मारली. लगेच त्या म्हाताऱ्याची पत्नी म्हाताऱ्या आजीबाई आल्या. त्यांनी त्या वृद्धाला एक कापराची माळ दिली.आणि एक स्वतःजवळ ठेवली. दोघांनी बापूजींना माळा घातल्या. आजीबाई थरथरत होत्या. बापूजींचे हात एकदम धरले. संपूर्ण शरीरावर ते फिरवले आणि पावनता अनुभवली. खास बापूजींकरिता त्यांनी दोन गोड नारळ राखून ठेवले होते. ते पिण्याचा आग्रह केला. हे दृश्य पाहून मला रामायणमधील शबरीची आठवण झाली. आजूबाजूला हिरवेगार जंगल होते. आणि शबरीने दिलेले बोर जसे प्रेमाने प्रभूने खाल्ले तसे हे पाणी बापूजी प्याले.

कंद मूल फल सुरस अति दिए राम कहुँ आनी ।
प्रेम सहित प्रभु खाए बारंबार बखानि ।।

दररोज रामायण वाचत असल्यामुळे आजसुद्धा त्यापुढील वाचन करावे म्हणून फिरून आल्यानंतर मी रामायण वाचायला बसले तेव्हा हाच वर दिलेला दोहा वाचण्यात आला. आणि त्या वृद्ध दांपत्याने ज्याप्रकारे बापूजींकरिता नारळ जपून ठेवले होते आणि त्या नारळातील पाणी

बापूजींना पाजले होते त्यातून त्या दृश्याचे प्रत्यक्ष दर्शनसुद्धा झाले. सायंकाळच्या जेवणानंतर बापूजी काहीही घेत नसतात. असे असूनही प्रेमाने देण्यात आलेल्या या नारळाच्या पाण्याला नकार न देता एका नारळाचे पाणी ते प्याले आणि एकाचे मला प्यायला दिले. या प्रसंगामुळे बापूजींच्या चेहऱ्यावरून आनंद ओसंडून वाहत होता. तिथून परतत असताना ते म्हणाले, "अशी माणसे जेव्हा भेटतात तेव्हा नेहमीच मन प्रसन्न होत असते. हे दोघेही ८० च्या जवळपास वयाचे असू शकतील. कदाचित त्याहूनही अधिक वयाचे असतील."

दुपारच्या गोष्टीत बापूजींचे कातायचे राहून गेले होते. यामुळे परतल्यानंतर आता सायकाळच्या साडेसात वाजता कताई करायला बसले आहेत आणि शैलेनभाई त्यांना वर्तमानपत्रे वाचून दाखवत आहेत. मी रोजनिशी लिहिते आहे.

ता. क. - कताई केल्यानंतर साडेनऊ वाजता माझी रोजनिशी ऐकली आणि त्यावर सही करून नंतर झोपले.

शिरंडी,

२० - १ - '४७

आज बापूजींना साडेपाच वाजता जाग आली. प्रार्थनेनंतर नित्यक्रमाप्रमाणे गरम पाणी आणि मध घेतले. त्यानंतर त्यांना रस देऊन मी माझे सामान बांधले आणि कालचा आधीचा रस्ता पाहायला गेले. परंतु रस्ता घाणेरडाच होता. कोणालाही न सांगता मी स्वतःच तो साफ करू लागले. गावातील लोकसुद्धा या कामात सहभागी झाले होते. यामुळे पंधरा मिनिटात माझे काम संपले. गावातील लोक म्हणाले, "उद्यापासून तुम्ही नका येऊ, आम्हीच साफ करून टाकू."

नंतर बापूजींचे मौन संपले. तेव्हा ते म्हणाले,

"आज तू माझे पुण्य घेऊन टाकलेस ना? हा रस्ता मलाच साफ करायचा होता. असो, आता दोन काम झाले. एक म्हणजे लोकांना स्वच्छतेची जाणीव झाली आणि दुसरी गोष्ट म्हणजे लोक आपले वचन पाळतील तर ते सत्याचरण शिकतील. या वेळी इथे याचा पूर्ण अभाव आहे. तुला माहीत आहे की आपल्या काठेवाडमध्येसुधा रस्ते घाणेरडे करायची फार सवय आहे. तू असे समजू नकोस की केवळ इथेच कुठेही थुंकायची वा रस्त्यावर शौच्याला जायची सवय आहे. हिंदुस्थानात अनेक ठिकाणी ही वाईट पद्धत आहे. आणि विशेषतः काठेवाडचे तर हे खास वैशिष्ट्य आहे. ही सुधारणा करावी अशी मला लहानपणापासूनच इच्छा होती. परंतु दुर्दैवाने काठेवाडमध्ये मी फार काळ राहू शकलो नाही. तुला जो माझा राग येत होता तो चुकीचा होता. कारण आपण स्वतः खाऊ तरच आपले पोट भरत असते. तसेच हा नियम स्वच्छतेलाही लागू होतो. यामुळे मी स्वतः साफसफाई करतो तेव्हाच मला असीम आनंद मिळतो."

(बापूजी सकाळी माझ्याआधीच शिरडीला निघून गेले होते. शिरडीत अमतुस्सलामबहेन उपवास करत होत्या. त्यांचे हे कामाचे ठिकाण होते. या गावात अनेक मुसलमानांनी शस्त्रे लपवून ठवली आहेत असे सागतात. आपले जातभाई असे असे कृत्य करतात हे पाहून त्यांना दुःख झाले ! अमतुस्सलामबेन या खानदानी मुसलमान कुटुंबातील होत्या. आणि पूज्यनीय बापूजींजवळ तर मुलगी म्हणून त्यांचे विशेषच स्थान होते. या ऐक्याच्या कार्यात त्याचा फार मोठा सहभाग होता. आणि आजसुद्धा त्या हेच कार्य करून राहिल्या आहेत. दिसायला पातळ शिडशिडीत, वय जवळपास पन्नासच्या वर असेल, परंतु सर्व शक्ती लावून मेहनत करून राहिल्या आहेत. या बहिणीने नोआखालीत उपवास केला आणि मृत्यूशैय्येवरून उठल्या असे म्हटले तरी चालेल.)

मी आणि निर्मळदाशिवाय आज मागे सामान उचलणारे दुसरे कोणीच नव्हते. बापूजी आधी गेल्यामुळे सर्व निघून गेले. यामुळे फार अडचण झाली. परंतु बापूजी मध्ये एकदोन मुसलमानांच्या घरी थांबले होते. यामुळे आम्ही पोहोचू शकलो.

अमतुस्सलामबेन फार अशक्त झाल्या आहेत. त्यांना अंथरुणाबाहेर पडून सूर्यस्नान घेण्याकरिता बापूजींनी सांगितले. बापूजी दिवसभर मुसलमान बांधवांबरोबर वाटाघाटी करत होते.

अमतुस्सलामबहेनची दिवसभार गीता, कुराणशरीफ वा भजन ऐकण्याची इच्छा असते. सर्व क्रमाक्रमाने म्हणत असतात.

पूज्य बापूजींनी दिवसभर केलेल्या वाटीघाटीच्या परिणामी रात्री नऊ वाजताच्या दरम्यान काही लेखी करार झाला. मुसलमामान भाईंनी काही तडजोडी केल्या. उपवास सुटला. प्रार्थनेनंतर पूज्य बापूजींच्या हस्ते अमतुस्सलामबहेनने रसाचा प्याला घेतला. सर्वांनी यातून मिळणाऱ्या संदेशाला स्वीकृती दिली. प्रार्थना झाली. सुखद अंताकरिता ईश्वराचे उपकार मानले. आनंदमय वातावरण झाले आणि सर्वांना शांति मिळाली.

अखेरीस बापूजी रात्री अकरा वाजता झोपू शकले. दिवसभर खूप बोलून थकून गेले होते.

केथुरी,

२१ - १ - '४७

रोजप्रमाणे प्रार्थना झाली. आज सुशीलाबहेनने प्रार्थना करविली. बापूजींना पाणी देऊन मी सामान नीट करायला गेले.

एवढ्यात सात वाजून गेले. बापूजी उठले. अमतुस्सलामबहेनकडे गेले तिथे रस घेतला. अनेक भगिनी बापूजींना प्रणाम करून निरोप देण्याकरिता येऊन गेल्या आणि आम्ही पदयात्रेकरिता निघालो. आज रामचंद्रजीसुद्धा गेले. यामुळे माझ्यावर बराच ताण आला. ते आजारी होते. बापूजी म्हणाले "ते माझ्याकडे अकस्मात आले होते. आधी ते शिपाई होते. मग ते आझाद हिंद सैन्यात सामील झाले आणि मला सेवेतच जीवन व्यतीत करायचे आहे असे ते म्हणाले होते. परंतु मला यात धोका वाटत होता. परंतु माझे काय? माझे जीवन असेच घडलेले

आहे.“ मग त्यांनी महाभारतातील गोष्ट सांगतली - महाभारतातील युद्धानंतर जेव्हा पाचही पांडव आणि द्रौपदी वनात गेले तेव्हा स्वर्गारोहणाच्या वेळी युधिष्ठिर सोबत असलेले एकानंतर एक पडत गेले. अखेरीस द्रौपदीसुद्धा युधिष्ठिरासोबत स्वर्गात जाऊ शकली नाही. केवळ एक कुत्रा शिल्लक होता. अशाच प्रकारे या यज्ञातून एकामागून एक निघून राहिला आहे. हे मला आवडले. आणि अखेरीस तूच राहिलीस तर? कदाचित राहशीलही. काहीही किंमत नसलेल्या कुत्र्यासारख्या क्षुल्लक प्राण्याने असे काही पुण्य केले होते की तो या पाचही जणांनंतरही राहिला? कारण तो प्रामामिक प्राणी आहे. असा या गोष्टीमधून फार सुंदर अर्थ निघतो. इतकी मोठी मोठी माणसे पाप करत नाहीत वा केले तरी ते फार क्षुल्लक असतात असे समजायचे काही कारण नाही. पण किती तरी क्षुल्लक वाटणारे लोक समोर पडलेले असतात.

सायंकाळी एक मुसलमानभाई आले. त्यांना पंडित सुंदरलालजींनी इथेच पाठवले होते. त्यांचे नाव हुनरभाई आहे. ते इथेच राहतात. बापूजींनी त्यांना प्रत्येक काम स्वतःच करायचे सुचवले. स्वयंपाक वगैरेसुद्धा शिकून घ्यायला सांगितले. सर्वात आधी जाजरूसभाईंना काम सोपवले. मला या भाईची फार दया येत असे. बापूजीसुद्धा येणाराची सर्वात आधी परिक्षा घेत असतात. परंतु मी या बंधूंना वेगळ्या प्रकारे मदत करू शकत नव्हते. जर मी यांना काही सहानुभूती दाखवली आणि ती बापूजींच्या लक्षात आली तर बापूजी माझी खरडपट्टीच काढतील. यामुळे अतिशय कीव येत असूनही त्यांच्याशी मी कठोरपणे वागत होते. इतके की त्यांच्याशी गोष्टी करताना जर मनाला पाझर फुटला आणि काही मदत केली तर? यामुळे त्यांनी निघून जाण्यातच मला त्यांचे भले वाटले. त्यांच्याकडे दृष्टी टाकली तर आफतच येणार ना?

मी बापूजींना ही गोष्ट सांगितली. बापूजी म्हणाले, “याला मी दया समजत नाही. ही तर निर्दयताच आहे. माझी दया वेगळ्या प्रकारची आहे. ज्या कार्याशी यांचे जीवन एकरूप झाले आहे आणि ज्यातून यांच्या उन्नतीचा मार्ग निघतो ते कठीण जरी असले तरी महत्त्वाचे आहे आणि या वेळी यांना सहानुभूती दाखवणे निर्दयता आहे. पोटात काही बिघाड झालेला असेल आणि

कापकूप करावी लागत असेल तसे हे आहे. त्या वेळी जो डॉक्टर म्हणेल की बिचाऱ्यावर शस्त्र चालवले तर रक्त निघेल. या विचाराने अस्वस्थ होणारा डॉक्टर एफ. आर. सी. एस. जरी असला तरी तो तो नालायक आहे असेच म्हणावे लागेल. याचे तर पोट चिरावे लागेल आणि बिघाड बाहेर काढावाच लागेल. अशा प्रकारे तुला वाटणाऱ्या दयेला मी दया म्हणणार नाही. बरे झाले तू मदत करायला गेली नाही. नाही तर मी काय केले असते ते माहीत नाही."

मी कोणत्याही महाविद्यालयात गेले असते तरी तेथील प्राध्यापकाला बापूजींच्या या सूक्ष्म 'फिलासॉफी'चे वा तत्त्वज्ञानाचे आकलन जसे मला करवून दिले तसे देता आले असते की नाही याबद्दल मला शंकाच आहे.

बापूजींनी सकाळी तर रोजप्रमाणेच जेवण घेतले. सायंकाळी दूध नासवून त्यातील पाणी आणि नारळाचे लोणी घेतले. प्रार्थनेत अमतुस्सलाम भगिनीच्या उपवासातील विशेष गोष्टींबद्दल सांगितले. मुसलमानभाईंचे म्हणणे होते उपवासासंबंधीचा हा वृत्तांत वर्तमानपत्रात यायला नको. त्याबद्दल समजावून सांगत बापूजी म्हणाले की जाहीर असलेली गोष्ट कधीही लपवायला नको. हा अहवाल प्रकाशित होऊ देण्यात निश्चितच काही हेतू असला पाहिजे. परंतु बापूजी काय कोणाच्या जाळ्यात फसणारांपैकी होते? त्यांना तो अहवाल प्रकाशित करावाच लागला.

बापूजी वर्तमानपत्रे ऐकून दहा वाजता झोपले. . . . मला दिवसभर खूप काम करावे लागले होते. कपड्यांमध्ये सर्व चादरी धुतल्या. बापूजींच्या उशीतील रू काढून तो वाळवला आणि परत भरला. लिहायचे पण पुष्कळ होते. आणि लहानमोठे बऱ्याच गोष्टी साफ केल्या. रात्री झोप येत असतानाही घरी पत्र लिहिले. केव्हा झोप लागली ते कळलेच नाही. पण सकाळी उठले तेव्हा कागद, पेन बाजूला पडले होते. बापूजीसुद्धा इतके काही थकले होते की त्यांनाही गाढ झोप लागली होती. यामुळे आज ठपक्यापासून वाचले. सकाळी माझा हा सर्व पराक्रम पाहून बापूजी म्हणाले, "मी तर म्हणतच असतो की मला कोण फसवू शकतो? तुला मी माझ्यानंतर जागण्याची मनाई केलेली असतानाही तू मेहनत करून काम आटोपण्याकरिता जागे राहण्याचा प्रयत्न केला.

परंतु ईश्वराने तुझ्या डोळ्यात झोप भरून टाकली. हे तू सांगते आहेस? इतके तर मी कबूल करतो की फसवणूक काही कोणाची नातलग नसते. यामुळे यानंतर सावध राहा."

ही होती तर लहान गोष्ट. परंतु बापूजींना फसवण्याचा प्रयत्न करणाराच फसत असतो हे कबूल करावेच लागेल.

पनियाला,

२२ - १ - '४७

आज पूज्य मोटीबाची मासिक पुण्यतारीख होती. यामुळे बापूजी लवकर उठले. मला लगेच उठवले. नंतर प्रार्थना आणि दरवेळेप्रमाणे संपूर्ण गीतेचे पारायण केले. पारायणात मी एकटीच होते. कालप्रमाणेच बापूजी खूप थकलेले असल्यासारखे वाटतात.

प्रार्थनेनंतर गरम पाणी केले. परंतु मधाची बाटली काही सापडली नाही. कोणी उचलून घेऊन गेला असे वाटते. रात्री मी सर्व काही तयारी करून ठेवली होती यावरून असे वाटते. सकाळी पाहिले तर बाटली सापडलीच नाही! परंतु नशीब चांगले की अनुदीदीजवळ चांगला गूळ होता, त्यात गरम पाणी टाकले, निंबू पिळले आणि ते बापूजींना दिले. म्हणाले, जो घेऊन गेला त्याच्या खाण्याकरिताच उपयोगी पडेल ना? आपले काम गुळानेही बरोबर चालते. आता तो कोण घेऊन गेला याची चौकशी करून गोंधळ घालण्याची आवश्यकता नाही.

प्रार्थनेनंतर काही कागदपत्रे तपासत असताना बापूजींच्या हातात कागद असतानाच त्यांना झोप लागली. तो कागद जर मी बापूजींच्या हातून काढायचा प्रयत्न केला असता तर बापूजींची झोपमोड झाली असती. यामुळे सामान बांधायला मला वेळ झाला. बाहेर कीर्तन करणारे आलेले होते. या सर्व भानगडीत मला पाच मिनिट उशीर झाला. बापूजी मला म्हणाले, "बाहेर लोक आलेले आहेत. पाचशे माणसाच्या पाच मिनिटांची ही चोरी आहे असे म्हणावे लागेल. हे मला परवडू शकत नाही. मी जातो, तू मागाहून ये. परंतु आज मी जातो आहे यावरून

मी दररोज निघून जाईन आणि तू मला धावत येऊन पकडशील असे समजू नकोस. तुला वाटत असेल की तू दररोज असे केले तरीर चालेल. तू पोरगी आहेस आणि मी म्हातारा. या विचाराने तू सुटून जाऊ शकशील. परंतु हा अपराधच समजला जाईल. यामुळे नेहमी वक्तशीरपणे काम करायला पाहिजे. आणि अमुक माणसाला मी जर अमूक वेळ दिला असेल, समज की सात वाजताची वेळ दिलेली असेल आणि बाहूर पडून दोन सेकंड जरी वेळ झाला तर मला ती गोष्ट खुपते. मला उठवणे तुझे कर्तव्य होते. तू मला उठवून वस्तू गोळा केल्या असत्या तर ते पूण्यकर्म झाले असते आणि तू बरोबर धर्माचे पालन केले असते."

बाकीचे कामकाज दररोजप्रमाणे चालले. कालपासून मला ताप होता. अकरा वाजता १०३ ताप होता. दोन वाजता जवळपास १०४ डिग्री. यामुळे मी झोपले. चार वाजता ताप उतरला. मग बापूजींना माती दिली आणि दोन तास आराम घेतल्यानंतर कामला परत सुरुवात करू शकल्यामुळे मला समाधान वाटले. माती घेतलेली असताना बापूजींनी माझी रोजनिशी पाहिली. मग सही केली.

सायंकाळी प्रार्थना सुरू असताना पाऊस आला, पण कोणीही उठला नाही. मी बापूजींवर चादर टाकली. असे असूनही मी आणि बापूजी पूर्णपणे भिजलो. मुसलमान बंधू चागल्या संख्येत होते. भजनानंतर एकेक धून डोक्यात येत गेली. लोकांनी तालासह ती सुंदर पद्धतीने पकडली.

रघुपति राघव राजाराम, पतीत पावन सीताराम,
ईश्वर अल्लाह तेरे नाम, सबको सन्मति दे भगवान.

ही धून मी गाईली खरे, परंतु मला भीती वाटत होती की मी ही जी धून म्हणाले ते मी बरोबर केले की नाही आणि तिचा काय परिणाम होईल?

परंतु नेहमीप्रमाणे या धूननंतर प्रवचन झाले. आणि त्यात या धूनचा बापूजींनी खूप चांगला उल्लेख केला. यामुळे माझ्या समाधानाला पारावार राहिला नाही.

प्रार्थनास्थळावरून परतल्यानंतर बापूजी म्हणाले, “आजची धून मला फार गोड वाटली. लोकांनाही आवडली. तू कुठे शिकलीस? की तू स्वतःच तयार केली?”

मी तिचा इतिहास सांगितला - पोरबंदरात सुदामाच्या मंदिरात एक सभागृह होते (आणि आजसुद्धा आहे.). तिथे एक ब्राह्मण महाराज कथा करत होते. कथा पूर्ण केल्यानंतर त्यांनी एक धून गायला लावली. तिच्यात सर्व समुदायाचे लोक भाग घेऊ शकत असत. माझ्या आईबरोबर मीसुद्धा आठदहा वर्षांची असताना या सत्संगात जात असे. आणि एके दिवशी तिथे मी ही धून ऐकली होती. इथे अकस्मात ही डोक्यात आली.

बापूजी म्हणाले, “ईश्वरानेच तुला ही धून सुचवली. माझ्या या यज्ञान ईश्वर किती जास्त मदत करतो आहे ! या शक्तीवरील माझी श्रद्धा दिवसेंदिवस प्रबळ होत चालली आहे. माझ्या कार्याला चोहोकडून जसजसा विरोध होतो आहे तसतसा मी अधिकाधिक दृढ होत चाललो आहे. माझ्याबरोबर माझा ईश्वर आहे आणि तो मला किती मदत करतो आहे ते तर तू पाहतेच आहे. आजची रामधून याची साक्ष आहे. . .

“जुन्या काळी असेच होते. आता दररोज तू हीच धून गायला लावत जा. माहीत नाही या कठीण वेळी ईश्वरानेच तुला ही धून सुचवली असेल! काळानुसार या कठीण प्रसंगी त्याने बरोबर माझ्या प्रार्थनेत नवीन प्राण फुंकले. आईवडिलांबरोबर अशा प्रकारे कथाकीर्तनात गेल्याने जीवनात असे किती तरी लाभ होत असतात. जीवनाचा तो एक महत्त्वाचा भाग होऊन जात असतो. मीसुद्धा पोरबंदरात रामजींच्या मंदिरात जात असे. तेव्हा मला खूप आनंद व्हायचा. परंतु आज तर कों ंडा आणि कुटारच जास्त असतो. सुदामाच्या मंदिरात आणि तेसुद्धा ब्राह्मणाने अतिशय स्वाभाविकपणे घेतले. परंतु वातावरणातील अशी कलुषितता तर गत पाचसात वर्षातच वाढली आहे.”

फिरून आल्यानंतर बापूजींनी दूध नासवून त्याचे पाणी घेतले. लोणी घेतले आणि कताई केली. वर्तमानपत्रे ऐकली. साडेनऊ वाजता बापूजी झोपले. मी कातले नव्हते. यामुळे कातून मी दहा वाजता झोपले.

पावसात भिजले होते. यामुळे झोपायच्या वेळी परत ताप वाढला. परंतु आता झोपायचेच असल्यामुळे काही प्रश्न नाही.

डाल्टा,

२३ - १ - '४७

आज सकाळीसुद्धा बापूजींना गाढ झोप लागलेली होती. यामुळे जीवनसिंगजी जेव्हा त्यांना उठवायला आले तेव्हाच ते जागे झाले. रोजप्रमाणे प्रार्थना. गरम पाणी पीत असतानाच . . . बरोबर कामाविषयी चर्चा केली. आणि मग त्यांच्या मुलाबाळांबद्दलसुद्धा चौकशी केली. मुलाबाळांबद्दल सांगत असताना आईवडिलांचे मुलाबद्दलचे कोणते कर्तव्य आहे आणि सध्या आईवडील कशा प्रकारे ते कर्तव्य पार पाडत आहेत त्याबद्दल सुंदर, अचूक आणि सहजपणे कळेल अशा प्रकारे समजावून सांगत बापूजी म्हणाले, ". . . सत्य काय आहे हे तुम्हांला कळत नाही अशा अनेक तक्रारी माझ्याकडे आल्या आहेत. माझ्या मते मुले जेव्हा अशी होतात तेव्हा तो आईवडिलांचाच दोष असतो. तुमच्या सगळ्या मुलांपैकी एकामध्येही तुमचा गुण का आला नाही? याचे कारण तुम्ही मुलांकडे लक्षच दिलेले नाही. आईवडिलांना मुले तर सारखी होत जातात, पण त्यांच्यावरील संस्कारांची वा त्यांना द्यावयाच्या शिक्षणाची ते फिकीर करत नाहीत. आईवडिलांच्या विषयसुखामुळे हिंदुस्थानचा विनाश होतो आहे तो याच कारणामुळे. माझेच उदाहरण घ्या ना ! हरिलालच्या जन्मानंतर वडील म्हणून जे कर्तव्य मी पार पाडायला पाहिजे होते ते मी पार पाडले नाही, जितके लक्ष मी त्याच्याकडे द्यायला पाहिजे होते तितके मी दिले नाही. तो लहान असतानाच मी विलायतेत निघून गेलो होतो. परिणाम काय झाला हे तुम्हांला माहीतच

आहे. आता यांचे लग्न लावून देणेच श्रेयस्कर. . . . जर लग्न लावून दिले नाही तर हा बिघडेल." याबरोबरच बापूजींनी माझी एक गोष्ट सांगितली - 'पूर्वी मनूबद्दल हे इर्षेने भरलेले जे वाक्य म्हणाले होते ते तर मी मनूला सांगितलेच नाही. . . . ." मी तर कोणामध्ये पडत नसल्यामुळे हे ऐकून मी उद्विग्न झाले. अशाच विचारचक्रात मी पनियालाहून डाल्टाला पोहोचले. दररोज एकला चलोच्या प्रवासाच्या दरम्यान बापूजी मला जे भजन गायला लावत असतात ते आज या विचारचक्रात मी म्हटलेच नव्हते. सकाळी बापूजी आणि . . . मध्ये झालेल्या ज्या गोष्टी मी ऐकल्या होत्या त्यामुळे मी मनातून दुःखी झालेले असल्यामुळे ते भजन गायला मी विसरूनच गेले होते. परंतु इथे आल्यानंतर काही न बोलता मी बापूजींचे पाय धूत असताना सौम्यपणे बापूजी म्हणाले, "आज तू प्रवासादरम्यान गप्पच होती. तू ते भजनही म्हणाली नाहीस. तुझ्या मनात जे असेल ते सांगून टाक. आज तू फार कोमेजलेली दिसतेस? तुझी प्रकृती चांगली नाही काय?" वगैरे बापूजींनी विचारले. मी म्हणाले, मी नंतर सांगेन.

मालीश वगैरे झाल्यानंतर बापूजींना मी आंघोळ घालत होते. तेव्हा बापूजी मला परत म्हणाले, "तू सावरली असशील तर सांगून टाक." मी सकाळची गोष्ट सांगितली आणि माझ्यामुळे या लोकांना इतके दुःख सहन करावे लागते वगैरेही सांगितले.

बापू म्हणाले, "एवढ्याने तू हे तुझ्या मनावर का घेतेस? मलासुद्धा किती तरी लोक शिव्या देत असतात. ते माझा हेवा करत नाहीत काय? मी जर हे सर्व माझ्या मनात साठवून ठेवले तर मी माझे जतन करणेच विसरून जाईन आणि मी मूर्खपणा करू लागेन. यामुळेच ते जे म्हणाले होते ते मी तुला सांगितले नव्हते. आजसुद्धा तुझ्यासमोर सांगायची इच्छा नव्हती. परंतु तू तुझे काम करत होती, आणि यांच्याशी खाजगी असे काही मी बोलत नव्हतो. . . . हा माणूस फार सज्जन आहे. बैरागी आहे. हे पाहून त्यांच्या मुलांकरिता तुझ्यावर ठेवण्यात आलेल्या ठपक्याची गोष्ट मी त्यांना सांगितली. पण त्यांनी कोणतेही उत्तर दिले नाही. आणि म्हणूनच मी यांना जोडून ठेवू इच्छितो. माणसाने नेहमी गुणग्राही असावे. माझे वानर गुरू तुला माहीत आहेत ना? कोणी

आपली निंदा केली तर आपण नाचायला पाहिजे. ‘निंदक बाबा बीर हमारा’ हे भजन तर तुला माहीत आहे.”

बापूजींच्या गोष्टींमुळे माझ्यात परत उत्साहाचा संचार झाला. आणि मनातून निर्धार केला की अशा लहानसहान गोष्टींनी जर आपण निराश झालो तर जगणेच निरर्थक होईल.

अखेरीस बापूजी म्हणाले, “जीवनाची मजाच कसोटीच्या आणि निंदाखोर, टीका करणाऱ्या वातावरणात परिपूर्ण जीवन जगण्यात असते. आणि मगच ईश्वरावर आपली किती श्रद्धा आहे तेही कळते. आपण ईश्वराचे खरे भक्त आहो की केवळ तोंडाने बडबड करतो हे तेव्हाच कळत असते. या गोष्टीची आपल्याला जाणीव होते. तू आधी एक गोड भजन म्हणत होतीस ना-

जीवनने पंथ जता पाप, थाक लागशे,<br>
वधती विटंबणा सहतां तुं थाकशे;<br>
सहता संकट ए बधाए,<br>
हो मानवी, न लेजे विसामों

”हे संपूर्ण भजन फार गोड आहे. परंतु त्यातील हे कडवे तुझ्या आताच्या मनःस्थितीला माझ्या मते फार लागू पडते.”

आज आंघोळ करण्यात बापूजींचा फार वेळ गेला. वरून मला शिकवण देण्यात तल्लीन झाले होते. उपदेशाचा या प्रवाहाची सततधार सुरू होती. वेळ फार होतो आहे याची मला कल्पना होती, परंतु हा प्रवाह अडवण्याची मला इच्छा होत नव्हती. त्यांच्या शब्दाशब्दांत, वाक्यावाक्यात ज्ञान भरलेले होते.

या गावात खूप सुखसोयी आहेत आणि गावसुद्धा रमणीय आहे. पावसाचे प्रमाण फार असल्यामुळे आद्रतेचे प्रमाणसुद्धा फार आहे. घरमालकाने फार प्रेमाने आम्हांला जेवू घातले.

नियमानुसार बापूजींचा बंगालीचा पाठ चालला. आजच्या टपालात सरदारदादा, जवाहरलालजी आणि श्वेब यांची पत्रे आली. बापूजींनी सरदारदादांना लहानशी चिठ्ठी लिहिली.

घनश्यामदासजींचेसुद्धा पत्र होते. बिरलाजींचा माणूस संत्रीही देऊन गेला. यांच्याबरोबरच टपाल पाठवला.

दुपारच्या जेवणात तर बापूजींनी रोजप्रमाणेच घेतले. सायंकाळी नासवलेल्या दुधातील पाणी आणि मध घेतले. आज लिहिण्यात बापूजींचा खूप वेळ गेला. बराच टपाल आला आणि त्याचे उत्तरही पाठवले. त्यांनी स्वतःच सर्वांना पत्रे लिहिली. यानंतर बापूजी झोपले. आज १२० तार कातले. तुणाई केलेल्या पेळूने बापूजींनी कताई केली होती.

मुरियम,

२४ - १ - '४७, शनिवार

रोजप्रमाणे प्रार्थना झाली. प्रार्थनेनंतर आसामसंबंधीचा जो ठराव बापूजींनी तयार केला होता त्याची कागदपत्रे शोधण्यात बापूजींचा खूप वेळ गेला. निर्मळदांनीसुद्धा शोधले, परंतु सापडले नाही. कदाचित इतर कागदाबरोबर हेही निर्मळदांबरोबर कलकत्त्याला गेले असावे. मग माझी दैनंदिनी ऐकली. लगेच सही केली. बापूजी बंगाली पाठ करत होते आणि मी त्यांच्या सुताला पीळ दिला. लिहिता लिहिता बापूजी पंधराएक मिनिट झोपले. मी पाय दाबले. असे करता करता वेळ झाला. इथे आठ वाजता पोहोचलो. डाल्टा ते मुरियम अडीच मैलांचा रस्ता आहे.

आज आम्ही एका मुसलमानाच्या वाडीत उतरलो आहो. खूप प्रेमळ कुटुंब आहे. कुटुंबप्रमुखाचे नाव हबिबुल्लासाहेब पटवारी आहे. मुसलमानभाई बापूजींना प्रेमाने भेटले. मौलवीसाहेब आवश्यक ती सर्व मदत करत होते. मला त्यांच्या बहिणींजवळ (जनानाखान्यात) घेऊन गेले. आपल्या बहिणींशी माझी ओळख करून दिली आणि त्यांनी मला आपली ओळख

करून दिली. बापूजींना वेळ मिळेल तेव्हा आमच्याकडे घेऊन या असे अजीजी करत त्या म्हणाल्या. त्यानंतर मी बापूजींची मालीश, आंघोळ वगैरे आटोपून दररोजच्या कामाला लागले. बापूजी आंघोळ करून बाहेर आले तेव्हा मी त्यांना घरातील स्त्रियांकडे घेऊन गेले. सर्वांनी भक्तीपूर्वक बापूजींना सलाम केला. काही भगिनी लाजत होत्या. बापूजी त्यांना म्हणाले, “मी तर तुमच्या वडिलांसारखा घरातील माणूस आहे. कोणतीही स्त्री, भगिनी माझ्याशी पडदा ठेवत नाही. पडदा ठेवायचा असेल तर अंतःकरणातून खरा पडदा ठेवला पाहिजे. खोटा पडदा काढून टाका. बाहेरचा पडदा ठेवत असाल आणि मनात विकार भरलेले असतील तर ते पाप आहे.”

हबीबसाहेबांनी याचा सुंदर अनुवाद केला आणि ते भगिनींना म्हणाले, “आज तर आपण पावन झालो असेच म्हटले पाहिले. आपल्या जातीवर हिंदूंना मारल्याचा कलंक लागला होता. यामुळे आपण पापी झालो होतो. यामुळे खुदाचा फिरस्ता - देवदूत आपल्या आंगणात आला आहे. त्याचे दर्शन घ्यायचे तर पडदा कशाला. जोर लावून त्यांनी असे म्हणताच सर्व बाहेर आले. किती तरी मुलांनी बापूजींना संदेशचा काप दिला.”

भगिनींनी बापूजींचे लक्ष सफाईकडे वेधले. बापूजी म्हणाले, “तुम्ही बाहेरील सफाई करा तसेच तुमचे हृदयही स्वच्छ करा.” हा पहिलाच प्रसंग आहे की मुसलमान कुटुंबात आम्ही त्यांच्या कुटुंबियांसारखे झालो होतो. बापूजींच्या धैर्याला आणि तपश्चर्येला फळ आले.

बापूजी मुसलमानांना जेव्हा सलाम करायचे तेव्हा मुसलमानांना हा माणूस आमचा शत्रू आहे असे वाटायचे. परंतु या लोकांना बापूजींनी प्रेमाने आणि धैर्याने जिंकले.

दुपारचे जेवण तर बापूजींनी रोजप्रमाणेच घेतले. परंतु हबीबसाहेबांनी खास बापूजींकरिता रामफळ आणले. यामुळे बापूजींनी एकच खाकरा घेतला. जेवण करून बापूजी लगेच झोपले. मी त्यांच्या पायांना तूप चोळले. आंघोळ केली, कपडे धुतले. तोवर बापूजींना जाग आली. मी त्यांना नारळपाणी दिले.

मी दीड वाजपर्यंत जेवले नव्हते. यामुळे बापूजी नाराज झाले. आणि आपल्याजवळच मला ताट घेऊन खायला बसायला सांगितले. चूक झाली होती. यामुळे ऐकल्याशिवाय सुटका नव्हती. जेवण करून बापूजींना माती दिली. माती घेतल्यानंतर माझ्याकडून पत्रे लिहवून घेतली. ठक्करबापा, शारदाबहेन, बलसारिया इत्यादींना. पत्रे लिहवून घेत होते. तेवढ्यातच बाबा (सतीशबाबू) आणि दंडाधिकारी आले.

सायंकाळी प्रार्थनेच्या आधी नारळाचे दूध, बकरीच्या दुधाचा संदेश, आणि एक केळ घेतले.

आजची प्रार्थनासभा फार मोठी होती आणि सर्व आनंदाने धून झेलत होते.

बापूजी म्हणाले, “आजची प्रार्थनासभा फार मोठी होती आणि हिंदू, मुसलमान सर्वच धून झेलत होते. यामुळे कुठेही उणीव जाणवत नव्हती. या गावातील वातावरण चांगले ठेवण्यात हबीबसाहेबांचा मोठा वाटा आहे असे वाटते.”

प्रार्थेनेतून आल्यानंतरही एकामागून एक माणूसाचे दर्शनाकरिता येणे सुरूच होते. असे जवळपास साडेनऊ वाजेपर्यंत सुरू होते. बापू फार थकलेले होते. साडेदहा वाजता झोपले.

(बापू. २५ - १ - ‘४७. हीरापूर, रविवार)

हीरापूर,

२५ - १ - ‘४७

रात्री बापूजींचे पोट फारसे चांगले नव्हते. मलासुद्धा थोडेसे तापासारखे वाटत होते. ठरलेले असल्याप्रमाणे प्रार्थना झाली. प्रार्थनेनंतर गीतेच्या आठव्या अध्यायाच्या श्लोकातील उच्चारणात झालेली माझी चूक बापूजींनी दाखवली.

एका कार्यकर्त्या बंधूला बापूजी म्हणाले, “माझ्याबरोबर जितके काही कार्यकर्ते काम करतात त्यांचा स्वयंपाक वेगळा असला पाहिजे. त्यांनी आपल्या हाताने स्वयंपाक केला पाहिजे.

नाही तर ज्यांच्याकडे ते उतरतील त्या घरमालकाकरिता ते ओझे होतील." त्यांनी ही गोष्ट कबूल केली.

गरम पाणी दिल्यानंतर बापूजींनी मला परत झोपायला लावले. साडेसहा वाजता उठवले. उठून मी रस काढला. पण मी परत झोपल्यामुळे माझे लिहिण्याचे, सूत उतरवून घेण्याचे असे सर्व काम राहून गेले. मुरियमपासून हे गाव दीड मैलच असल्यामुळे आम्ही लवकर पोहोचलो. मुरियमहून निघत असताना पुष्कळ भगिनी बापूजींना भेटायला आल्या होत्या. बापूजी त्यांना म्हणाले, "हिंदू बहिणींना स्वतःच्या बहिणीप्रमाणे समजा आणि जोपर्यंत घरातील आणि बाहेरील साफसफाई ठेवणे तुम्ही शिकणार नाही तोपर्यंत हृदयाची सफाई येणार नाही. यामुळे आजपासूनच तुम्ही तुमच्या कपड्यांची, तुमच्या मुलाबाळांची घराची, स्वतःच्या शरीराची सफाई करायला सुरुवात करा. आणि तुमच्या हृदयाची सफाई आपोआप सुरू झाल्याचे तुम्हांला आढळेल."

इथे पोहोचल्यानंतर बापूजींनी थोडेसे लेखनकार्य केले. मालीश, आंघोळ वगैरेंनंतर रोजप्रमाणे जेवले. पण मलाही सोबतच खायला सांगितले. परंतु माझी आंघोळ व्हायची होती. यामुळे मी जेवले नाही. बापूजी म्हणाले मला जेवू घालण्यात तुझा वेळ वाया घालवू नको. इतके कोडकौतुक तर बा (कस्तुरबा) करत होती! आता जर तू अशा प्रकारे माशा उडवायला बसशील तर तुझीही कमाल होईल आणि माझीही.

दुपारी बापूजी चांगले झोपले. जवळपास एक तास झोपले होते. प्रकृती चांगली नव्हती. स्वामीजींनी गीतेसंबंधी अनेक प्रश्न विचारले. बापूजींनी एकच गोष्ट सांगितली की "ईश्वरपरायण माणूस जर चूक करत असेल तर तिच्यात सुधारणा होऊ शकते. आज जास्त खाल्ले गेले. पोटाला आराम पाहिजे होता. उलट केले म्हणून असे झाले. उलटी करावीशी वाटत होती. थांबवता येत असेल तर थांबवावी असे वाटल्यामुळे मी झोपलो. आणि वांती थाबवल्यामुळे

थकवा खूप वाटला. परंतु रामनामाची चांगल्या प्रकारे मदत होती. परिणामी चांगल्या प्रकारे झोपू शकलो आणि सर्व काही ठीक झाले."

आज बापूजींनी दप्तरातील पुष्कळ निरुपयोगी पत्रे काढून टाकली. निर्मळदांनीसुद्धा पुष्कळ मदत केली.

सायंकाळी जेवणात बापूजींनी काहीही घेतले नाही. उद्याच्या प्रार्थनाप्रवचनाची नोंद करण्याकरिता बापूजींनी मला सांगितले. बापूजी जे बोलतात ते जेव्हा वर्तमानपत्रात जाते तेव्हा त्यातील काही सुटू नये म्हणून बापूजी असे म्हणाले होते, निर्मळदासुद्धा टिपणे घेत असतात, परंतु बापूजी हिंदीत बोलत असतात आणि निर्मळदा त्याची इंग्रजीत वा बंगालीत नोंद घेत असतात. परंतु हे तर मूळ हिंदीतच लिहिले पाहिजे.

प्रार्थनेतून आल्यानंतर बापूजी पाऊणेक तास फिरले. साडेनऊ वाजता बापूजी आणि मी एकाच वेळी झोपलो.

बांसा,

२६ - १ - '४७

आज बापूजी फार लवकर उठले. अडीच वाजता संडासला जावे लागले होते. त्यानंतर ते झोपलेच नाही. उठल्यानंतर माझी दैनंदिनी तपासली. दुसरे काम केले. तेवढ्यात जवळपास रोजची उठायची वेळ झाली. यामुळे दातण केले.

बापूजींबरोबर स्वयंसेवक आले आहेत. बापूजींनी त्यांना स्वतःचा स्वयंपाक करायला सांगितले आहे. मी आणि निर्मळदा जेवलो, परंतु हे लोक जेवू शकले नाही. काल हीरापूरमध्ये आम्ही ज्या घरी उतरलो होतो त्या घराच्या मालकाने या सर्व स्वयंसेवकांना जेवू घातले होते. ही गोष्ट विशेषतः लक्षात ठेवून एक कार्यकर्ते बंधू म्हणाले,

२६ जानेवारी हा स्वातंत्र्यदिवस असल्यामुळे हीरापूर सोडण्यापूर्वी त्यांनी वंदेमातरम हे गीत म्हटले आणि मग ते हीरापूरहून निघाले. इथे यायला निघण्यापूर्वी मी काही मुसलमान भगिनींना भेटायला गेले असता त्या भगिनींनी बापूजींना भेटण्याची इच्छा सांगितली. यामुळे बापूजींना मी त्या भगिनींकडे घेऊन गेले. परंतु एक भगिनी सोडली तर इतर सर्व भगिनी आत निघून गेल्या. या भगिनींच्या इच्छेनुसार मी बापूजींना इथे आणले आणि त्या आत निघून गेल्या याचे मलाही वाईट वाटले. बरीच समजूत घातल्यानंतरही त्या बाहेर आल्या नाही. यामुळे अखेरीस प्रत्येक भगिनीच्या झोपडीजवळ बापूजी गेले आणि त्यांना सलाम करून आले. १५- १६ वर्षाच्या मुलींच्या झोपडीजवळ जाऊनसुद्धा बापूजी सलाम करून आले ! यामुळे मला खूप लाज वाटली. ही बदनामीचीच गोष्ट नाही काय? त्यांच्या विनंतीवरून मी बापूजींना आणले होते आणि माझ्या वयाच्या मुलींच्या झोपडीजवळ जाऊन बापूजींनाच सलाम करून यावे लागावे ! आणि त्या माझ्या बहिणी असल्यामुळे मला लाज वाटत होती. आपल्या अंगणात हा एक महापुरुष आला आहे याचे त्यांना जरी काही वाटत नव्हते यावर माझा आक्षेप नव्हता. माझ्या दृष्टीने ज्याला मी ईश्वर समजते त्याला तुम्ही तसे समजत नसाल तरी मला त्याचे काही वाटत नव्हते. परंतु आपल्याकरिता वयाने वडील असलेला हा माणूस आला म्हणून तरी त्यांनी बापूंचा सत्कार करायला पाहिजे होता. पुष्कळ वेळेनंतर माझी गोष्ट त्यांना पटली, आणि तेसुद्धा मी घरोघरी जाऊन आल्यानंतरच. आणि मगच सर्व भगिनी बाहेर निघाल्या.

यानंतरही बापूजी म्हणाले, “तू पाहा तर खरे की या प्रत्येक पोरीच्या मनात किती विष भरलेले आहे? स्त्रियांमध्येसुद्धा किती जहर भरलेले आहे? या भगिनींमधील विष काढण्याकरिता तुझा जितका उपयोग करता येऊ शकेल तितकाच करता येईल. तुझ्या शुद्ध हृदयाचे प्रतिबिंब या मुलींवर पडल्याशिवाय राहणार नाही. यामुळे या कामात तुला जितके काही यश मिळेल तितका माझा फायदाच आहे असे समज. या महायज्ञात तू आणि मी असे दोघेच आहो. यामुळे तू माझे काम सोडून हे कामच आधी करायचे आहे असे समज. आज आधी भगिनी आल्या

नव्हत्या त्यांना पुरुषांनी शिकवले होते हे तू पाहिले आहेस काय? सकाळी हाजीसाहेबांकडे जे पाहिले त्याच्या हे अगदी उलटच होते."

इथे आम्ही ८.१० वाजता पोहोचलो. आजची पदयात्रा सर्वात लहान होती. आपण काही चाललोच नाही असे बापूजींना वाटत होते. आल्यानंतर बापूजींनी लगेच टपाल लिहिला - रशीद अहमद, कुलरंजनबाबू, प्रकाशम, जवाहरलालजी, मदालसाबहेन, डॉ. जोशी आणि डॉ. रविशंकर शुक्ला या सर्वांना. टपाल लिहिल्यानंतर मालीश झाली. मालीशला जाण्यापूर्वी असोसिएटेड प्रेस ऑफ इंडियाचे प्रतिनिधी शैलेनभाईंनी आज स्वातंत्र्यदिवस असल्यामुळे त्यासंबंधात काही कार्यक्रम आहे काय अशी चौकशी केली. बापूजी म्हणाले, "मी तर इथे हा यज्ञ मांडून बसलो आहे. माझ्याकरिता हाच स्वातंत्र्यदिवस आहे. परंतु गावातील लोकांचा उत्साह वाढवण्याकरिता तुम्ही लोक (वृत्तपत्रप्रतिनिधी आणि इतर) हा दिवस साजरा करू शकता."

इथे येथील सरदार निरंजनसिंह यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. मालीश करण्याकरिता टाकण्यात आलेल्या तंबूूत बापूजी आणि मी गेलो. समूह जेवणाचा कार्यक्रम ठरलेला होता. परंतु नंतर बातमी आली की मुसलमान जर जेवायला येणार असतील तर धोबी येणार नाहीत. आपल्याला बळजबरीने मुसलमान करण्यात येईल अशी त्यांना भीती होती हे याचे कारण होते. यावर बापूजी म्हणाले, "भीतीमुळे त्यांनी जेवणात भाग घेऊ नये." जेवणात या समुदायाचाही समावेश असावा असे बापूजी म्हणाले. बापूजींचा आज उपवास होता. यामुळे आंघोळीनंतर गरम पाणी आणि मध घेतले. सायंकाळी उपवास सुटेल. खूप कातले. माती घेतलेली असताना पत्र लिहवून घेतली. उरुळीवाले मणिलालभाई, गोखलेजी, धीरूभाई, डॉ. भागवतजी आणि परमानंदभाई या सर्वांना.

स्वातंत्र्यदिनाबद्दल बापूजी व्यथित अंतःकरणाने म्हणाले,

आज २६ जानेवारी आहे म्हणजे आज स्वातंत्र्यदिवस आहे. कॉंग्रेसचा जन्म झाल्यामुळे हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाले. याचाच अर्थ हिंदुस्थानला नवजीवन मिळाले. सर्वच हिंदुस्थानींना कल्पना नसेल की पण हळूहळू कॉंग्रेसची वाढ होत चालली होती. आणि कॉंग्रसने गावागावातून स्वातंत्र्याची भावना जागवली. त्या काळात हिंदू, मुसलमान वगैरे भेदभाव एकाही गावाला माहीत नव्हता. परंतु आज फार वैमनस्य निर्माण झाले आहे. आज मने फाटली आहेत ही दुःखाची गोष्ट आहे. असे जर कलुषित वातावरण नसते तर मी इथेच तिरंगी झेंडा फडकवला असता.

मला काही बंधूंनी विचारले होते. मी जाणूनबुजून त्यांना नाही म्हणालो. परंतु एखादा इंग्रज अंमलदार जर म्हणाला असता की तू इथे तिरंगी झेंडा फडकवू शकत नाही तर मी तो फडकवल्याशिवाय राहिलो नसतो. मग तसे करताना माझा जीव जरी गेला असता तरी मी फिकीर केली नसती. पण आज मी कोण आहे? समजा की मी ध्वज फडकवला आणि मुसलमानभाईंना तो सहन झाला नाही तर? पण मनात एक विचार येतो. हे संकट का आले? मला असे करायचे नाही. पण त्याचबरोबर माझ्या मनात जे भरलेले आहे ते तर मी सांगायलाच पाहिजे ना? जेव्हा झेंड्याची गोष्ट सुरू झाली तेव्हा माझ्या मनात आले होते की झेंड्याचा एकच रंग जर असेल तर अन्याय होईल. हिंदुस्थानात अनेक जातिजमाती आहेत. एक दिवस असा होता की जेव्हा हिंदु, मुसलमान, पारसी हे सर्वच स्वतःला हिंदुस्थानी समजत असत आणि हाच आमचा झेंडा आहे असे मानत असत. आणि याच झेंड्याखाली अनेक लोक मेले आहेत. आज तर किती तरी झेंडे झाले आहेत. परंतु तिरंगी झेंडा तर असायलाच पाहिजे. ज्याप्रमाणे युनियन जॅक आहे. याचाही काळ होता. पण आज नाही. आज मी कोणाला म्हणू? वा कोणाशी लढू? आपण सर्व हिंदुस्थानी आहो आणि भाऊभाऊ आहो. स्वातंत्र्य मिळाल्यामुळे आपसात, अंतर्गत भांडणे होणार असतील तर हे स्वातंत्र्य काय कामाचे? पण आज तर आपल्याकरिता ही

आकाशपुष्पासारखी गोष्ट झाली आहे. आपण असा विचार केला पाहिजे की जोपर्यंत स्वातंत्र्य मिळत नाही तोपर्यंत शांतपणे बसायचे नाही. आज आपण भाऊभाऊ भाडत आहो. अरे ! स्वातंत्र्याआधी पाकिस्तान कसा? इंग्रज पाकिस्तान देतील? स्वातंत्र्य कसे असेल हे कोणाला माहीत? इंग्रज तर जातीलच, पण रशिया, अमेरिका पडलेले आहेत. आपण जर सावध राहिलो नाही तर मरून जाऊ. आताच आपण ‘जनगणमन’ म्हणालो, किती सुंदर गीत आहे ! हिंदुस्थानात अशाअशा गोष्टी पडलेल्या आहेत. आपण जर या अंतःकरणपूर्वक गाऊ तर सर्व एक होऊ. आपण जर असे करणार नाही तर आपली मूर्खांमध्येच गणना होईल. हा अनुभवी म्हातारा जे सांगतो आहे ते खरे आहे असे जर तुमचे अंतःकरण सांगत असेल तर आजपासून तुम्ही सर्व तसे वर्तन करायला सुरुवात करा.

आज मी तरी झेंडा फडकवणार नाही. परंतु माझ्याबरोबर वर्तमानपत्रांचे जे प्रतिनिधी फिरत आहेत ते झेंडा फडकवू शकतात. बंगालच्या महान पुरुष पुढाऱ्यांनी याच स्वातंत्र्याकरिता आपल्या प्राणांचे बलिदान केले होते. त्यांच्याकरिता जर आपण हा ‘यज्ञ’ करणार नसू तर अजून कोणाकरिता करू?

आज बापूजींनी परत दूध आणि खजूर घेतले. मी माझे आजचे कामकाज आटोपून प्रेसवाल्यांच्या आमंत्रणामुळे तिथे जेवायला गेले. खिचडी आणि भाजी केली होती. जेवायला जायला अर्धा तास उशीर झाला होता. तोपर्यंत सर्व वाट पाहत बसले होते. साडेआठ वाजता जेवून आले तेव्हा बापूजी वर्तमानपत्रे वाचत होते. साडेनऊ वाजता बापूजी झोपले.

बापूजींना दररोज रात्री एकदोनदा उठावे लागत असते. मला रोज वाटत असते की तेव्हा आपणही उठावे, त्यांना पाणी गरम करून द्यावे. पण बापूजी इतक्या हळू उठत असतात की ते उठले असल्याचे कळतच नाही. उलट मी मात्र थंडीत गुंडाळी करून पडलेली असते. ते माझ्या अंगावर सारखे पांघरूण टाकत असतात. यामुळे झोपण्याआधी बापूजींना मी म्हणाले, “मी

तुमची सेवा करण्याऐवजी रात्री मीच तुम्हाला सेवा करायला लावत असते. आजपासून तुम्ही मला न चुकता उठवा."

बापूजी म्हणाले, "रात्रीच्या सेवेची तू गोष्ट करतेस, पण मी तुझी सेवा घेत असतो असतो त्याचे काय? तू मुरद्याप्रमाणे गाढ झोपलेली असतेस. मी हिंला सुंदर, निर्दोष निद्रा म्हणतो. अशी झोप मला फार आवडते. तू किती निर्दोष आहेस हे यातून खात्रीपूर्वक दिसून पडते. माणसाचे मानसिक वातावरण जसे असते तसेच परिणाम दिसून पडत असतात. माणूस जरी बोलत नसला तरी काय फरक पडतो. परंतु झोप, आहार, व्यवहार या सर्वांमधून हा माणूस कोणत्या पातळीवरील आहे याची पारख होत असते."

बापूजींचे पाय दाबले. डोक्याला तेल चोळले, मच्छरदाणी बंद केली. आता पाऊणेअकरा वाजले आहेत. माझी डायरी लिहिली. दात घासायचा कुंचला तयार करायचा आहे. तो करून झोपायला जाईन.

पल्ला,

२७ - १ - '४७

आज तर इतकी काही थंडी पडली आहे की उठायची इच्छाच होत नाही. बापूजींचे पाय फार थंड पडले आहेत. पुष्कळ वेळेपर्यंत दाबले. प्रार्थना. नित्यक्रमाप्रमाणे दररोजचा कार्यक्रम चालला. आजकाल सायंकाळी प्रार्थनेच्या वेळी मी माझी वही घेऊन जात असते. बंगाली भाषांतर होते ते मी लिहून घेत असते. सकाळी पाणी पीत असताना बापूजी ते ऐकत असतात. पाहून सही करतात.

आज बापूजींनी बंगाली बाराखडी पूर्ण केली. ती लिहिण्यात पूर्ण अर्धा तास गेला. आणि थोडासा टपाल लिहिला. सात वाजता बापूजी थोडेसे झोपले. ७.४०ला आम्ही बासाहून निघालो आणि ८वाजून १० मिनिटांनी आम्ही इथे पोहोचलो. एक मैलच चालायचे होते. इथे आम्ही एका

विणकराकडे उतरलो. बापूजींचे तर मौन होते. विणकर कुटुंब फार प्रेमळ आहे. उन्ह पडल्यानंतर बापूजींची मी मालीश केली. आणि आंघोळ केल्यानंतरही बापूजी बाहेर उन्हातच थांबले.

बापूजींनी दुपारच्या जेवणात पाच काजू, पाच बदाम, मुरमुरे आणि भाजी घेतली. राजेंद्रबाबूंच्या आत्मकथेचे पुस्तक आले आहे. ते वाचण्यात बापूजींचा बराच वेळ गेला. सोमवार असल्यामुळे मला सुटीसारखेच वाटते आहे. माझे जास्तीचे कामकाज मी आज उरकवले. बापूजींच्या चादरी आणि सतरंजी फार मळाल्या होत्या. यामुळे आज सर्व धुतल्या. मग उद्याकरिता खाकरे बनवून टाकले.

दुपारी दोन वाजता बापूजींनी नारळपाणी घेतले. आज प्रार्थनेनंतर येथील माजी युनियन प्रमुखाच्या घरी गेलो. ते कुटुंब मुसलमान होते. त्यांच्याकडे बापूजींनी नारळपाणी घेतले. बापूजींना भगिनीसुद्धा भेटल्या. त्यांतील एक भगिनी आठवीपर्यंत शिकलेली होती.

बापूजींनी या भगिनिंना विशेषेकरून शिक्षण घेण्याकरिता - वाचन, लेखन शिकण्याकरिता सांगितले. “आणि कताई करण्यावर भर दिला. कताई केल्याने कापडावरील ६०% खर्च वाचतो. शिवाय हा देश तर कापसाचाच आहे. आणि आजकाल कापडाची महागाई ही अशी आहे. आपल्या देशात कापडावर नियंत्रण आहे. आपला किती वेळ वाया जात असतो याचा स्त्रियांनी विचार करावा. लहान लहान मुलीसुद्धा कताई करू शकतात. तुम्ही जो पडदा ठेवता त्याऐवजी तुम्ही मनात लज्जेचा पडदा ठेवा. पडद्याचा अर्थ लज्जा, मर्यादा, विवेक आहे. पण तुम्ही बाहेरून पडदा ठेवत असाल आणि तुमचे मन मळलेले असेल तर पडदा काय कामाचा?”

आज आम्ही विणकराच्या घरात असल्यामुळे बापूजी खूप खुश आहेत. याचा उल्लेख करत ते म्हणाले,

“आज माझा मुक्काम एका विणकराच्या घरात असल्यामुळे मला फार आनंद होतो. यांनी मला खूप प्रेमाने ठेवले आहे. प्रेमाशिवायचा महाल तुरुंग वाटतो. परंतु प्रेमपूर्ण

झोपडी मात्र महालापेक्षाही जास्त चांगली वाटत असते. परंतु खरी गोष्ट तर ही आहे की बंगालच्या झोपड्यांवरच मी मुग्ध आहे. यात हवा आणि प्रकाश जसे खेळतात तसे ते खोल्यांमध्ये क्वचितच खेळत असतात. परंतु दुःखाची गोष्ट तर ही आहे की इतके साधे जीवन असूनही आणि निसर्गाची इतकी कृपा असूनही हिंदू-मुसलमान इथे परस्परांबरोबर प्रेमाने वागत नाहीत. धर्म वेगळा झाल्यामुळे आपण माणूसकी गमावली पाहिजे काय? परंतु ही गोष्ट आपण लवकरच विसरून जाऊ आणि आपली जबाबदारी आपल्याला कळेल अशी मी आशा करतो. परंतु नुकताच झालेल्या दंग्यानंतर बाजार बंद असल्याची बातमी आहे. आपण एकमेकांकडे संशयाने पाहतो. यामुळे नुकसान आपलेच आहे. कोणाचाही फायदा नाही. एकीकडे पीक न आल्यामुळे दुष्काळासारखी परिस्थिती आहे तर दुसरीकडे अज्ञानामुळे, बुद्धिहीनतेमुळे आपण आपल्याच पायावर कुऱ्हाड मारतो आहो अशी परिस्थिती आहे."

"आपल्यासमोर अनेक असे प्रश्न उभे आहेत ज्याबाबतीत सरकारने किंचितही त्रास घेण्याची आवश्यकता नाही. त्या प्रश्नांनी सोडवणूक आपणच आपसात करू शकतो. उदाहरणार्थ आरोग्य, स्वच्छता, फळाफुलाच्या लहानलहान रोपांचे जतन करणे, पक्के संडास तयार करणे असे अनेक काम आपल्यासमोर पडले आहेत. आपण जर आपले डोके या कामात लावले तर सर्वांचाच किती फायदा होईल? कोणाला जर पळभराचीही सवड मिळाली तर मला सांगा. पण आपल्याला हे उमगेल तर ना? ईश्वराला माझी निरंतर प्रार्थना आहे की या मुलीने म्हटले तसे 'सबको सन्मती दे भगवान'प्रमाणे आपल्या बुद्धीने प्रतिसाद द्यावा आणि सदुपयोगी काम करण्याची शक्ती द्यावी हीच ईश्वराला प्रार्थना.

आजचे प्रार्थनाप्रवचन असे होते. निर्मळदा त्याचा बंगालीत अनुवाद करत होते. नंतर बापूजींनी स्वतःची दैनंदिनी लिहिली. मी माझी लिहिली.

बापूजी खूप थकले होते. फिरून आल्यानंतर पाय धुतले. खूप थंडी होती. वाफाळलेले एक सफरचंद आणि दूध घेतले. पांघरूण घेऊन थोडेसे कातले. कातल्यानंतर वर्तमानपत्रे ऐकली. शैलेनभाई वाचून दाखवत होते. बापूजी फार थंड पडले होते. यामुळे त्यांचे पूर्ण शरीर दाबले. सव्वानऊ वाजता बापूजी अंथरुणावर पडले. बापूजींनी गरम पाण्याने हाततोंड धुतले आणि मग ते झोपले. बोपूंजींना तेल चोळले, पाय दाबले आणि मग मी पाऊणेदहा वाजता झोपले. आजसारखी थंडी तर कधीच नव्हती.

रात्रीसुद्धा बापूजींना फार थंडी वाजत असल्यामुळे त्यांनी मला उठवले होते. मी त्यांना पांघरुण घातले आणि शरीर गरम करण्याकरिता खूप दाबले.

पांचगाव,

२८- १ - '४७

रोजप्रमाणे पल्लामध्ये प्रार्थना झाली. आजचे भजन निर्मळदांनी गाईले. खूपच गोड आणि मृदू आवाजात म्हटले होते. काल रात्री बापूजींनी भगिनींच्या प्रश्नांची विस्तृत चर्चा केली होती. त्यांनी जे अनेक प्रश्न विचारले त्यांतील एक प्रश्न असा होता - गुंड जर एखाद्या स्त्रीवर हल्ला करत असतील तर स्त्रियांनी काय करावे? पळून जावे की शस्त्र तयार ठेवावे?

बापूजी म्हणाले, “बचावाकरिता शस्त्र ठेवण्याची तयारी एवढ्याकरिता की हिंसा करायची तयारी ठेवण्याची आवश्यकताच पडू नये. आदर्श अहिंसक धैर्य शिकण्याकरिता तयारीची आवश्यकता असते. जो माणूस अहिंसक असतो त्याच्यावर अशी संकटाची वेळ येणारच नाही. परंतु शांततापूर्वक आणि गौरवाने मृत्यूची हसतमुखाने भेट घेण्याची आपली तयारी असली पाहिजे. खरी मदत शस्त्राची नसली पाहिजे, ईश्वराचीच असली पाहिजे हे याचे कारण आहे.

"आदर्श अहिंसेने सामना करण्याचे धैर्य आज जगाजवळ नाही. यामुळे जग अण्वस्त्रासारख्या शक्तीने सज्ज होत आहे. परंतु माणसाने कोणाचाही आधार घेतल्याशिवाय स्वतंत्रपणे आणि स्वाभाविकपणे चालायला शिकायला पाहिजे. कोणाच्या ताब्यात जाण्याऐवजी भगिनींनी आपल्या स्वतःचा प्राणत्याग करणे शिकायला पाहिजे. आणि त्यांच्यात अंतःकरणाचे असे पावित्र्य असले पाहिजे की गुंडांचे शस्त्र आपोआपच गळून खाली पडायला पाहिजे. आपले प्राण द्यायचे की हल्ला करणाराचे प्राण घ्यायचे या दोघांमधून तुम्ही काय पसंत कराल असे जर कोणी मवा विचारले तर आपण आपले प्राण हसतमुखाने देण्यातच खरे शौर्य आहे असे मी म्हणेन.

प्रार्थनेनंतर माझ्याकडून काही पत्रे लिहवून घेतली. त्यांत त्यांनी वरील गोष्टीचाही उल्लेख केला. हे लिहवून घेत असतानाच बापूजींचा डोळा लागला. एका भगिनीने बापूजींना पेंसिलने पत्र लिहिले, बापूजींनी लिहिले, "आता तू शाईवर कायम राहा. पेंसिलने लिहिणे पाप आहे, आळस आहे, हिंसा आहे."

इथे येण्याकरिता आम्ही पल्लाहून रोजप्रमाणे साडेसात वाजता निघालो होतो. रस्त्यात राजकुमार दे, महमद रोज़ा आणि मुफलिस रहम या तिघांच्या घरी आम्ही गेलो. तिथे आम्ही अंदाजे नऊ वाजताच्या सुमारास पोहोचलो. रोजप्रमाणे मी मुफलिसकडील भगिनींकडे गेले. आधी तर त्या भगिनी आत गेल्या आणि त्यांनी दार बंद करून टाकले. आज हा नवीनच अनुभव होता. मग थोड्या वेळाने एक प्रौढ भगिनी माझ्याजवळ आली आणि तिने माझ्याशी खूप सौजन्यपूर्ण गोष्टी केल्या. माझे आणि बापूजींचे नाते काय आहे असे विचारले. तेवढ्यात इतर भगिनीही बाहेर आल्या. एक भगिनी मासळीचा स्वयंपाक करत होती. तिने मला मासळीची भाजी आणि भाकरी खायचा खूप आग्रह केला. मी म्हणाले की मी मासळी खात नसते आणि एवढ्यात भाकरी खायची सवय राहिलेली नाही. तेवढ्यात ती प्रौढ भगिनी म्हणाली, तू तर निमित्त करते आहेस. आणि तू म्हणतेस की गांधीजी हिंदू-मुसलमानांमध्ये ऐक्य करायला

निघालेले आहेत. परंतु हिंदू हिंदूंना श्रेष्ठ समजतात आणि आम्हांला ते अस्पृश्य वा हलक्या प्रतीचे समजतात. तूसुद्धा हिंदू आहेस ना?

मी म्हणाले की मला अशा प्रकारची कोणतीही अडचण नाही. तुमच्या मनाचे समाधान व्हावे म्हणून मी भाकरीचा तुकडा तोंडात टाकायला तयार आहे, पण मासळीच्या या भाजीचा कशाला हात जरी लागला असेल तरी मी ती खाऊ शकणार नाही.

त्यांनी चांगली भाकरी केली. मी त्यातील चतकोर तुकडा सहजपणे तोडला आणि तो खाल्ला. या भगिनीने माझी परीक्षा केली आणि म्हणाली, “तुझ्यात तर मुळीच भेदभाव नाही.”

रस्त्यात मी ही गोष्ट बापूजींना सांगितली. बापूजी म्हणाले, “तू थोडीशी भाकरी घेतली हे चांगले केले. पण माझ्याबद्दलही या लोकांमध्ये किती शंका आहेत हे तुझ्या लक्षात आलेच असेल?”

मोहमद रोज़ाकडून त्या दिवशी संत्री आली. इथे आल्यानंतर मी बापूजींचे पाय धुतले आणि लगेच मालीश केली. आंघोळीनंतर जेवणात दोन खाकरे, भाजी, दोन काजू, दूध आणि घरमालकाला खुश करण्याकरिता नारळाच्या संदेशचा एक लहानसा तुकडा घेतला. जेवत असताना बापूजींनी अपूर्ण राहिलेले पत्र लिहवून घेतले. मग आराम केला. झोपून उठल्यानंतर दोन नारळ घेतले. कातत असताना परत पत्रलेखन करवून घेत होते. तेवढ्यात प्यारेलालजी आणि सुशीलाबहेन आले. यामुळे पत्र अपूर्ण राहिले.

सायंकाळच्या प्रार्थसभेत आज भगिनींसोबत घडलेल्या प्रसंगासंबंधी सांगत बापूजी म्हणाले,

- माझ्या प्रवासादरम्यान मला एका हिंदूच्या आणि एका मुसलमानाच्या घरी नेण्यात आले. यामुळे मला खूप आनंद झाला. मी तर भावाचा भुकेला आहे. अशा अशा ठिकाणी जायचे आहे अशी काही मला आगाऊ कल्पना देण्यात आलेली नव्हती. परंतु रस्त्यात आमंत्रण देणाऱ्या भाईने

प्रेमाने बोलावल्यामुळे मी तिथे गेलो. तिन्ही ठिकाणी मला काही ना काही खाण्याकरिता सांगितले. पण माझी ती खाण्याची वेळ नव्हती. मी म्हणालो की मला फळ दिले तर मी जरूर खाईन. माझ्याबरोबर माझी नात फिरत असते. ती तेथील भगिनींकडे गेली. भगिनींनी तिचे प्रेमाने स्वागत केले आणि एका घरातील आजीबाईंनी ही पोरगी कोण आहे याची चौकशी केली आणि तिला जवळ घेतले. एका बहिणीने भाकरी आणि मासळीची भाजी बनवली होती. ते खाण्याकरिता तिने आग्रह केला. मग ही बिचारी पोरगी काय करणार? मला या वेळी जेवायची सवय नाही असे हिने सांगितले. तर त्या भगिनींला संशय आला की स्पर्शास्पर्शाच्या दृष्टीने ही पोरगी खात नाही. पण अखेरीस तिने भाकरीचा एक तुकडा घेऊन तो खाल्ला. आधीची भगिनी खुश झाली. माझ्यात वा माझ्याबरोबर फिरणारात नात्याचा वा जातीचा भेदभाव नाही. आम्हांला हवे त्यांच्याबरोबर खाण्यात कोणतीही अडचण नाही. आणि माझ्या मुसलमान बांधवांना माझी विनंती आहे की तुमच्याकडे जे अस्पृश्यतेच्या भावनेने पाहतात त्यांच्याकडे तुम्ही उदार भावनेने पाहायला पाहिजे. हा समज चुकीचा आहे हे मला कळते. खऱ्या प्रेमाची ओळख असणारा कोणाबरोबर जेवायला येत असतो काय? जसजसा काळ जाईल तसतसा हा समज दूर होणारच आहे. या दृष्टीने बरेचसे काम झालेलेही आहे. परंतु हा संशय पूर्णपणे दूर व्हावा म्हणून जोजो तुमच्याबद्दल खरे प्रेम दाखवील त्याचे तुम्ही कौतुक केले पाहिजे. असे केले तरच तुम्ही एकमेकांजवळ येऊ शकाल.

२६ जानेवारीच्या प्रसंगाचा उल्लेख करत बापूजी म्हणाले -

माझ्याबरोबर हे प्रेसवाले फिरत असतात. त्यांनी एक समूहभोजन ठेवले होते. या पंगतीत मुसलमानभाई काही जेवायला आले नव्हते. परंतु प्रेसवाले ज्या भाईंकडे राहिले होते त्यांना ते हात जोडून म्हणाले तुमच्याबरोबर मला जेवायचा आग्रह करू नका, तुम्ही तर एक दिवस राहून जाल, पण माझ्यावर आफत येईल. तुम्ही गेल्यानंतर तू बाटला, म्हणून तू मुसलमान हो असे दडपण माझ्यावरही येईल. .

या माणसाची भीती मला खरी वाटली, यामुळे वर्तमानपत्रवाल्यांना मी म्हणालो की या बिचाऱ्याच्या झोपडीत तुम्ही जेवण ठेवू नका. हिंदू आणि मुसलमान एकमेकांची दुर्बलता समजून घेऊन जवळ कसे येतील ते मला माहीत नाही. परंतु या हेतूची पूर्ती व्हावी म्हणून आवश्यकता पडली तर मी माझा जीव द्यायलाही तयार आहे. यामुळे तुम्ही सर्व माझ्याबरोबर ईश्वराला प्रार्थना करा की हे ईश्वरा! असा शुभ दिवस तू लवकर आण.

माझ्या लहानशा प्रसंगाच्या आधारे आज बापूजींनी अतिशय सद्गदित होऊन प्रवचन केले.

प्रार्थनेमधून आल्यानंतर बापूजींनी आठ वाटलेले खजूर आणि दूध घेतले.

रात्री दहा वाजल्यानंतर बापूजी झोपले. तोपर्यंत प्यारेलालजींशी महत्त्वाच्या गोष्टी केल्या. प्रवचन आणि इतर पत्रे लिहिली.

जयाग,

२९ - १- '४७

बापूजींचा प्रार्थना इत्यादींचा क्रम नित्यनियमानुसार राहिला. किती तर टपाल पाहिला आणि बंगाली मूळाक्षरे लिहिली. मलासुद्धा शब्द लिहायला लावले. बापूजी बंगाली शब्द स्वतः शिकतात आणि मलाही शिकवतात. आणि मजेदार गोष्ट तर ही आहे ते स्वतः बाराखडी लिहितात आणि मला ती घोटायला लावतात. जर त्यांना एखादा शब्द वा अक्षर कळला नाही तर मला विचारतात, आणि मी त्यांना विचारते. आणि दोघांनाही काही कळले नाही तर जा निर्मळदांकडे. बापूजींच्या बाराखडीवरून लिहिल्याने माझ्या अक्षरात सुधारणा होत असल्यामुळे मला ते अक्षर घोटायला सांगितले. हे पाहून निर्मळदा तर खूप हसले आणि म्हणाले, 'हेच शिक्षक आणि हेच विद्यार्थी ! सर्व काही हेच !' याप्रमाणे आजकाल आमचे शिकायचे काम चालत असते.

साडेसात वाजता पाचगाव सोडले. सव्वाआठ वाजता आम्ही इथे पोहोचलो. येथील घरमालकाने रात्रभर जागून आमची फार चांगली व्यवस्था केली होती. 'जंगलात मंगल' म्हणतात ते हेच. रामजी जेव्हा चौदा वर्ष वनात होते तेव्हा वनात राहणाऱ्या भिल्लांनी, तर केव्हा जंगली माणसांनीच नाही तर तेथील पशुपक्षांनीसुद्धा किती प्रेमाने त्यांचे स्वागत केले होते हे आपण वाचलेले आहेच ना? त्याच प्रसंगाचे इथे मला हुबेहूब दर्शन होते आहे. इथे पण आमचा मुक्काम जंगलात राहणाऱ्या विणकराकडे, मोची, हरिजन सारख्यांकडे झाला आहे ना? परंतु ते इतक्या काही प्रेमाने सत्कार करत असतात की त्यांच्यासमोर मुंबई, दिल्लीसारख्या शहरातील लोकांनी केलेला सत्कारही फिका पडेल असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. तिथे तर शिकलेसवरलेले लोक राहतात. त्यांना बापूजींनी घडवलेलेही आहे. बापूजींचे बहुतेक साहित्य वाचलेल्या लोकांचाही त्यांत समावेश आहे. इथे तर केवळ भक्तीपूर्ण प्रेमच आहे. स्त्रियांना भोगावे लागत असलेल्या असह्य दुःखानंतरही बापूजी जेव्हा येतात तेव्हा त्यांचे स्वागत करण्याकरिता त्या मंगल शंख फुंकतात, शुभ चिन्हे काढतात, कुंकू लावतात, आरती उतरवतात, दीपमाळ लावतात, वातावरण मंगल नादाने भरून टाकतात. बापूजी प्रवास करत असताना शहरात (मुंबई, पुणे, दिल्ली) होणारे त्यांचे स्वागत मी पाहिले आहे. परंतु हे स्वागत काही आगळेवेगळे आहे. चोहोकडे निसर्गच निसर्ग आहे. आणि नोआखालीतील ही गावे तर खूपच रमणीय आहेत. आणि ग्रामप्रजेचे स्वागतही. याशिवाय अशा असह्य थंडीत हा संत एकटाच ही जी अनवाणी यात्रा करतो आहे, त्या यात्रेत सहभागी होण्याचे जे सद्भाग्य मला लाभले आहे त्याच्या आनंदाचे मी कसे वर्णन करू? रामायणात आलेले असल्याप्रमाणे रामजी जेव्हा वनात जात होते तेव्हा लक्ष्मणजी त्यांना सोबत घेण्याकरिता अजीजी करत होते आणि प्रभू त्यांना सोबत घेण्याकरिता खूपच नकार देत होते परंतु अखेरीस घेतले त्या वेळी लक्ष्मणजीला जसा आनंद झाला होता तसाच कदाचित मला झाला असावा. अशी कल्पना सतत माझ्या मनात येत असते. बापूंबरोबर राहण्याची अशी उत्तम संधी ईश्वराने मला दिली ही त्याची असीम कृपा आहे.

इथे आल्यानंतर बापूजींचे पाय धुतले. डॉ. सुशीलाबहेन आलेल्या आहेत. त्यांनी बापूजींची मालीश केली. त्या दरम्यान बापूजींकरिता मी खाकरे आणि भाजी केली. इतक्या वेळात बापूजी आंघोळ करून बाहेर आले आणि लगेच जेवायला बसले. बापूजी म्हणाले, "माझी व्यवस्था तर खूप चांगली आहे, पण असे असूनही मी अस्वस्थ आहे. काम वाढत चालले आहे आणि तोपर्यंत मी पोहोचू शकत नाही ही गोष्ट खटकते."

आज बापूजींनी काही प्रश्नांचे उत्तर दिले. ही प्रश्नोत्तर पुढीलप्रमाणे -

प्रश्न - मुसलमानांनी प्रार्थनेत यावे अशी बापूजींची खरोखरच इच्छा आहे काय?

बापूजी म्हणाले, "माझ्या प्रार्थनेत सर्वांनी सहभागी व्हावे असा माझा आग्रह नाही. परंतु मुसलमानभाई जर माझ्या प्रार्थनेत आले तर मी खुश होईन हे खरे आहे. मला असे वाटतेही आणि माझ्या प्रार्थनेत अनेक वर्षांपासून मुसलमान बंधुभगिनी सहभागी होत आलेही आहेत."

प्रश्न - तुम्हाला अवतारी पुरुष मानतात ना? तुम्ही तर हिंदू आहा. मग आमच्या कुराणमधील आयती तुम्ही कसे काय म्हणता? आणि राम-रहीम, कृष्ण-करीम हे शब्द कसे जोडता येऊ शकतात?

बापूजी - या प्रश्नातून उपस्थित करण्यात आलेल्या वादाबद्दल मला अतिशय दुःख होते. अशा प्रकारचा वाद उपस्थित करण्यातून आपली संकुचितता दिसते. माझ्या प्रार्थनेत कुराणमधील आयतींचा समावेश माझ्या मुलीसारख्या एका दृढ प्रवृत्तीच्या मुलीने - अब्बास तैयबजींची नातीने बीबी रैहानाबहेनने केला आहे. मला संबोधण्यात येते तसा मी अवतारी पुरुष नाही. मी तर माझ्या सामान्यतम बांधवांची सेवा करणारा प्रभूचा - खुदाचा सेवक आहे. माझी इच्छा मुसलमानांला अधिकाधिक चांगला मुसलमान करण्याची आहे, हिंदूंनी अधिकातअधिक चांगला हिंदू करण्याची आहे, ख्रिश्चनाला अधिकातअधिक चांगला ख्रिश्चन करण्याची आहे, पारसीला अधिकातअधिक चांगला पारसी करण्याची आहे. कोणालाही मी त्याचा धर्म

बदलवण्याकरिता सांगतच नाही. माझा धर्म तर जगातील सर्व धर्मशास्त्रांने शिकवलेला पाठ स्वीकारण्याइतका व्यापक आहे. प्रभूची, खुदाची तर अनेक नावे आहेत. त्याचे नाव केवळ रामच आहे असे आपण कसे म्हणू शकतो? अथवा रहीमच आहे? मी स्वतःला अवतारी पुरुष समजतच नाही. आणि त्याप्रकारचे मी काही करतही नाही. मी तुमच्यासारखाच एक माणूस आहे आणि प्रभू तर एकच आहे. कोणी त्याला खुदाच्या नावाने ओळखतो तर कोणी प्रभूच्या. प्रभू वेगवेगळा नाही. आपण त्याला वेगवेगळा करून टाकला आहे. तुम्हांला माझे कार्य कळावे म्हणून ही गोष्ट मी तुम्हांला परत सांगतो आहे.

युवकांना संबोधत बापूजी थोडक्यात म्हणाले,

आपल्या देशातील जे तरुण स्त्री पुरुष नोकरीधंद्याकरिता मुंबई, कलकत्तासारख्या शहरात जात असतात आणि देशावर जेव्हा संकट येते तेव्हा देशाला योग्य ती मदत करणे त्यांचे कर्तव्य असते. त्याचा अगदी सहजसुलभ मार्ग असा आहे की तुम्हांला एकदा नोकरी मिळाली की अथवा व्यवसाय व्यवस्थित सुरू झाला की एखाद्या महिन्याची सुटी घ्यावी आणि गावात व्यनस्थित काम करावे आणि मग सुटी संपली की दुसऱ्या तुकडीने येऊन ते काम आपल्या हाती घ्यावे. अशा प्रकारे गावखेड्यातील कामही चांगले होईल आणि ग्रामसेवा करणाराचे नुकसानही होणार नाही. जे लोक स्वतः काम काम करून मदत करू शकत नसतील ते आर्थिक मदत करू शकतात.

इंग्लंड, रशिया वगैरे प्रगत राष्ट्रातील तरूण आपल्या देशाकरिता किती करत असतात? त्यांच्याबद्दल खरोखरच आदर वाटतो. प्रत्येक कुटुंबातून अशी एकेक व्यक्ती जर निघाली तर किती मोठे काम होईल? जगात समूहांमध्ये अंतर्गत ऐक्य अशाच प्रकारे साध्य करता येत असते. आपणसुद्धा अशा प्रकारच्या देशप्रेमात कमी पडत नाही. परंतु आज मात्र भाऊ भावाला मारतो आहे. यामुळे आपली फार घसरण झाली आहे. आपण आपल्या संकुचित मनाचा आणि स्वार्थी हिशेबीपणाचाही विचार केला पाहिजे अशी माझी प्रार्थना आहे.

सायंकाळी आश्रितांची एक छावणी पाहायला गेलो. तिथे शाळा चालत असते. एका मुलाला पुस्तक आणि पाटी बक्षीस म्हणून दिले. आमच्याजवळ जी संत्री होती ती इतर मुलांना वाटली. नंतर आम्ही फिरायला गेलो. फिरून आल्यानंतर बापूजींनी दूध आणि खजूर घेतला. आज फिरल्यामुळे बापूजींच्या पायाला भेगा पडल्या आहेत. कालपासून सुरू असलेली असह्य थंडी याचे कारण आहे असे वाटते. तसेच शेतातील चिखलामुळे पाय घसरून चीर वगैरे पडलेले असू शकतात. राम ठेवेल तसे राहायला पाहिजे असे बापूजी म्हणाले. रात्री पाय धुऊन जखमेत मलम भरला. उजव्या पायाचा अंगठा चिरला गेल्यामुळे ती जखम पाहताच माझा थरकाप उडाला. डोळे बंद करून मलम भरला आणि पट्टी बांधली. परंतु सकाळी परत चालणार असल्यामुळे पायाची परत हीच अवस्था होणार आहे. आता तरी बापूजी पायात काही घालतील तर बरे होईल. पण हे सांगायची हिंमत होत नाही.

रात्री नऊ वाजता बापूजींनी कताई केली. २५० तार झाले. आणि हाततोंड धुवायला पाणी मागितले. दररोज तोंड धुवायला थंड पाणीच मागत असतात, परंतु मला वाटले की आज इतकी असह्य थंडी आहे तर चला गरम पाण्याचाच उपयोग करू. परंतु माझा हा शहाणपणा माझ्याच अंगावर उलटला. गरम पाणी पाहून बापूजी म्हणाले, “तुला माझी कीव वाटत असेल तर एक काम कर. माझ्यासाठी एक सुंदर गालीचा अंथर. मोटर मागव, आणि हवा गरम राहील असा एक वातुनुकुलित महाल माझ्याकरिता बांध. आणि त्यात या महात्म्याला ठेव. मग किती चांगले होईल!”

बापूजी अतिशय उपरोधिक बोलत आहेत हे माझ्या लगेच लक्षात आले. “तोंड धुवायलाही गरम पाणी लागत असेल तर विचार कर की हा किती साहेबपणा होईल? आज या भाकरी शेकायला लाकडे मिळत नसताना माझ्या तोंड धुण्याकरिता गरम पाणी करून देतेस? ही गोष्ट तुझ्याकरिता आणि माझ्याकरिताही आश्चर्याची नसायला पाहिजे काय? आंघोळीकरिता तर समजू शकतो, परंतु हात धुवायला तू जर गरम पाणी करणार असशील तर ते मी समजू शकणार

नाही. यावरून तू सावध होऊन विचार कर की आज तू काय आहेस?" बस मला तुला इतकेच सांगायचे आहे.

हात धुण्याकरिता गरम पाणी वापरल्यामुळे गरिबांवर त्याचा किती परिणाम होतो याचा बापूजींशिवाय अजून कोण विचार करू शकेल? "ज्यांना भाकरी शेकण्याकरिता दोनचार लाकडाच्या काड्या मिळत नाही त्यांना हात तोंड धुण्याकरिता गरम पाणी कसे मिळेल?" हे दोनचार शब्द बोलता बोलता बापूजींचा जीव कळवळून आला होता हे मला स्पष्टपणे दिसत होते. इतक्या सीमेपर्यंतचा कोमलपणा आपण कसा मिळवू शकू?

बापूजी पडल्यापडल्या अतिशय व्यथित अंतःकरणाने मला हे सर्व सांगत होते. मलासुद्धा ही गोष्ट खूप खुपली होती. आणि यातून मला जो उत्तम पाठ मिळाला होता त्यावर मी मनन करत होते.बापूजींनी यावर विचार करायला सुचवले होते.

आमकी,

३० - १ - '४७

रोजप्रमाणे प्रार्थना. बापूजींनी बंगाली पाठ केला आणि माझी रोजनिशी पाहिली.

मुंबईच्या दोन भगिनी बापूजींना हातोहात १२५० रुपये द्यायला आल्या. बापूजींनी ते रुपये मला सांभाळायला दिले आणि ते सतीशबाबूंना देऊन त्यांची पोच घ्यायला सांगितले.

सात वाजता बापूजींनी रस घेतला आणि दहा मिनिट आराम केला. साडेसात वाजता आम्ही पाचगाव सोडले. पाऊणेनऊ वाजता आम्ही इथे पोहोचलो. पोहोचल्यानंतर लगेच बापूजींनी पंडितजींना पत्र लिहिले. संपूर्ण पत्र इंग्रजीत लिहिले. पण सुरुवात मात्र 'चि.जवाहरलाल' अशी केली होती. चांगली वाटत होती. मालतीदीदी (मालती देवी चौधरी) आल्या आहेत. मालीश, आंघोळ वगैरे आटोपून दहा वाजता जेवण. जेवणात भाजी, दोन खाकरे, दूध आणि एक ग्रेपफ्रूट घेतले. आज सायंकाळी दूध घेतले नाही. जे होते ते खरे. दुपारी होरॅश

अलेक्झॅन्डर आले. कातता काततात्च त्यांच्याबरोबर एक तास गोष्टी केल्या. नंतर जमालसाहेब आले. त्यांनी २५० रुपयात एक झोपडी बांधली आहे. ती पाहायला आम्हांला घेऊन गेले.

पण बापूजी म्हणाले की आमच्या काठेवाडी भाषेत सांगायचे तर हा एक पेटाराच आहे. आम्ही अर्ध्यात पोहोचलो तेव्हा लक्षात आले की बापूजींचा जो लहानसा रुमाल होता तो मी घ्यायला विसरूनच गेले होते. तो आणायला मी धावतच आमच्या मुक्कामाच्या ठिकाणी गेले आणि तो घेऊन आले.

आजचे आमचे मुक्कामाचे ठिकाण एका कायस्थाचे घर आहे. या गावात ५४२ हिंदू, १९५४ मुसलमान, २६ कोष्टी (विणकर) आणि ७५ इतर जातींचे लोक राहत होते. भंग्यांची पाच घरे आहेत. ज्या बंधूंनी आम्हांला इथे उतरवले त्यांचे नाव यशोदाकुमार आहे. आज सायंकाळी कुठेही दूध मिळाले नाही. अखेरीस निरुपायाने बापूजींना सांगितले. बापूजी म्हणाले, “असे कसे? नारळाचे दूध बकरीच्या दुधाची बरोबर गरज भागवते. आणि बकरीच्या तुपाऐवजी खोपऱ्याचे ताजे तेल खाता येऊ शकते.”

मी नाराळाचे आठ औंस दूध बकरीच्या दुधासारखे तयार तेले. परंतु हे दूध पचायला जड होते. यामुळे बापूजींना हगवण सुरू झाली. सायंकाळपर्यंत तर खूपच अशक्तपणा आला. बापूजींना खूप घाम आला. डोके धरून ठेवले, निर्मळदांना हाक मारली. सुशीलाबहेनला बोलावून आणावे असे मला वाटले. कदाचित काही नसले तर तो मूर्खपणातच गणला जाईल. (सुशीलाबहेन बापूजींच्या प्रार्थनेआधीच गेल्या होत्या. थोडासाच फरक पडला होता.)

मी चिठ्ठी लिहिली तोच बापूजींना शुद्धीवर आले. म्हणाले, “मनूडी तू निर्मळबाबूंना बोलवायला जोरात हाक मारली हे मला मुळीच आवडले नाही. परंतु तुझे वय पाहून तुला माफ करू शकतो. असे असले तरी यापुढे अशा वेळी तू इतर काहीही न करता केवळ रामनाम म्हणशील अशी मी आशा करतो. मी तर मनातून रामनामच घेत होतो. परंतु तू निर्मळबाबूंना

बोलावण्याऐवजी रामनाम म्हटले असतेस तर मला ते अतिशय आवडले असते. आता तू याबद्दल सुशीलाला सांगूही नकोस आणि बोलावूही नकोस. माझ्याबरोबर तर डॉ. रामच आहे. जोपर्यंत त्याला माझ्याकडून काम घेण्याची गरज असेल तोपर्यंत तो जगवील, नाही तर घेऊन जाईल."

देवाने माझी लाज कशी काय ठेवली? अशा वेळी तर खरोखरच वाटते की श्रद्धाळू माणसाच्या पाठीशी देव असतोच. माझी ही किती कठीण सत्वपरिक्षा होती? "सुशीलाला बोलावू नकोस" असे शब्द बापूजींच्या तोंडून निघाले. आणि निर्मळदांपासून मी माझी चिठ्ठी गुपचूप परत घेऊन टाकली.

हे सर्व बापूजींसमोरच सुरू होते, बापूजींनी पडल्या पडल्या हे पाहिले आणि त्यांना सर्व काही कळले. मला म्हणाले, "तू ही चिठ्ठी लिहून टाकली होतीस काय?" मी हो म्हणाले.

"आज तर तुलाही आणि मलाही ईश्वरानेच वाचवले आहे. सुशीलाला जर ही मिळाली असती तर ती माझ्याकडे धावत आली असती. मला तर ते मुळीच आवडले नसते. तुझ्यावर आणि माझ्यावर मी चिडलो असतो. आज तुझी आणि माझी परीक्षा झाली. रामनामाच्या या मंत्राने हृदय जर परिपूर्ण भरलेले असेल तर मी कधीही आजारी पडून मरणार नाही. हा नियम प्रत्येकाकरिता आहे, माझ्या एकट्याकरिता नाही. माणूस जी चूक करतो त्याचे फळ भोगल्यानंतरच त्याची सुटका होऊ शकते. अखेरच्या श्वासापर्यंत माणसाला रामनामाचे स्मरण होत राहिले पाहिजे, पोपटाप्रमाणे नाही. हृदयापासून. सीताजींनी हनुमानजींना मोत्याची माळ दिली, पण हनुमानजींनी ती तोडून टाकली. त्यात 'राम' हा शब्द आहे की नाही हे त्यांना पाहायचे होते. त्यांच्या मनात मोत्याला काहीही किंमत नव्हती. इतके ते रामनामात तन्मय झालेले होते. हा प्रसंग खरा आहे की नाही या वादात आपण पडायचे कारण काय? हनुमानासारखे पहाडी शरीर कदाचित आपण घडवू शकणार नाही. परंतु आत्मा तर पहाडी करू शकतो ना? ठरवले तर आपण काय करू शकतो हे कळावे म्हणून हे उदाहरण मी तुम्हांला दिले आहे. हे सिद्ध करता येवो वा न येवो, परंतु हे सिद्ध करण्याचा प्रयत्न जरी आपण केला तरी तितके पुरेसे आहे.

गीतामाता सांगते की माणसाने कर्तव्य करावे, फळ ईश्वरावर सोडावे. अशाच प्रकारे तू, मी वा इतर कोणी प्रयत्न करूनच यातून सुटका करून घेऊ शकतो. आता तुला कळेल की तुझ्या वा माझ्या आजारात आपली मानसिकता कशी असली पाहिजे.

"आज . . . बरोबर ब्रह्मचर्याविषयी बोलत असताना मी जे म्हणालो होतो चे तुला समजण्यासारखे आहे. जो पुरुष स्त्रियांना स्पर्श करण्यात पाप आहे, स्त्रिला स्पर्श केल्यानेच मनात विकार निर्माण होतात असे समजतो आणि म्हणून जो स्त्रियांना स्पर्श करत नाही तो माणूस ब्रह्मचारी असूनही मी त्याला ब्रह्मचारी समजत नाही. दुसरा एखादा माणूस म्हातारा झाला म्हणून तो निर्विकारी आहे असेसुद्धा मी समजत नाही. म्हातारपणामुळे त्याचा शक्तीलोप झालेला असल्यामुळे तो निर्विकारी झाला आहे, ब्रह्मचर्याच्या पालनामुळे नाही. आणि मन तर कधीही म्हातारे होत नसते, अगदी अखेरच्या श्वासापर्यंत. माझ्या अनेक मित्रांशी यासंबंधात माझा मतभेद आहेत हे खरे आहे. परंतु अनेक अनुभवांनंतर आणि प्रयोगांनंतर माझा दावा आहे की या सर्वांमध्ये खरा ब्रह्मचारी मीच आहे. जो निर्विकार असेल त्याला रोग कसा होऊ शकेल? रोग त्याच्या मनात धास्ती निर्माण करूच शकत नाहीत. यासंबंधात ज्या कोणी माझ्याशी वाद घातला ते आजारी आहेत. ज्याच्या मनात कोणत्याही स्त्रीबद्दल आई, बहीण वा मुलगी अशी भावना असेल, तो जर स्त्रीला स्पर्श करत असेल तर त्यामुळे त्याच्या मनात विकार कसे निर्माण होऊ शकतील? मग समोर अप्सरेसारखी सुंदर स्त्री का असेना ! असे असल्यामुळे मी तर म्हणून की माझ्या मृत्यूनंतरच मी खरा आहे की खोटा हे सिद्ध होईल. माणसाचे मन फार चंचल असते. क्षणात त्याच्या वृत्तीत बदल होऊ शकतो. यामुळे माणसाच्या मृत्यूच्या आधी त्याच्याबद्दल काहीही सांगता येऊ शकत नाही. मी जर रोगाने वा आजाराने मेलो तर या धरेवर मी एक दांभिक आणि रावणासारख्या राक्षसी प्रवृत्तीचा माणूस होतो असे समजशील इतकेच मी इथे म्हणतो आहे. परंतु जर मी रामनामाचा जप करत गेलो तर मी खरा ब्रह्मचारी, खरा महात्मा आहे असे समज.

बापूजी रामानावरील असीम श्रद्धेसंबंधी धाराप्रवाहाप्रमाणे बोलत चालले होते. त्याच्या हृदयाच्या अंतर्हृदयातून एकेक शब्द निघत होता. या वेळी दैवाने मला कसे काय वाचवले याचाच या वेळी मी विचार करत होते. बापूजींची सेवा करण्याने - त्यांचे पाय दाबण्याने, वा त्यांचे जेवण तयार करण्याने खऱ्या बापूजींची ओळख होऊ शकत नाही. परंतु अशा प्रसंगातूनच बापूजींच्या विराट स्वरूपाचे दर्शन होऊ शकते. आणि मगच कळते की हे खरे बापू आहेत. आणि गीतेत पुरुषोत्तम म्हणतात त्याप्रमाणे साक्षात पुरुषोत्तमाजवळच मला राहण्याची संधी मिळाली आहे ही माझ्यावर ईश्वराची किती मोठी कृपा आहे?

एका आजारी भगिनीला रामनामासंबंधी रात्री बापूजी लिहितात, “जगात रामबाण औषध तर एकच आहे आणि ते आहे रामनाम. या नामाचा जप करणाराने ज्या नियमांचे पालन केले पाहिजे त्या नियमाचे जर पालन केले नाही तर या औषधाचा आपणा सर्वांवर काय परिणाम होऊ शकतो ते आपल्याला कसे कळू शकेल?”

रात्री बापूजी ताजेजवाने होऊन गेले होते आणि होरॅस अलेक्झॅन्डरबरोबरच बराच वेळ बोलत होते.

ते गेल्यानंतर आम्ही वार्ताहरांबरोबर फिरलो. त्यांना २५० रुपयात तयार करण्यात आलेल्या झोपडीची गोष्ट सांगितली - “ही झोपडी नाही, पेटारा आहे. तिच्यात ना येते हवा, ना येते उन्ह. नारळाच्या पानांनी अशी झोपडी जर तयार केली तर मध्ये काहीही लावावे लागणार नाही आणि २५ रुपयात ही झोपडी तयार होईल. मला ठेका द्यायची तयारी आहे? जर द्याल तर यामधून मी कमिशनसुद्धा मिळवीन.” सर्व खळखळून हसले.

रात्री दहाएक वाजता बापूजी अंथरुणावर पडले. दररोजप्रमाणे मी त्यांच्या डोक्याला तेल चोळले, पाय दाबले आणि आता ही रोजनिशी पूर्ण करते आहे. थोडीशी दुपारी लिहिली होती. साडेदहा वाजले आहेत.

रात्री पडल्या पडल्या मी विचार करत होते की पू. बापूजींनी आश्रमात ब्रह्मचर्याचा नियम सांगितला आहे. तो किती उच्च विचार करून सांगितला आहे? त्याच्या आध्यात्मिक भावनेचा साक्षात्कार इथे होतो आहे.

माझ्यासारख्या लहानशा पोरीची आई होऊन बापूजी मला वेगवेगळ्या प्रकारे घडवत आहेत. त्यातील ब्रह्मचर्य व्रताचा सूक्ष्म अर्थ आज मला समजावून सांगितला.

नवग्राम,

३१ - १ - '४७

रोजप्रमाणे प्रार्थना. प्रार्थनेनंतर नेहमीप्रमाणे बापूजींनी माझ्या दैनंदिनीवर सही केली. बिहारमध्ये जो उपद्रव आणि गोंधळ सुरू आहे तो समजून घेण्याकरिता बापूजींनी एका बंधूला (मंत्रिमंडळातील) बोलावले होते. ते जदुभाई सहाय आले होते. हुनरभाई हिंदी-उर्दू पत्रव्यवहार सांभाळत असतात. बापूजींनी बिहारमध्ये चौकशी आयोग नेमण्याची सूचना केली. परंतु . . . ला ही कल्पना आवडली असे दिसत नाही. माती घेत असताना होरॅस अलेक्झॅन्डर आले. बापूजींनी त्यांच्याबरोबर भरपूर आध्यात्मिक तसेच सध्याच्या परिस्थितीतीबद्दलही चर्चा केली.

दुपारी भगिनींची सभा होती. त्यात एका भगिनीने प्रश्न विचारला की माझ्या पतीने संन्यास घेतला आहे, आता मी काय केले पाहिजे? बापूजी म्हणाले की ज्या स्त्रीच्या पतीने संन्यास घेतला असेल त्या स्त्रीने अतिशय शुद्ध जीवन व्यतीत केले पाहिजे. तिने स्वतःची भाकरी मिळवली पाहिजे. संग्रह करू नये. भगवे कपडे घातले तरच माणूस संन्यासी होतो असे नाही. काहीही सुचत नसेल तर चरखा घेऊन कताई करावी. चरख्याला मी कामधेनू म्हणतो म्हणून नाही. कातता कातता रामनामाचा जप करावा. हा असा संन्यास कदाचित तुझ्या पतीने घेतलेल्या संन्यासापेक्षा श्रेष्ठ असेल. ग्रामसफाई, मुलांची सफाई अशा वेगवेगळ्या कामात तू स्वतःला गुंतवून ठेव. रिकामा माणूस बसल्लाबसल्या नखे कुरतडतो हा वाक्प्रचार कदाचित बंगालीतही

असेल. आपण बेकार बसू तर हजार उलटसुलट विचार येतात, यामुळे एक मिनिटही बेकार बसू नये. हा या भगिनिकरिता सर्वात चांगला आणि सरळ मार्ग आहे.

सायंकाळी बापूजींनी काहीही खाल्ले नाही. मधपाणी आणि एक औंस गूळ घेतला.

आमिशापाडा,

१ - २ -'४७

रोजप्रमाणे प्रार्थना, टपाल लिहवून घेतला. बंगाली पाठ केला. डायरी हा शब्द लिहिण्याऐवजी रोजनिशी वा नित्यनोंद हा शब्द लिहिण्याकरिता सांगितले. कालची रोजनिशी क्रमवार नव्हती असेही बापूजींनी सांगितले. घडलेल्या घटना ज्या क्रमाने घडल्या त्या क्रमाने लिहिल्या तर पाहणाराला त्यांचा शोध घ्यावा लागत नाही. यामुळे याची काळजी घे असे बापूजी म्हणाले.

दुसरी गोष्ट अशी सांगितली की ही रोजनिशी वाटेल त्याच्या हाती पडू नये याचीही काळजी घेतली पाहिजे. आपल्या जवळ खाजगी म्हणावे असे जरी काहीही नसले तरी हिचा दुरुपयोग होऊ नये म्हणून भलत्यासलत्या माणसाच्या हाती ही पडणार नाही अशी काळजी घेतली पाहिजे. ही दैनंदिनी भविष्यात तुझ्याकरिता फार उपयोगी ठरणार आहे. जयसुखलालला ही आवडेल. सुशीलाने जशी आगाखान महालातील नोंद ठेवली तशीच माझ्या दृष्टीने एक ऐतिहासिक आणि मूल्यवान नोंद हिच्यात आहे हे तुला माहीत आहे. म्हणूनच मी यावर भर देतो आहे आणि तुझे लक्ष याकडे वेधतो आहे. यामुळे तू ही जपून ठेव. अथवा जयसुखलालकडे या रोजनिश्या पाठवून दे. प्यारेलालला दाखवशील तर तो यात सर्व प्रकारे सुधारणा करू शकेल. खूप खोलवर उतरायला माझ्याजवळ वेळ कुठे आहे? माझी खात्री आहे की प्यारेलाल विद्वान माणूस आहे. तो मला सर्व प्रकारे समजून घेऊन शकतो. तू जर त्याला ह्या रोजनिशा वाचायला देशील तर तू

काहीही गमावणार नाही, उलट तू काही मिळवशीलच, आणि यामुळे तुला माझ्या कामाची कल्पना येईल.

परंतु यात मी अशा बऱ्याच बऱ्यावाईट गोष्टी लिहिल्या होत्या की ज्यामुळे त्यांनी माझी चेष्टा केली गेली असती तर? यामुळे मी नाही म्हणाले.

बापूजी म्हणाले. "कोणासमोर कशाला पाहायला पाहिजे? त्यांनी जरी तुझी मस्करी केली तरी तू त्यातून काही पाठ शीकशील. कोणी असे म्हणतो की तसे अशी कल्पना आपण का करावी? ईश्वराला जसे करायचे असेल तसे तो करील. आपण केवळ आपले कर्तव्य बजावले पाहिजे. ते चांगले की वाईट असा विचार करत बसून राहिलो आणि आपण पुरुषार्थ केलाच नाही तर आपण पुढे जाणारच नाही. पण जेव्हा तू इतके धैर्य मिळवशील तेव्हा आपण पाहू. आपल्यात सुधारणा होईल अशा गोष्टी जर आपल्याला कोणी सांगितल्या तर आपण त्यांचे स्वागत केले पाहिजे. माणूस कितीही जरी मोठा असला तरी एखाद्या वेळी एखादे लहान मूलसुद्धा त्याला त्याच्या जीवनात परिवर्तन घडवून आणील असा पाठ त्याला शिकवू शकते हे मी अनुभवले आहे. यामुळे ज्याच्याकडून जे शिकायला मिळते ते शिकून घेण्याची वृत्ती आपण अंगी बाणवली पाहिजे."

साडेसात वाजता आम्ही नवग्राम सोडले. सव्वा आठ वाजता आम्ही इथे पोहोचलो.

जेवत असताना प्यारेलालजी त्यांच्या गावातून आले. बापूजींकरिता त्यांनी स्वतः खाकरे तयार करून आणले होते. यामुळे त्यांनी केलेले दोन खाकरे, भाजी, दूध आणि खोपऱ्याच्या संदेशाचा एक लहानसा काप बापूजींनी घेतला. दुपारी नारळाचे पाणी आणि सायंकाळी दूध आणि खजुराच्या आठ फोडी घेतल्या.

ज्यांच्याकडे आम्ही उतरलो त्यांचे नाव कृष्णमोहन चॅटर्जी आहे.

आजच्या प्रार्थनेत बापूजींनी इस्लाम धर्माची सुंदर व्याख्या केली आहे. दररोजपेक्षा आजच्या प्रार्थनेत हिंदू-मुसलमानांची उपस्थिती जास्त आहे. आणि खूप गोंगाट होता. शांतता स्थापित झाल्यानंतर बापूजींनी प्रवचन सुरू केले.

एक मौलवीसाहेब म्हणाले - गांधीजींना इस्लामसंबंधी बोलायचा मुळीच हक्क नाही. आणि त्यांनी 'रामासारख्या (माणसाशी) राजाशी खुदाचे नाव जोडण्याला' विरोध केला. यावर बापूजी म्हणाले, "मला वाटते की धर्मासंबंधीची ही फार संकुचित दृष्टी आहे. इस्लाम म्हणा की हिंदूधर्म म्हणा की पारसीधर्म म्हणा कोणताही धर्म तिजोरीत बंद करून ठेवण्यासारखा नसतो. मनुष्यमात्राला त्यांचा अभ्यास करून त्यांतील जे आदर्श आणि सिद्धांत जीवनात उपयोगी असतील त्यांचा स्वीकार करण्याचा वा नसतील त्यांचा अस्वीकार करण्याचा पूर्ण अधिकार आहे. मी इस्लाम धर्माचा अभ्यास केलेला असल्यामुळे मी असे म्हणतो आहे."

यानंतर डॉ. सुशीलाबहेन ज्या गावात काम करतात (चांगीरगाव) त्या गावातून सुंदर बातमी आली. त्यांनी दिलेल्या औषधामुळे, केलेल्या सेवेमुळे अनेक बंधुभगिनी दुरुस्त झाले आहेत. यामुळे त्यांचे प्रेम त्यांनी संपादित केले आहे. त्यांना सेवाग्रामला जायचे आहे, परंतु हे लोक त्यांना जाऊ देण्याकरिता तयार नाहीत. यामुळे दंगलीच्या वेळी ज्यांनी लूट सुरू केली होती त्यांनी सुशीलाबहेनच्या केवळ सेवेमुळे, सोबतीमुळे लुटलेला माल परत केला. हे किती मोठे हृदयपरिवर्तन आहे?

बापूजी म्हणाले, "सरकारला मी तर सल्ला देईन की लूट करणारांवर न्यायालयात खटला भरण्याऐवजी जर त्यांची अंतःकरणापासून समजूत घालण्याच्या दिशेने लष्करातील माणसे कामाला लागतील तर टिकाऊ शांतता निर्माण होऊ शकेल."

संपत्तीच्या विश्वस्ततेसंबंधी बापूजींना एक प्रश्न विचारण्यात आला होता. त्या प्रश्नाचे उत्तर देताना बापूजी म्हणाले, "जी काही संपत्ती आहे ती सर्व खुदाची, ईश्वराची आहे.

सर्वशक्तिमानाकडूनच ती माणसाला मिळालेली आहे. जे काही आहे ते व्यक्तीने स्वतःच्या शक्तीने मिळवलेले नाही. जगाच्या सेवेकरिता ती संपत्ती त्याला सोपवण्यात आलेली आहे. माणसाजवळ त्याला लागणाऱ्या संपत्तीपेक्षा जी काही संपत्ती जास्त असेल ती त्याला प्रभूची जी प्रजा दुःखी आहे तिच्या सेवेकरिता सोपवण्यात आलेली आहे. ते तिचे विश्वस्त आहेत. ज्या ईश्वरावर आपली श्रद्धा असते तो तर सर्वशक्तिमान आहे. तो कोणत्याही गोष्टीचा संग्रह करतच नाही. माणसांनी त्यातून आवश्यकतेपुरते घ्यावे, संग्रह करू नये. आपण जर या सत्याचा अवलंब केला तर माझ्या दृष्टीने कायद्याच्या दृष्टीतून हीच विश्वस्तता आहे असे समजता येईल. मग कोणाला लुटण्याकरिता वा कोणाचे शोषण करण्याकरिता वेळच मिळणार नाही."

गीताजीत सांगितलेले असल्याप्रमाणे बापूजींचे दरवेळी वेगवेगळ्या स्वरूपात दर्शन होत असते. कोणत्याही गोष्टीसंबंधात यांच्याकडे गेलो की यांच्याजवळून कधीही न संपणाऱ्या खजिन्याप्रमाणे नवनवीन गोष्टी शिकायला मिळत असतात. कुबेराच्या खजिन्यासारखा त्यांच्याजवळ संपत्तीचा भांडार आहे. या खजिन्यातून जितके घेऊ तितके कमीच असेल. घेणारात शक्ती असली पाहिजे.

दशघरिया,<br>२ - २ -'४७

रोजप्रमाणे प्रार्थना झाली. मग बंगाली पाठ. गरम पाणी घेतले. आज प्यारेलालजीसोबत गोष्टी करत होते. यामुळे बापूजी माझी रोजनिशी वाचू शकले नाही.

मग मोरबीच्या राजेसाहेबांनी दहा हजार रुपयांचा जो धनादेश दिला होता त्यावर सही केली, आणि त्यांनासुद्धा एक पोस्टकार्ड लिहिले. मग फळांचा रस घेऊन बापूजी झोपले. पाय दाबत असल्यामुळे तयार व्हायला वेळ लागला.

इथे येण्याकरिता ७.३५ला रवाना झालो. रस्त्यात दोन खंडारे दिसले. सुंदर इमारती उजाड केल्या आहेत. माणसांचे खूनसुद्धा झाले आहेत. . . . सोबत गोष्टी करत असताना बापूजी म्हणाले, “जरुरी काम असल्याशिवाय वा मी बोलावल्याशिवाय कोणीही येत नाही याचे श्रेय माझ्या कार्यकर्त्यांना आणि या यज्ञाला आहे. सर्व आपापल्या बुद्धीप्रमाणे कार्य करत आहेत.”

मालीश, आंघोळ वगैरे नेहमीप्रमाणे चालले. दुपारच्या जेवणात दोन खाकरे, आठ औंस दूध, थोडासा खोपऱ्याचा मावा आणि एक ग्रेपफ्रूट घेतले. या गावात २५१ हिंदूची आणि ८०० मुसलमानांची वस्ती आहे.

सायंकाळी अब्दुल्लासाहेबांबरोबर (एस. पी.) गोष्टी केल्या आणि मग मौन घेतले.

जेवणात सायंकाळी दूध, एक केळ आणि थोडेसे मुरमुरे घेतले. रात्री एक औंस गूळ घेतला. रात्री तर मौन सुरू झाले होते. यामुळे विशेष काही झाले नाही.

शादुरखिल,

३ - २ -’४७

रोजप्रमाणे प्रार्थना. आज प्रार्थनेनंतर लगेच जवाहरलालजींना पत्र लिहिले. पाणी पीत असताना मी माझी नोंदवही ऐकवली. परंतु मी नोंदवही इतर पुस्तकाखाली ठेवून गेल्यामुळे दशघरियामध्ये सही होऊ शकली नाही. बापूजींनी ती शोधायचा प्रयत्नही केला होता, परंतु ती सापडली नव्हती.

सात वाजून पस्तीस मिनिटांनी आम्ही दशघरियाहून रवाना झालो. रस्त्यात क्षेमनाथ चौधरी हबीबउल्लाह यांच्या वाडीत थोडा थोडा वेळ थांबलो होतो.

इथे आम्हांला यशोदापाल कायस्थ यांच्याकडे उतरवण्यात आले.

इथे आल्यानंतर रोजप्रमाणे क्रम चालला. आंघोळ वगैरे आटोपल्यानंतर जेवणात पाच बदाम, काजू पाच, दूध आणि आम्हांला ज्यांच्याकडे उतरवण्यात आले होते त्यांनी तयार केलेला

खोपऱ्याचा संदेश घेतला होता. या लोकांकडून बापूजींनी थोडेसे काही जरी घेतले तरी ते स्वतःला कृतकृत्य समजत असतात. इथे २७१ हिंदूंची आणि १.२१२ मुसलमानांची वस्ती आहे. आज मौन असल्यामुळे विशेष काही नाही. बापूजींचे ज्या दिवशी मौन असते त्या दिवशी फार सुने सुने वाटत असते. इथे सायंकाळी एक प्राथमिक शाळा चालत असते. ती पाहायला गेलो. तिथून येऊन खजुराच्या दहा फोडी आणि आठ औंस दूध घेतले. दुसरे काहीही घेतले नाही. ठरलेल्या वेळी प्रार्थना झाली. प्रार्थनेत उपस्थिती चांगली होती.

शादुरखिल,

४ - २ -’४७

मौनाच्या दिवशी गावकऱ्यांना गोष्टी करण्याचा लाभ मिळत नसल्यामुळे मौनाचा दिवस असेल तर एकाच गावात दोन दिवस राहाण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. यामुळे सकाळकरिता माझ्याकरिता फार कमी काम राहिले.

दररोज सकाळी या वेळी आम्ही पदयात्रेकरिता निघत असतो. त्याच वेळी आज सात वाजून पस्तीस मिनिटांनी आम्ही फिरायला निघालो. एका मुसलमान वकिलाकडे गेलो. तेथील भगिनींना भेटायला मी आत गेले. त्यांनी बापूजींना भेटण्याची इच्छा व्यक्त केल्यामुळे त्यांची भेट घडवून दिली. साडेआठ वाजता परतलो. रोजप्रमाणे बापूजींचे पाय धुतले, मालीश, आंघोळ वगैरे आटोपली. मला आजपासून गीतेचे श्लोक लिहायला सांगितले. बापूजींचे पाय धूत असताना बापूजींनी किती तरी पत्रांवर सही केली. . . . शी बोलत असताना नयी तालीमवर गोष्टी सुरू झाल्या. बापूजी म्हणाले की नयी तालीम शिकणाराने आपले शरीर काटक केले पाहिजे. पोहे, मुरमुरे खोपऱ्याचे तेल काढणे, तेलबियातील ढेप आणि स्वयंपाकाच्या इतर कला त्याने शिकून घ्यायला पाहिजे. स्वभावावर त्याचे नियंत्रण असले पाहिजे आणि सत्याचरण करतानाही त्याने

कोणाशीही प्रेमाने भेटायला पाहिजे. त्याने हिंदी आणि देवनागरी लिपी शिकायला पाहिजे. गुजराती शिकायला पाहिजे. बंगालीसुद्धा.

आज दिवसभर मुसलमान भाई आणि त्यातही अधिकारी लोक भेटायला येत होते.

आजची प्रार्थनासभा एका मुसलमानभाईच्या वाडीत झाली. निर्मळदा अनुवाद करत असल्यामुळे बापूजींनी मला लिहून सांगतले - "तू आत जाऊन भगिनींना भेटून ये. यामुळे नंतर वेळ वाया जाणार नाही." मी भगिनींकडे गेले. मी त्यांना औझबिल्ला ऐकवले. एक मुलगी म्हणाली, "आम्ही तर हिंदूंबरोबर गोष्टी करणे पाप समजतो". मी म्हणाले, "मी तर तुम्ही आग्रह केल्यामुळेच कुराणमधील ही आयत म्हणून दाखवली. पण तुम्ही कुराण कशाप्रकारे वाचता हे मला समजून घ्यायचे आहे. यामुळे तुम्ही मला हे सांगा. मला तुमच्याकडून विद्यार्थ्याप्रमाणे शिकायचे आहे. मी असे म्हणाल्यामुळे एका घरातील आजीबाईंवर याचा चांगला परिणाम झाला. आधीच्या मुलीला धमकावत त्यांनी मला एक लहानशी आयत म्हणून दाखवली.

येथील वातावरण निश्चितच विषाने भरलेले आहे. लोक धर्माच्या निमित्ताने सैतानाचे काम करत होते.

प्रार्थनेनंतर बापूजींना मी हे सांगितले. बापूजी म्हणाले, "यामुळेच मी म्हणत असतो की जास्तीच्या ज्ञानाने तर माणूस अज्ञानी आणि जडच होत असतो. यामुळेच कोणी जर जास्तीचा शहाणपणा दाखवू लागला तर आपण त्याला 'दीडशहाणा' म्हणत असतो. यामुळेच जास्तीच्या ज्ञानाला आपण विनाशक समजत असतो."

आमची प्रार्थनासभा शादुरखिलमधील मुख्य पुढारी सलीमुल्लासाहेबांच्या घरी झाली होती. आणि प्रार्थनेच्या दरम्यान टाळ्या वाजवून रामधून चांगल्या प्रकारे म्हणण्यात आली होती. बापूजींना बंगाली भाषेत मानपत्र देण्यात आले होते.

बापूजी म्हणाले, “मला तर तुमची अंतःकरणे ताब्यात घेऊन ती एक करायची आहेत. जर अंतःकरणाचे ऐक्य स्थापित होणार नसेल तर कोणतीही गोष्ट सरळ होऊ शकणार नाही, आणि जोपर्यंत असे ऐक्य स्थापित होणार नाही तोपर्यंत आपल्या नशिबी गुलामीच राहणार आहे. आपण सर्व वाटेल त्या नावाने ओळखले जात असलो तरी आपण केवळ सर्वसमर्थ ईश्वराचीच गुलामगिरी मान्य केली पाहिजे. मी खुदाला केवळ रामनामानेच जोडतो हा समज अज्ञानावर आधारित आहे. माझा राम हाच माझ्याकरिता ईश्वर आहे. तो पूर्वीही होता आणि अनंत काळ राहणार आहे. त्याचा ना तर जन्म आहे, ना कोणी त्याला घडवले आहे ना कोणी निर्माण केले आहे. यामुळे आपण वेगवेगळ्या धर्मांचा अभ्यास करून त्यांच्याबद्दल आदरभाव बाळगणे शिकायला पाहिजे. रहीम आणि करीम नावाचे माझे मुसलमान मित्र आहेत. मी जेव्हा त्यांना त्यांच्या नावाने संबोधतो तेव्हा मी थोडाच त्यांना खुदाच्या नावाने जोडत असतो? आणि त्याला अपराध का म्हणायचे? वैराचा बदला वैर करून घेणे मला मान्य नाही. वेगवेगळ्या जातिजमातीत खरा बंधुभाव निर्माण केल्याशिवाय कोणतीही सिद्धी मिळवता येऊ शकत नाही.

“बिहारमध्ये मला बळजबरीने पाठवण्याची आवश्यकता नाही. मला वाटते की इथे बसूनच मी सर्व समाजाची चांगली सेवा करू शकतो. यामुळेच मी इथे बसलो आहे.”

आज बापूजींनी दूध घेतले नाही. दहा वाजता झोपायला गेले. मीसुद्धा पाच-सात मिनिटात झोपायला गेले.

श्रीनगर,

५ - २ -’४७

रोजप्रमाणे प्रार्थना वगैरे यथाक्रम झाले. मला जोरदार सर्दी झाली आहे आणि तापही आहे. बापूजींनी मला आपल्याजवळ झोपवले. त्यांनी स्वतःच टपाल पाहिला आणि उत्तरही लिहिले. असे असले तरी साडेसहा वाजता बापूजांनी मला परत उठवले.

रोजप्रमाणे ७.३५ ला शादुरखिल सोडले. इथे वीणाबहेन दास आणि इतर भगिनींनी सुंदर तयारी केली आहे. या गावात त्या कार्य करत असतात. सव्वाआठ वाजता इथे पोहोचलो. आकर्षक रांगोळी काढली होती. आजचे हे घर एका कोष्ट्याचे (विणकराचे) आहे. ऑक्टोबरमध्ये त्यांचे सर्व काही लुटण्यात आले होते. बापूजींचे पाय धुऊन मालीश केली. मालीश करताना बापूजी वीस मिनिट झोपले. आंघोळ करतानाही झोपले.

बापूजींना जेवू घालत होते तेव्हा विणादीच्या हाती थर्मामिटर होते. ते घेऊन त्या माझ्याजवळ आल्या आणि बापूजींसमोर मला बळजबरीने ताप घ्यायला लावला. १०४ डिग्री होता. हे पाहून बापूजी माझ्यावर खूपच नाराज झाले.

लवकर काम आटोपून झोपायला जावे असे माझ्या मनात होते. परंतु वीणादींचे न ऐकता आतापर्यंत काम करत राहिल्यामुळे बापूजी फार नाराज झाले. म्हणाले, “सकाळपासूनच तू तुझे काम देवभाईंना वा निर्मळदांना सोपवले असते आणि झोपली असतीस तर तुझे इतके हाल झाले नसते. हे सर्व तू न सांगितल्यामुळे झाले. पण स्पष्टपणे सांगायचे तर याला मूर्खपणाच म्हणावे लागेल. असे न करता तू नम्रपणे आराम घेतला असता तर मी खुश झालो असतो. तुला मी अनेकदा सांगितले आहे की तू एकदा कामाला लागली की मग तू तुझ्या शरीराकडे लक्ष देत नाही. या कारणाकरिता मी तुला अनेकदा आगाखान महालातही रडवले आहे. आजही रडवावे लागेल.  थोडासा जरी थकवा आला की काम सोडायलाच पाहिजे. तू पाहतेस की माझ्याजवळ कामाचा ढीग पडलेला असतो, तरीही वेळ मिळाला की मी आराम घेतल्याशिवाय राहत नाही. नाही तर मी सेवा कसा करू शकलो असतो? ज्याला सेवा करायची असेल त्याने आधी स्वतःची सेवा करायला शिकायला पाहिजे.”

दोन तास आराम केल्यानंतर ताप उतरला. सायंकाळी  ९९।। झाल्यामुळे प्रार्थनेकरिता गेले. वीणादींनी आज पुष्कळ मदत केल्यामुळे बापूजींच्या सेवेत आज फारसा त्रास झाला नाही.

आज बापूजींच्या प्रवचनाकरिता मंडपासारखे केले होते. वरसुद्धा छत केले होते. प्रार्थनेकरिता खूप गर्दी होती. पण शांतता होती. प्रार्थनासथळ सजवायला बापूजींनी स्पष्ट नकार दिला. असे करण्यात पैशाचा आणि शक्तीचा अपव्यय होतो असे त्यांचे म्हणणे होते. बैठक थोडीशी उंच असावी म्हणजे ते लोकांना आणि लोक त्यांना पाहू शकत होते. तसेच थकवा येऊ नये म्हणून बसायला नरम गादीसारखे असावे. याशिवाय इतर कोणतीही सजावट करायला बापूजींनी मनाई केली.

प्रार्थनेत अहिंसेच्या शस्त्राविषयी आज बापूजी म्हणाले,

“स्वातंत्र्याचे रक्षण करायची ज्यांची इच्छा असेल ते आपल्या विरोधकांना मारून टाकत नसतात, ते स्वतः मरायला तयार होत असतात. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याबद्दल इंग्रज काय म्हणतात वा काय म्हणत नाहीत याची मला फिकीर नाही. ते स्वातंत्र्य आपल्यावरच अवलंबून आहे. इथे तर जवाहरलालजींनी आणि इतर साथीदारांनी जेव्हा राज्यकारभार हाती घेतला तेव्हा मी म्हणालो होतो की आजपासून तुम्हांला काट्याच्या अंथरुणावर झोपायचे आहे. आपले ध्येय हिंदुस्थानचे संपूर्ण स्वातंत्र्य मिळवणे आहे. आणि त्याशिवाय तुम्हांला शांत बसता येणार नाही. परंतु जो कोणी असे मानत असेल की इंग्रजांना तलवारीच्या जोरावर काढून टाकू शकू तर तो फार मोठी चूक करत असेल. इंग्रज अशा गोष्टींना कधीही घाबरत नाहीत. इंग्रजांमध्ये कमालीची चिकाटी, दृढता आणि हिंमत आहे. आणि तलवारीच्या जोरावर ते कधीही पळून जाणार नाही. परंतु मृत्यूचा बदला मारून नाही तर मरून घेऊ तर अशा अहिंसेसमोर ते निश्चितपणे उभे राहू शकणार नाहीत. अहिंसेपेक्षा कोणतीही वरचढ शक्ती मला माहीत नाही. माझी तर निश्चित मान्यता आहे की अजूनही आपल्याला संपूर्ण स्वातंत्र्य सापडलेले नाही. याचे कारण आपल्या अहिंसेत उणीव आहे. परंतु ते काहीही असो. परंतु आजपर्यंत अहिंसा शिकवण्याचा जो प्रयत्न झाला आहे त्याचे इंग्रजांनी जे उत्तर आहे ते हे राज्यप्रपत्र आहे.

"युद्धाच्या परिणामाचा विचार केला तर लक्षात येईल की त्याने मित्रराष्ट्रांचा त्यामुळे काहीही फायदा झालेला नाही, मग शत्रूराष्ट्रांचा फायदा कसा होईल? असंख्य लोक मारले गेले. पण त्याच्या परिणामी जगाची अवस्था अशी झाली आहे की जगात अन्नधान्याची आणि कापडाची ददात निर्माण झाली आहे. यामुळे जग मृतप्राय झाले आहे. मी तर बेधडकपणे सांगू शकतो की काहीही जरी परिणाम झाला तरी त्याची फिकीर न करता धर्म म्हणून जरी नाही तरी प्रारंभिक धोरण म्हणून अहिंसेचा अवलंब करून तिच्या शक्तीपासून मिळणाऱ्या आत्मविश्वासावर विसंबून आपण पुढे जायला पाहिजे."

इंग्रजी भाषेबद्दल बोलताना बापूजी म्हणाले, "इंग्रजीच्या शिक्षणाने आपल्या ज्ञानाची भूक अगदी मारली गेली आहे, आणि तिने आपल्याला अगदी पंगू केले आहे. माझी तर इच्छा आहे की आपली भाषा इतकी समृद्ध आहे की तिच्यातूनच आपण शिक्षण द्यायला पाहिजे. आपण जर पिच्छा पुरवून इंग्रजीचा मोह सोडला तर आपल्या जनतेला आपण नागरिकाचा धर्म आणि अधिकार यांचे शिक्षण फार कमी वेळात देऊ शकू."

आज प्रवचनाचा बंगाली अनुवाद सुरु असतानाच मी घरी परतले होते. बापूजींकरिता दूध आणि सफरचंद तयार करून मी झोपून गेले. रात्री परत ताप वाढला होता. परंतु तरीही साडेआठ वाजता उठून मी बापूजींचे अंथरुण तयार केले नेहमीचे कामकाज संपवले. बापूजींच्या डोक्याला तेल चोळले, पाय दाबले आणि परत झोपले. (आजची दैनंदिनी ६ - २ - '४६ला लिहिली आहे.)

धरमपूर,

६ - २ - '४६, गुरुवार

रोजप्रमाणे प्रार्थनेकरिता उठले. बापूजी म्हणत होते की तुला रात्रभर ताप होता. पण चांगले वाटत असल्यामुळे उठून मी अथरुणाबाहेर पडले. प्रार्थनेत गीताजींच्या अध्यायात चूक झाली. शुक्रवारचा अध्याय आजच वाचायला सुरुवात केली. बापूजींनी मला सावध केले. मला

म्हणाले, “या चुकीवरून तू अजूनही आजारी आहेस असे स्पष्ट दिसते. असे असूनही मी तुला आराम घेऊ दिला नसता, कारण तू नाही तरी आराम घेतला नसता.” बापूजींना मी पाणी आणि रस दिला आणि परत झोपून गेले. बापूजींनी . . . ला पत्र लिहिले - लीग आणि संस्थानिक हवे ते करो, माझ्या दृष्टीने मात्र ते कॉंग्रसने करण्यासारखे नाही. कपडे आणि खाद्यपदार्थासंबंधींचा माझा दृष्टिकोन स्पष्ट आहे.

साडेसात वाजता आम्ही श्रीनंगर सोडले. रस्त्यात एक मुसलमान मित्र सिकंदर जुनियानींनी त्यांच्या वाडीत थांबवले. मी भगनींकडे गेले होते. परतल्यानंतर नेहमीप्रमाणे मालीश, आंघोळ वगैरे सुरू झाले. जेवणात पाच काजू, पाच बदाम, भाजी, फळ, आणि दूध घेतले. माझी प्रकृती चांगली आहे. काम थोडे जास्तच केले. परंतु दुपारनंतर ताप १०४ डिग्रीपर्यंत गेला. यामुळे ४ ते ५ मी बापूजींजवळ झोपले. पाच वाजता प्रार्थनेच्या वेळी जाग आली आणि ठरलेल्या वेळी प्रार्थना करण्याकरिता बापूजींबरोबर गेले.

सायंकाळच्या जेवणात गुळाशिवाय बापूजींनी काहीही घेतले नाही. यामुळे प्रार्थनेनंतर विशेष असे मला कोणतेही काम नव्हते. बापूजी म्हणाले, “तुला झोपायला लावावे म्हणूनच मी केवळ गूळ घेतला आहे”. माझ्या काळजीमुळे आणि मला आराम मिळावा म्हणूनच केवळ गूळ घेतला होता याची मला रात्री तर कल्पनाच नव्हती. मला वाटत होते की कदाचित बापूजींना थोडे बरे नसल्यामुळेच इतर काही घ्यायला नकार देऊन रात्री त्यांनी केवळ गूळ घेतला असावा. पण ते इतरांची किती काळजी करत असतात? मला याचे दुःख होत होते की मी माझ्या प्रकृतीचा नीट सांभाळ केला नाही म्हणूनच बापूजींनी स्वतःला याची शिक्षा करून घेतली होती!

आज साफसफाईबद्दल बापूजी म्हणाले होते, “स्वच्छता हा तर माझा मुख्य आणि मन रमवणारा विषय आहे. पश्चिमेच्या अनेक गोष्टी मला पसंत नाहीत. परंतु त्यांचा स्वच्छतेचा नियम मी विशेषेकरून शिकलो आहे. येथील याच तलावाच्या पाण्यात लोक कपडे धुतात आणि तेच पाणी प्यायला असते. हे पाहून मला फार दुःख झाले. लोक निःसंकोचपणे कुठेही थुकतात, पान

खाऊन पिचकाऱ्या उडवतात. या गोष्टी आपल्या देशात सरसहा होतात. याचे मला दुख होते. आपल्या देशाकरिता ही लाजेची गोष्ट आहे. हिंदुस्थानातील अनेक रोगांचे कारण या प्रकाराची घाण आहे. अशाही परिस्थितीत हिंदुस्थान जिवंत आहे याचेच मला नवल वाटते. आपल्या देशातील मृत्यूचे प्रमाण सर्वात जास्त आहे. पुरेपूर स्वच्छता ठेवण्याच्या आड गरिबी कधीही येत नसते. केवळ आपल्या आळसाचा आपण त्याग केला तर आपण या सुवर्णभूमीत जीवंत राहू शकू. इंग्रजीत वाक्प्रचार आहे की स्वच्छता ही ईश्वरासमीप जाणारी गोष्ट आहे. आणि तुम्ही जर बाह्य स्वच्छता ठेवण्याच्या नियमांचे चिंतन कराल तर अंतर्गत स्वच्छता ठेवण्याचा विचार तुम्हांला आपोआपच सुचेल."

बापूजींच्या कामकाजाची माहिती असावी म्हणून अनेक वृत्तपत्रांचे प्रतिनिधी आपले वार्तापत्र घेऊन्न बापूजींसोबत राहण्याची मागणी करत होते. बापूजी म्हणाले, "वर्तमानपत्रवाले आजकाल या विभागावर आक्रमण करू लागले आहेत. इथे तर त्यांच्याकरिता कोणत्याही प्रकारची व्यवस्था नाही. माझ्या आसपास जर ते आपला थाटमाट करतील तर मी त्यांना निघून जायला सांगेन. परंतु ते अतिशय साधेपणाने गाववाल्यांबरोबर राहत असतात. माझा प्रश्न आहे की त्यांनी आपले वार्तापत्र इथे वितरित करून विनाकारण खर्च का करावा? असे असले तरी वर्तमानपत्रवाल्यांजवळ आपले प्रतिनिधी पाठवण्याइतका जास्तीचा पैसा असेल तर तो त्यांनी मला द्यावा. इथे लोकांना जो त्रास सहन करावा लागतो आहे तो काही केल्या मला सहन होत नाही."

१९२५ बापूजी म्हणाले होते की "स्वतंत्र हिंदुस्थानात जो माणूस कोणत्या ना कोणत्या प्रकारे शारीरिक श्रम करून राज्याची सेवा करील त्यालाच मतदानाचा अधिकार असेल असे कलम मी घटनेत टाकेन." या मतावर बापूजी अजूनही कायम आहेत काय असा एक असा प्रश्न आला होता. बापूजी म्हणाले, या गोष्टीवर तर मी मरेपर्यंत कायम राहीन. ईश्वराने माणसाला अशा प्रकारे घडवले आहे की त्याला काम केल्याशिवाय खाण्याचा अधिकारच मिळत नाही.

पैसेवाल्यांनी आपल्या पैशाचा त्याग करावा आणि सर्वांबरोबर हातपाय चालवून खावे. बुद्धीने पैसा आपल्याकडे ओढायचा, मौजमजा करायची, ऐशआरामात जीवन व्यतीत करणे या गोष्टी पाप आहेत.

राजासंबंधी (रियासतदार) बोलताना बापूजी म्हणाले, “५०० राजे आहेत आणि प्रजा करोडोच्या संख्येत. राजांना सांगायला पाहिजे की तुम्ही राजे म्हणून तुमचे अस्तित्व मिटवून टाका आणि जनतेचे सेवक व्हा. असे कराल तरच त्यात तुमचे आणि आणि इतर सर्वांचे हित आहे.”

बापूजींकडे येणाऱ्या वेगवेगळ्या प्रश्नांवर वेगवेगळी चर्चा चालत असते आणि त्यातून बापूजी कसकसा विचार करतात ते चांगल्या प्रकारे कळते.

प्रसादपूर

७ - २ - ‘४७

रोजप्रमाणे प्रार्थनेकरिता साडेतीन वाजता उठलो. प्रार्थनेनंतर माझ्या दोन्ही दिवसांच्या नोंदवहीवर बापूजींनी सह्या केल्या. रोजप्रमाणे बंगालीचा पाठ केला. निर्मळदांनी एका बंगाली मुलीचे बंगालीतील पत्र बापूजींना वाचून दाखवले.

सातपस्तीसला धरमपूर सोडले. सव्वाआठ वाजता इथे पोहोचलो. हे घर उपेंद्रकुमार मजमुदार यांचे आहे.

माझी प्रकृती चांगली आहे. यामुळे बापूजींनी बरीचशी कामे करण्याची परवानगी दिली. आल्यानंतर रोजप्रमाणे बापूजींची मालीश केली, आंघोळ घातली आणि बापूजी आंघोळ करून बाहेर येत नाही तोच सुशीलाबहेन पै आल्या. बापूजींकरिता थोडेसे काजू, बदाम जपून ठेवले होते ते आणले. बापूजींनी जेवणात भाजी, दूध, थोडे मुरमुरे आणि दोन काजू घेतले. खाकरे घेतले नाही. बाकी सर्व दररोजप्रमाणे चालले.

दुपारी बरेच लोक भेटायला आले होते. त्यात प्रा. राजकुमार चक्रवर्ती, सतीशबाबू, मनोरंजनबाबू चारूदा, मां (हेमप्रभादेवी), झमानसाहेब आणि पोलीस अधिकारी यांचा समावेश होता. आझाद हिंद सेनेचे कर्नल शाहनवाझसाहेब आणि हरिदासभाई तसेच बेलाबहेन (नेताजी सुभाषचंद्र बोस यांची पुतणी) हेही आले होते. निरंजनसिंग गिलसुद्धा आले.

माती घेतलेली असताना बापूजींना थोडा वेळ झोपले. उठल्यानंतर त्यांना पडलेल्या एका स्वप्नाची गोष्ट त्यांनी मला सांगितली. ". . . . हे मरत असताना तुला यांना वाचवणे तुझा धर्म आहे असे तुला वाटले आणि तू त्यांना वाचवायला गेली. पण जेव्हा तू त्या माणसाजवळ गेली तेव्हा तो विव्हळत होता. तू त्याला दोन थापडा मारल्या. त्याने इथे येऊन तुझी माफी मागितली. तू मला ही गोष्ट सांगायला आली तेवढ्यातच माझी झोप उडाली."

बापूजी म्हणाले, "या स्वप्नाप्रमाणे तू करावे अशी माझी इच्छा आहे. हे स्वप्न सिद्ध करण्यात वर्षे वा कदाचित काही युगेही लागू शकतील. परंतु कितीही जरी वेळ लागला तरी आपल्याला त्याचे काय? आपल्याला तर कर्तव्य करता करता मरायचे आहे आणि अपुरे राहिलेले काम पुढील जन्मी पूर्ण करायचे आहे. परंतु यात आजाराला कोणतेही स्थान असू नये. भाषा दृढत्वाची असले पाहिजे, राहण्यात शालीनता आणि विवेक असला पाहिजे. आणि भीतीला मुळीच स्थान असू नये. इतके जर तू पचवलेस तर तू खूप उंच चढशील."

वरील गोष्टी सुरूच होत्या तेवढ्यात ठक्करबापा आले. त्यांनी टपालाचा मोठी गठ्ठा आणला होता. बापा आणि बापूजींनी थोड्या गोष्टी केल्या. आज सर्वांची पत्रे खूप गरम आहेत.

सायंकाळी झमानसाहेबांबरोबर गोष्टी करत होते. निर्वासितांकरिता सदावर्त असल्यामुळे त्यांच्याकरिता मोफत धान्याची व्यवस्था अपायकारक आहे या विचारासंबंधात आपले विचार स्पष्ट करत गांधीजी म्हणाले, "प्रत्येक माणसाला मेहनत करून खाण्याचा अधिकार आहे. सरकारने रस्तेदुरुस्ती, ग्रामीण पुनर्रचना, सहकारी धोरणानुसार उद्योगाची स्थापना अशा

प्रकारची कामे काढावी. अशा अनेक कामात जनतेने जर सहकार्य केले तर त्यांना पूर्ण रेशन घेण्याचा अधिकार असेल. आपण त्यांना मोफत दान देणे अपायकारक आहे असा दानाचा जो अर्थ आपण करतो तशा दानाचा मी विरोधी आहे. सशक्त लोक जर कोणतेही काम न करता सरकारकडून मोफत राहण्याची आणि खाण्याची अपेक्षा करत असतील तर माझ्या दृष्टीने ती वाजवी गोष्ट नाही. परंतु जे लोक घरदार गमावून निराश्रित झाले आहेत त्यांच्याबद्दल मला पूर्ण सहानुभूती आहे. सट्ट्यात लोक जो पैसा मिळवतात तो खऱ्या कमाईचा पैसाच नाही. प्रत्येक माणूस आपल्या स्वतःच्या मेहनतीने, निढळाच्या घामाने भाकरी मिळवील तर आपली ही पृथ्वी स्वर्गच होऊन जाईल याबद्दल मला मुळीच शंका नाही. कवी, डॉक्टर, लेखक, शिक्षक, वकील, व्यापारी वगैरे कोणताही स्वार्थ न ठेवता जर खऱ्या अर्थाने आपापले कर्तव्य पार पाडत असतील आणि ते आपल्या ज्ञानाचा वा आपल्या आवडीनिवडीचा उपयोग मानवसेवेकरिता करत असतील तर आपला हिंदुस्थान संपूर्ण जगात पहिल्या क्रमांकावर असेल."

बापूजींनी झमानसाहेबांना हे जे विचार सांगितले होते त्याबद्दल मी विचार करत होते. इतकी मोठी अपेक्षा  बापूजी जनतेकडून कशी काय करू शकतात? याविषयी मी बापूजींना विचारले. ते म्हणाले,

> अग, एक माणूस जर असे काम करील तर त्याचा परिणाम दुसऱ्या माणसावर होईल. निराश न होता आपण प्रयत्नशील राहायला पाहिजे. हिंदुस्थानात स्वार्थी लोक असतील तर परमार्थी लोकसुद्धा कमी नाहीत. शिवाय मी गीतामातेचा अभ्यास करणारा असल्यामुळे मी तर इतकेच म्हणेन की गीतामातेने सांगितल्याप्रमाणे श्रद्धा ठेवून किंचितशाही फळाची अपेक्षा न ठेवता सर्व प्रकारच्या शुद्ध भावनेने आपण आपले कर्तव्य पार पाडत राहिलो पाहिजे.

प्रार्थनेमधून आल्यानंतर आज बापूजी कातू शकले. परंतु आज भरपूर मुलाखतकारांचा दिवस होता. कातता कातता वर्तमानपत्रे ऐकली. मी टपाल वाचून दाखवला. नंतर पाय धुतले आणि बापूजी अंथरुणावर पडले. पाय दाबत असतानाच बापूजींना झोप लागली.

बापूजी झोपल्यानंतर मी घरी पत्र लिहिले. बापूजींनी लिहिलेल्या पत्रांच्या नकला केल्या. रोजनिशी लिहिली. कताई केली. तेवढ्यात साडेबारा वाजून गेले. परंतु खूप काही लिहायचे राहिले होते. ते सर्व पूर्ण केले. यामुळे माझ्या मनाला हलकेपणा आला.

नंदीग्राम,

८ - २ - '४७

मी रात्री जेव्हा उशिरा झोपायला गेले होते, तेव्हा बापूजी गाढ झोपेत होते. परंतु दीड वाजता उठले. मलासुद्धा उठवले. दिवा लावायला सांगितले. मला म्हणाले, "मी रामनाम तर घेतच होतो पण दंडाधिकाऱ्याला एक पत्र लिहायचे होते. हे ओझे मनावर होते. यामुळे झोप उडाली. दुसरी गोष्ट म्हणजे बराच टपाल लिहायचा आहे. आणि शिवाय काल बापांनी अजून एक टपालाचा गठ्ठा आणला आहे. तो वाचायचा आहे. यामुळे दिवा लाव".

मी दिवा लावला आणि कागदपत्रे वगैरे दिली. मी म्हणाले, "तुम्ही पडल्या पडल्या सांगून माझ्याकडून लिहून घ्या ना?"

बापूजी म्हणाले, "तू ७७ वर्षाची हो आणि मग लिहिशील. आता झोप." मी तर एक शब्दही न बोलता झोपले. मला म्हणाले, "ज्या पोरीला मी दिवसा आराम घेण्यापुरताही झोपू देत नाही, जी रात्री उशिरापर्यंत काम करते तिला जर मी मध्यरात्री उठवून काम करायला लावले तर मा किती पापी म्हणवला जाईन?"

लगेच माझ्या लक्षात आले की रात्री मी साडेबारापर्यंतही लिहीत होते याची बापूजींना कल्पना नव्हती असे नाही. परंतु माझाच दोष असल्यामुळे काही बोलण्यासारखेही नव्हते. बापूजींचे किती बारीक लक्ष असते?

बापूजींनी दीड ते सव्वातीन वाजेपर्यंत काम केले. मग मला परत उठवले. तोंड धुवायला पाणी दिले, प्रार्थना झाली. आज बेलाबहेनने प्रार्थनेत सुंदर भजन म्हटले.

प्रार्थनेनंतर बापूजींनी गरम पाणी आणि मध घेतले. बंगाली पाठ केला आणि मग बापूजी झोपले. बापूजींचे पाय दाबण्याकरिता मी थोडा वेळ बसले. बापूजी पंधरा मिनिट झोपले. उठून रस घेतला. आणि तेवढ्यात इथे येण्याकरिता निघण्याची वेळ झाली.

जवळपास रात्रीच्या दीड वाजतापासून काम केल्यानंतरसुद्धा बापूजी म्हणाले, “मला थकवा वाटत नाही. रात्री मी झोपलो तेव्हाच तू जर झोपली असतीस तर मी तुझ्याकडून भरपूर काम करवून घेतले असते. परंतु तू उशिरा झोपायला आल्यामुळे मी तुझ्याकडून कसे काम घेऊ शकलो असतो? पण मी तुझ्या आधीच झोपलो याचे मला वाईट वाटले. साडेसात वाजता प्रसादपूर सोडले. आठवाजून पस्तीस मिनिटांनी आम्ही इथे पोहोचलो. बापांच्या सुपूर्द पत्र केले आणि बापूजी दुसरे पत्र पाहत असतानाच मी मालीशची तयारी केली. मालीश सुरू असताना बापूजी पन्नास मिनिट झोपले. रात्रभराचे जागरण होते, यामुळे इतके झोपले हे चांगले झाले.

दुपारचा आहार फार कमी केला आहे. दोन खाकरे, भाजी आणि सहा औंस दूध इतकेच घेतले.”

कताई करत असताना सुरेंद्रनाथ घोष, लावण्यप्रभाबहेन आणि मिदनापूरचे कार्यकर्ते आले होते.

आज बापूजी काही प्रश्नांचे उत्तर देत असताना म्हणाले -

मुसलमान हिंदूंचा बहिष्कार करून राहिले असल्याच्या गोष्टी माझ्या कानावर आल्या आहेत. परंतु सर्वत्र ही परिस्थिती नाही. असे जरी असेल तरी हिंदूंजवळ स्वतः वहीत करता येण्यापेक्षा जास्त जमीन आहे. यात दोन्ही वर्गांचे नुकसान आहे. यामुळे मी तर असा सल्ला देईन की हिंदूंनी स्वतः वहीत करता येईल इतकीच जमीन ठेवावी. जास्तीची जमीन आपल्या ताब्यात ठेवू नये. आपण जास्तीची कोणतीही वस्तू आपल्याजवळ ठेवू नये, मग ती लहान असो की मोठी. या आदर्शापर्यंत पोहोचण्याचा समाजाने प्रयत्न केला पाहिजे.

मी इथे दोनतीन महिन्यांपासून आलो आहे. तेव्हापासून मी निश्चितपणे पाहतो आहे की हिदू काही विशिष्ट प्रमाणात आपले शौर्य दाखवायच्या कामाला लागले आहेत; वा असेही म्हणता येईल की त्यांच्या दुर्बलतेमुळे त्यांची लूट होत आहे. थोड्याशाच दिवसांपूर्वी भटियालपुरात ज्या मंदिराचा मुसलमानांनी विध्वंस केला होता त्याच मंदिराचा प्यारेलालच्या मेहनतीमुळे देवाच्या मूर्तीची माझ्या हस्ते परत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली होती. त्या कार्यक्रमाला मुसलमानभाईसुद्धा हजर होते. इतकेच नाही तर यापुढे गरज पडली तर या मंदिराला आम्ही आमच्या प्राणाची बाजी लावूनसुद्धा वाचवू, आधी आम्ही आमच्या प्राणाचे बलिदान देऊ मगच कोणी मंदिराला हात लावू शकेल अशी प्रतिज्ञासुद्धा त्यांनी केली होती. अशा प्रकारची प्रतिज्ञा मुसलमानभाई करतात ही काही लहानसहान गोष्ट नाही. माझ्या प्रवासात अशी इतरही लहानमोठी उदाहरणे घडली आहेत. यामुळे निश्चितच किती तरी काम होते आहे इतके आत्मसमाधान आपल्याला मिळू शकते. मी जर शुद्ध असेन, जसे बोलतो तसेच करत असेन तर ते काम टिकायलाच पाहिजे. माझी अशीसुद्धा मान्यता आहे की सेवक जी बाह्य सेवा करतो त्याचा त्याच्या अंतर्गत जीवनाशीसुद्धा मेळ असला पाहिजे. तसेच ते जीवन अतिशय शुद्ध आणि पारदर्शक असले पाहिजे. प्रत्येक प्रामाणिक कार्य माणसाला अमर करत असते. माणूस

मेल्यानंतर त्याचे काम तसेच पडून राहते ही गोष्ट खोटी आहे. यामुळे माझ्याबरोबर असलेल्या माझ्या साथीदारांची आणि कार्यकर्त्यांची बाहेरची आणि आतील दृष्टी शुद्ध असेल तर त्यांचे कार्य चमकायलाच पाहिजे. तसे नसेल तर समाज त्यांना आपोआपच त्या स्थानावर राहू देणार नाही. हा माझा नियम नाही, जगाचा आहे. सेवकामध्ये किंचित जरी अवडंबर वा अभिमान असेल तर तो क्षणभरही टिकाव धरू शकणार नाही.

आजच्या प्रार्थनेत सुशीलाबहेन पै यांच्याबरोबर कारपाड्याहून ८० भगिनी आल्या होत्या. सुशीलाबहेन सांगत होत्या की आमच्यामध्ये काही भगिनी अशा आहेत की ज्यांनी गावाबाहेर कधीही पाऊल टाकले नाही. रामधूनची धून या भगिनींनी बरोबर झेलली.

या गावात मोठ्या मुश्किलीने बापूजी राहू शकतील इतकीच लहानशी जागा मिळाली आहे. बाकी सर्वांना तंबू तयार करून त्यात राहावे लागले होते. छायाचित्रकारांचा आणि बातमीदारांचा काफिला फार मोठा झाल्यामुळे असे वाटत होते की वारकऱ्यांचा एखादा जत्थाच इथे उतरला आहे. गावातील लोक शिकलेसवरलेले असूनही बेकार बसलेले आहेत.

प्रार्थनेमधून आल्यानंतर बापूजींनी नासवलेल्या दुधाचे पाणी घेतले. टपाल पाहून दहा वाजल्यानंतर झोपले. कालच्या ठपक्यामुळे मी बापूजींच्या पायांना तेल चोळले, पाय दाबले आणि लगेच झोपून गेले.

विजयनगर,<br>९ - २ - ‘४७

रोजप्रमाणे प्रार्थना. प्रार्थनेनंतर नेहमीप्रमाणे बंगालीचा पाठ केला आणि काही टपाल बापूजींनी स्वतःच लिहिला. इथे भगिनीच प्रामुख्याने कार्यकर्त्या म्हणून काम करत असतात. या भगिनी भजन गातगात सकाळच्या आधीच आम्हांला घ्यायला नंदीग्रामला येऊन पोहोतल्या

होत्या. यांतील दोन लहान मुलीची बापूजींची काठी होण्याची फार इच्छा होती. यामुळे मी त्यांना बापूजींची काठी होऊ दिले आणि मी निर्मळदाबरोबर जवळच्या आडवाटेने इथे येऊन पोहोचले.

बापूजी इथे पोहोचण्यापूर्वीच मी सर्व व्यवस्था केली होती. यामुळे बापूजी जेव्हा पोहोचले तेव्हा मी लगेच त्यांचे पाय धुऊन मालीश केली, त्यांनी आंघोळ कली आणि साडेदहा वाजता सर्व काही आटोपले. इतक्या सगळ्या प्रवासात आज सर्वात लवकर जेवण घेतले.

बेलाबहेन इथूनच गेल्या. किशोरीलालकाकांना दम आहे. यामुळे त्यांच्याकरिता एक जडीबुटी पाठवायला बेलाबहेन बापूजींना म्हणाल्या. या जडीबुटीचा त्यांनी अनुभव घेतलेला आहे असे त्यांचे म्हणणे होते. परंतु बापूजी विनोदात म्हणाले, “किशोरीलालचा दम जर मुळापासून गेला तर मी तुला बक्षीस देईन.”

मला अजूनही सर्दी असल्यामुळे बापूजींनी मला झोपायला लावले आणि म्हणाले, “मी तुला जेव्हा उठवीन तेव्हाच उठायचे.” मी झोपून राहिले. परंतु जाग आल्यानंतर पाहते तर बापूजींनी स्वतःच चरखा तयार केला होता आणि कताई करण्याकरिता मांडी घातलेली होती. मी रागातच म्हणाले, “मला अजूनही जाग आली नसती तर तुम्ही तर उठवलेच नसते ना? तुम्ही स्वतः चरखा तयार करून मग मला उठवाल अशी तर मी मुळीच अपेक्षा केली नव्हती.”

बापूजी हसून म्हणाले, “तुला काय माहीत की मला माझे काम स्वतःच करण्यात किती आनंद मिळतो? तू तर रोज करतच असतेस आणि करशीलही. परंतु जेव्हा केव्हा माझे काम स्वतः करण्याची मला संधी मिळते तेव्हा त्या संधीचा सदुपयोग केल्याने मला फार आनंद होतो. तू थोडी चांगली हो, मग तर मी तुला एक ताससुद्धा कुठे झोपू देणार आहे? मी किती निर्दय होऊ शकतो हे तू अनुभवलेले आहे. यामुळे तू लोखंखंडासारखी मजबूत हो. लोहार लोखंडाला प्रचंड अग्नीत तापवतो आणि मग त्यावर जोरात हातोडा मारतो. तेव्हा त्याला लोखंडाची दया येते काय? इतका निष्ठुर मी तेव्हाच होऊ शकेन जेव्हा तू तापलेल्या लोखंडासारखी होशील. आणि मग

लोखंडाला किती सुंदर आकार देता येऊ शकतो? असाच सुंदर घाट तुला देता यावा असे मला वाटते. हे तर तेव्हाच होऊ शकेल जेव्हा तुझ्या नखातही रोग नसेल.”

नंतर कातत असताना अजून वेगळा टपाल लिहवून घेतला. तेवढ्यात उपलेटा येथील वलीमहमदभाई आले. आज बापूजींनी प्रार्थनेच्या आधीच पाच वाजून वीस मिनिटांनी मौन घेतले. प्रार्थनेकरिता लिहिलेले भाषण वाचायला लावले.  आजचे भाषण कार्यकर्त्यांच्या प्रश्नोत्तरीच्या स्वरूपात होते.

बापूजींकडे एक प्रश्न असा होता -

**प्रश्न - काही काळ सेवेत घालवल्यानंतर कार्यकर्त्यांना सत्तेचे प्रेम वाटू लागते असा आमचा अनुभव आहे. अशा अवस्थेत त्याच्या इतर सहकाऱ्यांनी त्याच्यावर नियंत्रण कसे ठेवावे? वेगळ्या शब्दांत आपण संघटनेचे लोकशाहीवादी स्वरूप कसे टिकवून ठेवावे? संबंधित पक्षाशी असहकार केल्याने काही विशेष लाभ होत नाही असे आमच्या निदर्शनास आले आहे. असे केल्यामुळे उलट संघटनेच्या कामाचीच हानी होते.**

उत्तर - मनुष्यस्वभाव सत्तेचा शौकीन आहे. आणि या शौकाचा शेवट जवळपास मृत्यूतच होत असतो. यामुळे सत्तेमागे असलेल्या सेवकाला नियंत्रणात ठेवणे इतरांकरिता कठीण आहे. त्याच्या अनेक कारणांपैकी एक कारण असे आहे की इतरांमध्येसुद्धा हा दोष कळतनकळत असण्याची शक्यता असते. शिवाय या जगात पूर्णपणे अहिंसेवर चालणारी एकसुद्धा संस्था पाहायला मिळत नाही. आणि यामुळे कोणतीही संस्था पुरेपूर लोकशाहीच्या धोरणाने चालू शकते असे आपण म्हणू शकत नाही. जोपर्यंत लोकशाहीला पूर्णपणे अहिंसेचा आधार नसेल तोपर्यंत ती लोकशाही पूर्ण आहे असे मान्य करता येत नाही. हेतू अथवा कार्य जर चांगले असतील तर अहिंसक असहकार यशस्वी झाल्याशिवाय राहूच शकत नाही. आणि अशा

असहकार करणाऱ्या संस्थांवर संकट येऊच शकत नाही. या प्रयोगात एक तर अहिंसेचे प्रमाण कमी असू शकते वा अगदीच अहिंसा नसू शकते. असे असले तरच प्रयोग यशस्वी होणार नाही. मी अनुभवले आहे की जे लोक इतरांबद्दल तक्रार करतात त्यांच्या स्वतःच्या मनात सत्तेचा लोभ असतो. यामुळे एकाच प्रकारच्या स्पर्धांमध्ये जो भेद करण्यात काही अर्थ नाही, आणि दोन्ही पक्षात रोष भरलेला आहे.

"ज्याप्रमाणे आपल्या शहरांमध्ये पक्षबाजी आणि गटबाजी असते आणि सत्तेसाठी डावपेच सुरू असतात तशीच गोष्ट जर गावांमध्ये सुरू झाली तर ती गोष्ट हिंदुस्थानकरिता दुःखाची होईल. जो सत्तेकरिता गावात कार्य करण्याकरिता जाईल तो गावाच्या प्रगतीत अडथळ्यासारखा होत असतो. मी तर असे म्हणेन की आपण परिणामांची अपेक्षा न करता काम करत राहायला पाहिजे आणि त्या कामात स्थानिक मदत घेतली पाहिजे. आपल्यामध्ये जर सत्तेचा मोह नसेल तर त्या कामात बिघाड निर्माण होणार नाही. शहरातील शिकलेसवरलेली, सुधारलेली म्हणवली जाणारी आपली माणसे गावांकडे अगदी बेफिकीर असतात. आपण हा एक भयंकर अपराध करत असतो. आपण जर याकरिता अंतःकरणापासून प्रायश्चित्त घेतले तर आपल्यात थोडा धीर येईल. मी तर गावांमध्ये फिरतो आहे. आणि तिथे एखादा तरी प्रामाणिक कार्यकर्ता भेटतोच. निदान गावात इतकी चांगली गोष्ट आहे. परंतु तो चांगुलपणा स्वीकारण्याइतका वा कबूल करण्याइतका नम्रपणा आपल्यामध्ये नाही. ज्याला स्थानिक पक्षांमध्ये काम करायचे असेल त्याने तर वेगळेच राहायला पाहिजे. आणि सर्व पक्षांची वा कोणत्याही पक्षात नाही अशाची जर मदत मिळत असेल तर तिचा नम्रपणे स्वीकार केला पाहिजे. आपल्या गावांमध्ये ऐक्य स्थापित होऊ शकते या दृष्टिनेच मी प्रत्येक गावात माझ्या एकेका सहकाऱ्याला ठेवले आहे. आणि हे जे कार्यकर्ते आहेत त्यांना जर बंगाली येत नसेल तर अपवाद म्हणून त्याच्याबरोबर दुभाषा म्हणून दुसरा सहकारी ठेवला आहे. याचा लाभ होत असल्याचे मला दिसते आहे. आपल्याला उतावीळपणाने निर्णय घेण्याची फार वाईट सवय आहे. बाहेरच्या मदतीशिवाय काम होऊ शकत

नाही ही खोटी गोष्ट आहे. जी काही स्थानिक मदत मिळेल ती घेऊन आपण जर स्वतः एकटेच धैर्याने आणि समंजसपणे कार्य करू तर आपण यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही. आणि असे असूनही जर यश मिळत नसेल तर इतर कोणात (कोणत्याही व्यक्तीत वा काळात) दोष पाहण्यापेक्षा आपण स्वतःमधील दोष पाहणे शिकायला पाहिजे. असे केले तर आपली उन्नती होईल. याबद्दल मला किंचितही शंका नाही.

हे घर योगेशचंद्र मजमुदार यांचे आहे. या गावात १२६८ मुसलमान ८६५ हिंदू आहेत. बरीच घरे जळालेली आहेत. लीगच्या नावाने पैसे घेतले आहेत. जवळपास सर्वांना बळजबरीने मुसलमान करण्यात आले आहे. हिंदूत बरेच कोष्टी (विणकर) आहेत. श्रीमंत लोक तर मोठ्या प्रमाणात बाहेर गावात आहेत.

जेवणात चिमुटभर मुरमुरे, पाच बदाम, दोन काजू, भाजी आणि आठ औंस दूध घेतले. दुपारी दोन वाजता नारळाचे पाणी. सायंकाळी प्रार्थनेच्या आधी आठ औंस दूध आणि त्यात एक चमचा खारकेचा चुरा टाकायला लावला. प्रार्थनेनंतर वर्तमानपत्रे ऐकत असताना गरम पाणी आणि त्यात चहान चमचा भरून मध घेतले. सायंकाळी जवळपास अडीच मैल फिरले. पाऊणेदहा वाजता बापूजी अंथरुणावर पडले आणि झोपले. मला झोपायला साडोदहा वाजले.

विजयनगर,

१० - २ - '४७

या गावात दोन दिवस राहायचे आहे. यामुळे प्रार्थनेनंतर आज विशेष असे कोणतेही काम नव्हते. रोजप्रमाणे प्रार्थनेकरिता उठलो. तोंड वगैरे धुतल्यानंतर बापूजींनी प्रार्थना करून बंगालीचा पाठ केला. आणि मौनदिवस असल्यामुळे . . . ला आणि . . . ला मननीय पत्रे लिहिली.

माझे पडसे अजून गेले नाही. यामुळे बापूजींनी एका चिठ्ठीवर लिहिले -

हे पडसे दूर करण्याकरिता तू काही उपाय शोधला पाहिजे. रामनाम तर रामबाण औषध आहेच. त्याने हे पडसे जायलाच पाहिजे. असे असले तरी छातीवर आणि गळ्यावर जर काही पट्टा बांधला तर थोडे बरे वाटते हे कबूल करावेच लागेल. निसर्गनियमांचा भंग व्हायला नको हा रामनामाचा एक नियम आहे. हा विचार तू समजून घे.

बरोबर सातपस्तीसला फिरायला निघालो. गोपीनाथपूरला जायचे होते. पंचेचाळीस मिनिट चालूनही आम्ही गोपीनाथपूरला पोहोचलो नाही. यामुळे बापूजींनी विचारले, "अजून किती दूर आहे?" उत्तर मिळाले, "दहापंधरा मिनिट असेल." "अशा प्रकारे जाण्यायेण्यात सहज दोन तास निघून जातील. असे चालत गेलो तर आपली यात्रा पूर्ण होणार नाही. सर्व काही नियंत्रणात असले पाहिजे." यामुळे इथून आम्ही परत फिरलो. आलो तेव्हा ८.५५ होऊन गेले होते. आल्यानंतर बापूजींचे पाय धुतले. बापूजींची मालीश सुरू असताना ते ३० मिनिट झोपले. शिवाय आज मौन दिवस असल्यामुळे अगदी शांत शांत वाटते.

बापूजींनी दुपारच्या जेवणात एक खाकरा, भाजी, आठ औंस दूध, आणि एक ग्रेपफ्रूट घेतले. दुपारी नारळाचे पाणी घेतले. बापूजींचा जवळपास संपूर्ण दिवस लिहिण्यात आणि वाचण्यातच गेला.

एक भाई बापूजींना म्हणाले की एक मुसलमान व्यापारी खरा तराजू ठेवत होता आणि एक हिंदू व्यापारी खोटा तराजू ठेवत होता. एवढ्यावरून मुसलमान व्यापारी प्रामाणिक आहेत आणि हिंदू व्यापारी प्रामाणिक नाहीत असे तर म्हणता येत नाही ना?

बापूजींनी उत्तर दिले, "या अपूर्ण जगात कोणतीही एक जमात पूर्णपणे प्रामाणिक नाही. तसेच कोणतीही एक जमात पूर्णपणे अप्रामाणिकही नाही. कोणी जर आपल्या ग्राहकाची

फसवणूक करत असेल तर ती व्यक्ती अप्रामाणिक आहे. परंतु यावरून संपूर्ण जमातीला कसे अप्रामाणिक म्हणता येऊ शकते हे मला कळत नाही."

**प्रश्न - तुम्ही म्हणाला होता की जोपर्यंत इथे परिपूर्ण शांतता आणि एकोपा प्रस्थापित होत नाही तोपर्यंत तुम्ही इथे राहाल आणि आवश्यकता पडली तर मरणही पत्कराल. इतका दीर्घ काळ तुम्ही इथे मुक्काम केला तर त्यामुळे हिंदुस्थानचे आणि जगाचे लक्ष विनाकारण नोआखालीकडे वेधले जाईल आणि अनेक दिवसांत नोआखालीत कोणतीही अवांछित घटना घडली नसतानाही नोआखालीत अजूनही अत्याचार सुरू आहेत असा समज पसरणार नाही काय?**

उत्तर - कोणताही निष्पक्ष माणूस माझ्या उपस्थितीवरून असा खोडसाळपणाचा निष्कर्ष काढू शकणार नाही. मी इथे तुमचा सेवक आणि मित्र म्हणून आहे. नोआखाली हे एक असे सुंदर ठिकाण आहे की इथे जर हिंदू आणि मुसलमानाचे ऐक्य झाले व ते मैत्रीभावाने राहू लागले तर हे ठिकाण स्वर्गाचे रूप धारण करू शकेल अशी प्रसिद्धी माझ्या उपस्थितीमुळे निश्चितच झाली आहे. शक्य आहे की अहिंसेची माहिती नसलेला एक अपयशी माणूस अशी अखेरीस माझी नोंद होईल. याशिवाय हिंदूंनी आणि मुसलमानांनी आपसात अंतःकरणापासूनची मैत्री केली असल्याचे मला दाखवून दिले तर मला नोआखालीत राहण्याची आवश्यकताच राहणार नाही. परंतु मला हे सांगताना खेद होतो की अजूनही जशी पाहिजे तशी परिस्थिती निर्माण झालेली नाही.

**प्रश्न - मुसलमानांनी चांगल्या वर्तनाचे अभिवचन दिल्यानंतर आणि संधी मिळाल्यानंतर त्याप्रमाणे आचरण करून दाखवल्यानंतरही हिंदू जर आपल्या घरी परतत नाहीत तर यातून तणावपूर्ण वातावरणाचे नकली अस्तित्व दाखवण्याचा हिंदूंचा हेतू असावा असे तुम्हाला वाटत नाही काय?**

उत्तर - तणावपूर्ण वातावरणाचे नकली अस्तित्व दाखवण्याकरिता अनेक हिंदू जाणूनबुजून घरापासून दूर राहत आहेत यावर माझा विश्वास नाही. फार मोठे प्रलोभन दिल्याशिवाय कोणताही माणूस आपल्या घरापासून दूर राहणार नाही. अशा प्रकारच्या कोणत्याही प्रलोभनाबद्दल मी ऐकले नाही. भीती आणि संसार चालवण्याच्या साधनांचा अभाव त्यांना घरापासून दूर ठेवत आहे. असे असले तरी परतणारांची संख्या समाधानकारक आहे असे अधिकाऱ्यांनी मला सांगितले आहे. याहून जास्त लोकांना आम्ही सांभाळू शकणार नाही असेही ते म्हणाले. स्पष्ट दिसणारी अशी कारणे असताना सिद्ध करता येणार नाही असे निष्कर्ष काढण्याचे काही कारण नाही. आणि अशा प्रकारे त्यांना उत्तेजित करणारे काही लोक असतील तर त्यांना शिक्षा करण्याकरिता कायदा आहे. मिठाईच्या गोडव्याचा पुरावा खाण्यातून मिळतो. हे कामही तसेच आहे. ही भीती तर तेव्हाच जाईल जेव्हा लपत फिरणारे गुन्हेगार बाहेर निघतील आणि आपला अपराध कबूल करून त्याचे प्रायश्चित्त घेतील. असे होईल तेव्हा भीतीने घाबरलेले हिंदू भयमुक्त होऊन शांततेचा अनुभव घेतील.

मी तर इथे माझ्या अहिंसेच्या परीक्षेत उत्तीर्ण होण्याकरिता आलो आहे. अहिंसेत अपयशाला स्थानच नसते. मी एक तर करेन अथवा मरेन. ज्याच्या अंतःकरणात दोन्ही जमातींविषयी वा मानवजातीविषयी ऐक्याची - मैत्रीची तीव्र ओढ असेल त्याच्याकरिता अशा अहिंसेशिवाय दुसरा मार्गच असू शकत नाही, आणि माझ्याकरिता तर मुळीच नाही.

आज जेवणात केवळ एक औंस गूळच घेतला.

येथील स्थानिक कार्यकर्त्या असलेल्या दोन भगिनींचे बोट रात्री गरम पाण्याने पोळले होते. मी त्यांच्याकरिता व्हॅसलीन आणायला जात होते. बापूजींना सांगितले. नाही म्हणाले. “म्हणाले गावातील लोकांना या इलाजाचा उपयोग काय? माती लाव, कळीचा चुना लाव आणि तेलाचा लेप लाव.” मला म्हणाले, “स्थानिक कार्यकर्ते अशा प्रकारे जर जाणीवपूर्वक विदेशी औषध वापरत असतील तर याचा गावकऱ्यांवर काय परिणाम होईल? उलट गावकरी एक वाईट

पद्धत शिकतील. ज्याप्रमाणे चहा, बिडी इत्यादी गावात पोहोचले आहेत. हा दोष कोणाचा आहे? गावकऱ्यांचा नाही, शहरी लोकांचा आहे.” त्या कार्यकर्त्या भगिनींना मातीमुळे शांतही वाटले. झोपण्यापूर्वी रात्री दहा वाजता मी त्यांची विचारपूस करायला गेले तेव्हा त्या आराम करत होत्या.

बापूजींच्या प्रत्येक कामात सूक्ष्म पाठ तर असतोच. आणि तो एकच नसतो, वैविध्यपूर्ण असतो.

आधीच्या बहिणींची विचारपूस केल्यानंतर बापूजींच्या डोक्यात तेल चोळले, पाय दाबले, टपाल लिहिला आणि मग मीसुद्धा झोपले.

हैमचंडी,

११ - २ - ‘४७

आज आता उठलोच होतो तर निर्मळदांनी . . . ची आलेली तार वाचून दाखवली. प्रार्थनेनंतर लगेचच तिचे उत्तर बापूजींनी तयार केले. दवामुळे चूल लवकर पेटत नसल्यामुळे गरम पाणी व्हायला वेळ लागला. यामुळे रससुद्धा उशीरा घेतला. रस घेतल्यानंतर लगेल पदयात्रा सुरू झाली.

विजयनगर सोडण्याआधी येथील संडास कसे आहेत आणि त्यांची साफसफाई कशी असते याचे बापूजींनी निरीक्षण केले. काही सूचनाही केल्या. एकूण त्यांचे समाधान झाले.

रस्त्यात जीवणसिंगजींनी पैगंबरसाहेबांची काही वचनामृत सांगितले. हे वचनामृत केवळ मुसलमानांनाच लागू होणारे नव्हते. ते तर संपूर्ण मानव जातीने मनन करावे असे होते

१. मुसलमानांवर वा इतर कोणत्याही जातिजमातीवर जुलूम होत असेल तर त्यांच्या मदतीकरिता पोहोचायला पाहिजे.

२. जे व्यभिचार करतात, चोरी करतात, दारू पितात वा लूट करतात वा पैशाच्या व्यवहारात फसवणूक करतात ते खरे मुसलमान नाहीत आणि माणूसही नाहीत. यामुळे हे माणसा तू जागा हो आणि सावध हो.

३. ज्याचे स्वतःच्या मनावर आणि जमातीवर नियंत्रण असते त्यांचा विजय सर्वश्रेष्ठ विजय असतो.

४. जो माणूस व्यभिचार करतो त्याला ईश्वर स्वतःपासून दूर करतो. (त्याच्याबरोबर प्रभू नसतो तर सैतान असतो.)

५. माणसांमधील सर्वात दुष्ट माणूस दुष्ट विद्वान असतो. अशिक्षित सज्जन सर्वात चांगला माणूस असतो.

६. ज्याच्या जिभेने वा हाताने मानवजातीला वा कोणत्याही माणसाला इजा होत नाही तो पूर्ण मुसलमान वा माणूस असतो.

७. जो माणूस ईश्वराने प्रभूच्या निर्मितीबद्दल दयाभाव ठेवतो त्याच्यावर ईश्वर खुश असतो.

८. जो माणूस विश्वासघातकी तर नसतोच, पण एखाद्या शत्रूनेसुद्धा त्याच्यावर जर विश्वास ठेवला तर जो त्याच्या मदतीकरिता धावून जातो, जो आपले वचन पाळतो तोच खरा माणूस.

९. जो खोटा बोलतो वा वचनभंग करतो त्याला मी माझा समजत नाही.

१०. माणूस स्वतःसाठी जी इच्छा करतो तीच इच्छा जर तो आपल्या भावडांकरिता करत नसेल तर तो खरा माणूस नाही, खरा मुसलमान नाही.

११. जो स्वतःकरिता श्रम करत नाही, वा इतरांकरिता मेहनत करत नाही त्याला ईश्वर फळ देत नाही.

१२. उपवास करून वा संयमाने वागून माझे अनुयायी ब्रह्मचारी होतात, होऊ शकतात.

१३. माणसाचे अर्धांग स्त्री आहे.

१४. साध्वी स्त्री जगातील सर्वात मूल्यवान, भव्य आणि उत्तम गोष्ट आहे.

१५. ज्याला कळते आणि जो त्याप्रमाणे चालतो तोच खरा ज्ञानी असतो.

१६. स्त्रियांवर हात उचलू नका, कुदृष्टीने पाहू नका, तुमच्या पत्नीशिवाय सर्व स्त्रिया तुमच्या माता, बहिणी वा मुलीप्रमाणे आहेत.

बापूजी म्हणाले, "सुदैवाने सर्व धर्मशास्त्रांमध्ये असे बहुमूल्य नियम सांगितलेले असून प्रत्येक माणूस सुखी कसा होईल याचा मार्ग त्यांच्यात दाखवला आहे. त्यानुसार आचरण केले, त्यांचे मनन केले तर आज जगात ज्या श्रेष्ठ जमाती गणल्या जातात त्यांच्यात आपला पहिला क्रम लागू शकेल."

पाय धूत असताना बापूजी मला म्हणाले, "पैगंबर साहेबांचे हे वचन कंठस्थ कर, दररोज सकाळी यांचे मनन करून त्यातील कितींचे पालन केले आणि कितीचे नाही याचा सायंकाळी हिशेब करून त्याप्रमाणे जर कोणी चालेल तर माझी खात्री आहे की पंधरा दिवसांत त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्व काही आगळेवेगळे होऊन जाईल."

मालीशची तयारी करण्यात मला रोजपेक्षा जास्त वेळ लागला. यामुळे बापूजींना बरीच पत्रे (गुजरातीत) लिहून टाकली. आज इथे एका झोपडीशिवाय दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची व्यवस्था नव्हती. यामुळे बरेचसे नव्याने आणि स्वतःच करावे लागले. जवळपास आठवड्यापासून सर्दी आणि ताप सुरू आहे. त्यात आज निर्मळदाने क्विनाईनची गोळी दिली, ती घेतली. निर्मळदांनी स्वतःचे काम सोडून माझ्या कामात बरीच मदत केली. हुनरभाईंनी भाजीत सुधारणा केली. बापूजींकरिता कुकर लावला आणि त्यांची मालीश केली. सर्व हातोहात काम करून राहिले आहेत. निर्मळदा तर कलकत्ता विद्यापीठात मोठ प्राध्यापक आहेत. परंतु चूल

पेटवायला बसले. अशा प्रकारे आमच्या मंडळीत म्हणा वा कुटुंबात खूप ऐक्य आहे. आणि मी सर्वात लहान असल्यामुळे माझ्याबद्दल सर्वांना अपार सहानुभूती आहे.

मला 'न्युमोनिया' होईल अशी बापूजींना भीती वाटते आहे. मला म्हणाले, "आज जर तुला ताप चढला तर तुला 'वेटशीट पॅक' द्यावाच लागेल. मणिलाल वाचायची तर आशाच नव्हती आणि मी जोखीम घेऊन त्याच्यावर हा प्रयोग केला आणि तो चांगला झाला. कदाचित आठवडाभरही तुझा ताप आणि सर्दी जाणार नाही. तोपर्यंत स्वस्थ बसून का राहत नाही?"

मी नाही म्हणाले.

बापूजी म्हणाले, "तू मला वचन दिले आहे की मी म्हणेन तसे तू करशील. असे असूनही तू जर वचन पाळणार नसशील तर मी तुला सोन्याच्या भावनाने तोलणार नाही, तांब्याच्या भावाने तोलेन."

बापूजी लहान लहान म्हणवल्या जाणाऱ्या गोष्टीतही वाक्प्रचारांचा सुंदर उपयोग करून हसवतात आणि काम काढून घेतात. आणि याहूनही भव्य पाठ तर हा आहे की पैगंबरसाहेबांच्या आजच्या ज्या वचनाचा बापूजींना मनन करायला लावायचे होते त्याचा एक नियम आहे. त्याचीही बापूजींनी आठवण करून दिली.

दुपारच्या जेवणात दोन खाकरे, भाजी आणि आठ औंस दूध घेतले. बापूजींचे गोळा झालेले कपडे धुतले आणि त्यांच्या पायाला तूप चोळले. बापूजींनी मला झोपायला सांगितले आणि झोपायच्या आधी देशी ॲन्टिफ्लोजेस्टाईनचा - माती चाळून गरम केली, त्यात सुंठ, हळद आणि ओव्याची बारीक केलेली पूड आणि मीठ हे सर्व टाकून खूप चांगले कालवले, ते गरम केले आणि गरमगरमच छातीवर तसेच फासळ्यांवर लावून मी झोपले. आणि मगच बापूजी झोपले. बापूजीं मायाळूपणाने काळजीपूर्वक प्रत्येक रुग्णाच्या शुश्रुषेकडे लक्ष घालत असतात.

सायंकाळी बाबा (सतीश चंद्र दास गुप्ता) आणि हेमप्रभाबहेन (सतीश चंद्र दास गुप्तांची पत्नी) आले.

सायंकाळ झाल्यानंतर कामकाज हळूहळू संपवले. सायंकाळी प्रार्थनेला गेले तेव्हा ताप भरेल असे वाटत होते. पण प्रार्थनेनंतर बापूजींनी खारकेचा एक औंस चुरा टाकलेले दूध दिले. शिवाय तीन संत्री दिली. मग झोपले. बापूजींनीच ताप घेतला. १०५ होता. खूप डोके दुखत होते. आज १५ ग्रॅम क्विनाईन पोटात गेल्यामुळे कदाचित ताप येणार नाही असे निर्मळदांना वाटत होते. पण बरोबर वेळ झाल्यानंतर आलाच. बाबा, मां बसलेलेच होते.

बापूजी हसत हसत म्हणाले, "तू तर एखाद्या गुन्हेगाराप्रमाणे साळसूदपणे झोपली आहेस." आणि मला 'वेटशीट पॅक' घ्यावाच लागला. खूप गाढ झोप लागली. रात्री साडेबाराच्या अंदाजात उठले. मी घामाने ओलीचिंब झाले होते. बापूजींनी शैलेनभाईना वर्तमानपत्रे वाचून दाखवायला सांगितले. आणि मग बापूजी स्वतःही झोपून गेले. साडेबारा वाजता मी जागी झाले आणि बापूजींनी ताप मोजला. नॉर्मल होता. उठून बापूजींचे अंथरूण लावले. मग बापूजींचे पाय धुतले, पाय दाबले. तेल चोळले. मग सकाळकरिता दात घासायचा कुंचला तयार केला आणि त्यानंतर मी आणि बापूजी दोघेही एक वाजता झोपलो. इतकी गाढ झोप लागली की सकाळीच उठलो. तेही निर्मळदांनी उठवले तेव्हा बापूजी उठले आणि मग त्यांनी मला उठवले.

प्रार्थनेनंतर बापूजींनी मला एखादी आई जशी मायाळूपणे समजावून सांगते तसे मला शरीरासंबंधी समजावून सांगितले. त्यातील जितके काही इतर भगिनींनी समजून घेण्यासारखे आहे ते थोडक्यात सांगते -

खोट्या लाजेमुळे मुली आपले शरीर खराब करत असतात. त्यातही हिंदुस्थानात ही संख्या फार मोठी आहे. भगिनी एक तर हे विसरतात वा त्यांना कळतच नाही की आजची मुलगी उद्याची आई होणार आहे. यामुळे प्रत्येक हिंदुस्थानीवर ही जबाबदारी आहे. स्त्री जसे देशाला संत वा थोर

पुरुष देऊ शकते तसेच ती लुच्चेलफंगे कत्तल करणारेसुद्धा देऊ शकत असते. . . . जेव्हा आपली मुलगी तेरापंधरा वर्षांची होते तेव्हा हसणाऱ्या खेळणाऱ्या या मुलीला जसे अजून विशेष समंजत नाही तसेच तिला काहीही कळत नाही अशीही ती नसते. यामुळे तिला या वयात आईवडिलांच्या सर्वाधिक प्रेमाची गरज असते. आणि ही जबाबदारी विशेषेकरून आईची असते. परंतु आपल्या समाजात उलट आहे. ही मुलगी मोठी झाली की अबला वाटू लागते. सामाजिक दृष्टीने ती अपराधी तर नाही ना असे तिच्याशी वर्तन होऊ लागते. कुठे बाहेर जाण्याची तिच्यावर मनाई असते, अशा करुण परिस्थितीचा परिणाम तिच्या कोमल मनावर होत असतो.

असेच आजकालचे मुलींचे पोषाख विनाशक आहेत. त्या इतके काही घट्ट बसणारे कपडे घालत असतात की त्यांना पाहून मला त्यांची कीव वाटू लागते. त्या पूरेसा श्वासोच्छ्वासही करू शकतात की नाही याबद्दल मला शंका वाटते. आजकाय फॅशनचे युग आले आहे. मुलींना आपल्या शरीराच्या रक्षणापेक्षा फॅशनचे रक्षण करणे जास्त महत्त्वाचे वाटते ही आपली किती दयनीय परिस्थिती आहे? आणि या सर्वांचे कारण त्या शरीराने अतिशय दुर्बल झाल्या आहेत. ज्या भगिनी काहीही न करता आपली मर्यादा सांभाळून, जसे की आपले शरीर निरोगी करतील आणि आपल्या रितीरिवाजात, खाण्यापिण्यात, वर्तणुकीत, पेहरावात, वाचनात, कामात, शिकण्यासवरण्यात, राहणीत संपूर्ण साधेपणा आणि सात्विकता अवलंबितील, आणि या गोष्टी अवलंबिणे अगदी सहजशक्य आहे, तर माझी खात्री आहे की आपल्या स्त्रिया गामासारख्या पहेलवानांना वा दयानंद सरस्वतींसारख्या बहाद्दूर संतांना (जे आपल्याच स्त्रियांची संतती होते) प्रसवू शकतील. पण आजकाल तर हाडबंडल मुले होत आहेत. मला तर ऐऱ्यागैऱ्या स्त्रियांकडून हे अपेक्षीत नाही. आदर्श भगिनींकडूनच मात्र मी ही गोष्ट अपेक्षितो. पण आज तर ही गोष्ट आकाशपुष्पासारखी झाली आहे. यात पुरुषांचाही अपराध काही कमी नाही. परंतु एकाला कळत नसेल आणि दुसऱ्याला कळत असेल तर काय गोष्ट राहिली? अशी तीव्र

इच्छा ठेवणारा मी तुझी आई झालो आहे. आणि जर मी तुला हे शिकवू शकणार नसेन तर असा विचार करण्याचा मला अधिकार नाही असे मी समजेन. यामुळेच तू न घाबरता निर्भयपणे राहतेस याचा मला आनंद होतो, याचे मला मूल्य आणि महत्त्वही कळते. जोपर्यंत तू माझ्या हातात आहेस तोपर्यंत मी तुला शिकवणे थांबवणार नाही. असे करण्यात माझा वेळ मुळीच वाया जात नाही. परंतु मी असेही समजतो की करोडो भगिनींमध्ये जिची मी आई झालो त्या एकाच मुलीची प्रगती करून मी आईचा आदर्श जर उभा करू शकलो तर संपूर्ण जगातील मुलींची सेवा केल्याचे आत्मसमाधान तरी मला मिळेल ! पुरुषांना मी एक नवीन पाठ शिकवीन की त्यांच्या बहिणींची, मुलींची आई होऊन त्यांना आदर्श शिक्षण देणे शिकावे आणि मी असे समजतो की आत्मसमाधान मिळवण्याकरिता इतरांनी कितीही जरी आपल्यावर टीका केली तरी ती सहन करायची, दुःख सहन करायची जर माणूस तयारी ठेवील तर इतरांची पर्वा करायची त्याची सवय आपोआपच कमी होईल. पर्वा करायलाही नको. आत्माच परमात्मा आहे. तर मग परमात्या मिळवण्याकरिता वाटेल तितक्या अडचणी सहन करण्याची माणसाची तयारी का असू नये? आणि माणसाला खुश करण्याकरिता तो नाचवील तसे तिने नाचायला पाहिजे काय? हो पण यालाही सीमा आहेत. कोणाला दारू पिऊन वा व्यभिचार करून समाधान मिळते असे समजून आणि इतर काही म्हणत असतील तर तो ऐकत नसेल तर हा एक नवीनच अहंकार आणि खोटेपणा होईल हे तर तुला कळते ना? परंतु शुद्ध भावनेचे- हृदयाच्या अंतर्हृदयातील परमेश्वराचे समाधान करणे माणसाचे आद्य कर्तव्य आहे. आणि तेच करायचा मी प्रयत्न करतो आहे. या गोष्टीला या यज्ञाचा मी अविभाज्य भाग समजतो. याबाबतीत माझी कितीही कठोर सत्त्वपरीक्षा होत असेल तरी त्याकरिता मी तयार आहे. या परीक्षेत कदाचित मी अनुत्तीर्णही झालो तरी काय? अखेरीस तर सर्व काही ईश्वराधीन आहे. ईश्वराशिवाय मला इतर कोणीही साक्षीदार नको. यशापयशाची

काळजी आपण का करायला पाहिजे? आणि यांत कदाचित कशाचा तरी दंभ असू शकेल, तुसुद्धा कशाचा तरी दंभ करत असू शकशील. आपल्याला कदाचित ते माहीतही नसेल, परंतु जगाला त्याची कल्पना असू शकेल. हा यज्ञ काही आगळावेगळा आहे. प्रेमाने जिंकून बंधभाव शिकवण्याकरिता मी तपश्चर्या करतो आहे. आणि यात दंभाला स्थान असूच शकत नाही. आणि जर असेलही तर तो आपोआप उघड होईल आणि जगाला ते कळल्यानंतर ते माझ्यावर टीकेचा वर्षाव करील. असे जरी झाले तरी ते आपल्याकरिता तर श्रेयस्करच आहे. जगाकरिताही श्रेयस्कर असेल. जगाला पाठ मिळेल की हा तर दंभी महात्मा होता. मग परत जग कोणालाही महात्मापद देणार नाही. जगाकरिता दोन्ही दृष्टींनी ही गोष्ट श्रेयस्कर असेल. मी एक तर खरा महात्मा असेन वा खोटा महात्मा असेन. जर मी खरा महात्मा असेन तर जगाला माझ्या महात्मेपणातून काही शिकायला मिळेल आणि अशा प्रकारे जगाचा लाभच होईल. आणि जर मी खोटा महात्मा असेन तर यानंतर परत हे जग कोणालाही सहजपणे महात्मापद देणार नाही. यातून ते सावध होईल. ही एक अधिक मिळून दोन होतात तशी स्पष्टपणे दिसणारी गोष्ट मी समजावून सांगण्याचा प्रयत्न करतो आहे.

पाणी पीत असताना बारा तारखेच्या सकाळी बापूजींनी याप्रमाणे निरव शांततेत एका श्वासात आपल्या हृदयात सुरू असलेले विचारमंथन मला सांगितले. त्यातील एकेका शब्दातून, एकेका वाक्यातून त्यांच्या हृदयातील वात्सल्यभाव उचंबळून बाहेर येत असलेला दिसून पडत होता. त्याच्या चेहऱ्यावरील अशाच सखोल गांभीर्यावरून माझ्यारूपाने जणू काय संपूर्ण स्त्रीजगताचे कल्पनाचित्र त्यांच्या चेहऱ्यावर उमटून ते ओसंडत असल्यासारखे वाटत होते. आणि याकरिता कारणही होते. ते स्वतः जबाबदार स्त्रीउद्धारक होते.

कफिलातली,

१३ - २ '४७

सकाळी गरम पाणी प्याल्यानंतर बापूजी जे म्हणाले होते ते मी कालच्या रोजनिशीत, पण आज लिहिले. यामुळे ते सर्व तिच्यात आले. आज सकाळच्या प्रार्थनेनंतर बापूजींचे टपालवाचत पूर्ण होण्याआधी सकाळच्या वेळीच मी कालच्या नोंदी करून टाकल्या होत्या.

साडेसात वाजता हैमचंडी सोडले. रस्त्यात फेड्रल युनिटने थांबवले. हे लोक फार सेवाभावनेने काम करत असल्याचे पाहून बापूजी खुश झाले.

आज मला पूर्णपणे बरे वाटते आहे. (देशी ऍन्टीप्लोजेस्टाईनमुळे) गरम मातीच्या लेपामुळे. हा लेप एकच दिवस लावला तरी त्याने खूप चांगले काम केले. कफ एकदम मोकळा झाला. आणि याकरिता पैचासुद्धा खर्च नाही !

इथे येत असताना रस्त्यातसुद्धा सकाळचीच गोष्ट पुढीलप्रमाणे समजावून सांगत बापूजी म्हणाले -

> "मी तुला घडवून राहिलो आहे. यात यश मिळो की अपयश. कुंभार ज्याप्रमाणे एखादे मातीचे भांडे तयार करतो तेव्हा त्याला कुठे माहीत असते की भट्टीत टाकल्यानंतर हे तडकेल की तुटेल? तो तर बिचारा सुंदर भांडी तयार करून त्यांना उत्साहाने भट्टीत टाकत असतो. त्यांतील किती तरींची तूटफूट होत असते, कितीतरी तडकत असतात आणि काही भांडी सुंदर भाजली जातात. अशा प्रकारे मी तर राहिलो कुंभार. कुभाराप्रमाणे चांगली आशा ठेवून मी तुला घडवतो आहे. ते जर फुटले वा तडकलेबिडकले तर तुझे आणि माझे नशीब. वा तू म्हण की मी, आपण काय करू शकतो? यामुळे आपण याची काळजी करण्याचे काही कारणच नाही. आपण तर आधीच्या कुंभाराप्रमाणे माती चांगली आहे की नाही, तिच्यात खडे वगैरे तर नाहीत ना, घाट सुंदर आहे ना आणि ते चांगले

भाजले गेले की नाही इतकेच पाहायचे असते. अशाच प्रकारे आपण या यज्ञात सत्यता, शुद्धता, निर्मळता आहे की नाही, कुठे दंभ तर नाही ना हे पाहिले पाहिजे. क्षणोक्षणी विचार करून पुढील पाऊल टाकले पाहिजे. आपल्या अंतःकरणाला दहा वेळा विचारले पाहिजे. कोणाला चांगले वाटते की वाईट याचा विचार न करता आपण विवेकाचा वापर केला पाहिजे. जे खरे असेल तेच केले पाहिजे. मी असे समजतो की माझ्याजवळ अशी माती आहे. यामुळे घट घडवण्यात मला त्रास होणार नाही. मातीत जर खडे असतील (म्हणजे तुझ्यात किंचितसुद्धा दोष असेल तर) तर ते घट घडवण्याच्या आडवे येतील. तू माती आहेस आणि मी गट घडवणारा आहे. मी लिहून तुझे वर्णन केले आहे. . . . करिता तुला सावध करत राहिलो आहे. तुला मला जर काही विचारायचे असेल तर तू ते न घाबरता विचारू शकते. पण सत्याकरिता संघर्ष करण्यातच माझे मन रमते. यामुळे कोणत्याही लढाईत माझा पराभव होत नाही. आतापर्यंत तरी ईश्वर मला निभवून घेतो आहे.

"तू पाहत असशील की मी बरेच असे काही केले आहे, बरेच तोडले आहे. साबरमती आश्रमासारखा आश्रम तोडून टाकायला मला वेळ लागला नाही. यामुळे अशा प्रकारे मला मातीत जर लहानसाही खडा आढळला तर आधीचा कुंभार जसे आपले भांडे तोडून टाकायला वेळ लावत नाही त्याचप्रमाणे मीही त्या वेळी तसेच करायला वेळ करत नाही. तू सतत जागृत राहावे म्हणूनच हे सर्व मी तुला सांगतो आहे."

सकाळी बापूजी ज्या गोष्टी सांगत होते त्यापेक्षाही आताच्या गोष्टी मला खूप गंभीर वाटल्या. बापूजींबरोबर राहणे म्हणजे तीक्ष्ण तलवारीच्या धारेवर चालण्यासारखे नाही काय? या कठोर परीक्षेतून उत्तीर्ण होण्याची शक्तीसुद्धा ईश्वर मला देतोच आहे. ही त्याची असीम कृपा आहे.

सुशीलाबहेन 'रेड क्रॉस सेंटर'मध्ये होत्या. तिथून त्या आमच्याबरोबरच इथे आल्या. कस्तुरबा ट्रस्टची सभा असल्यामुळे तिच्यात हजर राहण्याकरिता त्यांना दिल्लीला जायचे आहे.

सुशीलाबहेननी बापूजींचा रक्तदाब मोजला. १९२-११० होता.

इथे साडेसात वाजता पोहोचलो. मालीश, आंघोळ वगैरे आटोपता आटोपता अकरा वाजून गेले. जेवणात दोन खाकरे, दूध, संदेशचा एक लहानसा काप आणि ग्रेपफ्रूट घेतले. सुशीलाबहेन दिल्लीला जात असल्यामुळे त्यांच्याबरोबर पाठवण्याकरिता जेवण करताकरता काही पत्रे तयार केली. साडेबारा ते एक आराम केला. मग कातले. कातता कातता पत्रे लिहवून घेतली. अडीच वाजता नारळाचे पाणी घेतले. साडेतीन ते चार माती घेतली. आज डोक्याला आणि पोटाला असे दोन पट्टे बांधले. मुलाखतींकरिता येणारे तर सुरूच होते. असे असूनही दहा मिनिट एक डुलकी घेतली होती. प्रार्थनेनंतर वाफाळलेले एक सफरचंद आणि आठ औंस दूध घेतले.फिरून आल्यानंतर वर्तमानपत्रे ऐकली, टपाल ऐकला. रात्री गरम पाणी आणि मध घेतला.

रात्री बापूजींना चांगलाच थकवा वाटत होता. पाऊणेदहा वाजता अंथरुणावर पडले.

बापूजी झोपल्यानंतर मी थोडीशी जरी जागी राहिले तरी बापूजींना ते आवडत नाही. यामुळे ते झोपण्याआधीच सर्व काम आटोपण्याचा प्रयत्न करते आहे.

पूर्व केरवा,

१४ - २ - '४७

रोजप्रमाणे बापूजी प्रार्थनेकरिता साडेतीन वाजता उठले. तोंडवगैरे धुऊन बापूजींनी बंगालीचा पाठ केला. माझी दैनंदिनी ऐकून सही केली. थोडा वेळ टपालाचे कामकाज केले. थकवा जाणवल्यामुळे बापूजी सव्वासहा वाजता झोपले. सव्वासात वाजता उठले.

आजच्या बापूजींच्या लेखनात होते, “ज्या माणसाला अनितीमान लोकांबद्दल आदर वाटतो तो सहवासाकरिता पात्र नसतो. तो कितीही किंमत देत असला तरी त्याला अर्थ नसतो. आतापर्यंत तरी ईश्वराने मला वाचवले आहे. माणसाने केलेल्या शिक्षेचे तर मी पान केलेले आहे.”

बापूजी ईश्वरात किती लीन झालेले आहेत हे आजच्या त्यांच्या वेगवेगळ्या लेखनावरून लक्षात येते.

. . . वर चौकशी आयोग बसवण्यासंबंधी बापूजींनी आपला अभिप्राय कळवला. बापूजींचे मत होते की ज्या गोष्टीच्या पायात सत्य असते त्या गोष्टीवर जर कोणताही आरोप करण्यात आला तर त्याची चौकशी जर एखाद्या तटस्थ पंचाद्वारे होत असेल तर त्याबद्दल कोणताही आक्षेप असायला नको. उलट त्याने चौकशीकरिता लवाद नेमण्याचा आग्रह ठेवला पाहिजे. सत्याला कोणीही गालबोट लावू शकत नाही.

आम्ही साडेसात वाजता कफिलातली सोडले आणि आठवाजून दहा मिनिटांनी इथे पोहोचलो. गाव फार जवळ होते.

आज थंडी आणि ढगाळ आहे. इथे येऊन बापूजींचे पाय धुतले. मग बापूजींनी शैलेनभाईजवळील बंगाली शैक्षणिक पुस्तकातील काही कविता वाचल्या आणि त्यांचा अनुवाद केला. बंगाली येणाऱ्या कोणलाही बापूजी गुरू करतात, मग तो मोठा असो की लहान मूल असो.

वारा होता. ढगाळ होते. यामुळे मालीश घरातच केली. आंघोळीनंतर आज जेवणात खाकरे घेतले नाही. आठ औंस दूध आणि थोडासा खोपरापाक घेतला.

दोन वाजता गरम पाणी, मध आणि एक ग्रेपफ्रूट घेतले. चार वाजता नाराळपाणी घेतले. आहारातील हा सर्व फेरबदल फार काम असल्यामुळे बापूजींनी केला होता.

सायंकाळी दुधातील पाणी घेतले. आणि गोपीनाथ बारडोलाई, मौलानासाहेब, जवाहरलालजी, जयरामदास यांना पाठवावयाच्या पत्रांचे श्रुतलेखन करवून घेतले.

गांधीजी महंमद साहेबांचे वचनामृते वाचत होते तेवढ्यात तीनेक मुसलमान भाई आले. ते म्हणाले, “आमचे अंतःकरण स्वच्छ राहील असा आशीर्वाद आम्हांला द्या.” त्यावर बापूजी म्हणाले,

“महंमदसाहेब म्हणाले आहेत की या जगात राहा परंतु एखाद्या प्रवाशाप्रमाणे राहा. अथवा येऊन निघून जाणाराप्रमाणे राहा. मृत्यू तर माणसावर कोणत्याही क्षणी झडप घालू शकतो. यामुळे चांगला माणूस तर तो असतो की जो दीर्घ काळ जगून चांगले काम करतो. माणसाची परीक्षा तो काय बोलतो वा सांगतो यावरून होत नसते. तो जे कार्य करतो त्यावरून होत असते. हा उपदेश काही केवळ मुसलमान बंधुभगिनींकरिताच नाही, जगातील सर्व बंधुभगिनींकरिता आहे.

”नोआखालीत किती सुंदर निसर्ग आहे! परंतु आपले अंतःकरण मात्र याला अनुरूप नाही. आपल्या अंतःकरणात जोपर्यंत अस्पृश्यता आहे तोपर्यंत आपल्याला शांतता मिळू शकत नाही. माणसाबरोबर माणसाने भेदभाव करणे हे काय चांगले काम आहे?

“हरिजनांबरोबर अस्पृश्यता पाळण्यात येते हा हिंदू धर्मावर फार मोठा कलंक आहे. हे बिचारे तुमचे नरक, तुमची घाण साफ करतात. यामुळे तुम्ही यांना अस्पृश्य म्हणायला पाहिजे काय? खरे अस्पृश्य तर ते आहेत की जे अनीती करतात, जे भावाला मारतात, जे व्यभिचारी असतात, जे फसवणूक वा धोकेबाजी करतात वा जे व्यसनी असतात. हा भेद तुम्ही समजून घ्या. ब्रिटिश तर इथून निघून जातील, परंतु जोपर्यंत अस्पृश्यतेचा कलंक मिटत नाही तोपर्यंत खरे स्वातंत्र्य नाही.”

प्रेमाबहेन कंटक इथे आल्या आहेत. यामुळे बापूजींचा प्रार्थनेनंतरचा जवळपास सगळा वेळ त्यांच्याबरोबर बोलण्यातच गेला.

वर्तमानपत्रे ऐकली. बाकी तर विशेष असे काहीही नाही. साडेनऊ वाजता बापूजींचे पाय धुतले आणि बापूजी झोपायला गेले.

पश्चिम केरवा,

१५ - २ - '४७

आज बापूजींना प्रार्थनेच्या थोडा वेळ आधीच म्हणजे तीन वाजताच जाग आली होती. टपाल पाहिला. प्रार्थनेच्या वेळी प्रार्थना झाली. प्रार्थनेनंतर नेहमीप्रमाणे बंगालीचा पाठ केला, आणि नंतर जवळपास सगळा वेळ प्रेमाबहेनबरोबर गोष्टी करण्यातच गेला.

दिल्लीला जाण्याकरिता सुशीलाबहेन बापूजींचा निरोप घेऊन गेल्या. बाकी सर्व यथाक्रम रोजप्रमाणेच चालले. साडेसात वाजता रायपुऱ्याला जायला निघालो.

रायपुरा,

१५ - २ - '४७

आम्ही बरोबर आठ वाजून दहा मिनिटांनी इथे पोहोचलो. हे ठाणे आहे. रस्त्यात बापूजी प्रेमाबहेनबरोबर गोष्टी करत होते. त्यांना दिल्लीला आणि सेवाग्रामला जाण्याकरिताही सुचवले.

मालीश आणि आंघोळीनंतर जेवणात तीन खाकरे, सहा औंस दूध, भाजी आणि यीस्ट घेतले. फळात एक संत्रे आणि एक ग्रेपफ्रूट घेतले. जेवता जेवजा जवाहरलालजी आणि बारडोलाईजी यांच्याकरिता पत्रे लिहवून घेतली. . . .

आजच्या पत्रांचे श्रुतलेखन माझ्याकडून करून घेतल्यामुळे मी उशीरा आंघोळ केली आणि जेवले.

बापांनी हैमचरहून ८ - २ - १९४७ ला लिहिलेले पत्र आज मिळाले. शेजारच्या गावातील पत्र सात दिवसांनी मिळाले. हे असे आहे येथील टपालखाते.

या गावाच्या लोकांची बापूजींना मानपत्र देण्याची इच्छा होती. त्यात मुसलमानभाईंचाही समावेश होता. त्याकरिता लाकडात कोरलेली सुंदर चौकट तयार करण्यात आली.

यात बापूजींचा किती उज्ज्वल विजय झाला याचे मी काय वर्णन करू? परंतु जिथे 'राम' हा शब्दच उच्चारता येत नव्हता त्या संपूर्ण रस्त्यावर रामधून आणि भजनांचे गायन सुरू होते. बापूजींनी आपल्याकडे उतरावे असा मुसलमानभाईंचा आग्रह असायचा. आणि मानपत्र अर्पण करण्यासारखे सार्वजनिक काम करायचे असेल तर गावातील सर्व जातीचे लोक मिळूनमिसळून एकत्रितपणे ते काम करू लागले होते. ही निश्चितच काही लहानसहान गोष्ट नव्हती. कारण? बापूजींनीसुद्धा 'परथम पेली मस्तक मूकी' (आधी तुमची स्वतःची आहुती द्यायला तयार व्हा) या भजनाची पहिली ओळ अक्षरशः आचरणात आणत होते. यामुळेच त्यांचा हा असा ज्वलंत विजय होऊन राहिला होता. आणि असे असतानासुद्धा हे सर्व माझ्यामुळे झाले असा अहंकाराचा लवलेशही त्यांच्यात नाही, परंतु 'ईश्वरच सर्व गोष्टींचा कर्ताकरविता आहे' असा निष्काम कर्मयोग त्यांच्यात आहे.

हे मानपत्र जाहीरपणे वाचून दाखवायला बापूजींनी नकार दिला. म्हणाले, "आताच मला मानपत्र देऊन टाका. अशा वेळी मी मानपत्र कसा घेऊ शकतो? प्रेम तर हृदयाचे असले पाहिजे. आणि हृदयीच्या प्रेमाला प्रदर्शनाची मुळीच आवश्यकता नसते. मी काय केले आहे? आणि तुम्हांला जे चांगले वाटते ते तर खुदाच्या कृपेमुळे झाले आहे. हृदयात प्रेम ठेवून काम करा. माझ्याबद्दल जर प्रेम वाटत असेल तर माझे काम करा. हेच मला मानपत्र देण्यासारखे आहे. लोकांना घाबरवू नका आणि लोकांना घाबरूही नका."

हिंदू, मुसलमान, विणकर वगैरे गावातील चारपाच प्रतिनिधींच्या उपस्थितीत बापूजींनी ही गोष्ट सांगितली आणि मानपत्राची ती चौकट त्याच वेळी त्यांनी घेतली. लोकांची इच्छा मात्र हे मानपत्र प्रार्थनासभेत देण्याची होती.

मानपत्राच्या लाकडाची चौकट मला फार आवडली. कलेच्या दृष्टीने तर ती सुंदर होतीच. परंतु या ऐतिहासिक यात्रेच्या विजयाचे चिन्ह म्हणून वा प्रसाद म्हणून ही चौकट माझ्याजवळ ठेवण्याची मी बापूजींकडे मागणी केली. बापूजी लगेच होकार दिला आणि हसून म्हणाले, “तुला अशा प्रकारचा संग्रह करणे आवडते हे मला माहीत आहे. परंतु यातून जर तू प्रेरणा घेशील तर मला ते अधिक आवडेल.” (आज हा ऐतिहासिक प्रसाद खरोखरच माझ्याजवळ राहून गेला आहे.)

निर्मळदा विजयानगरला गेले आहेत. प्रार्थनेचा अनुवाद बाबांनी केला. बापूजींनी आधी शैलेनभाईंना अनुवाद करायला सांगितला होता. प्रार्थनेकरिता जात असताना मात्र एबलगनींच्या मुलाची म्हणजे सरहुद्दीनभाईंची भेट झाली. त्यांनी बऱ्याच गोष्टी सांगितल्या. येथीलच एका मंदिरात पाकिस्तान क्लब करण्यात आला होता. तो पण पाहायला गेलो. बाबांबरोबर यासंबंधी गोष्टी झाल्या. अशा घटनांवर नियंत्रण आणले जाईल अशी खात्रीसुद्धा त्या बंधुंनी दिली.

येथील इमामसाहेब आजारी आहेत. त्यांनासुद्धा पाहायला गेलो.

या ठाण्यात सहा युनियन आहेत. हे चांगले आहे. येथील वस्ती ४५,००० आहे. या युनियनची वस्ती २२,००० आहे. त्यात ९५%मुसलमान आणि ५% हिंदू आहेत. हिंदू जमीनदार, व्यारी म्हणजे विणकर आहेत.

बापूजी साडेनऊनंतर अंथरुणावर पडले. कताई पूर्ण झालेली नसल्यामुळे कातत कातत वर्तमानपत्रे ऐकली.

रायपुरा,

१६- २ - ‘४७

रोजप्रमाणे प्रार्थनेकरिता उठलो. या गावात आज दुसरा दिवस घालवायचा आहे. यामुळे सकाळी कोणतेही विशेष काम नव्हते. प्रार्थनेनंतर बापूजींना गरम पाणी आणि मध दिले काही

पत्रांची नकल केली. माझ्या नोंदी लिहिल्या, आणि घरी टपाल लिहिला. पुष्कळ दिवसांनंतर घरी टपाल लिहू शकले. वेळच मिळत नव्हता. आता एकाच गावात ज्या वेळी दोन दिवस मुक्काम राहील तेव्हाच पत्र लिहायचा नियम कर असे बापूजींनी सुचवले. माझ्या मोठ्या बहिणीला मी एक महिन्यापासून पत्र लिहिले नाही अशी तिने बापूजींकडे तक्रार केली होती. यामुळे रस घेता घेता बापूजींनी मला दोष दिला आणि माझ्यासमोर बसून पत्र लिहीत जा असे सुचवले. अशी बापूजींची बारीक नजर असते.

बरोबर साडेसात वाजता फिरायला निघालो. . . . ने काही प्रश्न विचारायला लावले होते. त्याबद्दल बापूजी म्हणाले, “हे प्रश्न मलाच विचारण्यासारखे होते. भाषा गावठी आहे. . . . तिच्यातील दोष उघड झाल्याशिवाय राहत नाही. पण माणसात जेव्हा अशी धमकी देण्याची प्रवृत्ती निर्माण होते तेव्हा समोरील माणसाचे अवगुण दिसू शकतच नाहीत. गर्व हा मानवजातीचा शत्रू आहे. परंतु मला शत्रू, वैरी हे शब्दच आवडत नाहीत. हा माणूस जर खऱ्या अर्थाने आपला गर्व वा आपली चूक ओळखेल, आपली दुर्बलता झटकून टाकेल तर हा किती उंच चढू शकेल? यामुळे या माणसाचे जीवन हा एक बोधपाठच आहे. याला आपण शत्रू कसे काय म्हणू शकतो? मी तुझ्या चुका काढून तुला दाखवल्या तर मी तुझा शत्रू थोडाच होतो? उलट यामुळे तुला शिकायला मिळत असते. अशाच प्रकारे आपल्याला जर अहंकारीपणा कळला तर आपण किती उंच चढू शकू? आणि हे ओळखण्याची शक्ती तर आपल्याला स्वाभाविकपणेच मिळालेली असते. केवळ ती अभिव्यक्त करण्याची आवश्यकता असते. ज्याप्रमाणे व्यक्ती धान्य खाते, परंतु त्याच व्यक्तीचे आतडे जेव्हा थकून जातात तेव्हा ती ते धान्य शरीराच्या शक्तीप्रमाणेच पचवू शकते. आतडे शुद्ध असेल तर पाचक रस आपोआप प्रगट होईल आणि अन्नाचे रक्त होईल. आणि आतडे जर दुर्बल असतील तर ती व्यक्ती रोगीच होईल. माणसाच्या प्रत्येक कामात विज्ञान असेच काम करते.”

फिरून आल्यानंतर बापूजींचे पाय धुतले. मालीश आणि आंघोळीनंतर जेवणात एक खाकरा, आठ औंस दूध आणि भाजी घेतली. नंतर मदालसाबहेन, किशोरीलालकाका यांना पत्रे लिहिली. दोन वाजता गावकऱ्यांनी प्रीतिभोज ठरवले होते. तिथे गेलो. तिथे फार गोंगाट होता. बापूजी विशेष काही बोलले नाही. परतत असताना शाहबुद्दीनसाहेबांबरोबर मशीद पाहायला गेलो. भुयारात गेलो. जवळपास साडेतीन वाजता परतलो. बापूजींची एका पेळूची कताई राहून गेली होती. परतल्यानंतर ती केली. कताईनंतर कपाळावर आणि पोटावर माती घेतली. पाय दाबत असताना परत आधीच्या अन्नपचनक्रियेवरून माणसाच्या नातिक व्यवहाराच्या गोष्टीचा आणि नम्रता शिकण्यावर भर देण्यासंबंधीच्या गोष्टीवर विचार करायला सांगितले.

उठले तेव्हा युनियन प्रमुख मजबुल हक, सय्यद अहमद, अखतर झमानसाहेब आले. हिंदूंनी खोटे खटले भरले आहेत अशी त्यांनी तक्रार केली. बापूजी म्हणाले, “खोटा खटला असेल तर शिक्षा होईल. नावागावाशिवाय मी काय सांगू शकतो?”

प्रार्थनेनंतर बिरलाजींचे महेताजी भैरवदानजी आले. बिरला कामगारांतर्फे २५५३ रुपये नोआखालीतील मदतकार्याकरिता दिले.

आजच्या प्रार्थनेत बरेच मुसलमान भाई होते. मुख्य मौलवीसाहेबांमध्ये श्री मझमल्लअली चौधरी, फजलूल रहमान, फझलूल हक, हाजी अझीझउल्ला रहमान आणि वलिउल्लासाहेब होते. या सर्वांच्या मनात बापूजींबद्दल आदर होता हे लक्षात येत होते. मी जेव्हा कुराणमधील आयत म्हणत होते तेव्हा एका मौलवीसाहेबांनी उच्चारात दुरुस्ती करण्याची सूचना केली. तेव्हा त्यांच्याजवळ बसून ती आयत कशी म्हणायची हे शिकून घेण्याची सूचना बापूजींनी केली. आणि रात्री आठ वाजता बापूजी वर्तमानपत्रे ऐकत असताना मौलाना साहेबांनी अतिशय प्रेमाने मला शिकवले.

बापूजींनी सायंकाळी एक केळ आणि सहा औंस दूध घेतले. आजकाल बापूजींचे सरासरी तार १०० ते १५० होऊन जात असतात. सात पेळूंमधून इतके तार निघत असतात.

पाऊणेदहा वाजता बापूजींची झोपायची तयारी केली. रोजप्रमाणे बापूजींचे पाय दाबले, तेल चोळले आणि पाया पडले. मीसुद्धा लगेच झोपले. मौनामुळे सर्व काही शांत होते.

देवीपूर,

१७ - २ - '४७, सोमवार

रोजप्रमाणे बापूजींनी प्रार्थनेनंतर बंगाली बाराखडी लिहिली. गरम पाणी पीत असताना दैनंदिनी ऐकली. सही केली. मग टपालाचे कामकाज सुरू झाले.

एका पत्रात बापूजींनी लिहिले -

"तुझ्या मागील पत्राला मी उत्तर दिलेले नाही आणि आता तुझे हे दुसरे पत्र मिळाले. परंतु तुझ्या पत्रात तातडीचे असे काहीही नव्हते की ज्याचे मी उत्तर देणे आवश्यक होते. आता माझ्यावर फार मोठा शारीरिक आणि मानसिक ताण आहे. विरोध वाढत असल्यामुळे माझे येथील काम दिवसेंदिवस सोपे होण्याऐवजी कठीण होत चालले आहे. याचबरोबर माझी श्रद्धा आणि माझे धैर्य या गोष्टी दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत. अखेरीस इथे मी करण्याकरिता वा मरण्याकरिता आलो आहे, नाही काय? इथे कोणताही मध्यममार्ग नाही. . . . . माझ्या दौऱ्याचे तिसरे पर्व केव्हा सुरू होईल हे मला माहीत नाही. मला २५ तारखेला हैमचर येथे पाहोचायचे आहे. . . . .मला किती थकवा जाणवतो यावर पुढील कार्यक्रम अवलंबून राहील. ईश्वराने २५ तारखेपर्यंत जरी मला टिकवून ठेवले तरी माझे समाधान होईल."

*　　　*　　　*

एका मुलीने माझ्याप्रमाणे बापूजींजवळ राहण्याची इच्छा व्यक्त केली होती. तिला उत्तरात लिहिले,

"तुझी माझ्याकडे येण्याची इच्छा आहे. हा विचार मला आवडला. परंतु मी तर रोज एक नवीन गाव करत फिरत असतो. तेव्हा सर्व प्रकारचा त्रास होत असतो. गावांमध्ये फिरत असताना अनेक गोष्टी मिळत नसतात. जागेची अडचण असते. पाणी तर अगदीच चांगले नसते. अशा परिस्थितीत तुला बोलावण्याचe धीर होत नाही. यामुळे तू थोडा धीर धरावा अशी माझी इच्छा आहे. प्रभूची इच्छा असेल तर तू माझ्याबरोबर आहेस अशी वेळ येईल. तुझ्या वर्णनावरून तुझे काम सुंदर सुरू आहे. त्यात प्रगती कर. विणण्याच्या कामात तू कुशल आहेस. कताईच्या कामातसुद्धा तू पहिला नंबर राखशील तर तू अमूल्य होशील कारण तुझ्या तयार केलेल्या वस्तूंचा सर्व ठिकाणांहून मागणी आहे आणि पर्यायाने त्यांचा खप वाढेल. मराठी तर तू चांगले केलेच असशील, नसशील केले तर चांगले करून घेशील. निसर्गोपचाराचे भरपूर ज्ञान मिळव. उर्दू लिपी आणि भाषेचे चांगले ज्ञान मिळव. संस्कृत समजून घे. हे सर्व काम हसतखेळत कर. हे सर्व करशील तर वेळ कसा जाईल हे तुला कळणारच नाही. पत्रांद्वारे मला भेटत जा. अजून तुझा ताप गेला नाही हे चांगले वाटत नाही. तू निसर्गोचाराचा अभ्यास चांगला कर. आणि हे सोपे आहे. असे केले तर . . . तूच ताप नाहीसा करू शकशील. यात खाणे सांभाळले पाहिजे. कटिस्नान, घर्षणस्थान आणि मातीचा लेप हा उपचार केला पाहिजे डोके शांत होईल आणि आणि रामनामाचा जप . . ."

* * *

दुसऱ्या एका पत्रात लिहिले,

"येथील टपालाचे काम शिथिल आहे. टपालाच्या दृष्टीने मी दूर दूर आहे."

*              *              *

आजच्या विविध पत्रांमधून बापूजींची मानसिक प्रवृत्ती आणि येथील परिस्थिती यांची कल्पना येते.

सहा पन्नासपर्यंत काम केले. मग पंधरा मिनिट आराम केला. मी सामान बांधले. काही सामान पुढे पाठवले होते. दररोजच्या वेळी म्हणजे सातपस्तीला पदयात्रा सुरू झाली. आठपंचावन्नला रायचुरा येथे येऊन पोहोचलो.

इथे भव्य स्वागत झाले. लोकांनी खूप भावपूर्ण तयारी केली होती. ध्वज, तोरण, पताका वगैरेंनी सजवून शृगारले होते. हे सर्व पाहून बापूजींचे धैर्य वाढले.

बापूजींचा आज मौनवार आहे. यामुळे ते खूप गंभीर विचारात आहेत असे वाटते.

पाय धुतल्यानंतर बापूजींनी शैलेनभाईजवळ थोडेसे बंगाली वाचले. एवढ्या वेळात मी मालीशची तयारी केली. मालीशनंतर आंघोळ आणि त्यानंतर जेवणाकरिता पाच बदाम आणि पाच काजू वाटले होते. पातळ कापडातून भाजी चाळली आणि त्यात हे वाटलेले बदाम आणि काजू टाकले. हे मिश्रण आणि गरम दुधात एक निंबू पिळले आणि अशा प्रकारे नासवलेले दूध आठ औंस घेतले. जेवणानंतर एक तास आराम केला. मी बापूजींचे पाय घासले. धुवायचे बरेच कपडे गोळा झाले होते. मग ते सर्व धुतले. बापूजींचे सूत चरख्यावरून काढले. पत्रे नीट ठेवली. भगिनींकडे गेले. जेवण केले. तेवढ्यात बापूजी उठले आणि एका नारळाचे पाणी घेतले. मग बापूजींनी कातले. कातत असताना मी टपाल वाचून दाखवला. तीन वाजता बापूजींनी माती घेतली आणि ते अर्धा तास झोपले. सायंकाळी दोन ग्रेपफ्रूट आणि आठ औंस दूध घेतले.

दूध घेत असताना बापूजींचे मौनव्रत सुटले. सकाळी करण्यात आलेल्या इतक्या आकर्षक सजावटीकडे दिवसभरात माझे लक्ष गेलेच नव्हते. त्याबद्दल बापूजी मला म्हणाले, “तू

हे जे पाहते आहेस ते करून या लोकांनी काय मिळवले? इथे मुख्य कार्यक्रते कोण आहेत वगैरे आपण पाहिले पाहिजे.”

बापूजी गंभीर का होते हे आता माझ्या लक्षात आले. आणि माझ्याही लक्षात संपूर्ण गोष्ट आली. माझी चूक माझ्या लक्षात आली. मी लगेच धावत गेले आणि चौकशी केली. मी सर्वत्र चौकशी केली. या गावात तीनशे हिंदू आणि पंधराशे मुसलमान राहतात. हिंदूत ब्राह्मण, कायस्थ आणि शुद्र आहेत. सजावटीत लालपिवळे कागद, तेलातुपाचे दिवे, जरी, झेंडे आणि पताका या सर्वांचा उपयोग करण्यात आला होता. गावात तर या गोष्टी मिळूच शकत नव्हत्या. यामुळे मी मुख्य कार्यकर्त्याला बोलावले. बापूजींनी विचारले, “तुम्ही हे सर्व कुठून आणले?”

ते भाई म्हणाले, “बापू ! तुमचे पाय आमच्या गावाला केव्हा लागतील? तुम्ही येणार असल्यामुळे आम्ही प्रत्येकाकडून आठआठ आणे घेऊन तीनशे रुपये गोळा केले आणि त्यातून आम्ही हा खर्च केला आहे.”

यामुळे बापूजी फार दुखावले. म्हणाले,

“ही फुले आणि हे वैभव तर क्षणात कोमेजून जाईल. आणि याशिवाय तुम्ही सर्व माझी फसवणूक करत आहा असेच मला वाटते. मोठ्या हिंमतीने मी ही धडपड करतो आहे. तरीही या सांप्रदायिक संघर्षाला चिथावणी देण्यात येत आहे. मी आता अग्नीज्वालेत उभा आहे.याची तुम्हांला कल्पना आहे काय?. इतकीमोठी फुलांची आणि हारांची सजावट करण्याैवजी तुम्ही जर सुताच्या हाराची सजावट केली असती तर मला ते इतके जाणवले नसते ! या हाराने सजावटही होते आणि नंतर परत त्याचे कापडही तयार होते हे याचे कारण आहे. यामुळे त्यांतील काहीही वाया जात नाही. मला वाटते की या गावात पैसे फार आहेत. नाही तर अशा कठीण काळात असे हारतुरे करणे तुम्हांला सुचलेच नसते. तुमच्या मनात प्रेम आहे हे सिद्ध करण्याकरिता जर हे हारतुरे केले

असतील तर ते प्रेम खोटे आहे. यातून प्रेम किंचितही दिसून पडत नाही. तुमचे जर माझ्यावर प्रेम असेल तर मी म्हणतो ते करा. माझ्याकरिता तितके पुरेसे होईल. तुमच्याकडे इतकी मोठी कत्तल झाल्यानंतरही या फुलांकरिता पैसे खर्च करणे तुम्हांला कसे सुचू शकते हेच मला कळत नाही. आणि शिवाय तुम्ही तर काँग्रेसचे कार्यकर्ते आहा. तुम्ही सार्वजनिक कार्यकर्ते आहा. तुम्ही सांगता त्याप्रमाणे तुम्ही माझी पुस्तके वाचली आहेत. तुम्ही वाङ्मय पारंगतपर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे. आणि या शृंगारात विलायती गिरणीची रेशमी रिबीन तुम्ही वापरता. मी इतकेच म्हणेन की हे सर्व माझ्याकरिता दुःखद आहे.

तुमच्यावरून मी माझ्या सर्व सहकार्यकर्त्यांचा जेव्हा विचार करतो तेव्हा असे दिसते की ज्याला एके दिवशी मी देशसेवक म्हणून, जनतेचा सेवक म्हणून ओळखत होतो. तेच कार्यकर्ते आज काही पद मिळाले तर अशा प्रकारे हारतुरे घातले जातील वा कोणाला घालायची संधी मिळेल अशी लालूच त्यांना वाटू लागत नाही काय? मला असे दिसते की अजूनही मी छातीठोपणे सांगू शकत नाही की माझा कोणत्याही कार्यकर्त्याची कशीही परीक्षा घेतली तरी तो साधेपणाचे आचरण करत असताना दिसेल. वाटेल तितके मोटारीबंगले असले तरी तो आपले ध्येय कधीही सोडणार नाही. परंतु आज अशी परिस्थिती नाही, ठीक आहे. आजच्या प्रसंगाने मला चांगलेच सावध केले आहे. मी तुमचे दोष काढून राहिलेलो नाही. तुम्ही तर जसे आहा तसेच दिसाल. यात तुम्ही तरी काय करू शकत होता? परंतु मी काय आहे याचे भान मला ईश्वर करवून देतो आहे. नशिबात अजून काय काय पाहायचे राहिले आहे?”

बापूजींच्या हृदयव्यथेचा हा प्रवाह सततधार वाहत होता. गांधीजींच्या या हृदयव्यथांनी त्या बिचाऱ्या कार्यकर्त्या बंधूना दे माय धरणी ठाय असेच झाले असावे. त्यांना हे कसे कळावे?

या हारतुऱ्यात जो दोरा वापरण्यात आला होता तो काढून त्याची गुंडाळी करून ठेवायला बापूजींनी सुचवले. त्याच्या वीस लहान लहान गुंडाळ्या झाल्या. प्रार्थनेनंतर ते बंधू त्या घेऊन आले.

हे पाहिले ना? या वीस गुंडाळ्यांचे किती कापड तयार होईल? हे सगळे पाहणे तू शिकावे अशी माझी इच्छा आहे. तुला जेव्हा जाणवेल की विशिष्ट काम तुझ्या स्वभावाविरुद्ध होते आहे तेव्हा तू ठामपणे त्याबद्दल विचारपूस करायला पाहिजे. निर्मळबाबू असे करत असतात खरे. व्यावहारिक दृष्टी शिकायला पाहिजे. ईश्वर करील तर हेसुद्धा होऊन जाईल. परंतु तूसुद्धा इतके लक्षात ठेव की सध्या मी ज्या प्रकारे तुला शिकवतो आहे त्या प्रकारे मी कोणालाही कधीही शिकवले नाही. एक प्रभा होती खरे, पण इतकी एकटी ती कधीही नव्हती. आगाखान महालात तुला असा पाठ मिळत नव्हता. तिथे तर बा लाड करत होती ना? परंतु तरीही काही विशिष्ट शिक्षण तर तुला मिळालेच. आणि ते या सर्व शिक्षणाकरिता पूरक होत आहे.

रात्री बापूजी झोपले होते आणि मी त्यांचे पाय दाबत होते. तेव्हा ते मला वरीलप्रमाणे म्हणाले होते. असाच दुसराही प्रसंग आहे जेव्हा मला असा पाठ मिळाला होता.

सायंकाळी माझ्या पोटात खूपच दुखत असल्यामुळे मला गरम पाण्याने शेकायला सांगितले. मी गरम पाणी करायला विसरून गेले.

झोपताना बापूजींनी विचारले, “मी सांगितले त्याप्रमाणे शेकलेस काय?” मी नाही म्हणाले. पाणी गरम करायचे राहून गेले वगैरे. बापूजींना हे आवडले नाही. बापूजी म्हणाले, “जो माणूस स्वतःच्या कामात आळस करतो तो केव्हा केव्हा दुसऱ्याच्या कामातही आळस करत असतो. तुझा देह हा तुझा नाही, ईश्वराचा आहे. ज्याप्रमाणे कोणी घरमालकाचे घर भाड्याने घेतो

आणि तो त्या घराची जर साफसफाई करत असेल, एखाद्या वेळी जर घराचे काही नुकसान झाले तर त्याची दुरुस्ती करत असेल तरच ते घर चांगले रहिले असे म्हणता येईल. राहणाराला घराचा आधारस्तंभ म्हणता येईल. अशाच प्रकारे हा देह ईश्वररूपी घरमालकाचा आहे. यात जर काही तूटफूट झाली तर दुरुस्ती करण्याचे आपले कर्तव्य आपण पार पाडले पाहिजे. नाही तर ईश्वर नाराज होईलच. ईश्वराचा आदेश येईल तेव्हा घररूपी हा देह आपल्याला त्यजावा लागत असतो. परंतु या देहाला जर जपायचे असेल आणि या देहाची जर सेवा करायची असेल तरच हा देह जिवंत असल्याचे सार्थक होईल. ईश्वर खुश होईल. नाही तर या पृथ्वीवर जे असंख्य किडे वळवळत असतात त्यांतील आपण एक किडा होऊ. झोपणे, बसणे, खाणे, पिणे हे सर्व नियमितपणे झाले तर तूटफूट होण्याची वेळ येणारच नाही. परंतु एखाद वेळी जर शरीररूपी यंत्रात काही दोष निर्माण झाला तर तो ईश्वररूपी महान मालकाचा असल्यामुळे त्याची सेवा केलीच पाहिजे."

मग दहा वाजता गरम पाणी करून आणायला सांगितले. यामुळे मला झोपायला उशीर झाला.

बाकी तर सर्व नियमितपणे सुरू आहे. बापूजींचे दिवसभर मौन असल्यामुळे वातावरण अगदी शांत होते. परंतु मौनानंतर आम्हा सर्वांना समजावून सांगण्याकरिता बापूजींना फार मेहनत करावी लागली. आम्ही राजकुमारश्रीकडे उतरलो होतो. ते कायस्थ आहेत आणि शेती करतात. वस्तीत ३०० हिंदू आणि १५०० मसलमान राहतात.

आजच्या डायरीत बापूजींनी सही करून असे लिहिले -

आलूनिया,

१८ - २ - ‘४७

आज माझे मन अस्वस्थ आहे. माझी अनासक्ती ही अशी आहे. मला आवडले नाही. माझ्या अहिंसेची कदाचित परीक्षा होत असेल हीसुद्धा विचार करण्यासारखी गोष्ट आहे असे वाटते. ईश्वराची महान कृपा आहे की तो मला निभवून घेतो आहे. तू १००% सावध राहा.

बापू

आलूनिया,

१८ - २ - ‘४७

रोजप्रमाणे प्रार्थनेच्या वेळी उठलो. नंतर मध आणि पाणी घेत असताना माझी नोंद ऐकली आणि सही केली. बापूजींना काल जे असह्य दुःख झाले होते ते त्यांनी व्यक्त केले होते. ते मला दिसले नाही. पू. बापूजींनी मला विचारले, “तुझ्या नोंदवहीत काल मी जे लिहिले ते तू पाहिले?”

मी म्हणाले - मी तुम्हाला नोंदवही दिली आणि गरम पाण्याचा पेला धुवायला गेले. तिथे मी काही पाहिले नाही. बापूजी म्हणाले, “कोणतीही का वस्तू असेना, ती जर दुसऱ्याला सोपवली असेल आणि ती जर आपल्यापुरतीच असेल तर ती परत घेताना आपण ती पाहून घेतली पाहिजे. तुला माहीत आहे ना की मी एक पत्ता जरी लिहिला असेल तरी तो परत वाचल्याशिवाय टपालात जाऊ देतो काय? ही सवय मला आधीपासून आहे.”

मी नोंद पाहिली. बापूजींच्या दुःखाला सीमा नव्हती.

त्यानंतर (बंगालचे माजी बडा प्रधान म्हणजेच प्रधानमंत्री) प्रफुल्लबाबूंना आणि माझ्याबद्दल माझ्या पिताश्रींना पत्र लिहिले. प्रफुल्लदांनी बापूजींना अभय आश्रमात जाण्यासंबंधी लिहिले होते. त्याच्या उत्तरात बापूजींनी लिहिले होते - “जर मी कुमिल्लाला गेलो तर मी अभय

आश्रमात निश्चितच जाईन . . . . माझी यात्रा सुरूच आहे. हैमचरला पोहोचल्यानंतर मला थोडासा आराम घ्यावा लागेल असे वाटते.”

सातेसात वाजता आम्ही देवीपूर सोडले आणि नऊ वाटून पाच मिनिटांनी आम्ही इथे पोहोचलो. बापूजींचे पाय धुतल्याबरोबर त्यांनी मला बंगालीचा पाठ समजावून सांगितला. नंतर मालीश, आंघोळ वगैरे चालले. जेवणात दोन खाकरे, भाजी आणि थोडासा नारळपाक घेतला. दोन ग्रेपफ्रुट घेतले.

आजची भाजी फार विचित्र होती. - भेडी, भाजी, कारले, थोडी दुधी. हे सर्व एकाच वेळी टाकून बापूजींनी सोबतच वाफाळायला सांगितले. त्यात भेडी टाकल्यामुळे भाजी फार चिकट झाली होती. आणि जेवत असताना याच भाजीत दूध टाकायला लावले. आणि हे सर्व बापूजी चमचाने ढवळत होते. हे पाहून मला प्रश्न पडला होता की, बापूजींच्या गळी हे सर्व कसे उतरेल? मी हसत हसत बापूजींना हे विचारले. बापूजी म्हणाले, “अग, भूक असेल तर सर्व काही गळी उतरते.”

याच भाजीतील दोन चमचे भाजी माझ्याकरिता वेगळी ठेवली (तिखट, मसाला वगैरे काहीही न टाकता पूर्णपणे वाफाळलेली भाजी तर बापूजी वर्षांपासून खात होते. आणि ते योग्यही वाटते. पण पाचभाज्या एकत्र केलेली ही भाजी आणि तिच्यातसुद्धा दूध टाकून बापूजी ती प्याले होते.) मला जी भाजी खायला दिली होती ती मला खावी लागणारच होती. परंतु ती मी जसे एखादे औषध घ्यावे तशी मोठ्या मुश्किलीने खाल्ली होती.

जेवत असताना बापूजींनी हिंदू नियतकालिकाचे प्रतिनिधी रंगास्वामी यांच्याकडून काही पत्रांचे श्रुतलेखन करवून घेतले.

दुपारी आराम करत असताना बंगाली पाठ केला. दोन वाजता सुचेताबहेन आल्या. खाकसारभाईसुद्धा भेटायला आले होते. मध्यंतरकालीन सरकारने खाकसारांना सोडून द्यावे अशी विनंती करणारे पत्र तुम्ही लिहा अशी मागणी त्यांनी बापूजींकडे केली.

बापूजी म्हणाले, “मला अशा तोंडी गोष्ट समजत नाहीत. तुमचे काय म्हणणे आहे ते सर्व मला लिहून द्या. मग मी त्यावर विचार करीन.”

आज बापूजी किती तरी जास्त थकलेले आहेत असे वाटते. म्हणत होते, “डोळ्यांची जळजळ होते आहे.” डोळ्यांवर माती लावलेली पट्टी बांधली. हैमचरला जाऊन आराम करायचा आहे. मला म्हणाले, “आता अजून किती दिवस राहिले आहेत? . . .शक्य आहे की माझ्या मृत्यूपर्यंत . . . हे कळणारही नाही. असे असले तरी याबद्दल दुःखाची वा मोहिनीची भावना का असायला पाहिजे? माझ्या मनात तर तशी भावना मुळीच नाही. परंतु माझी अनासक्ती किती अल्प आहे हे मी तुला सांगितलेले आहे ना? हे मी तुला परवाच लिहिले होते. मी जर ‘स्थितप्रज्ञ’ झालो आणि माझे कार्य करत राहिलो तर काहीही झाले तर माझ्या मनात सर्व समानच राहिले असते. सुखदुःखांकडे मी सम दृष्टीने पाहिले असते. या उद्दिष्टाकडे जाण्याचा माझा प्रयत्न करतो आहे तितके यश मला मिळालेले नाही. आणि मला आशा आणि दृढविश्वास आहे की जितके दिवस मी हा प्रयत्न करतो आहे त्या प्रमाणात मला यश मिळालेले नाही. यांमुळे मी . . .ला हिंमत करून सुटी दिली आहे. यामुळे माझ्या हृदयात जर रामनाम अंकित असेल तर मी नाचेन. तू माझ्या कार्यात जितकी जागृत राहशील तितकी तुझी मला मदत मिळेल आणि माझ्या शक्तीत तितकीच वाढ होईल. तू यांतून खूप शिकू शकशील.”

दुपारनंतर बिहारमधून एक भाई आले. ते विशेषेकरून रामायण ऐकवायला आले होते. त्यांच्या समाधानाकरिता बापूजींनी रामायण ऐकले आणि म्हणाले -

> तुम्ही उद्या बिहारमध्ये जा. केवळ रामायणाचे तुमचे सूर ऐकण्याकरिता तुम्हाला इथे थांबवावे असे मला वाटत नाही. ही पोरगीही ऐकवू शकेल असे हे सूर आहेत. परंतु बऱ्याच वर्षांपूर्वी मी जे सूर ऐकले होते तसे तर हे नाहीत. शिवाय बिहारची परिस्थिती सेवेच्या एखाद्या क्षेत्रासारखी झाली आहे. तिथे राहा. रामायणांच्या प्रचारामुळे तेथील

गावकऱ्यांचा जर फायदा होत असेल तर करा. आणि नसेल होत तर ही वेळ सेवाकार्यात गुंतून राहण्याची आहे. तुमचे सूर ऐकण्याकरिता मी जर तुम्हाला इथे अडकवून ठेवले तर हा एक नवीन मोह, स्वार्थ म्हणवला जाईल. आणि तसे झाले तर मला आणि तुम्हा - दोघांनाही पाप लागेल. यामुळे यापासून मी वाचलो पाहिजे आणि तुम्हीही वाचा. मी तर ही पोरगी जसे गाते त्यातच समाधान मानतो. हिचा गळा चांगला आहे, आणि ही गाऊही चांगले शकते. नवीन सूर लगेच पकडते. यामुळे आज दिवसभर ही जे काही शिकू शकेल ते हिला शिकू द्या. परंतु हिला शिकवण्याकरता विशेषेकरून थांबू नका.

बापूजींची भेट घेण्याकरिता हे जे गृहस्थ आले होते त्यांच्याकडून मी हे शिकले.

सायंकाळी प्रार्थनेनंतर डाकरिया नदीपलीकडे एक फार म्हातारे गृहस्थ राहत होते. त्यांना भेटायला आम्ही गेलो. होडीत बसलो. दोन्ही काठांवर पुष्कळ लोक होते. (या वृद्ध गृहस्थाला बापूजींना भेटण्याची इच्छा होती, आणि ते गृहस्थ बापूजींची भेट घेण्याकरिता यायला असमर्थ होते. यामुळे बापूजींनी त्यांच्याकडे जाण्याची इच्छा व्यक्त केली. ते एक सामान्य माणूस होते. कोणी पुढारी वा नावाजलेले माणूस नव्हते.)

हिरव्यागार वनश्रीमधून नदी वाहत होती. आकाश स्वच्छ होते. उन्ह नव्हते कडक की नव्हती खूप थंडी. होडीतून पाचसात मिनिटांचा रस्ता होता. या पाचसात मिनिटात बापूजी माझ्या मांडीवर डोके ठेवले, पाय लांब केले आणि एक डुलकी घेऊन टाकली. वर आकाश होते, खाली पाणी. दोन्ही काठांवर माणसांच्या गर्दी बरोबरच निसर्गाने गर्द हिरवळ पसरवली होती आणि त्यात दाट वनराई पसरलेली होती. मंद मंद वारा वाहत होता. अशा या वातावरणात हा महापुरुष माझ्या मांडीवर डोके टेकवून पडलेला होता आणि होडीवाला होता. माझा हात बापूजींच्या कपाळावर होता. हे मिनिट धन्य धन्य वाटतात.

इतक्या दिवसांच्या यात्रेत हा प्रसंग एक अनमोल प्रसंग म्हणून माझ्या आठवणीत मी तो जपून ठेवला आहे.

फिरून आल्यानंतर एका कार्यकर्त्या बहिणीने विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात बापूजी म्हणाले -

कार्यकर्त्यांनी गावात जाऊन लोकांना ईश्वरावर विश्वास ठेवायला आणि हिंमत ठेवायला शिकवायला पाहिजे. गावात गेल्यानंतर कार्यकर्त्याने गावकऱ्यांच्या मनात कोणी उपकारकर्ता आला आहे अशी भावना कधीही निर्माण होऊ देऊ नये. सर्व कार्यकर्त्या बंधुभगिनींनी साफ साफ सांगितले पाहिजे की आम्ही कार्यकर्ते इथे नेहमीकरिता राहायला आलेलो नाही, आम्ही केवळ कामापुरते आलेले आहे. यामुळे तुम्ही सगळ्यांनी स्वतःच्या आधारावर काम करायला शिकायला पाहिजे. आपापल्या धर्माकरिता आपल्या स्त्रियांच्या शीलरक्षणाकरिता आपण मरण्याची कला शिकायला पाहिजे.

इतर काही गोष्टी सुरू असताना बापूजी म्हणाले -

ज्या वेळी मी अस्पृश्यतेच्या विरोधात संघर्ष सुरू केला होता त्या वेळीही अशीच, परंतु काहीशी वेगळी परिस्थिती होती. इतकी की समाजाला आणि माझ्या सहकाऱ्यांना माझी भूमिका पटत नव्हती. परंतु माझ्या आत्म्याला ते पटत होते. आत्म्याच्या आवाजाप्रमाणे मी अनेक गोष्टी केल्या आहेत. आणि त्यात काही प्रमाणात मला यशही मिळाले आहे. खरे म्हणजे यशापशाचा विचार करण्याचा माणसाला काहीही अधिकार नाही. त्याची काळजी करायचा अधिकार ईश्वराशिवाय कोणालाही नाही. ही काळजी करणे म्हणजेसुद्धा एक प्रकारचा अभिमान करण्यासारखेच आहे आणि तो मिथ्याभिमान आहे.

नंतर बापूजींकडे नृपेनदा आले. एव्हाना रात्रीचे आठ वाजून गेले आहेत. मी आजची नोंद लिहिली. बापूजींनी अजून आजची वर्तमानपत्रे पाहिली नाहीत. वर्तमानपत्रे ऐकत असताना डोळ्यांवर माती घ्यायची आहे. मला अजून अंथरुणे टाकायची आहेत. कपड्यांच्या घड्या करायच्या आहेत आणि थोडीशी बांधाबांध करायची आहे.

हे घर राजकुमार दासचे आहे. एकूण ६४६ घरे आहेत. त्यात ४,६२१ मुसलमान राहतात आणि हिंदू केवळ १,००० आहेत. आज बापूजींचे ९० तार झाले.

रात्री बापूजींनी माती घेतल्यानंतर वर्तमानपत्रे ऐकली. थोडेसे श्रुतलेखन करवून घेतले. मग झोपले. दहा वाजले. मी तेल चोळले, पाय दाबले आणि पाया पडून लगेच झोपले.

बिरामपूर,

१९ - २ - '४७

आज महाशिवरात्र आहे. आज मोटीबाची श्राद्धतिथी असल्यामुळे मी बापूजींना विचारले की मोटी बाचा जेव्हा मृत्यू झाला तेव्हा म्हणजे सायंकाळी सातपस्तीस वाजता गीतापाठ सुरू केला तर कसे राहील? बापूजी म्हणाले -

> गीतापारायण सातपस्तीसला सुरू करावे अशी तुझी इच्छा आहे दिसते. तसे असेल तर माझी हरकत नाही. आज जेवायचे तर नाहीच. मला इतकेच सांगायचे आहे की बा नसती तर मी इतका चढलो नसतो. बाने मला खूप खूप ओळखले होते. आणि बाची ओळख माझ्याशिवाय दुसरा कोण करून देऊ शकतो? तिच्या मनात माझ्याबद्दल किती निष्ठा होती? आणि अखेरच्या वेळी तू तर तिथेच होतीस. बा कोणाच्या मांडीवर जाईल असा प्रश्न मला पडला होता. परंतु अखेरीस तिने मला बोलावले आणि माझ्या मांडीवर तिने अखेरचा श्वास घेतला. अशी होती बा. आज या यज्ञात तिची आठवण करतो

आहे आणि तिचे गुणगान करतो आहे. तिचे हे गुण आत्मसात करणे हेच बाचे खरे श्राद्ध आहे. ती माझी अशी निर्दोष आणि भावपूर्ण सेवा करत होती. आणि लग्न झाल्यापासून तर मृत्यूपर्यंत माझ्या प्रत्येक कामात तन, मन आणि धनाने ती सतत माझी सेवा करत होती.

सकाळी प्रार्थनेच्या वेळी बापूजींनी मला उठवले आणि अगदी सकाळी सकाळीच तोंड धूत असताना बापूजींनी कस्तुरबांबद्दल हे शब्द उच्चारले होते.

आज हिंदुस्थानात कदाचित अनेक ठिकाणी पू. मोटी बाला अंजली वाहिली जाईल. पण बापूजींनी मोटीबाला ही अंजली प्रातःकाळी चार वाजताच माझ्यासमोर वाहिली होती. आणि माझे सद्भाग्य असे की की पूज्यनीय बापूजींच्या मुखातून बाहेर पडलेले हे शब्द सर्वप्रथम माझ्यासारखा लहान मुलीच्या कानावर पडले होते.

रोजप्रमाणे सकाळची प्रार्थना आलूनियामात झाली. प्रार्थनेनंतर बापूजींनी देवभाईबरोबर गोष्टी केल्या. नंतर गरम पाणी आणि मध घेतले. अर्ध्या तासानंतर अननसाचा रस घेतला. काही पत्रांवर सह्या केल्या. दहा मिनिट आराम केला. दररोजप्रमाणे सातपंचवीसला यात्रा सुरू झाली. इथे पोहोचायला बहात्तर मिनिट लागले. रस्ताभर भजनमंडळी सुंदर भजन गात होती. यामुळे गाण्यात माझा फार कमी सहभाग होता. मी तर आज केवळ एकच भजन म्हणाले होते. बाकी संपूर्ण रस्त्यात भजनमंडळीच गात होती. पोहोचताच बापूजींचे पाय धुतले. बापूजी बंगाली पाठ करत होते तेवढ्या वेळात मी मालीशकरिता तंबू तयार करून घेतला होता.

आज बापूजी फारच थकलेले आहेत. यामुळे मालीश करत असताना चांगली झोप लागली. आंघोळीनंतर जाजूजी, जवाहरलालजी, काईटहान्स, कुळकर्णीजी, हरिशंकर घोष, अब्दुल्लासाहेब या सगळ्यांना पत्रे लिहिली आणि त्यांच्यावर सही केली.

आर्यनायकमजी आलेले असल्यामुळे त्यांच्याबरोबर पुष्कळ गोष्टी केल्या.साडेबारा वाजता आराम करण्याकरिता बापूजी झोपले. मी पायांना तूप चोळून माझे काम केले. सूत दुहेरी करणे, कपड्यांना जोड लावणे, शिवणे, रोजनिशी लिहिणे वगैरे काम केले. नायकमजींबरोबर अमलप्रभाबहेन, पूर्णेंदुबाबूसुद्धा आले होते. अमिय बाबूसुद्धा (अमिय चक्रवर्ती) आहेत. यामुळे आजचा दिवस भरगच्च आहे.

उठल्यानंतर बापूजींनी नारळाचे पाणी घेतले आणि टपाल पाहिला. दोन वाजता कातत असताना नायकमजींशी गोष्टी केल्या. आणि डोक्यावरील केस फार वाढल्यामुळे ‘ते मशिनीने कापून टाक’ असे मला म्हणाले. यामुळे मी बापूजींचे केस कापून टाकले. बापूजींकरिता नेहमीच वेळेची अशी मारामार असते. नायकमजींबरोबरसुद्धा माझ्याबद्दल बऱ्याच गोष्टी केल्या. आणि तेसुद्धा कबूल झाले. तीन वाजता माती घेत असतानासुद्धा नायकमजी मंडळी होतीच. नयी तालीमसंबंधी चर्चा सुरू होती.

सिल्हटहून खूप संत्री आली आहेत. पूज्य मोटी बाच्या तिथीच्या निमित्ताने मुलांना मोठ्या प्रमाणात संत्री वाटली. बापूजी म्हणाले, “तुला आठवते ना की बा स्वतः खाऊन खुश होत नव्हती, पण खाऊ घालून खुश होत होती?”

सायंकाळी दूध आणि खजुराच्या आठ फोडी घेतल्या. मग प्रार्थनेकरिता गेले.

प्रार्थनेत एक प्रश्न असा आला होता - विशिष्ट हिंतसंबंध असलेले लोक एखाद्या हिंदू कार्यकर्त्यासमोर जाणूनबुजून खोट्या गोष्टी पसरवून त्याची बदनामी करत असतील तर काय करावे?

बापूजी - मी तर असे म्हणेन की अहिंसक माणसाची आणि अहिंसक दृष्टी असलेल्या माणसाने केलेल्या कार्यामुळे त्याची जी ओळख असते तीच त्याची खरी ओळख असते. कदाचित काही गैरसमज जरी झालाही असेल तर व्यर्थ गोष्टी करून तो गैरसमज दूर करण्याच्या

भानगडीत पडू नये. पण केव्हा केव्हा असेही प्रसंग येतात की जेव्हा त्यासंबंधी बोलून तो दूर करणे आपला धर्म होतो आणि गुपचूप राहून त्याला जर काहीही प्रतिक्रिया दिली नाही तर तो खोटेपणे जागच्या जागीच नष्ट होतो. यामुळे योग्य मार्ग तर हा आहे की कार्याबरोबर वाणीने स्पष्टीकरण करायची वेळ केव्हा येते त्याचा विवेकपूर्ण विचार आपण केला पाहिजे. अर्थात अशा वेळी आपण निश्चितच सौजन्यशील भाषेत खुलासा केला पाहिजे.

बरोबर सातपस्तीसला गीतापारायण सुरू केले. माझ्याजवळ मोटी बाचा एक फोटो होता. मी तो दिला. त्या फोटोला फुलाचा हार वाहून मी पाया पडले आणि पारायणाला सुरुवात केली. नायकमजीबरोबर आलेल्या भगिनी आणि इतर पाहुणे आणि स्थानिक लोक प्रार्थनेत गोळा झाले होते. मुसलमानभाईसुद्धा आले होते. पारायण तर मी एकटीनेच केले. सर्व लोक ऐकत होते. सव्वा तास लागला. खूप शांतता आणि गांभीर्य होते. पारायण पूर्ण होताच बापूजींनी माझ्या बहिणीला लिहिले -

> या दिवशी याच वेळी बाने देहत्याग केला होता. पारायणाच्या वेळी नवीन आलेले अतिथी होते. आज या यज्ञात ही हकिगत नजरेसमोर तरळली कारण इथे मनुडी होती. ती एका झटक्यात पारायण करू शकली, आणि तेसुद्धा एकटीने. आगाखान महालात एकटेच होतो ना? सहावा अध्याय लांब असल्यामुळे बाचे डोके माझ्या मांडीवर तर नाही ना असा भास मला होत होता आणि थोडावेळ झोपेचा एक झटका येऊन गेला तेव्हा असे झाले. (सहाव्या अध्यायापर्यंत बापूजी बसून डोळे मिटून ऐकत होते. परंतु नंतर थकल्यामुळे पाय लांब करून झोपले.)

मी उपवास ठेवला होता. यामुळे प्रार्थनेनंतर मी फराळ केला आणि इतर काम केले. बापूजी तर आज पाऊणेअकरा वाजताही पाहुण्यांशी गोष्टी करत होते.

हे घर तरणीचरण दास माछी यांचे आहे. इथे १०० हिंदू परत आले आहेत. इथे मुसलमानांची वस्ती ६,००० आहे आणि हिंदू ३५० आहेत.

बीशकाथली,

२० - २ - '४७

आज रात्री असह्य थंडी होती. चार वाजता बापूजींनी मला उठवले. बापूजींवर मी पाघरूण टाकले आणि त्यांचे पाय दाबून गरम केले. बापूजींचे पाय खूप थंड पडले होते आणि ते थरथर कापत आहेत असे वाटत होते. झोपडीत सोसाट्याचा वारा येत होता. परंतु वारा अडवता येईल असा कोणताही उपाय नव्हता. बापूजींना हा असा त्रास सहन करावा लागून राहिला आहे.

रात्री साडेबारा वाजता बापूजी मला म्हणाले, "माझ्या पायाचे तळवे थंडगार पडले आहेत आणि ते कापत आहेत असे वाटते." शिवाय घासलेट वाचवण्याकरिता बापूजी दिवाही विझवायला लावत असतात. आणि वद्य चतूर्दशी-अमावस्येची घोर काळोखी रात्र होती. चोहोकडे भयंकर शांतता होती. नारळाच्या आणि सुपारीच्या झाडातील सोसाट्याचा वाऱ्याचा आवाज भयंकर वाटत होता. मानवतेला शिकवण्याकरिता एक संत जी तपश्चर्या करत होता त्याचे साक्षीदार केवळ हेच होते. झोपडीच्या छपराच्या आणि भिंतींच्या छिद्रांमधून येणाऱ्या वाऱ्याला आणि थंडीला मी कशी अडवू शकणार होते? या खोलीत मी आणि बापूजी दोघेच होतो. माझ्या मनात किती तरी विचार येत होते. गरम पाण्याची पिशवी तर होती, पण गरम पाणी कसे करणार होते? कोणाला उठवणे तर शक्यच नव्हते. बापूजींची भीतीही तर होतीच. जिथे दिवासुद्धा लावू देत नव्हते तिथे प्रायमस स्टो पेटवू देऊन केरोसीन जाळायची परवानगी कसे देतील? मनात येणारे हे सर्व विचार व्यर्थ होते. जी काही पांघरुणे होती ती सर्व त्यांच्या अंगावर टाकली. डोक्यावरसुद्धा पांघरूण टाकले जितका काही जोर होता तितक्या जोराने बापूजींचे शरीर दाबले. असे केल्यामुळे बापूजींना अर्ध्याक तासाने थोडे बरे वाटले आणि ते झोपले.

प्रार्थनेनंतर दररोजचा कार्यक्रम नियमितपणे चालला. आज रात्रीकरिता गरम पाणी भरून ठेवण्याकरिता थर्मोस मागवण्याची इच्छा झाली. त्याकरिता फार घाबरत घाबरत बापूजींची परवानगी मिळवली. बापूजी म्हणाले, "काझीरखिलपर्यंत जपून ठेव आणि तोपर्यंत आवश्यक वाटला नाही तर परत करून टाक. नवीन तर मुळीच विकत घेऊ नको. पैसे कुठे आहेत?

आज बंगाली बाराखडी लिहिण्याकरिता एका वहीत खाणे तयार केले. (मुलांना बाराखडी शिकवण्याकरिता आपण जसे खाणे तयार करतोअगदी तसेच.) हे पाहून मला खूप हसू आले. मी म्हणाले, 'हे पाहून तुम्ही बालक मंदिरात तर शिकत नाही ना असे वाटू लागले होते."

बापूजी - "खरे आहे. माणूस जीवंत असतो तोपर्यंत तो विद्यार्थीच असतो. बाराखडी पक्की करण्याची आणि अक्षरे सुंदर करण्याची ही सर्वात चांगली पद्धत आहे. मला तर माझे शिक्षक याच पद्धतीने अंक, बाराखडी लिहायला शिकवत होते. ही फार चांगली पद्धत आहे."

मग बापूजींनी रस घेतला. बंगाली बालपोथी वाचता वाचता बापूजी दहा मिनिट झोपले. सात पंधराला उठले. सात पंचवीसला आम्ही विरामपूर सोडले. आठपंचवीसला आम्ही इथे पोहोचलो. इथे यायला पूर्ण एक तास लागला. रोजप्रमाणे इथे आल्यानंतर बंगाली पाठ केला. मालीश करत असताना पाऊणेक तास बापूजी झोपले. जेवणात तीन खाकरे, भाजी, दूध दहा औंस, तीन संत्री.

दुपारी आराम करून एका नारळाचे पाणी घेतले. सायंकाळी दूध आणि संत्र्याचा रस मिसळून ते प्याले. दुपारी सेवाग्राम आश्रमातून काही टपाल आला होता. तो मी वाचून दाखवला. कताई आणि मुलाखती नेहमीप्रमाणे सुरूच असतात. रात्री आठ वाजता रंगस्वामीजींकडून पत्र लिहवून घेता घेता बापूजींना झोप येऊ लागल्यामुळे त्यांचा तोल जाऊ लागला. यामुळे ते झोपले. आज बापूजी दिवसभरात अशा प्रकारे तीनचारदा झोपल्यामुळे ते खूपच थकलेले आहेत असे वाटते. पाय कापत असल्याची तक्रार करत होते. आज यात्रेत चालावेही जास्त लागले होते

आणि थंडीसुद्धा जास्त आहे. यामुळे असे झाले असावे. शिवाय अंगठ्याला चीर पडली आहे. यामुळेही बापूजींचा पाय दुखत असावा. थंडीचा परिणाम आणि अनवाणी चालणे. आणि बापूजींचे पाय तर इतके काही नाजूक आहेत की थोडीशी काही दुखापत झाली की पाय उलतात. काय होईल ते खरे. ईश्वराची काय इच्छा आहे ते कोणाला कळू शकते?

कोमलापूर,

२१ - २ - '४७

रोजप्रमाणे प्रार्थना. त्यानंतरचा जवळपास सगळा वेळ नायकमजींनी घेतला. मौलानासाहेबांच्या आणि झाकीरसाहेबांच्या शिक्षणावरील विचारासंबंधी गोष्टी झाल्या. साडेपाच वाजता रस घेतला आणि थकल्यामुळे आडवे पडले. मी पाय दाबले. बापूजी ५.५५ पर्यंत झोपले. मृदुलाबहेनकरिता पत्र लिहायला लावले आणि हा सर्व टपाल बिरलाजींकडून भैरवदानजी म्हणून जे गृहस्थ आले होते त्यांच्याबरोबर पाठवला. मुन्नालालभाईकरिता पत्र लिहवून घ्यायला सुरुवात केली होती परंतु ते पूर्ण होऊ शकले नाही. . . . थकवा असल्यामुळे काही घेण्याची सूचना लावण्यलताबहेनने बापूजींना केली. बापूजी म्हणाले, "माझे औषध तर रामनाम आहे. मी कशाकरिता जिवंत आहे ही दुसरी गोष्ट आहे. यामुळे या औषधाने एक तर मी कधीही आजारी पडणार नाही, आणि कादाचित आजारी पडलोही तरी हृदयस्थ रामनामामुळे चोवीस तासात चांगला होऊन जाईन."

साडेसात वाजता बीशकाथली सोडले. सव्वानऊ वाजता आम्ही इथे पोहोचलो. बापूजी रस्ताभर आर्यनायकमजींबरोबर बोलत होते. रस्त्यात दोन ठिकाणी आम्ही थांबलो होतो. यामुळे पोहोचायला थोडा वेळ लागला. पाय धूत असताना बापूजींनी कालच्या अहवालात सुधारणा केली. मालीश सुरू असतानाही बापूजूंनी हेच काम केले.

बापूजींनी आज आपल्याला आहारात काही फेरबदल केला. एक खाकरा आणि एक चमचा बकरीचे तूप भाजीत घेतले. बापूजींमध्ये अशक्तपणा असल्यामुळे बकरीच्या दुधापासून थोडे थोडे लोणी तयार करून मी त्याचे तूप तयार केले होते आणि त्यापासून गूळपापडी तयार केली होती. ती तयार केल्यानंतरच मी बापूजींकडे घेऊन गेले होते. मी म्हणाले, "तुम्ही गूळ घेत असता, तूपही घेत असता. यामुळे मी ही केली आहे." मला भीती वाटत होती की कदाचित घेतली नाही तर?.परंतु सुदैवाने एक लहानसा तुकडा घेतला. फळ घेतले नाही.

मला म्हणाले, "तू गूळपापडी बनवून आणली आणि तुझा विरस केला असता तर तू नाराज झाली असती. यामुळे इच्छा नसतानाही मी गूळपापडीचा एक घास घेतला. परंतु हिच्यामुळे माझा थकवा वा अशक्तपणा थोडाच जाणार आहे. तो तर केवळ रामनामाच्या औषधाने जाईल. माझी सर्व बाह्य सेवाचाकरी तुझ्याच हाती असल्यामुळे ही श्रद्धा तूसुद्धा तुझ्यात रुजवायला पाहिजे. ही गूळपापडी तर तू तुझ्या मनातील काळजीमुळे तयार केली आहेस. पण मला तर तू ही तयार करून आणली तेव्हाच कळले. दूध मिळवून त्यापासून तू लोणी काढतेस हे तर मला माहीतच नव्हते. तू जेव्हा स्वयंपाकघरात काम करत होतीस तेव्हा तू खाकरे तयार करत असशील वा अजून काही काम करत असशील असे मला वाटत होते. मला शक्ती यावी या उद्देशाने तुला मला गूळपापडी खाऊ घालायची होती. परंतु तितक्याच श्रद्धेने तुला जर रामनामाच्या औषधाची ओळख पटली असती आणि अंतःकरणापासून जर तू रामनामाचा जप केला असतास तर त्यामुळे मला या गूळपापडीपेक्षाही किती तरी पटीने फायदा झाला असता आणि माझी शक्ती किती तरी पटीने वाढली असती."

पूज्य बापूजींची रामनामाची श्रद्धा खूप खूप प्रबळ होत चालली आहे.

काकासाहेबांना पत्र लिहिले. त्यात चांगलाच वेळ गेला. निर्मळदांनी आणि देवभाईनी हिंदी, इंग्रजी, बंगाली आणि उर्दू टपाल वाचून दाखवला. इंग्रजी-बंगाली पत्रव्यवहार मोठ्या प्रमाणात निर्मळदा सांभाळत असतात. देवभाई आणि हुनरभाई हिंदी, उर्दू आणि काही इंग्रजी

टपाल. आजकाल माझ्याकरिता टपालाचे काम फार कमी झाले आहे. गुजराती वा काही मराठी राहिले आहे. या दोन्ही भाषांमधील पत्रे बापूजी मोठ्या प्रमाणात लिहिवून घेत असतात आणि त्याच्या नकला करणेसुद्धा माझ्याकडेच असते हे याचे कारण आहे. याशिवाय यांतील उपयोगी पत्रांची तारखेनुसार फाईलही तयार करावी लागत असते.

सायंकाळी बाबा (सतीश चंद्र दास गुप्ता) आले. निरंजसिंग गिलसुद्धा त्यांच्याबरोबर होते. बिहारचा अहवाल आला आहे. कदाचित बिहारमध्ये जावे लागेल असे वाटते. अहवाल अतिशय दुःखद आहे.

गिलबरोबर गोष्टी करत असताना त्यांनी शीख बांधवांची सगळी जबाबदारी आजपासून जीवनसिंगजींना सोपवल्याचे कबूल केले आहे.

स्टॅनली जोन्सलासुद्धा पत्र लिहायला लावले. बाकी कामकाज नेहमीप्रमाणे सुरू आहे. बापूजींची प्रकृती बरीच चांगली आहे. पायाला झालेली इजा अजून पूर्णपणे दुरुस्त झालेली नाही, पण दुरुस्त होण्याच्या बेतात आहे. ऋतूचा प्रभाव आहे. यामुळे चांगला होतो आहे.

दुसऱ्या एका लेखात “गिलच्या निवेदनावरून बिहारबद्दलचा माझा धर्म कदाचित तिथे जाण्याचा असेल. येथील मुसलमानांचे वर्तन पाहता अहिंसेची सत्त्वपरीक्षा होणार आहे !”

ब्रिटनच्या प्रधानमंत्र्यांनी भाषण केले होते. त्या भाषणावरून युद्ध कदाचित अजून शिल्लक असेल असे वाटते !

या गावाची वस्ती ६३८७ आहे. २३८७ हिंदू आणि ४००० मुसलमान आहेत.

आज बापूजींनी ९५ तार कातले. साडेदहानंतर झोपलो.

(थरप्रदेश) थर, कृष्णपूर,

२२ - २ - '४७

आज रात्री जेव्हा २.२० मिनिट झाले तेव्हाच बापूजींना ४.१० झाले असे वाटले. मीसुद्धा डोळे चोळत झोपेतून उठले तर बापूजी मला दात घासायचा काडीचा कुंचला आणि मसी (दात घासायची एक भुकटी) देत होते. पण माझ्या डोळ्यांवरील झोप काही उडेना. मी घड्याळाकडे पाहिले तर अजून अडीचच वाजले होते. बापूजींना घड्याळ दाखवले. मला खूपच झोप येत होती. अशात ही चूक लक्षात आल्याने मला खूपच आनंद झाला. आम्ही दोघेही परत झोपून गेलो. चार वाजता जीवनसिंगजी नेहमीप्रमाणे उठवायला आले. आणि त्या वेळी आम्ही उठलो. तोंड वगैरे धुऊन प्रार्थना केली. प्रार्थनेनंतर बापूजींना गरम पाणी दिले. मी फळांचा रस काढून आणला त्या दरम्यान बापूजींनी बंगालीचा पाठ केला, पण तो अर्धवट राहिला. सकाळची वेळ गुजराती पत्रोत्तरांकरिता ठेवली.

सात वाजून पस्तीस मिनिटांनी कोमलापूर सोडले. इथे आठ वाजून पस्तीस मिनिटांनी पोहोचलो. रोजप्रमाणे बंगाली पाठ केला. सकाळी माझ्याशी गोष्टी करण्यात वेळ गेल्यामुळे हा पाठ अर्धवट राहिला होता. बापूजींच्या मालीशची आणि आंघोळीची तयारी करीपर्यंत त्यांनी तो पूर्ण केला.

जेवणात एक खाकरा, गुळपापडीचा एक लहानसा तुकडा, भाजी आणि सहा औंस दूध घेतले.

जेवत असताना रेणुकारायबहेनबरोबर गोष्टी केल्या. मग बापूजी आराम करत असताना मी त्यांच्या पायाला तूप चोळले आणि बापूजींनी रंगास्वामीजींकरिता पत्रे लिहवून घेतली. सुऱ्हावर्दीसाहेबांना, बिहारचे मुख्यमंत्री श्रीकृष्ण सिन्हांना आणि मौलानासाहेबांना. सव्वा ते दीड पंधरा मिनिट झोपले. इथे खूप गर्दी आहे. मी बापूजींकरिता काही करायला गेले, तर भगिनी, मुले

मागेमागे येतात. पाणी खूप घाणेरडे असल्यामुळे कपडे धुण्याकरिता खूप दूर जावे लागले. दोन वाजेपर्यंत कपडे धुणे आटोपले. बापूजींची जेवणाची भांडीसुद्धा तिथेच घासली. या दरम्यान बापूजींनी देवप्रकाशभाईंबरोबर टपाल पाठवला आणि चरख्यावर कताई केली. कार्यकर्त्या बंधुभगिनीत अमूल्यभाई चक्रवर्ती, आभाबहेन वर्धान, सुधाबहेन सेन आणि बॅनर्जींची भेट झाली.

मी आले तेव्हा ठक्करबापा आणि रामकृष्ण मठाचे स्वामीजी शरदेशानंदजी बसलेले होते. स्वामीजींनी मठात येण्याचे निमंत्रण दिले आहे. बापा थकलेले वाटत होतो. बापूजींशी थोडा वेळ बोलून गेले. साडेचार वाजता आठ औंस दूध आणि अंगूर घेतले. रेणुकाबहेनने मला खूप मदत केली. खूपच खेळीमेळीचा स्वभाव आहे.

नेहमीप्रमाणे प्रार्थना झाली. प्रार्थनासभेत बापूजींनी फिरस्त्यांची एक फार चांगली गोष्ट सांगितली.

> असे म्हणतात की खुदाने जेव्हा पृथ्वी तयार केली तेव्हा ती डोलत होती. यामुळे प्रभूने तिच्यावर मोठेमोठे पर्वत बसवले. यामुळे फिरस्ता ईश्वराला विचारू लागला, “हे मालक, तू बनवलेल्या गोष्टींमध्ये या पर्वतांपेक्षा अधिक शक्तिशाली काही आहे काय?” ईश्वर म्हणाला “हो, लोखंड आहे. ते या डोंगरांनाही तोडू शकते. यामुळे ते जास्त शक्तिशाली आहे.” फिरस्त्याने विचारले, “मग लोखंडापेक्षाही काही शक्तिशाली गोष्ट आहे काय?” खुदा म्हणाला, “आतश (अग्नी) पोलादापेक्षाही जबरदस्त आहे कारण तो लोखंडालाही वितळवतो. यामुळे तो अधिक शक्तिशाली आहे.” फिरस्ता म्हणाला, “आतशापेक्षाही काही अधिक शक्तिशाली आहे काय?” खुदा म्हणाला, “पाणी, कारण पाणी आतशला विझवून टाकतो.” फिरस्त्याने विचारले, “याहूनही काही अधिक शक्तिशाली आहे काय?” खुदा म्हणाला, “वारा, कारण वारा पाण्यालाही हालवतो.” मग फिरस्त्याने विचारले, “हे दयामय प्रभू याहूनही काही अधिक शक्तिशाली आहे काय? ”

खुदा म्हणाला, “हो, दान आहे. दान देणाऱ्या माणसाने उजव्या हाताने दिले तर ते तो आपल्या डाव्या हातापासूनही लपवून ठेवतो. यामुळे दान देणारा माणूस कोणत्याही गोष्टीला जिंकू शकतो.”

प्रत्येक चांगले काम हे दान आहे. तुमच्या भावाशी तुम्ही हसून बोला, रस्ता चुकलेल्या माणसाला योग्य रस्ता दाखवा, तहानलेल्याला पाणी द्या, हे सर्व दानच आहेत. माणूस जीवंत असताना आपल्या सारख्या माणसाबद्दल वा प्राण्याबद्दल जी सद्भावना ठेवतो ती त्याचे सर्वात मोठे भांडवल असते. तो मेल्यानंतर लोक विचारतात, मृताने मागे काय सोडले? परंतु फिरस्ता विचारत असतो, मृताने किती चांगुलपणाचे काम केले आहे?

यानंतर या भागात जे नमोशुद्र (हरिजनांची एक जात) आहेत त्यांच्यासंबंधात बापूजी म्हणाले, “मी भविष्य सांगतो की हिंदुस्थानवरील ब्रिटिश अंमलाचा आणि निश्चितपणे नाश होऊन राहिलेला आहे. ब्रिटिशांची ज्याप्रमाणे इथे नावनिशाणी राहणार नाही त्याचप्रमाणे आपण जर अस्पृश्यतेचा नायनाट केला नाही तर हिंदू धर्माचाही नेहमीकरिता विनाश होईल.”

समान अधिकारासंबंधात बापूजी म्हणाले,

बाह्य जगातील जनतेला हिंदुस्थानाबद्दल आश्चर्य वाटेल असे स्वतंत्रपणे आदर्श जीवन जर आपल्याला व्यतीत करायचे असेल तर सर्व भंग्यांना, सर्व डॉक्टरांना, वकिलांना, शिक्षकांना, व्यापाऱ्यांना आणि इतरांना संपूर्ण दिवसाच्या प्रामाणिकपणे केलेल्या मजुरीच्या बदल्यात वेतन, पगार वा सारखी मजुरी मिळाली पाहिजे. याबद्दल माझ्या मनात किंचितही शंका नाही. शक्य आहे की हिंदुस्थानी या ध्येयाची पूर्ती करू शकणार नाहीत असे होऊ शकते. परंतु आपल्या देशाला जर आपल्याला

सुखासमाधानाची भूमी करायची असेल प्रत्येकाने या ध्येयाकडे दृष्टी ठेवून चालायला पाहिजे.

अशा प्रकारे बापूजींच्या प्रत्येक विचारातून त्यांच्या सूक्ष्म दृष्टीचे दर्शन होतच असते.

प्रार्थनेनंतर वीणाबहेन बसू, बेलाबहेन, लावण्यलताबहेन, रेणुकाबहेन वगैरे स्त्री कार्यकर्त्यांबरोबर बापूजींनी चर्चा केली.

आज आम्ही एका नमोशुद्राच्या घरी उतरलो आहो. घरमालकाचे नाव महादेव वैद्य आहे. खूप गरीब असूनही प्रेमाने त्यांनी सर्व व्यवस्था केली आहे.

प्रभूने भिल्लीणीच्या घरी कसा मुक्काम केला होता? आणि हे तर आम्हांला पाहुणे समजत होते आणि त्यांच्या घरी आम्हांला तसेच बापूजींना अयोध्येच्या राजमहालापेक्षाही जास्त आनंद मिळत होता. अखेरीस प्रभूने उष्टी बोरेसुद्धा आवडत्या मिठाईप्रमाणे किती तरी स्वाद घेत खाल्ली होती ! रामायणातील हे चित्र आज हुबेहूब पाहायला मिळत होते ! या घरमालकाने केलेल्या पाहूणचाराचा बापूजीं खूप प्रसन्नतेने आस्वाद घेत होते.

या गावाची वस्ती २५०० असून त्यात ३०० मुसलमान आहेत. या गावातील सर्व लोक परत आले आहेत.

रात्री बापूजींनी घरातील लोकांबरोबर गोष्टी केल्या. वर्तमानपत्रे ऐकली. मुलांबरोबर खेळले. दहा वाजता अंथरुणावर पडले. मीसुद्धा नेहमीप्रमाणे बापूजींच्या डोक्याला तेल चोळले, पाय दाबले, किरकोळ काम संपवले, आणि साडेदहा वाजता झोपले.

चरशलादी,

२३ - २ - '४७

आज बापूजींनी प्रार्थनेनंतर बंगाली अक्षरे घोटली. एकेक अक्षर घोटायचे असल्यामुळे चांगलाच वेळ लागत होता. शैलेनभाईंकडून अक्षरे लिहवून घेतली आणि प्रत्येक अक्षर दहा वेळा घोटत होते. मग वेगळी अक्षरे लिहवून घेतली आणि तीसुद्धा दहादहा वेळा घोटली. मला तर ही धडपड पाहून खूपच गंमत वाटत होती. एखाद्या मुलाने अक्षरे घोटावी त्याप्रमाणे बापूजी रस घेऊन बंगाली अक्षर घोटत होते.

हे काम मुश्किलीने पूर्ण केले. बालपोथी वाचत असताना व्याकरणाच्या दृष्टीने बापूजींच्या लक्षात एक शब्द येत नव्हता.

मलासुद्धा कळला नाही. 'निओ' आणि 'नाओ' या शब्दांत काय फरक आहे हे समजून घ्यायचे होते. मी आणि बापूजींनी डोकेफोड केली. तेवढ्यात निर्मळदा आले. तेसुद्धा थोडा वेळ गोंधळले. मग समजावून सांगत मला म्हणाले, "बापूजी ही बालपोथी एखाद्या कुराणाप्रमाणे का वाचत आहेत? अशा प्रकारे बापूजींच्या बालपोथीने निर्मळदांसारख्या प्राध्यापकालाही थोडा वेळ गोंधळवले होते."

मग बापूजींनी देवभाईंबद्दल गोष्टी केल्या. आज थोडासाही आराम घेतला नाही. बापूजी म्हणाले की मला नयी तालीमच्या दृष्टीने हे काम करायचे आहे.

साडेसात वाजता चरकृष्णपूर सोडले. इथे आम्ही साडेआठ वाजता पोहोचलो. मालीश, आंघोळ वगैरे आटोपता आटोपता साडेदहा वाजून गेले. ब्रिटिश सरकारला द्यावयाच्या निवेदनासंबंधी रंगास्वामीजींबरोबर चर्चा झाली.

जेवणात गव्हाची सोजी, भाजी घेतली, अर्ध्या अंसाइतके लोणी काढले होते, तेसुद्धा घेतले. जेवण करता करता टपाल ऐकला. मी आंघोळीला गेले. कपडे जास्त असल्यामुळे

धुवायला वेळ लागला. येऊन पाहते तर बापूजींना गाढ झोप लागलेली होती. मी पायांना तुपाची मालीश केली नाही. बापूजींना सव्वाबारा वाजता जाग आली. मला म्हणाले, “मी जरी झोपलेलो असलो तरी तुला पायांना तूप चोळायची परवानगी देतो आहे.” नंतर तीन वाजता बापूजी जेव्हा पोटावर माती घेऊन झोपले तेव्हा मी त्यांच्या पायाला तूप चोळले. नायकमजी, राजकुमारीबहेन आणि मौलाना साहेबांची पत्रे आली आहेत. ती वाचली. आणि माझ्याकडून पत्रे लिहवून घेतली. नकल करण्याकरिता काही पत्रे मला सोपवली.

* * *

आजकाल बापूजी मोटी बा आणि महादेवभाईंची रोज आठवण करत असतात.

आजचे बहुतेक लेखन आलेल्या पत्रांच्या उत्तराकरिता केले होते. ते अतिशय स्पष्ट होते.

बापूजींच्या दाढीच्या केसात एक मस निघाला होता. नृपेनदांनी तो घोड्याच्या केसांनी बांधला. साडेचार वाजता बापूजींनी एक खाकरा, चार बदाम, काजूच्या चार फोडी आणि थोडेसे मुरमुरे घेतले. नंतर कातले. प्रार्थनेची वेळ झाल्यानंतर प्रार्थनेकरिता गेले.

प्रार्थनेत काही प्रश्न विचारण्यात आले होते. त्यांतील एक प्रश्न होता, “बालविवाह आणि विधवाविहासंबंधीचा”. याच्या उत्तरात बापूजी म्हणाले -

> “या बाबतीत माझे उत्तर स्पष्ट आहे. बालविवाह जर झाले नाही तर बालविधवा होण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. आणि नमोशुद्रांमध्ये (हरिजनांमध्ये) कन्येला विकण्याची जी पद्धत आहे ती तर नेहमीकरिता पूर्णपणे जायलाच पाहिजे. आणि प्रत्येक व्यक्तीने एकदाच लग्न केले पाहिजे अशी माझी मान्यता आहे. ‘नागरी विवाहाची पद्धत’ मला अगदीच मान्य नाही. जिथे हृदयाचे ऐक्य असेल, परस्परांची संमती असेल तिथे ‘नागरी विवाह’ करण्याची काय आवश्यकता? परंतु यात मी खोलवर उतरणार नाही. धार्मिक क्रियेची गोष्ट वेगळी आहे. तिचा अर्थ तर जीवनात नवनिर्मिती होत असताना

त्याकरिता ईश्वराची आपण जी प्रार्थना करतो तिचा हा विधी एक भाग आहे. तो मला खूप आवडतो. हे खरे आहे की त्यात अनेक खोट्या पद्धतीही शिरल्या आहेत. परंतु त्यात मी सध्या शिरत नाही.

"आमचा हा प्रवास हैमचरला संपेल आणि त्यानंतर नवीन विभागाला सुरुवात होईल. या विभागाचा हा सुखद अंत झाला याकरिता मी ईश्वराचे आभार मानते. ठक्करबापा तर हरिजनांचे सेवक आहेत आणि गोरमहाराज जसे हरिनांकरिता आहेत तसे ते आहेत. हा जिल्हा त्यांनी आपल्या पसंतीप्रमाणे घेतला. 'सुताराचे मन लाकडातच रमते' असा एक वाक्प्रचार आहे ना?

"तुम्ही तुमच्या जातीला हलकी वा अस्पृश्य समजू नका. तुमचा उद्धार विधिमंडळ वा इतर कोणी करू शकणार नाही. याकरिता तुम्हांला स्वतःलाच मेहनत करावी लागेल. इथे जी घाण झाली आहे ती बापांनी मला सांगितली. मला फार वाईट वाटले, परंतु याकरिता मी रडणार नाही की घाबरून गप्प बसणार नाही. हिंमत ठेवून तुमच्या मजुरीवर तुम्ही विश्वास ठेवा. जे लोक आपल्या उद्धाराकरिता प्रामाणिकपणे मेहनत करतात त्यांना निश्चितच ईश्वर मदत करतो.

प्रार्थनेनंतर बापूजींनी टपाल लिहिला. मौन सुरू झालेले असल्यामुळे वातावरण फार शांत आहे.

हे घर मिस्त्रीचे आहे. जातीने ते नमोशुद्र आहेत. या गावाची वस्ती ७६६८ आहे. त्यात ५० हिंदू आहेत. सव्वानऊ वाजता बापूजी अंथरुणावर पडले.

हैमचर,

२४ - २ - '४७

रोजप्रमाणे प्रार्थना झाली. प्रार्थनेनंतर पाणी पीत असताना माझी नोंद ऐकली.

सातपंचवीसला चरशलादी सोडले. आम्ही इथे येत असताना रस्त्यात मालतीदिदी (मालतीदेवी चौधरी) आणि त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या कार्यकर्त्या बापूजींना घ्यायला आल्या होत्या. बापूजी ठक्करबापांना विनोदात म्हणाले, "आज तर तुम्ही मला तुमचा पाहुणा केला आहे ना? आपण दोघेही म्हातारे. चांगली जोडी जमली." खूप हसले.

रस्त्यात रामकृष्ण आश्रमात गेलो. पू. बापांनी आणि बिसेनभाईंनी खूप चांगली व्यवस्था केली होती. दारात भगिनींनी आकर्षक रांगोळी काढली होती. शांतिनिकेतनमध्ये शिक्षण घेतलेल्या भगिनींनी काढलेल्या रांगोळीत दोष कसा राहू शकणार होता? मग मालतीदिदींनी बापूजींच्या कपाळाला कुंकू लावले. मालतीदिदी सुंदर स्वागत गीत गाईल्या, शंख वाजवला. पोहोचताच बापूजींनी पाय धुतले आणि जवाहरलालजींना पाठवावयाचे पत्र पूर्ण केले. बंगाली पाठ केला. इथे तर सुंदर तयारी होती. यामुळे मला मालीश, आंघोळकरिता न्हाणीघर तयार करायचीसुद्धा आवश्यकता नव्हती. बापूजींकरिता भाजीचा कुकर लावून सरळ मालीश केली. अजितभाई वगैरे कार्यकर्त्यांनीसुद्धा खूप मेहनत घेतली होती. आंघोळ केल्यानंतर जेवणात भाजी, दूध आणि सफरचंद घेतले.

बापूजींचे कपडे धुवायची संधी मिळणे हे सद्भाग्य समजणाऱ्या अजितभाईंनी आग्रहपूर्वक बापूजींचे कपडे धुतले. मोठ्या मोठ्या शिकल्यासवरलेल्या लोकांना बापूजींचे कपडे धुणे, त्यांची उष्टीखरकटी भांडी घासणे ही जीवनातील अपूर्व संधी वाटते आणि यामुळे ते ते काम करत असतात. भांडीसुद्धा एका पदवीधर सुसंस्कारी मुलीने धुतली. मालतीदिदी मला म्हणाल्या, "आम्हांला तुझा हेवा वाटतो. यामुळे बापूजी जितके दिवस इथे राहतील तितके दिवस आम्हांला

तू त्यांचे काम करू दिलेच पाहिजे.” खूप प्रेमळ आहेत त्या. आपल्या बहिणीची, बबूबहेनची दिवसभर आठवण करत होत्या आणि अतिशय जिव्हाळ्याने खाऊ घालत होत्या. आठवणीने माझ्याकरिता दही मिळवले होते. बळजबरीने दूध पाजत होत्या. आणि त्यांनी बंगाली भजनसुद्धा शिकवले. पू. बापांनी त्यांच्या स्वयंपाकघरात माझ्याकरिता स्वयंपाक करवून घेतला होता. वरण, भात, भाजी, पोळ्या, पापड जेवणात होते. पू. बापाकरिता बिरलाजींकडून स्वयंपाकी देण्यात आला होता.

इथे (नोआखालीत) आल्यानंतर जवळपास तीन महिन्यांनंतर आज अशा प्रकारचे घरगुती जेवण मी जेवले होते.

जेवण करून आल्यानंतर जवळपास साडेबारा वाजता बापूजींना नारळपाणी दिले. बापूजी कताई करत असताना मी त्यांना पत्रे वाचून दाखवली. साडेतीन वाजता बापूजींनी दोन खाकरे, मुरमुरे आणि दोन काजू घेतले. सव्वाचार वाजता माती घेतली. पाऊणेपाच वाजता प्रार्थनेकरिता गेले. इथे जी जळालेली, लूटमार करण्यात आलेली घरे होती ती पाहायला आम्ही प्रार्थनेनंतर गेलो. भयंकर दृश्य होते. घरांच्या ठिकाणी राख, अर्धवट जळालेले इमारती सामान, पत्रे इत्यादी पडलेले होते. भाजीबाजाराची राखरांगोळी झालेली होती. खूप गोष्टी पळवून नेण्यात आल्या होत्या. असे असूनही अजूनही बरेच सामान पडलेले होते. इथे सुरेशभाई रात्रशाळा चालवत असतात. ती पाहायला गेलो.

निर्मणदा तर इथेच तंबू ठोकून बसले आहेत. दोन घर आहेत. एकात बापा राहत आहेत, एकात बापूजी आहेत. वर्तमानपत्रांच्या प्रतिनिधींनी तर तंबू ठोकले आहेत.

नऊ वाजता बापूजींनी वर्तमानपत्रे ऐकली. थोडे लिहिले. पाऊणेदहा वाजता झोपायची तयारी.

इथे आठवडाभर राहायचे आहे. मदत करणारे इतर लोक असल्यामुळे माझ्याकडे मुख्य मुख्य कामच राहणार आहे. आणि बापूजींबद्दलच्या भक्तिभावनेमुळे त्यांचे कोणतेही काम करून कृतार्थ होण्याची भावना यांच्या अंतःकरणात आहे.

हैमचर,

२५ - २ - '४७

रोजप्रमाणे प्रार्थना. प्रार्थनेनंतर गरम पाणी आणि मध देऊन मी परत थोडा वेळ झोपले. वीस मिनिटांनंतर बापूजींना रस दिला. साडेसात वाजता यात्रेकरिता निघायच्या वेळी फिरायला निघालो. आझाद हिंद फौजेचे देवनाथभाई दासबरोबर लहान लहान मुलींनी बापूजींना सलामी दिली. जयहिंदची घोषणा केली. दव आणि थंडी असल्यामुळे मालीश थोडी उशिरा केली. साडेनऊ वाजता मालीशकरिता गेले.

जेवणात दूध, भाजी, फळ आणि एक केळ घेतले. बाबा (सतीश चंद्र दास गुप्ता) आले.

दुपारी आलेला टपाल वाचून घेतला. हे काम करत असताना बापूजींनी साडेचार वाजता मालतीबहेन आणि रेणुकाबहेनबरोबर गोष्टी केल्या.

येथील मदत अधिकाऱ्यांनी तीन वाजता एका सभेचे आयोजन केले होते. तिच्यात गेले. अधिकाऱ्याचे नाव नूरन्नबी होते. सभा एक तासापेक्षाही जास्त वेळ चालली. अध्यक्ष आणि इतर वक्त्यांनी इतकी काही लांबण लावली की कंटाळा येऊ लागला. बापूजींना तर जे समजून घ्यायचे होते ते त्यांनी समजून घेतले होते. परंतु सभेतून उठून जाणे योग्य झाले नसते. यामुळे वेळेचा उपयोग करण्याकरिता इतक्या गोंगाटातही बापूजींनी थोडी झोप घेऊन टाकली. यादीत बापूजी कोणानंतर बोलतील हे लिहिलेले होते. त्या बंधूंचे भाषण संपण्याच्या बेतात असताना मी बापूजींना उठवणार होते, परंतु विशेष लक्षणीय गोष्ट तर ही होती की बापूजींना स्वतःलाच त्या वेळी जाग आली. बापूजींचे झोपेवर जबरदस्त नियंत्रण आहे. बापूजी म्हणाले,

माझ्याजवळ बंगाली भाषा नाही आणि नाही माझ्याजवळ ठणठणित आवाज. तुम्ही पाहिले असेल की जे वक्तव्य देण्या आले ते मी ऐकलेही होते आणि त्याचबरोबर मी झोपलोही होतो.

इथे जे सांगण्यात आले त्या तर हवाई गोष्टी आहेत. विमानात उडून आपण कुठवर जाऊ शकतो याची कोणाला कल्पना आहे? मी नम्रपणे इतकेच म्हणेन की ज्यामुळे ताबडतोब मदत होईल तेवढेच काम करा. योजना कागदावर राहण्यात काहीही अर्थ नाही.आपल्याला एक वाईट सवय आहे. आपल्याला करायचे असते थोडे आणि जाहिरात मात्र आपण फार मोठी करतो. आणि मग आपण अशा काही मोठमोठ्या योजनांचा विचार करतो की ज्या अखेरीस कागदावरच राहून जातात. परिणामी नुकसान हे होते की यामुळे आपण लोकांचा, सर्वसामान्य जनतेचा विश्वास गमावून बसतो.

कोणतेही काम करण्याआधी “मी काही पाप तर करत नाही ना?” असे आपण आपल्या अंतःकरणाला विचारले पाहिजे आणि अंतःकरण जर कर म्हणाले तर आपण ते केले पाहिजे. आपले अंतःकरण म्हणत असेल की हे पाप झाले तर आपण प्रायश्चित्त घेऊन ते साफ केले पाहिजे. इथेच परत असे काही न करण्याची काळजी येऊन जाते.

दुसरी गोष्ट काय करायचे वा बोलायचे याचा विचार करत जागेवरच बसून राहू नये. आपल्याला जर रामराज्य स्थापित करायचे असेल तर आपल्या प्रत्येक कामात इतर काय म्हणतील याकडे पाहत बसण्याची आवश्यकताच नाही. वाईट कार्य आपल्याला बोचत असेल तरच आपली उन्नती होईल.

सव्वाचार वाजता आम्ही परतलो. आल्यानंतर बापूजींनी एक औंस गूळ आणि दूध घेतला.

प्रार्थनासभेत एक प्रश्न आला होता -

"पडदापद्धतीचा जर कडक रीतीने अंमल करण्यात आला तर भगिनींच्या पावित्र्याचे अजून चांगले जतन होईल असे वाटत नाही काय?"

बापूजी - पडदापद्धतीची गोष्ट अंतःकरणाशी संबंधित आहे वा हे बंधन पाळणाराशी संबंधीत आहे. जी स्त्री दाखवण्याकरिता तोंडावर कापड घेते पण आतून मात्र परपुरुषाचा विचार करत असेल तर तिचे लाजणे पाखंडी असते. यामुळेच मी पडद्याचा विरोधी आहे. शिवाय पडद्यामुळे वैद्यकीय दृष्टीने तर नुकसान आहेच. पडद्यामुळे स्त्रियांना पुरेशा प्रमाणात हवा आणि प्रकाश मिळत नाही. परिणामी त्या रोगट राहतात. परंतु पडद्यामागील मूळ भावना संयमाची आहे. हा संयमाचा पडदा जी ठेवते तीच खरा पडदा ठेवते.

प्रश्न - तुम्ही लोकांना मजूर होऊन पोट भरायला सांगता. मग व्यापाराचे आणि शिक्षणाचे काम कोण करील? मग आपल्या संस्कृतीचा नाश होणार नाही काय?

बापूजी - हा प्रश्न विचारणाराला माझ्या बोलण्याचा नीट अर्थ कळलेला नाही. शिवाय भावनांचा विचार केला पाहिजे. केवळ शब्द पकडून ठेवू नये. हत्तीचे तोंड असलेल्या गणपतीला पाहिले तर प्रथमदर्शनी तो विचित्र प्राणी वाटतो. पण प्रतीक म्हणून आपण त्याच्याकडे पाहिले तर ती कल्पना माणसाला उंच चढवते.

दहा डोके असलेला रावण एक मूर्ख माणूस वाटतो. परंतु त्याचा अर्थ असा आहे की माणसाला सारासाराचे भान राहत नाही. जो माणूस एका वचनावर राहत नाही, क्षणोक्षणी बदलतो आणि भावनेच्या भरात व्यर्थ प्रयत्न करत असतो तो अनेक तोंड असलेल्या राक्षसारखा असतो. याचा अर्थ तो एका गोष्टीवर स्थिर नसतो तो एका तोंडाचा नसतो हा माझ्या दृष्टीने रामायणात आलेल्या दहा डोके असलेल्या रावण राक्षसाचा अर्थ आहे.

दंतकथांमध्ये असा गूढ अर्थ भरलेला असतो. यामुळे मजुराच्या मजूरीत श्रमविभाजन तर आहेच, याशिवाय प्रत्येक प्रकारचे काम करणाऱ्या सर्वांना सारखे वेतन

मिळाले पाहिजे हा माझ्या बोलण्याचा अर्थ आहे. वकील, डॉक्टर, शिक्षक, भंगी - हे सर्व आपापले काम तर करतच असतात परंतु त्यांना वेतन मात्र सारखे मिळत नाही. डॉक्टरला आठशे रुपये मिळतात तर भंग्याला आठ आणे. आपण असे समजतो की या दोघांचीही सेवा उत्तम आहे, सारखी आहे. असे असेल तर या दोघांचीही राहणी का सारखी असू नये? हा सिद्धांत मान्य केला तरच ही गोष्ट खऱ्या अर्थाने शक्य आहे. असे केले तर राष्ट्राचाच नाही तर जगाचाही उद्धार होईल आणि समाजव्यवस्थाही सुखावह होईल.

विलायतेत खऱ्या भंग्याचे काम करणारे, खऱ्या भंग्याचा धंदा करणारे तर मोठमोठे नामांकित एंजिनिअर आणि निष्णात सफाईशास्त्रज्ञ आहेत. परंतु आपल्यामधील आळस आणि जडपणा जात नाही तोपर्यंत काहीही चांगले करता येणे कठीण आहे.

बाबांनी बापूजींच्या नवीन यात्रेचा नकाशा आणला होता. प्रार्थनेतून आल्यानंतर बापूजींनी त्यासंबंधी त्यांच्याशी चर्चा केली. मी सामान वेगळे काढले. जास्तीचे सगळे सामान बाबांच्या हवाली केले.

बापूजी पडलेले असताना साडेनऊ वाजता माझी संपूर्ण रोजनिशी मी त्यांना वाचून दाखवली. मी वाचत होते तेव्हा मदत अधिकाऱ्याचे नाव त्यांनी नूरन्नबी लिहिले होते. त्याकडे बापूजींनी माझे लक्ष वेधले. ते म्हणाले, “एक तर नूरन्नबीसाहेब लिहिले पाहिजे वा नूरन्नबीजी लिहिले पाहिजे वा भाई लिहायला पाहिजे. लिहिलेली भाषा परत वाचायला पाहिजे आणि कुठे काही अनुचित वा असभ्यपणाचे तर लिहिले गेले नाही ना हे पाहिले पाहिजे.”

रात्र झालेली असल्यामुळे मी बापूजूंनी घाईघाईत ऐकवत होते. तरी पण कुठे काही ऐकण्यात चूक तर झाली नाही ना हे निश्चित करण्याकरिता बापूजींनी मला ही ओळ परत वाचायला लावली. मी फक्त नूरन्नबीच लिहिलेले असल्याबद्दल त्यांंनी खात्री करून घेतली. ही चूक आहे असे तू समज असे ते म्हणाले. बापू असे महान गुरू आहेत.

हैमचर,

२६ - २ - '४७

रोजप्रमाणे प्रार्थना झाली. बिसेनभाईंनी गीतापाठ केला. . . . कडून एका लहानशा पुस्तिकेच्या रूपाने पत्र मिळाले आहे. बापूजींनी प्रार्थनेनंतर ते पत्र माझ्याकडून वाचून घेतले. बापूजी म्हणाले "एक पंथ आणि दोन काम झाले. तू वाचून घेतले आणि मी ऐकून घेतले, आणि जे तुला कळले नाही ते समजावून सांगितले."

साडेसात वाजता फिरायला जायला निघालो. फिरून आल्यानंतर स्थानिक कार्यकर्त्या बंधूंशी वार्तालाप. अमतुस्सलामबहेन आणि कनूभाई आले आहेत. साडेनऊ वाजता मालीश. मालीश सुरू असताना बापूजी अर्धा तास झोपले. आंघोळ वगैरे उरकवण्यात एक तास लागला. जेवणात तर एक खाकरा, भाजी आणि आठ औंस दूध घेतले. बहुतांश वेळ तर अमतुस्सलामबहेन आणि कनूभाईंशी गोष्टी करण्यातच गेला. तेवढ्यात नुरन्नबीभाई आले.

येथील बाजारात दोन वाजता जाहीर सभा ठेवण्यात आली होती. तिथे गेलो. तिथून येऊन बापूजींनी माती घेतली. माती घेतलेली असताना थोडेसे झोपले. पाऊणेचारपासून प्रार्थनेकरिता जाईपर्यंत बापाशी गोष्टी केल्या. साडेचार वाजता प्रार्थनेकरिता गेले. प्रार्थनासभेत बापूजी म्हणाले,

> आपल्यामध्ये जर माणूसकी असेल तर आपण लहानलहान गोष्टींकरिता सरकारवर अवलंबून राहायला नको. उदाहरणार्थ एखादा रस्ता साफ करायचा असेल तर जो रस्ता माझ्या गावाजवळ असेल, जो सोयीस्कर आहे असे मला वाटत असेल तो मी आपोआपच साफ ठेवला पाहिजे. लक्ष न राहूनसुद्धा वाटेल तिथे थुंकू नये. कचरा कचऱ्याच्या जागेवरच टाकला पाहिजे. अशा अनेक सेवा आहेत की ज्या करण्याकरिता जवाहरलालजींना वा सरदारना वा जिनासाहेबांना विचारायला जाण्याची आवश्यकता

थोडीच असते? गावकऱ्यांना जर सुखी करायचे असेल तर ग्रामपंचायतींची स्थापना करून सर्वांशी सल्लामसलत करून प्रत्येकाने बऱ्या वाईटाची जबादारी घेतली पाहिजे.

ज्या माणसाची त्यागभावना आपल्या समुदायाच्या हिताच्या वर जात नाही तो स्वतःच स्वार्थी झालेला असतो आणि आपल्या समुदायालाही स्वार्थी करतो. माझ्या मते स्वार्थत्यागाचा तर्कनिष्ठ निष्कर्ष हाच आहे की व्यक्ती समुदायाकरिता त्याग करते, समुदाय जिल्ह्याकरिता त्याग करतो, जिल्हा प्रांताकरिता त्याग करतो, प्रांत देशाकरिता आणि देश जगाकरिता. समुद्रातून बाहेर पडलेला थेंब कोणतेही चांगले काम न करता तसाच वाळून जात असतो. परंतु तो जर सागराचा भाग राहिला तर तो समुद्राच्या वैभवाचा वाटेकरी होतो व आपल्या छातीवरून तो मोठमोठे जहाज नेऊ शकतो.

खरोखर स्वतंत्र झालेला हिंदुस्थान आपल्या शेजाऱ्याच्या अडीअडचणीत निश्चितच धावून जाईल. अफगाणीस्तान, सिलोन (श्रीलंका) आणि ब्रह्मदेशाचे (म्यांमार) उदाहरण देऊन गांधीजी म्हणाले की हा नियम या तीन राष्ट्रांनाही लागू होतो आणि ज्यांना ज्यांना आपण मदत करतो त्यांचे आपणसुद्धा शेजारी होतो. आणि अशा प्रकारे व्यक्तीने जर समंजसपणाने त्याग केलेला असेल तर ते संपूर्ण मानवजातीला आपल्या सेवेच्या क्षेत्रात सामावून घेईल.

प्रार्थनेनंतर बापूजी फिरले. एक औंस गूळ, आठ औंस दूध आणि फळ घेतले. आज बापूजींचे ९० तार झाले. फिरून आल्यानंतर रोजप्रमाणे वर्तमानपत्रे ऐकली. अरुणांशभाई, बिसेनभाई, अमतुस्सलामबहेन यांच्याबरोबर गोष्टी केल्या. बापूजींचे मी पाय दाबत असताना त्यांनी मला . . . वरून एक सैद्धांतिक गोष्ट सांगितली -

. . . कोणी जर चुकीच्या मार्गाने खूप मेहनत करत असेल, आणि त्याने ती कितीही सेवाभावनेने केलेली असेल तरी ती जर चुकीच्या मार्गाने केलेली असेल तर ती वाया जात असते.

याचे कारण त्या माणसाला खऱ्याखोट्याची चाड नसते हे आहे. अशा माणसाचे काम चमकत नाही. . . .चा उपवास चमकला नाही याचे माझ्या दृष्टीने हेच कारण होते. त्यातील दोषाचा हा परिणाम आहे. माणसाने नेहमी स्पष्ट राहायला पाहिजे. आपल्या चुका सूक्ष्मदर्शक यंत्रातून पाहायला शिकायला पाहिजे. इतरांच्या चुका पहाडावरून पायाच्या हा नियम जर अवलंबिला तर आपण हजारो पापांपाळून वाचू. आपली बाजू जर खरी असेल तर आपल्याला भीती कोणाची? माणसाने सर्वात आधी सत्यवादी होण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

भीतीमुळे वा अनेकदा कोणत्या तरी लाभाच्या लोभामुळे वा दोष लपवण्याच्या वृत्तीमुळे खोटे बोलण्याचा प्रसंग उद्भवण्याचे काय कारण? आणि असा जो माणूस असेल आणि त्याच्याकडून जर काही चूक झाली असेल तर ती दुरुस्त करण्याकरिता त्याला उघडा पाडण्याइतके जेव्हा आपण शूर होऊ तेव्हा आपली मुक्ती होईल. यामुळेच तर काल मी लिहिले की . . .  जर कोणी दुषित वाटत असेल तर त्याचा दोष जर उघड केला तर त्याचे परिणाम दोन्ही पक्षांकरिता लाभदायकच होतील. यामुळे दोषाची घाण धुतली जाऊन ते साफ होतील आणि आत्मा, हृदय आणि चेहरा या सर्वांवर तेज येईल आणि ते उजळून निघतील.

प्रामाणिक आणि शुद्ध हेतूने आपल्या अंतरात्म्याला साक्षी ठेवून जो कार्य करतो त्याला ईश्वर निश्चितच मदत करत असतो. हे मी अनुभवतो आहे. वादळ कितीही मोठे आले तरी निष्ठावंताला त्याचा स्पर्श होऊच शकत नाही. कितीही मोठे वादळ आले तरी खऱ्या आणि दृढ व्यक्तीच्या हृदयबलात कधीही ढिलेपणा येऊ शकत नाही. आणि अशा वेळी जी निष्फळता दिसते ती सफलताच असते. ती सफलता वा निष्फळता ईश्वराच्या आशीर्वादाच्या रूपाने आपल्याला मिळालेले एक वरदानच असते. हे मी अनुभवतो आहे आणि म्हणूनच सांगतो आहे की ईश्वर मला मदत करतो आहे याबद्दल मला मुळीच शंका नाही.

मध्येच बिहारमध्ये जावे लागेल असे वाटते. रात्री मी बापांजवळ बसले. त्यांनी काही कागद वाचून दाखवले. काही कागदपत्रे वाचून दाखवल्यानंतर बापा म्हणाले ". . . काही गोष्टी प्रत्यक्ष पाहिल्यानंतर जितकी समजते तितकी कागदपत्रे वाचून समजत नाही. बापूजींबरोबर आज माझी जी चर्चा झाली तिच्यावरून मला जाणवते आहे ते मी सांगतो आहे. बापूजींबरोबर माझ्या ज्या गोष्टी झाल्या त्यावरून मी हे सांगतो आहे. पत्रव्यवहाराने अनेकदा उलट काही गैरसमज वाढतात. बापूजींबरोबर अर्धा तास माझी जी चर्चा झाली त्यावरून तुझ्या येथील मुक्कामात मी प्रत्यक्ष जे पाहितो आहे त्यावरून माझे मन खूप हळवे झाले आहे. केवळ पत्रव्यवहारावरून बापूंना समजून घेण्याच्या प्रयत्न केला तर ते खूप अर्धवट कळतात."

बापाकडून आले तेव्हा बापूंना गाढ झोप लागलेली होती. मीसुद्धा लगेच झोपून गेले.

हैमचर,

२७ - २ - '४७

नेहमीप्रमाणे प्रार्थना. . . . नंतर बापूजींशी गोष्टी करायला गेले. परंतु बंगाली पाठ सुरू असताना बापूजींनी गोष्टी करायला नकार दिला. फिरत असताना . . . शी गोष्टी केल्या. बापूजींनी स्पष्टपणे सांगितले की "तू आता पूर्णपणे बदलली आहेस आणि खोटे बोलते आहेस." या गोष्टीची नोंद करून ठेवायला बापूजींनी मला सांगितले. . . . बापूजींवर खूप नाराज झाले. बापूजी म्हणाले, "त्याची फिकीर नाही. मला जे खरे वाटते ते जर मी सांगितले नाही तर दुसरा कोण सांगेल? खरे सांगणे हा माझा धर्मच आहे."

साडेआठ ते अकरा मालीश, आंघोळ वगैरे चालले. जेवणात दूध, भाजी आणि एक केळ घेतले. आज बापूजी सहाएक वाजताच्या अंदाजात झोपून गेले. मग खादीबद्दल अमतुस्सलाम बहेनने जे लिहिले होते ते परत तपासले. दोन वाजता नारळपाणी घेतले. साडेतीन वाजता सुधाबहेन (सेन) आल्या. अहिंसेसंबंधी त्यांच्या मनात सुरू असलेल्या गोधळासंबंधात बापूजींनी

सुंदर उत्तर दिले. रामनामरुपी तलवार लोखंडाच्या तलवारीपेक्षा किती तरी मजबूत असते.' आज पंचाहत्तर तार कताई केली.

सातचाळीस वाजता फजलूल हकसाहेब आले. कोणी तरी त्यांना करेणच्या फुलांचा हार घातला. फोटोग्राफरने त्यांना उभे करून आधी फोटो घेतला. उन्ह खरोखरच खूप कडक होते आणि कमालीचा उकाडा होता. त्यांचे शरीरसुद्धा खूप जाडजूड होते. आणि त्यांना बापूजींच्या झोपडीतच बसायचे होते. मी बापूजींना पंख्याने वारा घालत होते. त्यांनासुद्धा पंख्याची हवा मिळेल असे कर अशी बापूजींनी मला सूचना केली. आधी घालण्यात आलेल्या हारावरून वाहणाऱ्या घामाच्या धारांकडे इतक्या गंभीर विषयावर बोलत असतानाही बापूजींचे लक्ष गेले. बापूजींनी हार काढायची सूचना केली. त्यांनी हार काढला.

सव्वाचारवाजेपर्यंत ही मुलाखत चालली. त्यांच्याबरोबर प्रा, महमूद अझीमुद्दीन, महमद सराज उल इस्लाम आणि नूरेझमानिया होते. बापूजींनी सर्व प्रकारे समजावून सांगितले. हे लोक गेल्यानंतर थोडेसे मुरमुरे आणि गुळपापडीचा एक तुकडा घेतला.

आजची आमची प्रार्थना दंगलीत तोडफोड करून उद्ध्वस्त करण्यात आलेले मंदिर असलेल्या एका इमारतीत झाली. आजचे प्रार्थनाप्रवचन कालच्या प्रवचनाच्या आधारेच झाले.

> माणूस एकाच वेळी शेजाऱ्याची आणि मानवतेची सेवा करू शकतो हे सत्य मी निश्चितपणे मान्य करतो. परंतु अट इतकीच आहे की शेजाऱ्याची सेवा कोणत्याही अर्थाने स्वार्थी हेतूने केलेली नसावी आणि केवळ शेजाऱ्याचीच सेवा करणारा तो माणूस नसावा. तसेच सेवकाने ज्याची सेवा करायची आहे त्यांच्यात कोणताही भेदभाव करायला नको. इतकेच नाही तर सेवकाने सेवेच्या आधारावर गैरलाभ घ्यायला नको, कोणाचीही पिळवणूक करायला नको. असे झाले तर लोक त्या सेवेकडे आकर्षित होतील आणि शेजाऱ्यांनाही त्या भावनेची लागण होईल आणि त्याचबरोबर आपणही आपल्या

शेजाऱ्यांनाही अशी सेवा दिली पाहिजे हेसुद्धा त्यांना कळेल आणि या सेवाकार्यात वृद्धी होत राहील आणि एक दिवस असा येईल की जेव्हा ही सेवा संपूर्ण जग व्यापेल. यावरूनच कळते की स्वदेशी भावना ती भावना आहे की जी इतरांना वगळून माणसाला आपल्या निकटच्या शेजाऱ्याची सेवा करण्याकरिता प्रेरित करते. मी आधीच उल्लेख केलेले असल्याप्रमाणे आपण ज्या शेजाऱ्याची सेवा करतो त्याने आपल्या शेजाऱ्याची सेवा केली पाहिजे ही अट आहे. या अर्थाने स्वदेशी केवळ आपल्या शेजाऱ्याची सेवा नाही. माणसाची सेवा करण्याच्या क्षमतेची वैज्ञानिक मर्यादा ती लक्षात घेते इतकेच.

माझे कार्य तर लोकांमध्ये खरे साहसी होणे शिकवूनत्यांना शूर बनणे शिकवणे आहे. तुम्ही लोकांनी तुमच्या मनात जी भीती भरलेली आहे ती जर तुम्ही काढून टाकाल तर तुम्हांला कोणीही घाबरवू शकणार नाही. तुम्ही निडर आणि हिंमतवाले झाले आहा असे जेव्हा मुसलमान पाहतील तेव्हा ते आपोआप तुमचे मित्र होतील. खरे शौर्य तलवार मिळवून समोरच्याला मारण्याच्या कौशल्यात नाही. माणूस माणसाचा शत्रू का होतो हे समजून घेण्यात खरी बहाद्दुरी आहे.

उद्योगीकरणासंबंधी बापूजी म्हणाले,

आधुनिक जगात अमेरिकेची गणना सर्वात जास्त उद्योगीकरण झालेल्या देशात होते.असे असूनही त्या देशात गरिबी आहे, माणसाला भ्रष्ट करण्याऱ्या वाईट सवयी आहेत आणि तेथील व्यसने नष्ट झालेली नाहीत. याचे कारण वैश्विक मानवी शक्तीचा उपयोग करण्याऐवजी अमर्याद संपत्ती कमावणाऱ्या अत्यल्प लोकांच्या हाती तेथील सत्ता केंद्रित झाली आहे. परिणामी अमेरिकेचे उद्योगीकरण तिच्या गरीब लोकांकरिता आणि उर्वरित जगाकरिता खूपच जडभारी ओझ्यासारखे झाले आहे.

हिंदुस्थानला जर अशा विनाशापासून वाचायचे असेल तर त्याने अमेरिकेत आणि इतर पाश्चात्त्य राष्ट्रांत जे काही सर्वोत्तम असेल त्याचे अनुकरण केले पाहिजे आणि त्यांच्या आकर्षक परंतु विनाशक अशा आर्थिक धोरणापासून वेगळे राहायला पाहिजे. हिंदुस्थानात राहणाऱ्या चाळीस कोटी लोकांची शक्ती एकत्र केली पाहिजे आणि तिचा चांगल्यात चांगला उपयोग केला पाहिजे.

आपण देशातील कच्च्या मालाचा उपयोग करून त्यापासून तयार होणाऱ्या वस्तूंपासून आपल्याला अमर्याद पैसा मिळवण्याऐवजी कच्चा माल जर पद्धतशीरपणे वितरित केला आणि त्याचा सदुपयोग केला तर या देशातील संपत्ती या देशात राहील. कोणालाही अशा प्रकारे दंगली करण्याकरिता फुरसतच राहणार नाही. आणि यातच माझ्या दृष्टीने आर्थिक नियोजन साठवलेले आहे.

प्रार्थनेनंतर बापूजींनी जवळपास दीडदोन तास अविरत टपाल लिहवून घेतला. नऊपंचवीसला वर्तमानपत्रे ऐकली. गोष्टी करता करता बापूजी आज दहाएक वाजता झोपले.

हैमचर,

२८ - २ - ‘४७

रोजप्रमाणे प्रार्थना. प्रार्थनेनंतर . . . शी गोष्टी केल्या. . . . च्या चुकीमुळे बापूजींना दुःख झाले असे वाटते. बापूजींकडे जाऊन आपल्या चुकीबद्दल माफी मागण्याची . . . ची इच्छा आहे. त्याबद्दल बापूजी आपले विचार व्यक्त करत म्हणाले, “यांनी काय चूक केली ते जाणून घ्यायची माझी इच्छा आहे. मला आश्चर्य वाटले, दुःख झाले. यांनी जर चूक केली असेल तर त्यांना त्याबद्दल दुःख व्हायला पाहिजे होते. पण त्यांनी जरी चूक केली असेल तरी ती माझ्या प्रेरणेने झाली असेल. ही शंका आणि त्यानंतर घडलेले दोन किस्से बापूजींनी सांगितले. आणि आता , , , जर ही चूक वाटत असेल तर हा . . . चाच दोष आहे हे स्पष्ट दिसते.”

कोणत्याही कामात दुसऱ्याची जर चूक आढळली तर बापूजींचे मन इतके काही विशाल असते की ते त्यात स्वतःचीच चूक समजतात.

निर्मळदा तर हे पाहून फार नाराज झाले होते. मला म्हणाले, “हे पाहा, आता या वेळी गांधीजी पेटत्या भट्टीत पडलेले आहेत. असे असूनही हे लोक हे का विसरत नाहीत?” परंतु नंतर हसत हसत म्हणाले, “या म्हाताऱ्याचे हेच वैशिष्ट्य आहे की याच्या मनात कोणतीही गोष्ट बेकार नसते. लहान नसते. यामुळेच ते अतुलनीय पुढारी आहेत. बाकी तर गांधीजींइतकी शिकलेली किती तरी माणसे पडलेली आहेत. गांधीजींपेक्षा दिसायलाही पुष्कळ माणसे चांगली आहेत. परंतु गांधीजींच्या मनाची जी विशाल शक्ती आहे ती अजोड आहे.”

बिहारला जाण्याचा दिवस एकदोन दिवसातच निश्चित ठरेल असे वाटते. सुधीरदांनी (सुधीरबाबू घोष) फिरायला जाण्यापूर्वी शुभेच्छांची तार केली.

बापूजींच्या सकाळच्या नित्यक्रमात नेहमीच बंगाली पाठ करणे असते. आज . . . बरोबर झालेल्या गोष्टीमुळे त्यात बदल झाला. हे बापूजींना आवडले नाही. फिरून आल्यानंतर लगेचच वीस मनिट बंगाली पाठ लिहिला.

फिरून आल्यानंतर मालीश, आंघोळ वगैरे चालले. दुपारी जेवणात भाजी, दूध आणि वाफाळलेले एक सफरचंद घेतले. इतर सर्व सोडून दिले. बिहारच्या गोष्टींमुळे आणि आजच्या . . . प्रसंगाने बापूजी अतिशय गंभीर विचारात पडलेले आहेत. मला तर भीती ही वाटते आहे की बापूजी उपवासाचे वा इतर कोणते तरी मुश्किल पाऊल तर उचलणार नाहीत ना? सुशीलाबहेन पै आणि सतीशबाबू आलेले आहेत. त्यांनी नवीन प्रवासाचा नकाशा दाखवला. कातत असताना बिहारमधील डॉ. सय्यद महमूदच्या अंतर्गत काम करणारे मंत्री श्री मुस्तफासाहेब आले. त्यांनी बिहारचा करुण आणि भयंकर अहवाल वाचून दाखवला. आणि या अहवालात मुसलमान स्त्रियांवर जे अत्याचार झाले ते वाचता वाचता मुस्तफासाहेब तर रडूच लागले. बापूजींचा चेहरा

तर गंभीर होता. परंतु त्याच्या चेहऱ्याकडे पाहिले तर त्यांच्या हृदयातील वेदना स्पष्टपणे वाचता येऊ शकत होत्या. आम्ही कॉंग्रेसींना भेटलो आहो. कापाकापी झाली. मुलीवरील अत्याचाराला सीमाच नव्हती.

हिंदूनी बिहारमध्ये काळोखी फासली जाण्यासारखे वर्तन केल्यामुळे बापूजींच्या हृदयाची होणारी घुसमट स्पष्ट दिसत होती. बापूजींनी एस. डी. ओ. तर्फे बिहारच्या मुख्यमंत्र्यांना तार करून “मी येऊ शकतो काय?” असे विचारले. ही सर्व हकिगत त्यांना आपल्या स्वतःच्या डोळ्यांनी पाहण्याची इच्छा होती हे याचे कारण होते. बिहारचे मुख्यमंत्री श्रीकृष्ण सिंह बापूजींचे परम भक्त, जुने सहकारी होते. असे असूनही बापूजींचे म्हणणे होते की असे अकस्मात जाऊ नये. ज्याप्रमाणे इथे येण्याकरिता मी सुऱ्हावर्दीलाहेबांची परवानगी घेतली होती त्याचप्रमाणे मुख्यमंत्र्यांची परवानगी घेणे मला आवश्यक वाटले, जे नियम सर्वसामान्य प्रजेला लागू होतात तेच मलासुद्धा लागू होणार ना?  असा होता बापूजींचा विवेक.

मी म्हणाले, “परंतु ते तर प्रत्येक बाबतीत तुमचा सल्ला घेत असतात, तुम्हालाच पूज्य मानत असतात, वडीलधारे मानत असतात.”

बापूजी म्हणाले, “त्याचे काय? परंतु आज त्यांचे पद पाहता अशा विवेकाचे पालन केलेच पाहिजे. आपसात कसेही वर्तन असो, परंतु कायदा तर सर्वांकरिता सारखाच आहे.” बापूजींचा न्याय हा असा आहे.

जवळपास तीन वाजता स्थानिक कार्यकर्त्यांच्या सभेत बापूजी उपस्थित होते. तिथून येऊन बापूजींनी माती घेतली. चार वाजता नारळपाणी घेतले. आज कोणतेही धान्य घेतले नाही.

प्रार्थनासभेत येथील नमोशुद्रांच्या शिक्षणासंबंधी बापूजी म्हणाले -

> नामशुद्रांमधील शिक्षणाच्या अभावाची संपूर्ण जबाबदारी तथाकथित उच्चवर्णीय हिंदूंवर आहे. ज्या लोकांना हिंदू समाजाने जाणीवपूर्वक दडपून ठेवले होते ते आता स्वतःहोऊन शिक्षणाकडे वळतील अशी अपेक्षा करणे हास्यास्पद आहे.

आज दुसरी गोष्ट बिहारविषयी सांगायची आहे. बिहारमधील हिंदूंनी त्रिपुरा आणि नोआखालीला विसरायला लावील असे अत्याचार केल्याच्या बातम्या मिळत आहेत. मला वाटत होते की इथे बसूनच मी बिहारचेही काम करतो आहे. परंतु डॉ. सय्यद महमूदचे मंत्री श्री मुस्तफासाहेब आजच सय्यद महमूदसाहेबांचे पत्र घेऊन माझ्याकडे आले. त्यांच्या पत्रात आहे -"तुम्ही जर आला तर तुमच्या उपस्थितीत येथील परिस्थितीत बरीच सुधारणा होऊ शकेल. आणि मुसलमानांना खात्री आहे की तुम्हांला हिंदूंबद्दल जितका कळवळा आहे तितकाच मुसलमानांबद्दलसुद्धा आहे." यामुळे आजच तार करून विचारले आहे. याकरिता नोआखाली आणि त्रिपुराची पदयात्रा काही काळ स्थगित ठेवावी लागेल. माझ्या अनुपस्थितीत तुम्हा सर्वांना विनंती करतो की तुम्ही भावाभावाप्रमाणेच राहा. मी बाहेर जातो आहे, पण माझे हृदय तुमच्याजवळ आहे.

इंग्रज तर आता हिंदुस्थान सोडून जाणार आहेत याबद्दल किंचितही शंका नाही. (हिंदुस्थानात राहणाऱ्या सर्व जातीच्या लोकांना - सर्व पक्षाच्या लोकांनी) परस्पराशी मिळूनमिसळून शांततापूर्वक राहायची वेळ आलेली आहे. जर तुम्ही असे करणार नाही तर हिंदुस्थानात राहणाऱ्या लोकांमधील लढाईचे संकट आपल्यावर येईल आणि अखंड हिंदुस्थानचे आपण तुकडे तुकडे करून टाकू. याचा कोणालाही लाभ होणार नाही. आणि जगात आपले हसे कशाने होणार नाही याचा विचार करणे प्रत्येक हिंदुस्थानीचा धर्म आहे. याचा विचार करा.

फिरता फिरता बापूजी म्हणाले, "दुपारपर्यंत तर त्रिपुराच्या कार्यक्रमाचा विचार सुरू होता. परंतु सकाळी ज्याप्रमाणे रामजींचा राज्याभिषेक होणार होता आणि वनात जावे लागले तसेच आज माझ्यासंबंधीही झाले आहे."

फिरत असताना रस्त्यातील घरे पाहिली. आल्यानंतर काहीही खाल्ले नाही. मुस्तफासाहेब कुठे झोपतील, त्यांनी काय खाल्ले वगैरे बापूनी स्वतः विचारपूस केली आणि व्यवस्था करायला

लावली. प्रार्थनाप्रवचन पाहिले, रंगास्वामींना पत्र लिहवून घेतले. रात्री साडेअकरा वाजता बापूजी झोपले. त्याआधी म्हणाले, "तू तुझ्या तयारीत राहा. सामान अगदी कमी घे. आठवण करून सर्व सतीशबाबूंना सोपव."

हैमचर,

१ - ३ - '४७

बापूजी आज पाऊणेचार वाजता उठून गेले. माळ घेतली. नंतर . . . ला उठवले. त्यांच्याबरोबर गोष्टी केल्या. , , , दोघांनाही त्यांचा धर्म समजावून सांगताना बापूजी म्हणाले, "जर इथे स्थैर्य जाणवत असेल आणि माझ्यावर विश्वास असेल तर काम करा. परंतु नंतर जडता यायला नको, मन चलबिचलसुद्धा व्हायला नको. जे काही तुम्ही करू शकत असाल ते करा, माझ्यात दोष असेल तर माझा त्याग करा. बोलण्याची शक्ती माझ्यात राहिलेली नाही."

सकाळच्या प्रार्थनेनंतर मध आणि गरम पाणी घेतले. मग अननसाचा रस दिला. हुनरभाई, रझउल्लारहमान, अंसारीसाहेब आणि इतर काहींना उर्दूत पत्रे लिहवून घेतली. त्यांच्यावर उर्दूत सही केली.

फिरत असताना एक अनाथाश्रम पाहायला गेलो. जायलायायला दीड तास लागला. पाऊणेनऊ वाजता परतलो. मालीश करत असताना बापूजी थोडा वेळ झोपले. आज लवकर उठलेले असल्यामुळे चांगले झाले. एकीकडे बिहार डोक्यात फिरतो आहे तर दुसरीकडे वेगवेगळे वातावरण आहे. अजून पटण्याहून कोणतीही बातमी आलेली नाही. आंघोळ करत असताना बापूजी म्हणाले, "उत्तर येवो अथवा न येवो, तू तयार राहा." चोवीस तास होऊनही बिहारकडून कोणतेही उत्तर आले नव्हते. हे बापूजींना आवडले नाही.

दुपारी बापूजींकरिता आणि आम्ही सर्व मंडळीकरिता भात केला. बापूजींकरिता खाकरे आणि गूळपापडी केली. आम्हा सर्वांकरिता नारळाच्या तेलाचे मोहन घालून वेगळे खाकरे तयार

केले. जवळपास सर्व दुपार अशीच गेली. आजसुद्धा बापूजींनी भाजी, दूध आणि फळे घेतली नाही. बापांबरोबर चर्चा केली. दोन वाजता रामकृष्ण मिशनवाले आले. साडेतीन ते चार कताई केली. माती घेतली.

प्रार्थनासभेत जात होतो तर समोरच मृदुलाबहेन दिसल्या. त्यांच्याबरोबर चार विदेशी विद्यार्थी आहेत.

मृदुलाबहेननी पंडितजींचे, खानसाहेबांचे आणि दिल्लीतील अनेक पत्रे आणली आहेत. त्यांच्याकडून अनेक नवनवीन गोष्टीही ऐकायला मिळाल्या. प्रार्थनेनंतर बापूजींनी जवळपास त्यांच्याशीच गोष्टी केल्या.

कनूभाई आपल्या गावी परतले. बापूजींनी सायंकाळी एक केळ आणि दूध घेतले. रात्री तर भेटणारे एकामागून एक येतच होते. बिसेनभाई आणि मी मिळून उशिरा रात्रीपर्यंत सामान बांधत होतो. बिसेनभाईंच्या आणि अजितभाईंच्या मदतीला सीमा नव्हती. निर्मळदासुद्धा त्यांच्या कामात मग्न होते. ते तर रात्रीसुद्धा दिवसअसल्यासारखेच काम करत होते.

बापूजींचे पाऊण काम तर त्यांनीच केले. बापूजी तर साडेअकरा वाजेपर्यंत मुलाखतीकरिता आलेल्या लोकांमध्येच बसलेले होते. मग आले वर्तमानपत्रांचे वार्ताहर. मी माझी ही डायरी त्यांच्याच तंबूत बसूनच लिहिते आहे. बापूजींना आवाजाचा त्रास होऊ नये म्हणून सामानाची बांधाबांधसुद्धा या तंबूत बसूनच केली होती.

आता बारा वाजले आहेत. झोपायला जाते आहे.

हैमचर,<br>२ - ३ - '४७

बाबा (सतीशबाबू) रात्री आले होते. मला आणि बापूजींना तर आमच्या खोलीत गाढ झोप लागलेली होती. जवळपास साडेबारा वाजलेले आहेत. मीसुद्धा थकून गेले होते. मला झोपून अर्धाच तास झाला होता, पण मध्यरात्र झाल्यासारखे वाटत होते. बाबांनी बापूंची मच्छरदाणी

काढली, बापूजींना उठवले, दोघेही गोष्टी करत होते. तोच अकस्मात मी मध्ये उभी राहिले. मला भीती वाटत होती की रात्री मी उशिरा झोपले हे बापूजींना आवडले नसावे. यामुळे उठून त्यांनी स्वतःच तोंड धुतले असेल. प्रार्थनासुद्धा करून टाकली असेल. यामुळे मी उभीच राहिले. दात घासायचा कुंचला आणायला गेले तर बापूजी हसू लागले. म्हणाले, “अजून वेळ झाली नाही. तोंड धुवायला वेळ आहे. तू झोप.” मी खूप झोपेत असल्यामुळे इतर काही न बोलता मी परत झोपून गेले. बाबा केव्हा गेले हे मला कळलेच नाही. परंतु रात्रीपर्यंत बिहारची काहीही बातमी न कळल्यामुळे उद्याचा काय कार्यक्रम राहील हे जाणून घ्यायला बाबा आले होते.

रोजप्रमाणे प्रार्थना झाली. नंतर बंगाली पाठ. बापूजींनी बापांच्या स्वयंपाक्याकडून पाच रुपये घेतले आणि त्याला सही दिली (गांधीजी स्वाक्षरी द्यायचे पाच रुपये घत असत.). प्यारेलालजींना पत्र लिहिले. आज दुपारी दोन वाजता जायचे नक्की झाले. मालीश आणि आंघोळीनंतर मृदुलाबहेनबरोबर आणि बापांबरोबर गोष्टी केल्या. जेवत असतानाही बापांबरोबर भरपूर गोष्टी केल्या. जेवणात एक खाकरा, भाजी आणि दूध घेतले.

आज बापूजी मानसिक दृष्टीने किती तरी हळवे झालेले वाटत आहेत. बिहारबद्दल काय करायचे हे निश्चित झालेले असल्यामुळे आणि ते सर्वांना . . . स्पष्टपणे सांगू शकल्यामुळे त्यांच्या हृदयात जे साठलेले होते ते सर्व त्यांनी रिते केले. बापूजींचे दर्शन करण्याकरिता खूप गर्दी झालेली होती. अजितभाईंची बिहारमध्ये येण्याची खूप इच्छा आहे, पण बापूजींनी इथेच राहून काम कर असे सुचवले. साडेचार वाजताच सर्व सामान मोजून मी ते कर्नल जीवनसिंगजींना सोपवले. लहानमोठे असे एकूण २० डाग झाले. माझ्याजवळ जे सामान होते ते असे - बापूजींच्या कागदपत्रांनी भरलेली शबनम पिशवी, पाण्याची बाटली, थूकदाणी वगैरे. ते सर्व मी पिशवीतच टाकले होते. नोआखाली टोप, चरखा, खाण्याची लहान लहान भांडी ठेवण्याकरिता एक लहानशी पेटी, बिस्तरा आणि काठी. बाकीचे सामान पुढे पाठवले आहे.

चांदपूरला पोहोचल्यानंतर -

निघण्यापूर्वी मी बापांचा निरोप घ्यायला गेले.

माझ्याकडून त्यांनी एक पत्र लिहवून घेतले. प्रणाम केल्यानंतर त्यांनी एक गोड आशीर्वाद दिला, “तू बापूजींची सेवा करते आहेस त्याने मी फार खुश आहे. तू आज फार मोठे पूण्य कार्य करते आहेस. ईश्वर तुला खुश ठेवो. तुझे आजोबा अमृतलालभाई तर खूप खुशमिजाज माणूस होते. नवी बंदरमध्ये राहत होतो तेव्हापासून माझे आणि त्यांचे फार गोड संबंध होते. जयसुखलाल तर तेव्हा फार लहान होता. तुझ्या आजोबांची आठवण झाली की माणूस पवित्र होतो, इतके ते पवित्र व्यक्ती होते.”

पू. बापांचे डोळे बरोबर काम करू शकत नसल्यामुळे मला ते म्हणाले, “तुला जर वेळ असेल तर तुझ्याकडून मला पत्र लिहवून घ्यायचे आहे.” . . . निघायला दहा मिनिटच वेळ होता. परंतु पत्र तातडीचे आणि आवश्यक असल्यामुळे लिहून दिले. त्यांनी त्याची नकल मला दिली.

नंतर मी आणि बापा बापूजींकडे गेलो. पू. बापा आणि पू. बापूजींमधील दृश्य फार पवित्र वाटत होते. बापूजींना असा एकाएकी निरोप द्यावा लागेल अशी कल्पनासुद्धा बापांना कशी असणार? परंतु एक आठवडा आम्ही इथे असल्यामुळे बापा फार खुश होते. आणि ते परस्परांचे अनेक कार्य समजून घेऊ शकत होते. आणि अखेरीस दोघांनाही समाधान वाटत होते.

बापूजींनी हैमचरमध्येच कताई केली होती. माती तयार करून सोबत घेतली होती. बरोबर दोन वाजायला दहा मिनिट कमी असताना आम्ही चांदपूरला जाण्याकरिता जीपगाडीतून रवाना झालो. बापूंना भगिनींनी कुंकू लावले आणि शकून केला होता. आम्हांला दहीसाखर खाऊ घातली. आमच्या जीपमध्ये बापूजी, मृदुलाबहेन, चारूदा, देवभाई आणि मी होतो. बापूजी जीपमध्ये बसल्या बसल्या अर्धा तास झोपले होते. रस्त्यात एक नदी ओलांडण्याकरिता नावेत बसावे लागणार होते. जीपगाडीसुद्धा नावेत उतरवली होती.

इथे आम्ही बरोबर तीन वाजून चाळीस मिनिटांनी पोहोचलो. ग्रामशांततेतून शहराच्या अशांततेत शिरलो. बाबू हरदयाल नागकडे जाण्याकरिता थोडे चालत गेलो. इथेच, याच घरी वीस

वर्षांपूर्वी बापूजी आले होते. बापूजी म्हणाले, “आता तर घरात काही फेरफार करण्यात आले आहेत असे वाटते.” गर्दीमधून चालत गेल्यामुळे घरी पोहोचायला दहा मिनिट लागले. आल्यानंतर हाततोंड धुऊन नारळपाणी घेतले. सरदार जीवनसिंगजी लोकांना चांगल्या प्रकारे सांभाळत होते. आरडाओरड करून त्यांनी जमावाला नियंत्रणात ठेवले होते.

मृदुलाबहेननी तर त्यांच्या स्वभावाप्रमाणे मदत करायच्या कामाला सुरुवात केली. मला म्हणाल्या, “बापूजींना कोणताही त्रास व्हायला नको. काहीही लागले तर मला सांगशील.” बापूजींनी त्यांच्याकडून खानसाहेब आणि इतरांना पत्रे लिहवून घेतली. डोळ्यावर आणि डोक्यावर माती घेतली. येथून पुढील व्यवस्था तर मजेशीर होती. गोलंदाओला जाण्याकरिता आज रात्री आगबोटीत बसायचे आहे. नोआखालीत जवळपास पन्नास गावात पदयात्रा केली. आता वाहनातून प्रवास सुरू आहे.

बापूजी साडेचार वाजता उठले. प्रार्थनेकरिता जायला निघाले. मोटरमध्ये न जाता बापूजींनी चालत जाणे पसंत केले. यामुळे लोकांचेही समाधान झाले असते. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी स्वयंसेवक उभे होते. एकीकडे मृदुलाबहेन काठी म्हणून होत्या तर दुसऱ्या बाजूने मी. भगिनी चांगले चांगले कपडे घालून आपल्या घराच्या गच्चीवर उभ्या राहून फुलांचा आणि भाताचा वर्षाव करत होत्या. काही शुभशकुनाचा निनाद करत होत्या. संपूर्ण सडकेवर फुले पसरली होती.

सभेत खूपच गोंगाट होता. बापूजींनी आधी रामधून सुरू करायला सांगितले. मग बरीच शांतता झाली आणि मग आम्ही संपूर्ण प्रार्थना म्हणालो. जोरदार आवाज केल्यामुळे शैलेनभाईंचा घसासुद्धा बसला होता. यामुळे मला एकटीलाच प्रार्थना करवावी लागली. शैलेनभाई वर्तमानपत्रांचे वार्ताहर आहेत, पण आमच्यातील एक झाले आहेत. तसे तर सर्वच वार्ताहर आमच्या घरच्यासारखेच झाले आहेत. परंतु प्रार्थनेत शैलेनभाई खूप मदत करत असतात.

प्रार्थनेत शांतता ठेवण्याची विनंती केल्यानंतर बापूजी म्हणाले -

यापेक्षाही मोठ्या सभेत मी गेलो आहे, आणि तिथे मी संपूर्ण शंतता पाहिली आहे. मी बंगाली बोलू शकत नाही याचे मला वाईट वाटते. परंतु परत जेव्हा येईन तेव्हा मी बंगालीत बोलू शकेन अशी आशा आहे.

माझ्याकरिता चांदपूर नवीन जागा नाही. अलीभाई होते तेव्हा बाबू हरदयाल नाग जिवंत होते. तेव्हा मी इथे पहिल्यांदा आलो होतो. परत आल्यामुळे एकीकडून आनंद होतो आहे तर दुसरीकडून दुःख होते आहे. गावांमधून मी जेव्हाकेव्हा फिरत होतो तेव्हा तेव्हा लोक रडत होते, दुःखी होते. परंतु रडल्याने काहीही परत येणार नव्हते. या मार्गाने सर्वांना जायचेच आहे. ही भूमी बाबू हरदयालजींची आहे. त्यांनी जे काम केले त्यापासून प्रेरणा घेऊन त्यांच्यासारखेच काम आपण केले तरच आपले जीवन सार्थकी लागेल. चांदपूरला मी कोणत्या कामाकरिता आलो आहे? माझ्या पदयात्रेचे दोन भाग पूर्ण झाले आहेत. तिसऱ्या भागाला सुरुवात होणार होती तोच सैय्यद महमूदसाहेबांचे मंत्री आले आणि मला बिहारमध्ये जाण्याचा आदेश दिला. आज तिथेच जातो आहे.

एक हिंदू जर मेला तर माझा सख्खा भाऊ मेला असे मला वाटते. तितकेच दुःख मला एक मुसलमान जरी मेला तरी होत असते. आपण सर्वच एकाच ईश्वराची लेकरे आहो. यामुळे मी नोआखाली आणि टिपरा जिल्ह्यात फिरलो. जोपर्यंत शांतता स्थापित होत नाही तोपर्यंत ना तर मी शांत बसेन ना तुम्हांला शांत बसू देईन. एकटा जर राहिलो तरी पण आरडाओरड करत राहीन.

बिहारमध्ये माझे थोडेसे चालते. यामुळे आशा करतो की तेथील काम लवकर आटोपून इथे लवकरच परतेन. परंतु मध्यंतरीच्या काळात तुम्हांला सांगून ठेवतो की

इकबाल म्हणाले आहेत की “मजहब नहीं सिखाता आपस में बैर रखना, हिंदी है हम, वतन है हिंदोस्तॉं हमारा.”हे अगदी खरे आहे.

परत घरी आल्यानंतर घरातील स्त्रियांनी भावपूर्वक बापूजींकरिता बकरीच्या दुधाचे संदेश केले होते. ते घेतले. त्या भगिनींची इच्छा होती की बापूजींचे जेवणाचे ताट स्वतः आणावे. यामुळे मी एका लहानशा मुलीला तयार केले आणि मग तीच आठ औंस दूध, द्राक्ष आणि त्या स्त्रियांनी तयार केलेले संदेश बापूजींकडे घेऊन आली. त्या भगिनींची इच्छा बापूजींनी त्यांच्या ताटात जेवावे अशी होती. बापूजींनी तसेच केले.

बापूजी खूपच थकले आहेत.

अकस्मात एक विशेष आगबोट आली. मृदुलाबहेनने तिच्यातच बापूजींची व्यवस्था केली. हे फार चांगले काम झाले. नाही तर प्रवासी आगबोटीत जावे लागले असते. असे झाले असते तर बापूजींना झोपायला मिळाले नसते.

बापूजींचे मौन सुरू झाले. रात्री आठ वाजता राहिलेल्या गोष्टी मृदुलाबहेनकडे सोपवल्या. बापूजींना डासांचे मलम लावून सर्व सामान घेऊन मी आगबोटीत चढले. कॅबीनमध्ये मी बापूजींचे अंथरूण टाकले आणि दात घासायचा कुंचला वगैरे रात्रीच्या उपयोगी गोष्टी तिथे ठेवल्या.

मृदुलाबहेनबरोबर बापूजी रात्री दहा वाजता आगबोटीवर आले. केबीनमध्ये लिहून कर्नल जीवनसिंगजींबरोबर खूप गोष्टी केल्या. निरोप देण्याकरिता आलेल्यांमध्ये चारुदा आणि जीवनसिंगजी आमच्याबरोबर अडीचेक महिन्यांपासून असल्यामुळे त्यांचे आमच्याशी कौटुंबिक प्रेमसंबंध निर्माण झाले होते. ते गद्गद होऊन गेले. अकरा वाजता सर्व गेले. आगबोट निघाली. साडेअकरा वाजता बापूजी झोपू शकले. खूपच थकले आहेत. डोक्याला तेल चोळले, पाय दाबले, प्रणाम केला. खूप दिवसांनी बापूजींनी जोरात पाठीत थोपटले.

चिठ्ठीत लिहिले -

हैमचरमध्ये बापा तुझ्यावर खूप खुश झाले. मला सांगत होते. परंतु समाधानाची गोष्ट ही आहे की बापांच्या या आठवड्याच्या मुक्कामात मी त्यांना चांगल्या प्रकारे समजावून सांगू शकलो आणि त्यांच्या ज्या काही मान्यता होत्या त्यातील काही मान्यता त्यांनी परत घेतल्या. ते तर महात्यागी माणूस आहेत. तसेच अतिशय नम्र माणूसही आहेत. तू पाहिले असशील की त्यांनी इतक्या दिवसात केवळ एकाच दिवशी माझा थोडा वेळ घेतला. बाकी माझा वेळ घेण्याकरिता ते येतच नव्हते. हे असे आहे त्यांचे काम. त्यांची बरोबरी कोणीच करू शकत नाही. चूक लक्षात आली तर लगेच सुधारणा करतात. याकरिता ते वेळ लावत नाहीत. तू त्यांची किती तरी सेवा करू शकली हे मलासुद्धा आवडले. म्हणूनच मी तुला प्रोत्साहन दिले. काल तू दोन दिवसांची रोजनिशी दिली होती. ती इथेच ठेव. सकाळी प्रार्थनेनंतर वाचेन.

आजची ही दैनंदिनी आगबोटीवर साडेबारा वाजता पूर्ण करते आहे. बापूजींचे पाय दाबले. मच्छरदाणी बंद केली. दिवा आणि केबिन बंद करून बाहेर बसले माझी सर्व दिवसांची ही रोजनिशी पूर्ण केली. साडेचार वाजता चांदपूरमध्ये लिहिली होती. मग चांदपूरहून गोलंदाओला जाताना आगबोटीवर पूर्ण केली.

बापूजींचे ८८ तार झाले.

चांदपूरहून गोआलंदो येथे जाणाऱ्या आगबोटीत,<br>३ - ३ - '४७

आताच तोंड वगैरे धुऊन रोजप्रमाणे प्रार्थना केली. बापूजींना गरम पाणी आणि मध दिले आणि मी रस काढायला गेले तेवढ्या वेळेत बापूजींनी बंगालीचा पाठ केला, आणि मग त्यांनी टपालाचे काम सुरू केले. हे लिहिण्यात बापूजी इतके मग्न झाले होते की मी रस आणून दहा मिनिट उभी असतानाही त्यांना त्याचे भानच नव्हते. मौनसुद्धा होते. अखेरीस मी दोनदा हाक

मारली आणि हातात रसाचा पेला दिला तेव्हा त्यांनी तो हसून घेतला. मग परत आपले काम सुरू केले . . . आणि हे लिहिता लिहिता माझा डोळा लागला.

बापूजी थोडे आडवे झाल्यानंतर मी ही नोंदवही लिहिते आहे. रात्र चांगली गेली. सुंदर प्रवास आहे. समोर नदीचा काठ दिसतो आहे. सकाळचे सव्वासात वाजले आहेत.

साडेसात वाजता बापूजी उठले, फिरायला निघाले. मी आणि बापूजी डेकवर चकरा मारत होतो. बापूजींचे मौन होते. खूप झपाझप चालत होते. थोड्या वेळात आमच्याबरोबर प्रवास करत असलेले वृत्तपत्रांचे प्रतिनिधी शैलेन भाई आणि इतर भाई आले. निर्मळदासुद्धा पाहून गेले. समोर एक आगबोट 'महात्मा गांधी की जय'ची घोषणा करत आमच्याबरोबर चालली होती. त्यात प्रवास करणारे प्रवासी तर खास बापूजींचे दर्शन घेण्याकरिता अशा प्रकारे प्रवास करत होते असे मला आमच्या आगबोटीच्या कप्तानाने सांगितले. बापूजी उभे राहिले आणि त्यांनी समोरच्या आगबोटीतील प्रवाशांना हात जोडून नमस्कार केला. सूर्यदेव उगवते होते आणि त्यांच्या किरणांचा प्रकाश सरळ बापूजींच्या चेहऱ्यावर पडत होता. किनारा खूपच रमणीय होता आणि नदीसुद्धा समोर खळखळ करत वाहत होती. अशा या वातावरणात बापूजी समोरच्या प्रवाशांसमोर हात जोडून उभे राहिले आणि त्या प्रवाशांनी आपली आगबोट जयघोषाच्या निनादाने गाजवून टाकली, आणि प्रवाशांनी बापूजींनी केलेले वंदन कृतज्ञतापूर्वक झेलले.

आज तर पाय धुवायचे नव्हते. बापूजींनी पत्र पूर्ण केले तितक्या वेळेत मी मालीशची आणि आंघोळीची तयारी केली. दहा वाजता आंघोळ वगैरे सर्व आटोपले. बापूजींनी जेवणात भाजी, एक खाकरा आणि बकरीच्या दुधाऐवजी काल बनवून ठेवलेला एक संदेश घेतला. इथे दूध तर मिळूच शकत नाही. अकरा वाजता मृदुलाबहेन गोष्टी करायला आल्या. मी बापूजींचे कपडे नीट ठेवायला आणि धुवायला गेले. नंतर जे जे सामान काढले होते ते परत नीट ठेवले. तेवढ्यात एक वाजला. एक वाजता माती दिली. बापूजींचे पाय चोळले. बापूजी आराम करत असताना मी बंगाली बालपोथी पूर्ण केली. दोन वाजता उठल्यानंतर बापूजींनी नारळपाणी घेतले.

आम्ही गोआलंदोला बरोबर अडीच वाजता पोहोचलो.

आगबोटीवर बरेच लोक आले होते. बारीक वाळू खूप गरम झाली होती आणि मला तापसुद्धा जाणवत होता. आगगाडीत आलो तर त्या डब्यात काकासाहेब बसलेले होते. बापूजींना भेटायला येऊन राहिले होते. बापूजींची बैठक तयार करून आम्ही हातोहात सामान घेऊन आलो. तीन वाजता आगगाडी निघाली. बापूजी आणि काकासाहेब गोष्टीत मग्न झाले. बापूजींचे तर मौन होते. लिहून गोष्टी करत होते. बापूजींनी साडेचार वाजता दोन काजू, दोन बदाम आणि दोन खाकरे घेतले. गोष्टी अर्धवट राहू दिल्या. जेवणानंतर डोळ्यांची फार जळजळ होत असल्यामुळे डोळ्यांवर माती घेतली आणि झोपले. मी तर सामान काढणे आणि ते परत जागेवर ठेवणे यातच गुंतले होते.

सात वाजता बापूजींचे मौन सुटले. सगळे जुने वृत्तपत्र प्रतिनिधी बापूजींना भेटायला आले. हे प्रतिनिधी बापूजींबरोबर नोआखालीत फिरत होते. आता कदाचित त्यांचे वरीष्ठ या भागात त्यांना ठेवणार नाहीत. प्रार्थनेनंतर या सगळ्या प्रतिनिधींनी अखेरचे म्हणून ‘एकला चलोरे’ हे भजन सद्गदित होऊन म्हटले. सगळ्यांचे डोळे अश्रूंनी डबडबलेले होते. प्रार्थनेनंतर परत पू. काकासाहेबांबरोबर गोष्टी केल्या. आराम केला. दहादहाला आम्ही शोदपूरला आलो. आल्यानंतर बापूजींचे अंथरुण टाकले. हाततोंड धुऊन बापूजी स्थिरस्थावर झाले. सर्वांना भेटले आणि जवळपास साडेअकरा वाजता झोपले.

मी तर खूपच थकले होते. इतकी की बापूजी झोपल्यानंतर मी त्यांच्या पायाला तेल चोळले पण पाय दाबले नाही. सामान पाहिले. सकाळची तयारी केली. बापूजींकरिता दात घासायचा कुंचला तयार केला. बाकीचे किरकोळ काम उरकले आणि रोजनिशी पूर्ण केली. थकलेले असल्यामुळे जेवले नाही. आता एक वाजायला दहा मिनिट कमी आहेत. झोपायला जाते आहे. निर्मळदासुद्धा अजून जागे आहेत. यांचे तर उशिरा रात्रीपर्यंत काम चालतच असते.

खादी प्रतिष्ठान,

शौदपूर, (कलकत्ता)

४ - ३ - '४७

रोजप्रमाणे प्रार्थनेकरिता उठलो. मी केव्हा झोपले यासंबंधी विचारपूस करत बापूजी म्हणाले, "आपण नोआखाली पूर्णपणे सोडली तर नाहीच, परंतु आता आपल्याला वेगळ्या प्रकारे प्रवास करावा लागेल. कदाचित काम वाढेल. परंतु ज्या नियमांचे आपण नोआखालीत पालन करत होतो त्यात फरक पडायला नको. हा यज्ञ केवळ काही नोआखालीपुरता नव्हता. जोपर्यंत आपण संपूर्ण बंधुभाव शिकत नाही तोपर्यंत आपल्यात माणूसकी येणार नाही. आणि तोपर्यंत तर मला करायचे अथवा मरायचेच आहे. आणि यामुळेच माझे आणि तुझे तप जितके शुद्ध असेल तितकाच त्याचा या कार्यावर परिणाम होईल. आणि नोआखालीपेक्षा बिहारमध्ये कदाचित हे काम जड गेले तर मला नवल वाटणार नाही. याचे कारण असे आहे की अनेकदा आपली माणसे जेव्हा चूक करतात तेव्हा ती दुरुस्त करणे कठीण होत असते. बिहारचा अहवाल पाहता मला असे वाटते की नोआखालीपेक्षा येथील काम अवघड होणार आहे. काम वाढेल.. यामुळे तू खूप सावध राहायला पाहिजे. आणि तू खाणेपिणे, आराम वगैरे सर्व गोष्टी जशी नियमानुरूप करत होतीस तसेच करत राहशील तरच हे सर्व चालेल आणि मला समाधान होईल."

काल रात्री मी उशिरा झोपलेले होते. यामुळे मी अनियमित होऊ नये म्हणून बापूजींनी आज सकाळी पाऊणेचार वाजता या नवीन फेरबदलाची मला ही सावधगिरीची सूचना केली होती.

प्रार्थनेनंतर माझ्या नोंदी पाहिल्या. बापूजींना गरम पाणी आणि मध देऊन मी रस काढायला गेले. तोवर बापूजींनी बंगालीचा पाठ लिहून टाकला होता. आज तर बंगाली बोलणे शिकत होते. मी रस घेऊन आले तर मला बंगालीत विचारले, "तोमार नाम शुं? (तुझे नाव काय?)" खूप हसले. बापूजी दहापर्यंत सहजपणे लिहू शकले. रोजप्रमाणे साडेसात वाजता

फिरायला गेलो. 'काठी' होऊ शकणाऱ्या इतर मुली होत्या. यामुळे मी फिरायला गेले नाही. आणि मला कामसुद्धा होते. परंतु बापूजींना हे मुळीच आवडले नाही. पाय धूत असताना मला दोष देत म्हणाले, "तू जरी काठी झाली नाही तरी काय होते? तू फिरणे थांबवायला नको. तुझे फिरणेसुद्धा माझ्या इतर सेवांचा एक भागच आहे. यामुळे आज तू फिरायला आली नाही याचे मला वाईट वाटते. तू जर मालीशमधून सुटी घेतली आणि तितका वेळ फिरलीस तर मला आनंद होईल."

मी म्हणाले, "मालीशच्या कामातून सुटी घेणे मला पटत नाही".

बापूजी म्हणाले, "मी कमोडवर बसतो तितका वेळ जर तू धावत जाऊन चक्कर मारून आलीस तर पूर्ण जरी नाही तरी काही प्रमाणात माझे समाधान होईल. परंतु मुळीच न फिरणे हे तर पापच आहे."

बापूजी म्हणाल्याप्रमाणे मी केले. या अशा नियमिततेतून बापूजींची काळजी दिसते.

पाऊणेनऊ वाजता शहीद सुऱ्हावर्दीसाहेब, येथील मुख्यमंत्री आले. जवळपास सव्वादहा वाजता गेले. यामुळे मालीशला खूप उशीर झाला. सुऱ्हावर्दीसाहेब तर स्वतःच बोलत असतात. बापूजींना बोलायची संधीच देत नसतात. जबरदस्त माणूस आहे. मालीश केली तरी न केल्यासारखेच व्हावे तसे ते गोल गोल बोलतात पण मुद्द्याची गोष्ट करत नाहीत असे वाटले. बापूजी म्हणाले, "ईश्वर जसे ठरवील तसे होईल."

बारा वाजता कुठे त्यांना सवड मिळाली. जेवणात भाजी, दूध आणि फळात थोडे अंगूर घेतले. दुसरे काहीही घेतले नाही. जेवत असताना काकासाहेबांबरोबर गोष्टी करत होते.

दर्शनार्थींच्या गर्दीला तर पार नव्हता. मी दोनेक वाजता आंघोळ करून मोकळी झाले. अडीच वाजता डॉ. कुलरंजनबाबू (निसर्गोपचारक) आले. बापूजींच्या कानात काहीसा बधीरपणा वाटतो. तो दूर करण्याकरिता कशा प्रकारे स्पंज करावा ते मला समजावून सांगितले.

नंतर बापूजींनी थोडीशी पत्रे लिहिली. स्वतःची डायरी लिहिली. काल रात्री मी उशिरा झोपले होते त्याबद्दल बापूजींनी लिहिले -

> . . . मनुडीविषयी . . . अजून बालकबुद्धी गेलेली नाही. परिपक्व होणे आवश्यक आहे. मला तर आशा वाटते की थोड्याच दिवसात ही परिपक्व होईल. फार भोळी आहे. चाकरी करत असते, त्यातच तल्लीन झालेली आहे. परंतु खाणे, पिणे, झोपणे वगैरेंकडे लक्ष ठेवत नाही. शरीर खराब होते आहे. हे मला बोचते. . . . बाकी ती माझे पूर्ण समाधान होईल अशी वागते.

मी जेव्हा हे लिहीत होते तेव्हा मला बापूजींच्या आठवणीचे नवल वाटले. मी म्हणाले होते की तुम्ही तुमच्या रोजनिशीत माझ्याबद्दल जे लिहिता ते सर्व वाचतात. मला हे आवडत नाही.

बापूजी म्हणाले, “यामुळे काय होते? जे काही होते ते सर्वांना दिसले तरच आपण जीवनात पुढे जाऊ शकतो. ‘खाजगी’ हा शब्दच तू काढून टाकला पाहिजे. आपण काही चोरी थोडीच केली आहे की ती खाजगी ठेवावी? मी तर चुपच झाले.”

सायंकाळी प्रार्थनेनंतर दूध आणि फळे घेतली. प्रार्थनेला जाण्याआधी मी सर्व सामान मोजून ट्रकमधून हावडा स्टेशनकरिता रवाना केले.

सायंकाळच्या प्रार्थनासभेत तुफान गर्दी होती. प्रार्थनासभेत बापूजींनी आपण बिहारमध्ये का जात आहो ते लोकांना समजावून सांगितले आणि बंधुभावाने वागणे शिकण्याची सर्वांना विनंती केली. प्रार्थनेनंतर बापूजी दहाएक मिनिटे फिरले.

बरोबर साडेसात वाजता आम्ही शोदपूरहून रवाना झालो. हावडा स्थानकावर बापूजींच्या दर्शनाकरिता जी तुफान गर्दी गोळा झाली होती तिच्याबद्दल मी काय लिहू? तिथेसुद्धा माणसांचा महासागर उमळला होता. आणि त्यात छायाचित्रकारांनी तर किडामुंग्यांप्रमाणे गर्दी केली होती.

दिव्यांनी डोळे दिपत होते. परंतु जनतेचे हे प्रेम सहन करावे लागतच असते. आणि त्यात बापूजींनी हरिजन फंड गोळा करण्याचा आपला धंदा सुरू केला. बापूजींच्या हातात पैसा, रुपया, आणा, चवली, पावली, नोटा आणि चिल्लरचा चांगला ढीगच गोळा झाला. परंतु प्रत्येकजण बापूजींच्या हातातच पैसे देत होता. आम्ही लांब केलेल्या हातावर भाग्यानेच कोणी पैसे ठेवत होता. खूप चिल्लर मोजायची आहे. उद्या पटण्यात मोजू. आता (रात्री दहा वाजता) बरद्वान स्थानकावर ही रोजनिशी पूर्ण करते आहे. बापूजी झोपलेले आहेत. निर्मळदांनी समजावल्यामुळे लोक शांततेने दर्शन घेत आहेत.

* * * * *

# पुरवणी

## एकटाच चोखाळतो मी माझी वाट रे

## वा

## नोआखालीत गांधीजी

संकलन, संपादन आणि अनुवाद

**ब्रिजमोहन हेडा**

# महात्मा गांधी संकलित साहित्य खंड ९२-९३ मधील काही निवडक विषय

## १. इस्लामविरोधी

शेख साहेब हिसमुद्दिन, माजी अध्यक्ष अखिल हिंदुस्थानी मजलिस - ए - अहरार यांनी पुढील वक्तव्य वर्तमानपत्रांकरिता लिहिले आहे (हे वक्तव्य इथे दिलेले नाही. यात हिसमुद्दीन आणि अबुल कलाम आझाद यांनी वेगवेगळ्या वक्तव्यातून पूर्व बंगालमधील जाळपोळ, खून, बळजबरीने घडवून आणलेले धर्मांतर यांची इस्लामविरोधी म्हणून निंदा केली होती आणि तेथील बहुसंख्याक मुसलमानांना हिंदूंचे संरक्षण करण्याकरिता आवाहन केले होते.) -

मौलाना साहेबांनी स्वतः चार दिवसांपूर्वी हे वक्तव्य दिले होते. (वरीलप्रमाणे)

किती मुसलमानांचा या वक्तव्याला पाठिंबा आहे यात या वक्तव्याचे मूल्य दडलेले नाही तर वक्तव्य देणारे मुसलमान पुढारी इस्लामी जगात फार प्रसिद्ध आहेत आणि त्यांनी निःसंकोचपणे पूर्व बंगालमधील मुसलमानांच्या क्रूर कृत्यांची कठोरतम शब्दांत निंदा केली आहे यात आहे. या दंगल करणारांवर गुंड म्हणून शिक्का मारणे बरोबर नाही. त्यांना सुमार्गावरून असे काही लोक विचलित करतात की ज्यांच्याकडून अधिक समंजसपणाची अपेक्षा आहे. सरळसाध्या मुसलमानांच्या डोक्यात जे जहर भरण्यात आले आहे ते लक्षात घेतले तर त्यांच्याकडून अशी रानटीपणाची कृत्ये होणे ही आश्चर्याची गोष्ट आहे असे वाटत नाही.

हे वाईटपण दूर करण्याकरिता समंजस मुसलमानांनी केवळ अशा कुकृत्यांच्या विरोधात बोलूनच थांबू नये तर त्यांनी ताबडतोब आपल्या शब्दांप्रमाणे चालायलाही पाहिजे. अखिल हिंदुस्थान मजलिस ए अहरारचे भूतपूर्व अध्यक्ष हे वाईटपण नष्ट करण्याकरिता स्वयंसेवकांची जी चमू पाठवणार होते ती पाठवणे शक्य झाले की नाही हे आम्हाला जाणून घ्यायचे आहे.

नवी दिल्ली, ऑक्टोबर २३, १९४६

'हरिजन', नोव्हेंबर ३, १९४६

# २. कुसुम देसाई यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २३, १९४६

चि. कुसुम,

या वेळी काँग्रेसच्या अधिवेशनात (२१ ते २५ नोव्हेंबरला मेरठ येथे होणाऱ्या अधिवेशनाकरिता) मी हजर राहायला पाहिजे की नाही हे मला माहीत नाही. यामुळे मला विसर. तुझी तिथे जाण्याची इच्छा असेल तर स्वतःची व्यवस्था कर. सध्या मी बंगालच्या दौऱ्याची तयारी करतो आहे.

आशीर्वाद,

बापू

श्री कुसूमबेन देसाई

मेहता पोळ,

बडोदा.

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. १८५२

----------------

# ३. सुशीला, अरुण आणि सीता गांधी यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २३, १९४६

चि. सुशीला,

मला तुझे पत्र मिळाले. 'इंडियन ओपिनियन'मधील तू पाठवलेले उतारे उपयुक्त आहेत. यामुळे हा सराव सुरू ठेव. एक वा दोन दिवसात बहुधा मी बंगालमध्ये जाईन. . . .

# ४. अपहृत मुली

(हे “टिपण” या सदराखाली प्रकाशित झाले होते.)

**प्रश्न - ज्या मुलींचे बळजबरीने अपहरण करण्यात आले आहे त्यात त्यांचा काहीही दोष नसल्यामुळे समाज जर त्यांना शिक्षा करत असेल तर ती चूक होईल या गोष्टीकडे तुम्ही लक्ष वेधले आहे (पाहा “प्रार्थना प्रवचन”, ऑक्टोबर २०, १९४६). याशिवाय अनिच्छुक मुलीचे लग्न लावण्याकरिता बळजबरीने जर काही विवाहविधी करण्यात आला तर तो त्या मुलीवर बंधनकारक आहे असे मानले जाईल काय? अशा मुलींना परत घेण्याइतके समाजाचे आणि मुलींच्या कुटुंबियाचे मन मोठे असायला नको काय? अशा प्रकारे अपहरण केलेल्या अविवाहित मुलींना अथवा बळजबरीने खोटे विवाहविधी करून लग्न लावण्यात आलेल्या मुलींना परत घेण्याकरिता समाजाने विशेष प्रयत्न तर केलाच पाहिजे आणि शिवाय नेहमीच्या पद्धतीने त्यांचे लग्न लावून देण्याकरिताही मदत करण्याचा प्रयत्न करून त्यांना पूर्णपणे सामावून घ्यायला नको काय? यासंबंधीचा तुम्ही तुमचा दृष्टिकोन आम्हाला अजून स्पष्ट करून सांगाल काय?**

उत्तर - तुम्ही बरोबर आहा. तुम्ही जे काही म्हणता ते सर्व माझे जे उद्गार उद्धृत केले त्यातून निष्पन्न होते. बळजबरीने अपहरण करण्यात आलेल्या मुलींचा कोणताही दोष नसतो आणि त्यांना कोणताही कलंक लागलेला नसतो याबद्दल मला मुळीच संशय नाही. प्रत्येक समंजस माणसाकडून मदत आणि करुणा यांची त्यांना गरज असते. अशा मुलांचे घरात मनमोकळेपणाने आणि प्रेमाने स्वागत झाले पाहिजे व त्यांच्याकरिता योग्य वर मिळण्यात अडचण जाऊ नये.

नवी दिल्ली, ऑक्टोबर २४, १९४६

‘हरिजन’, नोव्हेंबर ३, १९४६

---------------

## ५. सतीश चंद्र दास गुप्ता यांना तार

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २४, १९४६

सतीश बाबू,

खादी प्रतिष्ठान,

१५, कॉलेज चौक,

कलकत्ता.

स्पेशलची गरज नाही. निघण्याच्या तारखेची तार करीन.

बापू

फोटोप्रतीवरून. जी. एन. ८९१३

-----------------

## ६. मनू गांधी यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २४, १९४६

चि. मनूडी,

तू पाठवलेल्या पत्राचे मी दुसऱ्याच दिवशी उत्तर दिले. परंतु ते तुला मिळू शकले नसेल. ते उदयपूरला गेले असेल.

मला तुझे पत्र आज मिळाले. शंकरलाल (शंकरलाल अग्रवाल, मनू गांधी यांच्या मोठ्या बहिणीचे, उमिया अग्रवालचे पती) आजारी आहे हे ऐकून मला वाईट वाटले. तुम्ही दोन्ही बहिणी उदयपूरला गेल्या हे चांगले केले. शंकरलालला लवकर दुरुस्त होण्याकरिता सांग. स्वयंसेवकाला आजारी पडणे शोभत नाही. स्वयंसेवक कोणतीही नोकरी करत असला तरी स्वयंसेवक हा स्वयंसेवकच राहतो.

उमिया दुःखी का आहे? तिला सोबत घेऊन ये. तू जर आली नाहीस तर मात्र गोष्ट वेगळी आहे. तुला दुःखी करण्याकरिता मी तुला बोलावत नाही. तुला माझी भीती वाटते काय? तुझ्या इच्छेविरुद्ध मी तुला काहीही

करायला लावणार नाही. माझ्या अंतःकरणात केवळ कल्याणाचीच भावना आहे. मला अजून लिहायला वेळ नाही.

आशीर्वाद,

बापू

गुजराती मायक्रोफिल्मवरून. एम. एम. यू./२४

--------------

# ७. प्रार्थना प्रवचन

(प्यारेलाल यांचे “साप्ताहिक पत्र” या लेखातून उद्धृत.)

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २४, १९४६

**गांधीजी त्यांना** (हातात फलक घेतेलेले आणि घोषणा करण्यारे काही संतप्त तरुण प्रार्थना स्थळावर पोहोचले आणि पूर्व बंगालमधील स्त्रियांच्या नुकसानभरपाईची मागणी करू लागले. ते म्हणाले की आमचा आवाज कार्यकारिणीच्या सदस्यांपर्यंत पोहोचला पाहिजे. त्या वेळी गांधीजींच्या खोलीत कार्यकारिणीची सभा सुरू होती.) **म्हणाले की तुमचा आवाज आधीच त्यांच्यापर्यंत पोहोचला आहे. मला माहीत आहे की माझे स्वतःचे स्थान बंगालमध्ये आहे. त्यांना आश्वस्त करत गांधीजी म्हणाले की ईश्वरावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक स्त्री-पुरुषाचे अंतःकरण बंगालकरिता रक्ताचे अश्रू ढाळत असेल. प्रार्थनेच्या वेळी गोंधळ घातल्याबद्दल गांधीजींनी जमावाची कानउघाडणी केली आणि शांत होऊन प्रार्थनेत सामील होण्याची त्यांना विनंती केली....**

**नियमित प्रार्थना झाली नाही. गांधीजी म्हणाले की तुमची मनःस्थिती याकरिता तयार नाही. रामधून म्हणण्यात आली आणि नेहमीप्रमाणे लोक काहीसे शांत झाले. गांधीजी म्हणाले की ही प्रार्थना माझ्या हृदयात आहे आणि ती ईश्वरापर्यंत पोहोचेल याची मला खात्री आहे.** (पुढील परिच्छेद द हिंदुस्तान टाईम्समधून घेतलेला आहे)

**लोकांना आश्वस्त करत गांधीजी म्हणाले की आमचे बलिदान केले तर या दंगली थांबू शकतील अशी जर अंतरिम सरकारची खात्री पटली तर आमच्यापैकी कोणीही आपले बलिदान करण्याकरिता मागेपुढे पाहणार नाही.**

**आमचे घर जळत आहे असे एक तरुण म्हणाला होता** (आमचे घर जळत असताना आम्ही प्रार्थना करू शकत नाही असे कोणी तरी ओरडला होता.)**. त्याचा उल्लेख करत गांधीजी म्हणाले की आपले घर जळत असताना घरमालकाचे व घरातील नोकरांचे कर्तव्य आग विझवण्याकडे लक्ष देण्याचे असते, घाबरून डोके खराब करून घेण्याचे नसते. गांधीजींनी जनक**

राजाची गोष्ट सांगितली आणि ते म्हणाले की जनक राजाला जेव्हा कळले की त्याची राजधानी जळते आहे तेव्हा तो अगदी शांत राहिला आणि मुळीच घाबरला नाही. आग लागण्यापूर्वी आणि नंतरही जे काही करणे आवश्यक होते ते सर्व त्याने केलेले असल्यामुळे व ईश्वरावर श्रद्धा असल्यामुळे तो असा शांत राहू शकत होता. तो जर अस्वस्थ होऊन आग लागलेल्या आपल्या राजधानीकडे पळाला असता तर आग विझवणारांचे लक्ष विचलित होऊन आग अजूनच वाढली असती.

पूर्व बंगालमधील स्त्रियांना सहन कराव्या लागलेल्या व्यथांबद्दल तुम्हाला इतके दुःख होते परंतु इथे बसलेल्या स्त्रियांचा मात्र तुम्ही मुळीच मान ठेवत नाही. तुम्ही त्यांना घाबरवून प्रार्थनेच्या मैदानातून बाहेर जाण्याकरिता भाग पाडले आहे. दररोज जिथे स्त्रिया बसत असायच्या ती जागा तुम्ही व्यापली आहे. पूर्व बंगालमधील अत्याचारपीडित स्त्रियांना सहानुभूती दाखवण्याचा हा विचित्र मार्ग आहे. मला आशा आहे की यातील विसंगती आणि विचित्रपणा तुमच्या लक्षात येईल. आपल्या स्त्रिया लहानशा गोष्टीने घाबरून जातात. संपूर्ण जगातही कमीअधिक प्रमाणात हीच परिस्थिती आहे. आमच्या स्त्रियांनी शूर व्हायला पाहिजे. बेअब्रू होऊ देण्यापेक्षा तुम्ही आत्महत्या करा असा जो सल्ला गांधीजींनी स्त्रियांना दिला होता त्याबद्दल गैरसमज पसरले होते. गांधीजी म्हणाले की तुमची इच्छा असेल तर तुम्ही तुमच्या संरक्षणाकरिता कट्यार ठेवू शकता. परंतु परिस्थिती अतिशय विपरीत असते तेव्हा कट्यारीचा काहीही उपयोग नसतो. ज्या स्त्रिला मरण्याची भीती वाटत नाही तिचा शीलभंग कोणीही करू शकत नाही. तुमच्याजवळ आत्मरक्षणाचे दोन मार्ग आहेत - मारणे वा न मारता मरण पत्करणे. मी तुम्हांला केवळ दुसरा मार्ग शिकवू शकतो, पहिला नाही. अखेररीस मला तुम्ही निर्भय हव्या आहा. भ्याडपणासारखे पाप नाही.

परंतु ज्यांचा हिंसेवर विश्वास आहे त्यांच्याकरिताही एक आचार संहिता आहे. पूर्व बंगालमध्ये ज्या प्रकारे आचरण करण्यात येत आहे त्याची नक्कल करण्यात येऊ नये. मौलाना साहेब आणि अखिल हिंदुस्थान मजलिस ए अहरार यांच्या माजी अध्यक्षांचे वक्तव्य तुम्ही वाचले असेल. ते म्हणाले की इस्लाम बळजबरीच्या धर्मपरिवर्तनाला, अपहरणाला आणि स्त्रियांच्या बलात्काराला परवानगी देत नाही. (पाहा “खेडी आपले कापड कसे तयार करू शकतील?” नोव्हेंबर १७, १९४६)

‘हरिजन’, नोव्हेंबर ३, १९४६. शिवाय ‘द हिंदुस्तान टाईम्स’, ऑक्टोबर २६, १९४६

--------------

## ८. जयप्रकाश भंसाळी यांना पत्र

ऑक्टोबर २५, १९४६

चि. भंसाळी,

तुला धीर नाही. योग्य वेळी निश्चितपणे तुझाही हवी दिला जाईल. माझ्या मते पुष्पा (पुष्पा देसाई) अजून पूर्ण तयार झाली नाही. प्रत्येकाला पुरेसा वेळ दिला पाहिजे. मी बंगालमध्ये पोहोचल्यानंतरच बंगालच्या परिस्थितीबद्दल अधिक कळू शकेल. आवश्यक वाटले तर मी तिथून लिहीन.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ९२७६

-----------------

## ९. देवप्रकाश नाय्यर यांना पत्र

ऑक्टोबर २५, १९४६

चि. देव,

तू आताच बंगालमध्ये जाण्याची आवश्यकता नाही. सुट्यांमध्ये तू माझ्याबरोबर राहावे अशी माझी इच्छा नाही. माझ्या बंगाल भेटीबद्दल अजून काही ठरले नाही. माझे अंतःकरण अर्थातच तिथे आहे. इथेसुद्धा भरपूर काम आहे. घाईगडबडीत काहीही ठरवण्याची काहीही आवश्यकता नाही. तू तिथे सुरू केलेले काम इतके सोपे नाही हे तुला कळले इतकेच पुष्कळ झाले.

आशीर्वाद,

बापू

हिंदी मायक्रोफिल्मवरून. सौजन्य - भारतीय लेखागार

--------------------

# १०. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २५, १९४६

हिंदुस्थान अतिशय कठीण काळातून जात आहे. खरे तर हे आहे की सर्व जगच आज संकटातून जात आहे आणि हिंदुस्थानचा त्याला अपवाद नाही. या संकटातून पार पडण्याकरिता आपल्याला कोणती मदत मिळाली पाहिजे?

**गीतेप्रमाणे आध्यात्मिक वर्तनाकरिता पहिली गोष्ट निर्भयपणा हवा असतो. नववर्षदिनी लोक काही चांगला संकल्प करत असतात. तुम्ही सर्वांनी पूर्णपणे भीती सोडून देण्याचा संकल्प करावा असे मला वाटते. निर्भयता नसेल तर सर्व गुण धुळीला मिळतात. निर्भयता नसेल तर सत्य वा अहिंसेनुसार आचरण करणे अशक्य आहे.**

**निर्भयता म्हणजे उद्धटपणा वा आक्रमकता नाही. ते स्वतःच भित्रेपणाचे चिन्ह आहे. निर्भयपणात चित्त शांत असले पाहिजे आणि स्वभावही शांत असला पाहिजे. याकरिता ईश्वरावर जिवंत श्रद्धा असणे आवश्यक आहे.**

**अखेरीस गांधीजी म्हणाले की तुमच्यासमोर जे गीत म्हणण्यात आले त्यात ईश्वरापासून विभक्त झाल्यामुळे मी जितका दयनीय प्राणी झालो आहे तितका अजून कोणीही झाला नसेल असे भक्त म्हणतो. आपणा सर्वांचा आधार ईश्वर आहे. जो माणूस ईश्वराला शरण जातो त्याला कोणालाही घाबरण्याचे कारण नसते.**

'हरिजन', नोव्हेंबर ३, १९४६

----------------

# ११. सिंधमध्ये "सत्यार्थ प्रकाश"वर बंदी

असे वाटत होते की "सत्यार्थ प्रकाश"वरील बंदीचा कालावधी संपला आहे आणि परत त्याच्यावर कधीही बंदी घातली जाणार नाही. परंतु ही आशा व्यर्थ ठरली. नवीन घातलेली बंदी याप्रमाणे आहे -

सिंध सरकारला असे वाटते की "सत्यार्थ प्रकाश" नावाच्या पुस्तकातील १४व्या प्रकरणात काही गोष्टी अशा आहेत की ज्या सम्राटाच्या सरकारच्या प्रजेच्या विविध वर्गात शत्रुत्व आणि घृणा पसरवणाऱ्या आहेत -

***यामुळे आता १८९८च्या दंडविधान संहितेचे कलम ९९ ए द्वारा मिळालेल्या अधिकाराचा उपयोग करत सिंध सरकार असे घोषित करते की स्वामी दयानंद सरस्वतीद्वारा लिखित आणि प्रतिनिधी सभा, सिंध, कराचीतर्फे प्राध्यापक ताराचंद गजरा, एम. ए. द्वारा संपादित आणि प्रकाशित सिंधी सत्यार्थ प्रकाशच्या प्रती कुठेही उपलब्ध असल्यास त्या प्रतींना तसेच त्या प्रतीतील १४व्या प्रकरणाची नक्कल वा तिचे पुनर्मुद्रित रूप वा अनुवाद वा उद्धरण यांचा समावेश असलेले सर्व दस्तावेज जप्त करण्यात आले असल्याचे सिंध सरकार घोषित करते कारण वरील प्रकरणात (क) मुसलमानांच्या काही धार्मिक विश्वासांची चेष्टा करण्यात आली आहे, (ख) कुराणमधील उपदेश लोकांसमोर चुकीच्या पद्धतीने ठेवून त्याची निंदा करण्यात आली आहे, (ग) महम्मद पैगंबरवर टीका करण्यात आली असून त्यांच्या अधिकारवाणीला तुच्छ लेखण्यात आले आहे, (घ) त्यात सर्वसामान्यपणे अशा गोष्टी लिहिल्या आहेत की ज्यांच्यामुळे मुसलमानांच्या धार्मिक भावनांना धक्का लागतो वा धक्का लागलेला आहे.***

या नवीन बंदीचा व्याप जुन्या बंदीपेक्षाही व्यापक आहे. पहिल्या बंदीत केवळ १४व्या प्रकरणात सामील असलेल्या कोणत्याही माहितीचा समावेश असलेले पुस्तक प्रकाशित करणे हा अपराध आहे असे मानण्यात आले होते. नवीन बंदीप्रमाणे तर हे पुस्तक ठेवणेही अपराध आहे. मला तर असेच वाटते की ही बंदी असंजसपणाची आहे आणि यामुळे जगभरातील आर्यसमाजाच्या लोकांच्या भावनांना धक्का लागेल.

आर्य समाजाच्या ४० लाख लोकांकरिता सत्यार्थ प्रकाशचे तेच महत्त्व आहे जे मुसलमानांकरिता कुराणचे आणि ख्रिश्चनांकरिता बायबलचे.

आजकाल लोकप्रिय सरकार वादग्रस्त साहित्यावरील बंदी लावण्याच्या आपला अधिकार बजावतानासुद्धा एकाएकी धजावत नसते, परंतु तरीही आजकालच्या वादग्रस्त पुस्तकावरील बंदी समजून घेता येऊ शकते. परंतु एखाद्या धार्मिक पुस्तकावर बंदी घालणे हे तर दुष्टपणाचे कृत्य वाटते. यामुळे सिंध सरकारला माझी विनंती आहे की त्यांनी ही बंदी उठवावी. सत्यार्थ प्रकाशचे सिंधी भाषांतर हे काही नवीन

प्रकाशन नाही. ज्या पुस्तकाच्या इतक्या आवृत्त्या निघाल्या असतील, जगातील बहुतांश भाषांमध्ये ज्याचा अनुवाद झालेला असेल त्या पुस्तकाबद्दल असे म्हणणे उचित राहील काय की “त्यात अशा गोष्टी लिहिलेल्या आहेत की ज्या सम्राटांच्या वेगवेगळ्या प्रजाजनांमध्ये शुत्रुत्वाची भावना पसरवील? ”सहनशीलतेच्या गुणामुळे कधीही हानी होत नसते, विशेषतः धार्मिक गोष्टींच्या बाबतीत. धार्मिक बाबतीत जगाच्या अंतापर्यंत मतभेद राहणारच आहेत. यामुळे सहिष्णुतेच्या आधारावरच वेगवेगळे लोक चांगल्या शेजाऱ्यांप्रमाणे आणि मित्रांप्रमाणे राहू शकतात. उचित वा अनुचित टीकेमुळे धर्माचे नुकसान कधीही होत नसते, धर्म मानणाऱ्या लोकांच्या शैथिल्यामुळे वा बेफिकिरपणामुळे असे होत असते.

नवी दिल्ली, ऑक्टोबर २६, १९४६

‘हरिजन’, नोव्हेंबर ३, १९४६

-------------------

# १२. अमृत कौर यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २६, १९४६

चि. अमृत,

आजच्या तुझ्या पत्रात माझे पत्र मिळाल्याची सूचना तू दिलेली नाही. मी एक दिवसही चुकत नाही.

तुझी विमानात बसायची वेळ होईल तोपर्यंत तुझी जखम भरलेली असेल आणि तुला कोणताही शारीरिक त्रास न होता तू जाऊ शकशील आशी आशा आहे.

आम्ही कलकत्त्याकरिता सोमवारी निघत आहो.

सोबत शांताचे पत्र आहे.

स्नेह,

बापू.

मूळ इंग्रजीवरून. सी. डब्ल्यू. ४१८३. सौजन्य - अमृत कौर. शिवाय - जी. एन. ७८१९

----------------

# १३. मुन्नालाल गं. शाह यांना पत्र

ऑक्टोबर २६, १९४६

. . .

आता माझ्या सर्व योजनांचा गुंता झाला आहे असे समज. बंगालमधून मला जे काही करता येईल तितकेच मला शक्य होईल. मी सोमवारी बंगालकरिता निघण्याची शक्यता आहे. ईश्वर मला जे करायची प्रेरणा देईल ते मी करीन. माझी कसोटी पाहिली जात आहे. सद्यस्थितीत माझ्याजवळ राहण्याची कल्पना सोडून दे आणि तू स्वतःच कोणते तरी सेवेचे काम करू लाग. याबाबतीत तुला कांचनचा (मुन्नालाल शाह यांची पत्नी) सल्ला घेण्याची आवश्यकता नाही. तू जे काही करशील ते तिला मान्य होईल. तुला स्वतःच निर्णय घ्यायचा आहे.

. . .

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ८४०० आणि ८३९९

----------------

# १४. पी. जी. मॅथ्यू यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २६, १९४६

भाई मॅथ्यू,

राजकुमारी सिमला येथे आहे. ती विश्रांती घेत आहे. तिथे पत्र पाठवली जात नाहीत.

तुम्ही तुमच्या आईच्या मृत्यूचा शोक का करता? तिची वेदनांपासून मुक्ती झाली आहे.

मी बंगालमध्ये जात आहे.

आशीर्वाद,

बापू

प्रा. पी. जी. मॅथ्यू,

सेक्रेड हार्ट्स कॉलेज,

थेवरा, एर्नाकुलम.

इंग्रजी फोटोप्रतीवरून. जी. एन. १५४६

--------------

# १५. प्रार्थना प्रवचन

(प्यारेलाल यांच्या "विकली लेटर" या 'हरिजन'मधील लेखातून उद्धृत. पहिले वाक्य आणि शेवटचे दोन परिच्छेद 'हिंदुस्तान टाईम्स'मधून घेतले आहेत)

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २६, १९४६

**गांधीजी म्हणाले की स्वर्गीय महादेव देसाईंनी गुजरातीमध्ये या भजनाचा अनुवाद केला होता.** (हा संदर्भ रविंद्रनाथ टागोर यांच्या 'एकला चलो रे' या गीताचा आहे. हे गीत गुरुदेवांची पणती नंदिता कृपलानी म्हणाल्या होत्या.) **गांधीजी म्हणाले की कितीही मोठी अडचण असली तरी माणसाने एकट्याने चालत राहायला पाहिजे हा या गीताचा आशय आहे. ईश्वर आपल्याबरोबर आहे असे जर त्याला वाटत असेल तर त्याला एकटेपण वाटणार नाही. हे भजन कुकर्म करणारांकरिता नाही. ते एकटे चालू शकत नाहीत.**

**गांधीजी पुढे म्हणाले की लीगचे सदस्य मंत्रिमंडळात आले आहेत. आपले काम यशस्वीपणे करण्याच्या निर्धाराने ते आले आहेत अशी मला आशा आहे. या १४ लोकांच्या हातात** (जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, राजेंद्र प्रसाद, असफ अली, बलदेव सिंग, जगजीवन राम, जॉन मथाई, च. राजगोपालाचारी, सी. एच भाभा, लियाकत अली खान, आय. आय. चुंद्रिगर, अब्दुल रब निश्तर, गजनफर अली खान आणि जोगेंद्र नाथ मंडल) **आपल्या देशाचे सरकार आहे. त्यांना अन्नवस्त्राची व्यवस्था करायची आहे, कोट्यवधी लोकांना शिक्षण द्यायचे आहे व दळणवळणाच्या चांगल्या सोयी करायच्या आहेत आणि देशातील शांतता आणि सुव्यवस्थेची जबाबदारी त्यांच्यावर आहे. ते म्हणाले -**

आपण प्रार्थना करू या की हे लोक एक चमू म्हणून काम करतील व त्यांचे सर्व काम प्रामाणिकपणाचे असेल व ते वशिलेबाजी आणि लाचलुचपतीपासून मुक्त असतील.

**यानंतर गांधीजींनी दिल्लीत स्थापन केलेल्या चरखा मंडळाची आठवण करून दिली. ज्यांना कापसातील सरकी काढण्यापासून तर कताईपर्यंतच्या सर्व प्रक्रिया येतात तेच या मंडळाचे सदस्य होऊ शकतात. उद्या त्यांची परीक्षा असेल. ज्यांना या प्रक्रिया माहीत आहेत ते परीक्षेत भाग घेऊ शकतात. ते येतील तेव्हा त्यांना कापूस दिला जाईल. बाकी लागणारे साहित्य त्यांनी आणावे.**

**संघटनेला अजून पुरेसा कापूस मिळवता आलेला नाही. गिरणीत तयार झालेली रुई सहज मिळू शकते. परंतु ती तुणाई करण्याकरिता चांगली नसते. यामुळे आम्हाला बोंडांमधून निघालेला कापूस पाहिजे. पुरेसा कापूस गोळा न झाल्यामुळे परीक्षार्थ्यांची निराशा होऊ नये म्हणून ते स्वतःचा कापूस आणू शकतात. या भजनात सांगितल्याप्रमाणे एकट्याने उभे राहण्याचे साहस आपल्यामध्ये असले पाहिजे.**

'हरिजन', नोव्हेंबर ३, १९४६ आणि 'द हिंदुस्तान टाईम्स', ऑक्टोबर २७, १९४६

# १६. सरलादेवी अं. साराभाई

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २७, १९४६

चि. सरलाबेन,

. . .

उद्या मी बंगालकरिता निघत आहे. तुम्ही जर खादी प्रतिष्ठान, कॉलेज चोक, कलकत्ता या पत्त्यावर पत्र लिहिले तर ते मला मिळू शकेल.

निर्मलाबेनची प्रकृती चांगली झाली असती तर किती चांगले झाले असते.

आशीर्वाद,

बापू

सरलाबेन साराभाई,

अहमदाबाद.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-----------------

# १७. लीलावती मुंशी यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २७, १९४६

चि. लीलावती (मुंशी),

मला तुमचे पत्र मिळाले. मला तुमची कल्पना आवडली. परंतु सध्या तरी तुम्ही वा तुमच्यासारखे लोक माझ्याबरोबर येणार नाहीत. मी काय करावे अशी ईश्वराची इच्छा आहे हे मला माहीत नाही. मी तिथे पोहोचल्यानंतर मला मार्ग सापडेल. आणि मला गरज वाटलीच तर मी तुम्हाला लिहीन वा तार करीन.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---------------

# १८. प्रार्थना प्रवचन

(प्यारेलाल यांच्या “साप्ताहिक पत्र” या लेखातून उद्धृत)

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २७, १९४६

सायंकाळच्या प्रार्थनेतील श्रोत्यासमोर बोलत असताना गांधीजी म्हणाले की उद्या सकाळी मी बंगालमध्ये जात आहे. ईश्वर मला परत दिल्लीला कधी आणेल हे मला माहीत नाही. कलकत्त्याहून नोआखालीला जाण्याची माझी इच्छा आहे. तो प्रवास कठीण आहे आणि माझी प्रकृतीही तितकीशी चांगली नाही. परंतु माणसाने आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे आणि त्याकरिता आमचा मार्ग सोपा कर अशी प्रार्थना तुम्ही ईश्वराला करा. ईश्वर आपल्या मार्गातील अडचणी दरवेळी दूर करीलच असे नाही, परंतु त्या अडचणींना तोंड देण्याची हिंमत तो आम्हांला देतो.

कोणीही स्टेशनवर यावे अशी माझी इच्छा नाही. हिंदुस्थानने मला भरपूर प्रेम दिले आहे. या अतिरिक्त प्रदर्शनाची आवश्यकता नाही.

बंगालमध्ये कोण दोषी आहे याचा निकाल देण्याकरिता मी तिथे जात नाही आहे. मी तिथे जनतेचा सेवक म्हणून जात आहे आणि तिथे मी हिंदू आणि मुसलमान या दोघांनाही भेटणार आहे. काही मुसलमान आज माझ्याकडे शत्रू म्हणून पाहतात. असे ते नेहमीच करत नसतात. परंतु त्यांच्या रागवण्याचे मला दुःख होत नाही. माझ्या धर्माचे लोकसुद्धा अनेकदा माझ्यावर रागावत नाहीत काय? संपूर्ण मानवाजात, मग ती कोणत्याही देशातील, वंशाची, रंगाची, धर्माची असली तरी, ती माझ्या रक्ताच्या नातलगासारखी आहे. तुम्ही जर ईश्वराचे सेवक असाल तर तुम्ही त्याच्या संपूर्ण निर्मितीची सेवा केली पाहिजे.

याच नात्याने मी बंगालमध्ये जात आहे. मी त्यांना सांगेन की हिंदू आणि मुसलमान कधीही शत्रू होऊ शकत नाहीत. तुम्हा सर्वांचा हिंदुस्थानमध्ये जन्म झाला आहे आणि तुम्हांला इथेच जीवन कंठायचे आहे आणि मरायचे आहे. धर्मांतरामुळे हे मूलभूत सत्य बदलू शकत नाही. धर्मांतरामुळे राष्ट्रीयत्व बदलते असा जरी काही लोकांचा विश्वास असेल तरी तेवढ्यामुळे ते आपले शत्रू होण्याचे कारण नाही.

स्त्रियांवरील संकटांमुळे माझे हृदय नेहमीच विदीर्ण होत असते. त्यांचे अश्रू पुसण्याकरिता आणि शक्य झाले तर त्यांना धीर देण्याकरिता मी बंगालमध्ये जात आहे. नोआखालीला जाण्यापूर्वी कलकत्त्यात मी राज्यपालांना आणि मुख्यमंत्री सुऱ्हावर्दींना भेटेन.

मी इथून काही शुभ मुहुर्तावर निघत नाही आहे. जवाहरलालजी आणि अंतरिम सरकारमधील त्यांच्या सहकाऱ्यांना घाणेरड्या शिव्या देण्यात आल्या आणि अपमानित करण्यात आले. त्यापूर्वी व्हाईसराय भवनासमोर घृणित निदर्शने करण्यात आली. हे वाईट आहे. काँग्रेस आणि मुस्लिम लीग या दोन पक्षांचे केंद्रात संयुक्त सरकार स्थापन केल्यानंतर अशा घटना का घडाव्या? आपल्या सर्वोत्तम क्षमतेनुसार सेवा करण्याची इच्छा असलेल्या नेत्यांवर निंदा वा स्तुतीमुळे कोणताही फरक पडत नसतो. तरीही लोकांनी उचित व्यवहार करायलाच पाहिजे. सर्व मंत्री एक चमू म्हणून काम करतील अशी आपण प्रार्थना करू या आणि आशाही करू या. हिदुस्थान जर एका आवाजात बोलेल तर तो जगातील महान देश होईल आणि हिंदुस्थान या स्थानावर पोहोचावा अशी प्रत्येक हिंदुस्थानीने प्रार्थना केली पाहिजे. (या पुढील मजकूर 'हिदुस्तान टाईम्स'मधून घेतला आहे.)

. . .

'हरिजन', नोव्हेंबर १०, १९४६ आणि 'द हिंदुस्तान टाईम्स'

---------------

# १९. एका ब्रिटिश वृत्तपत्र निदेशकाशी चर्चा

(“एक मैत्रीपूर्ण निवेदन” या प्यारेलाल याच्या लेखातून उद्धृत. प्यारेलाल स्पष्ट करत सांगतात की “एका प्रभावी ब्रिटिश वर्तमानपत्राचे निदेशक नवी दिल्लीत गांधीजींना भेटायला आले व माझे वृत्तपत्र हिंदुस्थानचे हित करू इच्छिते असे सांगितले.)

नवी दिल्ली,

[ऑक्टोबर २८, १९४६] (गांधीजी नवी दिल्लीहून कलकत्त्याला जाण्याकरिता ऑक्टोबर २८, १९४६ला सकाळी निघाले होते.)

गांधीजी - आज आम्ही दुहेरी वाईटपणाने ग्रस्त आहो. तथ्य दाबले जाते आणि दुसरीकडे वाटेल तशा अफवा पसरवल्या जातात.

**निदेशक - दंगली वगैरेंच्या बातम्यांवर भर दिल्याने कोणताही लाभ होत नाही, माझे पत्र त्यावर भर देत नाही.**

**परंतु गांधीजी त्यांना म्हणाले की प्रासंगिक तथ्य दडपून तुमचे पत्र हिंदुस्थानची खरी सेवा करू शकणार नाही. पूर्वग्रहमुक्त होऊन वस्तुस्थिती जशी असेल तशी मांडूनच ते सेवा करू शकेल. गांधीजी पुढे म्हणाले -**

न्याय्य कारणांची सत्यामुळे कधीही हानी होत नसते.

**या दंगली कधी संपतील या अजून एका प्रश्नाचे उत्तर देताना गांधीजी म्हणाले की सध्याच या दंगली थांबण्याचे कोणतेही चिन्ह दिसत नसले तरी त्या थांबणे अपरिहार्य आहे. ते पुढे म्हणाले -**

काही लोक असे आहेत की जे आगीत तेल ओतत आहेत. माझा आवाज एकाकी असू शकेल, परंतु तरी मी हेच सांगेन की जोपर्यंत ब्रिटिश सैन्य इथे आहे तोपर्यंत हिंदू आणि मुसलमान हे दोघेही मदतीकरिता त्यांच्या तोंडाकडे पाहत राहतील व दंगली होत राहतील. स्वातंत्र्याकरिता प्रयत्नशील असलेल्या लोकांकरिता याहून अधिक वाईट काय असू शकते.

**यामुळे त्या मित्रांच्या ब्रिटिश भावनेला धक्का लागला. त्यांनी विचारले : “ब्रिटिशांना तर आपले सैन्य लवकरात लवकर काढून घ्यायचे आहे. कोणी अडवले आहे?”**

अजून कोणी, स्वतः ब्रिटिशांनीच. तात्काळ येथून निघून जाणे अशक्य आहे हे जर त्यांनी सिद्ध केले तर मात्र गोष्ट वेगळी आहे.

**काही टाळाटाळ करत अखेरीस त्या मित्राने कबूल केले की ब्रिटिश व्यापारी हितसंबंध, त्यांची हाजीहाजी करणारे आणि इतर हितसंबंधीय हेच सैन्य काढून घेण्याच्या मार्गात आडवे येत आहेत. परंतु शांतता, सुव्यवस्था कायम ठेवण्याच्या दृष्टीने ब्रिटिश सैन्याच्या उपयोगितेबद्दल अजूनही त्यांच्या मनात शंकाच होती. “तुम्ही म्हणता की जोपर्यंत ते इथे आहेत**

**तोपर्यंत इथे कायदा आणि सुव्यवस्था नांदू शकत नाही. तरीही शांतता प्रस्थापित करण्याकरिता इथे दिवसेंदिवस त्यांची मागणी वाढत आहे. तक्रार ही आहे की त्यांचा पुरेसा उपयोग केला जात नाही.”**

गांधीजी - याच कारणामुळे ते काढून घेतले पाहिजे. माझ्या मते त्यांच्या उपस्थितीचा उपयोग दंगली थांबण्याकरिता होत नाही तर केवळ शिक्षा करण्याकरिता होतो. कायदा आणि सुव्यवस्था टिकवण्याकरिता जिथे कुठे त्यांचा उपयोग होत असतो तिथे तो दंगली झाल्यानंतर होत असतो. भावी इतिहासकार हेच सांगतील. सुव्यवस्था पूर्व बंगालमध्येही निर्माण होईल, परंतु किती नरसंहार आणि यातनांनंतर? नाही, हिंदुस्थानातील ब्रिटिश सैन्य हिंदुस्थानचे रक्षण करण्याकरिता नाही तर हिंदुस्थानवर लादण्यात आलेल्या ब्रिटिश हितसंबंधाचे रक्षण करण्याकरिताच आहे. आणि त्यांची मुळे आज इतकी खोलवर रुजलेली आहेत की आज ब्रिटिश सरकारही त्यांना निर्मूल करू शकत नाही. ब्रिटिश इथे काही दानधर्म करण्याकरिता आले नव्हते. आणि त्यांच्या येथील मुक्कामामागे वा त्यांचे इथे असलेले सैन्य इथेच कायम ठेवण्यामागे त्यांचा कोणताही परोपकाराचा हेतू नाही, उलट जो दावा केला जातो त्याच्या विपरीत परिस्थिती आहे.

**निदेशक - नुकताच जे युद्ध आपल्याला पाहायला मिळाले त्याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून आपण काय केले पाहिजे असे तुम्हाला वाटते?**

गांधीजी - मोठ्या राष्ट्रांची शोषणाची इच्छा जोपर्यंत थांबत नाही आणि  युद्ध व अणुबॉम्ब जिची स्वाभाविक अभिव्यक्ती आहे त्या हिंसक वृत्तीचा त्याग करत नाहीत तोपर्यंत जगात शांततेची शक्यता नाही हे निश्चित. युद्ध सुरू असताना यासंबंधी बोलण्याचा मी प्रयत्न केला आणि ब्रिटिश जनतेला जाहीर पत्रही लिहिले (पाहा “प्रत्येक ब्रिटिशाला”), हिटलरला लिहिले (पाहा “ॲडॉल्फ हिटलर यांना पत्र”, डिसेंबर २४, १९४०) आणि जपानी जनतेलाही लिहिले. (पाहा “प्रत्येक जपानीला”). आणि मी घेतलेल्या त्या श्रमाकरिता मला पंचमस्तंभी संबोधण्यात आले.

**निदेशक - परंतु अहिंसेचा प्रभाव पडण्याकरिता बराच वेळ लागू शकतो. आणि दुसरा मोर्चा उघडण्यात आला नसता तर आज रशियाचे अस्तित्वही दिसले नसते.**

गांधीजी - हे सर्व युक्तिवाद बुद्धीने केलेले आहेत. या पद्धतीने मी विचार करू शकत नाही. मी जर अशा प्रकारे विचार करू लागलो तर त्याचा अर्थ होईल माझ्या श्रद्धेचा त्याग. उलट मला आलेल्या या सर्व कटू अनुभवांनंतरही माझी ही श्रद्धा तर दिवसेंदिवस कधी नव्हे इतकी उज्ज्वल होते आहे. डोळ्यांची पापणी लवते न लवते इतक्या वेळात संपूर्ण जनसमुदाय एखाद्या विशेष विचाराचा अनुयायी झाल्याचे चमत्कार इतिहासात आढळून येतात. बोअर युद्धच घ्या. त्याने इंग्रजी भाषेला मॅफेकिंग म्हणजे मजा करणे हा शब्द दिला आहे.

मॅफेकिंग ज्या दिवशी साजरा करतात त्या दिवशी लोकांना वेड लागल्यासारखे होते. तरीही दोन वर्षांच्या कालावधीतच संपूर्ण ब्रिटनचा कायापालट झाला आहे. हेन्री कॅम्पबेल बॅनरमन प्रधानमंत्री झाले आणि युद्धाच्या जवळपास सर्व लाभाचा त्यांनी त्याग केला. नुकताच मजूर पक्षाचा निवडणुकात झालेला विजय हे याचेच उदाहरण आहे. प्रभावी आणि प्रज्ञावंत वक्ता असलेले चर्चिल जे कालपर्यंत ब्रिटिशांचे आदर्श पुरुष होते व ज्याच्यात्याच्या तोंडी केवळ चर्चिलचेच नाव असायचे व कालपर्यंत त्यांचा एकेक शब्द लोक वेदवचनाप्रमणे मानायचे आणि त्यांचे म्हणणे श्रद्धायुक्त आश्चर्याने ऐकायचे. हाच माझ्याकरिता फार मोठा चमत्कार आहे. सर्व शक्ती संपल्यानंतरही एक शक्ती कायम राहील, मग तिला ईश्वर म्हणा की निसर्ग म्हणा वा अजून काही म्हणा. ही जी माझ्यासारख्या आस्तिकाची श्रद्धा आहे ती बळकट करण्याकरिता हे सर्व प्रसंग पुरेसे आहेत.

**अहिंसेच्या विजयासंबंधीच्या त्यांच्या या श्रद्धेची तुलना येशूच्या पुनरागमनाच्या साक्षीदारांच्या श्रद्धेशी करत गांधीजी म्हणाले की हे पुनरागमन ते साक्षीदार जिवंत असतानाच होणार होते, परंतु २००० वर्षे होऊनही ते पुनरागमन झालेले नाही आणि अजूनही ते फार फार दूरच्या स्वप्नाप्रमाणे आहे असे दिसते. श्रद्धा दुसऱ्या कोणत्याही पद्धतीने विचार करू शकत नाही,**

'हरिजन', नोव्हेंबर १०, १९४६

---------------

# २०. एका मित्राशी चर्चा

नवी दिल्ली,

[ऑक्टोबर २८, १९४६ला वा त्यापूर्वी]

(प्यारेलाल यांच्या 'विकली लेटर'मधून उद्धृत. प्यारेलालनुसार गांधीजी आपल्या जवळच्या मित्राबरोबर चर्चा करत होते. ते मित्र बंगालमध्ये जाण्यापासून गांधीजींना परावृत्त करण्याचा प्रयत्न करत होते. अखेरीस गांधीजी ऑक्टोबर २८ला बंगालकरिता रवाना झाले.)

मी तिथे काय करीन हे मला माहीत नाही. मला इतकेच माहीत आहे की मी तिथे गेलो नाही तर मला स्वस्थ वाटणार नाही.

दोन प्रकारची विचारसरणी असते - आरामखुर्चीतील आणि सक्रिय. आरामखुर्चीत बसल्याबसल्या डोक्यात असंख्य विचार येऊ शकतात. त्यांना महत्त्व नसते. परंतु अंतःकरणाच्या गाभाऱ्यातून निघालेला आणि व्यक्तिच्या समग्र व्यक्तिमत्वातून स्फुरलेला एक शुद्ध, सक्रिय विचार गतीशील होऊन बिजयुक्त अंडाणूप्रमाणे नवीन शक्ती निर्माण करण्याचे काम करतो.

**नोआखालीला जाण्याची सहजप्रेरणा मला झाली आहे. ती दाबून ठेवणे मला योग्य वाटत नाही.**

'हरिजन', नोव्हेंबर १०, १९४६

-----------------

# २१. सुमित्रा गांधी यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २८, १९४६

चि. सुमी (रामदास गांधींची मुलगी),

मला तुझी चिठ्ठी मिळाली. तू तर थोडी आधीच काशीकडे गेली होतीस ना? आज मी कलकत्त्याला जाणारी गाडी पकडत आहे. तिथे मला किती दिवस राहावे लागेल वा तिथे काय होणार आहे हे मला काहीही माहीत नाही. परंतु त्याच्याशी आपल्याला काय कर्तव्य आहे? ईश्वराची इच्छा असेल त्याप्रमाणे आपण राहू या आणि तो म्हणेल तसे वागू या. आपण काय केले पाहिजे हे त्याने आधीच सांगितले आहे! तू अभ्यास करतेस ना? सांग. बाकी सीताला पाठवलेल्या माझ्या पत्रात. (हे सापडत नाही.)

आशीर्वाद,

बापू

सुमित्रा गांधी,

बनारस.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-------------

## २२. शंकरलाल बँकर यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २८, १९४६

चि. शंकरलाल,

सकाळच्या प्रार्थनेनंतर मी पत्रे लिहायला बसलो. माझ्यासमोर तुझे आणि अनसुयाबेनचेही (अनसुयाबेन साराभाई) पत्र आहे. बंगालकरिता मी तयारी करत आहे. ईश्वराची आज्ञा असेल त्याप्रमाणे मी तिथे करीन. त्याची इच्छा असेल तोपर्यंत मी तिथे राहीन. तूसुद्धा.

तू तुझा वेळ कसा घालवतो?

माझा पत्ता असा असेल - खादी प्रतिष्ठान, कॉलेज चौक, कलकत्ता. परंतु मला नोआखालीला जायचे आहे.

आशीर्वाद,

बापू

शंकरलाल बँकर,

अहमदाबाद.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-------------

## २३. ब्रिजकृष्ण चांदीवाला

ऑक्टोबर २८, १९४६

चि. ब्रिजकृष्ण,

सध्या तू बंगालला येण्यात काहीही अर्थ नाही असे मला वाटते. हा ताण सहन करण्यासारखी तुझी प्रकृती नाही. आणि इथेही करण्यासारखी कामे आहेत. तिथे कोणती परिस्थिती असेल ते मला माहीत नाही.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. २४९५

# २४. कानम गांधी यांना पत्र

आगगाडीतून,

ऑक्टोबर २८, १९४६

चि. कानम (रामदास गांधींचा मुलगा),

मी हे चालत्या गाडीतून लिहीत आहे. मी बंगालमध्ये जात आहे. तुझे हस्ताक्षर फार वाईट आहे असे मी समजत नाही. तरीही तू त्यात प्रगती करू शकतो. तू तुझ्या अभ्यासात बुडालेला आहेस. तिकडे मी केव्हा येऊ शकेन हे मला माहीत नाही. उषाला (कानम गांधी यांची बहीण) मला लिहायला सांग.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. ९५२३. सौजन्य - कनम गांधी

--------------

# २५. रामदास गांधी यांना पत्र

आगगाडीतून,

ऑक्टोबर २८, १९४६

चि. रामदास,

बंगालमध्ये जात असताना मी हे लिहीत आहे. मला तुझी चिठ्ठी मिळाली. तू तुझ्या प्रकृतीची काळजी घेणे जास्त चांगले होईल.

मला सुमीचे पोस्टकार्ड मिळाले. ती अभ्यासाला चांगलीच लागलेली आहे असे दिसते.

बंगालमधून मला केव्हा परतणे शक्य होईल हे मला माहीत नाही.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

--------------

## २६. जयरामदास दौलतराम यांना पत्र

आगगाडीतून,

ऑक्टोबर २८, १९४६

चि. जयरामदास,

मला तुझे पत्र मिळाले. आपण झेंडा सोडू शकत नाही. मिरवणूकीची वा वाद्यांची आवश्यकता नसू शकते, परंतु शांततापूर्वक ध्वजारोहण करणे आवश्यक असते. जास्त तर पाहूनच सांगता येऊ शकते.

मी बंगालला जात आहे. केव्हा परतेन हे मला माहीत नाही.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

--------------

## २७. दुष्काळाशी संघर्ष करणारे हिंदुस्थानी गाव

(या शीर्षकाखालील लेख होरेस अलेक्झॅन्डर यांनी लिहिला होता. तो इथे दिलेला नाही. त्यात लिहिले होते की म्हैसूर संस्थानातील बेलगट गाव पाऊस न आल्यामुळे दुष्काळाशी सामना कर. त्याला अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि इजिप्त यांच्याकडून धान्याच्या स्वरूपात मदत मिळाली होती.)

या आभारप्रदर्शक लेखात मी इतकीच भर घालेन की जे लोक स्वतःची मदत करतात त्यांना ईश्वरही मदत करत असतो. अधिक धान्य स्वतः पिकवण्याकरिता गावांना शिकवले पाहिजे. मग बाहेरून जी मदत येईल तिचे स्वागत करता येईल.

कलकत्ता येथे जाणाऱ्या आगगाडीतून. ऑक्टोबर २९, १९४६

'हरिजन', नोव्हेंबर २४, १९४६

---------------

# २८. प्रार्थना प्रवचन

(प्यारेलाल यांच्या “विकली लेटर” या लेखामधून उद्धृत. ही प्रार्थना साडेपाच वाजता आयोजित करण्यात आली होती परंतु गांधीजी तिच्याकरिता ७ वाजता पोहोचू शकले होते.)

सोदेपूर,

ऑक्टोबर २९, १९४६

**प्रार्थनेनंतरच्या प्रवचनात गांधीजी म्हणाले की मी सोदेपूरला इतक्या लवकर परतेन अशी आशा नव्हती** (यापूर्वी गांधीजी सोदेपूरला डिसेंबर १९४५मध्ये गेले होते). **परंतु ईश्वराने मला तुमच्यामध्ये पाठवले आहे. गाडी पाच तास उशिरा पोहोचली. तीसुद्धा ईश्वराचीच इच्छा आहे. अलीगढ, खुर्जा रोड, कानपूर या स्टेशनवर फार गर्दी होती आणि त्यामुळे गाडीचा खोळंबा झाला हे खरे आहे. परंतु ईश्वराच्या इच्छेशिवाय गवताचे पातेही हालत नाही यावर माझा शब्दशः विश्वास आहे. काही लोक म्हणू शकतात की ईश्वराबद्दल मी जे काही बोलतो ते सर्व त्याचे निमित्त करणे आहे, खरे तर त्याच्या नावामागे लपण्याकरिता मी हे ढोंग करतो. मी इतकेच सांगू शकतो माझ्या अंतःकरणात ढोंगाची कोणतीही भावना नाही. ईश्वराविषयी जे सत्य आहे असे मला वाटते तेच मी सांगितले आहे. मी तेच सांगत असतो जे मला खरोखरच खरे वाटत असते.**

**भविष्यातील योजनेसंबंधी माझ्या डोक्यात काहीही नाही आणि ईश्वर माझ्याकडून जे करवून घेईल ते करण्याकरिता मी कलकत्त्याला आलो आहे. मी इथे काय करणार आहे आणि मी बंगालमध्ये किती दिवस राहणार आहे हे मला काहीही माहीत नाही.** (पुढील वाक्य ‘हिंदू’मधून घेतले आहेत.) **मी इतकेच सांगू शकतो की मी कलकत्त्यात राहण्याकरिता आलेलो नाही. मी कलकत्त्यात १ वा २ दिवस राहीन आणि नंतर नोआखालीला जाईन. नोआखालीला गेल्यानंतर तिथे काय करायचे ते मला ईश्वरच सांगेल.**

‘हरिजन’, नोव्हेंबर १०, १९४६ आणि ‘द हिंदू’ ऑक्टोबर ३१, १४६

----------------

# २९. प्रार्थना प्रवचन

(प्यारेलाल यांचे"साप्ताहिक पत्र" या लेखातून उद्धृत)

सोदेपूर,

ऑक्टोबर ३०, १९४६

**कलकत्यातील कामे आणि माननीय राज्यपाल व मुख्यमंत्री** (सर फ्रेड्रिक बरोज आणि हुसेन शहीद सुऱ्हावर्दी) **यांच्या भेटीच्या कार्यक्रमामुळे गांधीजी दुसऱ्या दिवशीसुद्धा प्रार्थनासभेला उशिरा पोहोचले. त्याबद्दल गांधीजींना माफी मागावी लागली.**

**ते म्हणाले** - जो माणूस आपला सर्व वेळ जनतेच्या सेवेकरिता देतो त्याचे संपूर्ण जीवनच अखंड प्रार्थना असते.

**असे असले तरी प्रार्थनेच्या वेळेचे महत्त्व कमी होऊ देण्याची त्यांची इच्छा नव्हती. ते म्हणाले की वैयक्तिक प्रार्थना आणि सामुदायिक प्रार्थना यांच्यात अंतर आहे. आजच्या सामुदायिक प्रार्थनेला मी न्याय देऊ शकलो नाही आणि वेळ पाळू शकलो नाही याचा मला खेद होतो. धीर धरून इतक्या वेळेपर्यंत तुम्ही माझी वाट पाहिली हा तुमच्या मनाचा मोठेपणा आहे, आणि हे पाहून मला आनंद होतो आणि माझ्यासमोरील काम पूर्ण होईल अशी श्रद्धा आणि आत्मविश्वास मनात निर्माण होतो. परंतु तुम्हाला दिलेल्या वेळेनुसार प्रार्थनेकरिता मी वेळेवर पोहोचू शकलो नाही याबद्दल इतक्या सहजपणे मी स्वतःला माफ करू शकत नाही.**

**व्हाईसरायनी पूर्ण मंत्रिमंडळातर्फे जे आवाहन केले त्याचे अध्यक्ष स्वतः व्हाईसराय आहेत आणि उपाध्यक्ष जवाहरलाल नेहरू आहेत व त्यात कॉंग्रेस आणि मुस्लिम लीगचे प्रतिनिधी सामील आहेत या गोष्टीकडे गांधीजींनी श्रोत्यांचे लक्ष वेधले. ते म्हणाले की त्या आवाहनामध्ये  व्हाईसरायनी स्वतःतर्फे आणि आपल्या सहकाऱ्यांतर्फे दोन्ही प्रमुख समुदायांना भांडण मिटवून सलोखा करण्याची व एक होण्याची विनंती केली आहे. परंतु हे ऐक्य अंतःकरणापासूनचे असले पाहिजे, सैन्याने आणि पोलिसांनी लादलेले नसावे. गांधीजी म्हणाले की मी याचकरिता बंगालमध्ये आलो आहे. मी कोणाचीही बाजू घेऊन राहिलेलो नाही. मी केवळ सत्य आणि न्यायाची बाजू घेऊ शकतो. माझी इच्छा आहे की मुसलमान आणि हिंदूंचे ऐक्य व्हावे म्हणून माझ्याबरोबर तुम्ही सर्वांनीही प्रार्थना करावी. जंगली जनावरांप्रमाणे आपसात लढून आम्ही जर स्वतःला अधःपतीत केले तर जगात आपली फार बदनामी होईल.**

'हरिजन', नोव्हेंबर १०, १९४६

----------------

# ३०. प्रार्थना प्रवचन

(प्यारेलाल यांच्या “विकली लेटर” या लेखातून उद्धृत. पहिला परिच्छेद ‘द बॉम्बे क्रॉनिकल’मधून उद्धृत केला आहे.)

सोदेपूर,

ऑक्टोबर ३१, १९४६

**प्रार्थना सभेत बोलताना गांधीजी म्हणाले की तुम्हाला सांगायला खेद होतो की ठरल्याप्रमाणे मी नोआखालीकरिता उद्या निघणार नाही. प्रधानमंत्र्यांनी (तेव्हा मुख्यमंत्र्याच्या पदाला प्रधानमंत्री हे नामाभिधान होते.) मला सागितले की उद्या आगगाडीची व्यवस्था होऊ शकणार नाही. यामुळे मला शनिवारी वा रविवारी जावे लागेल. यामुळे मध्यंतरीच्या काळात इथेच मला जी काही सेवा करता येईल ती मी करेन.**

**गांधीजी म्हणाले की दोन्ही समुदायांत शांतता निर्माण होऊ शकेल असा आशेचा एक अस्पष्टसा कवडसा मला दिसतो आहे इतकेच आज मी तुम्हाला सांगू शकतो. माझी माननीय राज्यपाल आणि प्रधानमंत्री या दोघांशीही दोनदा भेट झाली.**

**राज्यपालांची भेट ही कमीअधिक प्रमाणात शिष्टाचाराप्रित्यर्थ घेतलेली भेट होती. माझे मुख्य काम प्रधानमंत्र्यांशी होते. ओसाड पडलेल्या रस्त्यांवरून जाताना मला रस्त्याच्या कडेला पडलेले कचऱ्याचे ढीग दिसत होते. कुठेकुठे तर ते ढीग दोन फूट उंच होते. गल्लीबोळात नजर जायची तोपर्यंत जळालेली दुकाने आणि घरांच्या ओळी दिसायच्या. माणसाला पशूहूनही वाईट करणारे हे सामूहिक वेड पाहून मन निराशसे होऊ लागते. परंतु ही परिस्थितीच अशी आहे की जिला निसर्ग फार दिवस टिकू देऊ शकत नाही. मानवी स्वभाव हे सहन करू शकत नाही. अब्राहम लिंकन म्हणाले त्याप्रमाणे “तुम्ही सर्व लोकांना नेहमीकरिता मूर्ख बनवू शकत नाही.” या रक्तपाताच्या आणि पशुत्वाच्या नग्न नृत्याचा लोकांना आताच कंटाळा येऊ लागला आहे असे दिसते. आम्ही आपसातच जंगली जनावरांप्रमाणे भांडत आहो. या लढाईमुळे ना कलकत्त्याचे भले होणार आहे, ना बंगालचे ना हिंदुस्थानचे ना जगाचे.**

**गांधीजी पुढे म्हणाले की भांडणारांमध्ये समेट घडवून आणण्याचे काम तर मी लहानपणापासून करत आलो आहे. मी वकिली व्यवसाय करत असतानाही भांडणाऱ्या दोन्ही पक्षांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करत असे. मग या दोन समुदायांना एकत्र का आणता येऊ शकत नाही? मी तरी या बाबतीत आशावादी आहे.**

**दोन्ही समुदायात सुरू असलेले हे हत्याकांड बंद व्हावे आणि या समुदायांचे अंतःकरणापासून मनोमिलन व्हावे अशी तुम्ही माझ्याबरोबर प्रार्थना करावी इतकीच मदत मला तुमच्याकडून हवी आहे. हिंदुस्थान एक राहावा की त्याची फाळणी व्हावी हे बळाच्या जोरावर ठरवता येऊ शकत नाही. ही गोष्ट तर आपसातील समजुतीनेच होऊ शकते. आपल्याला सोबत राहण्याचा निर्णय घ्यायचा असो की वेगळे होण्याचा आपण तसे सद्भावनेने आणि समजूतदारपणानेच केले पाहिजे.**

**कोणाच्या स्वाभिमानाला धक्का लागेल अशा कोणत्याही गोष्टीची मी बाजू घेणार नाही. यामुळे आपल्याला जर टिकाऊ शांतता हवी असेल तर ती सन्माननीयच असली पाहिजे. सन्मानाला धक्का लावून मिळवलेली शांतता कधीही टिकाऊ असू शकत नाही.**

**मला भेटण्याकरिता जे प्रसिद्ध मुसलमान बंधू आले होते त्यांच्याच शब्दांचा मी इथे पुनरुच्चार करत आहे. ते मित्र म्हणाले होते - "आम्हाला पाकिस्तान हवा असो वा अखंड हिंदुस्थान, आपण आपल्या उद्दिष्टापर्यंत रक्तपात करून वा भांडण करून पोहोचू शकत नाही. मी तर इथपर्यंत म्हणेन की आपल्या उद्दिष्टापर्यंत आपल्याला जर रक्तपाताच्या वा भांडणाच्या मार्गाशिवाय इतर कोणत्याही मार्गाने पोहोचता येऊ शकणार नसेल तर ते उद्दिष्ट पोहोचण्याच्या पात्रतेचेच नाही."**

'हरिजन', नोव्हेंबर १०, १९४६ आणि 'द बॉम्बे क्रॉनिकल', नोव्हेंबर १, १९४६

----------------

## ३१. सुधीर घोष यांना तार

[ऑक्टोबर १९४६]

(संदर्भावरून. गांधीजींनी बंगालला ऑक्टोबरच्या  शेवटच्या आठवड्यात भेट दिली होती व ते कलकत्त्यालाऑक्टोबर २९, १९४६ला पोहोचले होते.)

सुधीर घोष,

नर्गिसबेनने काल पत्र आणले. सुशीला सेवाग्राममध्ये कॉलऱ्याचा रुग्णांची काळजी घेत आहे. आशा आहे की मी बंगालला ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात भेट देईन.

स्नेह,

बापू.

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

----------

# ३२. मुसलमान मित्रांशी चर्चा

(प्यारेलाल यांच्या "विकली लेटर", या नोव्हेंबर १, १९४६च्या लेखातून)

सोदेपूर, कलकत्ता,

[नोव्हेंबर १, १९४६पूर्वी](वरील नोंदी प्रमाणे)

**एका मुसलमान मित्राने गांधीजींकडे येऊन विचारले, "तुम्ही नोआखालीला का जाऊ इच्छिता? तुम्ही मुंबई, अहमदाबाद वा छप्रा इथे का जात नाही? तिथे तर निश्चितच नोआखालीपेक्षाही भयानक दंगली झाल्या आहेत. तुम्ही नोआखालीत गेल्यामुळे सध्याच तिथे जे तणावाचे वातावरण आहे त्यात अजूनच भर पडणार नाही काय?" या सर्व ठिकाणी मुसलमान यातनाग्रस्त आहेत म्हणून तुम्ही तिथे जात नाही आणि नोआखालीत हिंदू यातनाग्रस्त आहेत म्हणून तुम्ही तिथे जात आहा काय?**

**गांधीजींनी उत्तर दिले की मी हिंदू आणि मुसलमान यांच्यात कोणताही भेद करत नाही. नोआखालीत जशा प्रकारच्या घटना घडल्या तशा प्रकारच्या घटना जर त्या ठिकाणी घडल्या असत्या व प्रत्यक्ष तिथे हजर झाल्याशिवाय मी काहीही करू शकणार नाही असे जर मला वाटले असते तर मी तिथे निश्चितच गेलो असतो. अत्याचाराला बळी पडलेल्या भगिनींच्या आक्रोशाने मला इथे येण्याकरित भाग पाडले आहे. नोआखालीतील प्रत्यक्ष परिस्थिती पाहिल्यानंतर तिथे काय सुरू आहे हे मला कळू शकेल असे मला वाटले. माझ्या अहिंसेच्या पद्धतीची आज परीक्षा सुरू आहे. सध्याच्या परिस्थितीत ती कशी काम करते हे मला पाहायचे आहे. तिचा जर काही प्रभाव पडणार नसेल तर मी स्वतःच माझी दिवाळखोरी जाहीर करणे योग्य होईल. बंगालमधील हा दावानल पूर्णपणे विझत नाही तोपर्यंत बंगाल सोडायचा नाही असे मी ठरवले आहे.**

आवश्यकता असेल तर मी इथे वर्षभर वा त्याहूनही जास्त काळ थांबू शकतो. मी इथे मरेन पण अपयश स्वीकारणार नाही. माझ्या हाडामासाच्या देहातील उपस्थितीकडे लोकांनी आशेने पाहावे आणि मी त्यांच्याकरिता काहीही करू शकू नये असे होण्यापेक्षा तर मृत्यूने माझे डोळे झाकलेलेच बरे.

**आवश्यक असेल तर काँग्रेसच्या अधिवेशनालाही न जाण्याची मानसिक तयारी मी केलेली आहे . तसेच सेवाग्राम आणि माझे अगदी अलीकडचे आकर्षण उरुळी कांचन येथील जबाबदाऱ्यांपासूनी मी स्वतःला मानसिक दृष्टीने मुक्त केलेले आहे.**

'हरिजन', नोव्हेंबर १०, १९४६

----------------

# ३३. प्रार्थना प्रवचन

सोदेपूर, कलकत्ता,

शुक्रवार, [नोव्हेंबर १, १९४६]

**शुक्रवारच्या प्रार्थनोत्तर प्रवचनात गांधीजी म्हणाले की संपूर्ण हिंदुस्थानला कठीण समस्येला तोंड द्यावे लागत आहे. आणि बंगालसमोर तर अजून गंभीर समस्या आहे. अशा अवस्थेत धर्म काय आहे असे मला विचारण्यात आले होते. धर्मग्रंथांप्रमाणे शास्त्रांमध्ये ज्याचा आदेश देण्यात आला आहे, ऋषिमुनी ज्याचे पालन करतात, विद्वान लोकांनी त्याचा जो अर्थ लावला असेल व आपल्या अंतःकरणाला जो भावत असेल तो धर्म. चौथ्या अटीनुसार वागण्यापूर्वी पहिल्या तीन अटींची परिपूर्ती होणे आवश्यक असते. उदाहरणार्थ एखाद्या अडाणी वा दुष्ट माणसाची शिकवणूक जरी आमच्या मनाला भावली तरीही त्यानुसार वागण्याचा अधिकार आम्हांला नसतो. कोणाचीही हानी होणार नाही याकडे काटेकोरपणे लक्ष ठेवणे, कोणाशी शत्रुत्व नसणे आणि त्यागभावना या गोष्टी ज्याच्यात असतात तोच धर्माबद्दल काही विधान करू शकते. तोच धर्म असतो.**

**मी माझा धर्म वा कर्तव्य काय आहे ते तुम्हांला सांगितले आहे परंतु तुमचा धर्म वा कर्तव्य काय आहे हे तुम्हांलाच ठरवायचे आहे. गांधीजी म्हणाले की मी जे म्हणतो त्याप्रमाणेच वागा असे मला म्हणायचे नाही तर तुम्हांलाच तुमचा धर्म वा कर्तव्य काय आहे याचा शोध घ्यायचा आहे. माझेच ऐका असे मला तुम्हांला सांगायचे नाही परंतु आज आपण ज्या कठीण परिस्थितीत आहो त्यातून मार्ग कसा काढायचा ते मी तुम्हांला सांगितले आहे. गीता म्हणते की तुम्ही जर ईश्वराला शरण गेला तर तो तुम्हांला मार्ग दाखवील.**

'हरिजन'. नोव्हेंबर १७, १९४६

----------------

# ३४. प्रार्थना प्रवचन

("विकली लेटर" या प्यारेलाल यांच्या लेखातून उद्धृत. यातील पहिला परिच्छेद 'द संडे हिंदुस्तान स्टॅंडर्ड'मधून घेतला आहे.)

सोदेपूर, कलकत्ता,

[नोव्हेंबर २, १९४६]

**महात्मा गांधींनी सूचीत केले की या महानगरात मी काही काम करण्याचा प्रयत्न करत आहे. यामुळे मी लगेच नोआखालीकरिता निघून राहिलेलो नाही .... गांधीजी पुढे म्हणाले की अंतरिम सरकारचे चार मंत्री** (जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, लियाकत अली खान आणि अबदुल रब निश्तर यांचा इथे संदर्भ आहे.) **इथे येत असल्यामुळे शांतता प्रस्थापित करण्याकरिता मदत होऊ शकेल.**

**लोकांना समजावून सांगत गांधीजी म्हणाले की तुम्ही सर्वांनी स्वातंत्र्य मिळवण्याची जी प्रतिज्ञा घेतली आहे तिच्याबरोबर बदल्याची भावना तसेच रक्षणाकरिता व्हाईसराय, वा राज्यपाल वा सैन्य वा पोलीस यांच्याकडे धावणे या गोष्टी सोबत चालू शकत नाहीत. व्हाईसरायची सर्व शक्ती मंत्रिमंडळात आहे आणि राज्यपालांची बंगालच्या मंत्रिमंडळात आहे. त्यांना जर टिकाऊ शांतता हवी असेल तर ती जनतेच्या अंतःकरणातून उत्स्फूर्तपणे निघाली पाहिजे. मी तुम्हांला ओरडून ओरडून जाहीरपणे सांगतो आहे की तुमच्या कणखर हृदयाशिवाय दुसरा कोणीही तुम्हाला वाचवू शकत नाही. शूर माणसाची अब्रू कोणीही कधीही घेऊ शकत नाही. बदल्याचे एक दुष्टचक्र असते. तुम्हाला जर बदला हवा असेल तर तुम्हाला स्वातंत्र्य मिळू शकत नाही. ते म्हणाले -**

कल्पना करा की कोणी मला मारले. त्याचा बदला म्हणून मी दुसऱ्या कोणाला मारले तर मला काहीही मिळणार नाही. आणि तुम्ही जर यावर थोडा अधिक विचार कराल तर गांधीला स्वतः गांधीशिवाय अजून कोण मारू शकतो? आत्मा कोणीही नष्ट करू शकत नाही. यामुळे आपल्या अंतःकरणातून बदल्याचे सर्व विचार काढून टाकू या. आपल्याला जर हे नीटपणे कळले तर ते स्वांतत्र्याकडे टाकलेले अजून एक पाऊल ठरेल.

'हरिजन', नोव्हेंबर, १७, १९४६ आणि द 'सनडे हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', नोव्हेंबर ३, १९४६

-------------------

# ३५. जवाहरलाल नेहरू यांना तार

[नोव्हेंबर ३, १९४६]

(पाहा यापुढील विषय आणि “प्रार्थना प्रवचन”, नोव्हेंबर ४, १९४६)

हिंदूंनी मुसलमान प्रवाशांची कत्तल केल्याची “मॉर्निंग न्यूज”मध्ये बातमी आहे. (ऑक्टोबर २५च्या संपानंतर बिहारमध्ये सांप्रदायिक दंगली उसळल्या होत्या, आणि ‘मॉर्निंग न्यूज’ या मुस्लिम लीगच्या वृत्तपत्राने लाखो लोक मारले गेल्याची बातमी दिली होती.) जमावाच्या भीतीने मुसलमान पळत आहेत. आणि मुख्यमंत्री (श्रीकृष्ण सिन्हा) हे सर्व होऊ देत आहेत. सविस्तर माहिती तारेने कळव. (जवाहरलाल नेहरू यांच्या उत्तराकरिता पाहा “प्रार्थना प्रवचन”, नोव्हेंबर ४, १९४६)

‘द बॉम्बे क्रॉनिकल’, नोव्हेंबर ५, १९४६

------------------

# ३६. प्रार्थना प्रवचन

(प्यारेलाल यांच्या “विकली लेटर” या लेखातून उद्धृत. पहिला परिच्छेद ‘हिंदुस्तान स्टन्डर्ड’मधून घेतला आहे.)

सोदेपूर, कलकत्ता,

नोव्हेंबर ३, १९४६

**नोआखालीला जाण्याचा कार्यक्रम बकरी ईद संपेपर्यंत पुढे ढकलावा असे बंगालच्या मुख्यमंत्र्यांनी मला म्हटलेले असल्यामुळे मी तो दौरा लांबणीवर टाकत आहे. मी कलकत्त्यात बकरी ईद साजरी करावी अशी त्यांची इच्छा आहे. त्यांना वाटते की माझ्या उपस्थितीमुळे शांतता राखण्याकरिता कदाचित मदत होऊ शकेल. मी बंगालमध्ये मुसलमान, हिंदू आणि इतर सर्वांना मदत करण्याकरिता आलो आहे.**

**माझ्या लहानपणापासून मी वाईटपणाची घृणा करणे शिकलो आहे, वाईटपणाचे कृत्य करणाराची कधीही नाही. यामुळे मुसलमानांनी जरी काही वाईट केले असेल तरी ते माझे मित्र आहेत. परंतु असे असूनही तुम्ही चूक केली आहे हे त्यांना सांगणे माझे कर्तव्य आहे. हा नियम मी आयुष्यभर जवळच्या प्रिय मित्रांच्या बाबतीतही पाळत आलो आहे. खऱ्या मैत्रीची ही कसोटी आहे. कालच मी तुम्हांला सांगितले की बदला हा शांततेचा मार्ग नाही, ही माणूसकी नाही. क्षमा करणे हा सर्वात महान गुण असल्याचे हिंदू धर्मग्रंथांनी सांगितले आहे. क्षमा शूर लोकांचे भूषण असते. (क्षमा शूरस्य भूषणम्) परवा एक विद्वान मुसलमान मित्र मला भेटायला आले होते. कुराणची शिकवण हीच असल्याचे त्यांनी मला सांगितले. ते**

म्हणाले की एखादा माणूस जर एखाद्या निष्पाप माणसाला मारील तर त्याला संपूर्ण मानवजातीला मारण्याचे पाप लागेल. इस्लामने खून, जाळपोळ, बळजबरीचे धर्मांतर, अपहरण आणि अशाच इतर गोष्टींना कधीही मान्यता दिलेली नाही, उलट त्याने त्याची निंदाच केली आहे.

गांधीजी पुढे म्हणाले की तुम्हांला थापड मारणाराला क्षमा करण्याइतके तुमचे मन मोठे नसेल तर तुम्ही थापड मारणाराच्या गालावर एकदा परत थापड मारू शकता. त्याला ही गोष्ट कळू शकेल. परंतु खोडसाळपणा करणारा पळाला आणि मार खाणारी व्यक्ती बदला घेण्याकरिता त्याच्या नातलगांना वा त्याच्या धर्मातील इतर लोकांना थापड मारत असेल तर ती गोष्ट मानवी प्रतिष्ठेला निश्चितच कमीपणा आणणारी असेल.

गांधीजी पुढे म्हणाले की कोणी जर माझ्या मुलीचे अपहरण केले असेल तर मी अपहरण करणाराच्या मुलीचे वा त्याच्या मित्राच्या मुलीचे अपहरण केले पाहिजे काय? मी तर याला घृणास्पद गोष्ट समजतो. मुस्लिम मित्रांनी नोआखालीमधील अशा घटनांचा निषेध केला आहे. परंतु बिहारबद्दल मला जे सांगण्यात आले ते जर खरे असेल तर मी त्याबद्दल काय सांगू? बिहारमध्ये घडलेल्या घटनांबद्दल मला अतिशय दुःख होते. मला बिहारी लोक चांगले माहीत आहेत. रक्ताकरिता रक्त ही घोषणा रानटीपणाची आहे. नोआखालीचा बदला ते बिहारमध्ये घेऊ शकत नाहीत. गांधीजी म्हणाले की बिहारमधून घाबरून पळणाऱ्या मुसलमानांना बिहारी हिंदूंनी ठार मारले. हे ऐकून मला धक्का बसला. मी आशा करतो की हे वृत्त खरे नाही. असे म्हणतात की महाभारतात बदला घेण्याचे समर्थन आहे. मला हा अर्थ मान्य नाही. तलवारीने मिळालेला विजय खरा विजय नसतो हा धडा महाभारतातून आपल्याला मिळतो. पांडवांचा विजय पोकळ होता हेच या या महान ग्रंथातून सांगितले आहे.

तुमचे मुख्यमंत्री शहीद साहेब यांच्याशी माझी चर्चा झाली. वर्षांपूर्वी फरीदपूर इथे माझी त्यांच्याशी भेट झाली होती. त्या वेळी शहीद साहेबांना माझा मुलगा म्हणवून घेण्यात अभिमान वाटत होता. मला माहीत आहे की तुमच्या मनात मुख्यमंत्र्यांबद्दल किती तरी तक्रारी आहेत. परंतु शहीद साहेबांना शांतता हवी आहे असे त्यांनी मला आश्वासन देत सांगितले आहे. जोपर्यंत हे आश्वासन खोटे असल्याचे सिद्ध होत नाही तोपर्यंत मी त्यांच्यावर विश्वास ठेवीन. हे आश्वासन देऊन तुमच्या मुख्यमंत्र्यांनी स्वतःला कसोटीवर चढवले आहे. संपूर्ण जगाला मित्र मानणे आणि संपूर्ण मानवजातीला एकाच कुटुंबाचे सदस्य मानणे हाच सुवर्णमार्ग आहे. जो माणूस आपल्या आणि इतरांच्या कुटुंबात भेदभाव करतो तो स्वतःच्या कुटुंबाला चुकीचे शिक्षण देतो आणि शत्रुत्वाचा आणि अधर्माचा मार्ग उघडतो.

'हरिजन', नोव्हेंबर १७, १९४६ आणि 'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', नोव्हेंबर ४, १९४६

----------------

# ३७. अमृत कौर यांना पत्र

नोव्हेंबर ४, १९४६

चि. अमृत,

नुकताच तू पाठवलेले पुडके मिळाले. आज मौन दिवस असूनही मी कामात पूर्णपणे बुडालेलो आहे. बिहारने मला थोडेसे हादरवले आहे. विशेषतः प्रकृती चांगली व्हावी म्हणून गत सहा दिवसांपासून मी अल्पाहारावर (दूध आणि धान्यविरहित) आहे (मुद्रित हिंदी आवृत्तीत इथे दोन दिवस आहे.). आता बिहारमधील परिस्थितीत क्रांतिकारक बदल झाला नाही तर तो मला संपूर्ण उपवास करायला लावील. त्याला कालमर्यादा नसेल. घाबरू नकोस, उलट या अग्निपरीक्षेतून जाण्याचे व माझ्या धर्माप्रमाणे वागण्याचे सामर्थ्य माझ्यात आहे हे पाहून खुश हो. तुझ्या पॅरीसच्या कार्यक्रमात खोळंबा निर्माण होऊ देऊ नको. तुझा पॅरीसचा कार्यक्रम होणार नसेल व तुझ्या प्रकृतीला झेपण्यासारखे असेल तर इथे येण्याकरिता तू स्वतंत्र आहेस.

तुम्हा सर्वांना प्रेम

बापू

मुळावरून. सी. डब्ल्यू. ३७०१. सौजन्य अमृत कौर. शिवाय जी. एन. ६५१०

--------------

# ३८. किशोरलाल घ. मश्रूवाला यांना पत्र

(याचे मूळ गुजराती उपलब्ध नाही.)

कलकत्ता,

नोव्हेंबर ४, १९४६

प्रिय किशोरलाल मश्रूवाला,

आश्रमामधील तू सर्वात वयस्कर व्यक्ती असल्यामुळे मी तुला हे लिहीत आहे. हे सर्वांना वाचून दाखव.

बिहारने मला हादरवले आहे. सध्या मी प्रामुख्याने शरीरप्रकृतीकरिता अर्धउपोषणावर आहे. नंतर हळूहळू हे पूर्ण उपवासात परिवर्तित होऊ शकते. हळूहळू कारण अजूनही काही कामे माझ्या हातात आहेत. मला नोआखालीला जायचे आहे. पुढे काय होते ते तुम्हा लोकांना वर्तमानपत्रातून कळू शकते.

कोणीही माझ्याकडे धावपळ करत येऊ नये, माझ्या उपोषणाबद्दल सहानुभूती दाखवण्याकरिता कोणीही उपवास करू नये, प्रत्येकाने आपापल्या ठिकाणी पूर्णपणे कामात व्यग्र राहिले पाहिजे. प्रत्येकाने आपल्यामधील दोष दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि कठोर तपश्चर्या करता येण्याकरिता पवित्र व्हायला पाहिजे. माझी काळजी कोणीही करू नये. या प्रायश्चित्तातून मी यशस्वीपणे बाहेर पडेन. मी भित्रा होतो हे सिद्ध होऊ नये म्हणून प्रत्येकाने प्रार्थना करावी.

भंसाळीने कोणताही धोका पत्करू नये. माझा उपवास सुरू असेल तेव्हा इतर कोणीही माझ्यामागे उपवास करू नये. मी गेल्यानंतर काहीही होऊ शकते. मी मेल्याने लोकांच्या अंतःकरणाला पाझर फुटेल की नाही याबद्दल मला खात्री नाही. जर तसे काही घडले नाही तर निदान मी मेल्यामुळे या भूमातेवरील तितके ओझे तरी कमी होईल. माझ्या प्रगतीची क्षमता संपली असल्याचे माझ्या मृत्यूमुळे सिद्ध होईल.

आशादेवी (आशादेवी आर्यनायकम), आर्यनायकम (ई. डब्ल्यू. आर्यनायकम) आणि देव (शंकरराव देव) यांनी नयी तालीमच्या तत्त्वानुसार जगावे. शांताने तिच्या कामाला गौरवास्पद स्थान मिळवून द्यावे. जाजूजी आणि कृष्णदास गांधी यांच्याबद्दल मी काय सांगू? कुमारप्पावर (जे. सी. कुमारप्पा) कामाचे फार मोठे ओझे आहे. विनोबांना मी वेगळे लिहीत नाही. काकांनासुद्धा मी वेगळे लिहू शकत नाही. कृष्णचंद्र चांगला असेल.

पुष्पाला (पाहा “पुष्पा देसाई यांना पत्र”, ऑक्टोबर २९, १९४६) मी जे लिहिले होते ते बरोबर असल्याबद्दल अजूनच माझी खात्री पटली आहे. चिमणलालवरील (चिमणलाल न. शाह) जबाबदारीचे ओझे त्याला फार जाणवू नये. बलवंतसिंहचा राग नियंत्रणात येवो.

माझ्याकडून अनेक नावे सुटली आहेत. त्याचे कारण मी त्यांना विसरलो आहे असे नसून मला अजून लिहिण्याकरिता वेळ नाही हे आहे.

आशीर्वाद,

बापू

प्रतीवरून. जी. एन. १०१८५

-------------

# ३९. हसन शहीद सुऱ्हावर्दी यांना पत्र

सोदेपूर,

नोव्हेंबर ४, १९४६

भाई शहीद,

माझ्याकरिता रेल्वे आणि आगबोटीची जी व्यवस्था केली आहे ती मोठ्या लोकांकरिता आहे. मला या सगळ्या गोष्टी नको आहेत हे सर्व मी सतीश बाबूंना आधीच सांगितले होते. अगदी साध्या व्यवस्थेने माझे समाधान होईल. माझे सर्व सहकारी माझ्याबरोबर बसतील. आमच्याकरिता तिसरा वर्ग चांगला आहे. आगबोटीत एकांत मिळाला तर चांगले होईल. आमच्याबरोबर आमच्या खाण्याचे साहित्य असेल व ते पुरेसे असेल. मला स्वतःकरिता तर खास गाडीही नको. रेल्वेच्या लोकांना तसे हवे असेल तर माझी हरकत नाही. वार्ताहरांचीही आवश्यकता नाही. तो फार मोठा जथ्था असण्याची आवश्यकता काय?

तुमचा,

मो. क. गांधी

ता. क. - भाई शहीद हे राष्ट्रवाद्याकडून आहे काय? त्यात काही सत्य आहे काय? आणि का? बिहारच्या प्रकरणामुळे मी अस्वस्थ झालो आहे. ईश्वर आपल्याला वाचवो.

तुमचा,

मो. क. गांधी

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------------

# ४०. प्रार्थना प्रवचन

(हा गांधीजींचा मौनवार असल्यामुळे गांधीजींचे भाषण सतीश चंद्र दास गुप्ता यांनी वाचून दाखवले.)

सोदेपूर,

कलकत्ता, नोव्हेंबर ४, १९४६

काल तुमच्याशी बोलत असताना बिहारमधून आलेल्या बातम्यासंबंधी मी बोललो होतो. या बातमीने मला अतिशय दुःख झाले. तुमच्या मुख्यमंत्र्यांद्वारे मी जवाहरलाल नेहरू यांना पुढील तार पाठवली (पाहा, "प्रार्थना प्रवचन" नोव्हेंबर ३, १९४६). जवाहरलाल नेहरू यांनी त्या तारेचे पुढीलप्रमाणे उत्तर पाठवले :

**मॉर्निंग न्यूज'मधील वृत्तामध्ये भरपूर अतिशयोक्ती आहे आणि ते अस्पष्टसुद्धा आहे. येथील सरकार सर्व काही करत आहे परंतु अनेक ठिकाणी परिस्थिती तणावपूर्ण आणि गंभीर आहे. मी निश्तरबरोबर इथे थांबलेलो आहे. वल्लभभाई आणि लियाकत अली दिल्लीला जात आहेत.**

या उत्तरावरून स्पष्ट आहे की बातमीमध्ये अतिशयोक्ती असली तरी परिस्थितीने वाईट वळण घेतले आहे व ती गंभीर आहे. बिहार प्रांताशी माझे जे संबंध आहेत ते पाहता ही गोष्ट असह्य आहे. तसेच ही साथ इतर प्रांतात पोहोचू नये असे मला वाटते.

अशा परिस्थितीत माझे कर्तव्य काय याचा मी विचार करत आहे. काँग्रेस जनतेची आहे तर मुस्लिम लीग आपल्या मुसलमान बंधुभगिनींची आहे. काँग्रेस जिथे सत्तेत आहे तिथे जर काँग्रेसला मुसलमानांचे रक्षण करण्यात अपयश येत असेल तर मग काँग्रेसच्या मुख्यमंत्र्याचा उपयोग काय? याचप्रमाणे लीगच्या प्रांतात लीगचे मुख्यमं्त्री जर हिंदूंना संरक्षण देऊ शकत नसतील तर मग तिथे लीगचा मुख्यमंत्री असण्याची आवश्यकताच काय? यापैकी कोणालाही मुसलमानांच्या वा हिंदूंच्या रक्षणाकरिता त्यांच्या त्यांच्या प्रांतात सैन्याची मदत घ्यावी लागत असेल तर मग त्याचा अर्थ जेव्हा आणीबाणीची वेळ येते तेव्हा या दोघांपैकी एकाचेही सर्वसामान्य जनतेवर कोणतेही नियंत्रण नाही असे म्हणावे लागेल. जर असे असेल तर ब्रिटिशांनी हिंदुस्थानवरील आपली सत्ता कायम ठेवावी म्हणून आपण दोघेही त्यांना आमंत्रण देतो असा याचा अर्थ होतो.

ही अशी गोष्ट आहे की जिच्यावर दोघांनीही गंभीरपणे विचार केला पाहिजे. पंडितजी आणि निश्तर साहेब बिहारमध्ये काय करतात हे पाहण्याकरिता आपण वाट पाहू या. बिहारमधील हिंदू आपल्या वेडातून बाहेर पडतात की नाही हेही आपण पाहू या. उद्या बकरी ईद आहे. आपण एकमेकांशी भांडण्याचा हा प्रसंग

नाही. उद्या शहीद साहेबही काय करतात हे आपण पाहू या. उद्यापासून हिंदू, मुसलमान आणि इतर सर्व संप्रदायाचे लोक जर मित्राप्रमाणे राहायला सुरुवात करतील आणि सैन्याला वा पोलिसांना आपल्या शस्त्रांचा उपयोग करण्याची मुळीच आवश्यकता पडली नाही तर किती चांगले होईल? (पाहा "बिहारला", नोव्हेंबर ६, १९४६)

आपण नेहमी गुंडांना दोष देतो. परंतु त्यांच्या निर्मितीकरिता आणि त्यांना मिळणाऱ्या प्रोत्साहनाकरिता आपण जबाबदार असतो. यामुळे जे काही वाईट घडते ते गुंडांचे काम आहे असे आपण म्हणू शकत नाही.

'द बॉम्बे क्रॉनिकल', नोव्हेंबर ५, १९४६

----------------

# ४१. अमृत कौर यांना तार

कलकत्ता,

नोव्हेंबर ५, १९४६

राजकुमारी अमृत कौर,

मनोरव्हिला,

समरहिल, सिमला.

कफ त्रास देतो आहे बाकी चांगला आहे. तू चांगली आहेस याचा आनंद होतो. शब्दावली मिळाली. सरळ “हरिजन”कडे पाठव. उद्या नोआखालीला जात आहे.

बापू

मूळ इंग्रजीवरून. सी. डब्ल्यू. ४१८६. सौजन्य - अमृत कौर. शिवाय जी. एन. ७८२२

--------------

# ४२. लीलावती आसर यांना पत्र

कलकत्ता,

नोव्हेंबर ५, १९४६

चि. लीली,

मला कदाचित उपवास करावा लागेल. तसे झाले तर घाबरू नकोस, अभ्यासावर लक्ष केंद्रित कर आणि तुझे स्वतःचे जरी नाही तरी माझे नाव काढ. ईश्वरावर विश्वास ठेव. धावपळ करत इथे येऊन तू कोणतीही मदत करू शकणार नाही. इथे मला आवश्यकतेपेक्षाही जास्त मदत मिळत आहे. प्रत्येकाने आपापल्या ठिकाणी राहून आपापले कर्तव्य पार पाडले तर तीच अतिरिक्त मदत होईल. न बोलावता इथे कोणी आला तर त्याचा अडथळाच होईल. यामुळे मुळीच काळजी करू नकोस. तुझा अभ्यास पूर्ण कर आणि नंतर माझ्या कामात सहभागी हो.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ९६०४. शिवाय सी. डब्ल्यू. ६५७६. सौजन्य - लीलावती आसर

---------------

# ४३. मणिलाल बी. देसाई यांना पत्र

कलकत्ता,

नोव्हेंबर ५, १९४६

चि. मणिलाल,

सध्या तरी उरुळीला मी येण्याबद्दलची आशा तुम्ही सर्वांनी सोडून दिली पाहिजे. मी बंगाल आणि बिहार सोडू शकत नाही. या दंगली थांबल्या नाही तर मला उपवास करावा लागेल असे वाटते. तुला वर्तमानपत्रांमधून सर्व काही कळेल. मी स्वतः कदाचित लिहू शकणार नाही परंतु मी इतरांकडून लिहवून घेईन. कोणत्याही प्रकारची काळजी न करता प्रत्येकाने आपापल्या कामात व्यग्र राहिले पाहिजे. माझे काहीही झाले तरी उरुळीमधील काम सोडू नकोस. डॉ. भागवत, धीरू, बालकृष्ण (बालकृष्ण भावे, विनोबा भावे यांचे भाऊ) आणि तू अर्थातच तिथे आहा. परमानंद जर तिथे राहण्याचा निर्णय घेत असेल तर तो आणि त्याची भावी पत्नी भरपूर होतील. हे पत्र तुम्हा सर्वांकरिता आहे. पैशाबद्दल प्रश्न उभा राहू नये.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७३८. सौजन्य - मणिलाल बी. देसाई

---------------

# ४४. दिनशा का. मेहता यांना पत्र

कलकत्ता,

नोव्हेंबर ५, १९४६

चि. दिनशा,

माझ्या नियंत्रित आहाराचा आज सातवा दिवस आहे. मी चांगला आहे. हा आहार सुरू करण्याचे मुख्य कारण कफ आणि पुरळ वगैरे होते. आता ते सुरू राहील आणि कदाचित मी उपवासही करीन. बिहारमध्ये इतक्यातच झालेली कत्तल हे याचे कारण आहे. जे काही घडायचे असेल ते घडेल. माझ्याकडे धावपळ करत येण्याची आवश्यकता नाही. तुझी आई तिथे आहे, तिची सेवा कर. तुझे आरोग्यकेंद्र सुस्थिर पायावर उभे कर. तुला मला काही विचारायचे असेल तर मला लिही.

गुलबाई आणि मुले चांगली असतील अशी आशा आहे.

आशीर्वाद,

बापू

डॉ. दिनशा मेहता,

पुणे.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-------------------

# ४५. जवाहरलाल नेहरू यांना पत्र

कलकत्ता,

नोव्हेंबर ५, १९४६

चि. जवाहरलाल,

बिहारच्या घटनांनी मी अस्वस्थ झालो आहे. मला माझे कर्तव्य स्पष्ट दिसते. बिहारशी माझे संबंध अतिशय जवळचे आहेत. मी ते विसरू शकत नाही. मी जे ऐकतो त्यातील अर्धे जरी खरे असेल तरी बिहार माणूसकी विसरला असा त्याचा अर्थ होईल. तिथे जे काही घडले त्याकरिता गुंड कारणीभूत आहेत असे म्हणणे हे मुळीच बरोबर नाही. उपोषण करण्याचे जरी मी टाळत असलो तरी मला तसे करता येणे शक्य होणार नाही. दूध आणि धान्य सोडण्याचा माझा हा सातवा दिवस आहे. त्याकरिता कफ आणि पुरळ वगैरे जबाबदार होते. शिवाय शरीराने मी थकलेलो होतो. आणि मग बिहारमुळे प्रकरण अजूनच गंभीर झाले. आणि मग आतल्या आवाजाची हाक ऐकू आली : ‘या कत्तलीचा तू का साक्षीदार असायला पाहिजे? तुझ्या शब्दांकडे, जे सूर्यप्रकाशाप्रमाणे स्पष्ट आहेत, जर कोणी लक्ष देणार नसेल तर तुझे काम संपलेले आहे. मग तू मरत का नाहीस?” या कारणमिमांसेमुळे मला उपवासाचा निर्णय घेणे भाग पडले. बिहार आणि इतर प्रांतांमधील ही कत्तल थांबणार नसेल तर उपवास करून मला माझे जीवन संपवणे भाग आहे असे वक्तव्य काढण्याची माझी इच्छा आहे.

मोहम्मद युनूस यांनी शमसुद्दिन साहेबांना (शमसुद्दिन अहमद, वाणिज्य, श्रम आणि उद्योग या खात्यांचे बंगालमधील मुस्लिम लीग सरकारमधील मंत्री.) जे पत्र लिहिले ते बलदेव सिंगजवळ (अंतरिम सरकारमधील संरक्षण मंत्री) आहे. ते पाहा. ते जे म्हणतात ते बरोबर आहे काय? जे काही घडले त्याचा पूर्ण अहवाल देणे आपले कर्तव्य आहे.

माझे अर्धउपोषण सुरू राहील. उपवास सुरू करण्यात उशीर होऊ शकतो. दिल्लीत तू मला उपवासासंबंधी विचारले होते. त्या वेळी मी म्हणालो होतो की मला काही कल्पना नाही. आता परिस्थिती तीच नाही. तरीही तुला जे काही म्हणायचे असेल ते तू म्हणू शकतोस. मला जर तुझे म्हणणे पटले तर उपवासाची कल्पना मी सोडून देईन. माझा स्वभाव पाहून माझी भूमिका तू समजून घेऊ शकशील अशी आशा आहे. काहीही असले तरी लोकांनी आपले काम करत राहावे अशी माझी इच्छा आहे. माझ्या मृत्यूचा विचार करत वेळ वाया घालवू नका. मला ईश्वराच्या हातात सोडा आणि काळजी करणे बंद करा. हे पत्र तू बिहारच्या

मंत्रिमंडळाला दाखवू शकतो. ब्रिजकिशोर प्रसाद (काँग्रेसचे पुढारी. जयप्रकाश नारायण यांचे सासरे.) यांचाच हा बिहार आहे काय?

आशीर्वाद,

बापू

हिंदीवरून. 'बापूनो पत्रो -२ : सरदार वल्लभभाईने', पृष्ठ ३२६-२७

-----------------

# ४६. वल्लभभाई पटेल यांना पत्र

सोदेपूर,

नोव्हेंबर ५, १९४६

भाई वल्लभभाई,

जवाहरलालला लिहिलेल्या पत्राची प्रत सोबत जोडत आहे (पाहा मागील विषय). कृपाकरून ती पाहा. मला जास्त काही सांगायचे नाही. तुम्हांला जर काही सांगायचे असेल तर मला कळवा. मी ऐकायला तयार आहे. तुम्ही पाहिलेल्या संपासारखाही हा उपवास नाही आणि तो फार वेगळाही नाही. मी काही कमी यातनांमधून गेलो नाही.

राजाजी, देवदास आणि इतरांनी हे पत्र वाचावे (सुशीला नाय्यर यांनी तळटीपेत लिहिले आहे की अबुल कलाम आझाद यांनासुद्धा हे पत्र दाखवावे अशी गांधीजींची इच्छा आहे.) धावपळ करत माझ्याकडे कोणीही येऊ नये.

मला मदत करण्याकरिता किती तरी लोक आहेत. हिंदुस्थानात संपूर्ण शांतता निर्माण होण्यावर माझे जगणे अवलंबून आहे. ते साध्य करण्याकरिता तुम्ही निश्चितच सर्व काही कराल. माझ्या मृत्यूला फार महत्त्व न देता मी जर काही चूक केली असेल तर माझे मरणे उचितच आहे असे समजा. मी चांगला आहे.

आशीर्वाद,

बापू

हिंदीवरून. 'बापूनो पत्रो -२ : सरदार वल्लभभाईने', पृष्ठ ३२५

-----------------

# ४७ . प्रार्थना प्रवचन

(प्यारेलाल यांच्या “विकली लेटर या लेखातून”)

सोदेपूर, कलकत्ता,

नोव्हेंबर ५, १९४६

गांधीजी म्हणाले, हिंदू म्हणतील की मुसलमानांनी गोधळ घालायला सुरुवात केली नाही काय? परंतु मला वाटते की याचे उत्तर देण्याच्या भानगडीत तुम्ही पडू नये. तुम्ही तुमचे कर्तव्य काय याचाच केवळ विचार करा आणि काहीही झाले तरी आम्ही झगडणार नाही असे म्हणा. मी तुम्हांला सांगतो की आज दिवसभर जे मुसलमानबंधू माझ्याजवळ होते ते आम्हांला शांतता हवी आहे असे मला खात्रीपूर्वक सांगत होते. ते सर्व जबाबदार लोक आहेत. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की पाकिस्तान झगडून मिळू शकत नाही. तुम्ही जर आपसात भांडत राहाल तर स्वातंत्र्य हवेत विरघळून जाईल व त्यामुळे हिंदुस्थानात तिसरी शक्ती, मग ती ब्रिटिशांची असो की अजून कोणती असो, घट्टपणे आपले पाय रोवेल. हिंदुस्थान विशाल देश आहे आणि तो खनिज पदार्थांनी, धातूंनी आणि मसाल्याच्या पदार्थांनी भरलेला आहे. जगात असे काहीही नाही की जे हिंदुस्थानात निर्माण होत नाही. तुम्ही जर आपसात भांडत राहिला तर जगातील मोठ्या राष्ट्रांना हिंदुस्थानला हिंदुस्थानींपासून वाचवण्याचा मोह होईल व त्याचबरोबर त्यांना हिंदुस्थानची साधनसामुग्रीही हिरावून घेण्याची इच्छा होईल.

तुम्हा लोकांना स्वातंत्र्य हवे आहे. ज्या काँग्रेसने हिंदुस्थानकरिता इतके काही केले आहे त्या काँग्रेसकरिता तुम्ही सर्व काही करायला तयार आहा. कॉग्रेसने गेल्या साठ वर्षात जे काही केले त्या सर्वांवर पाणी फिरवण्याची तुमची इच्छा आहे काय? अहिंसेच्या मार्गानुसार आचरण करण्याचे तुमच्यात सामर्थ्य नसेल तर तुम्ही ठोशाला ठोसा मारू शकता. परंतु हिंसेनुसार आचरण करण्याकरितासुद्धा नैतिक नियम आहेत. असे केले नाही तर तुम्ही पेटवलेली आग तुम्हांलाच भस्मसात करून टाकील. तुमचा सगळ्यांचा नाश झाला तरी मी फिकीर करणार नाही, परंतु हिंदुस्थानचे स्वातंत्र्य नष्ट होताना मी पाहू शकत नाही.

बिहारमध्ये ज्या काही घटना घडल्याचे वृत्त आहे ते जर खरे असेल तर ती भयानक गोष्ट आहे. आम्ही अशा प्रकारचा रानटीपणा सहन करणार नाही असे पंडित जवाहरलाल नेहरूंनी अपराधी पक्षांना सांगितले आहे. हे प्रकार थांबण्याकरिता आवश्यकता पडली तर आकाशातून बॉम्ब टाकण्याचीसुद्धा त्यांची तयारी आहे.

परंतु तो ब्रिटिशांचा मार्ग होता. काँग्रेस ही जनतेची संघटना आहे. ज्या लोकांचे काँग्रेस प्रतिनिधित्व करते त्याच लोकांच्या विनाशाकरिता काँग्रेसने विदेशी सत्तेच्या मार्गाचे अनुसरण केले पाहिजे काय? सैन्याच्या मदतीने जर दंगली दाबाव्या लागत असतील तर हिंदुस्थानचे स्वातंत्र्यही दाबले जाईल. परंतु काँग्रेसचे जर जनतेवर नियंत्रण राहिले नसेल तर पंडित जवाहरलाल नेहरू तरी काय करतील? चांगला मार्ग तर हाच आहे की लोक जर शिस्त आणि विवेकानुसार वागत नसतील तर काँग्रेसने आपल्या हातातील सत्तेची सूत्रे सोडून देणे हाच योग्य मार्ग राहील.

ज्या माणसाने आपल्यावर अत्याचार केले त्याचा बदला घेण्याकरिता त्याच्या धर्मातील लोकांचा वा त्याच्या नातलगांचा बदला घेणे हे भ्याडपणाचे कृत्य होईल. तुम्ही जर असे काही कराल तर तुम्ही स्वातंत्र्य विसरून जायला पाहिजे.

'हरिजन', नोव्हेंबर १७, १९४६

---------------

# ४८. बिहारला

सोदेपूर,

नोव्हेंबर ६, १९४६

माझ्या स्वप्नातील बिहारने माझा स्वप्नभंग केला आहे. जे अहवाल पूर्वग्रहदुषित वा अतिशयोक्तीने भरलेले आहेत त्यांच्यावर विसंबून मी हे बोलत नाही आहे. केंद्रातील मुख्यमंत्री आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे बिहारमध्ये जे सतत दौरे सुरू आहेत ते बिहारच्या दुष्कृत्यांची आणि दुःखद परिस्थितीची माहिती जाहीर करतात. मुस्लिम लीगच्या बंगालमध्ये याहून परिस्थिती जास्त जरी नाही तरी कमी वाईट नाही असे यावर उत्तर देणे सोपे आहे. एका पक्षाने वाईट वर्तन केले असे सांगून विरुद्ध पक्ष आपल्या दुष्कृत्याचे समर्थन करू शकत नाही, आणि ज्या पक्षाला आपल्या दीर्घकालीन विशाल इतिहासाचा अभिमान वाटतो तो तर असे मुळीच करू शकत नाही. मी मान्य करतो की मी कलकत्त्यात एक आठवड्यापासून थोडे अधिकच दिवस आहे आणि त्यामुळे बंगालच्या दुःखद परिस्थितीचे गांभीर्य मला अजून पुरेसे कळू शकलेले नाही. बिहार जरी मला बोलावत असला तरी नोआखालीच्या कार्यक्रमात मी व्यत्यय आणू शकत नाही. आणि मुस्लिम लीगच्या ज्या सांप्रदायिकतेवर काँग्रेस टीका करते त्या सांप्रदायिकतेवर प्रतिसांप्रदायिकता हे उत्तर असू शकते काय? बिहारमधील १४ टक्के मुसलमानांना चिरडून टाकणे हे राष्ट्रीयत्व असू शकते काय?

बिहारमधील काही हजार लोकांच्या दुष्कृत्यांकरिता संपूर्ण बिहारला दोष देणे योग्य राहील काय असे मला विचारण्याची आवश्यकता नाही. बिहारला एका ब्रिजकिशोर प्रसादांचे वा एका राजेद्र प्रसादांचे आभूषण वाटत नाही काय? बिहारमधील दुष्कृत्ये सुरू राहिली तर हिंदुस्थानातील सर्व हिंदूंची जगात बदनामी होईल. असेच होत असते आणि असे होणे चूकही नाही. काँग्रेसमध्ये काही शीख, मुसलमान, ख्रिश्चन वगैरे असले आणि काँग्रेस तसे अभिमानाने सांगत असली तरी काँग्रेस ही हिंदूंची संघटना आहे हा जो टोमणा कायदे आझम जिना मारतात तो बिहारींच्या या दुष्कृत्यामुळे सिद्धच होईल. सर्व अल्पसंख्य मुसलमानांना आपले भाऊ मानणे व विशाल बहुसंख्या असलेल्या हिंदूंना जशी संरक्षणाची गरज आहे तशीच अल्पसंख्य मुसलमानांनाही गरज आहे याची जाणीव ठेवणे हे बिहारी हिंदूंचे कर्तव्य आहे. ज्या बिहारने काँग्रेसच्या प्रतिष्ठेकरिता इतके काही केले त्या बिहारने आता काँग्रेसकरिता कबर खोदू नये. मला माझ्या अहिंसेची मुळीच लाज वाटत नाही. मी बंगालमध्ये जो आलो आहे तो आणीबाणीच्या या प्रसंगात माझ्यातील ही अहिंसा कशी अभिव्यक्त होते हे

पाहण्याकरिता. परंतु माझ्यातील अहिंसेसंबंधी तुमच्याशी बोलण्याकरिता मी हे पत्र लिहिलेले नाही. तुम्ही जे केले असे वृत्त आहे त्याची गणना शूरवीरपणाच्या कृत्यात कधीही होऊ शकत नाही. हजारो लोकांनी काही शेकडो लोकांना मारून टाकणे हे काही शौर्याचे चिन्ह होऊ शकत नाही. हे तर भ्याडपणापेक्षाही वाईट आहे. ही गोष्ट राष्ट्रवादाला वा कोणत्याही धर्माला शोभणारी नाही. तुम्ही जर ठोशाला ठोसा मारला तर तुम्हाला कोणीही दोष देऊ शकणार नाही. परंतु तुम्ही जे काही केले आहे ते तुम्हांला कमीपणा आणणारे आहे, हिंदुस्थानची बदनामी करणारे आहे. तुम्ही तुमचे लष्कर परत न्या व हिंदुस्थानच्या कारभारात लक्ष घाला असे तुम्ही पंडित जवाहरलालजी, निश्तर साहेब आणि डॉ. राजेन्द्र प्रसाद यांना सांगायला पाहिजे. असे तुम्ही तेव्हाच म्हणू शकाल जेव्हा तुम्हांला तुमच्या अमानवीय कृत्याचा पश्चात्ताप होईल आणि आमच्या भावाबहिणींची आम्ही जशी काळजी घेतो तशीच मुसलमानाचीही घेऊ असे आश्वासन तुम्ही त्यांना देऊ शकाल. जोपर्यंत प्रत्येक मुसलमान निर्वासित आपल्या घरी परतत नाही तोपर्यंत तुम्ही क्षणाचाही विसावा घ्यायला नको. तुम्ही त्यांची घरे परत बांधून द्यायला पाहिजे आणि त्याकरिता तुम्ही तुमच्या मंत्र्यांची मदत मागितली पाहिजे. तुमच्या मंत्र्यांबदल तुमचे टीकाकार काय म्हणतात हे तुम्हांला माहीत नाही.

मी स्वतःला तुमचा भागच समजतो. असे मानण्याकरिता तुमच्या प्रेमाने मला भाग पाडले आहे. बिहारी हिंदूंच्या कर्तव्याविषयीची तुम्हांला जी जाणीव आहे त्यापेक्षा मला थोडे जास्त कळत असल्यामुळे जोपर्यंत मी काही प्रायश्चित्त घेत नाही तोपर्यंत मी स्वस्थ बसू शकत नाही. कलकत्त्याला आल्यानंतर लगेच प्रामुख्याने प्रकृतीच्या कारणाकरिता मी किमान आहारावर राहू लागलो होतो. बिहारमधील दुःखद परिस्थितीबद्दल कळल्यानंतर प्रायश्चित्त म्हणून माझे किमान आहारावर राहणे सुरूच राहील. चुकलेल्या बिहारींनी नवीन पान उघडले नाही तर या अल्पाहाराचे रूपांतर प्राणांतिक उपोषणात होऊ शकते.

पवित्र कर्तव्य भावनेने हे जे प्रायश्चित्त मी घेतो आहे त्याचा बिहार कोणताही चुकीचा अर्थ लावण्याचा धोका नाही हे मला माहीत आहे.

सहानुभूती दाखवण्याकरिता कोणत्याही मित्राने माझ्याकडे धावपळ करत येण्याची आवश्यकता नाही. माझ्या अवतीभवती माझ्यावर प्रेम करणारे भरपूर मित्र आहेत. इतर कोणत्याही व्यक्तीने माझी नक्कल करणे चुकीचे व अप्रासंगिक होईल. सहानुभती दाखवणारे उपोषण वा अर्धोपोषण कोणीही करू नये. अशा कृतीमुळे नुकसानच होईल. जे लोक मला ओळखतात आणि ज्यांचा माझ्या प्रामाणिकपणावर विश्वास आहे त्यांची सदसद्विवेकबुद्धी जागृत करणे हा माझ्या उपवासाचा हेतू आहे. कोणीही माझी काळजी करू नये. इतर

सर्वांप्रमाणेच ईश्वर माझी काळजी घेईल. जोपर्यंत त्याला या देहाकडून सेवा घ्यायची आहे तोपर्यंत मला काहीही होणार नाही.

तुमचा सेवक,

मो. क. गांधी

हरिजन, नोव्हेंबर १०, १९४६

----------------

# ४९. किरण शंकर राय यांना पत्र

सोदेपूर,

नोव्हेंबर ६, १९४६

प्रिय किरण शंकर (बंगाल विधिमंडळाचे सदस्य),

काल रात्री ज्या मुसलमान मित्रांच्या मुलाखतीसंबंधी (गांधीजी त्यांना नोव्हेंबर ५ला हसन शहीद सुऱ्हावर्दी यांच्या घरी केंद्रीय शांतता समिती स्थापन करण्याच्या दृष्टीने भेटले होते; पाहा "प्रार्थना प्रवचन", नोव्हेंबर ५, १९४६) बोललो त्यासंबंधी शरत बाबूंशी (शरत चंद्र बोस) भेटा. प्रस्तावित सल्लागार समिती अस्तित्वात आली तर तुम्ही सर्वांनी तिच्यात सामील व्हावे असा माझा तुम्हाला सल्ला आहे.

तुमचा,

मो. क. गांधी

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------------

# ५०. युनायटेड प्रेस ऑफ अमेरिका यांना मुलाखत

सोदेपूर,

नोव्हेंबर ६, १९४६

**ब्रिटिश सैन्य जर येथून काढून घेण्यात आले तर त्यानंतर सध्या सुरू असलेल्या दंगली लगेच थांबतील असे तुम्हाला वाटते काय आणि देशातील विविध भागातील अल्पसंख्य समुदायाच्या लोकांच्या मनात बहुसंख्य समाजाबद्दल जी भीती आहे ती कशी दूर करता येईल असा प्रश्न गांधीजींना विचारण्यात आला. उत्तर देताना गांधीजी म्हणाले -**

दंगली लगेच थांबणार नाहीत, परंतु ब्रिटिश सैन्य गेल्यानंतर त्या बऱ्याच लवकर थांबायला पाहिजे. आज तर आपल्याला इंग्रजांनी मदत करावी असे वाटते. ही अपमानास्पद परिस्थिती आपल्याला पाहावी लागत आहे. ते जेव्हा निघून जातील तेव्हा लोक अपरिहार्यपणे प्रतिहिंसेने वा त्याहून चांगल्या प्रकाराने म्हणजे अहिंसेने आत्मरक्षण करणे शिकतील. अल्पसंख्य समुदाय जर शूर झाला नाही आणि बहुसंख्य समाजावर विश्वास ठेवणे शिकला नाही तर ब्रिटिश सत्तेने इथेच राहावे अशी त्याची इच्छा असेल. याशिवाय इंग्रजांची सत्ता गेल्यानंतर अल्पसंख्याकांशी कसा व्यवहार करावा हे बहुसंख्य समाज शिकून घेईल. आज बहुसंख्याकांनी अल्पसंख्याकांशी कितीही उत्तम व्यवहार केला तरी त्याची पूर्ण किंमत होत नाही, उलट ब्रिटिश सैन्यावर विसंबून राहण्याची प्रवृत्ती बळावते. ब्रिटिश सैन्य म्हणजे केवळ गोरे शिपाई असा अर्थ नसून ब्रिटिशांशी निष्ठेने वागण्याचे ब्रिटिश अधिकाऱ्यांनी प्रशिक्षण दिलेले आणि हिंदुस्थानातील लोकांचे स्वातंत्र्य चिरडून टाकण्याकरिता ब्रिटिशांतर्फे बहुधा उपयोगात आणले जाऊ शकते असे हिंदुस्थानातील सैन्य. कोणत्याही परिस्थितीत सांप्रदायिक दंगलीच्या दरम्यान आत्मरक्षण कसे करावे हे लोकांनी शिकायलाच पाहिजे. पोलिसांचे काम चोर आणि डाकू यांच्या उपद्रवापासून नागरिकांचे रक्षण करणे आहे तर जिथे अहिंसक बचावाचे अपूर्व कौशल्य लोक शिकलेले नसतात तिथे सैन्याचे काम बहुधा विदेशी आक्रमकांपासून देशाचे रक्षण करणे असते.

**लोकांनी जर युरोपीय पद्धतीचा पोषाख केलेला असेल तर ते कलकत्ता आणि इतर भागातील दंगलग्रस्त भागातूनसुद्धा बरेचसे सुरक्षितपणे इकडून तिकडे जाऊ शकतात कारण बदमाश लोक त्यांना ख्रिश्चन समजतात या गोष्टीकडे जेव्हा गांधीजींचे लक्ष वेधण्यात आले तेव्हा गांधीजी म्हणाले –**

खून होण्यापासून बचाव व्हावा म्हणून आपण ख्रिश्चनासारखे दिसलो पाहिजे हा सल्ला कोणतीही स्वाभिमानी व्यक्ती मान्य करू शकत नाही. प्रस्तावित बदल हा हिंदू आणि मुसलमान या दोघांनाही शोभणार

नाही. परस्परांशी शांततापूर्वक राहण्याकरिता हिंदुस्थानातील विविध समुदायांच्या लोकांचे शिष्टाचार, त्यांच्या प्रथा आणि त्यांचे पोषाख इत्यादी सहन करायला आपण शिकायला पाहिजे.

'द हिंदू', नोव्हेंबर ११, १९४६

-------------

## ५१. मोहम्मद युनूस यांना पत्र

नोव्हेंबर ६, १९४६

भाई मोहम्मद,

बिहारमध्ये काय झाले? मी स्तंभित झालो आहे. जवाहरलालला मी पाठवलेले पत्र वाचा (पाहा "जवाहरलाल  नेहरू यांना पत्र", नोव्हेंबर ५, १९४६). गाडी सुटत आहे. मला पूर्ण अहवाल पाठवा.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५१०६

----------------

# ५२. कुश्तिया येथील भाषण

नोव्हेंबर ६, १९४६

**वाट पाहत असलेल्या जमावाला उद्देशून गांधीजी म्हणाले की नोआखालीत जाण्याचा माझा उद्देश कोणाची तरी बाजू घेऊन परस्परात भांडणे लावण्याचा नाही. दिवंगत अली बंधूंबरोबर मी पूर्वबंगालसह संपूर्ण बंगालचा दौरा केला होता. ते दिवस हिंदू-मुसलमान ऐक्याचे होते. मोठ्या संख्येत मुसलमान काँग्रेसमध्ये सामील झाले होते. त्या वेळी काँग्रेस सर्वांची होती. परंतु आज मी पूर्व बंगालमध्ये कॉंग्रेसी म्हणून जात नाही आहे. मी ईश्वराचा सेवक म्हणून जात आहे. अत्याचारित स्त्रियांचे अश्रू जर मी पुसू शकलो तर त्यामुळे माझे भरपूर समाधान होईल.**

**शहीद सांहेबांची माझ्याबरोबर पूर्व बंगालच्या दौऱ्यावर येण्याची इच्छा होती परंतु ते कलकत्त्यात अडकले आहेत. यामुळे त्यांनी त्यांच्याऐवजी शमसुद्दिन साहेबांना** (श्रममंत्री) **पाठवले आहे. शमसुद्दिन साहेब माझ्यावर काही हेरगिरी करायला आलेले नाहीत. मला जिथेकुठे मदत हवी असेल तिथे ती सरकारकडून करता यावी म्हणून ते इथे आलेले आहेत. मला आशा आहे की या दौऱ्याचा चांगला प्रभाव पडेल आणि खिलाफत काळातील हिंदू-मुसलमान ऐक्य परत निर्माण होईल. खिलाफतीच्या दिवसात हिंदुस्थानचे विभाजन करण्याबद्दल कोणीही बोलत नव्हता. आता मात्र तसे बोलले जात आहे. परंतु फाळणी वांछनीय आहे असे जरी वाटत असेल तरी बळजबरीने ती साध्य करता येऊ शकत नाही. आणि ती जरी साध्य झाली तरी संबंधित जनतेच्या शुभेच्छेशिवाय ती टिकवून ठेवता येणार नाही. पाकिस्तान बळजबरीने मिळवण्यावर आमचा विश्वास नाही असे आश्वासन काल मला मुसलमान पुढाऱ्यांनी दिले.**

**आपले भाषण पुढे सुरू ठेवत गांधीजी म्हणाले की आता बहुधा माझे ठिकाण बिहार असेल. मी बिहारची किती तरी सेवा केली आहे आणि बंगालपेक्षा बिहारवर माझा किती अधिक प्रभावही आहे. सध्या मात्र मी बिहारला जाण्याऐवजी बिहारींना अनावृत पत्र** (पाहा “बिहारला”, नोव्हेंबर ६, १९४६) **लिहिण्यावरच समाधान मानतो आहे. ते ते सर्व पाहतील. मला श्रोत्यांना इतकेच सांगायचे आहे की हिंदुस्थानात तुम्ही शत्रू होऊन राहू शकत नाही. तुम्ही मित्र आणि भाऊभाऊ व्हायला पाहिजे. बंगालमध्ये जे घडले आणि बिहारमध्ये जे घडत आहे ते अशोभनीय आहे. संपूर्ण जगात आपली बदनामी झाली आहे. मला नोआखालीत जायचे आहे आणि जोपर्यंत हिंदू आणि मुसलमान तिथे सख्ख्या भावाप्रमाणे राहत नाहीत तोपर्यंत मला तिथे राहायचे आहे.**

‘द बॉम्बे क्रॉनिकल’, नोव्हेंबर ७, १९४६

----------------

# ५३. ग्वालंदो इथे भाषण

नोव्हेंबर ६, १९४६

**ग्वालंदो घाट इथे गोळा झालेल्या बऱ्याच मोठ्या जनसमुदायासमोर आगबोटीच्या छतावरून बोलताना गांधीजी म्हणाले की शक्य झाले तर नोआखालीतील प्रत्येक दंगलग्रस्त गावाला भेट देण्याची माझी इच्छा आहे. दंगलग्रस्त गावातील लोकांचे सांत्वन करण्याकरिता आणि दुःखी लोकांचे अश्रू पुसण्याकरिता मी तिथे जात आहे.**

**तुम्ही जर आपसात बदल्याची भावना ठेवत असाल आणि आपसात झगडत राहाल तर अखेरीस हिंदू धर्म आणि इस्लाम या दोघांचाही सर्वनाश होईल. बिहारमध्ये जे काही झाल्याच्या बातम्या मिळत आहेत त्याला कोणताही धर्म मान्यता देत नाही आणि बिहारने मुसलमानांना चांगला "धडा" शिकवला असे जर कोणाला वाटत असेल तर ते फार मोठी चूक करत आहेत. अशी चर्चा शुद्ध मूर्खपणा आहे. माझ्या मते बिहारने स्वतःच्या आणि हिंदुस्थानच्या चांगल्या नावाला बट्टा लावला आहे आणि तीच गोष्ट बंगालने केली आहे. तुम्ही जर एकाही मुसलमानाला धक्का लावाल तर त्याआधी तुम्हाला मला मारावे लागेल असे प्रधानमंत्री पंडित नेहरूंनी बिहारींना सांगितले आहे.**

**केंद्रीय सरकारची सूत्रे १४ लोकांच्या हातात आहेत परंतु त्यांनी या दंगली सैन्याच्या मदतीने दाबल्या तर ही सूत्रे व्हाईसराय लॉर्ड वेव्हेल यांच्या हातात जातील. गांधीजी म्हणाले की मी हे कधीही सहन करू शकत नाही. जर १००० मुसलमान त्यांच्यामध्ये राहणाऱ्या अल्पसंख्याक समुदायावर हल्ला करतात, त्यांची घरेदारे लुटतात, त्यांच्या स्त्रियांशी दुर्व्यवहार करतात व बळजबरीने त्यांचे धर्मांतर करण्याचा प्रयत्न करतात तर ते स्वतःच्याच धर्मावर कुठाराघात करतात.**

**बंगालमधील हिंदू आणि मुसलमान जोपर्यंत मला सांगत नाहीत की तुमची इथे आवश्यकता नाही तोपर्यंत मी बंगाल सोडून जाणार नाही. बिहारचीसुद्धा मला हाक ऐकू येते आहे, परंतु पंडित नेहरूंनी मला आश्वासन देत सांगितले आहे की सध्याच इथे तुमची आवश्यकता नाही.** (यानंतरचा भाग 'द हिंदू'मधून घेतला आहे.)

लोकांना आपले घर सोडून आश्रयाकरिता शहरात जावे लागले ही अतिशय दुःखाची गोष्ट आहे. कसाही हल्ला जरी झाला वा कितीही हिंसा झाली तरी तुम्ही तुमचे गाव सोडायला नको. तुम्हांला शक्य असेल तर हिंसेचा सामना अहिंसेने करा आणि तुम्हांला तसे करणे शक्य नसेल तर कोणत्याही साधनाने हिंसेचा सामना करा, मग तसे केल्यामुळे तुमचा नाश जरी होणार असेल तरी त्याची फिकीर करू नका. परंतु कोणाला लुटायला वा जाळून टाकायला मोकळे रान मिळेल अशा प्रकारे आपले घरदार सोडून इतरत्र कुठेही पळून जाऊ नका.

'द बॉम्बे क्रॉनिकल', नोव्हेंबर ७, १९४६ आणि 'द हिंदू', नोव्हेंबर ६, १९४६

-----------------

# ५४. 'असोसिएटेड प्रेस ऑफ अमेरिका'ला मुलाखत

("श्रद्धेला आव्हान" या शीर्षकांतर्गत प्यारेलाल यांच्या लेखात या मुलाखतीचे वर्णन आले होते. नोव्हेंबर ८च्या 'बॉम्बे क्रॉनिकल'नुसार ही मुलाखत चांदपूरला जाताना किवी नावाच्या आगबोटीवर झाली होती.)

नोव्हेंबर ६, १९४६

**वार्ताहर - हिंदुस्थानचा सध्याचा इतिहास म्हणजे सन १९४२ची अशांती, आझाद हिंद सैन्याची कारवाई आणि त्याच्याशी जुळलेली अशांती, हिंदुस्थानी नौसेनेने केलेला विद्रोह, कलकत्ता आणि मुंबईमधील दंगे, काश्मीर आणि देशी संस्थानातील हालचाली आणि सध्या सुरू असलेल्या दंगली हे सर्व पाहता तुमच्या सिद्धांताने हिंदुस्थानच्या जनजीवनात मूळ धरले आहे असे म्हणता येईल काय?**

गांधीजी - अशा प्रकारे एकदम निष्कर्ष काढणे धोकादायक आहे. तुम्ही ही जी सर्व उदाहरणे दिली आहेत त्यांना निश्चितच हिंसा म्हणता येऊ शकते, परंतु याचा अर्थ अहिंसाधर्म अपयशी झाला आहे असा होत नाही. जास्तीतजास्त इतकेच म्हणता येईल की जनसमान्याचे मत वळवण्याकरिता ज्या प्रकारच्या कामाची आवश्यकता असते ते काम करण्याचे तंत्र मला गवसलेले नाही. परंतु ज्या हिंसेचा तुम्ही उल्लेख केला आहे त्या हिंसेत हिंदुस्थानच्या सात लाख खेड्यातील जनता सहभागी झालेली नाही असा माझा दावा आहे. हिंदुस्थानच्या जनजीवनात अहिंसेने मूळ धरले की नाही हे तर माझ्या मृत्यूनंतरच कळू शकेल.

**शूरांची अहिंसा अंगी बाणवण्याकरिता माणसाने आपल्या दैनंदिन जीवनात काय केले पाहिजे म्हणजे त्याकरिता त्याचा किमान कार्यक्रम कोणता असला पाहिजे?**

शूराची अहिंसा शिकू इच्छिणाऱ्या व्यक्तीने आपल्या मनातील भीतीचे सर्व विचार काढून टाकणे ही पहिली आवश्यकता आहे आणि या शुद्धीप्रमाणेच त्या व्यक्तीने आपल्या सर्व लहानमोठ्या कामाचे नियोजन केले पाहिजे. उदाहरणार्थ या धर्माचा अनुयायी आपल्या उच्चाधिकाऱ्याच्या दडपणाखाली राहण्याला नकार देईल, परंतु न संतापता. त्याचबरोबर आपले पद कितीही लाभदायक असले तरी त्याचा त्याग करण्याकरिता तो केव्हाही तयार असेल. आपल्या सर्वस्वाचा त्याग करतानाही त्याच्या मनात आपल्या मालकाबद्दल किंचितही दुर्भावना नसेल. असे असेल तर त्याच्यात शूराची अहिंसा आहे असे समजायला पाहिजे. असे प्रसंग दैनंदिन जीवनात अनुभवाला येत असतात व त्यांची सहजपणे किती तरी उदाहरणे देता येऊ शकतात. कल्पना करा की माझा कोणी सहकारी माझ्या मुलाला मारून टाकण्याची धमकी देतो आणि मी त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न करतो तर तो माझ्यावरच तुटून पडतो. अशा वेळी माझ्यात त्याच्या ठोशाला ठोसा देण्याची

शक्ती असूनही मी त्याचा मार जर शांतपणे सहन केला आणि माझ्या मनात त्याच्याबद्दल कोणतीही दुर्भावना निर्माण होऊ देणार नसेन व अशा प्रकारच्या प्रत्येक प्रसंगी माझी वागणूक पूर्वीप्रमाणेच असेल तर याचा अर्थ होईल की मी माझ्यात शूराची अहिंसा विकसित केली आहे. अशी अहिंसा कधीही माझी निराशा करणार नाही. तिची महत्ता माझे कट्टरहून कट्टर विरोधकही मान्य करतील.

'हरिजन', नोव्हेंबर १७, १९४६

---------------

# ५५. काँग्रेसच्या लोकांशी चर्चा

(एका वृत्ताप्रमाणे : "बंगाल विधिपरिषदेतील विरोधी पक्षनेते कामिनी कुमार दत्त यांच्या नेतृत्वाखाली किती तरी कॉंग्रेसी गांधीजींना चांदपूरला जाणाऱ्या आगबोटीवर भेटायला आले व त्यांनी गांधीजींना तेथील परिस्थिती सांगितली. सुरुवातीपासून काय काय झाले हे त्यांनी गांधीजींनी सांगितले.")

चांदपूर,

[नोव्हेंबर ६, १९४६]

(गांधीजी चांदपूरला नोव्हेंबर ६, १९४६ला सायंकाळी ८.३० वाजता पोहोचले होते.)

टिपरा जिल्ह्यातील प्रमुख व्यक्तींनी गांधीजींना जे निवेदन दिले त्याचे उत्तर देताना गांधीजी म्हणाले : आपल्याला असहाय वाटते परंतु आपल्याला वाटते तितके आपण असहाय नाही. आपण जर सैन्य आणि पोलीस यांच्यावर अवलंबून राहिलो तर मग मात्र आपण खरोखरच असहाय होऊ. चांदपूरचे २०,००० लोक जर संघर्ष करतील तर तो संघर्ष पाहण्याकरिता ईश्वरसुद्धा स्वर्गातून खाली उतरेल, आणि तुम्ही असे करावे अशी माझी इच्छा आहे. लोकांनी स्वतःहोऊन आक्रमण करू नये परंतु त्यांनी आपला बचाव केला पाहिजे आणि त्याकरिता आवश्यकता पडली तर आजूबाजूच्या, जवळपासच्या लोकांची मदतही घेतली पाहिजे. कोणीही पळून जाऊ नये आणि एखाद्या माणसाला हजार लोकांनी जरी घेराव घातला तरी शरण न जाता त्याने लढतलढत मरण पत्करायला पाहिजे. घेरले गेलेल्या लोकांनी आपल्या जागेवर ठाम उभे राहायला पाहिजे. लोकांनी मरण पत्करणे शिकायला पाहिजे. रचनात्मक कार्याकरिता बलिदानाची भावना हवी. परंतु हा संघर्ष गुप्त असायला नको. कोणत्याही परिस्थितीत स्त्रिया, मुले आणि अपंगांना स्पर्श करायला नको.

'द हिंदू', नोव्हेंबर ९, १९४६

------------------

# ५६. मदत कार्यकर्त्यांशी चर्चा

(प्यारेलाल यांच्या “द फर्स्ट लेसन” या लेखातून. मदत कार्य करणाऱ्या संघटनेचे २०-२५ कार्यकर्ते किवी जहाजाच्या भोजनालयात गांधीजींना नोव्हेंबरच्या ७ तारखेला भेटले.)

चांदपूर,

नोव्हेंबर ७, १९४६

गांधीजी - पोलीस आणि सैन्य यांच्या मदतीशिवाय तुम्ही काम करू शकत नाही असे तुम्ही म्हणत असाल तर लढाई सुरू होण्यापूर्वीच तुम्ही पराभव पत्करल्यासारखे होईल. भ्याड लोकांना जगातील कोणतेही पोलीस वा लष्कर वाचवू शकत नाही. एकाही माणसाचे बळजबरीने धर्मपरिवर्तन करता येऊ शकते वा एकाही स्त्रीला बळजबरीने पळवून नेता येऊ शकते वा तिच्यावर बलात्कार केला जाऊ शकतो ही गोष्ट माझ्या पचनीच पडू शकत नाही. जोपर्यंत तुम्हांला वाटते की अशा प्रकारच्या अपमानाला तुमचा बळी पडू शकतो तोपर्यंत अशा प्रकारच्या अपमानांना तुमचा बळी पडतच जाणार आहे. आज तुम्ही म्हणता की मूठभर लोकांना हजारो लोक दहशतीच्या वातावरणात दाबून ठेवत असतील तर ते मूठभर लोक काय करू शकतील? परंतु मोजके दोनचार लोकही मोठ्या जमावावर दहशत बसवू शकतात. संख्यात्मक उणिवेत तुमच्या त्रासाचे मूळ नसून तुमच्यातील असहायतेच्या भावनेत आणि इतरांच्या मदतीवर अवलंबून राहण्याच्या तुमच्या प्रवृत्तीत तुमच्या अडचणीचे मूळ आहे. उपाय तुमच्या हातात आहे. यामुळेच तुमच्या सामूहिक स्थलांतराला माझा विरोध आहे. षंढपणा वा असहायतेवरील तो उपाय नाही.

**कार्यकर्ता - पूर्व बंगाल अशा प्रकारच्या कारवाईच्या विरुद्ध आहे.**

गांधीजी - वीस हजार माणसे शूरपणे अहिंसक पद्धतीने मरण पत्करायला तयार होणे ही कदाचित आज परिकथा वाटेल. परंतु वीस हजार माणसातील प्रत्येक सक्षम माणूस लढाईत मरायला तयार झाला तर ती परिकथा आहे असे कोणी म्हणणार नाही. थर्मोपाईलच्या सैनिकांप्रमाणे त्यांचे नाव इतिहासात अजरामर होईल -

**हे नवागता, स्पार्टाला सांग की इथे त्याच्या सुपुत्रांचे दफन करण्यात आलेले आहे. हाच त्यांचा नियम होता आणि आम्ही त्यांच्याच नियमाचे पालन केले आहे.**

गांधीजी - मी जाहीरपणे सांगतो की पूर्व बंगालमध्ये जिवंत राहण्याचा हाच मार्ग आहे.

तुम्ही मुसलमानांच्या ठिकाणी हिंदू अधिकाऱ्यांची, हिंदू पोलिसांची व हिंदू सैन्याची मागणी केली आहे. ही मागणी व्यर्थ आहे. भूतकाळात हिंदू अधिकारी, हिंदू पोलीस आणि हिंदू सैन्य या सर्व गोष्टी करण्यात आल्या होत्या परंतु तरीही त्यांनी आपल्या हिंदू बांधवांच्या विरोधात लूट, आगी लावणे, अपहरण, बलात्कार हे सर्व प्रकार केले होते. मी काठेवाडमधून - एका संस्थानातून आलो आहे. माणूस किती अधःपतीत होऊ शकतो याचे मी तुम्हांला वर्णन करून सांगू शकत नाही. काही संस्थानांमध्ये एकाही स्त्रीची अब्रू सुरक्षित नाही. आणि त्यांचा प्रमुख काही कोणी गुंड नसतो, तो कर्तव्याने बांधलेला नियमानुसार सिंहासनारूढ राजाच असतो.

**कार्यकर्ता - ही प्रकरणे वैयक्तिक अधःपतनाची आहेत. इथे तर सामूहिक पद्धतीने हे घडत आहे.**

गांधीजी - परंतु तिथे व्यक्ती एकटी नसते. तिला तिच्या लहानशा संस्थानातील व्यवस्थेची मदत असते.

**कार्यकर्ता - तिथे त्याच्या धर्माचे लोकच त्याची निंदा करतात. इथे मुसलमान अशा गोष्टींची निंदा करत नाहीत.**

गांधीजी - शहीद सुऱ्हावर्दी यांना अशा घटनेचा निषेध करताना मी इथे आल्यापासून पाहतो आहे. निषेधाचे शब्द कदाचित तुमच्या कानांना गोड वाटतील परंतु ज्या स्त्रियांची घरे बळकावण्यात आली आहेत, ज्यांचे अपहरण झाले आहे, ज्यांचे बळजबरीने धर्मांतर करण्यात आले आहे व बळजबरीने ज्यांचा विवाह लावण्यात आला आहे त्या दुर्दैवी स्त्रियांचे यामुळे समाधान होणार नाही. हिंदूंकरिता ही किती लाजिरवाणी गोष्ट आहे, इस्लामकरिता ही किती अशोभनीय गोष्ट आहे! नाही मी तुम्हांला स्वस्थ बसू देणार नाही. हा माणूस आम्हांला एकट्याला सोडून येथून केव्हा एकदाचा जातो असेच आता तुम्ही स्वतःशी म्हणाल. परंतु हा माणूस जाणार नाही. हा माणूस काही तुमच्या निमंत्रणाने इथे आलेला नाही आणि त्याला जायचे असेल तेव्हा तो स्वतःहोऊनच जाईल. परंतु पूर्व बंगालमधील आपले काम पूर्ण करून आणि तुमचे आशीर्वाद घेऊनच तो जाईल.

**एक कार्यकर्ता - हा पाकिस्तान योजनेचा सगळा भाग आहे.**

गांधीजी - हे त्यांचे तात्पुरते वेड आहे आणि त्यांना याची जाणीव झाली आहे. त्यांना याचा लवकरच कंटाळा येईल, कंटाळा येऊही लागला आहे.

**कार्यकर्ता - मग ते इथे येऊन सर्व नीट का करत नाहीत?**

गांधीजी - ती वेळ सुद्धा येणार आहे. रोग हे संकटाचे चिन्ह आहे. रोगमुक्तीआधी संकटाची परिस्थिती यायलाच पाहिजे. मी निसर्गोपचारक आहे हे तुम्हांला माहीतच आहे.

**एक कार्यकर्ता - परंतु इथे आम्ही सागरातील एखाद्या थेंबाप्रमाणे आहो.**

पूर्व बंगालमधील मुसलमानांमध्ये एक जरी हिंदू असला तरी त्याच्यात मुसलमानांमध्ये जाऊन राहण्याचे आणि वेळप्रसंगी शूराप्रमाणे मरण पत्करण्याचे धैर्य असले पाहिजे. तसे असेल तर तो मुसलमानांच्याही आदराकरिता पात्र होईल. त्याने वेठबिगाराप्रमाणे वा गुलामाप्रमाणे राहायला नकार दिला पाहिजे. त्याच्यामध्ये प्रतिकार न करता मरण्याचे साहस नसू शकेल, परंतु अन्यायाला शरण न जाता संघर्ष करत शूर पुरुषाप्रमाणे त्याने मरण पत्करले तरी त्याच्याबद्दल मुसलमानांना आदर वाटल्याशिवाय राहणार नाही. कितीही क्रूर आणि कठोर अंतःकरणाचा माणूस असला तरी त्याला शूर माणसाबद्दल आदर वाटल्याशिवाय राहू शकत नसतो. आपण कल्पना करतो तसा गुंड वाईट माणूस नसतो. त्याच्यातही काही चांगले गुण असतातच.

**कार्यकर्ता - गुडाला विवेक कळत नाही.**

गांधीजी - परंतु त्याला शौर्य कळते. तुम्ही त्याच्यापेक्षा शूर आहा असे त्याला आढळले तर त्याला तुमच्याबद्दल आदर वाटेल. तुमच्या लक्षात आले असेल की आजच्या चर्चेत मी तुम्हांला शस्त्राचा उपयोग करू नका असे सांगितलेले नाही. मी तुम्हांला शस्त्र देऊ शकत नाही. चितगाव शस्त्रागारावर हल्ला करणाऱ्या तरुणांना शस्त्र पुरवण्याचे कामही माझे नव्हते (एप्रिल १८, १९३०ला अतिरेक्यांच्या गटाने हा हल्ला केला होता.). या हल्ल्याबद्दल सर्वात दुःखद गोष्ट ही आहे की असा हल्ला करणारांना आपली संख्याही द्विगुणित करता येत नव्हती. त्यांचे शोर्य चुकीच्या ठिकाणी होते. त्याचा स्पर्श इतरांना होत नव्हता.

**एक कार्यकर्ता - त्यांचा स्पर्श इतरांना झाला नाही यात नवल नाही. त्यांची तर निंदा करण्यात आली होती.**

गांधीजी - कोणी केली? मी केली असेल. ती वेगळी गोष्ट आहे.

**कार्यकर्ता - लोकांनी असे केले. मी स्वतः तो हल्ला करणारांमध्ये होतो.**

गांधीजी - तुम्ही त्या हल्ल्यात भाग घेणारे असू शकत नाही, असता तर हे सांगण्याकरिता तुम्ही जिवंत राहिला नसता. इथे जे घडले ते सांगण्याकरिता इतके लोक शिल्लक राहिले हीच माझ्याकरिता सर्वात मोठी दुःखद गोष्ट आहे. जे धैर्य तुम्ही चितगाव शस्त्रागारावर हल्ला करताना दाखवले होते तसे धैर्य तुम्ही इथे दाखवले असते तर शूरवीर म्हणून तुमचे नाव इतिहासात अजरामर झाले असते. सध्या तरी तुम्ही इतिहासात केवळ एक तळटीप लिहिली आहे. तुम्ही शस्त्र चालवण्याचे कौशल्य विसरून जा वा माझ्या प्रकारचे शौर्य

दाखवा असे मी तुम्हांला म्हणून राहिलेलो नाही हे तुमच्या लक्षात येईल. मी स्वतःही पूर्णपणे त्यानुसार अनुसरण करू शकलेलो नाही. त्याची परीक्षा घेण्याकरिता मी पूर्व बंगालमध्ये आलेलो आहे. तुमच्याकडून तर मी पारंपारिक पद्धतीच्या शौर्याचीच अपेक्षा करतो आहे.

तुमच्या साहसाचा स्पर्श सर्व स्त्रीपुरुषांना होईल असे सामर्थ्य तुमच्यात असले पाहिजे. अप्रतिष्ठा आणि अपमान हेच जेव्हा मृत्यूचे पर्याय असतात तेव्हा मृत्यूला तोंड देण्याकरिता त्या साहसाची गरज असते. पूर्व बंगालमध्ये हिंदू अशाच पद्धतीने राहू शकतात, इतर कोणत्याच पद्धतीने नाही. अखेरीस मुसलमानांमध्ये आमच्या रक्तासारखे रक्त आहे आणि आमच्या हाडासारखीच हाडे आहेत. तेसुद्धा आमच्याच हाडामासापासून झालेले आहेत.

**कार्यकर्ता - इथे मुसलमान आणि हिंदूंचे प्रमाण ६ ला १ असे आहे. इतक्या विषम परिस्थितीत आम्ही त्यांच्या विरोधात उभे राहावे अशी अपेक्षा तुम्ही कशी काय करू शकता?**

गांधीजी - हिंदुस्तान जेव्हा ब्रिटिशांच्या आधिपत्याखाली गेला तेव्हा ३३ कोटी हिंदुस्तानींच्या विरोधात इंग्रज सैन्य ७०,००० होते.

**कार्यकर्ता - आमच्याजवळ शस्त्रे नाहीत. सरकारी बंदुकांचा त्यांना पाठिंबा आहे.**

गांधीजी - दक्षिण आफ्रिकेत तर हिंदुस्थानी लोकांच्या विरोधातही फार विपरीत परिस्थिती होती. तिथे युरोपीय आणि दक्षिण आफ्रिकेतील हब्शी लोकांच्या तुलनेत हिंदुस्थानी समाज नगण्य होता. युरोपीयांजवळ शस्त्र होते. आमच्याजवळ मुळीच नव्हते. यामुळे आम्ही सत्याग्रहाचे शस्त्र शोधून काढले. आज दक्षिण आफ्रिकेत हिंदुस्थानी लोकांचा जितका आदर केला जातो तितका चांगली शरीरयष्टी असलेल्या झूंचाही केला जात नाही.

**कार्यकर्ता - तर मग आम्ही कोणत्याही प्रकारे शस्त्रांनी लढत द्यावी?**

गांधीजी - कोणत्याही प्रकारे नाही. हिंसेचेसुद्धा एक नीतीशास्त्र आहे. उदाहरणार्थ असहाय स्त्री-पुरुष, म्हातारे, मुले अशांचा खून करणे यात शौर्य नाही तर भ्याडपणा आहे. आपल्या जीवाची पर्वा न करता त्यांचे रक्षण करणे ही शौर्याची मागणी असते. इस्लामचा सुरुवातीचा इतिहास अशा अनेक घटनांनी भरलेला आहे, आणि यामुळेच इस्लाम इतका सामर्थ्यशाली झाला आहे.

**कार्यकर्ता - मुसलमानांवर हल्ला करण्याची परवानगी तुम्ही हिंदूंना द्याल काय?**

गांधीजी - बिहारच्या लोकांनी असेच केले आणि त्यांनी स्वतःला आणि हिंदूंना बदनाम केले. त्यांनी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या घड्याळाचे काटे मागे फिरवले. मला बिहारबद्दल बोलण्याचा अधिकार आहे. एका अर्थाने मी बंगालपेक्षा बिहारच्या जास्त जवळ आहे कारण चंपारणमध्ये मला माझ्या अहिंसक तंत्राचे प्रात्यक्षिक दाखवण्याची संधी तिथे मिळाली (१९१७ साली). मी असे ऐकले आहे की बिहारच्या बदल्यामुळे इतर ठिकाणचे मुसलमान 'थंड' झाले आहेत. याचा अर्थ आहे काही काळाकरिता त्यांना थंड करण्यात आले आहे. ते विसरतात की दोघेही हा खेळ खेळत आहेत. आपल्या गुलामगिरीच्या श्रृंखलेत बिहारने एक कडी अजून जोडली आहे. बिहारच्या घटनांची पुनरावृत्ती झाली वा बिहारने आपल्या मानसिकतेत सुधारणा केली नाही तर तुम्ही माझे हे शब्द डायरीत लिहून ठेवा - हिंदुस्थान लवकरच तीनपैकी कोणत्यातरी एका मोठ्या शक्तींच्या जोखडाखाली जाईल व त्यांतील कोणा तरी एकाला येथील राज्यकारभार चालवण्याचा अधिकार दिला जाईल. आज बंगाल आणि बिहारमध्ये हिंदुस्थानचे स्वातंत्र्य पणावर लागलेले आहे. ब्रिटिश सरकारने कॉंग्रेसच्या हातात जी सत्ता दिली आहे ती काही कॉंग्रेसवरील प्रेमामुळे दिलेली नाही. कॉंग्रेस सत्तेचा उपयोग सुज्ञपणाने आणि चागल्या पद्धतीने करील, दुरुपयोग करणार नाही या विश्वासाने ती सोपवली आहे. आपल्या पायाखालची जमीन घसरू लागली आहे असे पंडित नेहरू यांना वाटू लागले आहे. परंतु ते तसे घडू देणार नाहीत. म्हणूनच ते बिहारमध्ये आहेत. ते म्हणाले की आवश्यकता असेपर्यंत मी बिहारमध्ये राहणार आहे. बिहारी भित्र्या माणसांप्रमाणे वागले आहेत. अपरिहार्य असेल तर तुमच्या शस्त्रांचा सदुपयोग करा, दुरुपयोग करू नका. बिहारने आपल्या शस्त्रांचा सदुपयोग केलेला नाही. बिहारला बदलाच घ्यायचा असता तर त्यांनी तो नोआखालीला येऊन घ्यायला पाहिजे होता आणि शेवटच्या माणसापर्यंत मरण पत्करायला पाहिजे होते. हजारो हिंदूंनी त्यांच्यामध्ये राहणाऱ्या मूठभर मुसलमान स्त्रीपुरुषांवर आणि मुलांवर तुटून पडणे हा काही बदला नाही, केवळ पाशवीपणा आहे. दुर्बल आणि असहाय लोकांचे रक्षण करणे हा शस्त्रांचा विशेषाधिकार आहे, भूषण आहे. पूर्व बंगालमधील हिंदूंचे चांगल्या प्रकारे रक्षण करण्याचा मार्ग होता बिहारमधील हिंदूंमध्ये राहणाऱ्या मुसलमानांचे आपल्या प्राणांची बाजी लावून रक्षण करणे. तशा अवस्थेत बिहारच्या उदाहरणाचा चांगला प्रभाव पडला असता. आणि बिहारींचे हे वेड निघून गेल्यानंतर पश्चात्ताप व्यक्त करून ते असेच करतील याची मला खात्री आहे. ते काहीही असले तरी मी जिवंत राहावे अशी त्यांची इच्छा असेल तर माझ्या जीवनाचे हे मूल्य मी ठरवले आहे. इथे पहिला पाठ संपतो.

हरिजन, डिसेंबर १, १९४६

----------------

# ५७. मुस्लीम लीगच्या पुढाऱ्यांशी चर्चा

(प्यारेलाल यांच्या "ओव्हरप्रूफ इज ॲडमिशन" या लेखातून उद्धृत. गांधीजी चौमुहानीला जाण्यापूर्वी टिपरा जिल्ह्यातील किती तरी प्रमुख मुसलमान पुढारी चांदपूरला गांधीजींना किवी आगबोटीवर भेटले होते.)

चांदपूर,

नोव्हेंबर ७, १९४६

**त्यांच्यापैकी एक जण उद्गारला की चांदपूर उपविभागात कोणतीही दंगल झाली नाही. वृत्तपत्रांमधील खोट्या बातम्यांमुळे चांदपूरमध्ये निर्वासितांची गर्दी झाली आहे. मुसलमनांच्या हातून केवळ १५ हिंदू मारले गेले उलट सैनिकांनी केलेल्या गोळीबारात दुप्पट मुसलमान मारले गेले आणि त्या सैनिकांमध्ये बहुतेक हिंदू होते.**

**बंगाल विधानसभेचे सदस्य असलेले एक गृहस्थही शिष्टमंडळात होते. हिंदू अजूनही पळत असल्याबद्दल आणि हिंदू कार्यकर्ते त्यांच्या पुनर्वसनात अडथळे आणत असल्याबद्दल ते अजूनच नाराज होते. मुस्लिम लीग सरकारला बदनाम करण्याकरिता आणि प्रशासनाचे काम बंद पाडण्याकरिता ते असे करत आहेत असे त्यांचे म्हणणे होते.**

**त्या सभेत नसरुल्ला साहेब** (के. नसरुल्ला, आमदार आणि बंगाल मुस्लिम लीग मंत्रिमंडळातील गृहविभागात सांसदीय सचिव) **आणि शमसुद्दिन साहेबांबरोबर अब्दुल रशीद साहेबही हजर होते. ते मध्येच हस्तक्षेप करत म्हणाले - चांदपूर उपविभागाला वेगळे काढून आणि इतर जिल्ह्यांमधील घटनांकडे दुर्लक्ष करण्याला काहीही अर्थ नाही. सैन्याचा गोळीबारही तितकाच अप्रस्तुत आहे.**

**त्यांचे बोलणे जेव्हा संपले तेव्हा गांधीजी उत्तर देताना उद्गारले की तुम्ही जे म्हणता ते शब्दशः खरे मानले तर अपप्रचार आणि पोलीस आणि सैनिकांच्या अतिरेकांमुळे दंग्यांना प्रोत्साहन मिळाले आणि म्हणून भीतीचे वातावरण निर्माण करणारे हिंदूच दंगलीकरिता जबाबदार असून अपराधी आहेत आणि मुसलमानांनी कोणताही अतिरेक केला नाही असा याचा अर्थ होईल. हे इतके मोठे असत्य आहे की ते कोणाच्याही गळी उतरणार नाही. जर कोणत्याही दंगली झाल्या नव्हत्या तर सैन्य बोलावण्याची आवश्यकता का निर्माण झाली? सकाळी मला भेटण्याकरिता आलेले २०-२५ हिंदूंचे प्रतिनिधीमंडळ माझ्याबरोबर होते** (पाहा याआधीचा विषय.). **टिपरा आणि नोआखालीत किती भयानक घटना घडल्या ते त्यांनी मला सांगितले. बंगालमध्ये पाय ठेवल्यापासून अशाच इतर घटना माझ्या कानावर पडत आहेत. मुस्लिम लीगच्या लोकांनीसुद्धा भयानक घटना घडल्याचे मान्य केले आहे. त्यांचा विरोध केवळ आकड्यांबद्दल होता. ते अतिरंजित आहेत अशी त्यांना भीती वाटत होती. मला संख्येशी काहीही देणेघेणे नाही. अपहरणाचे, बळजबरीच्या धर्मांतराचे वा बळजबरीच्या विवाहाचे एक जरी प्रकरण असेल तरी तितकीच गोष्ट प्रत्येक ईश्वरभिरू माणसाकरिता लाजेने मान खाली घालायला लावणारी असेल. गांधीजी पुढे म्हणाले, मला कोणतीही गोष्ट गुप्त ठेवायची नाही. मला जी कोणती माहिती मिळेल ती मी मंत्र्यासमोर ठेवणार आहे. मी परस्परातील सद्भावना आणि विश्वास वाढवायला आलो आहे. त्याकरिता मला**

**तुमची मदत पाहिजे. मला पोलिसांच्या आणि सैन्याच्या मदतीने शांतता स्थापित करायची नाही. लादलेली शांतता ही शांतता नसते. पूर्व बंगालच्या लोकांना आपल्या घरातून पळ काढावा लागावा हेही मला नको आहे. मुस्लिम लीगच्या मंत्रिमंडळाला बदनाम करण्याकरिता जर कोणी सामूहिक स्थलांतराची योजना आखली असेल तर ती गोष्ट त्याच्याच अंगलट येईल. या गोष्टीवर क्वचितच कोणाचा विश्वास बसू शकतो. ते म्हणाले की जे काही घडले ते स्पष्टपणे मान्य करणे हाच योग्य मार्ग आहे.**

लोकांनी आपल्याकडे बोट दाखवण्यापेक्षा आपणच आपल्या चुकांकडे सूक्ष्मदर्शकातून पाहून त्या जगासमोर जाहीर करणे हे किती तरी चांगले. ईश्वर दुष्कर्म करणाराला कधीही माफ करत नसतो.

**आधी जे सद्गृहस्थ बोलले होते त्यांनी आता मान्य केले की मी काही जाळपोळीच्या लूटमारीच्या घटनांबद्दल ऐकले आहे परंतु लोकांनी आपल्या घरातून पळ काढल्यानंतर त्या घडल्या आहेत. ओस पडलेल्या घरांचा मोह आवरणे बदमाशांना कठीण झाले.**

गांधीजी - परंतु लोकांनी आपल्या घरातून पळूनच का जायला पाहिजे? सामान्य परिस्थितीत लोक असे करत नाहीत. घरात कोणीही नसेल व त्याच्या रक्षणाची काहीही व्यवस्था नसेल तर कोणी तरी ते लुटल्याशिवाय राहणार नाही हे प्रत्येकाला माहीत असते. केवळ मुस्लिम लीगला बदनाम करण्याकरिता कोणीही आपले सर्वस्व गमावण्याची तयारी ठेवील काय?

**प्रतिनिधीमंडळातील अजून एक गृहस्थ म्हणाले की केवळ १ टक्का लोक या गुंडगिरीच्या कृत्यात सामील होते. उरलेले ९९ टक्के लोक खरोखरच चांगले आहेत आणि जे काही घडले त्याकरिता ते जबाबदार नाहीत.**

**घटनांकडे पाहण्याचा हा दृष्टिकोन योग्य नाही. एक टक्के लोकांनी जे केले त्याबद्दल ९९ टक्के लोकांनी नापसंती दर्शवली काय? तसे झाले असते तर एक टक्का लोक काहीही करू शकले नसते आणि मग त्यांना सहजपणे पकडता आले असते. सज्जन लोकांनी आपले नाव सार्थ करण्याकरिता सकारात्मक पद्धतीने दुराचार थांबवण्याकरिता प्रयत्न केला पाहिजे. कुंपणावर बसून राहण्यात काही लाभ नाही. तुम्हांला असे करायचे नसेल तर हिंदूंना तसे स्पष्टपणे सांगा आणि मुस्लिमबहुल क्षेत्रांतून त्यांना निघून जायला सांगा. परंतु माझ्या समजाप्रमाणे तुमचे असे मत नाही. कायदे आझम म्हणाले आहेत की पाकिस्तानमधील अल्पसंख्याकांनाही शुद्ध न्याय मिळेल. तो न्याय कुठे आहे? आज हिंदू विचारतात की पाकिस्तानमध्ये काय वाढून ठेवले आहे याचे नोआखाली चिन्ह आहे काय? मी इस्लामचा अभ्यास केलेला आहे. दक्षिण आफ्रिकेतील माझे मुसलमान मित्र मला म्हणायचे : "तुम्ही कलमा म्हणून हिंदू धर्माचा त्याग का करत नाही?" मी म्हणालो की मी कलमा निश्चितच म्हणेन, परंतु हिंदूधर्म कधीही विसरणार नाही. तुमच्यापेक्षा मला हजरत मोहम्मदबद्दल कमी आदर वाटत नाही. परंतु दडपशाही आणि बळजबरीचा मार्ग धर्माला अधःपाताकडे नेणारा आहे, त्याला प्रगतीपथावर नेणारा नाही.**

**शमसुद्दिन साहेबांनी गाधीजींचा मुद्दा मान्य केला आणि त्याच्या पुष्ट्यर्थ कुराणमधील एक कडवे वाचून दाखवले. त्यानुसार धर्मात बळजबरीला कोणतेच स्थान असू शकत नाही. ते म्हणाले की मुसलमानांना मी सांगितले आहे की तुम्हांला जर पाकिस्तान हवा असेल तर तुम्ही अल्पसंख्य समुदायाला न्याय दिला पाहिजे व त्यांचा विश्वास जिंकायला पाहिजे. "तुम्ही जे काही करत आहा त्याने पाकिस्तानचा खून होत आहे."**

गांधीजी - जिल्हा न्यायाधीश श्री मॅकनर्नींनी एक पत्रक काढले आहे. त्यानुसार नुकताच झालेल्या दंगलींनंतर करण्यात आलेले कोणतेही धर्मपरिवर्तन बळजबरीचे आणि म्हणून अवैध मानले जाईल आणि धर्मपरिवर्तनानंतरही पूर्वाश्रमीच्या हिंदूंना हिंदूच मानले जाईल. सर्व मुसलमान जर अशी घोषणा करतील तर हा प्रश्न सोडवण्याकरिता त्याची फार मदत होईल. एखाद्याला जर कलमा म्हणण्याची इच्छा होत असेल तर त्याचे जाहीर प्रदर्शन करण्याची आवश्यकता काय? अंतःकरणापासूनच्या धर्मपरिवर्तनाकरिता ईश्वराशिवाय अजून कोणाच्याही साक्षीची गरज नसते.

**यामुळे मूलभूत शिष्टाचाराविरुद्ध एकीकडे वर्तन करत राहायचे आणि दुसरीकडे कलमा म्हणायचा हा इस्लाम नसून इस्लामचे विडंबन आहे. यामुळे मला प्लिमथ बंधूंची आठवण येते** (पाहा आत्मकथा). **त्यांनी मला ख्रिश्चन धर्म स्वीकारण्याकरिता आमंत्रित केले होते. ते म्हणाले येशू सर्वांचे पाप नाहीसे करत असल्यामुळे तुम्ही (म्हणजे गांधीजी) काहीही करू शकाल. याला स्पष्ट विरोध करणारे नव्या करारात एक कडवे आहे. : "जो केवळ ओठांनी हे देवा, हे देवा करतो त्याच्याकरिता नाही."** (सेंट मॅथ्यू, ७.२१) **यामुळे बळजबरीने वा यांत्रिकपणे केलेल्या धर्परिवर्तनाने कोणताही मुसलमानेतर मुसलमान होऊ शकत नाही असे सर्व मुसलमामान पुढाऱ्यांनी जाहीर करावे. त्यामुळे इस्लामची केवळ लाजिरवाणी परिस्थिती होते.**

**प्रतिनिधीमंडळाचा एक सदस्य, जो आतापर्यंत काहीही बोलला नव्हता, म्हणाला, "हे जे काही घडले ते अपप्रचारामुळे घडले आहे."**

गांधीजी - आपण अपप्रचाराला बळी पडू नये. आपण जर नीट वागलो तर अपप्रचाराचा काहीही परिणाम होणार नाही.

**अखेरीस प्रतिनिधीमंडळातील एक जण म्हणाला की शांतता आणि विश्वास निर्माण करण्याकरिता तर आम्ही हिंदूंबरोबर अंतर्भागात जाण्याकरिता तयार आहो परंतु त्यांचा आमच्यावर विश्वास नाही.**

गांधीजी म्हणाले की त्याला महत्त्व नाही. मी तुमचा प्रस्ताव आनंदाने स्वीकारतो. ते म्हणाले :

तुम्ही आणि मी मिळून अंतर्भागातील प्रत्येक खेड्याला आणि घराला भेट देऊ आणि शांतता आणि विश्वासाचे वातावरण प्रस्थापित करू.

'हरिजन', नोव्हेंबर, २४, १९४६

---------------

# ५८. निर्वासितांशी चर्चा

('हिंदुस्तान स्टॅन्डर्ड'च्या वृत्ताप्रमाणे चौमुहानी येथे जात असताना लक्षम जंक्शन येथे सकाळपासूनच जवळपास १०,००० लोक गांधीजींची वाट पाहत होते. तिथे ते दुपारनंतर थोड्याच वेळात पोहोचले होते. त्या जमावाला उद्देशून गांधीजींनी केलेले हे भाषण)

मी काही प्रचाराच्या धावत्या दौऱ्यावर आलेलो नाही. मी इथे तुमच्याबरोबर तुमच्यातील एक होऊन राहायला आलो आहे. माझ्यात प्रांतवाद नाही. मी हिंदुस्थानी असल्याचा माझा दावा आहे आणि यामुळे मी गुजराती असलो तरी बंगालीसुद्धा आहे. जोपर्यंत हे भांडण मिटून सलोखा होत नाही आणि एकटी हिंदू मुलगीसुद्धा निर्भय होऊन मोकळेपणाने मुसलमानांमधून फिरू शकत नाही तोपर्यंत इथेच राहायचे आणि आवश्यकता पडली तर इथेच मरायचे अशी मी स्वतःशीच शपथ घेतली आहे.

तुमच्या अंतःकरणातील भीती नाहीशी करून तुम्ही मला सर्वात मोठी मदत करू शकता. आणि हा चमत्कार घडवून आणू शकेल असा जादूचा दिवा कोणता? रामनामाचा अमोघ मंत्र. हा तो जादूचा दिवा आहे. तुम्ही म्हणू शकाल की आमचा त्यावर विश्वास नाही. परंतु तुम्हांला माहीत नाही की त्याच्या इच्छेशिवाय तुम्ही एक श्वासही घेऊ शकत नाही. तुम्ही त्याला ईश्वर, अल्ला, गॉड, अहुरमझ्द काहीही म्हणू शकता. जितकी माणसे आहेत तितकी त्याची नावे आहेत. तो एकच आहे आणि दुसरा कोणीही नाही. एकमेव तोच महान आहे. त्याच्याहून महान कोणीही नाही. तो कालातीत आहे,  निराकार आहे, निष्कलंक आहे. तोच माझा मालक आणि स्वामी आहे.

**हृदयस्पर्शी शब्दांत गाधीजी म्हणाले की लहानपणी मी भित्रा होतो आणि मला सावलीचीसुद्धा भीती वाटायची. माझ्या आयाने, रंभाने मला भीतीवरील उपाय म्हणून रामनामाचे रहस्य समजावून सांगितले. "तुला जेव्हा भीती वाटेल तेव्हा रामनाम घे. तो तुझे रक्षण करील," असे ती मला सांगायची. तेव्हापासून रामनाम माझ्याकरिता रामबाण उपाय झाला. सर्व प्रकारच्या भीतीवरील तो माझा अचूक वा अमोघ उपाय आहे.**

**त्याचा वास नेहमीच पवित्र व्यक्तीच्या अंतःकरणात असतो. बंगालमध्ये ज्याप्रमाणे श्री चैतन्य आणि रामकृष्ण परमहंसांचे नाव घेतले जाते त्याचप्रमाणे काश्मीरपासून तर कन्याकुमारीपर्यंत हिंदूंच्या घराघरांतून रामनाम घेतले जाते. भक्तशिरोमणी तुलसीदासांनी आपल्या अमर रामायणातून रामनानाचा हा संदेश दिला आहे. तुम्ही जर त्या नावाला घाबरून वागाल तर तुम्हांला या जगात इतर कोणालाही घाबरण्याचे कारण राहणार नाही, मग तुम्ही राजा असा की भिकारी.**

**"अल्लाहो अकबर" या घोषणेला तुम्ही घाबरण्याचे कारण काय? इस्लामचा अल्ला हा निरागस लोकांचा रक्षक होता. पूर्व बंगालमध्ये जे करण्यात आले त्याला पैगंबरने शिकवलेल्या इस्लामची मान्यता नाही.**

**तुमची जर ईश्वरावर श्रद्धा असेल तर तुमच्या बायकामुलींची अब्रू घेण्याचे कोणात साहस आहे? यामुळे तुम्ही मुसलमानांना घाबरणे बंद करा. तुमचा जर रामनामावर विश्वास असेल तर तुम्ही पूर्व बंगाल सोडायला नको. तुमचा जिथे जन्म झाला, जिथे तुमचे पालनपोषण झाले तिथेच आवश्यकता पडली तर अब्रू वाचवण्याकरिता तुम्ही शूर स्त्रीपुरुषांप्रमाणे मरणही पत्करायला पाहिजे.**

संकटाला तोंड देण्याऐवजी संकटापासून दूर पळणे हा माणूस, ईश्वर आणि स्वतःवरील श्रद्धेचा अभाव आहे. अशा प्रकारे श्रद्धेचे दिवाळे निघाल्याचे घोषित करण्यापेक्षा बुडून मरणे चांगले.

तुम्ही जर सैन्याला विचाराल तर तेसुद्धा तुम्हांला सांगतील की ईश्वरच आमचा रक्षक आहे. यामुळे माझी इच्छा आहे की आता आम्हांला पोलिसांची वा सैन्याची आवश्यकता नाही. आमची त्या ईश्वराच्या संरक्षणात राहण्याची इच्छा आहे ज्याच्या संरक्षणाची सर्वांना इच्छा असते असे तुम्ही शमसुद्दिन साहेबांना सांगावे. (पुढील भाग 'द हिंदू'मधून घेतला आहे.)

**गांधीजी म्हणाले की सैन्य आणि पोलीस कोणतेही संरक्षण देऊ शकत नाहीत. युद्धात तुम्हांला कोणी वाचवू शकते काय असे तुम्ही सैनिकांना (जे गांधीजींबरोबर उभे होते) विचारू शकता. मृत्यूसमोर बंदुकांची काहीच मात्रा चालत नाही. केवळ ईश्वरच आपल्याला वाचवू शकतो. आपल्याला वाचवण्याचा मार्ग आपल्या बांधवांवर, मग ते हिंदू असो की मुसलमान, विसंबून राहणे हाच आहे. प्रेमाचा हाच धर्म शिकवण्याकरिता मी इथे आलो आहे.**

**ते पुढे म्हणाले की बंगालचे मंत्री आणि अधिकारी माझ्याबरोबर आहेत, परंतु माझी काळजी घेण्याकरिता नाही. तुम्ही तुमच्या मानव बांधवांवर आणि शेजाऱ्यांवर विश्वास ठेवा आणि त्यांच्याबद्दलची भीती मनातून काढून टाका हे शिकवण्याकरिता व ही श्रद्धा तुमच्या मनात निर्माण व्हावी म्हणून मदत करण्याकरिता ते माझ्याबरोबर आहेत. गांधीजी म्हणाले की मला खात्री आहे की लोक लवकरच सैन्य आणि पोलीस यांच्याशिवाय काम भागवणे शिकतील. ते जितक्या लवकर हे शिकतील तितके बरे होईल. लोक आजपासून असे म्हणू लागल्याचे ऐकण्यात मला आनंद होईल.**

'हरिजन', नोव्हेंबर २४, १९४६ आणि 'द हिंदू' नोव्हेंबर १०, १९४६

----------------

# ५९. प्रार्थना प्रवचन

(प्यारेलाल यांच्या "विकली लेटर" या लेखातून उद्धृत. ही सभा हिंदू विद्यामंदिर या स्थानिक शाळेत झाली होती. श्रोत्यांमध्ये बहुसंख्य म्हणजे ८५ टक्के मुसलमान होते असे प्यारेलाल लिहितात व श्रोत्यांची संख्या अदमासे १५,००० होती.)

चौमुहानी,

नोव्हेंबर ७. १९४६

खिलापतीच्या दिवसात पूर्व बंगालचा दौरा गांधीजींनी कशा प्रकारे केला होता ते गांधीजींनी श्रोत्यांना सांगितले. ते म्हणाले की त्या दिवसात मी जे काही म्हणतो ते बरोबर आहे असे मुसलमानांना वाटत होते. अलीबंधू जेव्हा स्त्रियांच्या सभेत जायचे तेव्हा ते डोळ्यांना पट्टी बांधायचे. परंतु मला मात्र माझे डोळे उघडे ठेवून जाण्याची परवानगी होती. माझ्याच आयांबहिणींकडे जाताना मी माझ्या डोळ्यांना का पट्टी बांधावी? पडदा घेणाऱ्या स्त्रियांमध्ये जाण्याची माझी इच्छा नसते. परंतु मी यायलाच पाहिजे असा अलीबंधूंचा आग्रह असायचा. स्त्रियांना मला भेटण्याची इच्छा असायची व माझा सल्ला त्यांच्या हिताकरिता आहे हे त्यांना माहीत असायचे. दक्षिण आफ्रिकेत मी मुसलमान मित्रांबरोबर २५ वर्षे राहिलो आहे. त्यांनी मला आपल्या कुटुंबातील सदस्याप्रमाणे वागवले आणि माझ्यासमोर पडदा पाळण्याची आवश्यकता नाही असे त्यांनी आपल्या बहिणींना आणि पत्नीला सांगितले होते. मी इंग्लंडमध्ये बॅरिस्टर झालो होतो, परंतु भोजनावळीच्या बॅरिस्टरचा काय उपयोग? तो दक्षिण आफ्रिका होता आणि तिथे मी जो संघर्ष केला होता त्याने मला घडवले आहे. तिथेच मला सत्याग्रहाचा आणि सविनय कायदेभंगाच्या शस्त्रांचा शोध लागला होता.

आज मी जड अंतःकरणाने तुमच्याजवळ आलो आहे. आपल्या मातृभूमीने असे कोणते पाप केले आहे की आज तिची मुले - हिंदू आणि मुसलमान - आपसात भांडत आहेत? पूर्व बंगालच्या काही भागांत एकही हिंदू स्त्री सुरक्षित नसल्याचे मी ऐकले आहे. बंगालमध्ये आल्यापासून मी मुसलमानांच्या अत्याचाराच्या भयानक गोष्टी ऐकतो आहे. शहीद साहेब, तुमचे प्रधानमंत्री आणि शमसुद्दिन साहेब यांनी मान्य केले आहे की मी ऐकलेल्या वृत्तात काही तथ्य आहे. मुसलमानांशी भांडण्याकरिता आणि हिंदूंना हुसकवण्याकरिता मी इथे आलेलो नाही. माझा कोणीही शत्रू नाही. मी ब्रिटिशांशी आयुष्यभर झगडलो. तरीही ते माझे मित्र आहेत. मी त्यांचे अशुभ कधीही चिंतिले नाही.

बळजबरीचे धर्मांतर, बळजबरीने गोमांस खायला लावणे, अपहरण आणि बळजबरीने विवाह लावणे याबद्दल मी ऐकले आहे. खून, जाळपोळ आणि लूट यांच्याबद्दल तर बोलायचे कारणच नाही. तुम्ही मूर्तीभंजन केले आहे. मुसलमान मूर्तीपूजा करत नाहीत आणि मीसुद्धा करत नाही. परंतु जे मूर्तीपूजा करतात त्यांच्या पूजेत तुम्ही अडथळा का आणावा? या घटनांनी इस्लामला बट्टा लागला आहे. ते म्हणाले : मी कुराणचा अभ्यास केला आहे. इस्लाम या शब्दाचा अर्थच मुळी शांतता आहे. मुसलमान सलाम आलेकुम म्हणून स्वागत करतात. याचा अर्थ सर्वांकरिता शांतता असा आहे, मग ते हिंदू असो वा मुसलमान वा अजून कोणी. नोआखाली आणि टिपरा इथे जशा घटना घडल्या तशा घटना कुठेही घडू देण्याची इस्लाममध्ये परवानगी नाही. शहीद साहेब आणि जे कोणी मुसलमान पुढारी मला भेटले त्या सर्वांनी अशा घटनांचा एकमुखाने निषेध केला आहे. पूर्वबंगालमध्ये मुसलमानांच्या संख्येचे प्रमाण इतके जास्त आहे की त्यांनी तेथील अतिशय अल्पसंख्य असलेल्या हिंदू समाजाचे पालकत्व स्वीकारले पाहिजे अशी माझी अपेक्षा आहे. हिंदू स्त्रियांना तुम्ही (मुसलमानांनी) सांगायला पाहिजे की जोपर्यंत आम्ही इथे आहो तोपर्यंत कोणीही तुमच्याकडे वाकड्या नजरेने पाहू शकणार नाही. (नोव्हेंबर १० च्या 'द हिंदू'त वृत्त होते : "गांधींनी आपले २० मिनिटांचे भाषण संपवल्यानंतर आणि भाषणाचा बंगाली अनुवाद सतीश चंद्र दास गुप्ता यांनी वाचून दाखवण्यापूर्वी मुसलमानांची सायंकाळची नमाझ पढण्याची वेळ झाली होती. श्रोत्यांमधील मुसलमानांना नमाझ पढता यावी म्हणून दहा मिनिट प्रार्थनासभेला विश्रांती देण्यात आली.)

'हरिजन', डिसेंबर १, १९४६

-----------

## ६०. चितगावच्या लोकांना संदेश

(वृत्त असे आहे : "चौमुहानी इथे गांधीजींना भेटण्याकरिता एक प्रतिनिधीमंडळ गांधीजींची वाट पाहत होते. त्यांनी गांधीजींना चितगावची परिस्थिती समजावून सांगितली." )

चौमुहानी,

[नोव्हेंबर ७, १९४६ला वा त्यानंतर]

(गांधीजी चौमुहानी येथे नोव्हेंबर ७, १९४६ला पोहोचले होते.)

निर्भयतेची आणि आत्मबलिदानाची भावना अंगी बाणवा. स्थलांतर करू नका.

'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', नोव्हेंबर १६, १९४६

---------------

# ६१. मदत कार्यकर्त्यांशी चर्चा

(प्यारेलाल यांच्या “विकली लेटर” या लेखातून उद्धृत)

चौमुहानी,

[नोव्हेंबर ७, १९४६ला वा त्यानंतर]

गांधीजी - दुःखद गोष्ट ही नाही की इतक्या सगळ्या लोकांना वेड लागले, दुःखद गोष्ट ही आहे की इतके सगळे हिंदू याचे साक्षीदार होते. पूर्व बंगालमधील एकेक हिंदू जर मेला असता तर मला त्याचे काहीही वाटले नसते. राजपूतांनी काय केले होते हे तुम्हांला माहीत आहे काय? रणांगणात आपले बलिदान करण्याकरिता जाण्यापूर्वी त्यांनी आपल्या स्त्रियांना मारून टाकले होते. ज्या जिवंत राहिल्या त्यांनी आपण पकडले जाऊ नये आणि आपली अब्रू जाऊ नये म्हणून किल्ला पडण्यापूर्वी जोहार केला होता. हजारो मुसलमानांनी त्यांच्यामधील मूठभर हिंदूंना मारून टाकण्यात त्यांचे कोणतेच शौर्य नाही. परंतु हिंदूच्या डोळ्यांसमोर त्यांच्या स्त्रियांचे अपहरण केले जावे, त्यांच्यावर बलात्कार केला जावा, बळजबरीने धर्मांतर केले जावे व बळजबरीने विवाह लावले जावे  व त्यांना काहीही करता येऊ नये इतका हिंदूंचा अधःपात व्हावा हे पाहून माझे हृदय विदीर्ण होते.

**प्रश्न - हिंदूंमध्ये आम्ही सुरक्षिततेची व आत्मविश्वासाची भावना कशी निर्माण करावी?**

गांधीजी - शूरपणाने मरणे शिकून. आपण आपला संताप स्वतःकडे वळवू या. पोलिसांच्या ठिकाणी लष्कर आणण्यात वा मुसलमान पोलिसांच्या ठिकाणी हिंदू पोलीस आणण्यात मला रस नाही. या सगळ्या निरुपयोगी गोष्टी आहेत.

**प्रश्न - आम्ही कोणाला विनंती करावी, कोणाकडे दाद मागावी - काँग्रेस की लीग की ब्रिटिश सरकार?**

यापैकी कोणाकडेही नाही. स्वतःलाच म्हणजे ईश्वराला विनंती करा.

**आम्ही तर हाडामासाची माणसे आहो. आम्हांला कोणता तरी भौतिक आधार हवा.**

मग तुम्ही तुमच्याच हाडामासाला विनंती करा. त्यावरील सर्व धूळ झटकून टाका, त्याला शुद्ध करा.

**एक महिला कार्यकर्ती - निर्वासितांच्या पुनर्वसनासंबंधी तुमचे काय मत आहे?**

गांधीजी - त्यांना आसाम वा पश्चिम बंगालमध्ये न पाठवता त्यांच्यात धैर्य निर्माण करायचे. असे झाले तर त्या आपापल्या मूळ घरी परत जाऊन राहू शकतील.

**हे कसे शक्य आहे?**

तुम्ही त्यांच्यामध्ये उभे राहा आणि त्यांना सांगा : 'तुमच्या केसालाही धक्का लागण्याआधी आमच्यातील एकेक माणूस मरेल.' असे झाले तर तुम्ही पूर्व बंगालमध्ये विरांगना निर्माण कराल.

**एकदा आमच्या मनातसुद्धा असा विचार आला होता.**

तुमच्या भागातील ५०० कुटुंबांतील प्रत्येकजण जरी मरण पावला असता तरी मला त्याचे काही वाटले नसते. इथे तुम्ही २० टक्के आहा. बिहारमध्ये मुसलमान तर केवळ १४ टक्के आहेत.

**त्यांना माहीत आहे की तिथे त्यांची कोणी अब्रू घेणार नाही.**

तिथे त्यांना अजूनच क्रूरपणाने मारण्यात आले आहे. आणि या वेळी स्त्रियांवरही अत्याचार झाले आहेत.

**सरकार  जर रेशन देणार नसेल तर काय करावे?**

किती तरी मदत करणाऱ्या संस्था आहेत. रेशन विकत घेतले जाऊ शकते. मला वाटते की बंगाल सरकारही ही गोष्ट पुढे वाढवू इच्छित नाही. हा धडा बिहारने नाही तर बंगालच्या दुराचारांनी शिकवला आहे. सरकार स्तब्ध झाले आह.

**तुम्ही आम्हांला नवीन दिशा दाखवली आहे. असे वाटते की आमच्या धमन्यातून नवीन रक्त सळसळू लागले आहे.**

'हरिजन', डिसेंबर ८, १९४६ आणि 'महात्मा गांधी - द लास्ट फेज', खंड १, भाग २, पृष्ठ २०-२१

('महात्मा गांधी - अखेरचे पर्व', खंड १, पृष्ठ २६-७)

----------------

# ६२. दत्तापाडा येथे भाषण

(प्यारेलाल यांच्या"विकली लेटर" या लेखातून उद्धृत. गोपाईबागला भेट दिल्यानंतर सायंकाळी गांधीजी चौमुहानी इथे परत निघाले होते. 'द बॉम्बे क्रॉनिकल'च्या वृत्ताप्रमाणे एका घराच्या आवाराच्या कोपऱ्यात त्या घरातील २२पैकी १९ लोकांची कत्तल करून त्यांना जाळून टाकण्यात आले होते. दत्तापाडा इथे ज्या घरात गांधीजी थांबले होते त्या घरात जवळपास ६००० निर्वासित होते.)

नोव्हेंबर ८, १९४६

**गांधीजी श्रोत्यांना म्हणाले की हिंदूंना आपले घर सोडून पळावे लागत आहे ही गोष्ट हिंदू आणि मुसलमान या दोघांकरिताही लाजिरवाणी आहे. मुसलमानांकरिता ही लाजिरवाणी गोष्ट आहे कारण हिंदू मुसलमानांना घाबरून पळत आहेत. एका माणसामुळे दुसऱ्या माणसाच्या मनात मुळात भीती निर्माणच का व्हावी? आणि हिंदूंनी भीतीच्या भावनेला बळी पडणे हीसुद्धा काही कमी लाजेची गोष्ट नाही. माणसाने ईश्वराशिवाय इतर कोणालाही घाबरू नये असे मी नेहमीच म्हणत आलो आहे. माझ्याबरोबर असलेले सरकारी अधिकारी आपल्या घरी परतण्याकरिता उत्सुक आहेत. एका ठिकाणी हजारो निर्वासितांची राहण्याची आणि त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करण्यात सरकारकरिताही अडचणी आहेत आणि निर्वासितांकरिताही ती गोष्ट अडचणीची होते. आपल्या कार्यक्षेत्रात अशा घटना घडल्या याची सरकारी अधिकाऱ्यांनासुद्धा लाज वाटते. नोआखाली आणि टिपरात जे काही झाले त्याबद्दल तुम्ही त्यांना क्षमा करावी आणि विसरावे असे मला वाटते. याचा अर्थ तुम्ही भ्याड व्हावे असा नाही. परंतु अप्रिय भूतकाळाच्या दुःखद आठवणींसह कुढत बसण्यात काहीही अर्थ नसतो. या भागातील हिंदू आणि मुसलमानांमध्ये परत एकदा मैत्री व्हावी असे मला वाटते. मला माहीत आहे की हिंदूंना फार सहन करावे लागले आहे आणि ते अजूनही सहन करत आहेत. मी हिंदूंना तोपर्यंत आपल्या घरी परतण्याकरिता सांगणार नाही जोपर्यंत प्रत्येक गावात किमान एक चांगला मुसलमान आणि एक चांगला हिंदू पुढे येऊन त्यांच्याबरोबर राहत नाही आणि त्यांच्या जीवनाच्या सुरक्षिततेबद्दल ग्वाही देत नाही. या भागात अशी ग्वाही देऊ शकणारे अनेक हिंदू आणि मुसलमान असतील याची मला खात्री आहे.**

**श्रोत्यातील एक मुसलमान मित्र म्हणाला की आम्ही त्यांची काळजी घेऊ असे आश्वासन तर आम्ही आधीच दिले आहे, परंतु हिंदू आमचे ऐकायला तयार नाहीत.**

**त्याला उत्तर देताना गांधीजी म्हणाले की तुमच्यावर ते विश्वास ठेवत नाहीत याचे कारण तुम्ही समजून घेतले पाहिजे आणि त्यावर विचार करून तुम्ही त्यांची भीती दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.** ('द बॉम्बे क्रॉनिकल'नुसार गांधीजींनी लोकांना काही प्रश्न असतील तर ते विचारण्याकरिता सांगितले) **एक हिंदू निर्वासित उभा राहिला आणि म्हणाला मुसलमानांच्या आश्वासनावर अजूनही आम्ही कसा काय विश्वास ठेवू शकतो? जेव्हा धोक्याची चिन्हे दिसू लागली होती तेव्हा आम्ही तुमची काळजी घेऊ असे ते म्हणाले होते परंतु त्यांनी आमचे रक्षण केले नाही. याशिवाय आम्ही कुठे जाऊन राहणार आहो? आम्ही सर्व काही गमावले आहे. आम्ही परत जाऊन जंगलात राहायला पाहिजे काय? आणि गावातील ५० चांगले मुसलमान जेव्हा आम्हाला वाचवू शकले नाही तेव्हा एक चांगला मुसलमान आता आमचे रक्षण कसा करू शकेल? आणि ती घटना**

**घडून एका महिना झाला असला तरी दुराचारी अजूनही मोकळे हिंडत आहेत.** (हे वाक्य 'द बॉम्बे क्रॉनिकल'मधील आहे.). **तुम्ही जेव्हा घरी परताल तेव्हा तुमच्या झोपड्या बांधण्याची व तुमच्या अन्नवस्त्राची काळजी सरकार घेईल. भूतकाळात काहीही जरी घडलेले असले तरी प्रत्येक गावात आता जर एक चांगला मुसलमान आणि एक चांगला हिंदू तुमच्या संरक्षणाची जबाबदारी घेत असेल तर तुम्ही त्यांच्या शब्दांवर विसंबून राहू शकता. कारण त्यांनी दिलेला तो शब्द गावातील सर्व मुसलमानांची सामूहिक जबाबदारी असेल. आणि असे झाल्यानंतरही तुम्ही घाबरत असाल तर तुम्ही भित्रे आहा असे म्हणावे लागेल, आणि भित्र्या लोकांना ईश्वरसुद्धा मदत करू शकत नाही.**

'हरिजन', डिसेंबर १, १९४६ आणि 'द बॉम्बे क्रॉनिकल', नोव्हेंबर ११, १९४६

-------------

# ६३. मुस्लिम लीगच्या पुढाऱ्यांशी चर्चा

(प्यारेलाल यांच्या "विकली लेटर" या लेखातून उद्धृत. प्यारेलाल म्हणतात : "त्या रात्री कलकत्त्याहून आलेले काही सहकारी आणि काही प्रमुख स्थानिक मुसलमान यांच्यासह शमसुद्दिन साहेब गांधीजींना भेटले आणि त्यांनी निर्वासितांच्या प्रश्नावर चर्चा केली.")

नोव्हेंबर ८, १९४६

**एका मित्राने सुचवले की हिंदूंमध्ये परत विश्वास निर्माण करण्याकरिता निर्वासितांनी आपापल्या घरी परतावे असे जे आवाहन मुसलमानांनी केले होते त्या आवाहनाचे हिंदू पुढाऱ्यांनी समर्थन करावे. गांधीजी यावर म्हणाले की हिंदूंच्या मनात जी आशंकेची आणि अविश्वासाची भावना आहे ती साधार आहे, ती दूर करण्याचा हा योग्य मार्ग नाही. जोपर्यंत प्रत्येक गावात किमान एक चांगला मुसलमान आणि एक चांगला हिंदू त्यांच्या सुरक्षिततेती ग्वाही देत नाही व हिंदूंच्या केसाला जरी धक्का लागला तर जे स्वतःची आहुती देण्याकरिता आम्ही तयार असू असे म्हणत नाहीत तोपर्यंत हिंदूंना आपल्या घरी परतण्याचा सल्ला देण्याकरिता मी असमर्थ आहे. असे लोक पुढे येऊ शकतात की नाही हे सांगणे मुस्लिम लीगच्या नेत्यांवर अवलंबून आहे. ते सरकारचे सदस्यसुद्धा आहेत. जे काही घडले त्यानंतर विश्वास स्थापित करण्याचा दुसरा कोणताही मार्ग नाही. त्या सर्वांनी गांधीजींची सूचना मान्य केली आणि ही गोष्ट कार्यवाहीत आणण्याकरिता आमच्याकडून शक्य असेल ते आम्ही करू असे ते म्हणाले.**

'हरिजन', नोव्हेंबर २४, १९४६

------------

## ६४. जितेंद्र चक्रवर्ती यांना पत्र

चौमुहानी,

नोव्हेंबर ८, १९४६

भाई जितेन (जितेंद्र चक्रवर्ती, बंगाल चरखा संघाचे सचिव.),

नोआखाली आणि टिपरा यांच्या सध्याच्या परिस्थितीत तुम्ही सुताच्या मोबदल्याशिवायही खादी विकू शकता. अशा प्रकारे विकलेल्या खादीचा हिशोब ठेवा.

आशीर्वाद,

बापू

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------------

## ६५. मणिलाल गांधी यांना पत्र

नोव्हेंबर ९, १९४६

चि. मणिलाल,

माझ्या उपोषणाचे ऐकून काळजी करू नकोस, उलट तुला आनंद झाला पाहिजे. कोणी माणूस जर आपले कर्तव्य पार पाडत असेल तर त्याची काळजी करण्याऐवजी आपण अधिक उत्साहाने आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. सध्या माझे अर्ध-उपोषण सुरू आहे. परंतु मी नेहमीप्रमाणे माझे काम करू शकतो. पूर्ण उपोषण जेव्हा सुरू होईल तेव्हा पाहू या. ते बिहारी लोकांच्या हातात आहे. राजेंद्र बाबू आणि इतर लोक तिथे गेले आहेत. ते आपल्या कामात यशस्वी होतील अशी आशा आहे. काही झाले तरी मला जे माझे कर्तव्य आहे असे वाटते ते मी पार पाडायला नको काय? यामुळे मुळीच काळजी न करता तू तुझे कर्तव्य करत राहा.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीनरून. जी. एन. ४९९३

-----------------

# ६६. वृत्तपत्रांना वक्तव्य

चौमुहानी,

नोव्हेंबर ९, १९४६

पटण्याहून पाठवण्यात आलेल्या दोन तारांमधून माझ्या उपवासाच्या "धमकीबद्दल" माझ्यावर टीका करण्यात आली आहे. "धमकी" या शब्दाचा उपयोग एका तारेत करण्यात आला आहे. माझे प्रस्तावित उपोषण कोणावर बळजबरी करण्याकरिता नाही; आपल्यामधील सुप्त विवेक जागा करण्याकरिता ते आहे. जे लोक भीतीपोटी वर्तन करतात ते स्वतःची आणि ते जे कार्य ते करू पाहतात त्या कार्याचीही हानी करतात. सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे की बिहारमध्ये अगदी अल्पसंख्य असलेल्या मुसलमानांवर हल्ला करून बिहारने निश्चितच हिंदुस्थाचे स्वातंत्र्य पुढे ढकलले आहे आणि त्याने संपूर्ण हिंदुस्थानमधील मुसलमानांना दुखवले आहे. बिहारचे लोक आपल्या मूर्खपणाच्या आणि भ्याडपणाच्या हिंसेबद्दल जर पश्चात्ताप व्यक्त करतील तर मात्र गोष्ट वेगळी आहे.

राष्ट्रपती आचार्य कृपलानी, डॉ. राजेंद्र प्रसाद आणि आता मौलाना अबुल कलाम आझाद आणि जयप्रकाश नारायण बिहारमध्ये आहेत. बिहारमध्ये मुसलमानांबरोबर करण्यात आलेला भयंकर दुर्व्यवहार ही एक निकृष्टतम सांप्रदायिकता आहे व त्यामुळे बिहारमध्ये विकसित होत असलेला राष्ट्रवाद पराभूत होईल. माझ्या उपोषणाचे उद्दिष्ट कोणालाही आपल्या कर्तव्यापासून विचलित करणे नसल्यामुळे माझ्या उपोषणाची निंदा करणाऱ्या प्रत्येकाला माझ्या प्रस्तावित उपोषणाचा दुरुपयोग न करण्याबद्दल मी सूचित करतो.

'द हिंदू', नोव्हेंबर ११, १९४६

----------------

# ६७. हसन शहीद सुऱ्हावर्दी यांना पत्र

दत्तापाडा,

नोव्हेंबर १०, १९४६

भाईश्री शहीद सुऱ्हावर्दी,

मी कल्पना केली होती त्यापेक्षा काम किती तरी कठीण आहे. आणि कायदे आझमनी 'ग्लोब'ला जे वक्तव्य (पाहा "प्रार्थना प्रवचन", नोव्हेंबर १४, १९४६) दिले आणि जे मी नोव्हेंबर १०च्या 'मॉर्निंग न्यूज'मध्ये पाहिले त्याने तर माझे काम अजूनच कठीण झाले आहे. सुरुवातीला ते सवर्ण हिंदू हा शब्द उपयोजितात व नंतर केवळ हिंदू हा श्ब्द वापरतात. हिंदू आणि मुसलमान यांच्यातील सहकार्य अगदी अशक्यप्राय गोष्ट आहे काय? जर तसे असेल तर बंगाल आणि हिंदुस्थानची काय अवस्था होईल? नोआखाली आणि टिपरामध्ये काय घडेल?

येथील निर्वासितांना जितक्या रेशनची गरज आहे त्याच्या निम्मे रेशनसुद्धा मिळत नाही आणि त्यांना मिळणारा तांदुळ खाण्यासारखा नाही. थंडीच्या दिवसात पांघरूण घेण्यासारखेही त्यांच्याजवळ काही नाही. त्यांच्या घरांची तोडफोड झाली आहे, साफसफाई चांगली नाही. सतीशबाबूंनी तयार केलेला अहवाल मी तुमच्याकडे पाठवत आहे.

येथील अधिकारी माझ्याबरोबर पूर्ण सहकार्य करत आहेत व त्याकरिता मी तुमचा आणि त्यांचा आभारी आहे. दोन्ही समुदायातील मतभेद दूर करून त्यांच्यात मैत्रीभाव निर्माण करणे हे आपले उद्दिष्ट नाही काय?

तुमचा,

मो. क. गांधी

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

--------------

# ६८. प्रार्थना प्रवचन

(प्यारेलाल यांच्या “ऍन अपील टू कॉन्शस” या शीर्षकाखाली हे प्रकाशित झाले होते.)

दत्तापाडा,

नोव्हेंबर १०, १९४६

तुमचा माझ्यावर विश्वास असला वा नसला तरी मी तुम्हांला खात्रीपूर्वक सांगतो की मी हिंदू आणि मुसलमान या दोघांचाही सेवक आहे. मी इथे पाकिस्तानसंबंधी भांडण्याकरिता आलेलो नाही. हिंदुस्थानच्या नियतीत फाळणी लिहिलेलीच असेल तर मी ती टाळू शकत नाही. परंतु बळजबरीने पाकिस्तानची स्थापना होऊ शकत नाही हे मी तुम्हांला सांगून ठेवतो.

आताच जे भजन म्हणण्यात आले त्यात कवीने ‘ईश्वराची तुलना परिसाशी’ केली आहे. असे म्हणतात की परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होते. ही गोष्ट काही नेहमीच वांछनीय नसते. उदाहरणार्थ परिसाच्या स्पर्शाने रेल्वेच्या सर्व रुळांचे रूपांतर सोन्यात झाले तर त्यावर आगगाड्या धावू शकणार नाहीत. ईश्वराच्या स्पर्शाने आत्मा शुद्ध होतो. हे नेहमीच वांछनीय असते.

आपणा सर्वांमध्ये परीस आहे. मला माझ्या मुसलमान मित्रांना इतकेच सांगायचे आहे की तुम्ही एक देश म्हणून राहा की दोन देश म्हणून, परंतु तुम्ही हिंदूंशी मित्रांप्रमाणेच राहायला पाहिजे. तुम्हांला जर असे करायचे नसेल तर तसे तुम्ही स्पष्टपणे सांगायला पाहिजे. तशा परिस्थितीत मी पराभव जाहीर करीन. निर्वासित कायम निर्वासितांप्रमाणे राहू शकत नाहीत. सरकार त्यांना कायम खाऊ घालू शकत नाही. आणि त्यांना कोणत्या प्रकारचे खायला मिळत आहे? एका धडधाकट माणसाला जितक्या धान्याची आवश्यकता असते त्यापेक्षा निम्मे धान्य त्यांना मिळते. ना मासे मिळतात ना भाज्या. धान्याला पुरवठा म्हणून जास्त काहीही नाही. अशी अवस्था कायम राहिली तर फार दिवस त्यांचे अस्तित्व राहू शकत नाही. यामुळे मुसलमानांना ते परत आपल्या खेड्यात यायला नको असतील तर त्यांनी इतरत्र कुठे तरी जायलाच पाहिजे.

परंतु पूर्व बंगालचे हिंदू जरी निघून गेले तरी मी पूर्व बंगालच्या मुसलमानांमध्येच राहीन आणि ते देतील ते आणि त्यातील मला खाण्यासारखे असेल ते मी खाईन. मी माझे अन्न बाहेरून आणणार नाही. मला मासे अथवा मांस नको आहे. मला थोडीशी फळे, भाज्या आणि थोडेसे बकरीचे दूध तेवढे पाहिजे. बकरीच्या दुधाचा आणि धान्याचा जोपर्यंत प्रश्न आहे ईश्वराची इच्छा असेल तेव्हा मी ते घेईन. मी ते सोडले आहे आणि हिंदूंनी

बिहारमध्ये जे काही केले त्याचा त्यांना जेव्हा खरोखर पश्चात्ताप होईल तेव्हा मी ते परत घेऊ लागेन. हजारो हिंदूंनी शंभरेक मुसलमानांना घेरायचे वा हजारो मुसलमानांनी शंभरेक हिंदूंना घेरायचे आणि त्यांचा छळ करायचा यात कोणतेही शोर्य नाही, उलट हा भ्याडपणा आहे. न्यायाची लढाई तर ती असते की तिची पूर्वकल्पना दिली जाते आणि दोन्हीकडील लोकांची संख्या समान असते. याचा अर्थ असा नाही की अशा लढाईला माझी मान्यता आहे. असे म्हणतात की हिंदू आणि मुसलमान मित्रांप्रमाणे कधीही सोबत राहू शकत नाहीत वा एकमेकांशी सहकार्य करू शकत नाहीत. यावर विश्वास ठेवण्याकरिता कोणीही मला भाग पाडू शकत नाही, परंतु तुमचा जर यावर विश्वास असेल तर तुम्ही तसे स्पष्टपणे सांगायला पाहिजे. तशा परिस्थितीत हिंदूंनी परत आपल्या घरी जावे असे मी म्हणणार नाही. ते पूर्व बंगाल सोडून निघून जातील आणि ती गोष्ट मुसलमानांकरिता आणि हिंदूंकरिताही लाजिरवाणी होईल. उलटपक्षी तुम्हांला जर हिंदूंनी तुमच्यामध्ये राहावे असे वाटत असेल तर तुम्ही त्यांना सांगायला पाहिजे की तुम्ही संरक्षणाकरिता सैन्याकडे पाहण्याची गरज नाही, सैन्याऐवजी तुमची मुसलमान भावंडे तुमचे रक्षण करतील. तुमच्या मुली, बहिणी आणि आया आमच्या स्वतःच्या मुली, बहिणी आणि आयांप्रमाणे आहेत आणि आम्ही आमचे प्राण पणाला लावून त्यांचे संरक्षण करू. निर्वासित छावणीत मी निर्वासितांशी काल दोन शब्द बोललो.

त्याच वेळी जिल्हा न्यायाधीश श्री मॅकनर्नी निर्वासितांना म्हणाले की संपूर्ण मानवजात ॲडम आणि ईव्हपासून निघाली आहे. आपण कोणत्याही धर्माचे असलो तरी आपण सर्व एकाच कुटुंबाचे सदस्य वा नातलग आहो. यामुळे आपण नातलगांप्रमाणे सोबत राहायला पाहिजे. असे म्हणतात की काल सायंकाळी प्रार्थना प्रवचनानंतर एक माणूस आपल्या घरी परत गेला होता. त्याच्या घराला मुलमानांनी वेढा घातला असल्याचे त्याला आढळले. ते त्याला त्याच्या मालमत्तेला स्पर्श करू देत नव्हते. अशा परिस्थितीत, जर ही गोष्ट खरी असेल तर, मी कोणाला कसा काय आपल्या घरी परत जायला सांगू शकतो? मी काय म्हणालो त्यावर तुम्ही विचार करा आणि तुम्हांला खरोखर काय हवे आहे ते मला सांगा. त्याचप्रमाणे मी हिंदूंनाही सल्ला देईन. मला सांगण्यात आले आहे, आणि माझा त्यावर विश्वासही आहे की अनेक चांगले मुसलमान आहेत की ज्यांना हिंदूंनी आपल्या घरी परतावे असे वाटते, परंतु त्यांच्या मार्गात गुंड आडवे येतात. मला तुम्हांला सांगायचे आहे की चांगले मुसलमान एका आवाजाने बोलतील आणि आपले कर्तव्य पार पाडतील तर तथाकथित गुंडांचा कोणताही प्रभाव पडणार नाही व त्यांना आपल्या मार्गात सुधारणा करावी लागेल.

'हरिजन', डिसेंबर १, १९४६

# ६९. प्रार्थना प्रवचन

(प्यारेलाल यांच्या “विकली लेटर” या लेखातून उद्धृत. हा मौनवार असल्यामुळे गांधीजींचे व्याख्यान वाचून दाखवण्यात आले होते.)

दत्तापाडा,

नोव्हेंबर ११, १९४६

**गांधीजींनी जी दृश्ये पाहिली होती त्यामुळे त्यांचे हृदय फार व्यथित झाले होते. ते म्हणाले की मी जिथे कुठे गेलो तिथे मला जळालेली घरे दिसत होती आणि बळजबरीच्या धर्मांतराच्या व लूटमारीच्या हकिगती मी ऐकत होतो. हिंदू स्त्रियांनी शुभ चिन्ह असलेले कुंकू लावलेले नव्हते आणि त्यांच्या हातात शंखाच्या बांगड्याही नव्हत्या. मुसलमान बांधवांनी याचा एकमुखाने निषेध केला पाहिजे अशी माझी तीव्र इच्छा आहे. असे झाले तरच हिंदू आपल्या घरी परतू शकतील व दंगलीपूर्वी ते तिथे आणि जसे राहत होते तसे राहू शकतील. ते तिथे परतण्याआधी त्यांची घरे परत बांधली पाहिजे. त्याकरिता मुसलमानांनी मदत केली पाहिजे. मला वाटते की पवित्र कुराणाची आज्ञासुद्धा अशीच आहे.**

‘हरिजन’, डिसेंबर १, १९४६

------------

# ७०. अमतुस्सलाम यांना पत्र

[दत्तापाडा,]

नोव्हेंबर ११, १९४६

चि. अमतुस सलाम,

मला तुझे पत्र मिळाले. तू खादी इथे पाठव. मी नक्कीच येईन परंतु केव्हा ते मी सांगू शकत नाही. मला उशीर झाला तर बापा येतील. काम कठीण आहे. परंतु परिस्थिती कशीही असली तरी आपल्याला आपले कर्तव्य पार पाडावेच लागेल.

मी अजून काय लिहू? नोआखाली आणि सोमेरचडा येथून मी आता परतलो आहे. प्रार्थना संपली आहे आणि मी हे लिहीत आहे.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीनरून. जी. एन. ५३८

------------

# ७१. निर्मल कुमार बोस यांना पत्र

(निर्मल कुमार बोस कलकत्ता विद्यापीठात प्राध्यापक होते. नोआखालीच्या दौऱ्यात ते गांधीजींबरोबर नोव्हेंबर ८ तारखेपर्यंत होते व नंतर ते परत विद्यापीठातील कामावर रुजू झाले होते.)

[दत्तापाडा,]

नोव्हेंबर १२, १९४६

प्रिय निर्मल,

तुम्ही मला न भेटताच एकाएकी निघून गेला. तुम्ही सतीश बाबूंबरोबर आहा आणि त्यामुळे माझ्याबरोबर तुम्ही शेवटपर्यंत राहाल असे मला वाटत होते. हेमप्रभा देवी सांगत होत्या की तुम्हांला (गांधीजींना) गरज असली तर ते परततील. हो, मला तुमची गरज आहे आणि मी स्वतः वा सतीश बाबू यांच्यातर्फे मी तुम्हांला कोणतेही काम देऊ शकतो. तुम्हांला जर हे मान्य असेल तर ताबडतोब परत या. (ते नोव्हेंबर १७ला परत गांधीजींच्या कामात सहभागी झाले.)

तुमचा,

बापू

फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. १०५३२. सौजन्य - निर्मल कुमार बोस. शिवाय जी. एन. १०५०७

-------------

# ७२. द. बा. कालेलकर यांना पत्र

दत्तापाडा छावणी,

नोव्हेंबर १२, १९४६

ही आग जर विझणार नसेल तर माझी खात्री आहे की मला ती जाळून टाकील. माझ्याबरोबर जे लोक आहेत त्यांना कुठे तरी ठेवण्याची माझी इच्छा आहे व स्वतंत्रपणे ते काही तरी काम करतील. मी केवळ येथील आजूबाजूच्या खेड्यांमध्येच हिंडणार नाही. तुमची सेवा मी उपयोगात आणू शकणार नाही. तुम्हाला हरिजनकरिता जे काही पाठवता येत असेल ते पाठवत राहा.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. १०९८२

---------

# ७३. ब्रिजकृष्ण चांदीवाला यांना पत्र

दत्तापाडा छावणी,

नोव्हेंबर १२, १९४६

चि. ब्रिजकृष्ण,

तुला इथे बोलावणे चूक आहे असे मला वाटते. तू माझ्याबरोबर असल्यामुळे काहीही उपयोग होण्याची शक्यता नाही. माझ्याबरोबर जे लोक आहेत त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी ठेवण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. यामुळे तुझे कर्तव्य दिल्लीत थांबणे आणि तिथे जी काही सेवा करता येईल ती करणे आहे. शरीर निरोगी करणे हे तुझे पहिले कर्तव्य आहे.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. २४९४.

-------------

# ७४. महेश दत्त मिश्रा यांना पत्र

नोव्हेंबर १२, १९४६

चि. महेश,

दररोज मी तुझा विचार करतो. आता मी निश्चितपणे सागू शकतो की तुझे इथे येणे बेकार आहे. प्रत्येक सहकाऱ्याने वेगवेगळ्या खेड्यात जावे असे मी सुचवत आहे. मग तुला बोलावून काय फायदा होईल? खरे म्हणजे इथे सर्व बंगाली असायला पाहिजे. आधी तर माझ्याबरोबर कोणकोण आहेत हे मला पाहावे लागेल. नवीन कार्यकर्त्यांना पाठवून मी काय करणार आहे? नवीन आलेले लोक माझ्याबरोबर राहिल्यामुळे मदत कशी होईल हे ईश्वरालाच माहीत. हिंदुस्तनी हरिजनांची सेवा करण्याकरिता तू पात्र झाला आहेस काय? (पाहा "महेश दत्त मिश्रा यांना पत्र", ऑक्टोबर २२, १९४६ आणि "महेश दत्त मिश्रा यांना पत्र", ऑक्टोबर २४, १९४६).

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ६७१७. शिवाय सी. डब्ल्यू. ४४६१. सौजन्य महेश दत्त मिश्रा

--------------

# ७५. जयप्रकाश नारायण यांना पत्र

दत्तापाडा,

नोव्हेंबर १२, १९४६

चि. जयप्रकाश,

मला वाटते की आज तू बिहारमध्ये ईश्वर आहे. बिहार खरोखर शांत होणार आहे काय? आपण फार मोठी चूक केली आहे. आता काय होणार आहे हे मला स्पष्टपणे लिही. हातचे काहीही राखून न ठेवता मला तुझे मत दे. मला वाटते की या वेळी काँग्रेस भरवू नये. प्रत्येक प्रांतातील पुढाऱ्याने आपापल्या प्रांतात थांबावे. तू माझे मत सर्वांना कळवू शकतो. मी कदाचित असे करू शकणार नाही कारण मला फार थोडा मोकळा वेळ आहे. प्रभा (प्रभावती, जयप्रकाश नारायण यांची पत्नी) कुठे आहे? काय करते? तू चांगला असशील अशी आशा आहे.

आशीर्वाद,

बापू

श्री जयप्रकाश नारायण,

पटना.

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------------

# ७६. राजेंद्र प्रसाद यांना पत्र

दत्तापाडा,

नोव्हेंबर १२, १९४६

भाई राजेंद्र बाबू,

तुम्ही परत आजारी पडला! आता तुम्ही कसे आहा? बिहारची परिस्थिती कशी आहे? अत्याचार करणारांना पश्चात्ताप होत आहे काय? त्यांना तिथे माझी गरज आहे काय? गरज पडायला नको. बिहारचा संताप जर शांत होणार नसेल तर मला जिवंत राहण्याची इच्छा नाही कारण तसे झाले तर माझे जीवन निरर्थक होईल. तिथे काय परिस्थिती आहे हे मला थोडक्यात लिहा. येथील काम अतिशय नाजूक आहे. त्यातून काय बाहेर पडते ते पाहू या.

आशीर्वाद,

बापू

डॉ. राजेंद्र प्रसाद,

पटना.

हिंदी प्रतीवरून.प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-------------

# ७७. प्रार्थना प्रवचन

(प्यारेलाल यांच्या "विकली लेटर" या हरिजनमधील लेखातून. श्रोत्यात बहुतांश निर्वासित होते.)

दत्तापाडा,

नोव्हेंबर १२, १९४६

**निर्वासितांच्या घरी परतण्याबद्दल गांधीजींनी परत चर्चा केली. ते म्हणाले की युनियन नंबर सहाचे उपाध्यक्ष मौलवी साहेब यांनी, ज्यांनी माझ्याआधी तुम्हांला संबोधित केले होते, मुसलमानांच्या नावावर तुम्हांला तुमच्या घरी परतण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. परंतु भाषणात हे जरी सोपे वाटत असले तरी त्याप्रमाणे वर्तन करणे सोपे नाही. परत एकदा हे दोन समुदाय शांततापूर्वक आणि सुसंवाद साधून राहत असल्याचे पाहण्याकरिता प्रत्येकजण उत्सुक आहे. याकरिता या दोन्ही समुदायाचा एकच धर्म असण्याची आवश्यकता नाही. अंतःकरण हेलावून टाकणाऱ्या विध्वंसाची भयानक दृश्ये मी पाहिली आहेत. अत्याचारपीडित लोकांचे दुःखीकष्टी चेहरे मी पाहिले आहेत. एकदा त्यांना बळजबरीने धर्मांतर करण्यात लावण्यात आले आहे, परत असे केले जाऊ शकेल अशी भीती त्यांना वाटते. गांधीजी म्हणाले की तुम्ही भीती सोडायला पाहिजे. जो माणूस ईश्वराच्या नावाचा त्याग करायला तयार नसतो तोच जगण्याकरिता पात्र असतो.** (या परिच्छेदातील राहिलेला भाग 'द हिंदुस्तान टाईम्स'मधून घेतलेला आहे.) जालियनवाला बागच्या दिवसात कशा प्रकारे लहानलहान इंग्रज मुलेसुद्धा धडधाकट माणसाला पोटावर रांगायला लावायचे ते मला आठवते. ज्या गल्लीतून त्यांना रांगायला लावले जात असे तिचे नावच रांगणारी गल्ली (क्रॉलिंग लेन) असे पडले आहे. ते लोक माणसाच्या रूपात दिसत होते खरे परंतु त्यांची अवस्था किडाकीटकापेक्षा वाईट होती. यामुळे तुम्ही रामनाम घ्यायला शिकायला पाहिजे आणि मरण जरी पत्करावे लागले तरी तुम्ही रामनाम सोडायला नको.

**मला सैन्याचा आणि पोलिसांचा मोह नाही. पोलिसांचे काम चोर आणि डाकूंना पकडणे आहे, आणि सैन्याचे काम विदेशी आक्रमणापासून तुमचे रक्षण करणे आहे. आपसातील भांडणतंटा विसरायला आणि मित्राप्रमाणे राहण्याकरिता पोलीस शिकवत नसतात. जोपर्यंत प्रत्येक गावातील एक चांगला हिंदू आणि एक चांगला मुसलमान तुमच्या सुरक्षिततेची जबाबदारी घेत नाही तोपर्यंत मी तुम्हांला परत आपल्या गावात जाण्याकरिता सांगू शकत नाही.** (हे वाक्य 'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड'मधून घेतले आहे.) **निर्वासितांना परत आपल्या गावात नेऊन वसवण्याची योजना तेव्हाच यशस्वी होऊ शकते जेव्हा मुस्लिम लीगला शांतता हवी असेल व ती या कामाकरिता सहकार्य करील. शमसुद्दिन साहेब दोन वा तीन दिवसात येत आहेत. लीगच्या सरकारला काय करायचे आहे ते तुम्ही त्यांच्या तोंडूनच ऐकाल.**

'हरिजन', डिसेंबर १, १९४६ आणि 'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', नोव्हेंबर १५, १९४६

----------------

# ७८. दत्तापाडा येथील सहकाऱ्यांशी चर्चा

(प्यारेलाल यांच्या "अ व्हेंचर इन फेथ" या लेखातून उद्धृत.)

दत्तापाडा,

नोव्हेंबर १३, १९४६

**सकाळी सकाळीच गांधीजींनी आपल्या सहकाऱ्यांना एक महत्त्वाचा निर्णय कळवला. ते म्हणाले की मी ठरवले आहे की माझ्याबरोबर असलेल्या लोकांमधील प्रत्येकाला मी एकेका दंगलग्रस्त गावात पाठवणार आहे. त्यात भगिनींचाही समावेश असेल. व ती वा तो त्या त्या गावात मुक्काम करील आणि त्या त्या गावातील अल्पसंख्य हिंदूंच्या जीवाच्या आणि मालमत्तेच्या रक्षणाकरिता जामीन म्हणून त्याला गावात राहावे लागेल. आपल्या प्राणांची आहुती देऊनही हिंदू अल्पसंख्याकांचे आम्ही रक्षण करू अशी प्रतिज्ञासुद्धा आवश्यकता पडली तर त्यांना घ्यावी लागेल. मी घेतलेला हा निर्णय मान्य करण्याची कोणत्याही व्यक्तीवर सक्ती नाही. ज्यांची इच्छा असेल ते इथून निघून जाऊन माझ्या कोणत्या तरी रचनात्मक कार्याकरिता काम करू शकतात.**

ज्या लोकांच्या मनात मुसलमानांबद्दल वा इस्लामबद्दल दुर्भावना आहे वा जे काही घडले त्याबद्दलची चीड ज्यांच्या मनातून जाऊ शकत नाही त्यांनी यापासून दूर राहायला पाहिजे. असे लोक माझ्या योजनेअंतर्गत काम करून मला चुकीच्या पद्धतीने लोकांमध्ये उभे करतील.

**जोपर्यंत माझा संबंध आहे माझा हा निर्णय अंतिम आणि अपरिवर्तनीय आहे आणि यात चर्चेला कोणताही वाव नाही. जोपर्यंत पूर्व बंगालमधील हिंदू आणि मुसलमान शांततने आणि मिळूनमिसळून एकत्र राहणे शिकत नाहीत तोपर्यंत मी स्वतःला पूर्व बंगालमध्ये गाडून घ्यायचे ठरवले आहे. मी माझ्या कोणत्याही सहकाऱ्याकडून सेवा घेणार नाही आणि मी जिथे कुठे असेन तिथे स्थानिक लोकांकडून मला जी मदत मिळेल तिच्यावरच मी काम भागवीन** (यानंतर या विषयावर सायंकाळी जी चर्चा झाली होती त्यात ठक्करबापा आणि सुचेता कृपलानी यांनीही भाग घेतला होता.) **मी हे पाऊल उचलले नाही तर माझी अहिंसा अपूर्ण राहील. अहिंसा एक तर जीवनाचा नियम असेल वा नसेल.**

**माझे एक मित्र म्हणत असत की पतंजलीतील अहिंसा सूत्र — "अहिंसा प्रतिष्ठायां तत्संनिधौ वैरत्यागः" चुकीचे आहे आणि त्यात दुरुस्ती करून "अहिंसा परमोधर्मः" ऐवजी "हिंसा परमोधर्मः" असे म्हणायला पाहिजे; वेगळ्या शब्दांत अहिंसा नाही तर हिंसा हा सर्वोच्च नियम आहे. या आणीबाणीच्या वेळी माझी जर अहिंसेच्या नियमावरील श्रद्धा हरवली तर मी माझ्या दिवंगत मित्राची दुरुस्ती, जी मला चुकीची वाटते, मान्य केली पाहिजे.**

गांधीजी पुढे म्हणाले : बंगाली लोकांपेक्षाही मी बंगाली स्त्रियांना चांगला ओळखतो. आपण दबलेले आणि असहाय आहो असे आज त्यांना वाटते. मी आणि माझ्या सवंगड्यानी केलेल्या बलिदानामुळे तरी

स्वाभिमान कायम ठेवून कसे मरावे याची कला त्या शिकतील. यामुळे जुलूम करणारांचे डोळेसुद्धा कदाचित उघडतील व त्यांच्या हृदयाला पाझर फुटेल. माझे डोळे मिटल्याबरोबर त्यांचे डोळे उघडतील असे मला म्हणायचे नाही. परंतु अंतिम परिणाम तसाच झाल्याशिवाय राहणार नाही याबद्दल मला किंचितही संशय नाही. अहिंसा जर नाहीशी झाली तर हिंदू धर्मही नाहीसा होईल.

**सहकाऱ्यांमधील एकजण म्हणाला, "हा विषय धार्मिक नाही तर राजकीय आहे. हे हिंदूंच्या विरोधातील आंदोलन नसून काँग्रेसच्या विरोधातील आहे".**

गांधीजी - काँग्रेस ही शुद्ध हिंदू संघटना आहे असे त्यांना वाटते हे तुम्हांला दिसत नाही काय? आणि राजकीय, धार्मिक अशा परस्परांशी संबंध नसलेल्या कप्प्यात जीवन विभागलेले नसते हे तुम्ही विसरू नका. आपण शब्दांच्या जाळ्यात गुंतू नये. हा तिढा कसा सोडवायचा - हिंसक पद्धतीने की अहिंसक - हा प्रश्न आहे. वेगळ्या शब्दांत माझी पद्धत आज परिणामकारक आहे काय?

**प्रश्न - ज्या लोकांना तुमच्या रक्ताची तहान लागली आहे त्यांच्यांशी तुम्ही कशी काय चर्चा करू शकाल? अगदी कालपरवाच आपला एक कार्यकर्ता मारला गेला.**

गांधीजी - मला ते माहीत आहे. ही आग विझवणे हेच तर आमचे काम आहे.

**दुसऱ्या एका कार्यकर्त्याने विचारले की सध्याच्या परिस्थितीत लोकांना आपापल्या घरी परतण्याकरिता सांगणे योग्य होईल काय? यात भरपूर धोका नाही काय?**

**गांधीजींनी उत्तर दिले की एखाद्या गावातील लोक सामूहिकपणे परतलेल्या लोकांच्या सुरक्षिततेची ग्वाही देत असतील आणि त्या ग्वाहीची जबाबदारी त्या खेड्यात त्यांच्याबरोबर राहणारा एक चांगला हिंदू आणि एक चांगला मुसलमान घेत असेल आणि आवश्यकता पडली तर आपल्या प्राणांची बाजी लावू शकत असेल तर त्यात कोणतीही हानी नाही. जर कोणी अशा प्रकारे जामीन राहत असेल तर निर्वासितांनी आपल्या घरी परतायला पाहिजे आणि जो काही धोका असेल तोही पत्करायला पाहिजे. त्यांच्यात जर हा धोका पत्करण्याचे साहस नसेल तर पूर्व बंगालमधील हिंदू धर्माचे दिवस भरले असे समजा. पूर्व बंगालचा प्रश्न केवळ एकीकृत बंगाल नाही. आज हिंदुस्थानच्या लढाईचा निकाल पूर्व बंगालमध्ये लागणार आहे. आज काही लोक मुसलमानांना शिकवत आहेत की हिंदू धर्म अतिशय घृणित धर्म आहे आणि त्यामुळे त्यांना बळजबरीने इस्लाम स्वीकारायला लावणे ही पुण्याची गोष्ट आहे. यामुळे बळजबरीने मुसलमान केलेल्या लोकांची संतती तरी मुसलमान राहील. बदला हा जर आजचा नियम असेल तर मुसलमानांनी जी घृणित कृत्ये केली असे म्हणतात त्यावर हिंदूंना मात करावी लागेल. मित्र राष्ट्र हिटलरशी त्याच्याच शस्त्रांनी लढायला निघाले आणि अखेरीस ते हिटलरहूनही मोठे हिटलर झाले.**

**प्रश्न - या खेड्यांमध्ये अत्याचारी तसेच मुक्तपणे हिंडत असताना लोकांना आम्ही आश्वस्त कसे करू शकतो?**

गांधीजी - ज्या लोकांची परतण्याची इच्छा आहे त्यांच्या सुरक्षिततेकरिता एक चांगला मुसलमान आणि एक चांगला हिंदू यांनी जामीन राहण्याबद्दलचा माझा आग्रह याकरिताच आहे. अशा चांगल्या व्यक्तीचे नाव बंगालचे सरकार चालवणाऱ्या मुस्लिम लीगने दिले पाहिजे.

'हरिजन', नोव्हेंबर २४, १९४६

-----------------

# ७९. अधिकाऱ्यांशी चर्चा

(या अधिकाऱ्यांमध्ये जिल्हा न्यायाधीश, पोलीस अधीक्षक आणि इतर काही अधिकाऱ्यांचा समावेश होता. याशिवाय तिथे मदत संघटनांचे किती तरी प्रतिनिधी, निर्वासित आणि काही स्थानिक मुसलमान होते.)

दत्तापाडा,

नोव्हेंबर १३, १९४६

**आदल्या दिवशी प्रार्थनासभेत बोलताना मौलवी साहेब म्हणाले होते की मुसलमानांपैकी किती तरी प्रतिष्ठित आणि मानमरातब असलेल्या मुसलमानांना, त्यांनी कोणताही अपराध केलेला नसूनही, अटक करण्यात आलेली असल्यामुळे ते स्वतःच असुरक्षित असताना ते हिंदूंना पळून जाण्याकरिता कसे काय भाग पाडू शकतील? आणि हिंदू आणि मुसलमानांच्या मैत्रीत हीच खरी अडचण आहे.**

**गांधीजींनी उत्तर दिले की यामुळे हिंदूंशी चांगले संबंध ठेवण्यात का अडचण यावी हे मला कळत नाही. उलटपक्षी यामुळे तर हिंदूंशी अधिक चांगले संबंध कायम करण्याची आणि त्यांचा विश्वास जिंकण्याची प्रेरणा मिळाली पाहिजे. तसे झाले तर निर्दोष मुसलमानांना कायद्याच्या सापळ्यात अडकवण्याकरिता कोणतेही कारण राहणार नाही. खरे म्हणजे आपल्यासमोरील विषयाच्या दृष्टीने या मुद्द्याचा काहीही संबंध नाही.**

जेव्हा अपराधात लोक फार मोठ्या संख्येत भाग घेतात तेव्हा अपराध्यांबरोबर काही निरपराध लोकही अडकण्याची भीती असते. जगभरात असे होत असते. याचा अर्थ असा नाही की दोषी नागरिकांविरुद्ध कोणतीही कायदेशीर कारवाई करू नये.

**याचा उपाय हिंदू आणि मुसलमानांनी मिळून आपसात चर्चा करावी आणि दोषी लोकांची यादी करावी. असे झाले तर खरोखर निर्दोष असलेल्या कोणत्याही व्यक्तीला झळ लागणार नाही. खरोखरच्या अपराधी लोकांना पकडणे ही अधिकाऱ्यांच्या तसेच स्थानिक मुसलमानांच्याही प्रामाणिकपणाची सारखीच कसोटी आहे. नंतर मुस्लिम सदस्यांना संबोधत गांधीजी पुढे म्हणाले :**

मी इथे तुमचे सहकार्य मिळवण्याकरिता आलो आहे. तुमचा पक्ष प्रभावशाली आहे. इथे जे काही घडले त्यातून इस्लामचे उज्ज्वल रूप तर सोडाच कोणतेही रूप प्रतिबिंबित होत नाही. हे तर इस्लामला नाकारणे आहे. हिंदू आणि मुसलमानांमध्ये सहकार्य होऊ शकते काय हा आपल्यासमोर पहिला प्रश्न आहे. निर्वासितांना आपल्या गावात परतणे का शक्य होत नाही याची कारणे मी सुऱ्हावर्दींना कळवली आहे. जो विध्वंस मी काल पाहिला तो धक्कादायक होता. या गोष्टींवर पडदा टाकता येऊ शकत नाहीत. याला तोंड देण्याकरिता ताबडतोब धैर्याने पाऊल टाकणे आवश्यक आहे.

'महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड २, पृष्ठ ३६ -३७

# ८०. सुधीर घोष यांना पत्र

नोव्हेंबर १४, १९४६

चि. सुधीर (हे देवनागरीत आहे),

मला तुझ्या दोन चिठ्ठ्या मिळाल्या. ('गांधीज एमिसरी' या पुस्तकात "अमिय चक्रवर्ती यांच्याशी चर्चा", डिसेंबर ४, १९४६. सुधीर घोष स्पष्ट करतात हा त्या दोन पत्रांचा मसुदा होता जो स्टॅफर्ड क्रिप्स आणि पॅथिक लॉरेन्स यांना गांधीजींचा मुद्दा समजावून सांगण्याकरिता तयार करण्यात आला होता.) आता तर तिथे (दिल्लीत) तुझी उपयोगिता अजूनच जास्त आहे. परंतु तुला माझ्याशी जेव्हा केव्हा सल्लामसलत करण्याची आवश्यकता वाटेल तेव्हा तू मोकळेपणाने येऊ शकतो. काही काळ तरी मी पूर्व बंगालमध्ये बांधला गेलो आहे. कदाचीत येते काही महिनेसुद्धा.

तुझी दोन्ही पत्र ज्या स्वरूपात आहेत त्या स्वरूपात चांगली आहेत. व्हाईसरायबद्दल मी जे म्हणालो होतो ते अर्थातच बरोबर आहे. दोन्ही प्रमुख पक्षांचा आपापल्या मार्गाने धीर खचला आहे. हीच अवस्था तिसऱ्या पक्षाची म्हणजे ब्रिटिशांची आहे. ते सुसंगतपणे विचार करू शकत नाहीत. सैन्याचा अभिमान आणि सत्तेचा मोह त्यांना तसे करू देत नाही. इतरही आपल्यासारखेच आहेत असे आपल्याला वाटत असते. यामुळे प्रत्येक गोष्टीकडे समत्वबुद्धीने पाहण्याची दृष्टी यथाशक्ती विकसित करा.

या देशात परिपूर्ण शांतता प्रस्थापित होईपर्यंत हा देश सोडायचा नाही हे ब्रिटिशांचे स्वप्न अशक्यप्राय आहे असे वाटते. जो कोणता पक्ष सत्ता सांभाळण्याकरिता तयार असेल आणि ज्याच्यात तशी क्षमता असले त्या पक्षाकडे लवकरात लवकर संपूर्ण सत्ता हस्तांतरित करणे, सैन्यातील ब्रिटिश माघारी बोलावणे आणि उरलेले सैन्य भंग करणे इतकेच ब्रिटिश करू शकतात आणि करायलाही पाहिजे. ब्रिटिश हिताच्या रक्षणाकरिता सैन्याचा काही भाग ठेवण्याचा त्यांनी विचार करू नये. ही गोष्ट त्यांनी हिदुस्थानातील लोकांच्या सद्भावनेवर अवलंबून ठेवावी. शांततापूर्वक हस्तांतरणाचा हाच राजमार्ग आहे, दुसरा कोणताही नाही. अजून हा मार्ग मंत्रिमंडळाच्या पचनी पडलेला नाही. मी वर सांगितलेल्या विचारांतून जे कोणते उपसिद्धांत निघतात ते तुला स्वतःलाच सुचू शकतात व त्यावर तू काम करू शकतोस. तुला जर कोणत्याही मुद्द्यावर शंका वाटत असली तर कोणाबरोबर तरी मला तुझ्या शंका पाठव.

तुला आणि शांतीला (सुधीर घोष यांची पत्नी) स्नेह

बापू

सुधीर घोष पेपर्स. सौजन्य - नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. शिवाय गांधीजीज एमिसरी यातील पृष्ठ २१२ आणि १३मध्ये.

# ८१. जयसुखलाल गांधी यांना पत्र

नोव्हेंबर १४, १९४६

चि. जयसुखलाल,

मी तुझ्या तारेचे उत्तर दिले आहे. तुम्ही दोघांनीही इथे थांबावे असे मी म्हणू शकत नाही. इथे करा वा मराचा प्रश्न आहे. करा म्हणजे मुसलमानांना प्रकाश दाखवणे. याशिवाय माझ्याबरोबर जे लोक आहेत ते सर्व वेगवेगळ्या गावात जाऊन मुक्काम करतील आणि आवश्यकता पडली तर आपल्या प्राणांची आहुती देतील. या सर्वांमध्ये तुझा इथे कुठे समावेश होऊ शकेल? तू नोकरी करतोस. मनू नवख्या गावात कशी राहू शकेल? असे असले तरी तुम्ही दोघेही वेगवेगळ्या गावात राहण्याकरिता आणि आपल्या प्राणांची आहुती देण्याकरिता तयार असाल तर मी घ्यायला तयार आहे. परंतु तुझ्या तारेचा अर्थ तुम्ही दोघांनी येऊन मला भेटण्याची परवानगी मागणे इतकाच असेल तर तुम्ही निश्चितच येऊ शकता. त्यातही काही धोका आहेच. त्या वेळी मी कुठे असेन हे मी सांगू शकत नाही. परंतु पूर्व बंगालमध्येच मी कुठे तरी असेन. मला हेसुद्धा माहीत नाही की त्या वेळी मी जिवंत असेन की नाही. आता तुला जे योग्य वाटेल ते कर.

मनूडी चांगली झाली असेल अशी आशा आहे. तिची प्रकृती जर तितकीशी चांगली नसेल तर हे ठिकाण तिच्याकरिता योग्य राहणार नाही. येथील हवामान आणि पाणी फारसे चांगले नाही. इतकेच नाही तर इथे आवश्यक गोष्टीही मिळणार नाही आणि मिळाल्या तरी त्याकरिता फार त्रास घ्यावा लागेल. रस्ते त्रासदायक आहेत. कलकत्याहून मैलाच्या भाषेत सांगायचे तर हे अंतर फार नाही परंतु मध्ये सागरासारखी रुंद नदी आहे. यामुळे वेळ लागतो.

आशीर्वाद,

बापू

गुजराती मायक्रोफिल्मवरून. एम.एम. यू.।२४

-------------------

# ८२. वल्लभभाई पटेल यांना पत्र

दत्तापाडा,

नोव्हेंबर १४, १९४६

चि. वल्लभभाई,

मी 'चि.'ने सुरुवात केली आणि मग भाईने सुरुवात करण्याकरिता ते खोडले नाही. तुम्ही माझ्याकरिता तेच आहा जे होता. आचार्यांनी (आचार्य जि. भ. कृपलानी) मला सर्व काही सांगितले. मी माझा दृष्टिकोन जवाहरलालला सांगितला आहे. कृपाकरून तो पाहा. मी जसजसा विचार करत जातो तसतसा मी काँग्रेसचे अधिवेशन मेरठला घेऊ नये या मताचा होतो. अधिवेशन होणे ही चांगली गोष्ट आहे. परंतु तुम्हाला अधिवेशन घ्यायचेच असेल तर ते दिल्लीत घ्या (हे अधिवेशन दिल्लीला १९ आणि २० नोव्हेंबरला झाले होते आणि २१ तारखेला मेरठला झाले.) ज्याअर्थी हे कृपलानींचे कार्यक्षेत्र आहे त्याअर्थी प्रत्येकाने आपले मत जरी व्यक्त केले तरी याबाबतीतील अंतिम निर्णय त्यांनीच घेतला पाहिजे. अधिवेशन रद्द झाले तरी त्यांचे भाषण छापावे आणि वाचावे. तुमच्यासमोर किती तरी समस्या आहेत. त्या सोडवण्याकरिता तुम्हाला शांततेची गरज आहे. तुम्हाला वेळसुद्धा मिळाला पाहिजे. या वेळी जर चूक झाली तर ती फार महागात पडेल. मी हे स्थान सोडू शकत नाही. तुम्हाला जर माझ्या सल्ल्याची आवश्यकता वाटली तर इथे येऊन मला विचारा. हाच एकमेव मार्ग आहे. खरे सांगायचे तर माझ्याशी सल्लामसलत करण्याची आवश्यकताच पडू नये. मी बरेचसे सांगितले आणि केले आहे. येथील बहुधा माझे हे शेवटचे काम असेल. मी जर यातून टिकाव धरला तर ते माझे नवजीवन असेल. इथे माझ्या अहिंसेची अशी काही परीक्षा होत आहे की जशी कधीही झाली नव्हती.

तुम्ही सर्व तुमचे काम करण्याइतके चांगले असाल अशी आशा आहे.

गुजरातीवरून. 'बापूना पत्रो - २ : सरदार वल्लभभाईने', पृष्ठ ३७-८

-------------

# ८३. प्रार्थना प्रवचन

(प्यारेलाल यांच्या "विकली लेटर" या लेखातून उद्धृत. गांधीजी काझिरखिलला जाण्याकरिता दत्तापाडाहून दुपारी निघाले. मार्गात त्यांनी शाहपूरला सभा घेतली.)

शाहपूर,

नोव्हेंबर १४, १९४६

**शाहपूरमध्ये फार मोठी सभा होईल असे गांधीजींना सागण्यात आले होते. परंतु कोणी तरी अफवा पसरवली की त्यांच्याबरोबर पोलीस अधीक्षक, जिल्हा न्यायाधीश आणि सशस्त्र गार्ड असतील आणि संधी मिळताच ते लोकांना अटक करतील. परिणामी गांधीजी तिथे पोहोचले तेव्हा त्यांना सभेत फार कमी लोक उपस्थित असलेले आढळले.**

**गांधीजी म्हणाले की ही फार क्रूर चेष्टा आहे. जोपर्यंत माझा संबंध आहे मला पोलीस वा जिल्हाधिकाऱ्यांची मुळीच गरज नाही. परंतु अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की आम्ही तुम्हाला असुरक्षित अवस्थेत जाऊ देऊ शकत नाही.**

**माझ्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे की अनेक ठिकाणी शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून स्थानिक मुसलमान उत्सुक असले तरी मुस्लिम लीगचे पुढारी जोपर्यंत तसे म्हणत नाहीत तोपर्यंत त्याकरिता त्यांची काहीही करण्याची तयारी नाही वा तसे आश्वासन देण्याची तयारी नाही. त्यांच्या सूचनेतील औचित्य लक्षात घेऊन गांधीजींनी कायदेआझम जिनांच्या वक्तव्याचा संदर्भ दिला आणि त्या दिवशी सकाळी ते वक्तव्य वाचूनही दाखवले. ते म्हणाले की या वक्तव्यातील प्रत्येक गोष्ट मला आवडलेली नाही. परंतु काही गोष्टी अशा आहेत की ज्या मला चांगल्या वाटतात. त्या वक्तव्यात कायदे आझम म्हणतात -**

**"मुसलमान जर आपला तोल ढळू देतील आणि सूड आणि बदल्याच्या भावनेने आपल्या महान इस्लाम धर्मातील उच्च प्रतीच्या नीतितत्त्वांना व शिकवणुकीला आपल्या वर्तनाने खोटे ठरवत असतील तर तुम्ही पाकिस्तानसंबंधीचा दावा करण्याचीच पात्रता गमावणार नाही तर त्यामुळे रक्तपात आणि क्रौर्याचे एक असे दुश्चक्र सुरू होईल की ज्यामुळे आपल्या स्वातंत्र्याचा दिवस दूर जाईल व गुलामगिरीचा काळ वाढेल."**

**ते पुढे म्हणाले : "राजकीय दृष्टीनेही आम्ही शूर, उदार आणि विश्वासार्ह आहो हे आपण सिद्ध केले पाहिजे.... पाकिस्तानच्या भागात अल्पसंख्याकांना जीवनाची, वित्ताची आणि अब्रूची मुसलमानांना जशी सुरक्षितता मिळते तशीच पूर्ण सुरक्षितता मिळेल, किंबहुना त्याहूनही जास्त मिळेल."**

**गांधीजी म्हणाले की वक्तव्यातील मी जी उद्धरणे दिली आहेत ती चौकशी केल्यानंतर अगदी बरोबर असल्याचे तुम्हाला आढळेल. खून, लूट, जाळपोळ, अपहरण, बळजबरीचे विवाह आणि धर्मांतरण या सर्वांमुळे हिंदुस्थानच्या गुलामगिरीचा काळ वाढण्याशिवाय अजून काहीही साध्य होणार नाही. तुम्ही जर आपसात भांडत राहाल, पोलिसांकडे**

**आणि सैन्याकडे संरक्षणाकरिता पाहत राहाल तर तुम्ही तिसऱ्या पक्षाला हिंदुस्थानवर राज्य करण्याकरिता प्रोत्साहित कराल.**

'हरिजन', डिसेंबर १, १९४६

-------------

# ८४. प्रार्थना प्रवचन

(प्यारेलाल यांच्या "विकली लेटर" या लेखातून उद्धृत. काझिरखिल येथे गांधीजींना अर्धवट मोडतोड झालेल्या घरात थांबवण्यात आले होते. त्याची साफसपाई करून गांधीजींची राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती. घराच्या कंपौन्डमध्ये प्रार्थना घेण्यात आली होती.)

काझिरखिल,

नोव्हेंबर १४, १९४६

**गांधीजी म्हणाले की येथील आजूबाजूच्या निसर्गाच्या वातावरणात मला अवर्णनीय शांतता दिसते परंतु स्त्रीपुरुषांच्या चेहऱ्यावर मात्र मला ती शांतता अभावानेच आढळते. आणि जे काही घडले त्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर शांतता आढळू तरी कशी शकेल? किती तरी गार्ड माझे आणि माझ्या सहकाऱ्यांचे संरक्षण करण्याकरिता उभे आहेत असे मला दिसते. ते माझे कोणापासून रक्षण करतात? मला तर पहारेकऱ्यांबरोबर राहण्याची सवय नाही. याआधीही कोणत्याही संरक्षणाशिवाय मी बंगालमध्ये हिंडलेलो आहे.**

परंतु आज अधिकारी वर्ग मला तशी परवानगी देत नाही. माझ्याकरिता आणि माझ्यापेक्षाही पूर्व बंगालच्या मुसलमानांकरिता ही लाजिरवाणी गोष्ट आहे.

**ते पुढे म्हणाले की शाळा आणि मंदिरांचीसुद्धा नासधूस करण्यात आली आहे. तुमचे मंत्री शमसुद्दिन साहेब यांना ही गोष्ट आवडलेली नाही. पूर्वबंगालमधील घटनांनी मी खोलवर दुखावलो आहे. लोकांच्या हृदयातील द्वेषभावना काढून ते शुद्ध करावे लागेल. याकरिता तुमच्या मदतीची आणि सहकार्याची आवश्यकता आहे.**

**इतर कोणत्याही अनुभवापेक्षा ही यादवी भयानक आहे. मी दक्षिण आफ्रिकेत २० वर्षे तीव्र संघर्ष केला आणि गत तीस वर्षे हिंदुस्थानात करतो आहे. परंतु परस्परांच्या या कत्तलीने मी बधीर झालो आहे. दोन्ही समुदायांना खेळीमेळीने आणि शांततापूर्वक राहायला कसे शिकवायचे हेच मला कळून राहिलेले नाही. ही समस्या सोडवण्याकरिता मी बंगालमध्ये आलेलो आहे. बंगाल मोठा प्रांत आहे. इथे जर सांप्रदायिक समस्या सोडवता आली तर इतरत्रही ती सोडवता येईल. मी जर इथे यशस्वी झालो तर नवजीवन मिळून बंगालमधून मी बाहेर जाईन. जर तसे होणार नसेल तर ईश्वराने या जगातून मला घेऊन जावे अशी मी प्रार्थना करीन. बंगालमधून मला रिक्तहस्ते जाण्याची इच्छा नाही. माझ्या शब्दकोशात "निराशावादाला" स्थान नाही.**

**मुसलमानांनी बंगालमध्ये हिंदूंची कत्तलच केलेली नाही तर त्याहूनही भयानक कृत्ये केली आहेत. आणि बिहारमध्ये हिंदूंनी मुसलमानांची कत्तल केली आहे. दोघांनीही दुष्टपणाचे काम केले असताना कोण जास्त आणि कोण कमी दुष्टपणा केला याची तुलना करण्यात वा दंगलींना कोणी सुरुवात केली असे म्हणण्यात अर्थ नसतो. तुम्हांला जर बदला घ्यायचा असेल तर तुम्ही बदला घेण्याची कला माझ्यापासून शिकायला पाहिजे. मीसुद्धा बदला घेत असतो, परंतु तो वेगळ्या प्रकारे. माझ्या लहानपणी मी एक गुजराती कविता वाचली होती. त्यात लिहिले होते : "तुम्हाला जो एक पेला**

**पाणी देतो त्याला दोन पेले पाणी देण्यात कोणताही मोठेपणा नसतो. खरा मोठेपणा तेव्हा असतो जेव्हा तुमच्याशी जरी कोणी दुर्वर्तन केले तरी त्याच्याशी तुम्ही सद्वर्तन करता." गांधीजी सार सांगत म्हणाले -**

याला मी उदात्त बदला म्हणतो.

**सुरुवातीच्या खलीफांमधील एका खलीफची गोष्ट मी ऐकली आहे. एका माणसाने खलीफावर तलवारीने हल्ला केला. खलीफाने हल्ला करणाराच्या हातातील तलवार हिसकली आणि त्या तलवारीने तो हल्ला करणाराला मारणारच असतानाच तो हल्लेखोर खलीफच्या तोंडावर थुंकला. त्यामुळे खलीफाने त्या हल्लेखोराला सोडून दिले कारण त्याने केलेल्या अपमानाने खलिफाच्या मनात आत्मग्लानी निर्माण झाली होती. यामुळे हल्लेखोरालाही पश्चात्ताप झाला आणि त्याने इस्लामचा स्वीकार केला. जो माणूस बळजबरीमुळे इस्लामचा स्वीकार करतो तो माणूस म्हणवण्याला पात्र नसतो. भीतीमुळे कलमा म्हणणे निरर्थक आहे.**

'हरिजन', डिसेंबर १, १९४६

-------------------

(हे प्रार्थना प्रवचन नसून काझिरखिल इथे या तारखेला दिलेले भाषण होते असे वाटते. संपूर्ण गांधी वाङ्मयमध्ये याची नोंद भाषण म्हणूनच आहे. शिवाय या आधीचे प्रार्थना प्रवचनही याच तारखेचे आहे. - ब्रिजमोहन)

---------------

## ८५. जयसुखलाल गांधी यांना तार

रामगंज,

नोव्हेंबर १५, १९४६

जयसुखलाल गांधी द्वारा सिंदिया नेव्हिगेशन कंपनी

महुवा

तुला इथे येणे कठीण आहे. मनू महुवाला केव्हा येत आहे? लिहीत आहे.

बापू

मायक्रोफिल्मवरून. एम. एम. यू.। २४

----------------

# ८६. अमतुस्सलाम यांना पत्र

नोव्हेंबर १५, १९४६

चि. अमतुल सलाम,

मला तुझे पत्र मिळाले. दसघरियाला (काझिरखिलहून चार मैल अंतरावरील खेडे. अमतुल सलाम तिथे काम करत होत्या. गांधीजींनी त्यांना सिरोदी गावात ठेवले होते व त्यांच्यावर दहा खेड्यांची जबाबदारी सोपवण्यात आली होती.) माझ्या जाण्याबद्दल काहीच संशय नाही. मुस्लिम लीगबरोबर चर्चा सुरू आहे. तू इथे येण्याची काहीच आवश्यकता नाही. तू तुझ्या कामात गुंतलेली राहा. फार काळजी करू नको. तुझी शक्ती जितकी परवानगी देईल तितके कर आणि समाधान मान.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५३९

-------------

# ८७. प्रार्थना प्रवचन

(प्यारेलाल यांच्या "विकली लेटर" या लेखातून उद्धृत. ही सभा शाळेच्या मैदानात झाली होती.)

रामगंज,

नोव्हेंबर १५, १९४६

**गांधीजींनी काल जे आवाहन केले होते त्याचीच त्यांनी आज पुनरावृत्ती केली. ते म्हणाले की आजकाल मी तुम्हांला दुःख, वेदना, संकटे आणि अडचणी यांशिवाय काहीच सांगू शकत नाही. जिथेकुठे मी जातो तिथे विध्वंसाची भयानक दृश्ये पाहतो. माझ्या डोळ्यात अश्रू नाहीत. जो माणूस स्वतः अश्रू ढाळतो तो इतरांचे अश्रू पुसू शकत नाही. मुसलमानांशी स्पष्टपणे चर्चा करता येईल या आशेने मी इथे आलो होतो. मला अशीही आशा वाटत होती की त्यांना त्यांच्या अपकृत्यांचा पश्चात्ताप होईल आणि ते हिंदूंना परत येण्याकरिता सांगतील. त्यांचा पश्चात्ताप खरा असता तर हिंदूंच्या लक्षात त्यांचा प्रामाणिकपणा आला असता आणि मुसलमानांना गमावलेला विश्वास परत जिंकता आला असता. परंतु पूर्व बंगालमधील हिंदू आणि मुसलमानांमध्ये परस्परांबद्दल कटुता निर्माण झाली असल्याचे मला दिसते. मी याच्या कारणात शिरणार नाही. परंतु पूर्व बंगालमध्ये मुसलमानांनी हिंदूंवर हल्ला केला आहे हे सांगण्याची माझ्या मुसलमान बांधवांनी मला परवानगी द्यावी. हिंदू त्यांना अतिशय घाबरलेले आहेत. चौमुहानीच्या सभेत मुसलमान फार मोठ्या संख्येत, हिंदूंपेक्षाही जास्त संख्येत, सहभागी झाले होते. परंतु दत्तापाडाच्या सभेनंतर मुसलमान मला का टाळू लागले ते मला कळत नाही. त्यामुळे मी दुखावलो. सभेत उपस्थित असलेल्या थोड्याशा मुसलमानांनी माझा हा निरोप इतर मुसलमानांना सांगावा अशी माझी इच्छा आहे. एक मुसलमान भगिनी, जी या भागातील मुसलमान पुढाऱ्यांची भेट घेत आहे ती सांगते की मुसलमानांनी मला स्पष्टपणे सांगितले आहे की हिंदूंशी मैत्री करण्याकरिता वा गांधीच्या सभेला उपस्थित राहण्याकरिता आम्हांला लीगच्या पुढाऱ्यांची परवानगी पाहिजे. हिंदूंचे स्थलांतर अजूनही सुरू आहे. मुसलमान जर त्यांना आश्वस्त करून सांगतील की आपण शेजारी होतो आणि आहो, मित्र आहो, बांधव आहो, याच भूमीचे पुत्र आहो, एकाच हवेत आपण श्वास घेतो, एकच पाणी पितो यामुळे हिंदूंनी आम्हांला घाबरण्याचे मुळीच कारण नाही तर हे स्थलांतर थांबेल आणि जे हिंदू घर सोडून गेले आहेत ते परत येतील. जनावरांशी जे लोक मैत्री करतात त्यांच्याशी जनावरसुद्धा मैत्री करतात. परंतु माणसाचा जन्म तर ईश्वराची प्रतिमा म्हणून झाला आहे. माणसाला हा जो वारसा मिळाला आहे तो न्याय्य आहे हे सिद्ध करण्याकरिता माणसाने वाईटाची परतफेड चांगुलपणाने केली पाहिजे. कोणत्याही पक्षाचा जरी दोष असला तरी हे सत्य दोन्ही पक्षांना लागू होते. मुसलमानांना लीगकडून आदेश पाहिजे. मी ते समजू शकतो. प्रांतात लीगचे सरकार आहे. परंतु याचा अर्थ असा नाही की जे लीगच्या बाहेर आहेत त्यांच्याशी सरकारने शत्रुत्वाने वागावे. गांधीजींनी काल कायदे आझम जिनांच्या संदेशाबद्दल सांगितले होते ते त्यांनी परत सांगितले** (पाहा "प्रार्थना प्रवचन", नोव्हेंबर १४, १९४६). **गांधीजी म्हणाले की तुम्ही तुमची अंतःकरणे तपासा आणि या संदेशाप्रमाणे वागत असता काय ते पाहा. शेवटी ते म्हणाले :**

जोपर्यंत मला माहीत आहे इस्लामची बळजबरीच्या धर्मांतराला आणि स्त्रियांवरील अत्याचाराला परवानगी नाही. अंतःकरणाने इस्लामचा स्वीकार न करणारा माणूस जर केवळ ओठांनी कलमा म्हणत असेल तर त्याचा काय फायदा होईल? यामुळे आम्ही हिंदूंशी मैत्रीने राहायला पाहिजे की शत्रूप्रमाणे त्यांच्याशी वर्तन केले पाहिजे हे तुम्ही तुमच्या पुढाऱ्यांना विचारा आणि ते मला सांगा. तुम्हांला शत्रू म्हणून राहण्याची इच्छा असेल तर हिंदूंना पूर्व बंगाल सोडण्याकरिता सांगितले पाहिजे. मी मात्र तुम्हा दोघांमध्ये जोपर्यंत सलोखा होत नाही तोपर्यंत पूर्वबंगालमध्येच राहणार आहे.

'हरिजन', डिसेंबर १, १९४६

-----------------

# ८८. मनोरंजन चौधरी यांना पत्र

नोव्हेंबर १६, १९४६

भाई मनोरंजन बाबू (हिंदू महासभेचे पुढारी. ते शांतता समिती स्थापन करण्याकरिता प्रयत्न करत होते.),

तुम्ही आजारी का पडला? आपले मन आणि शरीर स्वस्थ ठेवणे हे कार्यकर्त्याचे काम असते. चांगल्या प्रकृतीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करा. आता तुम्हाला ताप नसेल अशी आशा आहे.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून, जी. एन. १०५७६

---------------

# ८९ . प्रार्थना प्रवचन

(प्यारेलाल यांच्या "विकली लेटर" या लेखातून उद्धृत)

काझिरखिल,

नोव्हेंबर १६, १९४६

**गोफरान साहेबांच्या** (अब्दुल गोफरान, नागरी पुरवठामंत्री, बंगाल सरकार) **भाषणानंतर सभेला संबोधत असताना चौमुहानी इथे काही दिवसांपूर्वी शमसुद्दिन साहेबांनी जे भाषण दिले होते त्याचा उल्लेख गांधीजींनी केला** (शमसुद्दिन साहेब गांधीजींना नोव्हेंबर ८ तारखेला भेटले होते. पाहा "मुस्लिम लीग नेत्याशी चर्चा", नोव्हेंबर ८, १९४६.). **गांधीजी म्हणाले की आता तुम्ही गोफरान साहेबांचे म्हणणे ऐकले आहे. तुम्ही मित्रांप्रमाणे राहावे असे मंत्र्यांनाही वाटते. पोलीस आणि सैन्य तुमचे रक्षण करू शकत नाहीत. केवळ ईश्वरच तुमचे रक्षण करू शकतो. यामुळे तुम्ही परस्परांकडे संरक्षणाकरिता पाहायला पाहिजे. गोफरान साहेबांनी तुम्हांला सांगितले आहे की हिंदूंनी पूर्व बंगाल सोडून निघून जावे अशी सरकारची इच्छा नाही. काही भयानक गोष्टी घडल्या आहेत यात काही संशय नाही. परंतु आता झाले गेले विसरून जायला पाहिजे. आता आपण नवीन पान उघडले पाहिजे. जेव्हा एखाद्या माणसाला प्रचंड त्रास सहन करावा लागतो तेव्हा स्वाभाविकपणेच तो संशयी होत असतो. परंतु माणसाने त्यावर विजय मिळवला पाहिजे.**

**सभेतील एका श्रोत्याने गोफरान साहेबांच्या भाषणाला उत्तर देण्याकरिता ५ मिनीट मागितले. तो म्हणाला की त्यात किती तरी ठिकाणी दुरुस्तीची आवश्यकता आहे. त्यावर गांधीजी म्हणाले की सभेला जाहीर वादविवादाच्या सभेचे रूप येऊ नये अशी माझी इच्छा आहे. सभेत जे काही सांगितले आहे ते सद्भावनेने** ('हिंदुस्तान टाईम्स'मध्ये इथे ."ईश्वराच्या नावावर" असे आहे.) **सांगितले आहे आणि ईश्वराचे काम करण्याच्या हेतूने सांगितले आहे. परंतु या बंधूनी जर मला एक पत्र पाठवले व त्यातील भाषा जर आक्षेपार्ह नसेल तर ते पत्र मी आनंदाने गोफरान साहेबांकडे पाठवीन. सभेतील मुसलमान नमाझ पढत असताना श्रोत्यांनी परिपूर्ण शांतता न पाळल्याबद्दलही गांधीजींनी *श्रोत्यांची कानउघाडणी केली. इतर लोक जेव्हा प्रार्थना करतात तेव्हा शांतता पाळली पाहिजे असे आपली संस्कृती आणि संस्कार सांगतात. परस्परांबद्दल आदर असला पाहिजे. लोकांचा धर्म कोणताही असला तरी सर्व एकाच ईश्वराची प्रार्थना करत असतात. प्रार्थनेच्या मैदानावर काँग्रेस आणि लीगचे ध्वज सोबतसोबत फडकत असताना पाहून मला आनंद होतो. दोघांनाही फार महत्त्व आहे. आपण जर आपसात भांडत राहिलो तर देश गुलामगिरीत राहील आणि पाकिस्तानचे स्वप्न हवेत विरून जाईल असे जे कायदे आझम जिना साहेब म्हणाले होते ते तुम्ही समजून घेतले पाहिजे. गांधीजी म्हणाले की मला धमक्यांनी भरलेली पत्रे येत आहेत. काही मुसलमानांना भीती वाटते की मी त्यांना दाबून टाकण्याकरिता**

**आलो आहे. गांधीजी मुसलमानांना आश्वस्त करत म्हणाले की संपूर्ण आयुष्यात मी कधीही कोणावरही दडपशाही केलेली नाही. ते विचारतात की मी बिहारमध्ये का जात नाही. बिहारचे वेड जर जाणार नसेल तर मी उपवास करण्याचा निर्धार घोषित केलेला आहे** (पाहा "बिहारला", नोव्हेंबर ६, १९४६). **मी बिहारच्या सतत संपर्कात आहे. माझ्या उपस्थितीची तिथे आवश्यकता नाही असे पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. राजेंद्र प्रसाद इत्यादी सर्वांनी मला सांगितले आहे. बिहार आता जवळपास शांत आहे. अजूनही तिथे तणाव आहे, परंतु तो कमी होत आहे. मुसलमान आपल्या घरी परतत आहेत. जे लोक गृहहीन झाले आहेत त्यांची घरे बांधून देण्याची जबाबदारी सरकारने घेतली आहे. बंगालमधील घटनांकरिता तुम्ही मुसलमानांच्या विरोधात उपवास का करत नाही असे विचारणाऱ्या तारा मला हिंदूंकडून येत आहेत. आज मी तसे करू शकत नाही. मी मुसलमानांचा मित्र आहे असे जर त्यांना पटले तर मला त्यांच्या विरोधातही उपवास करण्याचा अधिकार मिळेल. हिंदू आणि मुसलमानांच्या अंतःकरणावर जेव्हा शांततेचे राज्य असेल तेव्हाच मी पूर्व बंगाल सोडेन. असे घडणार नसेल तर मला अजून जगण्याची इच्छा नाही.** (यापुढील मजकूर प्यारेलाल यांच्या "द डू ऑर डाय मिशन" या लेखातून घेतला आहे.)

**गांधीजी म्हणाले की नोआखालीत मी मुसलमानांमध्ये राहतो आहे. हिंदू मित्रांबरोबर राहण्याची कल्पना मला पसंत नाही. लीगच्या मुसलमानाबरोबर मला राहता येईल काय हे मी पाहणार आहे.**

माझ्या गरजा फार कमी आहेत. मला केवळ स्वच्छता, स्वच्छ पाणी, मला चालणारे अन्न आणि माझ्या पद्धतीने ईश्वराची प्रार्थना करण्याचा अधिकार पाहिजे.

मुसलमान मित्रांना मला जवळून पाहण्याची आणि मी त्यांचा मित्र आहे की शत्रू हे तपासण्याची यामुळे संधी मिळणार आहे.

'हरिजन', डिसेंबर ८, १९४६ आणि हिंदुस्तान स्टॅन्डर्ड, नोव्हेंबर २१, १९४६

--------------

# ९०. प्रार्थना प्रवचन

(प्यारेलाल याच्या "विकली लेटर" या लेखातून उद्धृत. नोव्हेंबर १७च्या सकाळी काझिरखिलहून दोन मैल अंतरावर असलेल्या दसघरिया या खेड्याला गांधीजींनी भेट दिली होती. तिथे त्यांची अशा अनेक स्त्रियांची भेट झाली होती की ज्यांना बळजबरीने मुसलमान करण्यात आले होते. आता परत त्यांचे हिंदू धर्मात परिवर्तन करण्यात आले होते.)

काझिरखिल,

नोव्हेंबर १७, १९४६

**गांधीजी म्हणाले की जिल्हा न्यायाधीशांनी आदेश काढले आहेत आणि जाहीरही केले आहे की बळजबरीने म्हणजे भीतीच्या पोटी केलेल्या धर्मांतराला कायद्याने मान्यता दिली जाणार नाही. ज्या कोणाचे बळजबरीने धर्मांतर करण्यात आले आहे त्यांतील प्रत्येक जण परत हिंदू धर्मात आला आहे की नाही हे मला माहीत नाही. जर असे झाले नसेल तर व्हायला पाहिजे कारण आज जी दोन्ही समाजात कटुता आहे ती दूर व्हावी आणि सद्भावना निर्माण व्हावी म्हणून असे केले पाहिजे.**

**अजूनही काही अपहृत मुली सापडत नाहीत. कोणताही विलंब न करता त्यांना परत करण्यात आले पाहिजे. एका धोब्याने त्याचा एक वर्षाचा मुलगा आज दुपारी माझ्याजवळ आणला. पोलिसांच्या मदतीने मुसलमानाच्या घरातून त्याने तो मुलगा एक महिन्यानंतर परत आणला होता. अशा घटना थांबवणे हे मुसलमान बंधूंचे कर्तव्य आहे. भूतकाळात अशा ज्या चुका झाल्या त्याची त्यांनी स्पष्टपणे कबुली दिली पाहिजे व भविष्यात परत ही चूक होणार नाही असे वचनही दिले पाहिजे. जो माणूस आपल्या चुका लपवण्याचा प्रयत्न करतो तो त्या कधीही दुरुस्त करू शकत नाही. मी स्वतः सत्याचा पुजारी आहे. मी वकील असतानासुद्धा माझ्या अशिलांना सांगत असे की मी तुमचा खटला चालवावा असे जर तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही खरे काय ते सांगायला पाहिजे. यामुळे माझ्याकडे खरी आणि प्रामाणिकपणाचीच प्रकरणे आणली जात. मी कधीचीच वकिली करणे सोडले आहे आणि वकील लोकांच्या नोंदणी पुस्तकातून माझे नावही काढून टाकण्यात आले आहे** (अहमदाबाद सत्र न्यायलयात मार्च १०, १९२२ला गांधीजींना दोषी ठरवून शिक्षा झाल्यानंतर नोव्हेंबर १०, १९२२ला गांधीजींची वकिली करण्याची सनद अहमदाबाद सत्र न्यायालयाने काढून घेतली होती.) **तरीही मी त्याच तत्त्वाचे अनुसरण करत असतो. हिंदू आणि मुसलमानांनीआपल्या सर्व दोषांपासून मुक्त व्हावे असा माझा तुम्हा सर्वांना सल्ला आहे. असे केल्याशिवाय तुम्ही शांततेत राहू शकणार नाही आणि तुम्हाला परस्परांबद्दल आदरही वाटणार नाही.**

**मी असे ऐकले आहे की एका सभेत एका बंधूंना गोफरान साहेबांना तिथल्यातिथे उत्तर देण्याची मी परवानगी दिली नाही म्हणून हिंदू माझ्यावर नाराज आहेत आणि त्यांनी माझ्या सभेवर बहिष्कार टाकला आहे** (गांधीजींना नंतर आश्वस्त करण्यात आले की "तो रविवार आणि बाजाराचा दिवस असल्यामुळे अनेक मुसलमान आणि गुंड तिथे येण्याची शक्यता असल्यामुळे स्त्रियांना घराबाहेर पडण्याची भीती वाटत होती. शिवाय पाहा "प्रार्थना प्रवचन", नोव्हेंबर १९, १९४६). **मला त्याचा पश्चात्ताप होत नाही. इतरांना खुष करण्याकरिता मी कोणतीही गोष्ट सांगत नसतो वा करत नसतो. माणसाने नेहमीच आपले कर्तव्य पार पाडले**

**पाहिजे, मग त्याची इतरांवर काय प्रतिक्रिया होते याचा त्याने विचार करू नये असे मी नेहमीच सांगत असतो. माणसाला जे योग्य वाटते तेच जो माणूस करत असतो त्याला कोणालाही घाबरण्याचे कारण नसते.**

हरिजन, डिसेंबर ८, ११४६

----------------

## ९१. मौन दिवशी निर्मल कुमार बोस यांना लिहिलेली चिठ्ठी

नोव्हेंबर १८, १९४६

मी बंगालमध्ये असताना जिथेकुठे जाईन आणि राहीन तिथे तुमची येण्याची व राहण्याची तयारी असेल तर मला तुम्ही हवे आहा. कल्पना अशी आहे की माझ्याबरोबर सहकारी दुभाष्ये म्हणून केवळ तुम्ही असावे. तुम्ही जर विद्यापीठाशी असलेले संबंध तोडू शकाल आणि मृत्यू, उपासमार इत्यादींचा धोका पत्करण्याची तुमची तयारी असेल तरच तुम्ही हे करावे. माझ्या योजनेबद्दल सतीश बाबूंना पूर्ण माहिती आहे. त्यांच्याकडून तुम्हाला ते कळेल. तसेच 'डॉन', 'आझाद', 'मॉर्निंग न्यूज' आणि 'स्टार ऑफ इंडिया' या वृत्तपत्रांमध्ये कायदे आझम आणि इतर मुसलमान पुढारी यांच्या लेखांचे आणि भाषणांचे जे महत्त्वाचे अंश आले आहेत ते एकत्र करून तारीखवार लावून द्या. या गोष्टी तुम्ही एकाच वेळी करू शकता. (निर्मल कुमार बोसनी उत्तरात लिहिले : "तुम्ही जोपर्यंत बंगालमध्ये आहा तोपर्यंत विद्यापीठाने मला मोकळे केले आहे.... तुमच्या अटी पूर्ण करण्याचा मी प्रयत्न करीन.")

फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. १५३३. सौजन्य निर्मल कुमार बोस

---------------

# १२. एक चर्चा

(प्यारेलाल यांच्या “टु डू ऑर डाय मिशन”मधून उद्धृत.)

[नोव्हेंबर २०, १९४६ला वा त्यापूर्वी]

(“आपल्या सहकाऱ्यापासून वेगळे होण्याच्या” निर्णयासंबंधी. गांधीजी श्रीरामपूरला नोव्हेंबर २०, १९४६ला पोहोचले; पाहा याधीचा विषय.)

आगाखान महालात जेव्हा मला स्थानबद्ध करण्यात आले होते तेव्हा अहिंसेचे समर्थन करणारा एक देश म्हणून भारतासंबंधी एक प्रबंध लिहायला मी बसलो होतो. परंतु लिहिणे सुरू केल्यानंतर मी पुढे जाऊ शकलो नाही. मला थांबावे लागले. हिंदू धर्माचे दोन दृष्टिकोन आहेत. एकीकडे ऐतिहासिक हिंदूधर्म आहे ज्यात अस्पृश्यता, दगडांची पूजा करणे यासारखी अंधश्रद्धेवर आधारित भक्ती, प्राण्याचा बळी देणे इत्यादी गोष्टी आहेत, तर दुसरीकडे आपल्यात गीता, उपनिषद आणि पतंजलीच्या योगसूत्रात सांगितलेला हिंदूधर्म मिळतो. या हिंदू धर्मात सर्व जीवांच्या समानतेचा आणि सर्वव्यापी निराकार अविनाशी परमेश्वराच्या शुद्ध आराधनेचा एक परमोच्च बिंदू गाठण्यात आला आहे. अहिंसेचा सिद्धांत माझ्या दृष्टीतून हिंदू धर्माचे सर्वश्रेष्ठ आभूषण आहे. परंतु ही गोष्ट केवळ संन्यासी लोकांकरिता शक्य आहे असे म्हणून आपल्या लोकांनी तिला बाजूला टाकले आहे. मी या विचाराशी सहमत नाही. मला असे वाटते की अहिंसा हीच जीवनाची खरी पद्धत आहे आणि हिंदुस्थानने ही पद्धत जगासमोर अभिव्यक्त केली पाहिजे. मी कुठे आहे? माझ्या व्यक्तिमत्वातून मी अहिंसेचे प्रतिनिधित्व करतो काय? जर करत असेन तर कट-कारस्थान आणि घृणा या ज्या गोष्टी आज वातावरणात भरल्या आहेत त्या विरून जायला पाहिजे. माझ्या ज्या सहकाऱ्यांच्या मदतीवर मी नेहमी अवलंबून राहिलो आहे त्यांच्यापासून वेगळा होऊन आपल्या पायावर उभा राहूनच मी कुठे आहे हे मला कळू शकेल आणि ईश्वरावरील माझ्या श्रद्धेची कसोटी होऊ शकेल.

‘हरिजन’, डिसेंबर ८, १९४६

-----------------

# **१३. शाह नवाझ यांना पत्र**

नोव्हेंबर २०, १९४६

प्रिय शाह नवाझ,

माझ्याजवळ अतिशय कमी वेळ असल्यामुळे मी तुम्हाला हे उर्दूत लिहिण्याचे साहस करायला नको (हे शब्द देवनागरीत आहेत). तुमच्या उत्तरार्थ काल मी तार पाठवली आहे. येथील परिस्थिती इतकी बिकट आहे की तिचे आकलन होत नाही. या वेळी मी तुमचा कसा काय उपयोग करू शकेन हे मला कळत नाही. माझ्याबरोबर आलेल्या सहकाऱ्यांनासुद्धा मी दूर पाठवत आहे. मी त्यांना एकेकट्याला खेड्यांमध्ये पाठवत आहे. मला इथे असत्याने भरलेले वातावरण दिसते. यामुळे मी इतकेच म्हणेन - तुम्हाला जितके चांगले करता येईल तितके करा. मला जर प्रकाश दिसला तर मी ते तुम्हाला नंतर कळवीनच.

बापू

कॅप्टन शाह नवाझ

काँग्रेस छावणी, मेरठ

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-------------

# १४. सतिंद्रनाथ सेन यांना पत्र

नोव्हेंबर २०, १९४६

प्रिय सतीश (काँग्रेसचे पुढारी),

अमृत बाबूंनी मला तुमचे पत्र दिले. बंगालला अतिशय बिकट परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे. नेमके काय केले पाहिजे याची मला खात्री नाही. या काळोखातूनही प्रकाश दिसेल अशी मी आशा करतो आहे. यामुळे सध्या तरी मी तुम्हाला कोणतेही मार्गदर्शन करू शकत नाही. प्रतिक्षा करा, निरीक्षण करा आणि प्रार्थना करा.

बापू

श्री सतिंद्रनाथ सेन (हे देवनागरीत आहे)

बारिसाल

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-------------

# ९५. रेहाना तैय्यबजी आणि सरोज नानावटी यांना पत्र

काझिरखिल,

बुधवार, नोव्हेंबर २०, १९४६

प्रिय बेटी रेहाना आणि सरोज,

मला तुमची दोन पत्रे मिळाली. कालपासून मी दूध घेण्याकरिता सुरुवात केली आणि जो कोणता आहार माझ्या प्रकृतीला मानवेल तो घेण्याकरिताही मी सुरुवात केली आहे. राजेंद्र बाबू म्हणतात की आता बिहारचे प्रकरण संपल्यात जमा आहे (पाहा "वृत्तपत्रांना वक्तव्य", नोव्हेंबर २०, १९४६). आता ईश्वर आपल्याला काय करण्याची प्रेरणा देतो ते पाहू या. उपोषणाचा प्रस्ताव अगदी योग्य होता, परंतु त्यावर वाद करण्याकरिता आता वेळ नाही. आपण कधी भेटलो तर त्यावर चर्चा करू आणि तू मान्य करशील की माझी कृती बरोबर होती. तसे नसेल तर माझी कुठे चूक होती ते तू मला सांगशील. दोनपैकी काहीही झाले तरी माझे समाधान होईल. तुम्हा दोघींना इथे बोलावणे योग्य होणार नाही. येथील हवामानसुद्धा चांगले नाही.

आशीर्वाद.

बापू

रेहाना तैय्यबजी,

वर्धा.

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

--------------

# ९६. मालती चौधरी यांना पत्र

नोव्हेंबर २०, १९४६

चि. मालतीबेन (अध्यक्ष, उत्कल प्रांतीय काँग्रेस कमेटी; नंतर घटनासमितीवर सदस्य म्हणून नामित),

बापांनी मला तुमचे पत्र दाखवले. मला निकाल पाठवा. परंतु आता मेहताब बाबू (हरेकृष्ण मेहताब) मुख्यमंत्री झाल्यामुळे ते काही का करत नाहीत? तिथे लोकप्रिय मंत्रिमंडळ असल्यामुळे माझ्यासारखा माणूस बेकार होतो. तुम्ही वा अजून कोणी या वेळी इथे येणे योग्य होणार नाही. इथे आजूबाजूला संपूर्ण काळोख आहे आणि बाहेरचे लोक आल्यामुळे प्रकाश न दिसता तो काळोख अजूनच गडद होणार आहे. तुम्ही जिथे कुठे आहा तिथेच राहून आपले कर्तव्य पार पाडत राहा. हीच उत्तम गोष्ट होईल.

बापू

श्रीमती मालती चौधरी

कटक

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

--------------

# १७. वृत्तपत्रांना वक्तव्य

नोव्हेंबर २०, १९४६

अतिशयोक्ती आणि खोटेपणा यांनी मी वेढलो गेलो आहे असे मला वाटते. सत्याचा शोध लावण्याचे सामर्थ्य माझ्यात नाही. परस्परांबद्दल भयानक अविश्वास आहे. जुन्यात जुनी मैत्रीही संपली आहे. ज्या सत्याची आणि अहिंसेची मी शपथ घेत होतो आणि माझ्या माहितीप्रमाणे ज्यांच्या आधारावर मी गत साठ वर्ष टिकलो आणि त्यांच्या ज्या गुणांचे मी गुणगान करत होतो आज त्यांचा प्रभाव मला कुठेही दिसत नाही.

सत्य आणि अहिंसेची परीक्षा पाहण्याकरिता वा असे म्हणाना की माझी कसोटी पाहण्याकरिता इतकी सगळी वर्षे जे माझ्याबरोबर होते व ज्यांनी माझे जीवन इतके सुखकर केले त्यांना सोडून मी श्रीरामपूर या गावात जात आहे. प्राध्यापक निर्मल कुमार बोस यांना मी माझे बंगालीचे शिक्षक आणि दुभाष्या म्हणून आणि श्री परशुरामना, जे अत्यंत निष्ठावंत, निस्वार्थी आणि मूक लघुलिपिक आहेत, बरोबर घेत आहे.

मी माझ्याबरोबर ज्या इतर कार्यकर्त्यांना आणले ते शक्य झाले तर दोन समुदायांमध्ये शांतता प्रस्थापित करण्याच्या कामाकरिता नोआखालीतील वेगवेगळ्या खेड्यांध्ये जातील. लहानगी आभा (आभा गांधी, कनू गांधी यांची पत्नी) सोडली तर दुर्दैवाने त्यातील कोणीही बंगाली नाही. यामुळे प्रत्येकाबरोबर एक बंगाली कार्यकर्ता शिक्षक आणि दुभाष्या म्हणून असेल. इतकेच नाही तर प्राध्यापक निर्मल कुमार बोस माझ्याबरोबर असतील.

खादी प्रतिष्ठानचे सतीश चंद्र दास गुप्ता हे कार्यकर्त्यांच्या निवडीचे आणि वेगवेगळ्या कामांच्या वाटणीचे काम करतील. माझी इच्छा एखाद्या स्थानिक मुस्लिम लीगच्या माणसाच्या कुटुंबाबरोबर राहावे अशी आहे, परंतु तो सुखद दिवस उगवेपर्यंत मी वाट पाहू शकत नाही. मध्यंतरीच्या काळात मुसलमानाच्याच गावात शक्य होईल तितका संपर्क स्थापित करायचा आहे. लीगच्या मंत्र्यांनी मला प्रत्येक दंगलग्रस्त खेड्यात राहण्याकरिता एक प्रामाणिक आणि शूर मुसलमान द्यावा आणि त्याच्याबरोबर एक तितकाच प्रामाणिक आणि शूर हिंदू द्यावा. परत येणाऱ्या हिंदू निर्वासितांच्या संरक्षणाकरिता गरज पडली आणि वेळ आली तर आम्ही जिवाचीसुद्धा बाजी लावू असे आश्वासन त्यांनी मला दिले पाहिजे. असे काही केल्याशिवाय गाव सोडून निघून गेलेल्या हिंदू निर्वासितांना आपल्या गावात परत येण्याकरिता प्रवृत्त करणे कठीण आहे हे कबूल करणे मला भाग आहे ही दुःखाची गोष्ट आहे.

मला जी काही माहिती मिळते आहे त्यावरून अल्पसंख्याकांकरिता अजूनही जीवन सुखद आणि सुरक्षित नाही. यामुळे ते आपल्या घरापासून, पीकपाण्यापासून, आजूबाजूच्या परिसरापासून हुसकावून लावलेल्या विस्थापिताप्रमाणे दानात मिळणाऱ्या अपुऱ्या आणि असंतुलित आहारावर राहणे पसंत करत आहेत.

बंगालबाहेरील अनेक लोकांनी शांतताकार्य करण्याकरिता येण्याची इच्छा व्यक्त केली आहे परंतु मी त्या सर्वांना त्यापासून परावृत्त केले आहे. या गडद काळोखातून मला जेव्हा प्रकाश दिसेल तेव्हाच त्यांनी इथे आलेले मला आवडेल.

मध्यंतरीच्या काळात आम्ही दोघांनीही - प्यारेलाल आणि मी - पत्रव्यवहार आणि हरिजन आणि त्याच्याबरोबरच्या साप्ताहिकांकरिता लेखन करण्याचे कामही स्थगित ठेवावे असे ठरवले आहे. श्री किशोरीलाल, श्री काकासाहेब, श्री विनोबा आणि श्री नरहरी पारिख यांना हरिजन साप्ताहिकांचे संयुक्तपणे तसेच आपापल्या पद्धतीने संपादन करण्याकरिता सांगितले आहे. वेळ मिळाला तर प्यारेलाल आणि मी आपापल्या गावातून थोडेबहुत साहित्य पाठवू. पत्रव्यवहाराकडे सेवाग्रामहून लक्ष पुरवले जाईल.

अनिश्चिततेची ही अवस्था किती दिवस कायम राहील हे सांगणे माझ्या आवाक्याबाहेरील आहे. मी केवळ इतकेच करू शकतो. जोपर्यंत पूर्व बंगालमधील दोन समुदायात परस्परांबद्दल विश्वास निर्माण होत नाही आणि ते आपापल्या गावांमध्ये सामान्य, सामंजस्यपूर्ण जीवन जगायला सुरुवात करत नाहीत तोपर्यंत पूर्व बंगाल सोडण्याचा माझा विचार नाही. याशिवाय पाकिस्तानही नाही आणि हिंदुस्तानही नाही - शिल्लक असेल भांडण आणि पाशवी वर्तनात बुडालेला हिंदुस्थान आणि त्याची वाट पाहत असेल केवळ गुलामगिरी.

माझ्या आताच्या अल्पाहारामुळे कोणीही अस्वस्थ होण्याचे कारण नाही. राजेंद्र प्रसाद यांच्याकडून पुढील तार आली : “पत्र मिळाले. आधीच शांतता असल्याबद्दलची तार पाठवली आहे. आता एका आठवड्यापासून एकही घटना घडलेली नाही. परिस्थिती समाधानकारक आहे. नेहमीचा आहार घेण्याकरिता सुरुवात करावी अशी कळकळीची विनंती. मी स्वतः १९ तारखेला दिल्लीला जात आहे.” कालपासून मी बकरीचे दूध घेण्याकरिता सुरुवात केली आहे आणि प्रकृती परवानगी देईल त्याप्रमाणे लवकरात लवकर नेहमीचा आहार घेण्याकरिताही मी सुरुवात करणार आहे. भविष्य ईश्वराच्या हातात आहे.

हरिजन, डिसेंबर १, १९४६

# १८. प्रार्थना प्रवचन

(हे "श्रीरामपूर डायरी"मधून घेण्यात आले आहे. गांधीजी तिथे काय बोलले ते वाचकांना एका ठिकणी उपलब्ध व्हावे म्हणून ही डायरी वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित झालेल्या वृत्तांवरून तायर करण्यात आली आहे.)

श्रीरामपूर,

नोव्हेंबर २०, १९४६

**प्रार्थनेनंतरच्या प्रवचनात जवळपास १००० श्रोत्यांना संबोधत गांधीजी म्हणाले की नोआखालीतील एका उजाड झालेल्या गावात मी इतक्या लवकर राहू लागेन अशी कल्पनाही मी केली नव्हती. ही गोष्ट सतीश बाबूंच्या प्रयत्नाने शक्य झाली आहे. मी इथे एकटाच आलो आहे, माझ्याबरोबर केवळ दोन सहकारी आहेत. एकजण दुभाष्या म्हणून काम करणार आहे आणि मला बंगाली शिकवणार आहे तर दुसरे गृहस्थ मलबारमधील श्री परशुराम आहेत. त्यांना बंगाली येत नाही आणि हिंदुस्तानीसुद्धा फार कमी येते. यामुळे ते कोणत्याही खेड्यात राहू शकत नाहीत. व्यावहारिक दृष्टीने पाहिले तर मी एकटाच आलेलो आहे असे म्हणता येईल. माझ्या सहकाऱ्यांना काझिरखिलला सोडून मी इथे आलो आहे आणि त्यांच्यातील प्रत्येकजण आपापल्याकरिता एकेका गावाची निवड करील. अशा प्रकारे पाठवण्यात आलेल्या कार्यकर्त्याबरोबर एक मुसलमान कार्यकर्ता असावा व त्या दोघांनी मिळून स्थानिक लोकांमध्ये मिसळावे आणि त्यांनी हळूहळू असे वातावरण तयार करावे की ज्यात निर्वासित लोकांची भीती निघून जाईल आणि परत एकदा इथे येऊन ते शांतता आणि मैत्रीच्या वातावरणात राहू शकतील. मुसलमान कार्यकर्त्यांकरिता मी शहीद साहेब आणि शमसुद्दिन साहेबांवर अवलंबून आहे. परंतु असे कार्यकर्ते मिळेपर्यंत मी वाट पाहू शकत नाही. यामुळे संधी मिळताच मी इथे आलो आहे. काही मुसलमान सभेत उपस्थित आहेत आणि दोन स्थानिक मुसलमानांनी मला आपल्या घरी बोलावलेले आहे ही चांगली गोष्ट आहे. गांधीजी म्हणाले की त्यांनी मला आश्वस्त करत सांगितले आहे की हिंदू परत आपल्या घरी आलेले पाहण्याकरिता आम्हीसुद्धा उत्सुक आहो परंतु असे करण्याच्या मनःस्थितीत अजून हिंदू नाहीत.**

**भीती ही अशी गोष्ट आहे की जी मला मुळीच आवडत नाही. एका माणसाने दुसऱ्याला का घाबरावे? माणसाने केवळ ईश्वराला घाबरायला पाहिजे. आणि तसे झाले तर मग कोणालाही घाबरण्याची आवश्यकता राहत नाही. प्यारेलाल थोड्याच वेळेपूर्वी सभेत आले. त्यांनी मला सांगितले की रस्त्यात त्यांना दीडेकशे निर्वासित भेटले होते. ते आपले सामानसुमान घेऊन गावातून निघून चालले होते. चौकशी केल्यानंतर त्यांनी प्यारेलालना सांगितले की पोलीस आणि सैन्य निघून केल्यानंतर परत नव्याने दंगली सुरू होतील अशी आम्हांला भीती वाटते. यामुळे सध्या रस्ते सुरक्षित असतानाच इथून आम्ही दुसऱ्या एखाद्या सुरक्षित ठिकाणी जाऊन राहण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु जो माणूस भीतीने ग्रस्त असतो त्याला कोणतेही सुरक्षित ठिकाण सापडू शकत नाही. अशा माणसाला सैन्य वा पोलीस कोणती मदत करू शकतील? सैन्य आणि पोलीस यांच्यावर मदतीकरिता अवलंबून राहणे म्हणजे आपण स्वतःला अजून असहाय बनवणे. यामुळे निर्वासितांनी असे धैर्य आपल्या अंगी विकसित केले पाहिजे की प्राण गमावण्याच्या काल्पनिक भीतीमुळे पळून जाणे हे**

**आपल्या प्रतिष्ठेविरुद्ध आहे असे त्यांना वाटले पाहिजे. यामुळे जे लोक गाव सोडून निर्वासित होण्याचा विचार करत आहेत त्यांनी माझ्यासारखे जे लोक उपद्रवग्रस्त गावात जाऊन राहत आहेत त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन स्वतःमधील सुप्त साहसाला जागृत करावे. असे करणे हा त्यांच्याकरिता अधिक चांगला मार्ग आहे. या लोकांमध्ये असे साहस सुप्त स्वरूपात आहे असे गृहीत धरून मी हे बोलतो आहे.**

**परंतु अशा साहसाचा संचार मी इतरांमध्ये करू शकतो की नाही हे मला माहीत नाही. आतापर्यंत मी किती तरी सहकाऱ्यांबरोबर राहिलो आहे. परंतु आता मी स्वतःलाच म्हणू लागलो आहे की "आता वेळ आहे. तुला जर स्वतःला ओळखायचे असेल तर एकटा पुढे जा." यामुळे व्यावहारिक दृष्टीने पाहिले तर या खेड्यांत मी जवळपास एकटा आलो आहे. ईश्वरावर अढळ श्रद्धा ठेवून मी तोपर्यंत माझे प्रयत्न करत राहीन जोपर्यंत इथे सर्व प्रकारचा विरोध संपत नाही आणि लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण होत नाही.**

**मी इथे ग्रामीण मुसलमानांमध्ये राहीन. प्रत्येक मुसलमान कुटुंबाशी घनिष्ट संबंध निर्माण करीन, त्यांचे मन समजून घेईन आणि माझे मन त्यांना समजून घेता यावे म्हणून त्यांना मदत करीन. अशा प्रकारे जेव्हा आम्ही एकमेकांना जवळून ओळखू तेव्हा कदाचित वातावरण बदलेल आणि हिंदू-मुसलमानांमध्ये आज जी कटुता भरलेली आहे ती जाऊन तिच्या ठिकाणी मधूर संबंध निर्माण होण्याची वेळ येईल.**

हरिजन, जानेवारी ५, १९४६

------------------

# १९. "द हिंदू"ला मुलाखत

(वार्ताहर म्हणतो की मी गांधाजींना श्रीरामपूर येथील नवीन निवासस्थानी सायंकाळी भेटलो. ते अर्धवट जळालेल्या तोडफोड झालेल्या घरात शांतपणे बसलेले होते.)

श्रीरामपूर,

नोव्हेंबर २०, १९४६

**मी जेव्हा त्यांना विचारले की तुम्हाला तुरुंगात राहिल्यासारखे वाटत नाही काय, त्यावर गांधीजी म्हणाले :**

होय, परंतु एक अंतर आहे. तुरुंगात इच्छा असो वा नसो मला एकांतात राहावे लागत होते. इथे मी तो एकांत माझ्यावर लादून घेतला आहे. इथे माझ्याबरोबर दोन लोक आहेत आणि तेही जास्त झाले आहेत. निर्मल बाबू माझे दुभाष्ये आहेत तर परशुराम मला इतर प्रकारे मदत करतो. माझी किमान पत्रव्यवहार ठेवण्याची इच्छा आहे आणि फारच इच्छा झाली तरच मी हरिजनकरिता लिहीन.

**तुम्ही तुमच्यावर फार शारीरिक ताण देत नाही काय असे गांधीजींना विचारले असता ते म्हणाले :**

लोकांनी माझे फार लाड केले आहेत. जोपर्यंत मी अगदी एकटा राहणार नाही तोपर्यंत मी स्वतंत्र असल्याचा मला अनुभव येणार नाही.

**या खेड्यात किती दिवस राहण्याचा तुमचा विचार आहे असे विचारले असता ते म्हणाले की येत्या काही दिवसांत घटना कोणते रूप घेतात त्यावर हे अवलंबून राहील.**

**खेड्यातील आपल्या कार्यक्रमाचा तपशील सांगत असताना गांधीजी म्हणाले की मी मुसलमानांची भेट घेतली आहे आणि त्यांना माझ्या येण्याचा हेतू सांगितला आहे. दररोज सकाळी स्थांनिक मुलमानांच्या घरी जायचे व सध्याच्या परिस्थितीबद्दलचे त्यांचे विचार समजून घ्यायचे असा विचार मी केला आहे. मी त्यांना माझ्या प्रार्थनेकरिता बोलावणार नाही आणि दोन समुदायांमध्ये प्रेमाचे संबंध निर्माण व्हावे म्हणून त्यांना समजून सांगण्याचा प्रयत्न करीन.**

'द हिंदू', एप्रिल २४, १९४६

---------------

# १००. सावधगिरीची एक सूचना

(प्यारेलाल यांच्या “इनिशिएटेड” या लेखातून उद्धृत. गांधीजींच्या चमूतील लोक “करा वा मरा” या निर्धाराने वेगवेगळ्या गावात जाण्याकरिता निघत असताना गांधीजींनी त्यांना ही सूचना नोव्हेंबर २०ला दिली होती.)

[नोव्हेंबर २०, १९४६ला वा त्यानंतर] (वरील टिपेप्रमाणे)

सैन्यात जो शिपाई आपल्या पायांची काळजी घेत नाही आणि आपल्या पायाला कुरूप वगैरे होऊ देतो त्याला बरखास्त करण्यात येते. अहिंसेच्या सैनिकाकडून यापेक्षा किती तरी जास्त अपेक्षा असते.

हरिजन, जानेवारी, १२, १९४६

----------------

# १०१. प्यारेलाल यांना चिठ्ठी

[नोव्हेंबर २०, १९४६ला वा त्यानंतर]

(प्यारेलाल सांगतात की त्यांना नेमून दिलेल्या गावात जाण्यापूर्वीच त्यांना हिवताप आला होता आणि त्यांची काळजी घेण्याकरिता सुशीला नाय्यर यांना पाठवावे असे एका कार्यकर्त्याने लिहिले होते. दुसऱ्या दिवशी गांधीजींच्या हस्ताक्षरात त्यांना ही चिठ्ठी मिळाली. गांधीजींनी आपली छावणी नोव्हेंबर २०, १९४६ उठवली होती.)

तू तुला नेमून दिलेल्या गावात जाऊ नको. जे आपापल्या नेमून दिलेल्या गावाला जातील त्यांनी तिथे 'करा वा मरा' या निर्धाराने जायला पाहिजे. ते जर आजारी पडले तर एक तर त्यांनी दुरुस्त व्हायला पाहिजे वा मरायला पाहिजे. असे झाले तरच त्यांच्या जाण्याला काही अर्थ राहील. याचा व्यावहारिक अर्थ असा आहे की कोणी आजारी पडला तर त्याने घरगुती औषधोपचाराने वा निसर्गातील पंचमहाभूताच्या उपचाराने दुरुस्त व्हायला पाहिजे. सुशीलाची वैद्यकीय सेवा आपल्या चमूच्या सदस्यांना उपलब्ध आहे असे गृहीत धरले जाऊ नये. तिची सेवा पूर्व बंगालमधील गावकऱ्यांकडे आधीच गहाण पडली आहे. तिने आपल्या गावाच्या कामाचा आराखडा तयार केलेला आहे. ...(मूळ स्रोतात इथे वगळलेले आहे. डॉ. सुशीला नाय्यर यांनी छांगिरगावात मोफत दवाखाना उघडला होता.) गावात जिनप्रमाणे राहून काम चालणार नाही. आपण कथेतील हत्तीणीप्रमाणे सावधगिरीने हालचाल करायला आणि पाऊल टाकायला शिकायला पाहिजे. असे झाले तरच आपल्याला तिथे जगण्याचा अधिकार मिळेल. बंगालमधील खेड्यांमध्ये राहण्याकरिता विशेष कौशल्य पाहिजे. आपण सर्वांनी ते मिळवायला पाहिजे. तुला आणि मला या परीक्षेत उत्तीर्ण व्हावे लागेल. तू जेव्हा चांगला असशील तेव्हा माझ्याकडे ये. तेव्हा मी तुला 'करा वा मरा'चा अर्थ विस्ताराने समजावून सांगेन.

'महात्मा गांधी - द लास्ट फेज', खंड १, भाग २, पृष्ठ ७३-४ ('महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड २,पृष्ठ ९१)

------------

# १०२. सेवाग्राम आश्रमवासीयांना पत्र

(प्यारेलाल यांच्या “द डू ऑर डाय मिशन”मधून उद्धृत.)

[नोव्हेंबर २०, १९४६ला वा त्यानंतर]

(“या उद्ध्वस्त गावात स्वतःला पुरून टाकण्याच्या” गांधींजींच्या निर्णयाच्या संदर्भावरून. याशिवाय आधीचे दोन विषयही पाहा.)

मी आश्रमात लवकर पोहोचेन वा कधी तरी पोहोचेन की नाही ही मला भीती वाटते. यामुळे तुम्ही ही आशा टाकून दिली पाहीजे. हीच गोष्ट माझ्या सहकाऱ्यांनाही लागू आहे. माझ्यासमोरील समस्या अतिशय कठीण आहे व तिला मला तोंड द्यावे लागत आहे. माझी परीक्षा होत आहे. माझ्या कल्पनेतील सत्याग्रहाचे शस्त्र हे दुर्बलांचे शस्त्र आहे की सबळांचे? मला ही दुसरी गोष्ट सिद्ध करायची आहे वा तसे करताना मी माझे जीवन संपवले पाहिजे. याकरिता माझा शोध सुरू आहे. या शोधाकरिता मी या उद्ध्वस्त झालेल्या खेड्यांमध्ये स्वतःला पुरून घेण्याकरिता आलो आहे. तो जे करील ते होईल.

हरिजन, डिसेंबर ८, १९४६

------------

# १०३. डायरीतील नोंदी

(यातील आणि डायरीतील इतर ठिकाणच्या उद्धृतांधील रिकाम्या जागा मूळ स्रोताप्रमाणे आहेत.)

श्रीरामपूर,

नोव्हेंबर २१, १९४६

गीतेच्या पाठांचा अपवाद वगळता सकाळची प्रार्थना मीच केली. प्रार्थनेनंतर अ, ब, क यांना पत्रे लिहिली. सकाळी फिरायला जात असताना हावरा (नोआखाली) येथील मशिदीशी संलग्नित असलेल्या मौलवींशी चर्चा झाली.

त्यानंतर क्ष आणि य (दोन हिंदू कार्यकर्ते आले आणि त्यांच्याशी दीर्घ चर्चा झाली. हिंदू कार्यकर्त्यांशी झालेल्या चर्चेकरिता पाहा परिशिष्ट १ "दोन हिंदू कार्यकर्त्यांशी चर्चा", नोव्हेंबर २१, १९४६) आले व त्यांच्याशी दीर्घ चर्चा झाली. मी त्यांना सांगितले की पूर्णपणे धीर धरा आणि तुमच्या गावात परता. विशेषतः जिथे एक चांगला हिंदू आणि एक चांगला मुसलमान असेल व ते तुमच्या सुरक्षिततेची जबाबदारी आपल्या जीवाचे मोल देऊनही घ्यायला तयार असतील तर तुम्ही असे निश्चितच केले पाहिजे.... मी माझ्या स्वतःच्या हाताने मालीश केली परंतु दाढी करू शकलो नाही (वेळेच्या अभावामुळे). दुपारच्या जेवणात भाज्यांच्या सूपाबरोबर दूध घेतले. प्रार्थनेपूर्वी काही मुसलमान ... मला भेटले; प्रार्थनेनंतर अजून काही आले. स्थानिक मुसलमानांसबंधी चौकशी केली. ... एम. आणि त्यांच्या मित्रांबरोबर दोन तास चर्चा केली. कालप्रमाणेच आज आहार घेतला परंतु त्यात द्राक्षे नव्हती.

'महात्मा गांधी - द लास्ट फेज', खंड १, भाग २, पृष्ठ ४० ('महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड २', पृष्ठ ४९)

--------------

# १०४. नलिनी मित्रा आणि रसमय सूर यांच्याशी चर्चा

(यु. पी. आय.च्या वृत्ताप्रमाणे हे लोक "नोआखाली केंद्रीय मदत समितीतर्फे गांधीजी सकाळी फिरायला जात असताना त्यांना भेटण्याकरिता आले होते. निर्वासितांना तात्पुरते पश्चिम बंगालमध्ये वा हिंदुस्थानात अन्यत्र योजनाबद्ध पद्धतीने ठेवावे ही ठोस सूचना त्यांनी गांधीजींसमोर मांडली.)

श्रीरामपूर,

नोव्हेंबर २२, १९४६

गांधीजी त्यांना म्हणाले की बंगालमधील इतर जिल्ह्यांत वा इतर प्रांतात लोकसंख्येची अदलाबदल केली तर या धोरणाचे अनुसरण इतर प्रांतही करतील आणि म्हणून हे धोरण संपूर्ण देशाकरिता आत्मघातकी होईल. मी अशी कोणतीही योजना मान्य करू शकत नाही. आपले स्वतःचे घर सोडून इतर कुठेही जाण्याचा सल्ला मी लोकांना देऊ शकत नाही. सुसंस्कृत समाजांत बंगाली लोक नेहमीच शौर्य, बलिदान इत्यादी गुणांत आघाडीवर होते. या लोकांनी भीतीमुळे आपली घरेदारे सोडून पळून जावे ही गोष्ट खरोखर दुःखाची बाब आहे. माझी इच्छा आहे की प्रत्येक हिंदू कुटुंबाने आपल्याच गावात वास्तव्य करावे व परिस्थितीला निर्भय होऊन धैर्याने तोंड द्यावे.

शेवटी गांधीजी म्हणाले की सध्याची समस्या केवळ नोआखालीची नाही. ही समस्या संपूर्ण बंगालची आणि संपूर्ण हिंदुस्थानची आहे.

'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', नोव्हेंबर २४, १९४६

---------------

# १०५. रामगंज येथील हिंदू आणि मुसलमान प्रतिनिधींच्या सभेत भाषण

('महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड २, पृष्ठ ५६-५७ वर प्यारेलालनी लिहिले आहे : "२२ नोव्हेंबरला सायंकाळी रामगंज येथील डाकबंगल्यात जवळपास दोन्ही समुदायांचे मिळून ३० प्रतिनिधी आणि सरकारी प्रवक्ता यांची सभा गांधीजींच्या उपस्थितीत झाली. त्या सभेत बंगाल सरकारच्या प्रस्तावाच्या आधारावर शांतिस्थापनेची एक योजना तयार करण्यात आली आणि रामगंज पोलीस स्टेशनकरिता एक शांतता समिती तयार करण्यात आली. याकरिता मान्य करण्यात आलेली योजना अशी होती - गाव, ग्रामसमूह आणि पोलीस ठाणे यांकरिता हिंदू आणि मुसलमान समान संख्येत असलेली एकेक शांतता समिती असेल. मुसलमान सदस्यांची निवड हिंदूंनी करावी आणि समितीचा अध्यक्ष कोणी सरकारी अधिकारी असावा. शांतता समितीने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सरकार घेईल. . . . शातता समितीचे काम पुढीलप्रमाणे ठरवण्यात आले होते. (अ) पुन्हा विश्वास निर्माण करण्याकरिता जोरात प्रचारकार्य करणे. (ब) परतणाऱ्या निर्वासितांकरिता घर बांधण्याचे आणि उदरनिर्वाहाचे सामान उदा. कापड, धान्य वगैरेच्या वाटपाकरिता मदत करणे, (क) ज्या अपराध्यांना आणि शांतताभंग करणारांना पकडणे आवश्यक आहे त्यांची यादी तयार करणे, आणि (ड) दंगलीत जी घरे नष्ट करण्यात आली असतील वा ज्यांचे नुकसान करण्यात आले असेल त्यांची सूची तयार करणे.")

रामगंज,

नोव्हेंबर २२, १९४६

समिती तयार करण्याला संमती देताना महात्मा गांधी म्हणाले की हे सरकार जनतेचे सरकार आहे असे जर सरकारचे म्हणणे असेल तर सरकारने समितीचे निर्णय मान्य केले पाहिजे. गावकऱ्यांच्या सुरक्षिततेकरिता एक प्रामाणिक मुसलमान आणि एक प्रामाणिक हिंदू यांनी जामीन राहायला पाहिजे या गोष्टीच्या निकडीवर त्यांनी परत भर दिला आणि ते पुढे म्हणाले की आवश्यकता पडली तर या दोघांनी मरण्याकरिता तयार असायला पाहिजे. ते जर मेले तर परिणाम चांगलाच होईल (तीन तासांच्या चर्चेनंतर प्रतिनिधींनी शांतता समिती तयार करण्याकरिता मान्यता दिली.)

'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', नोव्हेंबर २५, १९४६

-------------

# १०६. डायरीतील नोंदी

श्रीरामपूर,

नोव्हेंबर २२, १९४६

सकाळी ४ वाजता उठलो. गीतापाठाला दोन तास लागले. पाठ म्हणणाराचे उच्चार अतिशय असमाधानकारक होते.

आर. ला पत्र लिहिले आणि त्यांच्या मुलाने (ज्याची पत्नी इतक्यातच वारली होती) परत विवाह करू नये, आणि लग्न करायचेच असेल तर एखाद्या विधवेशी करावे म्हणून लिहिले.

मुसलमानांच्या बाडीला (वस्ती वा मोहल्ला) सकाळी साडेसात वाजता भेट दिली. रस्ता लांब होता. तिथे जाण्याकरिता पूर्ण २० मिनिट लागले. जाण्यायेण्याकरिता ५५ मिनिट.

कालप्रमाणेच आजही मालीश केली. . . . १०.३० वाजता किती तरी भेटणारे आले. ते गेल्यानंतर पोटावर मातीचा लेप लावून एक लहानशी डुलकी घेतली. एक तास कताई केली. अब्दुल्ला (पोलीस अधीक्षक) इतर काही लोकांबरोबर रामगंज सभेसाठी आले. ४ वाजता त्यांच्याबरोबर रामगंज सभेसाठी निघालो. शेवटी दोन शब्द बोललो. … परतत असताना बोटीवर प्रार्थना केली आणि मग थोडासा झोपलो. रामगंजला जात असताना दूध घेतले. परतल्यानंतर गरम पाणी घेतले. श्रीरामपूरला मध्यरात्री पोहोचलो.

'महात्मा गांधी - द लास्ट फेज', खंड १, भाग २, पृष्ठ ४० ('महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड २, पृष्ठ ४९-५०)

--------------

# १०७. वृत्तपत्रांना वक्तव्य

श्रीरामपूर,

[नोव्हेंबर २३, १९४६] (साधनसुत्राप्रमाणे गांधीजींनी हे वृत्तपत्रांना वक्तव्य "चंडिपूरला निघण्यापूर्वी" या तारखेला दिले होते.)

आहारात मी जी कपात केली होती त्यामुळे मला अजूनही अशक्तपणा जाणवतो (अहवालाप्रमाणे गांधीजींना चंडीपूरला जाताना हगवण लागली होती व वांत्या होत होत्या.) आणि फोड वगैरे बाहेर निघत आहेत. मी दूध घेण्याला सुरुवात केल्यापासून हा चौथा दिवस आहे. डॉ. सुशीला नाय्यरचे मत आहे की नेहमीचा आहार घेऊ लागल्यानंतर हे फोड-पुरळ निघून जातील. त्यांच्या मते हे जीवनशक्तीच्या अभावामुळे झाले आहे. मी जर योग्य काळजी घेतली तर ती शक्ती परत येण्याकरिता आता काही दिवसांचाच अवधी आहे.

माझ्या इतर सहकाऱ्यांप्रमाणेच सुशीलासुद्धा जवळपासच्या खेड्यात गेली आहे.

माझ्या शारीरिक अशक्तपणामुळे माझ्या कामात अडथळा आलेला नाही आणि तसा तो यायलाही नको ही अजून एक गोष्ट मला सांगायची आहे.

'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', नोव्हेबर २६, १९४६

---------------

# १०८. प्रार्थना प्रवचन

चंडिपूर,

नोव्हेंबर २३, १९४६

**गांधीजी म्हणाले की जी शांततासमिती तयार करण्यात आली आहे** (पाहा "डायरीतील नोंदी", नोव्हेंबर २२, १९४६. या विषयावरील गांधीजींच्या सविस्तर मताकरिता पाहा "हिंदू कार्यकर्त्यांबरोबर चर्चा", नोव्हेंबर २१, ९१४६). **तिचे हात बळकट करण्याकरिता सर्वांनी मदत केली पाहिजे असा माझा तुम्हांला सल्ला आहे. समितीबाहेर राहून वर्तमानपत्रातून प्रचार करून तुम्ही समितीच्या शांततापूर्तीच्या हेतूपूर्तीकरिता कोणतीही मदत करू शकणार नाही. मी तुम्हांला चंपारणमधील माझा स्वतःचा अनुभव सांगतो. तेथील संघर्षामुळे एक चौकशी समिती तयार करण्यात आली होती. मला विनाअट त्या समितीचा सदस्य होण्याकरिता विनंती करण्यात आली होती. मी माझ्या मित्रांचा सल्ला घेतला आणि त्या प्रस्तावाचा स्वीकार केला. परिणामी नीळवाल्यांचा एकाधिकार संपला. जवळपास एक शतकापासूनचा तो अन्याय होता. यापूर्वी सात वेळा मजुरांनी बंड केले होते. प्रत्येक वेळी ते बंड क्रूरपणाने दडपून टाकण्यात आले आणि त्यामुळे मजुरांची अवस्था पूर्वीपेक्षाही वाईट होत असे.**

**अशाच पद्धतीने प्रत्येकाने शांतता समितीत भाग घ्यावा आणि तिथे आपले विचार व्यक्त करावे. शक्य आहे की असे केल्यामुळे प्रत्येक न्याय्य तक्रारीवरील उपाय निघू शकेल.**

**मंत्री शमसुद्दिन साहेब, सांसदीय सचिव हमिदुद्दीन साहेब आणि इतरांची भाषणे तुम्ही ऐकली आहेत. निर्वासितांनी आपल्या गावात परत जावे अशी विनंती त्यांनी केली आहे आणि आम्ही तुमचे आणि तुमच्या अब्रूचे रक्षण करू असे आश्वासन त्यांनी दिले आहे. निर्वासितांनी त्यांच्या आश्वासनाचा स्वीकार केला पाहिजे.**

**तुम्ही म्हणू शकता की या केवळ कोरड्या गप्पा आहेत. आमची आधीही फसवणूक झाली आहे. पुरेसा आधार असल्याशिवाय माणसाच्या शब्दांवर विश्वास न ठेवणे हे माणसाच्या प्रतिष्ठेविरुद्ध असते. सर्व मुसलमान जर खोटे बोलणारे असतील तर इस्लाम खरा धर्म असू शकत नाही. परंतु इतिहासाचे माझे ज्ञान अशा गोष्टींच्या विरोधी आहे. कोणतीही खोटी गोष्ट जगात फार काळ टिकू शकत नाही.**

**इस्लाम जगाच्या कोट्यवधी लोकांमध्ये जो पसरला तो त्याच्या अंतर्गत गुणांमुळे. इथे तुमच्यासमोर बसलेले लोक जनतेने निवडलेले प्रतिनिधी आहेत. ते प्रांताचे सरकार चालवत आहेत. त्यांनी तुम्हांला आश्वासन दिलेले आहे. हिंदूंना माझा सल्ला आहे की तुम्ही त्यांच्या शब्दांवर विश्वास ठेवावा आणि त्यांची परीक्षा पाहावी. याचा अर्थ असा नाही की पूर्व बंगालमध्ये एकही वाईट मुसलमान राहिलेला नाही. कोणत्याही समुदायात चांगली आणि वाईट माणसे असतात. अप्रामाणिकपणाची वर्णतणूक केली तर ती कोणत्याही मंत्रिमंडळाला वा संघटनेला खाऊन टाकील. शमसुद्दिन साहेबांनीसुद्धा त्यांना सांगितले आहे की पाकिस्तान क्रूरपणाच्या कृत्यांनी मिळवता येऊ शकत नाही. मला**

सूर्यप्रकाशाप्रमाणे स्पष्ट दिसते की आपण जर आपसात भांडत राहिलो तर तिसरी सत्ता आपल्यावर राज्य केल्याशिवाय राहणार नाही. मग ती सत्ता ब्रिटिशांची असो की अजून कोणत्या मित्र राष्ट्राची असो, त्यामुळे काहीही फरक पडत नाही. आपण गुलामच राहणार आहो.

एक वेळ अशी होती की जेव्हा हिंदू आणि मुसलमान एक होते. १९१६साली लीग आणि काँग्रेसचा करार झाला होता. तो करार चांगला होता की वाईट हा प्रश्न नाही. त्या वेळी मी हिंदुस्थानमध्ये नवीन होतो आणि मी क्वचितच कोणाला ओळखत होतो व देशात काय सुरू होते हेही मला माहीत नव्हते. त्यानंतर खिलाफत आंदोलन आले आणि मग पूर्वी कधीही नाही असे सांप्रदायिक ऐक्य निर्माण झाले. आज हिंदू जेव्हा "अल्ला - ओ - अकबर"ची घोषणा ऐकतात तेव्हा ते घाबरतात. त्या काळात सभांमध्ये या घोषणा वारंवार केल्या जात असत : "वंदे मातरम", "अल्ला - ओ- अकबर" आणि "सत श्री अकाल" या घोषणा हजारोंच्या संख्येत हिंदू, मुसलमान आणि शीख एका आवाजात करत असत. आजही ते तेच लोक आहेत. त्या काळात जे तरुण होते तेच आज प्रौढ झाले आहेत. आता ते मित्राप्रमाणे का राहू शकत नाहीत? ही कटुता आता इतकी खोलवर रुजली आहे की ती नाहीशी करता येऊ शकत नाही यावर माझा विश्वास बसू शकत नाही. तुमच्या मदतीशिवाय शांततासमिती काम करू शकत नाही. तुम्हांला जर खरी शांतता पाहिजे असेल तर परस्परांबद्दल विश्वास आणि आत्मविश्वास याशिवाय दुसरा कोणताही मार्ग नाही. ते म्हणतात की बिहारने नोआखालीचा बदला घेतला. कल्पना करा की पूर्व बंगालमधील वा जगातील सर्व मुसलमानांनी बिहारचा बदला घ्यायचा असे ठरवले तर हिंदुस्तानचे काय होईल?

गांधीजी म्हणाले की जिथे घरे जाळण्यात आली आहेत तिथे माझ्या समजाप्रमाणे सरकार नवीन घरे बांधून देत आहे. घरी परतल्यानंतर तुम्हांला काही अडचण आली वा तुम्हांला काही त्रास देण्यात आला तर तुम्ही शांततासमितीकडे तक्रार करू शकता.

सभा सुरू असताना गांधीजींना जे पत्र देण्यात आले त्याचा त्यांनी उल्लेख केला. चंडिपूरला करोडो रुपयांचे नुकसान झाले असून त्याची भरपाई केली जावी असे त्या पत्रात म्हणण्यात आले होते. गांधीजी म्हणाले की ते नुकसान करोडो रुपयांचे आहे की लाखो रुपयांचे आहे हे मला माहीत नाही. परंतु अशा बाबतीत जे केले पाहिजे ते करण्याकरिता सरकार बांधलेले आहे.

प्रधानमंत्री (मुख्यमंत्री) आपल्या शब्दांतून आग ओकतात असे नंतर सांगण्यात आले. माणसाच्या अंतःकरणात काय सुरू आहे ते केवळ ईश्वरालाच माहीत असते. सुऱ्हावर्दीसाहेब चांगले माणूस आहेत की वाईट हे मी सांगू शकत नाही. परंतु त्यांना मतदारांनी निवडून दिले आहे हे मला माहीत आहे. त्यांच्या सरकारच्या अंतर्गत हिंदूंनी आणि मुसलमानांनी शांततापूर्वक राहायचे आहे आणि बिहारच्या काँग्रेस सरकारच्या अंतर्गतही हिंदू आणि मुसलमानांना राहायचे आहे. लोकांना जर एखादे विशिष्ट सरकार आवडत नसेल तर मतदार ते बदलू शकतात. परंतु ही गोष्ट माझ्या अधिकार क्षेत्रात नाही.

**या पत्रात पुढे म्हटले आहे की पोलीस अधीक्षक वाईट माणूस आहे आणि त्यांना नोआखालीबाहेर पाठवण्यात यावे. मी परत सांगतो की पोलीस अधीक्षक वाईट गृहस्थ आहेत की चांगले हे मला माहीत नाही. परंतु त्यांच्या प्रमुखांचा त्यांच्यावर विश्वास आहे. गांधीजी म्हणाले की गेल्या काही दिवसात मी या गृहस्थांच्या अनेकदा संपर्कात आलो आहे आणि हे आरोप खोटे असतील तर अधीक्षक साहेब ते फेटाळून लावतील आणि ते खरे असतील तर आपल्या चुकांबद्दल ते खेद व्यक्त करतील याची मला खात्री आहे. परंतु मला तुम्हांला एक गोष्ट सांगायची आहे. ते जर वाईट असतील तर नोआखालीचे लोक वाईट आहेत हे त्याचे कारण आहे असे म्हणावे लागेल. वाईट लोकांमध्ये फार कमी चांगले लोक राहत असतात. काँग्रेसमधील सर्व लोक काही देवदूत नाहीत.**

**त्यानंतर सैन्य राहिलेच पाहिजे अशी विनंती करण्यात आली होती. सध्याच्या घटनेप्रमाणे सैन्याला मंत्र्यांच्या सल्ल्याप्रमाणे वागावे लागत असते. ही लोकशाही आहे. मंत्रीच तुमचे सोजीर होण्याकरिता तयार असताना तुम्ही सैन्याची मागणी का करावी? जास्तीत जास्त वाईट झाले तर फार तर तुमचा जीव जाईल. शूर स्त्री-पुरुष म्हणून तुम्ही याचा स्वीकार केला पाहिजे. पूर्व बंगालमधून पळून गेल्याने तुम्ही अतिशय वाईट प्रकारचे भ्याड व्यक्ती ठराल. असे कोणी व्हावे अशी मी कधीही अपेक्षा करू शकत नाही.**

सर्व हिंदू जर वाईट असतील तर हिंदूधर्म वाईट असला पाहिजे. सर्व मुसलमान जर वाईट असतील तर इस्लाम वाईट असला पाहिजे. येशू म्हणाला आहे की केवळ तोच माझा अनुयायी आहे की जो स्वतःचे काम स्वतः करतो, तो नाही जो तोंडाने लॉर्ड, लॉर्ड म्हणत असतो. ही गोष्ट सर्व धर्मांना लागू होते.

**शमसुद्दिन साहेब आणि त्यांचे सहकारी जे बोलतात तोच त्यांचा अर्थ नसेल तर ते त्यांना माहीत. ते कळेलच. जोपर्यंत माझा संबंध आहे अशी दुःखद परिस्थिती पाहण्याकरिता जिवंत राहण्याची माझी इच्छा नाही.**

'द हिंदू', नोव्हेंबर २८, १९४६

--------------

# १०९. रोजनिशितील नोंदी

श्रीरामपूर,

नोव्हेंबर २३, १९४६

मी स्वतःच (प्रार्थनेत) गीतेच्या अध्यायांचे पाठ म्हणालो. यापुढे प्यारेलाल तेव्हाच गीता म्हणेल जेव्हा तो उच्चारांवर पुरसे प्रभुत्व मिळवेल. प्रार्थनेत एक इंग्रजी स्तोत्रही म्हणायला लावले.

मालवीयजींच्या मृत्यूवरील वक्तव्य तयार केले (पाहा "मालवीयजी", डिसेंबर ८, १९४६). साडेसात वाजता एका मुसलमानाच्या घरी गेलो. तिथे घरातील लोकांशी कुराणसंबंधी चर्चा केली. नंतर त्यांनी नारळ आणि संत्री भेट म्हणून पाठवली.

एन.ने मालीश केली. यामुळे मालीशच्या टेबलवर मला ४० मिनीट झोप घेता आली.

दुपारच्या जेवणात पालेभाज्या वाढण्यात आल्या. त्या अतिशय कडू होत्या. त्या एक अंस नारळाच्या दुधाबरोबर खाल्या. ...

नंतर थोडीशी डुलकी घेण्याचा अयशस्वी प्रयत्न केला - मळमळ आणि पोटात मुरडे येत होते. मी स्वतःच बस्ती (इनिमा) घेतली. रामगंजला जाताना पोटावर मातीचा लेप ठेवून पडलो होतो. डोळा लागला. . . . रस्त्यातच जोरदार हगवणी आणि ओकाऱ्या सुरू झाल्यामुळे बोट थांबवावी लागली. ... थोडे बरे वाटले. रामगंजला ५ वाजता पोहोचलो. (स्रोताप्रमाणे गांधीजी २३ तारखेला रामगंजला पोहोचले नव्हते.) ... श्रीरामपूरला ११ वाजता पोहोचलो. ... सभेला जात असताना वाटेत काही आणि सभा असताना काही असे करून दिवसाचे कताईचे काम संपवले.

'महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड २, पृष्ठ ५०

------------------

# १९०. निर्मल कुमार बोस यांना चिठ्ठी

नोव्हेंबर २४, १९४६

चि. निर्मल,

हे लिफ्याप्यात टाकून शैलेनला (शैलेन चटर्जी) द्या. त्याचा माणूस जेव्हा चंडिपूरला जाईल तेव्हा त्याने तिथून ते पोस्ट करावे. तो असे करू शकेल काय हे त्याला विचारा. सोबत तार आहे; ती लिहून काढून शैलेनला द्या. त्याला ती पाठवण्याकरिता सांगा. त्याला तारेकरिता येणारा खर्च द्या. बिहारलासुद्धा तार पाठवा.

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. १०५१४

---------------

# १११. शरत चंद्र बोस यांच्याशी चर्चा

(ही चर्चा प्यारेलाल यांच्या "ऍट श्रीरामपूर" या शीर्षकाखालील लेखात प्रकाशित झाली होती. 'महात्मा गांधी - अखेरचं पर्व'मध्ये ते म्हणतात : "नोव्हेंबर २४ला अगदी सकाळीच बंगाल काँग्रेसचे पुढारी शरत चंद्र बोस कलकत्त्यातील आपल्या किती तरी मित्रांबरोबर आले व सरकारच्या शांतता प्रस्तावासंबंधी त्यांची गांधीजींशी श्रीरामपूर येथे दोन तास चर्चा झाली. निर्मल कुमार बोस आपल्या 'माय डेज विथ गांधी' या पुस्तकातील पृष्ठ क्रमांक ६७वर म्हणतात की चपलकांत भट्टाचार्य संपादक 'अमृत बझार पत्रिका', देवनाथ दास, कॅप्टन रझिक, आझाद हिंद सेनेचे लेफ्टनंट सॅमसन आणि दुसरे एक स्थानिक मित्र शरत चंद्र बोस यांच्याबरोबर होते.)

श्रीरामपूर,

[नोव्हेंबर २४, १९४६] (वरील टीपेप्रमाणे)

**गांधीजींनी मान्य केले की पुढारी अतिशय खालच्या पातळीवर उतरलेले आहेत, परंतु सर्वसाधारण जनता नाही. अजूनही जनतेचे मन शुद्ध आहे.**

ते पुढे म्हणाले : इतकेच नाही तर या गावातसुद्धा मला काही प्रतिसाद मिळाला. परंतु अर्थातच त्याआधारावर विसंबून मी विचार करत नाही.

**बोस : मानवतेला अगदी खालच्या पातळीवरून वर उचलण्याचा तुम्ही प्रयत्न करत आहा यावर आमचा विश्वास आहे. परंतु तुम्हाला यात यश येईल की नाही याबद्दल आम्हाला संशय आहे.**

गांधीजी - मलासुद्धा याबद्दल संशय आहे. मी यशस्वीही होऊ शकतो आणि या प्रयत्नात माझा अंतही होऊ शकतो. यश अथवा अपयश यांत अंतिम कसोटी नसते.

**बोस - बरोबर.**

गांधीजी - आणि शेवटपर्यंत प्रयत्न करत राहण्यातच खरी परीक्षा असते.

**बोसनी नंतर गांधीजींना विचारले की अधिकारी वर्गाच्या मानसिकतेत काही बदल झाला आहे काय.**

गांधीजी उत्तरात म्हणाले - सरकारच्या धोरणात बदल आहे आणि त्यात सुधारणा झाली आहे. परंतु अंतःकरणातील बदलाबद्दल बोलायचे तर मला आणि तुम्हाला त्याकरिता प्रयत्न करावे लागतील.

**मुलाखतीला आलेले म्हणाले की हिंदूंना इतके विवश झालेले पाहून दुःख होते.**

गांधीजींनी उत्तर दिले - हा काही केवळ हिंदूंचाच एकाधिकार नाही. आपण सर्वच असे विवश झालेले आहो. मी जरी एकटा असलो तरी पूर्व बंगालमधील हिंदूंना या असहायतेतून बाहेर काढण्याकरिता मी संघर्ष

करीन. मी या वा त्या समाजाचे भले करण्याकरिता इथे आलेलो नाही. अहिंसा ही काही केवळ एकट्याने आचरायची गोष्ट नाही. संपूर्ण समाज अहिंसेनुसार आचरण करू शकतो. या गोष्टीची परीक्षा पाहण्याकरिता मी नोआखालीत आलो आहे. माझ्या अहिंसेचे दिवाळे निघाले आहे काय? मला जर इथे अपयश आले तर त्याचा अर्थ असा होणार नाही की माझा सिद्धांत चुकीचा आहे. त्याचा अर्थ इतकाच होईल की माझी साधना अपूर्ण आहे, माझ्या तंत्रात कुठे तरी आणि कोणती तरी चूक आहे.

**बोस - तुम्ही आणि जवाहरलालने बिहारच्या परिस्थितीला जितके गांभिर्याने घेतले तितक्याच गांभिर्याने लीगच्या पुढाऱ्यांनी नोआखालीच्या परिस्थितीला घेतले असते तर एका दिवसात कायदा आणि सुव्यवस्थेची स्थापना करता आली असती.**

अशी तुलना करणे म्हणजे स्वतःच स्वतःचा अधःपात करून घेणे आहे. आवश्यकता आत्मपरीक्षणाची आणि अधिक आत्मपरीक्षणाची आहे.

मी इथे केवळ मुसलमानांशीच बोलण्याकरिता आलेलो नाही तर हिंदूंशीसुद्धा बोलण्याकरिता आलेलो आहे. ते इतके भित्रे का आहेत? जोपर्यंत धैर्य आणि शारीरिक पराक्रमाचा संबंध आहे हरिजन आणि नामशुद्र तुलनात्मक दृष्टीने याबाबतीत श्रेष्ठ आहेत. ते शूर आहेत. परंतु इतर हिंदूंनी जातिभेद टाकून दिला पाहिजे. या संकटामुळे जर सवर्ण हिंदूंचे डोळे उघडतील आणि अस्पृश्यता पाळामुळासह नाहीशी होईल तर हीसुद्धा ईष्टापत्तीच आहे असे म्हणता येईल.

**हिंदुस्थानातील आपल्या पूर्वीच्या अनुभवाची आठवण करत गांधीजी म्हणाले की चंपारण सत्याग्रहाच्या दरम्यान मी राजेंद्र बाबूंच्या घरी गेलो असता मला त्यांच्या घराच्या ओसरीत बसावे लागले होते त्यांचा नोकर मला विहिरीवर आंघोळ करू देण्याकरिता तयार नव्हता. यात सुधारणा झाली आहे परंतु किती तरी करायचे राहिले आहे.**

**भेटायला येणारांनी मान्य केले की हे दोष नाहीसे करण्याकरिता हिंदू धर्माला बरेच दूरवर जावे लागेल. नोआखालीतील बळजबरीच्या धर्मांतरासंबंधी बोलताना मुलाखत घेणारे म्हणाले की ज्या लोकांचे धर्मपरिवर्तन घडवून आणण्यात आले आहे त्या लोकांना जर लवकर हिंदू धर्मात परत आणण्यात आले नाही तर हिंदू आणि मुसलमानांमधील दरी कायम होऊन जाईल.**

गांधीजी - अनेक लोक परतले आहेत. परंतु सर्वांनी परतायला पाहिजे.

**धर्मपरिवर्तनाच्या प्रश्नावर इतकी ताठर भूमिका घेऊन तुम्ही एका समुदायाची बाजू घेत नाही काय असा प्रश्न गांधीजींना विचारण्यात आला. असे असेल तर तुमच्याकरिता सर्व धर्म सारखे आहेत हा तुमचा दावा कसा मान्य करता येऊ शकेल?** (हा परिच्छेद 'महात्मा गांधी - द लास्ट फेज'मधून घेतला आहे.)

गांधीजी - धार्मिक सहिष्णुतेवर अर्थातच माझा नेहमीच विश्वास राहिलेला आहे. परंतु मी त्याच्याही पुढे गेलो आहे. मी सहिष्णुतेपासून सर्व धर्मांबद्दलच्या समान आदरापर्यंत गेलो आहे. हे सर्व धर्म एकाच महावृक्षाच्या शाखा आहेत. परंतु स्वार्थाकरिता मी एका शाखेवरून दुसऱ्या शाखेवर उडी मारायला नको. असे करून मी ज्या शाखेवर बसलेला असतो तीच शाखा कापतो. यामुळे एका धर्मातून दुसऱ्या धर्मात जाण्याबद्दलच्या माझ्या भावना फार तीव्र राहिलेल्या आहेत. धर्मपरिवर्तन सहजप्रेरणेमुळे आणि आंतरिक विकासाकरिता करण्यात आले असेल तर मात्र गोष्ट वेगळी होते. अशा प्रकारचे धर्मपरिवर्तन कधीही सामूहिक पातळीवर होऊ शकत नाहीत. आणि संपत्ती, जीव वा भौतिक लाभ याकरिता माणसाने कधीही धर्मपरिवर्तन करायला नको.

**यानंतर एका दक्षिण भारतीय पाद्रीने सांगितलेली गोष्ट गांधीजींनी सांगितली. एक हरिजन धर्मांतर करून ख्रिश्चन धर्माचा पाद्री झाला होता. परंतु ख्रिश्चन झाल्यानंतरही त्याचे मूळातील दोष जसेच्या तसे कायम होते. त्याच्याबद्दल त्या बिशपने चार्ली ॲन्ड्रूयूज यांना सांगितले होते की हे गृहस्थ पाद्री आहेत असे मला वाटतच नाही.**

**बोस - इथे जे दानवी प्रकार घडले आहेत त्यांना तोड नाही आणि तेही धर्माच्या नावावर घडले आहेत. कोणत्याही माणसाच्या मनात त्यामुळे घोर निराशा निर्माण होऊ शकते.**

गांधीजी - मी अगदी तरुण असतानापासून मी मानवी राक्षसांना भेटलो आहे. परंतु त्यांच्या अंतःकरणाची तार जर योग्य ठिकाणी छेडली गेली तर तेसुद्धा दुरुस्तीच्या पलीकडे नसतात.

**माणसाच्या दारूण दुःखाचे आणि घोर विनाशाचे दृश्य पाहून भावनारहित आणि अनुभवी अधिकाऱ्यांच्या अंतःकरणाला कशा प्रकारे पाझर फुटला होता यासंबंधीचे गांधीजींनी एवढ्यातीलच आपले दोन अनुभव सांगितले.**

हे सर्व इतके भयानक आहे की तुम्हाला त्यांची अतिशयोक्ती करण्याची गरजच पडत नाही. अधिकाऱ्यांना मी सांगितले आहे की मी संख्येची फिकीर करत नाही. अपहरण, बलात्कार, बळजबरीचे विवाह वा बळजबरीचे धर्मांतर यासंबंधीचे एक तरी प्रकरण घडले काय? जर असे काही घडले नसेल तर तितके माझ्याकरिता पुरेसे आहे. अशा गोष्टी घडल्याचे त्यांनी मान्य केले.

**अपहृत स्त्रियांच्या सुटकेचे काय? त्यांनी तक्रार केली की आम्हांला माहिती मिळताच आम्ही सैन्यातील पोलिसांची एक तुकडी त्यांची सुटका करण्याकरिता पाठवली, परंतु बदमाशांना ती तुकडी येत असल्याची सूचना आधीच मिळाली होती व त्यांनी त्या अपहृत मुलीला अजून कुठे तरी हलवले.**

गांधीजी - मी आपल्या लोकांना सांगितले : 'सैन्य वा पोलिसांच्या मदतीवर अवलंबून राहू नका.' तुम्हांला लोकशाहीचे रक्षण करायचे आहे आणि लोकशाही व सैन्यावर अवलंबून राहणे या दोन गोष्टी एकत्र नांदू शकत नाहीत. एका ठिकाणी सैन्य चांगले आहे आणि दुसऱ्या ठिकाणी वाईट असे तुम्ही म्हणू शकत नाही. सैन्याची मदत तुमचा अधःपात घडवील (पुढील सहा वाक्ये 'महात्मा गांधी - अखेरचं पर्व'मधून घेतलेली आहेत.). लोकशाहीत तुम्ही जर एखाद्या गुंडाला सत्तेवर बसवले तर तुम्ही तयार केलेल्या अंथरुणात तुम्हालाच झोपावे लागेल. यावर एकमेव उपाय मतदारांना शिक्षित करून त्यांच्यात परिवर्तन घडवून आणणे हाच आहे आणि आवश्यकता पडली तर त्याकरिता सत्याग्रहही करावा लागेल. आपल्या व्यवहारात सर्वत्र आणि सदैव सुसंगती असली पाहिजे. लोकशाही जर बिहारमध्ये चांगली असेल तर ती बंगालमध्येही चांगली असली पाहिजे. यामुळे मी निवडून आलेल्या लोकप्रिय मंत्र्यांकडे जायला पाहिजे कारण ते माझे मंत्री आहेत. जर त्यांना अपयश आले तर त्यांना बदलवण्याकरिता लोकमत तयार केले पाहिजे. याला लोकशाही म्हणतात. बिहार असो की बंगाल लोकांनी आपल्या पायावर उभे राहायला पाहिजे. प्रत्येकाने एखाद्या शूर शिपायाप्रमाणे मरायला पाहिजे. कोणीही आपले घर अथवा गाव सोडू नये अशी माझी इच्छा आहे.

**दुसऱ्या एकाने प्रश्न विचारला की पंडित नेहरू बिहारमध्ये गेले आणि तेथील दंगली थांबवण्याकरिता त्यांनी इतका प्रयत्न केला, परंतु बंगालकरिता त्यांनी काहीही केले नाही. प्रांतांच्या स्वायत्ततेमुळे अंतरिम सरकार एका प्रांतात जर हस्तक्षेप करू शकत नसेल तर ते दुसऱ्या प्रांतात हस्तक्षेप कसा करू शकते?**

**गांधीजी म्हणाले की जवाहरलाल जसे अंतरिम सरकारचे उपाध्यक्ष आहेत तसेच ते कॉँग्रेसचे पहिल्या क्रमांकाचे सेवकही आहेत ही गोष्ट तुम्ही विसरायला नको. केंद्रीय मंत्रिमंडळाचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी घटनेच्या चौकटीतच काम केले पाहिजे. परंतु बिहारमध्ये पंडित नेहरू आणि राजेंद्र प्रसाद यांना कॉंग्रेसी म्हणून एक मान आहे आणि जबाबदारीही आहे.**

**मुलाखत घेणारा एक जण म्हणाला की बंगालचा उपयोग बुद्धिबळातील सोंगटीप्रमाणे करण्यात येत आहे.**

गांधीजी - नाही. आज बंगाल पुढे आहे कारण बंगाल हा बंगाल आहे. तो हाच बंगाल आहे की ज्याने टागोर आणि बंकिमचंद्रांना जन्म दिला. चितगाव शस्त्रागारावर हल्ला करणारांची कृती कितीही गैरमार्गावर भरकटलेली असली ते वीर याच भूमीत जन्माला आले होते. नाही, तुम्ही हे समजून घेतले पाहिजे. बंगाल जर या खेळात भाग घेईल तर संपूर्ण हिंदुस्थानच्या समस्या सुटतील. म्हणूनच मी स्वतः बंगाली झालो आहे. (पुढील दोन वाक्ये 'महात्मा गांधी - अखेरचं पर्व'मधून घेतली आहेत.) मी बंगालमध्ये इतका विनाश पाहिला आहे की रडूनरडून माझे

डोळे फुटून गेले असते. परंतु जे काही घडले त्याकरिता मी एक टिपूसही ढाळणार नाही. अजून आपल्याला दीर्घ पल्ला गाठायचा आहे. अशा लोकांच्या बंगालमध्ये अशा भ्याडपणाचे दृश्य का दिसावे?

**बोस - मला जेव्हा पूजास्थळांची विटंबना केलेली आढळते तेव्हा मी स्वतःलाच विचारतो की या पूजास्थळांना कोणी स्पर्श करण्याआधी प्रत्येक घरातील स्त्री, पुरुष आणि मुले का मेली नाही.**

त्यांनी जर असे केले असते तर तुम्हांला इतर कोणाच्याही मदतची गरज वाटली नसती. आज नोआखाली आपल्या प्रमुख लोकांना मुकलेली आहे. त्यांनी धोका पत्करायला नकार दिला आणि आपले घरदार सोडून ते निघून गेले. गरीब बिचारे मनोरंजन बाबू गोंधळलेले आहेत. शांतता समितीवर त्यांनी कोणाला ठेवावे? मी त्यांना सांगितले की ही पोकळी भरून काढण्याकरिता सामान्य माणसाने स्वतःला वर उचलले पाहिजे. निसर्गात पोकळी सारखी काही गोष्ट नसते. निसर्गाला पोकळीची घृणा आहे. मी त्यांना म्हणालो की तुम्ही त्यांना लिहून पाहा. ते जर परत आले तर फार चांगली गोष्ट. नाही तर सामान्य माणसाने पुढे यायलाच पाहिजे. आज त्यांचा दिवस आहे.

**प्रश्न - महात्माजी आम्हांला एका शब्दात सांगा की युद्ध आहे की शांतता? शांतता समित्या की युद्ध समित्या?**

गांधीजी - शांतता समित्या. जेव्हा शांतता अपयशी होते तेव्हा त्याची युद्धात परिणती होते. आपले प्रयत्न नेहमीच शांततेकरिता असले पाहिजे. परंतु ती शांतता सन्मानजनक आणि जिवाच्या व संपत्तीच्या सुरक्षिततेसह असली पाहिजे. या दोन अटींवरच निर्वासित आपल्या घरी परतू शकतात. त्यांनी स्वतःमध्ये धैर्य विकसित केले तर अशा कोणत्याही सुरक्षाकवचाशिवायही ते अर्थातच आपल्या घरी परतू शकतील. आज प्रत्येक खेड्याकरिता एका हिंदूने आणि एका मुसलमानाने निर्वासितांच्या सुरक्षिततेकरिता जामीन राहावे असे मी सुचवले आहे. लोकांमध्ये जर आवश्यक धैर्य असेल तर त्यांनी इतर कोणावरही अवलंबून न राहता केवळ ईश्वरावर आणि आपल्या स्वतःच्या बळावर आत्मरक्षण करण्याच्या भावनेवर अवलंबून राहायला पाहिजे. ते जर असे करतील तर नोआखालीतील सर्व गुंडांना वातावरणातील हा बदल जाणवेल व ते चांगले वर्तन करू लागतील. मी काय म्हणतो आहे ते मला कळते. मी काठेवाडमधून आलो आहे. तो प्रदेश दरोडेखोरांकरिता प्रसिद्ध आहे. ते सुधारण्यापलीकडे आहेत असे नाही हे मला माहीत आहे.  आणि जे काही घडले त्याकरिता केवळ गुंडच जबाबदार नाहीत हेही मला माहीत आहे.

**हिंदूंनी शांतता भंग करण्यासारखे काहीही केलेले नाही तर केवळ मुसलमानच शांतता समितीत का नसावे अशी सूचना करण्यात आली.**

गांधीजी - नाही. आपली भूमिका पार पाडण्याकरिता हिंदूसुद्धा तिथे असले पाहिजे. तसे झाले नाही तर शांतता समिती केवळ नाटक असेल. ('महात्मा गांधी - अखेरचं पर्व'मध्ये प्यारेलाल म्हणतात की "सकाळी फिरायला जात असताना शरत बोसही गांधीजींबरोबर चालले होते. त्यांच्याजवळ गांधीजी म्हणाले की माझ्या शांतता कार्याकरिता मुसलमान जरी पुढे येत नसतील तरी केवळ हिंदूंनी सुद्धा काम भागवता येईल. आपल्या मिठाला जागणारे मूठभर लोक जरी मिळाले  तरी मी ही लाट अडवू शकेन. अट इतकीच आहे की स्थानिक हिंदूंनी यात भाग घेतला पाहिजे. त्यांच्याकडून माझी किमान अपेक्षा इतकीच आहे की त्यांनी त्यांच्यामधील अस्पृश्यता पाळामुळांसह खणू काढून समूळ नष्ट करावी. असे केले नाही तर त्यांना त्यांचे योग्य स्थान कधीही मिळू शकणार नाही.")

**बोस - बिहारला अहिंसेच्या बळावर नियंत्रणात आणता येणे शक्य नव्हते काय? मग काँग्रेसला सैन्याचा मुक्तहस्ते उपयोग का करावा लागला?** (हा प्रश्न 'महात्मा गांधी - द लास्ट फेज'मधून उद्धृत केला आहे.)

होय. परंतु १९४२ आणि त्यापूर्वीपासूनसुद्धा बिहारला संघटित हिंसेचे धडे मिळत आहेत. १९४२ साली तर गुंडांबद्दलची आपली दुर्बलता पराकोटीच्या स्तरावर गेली. मला १९४२ची गुणवत्ता कळते. लोकांना दाबून ठेवता आले नाही. परंतु त्याचबरोबर मी आपल्या चुकांकडे दुर्लक्षही करू शकत नाही. आपण अधिक चांगले करायला शिकायला पाहिजे (नाही तर त्याची किंमत चुकवायची तयारी ठेवली पाहिजे).

'हरिजन', जानेवारी १२, १९४७; आणि 'महात्मा गांधी - द लास्ट फेज', खंड १, भाग २, पृष्ठ ४८-५० ('महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड २', पृष्ठ ५८-६१)

---------------

## ११२. द. बा. कालेलकर यांना तार

नोव्हेंबर [२४] ("सत्याग्रह वा स्वराज्य" या पुस्तकाला प्रास्ताविक), १९४६

काकासाहेब,

काकावाडी, वर्धा

आप्पांच्या पुस्तकाचे प्रास्ताविक पोस्ट केले आहे.

बापू

फोटोप्रतीवरून. जी. एन. १०९८४

--------------

# ११३. प्रार्थना प्रवचन

(गांधीजींचा हा मौनदिवस असल्यामुळे त्यांचे भाषण वाचून दाखवण्यात आले.)

श्रीरामपूर,

नोव्हेंबर २४, १९४६

मला माझ्या साप्ताहिक मौनाची नेहमीपेक्षा लवकर सुरुवात करावी लागली याचा मला खेद होतो. शमसुद्दिन साहेबांचा असाच आदेश होता. परंतु मी कुठेही असलो तरी माझे अंतःकरण इथे आहे. जोपर्यंत या खेड्यातील मुसलमान बंधू-भगिनी हिंदूंना, जे इथे राहत होते, राहण्याकरिता परत बोलावत नाहीत तोपर्यंत माझे अंतःकरण शांत होऊ शकत नाही. त्यांनी हे आपले कर्तव्य समजावे आणि ते पार पाडण्याचा प्रयत्न करावा.

'हरिजन', जानेवारी ५, १९४७

--------------

# ११४. रामगंज येथील शांतता समितीत भाषण

नोव्हेंबर २५, १९४६

बंधूंनो,

आज माझी तुमच्याशी बोलण्याची अगदीच इच्छा नव्हती कारण तुम्ही पाहतच आहा की अजूनही माझा आवाज अतिशय क्षीण आहे. आशा आहे की तुमचे काम चांगल्या प्रकारे पुढे जाईल.

परंतु अजूनही उपद्रवाचे वादळ घोंगावत आहे. मला आता आता संदीपकडून एक तार व अनेक तक्रारीसुद्धा मिळाल्या आहेत. त्यावरून सर्व काही ठीक नाही असे दिसते. मी हे सर्व शमसुद्दिन साहेबांकडे चौकशीकरिता आणि त्यात जर काही तथ्य असेल तर कारवाई करण्याकरिता पाठवले आहे.

गावांमध्ये ज्या शांततासमित्या बनवण्यात आल्या आहेत (तिथे उपस्थित असलेल्या शमसुद्दिन आहमद यांनी घोषित केले होते की सात गावांमध्ये शांतता समित्या तयार करण्यात आलेल्या आहे.) त्यांच्याबद्दल मला एक तक्रार मिळाली आहे. त्या तक्रारीनुसार काही मुसलमान सदस्य विश्वासाकरिता पात्र नाहीत. हिंदू सदस्य त्यांना घाबरतात परंतु त्या सदस्यांविरुद्ध उघडपणे बोलण्याचे त्यांच्यात धैर्य नाही. परंतु ते जर साहस करणार नाहीत आणि समित्यांमध्ये चुकीचे लोक राहिले तर समित्यांवर लोकांचा विश्वास बसणार नाही. आपल्याला खरी गरज कशाची असेल तर ती योग्य प्रकारच्या माणसांची. माझी सूचना आहे की एक हिंदू आणि दुसरा मुसलमान अशी दोन चांगली आणि शूर माणसे, जे वेळ आली तर जीव जरी गेला तरी त्याची फिकीर न करता उपद्रव थांबवण्याची जबाबदारी घेतील तर तितके पुरेसे होईल. समितीत जाण्याची इतकी उत्सुकता का असावी? ही जागा काही मानमरातब मिळवण्याची नाही, ती सेवा करण्याची जागा आहे आणि जर खरोखरच कोणाला सेवा करण्याची इच्छा असेल तर बाहेर राहूनही तो सेवा करू शकतो आणि समितीत येऊनही सेवा करू शकतो.

समितीवर मुसलमानांना जे पाचारण करण्यात आले आहे ते त्यांनी इस्लामची सेवा करावी म्हणून. सर्वात महत्त्वाची गोष्ट हिंदूंमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे आहे. तो निर्माण झाला तर ते आपल्या धर्माचे आचरण मोकळेपणाने करू शकतील. श्री अखिल दत्त यांनी मला ८५० रुपयांचा चेक आणि एक पत्र पाठवले आहे. त्या पत्रात ते लिहितात की शंखाच्या बांगड्यांचे २०० जोड आणि १ पौंड कुकू नोआखालीला पाठवले आहेत. या गोष्टी दंगलग्रस्त स्त्रियांमध्ये वाटायच्या आहेत. यांतील सर्वात चांगली गोष्ट ही आहे की या गोष्टी ११

मुसलमानांनी आणि एक इंग्रजाने गोळा केल्या आहेत. मी अशा स्त्रियांना भेटलो आहे की ज्यांनी ते कुंकू घरात असताना डोक्यावर लावले होते परंतु बाहेर पडताना ते पुसून टाकले होते. मुसलमानांनी अशा प्रकारची भीती दूर करायची आहे. हा प्रश्न आर्थिक मदत करण्याचा नसून दुसऱ्या संस्कृतीबद्दल आदर दाखवून त्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करण्याचा आहे. मुसलमान मित्रानी हे आपले पवित्र कर्तव्य आहे असे मानावे असे मी मुसलमान मित्रांना म्हणेन. एकदा पैगंबरांनी मुसलमानांना सल्ला दिला की यहुदी लोकांची प्रार्थनास्थळे ही तुमच्या प्रार्थनास्थळांइतकीच पवित्र आहेत असे समजा व त्यांना तसेच संरक्षण द्या. मुसलमानांनी आपल्या हिंदू शेजाऱ्यांना असेच स्वातंत्र्य दिले पाहिजे. कायदे आझम जिना म्हणाले की मुसलमानेतराने मुसलमानांना घाबरावे असे काहीही नाही हे प्रत्येक मुसलमानाने आपल्या वर्तनातून दाखवून दिले पाहिजे. मुसलमानेतराला सुरक्षिततेची ग्वाही दिली जाईल व त्याचे संरक्षण केले जाईल. असे करूनच मुसलमानांना सन्मान आणि आदर मिळू शकेल.

'माय डेज विथ गांधी', पृष्ठ ७२-७३

-----------------

# ११५. रेणुका राय यांना पत्र

श्रीरामपूर,

नोव्हेंबर २६, १९४६

मत्प्रिय रेणुका,

कामाच्या दडपणामुळे मी तुझ्या पत्राचे उत्तर देण्याकरिता उशीर केला. मी रस्त्यापासून दूरच्या गावात आहे, आणि खुश आहे. परंतु मी एक अतिशय कडू भाजी खाण्याचा मूर्खपणा केला आणि त्यामुळे थोडा अशक्तपणा आला आहे. माझ्या कामात अडथळा आलेला नाही.

तू जे काही करते आहेस ते तू तुझ्या स्वभावाप्रमाणे चांगलेच करत असतेस. येथून मी तुला मार्गदर्शन करायला नको. तुला जर मला भेटायचे असेल तर तुला या आडमार्गाच्या ठिकाणी यावे लागेल.

स्नेह,

बापू

श्रीमती रेणुका राय

चांदपूर

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------------

# ११६. घनश्याम दास बिर्ला यांना पत्र

नोव्हेंबर २६, १९४६

चि. घनश्यामदास,

तुला माहीतच आहे की मी एकटाच श्रीरामपूरला राहत आहे. सोबत माझे सहकारी म्हणून केवळ निर्मल कुमार (मूळ स्रोतात निर्मल चंद्र आहे) आणि परशुराम आहेत. ज्या लोकांबरोबर मी राहतो ते चांगले आहेत. संपूर्ण खेड्यात केवळ एक हिंदू कुटुंब आहे, बाकी सर्व मुसलमान आहेत. ते सर्व एकमेकांपासून बरेच दूर दूर राहतात. कालव्यातील पाणी वाळल्यानंतर येथील शेकडो खेडी दळणवळणाच्या कोणतेही साधन नसल्यामुळे परस्परांशी विशेष संपर्क ठेवत नसतात. परिणामी इथे कोणतेही काम पायी चालूनच करावे लागते. यामुळे बदमाश लोक वा शरीराने सशक्त साधू लोकच एकमेकांशी व्यवहार करू शकतात. सध्या मी अशा खेड्यात राहत आहे आणि अशाच दुसऱ्या एका खेड्यात काही काळ राहण्याचा माझा विचार आहे. जोपर्यंत हिंदू आणि मुसलमान प्रामाणिक मित्रांप्रमाणे राहणे सुरू करत नाहीत तोपर्यंत इथे राहण्याचा माझा विचार आहे. माणसाचा निर्धार केवळ ईश्वरच पार पाडू शकतो. सध्या तरी मी दिल्ली, सेवाग्राम, उरुळी आणि पाचगणी विसरलो आहे. करा वा मरा इतकाच माझा निर्धार आहे. यामुळे माझ्या अहिंसेचीसुद्धा परीक्षा होईल. या अग्निपरीक्षेतून सुखरूप बाहेर पडण्याच्या निर्धाराने मी इथे आलो आहे. तुला जर मला भेटायचे असेल आणि तू जर इथे येऊ शकत असशील तर तू इथे येऊ शकतो. मला स्वतःला त्याची काहीही आवश्यकता वाटत नाही. काही जाणून घेण्याकरिता तुला कोणा संदेशवाहकाला पाठवायचे असेल वा कुणाच्या हातून एखादे पत्र पाठवायचे असेल तर तू तसे करू शकतो.

मी घटनासमितीत जात नाही आहे; त्याची आवश्यकतासुद्धा नाही. जवाहरलाल, सरदार, राजेंद्र बाबू, राजाजी, मौलाना यापेकी कोणीही वा पाचही लोक वा कृपलानी जाऊ शकतात. त्यांना निरोप पाठव. घटनासमिती जर केवळ सैन्याच्या मदतीनेच स्थापित होऊ शकणार असेल तर ती स्थापन न झालेली बरी. ती जर शांततापूर्वक स्थापन होऊ शकत असेल तरच भाग घेणाऱ्या प्रांतांच्या मदतीने कायदे करता येऊ शकतात. लोकांचे आणि सैन्याचे भवितव्य काय आहे हे पाहू या. मुसलमानांची बहुसंख्या असलेले प्रांत काय करतात, ज्या प्रांतात मुसलमान अल्पसंख्य आहेत त्या प्रांतांचे काय करायचे, ब्रिटिश सरकार कशा प्रकारे काम करते व संस्थानांची प्रतिक्रिया काय राहील हे सर्वसुद्धा आपल्याला पाहावे लागेल. मला वाटते की १६

मेचे राज्य प्रपत्र बहुधा बदलावे लागेल. आपल्याला जर स्वतंत्रपणे काम करायचे असेल तर हे काम भरपूर बिकट आहे. मला समस्या कशी दिसते इतकेच मी सूचीत केले आहे. मी इथे जे काही करतो आहे ते काँग्रेसच्या नावावर करत नाही हेसुद्धा मित्रांनी लक्षात ठेवले पाहिजे. तसेच त्या कामाशी याला जोडण्याचाही माझा विचार नाही. मी जे काही करतो आहे ते माझ्या अहिंसेसंबंधीच्या व्यक्तिगत विचारातून करतो आहे. कोणाची जर या कामाला विरोध करण्याची इच्छा असेल तर तो तसे जाहीरपणे करू शकतो. खरे म्हणजे तेच बरोबर राहील; तसे करणे कदाचित त्याचे कर्तव्यही असू शकेल. यामुळे कोणाला काही करायचे असेल वा म्हणायचे असेल तर तो तसे न घाबरता मोकळेपणाने म्हणू वा करू शकेल. कोणाला मला काही सावधगिरीची सूचना द्यायची असेल तर त्यालाही ती देऊ दे. याची प्रत सरदारांना पाठव म्हणजे ते ज्या नावांचा वर उल्लेख आहे त्यांना हे सांगू शकतील. अथवा याच्या प्रती तयार करून वर उल्लेख केलेल्या पाच मित्रांना तू स्वतःच पाठवू शकशील. तुला जे काही सांगायचे असेल ते मोकळेपणाने सांग. मला सरळ लिही म्हणजे मी तुला उत्तर देऊ शकेन. प्यारेलाल, सुशीला इत्यादी सर्व वेगवेगळ्या खेड्यात आहेत. कालपासून प्यारेलाल आजारी आहे. तू चांगला असशील अशी आशा आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. सी. डब्ल्यू. ८०८१. सौजन्य - घनश्यामदास बिर्ला. शिवाय जी. एन. २२१२

------------

# ११७. चंद्रमणी विद्यालंकार यांना पत्र

नोव्हेंबर २६, १९४६

भाई चंद्रमणी विद्यालंकार,

मला तुमचे पत्र मिळाले. आभार. मी स्वतःच काळोखात आहे. सध्याच्या परिस्थितीत कोणाला बोलावणे बरोबर होणार नाही असे मला वाटते. तुम्ही तुमच्या ठिकाणी राहून तुमचे कर्तव्य पार पाडा.

आशीर्वाद,

बापू

पंडित चंद्रमणी विद्यालंकार,

भास्कर प्रेस,

डेहराडून.

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-----------

# ११८. साम्यवादी पक्षाच्या सदस्यांना आणि छात्र संघाला मुलाखत

(निर्मल कुमार बोस स्पष्ट करतात की : "साम्यवादी पक्ष आणि विद्यार्थी संघ यांच्या काही सदस्यांनी वेळ ठरवून गांधीजींची ८.२०वाजता मुलाखत घेतली. आपल्या खोलीबाहेर गांधीजी ऊन्हाच्या उबेत भेटायला येणारांचे म्हणणे ऐकून घेत होते. ते म्हणाले की ९ डिसेंबरला घटनासमिती आपले काम सरू करील तेव्हा नव्याने परत दंगली होतील असे लोकांना वाटते. आम्ही हमिदुद्दिनकडे आश्वासनाकरिता गेलो होतो परंतु ते म्हणाले की लीगच्या उच्चाधिकाऱ्याकडून या संबंधात दिशानिर्देश मिळण्याची आम्ही वाट पाहत आहो. मित्र म्हणतात की गांधीजींनी जिल्ह्यातील सर्वपक्षांची सभा बोलावली पाहिजे व वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या संघटनांतर्फे सुरू असलेल्या कामात समन्वय निर्माण केला पाहिजे.")

नोव्हेंबर २६, १९४६

**गांधीजी म्हणाले की व्यक्तिगत सांगायचे तर माझी घडण वेगळ्या प्रकारे झाली आहे; मला जेव्हा एखाद्या पावलाबद्दल विश्वास नसतो तेव्हा मी ते पाऊल कधीही उचलत नाही. सध्याच्या परिस्थितीत मित्रांनी सुचवलेल्या पावलाचा काही लाभ होईल असे मला वाटत नाही. वैयक्तिक पातळीवर सर्व काही मी मंत्रिमंडळाच्या माध्यमातून करून घेण्याचा प्रयत्न करतो आहे. मी इथे एकट्याने स्वतःच्या भरवशावर एक कार्यक्रम सुरू केला आहे व त्याकरिता बंगालमधील मोठ्यात मोठ्या माणसाचेसुद्धा सहकार्य घेतलेले नाही. बंगालमधील हिंदू केवळ शब्दांनी नाही तर प्रत्यक्ष कृतीकरूनच पूर्णपणे जात विसरण्याच्या या कार्यक्रमाला सहकार्य करू शकतात. याचबरोबर त्यांनी आपल्या मनातील भीती पूर्णपणे काढून टाकली पाहिजे. माणसाचे अंतःकरण भीतीपासून जेव्हा पूर्णपणे मुक्त होते तेव्हाच तिथे धर्माचे फूल फुलायला स्थान मिळू शकते.**

शेवटी ते म्हणाले : बंगालमधून मला पराभूत, भ्याड म्हणून निवृत्त व्हायचे नाही. आवश्यकता पडली तर खुनी माणसाच्या हातून मला इथे मरणे आवडेल. परंतु अशा मृत्यूला आमंत्रित करण्याची माझी इच्छा नाही.

'माय डेज विथ गांधी', पृष्ठ ७४

--------------

# ११९. प्रार्थना प्रवचन

श्रीरामपूर,

नोव्हेंबर २६, १९४६

गांधीजी म्हणाले की एका जरी निर्वासिताला मुसलमानांनी भरलेल्या त्याच्या गावात परतायचे असेल तरी मी त्याला निःसंकोचपणे परतायचा सल्ला देईन. स्त्री असो वा पुरुष असो त्यांना जर शूर व्हायचे असेल तर धैर्याशिवाय तरणोपाय नाही. माझ्या या अढळ श्रद्धेच्या सुज्ञपणाबद्दल प्रश्न उपस्थित करणारी मला असंख्य पत्रे येत आहेत. परंतु आपल्याला जर स्वाभिमानी राष्ट्र व्हायचे असेल तर हे आवश्यक आहे. मी स्त्री-पुरुषामध्ये कोणताच भेद करत नाही. स्त्रियांनीसुद्धा पुरुषांइतकेच स्वतःला स्वतंत्र समजायला पाहिजे. शौर्यावर केवळ पुरुषांचाच एकाधिकार नाही. स्वसंरक्षणाच्या कलेत कोणत्याही बाह्य मदतीला वाव नाही. मी जे ऐकतो आणि पाहतो त्यावरून आपला जीव वाचवण्याकरिता लोक आपला आत्मसन्मानही विसरतात. जे लोक आपल्या आत्मसन्मानाकरिता स्वतःची वा जे काही स्वतःचे आहे त्याची आहुती देण्याकरिता तयार नाहीत त्यांच्याकरिता स्वदेश वा स्वराज्य असू शकत नाही. माझ्या श्रोत्यांना माहीत आहे की जे मंत्री आणि सांसदीय सचिव नोआखालीला आले होते त्यांनी घोषित केले होते की आमच्या आत्मसन्मानाकरिता आणि इस्लामच्या प्रभावाकरिता निर्वासित परत आपल्या गावात आलेले व गावातील बहुतांश मुसलमानांमध्ये सुरक्षितपणे राहत असलेले पाहण्याकरिता आम्ही उत्सुक आहो. मला स्वतःला असे करण्यात आणि लोकांना असे करण्याचा सल्ला देण्यात कोणताच संकोच वाटत नाही. विश्वास ठेवणारांचे कधीही नुकसान होत नसते; विश्वास न ठेवणारांचे होत असते. नाव घेण्यासारख्या कोणत्याही धर्मात गुंडगिरीला स्थान नसते, मग तो इस्लाम असो की हिंदू धर्म असो. मी बंगाली होण्याचा प्रयत्न करत आहे कारण ईश्वराने मला जर शक्ती दिली तर मी पूर्व बंगालच्या लोकांमध्ये माझे जीवन व्यतीत करण्याचा प्रयत्न करीन व त्यांनाही तसे करण्याकरिता प्रेरित करीन.

हरिजन, जानेवारी ५, १९४७

---------------

# १२०. आशुतोष सिन्हा यांना पत्र

(टिपरा बचाव, मदत आणि पुनर्वास समितीचे उपाध्यक्ष. आशुतोष सिन्हांनी सुचवले होते की निर्वासितांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा म्हणून त्यांनी वेगवेगळे न राहता एक वा दोन वाड्यांमध्ये एकत्र राहावे आणि काम करावे.)

नोव्हेंबर २७, १९४६

निर्वासितांमध्ये जर सहकार्याची अपेक्षित भावना असेल तर हे शक्य आहे. परंतु या रोपट्याची वाढ हळूहळू होत असते आणि वैयक्तिक धैर्य तर सहकार्याच्या भावनेतूनही निर्माण होत नसते. ते जेव्हा निर्माण व्हायचे असेल तेव्हाच होते. कारण हा असा सद्गुण आहे की तोच त्याचे स्वतःचे पारितोषिकसुद्धा असतो. यामुळे प्रत्येक स्वयंसेवकाने प्रत्येक प्रभावित गावात जायला पाहिजे हा सिद्धांत बरोबर आहे. तुम्ही पाहिलेच असेल की मी स्वतः याला कार्यान्वयित करत आहे आणि याची सुरुवातही केलेली आहे. जे लोक सेवाग्रामहून माझ्याबरोबर आले होते तेसुद्धा माझे अनुकरण करत आहेत. त्यांच्यावर जो विश्वास टाकण्यात आला त्याला ते पात्र आहेत की नाही हे पाहायचे आहे. ही गोष्ट माझ्याबद्दलसुद्धा म्हणता येते. इतकेच की मी कोणाचे अनुसरण करत नसून या कल्पनेचा जनक मीच आहे. यामुळे आवश्यक क्षमता असलेले कोणी स्वयंसेवक तुमच्या दृष्टीत असतील तर कृपाकरून त्यांची नावे आणि पत्ते पाठवा.

**गांधीजी स्पष्ट करत म्हणाले की मला जाहीर आवाहन करायचे नाही कारण आवश्यक पात्रता असलेल्या स्त्रीपुरुषांचा प्रतिसाद जाहिरातीने मिळत नसतो.**

अशा व्यक्ती तर अगदी प्रामाणिक आणि अतुलनीय धैर्याच्या असल्या पाहिजे.... (साधन स्रोतात इथे रिकामी जागा आहे.) अहिंसेने परिपूर्ण म्हणजे मुसलमानांबद्दल आदर. हे स्वयंसेवक जर अविश्वासाने सुरुवात करतील तर ही दुःखद गोष्ट होईल. खरे धैर्य विश्वासावर आधारलेले असते व तोच त्याचा खरा आधार असतो.

**याशिवाय मी जर स्वयंसेवकांना परवानगी दिली तर माझ्या उपस्थितीने आकर्षित होऊन नोआखालीत स्वयंसेवकांची गर्दी होऊन जाईल. असे झाले तर यामुळे हानिकारक उत्तेजना पसरेल आणि अधिकारी आणि स्थानिक मुसलमानांमध्ये विनाकारण भीतीचे वातावरण निर्माण होईल. एखाद्या व्यक्तीला अहिंसात्मक आचरणाकरिता प्रेरित करायचे असेल तर ती व्यक्ती आधी निश्चिंत असणे आवश्यक असते. स्वयंसेवकांच्या काटेकोर सदाचरणाच्या प्रभावाने स्थानिक मुसलमान आणि बंगाल सरकार यांच्याकरिताही योग्य आचरण करणे प्रतिष्ठेचा विषय होऊन जाईल.**

अखेरीस गांधीजींनी लिहिले : सरकार काय करते आहे ते मी पाहतो आहे. आपल्या गावात परतण्याकरिता लोकांवर बळजबरी करता येत नाही. तसे केले तर माझ्या मते हा प्रयोग विनाशक होईल.

'महात्मा गांधी - द लास्ट फेज', खंड १, भाग २, पृष्ठ ६२-३ ('महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड २, पृष्ठ ७५)

# १२१. प्यारेलाल यांना पत्र

नोव्हेंबर २७, १९४६

चि. प्यारेलाल,

मला तुझे पत्र मिळाले. मी जे लिहिले ते अनावश्यक होते असे तुला वाटणे योग्य आहे. परंतु मला तसे वाटत नाही. त्यात दुःखद काय आहे ते मला कळत नाही.

काल न पाहिलेल्या रुग्णाला पाहण्याकरिता सुशीला आलेली आहे. तो राग असो वा वेदना असो वा दोन्ही असो सारखेच आहे. काय होते ते पाहू या.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशिला नाय्यर

---------------

# १२२. सैय्यद महमूद यांना पत्र

श्रीरामपूर, रामगंज,

नोव्हेंबर २७, १९४६

भाई महमूद (दळणवळण आणि विकास मंत्री, बिहार सरकार),

मला तुमची तार मिळाली. राजेंद्रबाबू लिहितात की मी बिहारला येण्याची आवश्यकता नाही. आवश्यक ते सर्व करण्यात आलेले आहे. मी अगदी चांगला आहे. जो काही अशक्तपणा राहिला आहे तो निघून जाईल. तिथे परिस्थिती कशी आहे ते लिहा. पळून गेलेले मुसलमान परत आले काय? सविस्तर लिहा. इथे माझे काम चांगले सुरू आहे.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५१०५

# १२३. वृत्तपत्रांना मुलाखत

श्रीरामपूर,

नोव्हेंबर २७, १९४६

**प्रश्न - जोपर्यंत मुस्लिम लीग बहुतांश बुद्धिजीवी लोकांचे मार्गदर्शन करते आहे आणि आपल्या शब्दांनी आणि कार्याने ती तुमच्याशी सहकार्य करत नाही तोपर्यंत तुमच्या नवीन योजनेप्रमाणे टिकाऊ शांतता प्रस्थापित करता येईल असे तुम्हाला कसे वाटते?**

गांधीजी - पाकिस्तानचे गुणदोष कोणते जरी असले तरी माझ्या योजनेत टिकाऊ शांततेची आवश्यकता आणि दोन्ही समुदायात मैत्रीपूर्ण संबंध स्थापित करण्याकरिता मुस्लिम लीगशी सहकार्य करण्याला निश्चितच स्थान आहे.

मुसलमान बहुसंख्य आणि हिंदू अल्पसंख्य असलेल्या नोआखाली सारख्या भागात काही महिन्यांनंतर परत असे संकट उभे राहणारच नाही अशी खात्री कशी देता येईल असे विचारले असता गांधीजी म्हणाले : खरी शाश्वती तर लोकांच्या व्यक्तिगत साहसातूनच मिळू शकते. बाकी सर्व त्याच्यावर अवलंबून आहे.

**पुढील प्रश्न होता ज्या भागात हिंदूंची केवळ १-२ घरे आहेत आणि बाकी सर्व घरे मुसलमानांची आहेत त्या ठिकाणच्या हिंदूंनी जिल्ह्यातीलच अशा ठिकाणी स्थलांतरिता व्हावे की जर काही आकस्मिक संकट आले तर ज्या हिंदूंचा अहिंसेवर विश्वास नाही ते काही प्रतिकार करू शकतील असा सल्ला हिंदूंना देणे योग्य राहील काय?**

यावर गांधीजींचे उत्तर होते - तुम्ही कल्पना केलेल्या परिस्थितीत जी संख्यात्मक वाढ होईल तिने अशी कोणतीही सुरक्षितता निर्माण होत नाही. सहकार्याची आशा असताना स्थलांतर हा उपाय होऊ शकत नाही. बहुसंख्य पक्षाला तशी इच्छा असेल आणि संघर्ष टाळायचा असेल तर तशी आवश्यकता निर्माण होईल. ही सर्व बाब परस्परांशी जुळवून घेण्याची आहे, लहरीप्रमाणे निर्णय घेता येणार नाही. एक राष्ट्र म्हणून वा दोन राष्ट्र म्हणून वा मैत्रीपूर्ण सहकार्य करणारे अनेक राष्ट्र म्हणून आपले अस्तित्व कायम टिकावे अशी इच्छा असेल तर आपल्यामधील पशुत्व संपण्याची खरी आवश्यकता आहे.

द बॉम्बे क्रॉनिकल, नोव्हेंबर २९, १९४६

---------------

# १२४. जीवनजी डा. देसाई यांना पत्र

नोव्हेंबर २८, १९४६

चि. जीवनजी,

हा लेख आहे. अतिशय अडचणीतून मी हा लिहू शकलो आहे. यातील हस्ताक्षर वाचणे तुला कठीण जाणार नाही अशी आशा आहे. इंग्रजी भाषांतरसुद्धा आहे. आता हरिजनकरिता मी लेख लिहावे अशी अपेक्षा तू करू नको. कसे काय सुरू आहे हे लिही आणि मला सर्व काही कळू दे. शक्य असेल ते प्यारेलाल पाठवील.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ९९७३. शिवाय सी. डब्ल्यू. ६९४७. सौजन्य - जीवनजी डा. देसाई

-----------------

# १२५. प्रार्थना प्रवचन

श्रीरामपूर,

नोव्हेंबर २८, १९४६

आश्रमातील प्रार्थनेला आताचे स्वरूप कसे आले याची गोष्ट गांधीजींनी सांगितली. ते म्हणाले की मी जेव्हा १९१५साली हिंदुस्थानात आलो होतो तेव्हा गुरुदेवांनी मला आणि माझ्याबरोबर असलेल्या फिनिक्स येथील आश्रमवासीयांना शांतिनिकेतनमध्ये राहण्याकरिता दीनबंधू ॲन्ड्र्यूज यांच्यातर्फे निरोप पाठवला होता. तिथे काकासाहेब, हरिहर शर्मा तसेच दीनबंधू ॲन्ड्र्यूज आणि पिअर्सनही होते. या मित्रांनी एक प्रकारचा दक्षिण आफ्रिकी गटच तयार केला होता. प्रार्थनेतील संस्कृत भागाबद्दल बोलायचे तर त्या वेळी सुप्रभाती आमचा लहानसा गट जशी प्रार्थना म्हणत असे जवळपास तशीच आजही म्हटली जात असते.

गांधीजी म्हणाले की त्रावणकोरमधील माझ्या हरिजन दौऱ्यात ईशोपनिषदमधील पहिला श्लोक मी प्रार्थनेत जोडला कारण त्यात हिंदू आध्यात्मिक चिंतनाचे सार आहे असे माझे मत होते. नंतर दिवंगत अब्बास तैय्यबजी यांची मुलगी रेहाना तैय्यबजीने, जी आपल्या संगीत प्रतिभेकरिता फार प्रसिद्ध आहे, कुराणमधील एक परिच्छेद जोडण्याची सूचना केली व तसे करण्यात आले. शेवटी आगाखान महालात कस्तुरबांच्या निधनाच्या वेळी (फेब्रुवारी २२, १९४४ला) डॉ. गिल्डर (एम. डी. डी. गिल्डर, काँग्रेसच्या मंत्रिमंडळात आरोग्य आणि अबकारी विभागाचे मंत्री, १९३७-३९) झोरास्ट्रियन धर्मग्रंथातील एक परिच्छेद प्रार्थनेत म्हणाले. तेव्हापासून आश्रमाच्या प्रार्थेनेत त्या भागाचा समावेश झाला. याशिवाय प्रार्थनेत हिंदुस्थानच्या भाषेतील एक भजन अथवा इंग्रजीतील एक स्तोत्र आणि रामधून म्हणण्यात येत असे.

अशा प्रकारे आकार धारण केलेली ही प्रार्थना कोणत्या तरी एका समुदायाची वा धर्माची आहे असे म्हणता येत नाही. तिचे विश्वात्मक आवाहन आहे; आणि यामुळे कोणी कुठेही राहणारा वा कोणत्याही धर्माचा वा समुदायाचा असला तरी तो या प्रार्थनेत सहभागी होऊ शकतो आणि व्हायलाही पाहिजे.

'हरिजन', जानेवारी ५, १९४६

----------------

# १२६. प्रार्थना प्रवचन

(वृत्ताप्रमाणे गांधीजींची ही सभा ते राहत असलेल्या ठिकाणापासून जवळपास एक मैल अंतरावरील एका मुसलमान गावकऱ्याच्या घरात झाली होती. सुमारे ५०० लोक, त्यातील बहुतेक मुसलमान होते, सभेत उपस्थित होते.)

श्रीरामपूर,

नोव्हेंबर २९, १९४६

श्रोत्यांना आपल्या येण्याचा उद्देश समजावून सांगत गांधीजी म्हणाले की या दोन समुदायात दुर्भावना निर्माण करणे हा माझ्या येण्याचा उद्देश नसून हिंदू आणि मुसलमानांना पूर्वीप्रमाणे एकत्र राहता यावे म्हणून त्यांच्यातील भातृभावना वृद्धिंगत करून या दोन समाजांतील संबंध घट्ट करणे हा माझा हेतू आहे. ईश्वराने हिंदू आणि मुसलमानांमध्ये फरक केलेला नाही. मग त्याच हवेत श्वासोच्छ्वास करत असताना आणि तेच पाणी पीत असताना माणसाने हा फरक का करावा?

'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', डिसेंबर २, १९४६

------------

# १२७. युनायटेड प्रेस ऑफ इंडियाला मुलाखत

नोव्हेंबर ३० १९४६

गांधीजी - पूर्व बंगालमध्ये मी किती दिवस राहीन यावर वेळेचे काहीही बंधन नाही. मला वाटते की इथे जितके दिवस राहणे आवश्यक असेल तितके दिवस मी राहू शकेन अशी मला आशा आहे. कदाचित मला इथेच आयुष्य काढावे लागेल. जे हिंदू आणि मुसलमान इथे किती तरी काळापासून भाऊ-भाऊ, भाऊ-बहिणी आणि मित्र म्हणून एकत्र राहत होते त्यांच्यात मनोमिलन घडवून आणण्याकरिता मला शक्य असेल ते मी करीन. परंतु मी काय करू शकेन या प्रश्नाचे उत्तर देणे माझ्या क्षमतेपलीकडील आहे. माणूस केवळ प्रयत्न करू शकतो. यश केवळ ईश्वरच देऊ शकतो.

**वार्ताहर - इथे एक गंभीर अडचण आहे. लवकरच कालव्यातील पाणी वाळून जाईल. नंतर लोकांची इच्छा असली तरी ते या खेड्यांमधून जाऊ शकणार नाहीत. तुम्ही त्यांना थांबायला सांगाल की ताबडतोब निघून जाण्याकरिता सांगाल?**

गांधीजी - देशातील या भागातील ज्या सभांमध्ये मी बोललो त्या अनेक सभांमध्ये मी सांगितले आहे की लोक कमी असो वा जास्त, जर ते शूर असतील तर ते आपले घर सोडणार नाहीत, उलट कितीही धोका असला तरी ते तिथेच राहतील. आणि हे मी सैन्याच्या वा पोलिसांच्या मदतीची अपेक्षा न करता म्हणालो. जे स्वतंत्र आहेत वा ज्यांना स्वतंत्र होण्याची आकांक्षा आहे त्यांनी अशा संरक्षणाची मागणी करणे हे त्यांच्या प्रतिष्ठेविरुद्ध आहे. लोकांनी आपल्याच घरी राहावे म्हणून गेल्या काही दिवसात त्यांना प्रोत्साहित करण्याकरिता निश्चितच बरेच काही झाले आहे.

'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', डिसेंबर २, १९४६

-------------------

# १२८. प्रार्थना प्रवचन

श्रीरामपूर,

नोव्हेंबर ३०, १९४६

**आश्रमाच्या पाठात म्हणण्यात येणारा पहिला मंत्र "नम्यो होरेंगे क्यो" यांचा याचा अर्थ स्पष्ट करत गांधीजी म्हणाले याचा अर्थ आहे "सर्व प्रबुद्धांना नमस्कार".**

**एक जपानी बुद्ध धर्मीय भिक्षू** (रेव्हरंड जी. हाईशाओ) **सेवाग्राममध्ये २-३ वर्ष राहिले होते. प्रार्थनेतील या भजनाच्या अंतर्भावाकरिता ते भिक्षू जबाबदार आहेत. ते हिंदुस्थानात बौद्ध धर्माचे रहस्य जाणून घेण्याच्या उद्देशाने आले होते कारण या धर्माचे मूळ हिंदुस्थानात होते. भिक्षूचा स्वभाव अतिशय गोड होता आणि सेवाग्राम आश्रमातील प्रत्येक सदस्याला ते प्रिय झालेले होते. सरळपणा, शालीनता आणि मौनाने त्यांनी प्रत्येक सदस्याचे मन मोहून घेतले होते. दररोज सकाळी आश्रमाच्या मैदानात ते पूर्ण एक तास फिरायचे आणि ढोल वाजवून ते अशा काही गोड आणि संगीतमय गंभीर आवाजात ते हा मंत्र म्हणायचे की त्यामुळे ऐकणारांना रोमांचक अनुभव यायचा. प्रार्थना सभेतही ते हे म्हणायचे. जपान सरकारशी शत्रुत्वाचे संबंध झाल्यामुळे सरकारने त्यांना हलवल्यानंतरही या मंत्राचा पाठ म्हणणे सुरूच राहिले.**

हरिजन, जानेवारी ५, १९४७

---------------

# १२९. युनायटेड प्रेस ऑफ इंडियाला मुलाखत

नोव्हेंबर ३०, १९४६

गांधीजी - पूर्व बंगालमध्ये मी किती दिवस राहीन यावर वेळेचे काहीही बंधन नाही. मला वाटते की इथे जितके दिवस राहणे आवश्यक असेल तितके दिवस मी राहू शकेन अशी मला आशा आहे. कदाचित मला इथेच आयुष्य काढावे लागेल. जे हिंदू आणि मुसलमान इथे किती तरी काळापासून भाऊभाऊ, भाऊबहिणी आणि मित्र म्हणून एकत्र राहत होते त्यांच्यात मनोमिलन घडवून आणण्याकरिता मला शक्य असेल ते मी करीन. परंतु मी काय करू शकेन या प्रश्नाचे उत्तर देणे माझ्या क्षमतेपलीकडील आहे. माणूस केवळ प्रयत्न करू शकतो. यश केवळ ईश्वरच देऊ शकतो.

**वार्ताहर - इथे एक गंभीर अडचण आहे. लवकरच कालव्यातील पाणी वाळून जाईल. नंतर लोकांची इच्छा असली तरी ते या खेड्यांमधून जाऊ शकणार नाहीत. तुम्ही त्यांना थांबायला सांगाल की ताबडतोब निघून जाण्याकरिता सांगाल?**

गांधीजी - देशातील या भागातील ज्या सभांमध्ये मी बोललो त्या अनेक सभांमध्ये मी सांगितले आहे की लोक कमी असो वा जास्त, जर ते शूर असतील तर ते आपले घर सोडणार नाहीत, उलट कितीही धोका असला तरी ते तिथेच राहतील. आणि हे मी सैन्याच्या वा पोलिसांच्या मदतीची अपेक्षा न करता म्हणालो. जे स्वतंत्र आहेत वा ज्यांना स्वतंत्र होण्याची आकांक्षा आहे त्यांनी अशा संरक्षणाची मागणी करणे हे त्यांच्या प्रतिष्ठेविरुद्ध आहे. लोकांनी आपल्याच घरी राहावे म्हणून गेल्या काही दिवसात त्यांना प्रोत्साहित करण्याकरिता निश्चितच बरेच काही झाले आहे.

'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', डिसेंबर २, १९४६

-------------------

# १३०. प्रार्थना प्रवचन

श्रीरामपूर,

नोव्हेंबर ३०, १९४६

**आश्रमाच्या पाठात म्हणण्यात येणारा पहिला मंत्र "नम्यो होरेंगे क्यो" यांचा याचा अर्थ स्पष्ट करत गांधीजी म्हणाले याचा अर्थ आहे "सर्व प्रबुद्धांना नमस्कार".**

**एक जपानी बुद्ध धर्मीय भिक्षू** (रेव्हरंड जी. हाईशाओ) **सेवाग्राममध्ये २-३ वर्ष राहिले होते. प्रार्थनेतील या भजनाच्या अंतर्भावाकरिता ते भिक्षू जबाबदार आहेत. ते हिंदुस्थानात बौद्ध धर्माचे रहस्य जाणून घेण्याच्या उद्देशाने आले होते कारण या धर्माचे मूळ हिंदुस्थानात होते. भिक्षूचा स्वभाव अतिशय गोड होता आणि सेवाग्राम आश्रमातील प्रत्येक सदस्याला ते प्रिय झालेले होते. सरळपणा, शालीनता आणि मौनाने त्यांनी प्रत्येक सदस्याचे मन मोहून घेतले होते. दररोज सकाळी आश्रमाच्या मैदानात ते पूर्ण एक तास फिरायचे आणि ढोल वाजवून ते अशा काही गोड आणि संगीतमय गंभीर आवाजात ते हा मंत्र म्हणायचे की त्यामुळे ऐकणारांना रोमांचक अनुभव यायचा. प्रार्थना सभेतही ते हे म्हणायचे. जपान सरकारशी शत्रुत्वाचे संबंध झाल्यामुळे सरकारने त्यांना हलवल्यानंतरही या मंत्राचा पाठ म्हणणे सुरूच राहिले.**

हरिजन, जानेवारी ५, १९४७

---------------

# १३१. रोजनिशीतील नोदी

डिसेंबर १, १९४६

पाठ दुखते आहे.

अंथरुणात पडून हरिजनकरिता लिहिलेला लेख तपासला.

मध्येच डुलकी घेतली.

महात्मा गांधी - द लास्ट फेज, खंड २, पृष्ठ ५०

-------------

# १३२. मनू गांधी यांना पत्र

डिसेंबर २, १९४६

चि. मनूडी,

पुत्र कुपुत्र होऊ शकतो पण माता कुमाता कशी होऊ शकते? तुझे पत्र गोंधळाने भरलेले आहे. मी पत्रात जे म्हणालोच नाही ते तू पत्रात गृहीत धरले आहे. म्हणून मी तुला मूर्ख म्हणतो. जयप्रकाश तुला गबाळ म्हणतो. तू शिक्षण मिळवले आहे पण ज्ञान नाही. तसे असले तरी मला तुझ्यातील दोष काढण्याची इच्छा नाही. तू जेव्हा इथे येशील तेव्हा मी तसे करीन आणि तुझे कान पिरगाळीन आणि मग त्या चुका केल्याचे तू स्वतःच कबूल करशील. केवळ मला भेटण्याकरिता तू येण्याची आवश्यकता नाही. तुला जर इथे काही काम करायचे असेल तरच ये. असे नसेल तर सध्या जयप्रकाशजवळ थांब. काही महिन्यातच माझे काय होते ते तुला कळेल. सर्व काही स्थिरस्थावर होईपर्यंत मी हे ठिकाण सोडणार नाही.

उमियाबद्दल मी समजू शकतो. जोपर्यंत शंकरलालबद्दल आपण समाधानी आहो तोपर्यंत त्या कुटुंबातील इतर लोक कसे आहेत याची आपण फिकीर करू नये. सासरच्या मंडळीत सुधारणा घडवून आणणे हे उमियाचे काम आहे. जयसुखलालची जागा आता बिर्ला शेठनी घेतली असे तिने समजायला पाहिजे. प्रतापची (उमियाचा मुलगा) समस्यासुद्धा सोडवली जाईल. तुझ्या अडाणीपणामुळे तू या गोष्टीचा फार विचार करते आहेस. जोपर्यंत उमिया शंकरलालबरोबर समाधानी आहे तोपर्यंत काळजी करण्याचे कोणतेही कारण नाही. शंकरलालला समस्या मोकळेपणाने समजावून सांग आणि त्याला मला लिहायला सांग. मी मोठा माणूस आहे म्हणून तो मला लिहू शकत नाही असे समजणे चूक आहे. मी स्वतःला मोठा माणूस समजत नाही आणि ते काहीही असले तरी तुम्हा मुलांशी त्या मोठेपणाचा काय संबंध? शंकरलालने उमियाशी लग्न केलेले असल्यामुळे तोसुद्धा माझ्या मुलासारखा आहे. आता शांत हो आणि तुला जो तुझा धर्म वाटतो तसे कर. तुझी इच्छा असेल तर तू माझ्याबरोबर राहण्याकरिता येऊ शकते.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - विनोदिनी (मनू गांधी यांची बहीण) आजारी आहे, यामुळे तुझी इच्छा असेल तर तू ये असे मी तिला सांगितले आहे.

गुजराती मायक्रोफिल्मवरून. एम. एम. यू.।३

# १३३. मनू गांधी यांना पत्र

डिसेंबर २, १९४६

चि. मनूडी,

पुत्र कुपुत्र होऊ शकतो पण माता कुमाता कशी होऊ शकते? तुझे पत्र गोंधळाने भरलेले आहे. मी पत्रात जे म्हणालोच नाही ते तू पत्रात गृहीत धरले आहे. म्हणून मी तुला मूर्ख म्हणतो. जयप्रकाश तुला गबाळ म्हणतो. तू शिक्षण मिळवले आहे पण ज्ञान नाही. तसे असले तरी मला तुझ्यातील दोष काढण्याची इच्छा नाही. तू जेव्हा इथे येशील तेव्हा मी तसे करीन आणि तुझे कान पिरगाळीन आणि मग त्या चुका केल्याचे तू स्वतःच कबूल करशील. केवळ मला भेटण्याकरिता तू येण्याची आवश्यकता नाही. तुला जर इथे काही काम करायचे असेल तरच ये. असे नसेल तर सध्या जयप्रकाशजवळ थांब. काही महिन्यातच माझे काय होते ते तुला कळेल. सर्व काही स्थिरस्थावर होईपर्यंत मी हे ठिकाण सोडणार नाही.

उमियाबद्दल मी समजू शकतो. जोपर्यंत शंकरलालबद्दल आपण समाधानी आहो तोपर्यंत त्या कुटुंबातील इतर लोक कसे आहेत याची आपण फिकीर करू नये. सासरच्या मंडळीत सुधारणा घडवून आणणे हे उमियाचे काम आहे. जयसुखलालची जागा आता बिर्ला शेठनी घेतली असे तिने समजायला पाहिजे. प्रतापची (उमियाचा मुलगा) समस्यासुद्धा सोडवली जाईल. तुझ्या अडाणीपणामुळे तू या गोष्टीचा फार विचार करते आहेस. जोपर्यंत उमिया शंकरलालबरोबर समाधानी आहे तोपर्यंत काळजी करण्याचे कोणतेही कारण नाही. शंकरलालला समस्या मोकळेपणाने समजावून सांग आणि त्याला मला लिहायला सांग. मी मोठा माणूस आहे म्हणून तो मला लिहू शकत नाही असे समजणे चूक आहे. मी स्वतःला मोठा माणूस समजत नाही आणि ते काहीही असले तरी तुम्हा मुलांशी त्या मोठेपणाचा काय संबंध? शंकरलालने उमियाशी लग्न केलेले असल्यामुळे तोसुद्धा माझ्या मुलासारखा आहे. आता शांत हो आणि तुला जो तुझा धर्म वाटतो तसे कर. तुझी इच्छा असेल तर तू माझ्याबरोबर राहण्याकरिता येऊ शकते.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - विनोदिनी (मनू गांधी यांची बहीण) आजारी आहे, यामुळे तुझी इच्छा असेल तर तू ये असे मी तिला सांगितले आहे.

गुजराती मायक्रोफिल्मवरून. एम. एम. यू.।३

# १३४. रामेश्वरी नेहरू यांना पत्र

डिसेंबर २, १९४६

चि. रामेश्वरीबेन,

मला तुमचे पत्र मिळाले. शस्त्र बाळगून माणूस स्वतःचा बचाव करू शकतो यावर माझा विश्वास नाही. लोकांमध्ये धैर्य असेल तरच ते स्वतःचा बचाव करू शकतात. असे नसेल तर त्यांना शासनाकडून संरक्षण घ्यावे लागेल वा खाजगी अंगरक्षक ठेवावे लागतील. मला वाटते की यासंबंधी मी केवळ मत व्यक्त करू शकतो. लोकांनी कसे वागावे हे आपल्याला त्यांच्यावर सोडावे लागेल. ही गोष्ट इतर ठिकाणीसुद्धा लागू होईल. इथेसुद्धा परिस्थिती गंभीर आणि नाजूक आहे.

आशीर्वाद,

बापू

श्रीमती रामेश्वरी नेहरू,

वारिस रोड,

लाहोर.

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---------------

# १३५. वृत्तपत्रांना वक्तव्य

("श्रीरामपूर डायरीमधून उद्धृत" )

श्रीरामपूर,

[डिसेंबर २, १९४६]

('हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', डिसेंबर ४, १९४६मध्ये ही मुलाखत श्रीरामपूर येथे डिसेंबर २ला झाल्याचे वृत्त आहे.)

लोकसंख्येची अदलाबदल करण्याचा विचारसुद्धा करता येऊ शकत नाही आणि तो व्यावहारिकही नाही. हा प्रश्न कधीही माझ्या डोक्यात आला नाही. प्रत्येक प्रांतात प्रत्येकजण हिंदुस्थानी आहे, मग तो हिंदू असो, मुसलमान असो की अजून कोणत्या धर्माचा असो. पाकिस्तानची पूर्णपणे निर्मिती झाल्यानंतरही या परिस्थितीत कोणताही बदल होणार नाही.

माझ्याकरिता अशी कोणतीही गोष्ट करणे म्हणजे हिंदुस्थानच्या बुद्धिमत्तेचे वा मुत्सद्दीपणाचे वा दोघांचेही दिवाळे निघाल्याचे जाहीर करणे आहे. असे कोणतेही पाऊल उचलले तर त्याचे परिणाम कल्पना करता येणार नाही इतके भयानक होतील. असे करणे म्हणजे हिंदुस्थानचे अनेक कृत्रिम भागात विभाजन करणे असे होणार नाही काय?

**अस्थिर स्थिती पाहता लोकसंख्येची अदलाबदल करणे उचित होणार नाही काय असे विचारले असता गांधीजी म्हणाले :**

असे धोरण अवलंबिण्याकरिता मला कोणतेही कारण दिसत नाही. असे धोरण निराशेतून उत्पन्न होते आणि त्याचा अवलंब शेवटचा उपाय म्हणून फार क्वचित प्रसंगी करावा लागत असतो.

**प्रश्न - तुम्ही म्हणाला होता की पूर्व बंगालमधील तुमच्या मुक्कामाला कोणतीही मर्यादा नाही. श्रीरामपूरला राहून तुम्ही तुमचा शांततेचा संदेश नोआखालीच्या इतर खेड्यांमध्ये पोहोचवू शकाल असे तुम्हाला वाटते काय?**

गांधीजी - अर्थातच. मी दीर्घकाळ स्वतःला श्रीरामपूरमध्ये गाडून घेणार नाही. मी इथे हातावर हात ठेवून बसलेलो नाही. मी आजूबाजूच्या खेड्यातील लोकांना आणि इतरांना भेटत असतो. मी परिस्थितीचा अभ्यास करतो आहे आणि त्याच वेळी गमावलेली शारीरिक शक्ती परत मिळवतो आहे. अखेरीस कल्पना अशी आहे की शक्य होईल आणि आवश्यक असेल तेव्हा पदयात्रा करत एका खेड्यातून दुसऱ्या खेड्यात जायचे आणि विस्थापितांची परतण्याकरिता समजूत घालायची. मी हे प्रभावीपणे तेव्हाच करू शकेन जेव्हा

येथील परिस्थिती मी माझ्या डोळ्यांनी पाहिलेली असेल. मला स्पष्टपणे माहीत आहे की माझ्या शब्दांना फार कमी वजन राहिले आहे. अविश्वास इतका खोलवर रुजला आहे की उपदेशाचा काहीही उपयोग नाही.

**तुम्हाला चोहोकडून काळोखाने वेढले आहे असे तुम्ही म्हणाला होता. तर या काळोखाने तुम्हाला केव्हा घेरले व त्यातून मुक्तीचा तुम्हाला काही मार्ग दिसतो आहे काय असा गांधीजींना पुढील प्रश्न विचारण्यात आला.**

गांधीजी म्हणाले : मला मान्य आहे की हे वृत्त बरोबर आहे. बाह्य परिस्थितीने मी कधीही घाबरत नसतो. सध्याच्या काळोखाचे कारण तर माझ्या आत आहे. हिंदू-मुसलमानांच्या संबंधात माझी अहिंसा काम करत नाही असे दिसते. नोआखालीतील घटना पाहण्याकरिता मी जेव्हा आलो तेव्हा मला याची प्रकर्षाने जाणीव झाली.

बळजबरीच्या धर्मांतराने आणि बंगाली भगिनीवरील अत्याचाराच्या ज्या बातम्या मला मिळाल्या त्यामुळे माझ्या अंतःकरणाची कालवाकालव झाली. मी लेखणीने वा शब्दांनी काहीही करू शकत नव्हतो. मी स्वतःलाच म्हणालो की मी या वेळी घटनास्थळावर राहिलो पाहिजे आणि ज्या सिद्धांताच्या भरवशावर मी इतकी वर्षे टिकून आहे आणि ज्याने माझे जीवन जगण्यासारखे झाले आहे त्याची परीक्षा घेतली पाहिजे. माझे टीकाकार म्हणतात त्याप्रमाणे अहिंसा हे दुर्बलाचे अस्त्र आहे की सबळांचे? नोआखाली ज्या व्याधीचे ज्वलंत प्रतीक झाली आहे त्या व्याधीवरील योग्य असा उपाय न सुचल्यामुळे माझ्या मनात हे प्रश्न निर्माण झाले.

यामुळे मी माझे सर्व कार्यक्रम बाजूला ठेवले आणि मी कुठे उभा आहे हे पाहण्याकरिता मी ताबडतोब नोआखालीला आलो. मला निश्चित माहीत आहे की अहिंसा एक परिपूर्ण साधन आहे. माझ्या हातात असताना तिच्याकडून जर उत्तर मिळत नसेल तर अपूर्णता माझ्यात असली पाहिजे. माझे तंत्र सदोष असले पाहिजे. दुरून माझी चूक काय आहे ते मला कळू शकत नाही. यामुळे तो शोध लावण्याकरिता मी इथे आलो. यामुळे जोपर्यंत मला प्रकाश दिसत नाही तोपर्यंत मी काळोखातच राहायला पाहिजे. ईश्वरालाच माहीत की तो केव्हा येईल. याहून अधिक मी सांगू शकत नाही.

'हरिजन', जानेवारी १९, १९४६

--------------

# १३६. प्रार्थना प्रवचन

(श्रीरामपूर डायरीमधून उद्धृत)

श्रीरामपूर,

डिसेंबर २, १९४६

**काही वेळापूर्वी जे भजन म्हणण्यात आले होते त्यातीलच विषय गांधीजींनी आजच्या प्रार्थनेनंतरच्या प्रवचनाकरिता घेतला. हत्त्यांचा प्रमुख (गजेंद्र) जेव्हा नदीवर पाणी पिण्याकरिता गेला तेव्हा मगरीने त्याला पकडले. दोघांमध्ये प्रचंड संघर्ष झाला परंतु हत्ती सामर्थ्यशाली असूनही मगरीने त्या हत्त्याला पाण्यात खोलवर ओढत नेले. हत्ती जेव्हा पाण्यात बुडण्याच्या बेतात होता तेव्हा हत्त्याच्या लक्षात आले की आपली प्रचंड शक्ती काहीही उपयोगाची नाही. आणि मग त्याने मदतीकरिता ईश्वराचा धावा केला. अनाथांचा नाथ ईश्वर मदतीकरिता धावून आला आणि त्याने हत्त्याला मृत्यूच्या मुखातून बाहेर काढले.**

**गांधीजी म्हणाले की या कथेचा सार स्पष्ट आहे. शक्तिशालीची शक्तीही ईश्वराच्या मदतीशिवाय बहुधा व्यर्थ सिद्ध होत असते. यामुळे माझा तुम्हांला सल्ला आहे की तुम्ही बाहेरील साधनांवर अवलंबून राहण्यापेक्षा तुमच्या आतील साधनांवर विसंबून राहा. जे लोक अंतःकरणपूर्वक ईश्वराला ती शक्ती मागतात त्यांनाच ती मिळते. नोआखालीच्या लोकांनी हाच पाठ शिकण्याची आवश्यकता आहे.**

'हरिजन', जानेवारी ५, १९४६

------------

# १३७. रोजनिशीतील उतारे

डिसेंबर २, १९४६

थांबलो पाहिजे. आता डावा हातसुद्धा दुखू लागला आहे आणि काम करत नाही.

अंथरुणावर - ९.३०

महात्मा गांधी - द लास्ट फेज, खंड १, भाग २, पृष्ठ ४१ (महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड २, पृष्ठ ५०)

------------

# १३८. घटनासमितीसंबंधी टिपण

('माय डेज विथ गांधी' यात निर्मल कुमार बोस म्हणतात की गांधीजींनी हा मजकूर कार्यकारिणीच्या सभेच्या दिवशी दुपारी सांगितला.)

श्रीरामपूर, नोआखाली

डिसेंबर ३, १९४६

मुस्लिम लीगने घटनासमितीवर बहिष्कार टाकला (समूहीकरणाच्या प्रश्नाबद्दल काँग्रेसच्या मनात असलेल्या शंका दूर होत नाहीत तोपर्यंत घटनासमितीत सामील व्हायचे नाही असा निर्णय मस्लिम लीगने घेतला. या दोन्ही पक्षात तडजोड व्हावी म्हणून ब्रिटिश सरकारने दोन्ही पक्षांच्या नेत्यांना लंडनला डिसेंबर ३ ते ६ या काळात वाटाघाटी करण्याकरिता बोलावले. परंतु त्यातून कोणताही मार्ग निघाला नाही. ब्रिटिश कॅबिनेटच्या ६ डिसेंबरच्या वक्तव्याकरिता पाहा "ब्रिटिश कॅबिनेटचे समूहीकरणासंबंधी वक्तव्य", डिसेंबर ६, १९४६) तर तिची सभा कॅबिनेट मिशनच्या १६ मेच्या वक्तव्याप्रमाणे (पाहा "कॅबिनेट मिशन आणि व्हाईसराय यांचे वक्तव्य" मे १६, १९४६) होऊ नये याबद्दल माझ्या मनात कोणतीही शंका नाही. त्या वक्तव्यात दोन्ही पक्षातील म्हणजे काँग्रेस आणि मुस्लिम लीग यांच्यातील सहकार्याची स्पष्टपणे अपेक्षा करण्यात आली आहे. यामुळे त्यातील एक पक्ष जर बहिष्कार घोषित करत असेल तर राज्य प्रपत्राप्रमाणे घटनासमितीची सभा औचित्यपूर्ण होऊ शकत नाही. बहिष्कारानंतरही सरकार जर घटनासमिती बोलावत असेल तर ते असे दुसऱ्या राज्यप्रपत्राप्रमाणेच कायदेशीरपणे करू शकेल आणि काँग्रेसशी सल्लामसलत करून ते असे करू शकते. काँग्रेस कितीही जरी शक्तिशाली झालेली असली तरी आज घटनासमितीची सभा ब्रिटिश सरकारने कल्पना केलेल्या कृतीप्रमाणेच होऊ शकते हे विसरता येऊ शकत नाही.

२. बहिष्कारानंतरही ब्रिटिश सरकारच्या सहकार्याने घटनासमितीची सभा जर होणार असेल तर ती ब्रिटिश सरकारच्या सैन्याच्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहकार्यानेच होऊ शकते, मग ते सैन्य युरोपीय लोकांचे असो की हिंदुस्तानींचे असो. माझ्या मते अशा परिस्थितीत आपण कोणतीही समाधानकारक घटना तयार करू शकत नाही. आपण मान्य करो वा न करो आपल्या दुर्बलतेची जाणीव सर्व जगाला होईल.

३. असे म्हणता येईल की अशा परिस्थितीत घटनासमितीची सभा न घेणे म्हणजे कायदे आझम जिनांना वा मुस्लिम लीगला शरण जाणे होईल. परंतु हा आरोप मला मान्य नाही कारण तथ्यांवरून काढलेला हा तर्कशुद्ध निष्कर्ष आहे आणि एखादी सूट देणे म्हणजे शरणागती होत नसते. सभा न घेण्याचे ही कृती विवशतेमुळे करण्यात आलेली नसेल, उलट त्यातून काँग्रेसच्या शक्तीचे दर्शन होईल. आपण जर इतक्या प्रमाणात प्रतिष्ठा आणि शक्ती मिळवली असेल की ब्रिटिश सरकारच्या सहकार्याशिवायही आपण घटनासमिती

भरवू शकू तर मग तसे करणे योग्य होईल. आपल्याला मुस्लिम लीग आणि संस्थानांसह इतर सर्व पक्षांचेही सहकार्य मिळवावे लागेल. आणि मग घटना समितीची सभा कोणत्या तरी अनुकूल ठिकाणावर घेता येईल. अशा परिस्थितीत काही घटक तिच्यात सामील झाले नाही तर त्याचा अर्थ काँग्रेस आणि संस्थानेच या घटना समितीत भाग घेतील. मला वाटते की ही गोष्ट प्रतिष्ठापूर्ण आणि तथ्यानुकूल होईल.

फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. १०५३५. सौजन्य - निर्मलकुमार बोस. शिवाय जी. एन. ३७८६

--------------

# १३९. हसन शहीद सुऱ्हावर्दी यांना पाठवलेल्या पत्रातील उतारे

डिसेंबर ३, १९४६

शमसुद्दिन साहेबांच्या बोलण्यावरून मला वाटत होते की ते परत येतील परंतु काही काळ त्यांची वाट पाहिल्यानंतर मी तुम्हाला हे पत्र लिहीत आहे आणि यात सांगितलेल्या गोष्टींवर तुम्हाला चांगल्या प्रकारे विचार करता यावा म्हणून हे इंग्रजीतसुद्धा लिहीत आहे.

१. माहीत नाही का पण ज्या समित्या बनवण्यात आल्या आहेत त्या चांगल्या पद्धतीने काम करताना दिसत नाहीत. लोकांमध्ये विश्वास निर्माण होईल असे आतापर्यंत त्यांनी काहीही केलेले नाही.

२. माझ्या सर्व प्रयत्नांनंतरही लोकांचे स्थलांतर सुरूच आहे आणि फार कमी लोक त्यांच्या खेड्यांमध्ये परतले आहेत. गुन्हेगार अजून मोकळे फिरत आहेत असे त्यांचे म्हणणे आहे आणि त्यांतील काही तर शांतता समितीत आहेत. खून आणि जाळपोळ यांची तुरळक प्रकरणे अजून सुरूच आहेत, अपहृत स्त्रिया अजून परतलेल्या नाहीत, ज्या लोकांचे बळजबरीने धर्मांतर करवण्यात आले आहे ते अजून परतलेले नाहीत, जाळलेली घरे परत बांधण्यात आलेली नाहीत आणि सर्वसामान्यपणे अजून सद्भावनेचे वातावरण निर्माण झालेले नाही. या आरोपांपैकी किती खरे आहेत आणि किती सिद्ध करता येऊ शकतात हे मला माहीत नाही. हे सगळे तुमच्या निदर्शनास आणून देणे इतकाच इथे माझा उद्देश आहे.  आत्मविष्वास निर्माण करण्याकरिता कदाचित सरसहा निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे.

३. स्वयंसेवक कोणत्याही संघटनेचे असले तरी त्यांच्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. बेकायदेशीर कृत्ये जर कोणी करत असेल तर त्याच्यावर निर्बंध घालणे मी समजू शकेन, परंतु इतर कोणतेही निर्बंध वांछनीय असू शकत नाहीत.

४. जोपर्यंत लोक खरोखर निर्वासित आहेत तोपर्यंत त्यांना पुरेसे जेवण, ऊबदार कपडे आणि राहण्याची चांगली सोय या किमान सोयी तर मिळायलाच पाहिजे. या सोयी नाकारल्या तर संशय निर्माण होईल आणि निर्वासितांना आपल्या खेड्यात परत पाठवण्याच्या उद्दिष्टावर पाणी फिरेल. सरकार जर निर्वासितांना या सोयीसवलती पुरेशा प्रमाणात पुरवू शकत नसेल तर दानशूर लोकांना या सोयीसवलती पुरवण्याची परवानगी दिली पाहिजे.

५. मी हे लिहीत असतानाच पुढील पत्र आले : (साधन स्रोतात ५ आणि ६मध्ये उल्लेख करण्यात आलेली पत्रे दिलेली नाहीत परंतु महात्मा गांधी - अखेरचं पर्वमध्ये प्यारेलाल म्हणतात की एका पत्रात एका घटनेचे वर्णन करण्यात आलेले आहे. त्या वर्णनाप्रमाणे जवळपास २५० लोकांच्या एका जमावाने एका हिंदू गावावर हल्ला केला. दुसऱ्या पत्रात चांदपूर तालुक्यात मुसलमानांनी हिंदूंवर टाकलेल्या आर्थिक बहिष्काराची चर्चा होती.)

६. दुसरे पत्र म्हणते : (वरील टिपेप्रमाणे.)

ही काही संपूर्ण सूची नाही. तुम्हाला या खोडसाळपणाची पूर्ण कल्पना आहे की नाही हे मला माहीत नाही.

'माय डेज विथ गांधी', पृष्ठ ९३-४; आणि 'महात्मा गांधी - द लास्ट फेज', खंड १, भाग २, पृष्ठ १०१ ('महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड २, पृष्ठ १२३-२४)

---------------

# १४०. प्रेमा कंटक यांना पत्र

डिसेंबर ३, १९४६

चि. प्रेमा,

मला आज तुझे पत्र मिळाले. मी रहदारीच्या दूरवरच्या ठिकाणी आहे. इथे पोस्ट ऑफिस नाही. मग तारेची काही सोय कशी असू शकेल?

मी इथे अडकलो आहे. कदाचित मी हे ठिकाण कधीच सोडणार नाही. परिस्थिती पूर्णपणे पूर्वपदावर येईल तेव्हाच मी हे ठिकाण सोडू शकेन. जर तसे होणार नसेल तर मी इथे मरणे पसंत करील. सध्या मी सेवाग्राम, उरुळी कांचन इत्यादींसंबंधी सर्व काही विसरलो आहे असे तू गृहीत धरू शकते.

मी इथे एकटाच आहे परंतु याचा अर्थ असा नाही की लोक मला एकट्याला राहू देतील.अशा प्रकारची परीक्षा माझ्या नशिबी नाही असे मला वाटते.

धोतर मिळाल्यानंतर (प्रेमा कंटक हाताने कातलेल्या सुताची धोतरे दरवर्षी गांधीजींना पाठवत असत.) मी ते नेसायला ताबडतोब सुरुवात करीन. माझ्या अहिंसेची अतिशय कठीण परीक्षा होत आहे. काम अतिशय कठीण आहे.

गावात जाऊन काम करायला सुरुवात केल्यानंतर सुशीला (सुशीला पै. गांधीजींना सचिव म्हणून मदत करणारातील एक. त्या करपाडा गावात काम करत होत्या.) काल पहिल्यांदाच मला भेटायला आली. हा तिचा वाढदिवस होता हे तुला माहीत असेल असे मला वाटते. ती आपल्या कामात भरपूर व्यस्त आहे.

तू तुझे काम कसे सोडू शकशील? तुझ्यावर तर एक गाव सहजपणे सोपवता येऊ शकते. तू या कामाकरिता अगदी योग्य आहे. परंतु तू तेथील काम सोड असे मी तुला म्हणणार नाही. तेथील कामाचा खोळंबा न होता तू येऊ शकत असशील तर तू येऊ शकते.

सुशीला तुला सविस्तर हकिगत कळवतच असेल. यामुळे मी अधिक लिहिणार नाही.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. १०४५०. शिवाय सी. डब्ल्यू. ६८८०. सौजन्य - प्रेमा कंटक

---------------

# १४१. प्यारेलाल यांना पत्र

डिसेंबर ३, १९४६

चि. ...

मी यासंबंधी सुऱ्हावर्दींना लिहिले आहे (पाहा हसन शहीद सुऱ्हावर्दी यांना पाठवलेल्या पत्रातील काही उतारे, डिसेंबर ३, १९४६). इथे येशील तेव्हा तू ते वाच. सर दातारसिंगना लिहून कळव मी मुख्यमंत्र्यांना कळवले आहे. मी त्यांना येथील घटनाक्रम कळवेन.

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

----------------

# १४२. प्रार्थना प्रवचन

श्रीरामपूर,

डिसेंबर ३, १९४६

**प्रा. नेल्सन** (हॉवर्ड विद्यापीठ, वाशिंग्टन इथे नेल्सन प्राध्यापक होते. ते फ्रेंड्स सर्व्हिसच्या शाखेद्वारे नोआखालीतील मदतकार्याकरिता आले होते. ते प्रार्थनेत सहभागी झाले आणि 'अवर गॉड, अवर हेल्प इन एजेस पास्ट' हे इझाक वॅट यांचे प्रसिद्ध स्तोत्र म्हणाले.) **यांची ओळख करून देत गांधीजी म्हणाले की आज ते या प्रार्थनेत भाग घेत आहेत याचा मला फार आनंद होतो. आगाखान महालात मी स्थानबद्ध असताना मीराबेन आपल्या गोड आवाजात भजन ऐकवायची. यानंतर भजनातील तीन कडव्यांचा अर्थ समजावून सांगत गांधीजी म्हणाले की यांचा जो अर्थ आहे तसाच अर्थ काल गजेंद्रमोक्षाचे जे भजन म्हणण्यात आले होते त्याचाही आहे. जेव्हा कोणत्याही भौतिक साधनांची मदत होत नाही तेव्हा सर्वशक्तिमान ईश्वरावरच विसंबून राहावे लागत असते. सर्व मानवी शक्ती क्षणिक आहे आणि जेव्हा आपण ईश्वरावर पूर्णपणे विसंबून राहतो तेव्हाच आपण खरे सुरक्षित होतो.**

**तुझ्या सिंहासनाच्या सावलीत**
**संत विसावतात शांतपणे .**
**पुरे आहे तुझ्या हाताचा आधार**
**आणि निश्चिंत असतो आम्ही त्या बळावर.**

**हाच तो पाठ आहे की जो नोआखालीत आपण सर्वांनी शिकणे आवश्यक आहे.**

'हरिजन', जानेवारी ५, १९४६

---------------

# १४३. मीराबेन यांना पत्र

श्रीरामपूर,

जिल्हा नोआखाली,

डिसेंबर ४, १९४६

चि. मीरा,

तुझे नोव्हेंबर १८चे पत्र मला कालच मिळाले. तू दळणवळणाच्या साधनापासून जितक्या दूर आहेस त्याहूनही मी जास्त दूरवरच्या ठिकाणी आहे (बापूज लेटर्स टू मीरामध्ये "मनू गांधींना चिठ्ठी", जानेवारी १९, १९४६मध्ये मीराबेन लिहितात की : "संयुक्त प्रांत सरकारने 'अधिक धान्य पिकवा' या मोहिमेकरिता मला एप्रिलमध्ये मानद सचिव नेमले आहे. यामुळे मला गरम हवामानात भरपूर प्रवास करावा लागतो. आणि आता मी मसूरीत माझी प्रकृती चांगली करण्याचा प्रयत्न करते आहे."). अंतर फार जास्त नाही परंतु इथे बैलगाडीचा रस्तासुद्धा नाही. कालव्यातील वाहते पाणी वाळल्यानंतर, तसे होण्याकरिता केवळ १० दिवस राहिले आहेत, पायी जाण्याशिवाय इकडूनतिकडे जाण्याकरिता कोणताच मार्ग शिल्लक नसतो. आता आता काही वर्षांपूर्वी काठेवाडमध्ये ज्याप्रमाणे डाक आणण्याचे काम धावणारे लोक करायचे व अजूनही काही ठिकाणी असे होते त्याचप्रमाणे इथे डाक धावणारे लोकच आणतात.

माझ्याबद्दल काळजी करू नको. ईश्वरावर श्रद्धा आणि विश्वास ठेव. मी त्याच्या सुरक्षेखाली आहे. तो मला मारील वा जगवील. त्याच्याकरिता सर्व घडवणेच असते, नष्ट करणे नसते.

इथे वृत्तपत्रे नियमितपणे येत नाहीत. आणि ते जेव्हा येतात तेव्हाही फार उशिरा येतात व केवळ स्थानिक वृत्तपत्रे येतात. यामुळे वृत्तपत्रात काय येते ते इथे कळतच नाही. "वर्तमानपत्रांमध्ये काय येते यावर विश्वास ठेवू नका" आणि कोणतीही बातमी चांगली बातमी नसते हा माझा यावर उपाय आहे. तुला माहीत आहे काय की प्रधानमंत्री ए. जे. बालफोर मोठ्या अभिमानाने म्हणायचे की मी कधीही वृत्तपत्र वाचत नाही आणि त्यामुळे मी काहीही गमावलेले नाही.

आता तुला माहीतच असेल की माझे सर्व सहकारी वेगवेगळ्या खेड्यात विखुरलेले आहेत. प्यारेलाल मला बरेचदा भेटतो परंतु तो माझ्याबरोबर नसतो. तो एका खेड्यात एकटाच असतो आणि त्याला एका बंगाली दुभाष्याची मदत होत असते. माझ्याबरोबर परशुराम आहे आणि त्यामुळे मी मजकूर सांगून त्याच्याकडून लिहून घेऊ शकतो. बंगाली दुभाष्याशिवाय इतर कोणालाही बरोबर घ्यायचे नाही आणि तशी इच्छाही करायची नाही

अशी मुळात कल्पना होती. परशुराम नेहमीच प्यारेलालला मदत करायचा, परंतु इथे त्याला स्वतंत्रपणे एकट्याला कोणत्याही खेड्यात ठेवता येऊ शकत नाही. स्वाभाविकपणेच त्याला माझ्याबरोबर राहावेसे वाटत होते परंतु मला इतर सर्व मदत असल्यामुळे, व मी वेगळ्या प्रकारचे काम करत असल्यामुळे तो तसे करू शकत नव्हता. यामुळे तो इतर कोणते तरी काम करत होता. आता तो माझ्याबरोबर असल्यामुळे तो माझी काळजी तर घेतोच शिवाय माझ्या लघुलेखनाचेही काम करतो. यामुळे आता मी ते कामसुद्धा करू शकतो ज्याची मी अपेक्षा केली नव्हती. आणि बंगालीत मदत करणारे प्राध्यापक आहेत. त्यांनी अनेक वर्षे माझ्या लेखनाचा सखोल अभ्यास केला आहे. यामुळे मला अतिशय चांगली मदत मिळाली आहे. परंतु मला वर्तमानपत्र वाचून दाखवण्याइतकी ती मदत करणाराला वेळ नाही. यामुळे माझे बाहेरचे काम किमान पातळीवर आले आहे.

येथील काम नवीन आणि अतीशय सुखदही आहे परंतु तितकेच कष्टकरही आहे. माझ्या अहिंसेची परीक्षा होत आहे. याबद्दल अधिक पुढील वेळी.

हे केवळ माझ्याबद्दल तुला वाटणाऱ्या काळजीतून मुक्त करण्याकरिता. आता मी नेहमीचा आहार घेत आहे वा असे म्हण की नेहमीचा आहार घेण्याचा प्रयत्न करतो आहे. २१ दिवस तसा आहार घेण्याला नकार दिल्यामुळे आता त्याची सवय होण्याकरिता थोडा वेळ लागू शकतो. जितक्या वेगात शक्य आहे तितक्या वेगात मी माझी पूर्वीची शक्ती मिळवण्याचा प्रयत्न करतो आहे. मी फार घाई करण्याचे साहस करायला नको.

तू १८ नोव्हेंबरला जो धागा सोडला होता तो तू आता २२ तारखेला परत पकडलेला दिसतो. तुझ्या समस्या काही साध्या नाहीत परंतु त्या तूच निर्माण केलेल्या आहेत. यामुळे त्या इतक्या कमी कर की ज्या तुझ्याकडून पूर्ण होऊ शकतील. तुला शोधूनही माणूस वा माणसे मिळणार नाहीत. ज्या कामाकरिता तू माणूस शोधते आहेस त्याकरिता ईश्वराची जर इच्छा असेल तर हवा तसा माणूस वा तशी माणसे तुझ्याकडे चालत येतील. यामुळे मी तर म्हणेन की तू ईश्वराचा आधार घे आणि काळजी न करता जे काम तुझ्याकडून होईल ते करत राहा. मला वाटते कृष्णचंद्र येणार नाही. तो विनोबांच्या हाताखाली काम करून राहिला आहे आणि समाधानकारकपणे काम करतो आहे. त्याने मला एक महिन्यापासून पत्र लिहिलेले नाही. तुझ्याकडे पाठवता येईल असा एकही माणूस मला माहीत नाही, आणि घनश्यामदासजीही याबाबतीत तुला काही मार्गदर्शन करतील असे मला वाटत नाही. ते तुला केवळ पैसा देऊ शकतात, परंतु तुला तो नको आहे आणि असायलाही नको. आश्रम ही तुझी स्वतःची कल्पना आहे. सध्याची जागा तुला मानवत नसेल तर तुला त्याचा जो उपयोग

करायचा असेल तो कर. माझे वैयक्तिक मत तर असे आहे की तुझे वैयक्तिक जीवन सोडले तर तू इतरांकरिता आश्रमीय जीवनाची कल्पना सोडून दिली पाहिजे. मग तुझा कोंडमारा होणार नाही आणि मग तुझा विश्वव्यापी विकास होऊ शकेल. तुला माहीत आहे की आश्रम म्हणून मी साबरमतीचा आश्रम विसर्जित केला आणि आता तिथे हरिजन संस्था आहे. मुळात सत्याग्रह आश्रम होता. तो कायमचा गेला. यामुळे तुझ्या संकल्पनेतील आश्रम कोणाला तरी हस्तांतरित करण्याचा विचार करू नको. सध्याच्या जागेत तुला आवडेल ते काम जे कोणी सक्षमपणे करू शकतील अशा विवाहितांना वा अविवाहितांना तिथे करू दे. असे केले नाही तर तिथे अतिशय आदर्श हवामान असूनही तू तुझी प्रकृती बिघडवून घेशील. लक्षात ठेव की मी वर जे काही म्हणालो आहे त्यात तुझ्या कल्पनेतील आश्रमाकरिता आधिकात अधिक वाव ठेवला आहे. आणि असे केल्यामुळेच आश्रमाची कल्पना तू तुझ्यापर्यंतच सीमीत ठेवण्याचा सल्ला मी तुला दिला आहे. हं, सहकार्यकर्ता म्हणून तुला जितक्या योग्य व्यक्ती मिळतील तितक्यांना जवळ ठेव, परंतु त्यांच्या उपस्थितीने वा राहण्यावागण्याने तुला त्रास होणार नाही वा तुझ्या व्यक्तिगत विकासाच्या आड त्या गोष्टी येणार नाहीत हे पाहा. (यासंबंधात मिराबेन लिहितात: “या पत्रामुळे किसान आश्रम ब्रह्मचारी आश्रम म्हणून ठेवण्याचा माझा जो विचार होता तो सोडून देण्याची निश्चितच प्रेरणा मिळाली आणि त्याऐवजी विवाहित स्त्री-पुरुषांना व त्यांच्या कुटुंबांना तिथे ठेवण्याचे ठरवले. आश्रमाची माझी संकल्पना माझ्यापर्यंतच सीमीत ठेवण्याचा बापूंचा सल्ला मी अंतःकरणपूर्वक स्वीकारला आणि त्या वेळी ऋषिकेशजवळील संरक्षित वनक्षेत्रात सरकारकरिता पशुविकासाची एक योजना तयार करत असल्यामुळे मी गंगाजीच्या काठावर गायरानात एक झोपडी बांधून तोच माझा आश्रम आहे असे समजून तिथेच राहण्याचे ठरवले.”)

आशा आहे की मला काय म्हणायचे आहे ते मी तुला पूर्णपणे समजावून सांगितले आहे. असे असेल तर माझे काम संपले.

सकाळी फिरायला जाण्यापूर्वी म्हणजे साडेसातपूर्वी शक्य तितक्या लवकर याचा मजकूर सांगून मी हे लिहून घेतले आहे. मी राष्ट्रीय प्रमाण वेळेप्रमाणे ४ वाजल्यापासून म्हणजे स्थानिक वेळेच्या ५ वाजतापासून काम करत आहे. यात नेहमीच्या प्रार्थनेच्या वेळेचाही समावेश आहे. प्रार्थनेचे संचालन परशुरामने केले.

आशीर्वाद,

बापू (साधन स्रोतात हे शब्द देननागरीत आहेत)

मुळावरून. सी. डब्ल्यू. ६५२०. सौजन्य - मीराबेन. शिवाय जी. एन. ९९१५

---------------

# १४४. नाझीर यांना पत्र

शिबिर, श्रीरामपूर, पूर्व बंगाल,

डिसेंबर ४, १९४६

प्रिय मित्र,

नोआखालीच्या दंगलींमध्ये त्रास सहन कराव्या लागलेल्या लोकांच्या मदतीकरिता अहमदिया समाजातर्फे तुम्ही जो ५,००० रुपयांचा धनाकर्ष (ड्राफ्ट) पाठवला त्याकरिता मी तुमचा आभारी आहे. तुम्ही सांगितल्याप्रमाणे हा पैसा या वर्षात खर्च केला जाईल.

तुमचा विश्वासू,

मो. क. गांधी

द नाझीर उमूर खरिजाह काधीन

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

-----------------

## १४५. नाझीर यांना पत्र

शिबिर, श्रीरामपूर, पूर्व बंगाल,

डिसेंबर ४, १९४६

प्रिय मित्र,

नोआखालीच्या दंगलींमध्ये त्रास सहन कराव्या लागलेल्या लोकांच्या मदतीकरिता अहमदिया समाजातर्फे तुम्ही जो ५,००० रुपयांचा धनाकर्ष (ड्राफ्ट) पाठवला त्याकरिता मी तुमचा आभारी आहे. तुम्ही सांगितल्याप्रमाणे हा पैसा या वर्षात खर्च केला जाईल.

तुमचा विश्वासू,

मो. क. गांधी

द नाझीर उमूर खरिजाह काधीन

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

-----------------

## १४६. वल्लभभाई पटेल यांना पत्र

श्रीरामपूर,

डिसेंबर ४, १९४६

चि. वल्लभभाई,

घटनासमितीसंबंधीचे माझे विचार सोबत आहेत (पाहा “घटनासंमितीसंबंधी टिपण”, डिसेंबर ३, १९४६). ते तुम्ही पाहा आणि तुम्हाला योग्य वाटेल ते करा. जवाहरलालची अनुपस्थिती अडचणीची होईल. याबाबतीत माझे विचार अतिशय दृढ आहेत. योजना रद्द करणे निश्चितच आमचा दुबळेपणा नाही. परिस्थितीप्रमाणे वागणे म्हणजे दुबळेपणा नसतो. परंतु शक्य आहे की मी चूक असू शकेन.

आशीर्वाद,

बापू

गुजरातीवरून. बापूना पत्रो - २ : सरदार वल्लभभाईने, पृष्ठ ३२८

# १४७. प्रफुल्ल चंद्र घोष यांना पत्र

डिसेंबर ४, १९४६

चि. प्रफुल्ल,

माझे विचार (घटनासंमितीसंबंधीचे) सोबत जोडले आहेत. तुम्हाला तुमच्या ज्या मित्रांना ते दाखवायचे असतील त्यांना ते दाखवू शकता. ९ तारखेच्या सभेनंतरही त्यांचे प्रकाशन स्थगित ठेवू शकता वा रद्द करू शकता. व्यक्तिगत विचाराल तर मला ते प्रकाशित करणे आवडेल. दोनपैकी एक मसुदा प्रकाशित करण्याचा निर्णय घ्यावा लागेल. कोणत्याही परिस्थितीत मौलानांना माझे विचार कळवायलाच पाहिजे. घनश्यामदासला भेटा. त्यांचा सल्ला घ्या. ते शरत बाबूंना दाखवा. हे कोणी प्रकाशित करावे हे मी आधीच लिहिले आहे. त्याची गरज नव्हती.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - मी अजून एक प्रत पाठवत आहे.

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ३७८५

------------

# १४८. अमिया चक्रवर्ती यांच्याशी चर्चा

(प्यारेलाल यांच्या "डू ऑर डाय ऍट वर्क" म्हणजे कामाच्या ठिकाणी करा वा मरा या शीर्षकाखालील लेखातून )

[डिसेंबर ४, १९४६]

(डिसेंबर ९ १९४६च्या हिंदुस्तान स्टॅन्डर्डवरून)

**कलकत्ता विद्यापीठाचे अमिया चक्रवर्ती गांधींना भेटायला आले होते. जेवणाच्या वेळी त्यांनी गांधीजींना विचारले की चुकीचे काम करणारांची प्रतिकार करण्याची भावना नाहीशी होईल याकरिता त्यांच्याशी कशा प्रकारे चर्चा केली पाहिजे? डॉ. चक्रवर्ती पुढे म्हणाले की "या क्रूर अपराध्यांच्या बाबतीत मुख्य अडचण ही आहे की त्यांना त्यांनी केलेल्या कृत्याचा पश्चात्ताप तर होतच नाही उलट ते उर्मटपणा करतात आणि त्यांना त्यांच्या कृत्याचा आनंद होत असतो."**

**गांधीजी म्हणाले:**

होय, त्यांना आनंद होण्याचे त्यांचे स्वतःचे कारण असते. आणि यावरील एकमेव उपाय निराश न होता त्यांच्यातच राहणे आणि आपल्याला जाणवणाऱ्या सत्याचा त्याग न करणे. चांगुलपणाला ज्ञानाची जोड असली पाहिजे. जीवनात मला जो अनुभव आला त्याप्रमाणे केवळ चांगुलपणाचा फारसा उपयोग नसतो. आध्यात्मिक साहस आणि चारित्र्यसंपन्न माणसात चांगल्या वाईटात भेद करणारी जी सद्सद्विवेकबुद्धी असते ती माणसाने आपल्यामध्ये विकसित केली पाहिजे. संकटप्रसंगी केव्हा बोलावे आणि केव्हा बोलू नये, केव्हा कृती करावी आणि केव्हा गप्प राहावे हे माणसाला कळले पाहिजे. अशा प्रसंगी कर्म आणि अकर्म परस्पर विरोधी नाही तर समान होतात.

मी प्रकाशाच्या शोधात आहे. माझ्या सभोवती काळोख दाटलेला आहे; परंतु मी सत्याच्या मार्गदर्शनाप्रमाणे एक तर कृती केली पाहिजे वा तसे करण्यापासून दूर तरी राहिलो पाहिजे. परंतु माझ्यात धीर नाही आणि अशा वेळी कसे वागावे याचे तंत्र मला अवगत नाही असे मला आढळते; वेदना वा दुःख आणि वाईटपणा पाहून मी अनेकदा भवविवश होतो आणि आतल्याआत होरपळत राहतो. यामुळे मी माझ्या मित्रांना सांगितले आहे की तुम्ही मला सहन केले पाहिजे आणि मला जाणवणाऱ्या सत्याप्रमाणे मी जी कृती करतो तिच्यापासून दूर राहायचे की नाही हे सुज्ञपणाने ठरवावे. या वेळी आपल्याला या बुद्धिमत्तेची नितांत आवश्यकता आहे. हा काळोख नाहीसा होईल आणि मला जर प्रकाश दिसला तर ज्या लोकांनी बंगालमध्ये सांप्रदायिकतेची ही शोकात्म परिस्थीती निर्माण केली आहे त्यांनासुद्धा तो दिसेल. (हे वाक्य डिसेंबर ८, १९४६च्या 'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड'मधून घेतले आहे.)

ज्या कोणत्या खेड्यांमध्ये हिंदू आणि मुसलमानांचे पूर्वज राहिले होते आणि जिथे त्यांना भविष्यातही सोबत राहायचे आहे आणि जिथे या दोघांनाही हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या आहेत त्याच खेड्यात आपल्याला नवीन आधार स्थापित करावा लागेल. सध्या तरी मी बंगाली आणि नोआखालीकर माणूस झालो आहे. मी इथे जो आलो आहे तो त्यांच्यात राहायला आणि त्यांच्या कामात हातभार लावायला, त्यांच्यात ऐक्याची भावना निर्माण करण्याकरिता वा तसे करण्याच्या प्रयत्नात मरण्याकरिता मी इथे आलो आहे. मी पेटत्या वणव्यात सापडलो आहे आणि तो विझेपर्यंत मी इथे थांबणार आहे. यामुळे मला हा भाग सोडायचा नाही. ज्या स्त्री-पुरुषांना अपरिमित व्यथा-वेदना सहन कराव्या लागल्या त्यांना जीवन जगण्यासारखे आहे असे वाटेल अशी परिस्थिती निर्माण करावी लागेल. संघटनेचे काम सुरू राहिले पाहिजे आणि त्याचबरोबर भौतिक आणि नैतिक उत्थानही झाले पाहिजे.

**यानंतर डॉ. चक्रवर्तींनी सुचवले की गांधीजींचे जे सहकारी आता वेगवेगळ्या भागात स्वतंत्रपणे काम करत आहेत त्यांच्या कामाचे अहवाल एकत्र करण्यात यावे व त्या सर्व अहवालावरून एक विस्तृत अहवाल तयार करण्यात यावा. असे केले तर पूर्व बंगालमध्ये सबळांच्या अहिंसेचा जो विकास आणि प्रयोग करण्यात येत आहे त्याच्या तंत्राबद्दलची माहिती इतर सहकारी कार्यकर्त्यांना मिळू शकेल.**

उत्तर देताना गांधीजी म्हणाले : अजून ती वेळ आलेली नाही. (हे वाक्य डिसेंबर ९, १९४६च्या 'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड'मधून घेतले आहे.) ते सद्भावनेने गेले आहेत, परंतु अशा वातावरणात गेले आहेत की जे अजूनही अगदीच अनुकूल नाही. ते रुळलेल्या वाटेने जाऊन राहिलेले नाहीत तर नवीन वाट काढत चाललेले आहेत. त्यांचे काम मुसलमानांच्या वस्तीत आहे. त्यांना तेथील भाषा माहीत नाही आणि लोकांच्या समस्याही माहीत नाहीत. मला स्वतःलाही पुढील पाऊल कोणते असेल हे माहीत नाही आणि मी त्यांना मार्गदर्शनही करू शकत नाही. सध्या ते अहवाल पाठवायला असमर्थ आहेत. मी जर त्यांच्याकरिता तक्ता तयार केला तर ते रकाने भरू शकतील. इतकेच नाही तर ठक्कर बापासुद्धा, जे माझ्याच वयाचे आहेत, अनुभवी कार्यकर्ते आहेत आणि निस्वार्थी व्यक्ती आहेत, तेसुद्धा काहीही न कळता काम करत आहेत. असे त्यांनी यापूर्वी कधीही केले नाही. परंतु माझा विश्वास आहे की आज अव्यवस्थेची जी परिस्थिती आपल्याला भेडसावत आहे तिच्यातूनच व्यवस्था निर्माण होईल. मग जी तुमची जी इच्छा आहे आणि माझी इच्छा आहे तसेच अहवाल येतील आणि भविष्यातील कार्यकर्त्यांना ते मार्गदर्शन करतील.

**अमिया चक्रवर्ती - हीच गोष्ट आपल्या कार्यकर्त्यांना आणि बाहेरच्या कार्यकर्त्यांना हवी आहे. नोआखाली आज प्रयोगशाळा झाली आहे आणि इथे अतिशय महत्त्वाचे प्रयोग केले जात आहेत. जे कोणते निष्कर्ष निघतील ते ज्या**

**समुदायात आणि राष्ट्रांत वाद निर्माण होतील त्या सर्व ठिकाणी लागू होतील. शांततापूर्वक तडजोडीकरिता एका नवीन तंत्राची आवश्यकता आहे.**

गांधीजी - लंडनहूनही मला याच अर्थाची पत्रे मिळाली आहेत. नोआखालीत काय होते हे जाणून घेण्याकरिता लोक उत्सुक आहेत. मला वाटते की ही जबाबदारी फार मोठी आहे आणि आपले काम बरोबर झाले पाहिजे.

**अमिया चक्रवर्ती - लोकांनी वर्णनातीत हालअपेष्टा सहन केल्या आहेत आणि सहन करत आहेत तरीही या महान कार्याकरिता बंगालला निवडण्यात आले आहे आणि तुम्ही बंगालला तुमचे कार्यक्षेत्र बनवले आहे ही आमच्याकरिता फार अभिमानाची गोष्ट आहे. तुमच्या आगमनाची संपूर्ण बंगालला कल्पना आहे आणि तुम्ही त्या पीडित स्त्रीपुरुषांकरिता कार्य करायला आला आहात की ज्यांना या वेळी तुमची नितांत आवश्यकता आहे.**

गांधीजी - जोपर्यंत माझा प्रश्न आहे हे कार्य जर यशस्वीपणे पूर्ण झाले तर माझ्या जीवनातील ते सर्वात मोठे कार्य असेल. मला पूर्व बंगालच्या भूमीवर आणि येथील लोकांमध्ये यायचे होते. सर्वात आधी मी ही गोष्ट जवाहरलालला सांगितली. क्षणाचाही विलंब न करता ते म्हणाले : “होय, तुमचे स्थान तिथेच आहे. आम्हाला इथे तुमची किती जरी गरज असली तरी तुमची नोआखालीत अधिक गरज आहे.” मी त्यांना विचारले, “केव्हा?” ते म्हणाले “तुम्हाला वाटेल तितक्या लवकर.” दोन दिवसात मी निघालो.

‘हरिजन’, जानेवारी १, १९४७; आणि ‘हिंदुस्तान स्टॅन्डर्ड’, डिसेंबर ८ आणि ९, १९४६

------------

# १४९. नाझीर यांना पत्र

शिबिर, श्रीरामपूर, पूर्व बंगाल,

डिसेंबर ४, १९४६

प्रिय मित्र,

नोआखालीच्या दंगलींमध्ये त्रास सहन कराव्या लागलेल्या लोकांच्या मदतीकरिता अहमदिया समाजातर्फे तुम्ही जो ५,००० रुपयांचा धनाकर्ष (ड्राफ्ट) पाठवला त्याकरिता मी तुमचा आभारी आहे. तुम्ही सांगितल्याप्रमाणे हा पैसा या वर्षात खर्च केला जाईल.

तुमचा विश्वासू,

मो. क. गांधी

द नाझीर उमूर खरिजाह काधीन

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

-----------------

# १५०. वल्लभभाई पटेल यांना पत्र

श्रीरामपूर,

डिसेंबर ४, १९४६

चि. वल्लभभाई,

घटनासमितीसंबंधीचे माझे विचार सोबत आहेत (पाहा “घटनासंमितीसंबंधी टिपण”, डिसेंबर ३, १९४६). ते तुम्ही पाहा आणि तुम्हाला योग्य वाटेल ते करा. जवाहरलालची अनुपस्थिती अडचणीची होईल. याबाबतीत माझे विचार अतिशय दृढ आहेत. योजना रद्द करणे निश्चितच आमचा दुबळेपणा नाही. परिस्थितीप्रमाणे वागणे म्हणजे दुबळेपणा नसतो. परंतु शक्य आहे की मी चूक असू शकेन.

आशीर्वाद,

बापू

गुजरातीवरून. बापूना पत्रो - २ : सरदार वल्लभभाईने, पृष्ठ ३२८

# १५१. प्रफुल्ल चंद्र घोष यांना पत्र

डिसेंबर ४, १९४६

चि. प्रफुल्ल,

माझे विचार (घटनासंमितीसंबंधीचे) सोबत जोडले आहेत. तुम्हाला तुमच्या ज्या मित्रांना ते दाखवायचे असतील त्यांना ते दाखवू शकता. ९ तारखेच्या सभेनंतरही त्यांचे प्रकाशन स्थगित ठेवू शकता वा रद्द करू शकता. व्यक्तिगत विचाराल तर मला ते प्रकाशित करणे आवडेल. दोनपैकी एक मसुदा प्रकाशित करण्याचा निर्णय घ्यावा लागेल. कोणत्याही परिस्थितीत मौलानांना माझे विचार कळवायलाच पाहिजे. घनश्यामदासला भेटा. त्यांचा सल्ला घ्या. ते शरत बाबूंना दाखवा. हे कोणी प्रकाशित करावे हे मी आधीच लिहिले आहे. त्याची गरज नव्हती.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - मी अजून एक प्रत पाठवत आहे.

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ३७८५

------------

# १५२. अमिया चक्रवर्ती यांच्याशी चर्चा

(प्यारेलाल यांच्या "डू ऑर डाय ऍट वर्क" म्हणजे कामाच्या ठिकाणी करा वा मरा या शीर्षकाखालील लेखातून )

[डिसेंबर ४, १९४६]

(डिसेंबर ९ १९४६च्या हिंदुस्तान स्टॅन्डर्डवरून)

**कलकत्ता विद्यापीठाचे अमिया चक्रवर्ती गांधींना भेटायला आले होते. जेवणाच्या वेळी त्यांनी गांधीजींना विचारले की चुकीचे काम करणारांची प्रतिकार करण्याची भावना नाहीशी होईल याकरिता त्यांच्याशी कशा प्रकारे चर्चा केली पाहिजे? डॉ. चक्रवर्ती पुढे म्हणाले की "या क्रूर अपराध्यांच्या बाबतीत मुख्य अडचण ही आहे की त्यांना त्यांनी केलेल्या कृत्याचा पश्चात्ताप तर होतच नाही उलट ते उर्मटपणा करतात आणि त्यांना त्यांच्या कृत्याचा आनंद होत असतो."**

**गांधीजी म्हणाले:**

होय, त्यांना आनंद होण्याचे त्यांचे स्वतःचे कारण असते. आणि यावरील एकमेव उपाय निराश न होता त्यांच्यातच राहणे आणि आपल्याला जाणवणाऱ्या सत्याचा त्याग न करणे. चांगुलपणाला ज्ञानाची जोड असली पाहिजे. जीवनात मला जो अनुभव आला त्याप्रमाणे केवळ चांगुलपणाचा फारसा उपयोग नसतो. आध्यात्मिक साहस आणि चारित्र्यसंपन्न माणसात चांगल्या वाईटात भेद करणारी जी सद्सद्विवेकबुद्धी असते ती माणसाने आपल्यामध्ये विकसित केली पाहिजे. संकटप्रसंगी केव्हा बोलावे आणि केव्हा बोलू नये, केव्हा कृती करावी आणि केव्हा गप्प राहावे हे माणसाला कळले पाहिजे. अशा प्रसंगी कर्म आणि अकर्म परस्पर विरोधी नाही तर समान होतात.

मी प्रकाशाच्या शोधात आहे. माझ्या सभोवती काळोख दाटलेला आहे; परंतु मी सत्याच्या मार्गदर्शनाप्रमाणे एक तर कृती केली पाहिजे वा तसे करण्यापासून दूर तरी राहिलो पाहिजे. परंतु माझ्यात धीर नाही आणि अशा वेळी कसे वागावे याचे तंत्र मला अवगत नाही असे मला आढळते; वेदना वा दुःख आणि वाईटपणा पाहून मी अनेकदा भवविवश होतो आणि आतल्याआत होरपळत राहतो. यामुळे मी माझ्या मित्रांना सांगितले आहे की तुम्ही मला सहन केले पाहिजे आणि मला जाणवणाऱ्या सत्याप्रमाणे मी जी कृती करतो तिच्यापासून दूर राहायचे की नाही हे सुज्ञपणाने ठरवावे. या वेळी आपल्याला या बुद्धिमत्तेची नितांत आवश्यकता आहे. हा काळोख नाहीसा होईल आणि मला जर प्रकाश दिसला तर ज्या लोकांनी बंगालमध्ये सांप्रदायिकतेची ही शोकात्म परिस्थीती निर्माण केली आहे त्यांनासुद्धा तो दिसेल. (हे वाक्य डिसेंबर ८, १९४६च्या 'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड'मधून घेतले आहे.)

ज्या कोणत्या खेड्यांमध्ये हिंदू आणि मुसलमानांचे पूर्वज राहिले होते आणि जिथे त्यांना भविष्यातही सोबत राहायचे आहे आणि जिथे या दोघांनाही हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या आहेत त्याच खेड्यात आपल्याला नवीन आधार स्थापित करावा लागेल. सध्या तरी मी बंगाली आणि नोआखालीकर माणूस झालो आहे. मी इथे जो आलो आहे तो त्यांच्यात राहायला आणि त्यांच्या कामात हातभार लावायला, त्यांच्यात ऐक्याची भावना निर्माण करण्याकरिता वा तसे करण्याच्या प्रयत्नात मरण्याकरिता मी इथे आलो आहे. मी पेटत्या वणव्यात सापडलो आहे आणि तो विझेपर्यंत मी इथे थांबणार आहे. यामुळे मला हा भाग सोडायचा नाही. ज्या स्त्री-पुरुषांना अपरिमित व्यथा-वेदना सहन कराव्या लागल्या त्यांना जीवन जगण्यासारखे आहे असे वाटेल अशी परिस्थिती निर्माण करावी लागेल. संघटनेचे काम सुरू राहिले पाहिजे आणि त्याचबरोबर भौतिक आणि नैतिक उत्थानही झाले पाहिजे.

**यानंतर डॉ. चक्रवर्तींनी सुचवले की गांधीजींचे जे सहकारी आता वेगवेगळ्या भागात स्वतंत्रपणे काम करत आहेत त्यांच्या कामाचे अहवाल एकत्र करण्यात यावे व त्या सर्व अहवालावरून एक विस्तृत अहवाल तयार करण्यात यावा. असे केले तर पूर्व बंगालमध्ये सबळांच्या अहिंसेचा जो विकास आणि प्रयोग करण्यात येत आहे त्याच्या तंत्राबद्दलची माहिती इतर सहकारी कार्यकर्त्यांना मिळू शकेल.**

उत्तर देताना गांधीजी म्हणाले : अजून ती वेळ आलेली नाही. (हे वाक्य डिसेंबर ९, १९४६च्या 'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड'मधून घेतले आहे.) ते सद्भावनेने गेले आहेत, परंतु अशा वातावरणात गेले आहेत की जे अजूनही अगदीच अनुकूल नाही. ते रुळलेल्या वाटेने जाऊन राहिलेले नाहीत तर नवीन वाट काढत चाललेले आहेत. त्यांचे काम मुसलमानांच्या वस्तीत आहे. त्यांना तेथील भाषा माहीत नाही आणि लोकांच्या समस्याही माहीत नाहीत. मला स्वतःलाही पुढील पाऊल कोणते असेल हे माहीत नाही आणि मी त्यांना मार्गदर्शनही करू शकत नाही. सध्या ते अहवाल पाठवायला असमर्थ आहेत. मी जर त्यांच्याकरिता तक्ता तयार केला तर ते रकाने भरू शकतील. इतकेच नाही तर ठक्कर बापासुद्धा, जे माझ्याच वयाचे आहेत, अनुभवी कार्यकर्ते आहेत आणि निस्वार्थी व्यक्ती आहेत, तेसुद्धा काहीही न कळता काम करत आहेत. असे त्यांनी यापूर्वी कधीही केले नाही. परंतु माझा विश्वास आहे की आज अव्यवस्थेची जी परिस्थिती आपल्याला भेडसावत आहे तिच्यातूनच व्यवस्था निर्माण होईल. मग जी तुमची जी इच्छा आहे आणि माझी इच्छा आहे तसेच अहवाल येतील आणि भविष्यातील कार्यकर्त्यांना ते मार्गदर्शन करतील.

**अमिया चक्रवर्ती - हीच गोष्ट आपल्या कार्यकर्त्यांना आणि बाहेरच्या कार्यकर्त्यांना हवी आहे. नोआखाली आज प्रयोगशाळा झाली आहे आणि इथे अतिशय महत्त्वाचे प्रयोग केले जात आहेत. जे कोणते निष्कर्ष निघतील ते ज्या**

**समुदायात आणि राष्ट्रांत वाद निर्माण होतील त्या सर्व ठिकाणी लागू होतील. शांततापूर्वक तडजोडीकरिता एका नवीन तंत्राची आवश्यकता आहे.**

गांधीजी - लंडनहूनही मला याच अर्थाची पत्रे मिळाली आहेत. नोआखालीत काय होते हे जाणून घेण्याकरिता लोक उत्सुक आहेत. मला वाटते की ही जबाबदारी फार मोठी आहे आणि आपले काम बरोबर झाले पाहिजे.

**अमिया चक्रवर्ती - लोकांनी वर्णनातीत हालअपेष्टा सहन केल्या आहेत आणि सहन करत आहेत तरीही या महान कार्याकरिता बंगालला निवडण्यात आले आहे आणि तुम्ही बंगालला तुमचे कार्यक्षेत्र बनवले आहे ही आमच्याकरिता फार अभिमानाची गोष्ट आहे. तुमच्या आगमनाची संपूर्ण बंगालला कल्पना आहे आणि तुम्ही त्या पीडित स्त्रीपुरुषांकरिता कार्य करायला आला आहात की ज्यांना या वेळी तुमची नितांत आवश्यकता आहे.**

गांधीजी - जोपर्यंत माझा प्रश्न आहे हे कार्य जर यशस्वीपणे पूर्ण झाले तर माझ्या जीवनातील ते सर्वात मोठे कार्य असेल. मला पूर्व बंगालच्या भूमीवर आणि येथील लोकांमध्ये यायचे होते. सर्वात आधी मी ही गोष्ट जवाहरलालला सांगितली. क्षणाचाही विलंब न करता ते म्हणाले : “होय, तुमचे स्थान तिथेच आहे. आम्हाला इथे तुमची किती जरी गरज असली तरी तुमची नोआखालीत अधिक गरज आहे.” मी त्यांना विचारले, “केव्हा?” ते म्हणाले “तुम्हाला वाटेल तितक्या लवकर.” दोन दिवसात मी निघालो.

‘हरिजन’, जानेवारी १, १९४७; आणि ‘हिंदुस्तान स्टॅन्डर्ड’, डिसेंबर ८ आणि ९, १९४६

------------

# १५३. प्रार्थना प्रवचन

("श्रीरामपूर डायरी"मधून उद्धृत.)

श्रीरामपूर,

डिसेंबर ४, १९४६

**दैनंदिन प्रार्थनेची सुरुवात करताना गांधीजींनी संगीत मंडळीची मुक्त कंठाने प्रशंसा केली.** [साधन सुत्राप्रमाणे : "प्रार्थना सुरू होण्यापूर्वी जवळच्या काही खेड्यांमधून काही लोक हातात खोळ (ढोल) आणि करताल (चिपळ्या) घेऊन त्यांच्या तालावर नामसंकिर्तन गात आले. रामधून जेव्हा सुरू झाली त्यांनी तिला ढोलाने ताल दिला."] **ते म्हणाले की या सभेत मी बंगाली मृदंग (ढोल) जितका चांगला वाजवलेला ऐकला तितका चांगला वाजवलेला मी कधीही ऐकला नव्हता. तो जेव्हा चांगला वाजवतात तेव्हा त्याचा गोडवा काही वेगळाच असतो. त्यांनी नामसंकीर्तनाचीही प्रशंसा केली; परंतु ते म्हणाले की पोपटसुद्धा त्याच्या मालकाने शिकवलेले म्हणत असल्यामुळे हे सूर केवळ तुमच्या गळ्यातून निघालेले नसून अंतःकरणातून निघालेले असतील अशी मी आशा करतो. आपण जेव्हा सुरक्षित जीवन जगत असतो तेव्हा जर आपण ईश्वराचे नाव घेतले तर त्यात कोणताही मोठा सद्गुण नाही. जेव्हा खरे संकट उभे राहते तेव्हा तो सद्गुण होतो.**

**हिंदूंनी स्वतःच्या इच्छेने अंतःकरणपूर्वक कलमा म्हटला तर मला त्याचे काही वाटणार नाही. परंतु जीवाच्या वा वित्ताच्या भीतीने जर ते तो म्हणाले तर त्यांचे ते ईश्वराचे नामस्मरण व्यर्थ जाईल कारण मग तो आवाज सैतानाने तुमच्या गळ्यातून काढलेला आवाज असेल. मला कळते त्याप्रमाणे इस्लामची भरभराट कधीही बळजबरीने झालेली नाही आणि तशी ती होऊही शकत नाही. जो कोणता माणूस अशा प्रकारे इस्लामची सेवा करू इच्छितो तो त्या उदात्त धर्माची सेवा न करता त्या धर्माचे अहितच करत असतो.**

**आज प्रत्येक धर्मात काही अवांछित गोष्टींनी प्रवेश केला आहे. हिंदू धर्मात आपण मोठ्या संख्येतील आपल्या भावंडांना अस्पृश्य समजतो आणि परिणामी त्या पापाची आपण घोर किंमत चुकवतो.**

**ईशोपनिषदातील पहिल्या श्लोकात हिंदूंच्या आध्यात्मिक अनुभवाचा सार आला आहे. त्या श्लोकाचा अर्थ आहे - जे काही या विश्वात अस्तित्वात आहे ते ईश्वराने व्याप्त आहे आणि ईश्वरात त्याचे अस्तित्व आहे. यामुळे कोणतीही गोष्ट माझी आहे असा दावा माणूस करू शकत नाही. त्याने आपले शरीर, मन व जे काही त्याचे आहे ते त्याने त्या विश्वात्मक अस्तित्वाला समर्पित केले पाहिजे आणि त्याच्या क़ृपेने जितके मिळते तितक्याचाच उपयोग केला पाहिजे. यापासून आपल्या धडा मिळतो की आपण इतर कोणाचीही संपत्ती, मग ती जीव, अब्रू वा धर्म यांच्या स्वरूपातील का असेना, हिरावून घेऊ नये. या तत्त्वावर विश्वास ठेवणारी व त्याप्रमाणे जगणारी व्यक्ती सर्व भीतीचा त्याग करते व परिपूर्ण शांततेत राहते.**

**यानंतर गांधीजींनी भगवद्गीतेतील श्लोकांचा उल्लेख केला** (अध्याय २, श्लोक ५४-७२). **या श्लोकांचा पाठ आश्रमाच्या सायंप्रार्थनेत क्रमांक २ वर म्हटला जातो. ज्या माणसाने ज्ञान मिळवले आहे आणि आपल्या इंद्रियांवर पूर्ण नियंत्रण मिळवले**

**आहे त्याच्या गुणांचे वर्णन या श्लोकांत करण्यात आले आहे. भगवद्गीतेतील शिकवणूक काही केवळ संन्याशांकरिता नाही. ती कुठेही आणि कोणत्याही ठिकाणी जन्म घेतलेल्या व्यक्तीला तितक्याच प्रमाणात लागू आहे. प्रत्येकाचे कर्तव्य या श्लोकांमध्ये वर्णिलेली स्थिती प्राप्त करणे आहे. आणि ज्याच्या जीवनाचा पाया निर्भयतेच्या शिळेवर उभारलेला आहे तोच असे करू शकतो.**

'हरिजन', जानेवारी ५, १९४७

------------

# १५४. प्यारेलाल यांना चिठ्ठी

(प्यारेलाल यांच्या "डू ऑर डाय ऍट वर्क" मधून उद्धृत)

[डिसेंबर ४, १९४६] (प्यारेलाल यांच्या प्रास्ताविकावरून अनुमानित.)

मी अजूनही काळोखातच चाचपडतो आहे. (हे वाक्य 'महात्मा गांधी - अखेरचे पर्व'मधून घेतले आहे.) असे वाटते की माझ्यात ते कौशल्यच नाही. मला अजून अहिंसेची किल्ली सापडलेली नाही. मी भव्य यज्ञ करायला निघालो आहे परंतु या कामाकरिताची माझ्यातील अपात्रता पावलोपावली दिसून पडते. परंतु येथून पळून जाण्याचा मार्ग नाही. आणि मी पळून कुठे जाणार? यश अथवा अपयश आपल्या हातात नसते. आपण आपले कर्तव्य पार पाडले तर तितके पुरसे असते. मी माझ्या प्रयत्नात कोणताच कसूर ठेवलेला नाही. आपल्या हाती प्रयत्न करणे आहे. अखेरीस त्याची इच्छा असेल तसे होईल.

'हरिजन', जानेवारी १२, १९४७; आणि 'महात्मा गांधी - द लास्ट फेज', खंड १, भाग २, पृष्ठ ७७ ('महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड २, पृष्ठ ९५)

-----------------

# १५५. हसन शहीद सुऱ्हावर्दी यांना पत्र

श्रीरामपूर,

डिसेंबर ५, १९४६

जिल्हा न्यायाधीश, कोमिला यांच्याकडून आलेल्या खास संदेशवाहकाने तुमची दोन आणि तीन तारखेची दोन पत्रे असलेला लिफापा मला दिला. मी सुचवल्याप्रमाणे तुम्ही काही तरी वक्तव्य प्रसृत करू इच्छिता हे वाचून मला आनंद झाला. काही वेळा अकारण आणि काही वेळा साधार भीतीने भरलेल्या या दिवसात कोणतीही विसंगती वरवरची आहे असे दिसत नाही आणि मूर्खपणाची तर मुळीच वाटत नाही.

२. जर “काही खोडसाळ तरुण हिंदू मोहरमच्या मिरवणुकीवर फटाके आणि क्षेपणास्त्रे फेकत असतील”, तर माझी सूचना आहे की त्यांना पकडले पाहिजे.

३. तुम्ही तुमच्या दोन तारखेच्या पत्रात बऱ्याच प्रमाणात आणि तीन तारखेच्या पत्रात पूर्णपणे बिहारच्या विषयाची चर्चा केली असल्याचे आणि माझी आवश्यकता नोआखालीपेक्षा बिहारमध्ये जास्त आहे असा जो सल्ला तुम्ही मला अनेकदा दिला आहे तोच परत दिला असल्याचे आढळते. तुम्ही बिहारसंबंधी जी अतिशय गंभीर विधाने केली त्यांची जर पुष्टी झाली तर मी माझा नेहमीचा आहार घ्यायला सुरुवात करून मी फार मोठी चूक केली आहे असे म्हणावे लागेल (पाहा “वृत्तपत्रांना वक्तव्य”, नोव्हेंबर २०, १९४६). परंतु पंडित जवाहरलाल नेहरू आणि डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्यासारख्या जबाबदार माणसाची साक्ष नाकारण्याचे साहस मी करू शकत नाही. ते तिथे खासकरून तेथील परिस्थिती पाहण्याकरिता आणि जमावाला शांत करण्याकरिताच गेले होते. हिंदूंच्या जमावाचे वर्तन कोणत्याही प्रकारे चांगले नव्हते हे ते मान्य करतात, परंतु तुम्ही केलेल्या आरोपांची पुष्टी त्यातून होत नाही. तसेच तुम्ही जी आकडेवारी दिली आहे तीसुद्धा त्यांच्या पत्रातून सिद्ध होत नाही. ते असेही सांगतात की जमावाचा राग शांत झाला आहे आणि सैन्याच्या मदतीने सरकारने जमावावर निःसंशयपणे परत नियंत्रण मिळवले आहे. बिहारमध्ये माझी उपस्थिती आवश्यक आहे असे जर मला वाटले असते तर असे करण्याकरिता मला तुमच्या प्रोत्साहनाची आवश्यकता पडली नसती. उलटपक्षी माझे माहीतगार मला आश्वस्त करत सांगतात की बिहारमध्ये माझ्या उपस्थितीची आवश्यकता नाही. अशा परिस्थितीत बिहारमध्ये जाणे आवश्यक असल्याची माझी खात्री पटली पाहिजे. परंतु माझी दुप्पट खात्री पटावी म्हणून बिहारच्या मुख्यमंत्र्याचे याबाबतील काय म्हणणे आहे हे जाणून घेण्याकरिता बिहारच्या मुख्यमंत्र्यांना

तुमच्या पत्राची प्रत पाठवण्याची तुम्ही मला परवानगी दिली पाहिजे. तसेच तुमचे विधान वेदवाक्याप्रमाणे सत्य आहे हेही मी मान्य करू शकत नाही याकरिता तुम्ही मला क्षमा करा. पहिली गोष्ट म्हणजे तुम्हाला घटनांची प्रत्यक्ष माहिती नाही. माझ्या मते नोआखाली आणि बिहार या दोन्ही प्रांतांमधील दंगलीची चौकशी करण्याकरिता दोन्ही सरकारांच्या संमतीने एक निष्पक्ष चौकशीसमिती नेमण्यात यावी (स्पष्ट आहे की गांधीजींची ही सूचना मुस्लीम लीगला मान्य झाली नाही.). तुमचे विधान बरोबर असेल आणि बिहारमधील घटनांसंबंधी तुम्ही जे हुबेहूब वर्णन केले आहे त्याप्रमाणे बिहार सरकारने दुर्वर्तन केल्याचे जर सिद्ध झाले तर हा बिहार सरकारकरिता वाईट दिवस असेल, हिंदूंकरिता वाईट दिवस असेल आणि या दोन समुदायांमध्ये मैत्रीचे संबंध प्रस्थिपित करण्याच्या प्रयत्नाला निरोप द्यावा लागेल, आणि मी कुठे उभा आहे याचा मला गंभीरपणे विचार करावा लागेल. कमीत कमी मी इतके म्हणेन की हे जर खरे असेल तर मला बिहारच्या मंत्र्यांची आणि बिहारी जनतेची जाहीर भर्त्सना करावी लागेल. माझी तुम्हाला विनंती आहे की तुम्हाला शक्य असेल तर तुम्ही या संबंधीचा अंतिम निर्णय घेण्याचे स्थगित करावे.

४. आता मी नोआखालीवर येतो. काल मी तुम्हाला एक लांबलचक पत्र पाठवले होते आणि तुम्हाला ते खास दूतातर्फे लवकरात लवकर पोहोचवण्याकरिता सतीश बाबूंना सांगितले. ते विमानाने पाठवण्याची काही शक्यता आहे काय याचाही मी शोध घेण्याचा प्रयत्न केला परंतु ते जमले नाही. तुम्ही नोआखालीचे गुलाबी चित्र रंगवले होते. तुम्ही म्हणता ते खरे असावे असे मला किती वाटत होते. मी कोणतेही मत बनवले नाही. मला जे लिहून देण्यात आले आणि जे तोंडी सांगण्यात आले त्याचा मी तुम्हाला केवळ आशय सांगितला आहे. मला सांगण्यात आलेली माहिती जर बरोबर असेल तर नोआखालीत सर्व काही पुरेसे सुरक्षित नाही असे म्हणावे लागेल. हिंदूंची भीती गेलेली नाही परंतु तुमच्या म्हणण्याप्रमाणे ते भीतीपासून मुक्त नाहीत. माझा इथे येण्याचा हेतू या दोन समुदायात वितुष्ट निर्माण करणे नाही. मी दोन्ही समाजांचा जसा आधीपासून सारखाच मित्र होतो तसाच आताही आहे असे समजतो. मला माहीत आहे की जाणीवपूर्वक मी कोणतीही चूक केलेली नसली तरी मुसलमानांना मी आता मित्र वाटत नाही. माझ्या नशिबी ही गोष्ट येण्याचे कारण काय असे मी माझ्या मुसालमान मित्रांना विचारले परंतु कोणीही त्याचे कारण सांगू शकलेला नाही. माझ्या वर्तणुकीवरून मी कसा आहे हा निर्णय घेता यावा म्हणून मी नोआखालीत आलो आहे. माझ्या अहिंसेची परीक्षा होत आहे. मी काळोखात चाचपडत आहे तोपर्यंत मला सहन करा. मी तीच व्यक्ती आहे जी तुम्हाला फरीदपूर येथे भेटली होती आणि जिच्याशी तुमची देशबंधूंच्या मृत्यूनंतर त्यांच्या घरी भेट झाली होती. सध्या तरी इतके पुरे.

तुमचा विश्वासू,

मो. क. गांधी

ता.क. - तुम्हाला लवकर पत्रे कशी मिळतील याचा तुम्ही मला मार्ग दाखवावा ही विनंती, कारण यापुढे माझी महत्त्वाची पत्रे तुम्हाला बहुधा एकसारखी येत राहतील.

मो. क. गां.

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

--------------

# १५६. ऍगाथा हॅरिसन यांना पत्र

पत्रोत्तराचा पत्ता -

खादी प्रतिष्ठान, सोदोपूर येथून लिहिल्याप्रमाणे,

डिसेंबर ५, १९४६

प्रिय ऍगाथा,

रामकृष्ण बजाज यांनी मला तुझे सुखद पत्र पाठवले आहे. कार्ल हीथ यांनी मला पत्र लिहिले होते आणि मी त्यांना ताबडतोब उत्तर दिले होते. मला खात्री आहे की त्यांनी तुला ते पत्र दाखवले असेल. यामुळे त्या पत्रातील विषय महत्त्वाचा जरी असला तरी त्याबद्दल मी तुला परत सांगणार नाही.

इथे मी बंगालच्या अतिशय दुर्गम भागात आहे आणि माझ्या जीवनातील अतीशय कठीण कार्य करण्याचा प्रयत्न करत आहे. आज मी जसा काळोखात आहे तसा पूर्वी मी कधीही नव्हतो. आणि हा काळोख काही बाहेरून आलेला नाही. तो माझ्या मर्यादांमधून निर्माण झालेला आहे. अहिंसेवरील माझी श्रद्धा कधीही इतकी प्रखर नव्हती परंतु  तरीही तिच्यासंबंधीच्या माझ्या तंत्रात कुठे तरी उणीव आहे असे मला वाटते. मला वाटते की मी अज्ञात प्रदेशातून मार्गाचा शोध घेत चाललो आहे.

तुला बहुधा माहीतच असेल की माझा उपवास सध्या तरी टळला आहे. बिहार आता शांत आहे आणि मी आता नेहमीचा आहार घेऊ लागलो आहे. हे खरे की त्याबद्दल मला सावधगिरी बाळगावी लागते. मला जो शारीरिक थकवा आला होता, आणि आहारात प्रथिने, स्निग्ध पदार्थ आणि पिष्टमय पदार्थ नसल्यामुळे तो येणे अपरिहार्य होते, तो लवकरच निघून जाईल अशी आशा आहे. या अल्पाहाराचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असे आहे की तसा आहार घेऊनही मी माझे मानसिक काम पूर्णपणे करू शकत होतो, आणि शारीरिक काम बऱ्याच प्रमाणात करू शकत होतो.

अमृत युरोपमध्ये असतानाच जर हे पत्र पोहोचले तर कृपाकरून तिला सांग की मला तिची सर्व पत्रे मिळाली आहेत, परंतु मी तिच्या पत्रांचे उत्तर मुद्दाम दिलेले नाही. मला वाटत होते की ती लवकरच परतणार आहे व जिथे जवळपास नाव घेण्यासारखे पोस्ट ऑफिस वा तार ऑफिस सुद्धा नाही अशा दुर्गम ठिकाणी मी राहत असल्यामुळे तिला माझी पत्रे मिळू शकणार नाही अशी भीती मला वाटत होती. यामुळे स्वाभाविकपणे दिल्लीतील हालचालींच्या संपर्कात मी नाही. येथील माझे कार्य यशस्वीपणे संपले तर पुढील कार्याकरिता

मला पुरेशी शक्ती मिळेल. ते काहीही असले तरी या दोन समुदायांमध्ये विश्वास आणि मैत्री निर्माण होईपर्यंत मला स्वतःला इथेच गाडून घ्यायचे आहे. बंगाल हिंदुस्थानच्या मर्मस्थानी असल्यामुळे जे इथे घडेल ते संपूर्ण हिंदुस्थानात घडेल.

स्नेह,

बापू

फोटोप्रतीवरून. जी. एन. १५२७

-----------------

# १५७. इवॅान प्रिवा यांना पत्र

पत्रोत्तराचा पत्ता -

सेवाग्राम, वर्धा मार्गे,

श्रीरामपूर शिबीर,

डिसेंबर ५, १९४६

प्रिय भक्ती,

मला तुझे फार चांगले पत्र मिळाले. तुला 'हरिजन' मुळीच मिळत नाही याचा मला खेद होतो. मी चौकशी करत आहे. विदेशी भागात हरिजन पाठवण्यासंबंधी कदाचित काही कायदेशीर अडचणी असतील. संचालकांनी तुझ्या प्रतीकडे दुर्लक्ष करणे मी समजू शकत नाही.

प्यारेलालजी सांगत होते की आनंदने (एडमंड प्रिवा, इवॅान प्रिवाचे पती) संपादित केलेला पेपर आला आहे.

हं, नवीन व्यवस्थेत सर्व सहकाऱ्यांना नोआखालीच्या वेगवेगळ्या भागात पाठवण्यात आले आहे.

तुझ्याबरोबरच मलाही आशा आहे की कधी ना कधी आपण भेटूच. कसे, केव्हा आणि कुठे हे केवळ ईश्वरालाच माहीत. मी तुला 'बेब्ज इन वुड' म्हणालो असल्याचा प्रसंग मला आठवतो, माझ्याकरिता तुम्ही सर्व लोक तसेच असाल.

तुम्हा दोघांना स्नेह,

बापू

१, ऍव्हेन्यू, द ला गार,

न्यूचॅटेल,

स्वित्झर्लंड.

फोटोप्रतीवरून. जी. एन. ८८०२

------------

# १५८. नाराणदास गांधी यांना पत्र

श्रीरामपूर, नोआखाली,

डिसेंबर ५, १९४६

चि. नाराणदास,

तुझ्या पत्राचे उत्तर देणे आवश्यक आहे. मी माझा नेहमीचा आहार घेऊ लागलो आहे. यामुळे आता काळजी करण्याचे मुळीच कारण नाही. खरे सांगायचे तर विचारशील जीवन असेल तर काळजीचे कोणतेही कारण नसते. माझ्या जीवनात आतापर्यंत मी जे कोणते कार्य हातात घेतले त्यातील हे सर्वात कठीण कार्य आहे. "रात्रीच्या घनघोर काळोखात मला माझा हातसुद्धा दिसू शकत नाही. तुझ्या या मुलाला तुझ्या संरक्षक कडेवर घे. माझ्या जीवनाचा मार्ग प्रकाशित कर." या ओळी (नरसिंहराव दिवेटिया यांनी "लीड काईंडली लाईट" चा प्रेमळ ज्योती या शिर्षकाखाली केलेला गुजरातीतील अनुवाद.") म्हणण्याचा मला शंभर टक्के अधिकार आहे. अशा काळोखाचा अनुभव माझ्या जीवनात यापूर्वी मला कधीही आला नाही, आणि रात्र कधीही संपतच नाही असे वाटते. समाधान इतकेच आहे की मी पराभव कधीही स्वीकारत नाही वा निराश कधीही होत नाही. त्याची इच्छा असेल तसे होईल.

मला इथे करायचे वा मरायचे आहे. "करायचे" म्हणजे हिंदू आणि मुसलमानांमध्ये ऐक्य निर्माण करणे; वा त्या प्रयत्नात मरण पत्करायचे.  ही गोष्ट साध्य करणे कठीण आहे. परंतु ईश्वर करील तसे होईल.

या अग्निकुंडात आपली आहुती देण्याची तयारी सर्व कार्यकर्त्यांनी स्वतःहोऊन दाखवली आहे, परंतु त्यांना त्याचा पश्चात्ताप होत असेल तर ते जाण्याकरिता मोकळे आहेत. त्यांना प्रत्येकाला एकेका खेड्यात ठेवण्यात आले आहे आणि त्यांच्या मदतीकरिता त्यांच्याबरोबर एकेक बंगाली दुभाष्या आहे.

या योजनेचा भाग म्हणून कनियोसुद्धा माझ्यापासून दूर आहे आणि आभासुद्धा. मी अंतर्भागातील एका खेड्यात माझी छावणी टाकली आहे. भाषेच्या अडचणीमुळे परशुरामला एकट्याला कुठेच ठेवता येत नसल्यामुळे तो माझ्याबरोबर आहे. तो शांत कार्यकर्ता आणि उत्तम लघुलिपिक आहे. दुसरे एक बंगाली प्राध्यापक आहेत. दोघेही माझी व्यक्तिगत सेवासुद्धा करतात. इतर सर्व माझ्यापासून दहा मैलांच्या अंतरावर आहेत. जेव्हा केव्हा आवश्यकता पडेल तेव्हा ते मला येऊन भेटू शकतात. प्यारेलाल, सुशीला नाय्यर आणि सुशीला पै हेसुद्धा वेगवेगळ्या गावात काम करत आहेत. कनियोला एक दिवस ताप आला होता. आता तो

चांगला आहे. काळजीचे कारण नाही. तो स्वतःच खूप आनंदात आहे. तो रामधूनचे संचालन करतो आणि निर्भयपणे वागतो. ईश्वराने त्याला छान प्रकृतीचे वरदान दिले आहे. आभा एकदम सुरक्षित आहे. ती बापांबरोबर गेली आहे. ती १६ मैल अंतरावरील गावात आहे. कनियोला ही व्यवस्था आवडली. बापा तिच्यात फार लक्ष घालतात आणि तिच्या सेवाभावनेवर ते फार खुश आहेत. ती त्यांच्याकरिता भाकरी बनवते आणि तिला बंगाली येत असल्यामुळे ती बंगाली स्त्रियांमध्ये मिसळते. तिला माझ्यापासून दूर जावेसे वाटत नव्हते. मलासुद्धा तिची सेवा आवश्यक वाटू लागली होती. परंतु माझ्या या कठीण साधनेत मला इतरांकडून सेवा घेण्याची सवय कशी परवडू शकेल? आता तुझ्या लक्षात येईल की इथे टाकण्यात आलेले प्रत्येक पाऊल धर्मानुसार टाकण्यात आलेले आहे. जे काही घडत आहे त्याचा तिथे प्रत्येकाला आनंद झाला पाहिजे. आता मी भरपूर लिहिले आहे. तू तुझे काम कर.

आशीर्वाद,

बापू

गुजराती मायक्रोफिल्मवरून. एम. एम. यू. ।२. शिवाय सी. डब्ल्यू. ८६३७. सौजन्य - नाराणदास गांधी

------------------

## १५९. अमतुस्सलाम यांना पत्र

डिसेंबर ५, १९४६

बेटी अमतुल सलाम,

काल तू अजूनच थोडी समंजस झाली असशील. जीवन विचारपूर्ण असले पाहिजे. विचार न करता जगलेले जीवन निरर्थक असते. यामुळे रेहानाचे (रेहाना तैय्यबजी) हे पोस्टकार्ड मी तुझ्याकडे पाठवत आहे. तुला जेव्हा वेळ मिळेल तेव्हा तिला दोन शब्द लिही. मी तिला लिहीत नाही.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५४२

----------------

# १६०. हिंदू महासभेच्या पुढाऱ्यांशी चर्चा

(निर्मल कुमार बोस स्पष्ट करतात : "हिंदू महासभेचे अध्यक्ष आणि सचिव निर्मल चंद्र चटर्जी आणि देवेंद्रनाथ मुखर्जी, नोआखालीतील दंगलीचे पहिले बळी सुरेन बोसचे भाऊ नरेन बोस,आणि इतर काही लोकांची गांधीजींशी ४५ मिनिट चर्चा झाली. सुरक्षिततेच्या दृष्टीने हिंदूंना मुसलमानांपासून वेगळे ठेवण्यासंबंधी ती चर्चा होती.")

डिसेंबर ५, १९४६

तुम्ही सुऱ्हावर्दींच्या दृष्टीतून पाहा; तुम्हाला वाटते काय की त्यांना ही गोष्ट पसंत पडेल, वा नोआखालीतील मुसलमानांना ती आवडेल? त्याचा अर्थ युद्धाकरिता तयारी असा केला जाईल. परंतु तुम्हाला हीच एकमेव व्यावहारिक योजना आहे असे वाटत असेल तर हीची अंमलबजावणी सुरू करा.

माझ्याबद्दल बोलाल तर माझा मार्ग वेगळा आहे. मी तर सर्व दृष्टींनी आणि सर्व प्रकारे बंगालीच झालो आहे. आज निर्मल बाबू माझे कान आहेत, माझे त्यांच्याशिवाय भागू शकत नाही, परंतु मला जेव्हा पुरेशी बंगाली येईल तेव्हा ते जाण्याकरिता मोकळे होतील.

नंतर त्यांनी स्वतःची योजना समजावून सांगितली - ते म्हणाले की मी एकेका खेड्यात एकेक कार्यकर्ता ठेवला आहे आणि आवश्यकता असेल तर त्याच्याबरोबर एक दुभाष्या दिला आहे. त्यांनी "त्या गावातील लोकांची मने जिंकायची आहेत", त्यांना निर्भय करायचे आहे. खेड्यात एक हिंदू आहे की अनेक याला महत्त्व नाही. माझे त्यांना इतकेच म्हणणे आहे की आपल्या ठिकाणाला चिकटून राहा आणि आवश्यकता पडली तर धैर्याने स्वतःहोऊन मरायचीही तयारी ठेवा. तुम्ही जर तुमच्याच समुदायात राहाल तर तुम्ही मुस्लिम लीगचा द्विराष्ट्र सिद्धांत मान्य कराल.

गांधीजी पुढे म्हणाले - जर स्थलांतर करायचेच असेल तर ते पूर्ण असले पाहिजे. मी पाकिस्तानचा स्वतःहोऊन समर्थक होऊ शकत नाही. मला पाकिस्तान न होऊ देण्यात जरी अपयश आले आणि सर्व हिंदू येथून निघून गेले तरी मी एकटाच इथे राहीन; आणि माझ्या धार्मिक आचरणात कोणताही बदल करणार नाही.

निर्मल बाबू म्हणाले की आतापर्यंत कोणालाच तुमचा सल्ला मान्य झालेला नाही कारण तुमची योजना सर्वसामान्य माणसाच्या आवाक्याबाहेरील आहे.

गांधीजी उत्तर देताना म्हणाले - काही लोक जर अशा प्रकारे मरतील तर काहींचे अनेक होतील. सामान्यपणे समजले जाते तसा मी स्वप्नाळू नाही. मी आदर्शवादी आहे, परंतु व्यावहारिक आदर्शवादी आहे. मी

हिंदू म्हणून जन्माला आलो आहे आणि हिंदू म्हणूनच मरणार आहे, एक कर्मठ हिंदू म्हणून. माझ्याकरिता जर मुक्ती असेल तर ती हिंदू म्हणूनच असायला पाहिजे. हिंदू धर्माने सर्व धर्मातील उत्तम आत्मसात केले आहे आणि अजूनही अशा प्रकारे आत्मसात करून घेण्याकरिता हिंदू धर्मात वाव आहे.

बंगालच्या कारणाकरिता वाहून घेतल्याबद्दल निर्मल बाबूंनी त्यांचे आभार मानले. आभार मानत असताना तुम्ही असे करून फार कृपा केली अशा आशयाचे निर्मल बाबू काही तरी म्हणाले. यावर ताबडतोब गांधीजी म्हणाले की यात कृपेची कोणतीही गोष्ट नाही आणि असेल तर ती माझ्या स्वतःवरच कृपा आहे.

ते म्हणाले - माझा सिद्धांत अपयशी होत आहे. मला अपयशी म्हणून मरायचे नाही तर यशस्वी माणूस म्हणून मरायचे आहे.

माय डेज विथ गांधी, पृष्ठ ९६-७

-------------

# १६१. घनश्यामदास बिर्ला यांना पत्र

डिसेंबर ६, १९४६

चि. घनश्यामदास,

मला तुझे २ डिसेंबरचे पत्र मिळाले आणि राजेंद्र बाबूंचेही. तू  जे लिहिले ते संयुक्तिक आहे. परंतु वाईटाचा हा प्रतिकार प्रामाणिक नाही. आपण जर जंगलाचा कायदा मान्य केला तर आपण संपूर्ण डाव गमावून बसू असे मला म्हणायचे आहे. एखादा माणूस हिंसेला प्रतिहिंसेने उत्तर देऊ शकतो. परंतु ती प्रतीहिंसा पाशवी असू शकते वा सुसंस्कृत आणि प्रभावी असू शकते. बिहारमध्ये जे घडले ते पाशवी आणि प्रभावशून्य होते. आणि हीच गोष्ट गढमुक्तेश्वरचीही आहे. अशा बाबतीत महाभारत आणि भागवतमधील उदाहरणे आपल्याला चुकीच्या मार्गाने नेऊ शकतात. आपले जीवन म्हणजे आपल्या लोकांचा मार्ग विचारपूर्ण आणि शिस्तबद्ध असला पाहिजे. माझे प्रयत्न त्या दिशेने आहेत, परिणाम ईश्वराच्या हातात आहेत. मी राजेंद्र बाबूंना वेगळे लिहीत नाही.

माझ्या प्रकृतीची काळजी करू नको. मी तिची चांगली काळजी घेतो आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. सी. डब्ल्यू. ८०८४

--------------

# १६२. प्रार्थना प्रवचन

("श्रीरामपूर डायरी"मधून उद्धृत)

डिसेंबर ६, १९४६

**प्रार्थनेनंतर बोलताना गांधीजी म्हणाले की खऱ्या प्रार्थनेचा प्रतिसाद मिळाल्याशिवाय राहू शकत नाही. याचा अर्थ असा नाही की ईश्वराला आपण जे काही मागतो ते तो आपल्याला तत्परतेने देतो. आपण जेव्हा जाणीवपूर्वक प्रयत्न करून आपला स्वार्थ सोडतो आणि नम्रपणाने ईश्वराला काही मागतो तेव्हा तो आपल्या प्रार्थनेला प्रतिसाद देतो.**

**आश्रमाच्या प्रार्थनेत काहीही मागत नसतात. आम्हांला चांगला माणूस बनव इतकीच प्रार्थना आपण ईश्वराला करत असतो. प्रार्थना खरोखरच अंतःकरणातून बाहेर पडली तर ईश्वराच्या कृपेचा प्रसाद आपल्याला मिळाल्याशिवाय राहणार नाही. त्याच्या इच्छेशिवाय गवताचे पातेसुद्धा हालत नसते. एकही असा खरा विचार नसतो की जो आपल्या चारित्र्यावर आपला प्रभाव पाडत नाही. यामुळे दररोज प्रार्थना करण्याची सवय लावणे हीच चांगली गोष्ट आहे.**

हरिजन, जानेवारी ५, १९४७

-----------------

# १६३. प्रार्थना प्रवचन

श्रीरामपूर,

डिसेंबर ७, १९४६

**गांधीजींनी एका मुसलमानाने लिहिलेल्या लेखनाचा उल्लेख केला. या लेखकाने दावा केला होता की जी व्यक्ती ईश्वरभक्त असते ती आपल्या आत्मसन्मानाकरिता वा धर्माकरिता मरण्याची वा आपल्या संपत्तीच्या नुकसानीची पर्वा करत नसते. ईश्वराने आपल्याला जीवन दिले आहे आणि तो ते परतही घेऊ शकतो. ही शिकवण वैश्विक आहे आणि ती हिंदू आणि मुसलमानांना सारखीच लागू होते. जे लोक ईश्वराला शरण जातात ते भीतीपासून मुक्त होत असतात. दोन्ही समाजात कायम मैत्री होऊ शकते. इतक्या दिवसांपासून श्रोत्यांच्या कानात हाच संदेश सांगण्याचा मी प्रयत्न करतो आहे. एक काळ असा होता की जेव्हा मुसलमानसुद्धा माझे ऐकायचे; परंतु आता परिस्थिती बदलली आहे आणि आता हिंदूंमध्येसुद्धा फारसे असे लोक नाहीत की जे माझ्या शिकवणुकीचे अनुसरण करतील. परंतु कोणत्याही समाजाचे असले तरी लोक जेव्हा ईश्वर सोडून अजून कशालाही घाबरणार नाहीत तेव्हाच कायम टिकणारी शांतता निर्माण होईल याबद्दल माझी खात्री आहे.**

'हरिजन', जानेवारी ५, १९४७

------------

# १६४. प्यारेलाल यांना पत्र

सायंकाळी ८ वाजून २० मिनिटांनी,

डिसेंबर ७, १९४६

चि. प्यारेलाल,

मला तुझे पत्र आणि वर्णनही मिळाले. वर्णन चांगले आहे. त्याने माझे अंतःकरण हेलावले. हे खरे आहे की आपण सर्व जितक्या लवकर बंगाली शिकू तितके चांगले होईल. काम कठीण आहे यावर माझा नेहमीच विश्वास होता. माझ्या जीवनात या कामाइतके दुसरे कोणतेही काम कठीण नव्हते. ईश्वराची इच्छा असेल तर आपण टिकू. जाणूनबुजून धोका पत्करण्याची आवश्यकता नाही. जे समोर येईल त्याला तर तोंड द्यावेच लागेल. मला वाटते की तू त्या ठिकाणी जरी गेला नसतास तरी हरकत नव्हती. परंतु तू तिथे गेला म्हणून काही बिघडले नाही. आपण सर्वच आपले कर्तव्य पत्करत असताना मरू या. सुशीला माझ्या बाजूला बसलेली आहे. आपण मंगळवारी भेटू.

आशीर्वाद,

बापू

महात्मा गांधी - द लास्ट फेज, खंड १, भाग २, पृष्ठ ६५

--------------

# १६५. एक पत्र

(बातमीप्रमाणे हे कलकत्त्यातील एका व्यक्तीच्या उत्तराप्रित्यर्थ लिहिलेले होते.

“गांधीजी नोआखालीत जे काम करत होते त्यासंबंधात पत्रलेखकाने पत्र लिहिले होते.”)

श्रीरामपूर (नोआखाली),

डिसेंबर ८, १९४६

तुम्ही माझ्या ज्या कामाचे “अतुलनीय काम” म्हणून वर्णन करता ती वास्तवात अहिंसाधर्माच्या सिद्धांताची स्वाभाविक आणि तर्कसंगत निष्कर्षाची फलश्रुती आहे. माझ्याकरिता ही गोष्ट प्राणासारखी आहे.

हिंदुस्तान स्टॅन्डर्ड, डिसेंबर १२, १९४६

# १६६. प्रार्थना प्रवचन

(हा गांधीजींचा मौन दिवस असल्यामुळे हे भाषण वाचून दाखवण्यात आले होते.)

श्रीरामपूर,

डिसेंबर ८, १९४६

**गांधीजी म्हणाले की एका मित्राने मला महम्मद पैगंबर यांच्या वचनांचे पुस्तक पाठवले होते. मला जेव्हा केव्हा काही मिनिटांचा वेळ मिळतो तेव्हा मी ते पुस्तक चाळतो. आज मी तुमच्याकरिता त्या पुस्तकातील काही वचन निवडण्याचा प्रयत्न केला आहे. इथे हिंदू आणि मुसलमान बंधू हे दोघेही गोळा झालेले आहेत आणि ही वचने अशी आहेत की जी वाचल्यानंतर हिंदू आणि मुसलमान या दोघांनीही त्यांचे अनुसरण केले पाहिजे.**

**माणूस जर या वचनांना अनुसरेल तर सर्व प्रकारची भांडणे संपतील. आपल्यामध्ये मतभेद असले आणि आपल्या धार्मिक श्रद्धा वेगवेगळ्या असल्या तरी आपण चांगल्या शेजाऱ्यांप्रमाणे राहायला पाहिजे. आता मी तुम्हाला या पुस्तकातील दोन वचनांचा अनुवाद करून सांगतो. अब्दुल्ला अलमैमून अलशुआ नववर्दीच्या या मूळ पुस्तकात पहिले वचन आहे : "कृतीचे मूल्यन हेतूवरून होत असते." दुसरे वचन आहे : "स्वतःकरिता माणूस ज्याची इच्छा करील तीच इच्छा जर तो आपल्या भावाकरिता करणार नाही तर तो पाखंडी असेल."**

द बॉम्बे क्रॉनिकल, डिसेंबर ११, १९४६

-------------

# १६७. डायरीतील नोंदी

डिसेंबर ८, १९४६

माझे मौनव्रत अगदी वरवरचे आहे असे मला वाटते. मौन ही फार मोठी कला आहे, ती काही साधी गोष्ट नाही.

महात्मा गांधी - द लास्ट फेज, खंड १, भाग २, पृष्ठ ४० (महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड २, पृष्ठ ५०ः

-------------

# १६८. देवभानकर यांना मुलाखत

(देवभानकर, श्रीधर पुरुषोत्तम लिमये आणि भद्री, जिल्हा प्रतापगढचे राजा राय बजरंग बहादूर हे लोक कृपलानी, मृदुला साराभाई आणि राम मनोहर लोहिया यांची पत्रे घेऊन आले होते.)

डिसेंबर ९, १९४६

मुसलमानांना आपल्या बाजूने करून त्यांना काँग्रेसमध्ये कसे सामील करून घेता येईल आणि जर असे करता येत नसेल तर या उद्दिष्टाच्या परिपूर्तीकरिता वर्गसिद्धांतावर आधारित एखादे आर्थिक आंदोलन सुरू करणे उचित राहील काय असे देवभानकर यांनी विचारले. गांधीजींनी उत्तर दिले की ज्या लोकांची सांप्रदायिक भावना फार प्रबळ असते त्यांच्याबाबतीत अशा प्रकारचे आंदोलन आतापर्यंत यशस्वी झालेले नाही. यामुळे आपण काँग्रेसचे एखाद्या हिंदू सांप्रदायिक संघटनेत रूपांतर होऊ द्यायला नको. जो कोणी हिंदुस्थानला आपले घर मानले असेल त्याला काँग्रेसने संरक्षण दिले पाहिजे. हिंदुस्थान केवळ आपल्याकरिता आहे असा विचार हिंदूंनी कधीही करू नये. पारसी लोक शतकांपूर्वी आले होते तर सिरियन ख्रिश्चन सेंट थॉमसच्या काळापासून ख्रिश्चन होते. यांतील प्रत्येकाला आपण हिंदुस्थानी समजलो पाहिजे आणि त्यांना इतर कोणत्याही हिंदुस्थानींप्रमाणेच अधिकार असले पाहिजे.

परंतु काँग्रेसने मुसलमानांचे अकारण तुष्टीकरण वा खुषामत करायला नको. हे खरे आहे की अशा प्रकारचे काही करण्यात आले आहे, आणि अशा वर्तनाकरिता मीच जबाबदार आहे असे कोणी म्हणाले तर ते चूकच असेल असे नाही. परंतु आता माझे डोळे उघडले आहेत आणि मी मान्य करतो की तसे करण्यात शहाणपणा नव्हता. प्रत्येक व्यक्तीच्या योग्य हिताची जपणूक करूनच काँग्रेसचे लोक राष्ट्रवादाबद्दलचे आपले प्रेम खरे असल्याचे सिद्ध करू शकतात. काँग्रेसमध्ये केवळ हिंदू असले तरी मला त्याचे काही वाटणार नाही. कॉंग्रेसी इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा संपूर्ण देशाचे हित डोळ्यासमोर ठेवत असतील तर त्यांचा आदर्शवाद अखेरीस सांप्रदायिकतेवर विजय मिळवल्याशिवाय राहणार नाही.

बंगालमध्ये मुसलमानांनी आणि बिहारमध्ये हिंदूंनी आतापर्यंच ज्या हिसेचे दर्शन घडवले ती भ्याडपणाने भरलेली हिंसा होती; त्यात नाममात्रही शौर्य नव्हते. ज्या लोकांचा अहिंसेवर विश्वास नाही त्यांना मी बदला घेण्याचा अधिक सुसंस्कृत मार्ग सुचवतो आहे. हा मार्ग त्या मार्गापेक्षा किती तरी श्रेष्ठ आहे. परंतु त्ते त्या मर्गाचे अनुसरण करण्याचे अपराधी आहेत. कल्पना करा की बिहारमध्ये असे शासन आहे की ज्याचा

हिंसेवर विश्वास आहे, अहिंसेवर नाही. त्यांनी मग कलकत्त्याच्या दंगलींनंतर पूर्व बंगाल सरकारला लिहिले असते, 'आता इथे असे लोक राहत आहेत की जे कलकत्त्याहून आलेले आहेत. ते संतापलेले आहेत आणि बिहारमधील १४ टक्के मुसलमानांवर बदला घेण्याकरिता उत्सुक आहेत. परंतु आम्ही त्यांना तसे करण्यापासून शक्य तितके परावृत्त करण्याचा प्रयत्न करत आहो. मध्यंतरीच्या काळात बंगालमध्ये अजूनही सुरू असलेल्या दंगली थांबवण्याकरिता तुम्हाला जे काही करता येणे शक्य असेल ते तुम्ही करावे.'

बंगालमधील मुस्लिम लीग सरकारला असे पत्र पाठवत असतानाच बिहार सरकार दंगली शमवण्याकरिता जे प्रयत्न करत असेल त्यांची माहिती आपल्या प्रांतातील मुसलमानांना देत राहील. बंगालमधील परिस्थितीत तरीही सुधारणा झाली नाही तर बिहारमधील मुसलमानांची इथे कत्तल होऊ नये म्हणून असे म्हणा की आठ दिवसात स्वतःहोऊन मुसलमान बिहार सोडून गेले नाही तर आम्ही त्यांना बळजबरीने बंगालमध्ये पाठवू असे पत्र बिहार सरकार बंगालमधील मुस्लिम लीग सरकारला लिहील. आणि जेव्हा आठ दिवस संपतील तेव्हा बिहारमधील मुसलमानांना बाहेर काढण्याकरिता आवश्यक पावले उचलील.

शक्य आहे की बिहारमधील मुसलमान बाहेर जाण्याकरिता नकार देतील आणि आणि बंगालमध्ये मुस्लिम लीग सरकार ज्या धोरणाचा अवलंब करत आहे त्या धोरणाबरोबर आम्ही नसून बिहारमधील काँग्रेस सरकारबरोबर आहो असे म्हणतील. असे झाले असते तर काँग्रेसचा केवळ बिहारमध्येच नाही तर त्या प्रांतातही विजय झाला असता जिथे काँग्रेसचे सरकार नाही.

बिहारचे आज जे पतन झाले आहे त्यापेक्षा अशी कृती करणे, ती पूर्णपणे हिंसक असली तरी, अधिक चांगले राहिले असते. भ्याडपणाचे हिंसक वर्तन जेव्हा केले जाते तेव्हा त्याच्या राजकीय उद्दिष्टाची परिपूर्ती तर होतच नाही उलट त्यामुळे आपले पतन होते.

अखेरीस गांधीजी म्हणाले की सध्या तरी मी केवळ माझ्याकरिता एका अहिंसक उपायाचा शोध घेत आहे. सामूहिक पातळीवर लागू करता येईल अशा अहिंसक उपायाचा शोध घेणे मी थांबवले आहे. सध्याच्या संकटात अहिंसा यशस्वी होते की नाही हेसुद्धा मला पाहायचे आहे. मी अपेक्षा करतो की दोन महिन्यांच्या आत परिस्थिती कोणते तरी निश्चित वळण घेईल, आजप्रमाणे ती अनिश्चित राहणार नाही.

'माय डेज विथ गांधी', पृष्ठ १०२-४

---------------

# १६९. प्रार्थना प्रवचन

श्रीरामपूर,

डिसेंबर ९, १९४६

**आपल्या लहानशा भाषणात गांधीजी म्हणाले की सकाळी आणि सायंकाळी असे दिवसातून कमीतकमी दोन वेळा तरी रामनाम घेणे तुमचे कर्तव्य आहे. तुम्ही अडचणीच्या आणि संकटाच्या वेळी जसे रामनाम घ्यायला पाहिजे त्याचप्रमाणे तुम्ही जेव्हा शांततापूर्ण वातावरणात कोणाचीही भीती मनात न बाळगता जीवन जगता तेव्हाही तुम्ही रामनाम घ्यायला पाहिजे. तुम्ही रामनामाचा जप केल्यामुळे मला फार आनंद होतो.** (वृत्ताप्रमाणे : “. . . नोआखालीतील दंगलीनंतर श्रीरामपूर आणि शेजारच्या कमरदिया गावातील लोकांनी एका सुरात रामनामाचा जप करण्याचे साहस केले. . . .”).

‘हिंदुस्तान स्टॅन्डर्ड, डिसेंबर १२, १९४६

----------------

# १७०. स्त्रियांशी चर्चा

(“श्रीरामपूर डायरी”मधून. सुत्राप्रमाणे सायंकाळी गांधीजी फिरायला गेले असताना “भातशेताच्या कोपऱ्यावर त्यांना बऱ्याच स्त्रिया भेटल्या. . . त्यांनी गांधीजींना आपली दुःखद परिस्थिती आणि सध्या त्या ज्या परिस्थितीत राहत होत्या त्या परिस्थितीची माहिती सांगितली.”)

श्रीरामपूर,

[डिसेंबर १०, १९४६] (डिसेंबर १२, १९४६च्या हिंदुस्तान स्टॅन्डर्डवरून)

गांधीजी त्यांना म्हणाले की नोआखालीत आल्यापासून मी तुम्हाला सतत निर्भय होण्याकरिता सांगतो आहे. तुम्ही जर त्याप्रमाणे वागला आणि निर्भय होऊन तुम्ही तुमचे काम करत असाल तर तुम्ही शांततेत राहू शकाल.

आकाशाकडे बोट दाखवत गांधीजी म्हणाले : त्याच्यावर विश्वास ठेवा. त्याची प्रार्थना करा आणि केवळ त्याची भीती मनात बाळगा, जगात इतर कोणालाही घाबरू नका.

‘हरिजन’, जानेवारी १९, १९४७

----------------

# १७१. प्रार्थना प्रवचन

श्रीरामपूर,

डिसेंबर १०, १९४६

गांधीजी म्हणाले की हिंदुस्थानातील हिंदू आणि मुसलमान धीर ठेवतील आणि संपत्ती आणि जीव गमावला जाण्याची भीती सोडतील तर हिंदुस्थानचा चेहरामोहरा बदलायला वेळ लागणार नाही. परंतु या सुधारित सामाजिक संबंधाचा पाया निर्भयतेच्या शिळेवर उभारलेला असला पाहिजे; असे करूनच परस्परांवरील खरा विश्वास निर्माण करता येईल. गेल्या रविवारी महम्मद पैगंबर यांचे जे वचन गांधीजींनी उद्धृत केले होते ते परत सांगत गांधीजी म्हणाले की प्रत्येक धर्मात आध्यात्मिक अनुभवाचा सर्वांना उपभोग घेता येईल असा निधी असतो. जगातील प्रत्येक धर्माला ही गोष्ट लागू होते.

जो काही भेद आपल्या डोळ्यांनी दिसतो तो त्या युगाच्या व स्थळाच्या मर्यादांमुळे निर्माण झालेला असतो. खरे पाहता जगातील कोणत्याही दोन माणसांच्या गरजा पूर्णपणे सारख्या नसल्यामुळे जगात जितके लोक आहेत तितकेच त्यांचे धर्म आहेत. असे असूनही प्रत्येक धर्मातील सामान्य तत्त्वांकडे लक्ष वेधले गेल्याशिवाय राहू शकत नाही. झाडाचा बुंधा एकच असतो, शाखा अनेक असतात आणि पाने असंख्य असतात आणि त्यातील कोणत्याही दोनमध्ये संपूर्ण साम्य कधीही नसते; धर्माच्या बाबतीत तर ही गोष्ट अजूनच प्रकर्षाने जाणवते.

आज कोणताही धर्म निर्दोष नाही. इस्लामने अनेक श्रेष्ठ व्यक्तींना जन्म दिला आहे आणि अशा अनेक लोकांना मी माझे मित्र म्हणू शकतो की ज्यांची समाजात प्रतिष्ठा आहे. परंतु इस्लामच्या आचरणात अनेक अशा गोष्टी निर्माण झाल्या आहेत की ज्या धर्माच्या मूलभूत सिद्धांताच्या विपरीत आहेत.

याचप्रमाणे येशूने आपल्या शत्रूवरही प्रेम करा असा उपदेश मानवसमाजाला केला होता. परंतु त्याच येशूचे अनुयायी असलेले ख्रिश्चन देश या पिढीतील अशा दोन महायुद्धांकरिता जबाबदार आहेत की ज्यांच्यामुळे या जगात अपार विध्वंस झाला आणि ज्याने आपल्यामागे संशय, घृणा आणि हिंसा याचे असे वातावरण सोडले की ज्यामुळे जग आजही पीडीत आहे.

हिंदुस्थानातसुद्धा धर्माच्या नावावर राक्षसी अन्याय करण्यात आलेले आहेत. आपल्या तथाकथित अस्पृश्य बांधवांची आपण अशी अवस्था केली आहे की जी मानवी प्रतिष्ठेच्या अगदी विपरीत आहे. अमेरिकेतील संयुक्त राष्ट्रसंघाच्या सभेत विजयालक्ष्मी पंडित यांनी दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्थानी लोकांना न्याय मिळावा म्हणून मागणी केली असताना सेनापती स्मट्स यांनी आपल्यावर हाच आरोप केला होता.

आपल्या भाषणाचा समारोप करत गांधीजी म्हणाले की हिंदू आणि मुसलमान रक्ताच्या भावंडांसारखे आहेत. याच भूमीतून निर्माण झालेल्या अन्नावर त्यांचे पोषण झाले आहे, याच नद्यांचे पाणी पिऊन त्यांनी आपली तहान शमवली आहे

**आणि याच भूमीत अखेरीस त्यांनी चिर विश्रांती घेतली आहे. तुम्ही जर ईश्वराला घाबराल तर तुम्हाला इतर कोणालाही घाबरण्याची गरज पडणार नाही.**

'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', डिसेंबर १२, १९४६

-------------

# १७२. प्रश्नोत्तरे

(“श्रीरामपूर डायरी”मधून उद्धृत. मद्रासच्या वर्तमानपत्राच्या वार्ताहराने प्रश्न विचारला होता. )

[डिसेंबर ११, १९४६ला वा त्यानंतर]

(‘हिंदुस्तान स्टॅन्डर्ड’मध्ये “श्रीरामपूर, डिसेंबर ११” या तारखेअंतर्गत प्रकाशित झालेल्या वृत्तावरून.)

**प्रश्न - तुमची येथील उपस्थिती हे आपल्यावर आणण्यात आलेले एक प्रकारचे दडपण आहे असे बंगालच्या मंत्र्यांना वाटणार नाही काय आणि निर्वासितांच्या पुनर्वसनाकरिता न्यायभावनेने प्रेरित होऊन त्यांनी जे काही स्वतःहोऊन केले असते ते तुमच्या दडपणामुळे ते करत आहे असा समज तुमच्या येथील उपस्थितीमुळे होणार नाही काय?**

उत्तर - पहिली गोष्ट म्हणजे तुमचा समज निराधार आहे. परंतु तो जर तसा नसेल आणि तुम्ही गृहीत धरलेल्या तथ्याप्रमाणे असेल तर तुम्ही काढलेला निष्कर्ष बरोबर असेल आणि माझा येथील मुक्काम अहिंसेनुसार नसेल. घोर अविश्वासाने आणि संशयाने भरलेल्या या वातावरणात माझ्या अहिंसेची सत्त्वपरीक्षा पाहण्याकरिता मी इथे आलेलो आहे.

माझा दावा आहे की मी इथे या भागातील मुसलमानांचा मित्र म्हणून जितका आलो आहे तितकाच हिंदूंचा मित्र म्हणूनही आलेलो आहे. स्वदेशात परतल्यानंतर सुरुवातीच्या दिवसातच चंपारणला मी दिलेली भेट तुम्हाला कदाचित आठवत असेल. निघून जाण्याकरिता मला नोटीससुद्धा देण्यात आली होती. मला करण्यात आलेली शिक्षा तत्कालीन व्हाईसरायच्या आदेशाप्रमाणे रद्द करण्यात आली होती आणि न्यायाधीशाला मला तिथे राहण्याची परवानगी देण्याकरिता आणि मी करत असलेल्या अनधिकृत चौकशीत मदत करण्याचासुद्धा आदेश देण्यात आला होता. परिणामी मला अधिकृत सरकारी स्लाय आयोगाचे (हा संदर्भ चपारण भूमी व्यवस्था आयोगाचा आहे. या आयोगाचे अध्यक्ष फ्रॅन्क स्लाय होते.) सदस्य होण्याकरिता निमंत्रित करण्यात आले आणि शतकांचा अन्याय दूर झाला होता.

हरिजन, जानेवारी १९, १९४७; शिवाय हिंदुस्तान स्टॅन्डर्ड, डिसेंबर १३, १९४६

-------------

# १७३. जयसुखलाल गांधी यांना तार

रामगंज,

डिसेंबर ११, १९४६

जयसुखलाल गांधी द्वारा शेफर्ड महुवा

मनूने माझ्याबरोबर राहावे असे तुला आणि मनूला खरोखरच वाटत असेल तर तुझ्या जोखमीवर तू तिला माझ्याबरोबर राहण्याकरिता आणू शकतो. येण्याची तार खादी प्रतिष्ठान, कॉलेज चौक, कलकत्ता या पत्त्यावर कर.

बापू

मायक्रोफिल्मवरून. एम. एम. यू. ।२४

---------------

# १७४. जि. भ. कृपलानी यांना पत्र

श्रीरामपूर, नोआखाली,

डिसेंबर ११, १९४६

प्रिय प्राध्यापक,

सुचेता तिच्या बहिणीच्या शुश्रूषेकरिता अजूनही कलकत्त्यात आहे. मी तिला सांगितले आहे की जोपर्यंत कलकत्यात बहिणीची काळजी घेण्याकरिता तुझी आवश्यकता आहे असे तुला वाटते तोपर्यंत घाई करू नको. तिने मला वैद्यकीय दाखला पाठवलेला नाही परंतु ती जेव्हा येईल तेव्हा ती मला तो देईल असे तिने तिच्या पत्रातून सांगितले आहे.  प्रकृतीची हेळसांड होईल असे मी तिला काही करू देणार नाही याबद्दल तुम्ही माझ्याकडून निश्चिंत राहा. ती माझ्याबरोबर अगदी सुरक्षित असल्याचे मी पाहीन.

तुमचे काम सोपे नाही. परंतु तुम्ही अथवा मी कल्पना केली होती त्यापेक्षाही ते कठीण आहे. तुम्ही रस्त्यातून ज्या दोन पत्रांच्या प्रती पाठवल्या असे म्हणता त्याबद्दल मी विचार करून राहिलेलो नाही. मला वाटते की ती पत्रे प्रामाणिक आहेत. स्पष्ट आहे की ते समितीचे सदस्य राहिले आहेत. मी जर तुमच्या ठिकाणी असतो तर त्यांनी राहावे म्हणून आग्रह धरला नसता. मी त्यांचा शब्द स्वीकारला असता आणि तुमच्याबरोबर नवीन रक्त दिले असते. मी तर म्हणेन की तुम्हाला जर तुमच्या कल्पनेप्रमाणे संघटनेला उत्तम रूप देता येत नसेल आणि ते तुम्हाला राजीनामा देऊ देत असतील तर तुम्ही क्षणभरसुद्धा विचार न करता तसे करायला पाहिजे. ज्या संघटनेची आपण सेवा करतो केवळ त्या संघटनेचाचाच आपण विचार करायला पाहिजे, इतर कशाचाही नाही. ज्या मित्राने तुमचे आणि सुचेताचे पत्र आणले त्यानेच मृदुलाचेही पत्र आणले. त्यात तिने काँग्रेसकरिता तयार केलेले टिपणही आहे. त्यात दुसरे टिपण गढमुक्तेश्वरच्या अनुभवावर आधारित आहे. तुम्ही दोन्ही पाहिली असतील. मला ते आवडले. काँग्रेस संघटनेसंबंधीचे टिपण मी आजच वाचले. त्यांनी केलेल्या सूचनेने माझी जबरदस्त पकड घेतली. त्यांना भेटीकरिता बोलावून त्यांच्या सर्व प्रस्तावांची त्यांच्याशी चर्चा करावी असा माझा तुम्हाला सल्ला आहे आणि केसकरांप्रमाणेच (बा. वि.. केसकर) ज्या कोणत्या प्रमाणात काँग्रेसला सेवा देणे मान्य करतील त्या प्रमाणात ती मिळेल याची निश्चिती करून घ्या. मला वाटते की त्यांच्या प्रस्तावांची चर्चा जवाहरलाल नेहरूंशी करावी आणि त्यानुसार योग्य तो निर्णय तुम्ही त्यांना घेऊ द्यावा. ते सदस्य राहो वा न राहो मी त्यांच्या निखळ प्रामाणिकपणाबद्दल प्रश्न उपस्थित करणार नाही. त्यांनी सर्व प्रकारे

मदत करण्याचे आश्वासन दिले आहे आणि मला खात्री आहे की ते मदत करतील कारण एरव्ही त्यांना मोकळेपणाने जे करता येत नाही ते त्या आता अधिक कार्यक्षमतेने करतील आणि आता ते कृती करण्याकरिता स्वतंत्र असतील. हिंदू मुसलमान प्रश्नासंबंधीचे विचारसुद्धा बरोबर आहेत. ती अतिशय जटिल समस्या आहे आणि काँग्रेसवर आणि म्हणून तुमच्यावर त्या समस्येची फार मोठी जबाबदारी आहे.

तुम्ही म्हणाला की तुम्हाला मी हवा असेन तर मला निरोप पाठवा. मी असे करण्याची शक्यता नाही. परंतु तुम्हाला माझ्याशी काही सल्लामसलत करायची असेल तर तुमची इच्छा असेल तेव्हा पूर्वसूचना न देता येण्याकरिता तुम्ही स्वतंत्र आहा. व्यक्तिगत पातळीवर मी तर म्हणेन की मला काय वाटते आणि काय वाटत नाही याचा विचार न करता तुमचा विवेक आणि तुमची सदसद्विवेकबुद्धी म्हणेल त्याप्रमाणे तुम्ही करायला पाहिजे. मी माझ्यासमोरील कामात अतिशय व्यग्र आहे आणि इतर कशाचाही विचार करायची मला सवड नाही. तुमच्या पत्राने ज्याप्रमाणे मला हालचाल करायला भाग पाडले तसे कोणते पत्र आले तर गोष्ट वेगळी.

अजूनही माझ्या भोवती काळोख पसरलेला आहे. तो आतून आलेला आहे परंतु अकारण नाही. परंतु त्यांने मी निश्चितच निराश झालेलो नाही. मी आगीतून असा काही होरपळत चाललो आहे की जसा पूर्वी कधीही होरपळलो नव्हतो. तसेच माझ्या कर्तव्यापासून मी पळ काढत नाही या विचाराने मला आनंदही होतो आहे. युगायुगापासून लोक ईश्वराचा आधार घेत आले आहेत आणि मीही त्याच्याच आदाराला बिलगून आहे.

आशीर्वाद,

बापू

आचार्य जि. भ. कृपलानी

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

------------------

# १७५. डायरीतील नोंदी

डिसेंबर ११, १९४६

थकवा काय आहे. … असे वाटत होते की मी पूर्ण जागा आहे. माझ्यासमोर ते आहे असे मला वाटत होते परंतु वास्तवात ते तिथे नव्हते. … दचकून एकदम जाग आली. अंधारात ते (महात्मा गांधी - अखेरचं पर्वमध्ये प्यारेलाल सांगतात की तो परसाकडचा पॉट आहे) शोधण्याचा प्रयत्न करू लागलो. काही मिनिटांनी तो सापडला (प्यालेलाल सांगतात : “सकाळी फिरून आल्यानंतर त्यांना इतका थकवा वाटू लागला की त्यांना अंथरुणावर पडावे लागले. मध्यरात्री केव्हा तरी त्यांना परसाकडला जाण्याची इच्छा झाली.) . . . एरंडिच्या तेलाची एक मात्रा घ्यावी असे वाटले. प्यारेलालला तीनदा हाक मारली. . . . उत्तर नाही. रामनामाचा जप करत झोपण्याचा प्रयत्न केला. अखेरीस डोळा लागला. . . . इतरांना मी सर्व व्याधींवरील रामनामाच्या जपाचा उपाय सांगतो, मग मी त्यावरच पूर्णपणे विसंबून का राहू नये?

‘महात्मा गांधी - द लास्ट फेज’, खंड १, भाग २, पृष्ठ ४१ (‘महात्मा गांधी - अखेरचं पर्व’, खंड २, पृष्ठ ५१)

----------------

# १७६. जग्नेश्वर घोष यांना पाठवलेल्या पत्रातील काही भाग

(निर्मल कुमार बोसनी गांधीजींतर्फे हे लिहिले. ते म्हणतात : "चिनसुरा येथून जग्नेश्वर घोष या व्यक्तीने एक पत्र पाठवले. बंगालची फाळणी करावी कारण या प्रांतातील हिंदू आणि मुसलमान यांची संस्कृती वेगवेगळी आहे व त्यात कोणताही मेळ नाही असे त्यात त्यांनी लिहिले होते.")

**डिसेंबर १२, १९४६**

**तुमची सूचना आहे की एकाच संस्कृतीच्या लोकांना एका ठिकाणी गोळा करून त्यांना एकाच सरकारच्या अंतर्गत ठेवावे. प्रशासनाच्या सोयीकरिता लोकांची गटात वाटणी करावी लागत असते. ही गोष्ट आर्थिक आधारावर वा भाषिक आधारावर चांगली करता येते. गांधीजींचा धार्मिक आधारावर लोकसंख्येचे पुनर्वितरण करण्याच्या गोष्टीवर आक्षेप आहे. याचा अर्थ वेगवेगळ्या धर्माचे लोक एकाच राज्यात मैत्री करून राहू शकत नाहीत असे मान्य करणे. सध्याच्या हिंदू मुसलमानांच्या तणावावर मुस्लिम लीगने हाच उपाय सुचवला आहे. त्या सूचनेनुसार प्रत्येक प्रांतातील अल्पसंख्याकांना शेजारच्या प्रांतातील बहुसंख्याकांच्या चागल्या वर्तनाच्या जामिनाकरिता बंधक म्हणून ठेवले जाईल. ही तर समानता, मैत्री आणि पारंपरिक विश्वासावर आधारित शांतता नसून युद्धाकरिता तयार असलेल्या दोन पक्षांमधील शांतता होईल. हिंदुस्थानचे धार्मिक आधारावर तुकडे करायचे व मग अशा प्रकारच्या कृत्रिम योजनेनुसार लोकांची परत वेगवेगळ्या देशात वाटणी करणे ही गोष्ट गांधीजींच्या मते राक्षसीपणाची होईल. कारण यामुळे भाषिक, सांस्कृतिक आणि सहकार्याच्या ज्या सूत्राने भूतकाळात आपल्या देशातील लोकांना एकत्रित बांधून ठेवले ते सूत्रच या योजनेत तुटून जाईल.**

'माय डेज विथ गांधी', पृष्ठ १०५-६

-----------------

# १७७. रमणी मोहन सेन शर्मा यांना पाठवलेल्या पत्रातील काही भाग

(बहुधा या पत्राचा मजकूर निर्मल कुमार बोस यांनी लिहिला असावा. ते म्हणतात की "रमणी मोहन सेन शर्मा हे नोआखालीतील संद्वीप शहरात चिकित्सक होते". मूळ स्रोतात हे पत्र जग्नेश्वर घोष यांच्या पत्रानंतर ठेवलेले आहे.)

**श्रीरामपूर,**

**डिसेंबर १२, १९४६**

**गांधीजी कोणत्याही निर्वासिताला आपल्या घरी परतण्याचा तेव्हाच सल्ला देऊ शकतात जेव्हा ईश्वरावर पूर्ण विश्वास ठेवून तो तसे करू शकेल. ज्यांच्यात असा आत्मविश्वास नसेल त्यांना परतण्याकरिता कधीही सांगता येऊ शकत नाही.**

**गांधीजींना पूर्णपणे जाणीव आहे की त्यांच्या तोंडातील कोणत्याही शब्दाने कोणामध्येही धीर निर्माण होऊ शकत नाही; यामुळे केवळ आपल्या दुर्बल शब्दाच्या आधारावर ते कोणालाही परतण्याकरिता सांगू शकत नाही. ज्याचा ईश्वरावर पूर्ण विश्वास असेल तोच परतू शकतो.**

माय डेज विथ गांधी, पृष्ठ १०५-६

-----------------

# १७८. जयसुखलाल गांधी यांना पत्र

डिसेंबर १२, १९४६

चि. जयसुखलाल,

आतापर्यंत मला तुझी दोन पत्रे मिळाली आहेत. दुसरे पत्र आजच आले. पहिल्या पत्राच्या उत्तरात मनूने मला तार करण्याकरिता सांगितले होते आणि मी तार केली आणि लिहिले की माझ्या अटीप्रमाणे शेवटपर्यंत माझ्याबरोबर राहण्याकरिता ती तयार असेल तर तू तिला इथे आणून सोडू शकतो.

मला मिळालेल्या दुसऱ्या पत्रात वेगळाच सूर आहे. येथील वातावरण शुद्ध नाही असा तुम्हा दोघांचाही विश्वास असेल तर मग मनू माझ्याबरोबर कशी थांबू शकेल? तिला कोणी त्रास देणार नाही इतके मी नक्कीच पाहू शकतो. तिने प्यारेलालशी बोलायचे की नाही हे तिच्या इच्छेवर अवलंबून आहे. सध्या तो वेगळ्या गावात आहे. तिला जर त्याला पाहण्याचीही इच्छा नसेल तर ती तसेसुद्धा ठरवू शकते. परंतु अशा कडक शिस्तीच्या वातावरणात राहण्यापेक्षा तिने मोकळ्या वातावरणात राहिले पाहिजे. तिला जर माझ्याबरोबर पूर्णपणे सुरक्षित वाटत असेल तरच तिने माझ्याकडे यायला पाहिजे. प्यारेलालची दृष्टी साफ आहे आणि तो स्वतःला कोणावरही लादण्याची शक्यता नाही. सर्वांसमोर आपले विचार व्यक्त करून त्याने काही चूक केली असे मला वाटत नाही. परंतु आता आपण हे सर्व विसरायला पाहिजे. मनूच्या इच्छेप्रमाणे तिला वागू देणे यातच मनूचे हित आहे आणि मला तिच्या भल्याशिवाय अजून काहीही नको.

कनूला लिहिलेले पत्रही मला दिसले नाही. ते बहुधा सरळ त्याच्याकडे गेले असावे. ही गडबड कशी झाली हे ना मला माहीत आहे ना इतर कोणाला. गुजराती जाणणारा इथे मी एकटाच आहे. हे कसे झाले हे मला हळूहळू कळेल.

कनूसुद्धा माझ्यापासून दूर आहे. सर्व पत्रे आधी सतीशबाबूंकडे येतात. ते ते प्यारेलालकडे पाठवतात की नाही हे मला माहीत नाही. तो दर आठवड्यात कमीतकमी एकदा येऊन मला भेटतो. तो यानंतर जेव्हा परत इथे येईल तेव्हा मला अधिक कळू शकेल.

आशीर्वाद,

बापू

गुजराती मायक्रोफिल्मवरून. एम. एम. यू. । ३

# १७९. प्रार्थना प्रवचन

श्रीरामपूर,

डिसेंबर १२, १९४६

संत आणि भक्तगण जिथे कुठे हे भजन म्हणतात त्याचा वास्तविक अर्थ हाच (बातमीप्रमाणे : "दोन मित्र त्या दिवशीच्या सायंप्रार्थनेत सहभागी झाले होते आणि त्या दिवशीच्या प्रार्थनोत्तर प्रवचनाच्या दृष्टीने गांधीजींनी निवडलेले भजन ते म्हणाले होते. या भजनात ईश्वराला प्रार्थना करण्यात आली होती की हे ईश्वरा प्रेमाच्या स्पर्शाने आमच्या अंतःकरणातील सर्व दोष काढून टाकून ते शुद्ध कर आणि त्यात सत्याचा द्वीप प्रज्वलित कर.") असतो. ते नेहमी म्हणत असतात : "आम्हाला काळोखातून प्रकाशाकडे ने, असत्याकडून सत्याकडे ने."

रामधूनच्या मागेसुद्धा एक गोष्ट आहे. चैतन्य महाप्रभूंनी ज्याप्रमाणे पुरी आणि वृंदावनची पायी यात्रा केली होती त्याचप्रमाणे संत तुलसीदाससुद्धा एकदा तीर्थाटन करत डाकोरला पोहोचले होते. ते मंदिर विष्णूमंदिर आहे.

तुलसीदास स्वतःशीच म्हणाले की जोपर्यंत देव माझ्या प्रिय रामाच्या रूपात मला दर्शन देत नाही तोपर्यंत मी या देवाला नमस्कार करणार नाही. कथेत जसे सांगितले आहे तसेच झाले. तीर्थयात्रा करत असलेल्या भक्त तुलसीदासांना आपल्यासमोर संपूर्ण वैभवासह राम बसलेले दिसले व त्यांच्या आजूबाजूला सीता, लक्ष्मण, शत्रुघ्न, आणि हनुमान होते. यामुळे रामधूनचे महत्त्व आहे आणि तिचा अर्थ आहे ईश्वराचा ध्यास वा व्यसन.

प्रार्थना जर आपल्या अंतःकरणातून उचंबळून येत असेल आणि व काळोखातून प्रकाशाकडे आणि भीतीकडून निर्भयतेकडे नेत असेल तर तितके पुरे आहे.

'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', डिसेंबर १६, १९४६

------------------

# १८०. कार्यकर्त्यांना सल्ला

(प्यारेलाल सांगतात की जवळपास १०० कार्यकर्ते गांधीजींचा सल्ला घेण्याकरिता आले होते. त्यांची एक रक्षक दल स्थापन करण्याची इच्छा होती.)

श्रीरामपूर,

डिसेंबर १३, १९४६

गांधीजींना रक्षकदल नाव आवडले नाही. दुसऱ्याचे संरक्षक होण्याचा दावा कोण करू शकतो? कोणी दहा वर्षाचा मुलगा असो, तरुणी असो वा प्रौढ माणूस असो, प्रत्येकाला आपले स्वतःचे रक्षण करण्याची कला शिकावी लागत असते. तुम्हांला जर असे वाटत असेल की स्वतःचे आणि इतरांचे रक्षण केवळ हिंसेनेच करता येते तर तुम्ही युद्धकला आणि शस्त्र चालवणे शिकायला पाहिजे. परंतु तमच्या या साहसात मी तुम्हांला फार कमी मदत करू शकतो. इतकेच नाही तर जे लोक तलवारीने लोकांचे संरक्षण करायला निघतात तेच नंतर अत्याचारी होतात असा माझा नेहमीचा अनुभव आहे. गावातील थोड्याशा लोकांच्या रक्षणाकरिता माझ्या योजनेनुसार अनेक लोक ठेवण्याची गरज नाही. आपल्या कर्तव्यापासून विचलित न होणारी आणि आपल्या अंतःकरणात क्रोध न ठेवता प्राणार्पण करण्याकरिता तयार असलेली एक दोन माणसे याकरिता पुरे असतात. त्यांच्या उदाहरणाने इतरांना कदाचित अहिंसक साहसाची प्रेरणा मिळेल. अशा रीतीने एक तर आपला छळ करणाऱ्या लोकांच्या अंतःकरणाला ते पाझर फोडतील अथवा अहिंसक पद्धतीने आपल्या प्राणाचे आणि स्वाभिमानाचे रक्षण करत ते प्राणार्पण करतील. यासाठी कार्यकर्त्यांना माझा सल्ला आहे की संरक्षक होण्याऐवजी तुम्ही सेवक वा नोकर व्हा.

'महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड २, पृष्ठ ७४-७५

----------------

# १८१. डायरीतील नोंदी

डिसेंबर १३, १९४६

बी.ला (भगवानजी पु. पंड्या; पाहा "भगवानजी पु. पंड्या यांना पत्र" डिसेंबर १३, १९४६) लिहिले की अस्पृश्यतानिवारणाचे काम कासवगतीने सरू आहे... या महान कार्याकरिता ज्याला कार्य करायचे असेल त्याने मूर्तीमंत कर्तव्य वा धर्म व्हायला पाहिजे. ... संध्याकाळच्या जेवणात दोन तोळे जवाच्या पिठापासून तयार केलेला खाकरा घेतला. ... त्यानंतर थोडा गुळ खाल्ला.... त्यामुळे भूक गेली.

महात्मा गांधी - द लास्ट फेज, खंड १, भाग २, पृष्ठ ११४ (महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड २, पृष्ठ १३९)

--------------

# १८२. एका मित्रासमोर काढलेले उद्गार

(हा आणि यापुढील विषय प्यारेलाल यांच्या "डू ऑर डाय ऍट वर्क"मधून घेतले आहेत. भटियालपूर डिंसेंबर १४, १९४६या तारखेअंतर्गत हे आले आहे.)

[डिसेंबर १४, १९४६पूर्वी]

मला बंगालमधून पराभूत होऊन परतायचे नाही. आवश्यकता पडली तर मारेकऱ्याच्या हातून मी मरण पत्करेन. परंतु मी मृत्यूला आवाहनही करत नाही आणि मरावे असे तर मला मुळीच वाटत नाही.

हरिजन, जानेवारी १२, १९४७; महात्मा गांधी - द लास्ट फेज, खंड १, भाग २, ७७

-----------------

# १८३. प्यारेलाल यांना चिठ्ठी

[डिसेंबर १४, १४६पूर्वी] (पाहा या आधीचा विषय)

मी सुरुवातीपासूनच म्हणत होतो की हे फार कठीण काम ठरणार आहे. या जीवनात याहून कठीण काम बहुधा आपल्या नशिबी येणार नाही. आपण आपल्याला पूर्णपणे त्याच्यावर सोपवू या. त्याच्या इच्छेप्रमाणे होईल. . . . तू अनावश्यक धोक्यात उडी घेऊ नको परंतु स्वाभाविकपणे जी कोणती परिस्थिती निर्माण होईल तिला तू न घाबरता तोंड दिले पाहिजे. अशा प्रकारे आपण सर्व जरी संपलो तरी मला त्याचे काहीही वाटणार नाही. माझ्यापुरते बोलायचे तर दिवसेंदिवस मी स्वतःला ईश्वराला अधिकाधिक सोपवत आहे. (प्यारेलालनुसार हे वाक्य दुसऱ्या चिठ्ठीत होते.)

हरिजन, जानेवारी, १२. १९४७; शिवाय महात्मा गांधी - द लास्ट फेज, खंड १, भाग २, पृष्ठ ७७

----------------

# १८४. मधूपूर येथील भाषण

[डिसेंबर १४, १९४६]

(चंदूलाल दलाल यांच्या गांधी - १९१५-४८ अ डिटेल्ड क्रॉनोलॉजीमधून)

आपल्या भाषणात गांधीजी म्हणाले की रुग्णालयाचे काम माझ्या कार्यक्षेत्रात येत नसले तरी डॉ. दास गुप्ता यांच्या आमंत्रणाला मी प्रतिसाद दिला (चंदूलाल दलाल यांच्यानुसार इंडियन मेडिकल असोसिएशनने डॉ. जे. एन. गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू केलेल्या रुग्णालयाचे गांधीजींनी उद्‌घाटन केले.) कारण येथील कार्यकर्ते शुद्ध सेवाभावनेने प्रेरित आहेत. मला माहीत आहे की आज हे काम फार कठीण आहे. निर्वासित शिबिरात गोळा झालेले आहेत आणि त्यांना सुरक्षितपणे आपल्या ओसाड पडलेल्या घरी परतता येईल असे वातावरण निर्माण करणे हे कार्यकर्त्यांचे काम आहे. हे काही शहरातील काम नाही. हे खेड्यातील काम असून इथे घाणीच्या आणि घाणेरड्या पाणीपुरवठ्याच्या समस्येलाही तोंड द्यावे लागणार आहे.

जे लोक 'हरिजन'मधील माझे लेख वाचत आले आहेत त्यांना माहीत असेल की गत काही दिवसांपासून मी निसर्गोपचार पद्धतीचा पुरस्कर्ता झालो आहे. मी कबूल करतो की माझे हे जुनेच प्रेम आहे. वर्षानुवर्षाचा माझा अनुभव आहे की ईश्वरापेक्षा दुसरा कोणीही मोठा चिकित्सक नाही. लोक जेव्हा ईश्वराने बनवलेल्या निसर्गनियमांचे उल्लंघन करतात तेव्हा त्यांना शारीरिक आणि मानसिक व्याधी होतात. चिकित्सक लोक केवळ शारीरिक चिकित्सेकडे लक्ष देतात, मानसिक आणि आध्यात्मिक व्याधींकडे लक्ष देत नाहीत. याचा परिणाम वाईट होतो. शरीर, मन आणि आत्मा या तिघांच्याही आरोग्याकडे लक्ष देणे हे चिकित्सकांचे पहिले ध्येय असले पाहिजे. इथे मुख्य व्याधी भीती आहे - भीतीच्या या भावनेने केवळ सर्व इंद्रियांनाच चैतन्यशून्य केले नाही तर निरोगी जीवनाकरिता उपयुक्त वातावरण तयार करण्याच्या प्रत्येक प्रयत्नावर याचा प्रतिकुल प्रभाव पडला आहे.

गांधीजी म्हणाले की मी असे ऐकतो आहे की गावांमधील मुसलमान हिंदू डॉक्टरांकडे उपचाराकरिता जाणार नाहीत. आशा आहे की मी ऐकलेले बरोबर नसेल. वैद्यकीय व्यवसायात माणसाचा धर्म कोणताही असला तरी एक माणूस आणि दुसरा माणूस यांच्यात भेदभाव केला जात नसतो.

इथे नेमलेल्या डॉक्टरांनी विदेशी औषधांवर अवलंबून राहायचे नाही हे ध्येय ठेवले पाहिजे. गावांमध्ये विविध प्रकारच्या जडीबुटी भरलेल्या आहेत. आयुर्वेदाच्या आणि युनानी पद्धतीच्या चिकित्सकांनी यांचा

व्यापक प्रमाणात उपयोग केला आहे. मग पाश्चात्य पद्धतीच्या डॉक्टरांनी या स्वस्त औषधोपचाराचा उपयोग का करू नये? आचार्य प्रफुल्ल रॉय (प्रफुल्ल चंद्र रॉय, संस्थापक बंगाल केमिकल्स ऍन्ड फार्मासिटॅकल वर्क्स) बंगाल केमिकल मध्ये तयार करण्यात आलेल्या विविध प्रकारच्या तेलांवर आणि मलमांवर अवलंबून राहण्याऐवजी केवळ सरसोचे तेल आणि मीठ वापरत असत. त्याबद्दल आचार्यांना विचारले असता आचार्य हसले आणि म्हणाले या गोष्टी मूर्खांकरिता आहेत आणि त्यांचा उपयोग करून मला मूर्खांच्या संख्येत भर घालायची नाही.

'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', डिसेंबर १८, १९४६

-----------------

## १८५. डायरीमधील नोंदी

डिसेंबर १४, १९४६

रात्री अडीच वाजता उठलो.

खाजेवर गंधकाचा मलम लावला आणि रामनामाची मदत घेत झोपलो.

महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड २, पृष्ठ १३९.

--------------

## १८६. डायरीतील नोंदी

डिसेंबर १५, १९४६

न्यायमूर्ती डी. आणि त्यांची पत्नी भेटण्याकरिता आले होते. आपले जे काही आहे त्याचा त्याग केल्याशिवाय नोआखालीत काम करणे शक्य नाही असे मी त्यांना सांगितले.

'महात्मा गांधी - द लास्ट फेज', खंड १, भाग २, पृष्ठ ११४ ('महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड २, पृष्ठ १३९)

---------------

# १८७. मौन असताना कमला दास गुप्ता यांना पाठवलेली चिठ्ठी

(कमला दास गुप्ता लिहितात : “ . . . एका मित्राकडे . . . आवाहनानंतर नोआखालीतील अपहृत आणि बलात्कारित स्त्रियांशी विवाह करण्याची तयारी असलेल्या ८६ नवयुवकांची पत्रे आली आहेत. . . मी बंगाल प्रदेश काँग्रेस स्त्रीविभागाच्या समितीची सचिव असल्यामुळे महात्मा गांधींना.... भेटण्याकरिता गेले आणि त्यांना विनंती केली की त्या अपहृत मुलींचे प्रकरण तुम्ही तुमच्या हाती घ्या. मी १६ डिसेंबरला ...श्रीरामपूरला पोहोचले. त्या दिवशी गांधीजींचे मौन असल्यामुळे गांधीजींनी आपले उत्तर कागदाच्या तुकड्यांवर लिहून दिले.”)

डिसेंबर १६, १९४६

हा वाईटपणा इतका पसरलेला आहे असे मला वाटत नाही. माझ्या दृष्टीत इतकी सगळी प्रकरणे आली नाहीत. अशा मुलींशी विवाह करू इच्छिणाऱ्या मुलांवर तुम्ही लक्ष ठेवा आणि खरोखर अशी कोणती मुलगी तुमच्यासमोर येईल तेव्हा काय करायचे त्याचा निर्णय घ्या.

मुळावरून. सी. डब्ल्यू. १४७२. सौजन्य - ए. के. सेन.

----------------

# १८८. श्रीरामपूर येथे कार्यकर्त्यांच्या सभेत भाषण

(स्रोतानुसार प्रार्थनेच्या जवळपास दोन तासपूर्वी गांधीजींनी कार्यकर्त्यांच्या सभेला संबोधित केले होते. आणि प्रार्थनेनंतरही हाच विषय सुरू राहिला. पाठात आवश्यक तिथे संपादन करण्यात आले आहे.)

श्रीरामपूर,

डिसेंबर १६, १९४६

ग्रामसेवकाचे मुख्य कर्तव्य शुद्धिकरण असते.

आज आपली खेडी म्हणजे ग्रामीण क्षेत्रातील चिघळलेल्या जखमा आहेत. आपल्या सर्व उणिवांकरिता ब्रिटिश सरकारला दोष देण्यात काहीही अर्थ नाही. ब्रिटिश हिंदुस्थान सोडून जाणार आहेत आणि आपल्याला आपल्या लोकांचे सरकार मिळालेले आहे (अंतरिम सरकारची स्थापना सप्टेंबर २, १९४६ला झाली होती.).

ब्रिटिशांनी जेव्हा हिंदुस्थानात घट्टपणे पाय रोवले तेव्हा अशी शहरे स्थापन करण्याची त्यांची कल्पना होती की जिथे सर्व श्रीमंत लोक गोळा होतील आणि ग्रामीण भागाचे शोषण करण्याकरिता त्यांना मदत करतील. या शहरांना काही प्रमाणात सुंदर करण्यात आले होते; तिथे राहणाऱ्या लोकांना सर्व प्रकारच्या सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या परंतु खेड्यातील कोट्यवधी ग्रामीण लोकांना मात्र घोर अज्ञान आणि दारिद्र्यात तसेच सडू देण्यात आले.

आणि आता आपल्या स्वतःच्या लोकांद्वारे संचालित होणारे सरकार आपल्याला मिळाल्यामुळे आम्ही खेड्यांच्या जिवावर शहरातील लोकांची काळजी घेऊ असे म्हणायला नको. गुजरातीत एक म्हण आहे : ‘जेव्हा जाग येते तेव्हा सकाळ.’ आपल्याकरिताही तसेच होवो. प्रांतातील लोकप्रिय सरकारांनी, मग ती काँग्रेसची असो वा लीगची, जागे होऊन हिंदुस्थानमधील ग्रामीण जीवनाच्या पुनरुत्थानाच्या कामाला लागावे.

परंतु हे काम केवळ सरकारचे असू शकत नाही; आपण महान राष्ट्र बनण्यापूर्वी प्रत्येक नागरिकाने सार्वजनिक कार्यातील आपला वाटा उचलला पाहिजे.

यानंतर गांधीजींनी खेड्यांच्या दयनीय अवस्थेकडे कार्यकर्त्यांचे लक्ष वेधले. कुठेही पिण्याचे स्वच्छ पाणी उपलब्ध नव्हते, रस्त्यांची अवस्था वाईट आहे आणि कालवे जलपर्णीने (वाटर हायसिंथने) अवरुद्ध झालेले आहेत. प्रत्येक खेड्यात सरासरीपेक्षा जास्त हगवण, कॉलरा आणि देवीचे रुग्ण आहेत. हे सर्व रोग असे आहेत की ज्यांचा प्रसार थांबवता येऊ शकतो. याशिवाय असे दुश्चरित्री लोक आहेत की जे लोकांच्या

अडचणींचा लाभ घेण्याची संधी सोडत नाहीत. या शारीरिक आणि मानसिक आजारातून गावांना मुक्त करण्याकडे कार्यकर्त्यांनी लक्ष दिले पाहिजे. हिंदुस्थानात जनशक्तीचा अभाव नाही; गरज आहे योग्य दिशेने केल्या जाणाऱ्या सामूहिक प्रयत्नांची. सरकार बरेच काही करू शकते, परंतु ते हे तेव्हाच करू शकेल जेव्हा त्याच्यामागे जागृत लोकमत असेल. माणसे किडाकीटकांप्रमाणे राहत आहेत. धैर्याने आणि सातत्याने केलेल्या प्रयत्नांनीच हा काळोख दूर होऊ शकतो. असे झाले तर दुर्वर्तनी माणसांना पोषक वातावरण मिळणार नाही. गरिबी आणि अज्ञान जेव्हा दूर होईल तेव्हाच विविध समुदायांमध्ये सुसंवाद निर्माण होईल.

गांधीजी म्हणाले की मी नोआखालीत याच उद्देशाने आलो आहे. जोपर्यंत हे काम पूर्ण होत नाही तोपर्यंत मी हे ठिकाण सोडू शकत नाही. या प्रयत्नात माझे प्राण जरी गेले तरी मी त्याची फिकीर करणार नाही.

'हिंदुस्तान स्टन्डर्ड', डिसेंबर १८, १९४६

-------------

# १८९. प्रार्थना प्रवचन

श्रीरामपूर,

डिसेंबर १६, १९४६

घटनासमितीचा पहिल्यांदाच उल्लेख करत घटनासमितीत पंडित नेहरूंनी मांडलेल्या ठरावाची चर्चा महात्मा गांधींनी केली (पाहा, “घटनासमितीतील ठराव”). या ठरावात घटनासमितीचे कोणते उद्देश असावे याची व्याख्या करण्यात आली आहे. गांधीजी म्हणाले की देशासमोर आज ज्या जटिल समस्या आहेत त्यांच्यावर सर्व प्रकारे विचार केल्यानंतर सर्व समुदायांबद्दल न्यायभावना ठेवून पंडित नेहरूंनी हा ठराव घटनासमितीसमोर ठेवला आहे.

गांधीजी म्हणाले की या ठरावावर कितीही टीका झाली वा लोक त्यासंबंधी काहीही म्हणाले तरी मला खात्री आहे की पंडित नेहरू या ठरावावर ठाम राहतील.

पंडित नेहरूंच्या लंडन यात्रेबद्दल आणि तिथून फारसे समाधानपूर्वक न मिळवता परतण्याबद्दलची चर्चा करत गांधीजी म्हणाले की आपण जो कोणता निर्णय घेतो तो सत्य आणि न्यायाला धरून विचारपूर्वक घेतला पाहिजे आणि मग काहीही झाले तरी त्या निर्णयाला चिकटून राहायला पाहिजे.

गांधीजी म्हणाले की जोपर्यंत परिस्थितीत पूर्णपणे सुधारणा होत नाही तोपर्यंत मला इथेच राहावे लागेल. इतर लोक यासंबंधी काहीही म्हणाले वा त्यांना काहीही वाटले तरी माझा निर्धार अढळ आहे. या संबंधात गांधीजींनी एका चित्रकाराची गोष्ट सांगितली. त्याने एक चित्र काढले होते. चित्रकाराने रस्त्याच्या कडेवर ते चित्र ठेवले आणि त्या चित्राबद्दल मत देण्याकरिता लोकांना विनंती केली. शेवटी त्या चित्रकाराला चित्रातील प्रत्येक ठिकाणी नापंसतीच्या खुणा आढळल्या. परंतु याचा अर्थ त्या चित्रकाराने काढलेले चित्र खरोखरच वाईट होते असा होत नाही. माणसाला जे चांगले वाटते त्याचे त्याने अनुसरण केले पाहिजे. सुज्ञ लोक काय म्हणतात आणि संत कसे आचरण करतात हे माणसाला माहीत असले पाहिजे आणि मग आपल्या अंतःकरणाला ती गोष्ट पटते की नाही याचा माणसाने विचार केला पाहिजे. इतर काय म्हणतात वा करतात याचा माणसाने ताबडतोब स्वीकार करू नये. माणसाने आपल्या सदसद्विवेकबुद्धीला विचारले पाहिजे आणि आपली त्याकरिता तयारी आहे काय हे पाहिले पाहिजे.

यामुळे केवळ मी म्हणतो म्हणून निर्वासितांनी आपल्या घरी परतायला नको. सुज्ञ लोक काय म्हणतात, संत काय करतात आणि तुमचे मन आणि अंतःकरण काय म्हणते हे तुम्ही समजून घेतले पाहिजे.

'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', डिसेंबर १९. १९४६

----------------

## १९०. डायरीतील नोंदी

डिसेंबर १६, १९४६

एस. आणि त्याचा मित्र माझ्याअंतर्गत नोआखालीत काम करण्याकरिता आले. जोपर्यंत मी स्वतःच काळोखाने घेरलेलो आहे तोपर्यंत हे अशक्य असल्याचे आणि याकरिता तुम्ही अधीक्षक अब्दुल्ला यांच्याकडे जायला पाहिजे असे मी त्यांना सांगितले. माझ्याकडे तुमच्याकरिता कोणत्याही सोयीसवलती नाहीत असेही मी त्यांना सांगितले.

'महात्मा गांधी - द लास्ट फेज', खंड १, भाग २, पृष्ठ ११४ ('महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड २, पृष्ठ १३९)

-------------

# १९१. घटनासमितीवर टिपण

(मूळ स्रोतानुसार असफ अलींनी वल्लभभाई पटेलना २० डिसेंबरला पाठवलेल्या पत्रासोबत हे होते.)

श्रीरामपूर,

डिसेंबर १७, १९४६

माझ्या मते मुस्लिम लीगने बहिष्कार घातल्यानंतरही घटनासमिती जर संपूर्ण हिंदुस्थानकरिता घटना तयार करण्याचा प्रयत्न करणार असेल तर ती गंभीर चूक होईल. मुस्लिम लीगने घातलेला बहिष्कार जेव्हा वास्तव रूप धारण करील तेव्हा घटनासमितीला घटनासमितीत भाग घेणाऱ्या आणि प्रतिनिधित्व करणाऱ्या प्रांतांच्या, संस्थानांच्या आणि इतर घटकांच्या स्वातंत्र्याकरिता घटना तयार करण्याचा अधिकार असेल. घटनासमितीची आज जी घडण झाली आहे ती पाहता हाच सन्माननीय आणि सुसंगत मार्ग असेल. मी सांगितलेल्या भूमिकेने घटनासमितीची सभा झाली तर एकापेक्षा अधिक घटनासमित्यांची बैठक होण्याची भीती राहणार नाही. जोपर्यंत हिंदुस्थानात ब्रिटिश सत्ता आहे तोपर्यंत इतर कोणत्याही प्रकारे घटनासमितीची बैठक होऊ शकत नाही. ब्रिटिश सरकारची इच्छा असेल तर अशा प्रकारच्या घटनासमित्या तयार करण्यापासून कोणाला अडवता येऊ शकत नाही परंतु ते असे काँग्रेसच्या हिंसक वा अहिंसक स्वरूपाच्या तीव्र विरोधाला तोंड देऊनच करू शकतील. मला वाटते की आसाम आणि सरहद्द प्रांतांना घटनासमितीपुरते काँग्रेसमधून बाहेर पडण्याची परवानगी देण्यात आली तरच ब्रिटिश सरकारने घटनासमितीचा लावलेला अर्थ काँग्रेस मान्य करू शकेल. नैतिक सत्ता सोडली तर काँग्रेसजवळ अशी कोणतीही सत्ता नाही की जी प्रांतांना वा शिखासारख्या गटांना घटनासमितीत सामील होण्याकरिता बाध्य करू शकेल.

‘सरदार पटेल्स कॉरस्पॉन्डन्स’, खंड ३, पृष्ठ ३१७

--------------------

# १९२. सचिंद्र नारायण रॉय यांना पत्र

श्रीरामपूर, नोआखाली,

डिसेंबर १८, १९४६

प्रिय प्राध्यापक रॉय,

मला नुकताच मागील महिन्याच्या २५ तारखेचे तुमचे पत्र मिळाले आणि ते वाचले. अजून मला तुमचे अनावृत पत्र मिळालेले नाही याचा मला खेद होतो. यामुळे त्यात काय लिहिले आहे ते मला माहीत नाही. त्या पत्रात काहीही लिहिलेले असले तरी तुम्ही त्याची काळजी करू नका. नसरुल्ला साहेबांबद्दल तुम्ही जे म्हणता ते धक्कादायक आहे (सचिंद्र नारायण राव यांनी आपल्या पत्रातून कळवले होते मुख्यमंत्र्यांचे सांसदीय सचिव के. नसरुल्ला खान यांनी काही मुलींनाच नाही तर किती तरी अपहृत मुलींना शहरातील मुसलमानांच्या भागात लपवून ठेवलेले आहे.). तुमचे पत्र मी त्यांना पाठवू काय? तुम्ही तुमचे विधान सिद्ध करू शकाल काय? अपहृत मुलींची नावे, पत्ते आणि अजून काही विशेष माहिती तुम्ही देऊ शकाल काय? मला इतरही स्रोतांकडून अशा तक्रारी मिळाल्या आहेत परंतु विशेष माहिती मिळत नाही.

तुमचा विश्वासू,

मो. क. गांधी

सचिंद्र नारायण रॉय,

३१, साहिब लेन, ढाक्का.

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

---------------

# १९३. एन. जी. रंगा यांना पत्र

श्रीरामपूर, नोआखाली,

डिसेंबर १८, १९४६

मत्प्रिय रंगा (अध्यक्ष, अखिल भारतीय किसान सभा; अध्यक्ष, आंध्र प्रदेश काँग्रेस कमेटी; सदस्य, काँग्रेस सांसदीय पक्ष; संस्थापक अध्यक्ष, स्वतंत्र पार्टी.),

मला तुमचे ११ तारखेचे पत्र आणि सहपत्रे अशी सर्व कागदपत्रे मिळाली. तुम्ही म्हणता की या कागदपत्रांवर मी स्वतः नजर टाकण्याची आवश्यकता नसून माझ्या सचिवाला ती पाहण्याकरिता सांगून त्याला वाटलेल्या महत्त्वाच्या गोष्टींवर मी नजर टाकावी. तुम्हाला माहीत नाही की मी काय करतो आणि कुठे राहतो. जर तसे नसते तर तुम्ही ते पत्र लिहून घेऊन पाठवले नसते. परंतु मला असे दिसते की जगाच्या या भागात मी काय करतो आहे हे पाहण्याकरिता वा दैनिक वर्तमानपत्रे वाचण्याकरिता तुम्हाला वेळ नाही. असो, मी दुर्गम भागातील एका अशा लहानशा खेड्यात राहतो की जिथे अनेक घरे जाळून टाकण्यात आली आहेत व त्यांतील सामान लुटून नेण्यात आले आहे. मीच स्वतःला सचिवीय मदत नाकारली आहे. माझ्याजवळ एक बंगाली प्राध्यापक आहेत. ते माझे दुभाष्ये आणि शिक्षक झाले आहेत आणि इतकेच नाही तर मालीश इत्यादी माझी कामेही ते करत असतात. मलबार येथील परशुराम माझ्याजवळ योगायोगाने आहे, आणि तो तज्ज्ञ लघुलिपीक आणि टंकलेखक म्हणून माझ्याकडे आलेला असल्यामुळे मी अधूनमधून त्याचा उपयोग या पत्रासारखी पत्रे लिहवून घेण्याकरिता करत असतो. सामान्यपणे माझ्या वैयक्तिक गरजांची जबाबदारी त्याच्याकडे असते. आणि हे काम इतके मेहनतीचे आणि वेळखाऊ असते की त्यातच त्याचा जवळपास सगळा वेळ जातो. परंतु तो कधीही तक्रार् न करणारा कार्यकर्ता आहे. आणि गेली दोन वर्षे तो माझ्याकडे असतानाही माझ्या वैयक्तिक संपर्कात येण्याची त्याला संधी मिळालेली नसल्यामुळे आता तो जे काम करतो ते त्याला आवडते आणि तो मला आवडतो. इतर सहकार्यकर्त्यांना जीवाचा धोका पत्करून जाळपोळ आणि लूट करण्यात आलेल्या दुर्दैवी गावांमध्ये पाठवण्यात आले आहे आणि मानवी प्रयत्नांनी शक्य होणार असेल तर देशाच्या या दुःखद भागातील दोन समुदायांमध्ये शांतता निर्माण करायचे कार्य त्यांना करायचे आहे. मला मान्य आहे की हिंदुस्थानमधील केवळ हाच भाग दुर्दैवी नाही, परंतु नियतीने माझी वा असे म्हणा की माझ्या अहिंसेची आणि सत्याची परीक्षा घेण्याचे ठरवले आहे आणि इथे मी स्वतःच स्वतःवर लादलेल्या त्या सत्त्वपरीक्षेला तोंड देण्याचा प्रयत्न करतो आहे.

यामुळे एक तर मी तुमची कागदपत्रे पाहिली पाहिजे वा काही काळ त्यांच्याकडे दुर्लक्ष केले पाहिजे. परंतु मी दुसरा मार्ग स्वीकारू शकत नाही कारण या कामाला मीच आमंत्रण दिले आहे. यामुळे यासंबंधी मी तक्रार करायला नको. या कागदपत्रांमधील जवळपास निम्मे कागदपत्रे मी पाहिली आहेत. आणि तुम्ही इतक्या काळजीपूर्वक सविस्तर माहितीने भरलेली जी कागदपत्रे तयार करून पाठवली आहेत त्यांच्याकडे तुमच्याबद्दल अंतःकरणापासून वाटत असलेल्या प्रेमामुळे केवळ वरवरची नजर टाकूनच भागू शकत नाही तर ती खोलात जाऊन ती पाहावीशी वाटणे स्वाभाविक मानवी प्रवृत्ती आहे. माझ्यासारखे मित्र आधीच इतर राष्ट्रीय कामात गुंतलेले असल्यामुळे व तथ्ये, आकडेवारी आणि तुम्ही केलेली विधाने समजूून घेण्याच्या मर्यादित क्षमतेमुळे संशयित उपयोगिता असलेल्या माझ्यासारख्या मित्रांकडे तुम्ही सध्या काही काळ दुर्लक्ष करा आणि अनेक विश्वसनीय देशसेवक तुमच्या विरोधात असले तरी तुम्ही तुमच्या मार्गाने प्रामाणिकपणे आणि निर्भयपणे काम करा असे मी तुम्हाला सुचवू इच्छितो.

ते काहीही असले तरी मी तुम्हाला वचन देतो की सध्याच्या कामातून मला थोडीशी जरी सवड मिळाली तर मी हे चौकशीचे काम पूर्ण करीन आणि त्यात मला काही उपयुक्त वाटले तर मी तुम्हाला लिहीन. तुम्ही माझ्याकडे संपूर्ण तथ्ये पाठवण्यात मात्र हयगय करू नका.

तुमचा,

बापू

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

---------------

# **१९४. अमतुस्सलाम यांना पत्र**

(हे सतीश चंद्र दास गुप्ता यांना पाठवलेल्या पत्राचे सहपत्र होते. पुढील विषय पाहा.)

डिसेंबर १८, १९४६

कन्या,

मी तुझी पत्रे वाचली. मी उपोषण समजू शकत नाही. [स्थानिक मुसलमानांनी हिंदूंचे तीन खड्ग (बळी देण्याचे शस्त्र) चोरल्यामुळे त्यांच्या विरोधात सिरंडी येथे अमतुस्सलामने डिसेंबर २६पासून उपोषण करण्याचा निर्णय घेतला होता. गांधीजींच्या सूचनेनुसार २५ दिवसाचे हे उपोषण अमतुस्सलामने जानेवारी २०ला सोडले होते. पाहा “प्रार्थना प्रवचन”, जानेवारी २१, १९४७.]

माझा सल्ला आहे - सतीश बाबू म्हणतील तसे कर. मी त्रस्त आहे. कनू तुला वारंवार म्हणाला होता, तेव्हा तरी मला याचे पूर्ण ज्ञान नाही असे तू म्हणाली असतीस. कनूला त्रास देण्याचा तुला काहीही अधिकार नाही. परंतु जे काही घडले ते निरस्त करता येऊ शकत नाही. अखेरीस जसा मी तुला कळतो तसेच तू माझे अनुसरण करशील; तू दुसरे काय करू शकशील?

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५४४

-------------

# **१९५. सतीश चंद्र दास गुप्ता यांना पत्र**

डिसेंबर १८, १९४६

चि. सतीश बााबू,

कोणत्याही दृष्टीने पाहिले तरी अमतुस्सलामचे उपोषण न्याय्य नाही असे म्हणता येऊ शकत नाही. कोणताही निर्णय द्यावा इतकी माहितीसुद्धा माझ्याजवळ नाही. तुम्ही दोघे मिळून विचारपूर्वक निर्णय घेऊ शकाल तर चांगले होईल.

हेमप्रभा चांगली असेल असा माझा विश्वास आहे.

आशीर्वाद,

बापू

ता. क.  - अमतुलस्सलामला लिहिलेले पत्र सोबत जोडलेले आहे. ते तिला पाठवा.

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५४५

----------------

# १९६. वृत्तपत्राच्या प्रतिनिधींना सूचना

(निर्मल कुमार बोस लिहितात : “प्रार्थनेच्या वेळी गांधीजींना इतका थकवा जाणवत होता की ते प्रार्थनेनंतरचे भाषणसुद्धा करू शकत नव्हते. गांधीजी नोआखाली आणि टिपरामधील दंगलग्रस्त भागाचा पायी दौरा करणार असल्याची बातमी पसरलेली होती आणि यामुळे अनेक वृत्तपत्रांचे प्रतिनिधी आणि फोटो काढणारे तिथे आले होते. . . .मी त्यांना वेगळ्या खोलीत भेटलो आणि त्यांना गांधीजींच्या या सूचना दिल्या..”)

डिसेंबर १९, १९४६

१. कुठेही राहण्यापूर्वी त्यांनी ग्रामस्थांची परवानगी घेतली पाहिजे. त्यांनी कोणावरही ओझे व्हायला नको.

२. त्यांनी एकमेकांना मदत केली पाहिजे आणि हातचे काहीही राखून न ठेवता मिळालेल्या बातमीत सर्वांना सहभागी करून घेतले पाहिजे.

३. गांधीजी पायी दौऱ्यावर जात असताना त्यांना गांधीजींबरोबर चालण्याची परवानगी देण्यात येऊ नये कारण गांधीजींना फार मोठा जत्था बरोबर घेऊन फिरण्याची इच्छा नाही.

गांधीजींची इच्छा आहे की वार्ताहरांनी आजूबाजूच्या गावात स्वतंत्रपणे पाहणी करावी आणि घर सोडून गेलेले निर्वासित परत आपल्या घरी परतत आहेत की नाही हे पाहावे. तसेच ग्रामीण मुसलमानांवर गांधीजींच्या उपस्थितीचा काय परिणाम झाला हेही पाहावे.

‘माय डेज विथ गांधी’, पृष्ठ ११३

--------------

# १९७. हसन शहीद सुऱ्हावर्दी यांना पत्र

श्रीरामपूर, नोआखाली,

डिसेंबर २०, १९४६

प्रिय मित्र,

मी तुम्हाला ३ पत्रे लिहिली. त्यांतील पहिले डिसेंबर ३, १९४६ला सर्वसाधारण परिस्थितीविषयी (पाहा "हसन शहीद सुऱ्हावर्दी यांना पत्र", डिसेंबर ३, १९४६", डिसेंबर ३, १९४६ आणि "हसन शहीद सुऱ्हावर्दींना पाठवलेल्या पत्रातील काही भाग", डिसेंबर ५, १९४६), दुसरे सरदार बहाद्दूर सिंग दातार सिंग यांच्या सूचनेविषयी डिसेंबर ४, १९४६ला आणि तिसरे तुमच्या २ तारखेच्या पत्राचे उत्तर म्हणून ३ डिसेंबरला लिहिले. ही तिन्ही पत्रे अनुत्तरित राहिली आहेत याचा मला खेद होतो. तुमच्याकडून कोणतेही पत्र वगैरे नाही याचे कारण तुमच्यावरील कामाचे दडपण असावे असे मी समजतो. नुकताच झालेला खून ही पहिली, बलात्काराविषयीची दुसरी आणि तिसरी लुटीविषयीची अशा माझ्या नजरेत आलेला तीन तक्रारी अब्दुल्ला साहेबांकडे पाठवण्याचे स्वातंत्र्य मी घेतले. काल ते माझ्याकडे आले आणि त्यांनी लगेच केलेल्या चौकशीचा परिणाम मला सांगितला. ते म्हणाले की खून झाल्यासंबंधीची पहिली घटना खरी आहे परंतु अपराध्यांची जी नावे सांगण्यात आली आहेत ती बरोबर नाहीत. माझा विश्वास आहे की अपराध्यांचा शोध घेतला जाईल. दुसरी तक्रार बनावट असल्याचे त्यांना आढळले. तिसरी खरी आहे आणि तिची चौकशी सुरू आहे.

अजून त्रास संपलेला नाही आणि भीती पूर्णपणे निराधार आहे असेही नाही हे तुम्हाला कळवणे हा हे पत्र लिहिण्यामागील माझा हेतू आहे. समस्या किती कठीण आहे हे दाखवणाऱ्या तक्रारी माझ्याकडे जवळपास दररोज येत आहेत. तुम्ही जर मला तुमच्या मंत्रिमंडळाचे आणि मुस्लिम लीगचे हितचिंतक समजत असाल तर तुम्ही सुरुवातीला केले होते त्याप्रमाणे एक मंत्री दंगलग्रस्त भागात ठेवावा व त्याने माझ्या संपर्कात राहावे. ही अपेक्षा जर फार मोठी असेल वा ती जर पूर्ण करण्यासारखी नसेल तर माझ्याकडे आलेल्या तक्रारींमधील ज्या तक्रारी सरळ जिल्हा न्यायाधीशांकडे वा पोलीस अधीक्षकांकडे पाठवण्याकरिता योग्य आहेत असे मला वाटेल त्या त्यांच्याकडे पाठवण्याकरिता मी मोकळा आहे काय हे आपण मला कळवावे.

तुमचा विश्वासू,

मो. क. गांधी

ता. क.  - मी या पत्रावर सही करणार तोच कोमिल्लाहून निरोप घेऊन दोन संदेशवाहक आले आणि त्यांनी मला तुमचे पत्र दिले. मी ते वाचलेले नाही. मी हे पत्र जाऊ देतो आणि आवश्यक असले तर परत पत्र लिहीन.

माननीय मुख्यमंत्री, बंगाल

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

--------------

## १९८. श्रीकृष्ण सिन्हा यांना पत्र

श्रीरामपूर,

डिसेंबर २१, १९४६

भाई कृष्ण सिन्हा,

मी तुम्हाला पत्र लिहिले होते परंतु त्याचे उत्तर आले नाही. बहुधा ते गहाळ झाले असावे. माझ्या काही पत्रांबद्दल असे होत असते. मला बिहार प्रांत (मुस्लीम) लीगचा अहवाल मिळाला. तुम्हालासुद्धा त्याची प्रत मिळाली असेल. यामुळे मी ती तुम्हाला पाठवत नाही. त्यात नमूद करण्यात आलेल्यापैकी निम्मे जरी खरे असेल तरी ते भयानक आहे. त्यात तर असेही म्हटलेले आहे की हे हत्याकांड बिहार मंत्रिमंडळाने घडवून आणले आहे आणि बिहार मंत्रिमंडळाला मी त्याचे पूर्ण स्पष्टीकरण मागितले पाहिजे. जर असे स्पष्टीकरण निघाले असेल तर मला त्याची प्रत पाठवण्यात यावी. माझी तर तुम्हाला यापुढे नेण्याची इच्छा आहे. काही वर्तमानपत्रांमध्ये मी वाचले आहे की यासंबंधात कोणतीही चौकशी करण्याचा बिहार सरकारचा विचार नाही (श्रीकृष्ण सिन्हा यांनी चौकशी आयोगाची स्थापना करण्याची घोषणा फेब्रुवारी, १३, १९४६ला केली.). मला हे वाचून खेद होतो. माझी इच्छा आहे की दोन्ही प्रांतांच्या मंत्रिमंडळांनी निष्पक्ष लोकांचे एक संयुक्त चौकशी मंडळ नेमावे आणि दोन्ही प्रांतात काय झाले याची चौकशी करावी. सध्याची खरी परिस्थिती काय आहे ते तुम्ही मला कळवले तर चांगले होईल. अनेक मुसलमानांनी बिहार सोडले आणि अजूनही अनेक सोडत आहेत यात कितपत सत्य आहे? मुसलमानांच्या निर्वासित छावणीत मुस्लिम लीगच्या प्रतिनिधींना जाण्याची बिहार सरकारतर्फे परवानगी नाही अशीही एक तक्रार आहे. याची प्रत मी राजेंद्र बाबूंना पाठवत आहे.

बापू

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-----------------

# १९९. प्रार्थना प्रवचन

("श्रीरामपूर डायरी"मधून उद्धृत)

श्रीरामपूर,

डिसेंबर २१, १९४६

**भाषणाची सुरुवात करत गांधीजी म्हणाले की दानधर्माबद्दल माझे विचार फार ठाम आहेत. कोणाकडून फुकट दान घेणे वा देणे या दोन्हीही गोष्टी चूक आहेत. आपल्या देशात अनेकदा अधर्म धर्माचे रूप घेतो. असे म्हणतात की धर्माच्या नावावर भीक मागणारे हिंदुस्तानात ५६ लाख साधू आहेत. त्यांतील बहुतेकांना कोणत्याही प्रकारे चांगले म्हणता येत नाही. या दुर्दैवी देशात अस्पृश्यतेच्या घृणित परंपरेलाही धर्माचे रूप देण्यात आले आहे.**

**मदत आणि पुनर्वसनाची समस्या गंभीर झालेली आहे. हिंदुस्थानच्या सर्व भागातील लोक नोआखालीतील दंगलग्रस्त लोकांना पैशाने वा सर्व प्रकारच्या मोफत वस्तूंच्या देणगीच्या रूपाने मदत करण्याकरिता उत्सुक आहेत आणि यामुळे या निर्वासितांमध्ये लोकांच्या दानधर्मावर अवलंबून राहण्याची वृत्ती घर तर करणार नाही ना अशी भीती वाटू लागली आहे. या गोष्टीला तसेच दान देऊन आपण पुण्य मिळवतो असे समजणाऱ्या आत्मसंतुष्ट वृत्तीलाही आपण विरोध केला पाहिजे.**

**सार्वजनिक दान करणाऱ्या संस्थांनी अवलंबिलेल्या धोरणाच्या तुलनेत सरकारने निर्वासितांबद्दल कसे धोरण अवलंबिले पाहिजे याची चर्चा करत गांधीजी पुढे म्हणाले की जे लोक निर्वासित शिबिरांत गोळा झाले आहेत ते काही त्यांच्या दोषामुळे गोळा झालेले नाहीत, त्यांतील काहींची घरे जाळण्यात आलेली आहेत आणि त्यांना निवाऱ्याकरिता कोणतीही जागा नाही, तर इतर काही असे आहेत की ज्याच्या झोपड्या कदाचित जशाच्या तसा उभ्या असतील परंतु त्यांचे सर्व सामान लुटून नेण्यात आले आहे. आणि तिसऱ्या प्रकारचे लोक ते आहेत की जे भीतीमुळे घरदार सोडून इथे आले आहेत. सरकारचे काम प्रत्येक प्रकरणी त्याच्या योग्यायोग्यतेप्रमाणे निर्णय घेऊन उपाययोजना करणे आणि निर्वासितांना आपल्या कुटुंबियांसह परत आपल्या घरी सुरक्षिततेच्या भावनेने परत जाता येईल हे पाहणे आहे.**

**आवश्यक परिस्थिती निर्माण केल्याशिवाय आणि निर्वासित आपल्या संपूर्ण कुटुंबासह घरी परतल्याशिवाय अधिकरणाने लोकांचे रेशन बंद करणे योग्य होणार नाही. निर्वासितांनी अडचणींचा सामना करत आपल्या घरी परतावे आणि तसे करत असताना आपल्या जीवाचाही धोका पत्करावा अशी जर सरकारची निर्वासितांकडून अपेक्षा असेल तर मग सरकारची आवश्यकताच नाही असे म्हणावे लागेल; ही परिस्थिती तर अशा प्रबुद्ध अराजकाची असेल की जिथे कितीही मोठे संकट आले तरी प्रत्येक माणूस स्वतःचे रक्षण स्वतःच्या शक्तीने करण्याकरिता समर्थ असतो. परंतु आजच्या परिस्थितीत समाजसेवेचे बहुतेक काम सरकारी संघटनांच्या माध्यमातूनच व्हायला पाहिजे.**

**सुरक्षिततेची पुरेशी व्यवस्था करावी लागेल आणि असे वातावरण निर्माण करावे लागेल की ज्यात लोक आपले काम करत शांततापूर्वक जगू शकतील. जोपर्यंत अशी व्यवस्था निर्माण होत नाही तोपर्यंत मदत कार्याची व्यवस्था सुरू ठेवावी लागेल.**

**परंतु सार्वजनिक दानधर्म करणाऱ्या संस्थांची गोष्ट याहून अगदी वेगळी आहे. गांधीजींचे मत होते की कोणत्याही माणसाने जनतेच्या दानावर जगणे चुकीचे असते. दक्षिण आफ्रिकेत जेव्हा सत्याग्रह सुरू होता तेव्हा सत्याग्रहींच्या खर्चाकरिता मोठ्या प्रमाणात देणग्या मिळाल्या होत्या. ट्रान्सव्हालमधील लॉलीजवळ सत्याग्रहींच्या कुटुंबियांना आणि त्यांच्यावर अवलंबून असणारांकरिता टॉलस्टॉय फार्मची स्थापना करण्यात आली होती. ते सत्याग्रही आपल्या क्षमतेप्रमाणे आपल्या निर्वाहाकरिता काम करत असत. परिणामी सत्याग्रह संघटनेला आंदोलन संपल्यानंतर देणगीदाखल मिळालेली बरीचशी रक्कम परत करता आली.**

**याच तत्त्वाप्रमाणे इथे काम करणाऱ्या पारमार्थिक संस्थांनी लोकांना स्पष्टपणे सांगितले पाहिजे की प्रामाणिकपणे मेहनत केल्याशिवाय एक वेळ जेवण करणेसुद्धा तुम्हांला अपमानास्पद गोष्ट वाटली पाहिजे. श्रमाबद्दल आपल्याला जो तिटकारा वाटतो त्याचा जर आम्ही त्याग केला आणि आपल्या परिस्थितीत झालेल्या अनपेक्षित बदलाशी जुळवून घेतले तर निर्भय होण्याच्या दृष्टीने आणि राष्ट्रीय चारित्र्याच्या उत्थानाच्या दृष्टीने आपण फार मोठा पल्ला गाठू.**

**मी तर निर्वासितांना इथपर्यंत सांगण्याचे साहस करीन की तुम्ही श्रीमंत असा वा गरीब, तुम्ही सरकारला सांगितले पाहिजे की सरकारकडून दान घेणे आम्हांला मानवी प्रतिष्ठेविरुद्ध वाटते. निर्वासितांमधील श्रीमंतांजवळ म्हणा वा गरिबांजवळ काहीही शिल्लक राहिलेले नाही. यामुळे त्यांना अन्न, वस्त्र, निवारा आणि वैद्यकीय मदत यांची गरज आहे. यामुळे या जीवनावश्यक गोष्टी पुरवणे राज्याची जबाबदारी आहे व निर्वासितांचा तो हक्क आहे. परंतु तुमच्यातील स्त्री, पुरुष, मुलगा, मुलगी कोणीही आपल्या शक्तीनुसार श्रम केल्याशिवाय सरकारी मदत स्वीकारत असेल तर याचा अर्थ होईल तुम्ही समाजाला लुबाडत आहा. यामुळे हे निर्वासित जे उपयुक्त काम करू शकतील ते सरकारने त्यांना द्यावे.**

'हरिजन', जानेवारी १९, १९४७

---------------

# २००. डायरीतील नोंदी

डिसेंबर २१, १९४६

सकाळच्या प्रार्थनेनंतर प्रार्थना प्रवचनांच्या दुरुस्तीचे काम केले. तोपर्यंत फिरायला जाण्याची वेळ झाली होती. नेहमीपेक्षा दुप्पट चाललो, ४० मिनीट लागले. सुऱ्हावर्दींना पाठवावयाच्या पत्राचा मजकूर सांगितला. बिर्लाच्या माणसाने कलकत्त्याहून काही फळे आणली. त्याला वेळ द्यावा लागल्यामुळे कताईकरिता फार थोडा वेळ राहिला. त्यामुळे फार वाईट वाटले.

'महात्मा गांधी - द लास्ट फेज', खंड १, भाग २, पृष्ठ ११४ ('महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड२, पृष्ठ १४०)

----------------

# २०१. पनिआला संघाच्या लोकांना संदेश

(हा संदेश आंतरजातीय सहभोजनाच्या प्रसंगी पाठवण्यात आला होता. या प्रसंगाकरिता गांधीजी हजर राहू शकले नव्हते. दंगलग्रस्त हिंदूंच्या पुनर्वसनाकरिता आणि जवळपास ४० खेड्यांमध्ये पसरलेल्या दोन समुदायात सुसंवाद निर्माण होण्याकरिता काम करणाऱ्या गांधी शांतता कार्य केंद्राचे प्रभारी अमृतलाल चटर्जी यांच्या हस्ते हा संदेश पाठवण्यात आला होता.)

श्रीरामपूर,

डिसेंबर २२, १९४६

पनिआलाचे हिदू आणि मुसलमान बंधूभगिनींनो,

रस्ता खराब असल्यामुळे आणि इतके अंतर पायी चालण्याची माझ्यात शक्ती नसल्यामुळे आज मी तुमच्याकडे येण्याकरिता असमर्थ आहे याबद्दल मला क्षमा करावी. जे हिंदू आपले घर सोडून निघून गेले होते ते परत येत आहेत याचा मला आनंद होतो. मला आशा आहे की तिथे राहणारे मुसलमान परतणाऱ्या हिंदू बंधूभगिनींना आश्वस्त करतील; जे अपराधी आहेत ते आपला अपराध कबूल करतील व सर्व एक होऊन सौहार्दपूर्ण वातावरणात राहतील.

मला आशा आहे की हिंदू अस्पृश्यतानिर्मूलन करतील. सर्वांनी सर्वांबरोबर खावे आणि कोणीही कोणाचाही बहिष्कार करू नये.

मो. क. गांधी

हिंदी फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. १०४१९

------------------

# २०२. हसन शहीद सुऱ्हावर्दी यांना पत्र

श्रीरामपूर, जिल्हा नोआखाली,

डिसेंबर २२, १९४६

प्रिय मित्र,

काल ताजाकलमच्या रूपाने मी तुम्हाला तुमच्या या महिन्याच्या १५ तारखेच्या पत्राची केवळ पोच दिली होती. माझे पत्र डाकेत टाकण्याकरिता जात असतानाच मला तुमचे पत्र मिळाले होते.

मला असे आढळून आले आहे की अजूनही तुमच्या डोक्यात बिहार भरलेला आहे आणि तुमच्या डोक्यात तुमच्या कार्यालयाच्या इतक्या काळज्या भरलेल्या आहेत की त्यामुळे मी पाठवलेले पत्र तुम्ही पूर्णपणे काळजीपूर्वक वाचलेसुद्धा नाही असे स्पष्टपणे दिसते. याचे कारण असे की तुम्ही उद्धृत केलेल्या आठवणीवरून तुम्ही मला खोटा मित्र ठरवले आहे असे दिसते. परंतु स्मृती फसवी मित्र असते आणि ज्या प्रतिभाशाली लोकाना आपल्या स्मृतीचा अभिमान वाटतो त्यांनासुद्धा ती फसवत असताना दिसते. तुम्ही जर मनाला लावून घेणार नसाल तर तुम्ही उल्लेख केलेल्या माझ्या ५ तारखेच्या पत्रातील या संदर्भातील मजकूर उद्धृत करून मी तुम्हाला मदत करतो.

"तुम्ही बिहारसंबंधी अतिशय गंभीरपणे केलेल्या विधानात मला काही तथ्य आढळले तर नेहमी जितका आणि जो आहार मी घेत असे तितका घेऊ लागून मी गंभीर चूक केली आहे असे मला कबूल करावे लागेल. परंतु पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. राजेंद्र प्रसाद हे दोघेही जबाबदार व्यक्ती आपल्या डोळ्यांनी तेथील परिस्थिती पाहण्याकरिता आणि जमावाचा राग शांत करण्याकरिता गेले होते. अशा लोकांनी दिलेली साक्ष मी नाकारू शकत नाही. ते मान्य करतात की विवेकबुद्धीने विचार केला तर हिंदूंच्या जमावाचे वर्तन भरपूर प्रमाणात वाईट होते परंतु तुम्ही केलेले विधान वा तुम्ही दिलेली आकडेवारी त्यांना मान्य नाही. ते असेही म्हणतात की जमावाचा क्रोध शांत झाला आहे आणि सैन्याच्या मदतीने सरकारने जमावावर निःसंशयपणे नियंत्रण मिळवले आहे. मला बिहारमध्ये माझी उपस्थिती आवश्यक आहे असे जर वाटले असते तर मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो की असे करण्याकरिता मला तुमच्या प्रोत्साहनाची आवश्यकता पडली नसती. उलटपक्षी मला माहिती देणारे मला खात्रीपूर्वक सांगतात की बिहारमध्ये माझ्या उपस्थितीची आवश्यकता नाही. अशा परिस्थितीत माझ्या भूमिकेबद्दल मला शाश्वती वाटत असेल तर मी बिहारमध्ये जाण्याची आवश्यकता नाही.

परंतु या आश्वासनाबद्दल परत खात्री करून घेण्याकरिता आणि ते उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून तुमच्या परवानगीने मी तुमच्या पत्राच्या प्रती बिहारच्या मुख्यमंत्र्यांकडे पाठवून त्यांची यासंबंधातील प्रतिक्रिया जाणून घेऊ इच्छितो. तुमची विधाने मी वेदवाक्य मानू शकत नाही याबद्दल तुम्ही मला क्षमा कराल, कराल ना. एक गोष्ट म्हणजे तुम्हाला घटनांची प्रत्यक्ष माहिती नाही. नोआखाली आणि बिहारमधील दंगलींची चौकशी करण्याकरिता दोन सरकारांच्या वतीने एक निष्पक्ष चौकशी समिती नामित करण्यात यावी अशी माझी सूचना आहे. तुम्ही केलेली विधाने बरोबर असतील आणि बिहार सरकारच्या दुष्टपणाच्या वर्तनाविषयी तुम्ही जे इतके सविस्तर चित्रण केले असेल ते बरोबर असेल तर तो दिवस बिहार सरकारकरिता वाईट असेल, हिंदूंकरिता वाईट असेल आणि दोन समुदायांत चांगले संबंध निर्माण करण्याच्या विचाराला मग मला तिलांजली द्यावी लागेल आणि मी कुठे उभा आहे हा माझ्यासमोर गंभीर प्रश्न उभा असेल. मी किमान इतके सांगू शकतो की असे असेल तर मी बिहार सरकारची आणि बिहारच्या जनतेची जाहीर भर्त्सना करीन. माझी तुम्हाला विनंती आहे की तुम्हाला जर शक्य असेल तर या बाबतीत अंतिम निर्णय घेऊ नये."

माझ्या मते ही जी माझी स्पष्टपणे आणि मोकळेपणाने व्यक्त केलेली भूमिका आहे तिला तुम्ही कृपापूर्वक जे उत्तर पाठवले ते असे आहे -

**"तुमच्या (गांधीजींच्या) पत्रात तुम्ही जेव्हा लिहिले की बिहारमध्ये असे काहीही घडले नाही की ज्यामुळे माझी उपस्थिती तिथे आवश्यक आहे असे मला वाटावे. पंडित जवाहरलाल नेहरू आणि डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्याकडून मी असे काहीही ऐकले नसल्यामुळे मला थोडासा धक्काच बसला."**

उद्धृत केलेली ही दोन विधाने जवळ ठेवली तर तुम्ही काढलेला निष्कर्ष सदोष आहे असे तुम्हाला दिसून येईल. परंतु तरीही तुमचा निष्कर्ष बरोबर आहे असे जर तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही काढलेल्या निष्कर्षातील अस्वाभाविकता दाखवून देण्याचा मी आनंदाने प्रयत्न करीन.

तुम्ही पुढे म्हणता :

**"…. तिथे खून, लूट, कत्तल, बलात्कार, अपहरण, धर्मांतर वा कल्पना करता येणार नाही अशा प्रकारची पशुत्वाची आणि क्रूरपणाची कृत्ये झाली नाही असे ते म्हणाले की नाही … हे मला माहीत नाही."**

मी गृहीत धरतो की हा आरोप सिद्ध करण्याकरिता तुमच्याजवळ बिहार प्रांत मुस्लिम लीगचा तो अहवाल आहे ज्याची प्रत तुम्ही मला कृपापूर्वक पाठवली होती. अवतरण चिन्हात मी म्हणू शकेन की मला इतर कोणतीही प्रत मिळालेली नाही वा मी पाहिली नाही. पंडित जवाहरलाल नेहरू आणि डॉ. राजेंद्र प्रसाद

बिहारमध्ये लूट आणि कत्तल झाली हे मान्य करतात परंतु ते बलात्कार, अपहरण आणि धर्मांतर मान्य करत नाहीत आणि जर “अकल्पनीय पशुत्वाचे आणि क्रूरपणाची” या शब्दांमधून आधी वर्णन केलेल्या शब्दांतील अर्थापेक्षा अधिक काही व्यक्त होत असेल तर या शब्दांचा नेमका अर्थ काय हे तुम्ही मला समजावून सांगितलेले मला आवडेल. कालपरवाच (बिहार काँग्रेसचे) पंडित आमदार धनराज शर्मा माझ्याकडे आले होते. बिहारमधून माझ्याकडे जे येतात त्यांच्याकडून मी बिहारची शक्य तितकी माहिती घेत असतो. वर सांगितलेल्या बिहारसंबंधीच्या अहवालात जे आरोप करण्यात आलेले आहेत त्यासंबंधी ते काय म्हणतात याची माहिती करून घेणे कदाचित तुम्हाला आवडेल. मी त्या अहवालातील मुख्य भाग वाचले आहेत आणि तो संतुलित अहवाल नाही हे मी कबूल केले पाहिजे. तो अहवाल तयार करणारांना स्वतःसंबंधीच्या निष्पक्षतेची खात्री पटवून देता आलेली नाही. ते काहीही असले तरी त्या अहवालावर माझा अगदीच विश्वास नाही आणि पंडित धनराजसह मला माहिती देणारांकडून मला जी माहिती मिळते त्या माहितीच्या तो अगदीच विरोधी आहे. पंडित धनराज यांच्या पत्राची प्रत मी तुमच्याकडे पाठवत आहे. मी तुम्हाला निष्पक्ष चौकशी आयोग नेमण्याची जी सूचना केली होती. त्या सूचनेला (मुस्लिम लीगच्या) बिहार अहवालमध्येही सहमती आहे. माझ्या या सूचनेला कोणतेही उत्तर देण्याचे तुम्ही टाळले आहे. आता मला बिहार प्रांतिकची प्रत मिळालेली असल्यामुळे .... (स्रोतात इथे फाटलेले आहे) असा आयोग नेमण्याची मी त्यांना सूचना करत आहे. त्याचा निष्कर्ष मी तुम्हाला निश्चितच सांगेन.

तुम्ही पुढे म्हणता :

**हे खरे आहे की बिहारमध्ये मुसलमानांना त्रास सहन करावा लागला, हिंदूंना नाही. आणि मग तुम्ही अप्रत्यक्षपणे सुचवता,**

**“यामुळे बिहारमधील मुसलमानांमध्ये परत विश्वास निर्माण करण्याच्या दृष्टीने मी बिहारमध्ये गेल्यामुळे काही उपयोग होणार नाही, परंतु ही समस्या कोणत्याही अर्थाने वेगळी नाही.”**

कृपाकरून मला सांगू द्या की माझ्या सेवेवर मुसलमानांवर अधिकार नाही वा मी त्यांच्याकडे लक्ष देण्याची गरज नाही असे मी कधीही मानले नाही. असे असले तरी मी मान्य करतो की या अवस्थेत मी बिहारमध्ये गेल्यामुळे परत विश्वास निर्माण होणार नाही हे मी कबूल करतो. सत्याबद्दल खेद व्यक्त करून कोणतीही मदत होऊ शकत नसते. हा अविश्वास अगदी निराधार आहे. मी स्वतःला हिंदुस्थानचा कार्यक्षम सेवक समजतो. एक जुने मित्र म्हणून तुम्हाला आणि मुस्लिम लीगच्या लोकांना मी म्हणेन की तुम्ही माझ्यावर

विश्वास ठेवा वा ठेवू नका, मी इथे गमावलेला आत्मविश्वास परत मिळवून देण्याकरिता आलो आहे. जोपर्यंत गमावलेला आत्मविश्वास परत येत नाही तोपर्यंत मला नोआखालीतून कोणीही घालवू शकत नाही. या दोन जिल्ह्यातील हिंदू आणि मुसलमान पोलिसांच्या आणि सैन्याच्या उपस्थितीशिवायही परस्परांवर विश्वास ठेवून जेव्हा राहू शकतील तेव्हाच असे झाले असे म्हणता येईल.

मला असे आढळले आहे की मी नोआखालीतून निघून जावे म्हणून वातावरण तयार होत आहे. तुम्हीसुद्धा त्या भावनेत सहभागी आहा. नोआखालीतील माझी उपस्थिती त्रासदायक का होते? आणि मी तर तुम्हाला म्हणेन की तुम्ही जिल्हा न्यायाधीश आणि पोलीस अधीक्षक यांना माझ्या हालचालीवर कडक लक्ष ठेवण्याची सूचना द्यावी व मी कुठे चुकतो हेही या सद्गृहस्थांना सांगण्याकरिता सांगावे. मी इथे दोन समुदायांमध्ये मतभेद पेरण्याकरिता आलेलो नाही आणि मुसलमानांऐवजी केवळ हिंदूंचे हित जपणे हाही माझा इथे येण्याचा हेतू नाही. मला केवळ भीती आणि असहायतेची भावना नाहीशी करायची आहे. अजूनही लोक कसे घाबरलेले आहेत हे मी तुम्हाला सांगितलेले आहे. विश्वास आणि पुनर्वास यांची प्रक्रिया सुरू आहे या तुमच्या विधानावर विश्वास ठेवता यावा अशी माझी इच्छा आहे.

केंद्रात मतभेदाची दरी वाढत आहे अथवा "काँग्रेसने हिंदू महासभेचे ज्येष्ठ पुढारी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे नेतृत्व स्वीकारले आहे" यांतील कशाचीही मला किंचितही कल्पना नाही हे मी तुम्हाला सांगायलाच पाहिजे. आपल्या प्रदीर्घ कार्यकाळात कॉंग्रसने अशा कोणाचेही नेतृत्व स्वीकारलेले नाही की जो अंतर्बाह्य कॉंग्रेसी नाही.

माझ्या तीन पत्रांमध्ये, ज्यांची पोच मी हे ज्या पत्राचे उत्तर देत आहे त्या पत्रात दिलेली आहे, मी जे मुद्दे उचलले आहेत त्या मुद्यांच्या विचारपूर्वक उत्तरांची मी वाट पाहीन.

तुमचा विश्वासू,

मो. क. गांधी

सहपत्र - १

माननीय मुख्यमंत्री बंगाल,

कलकत्ता.

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

----------------

# २०३. डायरीतील नोंदी

डिसेंबर २२, १९४६

रात्रीच्या दीड वाजता जाग आली. प्रार्थनेच्या वेळेपर्यंत काम केले.

'महात्मा गांधी - द लास्ट फेज', खंड १, भाग २, पृष्ठ ११४ ('महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड २, पृष्ठ १४०)

-----------------

# २०४. प्यारेलाल यांना पत्र

डिसेंबर २२, १९४६

चि. प्यारेलाल,

सुशीलाच्या पत्राने माझे मन मुळीच शांत झाले नाही. यापुढे युक्तिवाद करण्याची मला इच्छाही नाही आणि माझ्यात शक्तीही नाही. युक्तिवादाच्या भरात मी जे काही बोललो तेही निरस्त करावे असे मला वाटते. मी तिचे नाव घेऊ नये, तिच्याबद्दल बोलू नये वा कोणाला दिसेल असे तिच्याबद्दल पत्र लिहू नये या अशा अटी आहेत की ज्या मी पूर्ण करू शकत नाही. यामुळे जनहिताकरिता काही लिहिणे आवश्यक नसेल तर माझा लिहिण्याचाच विचार नाही. परंतु निदान माझ्या समाधानाकरिता तू तिला वारंवार भेटत जा, तिला दररोज किमान एक पत्र लिहावे व तिला उत्तर देण्याकरिता सांगावे असे मला वाटते. माझ्या मते एक तर तिचे डोके ठिकाणावर नाही वा माझे. माझ्यात मला तसे कोणतेही चिन्ह दिसत नाही. देवदास वा इतरांची काय इच्छा आहे याच्याशी या घटनेचा काहीही संबंध नाही. माझी तिला घालवून देण्याची इच्छा नाही. तिच्याकडून मला कोणतीही सेवा घेण्याची इच्छा नाही हे भांडण होण्याचे कारण आहे. तिची सेवा घेणे हे माझे कर्तव्य कसे होऊ शकते हे मला कळत नाही. सध्याचे हे दृश्य मनूकरिता अगदीच चांगले नाही. तिचे रक्षण करण्याकरिता मी माझा आत्मा दिलेला आहे आणि अजूनही मी ते करतो आहे. तिला येऊ देऊन मी दोन हेतू साध्य करतो आहे - पहिली ती अधिक चांगल्या परिस्थितीत राहील व दुसरी तुझी मनस्थिती परत नेहमीसारखी होईल. परंतु इतक्याकरिता मी तिच्या अटी मान्य केल्या नसत्या. मला जेव्हा आवश्यकता असेल तेव्हा मी कोणाकडूनही सेवा घेऊ शकतो. परंतु ज्याला सेवा करायची आहे तो अटी कशा काय घालू शकतो? तुझी वृत्तीही सुशीलासारखीच असेल तर माझ्याबरोबरचे संबंध कायम ठेवायचे की नाही याचा तूसुद्धा विचार केला पाहिजे. माझ्याबरोबर राहून तुझा वैयक्तिक फायदा काय आहे? तू जर दडपणाखाली वा इच्छा नसताना माझ्याबरोबर राहणार असशील तर ते तुझ्याकरिताही चांगले नाही, सुशीलेकरिताही चांगले नाही आणि माझ्याकरिताही चांगले नाही. सुशीला जी भूमिका घेत आहे ती माझ्या मते तिचा धर्म नाही. या क्षणी असा वैक्तिक प्रश्न मुळात उपस्थितच का व्हायला पाहिजे? माझा विश्वास आहे की मनूपासून तू काहीही लपवून ठेवू शकत नाही. मला तुझ्याबद्दल हेच कळू शकले. मला ती चिठ्ठीसुद्धा आवडली नाही जिची तिला काहीही माहिती नव्हती. सुशीलाबद्दल सांगायचे तर तू मनूला सांगू शकतो की काही असहायतेमुळे तू काही गोष्टी तिला सांगू शकत नाही. तिच्यापासून तू लपवावे असे काहीच कारण नाही हे मला समजते. हे कसे हे जर तुला

कळले नसेल तर मला विचार. मग मी ते तुला परत स्पष्ट करून सांगेन. मी सुशीलाला लिहिलेल्या पत्राची प्रत तू मला परत देण्याची आवश्यकता नाही. दोन्ही पत्रांच्या प्रती परत घेण्याची मला इच्छा झाली होती परंतु ते महत्त्वाचे नाही. तू सुशीलाला या पत्रातील काही वा सर्व तुझ्या इच्छेप्रमाणे सांगू शकतो.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

----------------

## २०५. मौनदिवशी निर्मल कुमार बोस यांना लिहिलेली चिठ्ठी

सोमवार, डिसेंबर २३, १९४६

शिक्षकाने एखादा पाठ शिकवण्याआधीच चांगल्या विद्यार्थ्याने आपल्या पाठाची तयारी करायला पाहिजे. (निर्मलकुमार बोस यांनी लिहिल्याप्रमाणे त्या काळात गांधीजी बंगाली शिकत होते. त्या दिवशी गांधीजींनी पाठाची तयारी केलेली नसल्यामुळे गांधीजींनी त्यांना ही चिठ्‌टी लिहिली.)

फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. १०५३७

------------------

## २०६. मौनदिवशी निर्मल कुमार बोस यांना लिहिलेली चिठ्ठी

(निर्मल कुमार बोस यांनी लिहिल्याप्रमाणे गांधीजींनी ही चिठ्ठी "अगदी सकाळी ५ वाजता दिली".)

सोमवार, डिसेंबर २३, १९४६

ईश्वर माझे काय करणार आहे वा माझ्या माध्यमातून काय करणार आहे हे मला माहीत नाही. तुम्हाला जर वेळ असेल तर आणि इच्छा असेल तर सूर्योदय झाल्यानंतर सुशीलाकडे जा आणि तिच्याबरोबर काही वेळ घालवल्यानंतर व तिला काय हवे नको ते पाहून व तिच्याबरोबर काही वेळ घालवून परत या. तिच्याबद्दल आपल्यामध्ये झालेले संपूर्ण संभाषण (पाहा "निर्मल कुमार बोस यांच्याशी चर्चा", डिसेंबर १९, १९४६. शिवाय टीप पाहा.) हातचे काहीही राखून न ठेवता तुम्ही तिला सांगू शकता. तिला जर तुम्हाला काही सांगायचे असेल तर तुम्हाला ते कळेलच. तुमची इच्छा असेल तर तुम्ही तिला हे दाखवू शकता. तुमची जर हे ओझे वाहण्याची तयारी असेल तर तुमचा आत्मा सांगेल तसे वागा. तुमच्या क्षमतेपलीकडे काही करू नका.

'माय डेज विथ गांधी', पृष्ठ १२०

---------------

## २०७. निर्वासितांना सूचना

(निर्मल कुमार बोस लिहितात की : "अरुण दत्ता नावाचा एक स्वयंसेवक नंदीग्राम निर्वासित शिबिरातून आला होता. तिथे १८०० विस्थापित राहत होते. त्यातील ३०० लोकांचे रेशन सरकारने थांबवले होते. विस्थापितांना बळजबरीने आपल्या घरी परत पाठवण्याचा प्रयत्न सुरू होता.")

डिसेंबर २३, १९४६

या वेळी त्यांनी उपोषण करावे अशी माझी इच्छा नाही. अशा उपोषणाकरिता पुरेसे कारण असले पाहिजे. यामुळे प्रश्न निर्माण होतो - ज्यांना रेशन मिळते त्यांची आपले रेशन इतरांबरोबर (३०० लोकांबरोबर) वाटून घेण्याची तयारी आहे काय? जर ते तयार असतील तर या प्रकरणावर विचार होईपर्यंत त्यांनी असे करावे.

'माय डेज विथ गांधी', पृष्ठ १२०-१

-------------------

# २०८. जे. एस्केलटन यांना पत्र

श्रीरामपूर, जिल्हा नोआखाली,

डिसेंबर २३, १९४६

प्रिय मित्र,

या महिन्याच्या १० तारखेच्या तुमच्या पत्राकरिता, जे इथे १७ तारखेला मिळाले, मी आभारी आहे (बिहार आणि नोआखालीमध्ये नवल वाटावे असे गांधीजी जे काम करत होते त्याबद्दल गांधीजींचे आभार मानणारे पत्र). इंग्रज धर्मोपदेशक सांगतात त्याप्रमाणे माणूस जेव्हा कर्तव्य पार पाडतो तेव्हा तो खरे पाहता आपली जबाबदारी पाड पाडत असतो. जबाबादारी पार पाडणे हा जर प्रशंसनीय गुण होणार असेल तर आपण फार दयनीय अवस्थेत आलो असे म्हणावे लागेल. मी नोआखाली आणि बिहारमध्ये जे काही करतो आहे ते अधिक काही नसून जबाबदारी पार पाडण्याचा गंभीरपणे केलेला तो प्रयत्न आहे. माझ्या दृढनिश्चयाची आज सत्त्वपरीक्षा होत आहे. प्रचंड प्रमाणात संशय, अविश्वास आणि अतिशयोक्तीने भरलेल्या या वातावरणात मी विचार, वाणी आणि वर्तन यातून सत्य आणि अहिंसेच्या तत्त्वाचा धरून राहू शकेन काय? यामुळे या सत्त्वपरीक्षेत मला अपयश येऊ नये अशी जी मी प्रार्थना करतो आहे तिला तुमच्या प्रार्थनेची जोड मिळाली तर मला आनंदच होईल.

तुमचा विश्वासू,

मो. क. गांधी

सार्जंट जे. एस्केलटन

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

---------------

# २०९. जयसुखलाल गांधी यांना पत्र

डिसेंबर २३, १९४६

चि. जयसुखलाल,

मनूडीने मला आज सकाळी ६ वाजताच आठवण दिली आणि मी हे लिहायला सुरुवात केली. तुला माहीतच आहे की हा माझा मौनवार आहे. रतिलालने धुनाई केलेल्या कापसापासून तयार केलेल्या पेळूंचा नमुना तू मला दिला. मी त्या सर्वांचे सूत कातले. रतिलालच्या उपक्रमाला माझ्या शुभेच्छा. मनूडी एकदम चांगली आहे. ती मला समाधान देते आहे. ती मला सांगत होती की परमानंद गांधी (गांधीजींचे चुलत भाऊ) जितक्या गोड आवाजात रामायण म्हणत असत तितक्याच गोड आवाजात तू रामायण म्हणत असतो. मी जेव्हा हे ऐकले तेव्हा मला हे आधी माहीत नसल्याबद्दल वाईट वाटले; मला जर हे माहीत असते तर मी तुला निश्चितच थांबायला आणि काही भाग म्हणून दाखवायला सांगितले असते. परमानंद भाईंचा गोड आवाज अजूनही माझ्या कानात घुमतो. तू त्यांना पाहिले असशील असे मला वाटत नाही. कालिदासला (परमानंद गांधी यांचा मुलगा.) त्यातील थोडासा वारसा मिळाला आहे. आता ईश्वराची इच्छा असेल तेव्हाच आपली भेट होईल. माझी सूचना लक्षात ठेव.

आशीर्वाद,

बापू

गुजराती मायक्रोफिल्मवरून. एम. एम. यू.। २४

-----------------

## २१०. अमृतलाल वि. ठक्कर यांना पत्र

सकाळी ६ वाजता, डिसेंबर २३, १९४६

बापा,

तुम्ही खूप मेहनत करत आहा, परंतु सुचेताप्रमाणे तुमचा गोंधळ का उडायला पाहिजे? बहुतेक ठिकाणी असेच सुरू असते. आपण कुठे जरी असलो तरी आपल्याकडून होईल ते आपण केले पाहिजे व त्यावर समाधान मानले पाहिजे. आपणापैकी कोणीही सर्वशक्तिमान नाही. अनेक सर्वशक्तिमान असते तर तुम्ही आणि मी इथे नसतो. तो एकच आहे आणि जो कोणतीही हालचाल न करता आपणा सर्वांना नियंत्रित करत असतो; आणि आपण त्याच्या सुरावर नाचलो पाहिजे. मी तुम्हाला लांब प्रवचन ऐकवणार नाही. मला वेळ कुठे आहे?

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

------------

## २११. कांचन आणि मुन्नालाल गं. शाह यांना पत्र

डिसेंबर २३, १९४६

कांचन आणि मुन्नालाल,

त्यांना जेव्हा लिहावेसे वाटेल तेव्हा ते लिहितील. त्यानी माझ्या पत्राची वाट पाहायला नको. माझी परिस्थिती इतकी दुःखद आहे की मी लिहीन अथवा लिहिणार नाही.

आशीर्वाद

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ८४१२. शिवाय सी. डब्ल्यू ५६१८. मुन्नालाल गं. शाह

--------------

# २१२. सी. गो. रानडे यांना पत्र

श्रीरामपूर,

डिसेंबर २३, १९४६

भाई रानडे,

तुमच्या डिसेंबर ७, १९४६च्या पत्रापर्यंत मी आजच पोहोचू शकलो. मी सध्या एका महान यज्ञात गुंतलो आहे आणि सध्या मी इतर कोणत्याही कामाचा नाही. साने गुरुजींच्या आग्रहाने तुम्ही सुरू केलेल्या हजार लोकांच्या सहभोजनाच्या योजनेला यश येवो.

तुमचा,

मो. क. गांधी

सी. गो. रानडे,

पुणे.

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-----------------

# २१३. प्रार्थना प्रवचन

("श्रीरामपूर डायरीतून" उद्धृत)

श्रीरामपूर,

डिसेंबर २३, १९४६

गांधीजी सुरुवातीलाच म्हणाले की माझ्या नावाने आलेल्या अनेक व्यक्तिगत पत्रातून आणि वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित झालेल्या अनेक लेखांमधून आणि टीकाटिपण्यांमधून असे सांगण्यात आले आहे की नोआखालीतील माझ्या वास्तव्यामुळे हिंदू मुसलमानांच्या संबंधात सामंजस्य निर्माण होण्याऐवजी मतभेदाची दरी वाढत आहे कारण माझ्या येथील वास्तव्यामागे बंगालच्या मंत्रिमंडळाला बदनाम करण्याचा माझा हेतू आहे.

नोआखालीत मोठ्या प्रमाणात सत्याग्रह सुरू करण्याची गुप्त योजना मी आखत आहे या अफवेचे खंडन करण्याचा दोन दिवसांपूर्वी मी प्रयत्न केला होता. मी आधीच म्हणालो आहे की मी कोणतेही काम गुप्तपणे करत नसतो. गुप्तपणा आणि खोटेपणा यांचा आधार घेतला गेला तर सत्याग्रहाचे रूपांतर दुराग्रहात होत असते.

आज मला माझ्यावरील दुसऱ्या आरोपाचे खंडन करणे आवश्यक वाटते ज्याचा मी आधीच उल्लेख केला आहे. बंगालमधील दोन समुदायात दुरावा निर्माण झालेला असल्यामुळे तो दूर करून त्यांना सांधण्याच्या व अंतःकरणाचे ऐक्य निर्माण करण्याच्या एकमेव दृष्टीने मी बंगालमध्ये आलो आहे हे मी घोषित करू इच्छितो. हे उद्दिष्ट समाधानकारक प्रमाणात साध्य झाल्यानंतर मला माझा येथील मुक्काम वाढवण्याची मुळीच इच्छा नाही.

गांधीजी पुढे म्हणाले की बंगालमधील लीग सरकारच्या अडचणी वाढतील वा बदनामी होईल असे काही करण्याची माझी इच्छा नाही. उलटपक्षी मंत्रिमंडळातील लोकांशी आणि अधिकाऱ्यांशी माझे सौहार्दपूर्ण संबंध आहेत आणि ते सर्व माझ्या शांतताकार्याच्या बाजूने आहेत असे माझे मत झाले आहे. माझ्या उपस्थितीमुळे कोणाची संकुचित अवस्था होत असल्याचे आतापर्यंत तरी मला आढळलेले नाही. मी काही चूक केली असेल तर ती माझ्या लक्षात आणून देऊन त्याबद्दल माझी खात्री पटवून द्यायला जिल्हा न्यायाधीशांना आणि पोलीस अधीक्षकांना सांगणे हे बंगाल सरकारचे काम आहे. आतापर्यंत तरी ते या अर्थाचे काहीही बोललेले नाहीत. माझ्याकडून काही चूक झालेली आहे याबद्दल जर माझी खात्री पटली तर मी येथून निघून जाईन.

गांधीजी म्हणाले की इतरत्र मला बरेच काम आहे आणि त्याकरिता माझी उपस्थिती तिथे आवश्यक आहे. उरुळी कांचन येथील निसर्गोपचार केंद्रात निसर्गोपचारावरील माझे प्रयोग सुरू आहेत, तसेच ते सेवाग्राम आणि दिल्लीसुद्धा सुरू आहेत. तिथेसुद्धा माझा काही उपयोग होऊ शकतो. माझा सल्ला घेण्याकरिता या आडमार्गावरील गावात येणाऱ्या पुढाऱ्यांचा त्रास वाचवण्याची माझीही इच्छा आहे. परंतु इथे मी सुरू केलेले काम संपूर्ण हिंदुस्थानकरिता सर्वात महत्त्वाचे आहे असे माझे वैयक्तिक मत झालेले आहे. मला जर सध्याच्या माझ्या कामात यश आले तर त्याचा हिंदुस्थानच्या

**भवितव्यावर खोलवर ठसा उमटणे अपरिहार्य आहे. इतकेच नाही तर इथे अहिंसेवरील श्रद्धेची परीक्षा होणार असल्यामुळे जागतिक शांततेच्या भवितव्यावरही याचा प्रभाव पडेल असे मी म्हणालो तर ते वावगे ठरू नये.**

**माझ्याकडे बिहारमध्ये झालेल्या अत्याचारांसंबंधीचा बिहार मुस्लिम लीग पक्षाने तयार केलेला अहवाल पाठवला आहे. मी तो अहवाल काळजीपूर्वक वाचला आणि तो अतिशयोक्तीने भरलेला आहे असे मला वाटते. असे असले तरी त्या अहवालाच्या आधारावर मी चौकशी करत आहे. बिहारमध्ये जे काही घडले त्यातील बरेचसे पाशवीपणाचे आहे असे म्हणता यावे असे ते कृत्य होते आणि त्याची भर्त्सना करणे आवश्यक आहे. अतिशयोक्तीने वास्तविकतेतील भयानकतेला झाकून टाकले आहे. शांतता परत प्रस्थापित करण्यात आली असल्याबद्दल मला आश्वस्त करण्यात आले आहे. याच आश्वासनाच्या बळावर मी परत माझा नेहमीचा आहार घेण्याकरिता सुरुवात केली आहे** (नोव्हेंबर १९पासून; पाहा "वृत्तपत्रांना वक्तव्य", नोव्हेंबर २०, १९४६.).

**गांधीजी बिहारमध्ये का गेले नाही याचे कारण सांगत गांधीजी म्हणाले की इतक्या दूरवरूनही मी बिहारवर माझा वैयक्तिक प्रभाव पाडू शकतो. परंतु बिहारमध्ये लीगच्या अहवालात नमूद केलेले असल्याप्रमाणे अजूनही तसेच सुरू आहे अशी शंका घेण्याकरिता काही कारण असेल तर आणि माझ्या मित्रांनी खोटे आश्वासन देऊन मला भ्रमित करण्याचा प्रयत्न केले असतील तर मग माझे स्थान निश्चितच त्या प्रांतात असेल आणि याचा अर्थ असाही होऊ शकेल की या देहातील माझ्या जीवनाचा काळ संपलेला आहे आणि या देशात जिवंत राहण्याकरिता मला कोणतेही स्थान उरलेले नाही.**

**परंतु सावधगिरीचे दोन शब्द सांगितल्याशिवाय मी राहू शकत नाही. जनतेत काम करणाऱ्या पुढाऱ्यांवर फार मोठी जबाबदारी आहे. ते जे काही म्हणतील त्यावर साधेभोळे लोक चटकन विश्वास ठेवतात आणि त्याचे काय दुःखद परिणाम होतात हे तुम्हाला माहीतच आहेत. हे मी काँग्रेसच्या तसेच मुस्लिम लीगच्या पुढाऱ्यांना अनुलक्षून म्हणतो आहे.**

'हरिजन', जानेवारी १९, १९४७

----------------

# २१४. रोजनिशीतील नोंदी

(प्यारेलाल लिहितात, : "असत्य, कर्तव्याकडे दुर्लक्ष वा त्यांच्या सहकार्यांमधील अपूर्णता या गोष्टींचे कारण आपल्या स्वतःमधील उणिवा आहेत असे गांधीजींना वाटत होते. . . .  एक दिवस त्यांना आपल्या एका सहकाऱ्याच्या चेहऱ्यावरील भाव बदललेले दिसले आणि त्यांनी आपल्या रोजनिशीत खालील नोंद केली. . . . काही दिवसांनंतर तोच कार्यकर्ता त्यांना न सांगता शिबिरात उपस्थित नव्हता. त्याला वाटत होते की ही क्षुल्लक बाबा आहे आणि यात सांगण्याची काही आवश्यकता नाही. परंतु गांधीजींनी या गोष्टीची गंभीर दखल घेतली आणि नंतर ते उद्गारले की माझ्यासमोरील काम किती कठीण आहे याची मला क्षणात जाणीव झाली. त्यांच्या एका विश्वासू कार्यकर्त्याने एका दुसऱ्या सहकाऱ्याजवळ एक विधान केले होते आणि नंतर त्याने जेव्हा ते नाकारले तेव्हा ते दुःखाने व्याकूळ झाले होते. अजून एका प्रसंगी त्यांना राग आला आणि सायंकाळच्या प्रार्थना प्रवचनात जोपर्यंत त्यांनी त्याची कबुली दिली नाही तोपर्यंत त्यांना स्वस्थ वाटत नव्हते.")

सोमवार, डिसेंबर २३, १९४६

आज गाढ झोप लागली. सकाळी ३.१५ वाजता जाग आली. नाराज होतो. येथील काम कसे पूर्ण करू? माझी अहिंसा किती शक्तिशाली आहे आणि माझ्यात तिच्याबद्दलचे कौशल्य कितपत आहे? (यापुढील मजकूर 'महात्मा गांधी - द लास्ट फेज'मधून घेतला आहे.) माझ्यासमोरील अनेक समस्या मी कसा सोडवू शकेन? माझ्या चोहोकडे जाळ पेटलेला आहे. . . . आज माझा मौनवार आहे याबद्दल हे ईश्वरा मी तुझा आभारी आहे. शिबिरात अधिकाऱ्यांकडून मिळणाऱ्या वाईट वर्तणुकीकरिता उपोषण करू नये असा सल्ला मी निर्वासितांना दिला .... अब्दुल्लांनी मला दोन पत्रक दिले. त्यात माझ्या कार्याला विरोध करण्यात आला होता व मला नोआखालीतून काढून टाकण्याची मागणी करण्यात आली होती.

गुजरातीवरून. 'एकला जानो रे', पृष्ठ २२; आणि 'महात्मा गांधी - द लास्ट फेज', खंड १, भाग २, पृष्ठ ११४ ('महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड २, पृष्ठ १३८-३९)

-----------

# २१५. हसन शहीद सुऱ्हावर्दी यांना पत्र

डिसेंबर २४, १९४६

मत्प्रिय शहीद,

फरीदपूरमध्ये आपली जी सुखद भेट झाली होती तिची मी तुम्हाला आठवण करून देऊ इच्छितो. देशबंधू चित्तरंजन दास तेव्हाही जिवंत होते. माझी आठवण बरोबर असेल तर तुम्ही एकटेच बसून माझ्यासमोर कताई करत होता. तुमचा धागा समान आणि बारीक निघत नव्हता. माझी आठवण बरोबर असेल तर तुमच्यावरील प्रेम व्यक्त करणारे आणि काही अंतर व्यक्त करणारे कोणते तरी विशेषण जेव्हा मी वापरले तेव्हा माझी चूक दुरुस्त करत तुम्ही मला सांगितले की तुम्ही स्वतःला माझ्या मुलाप्रमाणे समजता. आजही तुम्ही तेच शहीद आहा आणि माझा मुलगा बंगालचा मुख्यमंत्री होण्याइतका मोठा माणूस झाला आहे या विचाराने मला अभिमान बाळगावासा वाटतो....(मूळ स्रोतात इथे वगळलेले आहे.).

माझी इच्छा आहे की बिहारऐवजी तुमच्या डोक्यात बंगालच अधिक राहावा. समजा प्रांतिक मुस्लिम लीगच्या अहवालात बिहारसंबंधी जे सांगितले आहे ते सर्व खरे आहे.... बंगालने बिहारप्रमाणेच वाईट होण्याकरिता ईश्वराला धन्यवाद देऊन तुम्ही समाधान तर मानत नाही ना?.... बिहारसंबंधीच्या ज्या निर्दयीपणाच्या गोष्टी तुम्हाला सांगण्यात आल्या आहेत त्या सर्व खऱ्या आहेत असे तुम्ही समजता असे दिसते आणि त्यामुळे तुम्हाला मेजवानीचा आनंद मिळाला असे वाटते. ... मी तुमच्यासमोर मोकळेपणाने सांगू इच्छितो की या तथाकथित घटना खरोखरच घडल्या यावर माझा विश्वास नाही. यांतील पन्नास टक्के गोष्टी जरी खऱ्या असल्या तरी माझ्याकरिता जगणे कठीण झाले असते. ... तुम्हाला माहीत असायला पाहिजे की मी इथे असलो तरी बिहारमधील घटनांना प्रभावित करण्यात मला यश आलेले आहे. त्याकरिता मी प्रथिने आणि स्निग्धांशविरहित आहार सुरू केला होता. आणि तरीही तेथील वातावरण शांत झाले नाही तर मी उपोषणाचा निर्णय घेतला होता (पाहा या आधीचा विषय).

मी जाहीरपणे सांगितलेले नसले, आणि तसे करण्याची कधीही आवश्यकता पडणार नाही अशी मला आशा आहे, तरीही बंगालच्या या भागातील घटना अगदीच सुखावह नाहीत. निर्वासितांवर अजूनही भीतीचा पगडा आहे. रेशन बंद करण्याची निर्वासितांना धमकी देण्यात येऊ नये. त्यांनी त्यांच्या घरी परत जावे म्हणून विविध मार्गाने प्रयत्न करता येऊ शकतात. त्यांनी आपल्या घरी खरोखरच परत जावे असे तुम्हाला वाटत

असेल तर त्यांना योग्य अन्न, ऊबदार कपडे आणि राहण्यायोग्य घरे पुरवायला पाहिजे.... निधीअभावी वा पुरेशा कार्यकर्त्यांच्या अभावी तसे करणे शक्य नसेल तर तसे जाहीर करणे ही गोष्ट तुमच्याकरिता सन्मानाची होईल. मग हे कार्य परोपकारी कार्य करणाऱ्या संस्थांना करू द्यावे. या हाकेला प्रतिसाद देणारे देशात अनेक कार्यकर्ते आहेत. तुम्हाला एकट्याला हा कार्यक्रम पार पाडणे शक्य होणार नाही. आणि या कामाबद्दल तुम्ही खरोखरच प्रामाणिक असाल तर या लोककार्याकडे पाहण्याकरिता तुम्ही एखाद्या मंत्र्याला इथे पाठवायला पाहिजे. तुम्ही असे केल्यास तुम्हाला मी स्वतःहोऊन कार्यक्षम पद्धतीने मदत करण्याकरिता तयार असल्याचे आढळेल. (या पत्राचे २५ डिसेंबरला उत्तर देताना सुऱ्हावर्दी लिहितात की मी नोआखालीकरिता एकाही मंत्र्याला पाठवू शकत नाही कारण “इथे कलकत्त्यात आधीच भरपूर प्रशासनिक काम आहे”. तुमच्या काही तक्रारी असतील तर तुम्ही त्या स्थानिक अधिकाऱ्याकडे “निश्चितच. . .माझा कोणताही आक्षेप नाही.”)

तुमचा,

बापू

‘महात्मा गांधी - द लास्ट फेज’, खंड १, भाग २, पृष्ठ १०४ (‘महात्मा गांधी - अखेरचं पर्व’, खंड २, पृष्ठ १२६-७)

---------------

# २१६. प्रार्थना प्रवचन

("श्रीरामपूर डायरी"मधून उदधृत)

श्रीरामपूर,

डिसेंबर २४, १९४६

**भाषणाची सुरुवात करत गांधीजी म्हणाले की लोकांची भीती जात नाही कारण गुन्हेगारीकरिता प्रसिद्ध असलेल्या किती तरी व्यक्ती मुक्तपणे हिंडत असल्याच्या तक्रारींचा पूर माझ्याकडे येतो आहे. गांधीजी म्हणाले की हे खरे असेलही, तरीही तुम्ही धीर धरून परत आपल्या घरी जावे असाच माझा तुम्हाला सल्ला आहे. अनेक लोकांनी तक्रार केली आहे की सरकारने परत घरे बांधण्याकरिता देऊ केलेली रक्कम इतकी कमी आहे की तिच्या सहाय्याने कोणत्याही प्रकारचे घर बांधता येऊ शकत नाही. यावर गांधीजी म्हणाले की निर्वासितांनी आपल्या घरी परतावे अशी जर सरकारची खरोखरच इच्छा असेल तर सरकारने या मदतीत आवश्यक तितकी वाढ करावी.**

**गांधीजी म्हणाले की माझी इच्छा आहे की या संकटावर स्वतःला विजय मिळवता येईल इतके निर्वासित व्यवहारकुशल असले पाहिजे. जो माणूस स्वतःकरिता मदतीची भीक मागणार नाही आणि आपल्या संरक्षणाकरिता इतरांवर अवलंबून राहणार नाही त्याचा मी सत्कार करीन. या कारणाकरिता जर कोणी माझ्यावर अवलंबून असेल तर तसे करणे हे फुटलेल्या नावेवर विसंबून राहण्यासारखे होईल.**

**खरे प्रभावी संरक्षण त्या चिरंतन शक्तीकडून म्हणजे ईश्वराकडूनच मिळत असते. प्रत्येकाने एक रहस्य लक्षात ठेवले पाहिजे ते हे की आपण जुलमाला शरण जातो म्हणूनच जुलूम टिकून आहेत. तुम्ही जर तुमच्या अंतःकरणातील भीती काढून टाकाल तर तुमच्यावर कोणीही जुलूम करणार नाही आणि करू शकणार नाही.**

'हरिजन'. जानेवारी १९, १९४७

-----------

# २१७. वल्लभभाई पटेल यांना पत्र

श्रीरामपूर,

डिसेंबर २५, १९४६

चि. वल्लभभाई,

तुम्ही प्यारेलालला लिहिलेले पत्र काल सरळ मला मिळाले. प्यारेलाल आणि इतर सर्व आपापल्या कर्तव्यात व्यग्र असून मृत्यूबरोबर खेळत आहेत. आम्ही जेव्हा एका ठिकाणी गोळा होऊ तेव्हाच तो तुम्हाला काही तरी लिहू वा पाठवू शकेल. तो सध्या असे करू शकत नाही. तुमचे पत्र काझिरखिलला गेले होते; त्यामुळे तिथून ते माझ्याकडे पाठवण्यात आले. प्यारेलालला तुमच्या पत्राची माहिती नाही. तो अधूनमधून प्रसंगोपात मला भेटायला येत असतो आणि यानंतर जेव्हा तो येईल तेव्हा तो हे पत्र वाचेल.

मी या पत्राचा मजकूर सकाळी ३ वाजता सांगत आहे. यानंतर सकाळी ४ वाजता मी हात-तोंड धुईन आणि त्यानंतर प्रार्थना. सध्या हाच दररोजचा कार्यक्रम आहे. ईश्वराची इच्छा असेल तरच माझे हे सुरू राहील. ते काहीही असले तरी माझ्या प्रकृतीची चिंता करण्याचे कारण नाही. शरीराकडून आपण जी मागणी करू त्याला शरीर प्रतिसाद देत असते, परंतु माझी परीक्षा होत आहे. माझ्या सत्य आणि अहिंसेला पारड्यात ठेवून त्यांचे मोजमाप सुरू आहे. हे मोजमाप इतके काटेकोरपणे सुरू आहे की एखादा सोन्या-चांदीचा व्यापारीही इतके काटेकोर मोजमाप करणार नाही. ते इतक्या सूक्ष्मपणे होत आहे की केसाच्या जाडीच्या एक शतांश भागाचीही त्यात नोंद होऊ शकेल. सत्य आणि अहिंसा हे स्वतः कधीही अपूर्ण असू शकत नाहीत. जर कुठे उणीव असेल तर ती माझ्यात असली पाहिजे कारण मी स्वतःहोऊन त्यांचा प्रतिनिधी झालो आहे; असे असेल तर त्याने मला घेऊन जायला पाहिजे आणि इतर कोणा प्रतिनिधीच्या माध्यमातून काम करायला पाहिजे. प्यारेलाल माझ्याकरिता जे काम करत होता ते मी करू शकत नाही आणि माझ्याबरोबर असलेल्या व्यक्तींनाही अजून ते करणे जमलेले नाही याचा मला खेद होतो. परंतु दोघेही फार हुशार आहेत. यामुळे त्यांना ते जमू शकेल अशी मला आशा आहे. मनूच्या स्वतःच्या इच्छेप्रमाणे तीन वा चार दिवसांपूर्वी जयसुखलाल तिला इथे सोडून गेला आहे. तिच्या अटीवर मी तिला इथे येऊन राहण्याची परवानगी दिली आहे आणि माझ्याबरोबर तिची जगण्याची आणि आवश्यकता पडली तर मरण्याचीही तयारी आहे. आता ताण येऊ नये म्हणून अंथरुणावर पडून डोळे मिटून या पत्राचा मजकूर मी तिलाच लिहून घेण्याकरिता सांगत आहे. सुचेतासुद्धा

(सुचेता कृपलानी) खोलीत आहे. ती अजूनही झोपलेली आहे आणि मी या पत्राचा मजकूर लाकडी फळीवर पडून हळू आवाजात सांगत आहे. तीन माणसे सहजपणे झोपू शकतील इतका हा तक्तपोस रूंद आहे. मी माझे सर्व काम यावरच करत असतो. तुम्ही माझ्याकडे पाठवलेल्या तारेला काहीही अर्थ नाही. इथे अतिशयोक्तीला सीमा नाही. असे नाही की लोक जाणूनबुजून अतिशयोक्ती करतात; त्यांना तर अतिशयोक्ती काय असते हेही माहीत नसते. स्थानिक वनस्पतीप्रमाणे त्यांची कल्पनाशक्तीही चोहोकडे बेसुमार फोफावत असते. माझ्या चोहोकडे नारळाची आणि पोफळीची झाडे आहेत व त्यांच्या सावलीत विविध प्रकारच्या हिरव्या भाज्या उगवत असतात. येथील सर्व नद्या सिंधू, गंगा आणि ब्रह्मपुत्रासारख्या विशाल आहेत. त्या आपले पाणी बंगालच्या उपसागरात ओतत असतात. तुम्हाला तार पाठवणाराला तुम्ही जर उत्तर दिले नसेल तर तुम्ही त्याला त्याने केलेल्या विधानाचा पुरावा मागा. घटनेप्रमाणे केंद्र सरकारला प्रांतांच्या कारभारात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नसला तरी पुरावा मिळाला तर केंद्र सरकार काही करू शकेल असे तुम्ही त्याला सांगावे असा माझा तुम्हाला सल्ला आहे. आणि अजून सांगा : 'तिथे तुमच्यामध्ये गांधी आहे व ते तुमचे ऐकणार नाही हे अशक्य आहे. परंतु ते सत्य आणि अहिंसेचे भक्त असल्यामुळे तुमची निराशा होण्याची शक्यता आहे. परंतु ते जर तुमचा अपेक्षाभंग करत असतील तर आम्ही त्यांचे शिष्य तुमचे समाधान कसे काय करू शकू? परंतु आमच्याकडून शक्य असेल ते आम्ही करू.' मी इथे असल्यामुळे कोणीही येथील समस्या तिथे आणू नये असे कोणालाही म्हणू नका उलट त्यांना सांगा की गांधी तिथे असले तरी आम्ही काही तरी करण्याचा प्रयत्न करू. त्यांच्या विरोधात जाऊनही काही करणे आवश्यक असेल तर तसे करणे हा आमचा धर्म आहे कारण गांधींनी आम्हांला हेच शिकवले आहे. त्यांना हे कळू शकले तर पाहा आणि त्यांना काय विचारायचे आहे ते मला सांगा.

येथील परिस्थितीत अनेक अडचणी आणि समस्या आहेत. सत्याचा कुठेही मागमूससुद्धा नाही. हिंसा अहिंसेचे रूप धारण करते आणि धर्माच्या नावावर घृणित अपराध केले जातात. परंतु अशाच परिस्थितीत सत्य आणि अहिंसा यांची परीक्षा होत असते. मला हे माहीत आहे आणि म्हणूनच मी इथे आहे. मला बोलावू नका. मी जर येथून घाबरून पळून गेलो तर ते माझे दुर्दैव असेल; परंतु अशी दुर्दैवाची वेळ आपल्या देशावर येईल असे मला वाटत नाही. मी इथे करण्याकरिता वा मरण्याकरिता आलो आहे. काल रेडिओवर बातमी आली होती की जवाहरलाल, कृपलानी आणि देव माझ्याशी सल्लामसलत करण्याकरिता येत आहेत. हे चांगले आहे. प्रत्येकाला मी भेटण्याची आवश्यकता काय? ते काहीही असले तरी तुमच्यापैकी कोणालाही मला काहीही विचारायचे असेल तर त्याचे स्वागत आहे. आसामबद्दल मी जे लिहिले होते (बहुधा हा संदर्भ

"आसाममधील काँग्रेसच्या लोकांशी चर्चा" या विषयाशी असावी; पाहा "आसामच्या काँग्रेसच्या लोकांना मुलाखत", डिसेंबर १५, ९१४६) ते ताबडतोब प्रकाशित करण्याकरिता नव्हते. ते कसे प्रकाशित झाले हे तुम्हाला कळले तर मला कळवा. परंतु माझा मुद्दा बरोबर आहे याबद्दल खात्री बाळगा. मी भट्टीत आहे. यामुळे यात काय होते आणि सत्य काय आहे हे मला चांगल्या प्रकारे कळते. [सरदार जीवनसिंग] (प्यारेलाल पेपर्सवरून निरंजन सिंग गिल हे काझिरखिल या मुख्यालयावरून मदत कार्याचे काम सांभाळत होते. १९ डिसेंबरच्या पत्रातून त्यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांना मदत कार्याच्या अंदाजत्रकाला मंजुरी देण्याची आणि त्याचबोरबर मदत कार्य करणारांची संख्या १०० वरून ३००पर्यंत व कार्यक्रमाचा काळही तीन महिन्यांपेक्षा अधिक वाढवावा अशीही विनंती केली. २२ डिसेंबरला सरदार वल्लभभाईंनी उत्तर दिले की तुम्ही दिलेली अंदाजपत्रकाची रक्कम फार मोठी असल्यामुळे गांधीजी तिला संमती देऊ शकत नाही आणि कार्यकर्त्यांची संख्याही १०० वरून ३०० पर्यंत नेता येऊ शकत नाही. तसेच मदत कार्याचा अवधीही ३ महिनेच राहील.) अनेकदा माझ्याकडे येत असतात, मला सल्ला मागतात आणि माझ्या सल्ल्याचे ते शब्दशः पालन करतील असे मला आश्वासन देत असतात. मला वाटते की मी त्यांच्यावर विश्वास टाकू शकतो. मला [सरदार निरंजन सिंग] (वरील टिपेप्रमाणे) यांची तार आली. ते म्हणतात की ते तुमची समजूत घालू शकले नाहीत. परंतु त्यांचे निश्चित काय म्हणणे आहे हे मला कळू शकले नाही. ते तिथे असतील आणि तुमची त्यांच्याशी भेट झाली तर त्यांना हे सांगा. आणि ते काय म्हणतात ते तुम्हाला कळले असेल तर मला ते कळवा.

तुम्ही बिहार [मुस्लिम] लीगचा अहवाल  पाहिला असेल. मी राजेंद्र बाबूंना त्याबद्दल लिहिले आहे तुम्हा सगळ्यांना यासंबंधातील माझा दृष्टिकोन समजून सांगितला आहे. मी मुख्यमंत्र्यांनासुद्धा लिहिले आहे (पाहा "हसन शहीद सुऱ्हावर्दी यांना पत्र", डिसेंबर २४, १९४६). त्यातील निम्मे जरी खरे असेल तरी ते भीषण आहे. बिहारच्या घटनांची अशी निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे की त्याबद्दल कोणीही शंका घेऊ शकणार नाही याबद्दल मला मुळीच शंका नाही. यात एका दिवसाचाही उशीर होऊ नये. या आरोपात जे काही तथ्य असेल ते सरळ सरळ मान्य करण्यात यावे. आणि इतर बाबी आयोगाकडे सोपवण्यात याव्या. तुमच्या मंत्रिमंडळातील मुस्लिम लीग सदस्यांशी यासंबंधात तुम्ही चर्चा करा. माझा सुऱ्हावर्दींशी पत्रव्यवहार सुरू आहे व तो सुरूच राहील. तो जेव्हा संपेल तेव्हा त्याच्या सर्व प्रती मी तुम्हाला पाठवेन. आपल्या दोघांमध्ये आतापर्यंत जे काही सुरू आहे ते जवाहर आणि इतरांनी पाहावे.

तुम्ही जर असे करत नसाल तर माझ्या प्रार्थना प्रवचनांचा जो सारांश वृत्तपत्रांना दिला जातो तो वाचा, वा वर्तमानपत्रातील त्यासंबंधीची कात्रणे पाहा. मणी (मणीबेन पटेल, वल्लभभाई पटेल यांची मुलगी.) तुम्हाला ती देऊ शकेल. तुमच्यावर कामाचे किती दडपण आहे हे मला इथे इतक्या लांबवरूनही कळते. परंतु काही गोष्टी अशा

असतात की कामाचे कितीही दडपण असले तरी माणसाला त्या कराव्याच लागतात. तुम्हाला सर्व माहिती देत राहणे हे त्यातील एक काम आहे.

तुम्ही चांगले असाल असे मी कसे म्हणू? तुमचे काम करण्यापुरते तुम्ही ठीक आहा असे मी गृहीत धरतो. तुम्ही तुमच्या प्रकृतीत सुधारणा घडवून आणू शकता हे मला माहीत आहे. दिनशांना (डॉ. दिनशा के. मेहता) बोलावा असा सल्ला मी अजूनही देईन. ते चांगले आणि प्रामाणिक गृहस्थ आहेत याबद्दल मला शंका नाही आणि ते परोपकारी वृत्तीचे आहेत. ते कार्यक्षम नसले तर काय होते? सुशीलाबद्दल (डॉ. सुशीला नाय्यर) तुम्ही विचारले होते. तिची प्रकृती फार चांगली आहे असे तर म्हणता येत नाही. ती सुद्धा रुग्णालय नसलेल्या खेड्यात आहे आणि चांगले काम करते आहे. या भागात तर जिथे अर्धवट डॉक्टरसुद्धा चांगला डॉक्टर गणला जाऊ शकतो तिथे सुशीला सारख्या लोकांबद्दल काय विचारावे? यामुळे आमच्या कोणाबद्दल काळजी करू नका. आणि प्रत्येकजण इथे जेव्हा मरणाच्या तयारीने आला आहे तेव्हा इथे जर कोणी आजारी पडला तरी तो फारशा काळजीचा विषय होऊ शकत नाही. कोणी मेला तर ठीक आहे.  इतकेच की मृत्यू शुद्ध असला पाहिजे आणि ख्याती वाढवणारा असला पाहिजे.

आशीर्वाद,

बापू

गुजरातीवरून. 'बापूना पत्रो - २ : सरदार वल्लभभाईने', पृष्ठ ३३६-४०

-------------

# २१८. फेनी उपविभागातील मुस्लिम लीगच्या सदस्यांना पत्र

डिसेंबर २५, १९४६

सद्गृहस्थहो,

तुमचे शाईने खरडलेले पोस्टकार्ड (निर्मल कुमार बोसनुसार त्यात संघटनेच्या ठरावाची प्रत होती. तो ठराव असा होता. - "नोआखालीपेक्षा, कारण इथे परिस्थिती सामान्य आहे, बिहारमध्ये श्रीयुत गांधींची उपस्थिती किती तरी जास्त उपयुक्त आहे. यामुळे त्यांना बिहारमध्ये जाण्याची विनंती करण्यात येत आहे.") मला आताच मिळाले आणि तुम्ही दिलेल्या सल्ल्याकरिता मी आभारी आहे. तुमच्या सल्ल्याप्रमाणे मी निश्चितच वागू शकत नाही कारण तो तुमच्या अज्ञानावर आधारलेला आहे. मी तुम्हांला सांगू इच्छितो की पहिली गोष्ट म्हणजे येथील परिस्थिती सामान्य नाही, आणि बिहारवर माझा जो काही प्रभाव आहे त्याचा प्रभावीपणे उपयोग मी इथे श्रीरामपूरमध्ये राहूनही करतो आहे.

तुमचा विश्वासू,

मो. क. गांधी

'माय डेज विथ गांधी', पृष्ठ १२२

-------------------

# २१९. जयसुखलाल गांधी यांना पत्र

डिसेंबर २५, १९४६

चि. जयसुखलाल,

मनूडीची सूचना आहे की तुझ्याजवळ तिचा जो पैसा पडून आहे त्यातून तू शंकरलालच्या गरजा भागव. मला ही सूचना फार आवडली. तिच्यातील उदारपणाच्या भावनेला प्रोत्साहन दिले पाहिजे. शिवाय शंकरलाल काही भीक मागत नाही. थोडे व्याजही देईल. यामुळे त्यात काही धोका नाही. आणि तो पैसा गमावला गेला तरी त्यामुळे काय फरक पडतो? तू इतर कोणत्या तरी स्रोतातून तेवढी रक्कम मिळवून देऊ शकतो. परंतु उत्तम स्रोत हाताशी असताना दुसरा स्रोत शोधण्याची आवश्यकता काय? मनूडी फार चांगले करते आहे. परिणाम ईश्वराच्या हातात आहे. तुझ्यासंबंधी मी केलेल्या सूचनेचा विचार कर.

आशीर्वाद,

बापू

गुजराती मायक्रोफिल्मवरून. एम. एम. यू.। २४

--------------

# २२०. प्रार्थना प्रवचन

श्रीरामपूर,

डिसेंबर २५, १९४६

**गांधीजी म्हणाले की शैलेन चटर्जीने, जे माझ्याकरिता पत्रकारापेक्षा स्वातंत्र्य प्राप्तीच्या ध्येयातील एक सहकारी म्हणून जास्त आहेत, मला विचारले की आज ख्रिसमसचा दिवस असल्यामुळे आजच्या प्रार्थना प्रवचनात तुम्ही ख्रिश्चन धर्माबद्दल काही सांगाल काय, कारण मागील ख्रिसमसच्या वेळी तुम्ही असे केले होते. गांधीजी म्हणाले की मी यासंबंधात विचार करायला पाहिजे होता परंतु तसा काही विचार मी अजून केलेला नाही,**

**त्यांनी मला याची आठवण दिली याकरिता मी त्यांचा आभारी आहे आणि  गांधीजी श्रोत्यांना म्हणाले की मी ही सूचना किंचितही माागेपुढे न पाहता मान्य केली आणि मग काय बोलावे याचा मी विचार केला. कोणता विषय घ्यावा हे काही मला कळत नव्हते कारण जगात प्रत्येक ठिकाणी अधर्म धर्माचे रूप घेताना दिसतो.**

**या प्रसंगाला शोभेल असे काही तरी शोधत असताना मला त्या दोन सुंदर वह्यांची आठवण झाली ज्यात राजकुमारीने बायबल आणि ख्रिश्चन धर्मातील स्तोत्रांमधील रत्नासारख्या काही उत्तम गोष्टींचा संग्रह केला होता. केंद्रातील तुमचे विदेश मंत्री पंडित नेहरूंनी पॅरीसमध्ये होणाऱ्या शिक्षण संमेलनाकरिता हिंदुस्थानचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या शिष्टमंडळातील प्रतिनिधी म्हणून राजकुमारीची निवड केली आहे. कपूरथळा येथील संस्थानिकाच्या कुटुंबातील त्या सदस्य आहेत. त्यांचे वडील त्या गादीवर बसले असते परंतु ते ख्रिश्चन असल्यामुळे तसे करू शकले नाही. राजकुमारीला शीख, हिंदू आणि ख्रिश्चन असल्याबद्दल अभिमान वाटतो. आणि त्यांनी दीनदलितांच्या बाजूने उभे राहायचे ठरवले आहे. मी राजकुमारीच्या संग्रहातील काही सर्वोत्तम वचन निवडले आहेत. दोन दिवसांपूर्वीच मी तुम्हांला महम्मद पैगंबरचे दोन वचन सांगितले होते.**

**सर्व धर्मांबद्दल समान आदरावर माझा विश्वास आहे. केवळ सहन करण्याला फारसा अर्थ नसतो. कोणत्याही खऱ्या धर्माला कोणाच्याही संरक्षणाची आवश्यकता नसते. तो तर असा असला पाहिजे की लोकांना सहजपणे त्याचा आदर वाटला पाहिजे. कोणाला हवे असेल तर तो येशूला केवळ ख्रिश्चन धर्माचा मानू शकतो. परंतु खरे पाहता त्यांनी दिलेली शिकवणूक ही कोणत्याही एका धर्माकरता नव्हती. त्यांनी दिलेली शिकवण तर सर्व जगाकरिता होती.** (हे वाक्य जानेवारी २६, १९४७च्या हरिजनमधून घेतले आहे.) **यानंतर त्यांनी निर्मल बोसना नवा करारमधील प्रेमावरील पुढील दोन वचनांचा** (कॉरेन्थियन्स, १३). **अनुवाद करायला सांगितले*. ते म्हणाले की मी प्रेमालाच अहिंसा म्हणत असतो.***

'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड'. डिसेंबर ३०, १९४६; आणि 'हरिजन', जानेवारी २६, १९४७

---------------

# २२१. प्रश्नोत्तरे

(इथे दिलेली नाहीत.)

डिसेंबर २६,१९४६

**प्रश्न १ - निम्मे संयुक्त आणि निम्मे वेगळे मतदारसंघ ठेवण्यापेक्षा राखीव जागा ठेवून शुद्ध संयुक्त मतदार संघ असणे अधिक चांगले नाही काय?**

उत्तर - तुमच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर आहे होय. दुसरा अतिशय कठीण आहे.

**प्रश्न २- तुम्ही जेव्हा हरिजनांमधील अस्पृश्यतानिवारणाबद्दल बोलता तेव्हा तुम्ही कोणाचा उल्लेख करत असता? आपच्यापैकी कोणत्या गटाचा? कारण आमच्यामधील काही अनुसूचित जातीचे लोक इतरांपेक्षा स्वतःला श्रेष्ठ समजत असतात.**

उत्तर - तथाकथित अस्पृश्यांमधील अस्पृश्यता मिटवणे हे सवर्ण हिंदू आणि अवर्ण म्हणजे अस्पृश्य यांच्यातील अस्पृश्यता मिटवण्यापेक्षा जास्त कठीण आहे या तुमच्या मताशी मी सहमत आहे.

**प्रश्न ३. - अस्पृश्यांमधील राजकारणात साहस करणाऱ्या चंचल प्रवृत्तीच्या लोकांवर अस्पृश्योद्धाराचे काम सोपवण्यापेक्षा काँग्रेसच्या लोकांनी हरिजनसेवेचे काम प्रामाणिकपणे आपल्या अंगावर घेतले तर आमच्या परिस्थितीत खरोखरीची सुधारणा होणार नाही काय?**

उत्तर - तुमच्या तिसऱ्या प्रश्नाचे निःसंशय उत्तर होय असे आहे.

**प्रश्न ४ - शरत बाबू, किरण बाबू यांच्यासारखे काँग्रेसचे लोक इथे क्रमांक १ ते ७ मधील संदेश अनुसूचित जातींमध्ये पसरवण्याचे काम करू शकत नाहीत काय?**

(हे प्रश्न विद्याधर मंडल, अध्यक्ष नामशुद्र हितैषी समिती यांनी विचारले होते.)

उत्तर ४. - मला वाटते तुम्ही उल्लेख केलेल्या सद्गृहस्थांनी हे संदेश पसरवण्याकरिता आपल्या परीने भरपूर मेहनत घेतली आहे. वेळ असलेले इतरही अनेक लोक तुम्ही उलेल्ख केलेले संदेश पसरवण्याचे काम दीर्घ काळापासून करत आहेत.

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

---------------

# २२२. अमृतलाल वि. ठक्कर यांना पत्र

श्रीरामपूर,

डिसेंबर, २६, १९४६

बापा,

मला तुमचे पत्र मिळाले. शिखांतर्फे दोन लोक निश्चित येणार आहेत. त्यांना पाठवण्याची मी घाई करणार नाही. तुम्ही ज्या गतीने जात आहा त्या गतीने मी जाऊ शकत नाही हे मी कबूल करतो. असे का हे मला माहीत नाही. आज मी दोन वाजतापासून जागा आहे. त्यामुळे मला त्रास होत नाही. आजकाल मी तीन वाजता उठायची सवय लावली आहे. तरीही दिवसभराचे काम मी संपवू शकतो असे मला वाटत नाही. जवाहरलाल येईल तेव्हा तुम्ही येण्याची आवश्यकता नाही. ते फार कष्टाचे होईल. तुम्ही नुकताच तापातून उठला हे पाहता तुम्ही स्वतःवर इतका ताण टाकू नये. तुम्ही दिल्लीला जर काही दिवसांनंतर गेला तर शक्य आहे की त्या वेळी मीसुद्धा तिथे असेन. जर हे शक्य नसेल तर तुम्ही दिल्लीत नसताना मी तिथे असेन. पंख फुटलेल्या आभाशी मी आता बराच वेळ बोललो. तिची आता गावात राहण्याची तयारी आहे व सतीशबाबूंशी सल्लामसलत करून तिने येथून पाच मैल अंतरावर असलेल्या चंडीग्रामची निवड केली आहे. ती अनेक मुसलमान कुटुंबांना भेटली. इथेसुद्धा काही स्त्रियांशी भेट करून देण्याच्या आशेने ती मला घेऊन गेली होती, परंतु त्या स्त्रिया बाहेर आल्याच नाही. आभाला वस्तुस्थितीची जाणीव झाली. स्त्रिया येणार नाहीत हे मला आधीच माहीत होते, परंतु मी आभाबरोबर गेलो कारण आभाने त्यांना वचन दिले होते. महिला आश्रमात पाठवण्याकरिता ज्या दोन मुलींची तुम्ही निवड केली आहे त्यांच्याबद्दल आभा माझ्याशी बोलली. शांताबाईचासुद्धा सल्ला घेतला. लहानीला महिला आश्रमात पाठवायचे आहे आणि मोठ्या मुलीला (मालती चौधरी) बालिकाश्रमात. यामुळे दोघींनाही वेगवेगळे अनुभव येतील. मला त्यात फायदा दिसतो.

तुम्ही वेगवेगळ्या ठिकाणी लोकांकरिता जे कार्यक्रम ठेवले आहेत त्यात तुम्ही घाई तर करत नाही? परंतु या शंकेनंतरही मला यासंबंधात अधिक काही सांगायचे नाही.

आता आभाबद्दलच्या माझ्या सल्ल्याशी तुम्ही सहमत असाल तर माझी सूचना आहे की तुम्ही तिला लवकर पाठवावे म्हणजे ती काम सुरू करू शकेल. माझ्या दौऱ्यातील पहिले ठिकाण चंडिग्रामच राहणार असल्यामुळे मी असे म्हणतो. मी तिथे पोहोचण्याआधी तिथे गेलेले तिला आवडेल आणि मलासुद्धा. मालती

जर तिथे आधीच आलेली असेल तर मला काही म्हणायचे नाही. परंतु आताच ती आली नसेल तर तिला बोलावू नका.

बापू,

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-----------------

## २२३. वल्लभभाई पटेल यांना पत्र

श्रीरामपूर,

डिसेंबर, २६, १९४६

चि. वल्लभभाई,

मी हे पत्र लिहवून घेत आहे कारण मला तुम्हाला डॉ. फिशरबद्दल सांगायचे होते. दिनशाजींनी मला त्यांच्याबद्दल लिहिले होते. काम संपतच नाही, काही ना काही शिल्लक राहतेच. माझे काय होणार आहे तेच मला कळत नाही. माझ्यासमोर जरी संपूर्ण काळोख असला तरी मी आनंदात आहे आणि माझी प्रकृती उत्तम आहे. माझ्याबद्दल मुळीच काळजी करू नका. दिनशाजींनी शिफारस केलेली व्यक्ती जर राहू शकत असेल तर माझ्या मते तिला परवानगी द्यावी. परंतु तुमच्या कर्तव्याच्या आड ती गोष्ट येत नसेल तरच तसे करा. मी अधिक काही सांगू शकत नाही. तुमच्या प्रकृतीची काळजी घ्या.

आशीर्वाद,

बापू

गुजरीवरून. बापूना पत्रो - २ : सरदार वल्लभभाईने, पृष्ठ ३४०

----------------

# २२४. प्यारेलाल यांना पत्र

डिसेंबर २६, १९४६

चि. प्यारेलाल,

मला कोमिल्लाला जावे लागले नाही हे माझे भाग्य. परंतु मी तुला सांगतो की आपण वेगवेगळ्या खेड्यात राहत असल्यामुळे आपण इतरत्र कुठेही जाण्याचा मोह सोडला पाहिजे - कार्यकारिणीच्या सभेकरितासुद्धा. सध्या तरी आपले संपूर्ण लक्ष आपापल्या खेड्यावर केंद्रित झालेले असले पाहिजे. असे झाले तरच आपण यशाची आशा करू शकतो. हे काम कठीण आहे. परंतु हेच करण्यासारखे आहे. मलासुद्धा कार्यकारिच्या सभेला उपस्थित राहण्यात रस नाही. परंतु हजर राहणे माझे कर्तव्य असू शकेल. परंतु याकरितासुद्धा मला फार दूर जाणे आवडणार नाही. तू जेव्हा इथे येशील तेव्हा तुला हे चांगले समजू शकेल. आशा आहे की जखमेत पू भरावा म्हणून तूच हातात काटे टोचून घेतले नसतील.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संगर्हालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

--------------

# २२५. प्रार्थना प्रवचन

("श्रीरामपूर डायरी"मधून उद्धृत. डायरीत लिहिले आहे की "ज्या लोकांनी नोआखालीत सेवा करण्याची तत्परता दाखवली होती त्यांना गांधीजींनी विचारले की मी इथून गेल्यानंतरही इथे जर आवश्यकता असली तर तुम्ही संपूर्ण आयुष्य या लोकांची सेवा कराल काय. अशी कबुली देण्याकरिता ते मागेपुढे पाहत होते. यामुळे जे लोक अशा प्रकारे पुढे येऊन सेवा करू इच्छितात ते सेवेकरिता सेवा करत नाहीत तर माझे लक्ष त्यांच्याकडे वेधले जावे म्हणून असे करतात असे गांधीजींना वाटले." )

श्रीरामपूर,

डिसेंबर २६, १९४६

**गांधीजी म्हणाले की ब्रिटिश हिंदुस्थान सोडून जातील याबद्दल माझ्या मनात किंचितही शंका नाही. परंतु हिंदुस्थानी जर आपसात भांडत बसण्याइतके मूर्ख असतील तर देशाचे भवितव्य काय आहे याची मी सहजपणे कल्पना करू शकतो. मग हिंदुस्थानला संयुक्त राष्ट्र संघाच्या देखरेखीखाली ठेवले जाऊ शकते. याचा अर्थ हिंदुस्थानचे एक नाही तर अनेक मालक असतील आणि यामुळे आपल्याला स्वातंत्र्याला नेहमीकरिता निरोप द्यावा लागेल.**

**लवकरच मी माझ्या जीवनातील सर्वात मोठा प्रयोग करणार आहे. बहुधा तो माझा शेवटचा प्रयोग असेल. माझ्याजवळ बी. ए., एम. ए. अशी कोणतीही पदवी नाही. परंतु नोआखालीत मी जी परीक्षा देत आहे तिच्यात जर मी यशस्वी झालो तर मी समजेन की मला जीवनातील एम. ए. सारखी सर्वोच्च पदवी मिळाली. आणि मला त्या परीक्षेत जर यश मिळाले तर त्या पदवीसह मला जे काही मिळेल त्यात मी हिंदुस्थानातील कोट्यवधी जनतेना सहभागी करून घेईन.** (हा परिच्छेद 'द हिंदू'मधून घेण्यात आला आहे.)

**गांधीजी पुढे म्हणाले की बंगालमध्ये मी जे काम सुरू केले आहे ते अतिशय गंभीर आहे. इथे कालपरवापर्यंत माझ्याशी मैत्रीभावाने वागत असणारा एक समुदाय आज माझ्याकडे शत्रू म्हणून पाहतो आहे. मी "मुसलमानांचा खरा मित्र आहे" हे त्यांना दाखवून देण्याकरिता मी निघालो आहे. यामुळे माझ्या जीवनातील सर्वात महान प्रयोग करण्याकरिता मुसलमान बहुसंख्य असलेला हा भाग मी निवडला आहे.**

**माझे हे जीवनकार्य पूर्ण करण्याकरिता या ग्रामीण भागात मी एकट्याने फिरणे आवश्यक आहे. परंतु माझा सल्ला व मार्गदर्शन घेण्याकरिता बाहेरून आलेल्या कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमुळे ही जटिल समस्या सोडवण्याच्या दृष्टीने मला मदत होण्याऐवजी माझ्यासमोर नवीन समस्या निर्माण होत आहेत. जे लोक नोआखालीतील लोकांची मदत करण्याकरिता खरोखरच उत्सुक आहेत ते जर सरळ बंगालच्या मंत्र्यांकडे आपली योजना घेऊन गेले आणि नोआखालीत काम करण्याकरिता केवळ लेखी परवानगीच नाही तर कामाच्या आपल्या योजनेला त्यांनी त्यांची मान्यता मिळवली तर बरेचसे गैरसमज दूर होऊ शकतील.**

**उपद्रवग्रस्त भागातील निर्वासितांना वैद्यकीय मदत करण्याकरिता काल मुंबईहून जी डॉक्टरमंडळी आली होती त्यांना गांधीजींनी हाच सल्ला दिला होता. काही लोकांनी पत्र आणि तारा पाठवून नोआखालीकरिता आपली सेवा देण्याची इच्छा व्यक्त केली होती. गांधीजींनी त्यांना उत्तर दिले की तुम्ही जर तुमच्याच गावाच्या आजूबाजूला रचनात्मक कार्य कराल तर तुम्ही या कार्याला मदत करू शकाल. नोआखालीची जास्तीत जास्त चांगली सेवा करता यावी म्हणून काही लोकांनी गांधीजींना मार्गदर्शन मागितले होते. त्यांना गांधीजी म्हणाले की मी स्वतःच काळोखात चाचपडतो आहे, आंधळा माणूस मार्गदर्शन करण्याकरिता पात्र नसतो.**

'हरिजन', जानेवारी २६, १९४७; आणि 'द हिंदू', डिसेंबर २९, १९४६

----------------

## २२६. डायरीतील नोंदी

डिसेंबर २६, १९४६

सर्व काही चुकीच्या मार्गाने जात असल्याचे दिसते. चोहोकडे खोटेपणा भरलेला आहे.

'महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड २, पृष्ठ १४०

------------------

# २२७. हमिदुद्दिन अहमद यांना पत्र

(बंगाल सरकारच्या वाणिज्य मंत्र्यांचे सासदीय सचिव)

डिसेंबर २७, १९४६

प्रिय हमिदुद्दिन साहेब,

या महिन्याच्या १४ तारखेच्या आझादमध्ये तुम्ही लिहलेला लेख निर्मल बाबूंनी मला वाचून दाखवला. तो वाचून मी थक्क झालो आणि निर्मल बाबूंना मी त्याचा शब्दशः अनुवाद करून द्यायला सांगितले. त्यात काही चूक असेल तर ती तुम्ही कृपा करून मला कळवाल.

तुमचा लेख वाचून मी थक्क झालो असे मी म्हणालो कारण तुम्हाला माझ्या प्रामाणिकपणाचे खरे स्वरूप कळलेले आहे आणि जिल्ह्यातील केवळ हिंदूंकरिताच नाही तर मुसलमानांकरिताही माझी उपस्थिती उपयोगाची आहे याची तुम्हाला जाणीव झालेली आहे असा ठसा त्यापूर्वी माझ्या मनावर उमटलेला होता. परंतु हा अनुवाद बरोबर आहे असे गृहीत धरले तर मला असे वाटते की या लेखात तुम्ही माझ्यावर आरोप केले आहेत. आमच्यापैकी बहुतेक लोकांचा खरोखरच असा समज झाला होता की शमसुद्दिन साहेब मुख्यमंत्र्यांना भेटण्याकरिता काही दिवसांकरिता जात आहेत आणि नुकताच स्थापन करण्यात आलेल्या शांतता समितीतील कामात मदत करण्याकरिता तुम्ही मागे नोआखालीत थांबणार आहा. परंतु मला दुसऱ्या दिवशी कळले की दुर्दैवाने तुमच्या डोळ्यांना काही त्रास झाल्यामुळे तुम्हीसुद्धा एकाएकी शमसुद्दिन साहेबांबरोबर गेला. तुम्ही माझ्यावर आरोप करावे असे मध्यंतरीच्या काळात काय घडले हे मला माहीत नाही. अनेकांप्रमाणे तुम्हीसुद्धा मला नोआखाली सोडण्याचा आणि बिहारमध्ये वा अजून कुठे जाण्याचा सल्ला का देत आहा? (पाहा "फेनी उपविभागातील मुस्लिम लीगच्या सदस्यांना पत्र", डिसेंबर २५, १९४६)

मी पूर्व बंगालमध्ये चौकशी करण्याकरिता आलेलो नाही. दोन समुदायांत टिकाऊ आणि अंतःकरणापासूनची शांतता निर्माण करण्याकरिता मी इथे आलेलो आहे. मला वाटते की तुमच्यासमोर केलेल्या भाषणांमध्येही मी ही घोषणा केली होती. मग तुमच्या चर्चाधीन लेखात तुम्ही माझ्यावर दोषारोपण करावे असे एकाएकी काय घडले? तेव्हा तुम्ही माझ्याबद्दल उत्कट आदर व्यक्त केला होता. असे असताना त्यानंतर एक मित्र म्हणून तुम्ही माझ्याकडे काही चौकशी करावी, तुमच्या विचारातील परिवर्तनाची मला कल्पना द्यावी व त्याचे कारण सांगावे इतकीही अपेक्षा मी तुमच्याकडून करू शकत नव्हतो काय? कदाचित

तुम्ही परत विचार केला तर तुमच्या या लेखातच मी बिहारऐवजी नोआखालीत का थांबलो आहे त्याचे कारणसुद्धा दिसून येईल. मी केलेल्या घोषणा तुमच्यासारख्याच्या बाबतीतही जिथे इतक्या अल्पकालीन सिद्ध होतात ते ठिकाण सोडून माझी अहिंसा किती प्रभावी आहे व तिच्यात किती शक्ती आहे या गोष्टीची परीक्षा मी या ठिकाणाशिवाय अजून कुठे करू शकतो?

तुम्ही जेव्हा म्हणता : "श्रीयुत गांधींच्या मताप्रमाणे नोआखालीतील परिस्थिती इतकी सामान्य झालेली नाही की हिंदू निर्वासित आपल्या घरी परतू शकण्याची ते जबाबदारी घेऊ शकतील." जे हिंदू निर्वासित आपले रक्षण करण्यात दुर्बल सिद्ध झाले आहेत ते परत आपल्या घरी परतण्याकरिता का घाबरत आहेत हे मी निर्विवाद तथ्यांद्वारे दाखवू शकतो. ज्या शांतता समित्यांना घडणीच्या अवस्थेतच तुम्ही सोडून आला होता त्या अजूनही काम करण्याच्या परिस्थितीत नाहीत.

या समित्या आपले काम करत आहेत की नाहीत हे पाहण्याकरिता मंत्री आणि त्यांचे सांसदीय सचिव येत नाहीत. मी तुम्हाला ही विनंती लीगच्या मंत्रिमंडळाकरिताच करत आहे. त्याच्या कार्क्षमतेत आणि चांगुलपणात मलाही तितकाच रस आहे जितका तुम्हाला असू शकतो. विश्वास ठेवा की बंगालच्या लीगच्या मंत्रिमंडळातील दोष पाहण्याकरिता मी पूर्व बंगालमध्ये आलेलो नाही. माझ्या आचरणाद्वारे मुस्लिम लीगच्या मंत्रिमंडळाला आत्मतृप्तीच्या अवस्थेतून बाहेर काढण्याकरिता आणि स्वतःकरिता व हिंदुस्थानकरिता काही ठोस काम करण्याची त्याला प्रेरणा मिळावी म्हणून मी इथे आलेलो आहे. माझा विश्वास आहे की तुम्ही आणि मी मिळून पूर्व बंगालमध्ये योग्य प्रकारचे वातावरण निर्माण करू शकलो तर त्याचे अनुसरण संपूर्ण हिंदुस्तान करील हे याचे कारण आहे.

तुमच्या या लेखात तुम्ही परत म्हणता : “जर त्यांनी (गांधी) काय घडले याचे खरे वक्तव्य जारी केले असते तर बऱ्याच प्रमाणात वातावरण स्वच्छ झाले असते. यासंबंधात त्यांनी (गांधी) पाळलेल्या मौनामुळे अनेकांच्या मनात संशय निर्माण होतो.” तुम्हाला जेव्हा हे चांगल्या प्रकारे माहीत आहे की बंगाल सरकारतर्फे जे काही करण्यात आले आहे वा केले जात आहे त्याची प्रशंसा करण्याच्या परिस्थितीत मी नाही. तर मग हे दोषारोपण का? तुम्ही जर यावर विचार कराल तर तुम्ही मला न बोलण्याकरिता दोष देणार नाही, उलट मी बोलत नाही म्हणून माझी प्रशंसाच कराल.

तुम्ही जेव्हा म्हणता की : “श्री गांधींची बिहारमध्ये जाण्याची इच्छा नाही” तेव्हा तुमचे म्हणणे बरोबर असते. परंतु माझ्या न जाण्यामागील जे कारण तुम्ही सांगता ते पूर्णपणे चूक आहे. माझे “विश्वसनीय बिहारी

अनुयायी" तिथे घडत असलेल्या घटनांची माहिती मला खरोखरच देत राहिले आहेत. तुमचा जो विश्वास आहे त्याच्या अगदी उलट माहिती त्यांनी मला दिली आहे. इतर लोकांप्रमाणेच बिहार सरकारला तेथील घटनांबद्दल खेद आहे. परंतु त्यांचे म्हणणे आहे की दंगलखोर घटकांवर त्यांनी नियंत्रण मिळवले आहे आणि दंगलग्रस्त लोकांना मदत करण्याकरिता ते सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. मी बिहारमध्ये गेलो आणि मुस्लिम लीगचा बिहारसंबंधीचा अहवाल मला मोठ्या प्रमाणात कल्पनारंजित वाटला आणि बिहार सरकारची वर्तणूक प्रशंसनीय, मानवतापूर्ण आणि न्याय्य वाटली तर त्यामुळे कोणताही हेतू साध्य होणार नाही. तुम्हाला नको असेल तरी तुम्हाला चागल्या वर्तुणुकीचा दाखला देण्याकरिता मी जितका उत्सुक आहे तितका मी बिहार सरकारला देण्याकरिता उत्सुक नाही. माझा अल्पाहार आणि उपवास करण्याचा माझा विचार बिहारमधील उपद्रवांकरिताच होता हे तुम्हाला चांगल्या प्रकारे माहीत आहे. तुमच्यासारख्या अनुभवी वकिलालासुद्धा या गोष्टी स्पष्ट दिसू नये याचा मला खेद होतो.

"माझ्या उद्दिष्टांच्या परिपूर्तीकरिता मी बाहेरून अगणित स्वयंसेवक बोलावतो आहे" या अपराधाचा मी दोषी नाही हे मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो. पहिली गोष्ट म्हणजे तुम्ही पहिल्या परिच्छेदात माझ्यावर ज्या हेतूचा आरोप केला आहे तो माझा हेतू नाही. दुसरी गोष्ट म्हणजे मी असंख्य स्वयंसेवकांना बोलावलेले नाही. माझ्या हेतूच्या परिपूर्तीकरिता मला माझ्याशिवाय इतर कोणत्याही स्वयंसेवकाची गरज नाही. तुम्हाला जर खरोखरच असे वाटत असेल की नोआखालीतील शांततेकरिता ते धोका आहेत तर सरकारने केवळ म्हणावे की ते शांततेकरिता धोका आहेत आणि येथून निघून जाण्याची त्यांना सूचना द्यावी. आणि मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो की किंचितही कुरकुर न करता ते हा जिल्हा सोडून निघून जातील. या माझ्या साहसात माझ्याबरोबर माझा एक सहकारी आहे, ज्याचे नाव आताच उघड करण्याची आवश्यकता नाही. आम्ही दोघे केवळ या वचनाला अपवाद राहू. तुम्हाला हे सांगितले तर आश्चर्य वाटेल की मला माझे सहकारी कितीही प्रिय असले आणि त्यांची सेवा राष्ट्राकरिता किती उपयोगी आहे हे मला माहीत असले तरी मी त्यांना सांगितले होते की मला माझ्या या कामात एकाही सहकाऱ्याची आवश्यकता नाही कारण उद्देशाची लवकरात लवकर फलश्रुती होण्याकरिता ईश्वराच्या मदतीशिवाय इतर कोणाच्याही संरक्षणाची वा मदतीची गरज नसते हे मला माहीत आहे. अहिंसेकरिता काम करण्यामागील माझी संकल्पना ही अशी आहे. मला आशा आहे की जी कारवाई करण्याबद्दल मला सुचवण्यात आले आहे ती कारवाई करण्यापूर्वी सरकारने आम्ही कोणत्या प्रकारचे

काम करतो हे मला वा त्या लोकांना विचारण्याकरिता आपल्या आवडीच्या कोणत्या तरी विश्वासू व्यक्तीला नेमावे. त्यांचे जीवन उघडे पुस्तक आहे. त्यांच्या कामामागे गुप्त वा लपलेले काहीही नाही.

तुमचे लेखन सिद्ध करता येणार नाही अशा भरमसाट विधानांनी भरलेले आहे व त्यांचा तथ्यांशी काहीही संबंध नाही हे सांगण्याची मला परवानगी द्यावी. मी त्यातील केवळ काहींचा उल्लेख केला आहे.

माझ्या मनात मी जी कल्पना केली होती त्यापेक्षा माझे पत्र आताच किती तरी लांब झाले आहे, परंतु मला झालेल्या दुःखाची कल्पना तुम्हाला देण्याच्या दृष्टीने जसजसा मी पुढे जाऊ लागलो तसतसे ते लहान करणे मला शक्य झाले नाही. तुम्हाला जर अधिक माहिती हवी असेल तर तुम्ही इथे माझ्याकडे येऊन अर्धा तास थांबा आणि माझ्यावर करण्यात आलेल्या आरोपासंबंधी तुम्हाला जे विचारायचे असेल ते मला विचारा.

तुमच्या पत्राप्रमाणे हे पत्र अनावृत पत्र नाही. हे मी केवळ तुमच्याकरिता आणि केवळ तुमच्याकरिता अशा अपेक्षेने लिहिले आहे की हे पत्र एका अशा हितेच्छूने पाठवले आहे की जो सत्य काय आहे हे कळल्यानंतर आपले विचार बदलण्याची तयारी ठेवतो.

तुमचा विश्वासू,

मो. क. गांधी

माय डेज विथ गांधी, पृष्ठ १२३-७

---------------

# २२८. अमतुस्सलाम यांना पत्र

डिसेंबर २७, १९४६

प्रिय बेटी,

हरिलालने मला तुझे पत्र दिले. तो इथे तीन तारखेपर्यंत आहे. तो सज्जन माणूस आहे. तो म्हणाला की, तो कदाचित जास्त दिवसही थांबेल. मला दररोज कळवता राहा. बस्तीकरिता उकळलेले पाणी कोमट करून घे आणि त्यात पाणी गुलाबी होईल इतके दोन वा तीन दाणे पोटॅशियम परमँग्नेटचे टाक. उकळलेले पाणी पी आणि अर्ध्या मोसंबीचा रस घे. असे पाणी दर दोन तासांनी घे. मी तुझ्याकरिता मधाची बाटली पाठवत आहे. तुझी जेव्हा इच्छा असेल तेव्हा ते घे.

पोटावर मातीचा लेप लाव. माती कापडात नाही तर अशीच लाव. तू दुरुस्त होशील. बोरकामताहून काहीही मागू नको. मला कळवत राहा. सध्या तुझे उपोषण स्थगित कर. तू दुरुस्त झाल्यानंतर आपण त्याचा विचार करू.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५४६

-----------------

# २२९. अमतुस्सलाम यांना पत्र

डिसेंबर २७, १९४६

बेटी,

तू आजारी पडलीस. हे कसे? तुझ्या सहकाऱ्यांनी डॉक्टरची मदत आणि थर्मामिटरही मागितले आहे. मी त्यांना सांगितले की तुला डॉक्टरचीही गरज नाही आणि औषधाचीही. तुझे औषध माती, पाणी, आकाश, सूर्य आणि हवा आहे आणि त्याबरोबर रामनाम घ्यायचे आहे. उघड्यावर उभी राहून कुराण हातात घेऊन तुला जितका सहन होईल तितक्या सूर्यप्रकाशाचे प्राशन कर. स्वच्छ हवा आणि पाणी घे. ईश्वराला तुझी सेवा नको असेल तर तो तुला उचलून घेईल.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - मला लिही वा कोणाला तरी मला लिहायला सांग.

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५४६

-----------------

# २३०. प्रार्थना प्रवचन

(श्रीरामपूर डायरीतून उद्धृत)

श्रीरामपूर,

डिसेंबर २७, १९४६

**गांधीजी आपल्या भाषणात म्हणाले की एक मित्र मला म्हणत होता की "तुम्ही 'अंधकाराने'** (पाहा "डायरीतील नोंदी", डिसेंबर २६, १९४६) **घेरलेले आहा असे जे तुम्ही म्हणाला होता त्याने अनेक लोक फार गोधळात पडले आहेत." त्या मित्राला वाटते की दूर बसलेल्या लोकांना तर माझ्या योजनेतून प्रकाश किरण येताना दिसतात आणि दंगलग्रस्त लोकांमध्ये हळूहळू परत आत्मविश्वास निर्माण होत दिसत असल्याचे अनेक पुरावे आहेत.**

**गांधीजी म्हणाले की मी या मित्राला आणि या मित्राप्रमाणे विचार करणारांना म्हणेन की त्यांचा माझ्याबद्दल काही प्रमाणात गैरसमज झालेला आहे. जो काळोख माझ्या आजूबाजूला पसरला आहे तशा काळोखाला यापूर्वी मी कधीही तोंड दिले नव्हते. खरे म्हणजे आज माझ्या अहिंसेची सत्त्वपरीक्षा होत आहे. जोपर्यंत मी माझ्या उद्दिष्टापर्यंत पोहोचत नाही तोपर्यंत मला यात यश आले असे म्हणता येत नाही.**

**हे खरे आहे की सकाळ होण्यापूर्वी रात्र सर्वाधिक काळोखाने भरलेली असते. मला स्वतःला वाटते की मी काळोखाने घेरलेलो आहे.**

**गांधीजी म्हणाले की माझा एक मित्र नेहमी आपल्या खिशात पतंजलीचे योगशास्त्र बाळगत असे. मला जरी संस्कृत येत नव्हते तरी तो मित्र अनेकदा माझ्याकडे येऊन काही सूत्रांच्या अर्थाबद्दल माझ्याशी चर्चा करायचा. एका सूत्रात लिहिले होते की जेव्हा अहिंसा पूर्णपणे स्थापित होते तेव्हा आजूबाजूचे शत्रुत्व-वैमनस्य, वाईटपणा हे सर्व नाहीसे होतील. गांधीजी म्हणाले की माझ्या आजूबाजूच्या वातावरणातील वैमनस्याचे वातावरण मला निवळलेले दिसत नाही आणि यामुळे माझी अहिंसा या कसोटीतून यशस्वीपणे पार पडलेली नाही असा निष्कर्ष मला काढावा लागतो. यामुळे मी म्हणतो की माझ्या आजूबाजूला काळोख पसरलेला आहे.** (पुढील तीन परिच्छेद हिंदुस्तान स्टँडर्डमधून घेतलेले आहेत.)

**सुऱ्हावर्दींच्या वक्तव्याचा उल्लेख करत गांधीजी म्हणाले की त्यातून मला प्रकाश किरणाचे ओझरते दर्शन होऊ लागले आहे असे वाटते. बंगालचे मुख्यमंत्री म्हणाले की महात्मा गांधींच्या कार्याला यश येईल आणि त्याचा लाभ बंगाल आणि संपूर्ण हिंदुस्थानला होईल अशी मला आशा आहे. बंगालचे मुख्यमंत्री असेही म्हणाले की माझ्या पदयात्रेच्या वेळी ते निश्चितच माझ्या सुरक्षेची व्यवस्था करतील. मला माहीत आहे की मी राहतो त्याच्या आजूबाजूला सैनिक आणि पोलीस ठेवण्यात आले आहेत. काही वेळा त्यांच्याशी माझा नमस्कार वगैरे होत असतो. याहून अधिक कोणी काही करू शकत नाही. ईश्वराची जर काही वेगळी इच्छा असेल तर गोष्ट वेगळी.**

**आपल्या पदयात्रेचा उल्लेख करत गांधीजी म्हणाले की २-४ दिवसात तिचा तपशील ठरेल. कार्यक्रम तयार होताच मी तो बंगालच्या मुख्यमंत्र्यांना कळवीन कारण त्यांच्या माहितीशिवाय मला काहीही करण्याची इच्छा नाही.**

**गांधीजी म्हणाले की पदयात्रेवर जाताना माझ्याबरोबर कमीतकमी सहकारी घेण्याची माझी इच्छा आहे आणि पदयात्रेवर असताना मुसलमान मित्राच्या घरात राहणे मी जास्त पसंत करेन. मी माझ्या गरजा कमी केल्या आहेत आणि अगदी गरीब ग्रामीण माणूससुद्धा त्या पूर्ण करू शकेल. मुसलमानांबद्दल माझ्या मनात प्रेम आणि मैत्रीभावाशिवाय अजून काहीही नाही हे सिद्ध करण्याकरिता कोणत्याही प्रकारच्या संरक्षणाशिवाय माझी या पदयात्रेवर जाण्याची इच्छा आहे.**
(यापुढील भाग 'द संडे हिंदुस्तान स्टॅन्डर्ड'मधून घेतला आहे.)

**गांधीजी म्हणाले की मी जरी माझ्या या कार्यात अगदी एकटा असलो तरी या कार्यामुळे माझ्या सेवेचा स्तर भरपूर उंचावेल. त्या परिस्थितीत बंगालच्या समस्येला तोंड देण्याची माझ्यात किती क्षमता आहे हे मी पाहू शकेन.**

**किती तरी वर्षांपासून अनेक मित्रांनी कोणत्याही अटीशिवाय आपली सेवा मला देऊ केलेली आहे. मी जेव्हा नोआखीत या कार्याकरिता आलो तेव्हा या मित्रांच्या सेवेचा त्याग करावा असे माझ्या मनात होते. मला स्वतःला पूर्णपणे ईश्वराच्या हाती सोपवण्याचा माझा विचार होता. ईश्वर आपल्या भक्तांना निश्चितच मदत करत असतो परंतु ती मदत कोणत्या तरी माणसाच्या माध्यमातून होत असते. आणि त्या परिस्थितीत न मागता ती मदत आपोआप मिळत असते.**

**माझ्या मूळ योजनेप्रमाणे मी जर इथे एकटा आलो असतो तर आता ज्या तक्रारी निर्माण झाल्या आहेत त्या बऱ्याचशा प्रमाणात आपोआपच निरस्त झाल्या असत्या. आणि नोआखालीत सेवा करू इच्छिणारे जे लोक माझ्या सल्ला मागतात त्यांना माझे सांगणे आहे की त्यांनी मला सल्ला मागू नये आणि माझ्या मार्गदर्शनावर तर मुळीच विसंबून राहू नये.**

**ज्यांना इथे यायचे असेल त्यांनी माझ्याऐवजी लीगच्या मंत्र्यांशी संपर्क करावा आणि त्यांची लेखी परवानगी घ्यावी. याशिवाय त्यांना ज्या प्रकारचे काम करायचे असेल त्या कामाचे सविस्तर स्वरूपही त्यांनी मंत्र्यांसमोर मांडावे आणि मंत्र्यांनी मंजूर केलेल्या योजनेनुसारच त्यांनी आपले काम सीमित करावे, त्याबाहेर जाऊ नये. मी हे सुचवतो आहे कारण या प्रांतात लीगची सत्ता आहे.**

**आज लीगचे लोक मला पहिल्या क्रमांकाचा शत्रू समजतात आणि बाहेरचे लोक मला मदत करण्याकरिता आले तर ते आपल्या शत्रूंना मदत करण्याकरिता आले आहेत असे बंगालच्या मंत्र्यांना वाटेल. ही गोष्ट टाळावी असे मला प्रकर्षाने वाटते.**

**हिंदू संख्येने कमी असल्यामुळे जिथे ते दुर्बल आहेत तिथे त्यांनी हिंसेच्या स्वरूपातील आत्मरक्षणाची कला शिकायला पाहिजे असे काही लोकांना आणि संघटनांना वाटते. मुसलमानांनासुद्धा वाटते की प्रचंड बहुसंख्येच्या बळावर आपण हिंदूंना असहाय करू शकतो. परंतु हे दोघेही केवळ आपल्या समुदायाच्या लोकांचेच अनहित करत नाहीत तर संपूर्ण हिंदुस्थानचेही अनहित करत आहेत.**

**शेवटी गांधीजी ईश्वराला प्रार्थना करत म्हणाले की या दोन समुदायात दुर्दैवाने आज जे वितुष्ट निर्माण झाले आहे ते दूर करून त्यांना एकत्र सांधण्यात मला यश मिळावे. या महान प्रयोगात केवळ ईश्वराच्या मार्गदर्शनाखाली केवळ एकट्याने जाण्याची म्हणूनच माझी इच्छा आहे.**

हरिजन, जानेवारी २६, १९४७; आणि द संडे स्टॅन्डर्ड, डिसेंबर ३०, १९४६

----------

## २३१. अमतुस्सलाम यांना पत्र

डिसेंबर २८, १९४६

बेटी,

मला तुझी पत्रे मिळाली. इथे माझ्याबरोबर जवाहरलाल आहे. तू जे म्हणतेस ते बरोबर आहे. उपवास कर आणि प्रसन्न राहा. एक सेवक वा सेविका तुझ्याबरोबर असायला पाहिजे. अखेरीस तो, आपणा सर्वांचा मालक, सर्वशक्तिमान आहे.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५४८

-----------------

# २३२. प्रार्थना प्रवचन

श्रीरामपूर,

डिसेंबर २८, १९४६

**पंडित जवाहरलाल नेहरूंची ओळख करून देत गांधीजी म्हणाले की दोन राष्ट्रपतींपैकी हे एक आहेत. पंडितजी नवीन मंत्रिमंडळात उपाध्यक्ष आहेत. तिथे ते हिंदुस्थानातील लोकांचे प्रतिनिधित्व करतात. दुसरे, आचार्य कृपलानी हे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष आहेत. पंडित जवाहरलाल नेहरू शासनाचे प्रमुख आहेत तर कृपलानींना नैतिक अधिकाराशिवाय इतर कोणताही अधिकार नाही. श्री शंकरराव देव, सध्याचे महासचिव, आणि भूतपूर्व महासचिव श्रीमती मृदुला साराभाई हेसुद्धा आपल्यामध्ये आहेत. हे चारही लोक भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सेवक आहेत आणि त्या माध्यमातून ते राष्ट्राचे सेवक आहेत.**

**काही लोक असे आहेत की जे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे वर्णन हिंदू संघटना म्हणून करतात. असे करून ते केवळ हिंदुस्थानच्या राजकीय इतिहासासंबंधीचे आपले अज्ञानच प्रदर्शित करतात. एके काळी हिंदू महा सभा काँग्रेसच्या हातात होती आणि हीच गोष्ट मुस्लिम लीग आणि इतरांनाही लागू होत होती.** (पुढील दोन वाक्ये हरिजनमधून घेतली आहेत.) **काँग्रेस ही हिंदू संघटना नव्हती. इतर समुदायांना वगळून तिने केवळ हिंदूंचे हितसंबंध जपण्याचा कधीही प्रयत्न केला नाही.**

**काँग्रेसचे नेते हिंदूंचे हितसंबंध जपण्याच्या दृष्टीने सल्लामसलत करण्याकरिता इथे आले आहेत असे सूचीत करण्यात येत आहे. त्यांनी जर असे केले असते तर जगाच्या दृष्टीतून त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची प्रतिष्ठा कमी केली असती. हिंदू मुसलमानांच्या प्रश्नावरील तज्ज्ञ म्हणून सध्याच्या संकटात सर्वोत्तम राष्ट्रहित कसे साधता येईल यासंबंधीचा सल्ला घेण्याकरिता ते माझ्याकडे आले आहेत. शासनाची सूत्रे जनतेच्या प्रतिनिधींच्या हातात आली आहेत; देश स्वातंत्र्याच्या मार्गावर होता, परंतु अजून स्वातंत्र्य मिळायचे आहे. आपण आपल्या शक्तीचा सुज्ञपणाने उपयोग केला तर ते मिळणे अपरिहार्य आहे. या पुढाऱ्यांनी ब्रिटिशांच्या मदतीशिवाय ही समस्या सोडवण्याचा निर्धार केला आहे. एक जरी चुकीचे पाऊल टाकले तर राष्ट्रहिताला धक्का बसू शकतो.**

**गांधीजी म्हणाले की काल सायंकाळी मी सुऱ्हावर्दी साहेबांसंबंधी काही म्हणालो होतो.** (पाहा “प्रार्थना प्रवचन”, डिसेंबर २७, १९४७). **जनतेला जर लोकशाहीबद्दल आदर वाटत असेल तर ते मंत्रिमंडळाकडे दुर्लक्ष करू शकत नाही. बंगालच्या पीडित लोकांची सेवा करण्याची जर कोणाची इच्छा असेल तर त्याने मंत्रिमंडळाला कळवल्याशिवाय आणि मान्यतेशिवाय काहीही करू नये.**

**कोणत्याही प्रकारे मनातले राखून कोणी काहीही करू नये.**

**अखेरीस गांधीजी म्हणाले की मी मुसलमानांचा मित्र आणि हितचिंतक आहे हे सिद्ध करण्याकरिता मी इथे आलो आहे. एकोपा आणि भ्रातृभाव पुनःस्थापित करणे हा माझा इथे येण्याचा एकमेव हेतू आहे.**

‘द हिंदू’, जानेवारी २, १९४७; आणि ‘हरिजन’, जानेवारी २६, १९४७

## २३३. अमतुस्सलाम यांना पत्र

डिसेंबर २९, १९४६

प्रिय बेटी,

मला तुझे पत्र मिळाले. तू स्वतः का लिहितेस? एक ऍन्टीफ्लॉजिस्टाईनचा डबा पाठवला आहे. तुझ्या सूचनेप्रमाणे मी (हेम प्रभा दास गुप्ता) कोणाला तरी पाठवणार आहे. तू पत्रे लिहवून घे. भरपूर पाणी पी.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५४९

----------------

## २३४. ज्वाला प्रसाद यांना पत्र

श्रीरामपूर,

डिसेंबर २९, १९४६

भाई ज्वाला प्रसादजी,

मला तुमचे पत्र मिळाले. येथील कामाची किंमत देऊन मी इतर कोणत्याही कामाची जबाबदारी घेऊ शकत नाही. टाळताच येणार नाही केवळ तितकेच मी करत असतो; यामुळे कृपाकरून मला माफ करा. मला जे. के. रिव्ह्यूचे तुम्ही पाठवलेले अंक मिळाले, परंतु मला ते वाचणे शक्य झाले नाही. मी दररोजची वर्तमानपत्रेसुद्धा वाचत नाही. इतर लोक मला ज्या बातम्या देतात त्यावरच मी काम भागवतो.

तुमचा,

मो. क. गांधी

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-----------------

# २३५. अमतुस्सलाम यांना पत्र

रविवार, [डिसेंबर २९, १९४६ला वा त्यानंतर] (गांधीजींनी पदयात्रा सुरू केल्यानंतर पहिला रविवार डिसेंबर २९ला आला होता.)

चि. अमतुल सलाम,

मला तुझे पत्र मिळाले. उपोषण सोडण्याकरिता मी कोणाचीही समजूत घालत नसतो. तूच या बाबतीत अंतिम निर्णय घेतला पाहिजे ही गोष्ट मला कळू शकते. मी एकदा माझे कर्तव्य पार पाडले की मी समाधानी असतो. (शिवाय पाहा"प्रार्थना प्रवचन", जानेवारी, २१, १९४७.)

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५७३

------------------

# २३६. काँग्रेस कार्यकारिणीकरिता सूचना

श्रीरामपूर,

[डिसेंबर २८।३०, १९४६]

('माय डेज विथ गांधी'मध्ये पृष्ठ १२८वर निर्मल कुमार बोस म्हणतात : "या तीन दिवसांत काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी गांधीजींशी प्रदीर्घ चर्चा केली. . . . चर्चेनंतर गांधीजींनी कार्यकारिणीकरिता या सूचना तयार केल्या व त्या जवाहरलाल नेहरूंना आणि इतरांना दिल्या.")

काँग्रेसने आपल्या साठ वर्षांच्या जीवनयात्रेच्या कार्यकाळात हिंदू, मुसलमान आणि इतर समुदायांचे अधिकाधिक प्रतिनिधित्व करण्याचे सतत प्रयत्न केले आहेत. त्याचबरोबर तिने सर्वसामान्य जनतेचेही प्रतिनिधित्व केले आहे. काँग्रेसमध्ये नेहमीच बरेचसे ढोंगी लोक राहिलेले आहेत, परंतु यामुळे तर तिच्या या दोन गुणांची अजूनच प्रशंसा होते. या दोन गुणांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकांना जर आपण अल्पमतात आहो असे जाणवत असेल तर त्यांनी या गोष्टीला विरोध केला पाहिजे आणि काँग्रेसचा राजीनामा देऊन बाहेरून जनमतावर प्रभाव टाकला पाहिजे. असे केले तरच ते देशाचे खरे प्रतिनिधी असल्याचे सिद्ध होईल. यामुळे माझ्या मते संकटाच्या या काळात कार्यकारिणीने एकमुखाने पुढील धोरणाला मान्यता देणे आणि काँग्रेसला योग्य ते मार्गदर्शन करणे आवश्यक झाले आहे -

१. घटनासमितीपासून सुटका करून घेणे तर आता बहुधा कठीण झाले आहे, तरीही माझे मत आहे की काँग्रेसने यासंबंधीचे आपले मत व्यक्त करण्याचा हा सर्वात चांगला मार्ग आहे.

२. दुसरा सर्वात चांगला मार्ग हा आहे की कॅबिनट मिशनचे वक्तव्य काँग्रेसने त्या स्वरूपात मान्य करावे ज्या स्वरूपात काँग्रेस आणि जिना ते वक्तव्य मान करतील.

३. ही गोष्ट स्पष्टपणे समजून घेतली पाहिजे की काँग्रेसच्या कोणत्याही माणसाला वा काँग्रेसच्या कोणत्याही घटकाला अथवा प्रांताला काँग्रेसद्वारा घोषित नीतीपासून वेगळे असल्याचे घोषित करण्याकरिता ती व्यक्ती वा तो घटक स्वतंत्र असेल आणि त्या वेगळे होणाऱ्या घटकांनासुद्धा काँग्रेस मार्गदर्शन करू शकेल. कोणत्याही गटाने वा प्रांताने कोणत्या एका विशिष्ट समूहात सामील व्हायला पाहिजे असा आग्रह आम्ही धरू शकत नाही ही जी भूमिका कॅबिनेट मिशनने घेतली आहे त्या भूमिकेनुसारच ही गोष्ट असेल. याच्या परिणामी कॅबिनेट मिशनच्या वक्तव्यातील अटीप्रमाणे अ विभागातील सदस्य आपली पूर्ण घटना तयार करतील आणि ब आणि क गटातील काही सदस्य गट सोडून गेल्यानंतरही म्हणजे कल्पना करण्यात आली आहे त्याप्रमाणे

पूर्वेकडील गटातून आसामला आणि पश्चिमेकडील गटातून वायव्य सरहद्द प्रांताला पंजाबच्या भागातून शिखांना आणि कदाचित बलुचिस्तानला बाहेर पडण्याचा अधिकार असेल.

शक्य आहे की ब्रिटिश सरकार या घटनासमितीला वा दुसऱ्या एखाद्या घटनासमितीला मान्यता देईल. ते जर असे करतील तर त्यांची नेहमीकरिता बदनामी होईल. कॅबिनेट मिशनच्या योजनेप्रमाणे जेव्हा घटना तयार होईल तेव्हा तिला मान्यता देणे त्यांना भाग आहे आणि मग जे काही होईल ते त्यांनी नियतीच्या भरवशावर सोडून दिले पाहिजे. अशा अवस्थेत ब्रिटिश सरकारच्या अस्तित्वाच्या येथील सर्व खुणा पुसल्या जातील आणि ब्रिटिश सैनिक येथून परत गेलेले असतील. काँग्रेसने ही भूमिका घेतली तर काँग्रेस कायदे आझम जिना यांच्या हातातील खेळणे झाली आहे असा आरोप कोणीही करू शकणार नाही. आणि जिनांचा जो अर्थ होता तीच ही गोष्ट आहे असे जर जिनांना वाटत असेल तर पाकिस्तानकरिता मान्य सूत्र जिनांना दिल्याबद्दल जग काँग्रेसचे आभारच मानील. जिनांच्या दृष्टिकोनाशी ही गोष्ट जुळणारी आहे म्हणून काँग्रेसला जे योग्य वाटते त्यापासून काँग्रेसने माघार घेऊ नये.

घटना संपूर्ण हिंदुस्थानकरिता असेल. बहिष्कार करणारांना घटनेचा लाभ घ्यायचा असेल तर ते कशाप्रकारे तो लाभ घेऊ शकतील हे दाखवणारे एक स्पष्ट कलम घटनेत ठेवावे लागेल.

फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. १०५३९. सौजन्य - निर्मल कुमार बोस

----------------

# २३७. जवाहरलाल नेहरू यांना पत्र

(प्यारेलालनुसार, "जवाहरलाल नेहरूंनी गांधीजींना दिल्लीला परतण्याकरिता विनंती केली होती परंतु त्यात त्यांना यश आले नाही." ही चिठ्ठी त्यांनी सकाळी तीन वाजता खरडली होती".)

डिसेंबर ३०, १९४६

तुझा जिव्हाळा काही वेगळाच आहे आणि तरीही किती स्वाभाविक! तुझी इच्छा असेल तेव्हा परत ये. तुला जेव्हा सल्लामसलत करणे आवश्यक वाटेल परंतु तुला येणे शक्य नसेल तेव्हा अशा कोणाला पाठव की जो तुला समजून घेऊ शकतो आणि माझ्या प्रतिक्रियेचाही योग्य अर्थ लावू शकतो... (मूळ स्रोतात इथे वगळलेले आहे.) मी तुझ्याकरिता समंजस वडिलासारखा जरी असलो आणि मोतिलालजींपेक्षा तुझ्याबद्दल मला कमी प्रेम वाटत नसले तरी तू अशा प्रकारे माझ्याकडे सतत धाव घेणे चांगले दिसत नाही. तू मला काल दाखवलेल्या मसुद्याच्या भावनेपासून ढळू नको (पाहा "जवाहरलाल नेहरूंच्या वक्तव्याचा काँग्रेस कार्यकारिणीला दिलेला मसुदा", डिसेंबर २२, १९४६) . . . कळत नाही परंतु मला वाटते की सांप्रदायिक समस्या आणि राजकीय परिस्थिती यांसंबंधीचे माझे आकलन बरोबर आहे. कॅबिनेट मिशनच्या वक्तव्याला काँग्रेस कार्यकारिणीने जेव्हा मान्यता दिली होती तेव्हा दिल्लीत मी जे म्हणालो होतो (पाहा "एक विश्लेषण", मे २६, १९४६ आणि "महत्त्वाच्या उणिवा", मे २६, १९४६.) ते किती सुज्ञपणाचे होते हे आता मला जाणवते. याचा अर्थ असा नाही की कार्यकारिणीने जे केले ते करायला नको होते. उलटपक्षी कार्यकारिणीने जे काही केले त्याला मी पूर्णपणे साथ दिली होती. मला जे अस्पष्टपणे जाणवत होते त्याचे मी सकारण समर्थन करू शकत नव्हतो. आता गोष्ट अगदी वेगळी आहे. आता माझा विवेक माझ्या अंतःकरणाला पूर्णपणे पाठिंबा देतो आहे. मला दररोज त्याचे पुरावे मिळत आहेत. यामुळेच राष्ट्राने पारख केलेल्या जुन्या सेवकाचा सल्ला तुम्ही घेत राहावा असे मी तुम्हाला सुचवतो.

'महात्मा गांधी - द लास्ट फेज', खंड १, भाग २, पृष्ठ १२७ ('महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड २.पृष्ठ १५४)

--------------------

# २३८. वल्लभभाई पटेल यांना पत्र

सकाळी ५.१५ वाजता, डिसेंबर ३०, १९४६

चि. वल्लभभाई,

मला तुमचे पत्र मिळाले. इथे काय झाले ते जवाहरलाल आणि इतर तुम्हाला सांगू शकतील.

...बद्दल माझे स्पष्ट मत आहे. इथे सुरू असलेले काम काँग्रेसच्या निधीतून वा तुम्ही गोळा केलेल्या निधीतून करता येऊ शकत नाही. त्यांनी हिंदू आणि मुसलमान या दोघांकडून जाहिरपणे निधी गोळा केला पाहिजे. केवळ पैशाच्या बळावर करण्यात येत असलेल्या कामाला अपरिहार्यपणे अपयश आल्याशिवाय राहू शकत नाही असे माझे ठाम मत झाले आहे. तुम्हीसुद्धा त्याच्या बळावर नाचणे सोडून द्या. .

त्यांच्यात आणि माझ्यात जी सहमती झाली आहे त्यापासून किंचितही ढळू नये . . . .ही गोष्ट आवश्यक आहे. मला त्यात थोडीशीही अशुद्धी दिसली तर त्या क्षणी त्यातून बाहेर पडण्याचे मी ठरवले आहे. हे काम अतिशय नाजूक आहे आणि माझ्या नशिबी आलेले हे सर्वात मोठे काम आहे. आतापर्यंत ईश्वराने मला टिकवले आहे. काम करण्याकरिता मी सकाळी प्रमाण वेळेनुसार १.३० वाजता उठतो, आणि त्यात अजून अडचण आलेली नाही. उद्याबद्दल देवालाच माहीत.

मी तुमच्याबद्दल अनेक तक्रारी ऐकल्या आहेत (जानेवारी ७, १९४७च्या पत्रात वल्लभभाई पटेल म्हणतात : "अर्थातच तक्रारी खोट्या आहेत, परंतु त्यातील काहींना तर अर्थच नाही. मला पदाला चिकटून राहायचे आहे हा तर शुद्ध कल्पनाविलास आहे. जवाहरलालच्या अंतरिम सरकारमधून राजीनामा देण्याच्या धमकीच्या मी विरोधात होतो. अशा धमक्यामुळे काँग्रेसच्या प्रतिष्ठेवर परिणाम होतो आणि अधिकाऱ्यांवर त्याचा वाईट प्रभाव पडतो.... लीगमधील मंत्रिमंडळातील माझे सहकारीसुद्धा म्हणत नाहीत की मी त्यांचा वारंवार अपमान करतो... लोकांना कटूहून कटू सत्य सांगण्याची मला सवय आहे. . . . तलवारीला तलवारीने उत्तर दोण्याची गोष्ट माझ्या दीर्घ परिच्छेदातून संदर्भ सोडून कापून काढलेले वाक्य आहे.. . . माझ्या सहकाऱ्यांपैकी कोणी माझ्याबद्दल तक्रार केली असेल तर मला सांगा, ते कळलेले मला आवडेल. त्यांच्यापैकी कोणीही असे मला म्हणालेले नाही.). या शब्दांमध्ये जर काही अतिशयोक्ती असेल तर तिच्यामागे कोणताही हेतू नाही. तुमची भाषणे लोकांना खुष करणारी आणि भडकवणारी असतात. तुम्ही हिंसा आणि अहिंसा यांतील भेद विसरला आहा. तुम्ही लोकांना हिंसेला हिंसेने तोंड देण्याकरिता शिकवता. प्रसंग असो वा नसो तुम्ही मुस्लिम लीगच्या लोकांचा अपमान करण्याची संधी सोडत नाही. हे सर्व जर खरे असेल तर हे अतिशय हानिकारक असेल. पदाला चिकटून राहण्यासंबंधी बोलत असाल, आणि खरोखरच तसे करत असाल तर ती खुपणारी गोष्ट होईल.

मी हे जे काही ऐकले आहे ते सर्व मी तुम्हाला कळवले आहे. ही वेळ कठीण आहे. आपण जर सरळ आणि अरुंद वाटेवरून घसरलो तर नाश झालाच समजा.

कार्यकारिणीने जितक्या सुसंवादाने काम करायला पाहिजे तितक्या सुसंवादाने ती काम करत नाही. भ्रष्टाचार निपटून काढा; ते कसे करायचे हे तुम्हाला माहीत आहे. तुम्हाला आवश्यक वाटत असेल तर कोणा तरी समंजस आणि विश्वासार्ह माणसाला मला सर्व काही समजून सांगण्याकरिता आणि माझा दृष्टिकोन समजून घेण्याकरिता माझ्याकडे पाठवा. तुम्ही माझ्याकडे धावपळ करत येण्याची आवश्यकता नाही. धावपळ करण्याइतकी तुमची प्रकृतीही चांगली नाही. तुम्ही तुमच्या प्रकृतीची काळजी घेत नाही ही चांगली गोष्ट नाही.

इथे मी थांबतो. आता कलकत्ता वेळेप्रमाणे ५.३५ झाले आहेत आणि किती तरी साठलेली कामे उरकवायची आहेत.

आशीर्वाद,

बापू

गुजरातीवरून. 'बापूना पत्रो : सरदार वल्लभभाईने', पृष्ठ ३४१-३

-------------------

# २३९. प्यारेलाल यांना पत्र

डिसेंबर ३०, १९४६

चि. प्यारेलाल,

तू निश्चितच योग्य आहार घेतला पाहिजे. सैनिकाने आपले शरीर नेहमी सज्ज ठेवले पाहिजे. तू तुझ्याबरोबर नेहमी रोटी अथवा बिस्किट ठेवले पाहिजे. त्याबरोबर जर तू काही खोबरे खाल्ले व त्यात थोडा गुळ मिसळला तर तो परिपूर्ण आहार होईल. (मी हा प्रयोग केला आहे.) यामुळे कूच करतानासुद्धा हे पदार्थ निश्चित वेळी खाता येतात. तू दक्षिण आफ्रिकेच्या (सत्याग्रहाच्या) इतिहासात वाचले असशील की ट्रान्सव्हालकडे कूच सुरू असताना मी चालत असताना खात होतो. तू जर असे केले तर तुला कधीही कोणावरही अवलंबून राहावे लागणार नाही. उपलब्ध असलेले कोणतेही स्थानिक फळ तू घेऊ शकतोस.

मनूला वेगळे ठेवण्याबद्दल आपण बोलायचे नाही हे तुझ्यात आणि माझ्यात ठरले आहे. तू तिच्याबद्दल कोणताही संशय मनात ठेवू शकत नाही. यामुळे आपल्या चर्चेचा सार तू तिला सांगावा असा माझा तुला सल्ला आहे. हेसुद्धा तिला दाखव. यानंतर तिच्या मनात ज्या कोणत्या वाईट भावना असतील त्या आपोआप वर येतील. या प्रकरणात मोह शेवटपर्यंत टिकू शकत नाहीत. यामुळे तू प्रसन्न आणि आत्मविश्वासाने वागायला पाहिजे आणि तिच्यात जितका अधिक आत्मविश्वास निर्माण करता येईल तितका निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तुझ्या मनातील शंका सांगणे ही निष्ठेचीच कृती असेल. त्यानंतर मनात कोणतीही शंका न बाळगता तुला जे काही करता येणे शक्य असेल ते तू केले पाहिजे. ईश्वर प्रत्येकाचा आहे. त्याला जे करायचे असेल ते तो करील. मी तेच करत आहे. मी तिला जवळ झोपवतो. ती नग्न होऊन झोपते परंतु तिला गाढ झोप लागते. जेव्हा केव्हा काम असते तेव्हा तिला उठवावे लागते, मग तेव्हा दोन वाजलेले असो की तीन वाजलेले असो. ती अशा प्रकारे झोपू शकते हे मला फार चांगले चिन्ह वाटते. आगाखान पॅलेसच्या दिवसांपासूनच तिच्यात आत्मभान विसरण्याची शक्ती आहे हे मला माहीत होते. मुख्य गोष्ट ही आहे की ती माझ्या देखरेखीखाली राहून तुझ्या साहचर्यात शिकली पाहिजे. हे घडलेले आहे. आता तिच्यात उत्स्फूर्तपणे जे घडेल ते घडू दिले पाहिजे. असे झाले तरच ती भीतीपासून पूर्णपणे मुक्त होईल.

तू विजयी व्हावे ही माझीच इच्छा आहे. माझी भाषा समजून घेणे तू शिकायला पाहिजे. इंग्रजी शब्द ‘कॉंकर’ (conquer) हा माझ्याकरिता उपयोगाचा नाही. त्या अर्थाने मी हा शब्द कधीही उच्चारू शकत नाही.

मी ज्या विजयासंबंधी बोलतो आहे तो प्रत्येकाने मिळवला पाहिजे. तो धर्म आहे. आपल्याला असत्यावर सत्याने विजय मिळवायचा असतो, हिंसेवर अहिंसेने विजय मिळवायचा असतो. तू इंग्रजी वाचन आणि इंग्रजी विचारसरणी विसरू शकलास तर किती चांगले होईल! मला तुला हे सांगायचे आहे की तू उल्लेख केलेले सर्व प्रसंग तू मनूला सांग. तू मला हे सांगितले तर चांगले होईल. मला ते लेखी मिळाले तर मी ते अधिक चांगले समजू शकेन. ही मनूची सेवाच असेल. तसे करणे हा तिचा विश्वासघात कधीही होणार नाही.

सध्या आपण तिघेही एकत्र येऊ अशी आशा करता येत नाही. तू अधूनमधून जेव्हा येतोस तेव्हा एकत्र बसून बोलणे इतकेच आपण करू शकतो.

सध्या तुला माझ्याबरोबर ठेवणे योग्य होणार नाही. सध्याची साधना आपण वेगळे राहण्यात आहे. याचे सर्वात चागले उदाहरण आभा आहे. यामुळे आभा उच्च पातळीवर पोहोचली आहे आणि मला वाटते की ती अजूनही उच्च पातळीवर पोहोचू शकेल. बापा खुश आहेत आणि दिसतातही. आपण जसजसे आपल्या कामात गुंततो तसतसा ईश्वर आपल्याला एकत्र आणील. आणि वेगळे राहत असताना आपल्याला आपला बळी जरी द्यावा लागला तरी त्यामुळे काहीही हानी होणार नाही. अमतुल सलामचे उपोषण सुरू असताना ती जरी मरण पावली तरी मी फिकीर करणार नाही. ती शूर आहे आणि सध्या ती जे करते आहे ते पूर्ण विचार करून करते आहे असे मला वाटते.

मला माहीत आहे की या वेळी माझ्यापासून दूर असल्यामुळे तू कशाला तरी मुकतो आहेस. परंतु या प्रक्रियेत तू जे मिळवतो आहेस ते किती तरी मोठे आहे.

यामुळे निराश होण्याची वेळ आता निघून गेली आहे हे तू लक्षात ठेवले पाहिजे. आता याहून अधिक काही सांगायचे राहून गेले आहे असे मला वाटत नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि लेखागार. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

--------------

# २४०. प्यारेलाल यांना पत्र

श्रीरामपूर,

सप्टेंबर ३०, १९४६

चि. प्यारेलाल,

मी जर तुला बरोबर समजलो असेन तर सुशीला जे म्हणते ते धक्कादायक आहे. तुला भयानक नैराश्य आले आहे असे मला दिसते. मला तू मनूबद्दल सर्व काही सांगितलेले नाही. कोणत्याही कारणाने का होईना तू माझ्याजवळून काही तरी लपवून ठेवले असशील तर माझ्याकरिता सर्व संपले असेच म्हणावे लागेल. मला वाटते की काही तरी गैरसमज आहे. कमीतकमी तुला हे माहीत आहे की मनूला मी इथे केवळ तुझ्याकरिता आणले आहे, नाही काय?

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि लेखागार. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

--------------

## २४१. प्यारेलाल यांना चिठ्ठी

श्रीरामपूर,

सप्टेंबर ३०, १९४६

हे अशक्य आहे हे तुझ्या लक्षात आले नाही हे आश्चर्य आहे. मी ईश्वर नाही. तू निर्भेळ सत्य सांगत आहेस याबद्दल मला शंका नाही. परंतु मी सक्ती करण्याच्या परिस्थितीत नाही. माझा जर तुझ्यावर विश्वास नसता तर मी तुला इतका त्रास का दिला असता. तुला कल्पना नसेल की मी तिच्याशी किती बोललो आणि तिला समजावण्याचा किती प्रयत्न केला. तू अंदाज करू शकशील परंतु माझ्या प्रयत्नाच्या योग्यायोग्यतेसंबंधी तुझ्या मनात शंका असू शकतील. मी तुझ्या शंका कशा दूर करू शकेन? शक्य असेल तर ईश्वरावर विसंबून राहण्याचा प्रयत्न कर.

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि लेखागार. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

--------------

## २४२. अमतुस्सलाम यांना पत्र

डिसेंबर ३०, १९४६

प्रिय बेटी,

मला तुझे पत्र मिळाले. तुझ्याकडे एक मुसलमान आणि एक शीख अशा दोघांना पाठवत आहे. ते तुला कुराण वाचून दाखवतील आणि तुला जी काही सेवा पाहिजे ती करतील.

तू पाणी सोडले हे मला पटले नाही. तुला दुःखातून सुटका करून आत्महत्या करायची आहे काय? ईश्वराची प्रार्थना करणे आणि शांत राहणे हे तुझे कर्तव्य आहे. या उपवासामुळे तुझा खोकला थांबेल अशी तुला आशा होती, परंतु तसे झाले नाही. मी तुला इतकेच म्हणेन की ईश्वराच्या नावावर तुला जे काही करायचे असेल ते कर. कफ गेला नाही कारण अजूनही तुझ्या अंतःकरणात ईश्वर नाही. याबद्दल तू काय करू शकशील?

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५५०

# २४३. डायरीतील नोंदी

डिसेंबर ३०, १९४६

जाण्यापूर्वी जवाहरलालशी दहाएक मिनिटे चर्चा झाली. त्याचे म्हणणे होते की मी दिल्लीत असायला पाहिजे.

'महात्मा गांधी - द लास्ट फेज', खंड १, पुस्तक २, पृष्ठ १२७ ('महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड २, पृष्ठ १५४)

------------------

# २४४. सैय्यद महमूद यांना पत्र

श्रीरामपूर,

डिसेंबर ३१, १९४६

भाई सैय्यद मेहम्मूद,

मला तुमचे पत्र मिळाले. बिहार मुस्लिम लीगने जो अहवाल पाठवला आणि मला जे कळवण्यात आले आहे त्यातून सत्य काय आहे हे मला कळत नाही (महात्मा गांधी - द लास्ट फेज, खंड १, पुस्तक २, पृष्ठ २४९वर (महात्मा गांधी अखेरचं पर्व, खंड २, पृष्ठ ३०२वर) प्यारेलाल म्हणतात : "गांधीजींनी कर्नल निरंजनसिंग गिल यांना . . . बिहारमध्ये जाऊन तेथील परिस्थितीची पाहणी करून अहवाल देण्याकरिता सांगितले. होते. कर्नल गिलच्या अहवालातून बिहार सरकारकरिता बदनामीकारक असलेल्या अनेक खोट्या गोष्टी मुस्लिम लीगने पसरवलेल्या असल्याचे आढळून आले."). मी श्रीकांत सिन्हा यांना लिहिले आहे. मी अहवाल पाठवीन अशी तार मला त्यांच्याकडून आधीच मिळाली आहे. परंतु तुम्ही मला तुमचा अहवाल पाठवा. त्याचबरोबर सध्या कशी परिस्थिती आहे हेही लिहा.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५१०१.

--------------

# २४५. मित्रांशी चर्चा

श्रीरामपूर,

डिसेंबर ३१, १९४६

नोआखालीत हिंदू आणि मुसलमान शेजारीशेजारी राहू शकत नसतील तर ते तसे संपूर्ण हिंदुस्थानातही करू शकणार नाही, आणि मग पाकिस्तान अपरिहार्य परिणाम असेल. हिंदुस्थानचे विभाजन होईल तर हिंदुस्थान कायमचा गमावला गेला म्हणून समजा. यामुळे माझे म्हणणे आहे की हिंदुस्थान अखंड राहायचा असेल तर हिंदू आणि मुसलमानांनी भावाभावाप्रमाणे प्रेमाने राहायला पाहिजे, शत्रूप्रमाणे बचवात्मक पवित्रा घेण्याकरिता वा बदला घेण्याच्या तयारीने विरोधक म्हणून राहायला नको. यामुळे काही भागात हिंदू आणि मुसलमानांना वेगवेगळे ठेवण्याच्या धोरणाच्या मी विरोधात आहे. ही समस्या सोडवण्याचा एकच उपाय आहे आणि तो म्हणजे अहिंसा. मला माहीत आहे की आज माझा हा आवाज एकाकी आहे. परंतु मी परत सांगतो की हिंदुस्थानकरिता सत्य, अहिंसा, धैर्य आणि प्रेम यांशिवाय इतर कोणातीही मुक्तिचा मार्ग नाही. तो मार्ग कसा प्रभावी आहे हे दाखवून देण्याकरिता मी इथे आलो आहे. नोआखाली गमावली तर हिंदुस्थान गमावला.

'महात्मा गांधी - द लास्ट फेज', खंड १, पुस्तक २, पृष्ठ ५१-२ ('महात्मा गांधी - अखेरचं पर्व', - खंड २, पृष्ठ ६३)

-------------

# २४६. प्रार्थना प्रवचन

श्रीरामपूर,

डिसेंबर ३१, १९४६

**गांधीजींच्या प्रवचनाचा मुद्दा हिंदू-मुसलमान ऐक्य होता. नेते** (पाहा "श्रीकृष्ण सिन्हा यांना पत्र, डिसेंबर २१, १९४६. तसेच हा संदर्भ जवाहरलाल नेहरू, कृपलानी आणि इतर पुढाऱ्यांबद्दलही आहे.) **कोणत्याही प्रस्तावाकरिता आले नव्हते. त्यांनी हिंदू-मुसलमान ऐक्यासंबंधीचे माझे काम वर्तमानपत्रातून वाचले होते. परंतु मी कसे काम करतो हे त्यांच्यापैकी अनेकांना इथे येऊन पाहायचे आहे.**

नोआखालीत जे घडले ते संपूर्ण हिंदुस्थानात घडू नये अशी पुढाऱ्यांची इच्छा आहे. यामुळे घटनासमितीच्या संदर्भात ही भांडणे होऊ नये म्हणून काय करायला पाहिजे यासंबंधीचा सल्ला आणि मदत त्यांना पाहिजे होती. काँग्रेस कधीही कोणत्याही समुदायाच्या विरोधात नव्हती.

पुढारी लोकांनी माझ्याकडून कोणताही प्रस्ताव नेलेला नसून घटनासमितीत हिंदू-मुसलमान ऐक्यासंबंधी ज्या समस्या निर्माण होऊ शकतात त्या संबंधी लेखी सूचना घेण्याकरिता ते आले होते. (पाहा "काँग्रेस कार्यकारिणीला सूचना", डिसेंबर २८।३०, १९४६) या सूचनांच्या आधारावर ते कार्यकारिणीत निर्णय घेतील (दिल्लीत जानेवारी ४ ते ७, १९४७ला होणार असलेल्या).

'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', जानेवारी ३, १९४७

---------------

# २४७. मौन दिवशी निर्मल कुमार बोस यांना लिहिलेली चिठ्ठी

[डिसेंबर १९४६]

हे जर अगदी बरोबर नसेल तर तुम्ही मला योग्य रूप दाखवा. (या चिठ्ठीखाली गांधीजींनी बंगाली अक्षरे लिहिली आहेत; पाहा "मौन दिवशी निर्मल कुमार बोस यांना लिहिलेली चिठ्ठी", डिसेंबर २३, १९४६)

फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. १०५३८. सौजन्य - निर्मल कुमार बोस

----------

# २४८. घनश्यामदास बिर्ला यांना चिठ्ठी

१९४६

माझ्या अंतःकरण दुःखी आहे परंतु जे काही घडत आहे त्यामुळे नाही.

माझे स्थान कुठे आहे याचा विचार मी केला पाहिजे. कार्यकारिणीत माझ्या आवाजाला वजन नाही. मी जर येथून गेलो तर माझी नाराजी निघून जाईल. घटनाक्रम जे वळण घेत आहेत ते मला आवडत नाही. मी बोलू शकत नाही. मी जर यातून अंग काढले तर मी तातडीचे काही तरी काम करू शकेन. आज माझी अवस्था त्रिशंकू सारखी झाली आहे. हिमालयात जाऊन निवृत्त होण्याची वेळ खरोखरच आली आहे काय? अनेक लोक असे सुचवू लागले आहेत. ते असे अज्ञानामुळे म्हणत आहेत परंतु त्यांच्या या म्हणण्यातही अर्थ आहे. बिहार आणि नोआखाली अर्थातच आहेत. मी हे सर्व तुम्हाला लिखित शब्दांतून सांगू शकत नाही. आपण जेव्हा भेटू आणि बोलू तेव्हाच मी असे करू शकेन.

तुम्ही मान्य कराल काय की मालवीयजी ब्रह्मचारी नव्हते, कबूल कराल? 'त्याची आवश्यकता कुठे आहे?' हा आदर्श कधीच अस्तित्वात आला नाही. त्याकडे केवळ जाता येऊ शकते. मला मान्य आहे. आज मी श्रद्धानंदजीकरिता जे लिहीत आहे त्यात मी हेच लिहीत आहे. आज 'हरिजन'करिता मी जे लिहीत आहे त्यात परत हेच सगळे सांगत आहे. हा श्रद्धेचा विषय नाही. मालवीयजींनी ही गोष्ट माझ्याजवळ कबूल केली होती आणि श्रद्धानंदजींनीसुद्धा. त्यांच्या अखेरच्या वर्षांत ते माझ्या फार जवळ आले होते. मी जर स्थितप्रज्ञाची स्थिती प्राप्त केली तर मी निश्चितच १२५ वर्ष जगेन हे मी मान्य करतो. हा श्रद्धेचा विषय नाही. हे २ आणि २ मिळून चार होतात इतके स्पष्ट आहे. असा माणूस आपल्याला भेटत नाही ही वेगळी गोष्ट आहे. आपण जर ती स्थिती प्राप्त करू शकलो तर अजूनही तसे शक्य आहे.

मला खात्री नाही, परंतु मी तीन पौंडांची भर घातली असेल.

गोपाबद्दल काय बातमी आहे? शस्त्रक्रिया झाली काय? आवश्यकता असेल तर शस्त्रक्रिया करावी अशी तार मी केली होती. एक जीव जरी जगवता आला तरी ती चांगली गोष्ट आहे.

मूळ हिंदीवरून. सी. डब्ल्यू. ८०८५. सौजन्य - घनश्यामदास बिर्ला

--------------

# २४९. प्रार्थना प्रवचन

श्रीरामपूर,

जानेवारी १, १९४७

आपल्या भाषणाची सुरुवात करत गांधीजी म्हणाले की ज्या कुटुंबात मी राहिलो त्या कुटुंबातील सदस्यांनी माझ्यावर केलेल्या प्रेमाच्या वर्षावामुळे माझ्या या गावातील मुक्कामाला अजूनच गोडवा आला. परंतु ईश्वराची अशी काही माझ्यावर कृपा आहे की मला कोणत्याही एका गावात फार काळ राहण्याची संधीच मिळत नाही. माझे हे प्रवास किती तरी कडूगोड आठवणींनी भरलेले आहेत. मी या गावात अधिक काळ राहावे असा लोक आग्रह करत आहेत कारण माझ्या येथील मुक्कामामुळे त्यांना धीर येतो असे त्यांना वाटते.

खरे म्हणजे मिलन आणि वियोग हा जीवनाचा स्वाभाविक भाग आहे. यामुळे आश्रमवासी दैनंदिन प्रार्थनेत म्हणतात की "हे प्रभू जीवनाच्या विविध अवस्थांमधून समत्वबुद्धीने जाण्याची आम्हाला शक्ती दे". दररोज सायंकाळी गीतेच्या दुसऱ्या अध्यायातील ज्या श्लोकांचा पाठ म्हणण्यात येतो त्यात समत्वबुद्धीच्या म्हणजे स्थितप्रज्ञ माणसाच्या वैशिष्ट्यांचे वर्णन केलेले आहे. हे वर्णन काही केवळ विशेष गुण असणाऱ्या व्यक्तींकरिताच नाही, ती शिकवण तर सर्वांकरिता महत्त्वाची आहे.

मी उद्या सकाळी श्रीरामपूर सोडणार आहे कारण माझ्या कर्तव्याची हाक मला हे गाव सोडण्याकरिता सांगते. प्रेमाचा आणि मैत्रीचा संदेश देण्याकरिता मला आता गावोगावी फिरून लोकांच्या संपर्कात यायचे आहे. या आधीच्या दांडी यात्रेच्या वेळी माझ्यामागे लाखो लोक असायचे, परंतु या वेळी मात्र मी एकटा असेन. मी जेव्हा एखादे ठिकाण सोडेन तेव्हा आता हा जो माणूस चालला आहे तो आमचा मित्र होता, शत्रू नव्हता असे लोकांना म्हणता आले पाहिजे अशी ईश्वराला माझी प्रार्थना आहे.

आज ख्रिश्चन लोकांचा नववर्ष दिवस आहे. आश्चर्याची गोष्ट ही आहे की आपण हिंदुस्तानी हा दिवस संवत वा हिजरीपेक्षा अधिक उत्साहाने साजरा करतो. याचे कारण येथील ख्रिश्चन सत्ताधारी वर्गाच्या संपर्कात आपण दीर्घ काळापासून होतो हे आहे.

परंतु मी सर्व धर्मांकडे समभावाने पाहत असल्यामुळे व त्यांचा स्रोत एकच असल्यामुळे ख्रिश्चन नववर्षही पाळायला हरकत नाही. तुम्हांला हजरत मोहम्मदची दोन प्रसिद्ध वचने वाचून दाखवायची असा आधी माझा विचार होता. परंतु आता माझे मत बदलले आहे. राजकमारी अमृत कौरने संकलित केलेल्या ख्रिश्चन धर्मातील स्तोत्राचे जे पुस्तक त्यांनी मला भेट दिले आहे त्यातील स्तोत्रांमधील काही भाग तुम्हाला ऐकवण्याचा आता माझा विचार आहे.

गांधीजी म्हणाले की एक गोष्ट अजून काही वेळेपासून माझ्या मनात फिरते आहे. खरा मित्र तोच असतो जो जीवनात प्रगती करण्याकरिता आपल्याला मदत करतो. तुम्हांला जर माझ्यात काही चूक आढळली असेल तर तुम्ही ती

**मला सांगणे हे तुमचे कर्तव्य आहे. तसे झाले तर मी ती दुरुस्त करू शकेन. परंतु असे आपण गोड पद्धतीने आणि मदत करण्याच्या भावनेने केले पाहिजे.**

**ही नववर्षाची सुरुवात आहे. आणि माझी इच्छा आहे की तुम्ही वाईटपणा आणि अपवित्रता यांचा त्याग करून यात प्रवेश करावा आणि आपणा सर्वांना प्रिय असलेल्या हेतूच्या सिद्धीकरिता पात्र व्हावे.**

'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', जानेवारी ३, १९४७ आणि जानेवारी ४, १९४७

--------------

## २५०. डायरीतील नोंदी

जानेवारी १, १९४७

रात्री १२ वाजता उठलो. मनूशी एक तास बोललो. सकाळी ३-१५ पासून पत्र लिहिणे आणि व्यायाम. ६.१५ला डोळा लागला आणि ४ वा ५ मिनीट गोड झोप घेतली. त्यानंतर अगदी ताजातवाना होऊन उठलो. ...अजून पत्रलेखन. ... पत्राचा मजकूर सांगत असताना परत डोळा लागला.

'महात्मा गांधी - द लास्ट फेज', खंड १, पुस्तक २, पृष्ठ ११५ ('महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड २, पृष्ठ १४०)

-------------

## २५१. परशुराम यांना पत्र

जानेवारी २, १९४७ (हे देवनागरीत आहे.)

चि. परशुराम (हे देवनागरीत आहे.),

तू लिहिलेले पत्र मी अतिशय काळजीपूर्वक वाचले. मी ते सकाळी ३ वाजता वाचायला सुरुवात केली आणि ४ वाजता वाचून संपवले. त्यात अर्धसत्य आहेत आणि ही गोष्ट अधिक धोक्याची असते. या पत्रात तू ज्यांच्याबद्दल मत व्यक्त केले ते मत आतापर्यंत दाबून ठेवून तू माझ्यावर अन्याय केला, तू उल्लेख केलेल्या व्यक्तींवर अन्याय केला, तुझ्या स्वतःवर अन्याय केला. तुझ्या परवानगीशिवाय सुशीलाबेनने तुझी पत्रे मला वाचून दाखवली याबद्दल मला खेद होतो. त्यामुळे कोणतीही हानी झाली नाही. तुझ्या इच्छेचा सन्मान करून

मी तुझा हा मसुदा त्या वार्ताहरांना दाखवणार नाही ज्यांच्याबद्दल तू माझ्याशी बोलला होता. आणि मी ती प्रकाशितही करणार नाही. प्यारेलालला मात्र हे दाखवण्याकरिता मी बांधलेलो आहे. योग्य गोष्ट करत असताना तू माझ्यावर विश्वास ठेवला पाहिजे.

मी तुझ्या मागण्या मान्य करू शकत नाही. तू इतर जे मुद्दे उपस्थित केले आहेत ते मला फारसे भावले नाहीत.

माझे असे मत असल्यामुळे आणि आपल्या आदर्शात विरोध असल्यामुळे तुझ्या इच्छेप्रमाणे तू आजच जाण्याकरिता स्वतंत्र आहे. हीच गोष्ट सन्माननीय आणि सत्याला धरून असेल. मला तुझा स्पष्टवक्तेपणा आणि धीटपणा आवडला. टंकलेखक आणि लघुलिपिक म्हणून तुझ्याबद्दल मला वाटणारा आदर तसाच कायम राहील. तुझ्यातील इतर गुण बाहेर काढण्याकरिता हातभार लावण्याचा मी विचार करत होतो. असे होऊ शकले नाही याचा मला खेद होतो.

तू प्यारेलाल आणि सुशीलाबेन यांच्याशी सल्लामसलत करावी असा माझा तुला सल्ला आहे. तुझ्या भवितव्याच्या योजनेकरिता तू कनूभाईंचे मार्गदर्शन घे. मला तुझ्या भवितव्यात नेहमीच रस वाटेल आणि तुला जेव्हा मला लिहावेसे वाटेल तेव्हा तुझ्याकडून काही कळले तर मला आनंदच होईल. यापुढे जाऊन मी म्हणेन की तुला माझ्यात आणि माझ्या सभोवतीच्या वातावरणात ज्या काही उणिवा आढळल्या असतील त्या प्रकाशित करण्याकरिता तू स्वतंत्र आहेस. तुझा खर्च भागवण्याकरिता तुला जो काही पैसा लागेल तो तू घे हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

तुझा,

बापू

फोटोप्रतीवरून. जी. एन. ५८६०. सी. डब्ल्यू. ३०७४

-----------------

# २५२. अमतुस्सलाम यांना पत्र

चंडीपूर,

जानेवारी २, १९४७

प्रिय बेटी अमतुल सलाम,

तुझे पत्र मला वाचून दाखवण्यात आले. माझ्या डोळ्यांवर मातीच्या लेपाच्या पट्ट्या ठेवून मी या पत्राचा मजकूर सांगत आहे. मी तुला जे पाठवले त्याचा अगदी ॲन्टीप्लाजेस्टिनसारखाच उपयोग होतो. ते चागल्या प्रकारे लावले पाहिजे. आयात केलेल्या ॲन्टीप्लाजेस्टिनचा माझ्याजवळ एकच डबा होता. तो मी तुला पाठवला होता. मी पाठवलेली माती तुझ्याजवळ अजूनही असेल. तिचा वापर कर. आज मी आभाच्या गावात आलो आहे. त्या ठिकाणापर्यंत मला जावे लागणार नाही अशी मला आशा वाटत होती. तू पाणी पितेस हे फार चांगले करतेस. तुला जर बस्ती घ्यावी लागणार असेल तर कोणाच्या तरी मदतीने ती घे. सहजपणे शौच्याला साफ होत असेल तर तू ती घेण्याचे कारण नाही. तुला जर डोक्यात भारी वाटत असेल तर आता जसा मी माझ्या डोळ्यांना मातीच्या पट्ट्यांचा लेप लावून पडलो आहे तसा तू (डोळ्याला) मातीचा लेप लाव. यामुळे डोक्याचा जडपणा जातो. अशाच प्रकारे तू मातीचा लेप पोटाला लावशील तर पोटसुद्धा चांगले होईल. तुला सर्दी झाली असेल तर गरम पाण्याची बाटली अंथरुणात ठेव. रामनामसुद्धा प्रत्येक गोष्ट करू शकते परंतु ते अंतःकरणातून यायला पाहिजे. मग इतर कशाचीही आवश्यकता नसते. तुला बस्ती देण्याकरिता मदत करणारी व्यक्ती स्त्री असो वा पुरुष त्यामुळे कोणताही फरक पडत नाही आणि तुला तर मुळीच पडायला नको. माझ्या दौऱ्याबद्दल बोलायचे तर खऱ्या अर्थाने तीन वा चार दिवसांनी त्याची सुरुवात होईल. सतीश बाबूंनी मला चंडिपूरला आणले.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५५१

--------------

# २५३. प्रार्थना प्रवचन

("श्रीरामपूर डायरी"मधून उद्धृत)

चंडिपूर,

जानेवारी २, १९४७

**गांधीजी म्हणाले की इथे राहणाऱ्या वेगवेगळ्या समुदायातील लोकांमध्ये मैत्रीभाव निर्माण करण्याकरिता मी इथे आलो आहे, कोणत्याही एका समुदायाला दुसऱ्या समुदायाविरुद्ध संघटित करण्याकरिता नाही. आतापर्यंत ज्या अहिंसेचे अनुसरण करण्यात येत होते ती दुर्बलांची अहिंसा होती. परंतु आता इथे मी ज्या प्रयोगात गुंतलो आहे तो प्रयोग सबळांच्या अहिंसेचा आहे. यात जर यश मिळायचे असेल तर यामुळे दोन्ही समुदायांना मदत होईल असे नैतिक वातावरण तयार झाले पाहिजे. हिंदू आणि मुसलमान जेव्हा भीती आणि परस्परांबद्दलचा संशय संपवतील तेव्हाच अंतःकरणाचे खरे ऐक्य निर्माण होऊ शकेल. जेव्हा त्यांची अंतःकरणे एक होतील तेव्हा शत्रुत्वाचे कोणतेही कारण उरणार नाही.**

**गावांच्या पुनर्रचनेबद्दल बोलताना गांधीजी म्हणाले की पूर्व बंगालची भूमी ही सुवर्णभूमी आहे. परंतु दुर्दैवाने लोकांचे जीवन जसे असायला पाहिजे तसे नाही. तलावातील पाणी इतके घाणेरडे असते की त्यात हात धुण्याचीही इच्छा होत नाही. गावसुद्धा अस्वच्छ आहेत. श्रीमंत श्रीमंत होत चालले आहेत आणि गरीब अजून गरीब. ही गोष्ट काही निसर्गाने तुमच्यावर लादलेली नाही. ही अवस्था सैतानी आहे. परंतु सामाजिक व्यवस्था अशा प्रकारे सैतानी असली तरी माणसे तशी नाहीत. व्यक्तींनी नवीन विचाराप्रमाणे समता आणि बंधुता यावर आधारलेली नवीन व्यवस्था निर्माण केली पाहिजे.** (पुढील तीन परिच्छेद हिंदुस्तान स्टॅन्डर्डमधून घेतले आहेत.)

**गांधीजी म्हणाले की निकट भविष्यात तुम्ही हिंदुस्थानमध्ये ज्या नवीन शासनाची स्थापना करणार आहा त्यात जुन्या व्यवस्थेतील हे दोष नसतील. आज हिंदू आणि मुसलमान परस्परांपासून दुरावलेले आहेत. परंतु हे दोन्ही समुदाय कुटिरोद्योगाचा विकास करून ग्रामीण जीवनाची नव्याने उभारणी करून आपली आर्थिक परिस्थिती सुधारण्याच्या चांगल्या कामाला लागतील तर हे दोघेही एकाच उद्दिष्टाच्या प्राप्तीकरिता काम करत असल्याचे आढळून येईल आणि मग त्यांच्यात एकोप्याची भावना वृद्धिंगत होत असलेली आढळेल.**

**गांधीजी म्हणाले की सतीश बाबूंनी ज्या कार्यकर्त्यांना इथे पाठवले त्यांनी अनेक धोके पत्करले आहेत. गांधीजींनी कार्यकर्त्यांना सल्ला दिला की तुम्ही तुमच्या अंतःकरणातील भीती काढून टाका आणि तुम्हांला जे विरोध करत आहेत त्यांना जिंकण्याचा प्रयत्न करा. या प्रयत्नात काही मरू शकतात, परंतु माझी पूर्ण खात्री आहे की ही गोष्ट कितीही अशक्य दिसत असली तरी तुमच्या अंतःकरणात प्रेम आणि धैर्याची दृढ भावना असेल तर अत्याचारी लोकांचे अंतःकरण प्रभावित झाल्याशिवाय राहणार नाही.**

**कार्यकर्त्यांना आणि गावकऱ्यांना मी म्हणेन की त्यांनी आपल्या जीवनाच्या एकेका क्षणाचा हिशेब ठेवला पाहिजे. मानवतेच्या निःस्वार्थ सेवेकरिता त्यांनी आपले जीवन वाहून टाकले पाहिजे.**

**शेवटी ग्रामीण भागाकरिता जीवनदायक शक्ती सिद्ध होऊ शकेल अशा आपल्या अठरा सूत्री रचनात्मक कार्यक्रमाचा अवलंब करण्याची  विनंती गांधीजींनी उपस्थित जनसमुदायाला केली.**

'हरिजन', जानेवारी २६, १९४७; आणि 'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', जानेवारी ४, १९४७

-------------

# २५४. रोजनिशीतील नोंदी

(प्यारेलाल लिहितात : “श्रीरामपूरहून निघण्याच्या दिवशी गांधीजींना सकाळी दोन वाजताच जाग आली. परत त्यांनी स्वतःलाच प्रश्न विचारला : ‘ती काम का करत नाही?’. . . त्यांनी मनूला उठवले आणि आपल्यासमोरील सत्त्वपरीक्षा पाहता तिला सतत सावध आणि जागृत राहण्याकरिता सांगितले. . . . आपल्या आजूबाजूच्या वातावरणाचा उल्लेख करत ते स्वतःशीच पुटपुटू लागले की : ‘माझ्यातच खोलवर कोणता असा तरी असा दोष असला पाहिजे की जो मी शोधू शकत नाही. . . . माझा मार्ग कुठे चुकला असेल? माझ्या अहिंसेत आणि श्रद्धेत या सर्वांकरिता जबाबदार असलेली कोणतीतरी भयानक उणीव असली पाहिजे.”)

जानेवारी २, १९४७

सकाळी दोन वाजतापासून जागा होतो. ईश्वराची कृपाच मला टिकवून ठेवते आहे. माझ्यातच काही तरी अशी गंभीर उणीव असली पाहिजे की ज्यामुळे हे सर्व होत आहे. माझ्या सभोवती सर्वत्र गडद काळोख पसरला आहे. या काळोखातून ईश्वर मला प्रकाशाकडे कधी नेईल?

‘महात्मा गांधी - द लास्ट फेज’, खंड १, पुस्तक २, पृष्ठ ११५ (‘महात्मा गांधी - अखेरचं पर्व’, खंड २, पृष्ठ १४०)

--------------

# २५५. छोटूभाई यांना पत्र

चंडिपूर, चेतग्राम,

जानेवारी ३, १९४७

चि. छोटूभाई,

मला तुमची दोन्ही पत्रे मिळाली. शिवभाईबद्दल माझे फार चांगले मत झाले. मी कुठे तरी स्थिरावलो आहे असे वाटले तर त्यांच्यासारख्या माणसांच्या सेवेचा मी उपयोग करू शकतो. असे करण्यात मला आनंद होईल. निर्भय होण्यासंबंधी तुम्ही जे लिहिले आहे ते कदाचित वास्तव असेलही परंतु तुमच्या तोंडी ते शोभत नाही. गुन्हेगार म्हणून सर्वांना माहीत असलेले लोक जरी उघडपणे हिंडत असतील तरी लोकांनी निर्भय होणे शिकायला पाहिजे. जोपर्यंत ही शिकवणूक आपण अंगी बाणवत नाही तोपर्यंत आपण केवळ जनावराच्याच पातळीवर राहू. याबाबतीत हिंसा आणि अहिंसा विसरून जा. ज्या लोकांचा हिंसेवर विश्वास आहे त्यांनी सबळांच्या हिंसेचा वापर करावा आणि मरावे. ज्यांचा अहिंसेवर विश्वास आहे ते तिची शक्ती अशा परिस्थितीतच दाखवून देऊ शकतात. दुर्बलांच्या अहिंसेचे खरी अहिंसा म्हणून वर्णन करून आपण खऱ्या अहिंसेची बदनामी करतो. दुर्बलांचे ते एक साधन वा शस्त्र आहे असे आपण म्हणालो तर ते अधिक बरोबर होईल. आम्ही तिचा उपयोग करणे शिकलो खरे परंतु यामुळेच मला माझ्याबद्दल भीती वाटू लागली आहे की कदाचित नकळत मी दुर्बलांची अहिंसा शिकलो असेन आणि तिलाच सबळांची अहिंसा असे नाव देऊ लागलो असे तर नाही? यामुळे माझ्या अहिंसेच्या शक्तीची आणि माझी स्वतःची परीक्षा घेण्याकरिता मी इथे आलो आहे. माझ्याबरोबर पोलीस असतात आणि आता काही शीख बांधवही माझ्या पदयात्रेत सामील झाले आहेत आणि निर्मल बाबू तर माझ्याबरोबर नेहमीच असतात. यामुळेच मी निर्भयतेचे नाटक तर करत नाही? "कितीही मोठे संकट आले तरी चित्ताची स्थिरता ढळू देऊ नये" अशा आशयाचे हे गीत रायचंदभाई म्हणत असत आणि वयाच्या २०-२१व्या वर्षीच असे होण्याचे स्वप्न मी पाहिले होते. अशा प्रकारे मी बरेच काही लिहू शकतो परंतु "सुज्ञांसमोर फार बोलण्याची गरज कुठे असते?"

आशीर्वाद,

बापू

ता. क. - मी हे पत्र माहितीकरिता पाठवत आहे. ते फाईलमध्ये ठेवा.

गुजराती मायक्रोफिल्मवरून. एम. एम. यू. । २४

# २५६. अमतुस्सलाम यांना पत्र

जानेवारी ३, १९४७

प्रिय बेटी,

काल रात्री सतीश बाबू, दरोगा साहेब आणि इतर लोक आले होते. दरोगा साहेब म्हणाले की तू जर तुझा उपवास १५ दिवसांनी लांबणीवर टाकशील तर ते गुन्हेगाराचा त्या वेळेत शोध घेतील आणि तोपर्यंतही जर हे प्रकरण समाधानपूर्वक मिटले नाही तर तू तुझा उपवास परत सुरू करू शकशील. मला वाटते की ही गोष्ट अगदी न्याय्य आहे आणि दरोगा साहेब जर हे लिहून देणार असतील तू उपवास सोडायला पाहिजे. नंतरचे आपण नंतर पाहू. तू जर उपवास सोडला तर पहिले दोन दिवस ग्लुकोज आणि फळांचा रस घे व नंतर दूध आणि पाणी घे.

इतक्यात तू फार रोड झाली आहेस. रामनाम घेऊन शांत राहा आणि प्रकृती परत चांगली कर. मी तर कोणतीच काळजी करत नसतो. माझ्याकडून जे होऊ शकते ते इथे बसून करत असतो आणि समाधानी राहत असतो. दरोगा साहेबांनी मुसलमान म्हणून हे सांगितले आहे.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - तुझी सेवा करण्याकरिता आभा तिथे येत आहे. प्रकृती लवकर दुरुस्त कर आणि तिला परत पाठव. दरोगा साहेब जे म्हणतात ते तू ऐकले तर तू इथे ४-५ दिवसात येऊ शकशील. ('बापूके पत्र - ८ : बिबी अमतुस्सलामके नाम'मध्ये अमतुस्सलाम लिहितात या विषयावर दरोगासाहेबांशी अनेक तास चर्चा केल्यानंतर मी उपवास न सोडण्याचा निर्णय घेतला.)

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५७७

------------

# २५७. स्त्रियांच्या सभेत भाषण

("श्रीरामपूर डायरी"तून उद्धृत. गांधीजी ज्या घरात थांबले होते त्या घराच्या अंगणात ही सभा झाली होती.)

चंडिपूर,

[जानेवारी ३, १९४७] (जानेवारी ६, १९४७च्या हिंदूवरून)

**गांधीजी म्हणाले की तुम्ही स्त्रियांनी ईश्वरावर आणि स्वतःच्या शक्तीवर अवलंबून राहायला पाहिजे, इतर कोणावरही नाही. तुम्ही अधिक धैर्यशाली व्हायला पाहिजे आणि तुमच्यात भरपूर आत्मविश्वासही असला पाहिजे. तुम्ही जर घाबराल तर गुंड तुमची सहजपणे शिकार करतील.**

हिंदुस्थानी स्त्रिया अबला नाहीत. भूतकाळातील आपल्या शूरपणाच्या कृत्याकरिता त्या प्रसिद्ध आहेत आणि ही शक्ती त्यांनी तलवारीच्या बळावर नाही तर आपल्या चारित्र्याच्या बळावर मिळवली होती. तुम्ही दररोज विविध प्रकारे राष्ट्राला मदत करू शकता. तुम्ही काही उपयुक्त काम करू शकता आणि त्याद्वारे तुम्ही स्वतःलाच नाही तर एकूण राष्ट्रालाही मदत करू शकता. अशा प्रकारे देशाला तुम्ही त्याच्या ध्येयापर्यंत नेऊ शकता.

**गांधीजी म्हणाले की नोआखालीत जे काही घडले त्याकरिता केवळ पुरुषच जबाबदार नाहीत, स्त्रियासुद्धा तितक्याच जबाबदार आहेत. गांधीजी स्त्रियांना संबोधत म्हणाले की तुम्ही सर्वांनी निर्भय व्हायला पाहिजे आणि प्राचीन काळातील द्रौपदी आणि सीता यांच्याप्रमाणे तुमच्यात श्रद्धा असली पाहिजे.**

**गांधीजींनी स्त्रियांना अस्पृश्यतेचा त्याग करण्याकरितासुद्धा सांगितले. ते त्यांना म्हणाले की तुम्ही जर अजूनही अस्पृश्यतेचा त्याग केला नाही तर तुमच्यावर अजून संकटे येतील. श्रोत्यांना गांधीजी म्हणाले की अस्पृश्यांना तुम्ही दररोज आपल्याबरोबर जेवणाकरिता निमंत्रण दिले पाहिजे. तुम्ही जर असे करू शकत नसाल तर जेवणापूर्वी तुम्ही हरिजनाला बोलावा आणि त्याला तुमच्या पाण्याला वा स्वयंपाकाला स्पर्श करण्याकरिता सांगा.**

**गांधीजी म्हणाले की जातिव्यवस्थेच्या कृत्रिम बंधनांमुळे वेगवेगळ्या वर्गाच्या लोकामंध्ये जो दुरावा निर्माण झाला आहे तो दूर करण्याला यामुळे मदत होईल. तुम्ही जोपर्यंत तुमच्या पापाचे प्रायश्चित्त घेत नाही तोपर्यंत तुमच्यावर अधिक आणि तीही अधिक गंभीर संकटे येत राहतील**

हरिजन, जानेवारी २६, १९४७

-------------

# २५८. प्रार्थना प्रवचन

(जानेवारी ६, १९४७च्या 'द हिंदू'तील वृत्ताप्रमाणे ही सभा गांधीजींच्या राहण्याच्या ठिकाणापासून अंदाजे एक मैल अंतरावरील तमलतला येथील रामजस बाग आश्रमात झाली होती.)

चंडिपूर,

जानेवारी ३, १९४६

**आपल्या भाषणाची सुरुवात करत गांधीजी म्हणाले की माझी ही पदयात्रा काशी, बद्रिनाथ सारख्या तीर्थांची लोक जी पदयात्रा करतात त्यासारखी नाही. ईश्वर काही कोणत्या एखाद्या विशेष ठिकाणी राहतो आणि इतर ठिकाणी राहत नसतो असे नाही. तो तर माणसाच्या अंतःकरणात राहत असतो. माणसाने योग्य भावनेने यात्रा केली तर तो शुद्ध आणि शुद्धतर होत जाईल.**

**गांधीजी म्हणाले की जोपर्यंत तुमच्यात संकटांना धैर्याने तोंड देण्याची आणि आपल्या श्रमाने परत आपले जीवन उभारण्याची हिंमत आहे तोपर्यंत तुमची घरेदारे जाळून टाकली आणि संपत्ती लुटली तरी त्यामुळे तुमच्याकरिता काय फरक पडतो? निर्वासितांनी वास्तवाला शौर्याने तोंड दिले पाहिजे आणि असा काही हस्तोद्योग शिकायला पाहिजे की ज्यामुळे तुम्ही तुमच्या कुटुंबाचे आणि तुमचे स्वतःचे पोट भरण्याकरिता श्रमाची भाकरी मिळवू शकाल.**

**गांधीजी म्हणाले की जे लोक श्रम करत नाहीत उलट दुसऱ्याच्या श्रमावर जगतात ते चोर असतात. आपल्या उदरनिर्वाहाकरिता श्रम करण्याच्या जबाबदारीपासून कोणताही माणूस मुक्त नाही. यावर कोणी विचारू शकतो की या बाबतीत काही थोडेसे लोक काय करू शकतात. त्यावर गांधीजी म्हणाले की लाकडाचे लहान लहान ४० कोटी तुकडे एकत्र बांधले तर त्यांच्या आधारे असा पूल बांधता येऊ शकतो ज्यावरून मोठ्यात मोठे सैन्यही जाऊ शकेल. याचप्रमाणे हिंदुस्थानातील ४० कोटी जनतेत जर सहानुभूती आणि परस्परांना मदत करण्याची भावना विकसित झाली तर ते असे नवजीवन घडवू शकतील की ज्यात प्रत्येक स्त्री, पुरुष आणि मुलाची उन्नती होऊ शकेल.**

**कठोर परिश्रमाची आणि आकस्मिक संकटाची भीती जर तुमच्या डोक्यातून निघून गेली तर तुम्ही स्वातंत्र्याच्या मार्गावरील फार मोठा पल्ला गाठू शकाल. तुम्ही जर तुमच्या अंतःकरणातील भीती काढून टाकली तर तुम्ही तुमच्यावर अत्याचार करणारासमोर ताठ मानेने उभे राहू शकाल.**

**गांधीजी पुढे म्हणाले की माझे कार्य तर तेव्हाच पूर्ण होईल जेव्हा माझ्यामागे इथे राहणारे लोक म्हणू शकतील की आता आम्ही त्या अशुद्धीपासून मुक्त झालो आहो जी आतापर्यंत आमच्या जीवनाला दूषित करत होती. आणि आता आम्ही आनंदाने आणि हिंमतीने आमचे जीवन परत घडवण्याच्या कामाला लागू.**

'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', जानेवारी ७, १९४७

# २५९. डायरीतील नोंदी

जानेवारी ३, १९४७

सकाळी फिरायला जात असताना नामशुद्रांच्या वस्तीत झालेला विनाश पाहिला. मनात विचार आले: माणूस धर्माच्या नावावर स्वार्थाने प्रेरित होऊन असा विनाश कसा करू शकतो?

गुजरातीवरून. एकला जानो रे, पृष्ठ ४४

----------------

# २६०. अमतुस्सलाम यांना पत्र

जानेवारी ४, १९४७

प्रिय कन्या,

मला तुझे पत्र मिळाले. मला काळजी वाटत नाही. जोपर्यंत तुझा खोकला सुरू आहे तोपर्यंत मला स्वस्थ वाटू शकत नाही. तापसुद्धा आहे. रामनामाने दोन्हीही दुरुस्त होतील. उपवास सोडण्याकरिता मी तुझ्यावर बळजबरी करणार नाही.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटो प्रतीवरून. जी. एन. ५५२

------------------

# २६१. शाळेच्या उद्घाटन प्रसंगी केलेले भाषण

("श्रीरामपूर डायरी"तून उद्धृत. हे गाव चंडिपूरपासून जवळपास एक मैल अंतरावर होते. गांधीजींनी सकाळी शाळेचे उद्घाटन केले.)

चंडिरगाव,

जानेवारी ४, १९४७

शाळेत कोणते विषय शिकवले जातात आणि शाळेत हस्तकलेचे कोणते तरी शिक्षण दिले जाते काय याची गांधीजींनी विशेषत्वाने चौकशी केली.

गांधीजी म्हणाले की जुन्या पद्धतीने शाळा चालवणे मला पसंत नाही. शाळांमध्ये हस्तकलेचे शिक्षण देण्याचा सल्ला देत गांधीजी म्हणाले की हस्तकलेचे शिक्षण देण्याकरिता शाळांनी अनुदानाची मागणी केली पाहिजे, आणि अनुदान मिळत नसेल तर त्याशिवायच काम भागवले पाहिजे (हे वाक्य अमृत बझार पत्रिकेतून घेतले आहे.).

माझा सल्ला ऐकायचा असेल तर मी म्हणेन की नयी तालीमप्रमाणे शिक्षण द्या. तिच्यात हस्तकलेचे शिक्षण दिले जाते. शिक्षणाचा उद्देश विद्यार्थ्यांना स्वावलंबी करणे असला पाहिजे.

हरिजन, जानेवारी २६, १९४७ : आणि अमृत बझार पत्रिका, जानेवारी ७, १९४७

------------

# २६२. चंडिपूर चंडिरगाव ग्रामसेवा संघाच्या सदस्यांशी चर्चा

(“श्रीरामपूर डायरी”तून उद्धृत. जानेवारी ६, १९४७च्या ‘द हिंदू’मधील वृत्तानुसार सौरेन बोस यांनी गांधीजींच्या सल्ल्याप्रमाणे ग्राम सेवा संघ संघटित केला होता.)

जानेवारी ४, १९४७

**प्रश्न - बहुसंख्य समुदायाच्या आक्रमक मनस्थितीला संतुष्ट करण्याकरिता संघाने काय केले पाहिजे?**

उत्तर - “संतुष्ट” या शब्दाला घाण वास येऊ लागला आहे. आत्मसन्मानाची हानी करून कोणत्याही प्रकारचे संतुष्टीकरण करता येऊ शकत नाही. खरे संतुष्टीकरण आपल्या मनातील सर्व भीती घालवणे आणि काहीही झाले तरी योग्य ते करणे यात आहे. रक्ताचा बदला रक्ताने घेणे ही गोष्ट आता जुनी झाली आहे आणि शूराची अहिंसा हाच समस्या सोडवण्याचा खरा उपाय आहे. (हे वाक्य ‘हिंदुस्तान स्टॅन्डर्ड’मधून घेतले आहे.)

**सरकारकडून मिळणारी आर्थिक मदत तात्पुरता निवारा उभा करण्याकरितासुद्धा अतिशय अपुरी असली तरी ती घ्यावी काय असा प्रश्न निर्वासितांनी विचारला असता गांधीजी म्हणाले :**

तात्पुरत्या निवाऱ्याकरिता खरोखर किती खर्च येतो याचा शोध निर्वासितांनी प्रामाणिकपणे घेतला पाहिजे. शासनाच्या प्रस्तावित अनुदानातून निर्वासितांच्या मूलभूत गरजाही पूर्ण होत नसतील तर त्यांनी ते अनुदान घेऊ नये. असे असले तरी आणि डोक्यावर छप्पर नसले तरी निर्वासितांनी आपल्या घरी परतायला पाहिजे. त्यांनी असे खेळाडू वृत्तीने केले पाहिजे.

**प्रश्न - पुनर्वसन करत असताना सुरक्षिततेच्या कारणाकरिता अल्पसंख्याक समुदायाच्या लोकांना पुरेशा संख्येत एकाच ठिकाणी ठेवले पाहिजे काय?**

उत्तर - अशा प्रकारे लोकांचे केंद्रिकरण करण्याची कल्पनाच करता येऊ शकत नाही. याचा अर्थ होईल परस्परांबद्दल वैरभाव ठेवणाऱ्या गटांचे संपूर्ण देशात विभाजित करणे. असे करणे हे कदाचित शस्त्राच्या बळावर शांतता निर्माण करण्यासारखे होईल. पुरुषार्थ तर यातच आहे की प्रत्येक व्यक्तीने, मग ती कोणत्याही धर्माची असो, वृद्ध असो वा तरुण असो, आपल्या आंतरिक शक्तीवर अवलंबून असायला पाहिजे. ती शक्ती ईश्वराकडूनच मिळत असते.

**दंगलग्रस्त भागात खनी लोक मुक्तपणे फिरत असताना निर्वासितांच्या संरक्षणाकरिता कोणती व्यवस्था केली पाहिजे असे विचारले असता गांधीजी म्हणाले :**

जगातील एकही ठिकाण दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांपासून मुक्त नाही. यामुळे गावातील लोकांनी आपल्या स्वतःच्या शक्तीवर निर्भर राहिले पाहिजे. तुम्हाला टिकाऊ संरक्षण देऊ शकेल अशी शक्ती अंतःकरणातील शक्तीच आहे. ज्या लोकांनी ईश्वराला आपला संरक्षक मानले आहे त्यांनी कोणालाही घाबरण्याचे काय कारण? लोकांनी जे योग्य असेल ते करावे आणि बाकीचे ईश्वरावर सोडावे.

आताकरिता निर्वासिंतांना माझा सल्ला आहे की त्यांनी आपल्या गावात परतावे आणि जो काही धोका असेल त्याचा स्वीकार करावा. असे केल्यामुळे ऊनपावसाचा काही त्रास सोसावा लागला वा काही आवश्यक गोष्टी मिळाल्या नाही तरी हा प्रयत्न करण्यासारखा आहे. (हा परिच्छेद 'हिंदुस्तान स्टन्डर्ड'मधून घेतला आहे.)

**प्रश्न - सरकारी आणि खाजगी मदत थांबवण्यात आली तर निर्वासितांना आपण असे कोणते काम देऊ शकू की ज्यामुळे ते आपली भाकरी कमावू शकतील?**

उत्तर - वैयक्तिक पातळीवर मी तर हातकताईच्याच व्यवसायाचा वैश्विक व्यवसाय म्हणून पुरस्कार करीन परंतु सध्याच्या प्रकरणी मी असे करणार नाही. याउलट मी सल्ला देईन की या खेड्यांमध्ये कोणता व्यवसाय करणे शक्य होईल याचा कार्यकर्त्यांनी शोध घ्यावा आणि जेव्हा याबद्दलची माहिती मिळेल तेव्हा यासंबंधात मी कोणता तरी सल्ला देऊ शकेन. हे निश्चित की हे काम सहकार्याने करावे लागेल. (यानंतरचा भाग 'अमृत बझार पत्रिका'तून घेतला आहे.)

गांधीजी म्हणाले की बंगालच्या या भागात किती तरी तळी आहेत, परंतु मला एकही तळे इतके स्वच्छ दिसले नाही की ज्यात मला हात धुवावे असे वाटेल. गावकरी मागचा पुढचा कोणताही विचार न करता या तळ्यांचा उपयोग सर्व प्रकारच्या कामाकरिता करत असतात. स्वच्छ पाण्याचा पुरवठा ही जीवनाची आवश्यकता आहे. गांधीजींनी सूचना केली की तळ्यांच्या काठावर पाणी स्वच्छ करणारी नैसर्गिक आणि कृत्रिम उपकरणे पुरली पाहिजे आणि सर्वांनी मिळूनमिसळून त्यांचा उपयोग करावा. काही तळी केवळ पिण्याच्या पाण्याकरिता राखून ठेवली जाऊ शकतात. यातील कोणतीही सूचना व्यावहारिक वाटत नसेल तर प्रत्येक खेड्यात नलिकाकूप खोदण्यात यावे. दुसरा पर्याय अनेक मोठ्या रेल्वे स्थानकावर करतात त्याप्रमाणे प्रत्येक घरात एकावर एक मातीचे माठ ठेवून त्यातील काहीत कोळसा आणि रेती टाकून अर्धी भरावी व त्याद्वारे पाणी स्वच्छ करावे. तिसरा पर्याय नलिका कूपांचा आहे. तिसरा पर्याय मला पसंत नाही कारण तो गरीब आणि श्रीमंत लोकांना सारख्याच प्रमाणात लागू करता येऊ शकत नाही. परंतु तात्कालिक उपाय म्हणून

कूपनलिका तयार करणे हा पर्याय चांगला आहे. याकरिता लागणाऱ्या साहित्याच्या पुरवठ्याबद्दल काही अडचणी असतील तर याकरिता शासनाकडून मदत मिळवून देण्याचा मी प्रयत्न करीन.

'हरिजन', जानेवारी २६, १९४७; 'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', जानेवारी ७, १९४७; आणि 'अमृत बझार पत्रिका', जानेवारी ९, १९४७

-----------------

# २६३. प्रार्थना प्रवचन

("श्रीरामपूर डायरी"मधून उद्धृत. या प्रवचनाची तारीख आणि पहिला परिच्छेद 'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड'मधून घेतला आहे. "स्थानिक पुढारी मौलवी एम. फजलूल हक यांच्या विशेष विनंतीवरून ही सभा तिथे घेण्यात आली होती" असे या वृत्तपत्रात नमूद करण्यात आले होते.)

काझिरबझार,

जानेवारी ४, १९४७

**भाषणाची सुरुवात करत गांधीजी म्हणाले की दोन मित्र समुदाय आज परस्परांपासून दुरावले आहेत. मुसलमान समुदायाच्या काही लोकांना तर मी पहिल्या क्रमांकाचा शत्रू वाटतो. नोआखालीत मी मुक्काम केला आहे तो माझी स्वतःची परीक्षा घेण्याकरिता. माझ्या संपूर्ण आयुष्यात मुसलमान समुदायाबद्दल मी कधीही वैननस्य पाळले नाही. खरे म्हणजे माझ्या या दीर्घायुष्यातील किती तरी सर्वोत्तम वर्षे मी दक्षिण आफ्रिकेतील मुसलमान मित्रांच्या सहवासात घालवलेली आहेत.**

**माझे स्थान या प्रांतात नसून बिहारमध्ये आहे असे सतत माझ्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न होत आहे. त्यांचे म्हणणे आहे की इथल्यापेक्षाही बिहारमध्ये अधिक अत्याचार झाले आहेत. श्रोत्यांनी लक्षात ठेवावे की मी बिहारच्या लोकप्रिय सरकारच्या सतत संपर्कात आहे आणि इथे बसल्याबसल्या बिहार सरकारवर जो काही प्रभाव टाकणे शक्य आहे तो टाकण्याचा मी प्रयत्न करतो आहे; परंतु मी नोआखाली सोडत नाही याचे कारण माझे येथील कार्य अगदी वेगळ्या प्रकारचे आहे. इथे राहून मला मुसलमानांना दाखवून द्यायचे आहे की मी त्यांचा तितकाच मित्र आहे जितका मी हिंदूंचा वा इतर समुदायांचा आहे. ही गोष्ट दूरवरून वा केवळ शब्दांनी होऊ शकत नाही.**

**बिहारचे मंत्री आणि किती तरी जबाबदार अधिकारी मला काल भेटण्याकरिता आले होते. हातचे काहीही राखून न ठेवता त्यांनी माझ्यासमोर तेथील संपूर्ण परिस्थिती ठेवली. त्यांनी मान्य केले की त्या दुर्दैवी आठवड्यात पाशवी घटना घडल्या होत्या आणि त्याबद्दल आम्हाला जो काही दोष दिला जाईल तो मान्य करण्याची आमची तयारी आहे.**

**एक जबाबदार सरकार म्हणून त्यांना आपल्या कर्तव्याची जाणीव आहे. अत्याचारी लोकांशी त्यांचे धागेदोरे जुळलेले होते वा जे करणे शक्य होते ते त्यांनी केले नाही हा आरोप त्यांना मान्य नाही. त्यांचे म्हणणे आहे की आमचे निरपराधित्व सिद्ध करण्याकरिता कठोरतम चौकशीला समोर जाण्याची आमची तयारी आहे. मुस्लिम लीगने त्यांच्या विरोधात केलेल्या आरोपाचे उत्तर देण्याचा ते प्रयत्न करत आहेत. गांधीजी श्रोत्यांना म्हणाले मी तुम्हाला आश्वासन देतो की जोपर्यंत बिहारच्या प्रकरणासंबंधात माझे व्यक्तिगत समाधान होत नाही आणि मानवी प्रयत्नांनी जे काही करता येणे शक्य होते ते सर्व प्रयत्न तिथे करण्यात आले असे मला वाटत नाही तोपर्यंत मी शांत बसणार नाही.**

**गांधीजी म्हणाले की माझ्या प्रार्थनासभेतील हिंदू आणि मुसलमान या दोघांचीही उपस्थिती कमी कमी होत चालली आहे, आणि एक दिवस असा येईल की जेव्हा माझे प्रवचन ऐकण्याकरिता माझ्याशिवाय कोणीही राहणार नाही.**

('महात्मा गांधी - द लास्ट फेज', खं-२, भाग २, पृष्ठ १३५ मध्ये प्यारेलाल लिहितात की हे सांसदीय सचिव हमिदुद्दिन यांनी दिलेल्या वक्तव्याच्या संदर्भात होते.) **असे जरी झाले तरी निराश होऊन मी हाती घेतलेला कार्यक्रम सोडणार नाही. मग मी गावोगावी माझा चरखा घेऊन हिंडेन. माझ्याकरिता हीच ईश्वराची सेवा आहे. अशा प्रकारे निःस्वार्थ भावनेने घेतलेले श्रम त्यांची कहाणी आजूबाजूला लोकांना स्वतःच सांगतील. कार्यकर्ते गावोगावी हिंडून लोकांना तलाव कसे स्वच्छ ठेवावे हे सांगतील आणि गावातील लोकांचे जीवन समृद्ध करण्याकरिता त्यांना कला आणि कुटिरोद्योग शिकवतील. अशा माणसापासून लोक दूर पळणार नाहीत, उलट त्याला भेटण्याकरिता ते उत्सुक राहतील.**

**आपले भाषण पुढे सुरू ठेवत गांधीजी म्हणाले की घर सोडून परांगदा झालेले लोक आता बऱ्याच संख्येत परतू लागले असल्याची आणि त्यांच्या पुनर्वसनाची समस्या अधिकाधिक कठीण होत चालल्याची बातमी मला नुकताच मिळाली आहे. घर सोडून गेलेल्या लोकांना माझा सल्ला आहे की त्यांना किती जरी हालअपेष्टा सहन कराव्या लागत असतील तरी त्या सहन करून त्यांनी ताबडतोब आपल्या घरी परतावे. आपल्या श्रमाच्या बळावर परत आपले घर बांधण्याचा आणि जीवन उभारण्याचा त्यांनी निर्धार करावा. घर सोडून जावे लागलेल्या लोकांना सरकारने मदत करावी आणि पळून गेलेल्या लोकांनी सरकारला मदत मागितली पाहिजे. मला माहीत आहे की घर सोडून जावे लागलेल्या लोकांना मदत करण्याकरिता अनेक मदत करणाऱ्या संस्थांची आर्थिक आणि इतर साधनांनी मदत करण्याची तयारी आहे. परंतु जे काम खरे म्हणजे स्वतः जनतेने निवडून दिलेल्या सरकारचे आहे त्या कामाची जबाबदारी या संस्थांनी का घ्यावी? सरकार जर त्वरित मदत करू शकत नसेल वा पुरेशा प्रमाणात मदत करू शकत नसेल तर त्यांनी तसे सांगावे आणि लोकांचे पुनर्वसन करण्याकरिता अशा संस्थांकडून पुरवणी मदत घ्यावी. परंतु ही व्यवस्था कोणतेही जरी रूप घेत असेल तरी विस्थापितांनी घरी परतायला पाहिजे आणि त्यात जे काही धोके वा अडचणी असतील त्या पत्करायला पाहिजे.**

'हरिजन', जानेवारी २६, १९४७; आणि 'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', जानेवारी ८, १९४७

------------------

# २६४. महम्मद यासीन यांना पाठवावयाच्या तारेचा मसुदा

[जानेवारी ४, १९४७ला वा त्यानंतर] (महम्मद यासीन यांनी जानेवारी ४ला पाठवलेल्या तारेच्या उत्तरात ही तार पाठवण्यात आली होती. महम्मद यासीन यांनी आपल्या तारेत लिहिले होते की गांधीजींनी २३ डिसेंबरला जे वक्तव्य दिले होते ते “अन्याय्य” आहे आणि गांधीजींनी बिहारला भेट द्यावी अशी विनंती त्यांनी केली होती.)

महम्मद यामीन साहेब,

पंजाब मुस्लिम लीग,

पटना.

तुमची तार. कोणतेही मत दिलेले नाही. मला कात्रण पाठवा. मुसलमानांना झालेला त्रास कमी करून सांगितलेला नाही. मी कोणताही भेद करत नाही. मी बिहारमध्ये गेल्यामुळे तेथील मुसलमानांचे दुःख कसे कमी होईल ते कळत नाही. ते काम मी येथून चांगल्या प्रकारे करत आहे असे वाटते.

गांधी

फोटोप्रतीवरून. जी. एन. १०५२६

------------------

# २६५. अमतुस्सलाम यांना पत्र

शुक्रवार (ही चूक आहे. जानेवारी ५ला रविवार होता.) जानेवारी [५], १९४७

प्रिय बेटी,

मला तुझे पत्र मिळाले. तू दुरुस्त होणे अपरिहार्य होते. रामनामाचा जप कर. तुला पाहण्याकरिता आज सुशीलाबेन तुझ्याकडे गेल्या आहेत.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५५३

---------------

# २६६. प्रार्थना प्रवचन

("श्रीरामपूर डायरी"तून उद्धृत. तारीख आणि शेवटचा परिच्छेद हे 'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड'मधून घेतले आहेत. त्यात लिहिले होते की "ही सभा हरिश्चर शाळेत झाली होती. हे गाव चंडिपूरहून एक मैल अंतरावर आहे.")

चंडिपूर,

जानेवारी ५, १९४७

इथे मी राजकारणाची चर्चा करण्याकरिता आलेलो नाही.

**माझा इथे येण्याचा हेतू मुस्लिम लीगचा प्रभाव कमी करण्याचा वा काँग्रेसचा वाढवण्याचा नसून तुमच्या दैनंदिन जीवनातील लहानलहान गोष्टींसंबंधी बोलण्याचा आहे. माझा हेतू अशा गोष्टी सांगण्याचा आहे की ज्यांच्याकडे योग्य प्रकारे लक्ष दिले तर या भूमीचा चेहरामोहरा बदलून जाईल आणि आज तुम्ही ज्या दयनीय स्थितीत आहा ती बदलून स्वर्गाचे रूप धारण करील.**

**गांधीजी म्हणाले की बंगाल सदाहरित प्रदेश आहे, इथे भरपूर पाणी आहे आणि जमीन सूपीक आहे. निसर्गाने मुक्त हस्ताने बंगालवर संपन्नतेचा वर्षाव केला आहे. परंतु अज्ञानामुळे येथील लोकांना गरिबी आणि रोगराईचे दुःख भोगावे लागत आहे. सुपारी आणि नारळाच्या बागेपासून तसेच थोड्याशा शेतीपासून जे काही थोडेसे उत्पन्न मिळते त्यावर ते समाधानी असतात. परंतु थोड्याशा ज्ञानाने तुम्ही तुमच्या भूमीची उत्पादकता किती तरी पटीने वाढवू शकता आणि तुमच्या गावाचे रूपांतर शांतता आणि संपन्नतेच्या घरात करू शकता. सर्व गावकरी एक झाले तर तुमच्या भूमीचा चेहरामोहरा बदलायला वेळ लागणार नाही.**

**निर्वासितांची चर्चा करत गांधीजी म्हणाले की त्यांनी आपल्या घरी परत जायला पाहिजे आणि सर्व प्रकारच्या धोक्यांना आणि अडचणींना तोंड द्यायला पाहिजे. ज्या कोणी काही पाप केले असेल त्याने ईश्वरासमोर त्याची स्पष्ट शब्दांत कबुली दिली पाहिजे आणि मग ईश्वर जे काही करील ते मान्य करायला पाहिजे. ईश्वराजवळ आपल्या पापाची कबुली दिल्यानंतर खरे धार्मिक लोक आपल्या चुकांची पुनरावृत्ती करत नसतात.**

**गांधीजी म्हणाले की आज सकाळीच मी अशा घरी गेलो होतो की ज्याच्या मालकाला आश्वासन देण्यात आले होते की तू जर लपवलेल्या सोन्याची माहिती सांगशील तर आम्ही तुझा जीव न घेता तुला सोडून देऊ. परंतु त्या माणसाने जेव्हा सोने कुठे आहे ते सांगितले तेव्हा उपद्रवी लोकांनी त्याला मारून टाकले व त्याचे सोने घेऊन ते पळून गेले. कोणताही माणूस पापापासून मुक्त नसतो. यामुळे उपद्रव करणाऱ्या लोकांना माझा सल्ला आहे की त्यांनी पुढे येऊन ईश्वरावर अवलंबून राहावे आणि शूर आणि प्रामाणिक माणसाप्रमाणे जगावे.**

'हरिजन', जानेवारी २६, १९४७; आणि 'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', जानेवारी ८, १९४७

# २६७. मीराबेन यांना पत्र

पत्रोत्तराचा पत्ता -

काझिरखिल, रामगंज पोस्ट,

नोआखाली जिल्हा,

शिबीर चंडिपूर,

जानेवारी[२।६] (मूळ स्रोतावरून अनुमानित), १९४७

चि. मीरा,

तुझे रजिस्टर्ड पत्र माझ्यासमोर आहे. या पत्रासह परशुराम तुला बातम्या देईल. मी इतकेच सांगण्याकरिता या पत्राचा मजकूर सांगतो आहे की तू वर्णन केल्याप्रमाणेच येथील परिस्थिती आहे. माणसाची वाणी, विचार आणि वर्तन यांच्या शुद्धतेवर सर्व काही अवलंबून असते. इथे शुद्धता हा शब्द व्यापकतम अर्थाने वापरला आहे. असे झाले तर डोकेदुखीकरिता काही कारणच शिल्लक राहणार नाही. केवळ हे मूलभूत सत्य समजून घे. आपण अनेकदा शुद्धता हा शब्द ढिलेपणाने वापरतो आणि अनेक प्रकारच्या उणिवांकडे दुर्लक्ष करतो. माझे इथे कसे सुरू आहे वा मी इथे काय करतो याची काळजी करू नको. मला जर माझ्यातील सर्व काही ओतून देण्यात इथे यश मिळाले तर माझ्यात ईश्वर वास करू लागेल. मग जे काही होईल ते बरोबरच होईल हे मला माहीत आहे. परंतु मी स्वतःला शून्य करू शकतो काय यावरच हे सर्व अवलंबून आहे. अहंम् आणि शून्य यांना आजूबाजूला ठेवून विचार केला तर या दोन चिन्हांत जीवनाची संपूर्ण समस्या उलगडेल. तू जरी दूर असलीस तरी या प्रक्रियेत तू मला फार मदत केली आहे. असे दिसते की तुझ्या कार्यक्षेत्रात तू तुझे कर्तव्य पूर्णार्थाने पार पाडते आहेस. (इथपर्यंत हे पत्र टंकलिखित होते. यापुढील भाग गांधीजींच्या हस्ताक्षरात आहे.)

या पत्राचा मजकूर चार दिवसांपूर्वी अंथरुणात आराम करताना सांगितला होता. परंतु त्याचे टंकलेखन झाले नव्हते. मध्यंतरीच्या काळात तुझे दुसरे पत्र आणि खादीचे नमुने आले. तुझ्याजवळ विक्रीकरिता काही खादी शिल्लक आहे काय? मी ही चौकशी निर्वासितांकरिता करतो आहे. कोणत्याही कामात अती करू नको आणि फार जास्त काम करू नको. "विनाकारण कशाचीही काळजी करू नको.(फिलिपियन्स ४.६) उद्यापासून पदयात्रा सुरू होणार आहे. यानंतर कदाचित तुला पत्र पाठवता येणार नाही. तुला एक बुलेटीन पाठवले जाईल.

हे मी अगदी सकाळी खरडत आहे. “जे कशाचीही अपेक्षा करत नसतात ते भाग्यवान असतात.” (फोर्टेस्क्यूला अलेक्झॅन्डर पोप यांनी सप्टेंबर २३, १७२५ला लिहिलेल्या पत्रातील वाक्याचा अनुवाद.)

स्नेह,

बापू

मुळावरून. सी. डब्ल्यू. ६५२१. सौजन्य - मीराबेन. शिवाय जी. एन. ९९१६

---------------------

# २६८. अब्दुल्ला यांना पत्र

जानेवारी ६, १९४७

प्रिय अब्दुल्ला साहेब,

मी तुमचे पत्र काळजीपूर्वक वाचले. उत्तर स्पष्ट आहे. माझी असहकाराची कल्पना आणि त्याची परिणती पूर्णपणे अहिंसक होती. याचा अर्थ असा नाही की त्यानुसार केले गेलेले आचरण नेहमीच परिपूर्ण होते. सिद्धांत आणि आणि त्यानुसार केलेले आचरण हे कधीही समान नसतात, युक्लिडच्या रेषेच्या व्याख्येशी त्याने काढलेली रेषासुद्धा जुळत नसते.

मित्रराष्ट्रांच्या भ्रातृत्वहीन धोरणाचे घोर परिणाम झाले, आणि ते शोधण्याचा प्रयत्न करावा लागत नाही, आणि दुर्दैव असे की हा विनाश अजूनही पूर्णपणे थांबलेला नाही. तो आपल्याला कुठे घेऊन जाईल हे कोणालाही माहीत नाही.

मला वाटले की तुम्हाला अशा प्रकारे उत्तर पाठवावे की तुम्हाला हव्या त्या प्रकारे तुम्ही त्याचा उपयोग करू शकाल. परंतु तुमचे नाव उघड न करता मी तुमच्या पत्राचे जाहीर उत्तर द्यावे अशी जर तुमची इच्छा असेल तर तसे मी आनंदाने करू शकतो.

तुम्ही तुमच्या ठिकाणी चांगल्या प्रकारे काम करत असाल अशी आशा आहे.

एच. अब्दुल्ला साहेब, पोलीस निरीक्षक द्वारा खान साहेब, पोलीस अधीक्षक, नोआखाली

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

------------------

# २६९. प्यारेलाल यांना पत्र

जानेवारी ६, १९४७

चि. प्यारेलाल,

निर्मल बाबूंचे सोबत जोडलेले पत्र वाच, सुशीलाला ते वाचू दे आणि मग ते परत कर. सध्या तू इथे येऊ नये असा माझा तुला सल्ला आहे. माझी देवशी (देव प्रकाश नाय्यर) दीर्घ चर्चा झाली. मी त्याच्याकडून भरपूर काम घेतो आहे. तो अधिक लिहील. मनूला काही गोष्टींची अतिशय घृणा वाटू लागली आहे. तू आलास तर तिची ती घृणा अजूनच वाढेल. निर्मल बाबूंच्या पत्रावरून मला ते नंतर कळले. मनूने समत्वभाव गमावला आहे. किशोरीलालच्या पत्राची त्यात फार मोठी भूमिका आहे. तुला शक्य असेल तर तिची भक्ती करण्याऐवजी तू जर ईश्वराची भक्ती केली तर सर्व काही सोपे होईल. तू जर तसे करू शकत नाही तर सर्व काही अस्ताव्यस्त होऊन जाईल. शक्य आहे की या यज्ञालाही काही अर्थ राहणार नाही. आणि असे झाले तर मुख्य अपराधी मीच असेन, तुमच्यापैकी इतर कोणीही नाही. परंतु सांगायला लागलो तर ही फार लांब गोष्ट होईल. तुला मनू पत्नी म्हणून मिळू शकणार नाही हे मला स्पष्ट दिसते. परंतु ती पत्नी म्हणून मिळावी अशी जर तू ईश्वराकडे प्रार्थना करशील तर ती तुला शिष्या म्हणून मिळेल. ही कठीण परिस्थिती आहे. तुला शक्य असेल ते कर. मला वेगळे काही दिसत नाही. देव बाकीचे लिहील. तू जर हे सर्व सुशीलाला सांगशील तर बरे होईल. तिला निर्मल बाबूंचे पत्र दाखव.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

-----------------

# २७०. निर्मल कुमार बोस यांना मौनदिवशी लिहिलेली चिठ्ठी

जानेवारी ६, १९४७

त्यांना बंगालीत सांगा की तक्रार जर खरी असेल तर ताबडतोब पोलिसांकडे जा. मला वक्तव्याची प्रत (हे हिंदीत होते.) मिळणे महत्त्वाचे वाटते व मला त्याचा जर काही उपयोग करायचा असेल तर तो करण्याची परवानगी पाहिजे. पत्रोत्तराच्या अवस्थेत असलेल्या या पत्राचा सध्या तरी मी सत्य शोधून काढण्याकरिता खाजगी उपयोग करत आहे. तक्रारीत जर तथ्य असेल तर ही गोष्ट खरोखरच वाईट असेल. वाईटपणा मुळापासून उपटून काढला पाहिजे.

'महात्मा' खंड ७च्या पृष्ठ ३८४ आणि ३८५मधील चित्रावरून.

-------------------

# २७१. एक पत्र

[जानेवारी ६, १९४७]

(हे वल्लभभाई पटेल यांना जानेवारी ६ला पाठवलेल्या पत्राबरोबर होते. नाव मूळ स्रोतात वगळलेले आहे.)

भाई,

अजून (पैसा) आलेला नाही. माझी खात्री आहे की अशा प्रकारचे काम केवळ पैशाने होत नसते. मला काँग्रेसकडून एक कौडीही नको आहे. जोहर येथे जो काही पैसा गोळा झाला त्यानेच हे काम होईल. त्यांनी जर काहीच दिले नाही तरी मला हे काम सुरू करावे लागेल. इतर कोणत्याही मार्गाने खरी सेवा करता येऊ शकत नाही.

आशीर्वाद,

बापू

हिंदीवरून. 'बापूना पत्रो - २ : सरदार वल्लभभाईने', पृष्ठ ३४४

------------

# २७२. वल्लभभाई पटेल यांना पत्र

चंडिपूर,

जानेवारी ६, १९४७

चि. वल्लभभाई,

मला तुमच्या प्रकृतीची काळजी वाटते. तुम्ही दुरुस्त व्हायला पाहिजे. किती तरी कामे करायची आहेत.

परिस्थिती फार नाजूक आहे. येथील घटनाक्रमावर लक्ष ठेवा. मी संपूर्ण काळोखात आहे परंतु माझ्या आशेचा दीप पूर्वीच्याच तेजाने तळपतो आहे.

मी ...ला लिहिलेले पत्र सोबत आहे (पाहा याआधीचा विषय). ते कृपाकरून त्यांच्याकडे पाठवा. पैशाला देव मानल्यामुळे आपण खऱ्या देवाला विसरतो.

अखेरीस मी जेव्हा तुम्हाला लिहायला बसतो तेव्हा अनेक गोष्टी मी विसरून जातो यामुळे लिहिण्याकरिता मी लवकर तयार होत नाही. बाकीचे तुम्हाला सुधीर सांगेल.

आशीर्वाद,

बापू

गुजरातीवरून. 'बापूना पत्रो - २ : सरदार वल्लभभाईने', पृष्ठ ३४३-४

------------------

# २७३. अमतुस्सलाम यांना पत्र

जानेवारी ६, १९४७

प्रिय बेटी,

मला तुझे लांब पत्र मिळाले. तुला माझे पत्र काल मिळाले काय (पाहा "अमतुस्सलाम यांना पत्र", जानेवारी ५, १९४७)? मी दोन पत्रे लिहिली होती. तुला माझ्या मांडीवर मरायची इच्छा का आहे? तू मरायचे ठरवले आहे काय! हे सर्व धर्मविरोधी आहे. मी तिथे खास करून (तुला भेटायला) येऊ शकत नाही. इथून मला जे काही करता येईल ते मी करतो आहे. ईश्वराची इच्छा असेल त्याप्रमाणे तुला जगायचे वा मरायचे आहे. इतर कोणताही विचार सोडून दे. माझ्या दौऱ्यात तुझ्या खेड्यालाही स्थान आहे. तोपर्यंत आपण जिवंत राहिलो तर आपली भेट होईलच.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ४५४

-----------------

# २७४. प्रार्थना प्रवचन

("व्हाय वाकिंग टूर?" या शीर्षकाखालील लेखात हे प्रकाशित झाले होते. याचे संपादकीय गांधीजींनी हिंदुस्तानीत लिहिले होते आणि त्याचा अनुवाद निर्मल कुमार बोस यांनी केला होता.)

चंडिपूर,

जानेवारी ६, १९४७

माझे साप्ताहिक मौन अंदाजे सकाळी ७ वाजता संपेल. यामुळे मला जे काही सांगायचे आहे ते मी लिहून काढत आहे. उद्या मी ज्या यात्रेची सुरुवात करतो आहे ती पूर्ण व्हावी व तिचा अपेक्षित परिणाम व्हावा अशी मी ईश्वराला प्रार्थना करतो आहे. माझ्या या प्रार्थनेत तुम्ही सर्वांनी सहभागी व्हावे. परंतु प्रार्थना करण्यापूर्वी मी ही पदयात्रा का सुरू करतो आहे हे तुम्हांला कळले पाहिजे. या यात्रेमागे केवळ एकच हेतू आहे आणि तो स्पष्ट आहे. ईश्वर हिंदू आणि मुसलमान या दोघांचीही अंतःकरणे शुद्ध करो आणि या दोन्ही समुदायातील लोकांमध्ये परस्परांबद्दल अविश्वासाची आणि भीतीची जी भावना निर्माण झाली आहे ती नाहीशी होवो. तुम्ही सर्वांनी या प्रार्थनेत सामील व्हायला पाहिजे आणि ईश्वर आमचा मालक आहे आणि त्याने आम्हाला यश द्यावे असे म्हणायला पाहिजे.

या हेतूच्या सिद्धीकरिता या पदयात्रेची आवश्यकता काय? ज्या माणसाचे स्वतःचेच अंतःकरण शुद्ध नाही तो इतरांना शुद्ध राहण्याकरिता कसा काय म्हणू शकतो? ज्या माणसात स्वतःतच धैर्य नाही तो इतरांना धीर धरण्याकरिता कसे प्रेरित करू शकतो? जो स्वतःच शस्त्रास्त्रांनी सज्ज आहे तो इतरांना शस्त्रत्याग करायला कसा सांगू शकतो? हे सर्व प्रश्न योग्यच आहेत आणि असे प्रश्न मलाही विचारण्यात येत आहेत.

माझे अंतःकरण पूर्णपणे शुद्ध आहे, त्यात कोणत्याही प्रकारची अशुद्धता नाही हे मी या दौऱ्यात प्रत्येक खेड्यातील प्रत्येक माणसाला दाखवून देण्याचा प्रयत्न करीन. ज्या लोकांचा माझ्यावर विश्वास नाही त्या लोकांमध्ये मी जेव्हा हिंडेन आणि राहीन तेव्हाच मी त्यांना हे दाखवू शकेन. तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण आहे कारण मी स्वतःच पोलिसांच्या संरक्षणाखाली फिरतो आहे. माझ्याबरोबर शस्त्रसज्ज पोलीस आणि सैनिक आहेत. ते नेहमी सावध असतात आणि आदरपूर्वक माझी काळजी घेत असतात. हे सर्व पूर्णपणे सरकारच्या हाती आहे. माझ्या या पदयात्रेच्या दरम्यान मला पोलीस संरक्षण देणे आपले कर्तव्य आहे असे

आमच्या सरकारला वाटते. मी हे कसे थांबवू शकतो? मी केवळ इतकेच म्हणू शकतो की ईश्वराशिवाय अजून कोणीही माझा संरक्षक नाही. तुमचा माझ्यावर विश्वास आहे की नाही हे मला माहीत नाही. मी खरे तेच सांगतो आहे. माणसाच्या अंतःकरणात काय आहे हे केवळ ईश्वरालाच माहीत असते; इतर कोणालाही हे माहीत असू शकत नाही. आपल्या हृदयाची हाक ऐकणे हे ईश्वरावर श्रद्धा ठेवणाऱ्या प्रत्येक माणसाचे कर्तव्य असते. मी अशा प्रकारे वागतो हा माझा दावा आहे. परंतु शीख बांधवांना तर सरकारने ठेवलेले नाही ना? तरी मी त्यांना माझ्याबरोबर फिरण्यापासून अडवू शकतो काय? तेसुद्धा माझ्याबरोबर सरकारच्या परवानगीने आहेत हे तुम्हाला माहीत असले पाहिजे. ते इथे भांडणाच्या हेतूने आलेले नाहीत. त्यांनी आपल्या किरपाणीसुद्धा मागे ठेवल्या आहेत. कोणताही भेदभाव न करता ते इथे दोन्ही समुदायांची सेवा करण्याकरिता आलेले आहेत. हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, पारसी इत्यादी सर्व धर्मांच्या माणसांनी हिंदुस्थानला आपला देश समजावे व सर्व धर्मांच्या लोकांमध्ये ऐक्य निर्माण होईल असे वागावे हा पहिला पाठ नेताजींनी स्थापिलेल्या आझाद हिंद सेनेला शिकवला होता. शीख दोन्ही समुदायांची सेवा करू इच्छितात आणि माझ्या मार्गदर्शनाखाली हे काम करण्याची त्यांची इच्छा आहे. अशा मित्रांना मी कसा नाकारू शकतो आणि नाकारावे तरी का? ते सेवा करतात कारण त्यांनी सेवा करण्याची शपथ घेतली आहे आणि केवळ देखावा करण्याकरिता ते सेवा करत नाहीत. मी जर त्यांची सेवा घेण्याला नकार दिला तर मी माझ्याच नजरेतून पडेन आणि मी भित्रा ठरेन. या तुमच्या बांधवांवर तुम्ही विश्वास ठेवा आणि त्यांना भावंडांप्रमाणे वागवून त्यांच्या मदतीचा लाभ घेतला पाहिजे. ते किती तरी मदत करू शकतात, त्यांना भरपूर अनुभव आहे. ईश्वराने त्यांना प्रकृतीचे आणि प्रामाणिकपणाचे वरदान दिले आहे.

मी त्यांच्याबद्दल जे म्हणालो ते खोटे असल्याचे सिद्ध झाले तर ते इथून निघून जातील; आणि काही वाईट हेतूने मी त्यांना इथे ठेवत असेन तर मी नष्ट होईन आणि ज्या हेतूने मी इथे आलो आहे तो हेतूही विफल होईल. या यात्रेच्या दरम्यान मला तुम्हांला काही आवश्यक गोष्टी शिकवायच्या आहेत. उदाहरणार्थ खेड्यांमध्ये स्वच्छ पाणी कसे मिळेल, आपण स्वच्छ कसे राहावे, ज्या भूमीतून आपण निर्माण झालो त्या भूमीला चांगले कसे ठेवावे, आपल्या डोईवरील असीम आकाशातून जीवनशक्ती देणारा श्वासोच्छ्वास कसा करावा, आपल्या अवतीभवतीच्या परिसरातून नवजीवनाचे प्राशन कसे करावे, आणि अधिकातअधिक चांगल्या प्रकारे सूर्यकिरणाचा उपयोग कसा करावा इत्यादी. आपला देश गरीब झाला आहे. या सर्व साधनसंपत्तीचा कशा

प्रकारे उपयोग करावा आणि या भूमीला सुवर्णभूमी कसे करावे हे मी तुम्हांला शिकवीन. या दोऱ्यात अशा प्रकारे मला तुमची सेवा करता यावी अशी ईश्वराला माझी प्रार्थना आहे.

हिंदीवरून. 'हरिजनसेवक', जानेवारी २६, १९४७

------------------

## २७५. अमतुस्सलाम यांना पत्र

जानेवारी ७, १९४७

प्रिय बेटी,

मला तुझे पत्र मिळाले. आता प्रार्थनेची वेळ झाली आहे. मी थर्मास पाठवत आहे. मला कळवत राहा. तू दुरुस्त झालीस तर मला आनंद होईल.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५५५

---------------

# २७६. सतीश चंद्र दास गुप्ता यांच्याशी चर्चा

(प्यारेलाल लिहितात : “९ वाजता गांधीजींची मंडळी मसीमपूर येथे पोहोचली. सतीश चंद्र दास गुप्ता यांनी गांधीजींची राहण्याची व्यवस्था एका लहानशा नीटनेटक्या आरामशीर झोपडीत केली होती. … ती झोपडी वेगवेगळ्या करता येऊ शकणाऱ्या बांबूच्या कामट्या आणि गवताच्या कमी वजनाच्या तट्ट्यापासून तयार करण्यात आली होती. . . .परंतु गांधीजींना ती झोपडी ‘राजमहालासारखी’वाटली. . . .”)

जानेवारी ७, १९४७

माझ्या या यात्रेच्या दरम्यान मी अशा झोपड्यांचा उपयोग करू शकत नाही ज्या उघडून गोळा करता येतात आणि एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेता येतात.

मी कुठेही आणि कोणत्याही ठिकाणी आरामात राहू शकतो. एकही व्यक्ती मला आपल्या छपराखाली ठेवण्याकरिता तयार नसेल तर मी आरामात झाडाच्या सावलीत राहू शकेन.

‘महात्मा गांधी - द लास्ट फेज’, खंड १, पुस्तक २, पृष्ठ १४० (‘महात्मा गांधी - अखेरचं पर्व’, खंड २, पृष्ठ १६९)

---------------

# २७७. मसीमपूर - मेरुआ ग्राम सेवा संघात भाषण

(ही सभा गांधीजीच्या चलझोपडीसमोर झाली होती. गांधीजी तिथे पोहोचताच ही सभा सुरू झाली होती.)

मसीमपूर,

जानेवारी ७, १९४७

**महात्मा गांधी म्हणाले की लोकांनी स्वतःला आणि स्वतःच्या धर्माला आंतरिक रूपाने शुद्ध करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, धर्माच्या बाह्य प्रदर्शनात पडू नये.**

**आर्यसमाज म्हणतो की प्रत्येक व्यक्तीने जानवे घातले पाहिजे. याबद्दल तुमचे काय मत आहे असा प्रश्न एकाने विचारला. गांधीजी म्हणाले की ज्याला जानवे आवडत असेल त्याने ते घालायला हरकत नाही. परंतु याकरिता कोणतेही आंदोलन वा प्रचार केला जाऊ नये. केवळ जानवे घातल्याने कोणताही लाभ होणार नाही कारण त्यामुळे हिंदू धर्मातील कोणतेही दोष दूर होणार नाहीत.**

**आर्यसमाजाच्या आदर्शात आणि गांधीजींच्या आदर्शात अंतर आहे असे आर्यसमाजी म्हणतात. हे बरोबर आहे काय असे विचारले असता गांधीजी म्हणाले की आर्यसमाजाच्या अनेक शाखा असल्यामुळे आर्यसमाजातच मतभेद आहेत. त्यांचे काही आदर्श माझ्या विचारांशी जुळतात तर काही जुळत नाहीत. उदाहरणार्थ मध्यप्रदेश विधान परिषदेचे अध्यक्ष घनश्याम गुप्ता यांच्यासारख्या लोकांच्या आदर्शाशी माझे विचार जुळतात परंतु असे प्रत्येक आर्यसमाजीबद्दल म्हणता येऊ शकत नाही.**

**लोकांनी आपली उपजिविका कशी मिळवावी या प्रश्नाचे उत्तर देताना गांधीजी म्हणाले की मी तर सर्व लोकांना हाच सल्ला देईन की त्यांनी चरखा चालवावा. कापड विणाई आणि आणि सुतार कामाचाही सल्ला मी देईन. लोकांनी आपला अधिकात अधिक वेळ या कामात लावला पाहिजे आणि अशा प्रकारे पवित्र जीवन व्यतीत केले पाहिजे.**

**गांधीजींनी प्रत्येक गावातील पिण्याचे शुद्ध पाणी सहजपणे उपलब्ध होण्याच्या व्यवस्थेवर भर दिला.**

'द हिंदू', जानेवारी ९, १९४७

----------------

# २७८. जमान यांच्याशी चर्चा

(जमान - मदत आणि पुनर्वसनाची जबाबदारी असलेले अतिरिक्त जिल्हाधिकारी, नोआखाली. वृत्तानुसार विस्थापितांना द्यावयाच्या अनुदानाची चर्चा करण्याकरिता ते गांधीजींना दुपारच्या वेळी भेटले होते. या अनुदानाच्या रकमेसंबंधी मदतकार्य करणाऱ्या विविध संस्था आणि अधिकारी यांच्यात मतभेद होते.)

जानेवारी ७, १९४७

गांधीजी म्हणाले - लोक जर हे अनुदान म्हणजे प्रत्येक कुटुंबाकरिता २५० रुपये स्वीकारत नसतील तर सरकारने यात हस्तक्षेप केला पाहिजे आणि गरीब श्रीमंत असा भेद न करता सर्वांकरिता सोयीस्कर होतील अशी घरे बांधून लोकांना त्यात राहायला सांगितले पाहिजे. असे जरी असले तरी कोणत्या तरी कुशल एंजिनिअरकडून ते तपासून घेतले पाहिजे. सध्या इमारत न बांधता केवळ झोपड्या बांधल्या पाहिजे. त्यांनी काम भागेल.

श्री जमान म्हणाले की त्यांनी कर्जाची रक्कम कमाल १,००० रुपयांपर्यंत वाढवण्यात यावी आणि हे कर्ज निर्व्याज असावे व त्याची परतफेड १० समान हप्त्यात करण्यात यावी अशी शिफारस केली आहे. याशिवाय कारागिरांना २०० रुपयांचे अजून अनुदान देण्यात यावे आणि भांड्याकुंड्यांकरिता कुटुंबातील प्रत्येक सदस्याकरिता १० रुपये परंतु जास्तीत जास्त १०० रुपये अनुदान देण्याचीही शिफारस त्यांनी केली आहे. ज्या लोकांची घरे लुटण्यात आली आहेत त्यांच्या कुटुंबियांकरिता हे अनुदान मोफत असेल. याशिवाय शेतकऱ्यांना गायी, म्हशी, बैल वगैरे विकत घेण्याकरिता २५० रुपयांचे अनुदान द्यावे अशी शिफारस त्यांनी केली आहे.

गांधीजी यावर म्हणाले की या कर्जांवर व्याज का आकारले जावे हे मला कळत नाही. ते पुढे म्हणाले की सरकार जर यावर व्याज घेणार नसेल तर लोकांना ही गोष्ट फार चांगली वाटेल.

'अमृत बझार पत्रिका', जानेवारी १९, १९४७

---------------

# २७९. प्रार्थना प्रवचन

(या भाषणाचे विविध स्रोतातून जे वृत्त आले होते त्यात मेळ घालण्यात आला आहे.)

मसीमपूर,

जानेवारी ७, १९४७

**गांधीजी म्हणाले की काही मुसलमान प्रार्थनास्थळ सोडून निघून गेले आहेत. चौकशी केल्यानंतर मला कळले की इथे रामधून म्हणण्यात येत असल्यामुळे ते हे ठिकाण सोडून गेले. माझ्या या पदयात्रेच्या पहिल्याच दिवशी असे घडले याचा मला आनंद होतो. रामधून म्हटल्यामुळे माझे मुसलमान मित्र अस्वस्थ व्हावे ही अतिशय दुःखाची गोष्ट आहे. देशाची प्रगती होण्याकरिता कोणकोणते अडथळे आपल्याला पार करावे लागतील व कशाकशाला तोंड द्यावे लागेल हे यावरून दिसून येते. इथे करण्यात आलेल्या प्रचाराचे स्वरूप असे होते की हिंदू भक्तांनी म्हटलेली रामधूनसुद्धा मुसलमान सहन करू शकत नव्हते.**

**माझ्या काही मित्रांना ईश्वराला खुदा या नावाशिवाय इतर कोणत्याही नावाने बोलावलेले सहन होत नाही याचे मला दुःख होते. परंतु त्यांनी आपला विरोध उघडपणे आणि स्पष्टपणे जाहीर केला याचा मला आनंद होतो. जिल्ह्यात ऑक्टोबरमध्ये ज्या दंगली झाल्या त्या वेळी लोकांची कशी मानसिकता असावी याची कदाचित कल्पना करता येऊ शकते. कोणाच्याही भावनांना विनाकारण धक्का लागू नये म्हणून मी अतिशय काळजीपूर्वक वागत असतो. मुसलमान बांधवांनी तसेच हिंदू बांधवानी लक्षात ठेवले पाहिजे की ईश्वराला आपण कोणत्या नावाने संबोधतो यामुळे काहीही फरक पडत नाही. तो एकच निर्माता असतो ज्याची विविध लोक आपापल्या मुखाद्वारे भक्ती करत असतात. इस्लामच्या उदार परंपरेला अनुरूप असलेले स्वातंत्र्य मला अवश्य द्यावे अशी मुसलमान बांधवांना माझी विनंती आहे. मुस्लिम लीगच्या व्यासपीठावरूनसुद्धा वारंवार सांगण्यात आले आहे की पाकिस्तानमध्ये अल्पसंख्याकांना आपापल्या धर्मानुसार आचरण करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असेल आणि बंहुसंख्याकांप्रमाणेच ईश्वराची पूजा आणि आराधना करण्याचे स्वातंत्र्य अल्पसंख्याकांना असेल.**

**पाकिस्तानचा असा अर्थ कधीही होऊ शकत नाही की बहुसंख्य समुदायाची नाराजी पत्करावी लागू नये म्हणून बंगाल आणि सिंधमधील हिंदूंनी आपला धर्म सोडावा आणि बहुसंख्याकांच्या धर्माप्रमाणे आचरण करावे. ईश्वराची आराधना नमाझ पढून वा रामधून म्हणूनही करता येऊ शकते. एकाच वृक्षाच्या वेगवेगळ्या शाखांमध्ये कधीही लढाई होऊ शकत नाही.**

**गांधीजी म्हणाले की हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन इत्यादींमध्ये भांडण्यासारखे काहीही नाही. गांधीजी म्हणाले की मी जेव्हा चंडिपूरहून निघालो तेव्हा पूर्ण रस्त्यात रामधून म्हणत जाण्याचा माझा विचार होता. परंतु मग मी विचार केला की मला जरी रामधून प्रिय असली तरी यामुळे मुसलमान कदाचित नाराज होतील. केवळ माझ्या उपस्थितीमुळे हिंदूंना धैर्य**

**आले आणि ते उघडपणे उद्धटपणा करत रस्त्यातून रामधून म्हणत चालले आहेत असे मुसलमान बांधवांना वाटावे अशी माझी इच्छा नव्हती.**

**गांधीजी पुढे म्हणाले की मुसलमान भावंड दुखावले जाऊ नये म्हणून कोणतीही गोष्ट बोलत वा करत असताना मी फार काळजी घेत असतो. त्यांच्या भावना दुखवल्या जातील वा त्यांच्या धर्माला धक्का लागेल अशी कोणतीही गोष्ट करण्याचे मी टाळत असतो. परंतु ज्या रामधूनने मला इतकी मनःशांती दिली आहे ती रामधून मी टाळू शकत नाही. नोआखालीला मी सर्व समुदायांची सेवा करण्याकरिता आलो आहे. त्यांच्याबरोबर शांततापूर्वक आणि निरोगी वातावरणात राहता यावे म्हणून मी इथे आलो आहे. दररोज प्रार्थनेच्या वेळी मी केवळ भग्वदगीतेतूनच पाठ म्हणत नसतो तर कुराणमधील पाठही म्हणत असतो आणि माझ्याकरिता धर्मभेदाला मुळीच स्थान नाही.**

**गांधीजी म्हणाले की मी नोआखालीत हिंदू आणि मुसलमान या दोघांचीही सारखीच सेवा करण्याकरिता आलो आहे. परंतु त्याकरिता मी ईश्वराचे नाव सोडले पाहिजे असे जर मुसलमानांना वाटत असेल तर मी असहाय होऊन जाईन. मला ज्याप्रमाणे माझ्या धर्माचे प्रदर्शन करणे आवडत नाही त्याचप्रमाणे मला माझ्या धार्मिक विश्वासाचा त्याग करणेही पसंत नाही. ईश्वर आणि धर्म यांच्या ऐक्याचा उपदेश करण्याकरिता मी इथे आलो आहे. मी जिवंत असेपर्यंत त्याचा त्याग कधीही करू शकत नाही.**

**अखेरीस बहुसंख्य समुदायाच्या लोकांना सहिष्णुता ठेवण्याची गांधीजींनी विनंती केली आणि अल्पसंख्य समुदायाला संपूर्ण नम्रपणाने आणि इतरांबद्दल मनात शत्रुत्वाची भावना न ठेवता रामधून म्हणण्याचा सल्ला गांधीजींनी दिला. गांधीजी म्हणाले की मुसलमानांनी इतरांचा धर्म योग्य प्रकारे समजून घेतला तर त्यांची निश्चितपणे प्रगती होईल.**

(या प्रार्थना प्रवचनाच्या वृत्ताच्या शेवटी 'द हिंदू'ने लिहिले : "प्रार्थनेच्या शेवटी प्रार्थनेतून निघून गेलेले मुसलमान मोठ्या संख्येत परत आले आणि खाली बसून त्यांनी गांधीजींच्या प्रार्थना प्रवचनाचा बंगाली अनुवाद शांतपणे ऐकून घेतला..")

'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', जानेवारी ९, १९४७; आणि 'द हिंदू' जानेवारी ९ १९४७; आणि 'अमृत बझार पत्रिका', जानेवारी २०, १९४७

------------

# २८०. श्रीकृष्णदास जाजू यांना पत्र

बुधवार, जानेवारी ८, १९४७

चि. जाजूजी,

तुमचे ९ डिसेंबरचे पत्र मला बहुधा १९ तारखेला मिळाले. मनूने ते मला वाचून दाखवले. परंतु वेळेअभावी त्याचे उत्तर द्यायचे राहून गेले. मध्यंतरी काल मला तुमचे दुसरे पत्र मिळाले - ते ३० तारखेचे आहे आणि कालपासूनच मी माझ्या पदयात्रेला सुरुवात केली. या पदयात्रेत मला माझा पत्रव्यवहार किमान करावा लागला. गेल्या काही दिवसात मी सकाळी अडीच ते तीनच्या दरम्यान उठत असतो आणि लिहायला वा मजकूर सांगायला सुरुवात करत असतो. इतर कोणत्याही प्रकारे मी माझे काम पूर्ण करू शकत नाही. कामाची ही पद्धत चुकीची आहे हे मला माहीत आहे, परंतु माझ्याजवळ दुसरा कोणताही पर्याय नाही. ईश्वराला मला वाचवायचे असेल तर तो वाचवेल. मी जर मला स्वतःला येथील कामापुरते मर्यादित ठेवले आणि पत्रलेखनाचे कोणतेही काम केले नाही तर इतक्या लवकर उठण्याची गरज राहणार नाही. कदाचित मला असेही करावे लागेल. दुसरा मार्ग माझ्या जुन्या कार्यकर्त्यांना नेमणे आणि मी मागे राहणे हा आहे. परंतु हे मला चूक वाटते. जुन्या सहकाऱ्यांना स्वतंत्रपणे करण्यासारखे काम देणे योग्य झाले असते यात काही शंका नाही. मनू किती ओझे वाहू शकते यावर बरेच काही अवलंबून आहे. इतर कोणाला नेमणे हे माझ्या संकल्पाविरुद्ध होईल. या संपूर्ण यात्रेत मला धर्माधर्मातील संघर्षाला तोंड द्यावे लागत आहे. मनू माझ्याच अंथरुणात झोपत असते. मी जेव्हा उठतो तेव्हा तिलाही उठवतो आणि मजकूर सांगायला सुरुवात करतो. सध्या तरी ती हे सर्व काम चांगल्या प्रकारे करते आहे. पार्श्वभूमीबद्दल इतके पुरे. काहीशी पार्श्वभूमी सांगणे आवश्यक होते. असे केले नसते तर मी बराच वेळ वाचवू शकलो असतो.

आता मी ९ डिसेंबरच्या पत्रावर येतो. तुमच्या प्रकृतीची अखेरची माहिती तर मला व्ही. लाल यांनी दिली होती. असे दिसते की तिच्यात सुधारणा होते आहे. ही सुधारणा सुरू ठेवा आणि पूर्णपणे कामात व्यग्र राहा. माझ्या कामामुळे कोणताही अडथळा होऊ नये. तुम्हाला विचारायचे असेल ते विचारा. मद्रासच्या कामाबद्दल श्रीप्रकाशम यांच्याशी माझा गोड पत्रव्यवहार सुरू आहे (पाहा"टी. प्रकाशम यांना पत्र", डिसेंबर २८, १९४६). जे व्हायचे असेल ते होईल. मी काहीशी मदत करतो आहे. आपल्याला स्वतःलाच तज्ज्ञ म्हणून काम करावे लागेल. ते हे काम करू शकणार नाहीत. शासकीय यंत्रणेकडून कोणताही अडथळा येणार नाही इतकेच ते करू शकतात.

असे दिसते की वस्त्रआयुक्त सक्षम गृहस्थ आहेत. अंतिम परिणाम ईश्वराच्या हातात आहेत. सरलादेवींबद्दल बोलायचे तर त्यांची नियुक्ती अविलंब करण्यात यावी. त्या अतिशय नीटनेटक्या आणि कार्यक्षम कार्यकर्त्या आहेत. मला वाटते की दास्तानेजींचा त्यांच्याशी काही पत्रव्यवहार सुरू आहे. मी जर अंतिम निर्णय सांगू शकलो नाही तर विश्वस्त संस्थेच्या लोकांनी योग्य तो निर्णय घेतला पाहिजे. पंजाब प्रकरणी भांडायची जर वेळ आली तर त्याकरिताही आपली तयारी असली पाहिजे असे माझे मत आहे. परंतु मला वाटते की ती वेळ येणार नाही. तुम्ही राजकुमारीला लिहीत राहा. मला जर संधी मिळाली तर मी काही तरी लिहीन. तुमचे दुसरे पत्र संक्षिप्त आहे. मद्रास येथील प्रदर्शनाबद्दल जास्त काही सांगण्यासारखे नाही. भविष्याकरिता मी सांगतो की प्रांतिक सरकार वा केंद्र सरकार अथवा काँग्रेससुद्धा अखिल भारतीय चरखा संघाच्या धोरणाच्या विरोधी धोरणाचा अवलंब करत असेल तरी आपण आपले धोरण अनुसरले पाहिजे आणि त्याकरिता काँग्रेस सोडण्याचा धोका पत्करावा लागणार असेल तर त्याकरितासुद्धा तयारी ठेवली पाहिजे. अशा प्रकारे वागूनच आपण काँग्रेसची आणि देशाची खरी सेवा करू शकू. आपल्याला स्वतंत्र मत ठेवण्याचा अधिकार आहे आणि त्याचा अर्थ आहे आपल्या धोरणाबद्दल जनता पूर्णपणे जागृत झाली आहे.

आशीर्वाद,

बापू

मी अखिल भारतीय चरखा संघाचे वक्तव्य वाचले आहे. मी सकाळी ३ वाजता उठलो, ते घेतले आणि मी स्वतःच ते वाचले. आज मी तार पाठवत आहे. तुम्हाला ती मिळाली असेल. वक्तव्यात काही सुधारणा करणे आवश्यक आहे असे मला वाटत नाही. एकूण पाहता ते चांगले आहे. माझे येथील काम संपेपर्यंत अशा कामाकरिता मी निरुपयोगी आहे असे तुम्ही समजा. आपण शक्य तितक्या लवकर विकेंद्रित झालो पाहिजे असे हे वाचल्यानंतर माझ्या लक्षात आले. मला वाटते की यासंबंधात मी लिहिले आहे. आपण आपले तज्ज्ञ निर्माण केले पाहिजे. धिरेन मुजुमदारला हवी असलेली रक्कम आपण दिली असती तर बरे झाले असते.

राजकुमारी बहुधा दिल्लीत आहे. ती सध्याच इथे येणार नाही.

आशीर्वाद,

बापू

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------------

## २८१. राजेंद्र प्रसाद यांना पत्र

मसीमपूर,

जानेवारी ८, १९४७

चि. राजेंद्र प्रसाद,

मला तुमचे ... पत्र मिळाले (मूळ स्रोतात इथे वगळलेले आहे). ही व्यर्थ कहाणी आहे. केवळ मीच नाही तर आपण सर्व ईश्वराच्या हातात आहो. तो नाचवील तसे आपल्याला नाचावे लागेल. माझ्याबरोबर कनू राहू शकत नाही. प्रत्येकाला मी स्वतंत्र काम दिले आहे. चि. मनू स्वतःहोऊन आली आहे. तिला केवळ माझ्याबरोबर काम करण्याकरिता यायचे होते, मी त्याला संमती दिली आणि ती अतिशय उत्साहाने काम करते आहे. ती कनू सारखी कार्यक्षम नाही, परंतु जिथे श्रद्धा आणि पवित्रता असते तिथे प्रतिभा आणि शक्ती यायलाच पाहिजे. मनूला हे सिद्ध करायचे आहे. काय होते ते पाहू या.

आशीर्वाद,

बापू

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---------------

## २८२. अमतुस्सलाम यांना पत्र

जानेवारी ८, १९४७

प्रिय कन्या,

तुझे पत्र मिळाल्याने मला आनंद झाला. तुला इतर कशाचीही नाही तर केवळ धर्माची मदत होईल. ईश्वराची इच्छा असेल तर आपले कर्तव्य करत असताना आपली खचितच प्रत्यक्ष भेट होईल, नाही तर नाही. आपली भेट जरी झाली नाही तरी त्यामुळे काय फरक पडतो? आध्यात्मिक दृष्टीने आपण कधीही वेगळे नव्हतो आणि नसूही. जे काही घडेल त्यात आनंदात राहा.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५८४

# २८३. प्रार्थना प्रवचन

(विविध स्रोतापासून मिळालेल्या साहित्याचा यात मेळ घालण्यात आला आहे.)

फतेपूर,

जानेवारी ८, १९४७

आज इतक्या सगळ्या तुम्हा लोकांना इथे पाहून मला आनंद होतो. माझ्याकरिता हा फार मोठा दिवस आहे.

**गांधीजी म्हणाले की आज सकाळी मी जेव्हा फतेपूरला पोहोचलो तेव्हा गोळा झालेल्या लोकांच्या प्रेमाचा माझ्यावर चोहोकडून वर्षाव झाला आणि मला जे संदेश मिळाले त्यात काही भगिनींचेही संदेश होते. त्यांनी माझ्याकरिता विशेषेकरून मिठाई तयार केली होती व त्यांना स्वतःला मला ती द्यायची होती. परंतु गांधीजी म्हणाले की मला जिभेला गोड लागणाऱ्या मिठाईची भूक नसून हृदयाला गोड लागणाऱ्या मिठाईची भूक आहे. गावकऱ्यांनी मला राहण्याकरिता जागा दिली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. हीच गोष्ट मला पाहिजे होती. ज्या कोणत्या खेड्यातून गांधी जाईल त्या खेड्यातील लोकांवर ओझे व्हावे अशी माझी इच्छा नाही. माझ्याबरोबर असलेले लोक माझ्या खाण्याच्या वस्तू घेऊन चालत असतात आणि माझ्याबरोबर चालणाऱ्या सर्व लोकांचा खर्च काही प्रेमळ मित्रांनी आधीच उचललेला आहे.**

**विशेष म्हणजे काँग्रेस आणि मुस्लिम लीग या दोन्ही पक्षात समर्थ नेतृत्व असूनही हिंदू आणि मुसलमान यांच्यात दुरावा वाढण्याचे कारण काय असे काही मुसलमान मित्र मला विचारत होते. गांधीजी कबूल करत म्हणाले की सामान्यपणे वरून जे नेतृत्व येते त्याचेच लोक अनुसरण करत असतात हे अगदी खरे आहे. यामुळे नेतृत्व समर्थ असणे पुरेसे नसते तर जनतेला काय हवे आहे याचे नेतृत्वाला नेमके ज्ञान असणे आवश्यक असते. माझ्याबद्दल बोलायचे तर मी संपूर्णपणे ईश्वरावर अवलंबून राहण्याचा प्रयत्न करतो आहे आणि जे काम माझ्याकडे स्वाभाविकपणे येते ते पूर्ण करण्याचाही मी प्रयत्न करतो आहे. याच मार्गाची शिफारस मी सर्वांना करत असतो. आज मी माझ्या जीवनाची सर्वात मोठी परीक्षा देत आहे. मी ज्या मार्गाचे आजपर्यंत अनुसरण करत होतो तो मार्ग या देशातील लोकांकरिता खरा मार्ग आहे काय हे आता मला पाहायचे आहे. आम्ही यापुढे भावाभावाप्रमाणे संपूर्ण एकोप्याच्या भावनेने राहू असे नोआखालीतील दोन्ही समुदायाचे लोक जोपर्यंत मला आश्वासन देत नाहीत तोपर्यंत मी नोआखालीतून जाणार नाही. मला जर यात यश मिळाले नाही तर नोआखालीतून एक पराभूत माणूस म्हणून मी जाणार नाही, उलट ते ध्येय साध्य करण्याच्या प्रयत्नात मी इथे मरणे पसंत करीन.**

**गांधीजी श्रोत्यांना म्हणाले की आम्ही अनुसरावा असा कोणता योग्य मार्ग आहे हे विचारण्याकरिता काही मुसलमान बांधव माझ्याकडे आले होते. गांधीजी म्हणाले की मीच सध्या काळोखात चाचपडतो आहे आणि योग्य मार्गाचा शोध घेतो आहे, आणि जोपर्यंत मला योग्य मार्गाचा शोध लागत नाही तोपर्यंत मी तुम्हांला मार्गदर्शन करू शकत नाही.**

**आज मी जो मार्ग शोधतो आहे तो मार्ग ऐक्याचा आहे परंतु त्या मार्गापर्यंत कसे पोहोचायचे हे मला माहीत नाही. गांधीजी म्हणाले की देशाला मला योग्य मार्ग दाखवता यावा म्हणून माझ्या या कार्यात मला यश मिळावे अशी प्रार्थना तुम्ही सर्वांनी करावी अशी माझी विनंती आहे.**

'हरिजन', जानेवारी २६, १९४७; 'अमृत बझार पत्रिका', जानेवारी ११, १९४७; आणि 'द हिंदू', जानेवारी १०, १९४७

-------------

# २८४. हसन शहीद सुऱ्हावर्दी यांना पत्र

काझिरखिल,रामगंज पोस्ट,

नोआखाली,

जानेवारी ९, १९४७

प्रिय मित्र,

तुम्हाला माहीतच असेल की सध्या मी दैनंदिन पदयात्रेवर आहे आणि आज तिचा तिसरा दिवस आहे (एका गावातून दुसऱ्या गावात जाणारी पदयात्रा. पाहा, “प्रार्थना प्रवचन”, जानेवारी ६, १९४७). मला पहिल्या दोन दिवसांत आलेले विविध प्रकारचे अनुभव नोंद घेण्यासारखे आहेत. मसीमपूर येथे पहिल्याच दिवशी सायंकाळच्या प्रार्थनेच्या वेळी नेहमीप्रमाणे रामधून सुरू होती. रामधून सुरू असताना मुसलमान समुदायाचे लोक शांतपणे बसून होते आणि नंतर साडेपाच वाजता त्यातील काही लोक कोणतेही कारण न सांगता निघून गेले. अजून सूर्यप्रकाश असल्यामुळे सायंकाळच्या नमाझची वेळ झालेली नाही हे मला माहीत होते. यामुळे ते का निघून गेले याची चौकशी करण्याकरिता मी माझ्या एका सहकाऱ्याला सांगितले. सभेत रामधून म्हणण्यात आल्यामुळे आम्ही निघून आलो असे त्यांनी ताबडतोब उत्तर दिले. यामुळे मी त्यांच्या निघून जाण्याबद्दल सभेत बोललो आणि त्याचा वृत्तांत काही वर्तमानपत्रांमधून आलेला तुम्ही पाहिलाच असेल (पाहा, “प्रार्थना प्रवचन”, जानेवारी ७, १९४७).

कालचा दिवस प्रसन्न करणाऱ्या विरोधाने भरलेला होता. माझ्याबरोबर मौलवी इब्राहिम साहेब आपल्या मदरसात होते. ते आणि त्यांचे मुसलमान बांधव अतिशय प्रेमळ होते व माझी ते काळजीपूर्वक देखभाल करत होते. प्रार्थना सभेला मोठ्या संख्येत मुसलमान आले होते. रामधून म्हणण्यावर तुमचा काही आक्षेप आहे काय असे मी त्यांना आधीच विचारले होते आणि रामधूनवर आमचा मुळीच आक्षेप नाही असे ते म्हणाले. परंतु ही सभा अगदी मशिदीसमोरच होणार असल्यामुळे रामधून सुरू असताना तबला वा इतर वाद्ये नसावी असे त्यांचे म्हणणे होते. मला त्यांचा मुद्दा पटला आणि कोणत्याही प्रकारची कुरकुर न करता या दौऱ्याची जबाबदारी असलेल्या माझ्या सहकाऱ्याला असे कोणतेही वाद्य वाजवण्यात येऊ नये असे मी सांगितले. त्या सभेत आलेले मुसलमान बांधव सभा संपेपर्यंत बसलेले होते आणि मौलाना इब्राहिम साहेब त्या सभेतील कार्यक्रमाविषयी अतिशय जिव्हाळ्याने बोलले.

दासपाडा येथे एका गरीब मुसलमानाने आज मला आपल्या शेतावर राहू द्यायचे कबूल केले होते. असे असले तरी नंतर मात्र मी माझ्या मुसलमान बांधवांची नाराजी पत्करू शकत नाही असे म्हणून तो आपल्या शब्दावरून परत फिरला. यामुळे एका हिंदूच्या मालकीच्या मोकळ्या जागेवर माझा मुक्काम आहे. या गावात जवळपास सर्व मुसलमान राहतात. येथे ३५० मुसलमान कुटुंब आहेत तर हिंदूंची केवळ १६ घरे आहेत.

मी हे तक्रार म्हणून सांगत नाही. मी चांगले आणि वाईट असे दोन्ही प्रकारचे अनुभव सांगतो आहे. एक मुख्यमंत्री म्हणून नाही तर एक माणूस म्हणून तुम्हांला योग्य वाटत असेल तर तुम्हांला हव्या त्या दिशेने तुम्हांला तुमच्या प्रभावाचा उपयोग करता यावा म्हणून मी तुम्हांला हे सगळे सांगतो आहे. दोन्ही पक्षांचा समान मित्र म्हणून शांतता कार्याकरिता मी हे सगळे करतो आहे हे जर तुमच्या लक्षात आले तर तुम्ही तत्परतेने असे कराल.

डॉ. वर्दराजन पिल्लई यांच्या वक्तव्याची प्रत मी सोबत जोडत आहे. ही गोष्ट जर खरी असेल तर ही फारच मोठी गोष्ट आहे. माझ्याबरोबर असलेले प्राध्यापक निर्मल कुमार बोस यांना तुम्ही ओळखताच. त्यांना मी दंडाधिकाऱ्यांना लिहिण्याकरिता सांगितले आहे. परंतु तरीही ही गोष्ट तुमच्या निदर्शनास आणावी असे मला वाटले.

इतरही काही अशा गोष्टी आहेत की ज्या माझ्या निदर्शनास आल्या आहेत. परंतु तुम्ही तुमच्या शक्तीचा आवश्यकतेपेक्षा अधिक अपव्यय करू नये असे मला वाटले. यामुळे सध्या तरी मी हे माझ्यापर्यंतच ठेवतो.

आधी सांगायला विसरलो होतो ती अजून एक गोष्ट. गावात (दासपाडा) मुसलमानांनी काही हिंदू मित्रांना सांगितले की जोपर्यंत मी शस्त्रसज्ज पोलिसांच्या वा सैन्याच्या संरक्षणाखाली फिरतो आहे, मग त्यांना कोणतेही नाव द्या, तोपर्यंत दोन समुदायात मैत्री निर्माण करण्याचे माझे प्रयत्न अपयशी होणे अपरिहार्य आहे. सैन्याच्या धाकाने ते माझ्याजवळ येऊ शकत नाहीत आणि आपल्या शंका दूर करण्याकरिता मला सर्व प्रकारचे प्रश्न विचारू शकत नाहीत. त्यांच्या युक्तिवादात मला जोर दिसतो. दोन्ही समुदायांपैकी एक जरी समुदाय खरोखर शूर असता तर असे काहीही झाले नसते. दुर्दैवाने दोन्ही समुदायांमध्ये या आवश्यक मानवी गुणाचा अभाव आहे. यामुळे माझ्या सोबत असलेल्या संरक्षक कवचाबद्दल पुनर्विचार करणे आवश्यक आहे याबद्दल तुमची खात्री पटली असेल तर तुम्ही तसे करावे अशी माझी तुम्हांला विनंती आहे. मला या संरक्षणाची गरज नाही. यामुळे माझी संकुचित अवस्था होते आणि माझ्या साधनेत त्यामुळे निश्चितच अडथळा येतो. या बाबतीत तुमच्यावर कोणतीही जबाबदारी येऊ नये म्हणून तुम्हांला जर माझ्याकडून निःसंदिग्ध आणि स्पष्ट

निवेदन हवे असेल तर तुम्ही माझ्याकडे तशा अर्थाचा कोणताही मसुदा सही करण्याकरिता पाठवला तर माझी त्यावर विचार करण्याची तयारी आहे. असे शक्य नसेल तर मी ज्या भागातून जातो तेथील मुसलमान माझ्या सुरक्षिततेबद्दल समाधाकारक आश्वासन देत असतील तर आम्ही संरक्षक कवच काढून घेऊ शकतो अशी घोषणा तुम्ही करावी. जर असे झाले तर ही फार चांगली गोष्ट होईल. मला ती निश्चितच आवडेल व तिचा आजूबाजूच्या वातावरणावरही चांगलाच प्रभाव पडेल. आज सायंकाळच्या प्रार्थना प्रवचनातही मी असे काही तरी सुचवले होते.

अंतःकरणपूर्वक तुमचा,

मो. क. गांधी

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

--------------

## २८५. अमतुस्सलाम यांना पत्र

जानेवारी ९, १९४७

प्रिय बेटी,

चि. आभा तुझी मुलगी झाली आहे. आता तू तिच्याकरिता जगायला पाहिजे. कोणत्याही उपचाराने तुझा ताप जात नाही आणि तुझा खोकलाही थांबत नाही असे का? आता या दोघांपासूनही सुटका करून घेण्याची वेळ आली आहे. तू माती लावलेल्या पट्ट्यांचा उपयोग करतेस काय? तू ऍन्टिफ्लॉजेस्टाईनचा उपयोग केला काय? तोंडाने वाफ घेतेस काय? घे. कशी घ्यावी हे तुला माहीत आहे काय? तिथे जे सद्गृहस्थ आहेत त्यांच्याकडून तुला जी कोणती सेवा घ्यायची असेल ती घे. निदान काही दिवस तरी. ते काही दिवसांनी गेले तरी काही हरकत नाही.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५५६

-----------

# २८६. प्रार्थना प्रवचन

(स्थानिक शाळेच्या पटांगणात ही सभा झाली होती.)

दासपाडा,

जानेवारी ९, १९४७

**गांधीजी म्हणाले की दासपाडात प्रामुख्याने मुसलमान राहत असल्यामुळे प्रार्थना सभेत मोठ्या संख्येत मुसलमान येतील असे आश्वासन मला देण्यात आले होते, परंतु फारच कमी मुसलमान प्रार्थना सभेला उपस्थित राहिले. मला असे सांगण्यात आले की अनेक मुसलमान परत गेले आणि काही मुसलमान आलेच नाही कारण त्यांना माझ्याबरोबर असलेल्या पोलिसांची भीती वाटत होती. भीतीमुळे एक जरी मुसलमान उपस्थित राहिला नसेल तर माझ्याकरिता ती लाजेची गोष्ट असेल.**

**गांधीजी म्हणाले की आधीच्या खेड्यात मी मौलवी इब्राहीम यांच्या घरी राहिलो होतो आणि प्रार्थनेकरिता मोठ्या संख्येत मुसलमान हजर होते. पूर्व बंगालमधील माझ्या या यात्रेत मुसलमानांच्या घरात राहावे असे मला नेहमीच वाटत आलेले आहे. माझ्या यजमानाला माझ्या राहण्यामुळे कोणताच खर्च येणार नाही कारण माझ्या खाण्यापिण्याची व्यवस्था आधीच करण्यात आलेली असते. मला मुसलमान बांधवांकडून केवळ निवाऱ्याची अपेक्षा असते.**

**माझ्या बरोबर मोठ्या संख्येत सैन्य आणि पोलीस आहेत हे ऐकून अनेक लोक परत गेले हे ऐकून मला अतिशय दुःख झाले. माझी सैन्याच्या वा पोलिसांच्या संरक्षणात राहण्याची इच्छा नाही. परंतु बंगाल सरकारने मला हे संरक्षण देण्याचे ठरवले आहे. मी जर आजारी पडलो वा इतर कोणत्या कारणाने मेलो तर माझे संरक्षण कोण करू शकणार आहे? केवळ ईश्वरच खरे संरक्षण देऊ शकतो. निष्पाप लोकांना घाबरण्याचे कोणतेही कारण नसते. लोकांनी जर काही चुकीचे केले असेल तर त्यांनी ईश्वरासमोर पश्चात्ताप व्यक्त करावा आणि त्याने क्षमा करावी म्हणून प्रार्थना करावी.** (यानंतरचा भाग जानेवारी २०, १९४७च्या 'अमृत बझार पत्रिका'मधून घेतला आहे.)

**जो माणूस ईश्वराला घाबरतो त्याला इतर कोणालाही घाबरण्याची आवश्यकता नसते. जे अपराधी आहेत त्यांनी ईश्वराच्या पायाशी आश्रय घेतला पाहिजे. मी कधीही चुकलो नाही असे या भूमीवरील कोणताही माणूस म्हणू शकत नाही. माणसाच्या जेव्हा चूक लक्षात येते तेव्हा त्याने ईश्वरासमोर त्याची स्पष्ट कबुली दिली पाहिजे आणि पश्चात्ताप व्यक्त करून आता यापुढे अशी चूक मी कधीही करणार नाही असा निर्धार व्यक्त केला पाहिजे. असे जेव्हा माणूस करील तेव्हाच तो ईश्वराकडून करुणेची अपेक्षा करू शकतो. ते काहीही असले तरी पापी माणसाने आपल्या पापाची कबुली ईश्वरासमोर दिली पाहिजे आणि तो जो कोणती शिक्षा करील ती त्याने स्वीकारली पाहिजे.**

**इथे गोळा झालेल्या मुसलमान बांधवांना मी एकच मार्ग सांगेन. लोकमताप्रमाणे चालणाऱ्या बंगाल सरकारला तुम्ही सांगा की मी जो तुमच्या जिल्ह्यात दौरा करत आहे त्यामुळे कोणाचीही हानी होऊ शकत नाही आणि माझ्या या**

**शब्दांवर अक्षरशः विश्वास ठेवण्यात यावा. तुमच्यामध्ये आलेल्या या यात्रेकरूला तुम्ही कोणतीही हानी पोहोचवू शकत नाही असे तुम्ही सरकारला आश्वासन दिले पाहिजे आणि तुमच्यात आलेल्या यात्रेकरूशी कोणी खोडसाळपणाचे वर्तन करील या भीतीने सरकारला माझ्या संरक्षणाची व्यवस्था करावी लागावी हा आमच्यावरील कलंक आहे असे आम्हांला वाटते असे तुम्ही सरकारला सांगायला पाहिजे. अशा प्रकारे जर तुम्ही मंत्रिमंडळाला लिहिले तर माझे संरक्षण काढून घेण्यात यावे अशी जी विनंती मी शासनाला केली आहे** (पाहा "हसन शहीद सुऱ्हावर्दी यांना लिहिलेल्या पत्रातील काही भाग", जानेवारी ८, १९४७) **तिला ते कदाचित मान्यता देईल.**

'द हिंदू', जानेवारी १२, १९४७; आणि 'अमृत बझार पत्रिका', जानेवारी १२, १९४७ आणि जानेवारी २०, १९४७

---------------

## २८७. जिल्हा दंडाधिकारी, टिपरा यांना पत्र

**गांधीजींची छावणी, नोआखाली,**

**जानेवारी १०, १९४७**

**प्रिय मित्र,**

**गांधीजींच्या सूचनेनुसार. या महिन्याच्या २ तारखेला गंडामारा येथे घडलेल्या घटनेकडे मी तुमचे लक्ष वेधू इच्छितो. त्यांना स्वतःला या प्रकरणाबद्दल फार उत्सुकता आहे आणि तुमच्याकडून काही माहिती मिळण्याच्या ते प्रतिक्षेत आहेत. वर्दराजन पिल्लई यांनी दिलेले वक्तव्य स्वतःच बोलके आहे. जोपर्यंत ही मानसिकता कायम आहे तोपर्यंत वातावरण सामान्य होणार नाही हे तुम्हीसुद्धा मान्य कराल. तुमच्याकडून लवकरच ऐकण्याची मी प्रतिक्षा करत आहे.**

**तुमचा विश्वासू,**

**निर्मल कुमार बोस**

**जिल्हा दंडाधिकारी, टिपरा**

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

--------------

# २८८. मणिलाल गांधी यांना पत्र

दासपाडा.

[जानेवारी १०, १९४७] (जी. एन. रजिस्टरवरून)

चि. मणिलाल,

मला तुझे डिसेंबर १६, १९४६चे पत्र मिळाले. सुशीलाला लवकरात लवकर जा म्हणून मी सल्ला दिला आहे (पाहा पुढील विषय). मुलांच्या शिक्षणात व्यत्यय येईल परंतु ते अपरिहार्य आहे असे वाटते. मला सुशीलाचेसुद्धा पत्र आले आहे. यामळे ती लवकरात लवकर निघेल असे वाटते. तू तोपर्यंत तिची वाट पाहू नको आणि ती येईपर्यंत जो काही त्रास होईल तो सहन कर. माझी काळजी करण्याला काही अर्थ नाही. ईश्वर माझी जास्तीत जास्त काळजी घेतो आहे आणि माझे रक्षण करतो आहे. आजकाल मी दररोज ३ वाजता उठतो आणि अजून तरी मला त्याचा काही त्रास झालेला नाही. मी जरी माझा नेहमीचा आहार घेऊ लागलेलो असलो तरी मी माझी सर्व कामे करू शकत नाही याचा मला खेद होतो. असो, ही समस्यासुद्धा सुटेल. आता ते साध्य दृष्टीसमोर ठेवून मी माझ्या कामाची आखणी करत आहे. तू मुळीच काळजी करू नको. आणि मी कामाची आखणी अशा प्रकारे केली आहे की मला आता फार कमी सहकाऱ्यांची आवश्यकता पडते. सुशीला पै आणि सुशीला नाय्यर यांना वेगवेगळ्या गावात ठेवलेले आहे आणि त्या स्वतंत्रपणे काम करत आहेत. माझ्याबरोबर निर्मल बाबू, मनू आणि रामचंद्रन नावाचे गृहस्थ आहेत. ते खूप मेहनत घेतात परंतु मी त्यांचा फारसा उपयोग करू शकत नाही. हा माणूस माझ्याकडे दुःखद मनस्थितीत आला होता आणि मी त्याला ठेवून घेतले कारण मी त्याला नकार देऊ शकत नव्हतो. माझ्या कामाची व्यवस्था मी अशा प्रकारे केली आहे की फार कमी कार्यकर्त्यांच्या मदतीने मी ते पूर्ण करू शकतो, आणि अजूनही मी या योजनेला धरून आहे. यामुळे कोणतेही बाहेरचे काम करायचे नाही असे मी ठरवले आहे. परंतु हा नियम मी काटेकोरपणे पाळू शकत नाही. यामुळेच मला वेळेचे फार मोठे दडपण जाणवते. आता असे काम माझ्यावर लादून न घेण्याचा मी प्रयत्न करतो आहे. त्यात जर मला यश मिळाले तर मला भरपूर वेळ मिळेल.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ४९९८

# २८९. रामदास गांधी यांना पत्र

दासपाडा,

जानेवारी १०, १९४७

चि. रामदास,

मला तुझे पत्र मिळाले. तू तुझ्या जबाबदाऱ्या पार पाडण्याकरिता पात्र आहेस हे तू सिद्ध करशील असा माझा विश्वास आहे. तू तुझी प्रकृती राखली तर तेवढे पुरे आहे. माझी मुळीच काळजी करू नको. माझी उपासमार सुरू नाही.  मला ज्या आवश्यक सोयीसवलती हव्या असतात त्या घेण्याची मी सूट ठेवली आहे आणि मी कुठेही गेलो तरी त्या घेतो. मनूने बऱ्याच कामाची जबाबदारी घेतली आहे आणि जसजसे दिवस जातील तसतशी ती अजूनअजून जबाबदारी घेईल अशी माझी अपेक्षा आहे. मी तिला माझ्याबरोबर माझ्या अंथरुणात झोपण्याबद्दल विचारले आहे.

सकाळी तीन वाजता उठल्यानंतर या पत्राचा मजकूर सांगायला मी सुरुवात केली आहे. या कार्यक्रमातसुद्धा बदल करण्याचा मी प्रयत्न करत आहे. अजूनही माझ्याभोवती काळोख पसरलेला आहे. यामुळे माझ्या पद्धतीतच काही उणीव असली पाहिजे याबद्दल मला मुळीच शंका नाही. असे समज की हा दोष शोधून काढण्याकरिता मी या ठिकाणी अडकून पडलो आहे. माझ्या अहिंसेच्या अनुसरणातच कुठे तरी दोष असला पाहिजे. अहिंसेच्या नावावर मी केवळ दुबळेपणाला आश्रय घेत तर नसेल! दुबळेपणा विविध रूप धारण करू शकतो. परंतु त्याच्या चर्चेत पडणे व्यर्थ आहे. अनुभवातून आपल्याला जे कळते तेच खरे असते. यामुळे तू याची फिकीर न करता तुझे जे कोणते काम असेल ते चांगल्यात चांगले पार पाड. इतके माझ्याकरिता पुरे आहे. कनू चांगली प्रगती करताना दिसतो. हळूहळू तो प्रगल्भ होत आहे. त्याने सर्दीपासून सुटका करून घेतली पाहिजे; आणि मला खात्री आहे तो करून घेईल. मला निमूचे (निर्मला गांधी, रामदास गांधींची पत्नी.) लांब पत्र मिळाले. आता मी तिला लिहीन. तुला पाठवलेले पत्र हे तिलाही आहे असे समजून तिने समाधान मानायला पाहिजे. ती जर तिचे सर्व काम करत असेल आणि तरीही तिची प्रकृती चांगली राहत असेल तर ती माझेच काम करते असे मी समजेन.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-----------

# २९०. कनम गांधी यांना पत्र

[जानेवारी १०, १९४७]

(स्रोतात हे पत्र या तारखेला रामदास गांधींना लिहिलेल्या पत्राच्या खाली ठेवलेले आहे; पाहा यापूर्वीचा विषय.)

चि. कनू,

मला तुझे सुंदर पत्र मिळाले. तुला लिहिण्याकरिता मी किती तरी उत्सुक आहे परंतु मी स्वतःला आवरले पाहिजे. आता लवकरच चार वाजतील आणि मी मुखमार्जन केले पाहिजे. सर्दीपासून मुक्त हो. विनोबांकडून तू हे शिकला नाही काय? प्राणायाम करायला शिक. काही योगासनेही शिक आणि तुझ्याकरिता कोणता आहार चांगला राहील याचा शोध घे. तुझ्या परीक्षेचा निकाल निश्चितच तुझ्या बाजूने असेल कारण तू हुशार आहेस आणि आता तर तुझी विवेकबुद्धीही विकसित होते आहे. ईश्वर तुला दीर्घायुष्य देवो.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-------------

# २९१. मणिबेन यांना पत्र

फतेपूर,

जानेवारी १०, १९४७

चि. मणिबेन,

मी तुला माझीच मुलगी समजतो. परंतु सध्या मी माझ्या सर्व मुलामुलींना माझ्याकडे येण्यापासून अडवतो आहे. मला जर प्रकाश दिसला तर मी काहींना बोलावीन. परंतु सध्या तरी मी कोणालाच बोलवायला नको याबद्दल मी निश्चिंत आहे. आणि शिवाय तू मोकळीही नाहीस. तू जे काम शिरावर घेतले आहे ते घेऊन तू स्वतःला स्पृहणीय पद्धतीने व्यस्त केले आहे. आणि माझ्या दृष्टीतून जे लोक स्वतःच निवडलेल्या कामाला पूर्ण न्याय देतात ते यज्ञात सहभागी झालेले असतात.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

------------

## २९२. अमतुस्सलाम यांना पत्र

जानेवारी १०, १९४७

प्रिय कन्या,

तुला मरायचे नाही; आपण जिवंत राहण्याची आशा केली पाहिजे आणि मरण्याची तयारी ठेवली पाहिजे. मी तिथे आलो पाहिजे ही इच्छा सोड. मी आधीच तुझ्याबरोबर आहे. मी माझ्या कामात आणि तू तुझ्या कामात व्यस्त राहायला पाहिजे; थोडक्यात हीच आपली तपश्चर्या आहे आणि हाच धर्मही आहे. तुझी भेट घ्यावी म्हणून सुशीला माझी समजूत घालते आहे. मला वाटते की ते योग्य होणार नाही. मला वाटते की तूसुद्धा असाच विचार करत असशील.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५५७

------------

## २९३. अमतुस्सलाम यांना पत्र

जानेवारी १०, १९४७

प्रिय बेटी,

ईश्वराच्या हाती गोष्टी सोपवल्यानंतर एक माणूस जे करू शकेल तेच मी करत असतो. मग मी त्याची काळजी करत नसतो. वाफारा घे. तुझा खोकला आणि तापही जायलाच पाहिजे. तुला गुणसिंधूचे (मुसलमान सद्गृहस्थ. गांधीजींनी त्यांना अमतुस्सलामची काळजी घेण्याकरिता पाठवले होते.) काम नसेल तर त्याला माझ्याकडे पाठव. तुला कोणतेही काम पडले तर तिथे शीखबंधू आहेतच. तुझ्या भावांना काही कळवण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. परंतु तू म्हणशील तसे मी करीन.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५५७

-----------

# २९४. प्रार्थना प्रवचन

जगतपूर, जानेवारी १०, १९४७

गांधीजी म्हणाले की काही काळापासून मी ऐकतो आहे आणि कालपासून तर सतत माझ्या कानावर पडते आहे की मुसलमान म्हणतात की आपला जीव वा संपत्ती वाचवण्याकरिता हिंदूंनी जर इस्लामचा स्वीकार केला आणि हिंदूंनी त्याला प्रतिसाद दिला तर त्यात कोणतीही बळजबरी नाही. या वक्तव्याच्या सत्यासत्यतेसंबंधी मला मुळीच चिंता नाही. मला इतकेच म्हणायचे आहे की अशा प्रकारे इस्लामचा स्वीकार करणे हे पूर्णपणे बळजबरीने इस्लाम कबूल करणे आहे.

गांधीजी म्हणाले की धर्मांतरण याहून किती तरी मोठी गोष्ट आहे. या विधानावरून मला त्या दिवसांची आठवण येते जेव्हा दुष्काळाच्या दिवसात ख्रिश्चन धर्मप्रचारक लहान मुलांना विकत घेत आणि त्यांना ख्रिश्चनाप्रमाणे वागवत. असे करणे हे निश्चितच ख्रिश्चन धर्माचा स्वीकार करणे नाही. याचप्रमाणे खरोखर आणि नियमानुसार इस्लामचा स्वीकार केला जाणार असेल तर तसे कोणी स्वतःहोऊन केले पाहिजे आणि दोन्ही धर्मांच्या, एक धर्मांतर करणाराने आपल्या मूळ धर्माच्या आणि दुसरा ज्या धर्माचा तो स्वीकार करतो त्या धर्माच्या योग्य ज्ञानानंतर तसे व्हायला पाहिजे. माझ्यासमोर या ज्या भगिनी आणि मुले बसलेली आहेत ते अशा प्रकारे इस्लामचा स्वीकार करू शकण्याची मुळीच शक्यता नाही. धर्मांतराबद्दल आयुष्यभर माझा हाच दृष्टिकोन राहिला आहे. एक संस्था म्हणून धर्मांतर अस्तित्वात असू शकत नाही. मी हिंदू आहे म्हणून माझ्या मित्रांना मी हिंदू धर्माचा स्वीकार करण्याकरिता सांगणार नाही. जे लोक माझ्याकडे या दृष्टीने आले होते त्यांना मी हिंदू धर्माचा अभ्यास करण्याची शिफारस केली होती आणि हिंदू धर्मात जे काही चांगले वाटेल ते तुमच्या धर्मात सामावून घ्या असे मी त्यांना सांगितले होते. मी स्वतःला केवळ हिंदूच म्हणवत नाही तर ख्रिश्चन, मुसलमान, ज्यू, शीख, पारसी, जैन वा इतर कोणत्याही धर्माचा माणूस म्हणवत असतो. याचा अर्थ इतर सर्व धर्मांमध्ये वा त्या धर्मांच्या शाखांमध्ये जे काही चांगले आहे ते मी माझ्यात सामावून घेतले आहे. अशा प्रकारे मी वेगवेगळ्या धर्मातील संघर्ष टाळला आहे आणि माझी धर्माची संकल्पना विकसित केली आहे.

मी ही जी गोष्ट सांगितली ती कदाचित सर्वांना आवडणार नाही. माझ्या या तीर्थयात्रेच्या दरम्यान मला इस्लामबद्दल जे सांगण्यात आले त्यापेक्षा इस्लाम किती तरी श्रेष्ठ आहे असे तुम्हांला वाटत नाही काय असा विचार प्रत्येक मुसलमानाने करून पाहावा अशी माझी इच्छा आहे. माझ्या व्यग्र जीवनात मला जितके शक्य होते तितका मी इस्लामचा अभ्यास केला आहे आणि इस्लामवरील कोणत्याही धर्मग्रंथात बळजबरीच्या धर्मांतराला स्थान असलेले मला आढळलेले नाही. खरे धर्मांतर अंतःकरणात होत असते. आणि हृदयापासून झालेले धर्मांतर तेव्हाच होऊ शकते जेव्हा आपल्या स्वतःच्या धर्माचे आणि ज्या धर्माचा आपण स्वीकार करू इच्छितो त्या धर्माचे आपल्याला पूर्णपणे आकलन झालेले असते.

शेवटी गांधीजी म्हणाले की जोपर्यंत दोन समुदायांमध्ये मनोमिलन होत नाही तोपर्यंत माझे समाधान होणार नाही आणि जोपर्यंत हिंदू आणि मुसलमान एकमेकांच्या धर्माचा आदर करत नाहीत आणि धर्मांतराची प्रक्रिया पूर्णपणे स्वतंत्र आणि वैयक्तिक इच्छेवर सोडत नाहीत तोपर्यंत हे शक्य नाही.

'अमृत बझार पत्रिका', जानेवारी १४, १९४७

# २९५. मारवाडी मदत संस्था, रामगंजला पत्र

लामचर छावणी, नोआखाली,

जानेवारी ११, १९४७

प्रिय मित्र,

श्री हश्मर उल्ला खान गांधीजींना भेटायला आले होते आणि तुमच्या छटखिल येथील मदत छावणीला जो तांदुळ पुरवण्यात आला त्याचे देयक अजून देय आहे व त्याचे पैसे लवकर द्यावे अशी विनंती ते गांधीजींना करत होते. त्यांचे मूळ पत्र आणि सोबतची कागदपत्रे तुमच्याकडे पाठवत आहे. या प्रकरणी चौकशी करावी आणि यात कितपत तथ्य आहे ते आपण पाहावे अशी गांधीजींची इच्छा आहे. तुमचे उत्तर मिळाल्यानंतर आवश्यकता पडली तर ते हे प्रकरण पुढे नेतील.

तुमचा विश्वासू,

निर्मल कुमार बोस

प्रभारी अधिकारी, मारवाडी मदत संस्था, रामगंज शिबीर

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि संग्रहालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

--------------

# २९६. माधवदास यांना पत्र

जगतपूर,

जानेवारी ११, १९४७

चि. माधवदास,

सध्या मला लांब पत्रे वाचण्याकरिता वा वाचून घेण्याकरिता वेळ नसला तरी तुझे लांब पत्र वाचून मला आनंद झाला. आणि मनूने मला तुझे पत्र वाचून दाखवले. काही प्रमाणात तरी काम संपवले पाहिजे म्हणून मला सकाळी ३ वाजताच उठावे लागते. आजही मी तसेच केले आणि या मत्राचा मजकूर सांगत आहे. माझ्याबद्दल काळजी करू नको. तू योग्य ठिकाणी स्थिरावला आहेस. तुझ्याकडून जितकी सेवा करणे शक्य असेल तितकी सेवा कर आणि नाव काढून तेथून बाहेर पड. तुम्हा सर्व भावाबहिणींना आशीर्वाद.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-------------

# २९७. अमतुस्सलाम आणि आभा गांधी यांना पत्र

जानेवारी ११, १९४७

प्रिय कन्या,

दिवसेंदिवस चांगली हो आणि मरण्याची जेव्हा वेळ येईल तेव्हा निकोप शरीरप्रकृतीने मर. तुझा खोकला आणि ताप गेला नाही तर ते शुद्धतम स्वरूपाचे बलिदान नसेल. परंतु तू यात काय करू शकतेस? ईश्वराची इच्छा असेल तसे होईल.

आशीर्वाद,

बापू

चि. आभा,

तुझी प्रगती सुरू ठेव. मी दंतमंजन पाठवत आहे.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५५९

------------

# २९८. प्रार्थना प्रवचन

लामचर,

जानेवारी ११, १९४७

लामचर येथील प्रार्थनोत्तर प्रवचनाची सुरुवात करताना गांधीजी म्हणाले की गेल्या काही दिवसात मला पडलेल्या प्रश्नांपर्यंतच मी आज सीमित राहीन. मला असे कळले आहे की कारागिरांनी मोठ्या प्रमाणात आपली घरेही गमावली आहेत आणि व्यापाराची आपली अवजारेसुद्धा. त्या अवजारांची एक तर मोडतोड करण्यात आली आहे वा ती चोरून नेण्यात आली आहेत. या लोकांचे आपण काय करायचे? एक काळ असा होता की आपल्या गावांमध्ये सर्व प्रकारचे कारागीर होते व ते शेतकऱ्यांची सेवा करत होते. शेतकरी हे त्या गावात केंद्रस्थानी असायचे. त्या वेळी वस्तुविनिमयाद्वारे पैसे दिले जात आणि ते उत्पादकाच्या गरजेप्रमाणे दिले जात. वेगवेगळे व्यवसाय स्वतंत्रपणाच्या बंधनाने गुंफले गेले होते व त्याने एक संपूर्ण घटक तयार झाला होता. ब्रिटिशपूर्व काळात हिंदुस्थानची अर्थव्यवस्था ही अशी होती व तिच्यात मुसलमानांसह सर्व समुदायांचा संपूर्ण सहभाग होता. त्या व्यवस्थेत गावातील एकाही माणसाला अन्न, वस्त्र आणि निवारा यांच्याशिवाय राहावे लागत नव्हते.

गांधीजी म्हणाले की परंतु देशातील या भागातील कारागिरांचे जीवन दंगलींमुळे उद्ध्वस्त झाले आहे आणि आता त्यांचे काय करावे अशी समस्या निर्माण झाली आहे. बेकारीची समस्या सोडवण्याकरिता प्राचीन अर्थव्यवस्था स्थापित करणे आजही बऱ्याच प्रमाणात शक्य आहे. कारागिरांकरिता राहण्याची व्यवस्था करणे आणि व्यवसाय करण्याकरिता त्यांना अवजारे आणि कच्चा माल देणे हे सरकारचे पहिले कर्तव्य आहे. त्याकरिता रोखीने कर्ज देण्याची व्यवस्था करण्यात यावी; हे कर्ज निर्व्याज असावे आणि त्याची परतफेड दीर्घकालीन हप्त्यात करण्याची तरतूद असावी. या बाबतीत जमानतीचा प्रश्न स्वाभाविकपणेच निर्माण होऊ नये. कर्जाची पूर्ण परतफेड होण्यापूर्वीच जर एखादा कारागीर वारला तर ते कर्ज बुडीत खात्यात टाकण्याची सरकारची तयारी असली पाहिजे.

परंतु सरकार जर स्पष्ट दिसणारे त्याचे कर्तव्य पार पाडणार नसेल तर मग श्रीमंत लोकांनी या कामाकरिता पुढे यायला पाहिजे. त्यांनी कारागिरांना वर सांगितलेल्या अटीवरच कर्ज द्यायला पाहिजे. असे करणे त्यांचे कर्तव्य आहे. आपल्याला जर निरोगी ग्रामीण जीवन स्थापित करायचे असेल तर समाजातील विविध वर्गात सहकार्याचे हे बंधन निर्माण करणे आवश्यक आहे. (यानंतरचा भाग 'अमृत बझार पत्रिका'मधून घेण्यात आला आहे.)

गांधीजींनी विस्थापितांना सल्ला दिला की तुम्ही हे सर्व कष्ट सहन करूनही तुमच्या घराची आणि जीवनाची पुनर्उभारणी करण्याकरिता ताबडतोब परतायला पाहिजे.

'द हिंदू', जानेवारी १४, १९४७; आणि 'अमृत बझार पत्रिका', जानेवारी २०, १९४७

-------------

# २९९. अमतुस्सलाम आणि आभा गांधी यांना पत्र

जानेवारी १२, १९४७

प्रिय बेटी,

मला तुझे पत्र मिळाले. सतीश बाबूंनी मला सर्व काही सांगितले. तुझ्या प्रायश्चित्ताने ते फार खुष झाले. तुझ्या गुदद्वारातून काही घ्यायचे की नाही हे तू ठरवू शकत नसशील तर तू मीठ आणि निंबू घेऊ शकते. या दोन गोष्टी तू तोंडातूनही घेऊ शकते. परंतु एखादी गोष्ट गुदद्वाराद्वारे घ्यायची असेल तर मग ग्लुकोजच का नाही? परंतु या बाबतीत तू जे काही ठरवशील ते बरोबर आहे असेच मी म्हणेन. तुझ्याकरिता तू जे ठरवशील त्याच्या आड कोणीही येऊ नये.

आशीर्वाद,

बापू

चि. आभा,

तुझे पत्र सुंदर आहे. याप्रमाणे लिहीत राहा.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५६०

------------

# ३००. श्रीकृष्ण सिन्हा यांना पत्र

जानेवारी १२, १९४७

भाई श्रीकृष्ण सिन्हा,

मंत्रिमंडळाने १९४८पर्यंत दारूबंदी लागू करण्याकरिता नकार दिल्यामुळे जगलाल चौधरी यांनी मंत्रिमंडळात सामील होण्याकरिता नकार दिला असे बापांनी लिहिले आहे. मला याबद्दल काहीही माहीत नाही आणि हा निर्णयही मी मान्य करू शकत नाही. मी तुमच्याशी पत्रव्यवहार करीन असे मी बापांना लिहिले आहे. मी तुम्हाला काय लिहू?

अजून चौकशी समिती नेमण्यात आली नाही हे चूक आहे. मला वाटते की तिची नेमणूक ताबडतोब झाली पाहिजे. तक्रार करणारी अनेक पत्रे येत आहेत. केवळ चौकशी आयोगच असा प्रकारच्या पत्रांना उत्तर देऊ शकतो.

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

------------

# ३०१. सैन्यातील माजी अधिकाऱ्याला मुलाखत

("श्रीरामपूर डायरी"तून उद्धृत.' हिंदुस्तान स्टॅन्डर्ड'च्या विशेष वार्ताहराने ही बातमी दिली होती.)

जानेवारी १२, १९४७

**हिंदुस्थान राष्ट्रीय काँग्रेसने दिल्लीत मंजूर केलेल्या ठरावाने** (पाहा "अ. हिं. कॉ. क. चा ठराव") **डिसेंबर ६चे वक्तव्य** (पाहा "ब्रिटिश मंत्रिमंडळाचे समूहासंबंधीचे वक्तव्य", डिसेंबर ६, १९४६) **मान्य केले आहे आणि "आपल्या सिद्धांताच्या मर्यादेत जास्तीत जास्त प्रयत्न करून" मुस्लिम लीगशी सद्भावनापूर्वक वर्तन करण्याची घोषणा केली आहे.**

**काँग्रेसने व्यक्त केलेल्या या सद्भावनेबद्दल मुस्लिम लीगची काय प्रतिक्रिया होईल हे मला माहीत नाही असे गांधी म्हणाल्याचे वृत्त आहे.**

हरिजन, फेब्रुवारी २, १९४७

---------------

# ३०२. भेटायला आलेल्या मुसलमानाला मुलाखत

करपाडा,

जानेवारी १२, १९४७

**भेटण्याकरिता आलेल्याने विचारले की सध्याचे परिस्थितीतून मार्ग काढण्याचे दोन मार्ग आहेत - पाकिस्तान अथवा गृहयुद्ध. यांतील कोणता पर्याय स्वीकारार्ह आहे?**

**गांधीजी असे म्हणाल्याचे वृत्त आहे की मी या समस्येकडे वेगळ्याच दृष्टिकोनातून पाहीन. यापैकी एकही उपाय चांगला नाही. गृहयुद्धाद्वारे पाकिस्तान मिळू शकेल ही धारणा चुकीची आहे.**

**स्वतंत्र हिंदुस्थानकरिता कोणत्या प्रकारचे सरकार चांगले राहील असे भेटायला येणाराने विचारले असता गांधीजी म्हणाले की या प्रश्नाचे उत्तर मला मागायला नको. खरे म्हणजे हा प्रश्न स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचा आहे.**

'अमृत बझार पत्रिका', जानेवारी १६, १९४७; शिवाय 'हरिजन' फेब्रुवारी २, १९४७

-------------

# ३०३. कारपाडा येथे भाषण

जानेवारी १२, १९४७

मी इथे दोन समुदायात हृदयाचे ऐक्य निर्माण करण्याकरिता आलो आहे आणि आवश्यकता पडली तर तसा प्रयत्न करत असताना माझे प्राणार्पण करण्याचीही माझी तयारी आहे. हिंदू आणि मुसलमानांनी लक्षात ठेवले पाहिजे की या दोघांचेही पोषण एकच धान्य खाऊन झाले आहे आणि एकाच आकाशाखाली ते राहिलेले आहेत, एकच पाणी पिऊन त्यांनी आपली तहान भागवली आहे. दोन्ही समुदायांच्या धार्मिक श्रद्धा काहीही असल्या तरी देशावर आज जे संकट आले आहे त्याने हे दोन्ही समुदाय सारखेच प्रभावित झाले आहेत. दोन्ही समाजांनी आपले मतभेद गाडून टाकणे आणि शांततेत राहणे अतिशय आवश्यक आहे.

ज्यांच्यामध्ये धार्मिक भावना खऱ्या अर्थाने रुजली आहे तो आपल्या धर्माकरिता इतर कोणाचाही द्वेष करू शकत नाही. हिंदू धर्माने अस्पृश्यतेच्या प्रथेच्या रूपाने घोर पाप केले आहे यात काही शंका नाही. ही कुप्रथा नाहीशी करण्याकरिता मी आयुष्यभर संघर्ष केला आहे. परंतु हिंदू एका वेगळ्या नावाने त्याच देवाची वेगळ्या पद्धतीने पूजा करतात म्हणून जर मुसलमान हिंदूंचा द्वेष करत असतील तर ज्या अस्पृश्यतेच्या विरोधात इस्लामची शिकवण आहे तीच अस्पृश्यता मुसलमानसुद्धा पाळतात असे म्हणावे लागेल. कोणत्या नावाने वा कोणत्या प्रकारे तुम्ही ईश्वराची पूजा करता याला काहीही महत्त्व नाही असे मुसलमान आपल्या हिंदू शेजाऱ्यांना म्हणण्याच्या दिवसाची मी वाट पाहतो आहे.

अमृत बझार पत्रिका, जानेवारी २०, १९४७

--------------

# ३०४. एम. ए. अब्दुल्ला यांना चिठ्ठी

(एम. ए.अब्दुल्ला यांनी अमतुस्सलामच्या उपोषणासंबंधी पाठवलेल्या अहवालानंतर गांधीजींनी ही चिठ्ठी लिहिली होती. अखेरीस अमतुस्सलमामने २० जानेवारीला उपोषण सोडले. प्यारेलाल लिहितात : “या बाबतीत पोलीस अधिकाऱ्यांनी आपली असहायता व्यक्त केली. इतकेच नाही तर त्यांनी अमतुस्सलामवर क्षल्लक गोष्टीकरिता  हट्टीपणाचा आणि दुराग्रहीपणाचा आरोप केला.”)

शाहपूर,

सोमवार, जानेवारी १३, १९४७

तुमचे जे कर्तव्य असेल तेच करा आणि त्याहून अधिक नाही. ती जर दुराग्रहीपणा करून मरत असेल तर तिला बदनाम होऊन मरू द्या. ती जर बरोबर असेल आणि ती बरोबर असल्याचे तिच्या जिवंतपणी सिद्ध होत नसेल तर तिचा मृत्यू हे तिचे योग्य प्रायश्चित्त असेल. मी या सर्व गोष्टी निश्चितच तिच्या नजरेस आणून देईन.

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

------------

# ३०५. प्यारेलाल यांना चिठ्ठ्या

(प्यारेलाल यांना लिहिलेल्या खालील चिठ्ठ्या एकाच तारखेच्या असल्या तरी वेगवेगळ्या कागदांच्या तुकड्यांवर लिहिलेल्या आहेत. या दिवशी गांधीजींचे मौन असल्यामुळे गोधीजींनी या चिठ्या वेगवेगळ्या वेळी लिहिल्या असाव्या.)

जानेवारी १३, १९४७

जे काही नशिबी असेल ते तू सहन केले पाहिजे. आपण जे साध्य करायला निघालो आहे ते साध्य करूनच आपण थांबलो पाहिजे. प्रत्येक गोष्टीचा आपण अनुभव घेतला पाहिजे. आपण जर भीतीचा पूर्णपणे त्याग केला असेल तर काळजीचे कारण काय?

* * *

माझ्या मते तिच्या आनंदात तू समाधान मानायला पाहिजे. तुझा जर तिच्यावर विश्वास असेल तर ती म्हणेल तसे करणे तुझे कर्तव्य आहे. परंतु तुला ते तुझे कर्तव्य वाटत नसेल तर तू तुझा उपवास निश्चितच सोडायला नको. मी सर्व काही सहन करीन. परंतु मनूची गोष्ट वेगळी आहे. मला हे स्पष्ट दिसते. सध्या तुझे कर्तव्य तिला विसरणे आणि तुझ्या कामात व्यग्र होणे आहे. आणि तिला जिंकण्याचा तोच मार्ग आहे. मग त्याचे परिणाम काहीही होवो. शक्य असेल तर समजून घे की आपण ज्याच्यावर प्रेम करतो त्याचा विचार डोक्यातून काढून टाकता येत नसेल तर ...

* * *

ही गोष्ट यांत्रिकपणाने करता येत नसते. ती अंतःकरणातून उत्स्फूर्तपणे बाहेर पडली पाहिजे. पोपट रामाचे नाव घेतो. पोपट जे करतो ते यांत्रिकपणे करतो आणि म्हणून ते निरर्थक असते. मी जे काम करतो आहे ते कामच रामनाम आहे. अशा प्रकारे मी काम करत असतो आणि तीच पद्धत योग्य आहे. तुला जर कळू शकत असेल तर तुझा उपवास सोड आणि आनंदात राहा. हे जर पटत नसेल तर उपवास सुरू ठेव.

* * *

ती पत्नी म्हणून मिळावी ही कल्पना तू मनातून काढू शकत नाही. तू तो विचार सोडू शकशील की नाही हे केवळ ईश्वरालाच माहीत. मी लिहितो ते जर तुला कळत नसेल तर काय करता येऊ शकते? मी तिची

तुलना रामनामाशी करतो. आपण रामाचे नाव घेतो आणि आपल्याला राम भेटतो. परंतु त्याला शोधण्याकरिता आपण त्याचे काम केले पाहिजे. अजूनही तुला हे कळत नसेल तर यावर विचार कर. माझा वेळ घेऊ नकोस.

* * *

अशा प्रकारे परिस्थिती अजूनच चिघळत जाईल. मी तुला दोष का देतो? मी जे म्हणतो त्यात तुला वात्त्काडन दिसत असेल तर आपण पुढे कसे जाऊ शकतो? माझ्या सूचनेनंतर ती तुझ्याशी बोलली की नाही हेही मला माहीत नाही. तुझ्या बोलण्यावरून आता असे दिसते की तुला तिच्या शुद्धत्वाबद्दलही शंका आहे. इतके सगळे लिहूनही तू तिला विसरू शकत नाहीस. माझी तुला विनंती आहे की तू तिला विसरू शकत नसशील तर मला यातून बाहेर ठेव. मी लिहिलेले जे पत्र तुला समजले असे तुझे म्हणणे आहे त्यात या सर्व गोष्टींचा समावेश आहे.

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

---------------

# ३०६. अमतुस्सलाम यांना पत्र

जानेवारी १३, १९४७

प्रिय बेटी,

मी काय करू? काल मी तुला पत्र लिहिले. तुझी अतिशय काळजी करणारे सतीश बाबू ते घेऊन गेले. परंतु मला ते पत्र परत मिळाले. आता मी ते परत पाठवत आहे. तुझ्या ऑब्स्टिनसीबद्दल (हट्टीपणा, हा शब्द इंग्रजीत आहे.) माझी तक्रार नाही. सुशीलाबेन काय म्हणाल्या ते मला माहीत नाही. तुझ्यात श्रद्धा आहे इतके माझ्याकरिता पुरे आहे. तुझ्या दुखण्यापासून तुझी सुटका झाल्यानंतर तू रामनाम घेत मेलीस वा वाचलीस तर मला आनंद होईल. काफीखानला कळवायला तूच मला सांगितले होते आणि म्हणूनच मी तसे केले. मी तर त्याचा विचारही केला नव्हता. आता माझी काहीही करण्याची इच्छा नाही. येऊ नका हे सांगण्याकरिता आता तू त्यांना तार करू शकते. (जानेवारी १६, १९४७च्या 'अमृत बझार पत्रिका'तील वृत्तानुसार गांधीजींनी अमतुस्सलामच्या मुंबई येथील भावाला एक तार पाठवली होती. त्यात त्यांनी लिहिले होते की काळजीचे काही कारण नाही, तरी तुम्हाला आवश्यक वाटत असेल तर तिचा एखादा नातलग सिरंडीला जाऊ शकतो.) तू तार पाठवली नाही तरी हरकत नाही.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५६१

-----------------

## ३०७. सुचेता कृपलानी यांना पत्र

करपाडा,

जानेवारी १३, १९४७

चि. सुचेता,

मला तुझे पत्र मिळाले. तू कुठेही जरी गेलीस तरी काही तरी साध्य केल्याशिवाय राहणार नाही. तू तुझी प्रकृती बिघडवणार नाही अशी आशा आहे. निर्वासितांकडून तू काम घेते की नाही? तू त्यांना काही शिकवते काय? प्रत्येक शिबीर हे उद्योगी लोकांनी भरलेले असले पाहिजे. प्रत्येक शिबीर स्वच्छ असले पाहिजे आणि त्यात संडासाची परिपूर्ण व्यवस्था असली पाहिजे. तू इंग्रजीत पाठवलेल्या अहवालाचा मी सार्वजनिक उपयोग करू शकतो काय? तू त्यांना दंडाधिकाऱ्यांकडे आणि असोसिएटेड प्रेसकडे पाठवले काय? अमतुल सलाम शूर आहे; तिचे उपोषण सुरू आहे. ती अर्थातच अशक्त झाली आहे परंतु एरव्ही ती चांगली आहे.

आशीर्वाद,

बापू

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

------------------

## ३०८. प्रार्थना प्रवचन

शाहपूर,

जानेवारी १३, १९४७

**गांधीजी म्हणाले की हिंदू आणि मुसलमानांमध्ये जे अंतर आहे ते खऱ्या शिक्षणाच्या अभावामुळे आहे. ते म्हणाले की गावांसंबंधी बरेच काही सांगण्यासारखे आहे, परंतु आज मी ते जाणीवपूर्वक टाळतो आहे. मी इतके मात्र म्हणेन की हिंदू आणि मुसलमानांना शेजारीशेजारी राहावे लागणार आहे आणि सर्वांनी त्या दृष्टीने काम करायला पाहिजे. तुमच्या ऐक्यात बाधक असलेले तुमच्यातील दोष तुम्ही दूर केले पाहिजे.**

'द बॉम्बे क्रॉनिकल', जानेवारी १६, १९४७

----------------

# ३०९. श्रीकृष्ण सिन्हा यांना पत्र

[जानेवारी १३, १९४७]

(हे पत्र जानेवारी १३ आणि जानेवारी २६च्या पत्रांच्या मध्ये ठेवले आहे.)

भाई श्रीकृष्ण सिन्हा,

इथे लोकांचे बैल मारले गेले आहेत आणि शेतकरी बैलांशिवाय काहीही करू शकत नाहीत. लोक सांगतात की युद्धापूर्वी आम्हाला बिहारमधून बैल आणता येत असत परंतु आता ते आणता येत नाहीत. हे खरे आहे काय? पैसे देऊनही लोकांना बैल विकत मिळू शकणार नाहीत काय? मला बिहारसंबंधी एक टिपण मिळणार होते परंतु ते अजून मिळालेले नाही, आणि बिहारची चांगली माहिती असलेला एकही माणूस माझ्याकडे आला नाही. कोणी आला नाही तर हरकत नाही परंतु टिपण आलेच पाहिजे.

आयोगाबद्दल काय झाले?

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-------------------

# ३१०. जीवनजी डा. देसाई यांना पत्र

दौऱ्यावर, सकाळी ६.१० वाजता

जानेवारी १४, १९४७

चि. जीवनजी,

सोबत मी वालजीकडून (वालजी गो. देसाई) आलेला लेख पाठवत आहे. तो मला पुस्तकांच्या पानात आढळला. त्यात पैगंबरांचे वचन आहेत.

वर्गणीदारांच्या दृष्टीने काही प्रगती आहे काय?

प्रा. एडवर्ड पिव्हट यांना 'हरिजन'च्या प्रती का मिळत नाहीत हे विचारणारे पत्र मी लिहिले होते. त्याचे काय झाले ते मला कळव.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ९९७४. शिवाय सी. डब्ल्यू. ६९४८. सौजन्य - जीवनजी डा. देसाई

---------------

# ३११. सतीश चंद्र दास गुप्ता यांना पत्र

भटियालपूर,

जानेवारी १४, १९४७

चि. सतीश बाबू (हे देवनागरीत आहे.),

तुम्ही घातलेली बंदी चूक आहे. शिखांनी तुम्हाला अडवण्यातही शहाणपणा नव्हता. ज्या माणसाने तुम्हाला अडवले तो चांगला माणूस आहे. तुम्हाला त्याने अडवलेले तुम्ही हसण्यावर न्यायला पाहिजे होते व त्याचे कौतुक करायला पाहिजे होते. सरदार जीवनसिंग आणि निरंजनसिंग यांनी माफी मागितल्यानंतर तुम्ही शांत व्हायला पाहिजे होते. व्यक्तिगत अपमानाबद्दल आपल्याला वाईट वाटायला नको, हे बरोबर नाही. यामुळे तुम्ही वेगळे काही सांगू शकत नसाल तर शिखांना घ्यावे अशी माझी तुम्हाला सूचना आहे.

स्नेह

बापू

इंग्रजी फोटोप्रतीवरून. जी. एन. ८७१६

----------------

# ३१२. वल्लभभाई पटेल यांना पत्र

शाहपूर,

जानेवारी १४, १९४७

चि. वल्लभभाई,

...(मूळ स्रोतात इथे वगळलेले आहे.) आता बिहारच्या प्रस्तावित चौकशीसमितीबद्दल. बिहारच्या कोणत्या तरी सद्गृहस्थांनी मला ही माहिती दिली होती. मी त्यांचे नाव लिहून घेतले नाही. तुम्ही, राज्यपाल आणि व्हाईसराय हे सर्व चौकशी आयोग नेमण्याच्या विरोधात आहा हे खरे आहे काय? (शिवाय पाहा "वल्लभभाई पटेल यांना पत्र", फेब्रुवारी, ५, १९४७.) असे असतानाही चौकशी आयोगाची नियुक्ती करण्यात आली नाही तर लीगने प्रसृत केलेला अहवालच खरा मानला जाईल हे माझे निश्चित मत आहे. माझ्यावर किती दडपण आहे ते मलाच माहीत आहे. माझे हेच मत सुधीरबद्दलही आहे. लीगचे मंत्री आणि व्हाईसराय जर सहमत असतील तर त्याला नेमण्यात कोणतीही हानी आहे (भारतीय उच्चायुक्तांचे कार्यालय, लंडन येथे जनसंपर्क अधिकारी म्हणून.) असे मला वाटत नाही. त्याला जर उच्चायुक्तांच्या अंतर्गत काम करायचे असेल तर या पदाला तुम्हा तिघांची मंजुरी मिळायला पाहिजे. याशिवाय मंत्रिमंडळाचे सदस्यच नियुक्तीकरिता सुधीरचे नाव सुचवत आहेत. असे असेल तर त्यांनी जाहीरपणे त्याला बोलवायला पाहिजे. कोणताही संशय राहू नये इतका जर हा मुद्दा स्पष्ट करण्यात आला नाही तर सुधीरला आज जी काही किंमत आहे ती तो गमावेल. आता तुम्हाला योग्य वाटेल ते तुम्ही करू शकता. वक्तव्यात सुधीरचे नाव आले असल्याचे मी आताच पाहिले.

आशीर्वाद,

बापू

गुजरातीवरून. 'बापूना पत्रो - सरदार वल्लभभाईने', पृष्ठ ३४४-५

-----------------

# ३१३. अमतुस्सलाम आणि आभा गांधी यांना पत्र

जानेवारी १४, १९४७

प्रिय बेटी,

मला तुझे पत्र मिळाले. काफिखानबद्दल विसर. त्यांना यायचे असेल तर येतील. केवळ ईश्वराचा विचार कर. तू लिंबू आणि मीठ घातलेल्या पाण्याची बस्ती घेतली असशील. आनंदात राहा.

आशीर्वाद,

बापू

चि. आभा,

ईश्वर तुला तुझ्या समर्पणभावाचे फळ देईल.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५६२

---------------

# ३१४. स्त्रियांच्या सभेत भाषण

भटियालपूर,

जानेवारी १४, १९४७

सीता आणि सावित्री यांचे अनुसरण करा. धैर्यवान व्हा.

गांधीजी म्हणाले की असे म्हणतात की स्त्रिया स्वाभाविकपणे दुबळ्या असतात, अबला असतात. स्त्रियांना माझा सल्ला आहे की तुम्ही यावर विश्वास ठेवू नये. स्त्रियासुद्धा पुरुषांप्रमाणेच काटक असू शकतात. सीता आणि सावित्री आपल्या देशातील कोणत्याही पुरुषापेक्षा दुर्बल होत्या असा कोणी विचार तरी करू शकतो काय? यामुळे आपण स्वाभाविकपणेच दुर्बल आहो असा विचार कोणत्याही स्त्रीने करू नये आणि स्वतःची प्रतिष्ठा कमी करू नये.

'अमृत बझार पत्रिका', जानेवारी १६, १९४७

------------------

# ३१५. मुसलमान युवकांशी चर्चा

('अमृत बझार पत्रिका'नुसार सायंकाळी गांधीजी फिरून परतत असताना काही मुसलमान तरुण गांधीजींच्या फिरण्यात सहभागी आणि त्यांनी गांधीजींच्या नोआखालीतील कामाची प्रशंसा केली. गांधीजींना आश्वस्त करत ते म्हणाले की भूतकाळात जे घडले ते परत कधीही घडणार नाही असे आश्वासन आम्ही तुम्हाला देतो. विविध स्रोतातील वृत्तांशी या वृत्ताचा मेळ घालण्यात आला आहे.)

भटियालपूर,

जानेवारी १४, १९४७

**गांधीजींनी त्यांचे आभार मानले आणि म्हणाले :**

तुमचे शब्द जर तुमच्या अंतःकरणातून येत असतील आणि केवळ ओठांवरून निघत नसतील तर मग त्यांचा प्रभाव केवळ हिंदुस्थानपर्यंतच सीमीत राहणार नाही, तर तो जगभर पसरेल.

**बिहारमधील घटना पाहता वेगळे मुस्लिम राज्य निर्माण करण्याला तुमचा विरोध का असे त्यांनी विचारले असता गांधीजी म्हणाले :**

मुसलमानांचे वेगळे राज्य याचा अर्थ विदेशी शक्तींशी असे करार करणे असेल की ज्यामुळे संपूर्ण देशाचे अनहित करणे होऊ शकेल. ही गोष्ट मान्य होऊ शकत नाही. कोणाकडूनही अशी अपेक्षा करता येऊ शकत नाही की त्याने अशा कोणत्या तरी करारावर सही करावी की ज्यामुळे दुसऱ्या कोणाला तरी त्याच्या विरोधात शत्रुत्व करण्याचे स्वातंत्र्य मिळेल; हे आत्महत्या करणारे धोरण होईल.

**एका तरुणाने विचारले की पाकिस्तान देणे योग्य होणार नाही काय कारण या प्रश्नामुळे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न लांबणीवर पडलेला आहे. यावर गांधीजी म्हणाले :**

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पाकिस्तान देण्याचा प्रश्न निर्माण होतो. ही प्रक्रिया उलट करणे म्हणजे विदेशी शक्तीची मदत घेणे. स्वातंत्र्य आणि पाकिस्तान यांकरिता कोणत्याही विदेशी शक्तीची उपस्थिती नसली पाहिजे. जोपर्यंत हिंदुस्थान स्वतंत्र होत नाही तोपर्यंत इतर कोणताही प्रश्न उपस्थित होत नाही. तुम्ही जेव्हा आधी पाकिस्तानच्या स्थापनेचा विचार करता तेव्हा तुम्ही तिसऱ्या शक्तीच्या मदतीने पाकिस्तान मिळवण्याचा विचार करता. मी जेव्हा हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा विचार करतो तेव्हा इतर कोणाच्याही मदतीशिवाय ते मिळवण्याचा विचार करतो, मग ती शक्ती रशिया असो, चीन असो, वा अजून कोणती असो. मी आपल्या अंतर्गत शक्तीच्या बळावर स्वातंत्र्य मिळवण्याचा विचार करत असतो. असे होईल तेव्हाच स्वातंत्र्य खरे आणि

टिकाऊ होईल. एकदा देशाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न सुटला की आपण हिंदुस्थान आणि पाकिस्तानसंबंधी विचार करू शकतो.

**नोआखालीच्या तुलनेत बिहारमध्ये भयानक प्रमाणात लोकांना त्रास सहन करावा लागलेला असताना तुम्ही बिहारमध्ये का जात नाही असा प्रश्न गांधीजींना विचारण्यात आला असता गांधीजींनी उत्तर दिले :**

बिहारमध्ये जे घडले ते भरपूर लज्जास्पद आहे. परंतु तेथील लोकांना आपल्या चुकीची जाणीव झाली आहे असे म्हणतात. इथे राहून मी तिथल्याकरिता जे करू शकतो त्यापेक्षा अधिक मी तिथे जाऊनही करू शकत नाही, कारण नोआखालीत राहूनही मी बिहारमधील सरकारला आणि जनतेला प्रभावित करू शकतो.

**गांधीजींना विचारण्यात आलेला शेवटचा प्रश्न होता :**

**नुकताच झालेल्या दंगलींनंतर ना तर पाकिस्तान असू शकतो ना शांतता. या परिस्थितीवर तुम्ही कोणता उपाय सुचवता? गांधीजींनी उत्तर दिले :**

नोआखालीत मी याचाच शोध घेतो आहे. मला ते उत्तर माहीत होताच जगाला ते कळेल.

**गांधीजींचा निरोप घेताना ते मुसलमान तरुण गांधीजींना म्हणाले की आम्ही तुम्हाला जे आश्वासन दिले त्याची परिपूर्ती करण्याची शक्ती आम्हांला मिळावी असे आशीर्वाद आम्हाला द्या.**

**गांधीजी म्हणाले की जोपर्यंत तुंम्ही तुमच्या अंतःकरणापासून प्रामाणिकपणे बोलत आहा आणि तुमचे आश्वासन पूर्ण करण्याचा प्रयत्न कराल तोपर्यंत ईश्वर तुमच्या बाजूला असेल. गांधीजी त्या तरुणांना म्हणाले मी जे काही म्हणालो त्याची तुम्ही तुमच्या मित्रांशी चर्चा करा आणि अजून काही प्रश्न मला विचारायचे असतील तर मला परत भेटून विचारा.**

‘द हिंदू’, जानेवारी १७, १९४७; ‘हरिजन’, फेब्रुवारी २, १९४७; आणि ‘अमृत बझार पत्रिका’, जानेवारी १९, १९४७

-------------------

# ३१६. प्रार्थना प्रवचन

भटियालपूर,

जानेवारी १४, १९४७

असे म्हणतात की पाकिस्तान होण्याचा अर्थ असा नाही की आपल्याला आपल्या स्वतःच्या धर्मानुसार आचरण करण्याचे स्वातंत्र्य असणार नाही वा आपल्या इच्छेप्रमाणे कामधंदा करता येणार नाही. यामुळे अल्पसंख्य समुदायाचा बहिष्कार करून त्यांना सामान्य जीवन जगणे कठीण व्हावे  असा जो विचार तुम्ही करत आहा तो चूक आहे.

**गांधीजी पुढे म्हणाले की बहिष्काराचा अर्थ असहिष्णुता आणि इतर काही लोकांपेक्षा काही लोक श्रेष्ठ आहेत ही भावना असा होतो. आणि पुढे ते म्हणाले -**

आम्ही हरिजनांना - अस्पृश्यांना कमी लेखण्याचे पाप केले म्हणून आम्ही पापी आहो. परंतु इस्लाममध्ये माणसामाणसात भेद केला जात नाही म्हणून तो श्रेष्ठ आहे. परंतु हिंदू वेगळ्या नावाने त्याच ईश्वराची पूजा करतात म्हणून तुम्ही जर हिंदूंना कमी लेखत असाल तर तुम्ही त्याच अस्पृश्यतेचे पालन करता. असे करणे निश्चितच इस्लामच्या मूलभूत तत्त्वाविरुद्ध आहे.

**गांधीजी म्हणाले की प्रार्थनेला आलेल्या मुसलमानांची संख्या त्यांच्या येथील लोकसंख्येतील प्रमाणाशी सुसंगत नाही. स्त्रियांना जर माझी भीती वाटत नसेल तर पुरुषांना मला भेटण्याची भीती का वाटावी हे मला कळत नाही. केवळ ईश्वराची भीती ठेवा, माणसाची नाही असे इस्लाम सांगतो. पाप करण्याची माणसाला भीती वाटली पाहिजे परंतु एखाद्या माणसाकडून जर पापकृत्य घडले तर त्याने ईश्वराला शरण जायला पाहिजे आणि तो जी कोणती शिक्षा करील ती त्याने आनंदाने मान्य केली पाहिजे.**

**गांधीजींनी पडदा पद्धतीचा ओझरता उल्लेख केला आणि ती बंद करण्याची विनंती केली. या पद्धतीमुळे स्त्रियांना सर्व प्रकारे काळोखात ठेवले जाते. दोन्ही समुदायातील स्त्रियांनी अधिक मोकळेपणाने भेटायला पाहिजे आणि एकमेकांना समजून घेतले पाहिजे.** (यानंतरचा भाग 'अमृत बझार पत्रिक'मधून घेतला आहे.)

**तुमच्या संरक्षणाकरिता नेमलेल्या पोलिसांना आणि सैनिकांना हटवण्यात आले पाहिजे अशी विनंती तुम्ही सुऱ्हावर्दींना करावी अशी जी विनंती गांधीजींनी मुसलमानांना आधी केली होती तीच विनंती त्यांनी परत केली.**

**सकाळी गांधीजी काही मुसलमानांच्या घरी गेले होते. त्याचा उल्लेख गांधीजींनी केला. ते म्हणाले की मुसलमान स्त्रियांना माझ्या उपस्थितीत समोर येण्याचा संकोच वाटत होता. त्यांनी अलीबंधूंबरोबरच्या दिवसांची आठवण केली.**

**मुसलमान स्त्रियांच्या सभेत अली बंधूंनी आपल्या डोळ्यांवर पट्टी बांधून भाषण केले होते. परंतु गांधीजींना मात्र डोळ्यांवर पट्टी न बांधताच भाषण करण्याची परवानगी देण्यात आली होती. गांधीजी पुढे म्हणाले की खरा पडदा शरिराचा नसतो तर मनाचा असतो. मुसलमान स्त्रियांच्या मनावरील काळोखी पुसली गेली नाही तर बाह्य पडद्याने तुमचा कोणताही लाभ होऊ शकणार नाही. गांधीजी श्रोत्यांना म्हणाले की खुदा आणि राम एकच आहेत, आपण केवळ त्याला वेगवेगळ्या नावाने बोलावतो. मी असे ऐकले आहे की अनेक मुसलमान शिक्षा होण्याच्या भीतीने घाबरून आपल्या घरातून पळून गेले आहेत. ते म्हणाले की खऱ्या मुसलमानाने पापाला घाबरायला पाहिजे, पापामुळे झालेल्या शिक्षेला नाही. खुदा आणि राम एकच आहेत हे हिंदूंनीसुद्धा शिकायला पाहिजे. श्रोत्यांच्या मनावर मला हीच शिकवण ठसवायची आहे.**

'द हिंदू', जानेवारी १७, १९४७; आणि 'अमृत बझार पत्रिका', जानेवारी १७, १९४७

----------------

## ३१७. जवाहरलाल नेहरू यांना तार

(अशीच तार वल्लभभाई पटेल यांनाही पाठवण्यात आली होती.)

जानेवारी १५, १९४७

पंडित जवाहरलाल नेहरू,

नवी दिल्ली.

पेशावरहून खून, जाळपोळ आणि लूटमार इत्यादींबद्दलची दुःखद तार मिळाली. अशीच तार (हजरा येथूनही) आली आहे. (पाहा "वल्लभभाईपटेल यांना पत्र", जानेवारी २४, १९४७) आरोपात सत्य काय आहे ते कृपाकरून कळव. (नेहरूंनी जानेवारी १६, १९४७ला पाठवलेले उत्तर असे होते - "बिहारबद्दलच्या खोट्या आणि अतिशयोक्त प्रचारामुळे हजरा जिल्ह्यात अनेक गंभीर घटना घडल्या. त्यात हिंदू आणि शीख यांवरील हल्ले, जाळपोळ आणि लूट यांचा समावेश आहे. मृतांची संख्या बहुधा कमी आहे. निर्वासितांची संख्या मात्र बरीच आहे. दुराचारी लोकांवर वायव्य सरहद्द प्रांतातील सरकारने कठोर कारवाई केली आहे आणि ते निर्वासितांना मदत करत आहे. आता परिस्थिती शांत आहे. आम्ही निकटच्या संपर्कात आहो आणि आवश्यक पाऊल उचलू.")

बापू

---------------

# ३१८. अब्दुल गफ्फार खान यांना पत्र

काझिरखिल,

पोस्ट रामगंज,

जिल्हा नोआखाली,

जानेवारी १५, १९४७

वर्तमानपत्रातील बातम्या बरोबर असतील तर त्यावरून दिसते की मी जसा नोआखालीत आलो आहे अगदी तसेच तुम्ही बिहारमध्ये गेला आहा, आणि तुम्ही शब्दशः एकटे आहा. मी एकटा असणे हा खोटेपणा आहे. तुम्ही काय करत आहा याबद्दल दोन शब्द लिहून मला कळवा. तुम्हाला कितपत यश मिळाले हे आताच विचारणे थोडी घाई होईल असे मला वाटते. इथे काम कठीण आहे. माझ्या अहिंसेचे काटेकोर मोजमाप होत आहे. आयुष्यभर मी शूराच्या अहिंसेचे प्रतिनिधित्व करत होतो काय? असे असेल तर निदान नोआखालीतील मुसलमानांकडून तिला प्रतिसाद मिळायला पाहिजे होता. सध्याच काय होईल ते मी सांगू शकत नाही. मी माझ्या विश्वासाप्रमाणे वागत आहे, क्षणोक्षणी ईश्वर मला मार्गदर्शन करत असतो. पेशावरहून आलेल्या तारेची प्रत मी सोबत जोडली आहे. (पेशावर येथील काही अकाली शिखांनी ११ जानेवारीला पाठवलेली तार. त्यात लिहिले होते की वायव्य सरहद्द प्रांतातील सांप्रदायिक परिस्थिती चिघळली आहे. हिंदू आणि शिखांची हत्या झाली आहे, त्यांच्या घरादारांची लूट झाली आहे आणि देवळे व गुरुद्वारा यांचे पावित्र्य नष्ट करण्यात येत आहे.) यात सांगितलेले खरे असू शकते काय हे तुम्ही सांगू शकाल काय? खान साहेब आणि नवी दिल्लीतील त्यांच्या मित्रांना मी तार केली आहे. (पाहा “अमतुस्सलाम आणि आभा गांधी यांना पत्र”, जानेवारी १५, १९४७) वेळ वाचवण्याकरिता मी या पत्राचा मजकूर मित्र रंगास्वामी यांना लिहून घेण्याकरिता सांगत आहे. तुम्हाला माहीतच आहे की ते मद्रास येथील “द हिंदू”चे महत्त्वाचे वार्ताहर आहेत. अजूनही मी सहजपणे उर्दू लिहू शकत नाही. प्यारेलाल आणि सुशीला यांच्याशी जरी माझी अनेकदा भेट होत असली तरी मी त्यांच्यावर नेहमीच अवलंबून राहू नये. त्यांच्याकरिता नेमून दिलेल्या खेड्यात ते काम आहेत आणि त्यांनी अथवा मी कोणताही मोह ठेवू नये.

खान अब्दुल गफ्फार खान साहेब द्वारा मुख्यमंत्री बिहार सरकार, पटना

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय आणि संग्रहालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

----------------

# ३१९. अबुल कलाम आझाद यांना पत्र

पत्रोत्तरकरिता पत्ता - काझिरखिल,

पोस्ट रामगंज, जिल्हा नोआखाली,

जानेवारी १५, १९४७

प्रिय बंधू,

मला मिळालेल्या तारेची प्रत सोबत आहे. मला माहीत आहे की तुम्ही कलकत्त्यात डॉ. बिधन रॉय यांच्या कुशल आणि सक्षम हातात आहा. तुमचा सल्ला आणि मदत यांची आवश्यकता असलेल्या सर्व मित्रांनी तुम्हाला या वेळी मोकळे ठेवायला पाहिजे. परंतु इतर कोणाहीपेक्षा तुम्हाला वस्तुस्थितीची जास्त चांगली माहीती असू शकेल व तुम्ही योग्य मार्गदर्शन करू शकाल असे मला वाटले. यामुळे हा त्रास. मी सरदार, जवाहरलाल, काँग्रेसचे अध्यक्ष आणि डॉ. खानसाहेब यांना तार केली आहे. कलकत्त्यात मी तुम्हाला जाणीवपूर्वक तार पाठवली नाही. हे पत्रसुद्दा तुम्हाला प्रत्यक्ष दिले जाईल. अंतरिम सरकारमधील पद स्वीकारण्यासंबंधीचे तुमचे वक्तव्य मी वाचले. ते फार चांगले आहे आणि या कठीण परिस्थितीत मंत्रिमंडळातील तुमची उपस्थिती ही फार मोठी सेवा होईल याबद्दल मला किंचितही संशय नाही. आशा आहे की तुम्ही त्वरित आणि ठोस प्रगती कराल. उपचारामध्ये घाई करू नका. वैद्यकीय उपचार करणाराचाही रुग्णाने सहानुभूतीपूर्वक विचार केला पाहिजे. वैद्यकीय उपचार करणारा रुग्णाचा जवळचा मित्र आहे यामुळे उपचार करणाराचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्याची आवश्यकता नाही कारण तसे करणे हे आपल्या स्वतःचाच विचार करणे होईल असे वाटून घेण्याचे कारण नाही. माझ्या येथील हालचालीबद्दल बोलायचे तर तुम्ही माझ्या प्रार्थना प्रवचनाचे वृत्तपत्रांमधील अहवाल वाचा असे म्हणण्याचे साहस मी करेन. मी ज्या अहिंसेचा पुरस्कर्ता आहे ती अहिंसा खरी अहिंसा आहे की नावाची आहे याबद्दलची माझी मीच परीक्षा घेत आहे. माझी प्यारेलाल आणि सुशीला यांच्याशी जरी वारंवार भेट होत असली तरी मी त्यांच्यावर विसंबून राहत नाही. आज माझ्याबरोबर प्यारेलाल आहे. त्याच्या कामातील हे शेवटचे गाव आहे. मी जर हा नियम पाळला नाही तर हा संपूर्ण इमला कोसळेल आणि वेगवेगळ्या गावात लोकांना विभागून देणे हा केवळ थट्टेचा विषय होईल.

तुमचा,

गांधी

मौलाना साहेब,

कलकत्ता

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

-------------

## ३२०. अमतुस्सलाम आणि आभा गांधी यांना पत्र

जानेवारी १५, १९४७

प्रिय बेटी,

मला तुझे पत्र मिळाले. रामनामाचा जप करून तुझी शक्ती टिकवून ठेव. शक्य असेल तितके शांततेत दिवस घालव. याच मार्गाने ईश्वर प्रसन्न होईल आणि काम पुढे जाईल.

आशीर्वाद,

बापू

चि. आभा,

आनंदात राहा.

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५६३

------------------

# ३२१. वर्तमानपत्रांना वक्तव्य

(वृत्तानुसार निर्मल कुमार बोस यांनी वृत्तपत्रांना गांधीजींतर्फे हे वक्तव्य दिले होते.)

नारायणपूर,

जानेवारी १५, १९४७

उपोषणासंबंधी जे काही करणे आवश्यक असेल ते करण्यात आलेले आहे हे जनतेने लक्षात ठेवावे. बिबी अमतुस्सलाम शांत आहेत आणि त्यांच्याकडे जे काही लक्ष देणे आवश्यक आहे ते दिले जात आहे. ती शांत, आनंदी आणि निर्लिप्त आहे. तिच्या उपोषणाचा प्रचार व्हावा अशी तिची इच्छा नाही. हा शुद्ध आध्यात्मिक प्रयत्न आहे आणि तिला वाटते की सध्या भीती, अविश्वास आणि संशय यांनी भरलेल्या या वातावरणात दैवी हस्तक्षेपाकरिता त्यांनी घातलेल्या सादेला त्यांच्या सर्वोच्च बलिदानानेच शक्ती मिळेल.

हे वक्तव्य आवश्यक आहे कारण वर्तमानपत्रांमध्ये त्यांच्या उपोषणाची बातमी आलेली आहे. या उपवासाचा सुखद अंत तर तेव्हाच होऊ शकतो जेव्हा अनेक खुनांमध्ये उपयोगात आलेले ते शस्त्र सापडेल. तसे झाल्यानंतरच आवश्यक ते करता येऊ शकेल.

द बॉम्बे क्रॉनिकल, जानेवारी जानेवारी १८, १९४७

----------------

# ३२२. ग्राम सेवा संघाच्या सभेत भाषण

नारायणपूर,

जानेवारी १५, १९४७

गांधीजी म्हणाले की अस्पृश्यता निर्मूलन करणे तुमचे प्राथमिक कर्तव्य आहे. जोपर्यंत समाजातील हे विषाणू जात नाहीत तोपर्यंत या देशाचा खरा विकास होऊ शकत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे हिंदू-मुसलमान ऐक्य स्थापन झाले पाहिजे. हिंदू आणि मुसलमान या दोघांनीही हे साध्य साध्य करण्याकरिता उत्सुक असायला पाहिजे. ते एकाच तलावातून पाणी घेतात आणि एकाच भातशेतातून तांदूळ घेतात. काही काळ त्यांनी राजकारण विसरायला पाहिजे आणि आपले सगळे लक्ष गावाच्या सुधारणेकडे, शिक्षणप्रसाराकडे, उद्योगाच्या वाढीकडे आणि रचनात्मक कार्यक्रमाकडे केंद्रित केले पाहिजे. याकरिता कार्यकर्त्यांनी मरण्याची तयारी ठेवली पाहिजे. निर्वासितांनी आता घरी परतायला पाहिजे काय या प्रश्नाचे उत्तर देताना गांधीजी म्हणाले की त्यांनी लवकरात लवकर घरी परतायला पाहिजे. काहीही असले तरी त्यांनी भीती सोडली पाहिजे. कताई हासुद्धा कार्यकर्त्यांच्या कर्तव्याचा भाग झाला पाहिजे. तुम्ही जर दररोज किमान एक तास कताई केली तर तुम्ही विणकरांना सूत पुरवू शकता. आज त्यांना आपल्या हातमागाकरिता लागणाऱ्या सुताकरिता सरकारच्या तोंडाकडे पाहावे लागते. अशा प्रकारे कापडाचा प्रश्न सोडवणे सोपे होईल.

‘हरिजन’, फेब्रुवारी २, १९४७

--------------

# ३२३. प्रार्थना प्रवचन

(हा आणि यानंतरचा विषय “श्रीरामपूर डायरी”तून घेतला आहे.)

नारायणपूर,

जानेवारी १५, १९४७

**प्रार्थना प्रवचन सुरू करत असताना सुरुवातीलाच गांधीजी म्हणाले की माझ्या या पदयात्रेच्या दरम्यान अजून एका मुसलमान मित्राच्या छताखाली एक रात्र घालवता आली याचा मला आनंद होतो. माझ्याबरोबर असलेल्या लोकांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न तर मी करतो आहे परंतु अजून तरी त्यात मला फारसे यश मिळालेले नाही. परंतु माझे यजमान माझ्याबरोरच्या लोकांची संख्या पाहून घाबरले नाही व ते सर्वांची व्यवस्था करू शकले याचा मला आनंद होतो.**

**यानंतर गांधीजींनी थोड्याच वेळेपूर्वी घडलेल्या एका घटनेचा उल्लेख केला. गांधीजींची आपल्या घरातील स्त्रियांशी भेट व्हावी असे एका घरातील थोरल्या लोकांना वाटत होते. त्यांनी त्याकरिता प्रयत्न केला परंतु त्यात यश त्यांना आले नाही. गांधीजी पुढे म्हणाले की हिंदू स्त्रिया प्रार्थनेला जास्त संख्येत उपस्थित राहतात हे खरे आहे. या अर्थाने तुम्ही अधिक प्रगत आहा. परंतु अशा परिस्थितीत तुम्ही तुमच्या मुसलमान भगिनींना भेटून त्यांची पडद्याच्या या गुलामगिरीतून मुक्तता करणे तुमचे कर्तव्य आहे. तुम्ही जर शेजाऱ्याचे हे कर्तव्य विसराल तर तुमच्यात काही उणीव आहे असे म्हणावे लागेल.**

**गांधीजी म्हणाले की मी हिंदुस्थान स्वतंत्र होण्याचे स्वप्न पाहतो आहे. परंतु त्यातील निम्मे लोक जर पक्षाघाताच्या अवस्थेत राहणार असतील तर तुम्हांला ज्या प्रकारचे स्वातंत्र्य मिळेल ते कधीही परिपूर्ण नसेल. यामुळे श्रोत्यांमध्ये जी वडीलधारी मंडळी होती त्यांना अतिशय नम्रपणे विनंती करत गांधीजी म्हणाले की तुम्ही या पडदापद्धतीचा विचार करा आणि शक्य तितक्या कमी वेळात ती घालवा. पैगंबरांनी जी शिकवण दिली आहे त्याच्या अगदी विरोधी ही पडदापद्धती आहे याची जाणीव मला या भ्रमंतीत झाली व त्यामुळे मी तुम्हाला हे सांगतो आहे.**

‘हरिजन’, फेब्रुवारी २, १९४७

-----------------

# ३२४. बाकी खान यांना तार

जानेवारी १६, १९४७

बाकी खान (अमतुस्सलामचे भाऊ) द्वारा टाटा क्राफ्ट,

टाटा घर,

कलकत्ता.

तुमची तार. काफी खान यांना तार पाठवली आहे (पाहा "प्रार्थना प्रवचन", जानेवारी ११, १९४७). सत्य काय आहे ते तुम्हाला कळवत आहे. ती जरी पूर्णपणे शांत असली व कोणत्याही भावाने तिला भेटायला यावे असे तिला वाटत नसले तरी तुमच्यापैकी कोणाला तिला भेटायला यायचे असेल तर येऊ शकता.

बापू

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

-----------------

# ३२५. अमतुस्सलाम आणि आभा गांधी यांना पत्र

जानेवारी १६, १९४७

प्रिय बेटी,

मला तुझे पत्र मिळाले. हे मी बाकीच्या (अमतुस्सलाम यांचा भाऊ) तारेमुळे लिहीत आहे. त्याला यायचे असेल तर त्याकरिता आक्षेपाचे कारण नाही असे मी त्याला लिहिले होते. शांत राहा. मी लहानसे वक्तव्य दिले आहे. ते प्रकाशित होईल तेव्हा त्याचे कात्रण मी तुला पाठवीन (पाहा “वृत्तपत्रांना वक्तव्य”, जानेवारी १५, १९४७).

आशीर्वाद,

बापू

चि. आभा,

मी माझे मौन रविवारी दुपारी १२ वाजता सुरू करीन.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५६४

----------------

# ३२६. प्रार्थना प्रवचन

("श्रीरामपूर डायरी"मधून उद्धृत)

रामदेवपूर,

जानेवारी १६, १९४७

**गांधीजी म्हणाले की काल मी नारायणपूरमध्ये होतो तेव्हा काही मुसलमानांनी मला काही प्रश्न विचारले.**

**(पहिला प्रश्न होता :) तुमचे ध्येय हिंदू-मुसलमान ऐक्य असेल तर आसामला आणि शिखांना तुम्ही समूहाबाहेर राहण्याकरिता कसे सांगू शकता** (पाहा "स. राधाकृष्णन यांना पत्र", सप्टेंबर १७, १९४६) **आणि असे असताना मुस्लिम लीग घटनासमितीत सामील होईल अशी अपेक्षा कशी करता येऊ शकते?**

**गांधीजी म्हणाले की माझ्या हेतूबद्दल "जर" हा प्रश्नच उपस्थित होत नाही. हिंदू-मुसलमान ऐक्य हे ध्येय मी माझ्या तरुणपणापासून म्हणजे सतत ६० वर्षांपासून जोपासले आहे. आसाम, शीख आणि याबाबतीत सरहद्द प्रांत आणि याचप्रमाणे अजून ज्यांना वाटते त्यांना घटनासमितीतील समूहाबाहेर राहण्याचा सल्ला मी दिलेला आणि माझ्या ध्येयात आणि यांत मला कोणतीही विसंगती दिसत नाही. कॅबिनेट मिशनच्या प्रपत्राचे स्वरूप ऐच्छिक आहे आणि कोणत्याही पक्षावर घटनासमितीत सामील होण्याकरिता सक्ती करता येत नाही. तो ठराव वा आपली इच्छा त्यांच्यावर लादता येईल अशी लोकमताशिवाय इतर कोणतीही शक्ती त्यात नाही.**

**यामुळे मी असा कोणताही सल्ला दिला नाही की ज्यामुळे मुस्लिम लीगला घटनासमितीत सामील होणे अशक्य होईल. माझ्या माहितीप्रमाणे अखिल भारतीय काँग्रेस कमेटीच्या नुकताच झालेल्या सभेत जे ठराव मंजूर करण्यात आलेले आहेत** (पाहा "अखिल भारतीय काँग्रेस कमेटीचे ठराव") **ते पाहिले तर कॅबिनेट मिशनच्या प्रपत्राशी काँग्रेस पूर्णपणे सहमत असलेली आढळेल.**

**गांधीजी पुढे म्हणाले की मुस्लिम लीग घटनासमितीत सामील होईल आणि विचारपूर्वक युक्तिवादाने आपले म्हणणे समजावून सांगण्याचा प्रयत्न करील अशी मला आशा आहे. असे झाले नाही तर घटनासमिती स्वैच्छिक संस्था आहे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे आणि तिला अशा पक्षाने अस्तित्वात आणले आहे की ज्याच्यात काही शक्ती होती. असे नसते तर ती पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळली असती. तिला भारतीय जनमताचा पाठिंबा असला तरच तिचा इमला टिकाऊ होऊ शकतो. घटनासमिती इतर सर्व प्रकारे चांगली असेल तर काही प्रांत घटनासमितीबाहेर राहिले तरी त्यामुळे काही फरक पडू शकत नाही.**

यानंतर गांधीजींनी विचारले की आसामच्या इच्छेविरुद्ध त्याला बंगालमध्ये का सामील करण्यात यावे अथवा सरहद्द प्रांताला वा शिखांना पंजाबमध्ये अथवा सिंधमध्ये का सामील करण्यात यावे? प्रसंगानुरूप काँग्रेसने अथवा लीगने आपले धोरण अशा प्रकारे आखले पाहिजे की त्यात हट्टी प्रांतांना वा समूहांनाही सामील होण्याची इच्छा झाली पाहिजे.

गांधीजींना दुसरा प्रश्न विचारण्यात आला - तुमचा दावा आहे की तुम्ही दोन्ही समुदायाचे मित्र आहा, परंतु मागील दोन महिन्यापासून नोआखालीत तुम्ही केवळ तुमच्याच समुदायाचे पुनर्वसन करण्याच्या, सेवा करण्याच्या प्रयत्नात आहा. आपले सर्वस्व गमावलेल्या बिहारच्या मुसलमानांकरिता तुम्ही काय करत आहा?

गांधीजी - मी म्हणेन की हा प्रश्न तथ्यांकडे दुर्लक्ष करणारा आहे. मी केवळ माझ्याच समुदायाचे "पुनर्वसन करण्याचा, सेवा करण्याचा" प्रयत्न करून राहिलेलो नाही. माझा स्वतःचा कोणताही समुदाय नाही वा असे म्हणा की मी सर्व समुदायांचा आहे. माझे आजपर्यंतचे काम याची साक्ष देईल. मी मोकळेपणाने मान्य करतो की मी नोआखालीतील हिंदूंचे सांत्वन करण्याचा प्रयत्न करतो आहे, परंतु मुसलमानांची हानी करून मी असे करत नाही. आपल्या कुटुंबात कोणी आजारी असला आणि मी त्याची सेवा करत असलो तर त्याचा अर्थ असा नक्कीच होत नाही की नाही की मी इतरांकडे दुर्लक्ष करतो.

मुसलमान मित्र मला वारंवार आग्रहपूर्वक सल्ला देत असतात की माझी जागा नोआखालीऐवजी बिहारमध्ये आहे. ते असेही म्हणतात की संख्येच्या दृष्टीने पाहिले तर तिथे मुसलमानांना नोआखालीतील हिंदूंपेक्षा किती तरी जास्त प्रमाणात त्रास सहन करावा लागलेला आहे. परंतु बिहारमधील हिंदूमध्ये संकटग्रस्त मुसलमानांबद्दल मी बरीच सहानुभूती निर्माण केली आहे हे मी माझ्या मुसलमान टीकाकारांना पटवून देऊ शकलो नाही याचा मला खेद होतो. मी जर मुसलमान टीकाकारांचे ऐकून नोआखाली सोडून बिहारमध्ये गेलो असतो तर त्यामुळे मुसलमानांची सेवा होण्याऐवजी हानीच झाली असती.

उदाहरणार्थ शक्य आहे की तिथे गेल्यानंतर बिहारमधील हिंदूंवर आणि तेथील सरकारवर जे आरोप करण्यात येतात त्याच्या पुष्ट्यर्थ मला एकही पुरावा मिळणार नाही. अशी घोषणा करता यावी म्हणून मी चांगला मार्ग निवडला आहे. बिहार सरकारला मी सल्ला दिला आहे की त्यांनी बंगाल सरकारबरोबर वा एकट्याने दंगलींची चौकशी करण्याकरिता एका निष्पक्ष आयोग नेमावा. व बिहार सरकारने माझा तो सल्ला मान्य केला आहे. (यापुढील भाग हरिजनमधून घेतला आहे.)

(तिसरा प्रश्न होता :) अहिंसेचा हा पैगंबर, आधुनिक बुद्ध देशातील दंगली आणि रक्तपात का थांबवू शकत नाही?

या प्रश्नाचे उत्तर देत गांधीजी म्हणाले की मी आधुनिक बुद्ध नाही, मी अनुभवाचे विस्तृत भांडार असलेला एक सर्वसामान्य माणूस आहे आणि तसाच माझा दावा आहे. परंतु याचा अर्थ असा नाही की मी श्रोत्यांमधील कोणत्याही सदस्यापेक्षा कोणत्याही प्रकारे श्रेष्ठ आहे. दोन्ही समुदायांचा वा हिंदुस्थानातील सर्व समुदायांचा मी सारखाच सेवक आहे. 'आपसातील हे युद्ध' वा रक्तपात थांबवता येण्याची शक्ती माझ्यात असायला पाहिजे होती अशी माझी किती किती इच्छा आहे! माझ्यापूर्वी झालेले बुद्ध वा पैगंबर युद्ध थांबवण्याकरिता त्यांना योग्य वाटले त्या मार्गाने गेले. यावरूनच सिद्ध होते

की मला अशा कोणत्याही अपूर्व शक्तीचा पाठिंबा नाही. हे खरे आहे की मी अहिंसेकरिता शपथबद्ध आहे आणि म्हणून माझ्या अहिंसेच्या शक्तीची परीक्षा घेण्याकरिता मी नोआखालीत आलो आहे. आम्ही इथे भाऊभाऊ म्हणून पूर्णपणे शांततेने व एकोप्याच्या भावनेने राहू असे बंगालमधील दोन्ही समुदाय जोपर्यंत आपल्या कृतीतून दाखवत नाहीत तोपर्यंत मी येथून जाणार नाही असे मी बंगालमध्ये आलो तेव्हापासून वारंवार सांगतो आहे.

प्रार्थनेपूर्वी जे मुसलमान बांधव गांधीजींना भेटले होते त्यांच्या प्रश्नाचेही गांधीजींनी उत्तर दिले. दंगलीच्या काळात ज्यांच्यावर खून, जाळपोळ आणि लुटीचे आरोप होते त्यांच्या अटकेकरिता आणि त्यांच्यावर खटला चालवावा म्हणून हिंदू आंदोलन करत असताना तुम्ही हिंदू-मुसलमानातील मैत्रीपूर्ण संबंधाची अपेक्षा कशी करू शकता असा प्रश्न त्या मुसलमान बांधवांनी गांधीजींना विचारला. गांधीजींनी मान्य केले की मला अशा प्रकारच्या तक्रारी करणे आवडत नाही. परंतु जोपर्यंत अपराध करणारे अटक आणि सरकारी कारवाई टाळत आहेत तोपर्यंत अशा तक्रारी करणारांबद्दल मला सहानुभूती वाटते. मुसलमानांचे लोकमत जर अपराध्यांना शासकीय न्यायालयासमोर नाही तर जनतेच्या न्यायालयासमोर नेण्याकरिता सक्रिय प्रयत्न करील तर मला अधिक आनंद होईल. अपराध्यांनी पश्चात्ताप व्यक्त केला पाहिजे आणि लुटीचा माल परत केला पाहिजे. ज्यांचे त्यांनी नुकसान केले आहे त्यांनीसुद्धा आता यापुढे आम्हाला घाबरण्याचे कारण नाही, आता आमचे वेड गेले आहे हे दाखवून दिले पाहिजे. यापुढे अपराध्यांना कोणाचेही नुकसान करण्याची हिंमत होऊ नये असे मुसलमानांचे जनमत असले पाहिजे. असे होईल तेव्हाच हिंदूंना सुरक्षितपणे आपल्या खेड्यात परतण्याकरिता सांगता येईल. अशा प्रकारे जनतेच्या न्यायालयासमोर अंतःकरणाची शुद्धी होणे हे सरकारी न्यायालयातील खटल्यापेक्षा किती तरी चांगले याबद्दल गांधीजींची खात्री होती. गरज आहे ती सुधारणेची, बदल्याची नाही.

'हरिजन', फेब्रुवारी २, १९४७ आणि फेब्रुवारी ९, १९४७

-------------------

# ३२७. हमिदुद्दिन अहमद यांना पत्र

(सांसदीय सचिव, पूर्व बंगाल सरकार)

काझिरखिल, पोस्ट रामगंज, जिल्हा नोआखाली,

जानेवारी १७। १९, १९४७

प्रिय हमिदुद्दिन साहेब,

तुमच्या या महिन्याच्या १० तारखेच्या पत्राकरिता मी आभारी आहे. मला ते कालच मिळाले. माझ्या पत्राचे उत्तर देण्याला उशीर होण्याचे कारण मी समजू शकतो. मला तुमच्याशी कोणताही वाद करण्याची इच्छा नाही. परंतु तुमच्या पत्रातून जो गैरसमज मला लपलेला दिसतो तो दूर करण्याच्या प्रयत्नापर्यंतच मी स्वतःला सीमीत ठेवीन. नोआखालीतील घटनांबद्दल मी वक्तव्य दिले असते तर ते अपरिपक्वावस्थेत दिले गेले असते कारण इथे आल्यानंतर माझ्या मनावर जो ठसा उमटला होता तो विघातक होता आणि ज्या घटनांची मला आजही माहिती कळते त्या जर खऱ्या असतील, आणि त्यांतील काही तरी खऱ्या असल्या पाहिजे असे दिसते, तर ती माहिती अस्वस्थ करणारी आहे. इथे काम करणारे स्वयंसेवक जर माझ्या मार्गदर्शनाखाली वा शिस्तीखाली काम करत नसतील तर त्यांना काढून टाकणे हे निश्चितच सरकारचे काम आहे. मी केवळ त्यांनाच काढू शकतो ज्यांना मी माझ्याबरोबर आणले आहे. मी शहीद साहेबांना सांगितले आहे की कोणत्याही कारणाकरिता का होईना त्यांची उपस्थिती देशहिताकरिता बाधक आहे असे आढळले तर त्यांनी केवळ सूचना देण्याचा अवकाश की ते कोणतीही कुरकुर न करता निघून जातील. या श्रेणीतून मी फक्त माझा आणि माझ्या नातीचा अपवाद केला आहे. मला अर्थातच स्वयंसेवकांच्या कोणत्याही विध्वंसक कार्याची माहिती नाही. परंतु तुम्हाला मिळालेला अहवाल जर खरा असेल आणि मी तुमच्या जागी असतो तर मी निश्चितच अशा कामाकरिता त्यांना बाहेर काढले असते. एखाद्या स्वयंसेवकाला बाहेर काढले पाहिजे असे तुम्ही सुचवल्याचे मला आठवत नाही. मी बिहार सरकारसंबंधी वा मुस्लिम लीगच्या अहवालाविषयी जे जाहीरपणे म्हणालो ते तुम्हाला सांगणे मला आवडेल. याबाबतीत मी अतिशय मितभाषी आहे. शहीद साहेब आणि इतरांशी माझा पत्रव्यवहार निश्चितच सुरू आहे. परंतु जनतेत मी फार काही बोलल्याची मला जाणीव नाही. तुमचा बिहारसंबंधीचा सल्लाही मी मान्य करू शकत नाही आणि बिहारमध्ये मी असतो तर काय झाले असते यासंबंधी तुम्ही जो अंदाज करता तोही मी मान्य करू शकत नाही. बिहारमध्ये जाऊनच मुसलमानांच्या

हिताकरिता मी काम करू करू शकतो असे नाही हे माझे ठाम मत आहे. मला जर वाटले तर मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो की मी तुमच्या वा इतर कोणात्याही मित्राच्या प्रोत्साहनाची वाट त्याकरिता पाहणार नाही. माहिती असलेल्या मित्रांशी माझा पत्रव्यवहार सुरू आहे आणि ते मला बिहारमध्ये जाण्यापासून परावृत्त करत आहेत, आणि तेसुद्धा फार चांगल्या कारणाकरिता. परंतु या अवस्थेत मी तिथे जायला नको.

हिंदूंना शांतता समितीबद्दल मुळीच उत्साह नाही असे तुम्ही जेव्हा मला सांगितले तेव्हा मला आश्चर्याचा धक्काच बसला. आपण जेव्हा मागील वेळी भेटलो होतो तेव्हा तुम्ही माझ्या मनावर असा ठसा उमटवला होता की तुम्ही जिल्ह्यात निदान काही दिवस राहणार आहा आणि शांतता समित्यांचे काम सुरू झालेले पाहणार आहा. त्या वेळी शांतता समित्यांच्या स्थापनेबद्दल जे काही सुरू होते त्याबद्दल तुम्ही मला फार उत्साही दिसत होता. मला याबद्दल अजून काही “स्पष्टीकरणाची आवश्यकता” आहे काय याचा विचार न करता तुम्ही या जिल्ह्याला परत भेट द्यावी अशी माझी अर्थातच इच्छा आहे.

तुमचा विश्वासू,

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

-----------------

# ३२८. प्यारेलाल यांना पत्र

जानेवारी १७, १९४७

चि. प्यारेलाल,

सकाळी ६.३५ वाजता थरथरत्या हाताने मी हे लिहीत आहे. माझ्यासमोर पत्र नाही. मी अर्थातच ग्लिनच्या पत्रावर सही केली आहे (पाहा "तुलसीराम यांना पत्र", जानेवारी १२, १९४७). तुझी इच्छा असेल तर तू परत पाठवू शकतो. इथून काल सर्व गेले. मी केवळ सरदार जीवनसिंगजींना ठेवले आहे.

मी तुझे पत्र म.ला दिले. ते त्याच्या पेटीत आहे. तो निदान काही ओळी लिहिणार आहे. तू पूर्णपणे शांत राहायला पाहिजे. शक्य होतील तितक्या तुझ्या सूचनांचे मी पालन करीन.

तू म्हणतोस की तू पुस्तके पाठवली होती. ती मला मिळाली नाहीत. ते पत्र आणणाराने मला पुस्तके दिली नाही.

दुपारी बराच वेळ मी अंथरुणात पडून होतो. अधिक नंतर.

किती तरी सांगायचे राहिले आहे.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - मला सुशीलाचे पत्र मिळाले. ते तुला पाठवण्याची माझी इच्छा आहे. ते पत्रसुद्धा. ती जर तिथे असेल तर तिला सांग की आताच मी लिहू शकत नाही.

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

-----------------

# ३२९. अमतुस्सलाम यांना पत्र

जानेवारी १७, १९४७

प्रिय बेटी,

मला तुझे पत्र मिळाले. आता निरोप घेतो. माझ्याबरोबर दोन सरदार आहेत. आभाला मी वेगळे लिहू शकत नाही.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५६५

-----------------

# ३३०. स्त्रियांसमोर भाषण

परकोटे,

जानेवारी १७, १९४७

नोआखालीत जे घडले तो ईश्वराचा शाप होता, केवळ बंगाललाच नाही तर संपूर्ण हिंदुस्थानला. आणि आता आपला दृष्टीकोन बदलायची वेळ आलेली आहे. गांधीजी म्हणाले की माणसामाणसामध्ये आणि जातीजातींमध्ये उच्च आणि कमी प्रतीचा असा भेद स्त्रियांनी करू नये. तुम्ही सर्व स्त्रियांमध्ये समतेच्या भावनेने मोकळेपणाने मिसळायला पाहिजे. गांधीजींनी हिंदू स्त्रियांना सल्ला दिला की तुम्ही विशेषतः मुसलमान भगिनींमध्ये मिसळायला पाहिजे. या दोन समुदायातील स्त्रियांमध्ये जर मैत्रीपूर्ण संबंध असतील तर आणि हिंदू स्त्रिया मुसलमान स्त्रियांच्या निकटच्या संपर्कात असल्या तर नोआखालीत जे काही घडले त्यातील बरेच टाळता आले असते.

गांधीजींनी स्त्रियांना असासुद्धा सल्ला दिला की तुम्ही तुमचा रिकामा वेळ असाच घालवू नका. त्या वेळात तुम्ही कताई, ग्रामसफाई, पाण्याच्या टाक्यातील पाणी स्वच्छ ठेवणे अशा प्रकारचे काम करा.

गांधीजी असेही म्हणाले की हिंदू स्त्रियांना दिलेला माझा सल्ला पुरुषांकरिताही लागू होतो आणि त्यांनीसुद्धा मुसलमानांबरोबर मित्रांप्रमाणे फिरावे. मैत्रीपूर्ण संबंधामुळे गैरसमज टाळता येऊ शकतात आणि भांडणाची शक्यता नाहीशी होते.

'अमृत बझार पत्रिका', जानेवारी २०, १९४७

------------------

# ३३१. ग्रामसेवासंघाच्या स्वयंसेवकांसमोर भाषण

परकोट

जानेवारी १७, १९४७

तलवार तलवारीला भिडू शकते परंतु त्यामुळे काहीही साध्य होऊ शकत नाही. अहिंसक राहा आणि मनात कोणतीही भीती बाळगू नका. तुमच्यापैकी कोणी एक निर्भय होईल तर तुम्हा ४२ लोकांमध्ये ४२०० लोकांची शक्ती येईल.

**तुम्ही निर्भय झाला का असे चर्चेनंतर गांधीजींनी विचारले. एक स्वयंसेवक म्हणाला की जेव्हा आम्ही ४२ स्वयंसेवक सोबत असतो तेव्हा आम्हांला भीती वाटत नाही.**

याचा अर्थ तुमच्यावर अजूनही भीतीचा पगडा आहे, तुम्ही सर्व घाबरता. स्वयंसेवकाला एकटा असतानाही भीती वाटायला नको. काहीही झाले तरी तुमची मान खाली जायला नको आणि भीती वा अपमानाला तुम्ही शरण जायला नको.

**गांधीजी स्वयंसेवकांना म्हणाले की तुम्ही खेड्यांकरिता हितावह होईल अशा प्रकारे काम केले पाहिजे. आपण मित्रांशी वा भावाशी मिसळतो तसे तुम्ही मुसलमानांमध्ये मिसळायला पाहिजे. लाठीशी लढण्याकरिता लाठीचा उपयोग करण्याच्या पद्धतीचा त्यांनी निषेध केला आणि म्हणाले की अशाने ही समस्या सुटणार नाही. ते म्हणाले : तुम्ही कोणालाही लाठीने पराभूत करू शकत नाही, केवळ प्रेमानेच करू शकता.**

स्वयंसेवकांनी गांधीजींना आशीर्वाद मागितले असता गांधीजी म्हणाले : माझा सल्ला तुम्ही मानाल तर माझे तुम्हाला आशीर्वाद आहेत.

'अमृत बझार पत्रिका', जानेवारी २०, १९४७

----------------

# ३३२. प्रार्थना प्रवचन

("श्रीरामपूर डायरीतून उद्धृत.")

परकोट,

जानेवारी १७, १९४७

**गांधीजींनी म्हणाले की परकोट येथे १७ तारखेला सकाळी मी कायदे आझम जिना यांचे एक भाषण वाचले होते. त्यांची बहीण फातिमा जिना यांनी मुलींच्या एका शाळेचा शिलान्यास केला त्या वेळी जिनांनी ते भाषण केले होते. त्या भाषणातील काही भागाचा गांधीजींनी अनुवाद केला. त्यात जिना म्हणाले की मुसलमानांमध्ये जबाबदारीची तीव्र जाणीव, न्यायभावना आणि प्रामाणिकपणा या गोष्टी विकसित झाल्या पाहिजे. चुकीच्या गोष्टीचे अनुकरण करायला नको. सदसद्विवेकबुद्धीचा सल्ला घेतल्यानंतर माणसाला जर असे वाटले की आपण जी कृती करण्याचा विचार करत होतो ती चूक आहे तर इतर कोणत्याही प्रलोभनाच्या वा प्रभावाच्या विचाराने ती कृती करायला नको. गांधीजी म्हणाले की लोक जर या नियमांचे पालन करतील तर त्यांना पाकिस्तान मिळवण्यापासून कोणीही अडवू शकणार नाही.**

**यावर भाष्य करत गांधीजी म्हणाले की यात बळजबरीची कोणतीच गोष्ट नाही आणि पाकिस्तानची स्थापना चारित्र्याच्या उत्तम गुणांच्या आधारवर केली जाणार असेल तर कोणीही त्या राज्याचे स्वागत करील, मग त्याला कोणतेही नाव द्या.** (पुढील परिच्छेद 'अमृत बझार पत्रिका'मधून घेतले आहेत.)

**ते म्हणाले की लूट, जाळपोळ आणि बळजबरीचे धर्मांतर या गोष्टी कुठेही झाल्या तरी त्यांचे समर्थन कोणीही करू शकत नाही, जागृत विवेकबुद्धीचा माणूस त्यांना कधीही पाठिंबा देऊ शकत नाही.**

**हा समारोह मुलींच्या शाळेच्या उद्घाटनासंबंधी झाला होता आणि सिंधमध्ये निरक्षरतेसंबंधी जोरदार मोहीम सुरू करण्यात यावी असा सल्ला जिनांनी सिंधच्या शिक्षणमंत्र्यांना दिला होता याचा गांधीजींनी उल्लेख केला. गांधीजी म्हणाले की यातच भविष्यातील शांततेचे आणि ऐक्याचे रहस्य दडलेले आहे. केवळ पुस्तकी शिक्षणाने फारसा लाभ होत नाही. पुस्तकी शिक्षण घेतलेल्या लोकांची आपल्याकडे उणीव नाही. आपल्याला गरज आहे ती जीवनावश्यक शिक्षणाची. ते पुढे म्हणाले की स्त्री आणि पुरुष ही समाजशरीराची दोन इंद्रिये आहेत आणि त्यातील एक इंद्रिय जरी खुजे राहिले तरी त्याचा परिणाम पूर्ण शरीरावर होईल. यामुळे आपल्या स्त्रियांना आपण काळोखात आणि अज्ञानात ठेवतो ही अतिशय दुर्दैवाची गोष्ट आहे.**

**हिंदू स्त्रिया प्रार्थनेत मोठ्या प्रमाणात सहभागी होतात. मुसलमान स्त्रिया जरी नाही तरी मुसलमान मुलींना तरी प्रार्थनासभेत का सहभागी होता येऊ नये? गांधीजी म्हणाले की मुसलमान भगिनींकडे शुद्ध सेवा भावनेने जाणे हे हिंदू भगिनींचे कर्तव्य आहे हे स्पष्ट आहे. गांधीजी पुढे म्हणाले की तुम्ही कायदे आझम जिना यांचा सल्ला लक्षात ठेवला पाहिजे व त्यानुसार वागायला पाहिजे; हा संदेश काही कोणा विशिष्ट समाजाकरिता नाही; त्याचे वैश्विक महत्त्व आहे. मी तुम्हाला विकसित करायला सांगितलेला गुण संघर्षशीलता नाही तर न्याय आणि सत्य आहे; आणि जेव्हा केव्हा न्यायाचा प्रश्न**

**असेल, मग तो व्यक्तिगत असो वा सामाजिक, लोकांनी पाशवी साधनांचा अवलंब करण्याऐवजी विवेकाला आवाहन केले पाहिजे.**

'हरिजन', फेब्रुवारी ९, १९४७; आणि 'अमृत बझार पत्रिका', जानेवारी २०, १९४७

-------------

# ३३३. अली हुसेन यांना पाठवलेल्या पत्रातील काही भाग

(पटना येथील बॅरिस्टर)

जानेवारी १८, १९४७

तुम्ही माझे तेच अथक पत्रव्यवहार करणारे आहात काय की ज्यांना मी माझे म्हणणे कधीही पटवून देऊ शकलो नाही? तुम्ही सुरुवातीलाच तुमचे मत जोरदार पद्धतीने मांडले आणि मी माझा वेळ कसा घालवतो हे विचारण्याचा त्राससुद्धा तुम्ही घेतला नाही. तसेच तुम्ही काढलेल्या निष्कर्षावर तुम्ही कसे पोहोचला हे सांगण्याचा त्राससुद्धा तुम्ही घेतला नाही. माझे, एका आरोपीचे ऐकून न घेताच तुम्ही मला अपराधी घोषित केले आहे. नोआखालीऐवजी बिहारमध्ये माझी उपस्थिती आवश्यक आहे असे विधानही तुम्ही करून टाकले. नोआखालीत मी माझा वेळ वाया घालवतो आहे की काय हे सर्वात चांगले मलाच कळू शकत असल्यामुळे मी असे गृहीत धरतो की तुम्ही काढलेला नोआखालीसंबंधीचा निष्कर्ष जितका चूक आहे तितकाच बिहारसंबंधीचाही चूक आहे (प्यारेलाल लिहितात की "गांधीजींनी बिहार सरकारला अली हुसेन यांनी उपस्थित केलेल्या प्रत्येक मुद्द्यावर सविस्तर उत्तर देण्याकरिता सांगितले" आणि "नोआखालीत जे काही पुरावे त्यांच्यासमोर आणण्यात आले होते त्यांच्या आधारे त्यांनी परिश्रमपूर्वक सर्व प्रश्नांचे उत्तर दिले.").

तुमच्या पत्रातील पहिल्या परिच्छेदाइतकाच दुसरा परिच्छेदही निराशाजनक आहे. (बिहारच्या शिष्टमंडळाकडून) मला अगदी चुकीची माहिती मिळाली याची तुम्हाला अगदीच माहिती असू शकत नाही . . . आणि तरीही तुम्ही निर्णय घोषित करता आणि म्हणता की . . . त्यांनी मला "चुकीची माहिती दिली" आणि श्री हौलटनसुद्धा (मदत आयुक्त, बिहार) त्यात सहभागी आहेत. . . . जोपर्यंत मला माहिती आहे निष्पक्ष चौकशी आयोग बसवला जाईल आणि जर असे होणार असेल तर तुम्ही आणि मी आपला निर्णय घोषित करण्याचे थांबवले पाहिजे.

माझे ठाम मत आहे की बिहारच्या हिंदूंनी केलेल्या अपराधात जरी बिहारच्या मंत्रिमंडळाची सुप्त सहानुभूती नसेल तरीही त्यांच्या शासनक्षेत्रात जनतेने जे दुर्वतन केले ती त्यांच्याकरिता लज्जाजनक आणि अपमानास्पद गोष्ट आहे. आणि त्याच्या जबाबदारीतून मला मुक्त करता येत नाही.

'महात्मा गांधी - द लास्ट फेज', खंड १, पुस्तक २, पृष्ठ २४८ आणि २७८

-------------

# ३३४. श्रीकृष्ण वल्लभ सहाय यांना पत्र

काझिरखिल, पोस्ट रामगंज, जिव्हा नोआखाली,

जानेवारी १८, १९४७

प्रिय कृष्ण वल्लभ सहाय,

सोबत मी बॅरिस्टर अली हुसेन यांच्या पत्राची प्रत (बॅरिस्टर अली हुसेन यांनी आपल्या पत्रात दंगली नीट न हाताळल्याबद्दल आणि दंगलखोरांबद्दल नरमाईचे धोरण स्वीकारल्याबद्दल बिहार सरकारवर आणि मंत्र्यांवर टीका केली होती.) आणि माझे उत्तर जोडत आहे. तुमच्या मताबद्दलच्या वृत्तपत्रीय अहवालाबद्दल काय? तुम्हाला चटकन पाहता यावे म्हणून बॅरिस्टरनी पाठवलेले कात्रणही मी सोबत जोडत आहे. कृपाकरून उत्तर पाठवा. तुम्ही मला भेटला होता तेव्हा तुम्ही दिलेल्या आश्वासनाचे काय? सोबत जोडलेले (पत्र) अशा प्रकारचे एकच आहे असे नाही. परंतु इतर गोष्टींचा विचार करून मी तुमच्या काळजीत भर घालू इच्छित नाही.

आशीर्वाद,

बापू (हे हिंदीत आहे.)

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

-----------

# ३३५. प्यारेलाल यांना पत्र

जानेवारी १८, १९४७

चि. प्यारेलाल,

काल तू मला संपूर्ण गठ्ठाच पाठवला. असे करू नको. सर्व काही ईश्वरावर सोड. आपण आपले कर्तव्य करू या आणि बाकी ईश्वरावर सोडू या. तुझ्या पत्रावरून वेगळेच काही वाटते. ते बरोबर आहे असे मला वाटत नाही. मनू फार चिडलेली आहे. ती पुष्कळच प्रयत्न करत आहे. ती दिवसभर काम करत असते. ती प्रत्येक गोष्ट कशी सांभाळू शकेल? तिलासुद्धा ईश्वराच्या इच्छेवर सोडून दे. तिचे पाय आता चांगले आहेत. जो कोणता उपचार तिच्यावर करण्यात आला तो मीच केला आहे. तिच्या आहाराची वगैरे काळजी मी घेत आहे. तू तिला शिकवत राहा. तिच्या आहाराबद्दल तुला काही विशेष सूचना द्यायची असेल तर तसे मला सांग. काही गोष्टी उघड करायला नको ही तुझी वृत्ती कायम असल्याचे दिसते. हा फार मोठा अडथळा आहे. हे बंधन योग्य नाही. मला हे माहीत आहे. याचे पालन करत असताना माझी डायरीसुद्धा खराब झाली आहे, आणि आता ती लिहिणे बंद केले पाहिजे अशी भावना माझ्या माझ्या मनात निर्माण होऊ लागली आहे. आज मी सुशीलाचा लांब पत्रव्यवहार पाठवत आहे. त्यातून तुला काही कल्पना येईल. माझ्याबद्दल बोलायचे तर माझ्या इच्छेविरुद्ध मी तिच्या इच्छेचे पूर्णपणे पालन केले आहे. परंतु ते जाणून घेण्याकरिता अधीर होऊ नकोस. ती तुला सांगेल तेव्हा तुला ते कळेल.

आशीर्वाद,

बापू

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

-------------

# ३३६. अमतुस्सलाम यांना पत्र

जानेवारी १८, १९४७

प्रिय बेटी,

आज तुझे एकही पत्र नाही. सुशीलाने सर्व बातमी दिली. अमतुलने (अमतुस्सलाम यांची पुतणी) लखनौहून तार पाठवली आहे. उत्तरार्थ मी तार पाठवीन. तुला मी सोमवारी साडेआठच्या दरम्यान भेटेन अशी आशा आहे.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५६६

-------------

# ३३७. वार्ताहरांशी चर्चा

जानेवारी १८, १९४७

माझ्या येथील कार्यात जरी मला अपयश आले तरी ते अपयश अहिंसेमुळे आलेले नसेल. ते अपयश माझ्या हिंसेमुळे आलेले असेल.

गांधीजी पुढे म्हणाले की मी इथे माझ्या अहिंसेची परीक्षा घेत आहे.

'अमृत बझार पत्रिका', जानेवारी २०, १९४७

--------------

# ३३८. प्रार्थना प्रवचन

("श्रीरामपूर डायरी"मधून उद्धृत. वृत्त असे आहे : "प्रार्थनेच्या थोड्याच वेळेपूर्वी बादलकोटला जाताना ज्या मुसलमान मित्राच्या घरी गांधीजी थांबले होते तो गांधीजींना म्हणाला की तुमच्यात आणि जिनांमध्ये तडजोड झाली तर देशात शांतता स्थापन होईल.")

बादलकोट,

जानेवारी १८, १९४७

**गांधीजींचे उत्तर होते की मी कोणताही भ्रम मनात ठेवत नसतो आणि माझ्यात कोणतीही उच्च प्रतीची शक्ती नाही. तुम्हांला माहीत असल्याप्रमाणे मी जिनांना अनेकदा भेटलो आहे आणि आमची भेट नेहमीच मैत्रीपूर्ण राहिली आहे. तरीही तुम्हा सर्वांना माहीत आहे की त्या भेटीतून नकारात्मक परिणामच निघाले.**

**गांधीजी म्हणाले की सत्य तर हे आहे की जसे अनुयायी असतील तसा पुढारी असतो. जनतेतील सुप्त आकांक्षा तो अभिव्यक्त करत असतो. ही गोष्ट केवळ हिंदुस्थानातच खरी नाही तर संपूर्ण जगात खरी आहे. यामुळे माझा हिंदू आणि मुसलमान या दोघांनाही सल्ला आहे की आपल्या जीवनाच्या दैनंदिन समस्या सोडवण्याकरिता त्यांनी मुस्लिम लीग, कॉंग्रेस वा हिंदू महा सभा यांच्या तोंडाकडे पाहू नये. त्याकरिता त्यांनी स्वतःकडे पाहिले पाहिजे; आणि तुम्ही जर असे केले तर शेजाऱ्यांशी शांततापूर्ण संबंध असावे अशी जी तुमची इच्छा आहे ती तुमच्या पुढाऱ्यांमधून अभिव्यक्त होईल. राजकीय संस्थांना खास राजकीय प्रश्न सोडवण्याकरिता मोकळे सोडले पाहिजे, परंतु त्यांना आपल्या व्यक्तिगत दैनंदिन प्रश्नांबद्दल काय कळते? तुमचा शेजारी आजारी असेल तर तुम्ही कॉंग्रेस वा लीगकडे पळत जाऊन आता काय करावे असे विचाराल काय? हा विचारच मुळी अकल्पनीय आहे.**

**स्त्रियांची त्वरेने अशिक्षितपणातून सुटका करावी हा श्रीयुत जिनांनी दिलेला सल्ला काल मी उद्धृत केला होता. परंतु गांधीजी म्हणाले की इतके पुरेसे नाही. शिकल्यासवरल्या लोकांची परिस्थिती त्यांच्या शिक्षणामुळे जास्त चांगली आहे काय? गांधीजींनी विचारले की राजकीय जगाच्या विचारांपुढे ते हतबल होत नाहीत काय? इतकी वर्षे हिटलरच्या अधिपत्यात राहिलेल्या जर्मनीकडे पाहिले तर मी काय म्हणतो ते कळेल; आज सर्वांना माहीत आहे की ती दुःखद अवस्था होती. पुस्तकी ज्ञान वा शिक्षण यामुळे माणूस घडत नसतो तर खऱ्या जीवनाकरिता जे शिक्षण असते त्याने माणूस घडत असतो. तुम्हाला जर सर्व काही माहीत असेल परंतु आपल्या शेजाऱ्यांबरोबर भावाभावाप्रमाणे कसे वागावे हे माहीत नसेल तर त्याचा काय उपयोग?**

**गांधीजी पुढे म्हणाले की काही लोकांनी आपल्या शेजाऱ्यांशी वागताना जर गंभीर चूक केली असेल तर त्यांनी पश्चात्ताप व्यक्त करून ईश्वराला माफी मागितली पाहिजे. ईश्वराने जर क्षमा केली आणि मग जगाने जरी क्षमा केली नाही तरी जो माणूस ईश्वरावर अवलंबून असतो त्याच्याकरिता त्यामुळे काहीही फरक पडत नाही; अशी शिक्षा मोठ्या मनाने सहन केल्याने माणूस उन्नत होतो. पैगंबर साहेबांच्या वचनांच्या एका पुस्तकात मी वाचले आहे की माणसाने आपली चूक**

**दुरुस्त केल्याशिवाय कधीही राहू नये. जर त्याने अशा प्रकारे चूक दुरुस्त केली नाही तर न्यायाच्या दिवशी त्याला खुदासमोर उभे केले जाईल आणि त्या वेळी खुदा त्याच्यावर कोणतीही दया करणार नाही.**

**केवळ लिहिणेवाचणे इत्यादी महत्त्वाचे नाही. आपल्या शेजाऱ्यांशी मैत्रीभावाने राहण्याची कला शिकणे महत्त्वाचे आहे. निम्मे लोकसंख्या असलेल्या आपल्या स्त्रियांची अज्ञानाच्या आणि अंधश्रद्धांच्या गुलामगिरीतून तुम्ही सुटका केली पाहिजे. पुरुषांनी एकमेकांशी सहकार्य करून राहायला पाहिजे आणि सर्वांच्या हिताकरिता काम केले पाहिजे. यासाठी मार्गदर्शनाकरिता तुम्ही राजकीय पक्षांकडे पाहण्याची गरज नाही तर तुमच्या स्वतःच्या अंतःकरणाकडे वा ईश्वराकडे पाहिले पाहिजे.**

**गांधीजी म्हणाले की व्यक्तिगत माझ्याबद्दल सांगायचे तर मी या कामाला लागलो आहे. हे काम अपुरे ठेवून देशातील या भागातून मी जिवंत जाणार नाही. मुसलमान बांधवांमधील अविश्वास दूर करण्यात मला यश मिळाले आणि मी वर सांगितलेल्या गोष्टी दैनंदिन जीवनात सर्वात महत्त्वाच्या गोष्टी आहेत हे जर लोकांना कळले तर त्याचा प्रभाव केवळ देशातील केवळ या भागातच जाणवणार नाही, संपूर्ण देशात जाणवेल.**

'हरिजन', फेब्रुवारी २, १९४७

-----------

# ३३९. प्यारेलाल यांना पत्र

जानेवारी १९, १९४७

चि. प्यारेलाल,

तुला सविस्तर लिहिण्याकरिता अगदीच वेळ नाही. आता कामाचे ओझे फार जास्त वाटते आहे. ते कमी करता येईल अशी आशा आहे. तू जसा 'गोपनीय' या शब्दाचा अर्थ लावला आहे तसाच मीसुद्धा लावला आहे. माझे काय कर्तव्य आहे यावर मी चिंतन करत आहे. कनू हवे ते करू शकतो. मनू बरोबर असेल आणि तू बरोबर असशील तर कनूसुद्धा समजून घेऊ शकेल. मनूच्या निर्भयतेला प्रोत्साहन दिले पाहिजे. कोणत्याही परिस्थितीमुळे का होईना तुला जर उपवास करायचाच असेल तर तू तो शनिवारी कर. पूर्णपणे समजूत पटल्यानंतरच तो सोड. मनूला शिकवणे सुरू ठेव. संपूर्णपणे ईश्वराला शरण जाण्यातच कल्याण असते.

आशीर्वाद,

बापू

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

----------

# ३४०. मनू गांधी यांना चिठ्ठी

जानेवारी १९, १९४७

तुला जर गरम पाण्याची आंघोळ सहन होत असेल तर तू तसे का करत नाही? परंतु तुला ते आवडत नसेल तर गोष्ट वेगळी आहे. तुला माझ्याबरोबर सकाळी फिरायला जाणे आवडेल की सायंकाळी की दोन्ही वेळा हे मला कळले तर मला आवडेल. माझा जयसुखलालला लिहिण्याचा विचार आहे. तुझ्याबद्दल मी काही तरी करावे अशी त्याची अपेक्षा आहे. परंतु तू नेहमी घाबरलेली असशील तर मी तुला कसा मदत करू शकेन हे मला कळत नाही.

गुजराती मायक्रोफिल्मवरून. एम. एम. यू. । २३

-------------

# ३४१. अमतुस्सलाम यांना पत्र

जानेवारी १९, १९४७

प्रिय बेटी,

तुझ्याकडून दोन ओळी जरी मला मिळाल्या तरी मला आनंद होतो. अमतुलचा पत्ता स्पष्ट वाचता येत नाही. तो मला उद्या दे. आज रात्री तिथे पोहोचण्याची माझी इच्छा आहे. परंतु तसे शक्य नाही. मला दोन ठिकाणी जायचे आहे आणि इतरही अडचणी आहेत. परंतु ईश्वराची कृपा असेल तर आपण उद्या भेटू.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५६७

------------

# ३४२. प्रार्थना प्रवचन

("श्रीरामपूर डायरी"तून उद्धृत. गांधीजींचे मौन रविवारीच सुरू झालेले असल्यामुळे हे भाषण वाचून दाखवण्यात आले होते.)

अटखोरा,

जानेवारी १९, १९४७

आजकाल मला काहीही जरी सांगायचे असले तरी ते पैगंबरांच्या वचनात आधीच असलेले मला आढळते. यामुळे त्यांच्या वचनातील काही वाक्य मी तुमच्याकरिता निवडले आहेत :

***माणूस स्वतःकरिता जी इच्छा करतो तीच इच्छा तो आपल्या भावांकरिता करत नसेल तर तो खरा मुसलमान नसतो.***

***जो माणूस स्वतःकरिताही काम करत नाही आणि इतरांकरिताही काम करत नाही त्याला ईश्वराचा प्रसाद मिळू शकत नाही.***

***जो माणूस खोट्यावर खोटे बोलत जातो, दिलेले वचन मोडतो आणि त्याच्यावर विश्वास ठेवणाराचा विश्वासघात करतो तो माझा माणूस नसतो तर माझ्याविरुद्ध बंड करणारा असतो.***

***जो त्याच्यावर टाकलेला विश्वास खरा आहे हे सिद्ध करतो आणि आपला शब्द पाळतो तोच खरा मुसलमान असतो.***

***जो खुदाच्या प्राणीमात्रांवर दया करतो त्याच्यावर खुदाही दया करतो.***

***ज्याच्या जिभेमुळे आणि वर्तनामुळे कोणीही दुखावला जात नाही तो परिपूर्ण मुसलमान असतो.***

***शिक्षित वाईट माणूस सर्वात वाईट असतो आणि शिक्षित चांगला माणूस सर्वात चांगला असतो.***

***माणूस जेव्हा व्यभिचार करतो तेव्हा इमान त्याला टाकून देतो.***

***जो व्यभिचार करतो वा चोरी करतो वा मद्यपान करतो, लुबाडतो, अपहार करतो तो मोमीन नसतो; त्याच्यापासून सावध राहा, सावध राहा.***

***सर्वात श्रेष्ठ जिहाद स्वतःवर विजय मिळवणे आहे.***

***ज्या कोणावर जुलूम होत असेल, मग तो मुसलमान असो वा नसो, त्याला मदत करा.***

***रोजे आणि मोहापासून दूर राहूनच माणूस ब्रह्मचारी होऊ शकतो.***

***स्त्री पुरुषाची अर्धांगिनी आहे.***

***ते विद्वान असतात जे काही शिकलेले असतात आणि त्यानुसार आचरण करतात.***

***जगातील सर्वात मूल्यवान गोष्ट सद्गुणी स्त्री असते.***

***तुमच्या पत्नीला चांगला सल्ला द्या; तिच्यात जर चांगुलपणा असेल तर ती त्याचा ताबडतोब स्वीकार करील; व्यर्थ विचार करत बसू नका आणि तुमच्या पत्नीला गुलामाप्रमाणे मारहाण करू नका.*** (यानंतरचा भाग अमृत बझार पत्रिकेतून घेतला आहे.)

***गांधीजी म्हणाले की काही मुसलमानांनी मला विचारले :***

***'सिरंडी येथे उपवास करत असलेली अमतुस्सलाम ही कोण मुसलमान स्त्री आहे?' गांधीजी म्हणाले -***

अमतुस्सलाम ही दीर्घ काळापासून माझ्याबरोबर आहे. ती खरी मुसलमान आहे. तिच्याजवळ नेहमी कुराण शरीफ असते आणि त्याशिवाय ती कधीही नसते. त्याचबरोबर ती गीताही वाचते.

***अमतुस्सलामच्या कुलीन कौटुंबिक इतिहासाची माहिती सांगितल्यानंतर गांधीजी म्हणाले की ही कुलीन स्त्री हिंदू-मुसलमान ऐक्याकरिता मृत्यूशैय्येवर पडलेली आहे.***

***अशा महान कार्यात अमतुस्सलामला यश यावे अशी गांधीजींनी इच्छा व्यक्त केली.***

'हरिजन', फेब्रुवारी ९, १९४७; आणि 'अमृत बझार पत्रिका', जानेवारी २२, १९४७

-----------

# ३४३. मुसलमानांकरिता शपथेचा मसुदा

(प्यारेलाल लिहितात की गांधीजी ज्या दिवशी सिरंडी येथे पोहोचले त्या दिवशी तेथील स्थानिक मुसलमान मोठ्या संख्येत गांधीजींना भेटले आणि त्यांना म्हणाले की आम्ही आमच्याकडून खड्ग शोधण्याकरिता सर्वतोपरी प्रयत्न केला परंतु त्यात आम्हाला यश येऊ शकले नाही. आम्ही कोणते आश्वासन दिले तर अमतुस्सलामचे समाधान होईल आणि त्यांना उपवास सोडण्याकरिता प्रेरित करता येईल? गांधीजींनी त्यांच्याकरिता प्रतिज्ञेचा हा मसुदा तयार केला.)

जानेवारी २०, १९४७

खुदाला साक्षी ठेवून आम्ही शपथपूर्वक घोषणा करतो की आम्ही हिंदू आणि अन्य कोणत्याही समुदायाविषयी वैरभाव ठेवणार नाही. आम्हांला जितका इस्लाम प्रिय आहे तितकाच प्रत्येकाला त्याचा धर्म प्रिय आहे. यामुळे दुसऱ्याच्या धर्मात हस्तक्षेप करण्याचा कोणताच प्रश्न उपस्थित होत नाही. आम्हांला कळले आहे की बीबी अमतुस्सलामचा उद्देश हिंदू-मुसलमानांत ऐक्य निर्माण करण्याचा आहे. या हेतूची पूर्ती या प्रतिज्ञेवर स्वाक्षरी केल्याने होते. यामुळे त्यांनी उपोषण सोडावे अशी आमची इच्छा आहे. (अमतुस्सलामला गांधीजींनी त्या प्रतिज्ञापत्राचा अर्थ समजावून सांगितल्यानंतर त्यांनी आपले उपोषण रात्री ९.३० वाजता सोडले.) आम्हांला माहीत आहे की या बाबतीत मनात आडपडदा ठेवून आम्ही वागलो तर गांधीजींच्या उपोषणाचा आम्हांला सामना करावा लागेल. उरलेल्या तिसऱ्या खड्गाचा शोध घेण्याचा आम्ही प्रयत्न करू

महात्मा गांधी - अखेरचं पर्व. खंड २, पृष्ठ १८९-९०

-------------

# ३४४. वृत्तपत्रांना वक्तव्य

एक पत्रलेखक लिहितो की हिंदू आणि मुसलमान यांच्यातील तणावपूर्ण संबंध संपवायचे असतील तर नागरी आणि उर्दू लिपीच्या ठिकाणी रोमन लिपीचा स्वीकार करणे ही काळाने दिलेली सूचना आहे. विश्वलिपी म्हणून रोमन लिपीचे पुरस्कर्ते अर्थातच आहेत. मला वाटते की असे झाले तर ही एक फार मोठी मानवी शोकांतिका होईल. वेळ वाचवणारी साधने एका मर्यादेपर्यंत चांगली असतात. परंतु त्यांच्यामुळे मानवी संबंधात वितुष्ट येते आणि संयम राहत नाही तेव्हा त्यांना खुळाचे रूप येते. परंतु हे तपासण्याकरिता मी वेळ घालवण्याचे कारण नाही. वैज्ञानिक दृष्टीने परिपूर्ण असलेल्या नागरी लिपीच्या प्रेमींना आणि सौष्ठवपूर्ण उर्दू लिपीच्या प्रेमींना रोमन लिपीचे हे वेड इतक्या सहजपणे मोहवू शकणार नाही. परस्परांबद्दलच्या घृणेमुळे या दोन्ही हिंदुस्तानी लिप्या मोडीत निघू दिल्या जाणार नाहीत इतका सुज्ञपणा या दोन्ही समुदायात असेल काय? परंतु या वादाचा असा सुखद अंत होणार नसेल तर ज्या थोड्याशा वा अनेक लोकांना पवित्र मानवी ज्ञानाबद्दल आदर असेल त्यांनी प्रयत्नपूर्वक या दोन्ही लिप्या शिकाव्या आणि हिंदुस्थानातील भाषा समृद्ध करण्याचा प्रयत्न करावा. हिंदुस्तानीत हिंदू आणि उर्दू या भाषांचे सहजपणे मिलन झाले आहे. प्रांतिक सरकारांनी रोपन लिपीच्या या मोहापासून सावध राहावे. हिंदुस्थान केवळ संस्कृतीचा टीपकागद आहे असे कोणी म्हणू नये.

केथुरी (नोआखाली), जानेवारी [२१], (गांधीजी केथुरीत या तारखेला होते परंतु स्रोतात "२४" तारीख आहे, बहुधा हा मुद्रणदोष आहे.) १९४७,

हरिजन, फेब्रुवारी २, १९४७

-----------

# ३४५. चिमणलाल शाह यांना पत्र

केथुरी,

जानेवारी २१, १९४७

चि. चिमणलाल,

मला तुझे पत्र मिळाले. मधूबद्दल मी समजू शकतो. तिला तिचे स्वातंत्र्य मिळाले याचा आणि न घाबरता ती आश्रमात राहत आहे याचा मला आनंद होतो. या मुलीकडून आपण बरेच काम घेऊ शकतो असे मला आधीपासूनच वाटत होते. सुचवलेल्या पद्धतीप्रमाणे धिरेनची आश्रमात राहण्याची आणि खादीचे काम करण्याची इच्छा आहे. मी त्याला लिहिलेले पोस्टकार्ड वाच. सुचवलेल्या पद्धतीने तो आश्रमात राहिला तर त्यामुळे तुला जर काही अडचण होणार असेल तर नाही म्हणायला संकोच करू नको. तिथे त्याची प्रकृती चांगली राहिली तर मला खात्री आहे की तो फार मेहनत करील. अण्णांना (हरिहर शर्मा) पैसे पाठवण्याबद्दलचे कारण मी समजू शकतो. ते तुझ्याकरिता काळजीचे कारण राहतीलच. जाजूजींनी वा तू माझी काळजी करण्याचे कारण नाही. मी तीन वाजता उठणे बंद केले आहे. मी माझ्या प्रकृतीची सर्व प्रकारे काळजी घेत आहे. दररोज चालण्यामुळेसुद्धा थकवा येतो. परंतु मी माझी प्रकृती राखू शकलो वा ती बिघडली नाही तर मी जगेन असे वाटते. परंतु हे सर्व ईश्वराच्या हातात आहे. त्याला जर माझ्याकडून काही सेवा घ्यायची असेल आणि माझ्या प्रयत्नांना त्याला यश द्यायचे असेल तर तो सर्व अडचणी दूर करील. देव आला तर मी पाहीन.

अमतुल सलामने काल उपवास सोडला. मुसलमानांशी चर्चा करण्यात आम्ही संपूर्ण दिवस घालवला. वरवर पाहिले तर परिणाम चांगला झाला. सर्व काही लेखी घेण्यात आले आहे (पाहा “मुसलमानांकरिता शपथेचा मसुदा”, जानेवारी २०, १९४७). ते तू वर्तमानपत्रांमध्ये वाचशील. तिने फार मोठे साहस आणि सहनशीलता दाखवली आहे.

बापांना आदिवासी कार्याकरिता २५,००० रुपयांचा चेक पाठव. इतक्याच रकमेचा याच खात्यावर एक चेक आधीच पाठवण्यात आलेला आहे. ५०,००० पाठवायचे ठरले होते. या वर्षाकरिता किती पैसे देण्याचे ठरवण्यात आले होते ते मला आठवत नाही. असे असले तरी भविष्यात जो पैसा येईल तो याच खात्यात जमा करण्यात येईल. परंतु आपल्याला पैसा मिळो वा न मिळो माझ्या नावावर जे पैसे आहेत त्यातून आपल्याला वरील रक्कम त्यांना द्यायची आहे. यामुळे ती त्यांना पाठव.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. १०६५७

------------

## ३४६. प्यारेलाल यांना पत्र

जानेवारी २१, १९४७

चि. प्यारेलाल,

मला तुझे पत्र मिळाले. ठीक आहे तू ईश्वराबरोबर चाल चालला आणि उपवास सोडण्याच्या ऐनवेळी ते पाठवले. ...(इथे एक शब्द अस्पष्ट आहे.) ला का नेण्यात आले ते मी समजू शकतो. ते माझ्याजवळ निश्चितच नाही. ब्लॅन्कट पाठवले तर मला मुळीच त्रास होणार नाही असे मी तुला खात्रीपूर्वक सांगतो. मी ते सोबत पाठवत आहे. दूधपावडरने मनूचे काम भागेल. या पत्रासोबत डायरीही जात आहे. तू ती तुझ्या सोयीप्रमाणे परत करू शकतो. मला घाई असण्याचे कारण काय?

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

------------

# ३४७. प्रार्थना प्रवचन

("श्रीरामपूर डायरी"तून उद्धृत)

केथुरी,

जानेवारी २१, १९४७

**बिबी अमतुस्सलामने कोणत्या कारणाने २५ दिवसांचा उपवास केला आणि तो का सोडला हे समजावून सांगत गांधीजी म्हणाले की योगायोगाने सभेत उपस्थित मुसलमान सद्गृहस्थाने खड्या आणि गोड आवाजात अल फतेहा म्हटल्यानंतर काल सायंकाळी साडेनऊ वाजता बिबी अमतुस्सलामने हा उपवास सोडला होता. अब्दुल्ला साहेब आणि त्यांच्या सहाय्यकांसह अनेक मुसलमान मित्र मी शिरंडीत असतानाच हा उपवास संपवता यावा म्हणून दिवसभर प्रयत्न करत होते. ज्या खड्गांकरिता हा उपवास सुरू करण्यात आला होता ते खड्ग अतिशय प्रामाणिक प्रयत्न करूनही मिळू शकले नाही. आणि अमतुस्सलामने ते खड्ग मिळालेच पाहिजे असा आग्रह सुरू ठेवला असता तर तिच्यासमोर जीव गमावण्याशिवाय दुसरा कोणताही उपाय शिल्लक राहिला नसता. परंतु तिला समजावून सांगत मी म्हणालो की खड्ग सापडणे हा काही तुझ्या उपोषणामागील खरा हेतू असू शकत नाही; ते कशाचे तरी प्रतीक असले पाहिजे. मी तिला नंतर म्हणालो की तुझे संपूर्ण जीवन तू हिंदू-मुसलमानांमध्ये अंतःकरणापासून ऐक्य व्हावे म्हणून वाहिलेले आहे. यामुळे तू जिथे राहतेस तिथे जरी हिंदू-मुसलमानांचे खरे ऐक्य होण्याची शक्यता असेल तरी तू उपवास सोडायला पाहिजे.** (यानंतरचा भाग द हिंदूमधून घेतला आहे.)

अशा प्रकारे पूर्ण विचारविनिमय करून लोकांनी कागदावर सह्या केल्या. आपला धर्म सगळ्यांना प्रिय असतो आणि यामुळे विभिन्न लोकांनी एकमेकांच्या धर्माबद्दल सहिष्णुता ठेवली पाहिजे हे तत्त्व त्यामागे मान्य करण्यात आले होते. या उद्देशाची परिपूर्ती करण्याकरिता प्रयत्न करण्याचे सही करणारांनी मान्य केले आहे. स्वाभाविकपणे त्यांनी जर शब्द पाळला नाही तर त्यांना माझ्या उपोषणाला तोंड द्यावे लागेल, हा दस्तावेजाचा अर्थ समजावून सांगितल्यानंतर वरीलप्रमाणे अमतुस्सलाने उपोषण समाप्त करण्याचा निर्णय घेतला आहे.

**सही करणारांना आश्वस्त करत गांधीजींनी सांगितले की दोन समुदायांचे हक्क राखून ठेवण्याकरिता माझ्याकडून शक्य होतील ते प्रयत्न मी करीन आणि त्याचबरोबर तुम्हीसुद्धा तुमच्या वचनाचे पालन कराल अशी मी अपेक्षा करीन.**

**गांधीजी म्हणाले की या दस्तावेजात ज्या क्षेत्राचा उल्लेख आहे त्या क्षेत्रात होणारी प्रत्येक घटना माझ्या नजरेस आणली जाईल अशी माझी अपेक्षा आहे आणि सर्व प्रकारचे वाद मिटवण्याकरिताही मी मदत करीन. गांधीजींनी हिंदू आणि मुसलमान या दोघांनाही सांगितले की मला प्रकरण पोलिसांकडे वा न्यायालयात नेणे आवडत नाही. गांधीजींनी सूचित केले बहुसंख्याक समाजानेच काय अल्पसंख्याक समाजानेही जरी आपल्या वैध हक्कांचा त्याग केला तरी स्थायी शांतता प्रस्थापित होऊ शकत नाही.**

'हरिजन', फेब्रुवारी ९, १९४७ आणि 'द हिंदू', जानेवारी,२३, १९४७

## ३४८. हरिलाल गांधी यांना पाठवलेल्या पत्रातील काही भाग

जानेवारी, २२, १९४७

तू नवजीवनास सुरुवात केली हे पाहून मला किती आनंद झाला ! तुझ्यावर स्नेहपूर्ण प्रेमाचा किती वर्षाव केला याचा विचार कर ! माझी ही यात्रा अतिशय कठीण आहे, शक्य झाले तर तू यात सामील हो.... तू जर स्वतःला पूर्णपणे शुद्ध केले तर तू कुठेही असलास तरी तू यात सामील झाल्यासारखेच होईल. भागवतला साक्ष मानून तू या गोष्टीवर विश्वास ठेव की तुला जे अवेळी म्हातारपण आल्यासारखे दिसते तेसुद्धा यामुळे दूर होईल.

'महात्मा गांधी - द लास्ट फेज', खंड १. पुस्तक २, पृष्ठ १३६ ('महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड २, पृष्ठ १६५)

---------------

## ३४९. अमतुस्सलाम यांना पत्र

सभास्थळावरून,

जानेवारी २२, १९४७

प्रिय बेटी,

मला तुझे पत्र मिळाले. फार घाई करू नको. तू जर हळूहळू चाललीस तर सर्व काही ठीक होईल. तुला जर बकरीचे दूध आवडत असेल तर निश्चितच बकरी ठेव. तू सर्व प्रकारे दुरुस्त व्हावी हीच माझी इच्छा आहे. खोकला थांबायलाच पाहिजे.

आशीर्वाद,

बापू

हिंदू फोटोप्रतीवरून. जी. एन. ५६९

------------

## ३५०. अमतुस्सलाम यांना पत्र

जानेवारी २२, १९४७

प्रिय बेटी,

तुझा उपवास जरी सुटला असला तरी तू मला लिहीत राहावे अशी माझी इच्छा आहे. तुझी हालचाल सुरू झाल्यानंतर आपण पाहू. आशा आहे की तू चांगली असशील. आज सकाळी सुशीला येईल अशी मला अपेक्षा होती, परंतु तिने इतक्या लवकर येऊ नये अशी मी मनातून प्रार्थना करत होतो. तुझ्यामुळे ती मागे थांबली असे मला वाटत नाही.

आशीर्वाद,

बापू

हिंदू फोटोप्रतीवरून. जी. एन. ५६८

------------

## ३५१. अमतुस्सलाम यांना पत्र

जानेवारी २२, १९४७

प्रिय बेटी,

मला तुझे पत्र मिळाले. सुशीलाबेनबद्दल मी समजू शकतो. तुला जी प्रत (मुसलमानांनी सही केलेले प्रतिज्ञापत्र; पाहा “मुसलमानांकरिता शपथेचा मसुदा”,जानेवारी २०, १९४७) हवी आहे ती सोबत जोडली आहे. तुझ्या शुश्रूषेतून मुक्त झाल्यानंतर अमृतलालजीने आभाला परत बोलावले आहे. तुझ्याजवळ असेपर्यंत ती इथे राहील.

आशीर्वाद,

बापू

हिंदू फोटोप्रतीवरून. जी. एन. ५७०

------------

# ३५२. सतीश चंद्र दास गुप्ता यांना पत्र

जानेवारी २२, १९४७

चि. सतीश बाबू,

शांतिपत्रिकेत वार्ताहरांवर जो हल्ला करण्यात आला तो मला आवडला नाही. मी ते वाचले नाही, परंतु त्याला दिलेले उत्तर मी वाचले. त्यांनी मला प्रत पाठवली आहे. चूक झाली असेल तर ती कबूल करणे आपला धर्म आहे.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ८७२३

------------

# ३५३. सैय्यद महमूद यांना पत्र

केथुरी,

जानेवारी २२, १९४७

भाई महमूद,

मला बिहारचे स्पष्ट चित्र द्या. मला तुमच्याकडून सविस्तर माहिती हवी आहे. ज्या मुसलमानांचे सर्व काही बुडाले आहे आता त्यांचे ठीक सुरू आहे काय? जे वाचले त्यांना काही समाधान आहे काय? सर्व काही लिहा.

आशीर्वाद,

बापू

---------------

# ३५४. प्रार्थना प्रवचन

("श्रीरामपूर डायरी"तून उद्धृत. अहवालात लिहिले आहे की "आतापर्यंतच्या सर्व सभांमधील... ही सभा सर्वात मोठी होती.".)

पनियाला,

जानेवारी २२, १०४७

**अखेरीस मला पनियालाला येता आले याचा मला आनंद होतो** (गांधीजींची डिसेंबर महिन्यातच पनियालाला जाण्याची इच्छा होती; पाहा "पनियाला संघाच्या लोकांना संदेश", डिसेंबर २२, १९४६)**. परंतु तितके पुरेसे नाही. हिंदू आणि मुसलमान यांच्यात ऐक्य आणि मैत्री या गोष्टी निर्माण झाल्या तर मला अजूनच आनंद होईल.**

**तुम्हा सर्वांना माहीतच आहे की अमतुस्सलामने याच उद्देशाने उपोषण केले होते आणि तिच्या शेजारपाजारच्या ग्रामवासीयांनी तिला दिलेल्या आश्वासनामुळे बंगालचा चेहरा विद्रूप करणाऱ्या जखमा दुरुस्त करण्याकरिता बरीच मदत होऊ शकते.**

**गांधीजी पुढे म्हणाले की इतक्यात ज्या लोकांच्या कुटुंबांनी दंगलींमध्ये सर्व काही गमावले आहे त्यांची समस्या माझ्या मनाला त्रास देत आहे. असे अनेक कुटुंब आहेत की ज्यांच्यातील कर्ता माणूस गमावला गेला आहे. जिवंत असलेल्या लोकांची काळजी घेणे आवश्यक आहे आणि मुलांना शिक्षण दिले पाहिजे आणि त्यांच्या रक्षणाची पुरेशी व्यवस्था केली पाहिजे. खरे म्हणजे हे सरकारचे कर्तव्य आहे यात काही संशय नाही. परंतु आपण सर्वांना अंतःकरणाचे ऐक्य हवे असेल तर मी आणि तुम्ही यावर अधिक व्यापक दृष्टीकोनातून विचार केला पाहिजे. माझे नम्र मत आहे की मुसलमानांनी जर काही चूक केली असेल तर जवळपास राहणाऱ्या मुसलमानांनी याकरिता योग्य ती व्यवस्था केली पाहिजे.**

**सरकार केवळ शक्तीचा उपयोग करत असते उलट सर्वसामान्य नागरिक एक दुसऱ्याची समजूत घालून परस्परांच्या सहमतीने काम करत असतात. नागरिकांनी माणुसकीचे संबंध स्थापित करून समाजावर आलेल्या या संकटावर मात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शक्तीच्या बळावर उभ्या राहिलेल्या राज्यासारख्या संघटनेवर अशा प्रकारच्या कामाकरिता विसंबून राहता येऊ शकत नाही.**

**यानंतर स्वयंसेवकांचे कर्तव्य आणि कारागिरांचे पुनर्वसन या अजून दोन बाबींचा उल्लेख गांधीजींनी केला. एका प्रकारचे कर्तव्य आणि दुसऱ्या प्रकारचे कर्तव्य असा भेद करू नये असा सल्ला गांधीजींनी स्वयंसेवकांना दिला. कार्यकर्त्यांमध्ये कर्तव्यासंबंधी कोणतीही पसंती असू नये आणि जीवाचे मोल जरी द्यावे लागले तरी त्यांनी आपल्या कर्तव्याच्या ठिकाणाला चिकटून राहिले पाहिजे. अनेक लोक जेव्हा संघटित होऊन काम करतात तेव्हा अनुशासन आणि त्यागाची भावनाच अशा गोष्टी असतात की ज्यामुळे लहान कामसुद्धा मोठे होते. नंतर कारागिरांच्या समस्येसंबंधी गांधीजी म्हणाले की कितीही शुद्ध हेतूने जरी कोणी दान देत असेल तरी सध्याच्या अडचणींवर मात करण्याकरिता त्यांनी मात्र स्वतःच्याच संसाधनांवर अवलंबून राहायला पाहिजे. या संदर्भात गांधीजी म्हणाले की माणूस जे खातो तितके त्याने**

**शारीरिक श्रमाच्या रूपाने समाजाला परत केले नाही तर त्याच्यात आणि चोरात कोणतेही अंतर राहत नसते. जगातील सर्व धर्मशास्त्रात हीच गोष्ट सांगितलेली आहे. समाजातील विभिन्न वर्ग मिळून मिसळून जे श्रम करतील आणि समाज जेव्हा त्याच्या बंधनाने बांधला जाईल तेव्हाच जगात स्थायी शांतता निर्माण होऊ शकेल.** (यानंतर गांधीजींनी मुस्लिम लीगच्या लोकांच्या प्रश्नांना उत्तर दिले.)

**पहिला प्रश्न होता : "तुम्ही म्हणता की मुसलमान बहुसंख्य असलेल्या प्रांतांत आधीच पाकिस्तान आहे. असे म्हणण्याचा तुमचा अर्थ काय आहे?"**

**गांधीजींनी उत्तर दिले की मी जे म्हणालो त्याचा हाच पूर्ण अर्थ आहे. जोपर्यंत बाह्य सत्ता हिंदुस्थानवर शासन करत आहे तोपर्यंत ना तर भारत आहे ना पाकिस्तान. मग शुद्ध गुलामगिरी हेच इथे आपले भवितव्य असते. आणि जर कोणाचे म्हणणे असे असेल की जी कोणती प्रांतिक स्वायत्तता आम्हांला मिळते ती स्वातंत्र्यासारखीच आहे तर त्यांना स्वातंत्र्यात कायकाय समाविष्ट असते हे माहीत नाही असे म्हणावे लागेल. हे खरे आहे की ब्रिटिश सत्ता निश्चितपणे जाणार आहे. परंतु तुम्ही जर तुमची भांडणे मिटवली नाही आणि रक्तपात करत राहिला तर काही विदेशी शक्ती मिळून तुम्हांला गुलामगिरीत अडकवून ठेवतील. हिंदुस्थानसारखा विशाल लोकसंख्येचा देश, इतकी साधनसंपत्ती असलेला देश अंतर्गत दंगलींमध्ये जर बरबाद झाला तर देश ते सहन करू शकणार नाही. जगातील प्रत्येक देशाला इतर देशाच्या कल्याणाची दृष्टी ठेवून जगावे लागत असते. कूपमंडूक वृत्तीने राहण्याचे दिवस आता गेले आहेत. काँग्रेसने अहिंसक असहकारचे धोरण संपूर्ण देशाकरिता अंगिकारले होते त्यापूर्वी म्हणजे १९२० पूर्वी सर अब्बास तैय्यबजींच्या अध्यक्षतेखाली असहकाराचा प्रस्ताव मंजूर झालेला होता. त्या वेळी मी म्हणालो होतो की ब्रिटिश सत्तेचे जोखड आपल्या खांद्यावरून उचलून फेकण्याचे कोणत्याही प्रांताला स्वातंत्र्य आहे. कल्पना करा की मी सांगितलेल्या मार्गाप्रमाणे जर पूर्ण बंगाल स्वतंत्र झाला असता तर बंगालमध्ये माझ्या व्याख्येप्रमाणे पूर्ण पाकिस्तान स्थापन होईल. इस्लामचा अर्थ संपूर्ण लोकशाही आहे. यामुळे माणूस कोणत्याही धर्माचा असला तरी एका माणसाला एका मताचा आणि एका स्त्रीला एका मताचा अधिकार मिळेल. यामुळे स्वाभाविकपणेच काही प्रांतांत मुसलमानांचे खरे बहुमत होईल. पाकिस्तानमध्ये अल्पसंख्याकांची परिस्थिती शक्य झाले तर बहुसंख्याकांपेक्षाही चांगली असेल असे जिना साहेबांनी घोषित केले नव्हते काय? याचा अर्थ पाकिस्तानमध्ये लहानमोठ्याचा प्रश्नच उपस्थित होणार नाही.** (पुढील परिच्छेद द हिंदूमधून घेतला आहे.)

**गांधीजी ठामपणे म्हणाले की केवळ गुणाच्या आधारावर असे कोणतेही राज्य स्थापन झाले व त्यात सत्य आणि न्याय यांच्यावर जोपर्यंत भर दिला जाईल तोपर्यंत त्याच्यावर कोणीही आक्षेप घेऊ शकणार नाही, मग त्याला पाकिस्तान म्हणा की अजून काही नाव द्या. मुसलमानांना जर वाटत असेल की त्यांच्या कल्पनेतील पाकिस्तानमध्ये केवळ मुसलमानांनाच राहू दिले जाईल तर असे करणे गैरइस्लामी होईल असे म्हणणे भाग आहे. सहिष्णुता आणि इतर धर्मांना सहन करणे या मूलभूत तत्त्वांवर इस्लाम आधारलेला आहे. जर एखाद्या व्यक्तीने, मग ती हिंदू असो, मुसलमान असो वा ख्रिश्चन असो वा इतर धर्माची असे, तिने जर ही मूलभूत तत्त्वे नाकारली तर त्यामुळे त्या व्यक्तीचे पतन होईल, त्या धर्माचे**

**नाही. पाकिस्तानचा यापेक्षा काही वेगळा अर्थ असेल तर तो मला माहीत नाही; आणि जर तसा काही अर्थ असेल तर माझ्या माहितीप्रमाणे माझ्या विवेकाला तो पटणारा नसेल.**

**दुसरा प्रश्न होता : "तुमच्या अहिंसेने बिहारमध्ये कसे काम केले?"**

**गांधीजी म्हणाले की तिने मुळीच काम केले नाही. परंतु जबाबदार सूत्रांकडून मिळालेल्या बातम्यांवर विश्वास ठेवायचा तर बिहार सरकार तिथे पूर्ण नुकसानभरपाई देण्याचा प्रयत्न करत आहे, आणि तेथील मोठ्या जमावाने प्रांतातील काही भागात केलेल्या घृणित आणि अत्याचारी कृत्यांच्या पाशवीपणाची जाणीव बिहारमधील सर्वसामान्य लोकांनासुद्धा झाली आहे.**

**लोकांच्या पुनर्वसनाच्या कामात आम्ही कोणताच कसूर करणार नाही असे वचन देण्याकरिता बिहारचे एक मंत्री बिहार सरकारतर्फे आले होते. गांधीजी म्हणाले की मला पत्रे आणि मुस्लिम लीगने मंजूर केलेल्या ठरावांच्या प्रती मिळत आहेत आणि ज्या प्रकरणांची तुम्ही चर्चा करून राहिला आहा त्यांच्याशी मी परिचित आहे. बिहार सरकारचे लक्ष वेधण्याकरिता आणि त्याची चौकशी करण्याकरिता मी प्रत्येक प्रकरण बिहार सरकारकडे पाठवले आहे. गांधीजी म्हणाले की बिहारमध्ये घडलेल्या घटनांची सविस्तर चौकशी करण्याकरिता एक निष्पक्ष लवाद नेमण्याची सूचना मी केली आहे आणि बिहार सरकारने त्या लवादाच्या सूचनांचे पूर्णपणे पालन करण्याचे अभिवचन दिले आहे.** (हा परिच्छेद 'द हिंदू'मधून घेतला आहे.)

**तिसरा प्रश्न होता : "आसाम सरकारने बंगाली लोकांना बाहेर काढले असताना तुम्ही यावर मौन का पाळले आहे?"**

**गांधीजी म्हणाले की मी जाणूबुजून मौन धारण केलेले नाही. हा प्रश्न माझ्याकरिता नवीन नाही. मागे मी आसामला भेट दिली होती तेव्हा माझ्या कार्यक्रमात या प्रश्नाचा समावेश करण्यात आलेला होता. जोपर्यंत माझी माहिती आहे आसाम सरकारचा त्या लोकांवर आक्षेप आहे ज्यांनी आसाम सरकारच्या परवानगीशिवाय आसामच्या विविध भागात वास्तव्य केले आहे.** (या परिच्छेदातील उर्वरित भाग 'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड'मधून घेतला आहे.) **काही वर्षांपूर्वी मी जेव्हा आसाममध्ये गेलो होतो तेव्हा मला त्या भागात नेण्यात आले होते जिथे मैमनसिंग येथील मुसलमानांनी वास्तव्य केले होते व त्यांनी तेथील रिकामी जमीन ताब्यात घेतली होती. कोणत्याही व्यक्तीला आपल्या प्रां ातातील वा दुसऱ्या प्रांतातील रिकामी जमीन बळकावण्याचा अधिकार नाही असे मत मी त्या वेळी दिले होते व ते माझे मत अजूनही कायम आहे.**

**माझ्याकरिता हा प्रश्न हिंदू मुसलमानांचा नाही. मी जे म्हणालो ते सर्वत्र लागू होणारे आहे. आसामने जर कायदेशीर मालकांना हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला असता तर त्यांनी मानवतेविरुद्ध अपराध केला असता. परंतु मी जे ऐकले आहे ते अगदी याविरुद्ध आहे. परंतु हा प्रश्न जर बेकायदेशीरपणे हुसकावून लावण्याचा असेल तर आसाम सरकार काही कायद्याच्या वर नाही. अशा प्रसंगी बंगाल सरकारकरिता निष्कासित बंगाली लोकांना, जे दुर्भाग्यवश मुसलमान आहेत, मदत करण्याचा मार्ग मोकळा आहे.**

गांधीजी म्हणाले की या मित्रांना काही वेगळी गोष्ट सांगायची असेल तर ती ऐकण्याकरिता मी तयार आहे. जास्तीतजास्त बिहारप्रमाणेच आसाम सरकारला या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याकरिता निष्पक्ष चौकशी आयोग स्थापन करण्याचा सल्ला मी देऊ शकतो. खरी गोष्ट तर ही आहे की मागील आसाम सरकारने जे धोरण आखले होते तेच धोरण आसाम सरकार पुढे चालवत आहे. (हा परिच्छेद 'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड'मधून घेतला आहे.)

पुढील प्रश्न होता : "तुमच्या मते सांप्रदायिक दंगलीचे कारण काय?"

गांधीजी म्हणाले की माझ्या मताप्रमाणे हा दोन्ही समाजांचा मूर्खपणा आहे. (पुढील परिच्छेद 'द हिंदू'मधून घेतला आहे.)

गांधाजी म्हणाले की एक पक्ष अहिंसक आणि प्रामाणिक असला तर दुसरा कोणताही पक्ष एकटाच दंगल घडवून आणू शकत नाही. मुंबई आणि इतर ठिकाणी झालेल्या दंगलींचा उल्लेख करत गांधीजी म्हणाले की "डोळ्याकरिता डोळा आणि दाताकरिता दाताचे" धोरण या ठिकाणी निर्घृणपणे अवलंबिण्यात आले होते. एके दिवशी एका मुसलमानाला भोसकण्यात आल्याचे आढळले तर दुसऱ्या दिवशी एका हिंदूला भोसकण्यात आल्याचे आढळले. गांधीजींनी विचारले की याला दुसरे काय नाव आहे. हाच दृष्टिकोन सांप्रदायिक दंगलींमागे आहे. गांधीजींनी विचारले:

आपण एकाच भूमीचे पुत्र आहो आणि आपले मूळ एकच आहे. माझा कोणी भाऊ जर मला एखादे हीन कृत्य करण्याकरिता प्रेरित करत असेल तर मी त्याला बळी का पडावे? जर धर्मपरिवर्तनाकरिता कोणी बळजबरी करत असेल वा तो एखाद्या स्त्रीचा विनयभंग करत असेल तर त्याने अथवा तिने त्या पाशवी शक्तीला शरण का जावे?

गांधीजी म्हणाले की अशा पाशवी शक्तीचा अहिंसक विरोध करत असताना मरण पत्करणे हाच आपला धर्म आहे. अहिंसक लोक शरण येण्याऐवजी मरण पत्करतात हे पाहून दुराचारी किती दिवस आपले हिंसक कृत्य सुरू ठेवील? गांधीजींच्या मताप्रमाणे वेडाचा अंत करण्याचा उपाय बदला नाही. केवळ अहिंसाच हिंसेचा प्रतिकार करू शकते. ही सुप्त हिंसाच सांप्रदायिक दंगलींच्या मुळाशी असते.

पाचवा प्रश्न होता : "केंद्रात शांतता स्थापित झाल्याशिवायच नोआखालीत शांतता स्थापन करण्यात तुम्हांला यश येऊ शकेल असे तुम्हाला वाटते काय?"

गांधीजींनी उत्तर दिले की केंद्राचा तुमचा अर्थ मुस्लीम लीगचे अध्यक्ष जिना साहेब आणि भारतीय रष्ट्रीय कॉंग्रेसचे अध्यक्ष आचार्य कृपलानी असा असेल तर माझे स्पष्ट मत आहे की नोआखालीतील हिंदू आणि मुसलमानांमध्ये चांगले संबंध निर्माण होण्याकरिता अशा प्रकारच्या कराराची आवश्यकता नाही. जोपर्यंत मला माहीत आहे ना तर कॉंग्रेसच्या अध्यक्षांना ना मुस्लिम लीगच्या अध्यक्षांना हिंदू आणि मुसलमान यांच्यात बेबनाव व्हावा अशी इच्छा आहे. त्यांचे भांडण राजकीय आहे. परंतु बंगाल, बिहार वा इतर ठिकाणी ज्या दंगली झाल्या त्याचे कारण मूर्खपणा आहे आणि त्यामुळे आपल्या राजकीय प्रगतीत अडथळा निर्माण होतो. यामुळे मला वाटते की नोआखालीतील हिंदू आणि मुसलमानांनी माणसासारखे वागणे आणि आपसात शांततापूर्ण संबंध स्थापित करणे आवश्यक आहे.

**शेवटचा प्रश्न होता : "नोआखालीत हिंदूंचे आणि हिंदूंच्या मालमत्तेचे रक्षण खरोखर कोणी केले असे तुम्हाला वाटते? मुसलमान शेजाऱ्यांनी त्यांना वाचवले असे तुम्हाला वाटते काय?"**

**या प्रश्नामागे सुप्त अहंकार आहे. आज तर याकरिता नम्रता आणि पश्चात्तापाच्या भावनेची गरज आहे. आणि नोआखालीत असे अनेक मुसलमान आढळू शकतील की ज्यांची डोकी इतकी फिरली होती की त्यांनी लूट, जाळपोळ, खून आणि बळजबरीने धर्मांतर इत्यादी प्रकार केले होते. याहून अजून खोडसाळपणा झाला नाही याकरिता ईश्वराचे आभार मानावे लागतील, माणसाचे नाही. याचबरोबर गांधीजी म्हणाले की मी मोकळेपणाने मान्य करतो की असेही काही मुसलमान होते की ज्यांनी हिंदूंचे रक्षण केले आणि याकरिता ते सन्मानाकरिता पात्र आहेत.**

'हरिजन', फेब्रुवारी २, १९४७; 'द हिंदू', जानेवारी २५, १९४७; आणि 'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', जानेवारी २५, १९४७

-------------

# ३५५. प्यारेलाल यांना पत्र

जानेवारी २३, १९४७

चि. प्यारेलाल,

मला तुझे पत्र मिळाले.

एकही नवीन माणूस नको. रामचंद्र एकाएकी आला आणि मला त्याला परतून लावणे आवडले नाही. परशुरामचा आग्रह होता. तो थांबला. आता तो गेला परंतु त्यामुळे काही बिघडले नाही. मनूला हवी असलेली मदत मिळते आहे. तिने समस्या सोडवणे शिकायला पाहिजे. नवीन व्यक्तीचा तिच्या शिक्षणात अडथळा येईल. याशिवाय शक्यतोवर आपण बंगाली माणूसच ठेवला पाहिजे. तेच योग्य होईल. आता हा नवीन माणूस जर चांगला निघाला तर त्याला प्रशिक्षण दे. माझ्याकडे कोणालाही पाठवू नको. जीवनजीबरोबर परशुराम असो वा नसो आपल्याला तसे गृहीत धरावे लागेल. हे मला पटत नाही. त्याची जागा माझ्याबरोबर असू शकत नसेल तर तो निश्चितच स्वतंत्र आहे. हा मुद्दा समजून घेतला पाहिजे. तुला जर तो कळला नसेल तर तो समजून सांगण्याकरिता आता वेळ नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

----------------

# ३५६. सतीश चंद्र दास गुप्ता यांना पत्र

जानेवारी २३, १९४७

चि. सतीश बाबू,

प्यारेलालकडून भोपाळ बाबूंना हटवण्यात आले आहे. त्यांच्या ठिकाणी कामाची माहिती असलेला कोणी देण्यात आलेला नाही काय? येथील काम अर्थातच प्रचंड आहे. स्पष्ट आहे की या सर्व गोष्टी सांभाळणे हे प्रचंड काम आहे. शरीर सांभाळून काम करा.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ८७२१

------------------

# ३५७. प्रार्थना प्रवचन

("श्रीरामपूर डायरी"मधून उद्धृत)

डाल्टा,

जानेवारी २३, १९४७

गांधीजी म्हणाले की ही सभा होत असलेली जमीन येथील चौधरींनी मला देण्याचा निर्णय घेतला आहे. चौधरींच्या या उदारपणाकरिता ते अभिनंदनास पात्र आहेत. मला देण्यात आलेली ही जमीन जातीचा वा पक्षाचा भेदभाव न करता कोणालाही वापरता येईल याशिवाय मला देण्यात आलेल्या या जमिनीला विशेष कोणताही अर्थ नाही. यामुळे याबद्दलची कागदपत्रे नीट करण्यात येतील. आशा आहे की देणगीदार या देणगीमागील उद्दिष्टाचे पूर्णपणे पालन करील. दुसरी अभिनंदनीय गोष्ट ही आहे की आज मी रायमोहन माळी यांच्या घरी थांबलो आहे. मी स्वतःला कोणत्याही जातीचा मानत नाही. मी स्वतःला हिंदू जातीव्यवस्थेच्या अगदी तळातील जातीचा सदस्य समजतो. खरे म्हणजे वास्तवात कोणीही उच्च श्रेणीचा नसतो आणि कनिष्ठ श्रेणीचाही नसतो. कायद्यात ज्याप्रमाणे सर्व लोकांना समान मानलेले आहे तसेच ईश्वराच्या दृष्टीतसुद्धा सर्व लोक समान असतात. आनंदाची गोष्ट ही आहे की ही गोष्ट नेताजींच्या जयंतीला होत आहे. नेताजींच्या वाढदिवशी चौधरींनी ही भेट द्यावी आणि राज मोहन माळी या अनुसूचित जातीच्या सदस्याने मला आपल्या घरी राहण्याकरिता जागा द्यावी हा किती सुंदर योगायोग आहे? माझ्या मते नेताजींनी सर्व प्रकारचे जातिभेद आणि वर्गभेद नाहीसे केले ही त्यांची सर्वात महान आणि चिरंतन सेवा आहे. ते केवळ हिंदू नव्हते, केवळ बंगालीही नव्हते; ते स्वतःला कधीही उच्चवर्णीय हिंदू समजत नव्हते. ते आदीपासून अंतापर्यंत हिंदुस्थानी होते. इतकेच नाही तर त्यांच्याअंतर्गत काम करणारांमध्येही त्यांनी हीच भावना निर्माण केली. यामुळे तेसुद्धा सर्व प्रकारचे भेदाभेद विसरले आणि एक माणूस म्हणून ते काम करत होते.

नेतांजींनी अजूनही किती तरी अभिनंदनीय गोष्टी केलेल्या आहेत. देशाकरिता त्यांनी मोठी नोकरी सोडली आणि दिवंगत देशबंधू चित्तरंजन दास यांच्याबरोबर ते काम करू लागले. त्यांनी अनेकदा कारावास भोगला, दोनदा ते भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष झाले आणि अखेरीस बंगाल सरकारने नेमलेल्या पहारेकऱ्यांच्या हातावर तुरी ठेवून अपल्या चातुर्याच्या बळावर ते काबूलला पोहोचले. युरोपमधील किती तरी देशांचा प्रवास करत ते अखेरीस जपानला पोहोचले. विखुरलेल्या लोकांना गोळा करून त्यांनी एक सैन्य तयार

केले. त्यात हिंदुस्थानातील वेगवेगळ्या भागातील व जातिसमुदायातील प्रतिभाशाली लोक होते. त्यांनी शक्तिशाली सरकारला लढा दिला. नेताजींच्या ठिकाणी दुसरा कोणी किंचतही कमी प्रतीचा माणूस असता तर नेताजींना ज्या परिस्थितीतून जावे लागले त्या परिस्थितीत तो तुटून गेला असता; परंतु नेताजींनी आपल्या जीवनातून "समरथको नही दोष गुसाई" हे तुलसीदासांचे वचन सिद्ध करून दाखवले.

भाषणाचा अंत करत गांधीजी म्हणाले की हिंदूंनी जातिपातीचे भेद विसरून पुढे जायला पाहिजे आणि दोन्ही समुदायांनी हृदयाचे ऐक्य विकसित करायला पाहिजे. गांधीजी म्हणाले की मला महम्मद पैगंबर यांचे एक वचन आठवते. ते म्हणतात की अंतिम निवाड्याच्या दिवशी माणूस ओठांनी काय बोलतो हे पाहिले जाणार नाही तर तो कसे आचरण करतो हे पाहिले जाईल, त्याला मिळालेल्या शिकवणुकीचा त्याने काय उपयोग केला हे पाहिले जाईल.

'हरिजन', फेब्रुवारी ९, १९४७

------------

# ३५८. प्यारेलाल यांना पत्र

जानेवारी २३, १९४७

चि. प्यारेलाल,

मला तुझे पत्र मिळाले.

एकही नवीन माणूस नको. रामचंद्र एकाएकी आला आणि मला त्याला परतून लावणे आवडले नाही. परशुरामचा आग्रह होता. तो थांबला. आता तो गेला परंतु त्यामुळे काही बिघडले नाही. मनूला हवी असलेली मदत मिळते आहे. तिने समस्या सोडवणे शिकायला पाहिजे. नवीन व्यक्तीचा तिच्या शिक्षणात अडथळा येईल. याशिवाय शक्यतोवर आपण बंगाली माणूसच ठेवला पाहिजे. तेच योग्य होईल. आता हा नवीन माणूस जर चांगला निघाला तर त्याला प्रशिक्षण दे. माझ्याकडे कोणालाही पाठवू नको. जीवनजीबरोबर परशुराम असो वा नसो आपल्याला तसे गृहीत धरावे लागेल. हे मला पटत नाही. त्याची जागा माझ्याबरोबर असू शकत नसेल तर तो निश्चितच स्वतंत्र आहे. हा मुद्दा समजून घेतला पाहिजे. तुला जर तो कळला नसेल तर तो समजून सांगण्याकरिता आता वेळ नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

----------------

# ३५९. सतीश चंद्र दास गुप्ता यांना पत्र

जानेवारी २३, १९४७

चि. सतीश बाबू,

प्यारेलालकडून भोपाळ बाबूंना हटवण्यात आले आहे. त्यांच्या ठिकाणी कामाची माहिती असलेला कोणी देण्यात आलेला नाही काय? येथील काम अर्थातच प्रचंड आहे. स्पष्ट आहे की या सर्व गोष्टी सांभाळणे हे प्रचंड काम आहे. शरीर सांभाळून काम करा.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ८७२१

------------------

# ३६०. प्रार्थना प्रवचन

("श्रीरामपूर डायरी"मधून उद्धृत)

डाल्टा,

जानेवारी २३, १९४७

गांधीजी म्हणाले की ही सभा होत असलेली जमीन येथील चौधरींनी मला देण्याचा निर्णय घेतला आहे. चौधरींच्या या उदारपणाकरिता ते अभिनंदनास पात्र आहेत. मला देण्यात आलेली ही जमीन जातीचा वा पक्षाचा भेदभाव न करता कोणालाही वापरता येईल याशिवाय मला देण्यात आलेल्या या जमिनीला विशेष कोणताही अर्थ नाही. यामुळे याबद्दलची कागदपत्रे नीट करण्यात येतील. आशा आहे की देणगीदार या देणगीमागील उद्दिष्टाचे पूर्णपणे पालन करील. दुसरी अभिनंदनीय गोष्ट ही आहे की आज मी रायमोहन माळी यांच्या घरी थांबलो आहे. मी स्वतःला कोणत्याही जातीचा मानत नाही. मी स्वतःला हिंदू जातीव्यवस्थेच्या अगदी तळातील जातीचा सदस्य समजतो. खरे म्हणजे वास्तवात कोणीही उच्च श्रेणीचा नसतो आणि कनिष्ठ श्रेणीचाही नसतो. कायद्यात ज्याप्रमाणे सर्व लोकांना समान मानलेले आहे तसेच ईश्वराच्या दृष्टीतसुद्धा सर्व लोक समान असतात. आनंदाची गोष्ट ही आहे की ही गोष्ट नेताजींच्या जयंतीला होत आहे. नेताजींच्या वाढदिवशी चौधरींनी ही भेट द्यावी आणि राज मोहन माळी या अनुसूचित जातीच्या सदस्याने मला आपल्या घरी राहण्याकरिता जागा द्यावी हा किती सुंदर योगायोग आहे? माझ्या मते नेताजींनी सर्व प्रकारचे जातिभेद आणि वर्गभेद नाहीसे केले ही त्यांची सर्वात महान आणि चिरंतन सेवा आहे. ते केवळ हिंदू नव्हते, केवळ बंगालीही नव्हते; ते स्वतःला कधीही उच्चवर्णीय हिंदू समजत नव्हते. ते आदीपासून अंतापर्यंत हिंदुस्थानी होते. इतकेच नाही तर त्यांच्याअंतर्गत काम करणारांमध्येही त्यांनी हीच भावना निर्माण केली. यामुळे तेसुद्धा सर्व प्रकारचे भेदाभेद विसरले आणि एक माणूस म्हणून ते काम करत होते.

नेतांजींनी अजूनही किती तरी अभिनंदनीय गोष्टी केलेल्या आहेत. देशाकरिता त्यांनी मोठी नोकरी सोडली आणि दिवंगत देशबंधू चित्तरंजन दास यांच्याबरोबर ते काम करू लागले. त्यांनी अनेकदा कारावास भोगला, दोनदा ते भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष झाले आणि अखेरीस बंगाल सरकारने नेमलेल्या पहारेकऱ्यांच्या हातावर तुरी ठेवून अपल्या चातुर्याच्या बळावर ते काबूलला पोहोचले. युरोपमधील किती तरी देशांचा प्रवास करत ते अखेरीस जपानला पोहोचले. विखुरलेल्या लोकांना गोळा करून त्यांनी एक सैन्य तयार

केले. त्यात हिंदुस्थानातील वेगवेगळ्या भागातील व जातिसमुदायातील प्रतिभाशाली लोक होते. त्यांनी शक्तिशाली सरकारला लढा दिला. नेताजींच्या ठिकाणी दुसरा कोणी किंचतही कमी प्रतीचा माणूस असता तर नेताजींना ज्या परिस्थितीतून जावे लागले त्या परिस्थितीत तो तुटून गेला असता; परंतु नेताजींनी आपल्या जीवनातून “समरथको नही दोष गुसाई” हे तुलसीदासांचे वचन सिद्ध करून दाखवले.

भाषणाचा अंत करत गांधीजी म्हणाले की हिंदूंनी जातिपातीचे भेद विसरून पुढे जायला पाहिजे आणि दोन्ही समुदायांनी हृदयाचे ऐक्य विकसित करायला पाहिजे. गांधीजी म्हणाले की मला महम्मद पैगंबर यांचे एक वचन आठवते. ते म्हणतात की अंतिम निवाड्याच्या दिवशी माणूस ओठांनी काय बोलतो हे पाहिले जाणार नाही तर तो कसे आचरण करतो हे पाहिले जाईल, त्याला मिळालेल्या शिकवणुकीचा त्याने काय उपयोग केला हे पाहिले जाईल.

‘हरिजन’, फेब्रुवारी ९, १९४७

------------

# ३६१. जे. सी. कुमारप्पा यांना पत्र

काझिरखिल, पोस्ट रामगंज, जिल्हा नोआखाली,

जानेवारी २४, १९४७

प्रिय कुमारप्पा,

माझी मालीश सुरू असतानाच ज्यांचा माझ्याशी अतिशय निकटचा संबंध आहे त्यांच्याबद्दल पत्र लिहिण्याकरिता मी काही मिनीट देऊ इच्छितो. काल मी आर्यनायकम यांना लिहिले होते. आज तुझी पाळी आहे.

गावातील कामाची प्रगती कशी आहे? परस्पर संबंधित सर्व कामांचा आपसात समन्वय करण्यात आला आहे काय? वा त्यात अजूनही काही विसंगती आहे? मी इथे जे काम करतो आहे ते आतापर्यंतच्या सर्व कामातील अतिशय कठीण काम आहे आणि मला माहीत आहे की जे लोक देशहिताकरिता काम करत आहेत त्यांचा येथील कामात प्रभावी सहभाग आहे. तुझ्या वाट्यावर आलेल्या ग्रामोद्धाराच्या कार्याची इथे करण्यात येत असलेल्या कार्यात कदाचित सर्वात अधिक मदत होईल. त्याचबरोबर गावोगावी पायी हिंडत असताना मी येथील ग्रामीणांसमोर ग्रामसफाई, चरख्यावर सूतकताई, विणाई, त्या त्या गावाकरिता उपयुक्त अशी हस्तकला इत्यादी गोष्टी ठेवत असतो. माझ्या हेही लक्षात येते की हे फार कठीण काम आहे. ते ऐकतात, मान डोलवतात, कबूल करतात परंतु त्यापलीकडे ते जात नाहीत. यात भर पडते ती स्थानिक मतभेदांची आणि दंगलींची. भारतन (जे. सी. कुमारप्पा यांचा भाऊ) काय करतो? त्याची जागा कोणी घेतली? तुला फार काम करावे लागते काय? तुझा रक्तदाब कसा आहे?

स्नेह,

बापू

इंग्रजी फोटोप्रतीवरून.जी. एन. १०१८६

----------------

# ३६२. महम्मद तैय्यबुल्ला यांना पत्र

(महम्मद तैय्यबजींनी लिहिलेल्या पत्राच्या उत्तरात हे पत्र होते. आसामसंबंधी काँग्रेसने मंजूर केलेल्या ठरावाबद्दल त्यात असमाधान व्यक्त करण्यात आले होते, व गांधींजींना त्यासंबंधात मार्गदर्शनाची विनंती करण्यात आली होती.)

काझिरखिल, पोस्ट रामगंज, जिल्हा नोआखाली,

जानेवारी २४, १९४७

चि. तैय्यबजी (अध्यक्ष आसाम प्रांतिक काँग्रेस कमेटी),

मला तुमचे अगदी अलीकडचे पत्र मिळाले. आसामच्या लोकांनी इतके घाबरण्याचे कारण मला कळू शकत नाही. भीतीच अशी गोष्ट असते की ज्यामुळे माणसाची बुद्धी काम करत नाही, आणि जेव्हा मोठ्या संख्येतील लोक भयग्रस्त होतात तेव्हा तर विशेषत्वाने असे होते. काँग्रेसने मंजूर केलेला ठराव (पाहा परिशिष्ट "अखिल भारतीय काँग्रेस कमेटीचा ठराव".) जर वर्तमानपत्रात बरोबर आला असेल तर तो आसामला जरी मार्गदर्शन करत नसेल तरी त्या ठरावानुसार आसामच्या जनतेने आपल्या विधानसभेच्या माध्यमातून जी इच्छा घोषित केली आहे तिच्या विपरीत काहीही करण्याची आसामवर सक्ती केली जाणार नाही असे असल्यामुळे तो ठराव आसामला बरेच काही देतो. दुसरी गोष्ट म्हणजे पुढे घटनाक्रम कोणते वळण घेतो हे स्वाभाविकपणेच आसामला पाहावे लागेल व प्रसंगानुरूप आसामला वागावे लागेल. आधीच कोणती तरी कृती करणे योग्य होणार नाही. आसामच्या घटनेच्या स्वायत्त स्वरूपाला धक्का लागेल असे काही आसामने करायला नको. याबद्दल कोणाच्याही मनात संशय असायला नको. मी जे लिहिले ते स्पष्टपणे सर्व काही तुमच्या लक्षात आले नसेल तर त्याकरिता तुम्ही मला परत स्पष्टपणे लिहू शकता.

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

----------------

# ३६३. प्रेमा कंटक यांना पत्र

डाल्टा,

जानेवारी २४, १९४७

चि. प्रेमा,

मी तुझे पोस्टकार्ड जपून ठेवले आहे. दुसऱ्या गावात जात असताना मी हे रस्त्यात लिहीत आहे. सुशीलाने बरोबर संक्रांतीच्या दिवशी (जानेवारी १४, १९४७ला) तिळगुळ वाटला. मीसुद्धा माझा वाटा घेतला. शंकररावनी मला धोतरसुद्धा दिले. मी ते नेसलोसुद्धा. तुला जेव्हा यायला वेळ मिळेल तेव्हाच आपली भेट होईल. परंतु मी तुला एक गोष्ट सांगतो. तू हा त्रास घेऊ नको. हा पैसा वाचव आणि तुझे कर्तव्य करत राहा. असे करणे हाच या यज्ञातील तुझा सहभाग होईल. तुला तिथे थांबून जे मिळेल ते इथे येऊन मिळणार नाही. परंतु तुला योग्य वाटेल तसे कर. तू शांत असशील अशी आशा आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. १०४५१. शिवाय सी. डब्ल्यू. ६८९०. सौजन्य - प्रेमा कंटक

----------------

# ३६४. शारदा गो. चोखावाला यांना पत्र

मुरियाम,

जानेवारी २४, १९४७

चि. बबुडी,

कताई करत असताना मी या पत्राचा मजकूर सांगत आहे. दुसरा कोणताही मार्ग नाही. दररोज आपले घर बदलत राहणे ही काही सोपी गोष्ट नाही. गोरधनदासच्या इच्छेप्रमाणे वागणे यातच तुझे हित आहे अशी माझी खात्री पटली आहे. त्याची वेगळी काही इच्छा असेपर्यंत तू सुरतमध्येच राहायला पाहिजे. तो जे काही मिळवील त्यावर तू भागवले पाहिजे हे जे त्याचे म्हणणे आहे ते एका दृष्टीने बरोबर आहे. परंतु दुसऱ्या दृष्टीने पाहिले तर हे न्याय्य नाही. मी जी काही व्यवस्था करीन ती अपरिहार्यपणे मर्यादा आणि विवेकाच्या सीमेतच असणार आहे. यामुळे तुला त्यांचा स्वीकार करणे कठीण जायला नको. परंतु याबाबतीतसुद्धा गोरधनदासच्या इच्छेचा मान ठेवला पाहिजे याबद्दल मला मुळीच संशय नाही. तुम्हा दोघांच्याही उन्नतीचा हाच मार्ग आहे.

आनंद चांगला असेल अशी आशा आहे. त्याला अधूनमधून मला लिहिण्याकरिता समजावत जा.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. सी. डब्ल्यू. १००७६. सौजन्य - शारदा गो. चोखावाल

-----------------

# ३६५. वल्लभभाई पटेल यांना पत्र

डाल्टा,

जानेवारी २४, १९४७

चि. वल्लभभाई,

मला तुमची दोन्ही पत्रे मिळाली. कताई करताकरता मी यांचा मजकूर सांगत आहे. संदेश वाहक आला आहे आणि त्याच्याबरोबर हे पाठवायला पाहिजे. देशाच्या इतर भागात काय सुरू आहे याची मला काहीही माहिती मिळत नाही. मी हजराबद्दल ऐकले आणि म्हणून तार पाठवली (पाहा "जवाहरलाल नेहरू यांना तार", जानेवारी १५, १९४७) येथील काम माझा सर्व वेळ घेते. आपले घर रोज बदलणे सोपे नाही. आतापर्यंत तरी ईश्वराने मला कसे तरी तगवून ठेवले आहे. आता तो काय करतो ते पाहू या. विषाची (सांप्रदायिकतेचे) सर्वांनाच माहिती आहे. यातूनच अहिंसेला मार्ग काढायचा आहे. हाच असा एक मार्ग आहे की ज्यातून तिची परीक्षा होऊ शकते.

भोपाळच्या नबाबांच्या पत्रात नवीन काहीच नाही. त्यांनी माझ्या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही. माझ्या आणि त्यांच्या चर्चेची टिपणे मी दिल्लीत असताना तयार करण्यात आली होती. माझ्याजवळ त्यांची प्रत नाही आणि आता त्यांनी प्रत पाठवली आहे. मी ते वाचलेले नाही परंतु ते बरोबर असेल असे मी गृहीत धरतो. मी त्याच्यासमोर जो प्रश्न ठेवला होता तो वर येणे अपरिहार्य आहे.

तुमची प्रकृती आता बरी होऊ लागली आहे आणि दिनशांना जरी नाही तरी तुम्ही निसर्गोपचारकाला बोलावले आहे हे पाहून आनंद होतो. माझ्या मते तुमच्याकरिता निसर्गोपचार हाच एकमेव मार्ग आहे.

टंकलेखक परशराम, सोडून गेला आहे. त्याच्या जाण्यामुळे काहीही फरक पडलेला नाही. त्याने त्याचा तोल गमावला होता. परंतु मला त्याच्या ठिकाणी दुसऱ्याची आवश्यकता नाही.

आशीर्वाद,

बापू

गुजरातीवरून. 'बापूना पत्रो -२ : सरदार वल्लभभाईने', पृष्ठ ३४५-६

# ३६६. कृषक समितीच्या प्रतिनिधींशी चर्चा

(ही मुलाखत "सेल्फ हेल्प टू अव्हाईड फुड क्रायसिस" या शीर्षकाखाली प्रकाशित झाली होती. यात सांगितले होते की हसनाबाद येथील जनसहायता समितीच्या कृषक समितीने हसनाबाद येथील हिंदू आणि मुसलमानांची १२०० स्वयंसेवकाची एक चमू तयार करून त्या भागाला दंगलींपासून वाचवले होते. या गोष्टीची माहिती त्यांनी गांधीजींना दिली होती.)

मुरियम,

जानेवारी २४, १९४७

हो, दंगलीच्या दरम्यान हसनाबाद हे ठिकाण हिंदू-मुसलमान ऐक्याचे कीर्तीस्तभ झाले होते असे मी ऐकले होते.

**यानंतर भेटण्याकरिता आलेल्यांनी त्या भागात निर्माण झालेल्या खाद्य संकटाची गांधीजींशी चर्चा केली आणि बंगाल सरकारचे या विषयाकडे लक्ष वेधण्याकरिता या समस्येची चर्चा तुम्ही तुमच्या भाषणात करू शकाल काय असे विचारले. गांधीजी म्हणाले -**

मी येऊ घातलेल्या खाद्यसंकटाबद्दल काही बोलून राहिलेलो नाही परंतु मला परिस्थितीची कल्पना आहे. मी ही समस्या माझ्या पद्धतीने सोडवण्याचा प्रयत्न करतो आहे. मदतीकरिता लोक सरकार वा इतर संस्थांवर का अवलंबून राहतात हे मला कळत नाही. आता ऐकतो की लोक विदेशातून धान्य मागवण्याचा प्रयत्न करत आहेत. खरी गोष्ट तर ही आहे की लोक जर स्वतःला मदत करतील तर सरकारलाही लोकांना मदत करावीच लागेल. यालाच मी खरी लोकशाही म्हणेन कारण याची रचना खालून वर अशी केली जाते. बंगालजवळ स्वतःची सुपीक जमीन आहे. आपल्या खाण्याकरिता तिच्यात आवश्यक कंदमुळे पिकवता येऊ शकतात. परंतु लोकांच्या आवडीनिवडीत आणि सवयीत बदल घडवून आणणे कठीण असते. या नारळांच्या झाडांकडे पाहा. नारळापासून चांगले पोष्टिक अन्न तयार करता येऊ शकते. मी स्वतः या आहाराशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करतो आहे. त्यातून अर्थातच मी तेल काढून घेतो आणि उर्वरित भागात चांगली प्रथिने असतात. यानंतर बंगालच्या भूमीत तयार होणारी विविध प्रकारची मुळे घ्या. ती मुळे आलूच्या जातीची आहेत आणि त्यांचा चांगल्या अन्नाकरिता उपयोग करता येऊ शकतो. याशिवाय तुमच्याकडे भरपूर मासे आहेत. मासे, नारळ आणि ही कंदमुळे सहजपणे भाताची जागा घेऊ शकतात.

**प्रसंगोपात गांधीजींनी लोकांच्या आळशीपणाची चर्चा केली. एक उदाहरण म्हणून जलपर्णीचा (वाटर हायसिंथ) उल्लेख करत गांधीजी म्हणाले की सर्व लोकांनी स्वयंसेवक म्हणून एक आठवडाभर जर काम केले तर सरकारची कोणतीही मदत न घेता तुम्ही या जलपर्णीचा समूळ नाश करू शकता आणि हजारो रुपयांची बचत करू शकता.**

**बंगालमधील तेभागा आंदोलनाविषयी** (जमिनीतील पिकातून जमीन मालकाला जो वाटा मिळायचा तो कमी व्हावा म्हणून हे आंदोलन होते. याबद्दलच्या गांधीजींच्या विचारांकरिता पाहा "प्रार्थना प्रवचन", जानेवारी ३१, १९४६) **तुमचे काय विचार आहेत असे भेटायला येणारांनी गांधीजींना विचारले. गांधीजींनी या आंदोलनाबद्दलचे आपले अज्ञान कबूल केले आणि या विषयावरील एक टिपण मागितले. प्रश्न विचारणारांनी ते टिपण आणून द्यायचे कबूल केले.**

**प्रश्न - ठोस राजकीय कार्यक्रमाद्वारे आम्ही हिंदू-मुसलमानांचे ऐक्य स्थापित करू शकत नाही काय?**

गांधीजी - शक्य आहे की तुम्ही करू शकाल. परंतु माझे स्वतःचे मार्ग आहेत. लोक जर स्वतःला मदत करतील तर राजकारण त्याची स्वतःची काळजी घेईल असे मला वाटते.

**प्रश्न - बंगालमधील तेभागा आंदोलनाला तुमचे आशीर्वाद हवे आहेत.**

होय, होय सर्व आंदोलनांना माझे आशीर्वाद आहेत.

'हरिजन', फेब्रुवारी ९, १९४७

-------------

# ३६७. प्रार्थना प्रवचन

("श्रीरामपूर डायरी"मधून उद्धृत)

मुरियम,

जानेवारी २४, १९४७

**भाषणाची सुरुवात करत गांधीजी म्हणाले की मुसलमानाच्या घरात** (हबिबुल्ला साहेब पटवारी) **मला ठेवण्यात आल्याबद्दल मला फार आनंद होतो. तिथे माझी आणि माझ्या लोकांची पूर्ण काळजी घेण्यात आली. सभेकरिता फार मोठा जनसमुदाय मावू शकेल असे मोठे मैदान शोधण्याकरितासुद्धा मुसलमान बंधूंनी मदत केली. आणि योगायोग असा की माझ्या या यात्रेतील ही सर्वात मोठी सभा होती. मला वाटते की इतका मोठा जनसमुदाय गोळा होण्याचे कारण बिबी अमतुस्सलाम यांचे ते उपोषण आहे. अब्दुल्ला साहेब आणि त्यांच्याबरोबर काम करणारांनी व गावातील प्रमुख मुसलमान सहकाऱ्यांनी प्रामाणिकपणे घेतलेल्या मेहनतीमुळे त्यांच्या उपोषणाचा सुखद अंत झाला. मी काढलेला हा निष्कर्ष बरोबर आहे की नाही हे मला माहीत नाही परंतु असे समजून मी खुश होतो.**

**काही वृत्तपत्रांनी जनतेच्या मनात विष घोळले याचा मला खेद होतो. बायबल, कुराण, गीता आणि इतर धर्मग्रंथांची जागा आजकाल जवळपास वृत्तपत्रांनी घेतली आहे. हे चूक आहे परंतु जे काही सत्य आहे त्याला आपल्याला तोंड द्यावेच लागेल. अशी परिस्थिती असल्यामुळे वार्ताहरांनी वाचकाला सत्याशिवाय वेगळे काही देऊ नये असे माझे मत झाले आहे.**

**माझे असेही मत आहे की अल्पसंख्याकांनी बहुसंख्याकांच्या प्रांतात आदोलन करणे ही अव्यवहार्य गोष्ट आहे. मला ते दिवस आठवतात की जेव्हा स्वर्गीय इमाम बंधू** (सर अली इमाम. यांचा ऑक्टोबर १९३२मध्ये मृत्यू झाला होता आणि सैय्यद हसन इमाम. यांचा एप्रिल १९३३मध्ये मृत्यू झाला होता.) **आणि दिवंगत मझरूल हक साहेब** (पटना येथील बॅरिस्टर. हे इंग्लंडमध्ये गांधीजींबरोबर शिकत होते.) **हे सर्व दोन्ही समुदायांचे नेतृत्व करत होते. ब्रिजकिशोर प्रसाद, डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्यासारखे प्रमुख प्रतिष्ठित हिंदू त्यांच्या हाताखाली काम करत होते. बिहारमधील मुसलमानांनी बिहार सोडायला नको. हे खरे आहे की बिहारी हिंदूंनी अमानवीय वर्तन केले आहे. परंतु अशा प्रकारे ते पथभ्रष्ट झाले म्हणून मुसलमानांनी आपल्या कर्तव्यापासून विचलित होऊ नये. स्पष्ट आहे की आपले कर्तव्य शूरपणाने आपल्या घरातच टिकून राहणे आहे. आणि बिहारच्या हिंदूनी आपल्या दुराचारी हिंदूंच्या दुष्कृत्याची पूर्ण भरपाई केली पाहिजे. हीच गोष्ट मी नोआखालीच्या हिंदूंना आणि मुसलमानांनाही सांगेन. यामुळे या गावात मला आश्रय देणारे मुसलमान आहेत हा शुभ शकून आहे. एकटा जरी हिंदू असला तरी त्याला सुरक्षित वाटेल असे वातावरण निर्माण करणे तुमचे कर्तव्य आहे आणि हिंदूंमध्येही नोआखालीत राहता येण्याइतका विश्वास असला पाहिजे.**

'हरिजन', फेब्रुवारी ९, १९४७

----------------

# ३६८. मुंगेर जिल्हा मुस्लिम लीगच्या अध्यक्षांना पत्र

जानेवारी २५, १९४७

तुमचे पत्र उत्तेजनेने भरलेले आहे.... मी बिहारमध्ये आलो तर मुसलमानांची अधिक चांगली सेवा कसा करू शकेन हे तुम्ही मला सांगितले तर ते मला आवडेल. बिहारमध्ये हिंदूंनी जे अत्याचार केले त्यांना तोड नाही हे तुमचे म्हणणे जरी मला मान्य नसले तरी त्यांचा भयानकपणा नोआखालीपेक्षा जास्त होता हे मी सहजपणे मान्य करीन. ... माझी तुम्हाला विनंती आहे की मोंघीर जिल्हा मुस्लिम लीगचे अध्यक्ष म्हणून तुम्ही स्वतःला सिद्ध झालेल्या गोष्टींपर्यंत सीमित ठेवावे. तुम्ही असे केले नाही हे सांगायला मला खेद होतो.

महात्मा गांधी - द लास्ट फेज, खंड १, पुश्तक २, पृष्ठ २४७ (महात्मा गांधी - अखेरचं पर्व - खंड २, पृष्ठ २९९-३००)

----------

# ३६९. सैय्यद नसिरुद्दिन यांना पत्र

काझिरखिल, पोस्ट रामगंज, जिल्हा नोआखाली,

जानेवारी २५, १९४७

प्रिय मित्र,

मला तुमची दोन पत्रे मिळाली. तुम्ही महान विद्यापीठाशी संलग्नित आहा आणि तुम्ही वाङ्मय पारंगत (एम. ए.) ही पदवी मिळवलेली आहे. परंतु मला सांगायला खेद होतो की तुमच्या पत्रात समतोलभावाचा पूर्णपणे अभाव आहे.

मला माहीत असलेल्या चांगल्यात चांगल्या पद्धतीने तुम्ही मला हिंदू, मुसलमान आणि इतरांची सेवा करू द्यावी. मला त्यात अपयश आले तर मला खेद होईल. परंतु माझ्या विवेकाला जी पद्धत पटत नाही त्या पद्धतीनुसार मी माझा कार्यक्रम बदलू शकत नाही. (जानेवारी ११च्या पत्रात सैय्यद नसरुद्दिन म्हणाले होते की आक्रमक समुदायाचे पुढारी म्हणून गांधीजींनी त्या भागाचा दौरा करायला पाहिजे होता जिथे "तुमच्या समुदायाने धक्कादायक आणि भयानक अत्याचार केले".)

नोआखालीतील मुसलमानांबद्दलच्या तुमच्या टिपणीबद्दल बोलायचे तर तुम्ही रीतसर मार्गाने तुमची तक्रार दाखल करावी. तुम्ही प्रांतिक सरकारला लिहिले आहे काय? जर नसेल तर तुम्ही असे शक्य तितक्या लवकर करावे असे मी सुचवीन.

आक्रमक आणि अनाक्रमक समुदायात भेद करणे मला मान्य नाही. पाकिस्तानसंबंधीच्या विवादाच्या गुणावगुणाचा विचार न करता हे मी सांगतो आहे. कोणत्याही जातिधर्माचा विचार न करता मी हिंदुस्थानचा आहे इतका दावा करणे माझ्याकरिता पुरेसे आहे. धर्म ही माझी वैयक्तिक बाब आहे. हिंदुस्थानचा नागरिक म्हणून माझी जी कर्तव्ये आहेत त्यांच्या आड तो येऊ शकत नाही.

तुमचा विश्वासू

सैय्यद नसिरुद्दिन साहेब, अधिवक्ता,

अलिगढ, (संयुक्त प्रांत)

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

## ३७०. सतीश चंद्र दास गुप्ता यांना पत्र

जानेवारी २५, १९४७

चि. सतीश बाबू,

हे आश्चर्यकारक आहे. हो, (प्रकरणे) दाखल करा, परंतु हे प्रकरण सु.कडे जाऊ नये आणि आम्ही आमच्याकडून शक्य असेल ते सर्व काही करायचे आहे हे मी तुम्हाला सांगितले नव्हते काय? परंतु चौधरी साहेबांकडून काही पत्र आले नाही असे मी म्हणालो नव्हतो काय? काय योग्य आहे याचा विचार करा.

आशीर्वाद,

बापू

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

----------------

## ३७१. अमतुस्सलाम यांना पत्र

(जानेवारी २३ला सुशील सरकारनी अमतुस्सलामना लिहिले होते: “तुम्ही उपवास सोडावा अशी हिंदूंची विनंती आहे. तुमच्याकडून याहून अधिक चांगल्या सेवेची राष्ट्र अपेक्षा करते.”)

जानेवारी २५, १९४६

बेटी अमतुल सलाम,

ही तार वाच. तुझ्या पत्रावरून तू फार चांगली प्रगती करते आहेस असे दिसते. तुझा खोकला बंद झाला व ताप आला नाही तर तू बरेच काम करू शकशील. तुला काही हवे असले तर लिहिशील.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५७२

--------------

# ३७२. प्रार्थना प्रवचन

("श्रीरामपूर डायरी"मधून उद्धृत)

जानेवारी २५, १९४७

**गांधीजी श्रोत्यांना म्हणाले की तुम्ही दिलेला ताल बरोबर नव्हता. तुम्ही ईश्वराच्या नावावर जे काही करता ते तालासुरावर असले पाहिजे. तुमचा बाह्य सूर जर बेसूर असेल तर अंतर्गत सूरही बरोबर नसण्याची शक्यता असते. यानंतर मद्रास आणि मुंबई येथून जमियत उल उलेमाच्या ज्या दोन तारा आल्या होत्या त्यांची चर्चा करत गांधीजी म्हणाले की या दोन तारांमध्ये मला पाखंडी (काफीर) संबोधण्यात आले असून इस्लामच्या कायद्यात हस्तक्षेप करण्याचा मला कोणताही अधिकार नाही असे सांगण्यात आले आहे. गांधीजींनी मान्य केले की या तारा सत्याच्या माहितीशिवाय पाठवण्यात आल्या आहेत. धर्मपालनासंबंधात मी कोणताही हस्तक्षेप केलेला नाही. मला असे करण्याचा अधिकारही नाही आणि इच्छाही नाही. मी केवळ सल्ला दिलेला आहे आणि तोही पैगंबरांची मी जी काही वचने वाचली आहेत त्यांना धरून. याशिवाय अनेक सुसंस्कृत मुसलमान कुटुंबांमध्ये मला ही पडदापद्धती आढळली नाही जी मला आज दिसून पडते. परंतु याचा अर्थ हृदयाच्या पडद्याचे महत्त्व कमी करणे असा मुळीच होत नाही. माझ्या म्हणण्याचा तोच अर्थ आहे. ते काहीही असले तरी माझ्या मुसलमान श्रोत्यांना जर असे वाटत असेल की माझा सल्ला इस्लामविरोधी आहे तर त्यांनी तो मान्य करू नये. माझ्या मते माझ्यावर टीका करणाऱ्या तारांवरून दिसून येते की या टीकाकारांमध्ये सहिष्णुतेचा घोर अभाव आहे. तार करणाराने विसरू नये की प्रिव्ही कौन्सिलसह सर्व न्यायालये, ज्यांचे बहुतांश न्यायाधीश मुसलमानेतर असतात, इस्लामी कायद्याची व्याख्या करत असतात व त्यांनी लावलेला अर्थ इस्लामी विश्वावर लादला जात असतो. मी तर केवळ मत व्यक्त केले आहे. टीकेच्या वा शारीरिक शिक्षेच्या भीतीने मी जर असे करू शकलो नाही तर मी सत्य आणि अहिंसेचा चांगला प्रतिनिधी होऊ शकणार नाही.**

'हरिजन', फेब्रुवारी ९, १९४७

----------------

# ३७३. मोहम्मद तैय्यबजी यांना पाठवलेल्या पत्रातील काही भाग

(मोहम्मद तैय्यबजींनी लिहिलेल्या पत्राच्या उत्तरार्थ हे पत्र होते. आसामसंबंधी काँग्रेसने मंजूर केलेल्या ठरावाबद्दल त्यात असमाधान व्यक्त करण्यात आले होते, व गांधींजींना त्यासंबंधात मार्गदर्शनाची विनंती करण्यात आली होती.)

जानेवारी २६, १९४७

आसामी लोकांच्या घबराटीचे कारण मला समजत नाही. भीतीच अशी गोष्ट असते की ज्यामुळे माणसाची बुद्धी काम करत नाही, आणि भीतीमुळे जेव्हा मोठ्या संख्येतील लोक भयग्रस्त होतात तेव्हा तर विशेषत्वाने असे होते. काँग्रेसने मंजूर केलेला ठराव (पाहा परिशिष्ट "अखिल भारतीय काँग्रेस कमेटीचा ठराव".) जर वर्तमानपत्रात बरोबर आला असेल आणि तो आसामला जरी मार्गदर्शन करत नसेल तरी त्या ठरावानुसार आसमच्या जनतेने आपल्या विधानसभेच्या माध्यमातून जी इच्छा घोषित केली आहे तिच्या विपरीत काहीही करण्याची आसामवर सक्ती केली जाणार नाही. असे असल्यामुळे तो ठराव आसामला बरेच काही देतो. दुसरी गोष्ट म्हणजे पुढे घटनाक्रम कोणते वळण घेतो हे स्वाभाविकपणेच आसामला पाहावे लागेल व प्रसंगानुरूप आसामला वागावे लागेल. आधीच कोणती तरी कृती करणे योग्य होणार नाही. जे काही करायचे असेल ते आसामच्या घटनेच्या स्वायत्त स्वरूपाला धक्का लागेल असे काही असणार नाही याबद्दल कोणाच्याही मनात संशय असायला नको. (वृत्तानुसार गांधीजींनी अखेरीस मोहम्मद तैय्यबजींना लिहिले होते "पत्र स्पष्ट नसेल तर परत लिहा".)

'द हिंदू', फेब्रुवारी २, १९४७

------------------

# ३७४. मदालसा यांना पत्र

हिरापूर,

जानेवारी २६, १९४७

चि. मदू,

तू पत्र लिहिण्यात अनियमित झाली आहेस. हे चिन्ह बेशिस्तीचे नाही अशी मला आशा आहे. ते काहीही असले तरी आनंदी आणि शांत राहा. तुला आणि रामकृष्णला (रामकृष्ण बजाज, मदालसा यांचा भाऊ.) बोलावणे मला आवडले असते परंतु मला ती खोटी आसक्ती वाटते. वर्तमानपत्रांमध्ये जे येते त्यातील ५० टक्के सोडून दिले तर इथे काय सुरू आहे याची तुला काही प्रमाणात कल्पना येईल. दुरून डोंगर साजरे हे तू ऐकले नाही काय? आणि मी दररोज एका खेड्यातून दुसऱ्या खेड्यात फिरत असतो तेव्हा निव्वळ दुरून पाहणारे लोक ओझे होत असतात. अशातल्या अनेकांना मी 'नाही' म्हणत असतो. मग मी तुम्हा दोघांना हो कसा म्हणू शकतो? मला माहीत आहे की तुम्ही दोघे मला कोणत्याही प्रकारे ओझे होणार नाही. तरीही संयमित राहण्याचा प्रयत्न करा. तुम्ही तिथूनच जितक्या प्रमाणात सेवेचे काम कराल तितक्याच प्रमाणात तुम्ही येथील यज्ञात भाग घेतला असे मी समजेन. मुलांकडे लक्ष ठेव. तुझी स्वतःची काळजी घे. रामकृष्ण चांगला असेल अशी आशा आहे. त्याने स्वतःसंबंधी काही निर्णय घेतला आहे काय?

आशीर्वाद,

बापू

गुजरातीवरून. 'पाचवे पुत्रको बापू का आशीर्वाद', पृष्ठ ३३१

---------------

# ३७५. प्यारेलाल यांना पत्र

रात्री, जानेवारी २६, १९४७

चि. प्यारेलाल,

मला तुझे पत्र मिळाले. इंग्लंडहून आलेल्या व्यक्तीबद्दल ठीक आहे. ते जर येतील तर चांगले काम करतील. त्यांना लिही.

माझ्या मते तू येण्याच्या इच्छेवर नियंत्रण ठेवशील तर चांगले होईल. मी माझा वेळ वाचवत आहे. मला गप्पा मारणे आवडत नाही. कामाचा ढीग पडलेला आहे. खेड्यांना मला जो न्याय करायचा होता तो न्याय करण्याकरिता मी असमर्थ आहे. शरीर अजून काम करू शकत नाही. ते जी काही सेवा देऊ शकेल तितक्यावर मी समाधान मानले पाहिजे.

रामचंद्रन काल आला. तो म्हणतो की मानसिक आणि शारीरिक दृष्टीने तो आता स्वस्थ आहे. माझ्या झोपडीतील जमिनीवर त्याचे अंथरुण तयार करण्यात आले होते. आता हे ठिकाण लहान पडत आहे. मला ते आवडते.

हुन्नर आला आहे. तो कसा करतो ते पाहू या. तो शांत आहे. तुला सर्व काही डायरीत सापडेल. शक्य तितकी मी ती भरण्याचा प्रयत्न करत आहे. त्यात उणिवा आहेत आणि त्या बोचतात. एकदा ती भावना गेली की ती परिपूर्ण होईल. जर तसे झाले नाही तर दोष माझा असेल.

मनू किती तरी काम करत आहे. तिला वाचण्याकरिता मुळीच वेळ मिळत नाही. मी त्याकरिता वेळ देऊ शकत नाही. परंतु ती आकार घेत आहे असे दिसते. तू तिला काही संस्कृत पाठ पाठवण्याचे कबूल केले होते. ते पाठव.

आता सकाळचे साडेपाच वाजले आहेत.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

# ३७६. मृदुला साराभाई यांना पत्र

जानेवारी २६, १९४७

चि. मृदू,

तेंडुलकरने मला सहज तुझे पत्र दिले. उद्या तुला तार जाईल : “माझे मत विरुद्ध आहे.” आता सायंकाळचे ७.४५ झाले आहेत. इथे पोस्ट ऑफिस वा तारघर नाही. उद्या कोणी तरी हे सर्व तारघरात घेऊन जाईल. हे पत्रसुद्धा उद्याच डाकेत जाईल.

तुला जर माझ्याबरोबर राहण्याची इच्छा नसेल तर तू काय करशील? येथील काम जटिल आहे. माझ्याबरोबर राहिल्याने तू काही मिळवू शकशील. परंतु मला त्यात काही लाभ दिसत नाही. मी इथेच राहणार आहे हे जर गृहीत धरण्यात आले तर मला तुझे येणे आवडले असते. सध्या तर इथे जे थोडेसे लोक आहेत त्यांनाही ठेवणे कठीण झाले आहे. त्रासाला अंत नाही.

तेंडुलकर जेव्हा परततील तेव्हा तुला सविस्तर कळेल.

तुला लिहिलेले पत्र कसे हरवू शकते? ते तुला मिळेल असे मला अजूनही वाटते. ते परत लिहायचे तर त्यात मी काय लिहिले होते हेही मला आठवत नाही.

गर्भपाताची कल्पना मी सहन करू शकत नाही. अशा प्रकारे जन्माला आलेल्या मुलांना वाढवावे लागते हा युक्तिवाद मी समजू शकतो. तू जर मला गर्भपाताचे लाभ पटवून देऊ शकू शकशील तर गोष्ट वेगळी. काही मोठ्या पाश्चात्त्य स्त्रियाही आल्या होत्या परंतु त्या माझी खात्री पटवून देऊ शकल्या नाही. या बाबतीत मी अभेद्य आहे.

तुझी प्रकृती चांगली आहे ना? तू काळजी घेतेस की नाही?

सरदार जाणूनबुजून त्यांची तब्येत बिघडवत आहेत.

जवाहरलाल फार बेफिकीर आहे. तो हे सगळे कसे करतो हे आश्चर्यजनक आहे. ज्यांचे ईश्वर रक्षण करतो त्याचे अनहित कोण करू शकतो?

काल मी ऐकले की जयप्रकाश इथे पोहोचला आहे. तो कदाचित उद्या मला भेटायला येईल. तो काझिरखिलला आहे असे मला सांगण्यात आले आहे.

जनरल शाहनवाझ कलकत्त्यात आहेत असे मला सांगण्यात आले आहे. ते मला भेटायला येतील अशी आशा आहे. निरंजन सिंग गिल आज आले होते आणि ते परत गेले. त्यांचे कामसुद्धा अपूर्ण आहे.

माझी बोट केवळ श्रद्धेवर चालत आहे.

मनू इथे आहे आणि ती माझ्याबरोबर झोपत असते हे मी तुला लिहिले आहे असे वाटते. हे सर्व पाहतात आणि सर्वांना याची माहिती आहे. याचा प्रयोगाशी काहीही संबंध नाही. प्रयोग थांबला आहे परंतु त्याच्या प्रसंगोचिततेबद्दल मला मुळीच शंका नाही. तो केवळ सहकाऱ्यांमुळे थांबवला.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. सी. डब्ल्यू. ११२५९. सौजन्य - साराभाई फौन्डेशन

-----------------

# ३७७. प्रार्थना प्रवचन

बॉसा,

जानेवारी २६, १९४७

आज २६ जानेवारी, स्वातंत्र्य दिवस आहे. काँग्रेसचा जेव्हा जन्म झाला तेव्हा हिंदुस्थानला नवजीवन मिळाले. त्या वेळी फार कमी लोकांना स्वातंत्र्याचे महत्त्व कळले होते. परंतु हळूहळू काँग्रेसची शक्ती वाढत गेली आणि जनआंदोलन करून तिने प्रत्येक गावात स्वातंत्र्याबद्दलची जाणीव विकसित केली गेली. त्या काळात हिंदू-मुसलमानांमध्ये वैमनस्याची भावना नव्हती आणि माणूस हिंदू आहे की मुसलमान याची कोणीही फिकीर करत नव्हता. खेदाची गोष्ट ही आहे की आज दोघांची मने वेगळी झाली आहेत, तेव्हा सर्व एक होते. परंतु इथे वातावरण इतके विषाने भरलेले नसते तर मी स्वतःच ध्वजावरोहण केले असते. काही मित्रांचे म्हणणे होते की मीच ध्वजारोहण केले पाहिजे. परंतु मी विचार करून नकार दिला. इथे ध्वजावरोहण करू नये असा आदेश जर एखाद्या इंग्रज अधिकाऱ्याने काढला असता तर जीवाचा धोका पत्करूनही मी निश्चितच ध्वजावरोहण केले असते. परंतु आज मी तक्रार घेऊन कोणाकडे जाऊ? कल्पना करा की आज ध्वजावरोहण झाले आणि माझ्या मुसलमान बांधवांनी ते जरी सहन केले तरी ही काय झंझट आहे अशी भावना त्यांच्या मनात निर्माण होणार असेल तर मला तसे नको आहे. याचबरोबर माझ्या अंतःकरणात काय आहे तेही मी सांगितले पाहिजे. आपल्याला आपला ध्वज असला पाहिजे असा प्रश्न जेव्हा उपस्थित झाला तेव्हा हिंदुस्थानात एकाच समुदायाचे लोक राहत नाहीत तर अनेक समुदायाचे लोक राहत असल्यामुळे आपला ध्वज एकाच रंगाचा असणे अन्यायकारक होईल असे मला वाटले. एक दिवस निश्चितच असा होता की जेव्हा हिंदुस्थानातील सर्व समुदायांना - हिंदू, मुसलमान, पारसी आणि इतर सर्वांना हा ध्वज आपलाच आहे असे वाटत होते व त्याकरिता लोकांनी आपले प्राणही अर्पण केले होते. आज अनेक ध्वज अस्तित्वात आले आहेत. परंतु दुर्दैवाने ऐक्याचे ते दिवस ही आता भूतकाळाची गोष्ट झाली आहे. परंतु मी कोणाकडे तक्रार करू? आपण सर्व हिंदुस्थानची मुले आहो आणि म्हणून आपण भाऊ आहो. स्वातंत्र्यामुळे जर अंतर्गत संघर्ष आणि द्वेष वाढत असतील तर ते स्वातंत्र्य काय कामाचे? परंतु ऐक्य घोषित करणे हे तितकेच हास्यास्पद आहे जितके हवेत किल्ला बांधणे. परंतु आज तर ते स्वातंत्र्य आपल्याकरिता आकाशपुष्पासारखे झाले आहे. जोपर्यंत स्वातंत्र्य मिळत नाही तोपर्यंत आम्ही शांत बसणार नाही हा एकच ध्यास सध्या आपल्याला असला पाहिजे. आज भाऊ

भावाशी भांडत आहे. आपण जोपर्यंत आपले स्वातंत्र्य मिळवत नाही तोपर्यंत पाकिस्तान कसे निर्माण होऊ शकते? ब्रिटिश पाकिस्तान देणार आहेत काय? आणि आपल्याला कोणत्या प्रकारचे स्वातंत्र्य मिळेल हे कोणाला माहीत आहे? ब्रिटिश निश्चितच जाणार आहेत. परंतु अमेरिका आणि रशिया चित्राबाहेर नाहीत. आपण जर सावध राहिलो नाही तर आपण सर्व काही गमावू. अगदी काही वेळेपूर्वीच तुम्ही "जन गण मन" म्हणाला होता. किती उदात्त गीत आहे! आणि असे किती तरी गीत आपल्याजवळ आहेत. आपण जर हे गीत प्रामाणिकपणे अंतःकरणापासून म्हणालो तर आपण एक होऊ शकतो. आणि आपण एक झालो नाही तर बाकीचे जग आपल्याला मूर्ख समजेल. या अनुभवी म्हाताऱ्याचे बोल ऐकले पाहिजे असे जर तुम्हांला वाटत असेल तर तुम्ही आजपासूनच तुमच्या विचारात आणि वर्तनात माझ्या सल्ल्याप्रमाणे बदल केला पाहिजे. मी आज ध्वजारोहण केले नाही तर माझ्याबरोबर असलेल्या वार्ताहरांनी ध्वजारोहण केले. हे तेच स्वातंत्र्य आहे की ज्याकरिता बंगालचे सुपुत्र सुभाष चंद्र बोस यांनी प्राणार्पण केले होते. त्यांच्याकरितासुद्धा आपण हा यज्ञ करू शकत नसू तर मग आपण तसे कोणाकरिता करू शकू?

गुजरातीवरून. 'एकलो जानो रे', पृष्ठ ९४-५

-----------------

# ३७८. एका भगिनीसमोरील समस्या

प्रश्न - दुराचारी लोकांनी स्त्रीवर हल्ला केला तर तिने काय करावे - पळून जावे की हिंसेने प्रतिकार करावा? पळून जाण्याकरिता बोट सज्ज ठेवायची की शस्त्रांनी प्रतिकार करण्याची तयारी करायची?

उत्तर - या प्रश्नाकरिता माझे उत्तर फार साधे आहे. माझ्याकरिता हिंसेच्या तयारीचा प्रश्नच उपस्थित होत नाही. सर्वोच्च प्रकारचे साहस विकसित करायचे असेल तर आपण अहिंसेकरिताच तयारी केली पाहिजे. भ्याडपणाचा पर्याय म्हणूनच हिंसा सहन करता येऊ शकते. यामुळे आणीबाणीच्या प्रसंगी पळून जाण्याकरिता मी बोट तयार ठेवणार नाही. अहिंसक माणसाकरिता आणीबाणी नसते, तो प्रतिष्ठापूर्वक मरण्याची तयारी करत असतो. यामुळे स्त्री असो वा पुरुष असो त्यांना जरी कोणतीही मदत मिळत नसली तरी त्यांनी मरण्याची तयारी केली पाहिजे कारण खरी मदत तर देवाकडूनच मिळत असते. मी इतर कोणतीही गोष्ट शिकवू शकत नाही आणि मी जो उपदेश करतो त्यानुसार आचरण करण्याकरिता मी इथे आलो आहे. अशी संधी मला मिळेल काय वा दिली जाईल काय हे मला माहीत नाही. गुंडांचा हल्ला झाल्यानंतर ज्या स्त्रिया शस्त्राशिवाय त्याचा प्रतिकार करू शकत नाही त्यांना शस्त्र ठेवण्याचा सल्ला देण्याची आवश्यकता नाही. त्या स्वतःच तसे करतील. शस्त्र ठेवावे की ठेवू नये याबद्दल जी चौकशी करण्यात येत असते त्यात काही तरी चूक आहे. आपण स्वाभाविकपणेच स्वतंत्र आहो हे जनतेने शिकायला पाहिजे. खरा प्रभावी प्रतिकार अहिंसेतच असतो हा मध्यवर्ती विचार जर लोक लक्षात ठेवतील तर ते आपले वर्तन त्या पद्धतीने ढाळतील. आणि अजाणतेपणाने विचार न करता लोक सतत असेच करत आले आहेत. परंतु त्यांच्यात सर्वोच्च प्रतीचे धैर्य नसल्यामुळे म्हणजे असे धैर्य की जे अहिंसेतून जन्म घेते ते नसल्यामुळे ते स्वतःला अण्वस्त्र धारण करण्याइतके शस्त्रसज्ज करू लागले आहे. ज्यांना यातून हिंसेचे व्यर्थत्व दिसत नाही ते स्वतःला शक्य होईल तितक्या चांगल्या पद्धतीने शस्त्रसज्ज करतील. दक्षिण आफ्रिकेतून मी हिंदुस्थानात परतल्यानंतर इथे जाणीवपूर्वक अहिंसेचे सतत प्रशिक्षण देण्यात आले आहे आणि त्याचे परिणाम आपण पाहत आहो.

**प्रश्न - शरण जाण्यापेक्षा आपला जीव द्या असा सल्ला स्त्रीयांना देता येईल काय?**

उत्तर - या प्रश्नाचे निश्चित उत्तर देणे आवश्यक आहे. नोआखालीला येण्याच्या अगदी आधीच मी दिल्लीत याचे उत्तर दिले होते. आत्मसमर्पण करण्याऐवजी माणसाने निश्चितच आत्मघात केला पाहिजे. वेगळ्या शब्दांत जीवनाच्या माझ्या कल्पनेत आत्मसमर्पणाला कोणतेही स्थान नाही. परंतु माणसाने

आत्महत्या कशी करावी हा प्रश्न मला विचारण्यात आला होता. मी ताबडतोब उत्तर दिले की आत्महत्येचे साधन पुरवणे माझे काम नाही. आणि अशा परिस्थितीत आत्महत्येच्या नीतीला सहमती देण्यामागे माझा विश्वास होता आणि आहे की ज्या व्यक्तीत आत्महत्या करण्याचे धैर्य आहे तिच्यात अशा मानसिक प्रतिकाराकरिता आणि अंतःकरणाच्या पावित्र्याकरिता ते अपेक्षित धैर्य अस्तिवात असेल ज्यासमोर हल्ला करणारा निरस्त्र होऊन जाईल. मी हा युक्तिवाद पुढे नेऊ शकत नाही, तसे करण्याकरिता त्यात वाव नाही. याकरिता ज्या निश्चित पुराव्याची आवश्यकता आहे तो मिळू शकत नाही हे मला माहीत आहे.

**प्रश्न - आपला जीव देणे आणि दुराचारी व्यक्तीचा जीव घेणे हे दोनच पर्याय उपलब्ध असतील तर तुम्ही काय कराल?**

उत्तर - जेव्हा स्वतःचा जीव देणे वा दुसऱ्याचा जीव घेणे हेच पर्याय उपलब्ध असतील तेव्हा मी पहिलाच पर्याय पसंत करीन यात काहीही संशय नाही.

पल्ला, जानेवारी २७, १९४७

'हरिजन', फेब्रुवारी ९, १९४७

----------------

# ३७९. एस. जी. ए. आघा यांना पत्र

काझिरखिल, पोस्ट रामगंज, जिल्हा नोआखाली,

जानेवारी २७, १९४७

प्रिय मित्र,

तुमच्या प्रश्नाला माझे हे उत्तर आहे.

१. मी जेव्हा प्रार्थना करत होतो तेव्हा अनेक मुसलमान बसले होते आणि नंतर मी भाषण देऊ लागलो तेव्हा ते तिथून निघून गेले या त्यांच्या वर्तनामुळे मी दुखावलो होतो हे खरे आहे.

२. मी म्हणालो होतो की कोणत्याही व्यक्तीच्या सांगण्याने अथवा मला जगाचे जरी राज्य देण्यात आले तरी त्यामुळे मी रामनाम सोडू शकत नाही; कारण माझ्याकरिता रामनाम हे अल्ला, खुदा वा गॉड सारखेच आहे.

३. माझे मत आहे की हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, पारसी, यहुदी आणि इतर सर्वांचा देव वा ईश्वर एकच आहे. मग त्याचे भक्त कोणत्या नावाने त्याचा उल्लेख करतात वा त्याला ओळखतात याला काहीही महत्त्व नाही. हा विचार माझा स्वतःचा नाही. परंतु हा विचार विश्वात्मक आहे असा विचार करायला मी शिकलो.

४. माझा विश्वास आहे की सर्व धर्म समान दर्जाचे आहेत आणि ते एखाद्या झाडाच्या पानासारखे आहेत. झाडाची सर्व पाने एकाच झाडाची असली तरी कोणतीही दोन पाने अगदी सारखी नसतात.

हे खरे आहे की माझ्या दररोजच्या प्रार्थनेत गीता, कुराण आणि इतर धार्मिक पुस्तकातील रचनांना स्थान असते. याकरिता तुम्हाला नवजीवन प्रकाशन संस्था, अहमदाबादने प्रकाशित केलेली प्रत मिळवावी लागेल आणि इतरांमध्ये काय आहे याचा शोध घ्यावा लागेल. माझी कोणतीही रचना नाही.

६. हिंदूधर्म, इस्लाम, ख्रिश्चनधर्म इत्यादी सर्व धर्मांना माझा धर्म जवळ करतो. याचे अगदी साधे कारण आहे. माझा विश्वास आहे की या सर्व धर्मांचा दर्जा समान आहे. ही काही वेगवेगळ्या मिठायांपासून तयार केलेली मिठाई नाही. ज्याप्रमाणे प्रत्येक झाडाच्या पानाला स्वतःचे एक स्थान असते त्याप्रमाणे प्रत्येक धर्माला त्याचे एक स्थान आहे. मी जर झाडाच्या प्रत्येक पानाला समान स्थान आहे असे समजत असेन तर याचा अर्थ मी त्यांची गोळाबेरीज करतो असा नाही तर हे एक वैज्ञानिक सत्य आहे हे मान्य करणे आहे.

तुमचा विश्वासू,

माननीय अधिवक्ता, जी. ए. आघा,

जमीदार दाडी (सिंध)

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

----------------

# ३८०. हसन शहीद सुऱ्हावर्दी यांना पत्र

काझिरखिल, पोस्ट रामगंज, जिल्हा नोआखाली,

जानेवारी २८, १९४७

सरदार निरंजन सिंग यांच्याशी तुमची जी चर्चा झाली ती त्यांनी मला सर्व सांगितली. ते म्हणाले की नोआखालीत त्यांच्या काम करण्यावर तुमचा आक्षेप नाही परंतु ते आणि त्यांचे लोक बंगालमध्ये ज्या मेहनतीने काम करत आहेत त्याच मेहनतीने बिहारमध्ये काम करत नाहीत तोपर्यंत तुम्हाला त्यांच्या कामातील प्रामाणिकपणाबद्दल शंका वाटत राहील. अशा परिस्थितीमुळे तुम्ही त्यांना बिहारमध्ये जाण्याकरिता व तिथे काम करण्याकरिता सांगितले आहे. आणि बिहारमध्ये त्यांना चांगल्या पद्धतीने काम करता यावे म्हणून बिहारमधील मुस्लिम लीग पक्षाकरिता तुमच्याकडून एक शिफारस पत्रही नेण्याकरिता सांगितले आहे. (हसन शहीद सुऱ्हावर्दी यांनी जफर इमाम यांना फेब्रुवारी ४, १९४७ला एक पत्र पाठवले होते.) मी त्यांना सांगितले की तुम्ही अशा प्रकारचे शिफारस पत्र घेऊन गेला नाही तर लीगच्या दृष्टीने तुमचे तेथील काम व्यर्थ सिद्ध होऊ शकेल. मी त्यांना पुढे सांगितले की तुम्ही (निरंजन सिंग गिल) तिथे त्यांच्या संपर्कात राहा आणि काम करा.

सरदारजींच्या नोआखालीतील कामाबद्दल मी त्यांना सांगितले आहे की तुमचे विचार त्यांना जसे कळले आहेत ते लक्षात घेता तुम्हाला त्यांच्या माणसांनी नोआखालीत काम करणे जर पसंत नसेल तर तुम्ही (सरदार निरंजन सिंग गिल) तुमच्या माणसांना येथून काढून घ्या. त्यांच्या माणसांनी इथे काम केलेले तुम्ही सहन करणे इतके पुरेसे नाही, त्याकरिता तुमची लेखी परवानगी असणे आवश्यक आहे. त्यांची माणसे इथे हिंदू आणि मुसलमान या दोघांचेही समान मित्र म्हणून राहत आहेत. इतर कोणत्याही अटीवर मी त्यांना ठेवू शकणार नाही. मी त्यांना असेही सांगितले आहे की संशयातीत होण्याकरिता तुम्हांला स्वतःच्या स्रोतावर नाही तर जाहीर सार्वजनिक स्रोतावर अवलंबून राहावे लागेल. माझ्या अधिकारात जो स्रोत आहे तोही माझा वैयक्तिक स्रोत मानला जाईल. यामुळे मी त्यांच्यासमोर प्रस्ताव ठेवला आहे की तुम्हाला त्यांचे येथील काम जर पसंत असेल तर तुम्ही त्यांच्या आवाहनाला उत्तर म्हणून वर्गणी अवश्य द्यावी, मग ती प्रतिकात्मक एक रुपया का असेना. परंतु शक्य आहे की नोआखालीतील त्यांचे काम तुम्हाला पसंत असूनही माझा प्रस्ताव मान्य करण्यात तुम्हाला काही अडचण वाटेल. परंतु मला याची काही कल्पना नाही.

'सरदार पटेल्स कॉरस्पॉन्डन्स', खंड ४, पृष्ठ २२५

--------------

# ३८१. जि. भ. कृपलानी यांना पत्र

गोपनीय

जानेवारी २८, १९४७

प्रिय प्राध्यापक,

तुमचे पत्र आणि सहपत्रे. जोपर्यंत न्याय होत नाही तोपर्यंत तुम्ही शांत बसू शकत नाही. तुम्ही पंतजी (गोविंद वल्लभ पंत), किडवाई (रफी अहमद किडवाई) आणि अखेरीस सरदार आणि जवाहरलाल यांच्याबरोबर चर्चा करायला पाहिजे. तुमचे जर कोणीही ऐकत नसेल तर तुम्ही राजीनामा द्यावा. ही पावले जर उचलण्यात आली नाही आणि तुम्ही म्हणता ते खरे असेल तर काँग्रेसचा इमला कोसळून जाईल. हे तुम्ही मी उल्लेखिलेल्या इतर पक्षांना दाखवू शकता.

प्रकृतीबद्दलचे तुमचे आश्वासन मी मान्य करतो आणि तुम्ही चांगले आहा अशी आशा करतो.

स्नेह,

बापू

फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. १०८७१. सौजन्य - जि. भ. कृपलानी.

--------------

# ३८२. अश्रफुद्दीन अहमद चौधरी यांना पत्र

काझिरखिल, पोस्ट रामगंज, जिल्हा नोआखाली,

जानेवारी २८, १९४७

प्रिय मित्र,

मी तुमच्या पत्रापर्यंत आजच पोहोचू शकलो याचा मला खेद होतो. माझ्या सततच्या हालचालीमुळे दररोजच्या पत्रांकडे लक्ष देण्यात माझी चूक झाली व ते पत्र कुठे तरी ठेवले गेले. काल दुसऱ्या कोणत्या तरी कागदपत्रांचा शोध घेताना ते योगायोगाने वर्गवारी व नोंद न केलेल्या पत्रांमध्ये सापडले. माझ्या उत्तराच्या पद्धतीवरून तुमच्या लक्षात येईल की उशीर होऊनही आपण काहीही गमावलेले नाही. अर्थात या उशिराकरिता मीच जबाबदार आहे.

तुम्ही तुमचे विचार थोडक्यात सांगितले हे फार चांगले केले. माझ्यासमोर असा दृष्टिकोन सतत असल्यामुळे तुमच्या पत्राचे उत्तर देण्यात मला अडचण वाटत नाही.

सध्याच्या परिस्थितीत पत्रके आणि पुस्तिका काढून काही फायदा होऊ शकेल असे मला वाटत नाही. ज्या लोकांचा जनतेवर काही प्रभाव आहे त्यांची मने दुर्दैवाने आधीच तयार झालेली आहेत व कोणत्याही टीकेचा त्यांच्यावर परिणाम होत नाही. समाजाच्या या अवस्थेत तुम्ही ज्या प्रकारचे काम सुचवता त्याचा काहीही उपयोग न होणे अपरिहार्य आहे. तुम्हाला माहीत असेल की अशा प्रकारचे प्रयत्न यापूर्वीही करण्यात आले होते आणि आताही करण्यात येत आहेत. माझ्या मते लक्षात यावा असा त्यांचा काहीही प्रभाव पडलेला नाही.

२. तुमच्या दृष्टीत आहे तशी स्वयंसेवक संघटना स्थापन करता येऊ शकत नाही. योगायोगाने ती स्थापन झालीच तर तिच्या स्थापनेकरिता जे प्रयत्न करावे लागले ते त्यातून वजा करावे लागतील. ही सुखद वेळ येण्यापूर्वी प्रत्येक पक्षाला वा समुदायाला प्रामाणिक मुसलमानांची आणि हिंदूंची तुकडी तयार करावी लागेल आणि कोणत्याही मानसिक अडथळ्याशिवाय ते शांततेकरिता प्रयत्न करतील. अशा निस्वार्थी लोकांच्या तुकड्यांमधून हिंदू आणि मुसलमानांची एकच तुकडी तयार झाल्याशिवाय राहणार नाही. दुर्दैवाने गणना करता यावी इतक्या प्रमाणात आपल्याजवळ असे लोक नाहीत.

अनेक मुसलमान मिशनरी असण्याबद्दल मला शंका आहे. परंतु असे फार कमी लोक जरी असतील तरी हे मूल्यवान काम करण्यापासून त्यांना अडवील असे काहीही नाही. तुम्ही म्हणता की अशा लोकांची सेवा राखून ठेवणे आवश्यक आहे. माझा साठ वर्षांचा अनुभव मला काही वेगळेच सांगतो. अशा गोष्टी राखून ठेवता येत नसतात. त्या विनामूल्य दिल्या जात असतात.

४. केवळ मुसलमान स्वयंसेवकांची संघटना तयार करता येणे शक्य आहे. दुःखद गोष्ट ही आहे की मैत्रीपूर्ण पद्धतीने अशी संघटना आतापर्यंत तयार करण्यात आलेली नाही.

५. मी आधीच सांगितले आहे की या दोघांचे मिश्रण अवेळी होईल. काँग्रेस संघटना इथे आणि इतर ठिकाणी काय करत आहे हे अर्थातच मला माहीत नाही. त्याबद्दल मला केवळ अस्पष्टशी कल्पना आहे जिचा काहीही उपयोग नाही. आशा आहे की तुमच्या सूचनांकरिता पैसा नको आहे तर योग्य पात्रता असलेले स्त्री-पुरुष हवे आहेत. ते उपलब्ध आहेत काय?

तुमचा विश्वासू,

अश्रफुद्दीन अहमद चौधरी साहेब

९७ - ए, सदर्न ॲव्हेन्यू, कलकत्ता

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

----------------

# ३८३. अमतुस्सलाम यांना पत्र

जानेवारी २८, १९४७

बेटी अमतुल सलाम,

मला तुझे पत्र मिळाले. तू अगदी चांगली व्हायला पाहिजे. तिथे जर भरपूर कताई आणि विणाई करता येत असेल तर सर्व काही साध्य होईल. आभाबद्दल बोलायचे तर मी तिला लिहीत आहे.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५७५

-----------------

# ३८४. मुसलमानांच्या प्रतिनिधीमंडळाला मुलाखत

(या प्रतिनिधीमंडळाचे नेतृत्व मुजिबूर रहमान, सचिव, नोआखाली जिल्हा मुस्लिम लीग हे करत होते. ते गांधीजींना सायंकाळी भेटले. वृत्ताप्रमाणे प्रतिनिधीमंडळाची इच्छा गांधीजींनी बिहारला भेट द्यावी अशी होती. गांधीजी हिंदू असल्यामुळे ते कुराणमधील ज्या आयती प्रार्थनेत म्हणतात त्या मुसलमानांना पसंत नाहीत असे ते म्हणाले.)

पंचगाव,

जानेवारी २८, १९४७

मी इथे जगातील सर्वात मोठी सद्भावना घेऊन आलो आहे. मला माहीत आहे की नोआखालीत जर मला अपयश आले तर माझी संपूर्ण अहिंसा अपयशी झाली असे समजावे लागेल.

गांधीजी म्हणाले की मी जनतेचा माणूस आहे, जनतेकरिता मी आहे आणि मला जनतेशी पूर्णपणे एकरूप व्हायचे आहे. जनतेजवळ अधिक परिणामकारक पद्धतीने कसे पोहोचता येईल हे जर तुम्ही सांगाल तर मी तुमचे ऐकायला तयार आहे. परंतु मी नोआखाली कोणत्याही अवस्थेत सोडू शकत नाही.

इतर जे लोक नोआखालीत काम करत आहेत ते शांतता स्थापित करण्याच्या मार्गात खरोखरच अडथळा निर्माण करणारे आहेत काय हे शोधून काढणे सरकारचे काम आहे.

बिहारला जाण्यासंबंधीच्या प्रश्नाचा उलेल्ख करत गांधीजी म्हणाले की मी बिहारमध्ये जावे असे मुस्लिम लीगच्या वर्तुळामधील लोकांचे मत आहे हे मला माहीत आहे. परंतु मुसलमानांकरिता जे काही करता येणे शक्य ते सर्व मी नोआखालीत राहूनच करतो आहे. यासंबंधात मी बिहार सरकारच्या सतत संपर्कात आहे आणि आता त्या सरकारचे प्रतिनिधी माझ्याबरोबर प्रवास करत आहेत. मी जर आता बिहारमध्ये गेलो आणि बिहार सरकारने जे काही करणे आवश्यक आहे असे तिथे गेल्यानंतर मला आढळले तर मला तसे सांगावे लागेल आणि मग त्या गोष्टीची मुस्लिम लीगला मदत होऊ शकणार नाही.

मुसलमानांना इथे मोठ्या प्रमाणात जी अटक करण्यात आली आहे त्यासंबंधात गांधीजी म्हणाले की सुधारकाचे कर्तव्य शारीरिक शिक्षेऐवजी अपराध्याची सद्सद्विवेकबुद्धी जागृत करणे असते. मी आयुष्यभर याकरिता प्रयत्न करत राहिलो आहे पण अनेक प्रकरणी मला यश आलेले नाही. अपराधी आपला अपराध कबूल करतील अशा प्रकारे अपराध्यांची विवेकबुद्धी जागृत करणे हे तुमचेसुद्धा कर्तव्य आहे. जोपर्यंत असे होत नाही तोपर्यंत गुंडांच्या प्रमुखांना अटक व्हायला पाहिजे.

प्रार्थना घेण्यासंबंधात गांधीजी म्हणाले की आपल्यामध्ये जर इतकी असहिष्णुता असेल की माणसाला आपल्या इच्छेप्रमाणे प्रार्थना करता येणार नसेल तर गरीब बिचाऱ्या हिंदुस्थानच्या नशिबी काय आहे हे मला कळू शकत नाही. एका धर्मनिष्ठ मुसलमान भक्ताच्या इच्छेप्रमाणे कुराणमधील पाठाचा प्रार्थनेत समावेश करण्यात आला होता. अर्थातच इस्लामच्या शिकवणुकीच्या विरोधात माझी काहीही करण्याची इच्छा नाही. परंतु प्रार्थनेमध्ये कुराणमधील वचन म्हणणे हे कुराणच्या शिकवणुकीनुसार आहे की नाही हे मी एका वा पाचसहा व्यक्तींच्या गटाच्या म्हणण्यावरून मान्य करणार नाही.

'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', एप्रिल ३०, १९४७

--------------

## ३८५. प्यारेलाल यांना पत्र

जानेवारी २९, १९४७

चि. प्यारेलाल,

शहापूरसंबंधीच्या तुझ्या टिपणाला उत्तर द्यायला मी विसरलो. मला फार घाईघाईत काम उरकावे लागते. डॉ. गुप्तांच्या समितीत सामील हो. परंतु स्थानिक मुसलमान डॉक्टरांचा बहिष्कार करण्यात येऊ नये हे स्वतः गुप्तांनाच सांगायला पाहिजे. स्थानिक डॉक्टर समितीवर का नसावे? मुसलमानांचासुद्धा तू सल्ला घेतला पाहिजे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

---------------

# ३८६. अमतुस्सलाम यांना पत्र

पंचगाव,

जानेवारी २९, १९४७

प्रिय बेटी,

मला तुझे पत्र मिळाले. आभाच्या आजाराबद्दल वाचून वाईट वाटले. कोणत्याही गोष्टीकरिता आभाला त्रास का द्यावा? लेखी विचार. विनाकारण जाणे वा कोणाला पाठवणे चांगले नाही. माझ्या मते तू लहानसा दवाखाना सुरू करू नये वा चालवू नये. काही दिवस हालचालीबद्दलसुद्धा बोलू नको. बिहारमधून मला कोणतेही पत्र आले नाही. सोबत मी मुस्लिम लीगचा अहवाल पाठवत आहे. पाहिल्यानंतर तो परत कर.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५७४

--------------

# ३८७. प्रार्थना प्रवचन

("गांधीजीज वाकींग टूर डायरी"मधून उद्धृत)

जयंग,

जानेवारी २९, १९४७

**काही मुसलमान मित्रांनी उपस्थित केल्या प्रश्नासंबंधी गांधीजींनी सुरुवातीला चर्चा केली. आम्ही प्रार्थना सभेला यावे असे तुम्हांला वाटते काय असा प्रश्न त्यांनी गांधीजींना विचारला होता. गांधीजींनी उत्तर दिले की मी हिंदूंना वा मुसलमानांना प्रार्थना सभेत येण्याचा आग्रह करत नसतो. मुसलमानांनी प्रार्थना सभेला आलेले मला आवडेल काय असा जर तुमचा प्रश्न असेल तर ते प्रार्थनासभेला आलेले मला आवडेल असे उत्तर मी निःसंकोचपणे देईन. इतकेच नाही तर अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या माझ्या या प्रार्थना सभांमध्ये अनेक मुसलमान बंधूभगिनी विनासंकोच हजेरी लावत आलेले आहेत. दुसरा प्रश्न होता मुसलमान नसतानाही तुम्ही कुराणमधील पाठ म्हणता आणि रहीम आणि करीम यांची तुलना करून तुम्ही राम आणि कृष्ण यांच्याशी त्यांचा मेळ घालता हे तुम्हाला चूक वाटत नाही काय. ते म्हणाले की आम्हा मुसलमानांच्या कानांना ही गोष्ट सहन होत नाही. गांधीजींनी उत्तर दिले की या आक्षेपाने मला दुःखद धक्का दिला. या आक्षेपातून मनाची संकुचितता दिसते. तुम्हांला कळायला पाहिजे की कुराणमधील या पाठांचा समावेश मी अतिशय धार्मिक प्रवृत्तीच्या रैहाना तैय्यबजी यांच्या सांगण्यावरून केला होता. असे करण्यामागे त्यांचा कोणताही राजकीय हेतू नव्हता. लोक म्हणतात तसा मी कोणताही अवतार नाही. मी तर ईश्वराचा अगदी लहानात लहान भक्त आहे. माझा उद्देश मुसलमानाला अधिक चांगला मुसलमान करणे, हिंदूंना अधिक चांगला हिंदू करणे, ख्रिश्चनांना अधिक चांगला ख्रिश्चन करणे, पारसींना अधिक चांगला पारसी करणे आहे. मी कोणालाही आपला धर्म बदलण्याकरिता आमंत्रिले नाही. यामुळे माझा धर्म इतका व्यापक आहे की त्यात विश्वातील सर्व धर्मग्रंथातील पाठांनाही स्थान आहे हे पाहून प्रश्नकर्त्याला आनंद होईल असे मला वाटले होते.**

**दुसरी गोष्ट अशी आहे की मुसलमान अपराध्यांविरुद्ध हिंदूंनी भरलेल्या या सर्व खटल्यांमुळे या दोन समुदायांत शांतता प्रस्थापित करण्याकरिता अडचणी येत आहेत असे काही मित्रांचे म्हणणे आहे. मला या गोष्टीचे आश्चर्य वाटते. अपराध्यांविरुद्ध खटले चालवले जात असतील तर त्याचा सज्जन लोकांमधील शांतता संबंध प्रस्थापित करण्यावर का परिणाम व्हावा? खोटे खटले काढून घ्यावे असे जर हे मित्र म्हणाले असते तर ती गोष्ट मी समजू शकलो असतो व आक्षेपकांना अंतःकरणापासून साथ दिली असती. पुढे जाऊन गांधीजी म्हणाले की अशा सर्व व्यक्तींवर खोटे खटले चालवण्याबद्दल कारवाईसुद्धा करण्यात यावी असेही मी म्हणालो असतो. दोषी लोकांनी जाहीरपणे आपली चूक कबूल करून जनतेने दिलेली शिक्षा मान्य करणे हाच न्यायालयीन कारवाईपासून वाचण्याचा मार्ग असेल. असे काही आंदोलन झाले तर मी त्याला आनंदाने मदत करीन.**

**तिसरी गोष्ट ही आहे की जे तरुण कलकत्ता वा इतर ठिकाणी नोकरीच्या शोधाकरिता जातात त्यांनी आपला काही वेळ गावांकरिता दिला पाहिजे. आपसात बसून विचारविनिमय करून काही व्यवस्था करणे हा याकरिता सर्वात सोपा मार्ग आहे. उदाहरणार्थ त्यांच्यातील निम्मे लोकांनी आपल्या कार्यालयातून सुटी घेऊन काही महिने गावाची सेवा करावी आणि त्यानंतर राहिलेल्या निम्मे लोकांनी सुटी घेऊन गावाची सेवा करावी अशी व्यवस्था ते करू शकतात. त्यांच्यात जर इच्छा असेल तर खेड्यांची सेवा करण्याचा कोणता ना कोणता मार्ग निघाल्याशिवाय राहू शकत नाही. ज्यांना वैयक्तिक सेवा करता येणे शक्य होणार नाही ते पैशाने मदत करू शकतात.**

**अखेरीस इंग्लंड, रशिया आणि इतर देशांचे उदाहरण देत गांधीजी म्हणाले की तिथे प्रत्येक कुटुंबातून शारीरिक दृष्टीने सक्षम असलेल्या स्त्रीपुरुषांना देशाच्या रक्षणाकरिता पाठवण्यात येते. अशा प्रकारे अंतःकरणापासूनचे ऐक्य स्थापित केल्या जात असते. मी आशा करतो की आपण लोकसुद्धा तुच्छ वैयक्तिक स्वार्थाच्या वर उठून अशा ऐक्याची स्थापना करू की ज्याशिवाय जीवन जगण्यायोग्य राहत नाही.**

'हरिजन', फेब्रुवारी २३, १९४७

----------------

# ३८८. जवाहरलाल नेहरू यांना पत्र

काझिरखिल, पोस्ट रामगंज, जिल्हा नोआखाली,

जानेवारी ३०, १९४७

प्रिय जवाहरलाल,

कटनीचे श्री भार्गव यांनी दिलेल्या प्रस्तावासंबंधीचे मला तुझे या महिन्याच्या २० तारखेचे पत्र मिळाले (पूर्व बंगालमधील १०० ते २०० हिंदू कुटुंबांना ठेवता येईल व व्यवस्था करता येईल असे घर पाहू शकण्याचा प्रस्ताव बी. के. भार्गवांनी दिला होता.). या सद्गृहस्थांनी मला तेव्हाच लिहिले असावे जेव्हा त्यांनी तुला पत्र लिहिले होते आणि मी त्यांना ताबडतोब उत्तर दिले होते. मी लिहिलेल्या पत्राची प्रत मला सापडत नसल्यामुळे मी काय लिहिले होते ते मला आठवत नाही. परंतु त्याचा आशय पूर्व बंगालमधून एकाही कुटुंबातील स्त्रीची इच्छा बाहेर जाण्याची नाही हाच होता. त्यांच्या प्रस्तावातील हिंदू शब्दावर भर देणे मला आवडले नाही असेही मी त्यांना लिहिले होते असे मला वाटते. माझ्या पदयात्रेत दुःखी लोकांना पूर्व बंगाल सोडण्याची इच्छा आहे असे मला आढळले नाही. आणि तसे करणे सुज्ञपणाचे होईल असेही मला वाटत नाही. भीतीमुळे आपल्या गावी परतण्याची त्यांच्यात जर हिंमत नसेल तर बंगालच्या इतर भागात त्यांना सामावून घेता येऊ शकेल. लोक मोठ्या संख्येत आधीच आसाममध्ये गेलेले आहेत. काही बिहारमध्ये गेले आहेत कारण बिहारमध्ये बंगाली लोकांची बरीच वस्ती आहे. त्यांना त्यांच्या गावात परत पाठवण्याचा प्रयत्न आहे, त्यांची भीती घालवावी आणि परत त्यांना त्यांच्या पूर्वजांच्या घरात वसवावे असा माझा स्वतःचा प्रयत्न आहे. असे जरी असले तरी कोणाची जर कटनीला जाण्याची इच्छा असेल, ज्याची शक्यता नाही, तर मी श्री भार्गव यांचा प्रस्ताव लक्षात ठेवीन.

आशीर्वाद,

बापू (हे देवनागरीत आहे)

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

-------------

# ३८९. अमतुस्सलाम यांना पत्र

जानेवारी ३०, १९४७

प्रिय बेटी,

मला तुझे पत्र मिळाले. आभाबद्दल मला वाईट वाटते. ती का आजारी पडली? सुशीलाबेन इथे आहे. येथून परतत असताना आभाला पाहण्याचा तिचा विचार आहे. मी एक बंगाली निसर्गोपचारक कुलरंजन यांना तुझ्याकरिता बोलावले आहे. तो कदाचित तुला आज भेटेल. त्यांच्याशी सविस्तर आणि मोकळेपणाने चर्चा कर व ते काय म्हणतात ते ऐकून घे. ते जर तुला काही नवीन सांगत असतील व तुला तसा प्रयत्न करावासा वाटत असेल तर कर. ते केवळ पैशाकरिता काम करत नाहीत. यामुळे तुला जर त्यांच्याकडून काही असे समजून घेण्यासारखे वाटेल की जे गावांकरिता उपयुक्त असेल तर त्याकडे लक्ष दे. त्यांना सर्व संबंधित प्रश्न विचार. तुझी प्रकृती चांगली आहे हे ऐकून मला फार आनंद झाला. माझ्या प्रकृतीबद्दल बोलायचे तर ती चांगली आहे. मी जगावे अशी ईश्वराची इच्छा असेल तोपर्यंत तो मला चांगला ठेवील.

आशीर्वाद,

बापू

ता. क. आभाला आशीर्वाद

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५७६

---------------------

# ३९०. प्रार्थना प्रवचन

("गांधीजीज वाकिंग टूर डायरीमधून उद्धृत")

आमकी,

जानेवारी ३०, १९४७

**१५ मिनीट उशीर झाल्याबद्दल माफी मागून गांधीजींनी सुरुवात केली. ते म्हणाले की झमन साहेब आणि युसूफ साहेब यांच्याबरोबरच्या कामात गुंतल्यामुळे हा उशीर झाला होता. या अधिकाऱ्यांनी तयार केलेल्या एका लहानशा घराचा नमुना पाहण्याकरिता मी गेलो होतो. ते चांगले घर होते परंतु हिंदुस्थानच्या वातावरणात राहण्यासारखे ते घर नव्हते. अशा घराचे वर्णन पेटी म्हणून करता येईल. त्यात राहणारे लोक भट्टीत टाकल्यासारखे भाजतील आणि लोकांना घराची दारेखिडक्या बंद करण्याची सवय असल्यामुळे ते तसे करतील तर त्यांचा जीव गुदमरेल. यामुळे मी तर त्यांना बांबू, गवत आणि छप्पर असलेले आरामशीर घर बांधण्याचा सल्ला दिला आहे. अशा घरातून मोकळा वारा फिरेल, ते थंड राहील व हिंदुस्थानच्या वातावरणात, विशेषतः नारळ आणि सुपारीच्या उंचउंच झाडात ते कलात्मक दिसेल.**

**या अधिकाऱ्यांनी जेव्हा मला सांगितले की निर्वासित आपापल्या छावण्यांमधून घरी परतू लागले आहेत तेव्हा मला फार आनंद झाला. लोक अशाच उत्साहाने परतत राहतील अशी मला आशा आहे. लोकांनी आपल्या मनातील भीती घालवली पाहिजे आणि आपल्या देशबांधवांमध्ये त्यांना सुरक्षित वाटले पाहिजे, मग ते देशबांधव हिंदू असो की मुसलमान. ते जेव्हा केवळ निर्मात्याला घाबरणे शिकतील तेव्हा ते आपल्या बांधवांना घाबरणे बंद करतील. मग त्यांच्या लक्षात येईल की आपण स्वतःला घाबरलो तर जगात घाबरण्यासारखे काहीही नाही. माझ्या गत साठ वर्षांच्या जीवनात मला सतत हा अनुभव येत राहिला आहे.**

**गांधीजींनी चर्चेकरिता घेतलेला तिसरा प्रश्न कोळी लोकांबद्दलचा होता. गांधीजी म्हणाले की मला काही कोळी काल सायंकाळी भेटले आणि त्यांनी तक्रार केली की बहुसंख्याक समुदायाने जर आमचा बहिष्कार केला तर आम्हांला या भागात राहता येणे कठीण होईल कारण वर्षातील बहुतांश काळ आम्हांला लोकांच्या खाजगी तलावातच मासेमारी करावी लागत असते. गोष्ट इथपर्यंत पोहोचली हे पाहून मला आश्चर्य वाटले. निसर्गाने दिलेल्या वरदानाने भरलेल्या या भागात हिंदू आणि मुसलमान सध्याच्या आपल्या राजकीय मतभेदापासून वर उठले नाही आणि त्यांनी परत माणुसकी आणि बंधुभाव या गोष्टी आत्मसात केल्या नाही तर लोकांना इथे जगणे कठीण होईल. यामुळे मी आशा करतो की येथील सगळ्या लोकांनी मिळून केलेल्या प्रयत्नामुळे या परिस्थितीत सुधारणा होईल आणि गावांमध्ये खरी शांतता स्थापित होईल.**

हरिजन, फेब्रुवारी २३, १९४७

# ३९१. एम. इस्माईल यांना पत्र

काझिरखिल, पोस्ट रामगंज, जिल्हा नोआखाली,

जानेवारी ३१, १९४७

प्रिय महोदय,

मला तुमचे २१ तारखेचे पत्र आणि त्याबरोबर तुम्ही सुऱ्हावर्दी साहेबांना आणि मला पाठवलेल्या तारांच्या प्रती (तारेत लिहिले होते : "मद्रासच्या उलेमांची सभा प्राथमिक मुस्लिम लीगच्या अंतर्गत रॉयपेट, मद्रास इथे झाली. तिच्यात इस्लामिक कायदा आदर्श आहे असे घोषित करण्यात आले. इस्लामच्या विरोधात काही घोषणा करण्याचे थांबवा. मुसलमान राष्ट्र इस्लामच्या शिकवणुकीत हस्तक्षेप केलेला सहन करणार नाही.") हे सर्व साहित्य मिळाले. विवेकाच्या या युगात तुम्ही इस्लामला विवेकी टीकेपासून,विशेषतः ती टीका इस्लामचा मित्र म्हणवणाराने जरी केलेली असली तरी, का दूर ठेवू इच्छिता? मी जे म्हणालो ते पैगंबरांच्या शिकवणुकीशी सुसंगत आहे असा माझा दावा आहे. आज हिंदुस्थानच्या विविध भागात ज्या पद्धतीने पडदा पाळला जातो ते पडद्याचे विडंबन आहे. खरा पडदा हा अंतःकरणाचा असतो. तुम्ही उल्लेख केलेल्या सभेत मी त्याबद्दलच बोललो होतो.

वर्तमानपत्रांमध्ये माझ्याबद्दल जे लिहून येते त्या सर्वाकरिता तुम्ही मला जबाबदार धरणार नाही अशी आशा आहे. ते सर्व वाचण्याकरितासुद्धा मला वेळ मिळत नसतो. सभेत मी जे काही म्हणालो होतो त्यावर गत अर्ध्या शतकापासून माझा विश्वास आहे आणि मी ते सांगत असतो. मी जे म्हणालो ते मी माझ्या मुसलमान मित्रांकडूनच शिकलो आहे हेसुद्धा मी तुम्हाला सांगेन.

तुमचा विश्वासू,

एम. इस्माईल साहेब,

मद्रास.

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

-----------------

# ३९२. मनू गांधींना चिठ्ठी

जानेवारी ३१, १९४७

तू मला किती वेळ ताटकळत ठेवले! मी तिथे नारळ धरून बसलो होतो. मग थकलो आणि नारळ खाली ठेवला. माझ्याकरिता हे जड होते. शिवाय तू माझे काम थोपवून ठेवले. तू थोडीशी वाट पाहायला पाहिजे होती वा भांडे हाताशी ठेवायला पाहिजे होते. शिवाय जमीनही घाणेरडी होती.

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

-----------------

# ३९३. महिलांच्या सभेत भाषण

(ही सभा गांधीजी ज्या घरात राहत होते त्याच्या अंगणात दुपारी झाली होती.)

नवग्राम,

जानेवारी ३१, १९४७

एका वृद्ध स्त्रीने गांधीजींना विचारले - आम्हाला धर्मांतराची धमकी देण्यात आली तर आम्ही काय करावे?

गांधीजी म्हणाले की माझ्याकरिता याचे उत्तर सोपे आहे. धर्म हा जीवनाचा श्वास आहे आणि कोणी जीव घेण्याची जर धमकी दिली तरी माणूस श्वास घेण्याचा अधिकार सोडू शकत नाही. यामुळे कोणी मारून टाकण्याची जरी धमकी दिली तरी माणूस आपल्या श्रद्धेचा त्याग करू शकत नाही.

माणूस, मग तो पुरुष असो की स्त्री, दुसऱ्या कोणाच्या आज्ञेमुळे आपला धर्म टाकून देत असेल तर त्याचा कोणताही धर्म राहत नाही. गांधीजी पुढे म्हणाले की दुर्दैवाने हिंदुस्थानची अशी अवस्था झाली आहे. काही हिंदुस्थानी आपला तथाकथित प्रिय धर्म सहजपणे टाकून देतात. धर्म हा माणसाचा श्वास आहे. कोणी जर धमकीमुळे आपला धर्म टाकून देईल तर तो पशुत्वाच्या पातळीवर जाईल. (यानंतरचा भाग ''एकलो जानो रे''मधून भाषांतरित करून घेतला आहे.)

स्त्रियांपैकी एकीने विचारले - एखाद्या स्त्रीच्या पतीने संन्यास घेतला असेल तर तिने काय करावे?

गांधीजी म्हणाले की अशा स्त्रीने अतिशय पवित्र जीवन व्यतीत केले पाहिजे, आपली भाकरी स्वतः कमावली पाहिजे. तिने संचय करायला नको आणि अतिशय आवश्यक साहित्यच ठेवायला पाहिजे. भगवे वस्त्र घालूनच माणूस संन्यासी होतो असे नाही. अजून काही सुचत नसेल तर चरखा चालवायला पाहिजे. चरख्याला मी कामधेनू संबोधले आहे. कताई करताकरता रामनामाचा जप केला पाहिजे. माझ्या मते असा संन्यास पतीच्या संन्यासापेक्षा किती तरी श्रेष्ठ होईल. ग्रामसफाई, मुलांची स्वच्छता अशा सेवेच्या कामात तिने लागायला पाहिजे. असे म्हणतात की रिकामे मन भूताचे घर. अशीच काही तरी बंगालीतही म्हण असली पाहिजे. काहीही न करता आपण आळशीपणात बसून राहिलो तर हजारो कुविचार मनात गर्दी करतील. यामुळे माणसाने नेहमी स्वतःला कोणत्या ना कोणत्या कामात गुंतवून ठेवले पाहिजे. या समस्येवर हाच सर्वोत्तम उपाय आहे.

'द संडे हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', फेब्रुवारी २, १९४७; आणि 'एकलो जानो रे', पृष्ठ. ११०

# ३९४. प्रार्थना प्रवचन

("गांधीजीज वाकिंग टूर डायरी"मधून उद्धृत)

नवग्राम,

जानेवारी ३१, १९४७

**गांधीजी म्हणाले की आज तुम्ही प्रार्थनेत इतक्या मोठ्या संख्येत गोळा झाला आणि तरीही शांत राहिला याकरिता मी तुमचे अभिनंदन करतो. मला मुसलमानांनी दोन पत्रे मिळाली आहेत. मला धीर देत त्यात लिहिले आहे की पडदा वा इस्लामशी संबंधित इतर कोणत्याही गोष्टीसंबंधी तुम्हाला बोलण्याचा काहीही अधिकार नाही अशा प्रकारची जी टीका तुमच्यावर केली जात आहे तिला तुम्ही घाबरण्याचे कारण नाही. कुराणमधील वचनाचा आधार घेत त्यांनी लिहिले आहे की इस्लाम अतिशय व्यापक आणि सहिष्णू धर्म आहे. इस्लाम टीकेचे स्वागत करतो आणि जगाला इस्लामचा अभ्यास करण्याकरिता आवाहन करतो. त्यांतील एक जण तर लिहितो की जगात कोणताही समूह वा देश पैगंबरांशिवाय राहिलेला नाही. मी या पत्रांची चर्चा करतो आहे कारण मला तुम्हांला  दाखवायचे आहे की सर्व मुसलमानांमध्ये एकसारखीच असहिष्णुता नाही. ते दोन लेखक निष्पक्ष आहेत असे वाटत असल्यामुळे तुम्ही लोक, ज्यात मुसलमान मोठ्या संख्येत आहेत, त्या दोन लेखकांच्या म्हणण्याचे कौतुक कराल अशी मी आशा करतो .**

**यानंतर काही कार्यकर्त्यांनी गांधीजींना जे प्रश्न विचारले होते त्यांची चर्चा गांधीजींनी केली.**

**हिंदू कारागिरांचा आणि हस्तकौशल्याचे काम करणाऱ्या लोकांचा मुसलमान बहिष्कार करत आहेत आणि मासेमारी, कातडीचा व्यापार, देवदारचा व्यापार, पानांची शेती वगैरे व्यवसाय ते करू लागले आहेत. दोन्ही समुदायात शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून काम करणाऱ्या आम्हा कार्यकर्त्यांनी अशा परिस्थितीत काय करावे हे कळत नाही.**

**गांधीजी म्हणाले की या बातमीत अतिशयोक्ती असावी असे मला वाटते व हा बहिष्कार काही थोड्याशा लोकांपर्यंतच सीमित असावा असे मी समजतो. तो टिकू शकत नाही. याची तार्किक परिणती मुसलमान बहुसंख्य असलेल्या प्रांतांमधून हिंदूंना बाहेर जाण्याकरिता भाग पडण्यात होऊ शकते. परंतु कोणत्याही पुढाऱ्याने या गोष्टीचा पुरस्कार केलेला वा त्याच्या मनात असा विचार आला असल्याचे मी कधीही ऐकले नाही. ज्या लोकांनी मला ही बातमी सांगितली त्यांनी याची सूचना अधिकाऱ्यांना द्यावी. बहिष्कार करणारांना शिक्षा व्हावी म्हणून असे करायचे नाही तर यासंबंधात शासनाने आपले धोरण जाहीर करावे म्हणून असे करायचे आहे. दोन्ही समुदायांना सुबुद्धी सुचावी म्हणून प्रार्थना करण्याकरिता गांधीजींनी श्रोत्यांना विनंती केली.**

**दुसरा प्रश्न होता : जमीनदारांना शेतीतील पिकाचा अर्धा वाटा मिळत असे, तो आता एकतृ‍ियांश करावा म्हणून आता आंदोलन सुरू आहे** (हे आंदोलन तेभागा आंदोलन म्हणून प्रसिद्ध होते; शिवाय पाहा "कृषक समितीच्या प्रतिनिधींशी चर्चा", जानेवारी २४, १९४७). **यासंबंधी तुमचे काय मत आहे?**

**जमीनदाराचा पिकातील हिस्सा निम्मेवरून एकतृतियांश करण्याच्या आंदोलनाचे गांधीजींनी स्वागत केले. ते म्हणाले की हे महत्त्वपूर्ण आंदोलन आहे.** (यापुढील पाच वाक्ये 'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड'मधून घेतलेली आहेत.) **मी तर म्हणेन की कसणारालाच संपूर्ण पीक मिळायला पाहिजे. माझा तर विश्वास आहे की कोणीही भूमीच्या मालकीचा दावा करू शकत नाही. ती केवळ ईश्वराची आहे. यापढे जाऊन मी म्हणेन की जो जमीन कसत नाही त्याला त्या जमिनीतून निघणाऱ्या पिकावर दावा करण्याचा कोणताही अधिकार नाही. जे मेहनत करतात त्यांचाच पिकावर अधिकार असतो. परंतु कोणत्याही परिस्थितीत माणसाला जमिनीवरील मालकीचा दावा करता येऊ शकत नाही. जमीन आपणा सर्वांच्या ईश्वराची आहे आणि म्हणून तिच्यावर जो काम करतो त्याची आहे. परंतु ही आदर्श व्यवस्था निर्माण होईपर्यंत जमीनदाराचा हिस्सा कमी करण्याचे जे आदोलन सुरू आहे ते योग्य दिशेने सुरू आहे. परंतु या आंदोलनात बळजबरी वा हिंसा यांचा उपयोग केला जाऊ नये.**

**हिंसेत माझी कोणतीही भूमिका असू शकत नाही. ही सुधारणा केवळ निरोगी जनमतजागृतीनेच करता येऊ शकते. सुधारकांमध्ये धीर असला पाहिजे. 'जसे साध्य तसे साधन' या वचनावर माझा पूर्ण विश्वास आहे. साध्य चांगले असेल तर मग साधन कितीही हिंसक वा अन्याय्य असले तरी हरकत नाही या मतावर माझा विश्वास नाही. संशियत साधनांमळे अनेक आंदोलनांचा दुःखद अंत झाला आहे.**

'हरिजन', फेब्रुवारी २३, १९४७; आणि 'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड' फेब्रुवारी २, १९४७

---------------

# ३९५. अतिंद्र मोहन रॉय यांना पत्र

फेब्रुवारी १, १९४७

प्रिय अतिनबाबू (सचिव आणि कोषाध्यक्ष, टिपरा जिल्हा मदत निधी),

तुम्ही विचारता तसा कोणताही प्रशिक्षक माझ्याजवळ नाही. (ग्रामिणांना आत्मरक्षणाचे शिक्षण देऊ शकेल अशा प्रशिक्षकाबद्दल अतिंद्र मोहन रॉय यांनी गांधीजींकडे चौकशी केली होती.). माझे कार्य याच्या विपरीत दिशेत चालत असते. अहिंसक प्रतिकार अमोघ असल्यामुळे हा प्रतिकार सर्वोच्च आहे. याकरिता कोणत्याही प्रशिक्षकाची आवश्यकता नसते. आणि देशाच्या या भागात कोणत्या तरी शस्त्राने आत्मरक्षण करणे शिकणे हे एक प्रकारे आत्मघात करण्यासारखे आहे. असो, या कामाकरिता मी अयोग्य माणूस आहे.

तुमचा विश्वासू,

मो. क. गांधी

इंग्रजी फोटोप्रतीवरून. जी. एन. १०५३०

-----------------

# ३९६. सतीश चंद्र मुखर्जी यांना पत्र

फेब्रुवारी १, १९४७

**प्रिय सतीश बाबू** (१८६५-१९४८, स्वदेशी आणि राष्ट्रीय शिक्षण यांच्या प्रणेत्यांमधील एक; कलकत्त्याहून प्रकाशित होणारे मासिक डॉनचे संपादक, १८९७-१९१३; १९२२साली गांधीजींच्या अटकेमुळे ते साबरमतीला गेले, तिथे दोन महिने राहिले आणि 'यंग इंडिया'च्या प्रकाशनात मदत केली; नंतर आध्यात्मिक क्षेत्राकडे वळले व 'नंगा बाबा' म्हणून परिचित झाले.),

तुमचे प्रेमळ पत्र (सतीश चंद्र मुखर्जी यांच्या पत्रातील उताऱ्यांकरिता पाहा "सतीश चंद्र मुखर्जी यांचे पत्र", जानेवारी १४, १९४७). तुम्ही म्हणता ते मला मान्य आहे, इतकेच की मी कदाचित या सर्व गोष्टी वेगळ्या पद्धतीने मांडल्या असत्या आणि त्या सगळ्यांचा एकाच गोष्टीत समावेश केला असता. परंतु यामुळे तुमच्या प्रस्तावाची किंमत कमी होत नाही. खेद याचाच होतो की या अवस्थेपासून मी फार दूर आहे. परंतु याचबरोबर त्या अवस्थेकडे मी वेगात जात आहे. मी जर त्या अवस्थेपर्यंत पोहोचलो वा तिच्याजवळ जरी पोहोचलो (म्हणजे माणूस जोपर्यंत पोहोचू शकतो तोपर्यंत) तरी  नोआखालीची समस्या सहजपणे सुटेल. काय होते ते पाहू या.

तुम्हाला मला जेव्हा काही सांगायची इच्छा होईल तेव्हा मला लिहिण्यात वा माझ्याकरिता लिहवून घेण्यात कृपाकरून संकोच करू नका. तुमच्या संदेशाचे मला कधीही ओझे होणार नाही हे लक्षात ठेवा.

आणि आता मी तुमच्यासमोर एक समस्या ठेवतो. एक तरुण मुलगी (१९ वर्षांची), जी नात्याने माझ्या नातीसारखी आहे, माझ्याच अंथरुणात झोपते. असे पाशवी इच्छांच्या पूर्तीकरिता करण्यात येत नाही तर वैध नैतिक कारणांकरिता करण्यात येते.  तिचा दावा आहे की या वयातील मुलींना सामान्यपणे ज्या स्त्रीसुलभ भावना असतात त्या तिच्यात नाहीत आणि माझासुद्धा अभ्यस्त ब्रह्मचारी असल्याचा दावा आहे. या जवळीकीत तुम्हाला काही वाईट अथवा असमर्थनीय दिसते काय? मी हा प्रश्न विचारतो आहे कारण माझ्या काही अगदी जवळच्या मित्रांना ही गोष्ट समर्थनीय तर वाटत नाहीच उलट तो ब्रह्मचर्याचा भंगही वाटतो. माझा दृष्टीकोन अगदी याविरुद्ध आहे. तुम्ही अनुभवी माणूस असल्यामुळे आणि तुमच्या मतांबद्दल मला आदर असल्यामुळे मी तुम्हाला हा प्रश्न विचारतो आहे. उत्तराकरिता तुम्ही तुमचा वेळ घेऊ शकता.तुम्हाला याचे उत्तर द्यायचे नसेल तर तुम्ही याचे उत्तर दिलेच पाहिजे असे तुमच्यावर बंधन नाही.

तुम्ही चांगले असाल अशी आशा आहे.

तुमचा,

बापू

मुळावरून. सी. डब्ल्यू. १०५५७

# ३९७. वल्लभभाई पटेल यांना पत्र

फेब्रुवारी १, १९४७

चि. वल्लभभाई,

या दोन मित्रांनी मला त्यांची दुःखद कहाणी सांगितली. मी त्यांना काय सांगू शकतो वा करू शकतो? ते जे म्हणतात ते खरे असेल तर ही दुःखद गोष्ट आहे. त्यांनी तुमच्याकरिता ओळखपत्र मागितले; यामुळे मी त्यांना हे देत आहे.

तुम्ही चांगले असाल अशी आशा आहे.

आशीर्वाद,

बापू

सरदार वल्लभभाई पटेल

१, औरंगजेब रोड,

नवी दिल्ली

गुजरातीवरून. बापूना पत्र - २ : सरदार वल्लभभाईने, पृष्ठ ३४७

------------

# ३९८. मणिलाल गांधी यांना पत्र

फेब्रुवारी १, १९४७

चि. मणिलाल,

मला तुझे सुंदर पत्र मिळाले. तू तुझ्या आहारात चांगले बदल केले आहेत असे दिसते. मला ते आवडले. माझी तपश्चर्या त्या डोंगरासारखी आहे जे दुरून सुंदर दिसतात. मला कोणताही त्रास होत नाही. लोक दररोज येऊन मला भेटतात. माझ्या अंहिसेची सत्त्वपरीक्षा होत आहे. ते काहीही असले तू काळजी करू नको. तू तुझे कर्तव्य करत राहा. मनू माझ्याबबरोबर झोपते यामुळे अस्वस्थ होऊ नको. ईश्वरानेच मला हे पाऊल उचलण्याकरिता प्रेरित केले आहे असा माझा विश्वास आहे. तू जर समजू शकत नसशील तरी अस्वस्थ होऊ नको आणि मला सहन कर. मी हे लिहिले आहे कारण किशोरीलाल आणि इतर अस्वस्थ झाले आहेत. मला याकरिता काहीही कारण दिसत नाही. मला वाटते की सुशीला पहिली संधी मिळताच तिथे येईल.

आशीर्वाद,

बापू

गुजरातीवरून. सा. डब्ल्यू. १४४५. सौजन्य - सुशीला गांधी

---------------

# ३९९. सुशीला गांधी यांना पत्र

फेब्रुवारी १, १९४७

चि. सुशीला,

मला तुझे पत्र मिळाले. आता तू फिनिक्सला लवकरात लवकर जाणे आवश्यक आहे. मला भेटण्याची इच्छा सोड. इथे येऊन मला भेटणे ही काही गंमत नाही. यात तुझा किती तरी वेळ जाईल आणि पैशाचाही नासोडा होईल. याशिवाय मी गावोगावी हिंडत असेन. अशा परिस्थितीत आपण वैयक्तिक बाबतीत कोणती चर्चा करू शकू? आणि मग तू इथे येऊन काय मिळवशील? मनू माझ्याबरोबर झोपते यामुळे तू अस्वस्थ होऊ नये असे मला वाटते. परंतु किशोरीलाल सारखा माणूस जर अस्वस्थ झाल्याशिवाय राहू शकत नसेल तर तू अस्वस्थ झाली नाही तरच नवल. (हे पत्र अपूर्ण आहे.)

गुजरातीवरून. सी. डब्ल्यू. १४४४. सौजन्य - सुशीला गांधी

-----------------

# ४००. “द हिंदू”ला मुलाखत

नवग्राम,

फेब्रुवारी १, १९४७

गांधीजी म्हणाले की हिंदू आणि मुसलमान यांचे जेव्हा अंतःकरणापासून ऐक्य होईल तेव्हा माझे कार्य झाले असे मी समजेन आणि हे ऐक्य जोपर्यंत स्थापित होत नाही तोपर्यंत मला या भागात फिरत राहावे लागणार आहे.

गांधीजी म्हणाले की मी ज्या अहिंसेचे पालन करतो ती अहिंसा खरोखरच शूरांची अहिंसा आहे की नाही याची परीक्षा मी घेत आहे. यापूर्वी ब्रिटिशांशी जेव्हा संघर्ष सुरू होता तेव्हा मी माझ्या अहिंसेचा यशस्वीपणे प्रयोग केला आहे. परंतु मला वाटते की ती शूरांची अहिंसा नव्हती कारण संख्याबळ आमच्याकडे असल्यामुळे पारडे आमच्याकडे झुकेल अशी जाणीव पार्श्वभूमीत राहत असे. मला वाटते की आतापर्यंत मी अहिंसेचे जे पालन केले त्यात खऱ्या शौर्याचा अवलंब कधी केला गेलाच नाही.

गांधीजी म्हणाले की आपल्या चोहोकडे असलेल्या अशा बहुसंख्याक लोकांच्या विरोधात, ज्यांचे वागणे शत्रुत्वाचे जरी नसले तरी अ-मित्रत्वाचे निश्चितच आहे, अहिंसेचा प्रयोग प्रभावी पद्धतीने करू शकतो की नाही हे पाहण्याकरिता मला वाटते की नोआखाली आदर्श ठिकाण आहे. यामुळे माझ्या अहिंसेची परीक्षा घेण्याकरिता मी या ठिकाणी आलो आहे. इथे लोकप्रिय सरकारच्या हातात जनतेच्या भवितव्याची सुत्रे असल्यामुळे ही समस्या अजूनच कठीण झालेली आहे. जे लोक बंगाल सरकार चालवत आहेत त्यांच्या धोरणाशी मी जरी सहमत नसलो तरी एका प्रांताकरिता लोकशाही सरकार चांगले असेल तर दुसऱ्या प्रांताकरिताही लोकशाही सरकार चांगले असले पाहिजे या श्रद्धेमुळे या सरकारच्या अधिकाराची प्रतिष्ठा कमी होईल असे मी काहीही करायला वा बोलायला नको. सत्ताधारी विदेशी शक्तीशी सरळ संघर्ष करणे ही एक गोष्ट आहे परंतु आपल्याच देशाच्या भागातील बहुसंख्याक कितीही जरी उर्मट असले आणि त्यांच्या संरक्षणाखाली असलेल्या लोकांशी न्याय करण्याची जरी त्यांची तयारी नसली तरी त्यांच्याशी संघर्ष करण्याचा विचारसुद्धा कठीण होतो. यामुळे बंगालच्या मुख्यमंत्र्यांना मी त्या प्रत्येक गोष्टीची माहिती देत असतो जी मी इथे नोआखालीत करतो वा जी मला इथे आढळते.

जेव्हापासून माझी ही पदयात्रा सुरू झाली तेव्हापासून एकीकडे मी अशा लोकांना भेटतो की ज्यांचा व्यवहार मैत्रीपूर्ण नाही आणि दुसरीकडे घाबरलेले लोक आहेत. यामुळे एकीकडे मला घाबरलेल्या हिंदूंना धीर देण्याचे काम करावे लागत आहे तर दुसरीकडे बहुसंख्याक समुदायाला अल्पसंख्याकांच्या सरक्षणाच्या अधिकाराची जाणीव करून द्यावी लागत आहे. दोन्ही समाजांचे जीवन चांगले आणि निरोगी व्हावे म्हणून दोन्ही समुदायांसमोर मी बंधुभावाने राहण्याचा आदर्श ठेवतो आहे आणि त्याचबरोबर ग्रामसफाई आणि अर्थशास्त्राबद्दलही मी त्यांना समजावून सांगत असतो.

**निर्वासित आपल्या घरी परतले तर तो तुमच्या अहिंसेचा विजय आहे असे तुम्ही समजाल काय असे विचारले असता गांधीजी म्हणाले की नाही, सर्व निर्वासितांना समजावून सांगितले तर काहीच दिवसात ते परतणे अशक्य नाही. परंतु असे झाले तरी यातून शूराच्या अहिंसेच्या यशाचे कोणतेही चिन्ह दिसणार नाही; कारण असे झाले तर निर्वासित त्यांच्या संरक्षणावर विसंबून राहतील ज्यांनी त्यांची परतण्याकरिता समजूत घातली. स्त्रीपुरुषांनी धीर धरून स्वतःहोऊन परतण्याचा निर्णय घेतला व त्याकरिता कोणतेही संकट आले तरी शरण जाण्याऐवजी वा भांडण करण्याऐवजी संकट सहन करून वेळ आली तर उपासमार वा मरणसुद्धा पत्करण्याचा आनंदाने निर्णय घेतील तर त्याला खरे यश म्हणता येईल. या ध्येयाच्या सिद्धीकरिता मी हिंदूंना संबोधत असतो.**

'द हिंदू', फेब्रुवारी २, १९४७

--------------

## ४०१. एका डॉक्टरशी चर्चा

(हे डॉक्टर गांधीजंबरोबर नवग्राम ते अमिषपुरापर्यंत गेले होते.)

गांधीजी थट्टा करत म्हणाले की माझी १२५ वर्ष जगण्याची इच्छा आहे आणि त्याकरिता तुम्ही एखादा उपाय सांगू शकता काय.

डॉक्टर म्हणाले की तुमच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी म्हणून तुम्ही कलकत्त्यात काही दिवस मुक्काम करा. त्यावर गांधीजी म्हणाले की जोपर्यंत सांप्रदायिक ऐक्य स्थापित होत नाही तोपर्यंत मी येथून बाहेर पडू शकत नाही.

'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', फेब्रुवारी २, १९४७

-------------

# ४०२. ब्रिटिश सैन्याच्या अधिकाऱ्यांशी चर्चा

(ब्रिटिश सेनेचे आठ अधिकारी गांधीजींना भेटण्याकरिता दुपारी आले होते व त्यांनी गांधीजींच्या नोआखालीतील शांतता कार्याला शुभेच्छा दिल्या होत्या.)

फेब्रुवारी १, १९४७

गांधीजी म्हणाले की पत्रकार लोकसुद्धा (एक सेनाधिकारी तरुण ऑस्ट्रेलियायी होता. त्याने स्वतःची ओळख पत्रकार म्हणून करून दिली होती.) धोकादायक असतात आणि मी स्वतः पत्रकार असूनही मी हे सांगतो आहे. चेष्टा करत गांधीजी म्हणाले की ऑस्ट्रेलिया गोऱ्यांचे राखीव कुरण केवळ वर्तमान काळाकरिताच झालेले नाही तर भावी पिढ्याकरिताही झालेले आहे. गांधीजी म्हणाले की त्या मानाने हिंदुस्थानात बरेच जास्त आदरातिथ्य आहे.

'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', फेब्रुवारी ३, १९४७

-------------

# ४०३. प्रार्थना प्रवचन

(या प्रार्थनेचे वृत्त विविध स्रोतातून गोळा केले आहे.)

आमिषपुरा,

फेब्रुवारी १, १९४७

**सभेतील श्रोत्यांना संबोधत गांधीजी म्हणाले की सभा कितीही मोठी असली तरी श्रोत्यांनी सभेत अगदी स्तब्ध आणि शांत राहायला पाहिजे हा जागतिक नियम आहे व तो प्रत्येक सभेला लागू होतो.**

**काल सभेत एका मौलवींची अगदी थोडा वेळ बोलण्याची इच्छा होती. त्यांना काय बोलायचे आहे हे गांधीजींच्या लक्षात आले. यामुळे आपल्या इच्छेविरुद्ध गांधीजींनी त्या मौलवींना घड्याळाने अगदी पाच मिनीट बोलण्याची परवानगी दिली. मौलवीने बोलण्याकरिता तीन मिनीटसुद्धा घेतले नाही परंतु तितक्या वेळेत त्याला जे काही बोलायचे होते ते तो बोलला. बंगालमधील पडदा पद्धतीबद्दल गांधीजींनी काढलेल्या उद्गारांना त्याने विरोध केला. मौलवीच्या मताप्रमाणे गांधीजींना इस्लामच्या कायद्याबद्दल बोलण्याचा अधिकार नव्हता.**

**गांधीजी म्हणाले की इस्लामसंबंधीचा हा दृष्टीकोन संकुचित आहे. इस्लामचा अभ्यास करण्याचा आणि त्याचा अर्थ लावण्याचा मलाही अधिकार आहे. माझ्या दीर्घायुष्यात हिंदुस्थानात आणि हिंदुस्थानबाहेरही मला अनेक मुसलमानांना भेटण्याचे सौभाग्य प्राप्त झाले आहे आणि इस्लामचा अभ्यास करण्याचा आणि त्याचा अर्थ लावण्याचा मला अधिकार नाही असे कोणीही म्हणत असलेले मी ऐकले नाही. पडद्याच्या पद्धतीचा निषेध करत गांधीजी म्हणाले की पडद्याची ही पद्धत वेगवेगळ्या देशात वेगवेगळी आहे. या पद्धतीचा कुराणशी काहीही संबंध नाही याची मला खात्री आहे. दुसऱ्याच्या दृष्टीपासून दूर एका लहानशा जागेत ठेवून जतन करावे लागावे इतका इस्लाम नाजूक आहे असे माझे मत नाही. असे करणे हे इस्लामच्या शिकवणुकीविरुद्ध आहे अशी माझी खात्री आहे.**

**मौलवी साहेबांना रामाचे नाव - जो केवळ एक राजा होता - रहीमशी - जे ईश्वराचे नाव आहे - जोडणे आणि कृष्णाचे नाव करीमशी जोडणे आवडले नाही. गांधीजी म्हणाले की हा इस्लामचा संकुचित दृष्टिकोन आहे. राम आणि कृष्ण ही सर्वसामान्य माणसांची नावे आहेत या भ्रामक धारणेतून मौलवी साहेबांनी हा विचार मांडला आहे. माणूस एकाच ईश्वराची वेगवेगळ्या नावाने पूजा करत असतो आणि कुराणचा त्याला विरोध नाही. राम आणि कृष्ण ही ईश्वराची नावे आहेत आणि अशा प्रकारे ईश्वराची भक्ती करण्याला कुठेही प्रतिबंध नाही. यामुळे इस्लामला तरी कुठेही धक्का लागत नाही. इस्लाम असा धर्म नाही की जो तिजोरीत जपून ठेवला पाहिजे. त्याची शिकवणूक तपासण्याची व तो स्वीकारण्याची वा नाकारण्याची जगाला सूट आहे. मला आशा आहे की बंगालमधील वा हिंदुस्थानमधील मुसलमानाचा दृष्टीकोन असा संकुचित नसेल.**

**अंतःकरणाची शुद्धी ही धार्मिक माणसाची कसोटी असते, परंतु लोकांची संपत्ती लुटायची, आपल्याच बांधवांचा खून करायचा आणि त्याच वेळी ईश्वराचे नाव घ्यायचे हे अधार्मिक कृत्य आहे. या संदर्भात डॉ. सुशीला नाय्यर छांगिरगाव इथे करत असलेल्या कामाकडे मी तुमचे लक्ष वेधू इच्छितो. खरे म्हणजे त्यांची इच्छा सेवाग्रामला जाऊन तेथील रुग्णालयात सेवा करण्याची होती कारण त्या रुग्णालयाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी त्यांच्याकडे आहे. परंतु आम्ही पुर्णपणे दुरुस्त होईपर्यंत तुम्ही जाऊ नका असे त्यांच्या मुसलमान रुग्णांचे आग्रहाचे म्हणणे होते. सुशीला नाय्यर यांनी असेही सांगितले की या गावातील ज्या लोकांनी गेल्या ऑक्टोबरमध्ये लोकांचे सामान लुटले होते त्यांतील काही सामान ते स्वतःहोऊन परत आणून देत आहेत. मला वाटते की हा शुभसंकेत आहे. जोपर्यंत जनतेच्या लुटीचा संबंध आहे या गोष्टीची लागण जर पसरली तर या बाबतीत न्यायालयांकरिता कोणतेही काम शिल्लक राहणार नाही. मी तर या मताचा आहे की लुटलेली मालमत्ता परत करण्यात आली तर सरकारने न्यायालयीन कारवाई करण्याचा अधिकार सोडून दिला पाहिजे. परंतु याकरिता एक तर अपराध्याने नाही तर जनतेने संपूर्ण माल परत केला पाहिजे आणि त्यामागे प्रामाणिकपणाची वृत्ती असली पाहिजे, केवळ खटला टाळण्याची प्रवृत्ती नसली पाहिजे. माझे ध्येय अंतःकरणात बदल घडवून आणणे आहे, पोलिसांनी वा सैन्याने लादलेला तह करायला लावणे नाही. लोकप्रिय मंत्रिमंडळ आपली इच्छा जनतेवर लादू शकत नाही. गांधीजी म्हणाले :**

सर्व लोक एकोप्याने आणि प्रामाणिकपणे वागत आहेत अशी माझी खात्री झाली तर मी आनंदाने नोआखाली सोडून निघून जाईन. परंतु इथे माझी ध्येयसिद्धी झाली नाही तर ती होईपर्यंत वा मरेपर्यंत मी इथेच राहीन.

**यानंतर गांधीजींनी पुढील प्रश्नांचे उत्तर दिले :**

**श्रीमंत माणसांना तुम्ही विश्वस्त होण्याकरिता सांगता. याचा अर्थ त्यांनी आपल्या संपत्तीवरील हक्क सोडून द्यावा आणि त्यातून अशी विश्वस्त संस्था निर्माण करावी की जी कायद्याच्या दृष्टीने वैध असेल आणि जिचे व्यवस्थापन लोकशाही पद्धतीने केले जाईल असा होतो काय ? विश्वस्त संस्थेचे सध्याचे विश्वस्त मेले तर त्यांच्या ठिकाणी नवीन विश्वस्तांची नेमणूक कोणत्या पद्धतीने होईल?**

**गांधीजींनी उत्तर दिले की याबाबतीत अनेक वर्षांपासून मी घेतलेली भूमिका अजूनही कायम आहे. त्या भूमिकेप्रमाणे सर्व काही ईश्वराचे आहे व ईश्वराकडून आले आहे. यामुळे त्याने निर्माण केलेले सर्व काही संपूर्ण मानव जातीचे आहे, कोणत्याही एका विशेष व्यक्तीचे नाही. व्यक्ती जेव्हा तिच्या वाट्यापेक्षा जास्त घेते तेव्हा ती त्या अतिरिक्त वाट्याची ईश्वराच्या लोकांकरिता विश्वस्त होते. सर्व शक्तिमान ईश्वराला कशाचाही साठा करण्याची गरज नसते. दररोज त्याची निर्मिती सुरू असते. यामुळे तत्त्वतः माणसांनीसुद्धा दररोजकरिता जगायला पाहिजे, साठा करून नाही. सर्वसामान्यपणे लोकांमध्ये जर हे सत्य रुजले तर ती कायदेशीर रूप असलेली संस्था होईल. माझी इच्छा आहे की हिंदुस्थानने जगाला ही देणगी द्यावी. असे झाले तर मग कोणत्याही प्रकारची पिळवणूक नसेल आणि ऑस्ट्रेलिया व इतर देशांत आहे तसे गोऱ्या**

**लोकांकरिता व त्यांच्या वंशजांकरिता आरक्षणही नसेल. याच भेदभावात अशा भावी युद्धाचे बीज लपलेले आहे की जे मागील दोन युद्धांपेक्षाही भयानक असेल. विश्वस्तांच्या ठिकाणी नेमावयाच्या विश्वस्तांबद्दल सांगायचे तर विश्वस्तांनाच आपले उत्तराधिकारी विश्वस्त नेमण्याचा अधिकार राहील, अर्थात कायद्यात तशी तरतूद असली तर.**

**जमलेल्या श्रोत्यांना गांधीजी म्हणाले की आपल्या आजूबाजूला "कुचाळक्या, फुसक्या, टोमणे" वगैरे जे सुरू आहेत त्याबद्दल मी अनभिज्ञ आहे. मी आधीच संशय आणि अविश्वास यांच्या वातावरणाने इतका काही घेरलेलो आहे आणि माझ्याबद्दल इतके काही गैरसमज पसरलेले आहेत की माझ्या पूर्णपणे निर्दोष आचरणाचाही चुकीचा अर्थ लावला जात आहे. माझ्याबरोबर माझी नात असते. ती माझ्याबरोबर माझ्याच अंथरुणात झोपते. जे लोक शल्यचिकित्सा करून नपुंसक होतात त्यांना पैगंबरसाहेब महत्त्व देत नाहीत. परंतु ईश्वराची आराधना करताना जे नपुंसक होतात त्यांचे ते स्वागत करतात. माझी ती आकांक्षा आहे. ईश्वराचा शोध घेण्याकरिता मी हे करतो आहे आणि असे करणे हे माझे कर्तव्य आहे. मी जो यज्ञ करतो आहे त्याचा हा अभिन्न भाग आहे, आणि माझ्या या प्रयोगाकरिता तुम्ही मला आशीर्वाद द्यावे अशी माझी इच्छा आहे. मला माहीत आहे की माझ्या या कृतीमुळे माझ्या मित्रांनीसुद्धा टीका केली आहे. परंतु जवळच्या मित्रांकरितासुद्धा माणूस कर्तव्यापासून विमुख होऊ शकत नाही.**

'हरिजन', फेब्रुवारी २३, १९४७; 'हिंदुस्तान स्टॅन्डर्ड', फेब्रुवारी ३, १९४७; आणि 'महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड १, भाग २, पृष्ठ २६४

----------------

# ४०४. किशोरलाल घ. मश्रूवाला यांना तार

[फेब्रुवारी २, १९४७]

(माय डेज विथ गांधीनुसार गांधीजींनी प्रार्थना प्रवचनात ब्रह्मचर्याविषयाचीचा आपल्या प्रयोगाची माहिती प्रार्थना सभेत दिल्यानंतर दुसऱ्या दिवशी गांधीजींनी ही तार पाठवली होती. पाहा “वल्लभभाई पटेल यांना पत्र”, फेब्रुवारी [१.२.१९४७.)

किशोरीलाल

हरिजन आश्रम, साबरमती

तुझे पत्र. काल दिलेले सार्वजनिक वक्तव्य वाच. (माय डेज विथ गांधीनुसार गांधीजींनी प्रार्थना प्रवचनात ब्रह्मचर्याविषयाचीचा आपल्या प्रयोगाची माहिती प्रार्थना सभेत दिल्यानंतर दुसऱ्या दिवशी गांधीजींनी ही तार पाठवली होती. पाहा “वल्लभभाई पटेल यांना पत्र”, फेब्रुवारी [१.२.१९४७.) लिहीत आहे.

बापू

फोटोप्रतीवरून. सा. डब्ल्यू. १०५५९

-----------

# ४०५. एक पत्र

फेब्रुवारी २, १९४७

प्रिय अ... बाबू,

जिल्हा मुस्लिम लीगच्या सचिवामार्फत तुम्ही कळवलेल्या संदेशाबद्दल मी तुमचा आभारी आहे (मुजिबूर रहमान गांधीजींना जानेवारी २८ तारखेला भेटले होते. त्यांनी मागणी केली होती की बाहेरून आलेल्या सर्व पुढाऱ्यांनी आणि स्वयंसेवकांनी जिल्हा सोडून निघून जावे आणि स्थानिक मुसलमानांना आणि हिंदू पुढाऱ्यांना “एकटे सोडण्यात यावे” तसेच गांधीजींच्या उपस्थितीची इथे आवश्यकता नसून ते सध्या ज्या जाहीर प्रार्थना सभा घेतात त्या त्यांनी बंद कराव्या; पाहा “मुसलमान प्रतिनिधींना मुलाखत”, जानेवारी २८, १९४७).

तीन मुद्द्यांना (मुजिबूर रहमान गांधीजींना जानेवारी २८ तारखेला भेटले होते. त्यांनी मागणी केली होती की बाहेरून आलेल्या सर्व पुढाऱ्यांनी आणि स्वयंसेवकांनी जिल्हा सोडून निघून जावे आणि स्थानिक मुसलमानांना आणि हिंदू पुढाऱ्यांना “एकटे सोडण्यात यावे” तसेच गांधीजींच्या उपस्थितीची इथे आवश्यकता नसून ते सध्या ज्या जाहीर प्रार्थना सभा घेतात त्या त्यांनी बंद कराव्या; पाहा “मुसलमान प्रतिनिधींना मुलाखत”, जानेवारी २८, १९४७) माझे उत्तर असे आहे :

१. कोणाच्याही उपस्थितीमुळे सर्वसामान्य शांतता प्रस्थापित करण्यात अडथळा येत असेल तर सरकारने कायद्याने दिलेल्या अधिकारानुसार अशा व्यक्तीवर वा व्यक्तींवर कारवाई केली पाहिजे.

२. शांतता प्रस्थापित करण्याची जबाबदारी अर्थातच स्थानिक हिंदू आणि मुसलमान पुढाऱ्यांवर आहे. परंतु बाहेरची व्यक्ती या कामाकरिता काही मदत करत असेल तर त्यांनी ती मदत झिडकारून लावू नये.

३. मुसलमानांना माझ्या प्रार्थना सभा आवडत नसतील तर त्यांनी त्या सभांना उपस्थित राहू नये. परंतु मला आशा आहे की याचा अर्थ मुसलमानेतरांनी त्यांना माहीत असलेल्या सर्वोत्तम पद्धतीनुसार आपली प्रार्थना करू नये असा होत नाही. जिल्हा मुस्लिम लीगच्या मताला महत्त्व देणे जरी आवश्यक असले तरी माझी उपस्थिती आवश्यक आहे की नाही आणि एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी मी माझी पदयात्रा सुरू ठेवली पाहिजे की नाही हे ठरवण्याची मुभा मला दिली पाहिजे

तुमचा विश्वासू,

मो. क. गांधी

इंग्रजी फोटोप्रतीवरून. जी. एन. १०५३२

# ४०६. दंगलग्रस्त लोकांशी चर्चा

(गांधीजी आमिशपाडा येथून सातघरिया येथे जात असताना दंगलीत राखरांगोळी करण्यात आलेल्या एका घरी ते गेले. घरात राहणारे लोक गांधीजींना म्हणाले की आमच्या कुटुंबातील नऊ लोक आम्ही दंगलीत गमावलेले असल्यामुळे आम्ही तुम्हाला राखेशिवाय अजून काहीही देऊ शकत नाही.)

फेब्रुवारी २, १९४७

माझे अंतःकरण माणसासमोर नाही तर ईश्वरासमोर आक्रंदन करत आहे. मी इथे तुम्हाला रडवण्याकरिता आलेलो नाही. ईश्वराच्या इच्छेसमोर शरण जाण्याशिवाय माणूस दुसरे काहीही करू शकत नाही. मोठमोठी साम्राज्येसुद्धा कोसळली आहेत. हिटलरची जगज्जेता होण्याची इच्छा होती. त्याचे काय झाले? इतर ठिकाणांप्रमाणेच इथल्याही काही लोकांना वेड लागल्यासारखे झाले होते. परंतु हिंदू आणि मुसलमान हे भाऊभाऊ आहेत म्हणून तरी त्यांच्यात दुर्भावना नसली पाहिजे.

'द हिंदू', फेब्रुवारी ३, १९४७

-------------------

# ४०७. प्रार्थना प्रवचन

("विश्वस्ततेसंबंधी गांधीजी" या शिर्षकाखाली हे प्रकाशित झाले होते. प्रार्थना सुरू झाल्याबरोबर गांधिजींचे मौन सुरू झाले. त्यांचे लेखी भाषण बंगालीत होते आणि ते निर्मल कुमार बोस यांनी वाचून दाखवले.)

सतघरिया,

फेब्रुवारी २, १९४७

**गांधीजी म्हणाले की मी माझ्या वैयक्तिक जीवनाची चर्चा करतो कारण माणसाच्या खाजगी जीवनाचा सार्वजनिक जीवनावर काहीही प्रभाव पडत नाही या मतावर माझा कधीही विश्वास नव्हता. त्याचप्रमाणे खाजगी जीवनात मी अनैतिक असूनही प्रभावी कर्तबगार जनसेवक असू शकतो यावरही माझा विश्वास नाही. माझ्या खाजगी जीवनाचा प्रभाव सार्वजनिक जीवनावर पडणे अपरिहार्य आहे. खाजगी आणि सार्वजनिक जीवनाचा परस्परांशी संबंध नाही असे म्हणून जगात बऱ्याचशा वाईट गोष्टींना प्रश्रय मिळत असतो आणि अहिंसेच्या बाबतीत माझ्या जीवनातील कठोरतम सत्त्वपरीक्षा होत असताना तर ईश्वर आणि माणूस या दोघांनीही माझ्या जीवनाचे हे दोन्ही भाग समग्र एकक आहे असे समजून निर्णय घ्यावा. अनेक वर्षांपूर्वी मी म्हणालो होतो त्याप्रमाणे अहिंसक कृती ही आत्मपरीक्षणाची आणि आत्मशुद्धीची कृती असते, मग ती कृती करणारी एक व्यक्ती असो की समूह असो की देश असो.**

**विश्वस्ततेसंबंधी यापूर्वी गांधीजी जे काही म्हणाले होते त्यासंबंधी गांधीजींना जे प्रश्न विचारण्यात आले त्या प्रश्नांचे गांधीजींनी दिलेले उत्तर असे आहे -**

**प्रश्न - जी गोष्ट हिंसेने मिळवण्यात आलेली असेल तिचे रक्षण अहिंसेने करता येणे शक्य आहे काय?**

**उत्तर - आधी मी जे म्हणालो आहे त्यावरून असा निष्कर्ष निघतो की जी गोष्ट हिंसेने मिळालेली असते तिचे अहिंसेने केवळ रक्षण तर करता येतेच शिवाय हिंसेने म्हणजे अन्याय्य मार्गाने मिळवलेल्या गोष्टीचा त्याग करण्यात यावा अशीसुद्धा अहिंसेची अपेक्षा असते.**

**प्रश्न - उघड वा सुप्त हिंसेशिवाय इतर कोणत्याही मार्गाने संपत्ती गोळा करता येणे शक्य आहे काय?**

**व्यक्तीकरिता हिंसेशिवाय संपत्तीचा संग्रह करता येणे अशक्य आहे परंतु अहिंसक समाजात राज्य अहिंसक मार्गाने संपत्ती गोळा करू शकते, इतकेच नाही तर त्याने असे करणे वांछनीय आणि अपरिहार्यही आहे.**

**भौतिक वा नैतिक यापैकी कोणत्याही प्रकारच्या संपदेचा जो काही संग्रह माणूस करतो तो समाजातील अन्य सदस्यांच्या मदतीने आणि सहकार्यानेच करू शकतो. असे असेल तर यापैकी कशाचाही तो वैयक्तिक लाभाकरिता उपयोग करू शकतो काय?**

**उत्तर - नाही, त्याला कोणताही नैतिक अधिकार नाही.**

**प्रश्न - विश्वस्ताचा वारसदार कसा ठरेल? विश्वस्ताला आपल्या वारसदाराचे केवळ नाव सुचवण्याचा अधिकार असेल की त्याने सुचवलेल्या नावाला अंतिम मान्यता देण्याचा अधिकार राज्याकडे असेल?**

**उत्तर - काल मी म्हणालो होतो त्याप्रमाणे (पाहा "प्रार्थना प्रवचन", फेब्रुवारी १, १९४७) निवड करण्याचा अधिकार त्या मूळ मालकाला देण्यात यावा जो पहिला विश्वस्त होतो. परंतु अंतिम निवड राज्याने केली पाहिजे. अशा व्यवस्थेमुळे राज्यावर तसेच व्यक्तीवरही नियंत्रण राहते.**

**प्रश्न - विश्वस्ततेच्या सिद्धांताच्या अंमलबजावणीमुळे जेव्हा खाजगी संपत्तीची जागा सार्वजनिक संपत्ती घेईल तेव्हा तिची मालकी त्या राज्याकडे असावी काय की जे स्वतःच हिंसेचे साधन आहे? की ग्रामीण समुदाय आणि नगरपालिकेसारख्या स्वायत्त संस्थांच्या हाती असावी ज्याच्या अंतिम अधिकाराचा स्रोतही अखेरीस राज्याने केलेले कायदेच असतील?**

**उत्तर - या प्रश्नात विचाराचा काही गोंधळ आहे. बदललेल्या स्वरूपातही संपत्ती विश्वस्ताचीच राहील, राज्याची नाही. मूळ मालकाची संपत्ती हिसकावून घेतली जाऊ नये आणि व संपत्ती धारकाच्या कौशल्याचा समाजाला लाभ व्हावा म्हणून विश्वस्त कल्पना आलेली आहे. तात्विक दृष्टीने राज्य हिंसेवर आधारलेले असू शकेल परंतु व्यवहारात राज्याला बहुतांश काळ अहिंसेचाच आधार घ्यावा लागत असतो.**

'हरिजन', फेब्रुवारी १६, १९४७

--------------

# ४०८. बिहार प्रांतिक मुस्लिम लीगच्या सचिवाला पत्र

सतघरिया,

[फेब्रुवारी ३, १९४७ला वा पूर्वी]

(गांधीजी सतघरिया इथे फेब्रुवारी २ आणि ३ तारखेला होते.)

प्रिय मित्र,

मला तुमचे (मागील महिन्याच्या) १५ तारखेचे पत्र मिळाले (स्रोतात “चालू महिन्याच्या” असे आहे. बिहार मुस्लिम लीगच्या सचिवाने गांधीजींना “बिहारमधील दंगलींदरम्यान हिंदूंनी केलेल्या मानवी पशुत्वाचे असे काही निर्विवाद” पुरावे दिले. दंगलींबद्दल काँग्रेसने बघ्याची भूमिका घेतल्याबद्दल त्याने काँग्रेसवर टीका केली.). ते माझ्या हातात ३१ तारखेला पडले. तुमच्या कार्यकारिणीच्या ठरावाची प्रत बंगालच्या मुख्यमंत्र्यांनी मला पाठवली आहे. परंतु त्यांनी ते तुमच्या सांगण्यावरून पाठवले हे मला माहीत नव्हते. मला जर हे माहीत असते तर मी त्याची तुम्हाला निश्चितच पोच दिली असती. मला माहीत असल्याप्रमाणे अजून तरी तुमच्या अहवालातील प्रस्तावांसंबंधी मी कोणतेही जाहीर वक्तव्य दिलेले नाही. परंतु मी मान्य केले पाहिजे की ते शांत मनस्थितीत लिहिलेले आहेत असा ठसा मनावर उमटत नाही. आणि त्यातील काही विधाने तर मला अविश्वसनीय वाटतात. असे असले तरी या संपूर्ण दुर्दैवी प्रकरणाची चौकशी करण्याकरिता बिहार सरकारने निष्पक्ष चौकशी समिती नेमावी अशी मी जबरदस्त शिफारस केली आहे. डॉ. महमूदबद्दल तुम्ही केलेले विधान खरे ठरले तर मला फार खेद होईल. तरीही या प्रकरणी मी चौकशी करत आहे. (पाहा “प्रार्थना प्रवचन”, फेब्रुवारी ५, १९४७)

तुमचा विश्वासू,

मो. क. गांधी

सचिव, बिहार मुस्लिम लीग

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

----------------

# ४०९. एक चिठ्ठी

सतघरिया,

फेब्रुवारी ३, १९४७

इथे एक वेडा राहतो (गांधीजींचा मुक्काम असलेल्या या घरातील एकाला वेड लागलेले होते. याला मदत करा म्हणून गांधीजींना विनंती करण्यात आली होती.). मनूने त्याच्याकरिता योग्य उपचार सांगितला. तो रामनामाचा होता. यावर विश्वास ठेवून तो जर दीर्घकाळ रामनामाचा तालासुरात जप करील तर त्याचे वेड निश्चितपणे निघून जाईल. घरातील लोकांना इतके सांगा. बाकी मी नंतर सांगेन.

इंग्रजी फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. १०५५८

------------------

# ४१०. प्यारेलाल यांना पत्र

फेब्रुवारी ३, १९४७

चि. प्यारेलाल,

मी ज. ला पाठवत आहे. त्यांना विनोदचे पत्र पाठवणेसुद्धा योग्य राहील असे मला वाटते. सोबत मनूने तुला लिहिलेले पत्रही मी पाठवत आहे. ती अधिक दुखवली जाऊ नये. तिला ज्या कोणाशी बोलायची इच्छा असेल त्याच्याशी तिला बोलू दे. सध्या तू जसा एका ठिकाणी बांधला गेला आहे तशीच तीसुद्धा एका ठिकाणी बांधली गेली आहे. तू जरी माझ्या विनंतीमुळे बांधला गेलेला आहेस तरी तुम्हा दोघात सतत सुसंवाद असतो. भविष्य तर ईश्वरावरच अवलंबून आहे. अजूनही तू ते करत नाहीस आणि तू ते करत नसल्यामुळे मनूचीही चिडचिड होत आहे. हे बरोबर नाही. एक तर ईश्वर असेल आणि सर्व काही त्याच्या इच्छेप्रमाणे होत असेल, नाही तर ईश्वर नसेल. मधला मार्ग नाही. तो जर असेल  तर तुला इतका धक्का बसायला नको. तुझ्या मनात जरी मनूच्या हिताचाच विचार असेल तरी तू तिला ईश्वरावर सोपवले पाहिजे  व तिला तिचा आकार घेऊ दिला पाहिजे. मी अजून काय लिहू? शक्य असेल तर जागा हो.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

-----------------

## ४११. चंद्रगुप्त विद्यालंकार यांना पत्र

फेब्रुवारी ३, १९४७

भाई चंद्रगुप्त,

तुमच्या योजनेबद्दल मी तुम्हाला आधीच लिहिले की काय हे मला आठवत नाही. इथे माझ्या कागदपत्रात पडून असलेला काकासाहेबांचा अभिप्राय मी तुमच्याकडे पाठवत आहे. सध्या याहून अधिक मी काही करू शकत नाही.

आशीर्वाद,

मो. क. गांधी

ता. क. - काकासाहेबांचा अभिप्राय वाचल्यानंतर तो परत करा.

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ७२१०. शिवाय सी. डबल्यू. ४८६६. सौजन्य - चंद्रगुप्त विद्यालंकार

-----------------

## ४१२. एका वार्ताहराशी चर्चा

साधुरखिल,

फेब्रुवारी ३, १९४७

यात्रेकरूला सर्व प्रकारचे आयुष्य सहन करावे लागते. पाऊस असो वा पाणी त्याला तर आपल्या गंतव्यापर्यंत पोहोचण्याकरिता आपली यात्रा सुरूच ठेवावी लागत असते. आणि आज मी यात्रेकरू आहे. मग मी पावसाला वा पाण्याला घाबरण्याचे कारण काय?

‘अमृत बझार पत्रिका’, फेब्रुवारी ६, १९४७

---------------

# ४१३. प्रार्थना प्रवचन

('गांधीजीज वाकिंग टूर डायरी'मधून उद्धृत. यातील पहिला परिच्छेद अमृत बझार पत्रिकेतून घेतला आहे.)

साधूरखिल,

फेब्रुवारी ३, १९४७

**सुरुवातीलाच गांधीजी म्हणाले की मी जी गोष्ट माझ्या खाजगी जीवनाबद्दल सांगितली ती तुम्ही माझे अंधानुकरण करावे म्हणून सांगितलेली नाही. माझ्यात कोणतीही दैवी शक्ती असल्याचा माझा दावा नाही. मी जे केले ते कोणीही करू शकतो परंतु त्याकरिता त्याने त्या अटींचे पालन केले पाहिजे ज्यांचे मी पालन केले. असे न करता जे माझे अनुकरण करत असल्याचे ढोंग करतील त्यांची अधोगती झाल्याशिवाय राहणार नाही. मी जे काही करत होतो ते धोक्याचे होते यात काही संशय नाही परंतु त्याकरिता असलेल्या अटींचे पालन केले तर त्या कृतीतील धोकादायकपणा निघून जातो.**

**घटनासमितीबद्दल मुस्लिम लीगने मंजूर केलेल्या ठरावाचा** (जानेवारी ३१ला कराची येथे) **गांधीजींनी थोड्याशा संकोचानेच उल्लेख केला. लीगला वाटते की काँग्रेसचा ठराव प्रामाणिकपणाचा नाही, त्यात जे म्हणण्यात आले आहे तोच काँग्रेसचा अर्थ नाही. विधान सभांमधील निवडणुका आणि तिथे झालेली इतर कार्यवाही बेकायदेशीर आहे. गांधीजी म्हणाले की एका पक्षाला दुसऱ्या पक्षावर अप्रामाणिकपणाचा आरोप करण्याचा अधिकार नसतो. हे दोन्ही महान पक्ष आहेत आणि असा व्यवहार करणे त्यांना शोभत नाही. या दोघांनी परस्परांना शत्रू समजण्याचे काहीही कारण नाही. असे करून ते स्वातंत्र्याकडे वाटचाल करू शकणार नाहीत. निवडणुका आणि कार्यपद्धती बेकायदेशीर असेल तर त्यांच्या वैधतेला न्यायालयात आव्हान दिले पाहिजे. असे केले नाही तर या आरोपाला काहीही अर्थ राहणार नाही. मी ज्याप्रमाणे १९२०पासून न्यायालयांचा अधिकार मान्य करायला नकार दिला त्याचप्रमाणे तेही न्यायालयाचा अधिकार मान्य करत नसतील तर मग त्यांनी वैधतेचा म्हणा की अवैधतेचा मुद्याच उपस्थित करायला नको. गांधीजी म्हणाले की मी लीगला विनंती केली की तिने विधिसभेत जाऊन आपली बाजू मांडावी आणि तेथील कामकाजावर प्रभाव पाडावा. आणि जर लीगला विधिसभेत जायचे नसेल तर मी तिला सल्ला देईन की तिने विधिसभेच्या प्रामाणिकपणाची परीक्षा घ्यावी आणि मुसलमानांची समस्या ते कशी सोडवतात ते पाहावे. हं, तिचा जर तलवारीच्या कायद्यावर विश्वास नसेल, आणि मला वाटते की असेच आहे, तर तिने स्वतःकरिता आणि देशाकरिता असे करणे हेच कर्तव्य असेल. याशिवाय लीगचे म्हणणे आहे की घटनासमितीत केवळ सवर्ण हिंदूंचे प्रतिनिधित्व आहे. परंतु हे तर कोणालाही दिसू शकेल की तिच्यात अनसूचित वर्ग, ख्रिश्चन, पारसी, आंग्लभारतीय आणि स्वतःला हिंदुस्तानचे पुत्र समजणाऱ्या सर्व लोकांचे प्रतिनिधी आहेत. याशिवाय डॉ. आंबेडकरांनी** (डॉ. भी. रा. आंबेडकर, १८९१-१९५६; पददलित वर्गाचे पुढारी, विधिज्ञ आणि लेखक; १९४२मध्ये शेड्यूल्ड क्लास फेडरेशनची स्थापना केली, सदस्य घटनासमिती भारताच्या घटनेचा मसुदा तयार करणाऱ्या समितीचे अध्यक्ष) **घटनासमितीत सामील व्हायचे कबूल केले आहे. शीखसुद्धा अजूनही तिथे आहेत. घटनासमितीत जाऊन संघर्ष करण्याचा मार्ग लीगकरिता मोकळा आहे.**

लीगचे म्हणणे आहे की ब्रिटिशांनी घटनासमिती रद्द केली पाहिजे. परंतु जोपर्यंत ब्रिटिश सरकारचा संबंध आहे मला आशा आहे की, माझ्या या आशेत विशेष जोर राहिलेला नाही हे मला मान्य आहे, ते त्या स्वैच्छिक दस्तावेजाची पूर्णपणे अंमलबजावणी करतील. माझे मत आहे की शासकीय प्रपत्रानुसार काही प्रांतांनी जरी घटनासमितीत भाग घेतला नाही व त्यांनी स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला तरी त्या दस्तावेजावर अंमल करणे ब्रिटिश सरकारकरिता बंधनकारक आहे. मला आशा आहे की हिंदुस्थानबरोबर प्रामाणिकपणाचे वर्तन करण्याबद्दलची आपली सर्व इभ्रत इंग्रज गमावणार नाहीत.

अखेरीस गांधीजी म्हणाले की मला जरी लीगच्या राजकारणाची चर्चा करणे भाग पडले असले तरी हिंदू आणि मुसलमान एकमेकांचे शत्रू आहेत असा निष्कर्ष तुम्ही काढायला नको. लीगने अशी कोणतीही घोषणा केलेली नाही. राजकारणातील भांडण प्रमुख राजकारणी लोकांकरिता राहू द्या. हे भांडण जर गावखेड्यांपर्यंत पोहोचले तर त्याचे परिणाम भीषण होतील. हिंदुस्थानला स्वातंत्र्य तलवारीच्या मार्गाने नाही तर मैत्रीच्या आणि तडजोडीच्या मार्गाने मिळेल. खरा पाकिस्तान म्हणजे काय हे दाखवण्याकरिता मी नोआखालीत आलो आहे. हिंदुस्थानात बंगालच असा प्रांत आहे की जिथे हे दाखवून देता येऊ शकेल. बंगालने प्रतिभाशाली हिंदू आणि मुसलमानांना जन्म दिला आहे. बंगालचा राष्ट्रीय संघर्षात फार मोठा सहभाग आहे. आता मित्राप्रमाणे वा भावाभावाप्रमाणे हिंदू आणि मुसलमान कसे राहतात हे दाखवून देणे बंगालला शोभून दिसेल. असे झाले तर बंगाल अभावग्रस्त प्रांत राहणार नाही. बंगालने तर प्राचुर्याचा प्रदेश असायला पाहिजे.

हरिजन, फेब्रुवारी २३, १९४७; आणि अमृत बझार पत्रिका, फेब्रुवारी ६, १९४७

---------------

# ४१४. हाशमी यांना पत्र

फेब्रुवारी ४, १९४७

भाई हाशमी,

तुम्हाला मला हिंदुस्तानीचे पाठ इंग्रजीतून शिकवावे लागतात. ही काय गोष्ट आहे! अलीगढ विद्यापीठातून पदवी घेतलेल्या लोकांप्रमाणे तुम्ही मला रागात पत्र लिहीत आहा. माणूस जेव्हा रागात असतो तेव्हा तो तथ्यांकडे बघत नसतो. तुम्ही म्हणता की मी काँग्रेसला काहीही करायला लावू शकतो. सत्य मात्र यापेक्षा अगदी उलट आहे. काँग्रेसने नागरी आणि उर्दू लिपीकरिता काहीही केले नाही असे तुम्ही म्हणता. सत्य हे आहे की कानपूर येथे मंजूर करण्यात आलेला ठराव (हा संदर्भ काँग्रेसने १९२५ मध्ये मंजूर केलेल्या ठरावासंबंधी असावा.)**....**(हे पत्र अपूर्ण आहे.)

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-------------

# ४१५. प्रार्थना प्रवचन

("गांधीजीज वाकिंग टूर डायरी"मधून उद्धृत)

साधूरखिल,

फेब्रुवारी ४, १९४६

**गांधीजींच्या भाषणाच्या वेळी काही मुसलमान बांधवांना बंगालीत एक निवेदन वाचायचे होते. गांधीजी म्हणाले की तुम्हा लोकांना जर यामुळे आनंद होणार असेल तर असे करू शकता. त्यात मशिदीसमोरील संगीत, गोवध इत्यादी गोष्टींचा उल्लेख करण्यात आला होता. गांधीजी म्हणाले की या प्रश्नांशी माझा संबंध नाही. हे कायद्याचे प्रश्न आहेत. मला तर तुमची अंतःकरणे जिंकायची आहेत आणि त्यांना एका सूत्रात गुंफायचे आहे. हे जर साध्य झाले तर सर्व काही बरोबर होईल. तुमची गुलामगिरी हे तुमचे सर्वात मोठे दुर्दैव आहे. तुम्ही केवळ त्या सर्वशक्तिमान ईश्वराचीच गुलामगिरी मान्य केली पाहिजे, मग त्याला तुम्ही कोणत्याही नावाने बोलावा. असे झाले तर तुम्ही दुसऱ्या कोणत्याही माणसासमोर वा माणसांसमोर गुडघे टेकणार नाही. राम नावाच्या साध्या माणसाशी मी ईश्वराशी सांगड घातली हा तुमचा समज अज्ञानातून निर्माण झाला आहे. मी वारंवार सांगितले आहे की माझा राम हा ईश्वरच आहे. माझा राम आधी होता, आता आहे आणि पुढेही राहील. तो अजन्मा आणि अनादी आहे. यामुळे तुम्ही वेगवेगळे धर्म सहन केले पाहिजे आणि त्यांचा आदर केला पाहिजे. मी स्वतःही मूर्तीपूजेच्या विरोधात आहे, परंतु मला मूर्तीपूजकांबद्दलही तितकाच आदर वाटतो. जे मूर्तीपूजा करतात तेही त्याच ईश्वराची पूजा करत असतात जो सर्वव्यापी आहे, अगदी या भूमीच्या अणुरेणूत आहे, कापलेल्या नखात आहे. माझे मुसलमान मित्र आहेत. त्यांची नावे रहीम, रेहमान, करीम इत्यादी आहेत. मी जेव्हा त्यांना रहीम, रेहमान आणि करीम म्हणून हाक मारतो तेव्हा त्यांना ईश्वराच्या बरोबरीचे लेखतो काय?**

**नोआखालीत वा आजूबाजूच्या भागात सर्व काही ठीक आहे असे समजू नका. मला मिळालेले सर्व अहवाल जर खरे असतील, तर अजून परिस्थिती सामान्य झालेली नाही. मी या गोष्टींचा उल्लेख करत नाही कारण मला भावना भडकवायच्या नाहीत. माझा बदल्यावर विश्वास नाही. मी पठाणांबरोबर राहिलेलो आहे. बादशाह खान (अब्दुल गफ्फार खान) यांना पिढांपिढ्यापासून सुरू असलेल्या बदल्याच्या भावनेचा कंटाळा आला होता. त्यांना अहिंसेचे महत्त्व कळले. ते परिपूर्णतेचा दावा करत नाहीत. त्यांना राग येऊ शकतो. परंतु माझ्या या मित्राबद्दल मी दावा करू शकतो की त्यांच्यात प्रतिशोधाच्या भावनेवर नियंत्रण ठेवता येण्याइतका समंजसपणा आहे. नोआखालीत त्यांना हीच गोष्ट हवी आहे. या दोन समुदायांमध्ये जोपर्यंत शांतता प्रस्थापित होत नाही तोपर्यंत पाकिस्तानही असू शकत नाही आणि हिंदुस्थानही असू शकत नाही, तुमच्या नशिबी केवळ गुलामगिरी असेल.**

**चार मुसलमान बंधू मला भेटायला आले होते. नोआखाली आणि तिच्या आजूबाजूच्या भागात मारल्या गेलेल्या लोकांची संख्या मी दुरुस्त केली नाही म्हणून ते नाराज होते. मी तसे केले नाही कारण तिथे जे काही घडलेले मी पाहिले ते**

**सर्व मला उघड करायचे नव्हते. परंतु त्या संख्येत सुधारणा केल्याने जर काम होणार असेल तर हजार हत्या झाल्या असल्याचा कोणताही पुरावा मला मिळाला नाही असे मी सांगेन. आकडा निश्चितच अतिशय लहान आहे. बिहारमध्ये झालेले खून आणि तिथे घडलेली क्रूर कृत्ये नोआखालीतील कृत्यांवर मात करणारी आहेत असेही मी म्हणेन. परंतु हे कबूल करण्याचा अर्थ येथून मी बिहारमध्ये जायला पाहिजे असा होत नाही. जितकी सेवा मी इथे राहून करू शकतो त्यापेक्षा जास्त सेवा मी बिहारमध्ये जाऊन करू शकतो असे मला वाटत नाही. माझी स्वतःची खात्री पटल्याशिवाय कोणाच्या सांगण्यावरून जर मी बिहारमध्ये गेलो तर मी कोणत्याही उपयोगाचा राहणार नाही. माझी जर खात्री पटली की इथल्यापेक्षा बिहारमध्ये माझी गरज अधिक आहे तर तिथे जाण्याकरिता मला कोणाच्या प्रोत्साहनाची गरज पडणार नाही. जिथे राहून दोन्ही समुदायांची जास्तीत जास्त सेवा करता येईल असे मला वाटेल तिथे मी असेन.**

'हरिजन', फेब्रुवारी २३, १९४७

--------------

# ४१६. एडमंड आणि इव्हॉन प्रिवा यांना पत्र

श्रीनगर छावणी,

मुक्काम काझिरखिल, पोस्ट रामगंज, नोआखाली,

फेब्रुवारी ५, १९४७

प्रिय आनंद आणि भक्ती,

तुमचे पत्र मिळाल्यामुळे अतिशय आनंद झाला.

श्रीयुत आर. (हे नाव स्रोतात वगळलेले आहे) यांचा दृष्टिकोन लक्षवेधक आहे. तुम्ही जे म्हणता ते अगदी खरे आहे, म्हणजे अंतःकरणाच्या परिपूर्ण शुद्धीशिवाय खरी अहिंसा अशक्य आहे. परिपूर्ण अहिंसेकरिता अंतःकरणाच्या शुद्धीची आवश्यकता नाही असे जर श्रीयुत आर. यांचे मत असेल तर ते का हे कळलेले मला आवडेल.

खऱ्या अहिंसक माणसाच्या वर्तनाचे अनुकरण अनेक लोक करू शकतात हे अगदी खरे आहे. माझे असेच मत होते आणि आहे. परंतु प्रेरणा देणारी व्यक्ती अहिंसा शास्त्रात निष्णात असली पाहिजे. श्रीयुत आर. याचे वर्तन जर ईश्वरी माणसासारखे असेल तर ते नास्तिक असले तरी काही फरक पडत नाही. ब्रॅडलॉ (चार्ल्स ब्रॅडलॉ, मुक्त चिंतक आणि कट्टर सुधारक.) यांचे असे उदाहरण होते. त्यांची नास्तिकता नावाची नास्तिकता होती. जग नैतिक शासनानुसार चालते अशी त्यांची श्रद्धा होती आणि त्यांचे आचरण इतके पवित्र होते की अनेक ख्रिश्चन धर्मगुरूंनी त्यांच्या अंत्ययात्रेत भाग घेतला होता. मी त्यांच्या अंत्ययात्रेला गेलेलो असल्यामुळे या सर्व गोष्टींचा मी साक्षी आहे (पाहा "आत्मकथा"). त्यांचे दफन वाकिंग (स्रोतात"जिओकिंग". आहे) इथे झाले होते.

यामुळे तुमच्या शंकेचे समाधान झाले की नाही हे मला माहीत नाही. जर समाधान झाले नसेल तर तुम्ही मला परत त्रास दिला पाहिजे.

माझी पदयात्रा शांतपणे सुरू आहे आणि त्यामुळे मला अतिशय मानसिक शांतता मिळते. याचा काय परिणाम होईल हे मला माहीत नाही आणि हे जाणून घेण्याची मला इच्छाही नाही. तो ईश्वराचा एकाधिकार आहे. यामुळे मी कार्डिनल न्यूमन यांच्या सुरात सूर मिळवून म्हणेन की

"एक पाऊल पुरे मला,

नाही इच्छा दूरवरचे पाहण्याची,

हे करुणानिधी तुझ्या ज्योतीने कर माझा मार्ग प्रकाशित."

तुम्हांला हे स्तोत्र माहीत असेल, आहे ना? या स्तोत्राची सुरुवात आहे -

"या घनघोर काळोखातून

हे प्रभो दाखव मार्ग मला."

आशा आहे की तुम्हांला तुमचा 'हरिजन' लवकरच मिळू लागेल. इतके सगळे महिने तुम्ही 'हरिजन'शिवाय राहिला याचा मला अतिशय खेद होतो. मी "महिने" म्हणतो कारण इतक्यातच ते परत सुरू करण्यात आले आहे (फेब्रुवारी १०, १९४६). आशा आहे आपली पहिली भेट झाली तेव्हा तुम्ही दोन्ही बाळ असूनही (गांधीजी एकदा त्यांना बेब्ज इन द वुड म्हणाले होते. पाहा इव्हान प्रिवा यांना पत्र, ५ ऑक्टोबर १९४६) जसे तरुण होता तसेच असाल.

स्नेह,

बापू

इंग्रजी फोटोप्रतीवरून. जी. एन. २३४१

--------------

# ४१७. जॉन हेन्स होम्स यांना पत्र

फेब्रुवारी ५, १९४७

प्रिय डॉ. होम्स,

तुम्ही मला केवळ उत्सुकतावर्धक बातमीच दिली नाही तर स्वागतार्ह बातमी दिली आहे. ही बातमी इतकी चांगली आहे की ती खरी वाटत नाही आणि जोपर्यंत तुम्ही सदेह हिंदुस्थानात येत नाही तोपर्यंत मी तिच्यावर विश्वास ठेवणार नाही.

मी हिंदुस्थानच्या कोणत्याही भागात जरी असलो तरी आपली भेट तर होईलच आणि व्हायलाही पाहिजे. माझी पदयात्रा ही माझ्या जीवनातील सर्वात लांब पदयात्रा आहे. ईश्वराने या आगीतून चालण्याची शक्ती द्यावी अशी मी प्रार्थना करतो आहे आणि आशाही करतो आहे. १९४२ साली "करा वा मरा" हे घोषवाक्य देण्यात आले होते. या सूत्रानुसार आता मलाच आचरण करायचे आहे कारण हे घोषवाक्य मीच दिले होते. तुम्ही लंडनमार्गे येणार आहा आणि येताना लॉर्ड पॅथिक लॉरेन्स यांना भेटणार आहा याकरिता आणि इतर अनेक कारणांकरिता मला आनंद होतो. इथे आतापासून ऑक्टोबरपर्यंत अनेक घटना घडणार आहेत. तुमच्यासमोर योगायोगाने जे आव्हान आले आहे त्याला तुम्ही पूर्ण न्याय द्याल याबद्दल मला मुळीच संशय नाही.

कम्युनिटी चर्च ऑफ न्यू यॉर्क

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------------

# ४१८. एम. ए. अब्दुल्ला यांना पत्र

फेब्रुवारी ५, १९४७

प्रिय खान साहेब,

श्री रामचंद्रन हे पूर्वी वायुदलात होते. ते तिथून फरार झाले होते, त्यांनी आपले नाव बदलले होते आणि अखेरीस माझ्याजवळ आश्रयाकरिता आले होते. ते एकाएकी मला सोडून गेले ही गोष्ट तुम्हाला सांगणे माझे कर्तव्य आहे. तुम्ही त्यांच्या विरोधात काही करणे आवश्यक आहे की नाही आणि करू शकता की नाही हे मला माहीत नाही. परंतु अशा प्रकारचा माणूस भूमिगत झाला आहे हे तुम्हाला माहीत असणे आवश्यक आहे. ते मलाबार भागातील आहेत. मला त्यांच्याकरिता वाईट वाटते. ते स्थिर राहिले तर चांगले कार्यकर्ते होऊ शकतात.

पोलीस अधीक्षक

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------------

# ४१९. वल्लभभाई पटेल यांना पत्र

श्रीनगर (बंगाल),

फेब्रुवारी ५, १९४७

चि. वल्लभभाई,

मला तुमचे पत्र मिळाले. लीगसंबंधी मी लांब भाषण केले (फेब्रुवारी ३ला, पाहा “प्रार्थना प्रवचन”, फेब्रुवारी ३, १९४७). त्याचा वृत्तांत वर्तमानपत्रांकडे पाठवण्यात आला आहे. त्यात या विषयावरील माझा दृष्टीकोन थोडक्यात मांडलेला आहे.

कॅबिनेट मिशनच्या प्रपत्राचा मी जसा अर्थ लावतो त्याप्रमाणे संस्थनिक जरी घटनासमितीत आले नाही तरी त्यात घाबरण्यासारखे काहीही नाही असे माझे मत आहे. ते जरी अशा प्रकारे याचा अर्थ लावत नसतील तरीही आपले काही नुकसान होणार नाही. आणि त्यांनी जर असा अर्थ लावला तर ते त्यांना शोभेसे कृत्य होईल आणि आपल्याला कोणत्याही अडथळ्याशिवाय काम करता येईल. धान्य आणि कापड यांची चणचण सहन करण्याचे कोणतेही कारण नाही ही गोष्ट मला सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट दिसते. याबद्दल मी इतरांची खात्री पटवून देऊ शकत नसेन तर मात्र गोष्ट वेगळी आहे. अशा परिस्थितीत मी तिथे येतो की नाही यामुळे काहीही फरक पडत नाही. माझी जागा केवळ इथेच आहे. मी इथे जे काही करू शकून राहिलो आहे त्यावर मी समाधानी आहे. येथील लोकांचे काहीसे सांत्वन मी करू शकलो याचे मला समाधान आहे आणि जर मी इथेच राहिलो तर त्यांचे अजून जास्त समाधान होईल असे काम मी करू शकेन. परंतु हे सर्व ईश्वराच्या हाती आहे.

बिहार सरकार चौकशीसमिती नेमत नाही कारण त्याकरिता तुमचा विरोध आहे असे सांगितले जात असल्याचे मी ऐकतो (फेब्रुवारी १०ला याचे उत्तर देताना सरदार पटेलनी लिहिले : “बिहारमध्ये चौकशी आयोगाची स्थापना न करण्यात माझा हात आहे असे तुम्हाला कोणी सांगितले? चौकशी आयोग बसवण्यात फायदा काहीच नाही उलट हानीच होईल असे माझे नक्कीच मत आहे. असे असतानाही चौकशी आयोग नेमला जात असेल तर मी ते कसे थांबवू शकतो? . . . . चौकशी आयोग न नेमण्यामागे बिहार सरकार आहे. व्हाईसरायनासुद्धा चौकशी आयोग नको आहे.”). माझा या गोष्टीवर विश्वास नाही, परंतु ती मी तुमच्या निदर्शनास आणून देत आहे. चौकशीआयोग नेमला गेला नाही तर फार मोठी हानी होईल. मंत्रिमंडळ अपराधी आहे असे समजले जाईल. त्यांचे काम जर सरळस्वच्छ असेल तर चौकशीआयोग नेमल्याने कोणती हानी होऊ शकते? बिहारमध्ये जाण्याकरिता माझ्यावर भरपूर दडपण येत आहे परंतु मंत्र्यांवर माझा विश्वास

असल्यामुळे मी तिथे गेलो नाही. परंतु तरीही चौकशीआयोग नेमला गेला नाही तर बिहारमध्ये जाण्याशिवाय माझ्यासमोर पर्याय राहणार नाही.

तुम्ही तुमच्या प्रकृतीची पुरेशी काळजी घेत असाल अशी आशा आहे.

आशीर्वाद,

बापू

सरदार वल्लभभाई, गृहमंत्री,

नवी दिल्ली.

गुजरातीवरून. 'बापूना पत्रो - २ : सरदार वल्लभभाईने', पृष्ठ ३४८-९

-----------------

# ४२०. अश्रफ अली यांना पत्र

फेब्रुवारी ५, १९४७

भाई अश्रफ अली,

मला तुमचे सुंदर अक्षरात लिहिलेले पत्र मिळाले. मी कोणत्या रामाची भक्ती करतो हे मी सांगायला पाहिजे की तुम्ही? मला काय म्हणायचा वा कशावर विश्वास ठेवायचा अधिकार आहे हे सांगण्याचा मलाच जर अधिकार असेल तर मी म्हणेन की माझा राम मानव प्राणी नाही. माझा राम आज उपस्थित आहे, भूतकाळात तो उपस्थित होता आणि भविष्यकालातही तो उपस्थित असेल. तो निरंजन, निराकार आहे. यामुळेच माझ्याकरिता राम, कृष्ण, रहीम आणि करीम ही सगळी एकाच गोष्टीची नावे आहेत. तुम्ही स्वतः मुंबईत असताना तुमच्या शाळेला भेट देण्याकरिता मला कसे काय सांगता?

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-------------------

# ४२१. श्रीकृष्ण सिन्हा यांना पत्र

फेब्रुवारी ५, १९४७

भाई श्रीकृष्ण सिन्हा,

जमायते उलेमाने मोंघीरसंबंधी पाठवलेले पत्र आणि कागदपत्रे मी पाठवत आहे. तुम्ही मला उर्दूत वा इंग्रजीत उत्तर पाठवू शकता.

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------------

# ४२२. अब्दुल हमीद आझमी यांना पत्र

फेब्रुवारी ५, १९४७

भाई अब्दुल हमीद आझमी साहेब,

मला तुमचे पत्र आणि वृत्तपत्रांना दिलेल्या वक्तव्याची सोबत जोडलेली प्रत मिळाली. तुम्ही म्हणता ते सगळे खरे असेल तर या प्रकरणाकडे मी गंभीरपणे पाहिले पाहिजे. मी चौकशी करत आहे (पाहा पुढील विषय.). मला जर अजून काही सांगण्यासारखे वाटले तर मी तुम्हाला परत लिहीन. मला लिहून तुम्ही उपकृत केले आहे. बिहारमधील घटनांची चौकशी करण्याकरिता निष्पक्ष चौकशीसमिती नेमण्यात यावी असा सल्ला बिहार सरकारला मी दिल्याचे तुम्हाला माहीतच असेल असे मी समजतो.

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

--------------

# ४२३. सैय्यद महम्मद यांना पत्र

काझिरखिल छावणी, पोस्ट रामगंज, नोआखाली,

फेब्रुवारी ५, १९४७

भाई महम्मद (विकास आणि दळणवळण खात्याचे मंत्री, बिहार),

मुस्लिम लीगच्या सचिवाने मला लिहिले आहे. त्या पत्रातील काही भाग असा आहे :

बिहार काँग्रेसच्या मंत्रिमंडळाची हिंदू मानसिकता इतकी जबरदस्त आहे की ते मुसलमान सहकाऱ्यालासुद्धा टाळतात असे वृत्त मला मिळाले आहे. मला असे सांगण्यात आले आहे की मुसलमानांचा गमावलेला विश्वास परत मिळवण्याकरिता बिहारमधील मदतनिधीच्या कामाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी डॉ. महमूदकडे देण्याचे मौलाना अबुल कलाम आझाद आणि डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी ठरवले होते. असे असतानाही त्यांना हातभर अंतरावर ठेवण्यात आले आहे. (उद्धृत करण्यात आलेला हा परिच्छेद इंग्रजीत आहे.)

हे खरे आहे काय आणि खरे असेल तर त्यासंबंधी तुम्ही काय केले ते कृपाकरून मला कळवा.

सचिव मला लिहितात :

दंगलग्रस्त भागाचा दौरा करणाऱ्या मंत्र्यांमध्ये डॉ. महमूद एक होते. तिथे घडलेल्या घटनांच्या क्रूरपणाच्या वर्तनामुळे झालेल्या नुकसानाची कल्पना ते तुम्हाला देऊ शकतील. आम्हाला तथ्यांमध्ये अतिशयोक्ती करायची नाही. त्या इतक्या भयानक आहेत की कोणीही प्रामाणिकपणे सांगेल तर तो त्यांचे गांभीर्य कमी करू शकणार नाही. इतकेच नाही तर या सर्व गोष्टींकडे सरकारसुद्धा निष्ठुरपणे दुर्लक्ष करत आहे. बिहारमधील मुसलमानांचा विश्वास त्यांनी गमावला आहे. (उद्धृत करण्यात आलेला हा परिच्छेद इंग्रजीत आहे.)

कृपाकरून मला सर्व माहिती कळवा.

उर्दू फोटोप्रतीवरून. जी. एन. ५१००

----------------

# ४२४. प्रार्थना प्रवचन

("गांधीजीज वाकिंग टूर डायरी"मधून उद्धृत)

श्रीनगर,

फेब्रुवारी ५, १९४७

**मी भाषणाकरिता बसतो ती जागा सजवू नका आणि त्या ठिकाणाला सुशोभित करणारे छत वगैरेही लावण्याची आवश्यकता नाही असे स्वयंसेवकांना सांगत गांधीजींनी आपल्या भाषणाची सुरुवात केली. ते म्हणाले की मला अशा कोणत्याही गोष्टी आवडत नाहीत. हा पैशाचा आणि श्रमाचा अपव्यय आहे. आवश्यकता इतकीच आहे की थोड्या उंच जागेवर ही क्षीण काया टेकण्याकरिता थोडी नरम आणि स्वच्छ गादी टाकली की माझ्याकरिता तितके पुरे होते. आज माझी तुम्हाला त्या प्रश्नाबद्दल काही सांगण्याची इच्छा आहे जो या महिन्याचा तीन तारखेला निघाला होता परंतु चार तारखेला मी त्याबद्दल बोलू शकलो नव्हतो कारण मला मुसलमान मित्रांच्या वक्तव्याबद्दल चर्चा करणे भाग पडले होते. प्रश्न असा होता :**

**ज्या प्रांतांमध्ये आपली स्वतःची घटना तयार करण्याकरिता लागणारे सामर्थ्य असेल त्यांनी आपली घटना तयार करावी आणि आपण स्वतंत्र झालो याचा पुरावा म्हणून ब्रिटिश सैन्याला निघून जाण्याकरिता सांगावे असा सल्ला तुम्ही त्या प्रांतांना दिला आहे. हिंदुस्थानातील स्वतंत्र झालेल्या त्या प्रांतात मताधिकाराचा कोणता आधार असला पाहिजे? विधानसभेच्या सांप्रदायिक निवडणुकांची जागा विशिष्ट कामाच्या आधारावरील निवडणुकांनी घ्यायला पाहिजे काय? की कामाऐवजी सांप्रदायिक प्रतिनिधित्व असले पाहिजे? अथवा संयुक्त मतदार संघ असावे आणि त्यात अल्पसंख्य संप्रदायांकरिता अथवा विशिष्ट काम करणाऱ्या गटांकरिता काही काळ आरक्षण असले पाहिजे? काही समुहांकरिता विशिष्ट काळाकरिता आपण आरक्षण दिले पाहिजे काय? असे असेल तर कोणत्या गटाकरिता? वा प्रौढ मतदानाचा अधिकार असलेले संयुक्त मतदारसंघ असायला पाहिजे?**

**गांधीजींचे उत्तर स्पष्ट होते. एक प्रांतसुद्धा त्याची स्वतःची घटना तयार करू शकतो व ती लागू करू शकतो, परंतु त्याकरिता अगदी थोडेसे बहुमत असून भागणार नाही तर प्रचंड बहुमत असले पाहिजे. जगात अशी एकही शक्ती नाही की जी अशा स्वातंत्र्यप्रेमींचा मार्ग अडवू शकेल जे आपल्या शत्रूंना मारण्याकरिता नाही तर मरण्याकरिता तत्पर असतात. हा दृष्टिकोन मी एकेकाळी मांडला होता** (अमृत बझार पत्रिका, फेब्रुवारी ८, १९४७, इथे १९१९ आहे.). **परंतु आज बरीच प्रगती झाली आहे. मी कॅबिनेट मिशनच्या राज्य प्रपत्राचा अनुकूल अर्थ लावला आहे. मला दिसते त्याप्रमाणे एका प्रांताने जरी ठामपणे निर्धार व्यक्त केला तरी कॅबिनेट मिशनच्या प्रपत्राप्रमाणे त्याला अडवता येऊ शकणार नाहीत. ही गोष्ट जर एका प्रांताकरिता म्हणजे कल्पना करा की बंगालकरिता खरी असेल तर घटनासमितीकरिता ती किती खरी असेल? ब्रिटिश सरकार हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याविषयी काय म्हणते याच्याशी माझे काहीही सोयरसुतक नाही. ही गोष्ट जनतेवर अवलंबून आहे,**

कोणत्याही विदेशी शक्तीवर नाही. आणि राज्यप्रपत्र जर मागे घेण्यात आले तर हिंदुस्थान काय करील हा प्रश्नही माझ्यासमोर उभा राहत नाही. हिंदुस्थानला विजनवासाची सवय आहे. पंडित नेहरू आणि त्यांच्या मित्रांनी जेव्हा पदभार स्वीकारला होता तेव्हा मी म्हणालो होतो की ही गुलाबपुष्पाची शैय्या नाही तर हे काटेरी अंथरुण आहे. तुमचे ध्येय स्वातंत्र्य आहे आणि काहीही झाले तरी तुम्हाला स्वातंत्र्य मिळेल.

स्वाभाविक आहे की जनता जर हातचे काहीही राखून न ठेवता स्थिर आणि सरळ धोरणानुसार मनापासून अहिंसेचा स्वीकार करील तर मी ही गोष्ट खात्रीपूर्वक सांगू शकतो. उलटपक्षी इंग्रजांना आपण तलवारीच्या बळावर घालवून लावू शकतो असे जर तुम्हांला वाटत असेल तर तुम्ही फार मोठी चूक कराल. तुम्हांला ब्रिटिशांचा निर्धार आणि धैर्य माहीत नाही. ते तलवारीच्या सामर्थ्यासमोर झुकणार नाहीत. परंतु खुनाचा बदला खुनाने घेण्यावर विश्वास नसलेल्या अहिंसेच्या धैर्याचा ते सामना करू शकत नाही. अहिंसेपेक्षा श्रेष्ठ अशी दुसरी शक्ती मला माहीत नाही. आणि तरी अजूनही आपण स्वतंत्र नसू तर याचे कारण जनतेत अजून पुरेशा प्रमाणात अहिंसा विकसित झालेली नाही हे आहे. असो, हिंदुस्थानने आतापर्यंत जी अहिंसा विकसित केली तिला दिलेले उत्तर म्हणजे हे राज्य प्रपत्र आहे.

तुम्ही जर गेल्या युद्धाचा विचार कराल तर तुम्हांला स्पष्टपणे दिसून येईल की त्यात शत्रूची तथाकथित शक्ती जरी चिरडली गेली होती तरी मित्रपक्षांना मिळालेला विजय पोकळ होता. त्यात जो प्रचंड नरसंहार झाला तो तर झालाच शिवाय शत्रूदेश आणि मित्रदेश या दोघांनी मिळून जगातील किती धान्यसंपदा आणि कापडसंपदा नष्ट केली याचा अंदाजच नाही. आणि यात मित्रपक्षाच्या राष्ट्रांनी इतकी माणूसकी गमावली आहे की ते शत्रूला गुलामगिरीच्या अवस्थेत पोहोचवण्याकरिता प्रयत्नशील आहेत. यापैकी मित्र राष्ट्रांची अधिक कीव करावी की शत्रू राष्ट्रांची हाच प्रश्न उभा राहतो. यामुळेच लोकांना माझे सांगणे आहे की तुम्ही अहिंसेद्वारे मिळालेल्या आत्मविश्वासाच्या बळावर, मग केवळ धोरण म्हणून जरी तुम्ही त्या अहिंसेचा अवलंब केलेला असेल तरी,सुरक्षिततेची जाणीव ठेवून जे कोणते परिणाम होतील त्यांचा सामना करण्याची तयारी ठेवली पाहिजे.

जोपर्यंत मताधिकाराचा प्रश्न आहे २१ वा १८वर्ष वयाच्यासुद्धा सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांना मताधिकार मिळण्यावर माझा विश्वास आहे.माझ्यासारख्या म्हाताऱ्यांना हा अधिकार देण्याची माझी इच्छा नाही. मतदानाच्या अधिकाराच्या दृष्टीने हे लोक काहीही उपयोगाचे नाहीत. जे मृत्यूच्या काठावर उभे आहेत त्यांच्याकरिता मृत्यू आहे, तरुणांकरिता जीवन आहे. ज्याप्रमाणे १८ वर्षांच्या आतील मुलांना मताधिकार मिळण्याच्या मी विरोधात आहे त्याचप्रमाणे असे म्हणा की ५० वर्षांवरील माणसांना मताधिकार मिळण्याच्या मी विरोधात आहे. वेड्यांना आणि बदमाशांनासुद्धा हा हक्क अर्थातच दिला जाणार नाही. स्वतंत्र हिंदुस्थानात अर्थातच मी सांप्रदायिक मतदानाची कल्पना करू शकत नाही. राखीव जागा असलेले काही संयुक्त मतदारसंघ असू शकतात. मुसलमान, पारसी, शीख इत्यादींकरिता विशेष सुविधेचीही मी कल्पना करू शकत नाही. जर कोणाला सूट द्यायचीच असेल तर ती मी शारीरिक महारोग झालेल्यांना सूट देणे पसंत करीन. सामाजिक अपराधाची ती परिणती आहे. नैतिक महारोगी जर स्वतःहोऊन सर्व सवलती घेणे बंद करतील तर शारीरिक महारोग नाहीसा होण्याकरिता वेळ लागणार नाही. आणि हे गरीब लोक समाजाला इतके घाबरलेले आहेत की ते आपल्या हक्काचा

**कोणताही दावा समाजासमोर करत नाहीत. त्यांना चांगले शिक्षण द्या आणि ते आदर्श नागरिक होतील. असो, प्रौढ मतदान अधिकाराबरोबरच वा असे म्हणा की त्यापूर्वीच सार्वत्रिक शिक्षणाचा मी पुरस्कार करीन. साहित्यिक शिक्षणाची त्याला जोड देता येऊ शकेल परंतु संपूर्ण शिक्षण साहित्यिक असण्याची आवश्यकता नाही. इंग्रजी शिक्षणाने तुमच्या मनाची उपासमार केली आहे याबद्दल माझी खात्री पटली आहे. त्याने आपली बुद्धी विकसित होऊ दिली नाही, तिला दुर्बल केले आणि आपण शूर नागरिक व्हावे म्हणून तिने कधीही प्रयत्न केले नाही. मी सर्व ज्ञान आपल्या त्या समृद्ध भाषेतून देण्याच्या बाजूने आहे ज्यांच्याबद्दल कोणत्याही देशाला अभिमान वाटू शकेल. लोक जर प्रामाणिकपणे आणि निष्ठेने काम करतील तर चांगला नागरिक होण्याचे शिक्षण अल्पावधीतच देता येऊ शकते.**

'हरिजन', मार्च २, १९४७

-------------------

# ४२५. किशोरीलाल घ. मश्रूवाला यांना तार

[फेब्रुवारी ५, १९४७ला अथवा त्यानंतर]

(ही तार किशोरीलाल घ. मश्रूवाला यांच्या तारेच्या उत्तरात पाठवली होती. त्या तारेत लिहिले होते: “अंदाजाने केलेल्या विधानांचा पुनर्विचार करण्यात येत आहे. अंतिम पाऊल उचलण्यापूर्वी नाथजींना चर्चेकरिता बोलवावे अशी सूचना आहे. नाथजींचा पत्ता शांतीकुंज बाजार, दादर आहे.”)

किशोरीलाल,

हरिजन आश्रम,

अहमदाबाद.

नाथजींचा (केदारनाथ कुळकर्णी; शिवाय पाहा “अमतुस्सलाम यांना पत्र”, जानेवारी २२, १९४७) पत्त्याची (अक्षरे) समजू शकली नाही. ते येऊ शकत असतील तर त्यांचे स्वागत आहे. मी मात्र माझा दृष्टीकोन जाहीर केला आहे (पाहा वल्लभभाई पटेल यांना पत्र, फेब्रुवारी १।२, १९४७)

बापू

मुळावरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

---------------

# ४२६. प्रश्नोत्तरे

बौद्धिक श्रम आणि शारीरिक श्रम

**प्रश्न - रविंद्रनाथ** (रविंद्रनाथ टागोर) **वा रमण** (सी. व्ही. रमण, भौतिक विज्ञान शास्त्रज्ञ) **यांनीही शारीरिक श्रमाद्वारे आपली भाकरी मिळवावी असे तुम्ही का म्हणता? हा मानवी शक्तीचा केवळ अपव्यय नाही काय? बौद्धिक श्रम करणारे आणि शारीरिक श्रम करणारे हे दोघेही उपयुक्त सामाजिक कार्य करत असताना या दोघांनाही समान पातळीवर का ठेवण्यात येऊ नये?**

उत्तर - बौद्धिक काम महत्त्वाचे आहे आणि त्याला जीवनाच्या योजनेत निश्चितच स्थान आहे यात काही संशय नाही. परंतु माझा आग्रह शारीरिक श्रमाच्या आवश्यकतेबद्दल आहे. माझा दावा आहे की कोणताही माणूस या कर्तव्यापासून मुक्त होऊ शकत नाही. यामुळे उलट त्याच्या बौद्धिक श्रमाची प्रतवारी वाढेल. प्राचीन काळात ब्राह्मण लोक जसे बुद्धीने काम करायचे तसेच शरीरानेसुद्धा करायचे असेसुद्धा मी म्हणेन. परंतु ते जरी तसे करत नसतील तरी सध्याच्या युगात शारीरिक श्रमाची उपयुक्तता सिद्ध झालेली आहे. या संदर्भात मी टॉलस्टॉय यांच्या जीवनाचे उदाहरण देईन. त्यांनी आपल्या देशातील बोंडोरेफ या शेतकऱ्याने सर्वप्रथम मांडलेल्या भाकरीच्या सिद्धांताला प्रसिद्धी मिळवून दिली.

धरमपूर (नोआखाली) फेब्रुवारी ६, १९४७ (प्रसादपूर येथे काँग्रेस कार्यकर्ती बिना दास यांनी विचारलेल्या प्रश्नाचे गांधीजींनी दिलेले उत्तर म्हणून हे 'अमृत बझार पत्रिक'च्या फेब्रुवारी १०, १९४७च्या अंकात प्रकाशित झाले होते)

'हरिजन', फेब्रुवारी २३, १९४७

--------------

# ४२७. जवाहरलाल नेहरू यांना पत्र

(नेहरूंनी जानेवारी ३०, १९४७च्या पत्रात लिहिले होते: "मला माहीत आहे आहे की आम्ही स्वतःवर अवलंबून राहायला पाहिजे आणि प्रत्येक वेळी तुमच्याकडे मदतीकरिता धावत यायला नको. परंतु आम्हांला ही वाईट सवय लागली आहे आणि आम्हांला वाटते की तुमच्यापर्यंत सहजपणे पोहोचता येईल अशा अंतरावर तुम्ही असता तर आमच्या अडचणी कमी झाल्या असत्या." शिवाय पाहा "अबुल कलाम आझाद यांना पत्र"मधील उतारे, फेब्रुवारी १२, १९४७)

फेब्रुवारी ६, १९४७

मला माहीत आहे की मी जर मोकळा असतो तर देशासमोर असलेल्या किती तरी समस्या सोडवण्याकरिताच्या प्रयत्नात मी माझा वाटा उचलला असता. परंतु मी इथे काही करू शकलो नाही तर मी निरुपयोगी ठरेन हे मला माहीत आहे. ... आपण सर्व त्या शक्तीच्या हाती आहो जिला आपण ईश्वर म्हणून ओळखतो.

* * *

बिहारमध्ये जाण्याकरिता माझ्यावर फार मोठे दडपण येत असते. कारण बिहार सरकारने तेथील परिस्थितीचे माझ्यासमोर वस्तुस्थितीदर्शक चित्र मांडले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. परिस्थितीवर माझे लक्ष आहे.

'महात्मा गांधी - द लास्ट फेज', खंड १, भाग २, पृष्ठ २०८ आणि २४७

---------------

# ४२८. मीराबेन यांना पत्र

फेब्रुवारी ६, १९४७

सत्याचा मार्ग कलेवरांवरून जात असतो आणि त्यांच्यावरून जाण्याचे आपण साहस करत असतो.

'महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड २, पृष्ठ २६४

--------------

# ४२९. एक चिठ्ठी

फेब्रुवारी ६, १९४७

मला तुझी तार मिळाली, परंतु उत्तरार्थ मी तुला परत तार पाठवली नाही. याचा अर्थ असा नाही की मला तुझी खादी (नको) आहे. तुझ्याजवळील प्रत्येक वार खादी मी घेऊ शकेन. मला वाटते की तू मला किंमतीची सूची पाठवली नाही. ती पाठव. तुझी खादी बोलावण्याकरिता कदाचित काही वेळ लागू शकतो. कोणी निकडीचा ग्राहक आला तर तू विकण्याकरिता मोकळा आहे. असे नसेल तर तुझ्याजवळ जे असेल ते तू माझ्याकरिता राखून ठेवू शकतोस आणि मी लिहिले तेव्हा किती विक्री झाली होती याची तू फिकीर करू नको.

"सेप्टिक टँक व्हर्सेस अर्थ लॅट्रीन्स" या तुझ्या लेखाचा एक कागद मी अजून सांभाळून ठेवलेला आहे. तू म्हणाला होतास की हा लेख मी परत लिहीन, तर तू तो परत लिहिणार आहेस काय?

मला तुला लिहिण्यात यश येवो अथवा न येवो परंतु तू मात्र तुझ्या हालचाली आणि प्रकृती यांच्याबद्दल मला कळवत राहा.

पदयात्रा वेळापत्रकाप्रमाणे सुरू आहे. सतीश बाबूंनी मला चार मैलांपेक्षा जास्त दिलेले नाही. संध्याकाळी काय करायचे हे बहुतांशी माझ्यावर अवलंबून असते. मला वाटते की ... (मूळ स्रोत अपूर्ण आहे.)

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-----------------

# ४३०. प्यारेलाल यांना पत्र

फेब्रुवारी ६, १९४७

चि. प्यारेलाल,

मी तुझे आणि तू मनूला लिहिलेले पत्र वाचले. आवश्यक असेल तर ये. त्यामुळे काही लाभ होईल असे मला वाटत नाही. यावरून तुझा ईश्वरावर विश्वास नाही इतकेच दिसेल - अजूनही माझे म्हणणे आहे की तू स्वतःला आणि मनूला ईश्वराच्या हाती सोपवले पाहिजे. मी त्यावर भरपूर वेळ दिला आहे. तू जसजसा अधिक प्रयत्न करत राहशील तसतशी परिस्थिती अधिकाधिक क्लिष्ट होत जाईल. तू स्पष्ट करून सांगावे असे काहीही नाही. परंतु तुझी जर खात्री पटली असेल की तू दूर राहू शकत नाही तर तू येऊ शकतो. तू ठरवले तर तिथे राहून तू मनूची जास्त सेवा करू शकतो. मी तुला अडवत नाही हे समजून घे, परंतु मी तुझ्यासमोर मांडलेल्या चित्राची तुला काही मदत होत असेल तर तुझ्या मनावर ताबा ठेव.

आशीर्वाद,

बापू

ता. क. मनू म्हणते : “मला माहीत नाही. तुमची इच्छा असेल तसे लिहू शकता.”

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

----------------

# ४३१. एकनाथ यांना पत्र

फेब्रुवारी ६, १९४७

भाई एकनाथ,

मला तुमचे पत्र मिळाले. तुम्ही हिंदू आणि मुसलमान रुग्णांवरही उपचार करता आणि ते तुमच्याकडून उपचार करून घेतात हे कळल्यामुळे मला आनंद झाला. माझ्या भाषणांमधून मी स्वच्छतेबद्दल आधीच बोललो आहे. परंतु मी तुमची सूचना लक्षात ठेवीन आणि त्याबद्दल काही तरी बोलेन. (पाहा पुढील विषय)

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

# ४३२. प्रार्थना प्रवचन

("गांधीजीज वाकिंग टूर डायरी"मधून उद्धृत.)

धरमपूर,

फेब्रुवारी ६, १९४७

गांधीजी म्हणाले की मला मारवाडी रिलीफ सोसायटीच्या वैद्यकीय अधीक्षकडून एक पत्र मिळाले आहे. डॉक्टर म्हणतात की कोणताही भेदभाव न करता ते हिंदू आणि मुसलमान रुग्णांवर उपचार करत असतात. मुसलमान स्त्री-पुरुष आनंदाने त्यांच्या सेवेचा लाभ घेत असतात. या भागातील मुसलमान फार गरीब असल्याचे त्यांच्या लक्षात आले आहे. ते म्हणाले की मी जिथे कुठे जातो तिथे मला घाण आणि अस्वच्छता दिसते. डॉक्टर पुढे म्हणाले की याबद्दल तुम्ही काही सागू शकता काय?

मी म्हणालो की मी आनंदाने तसे करीन कारण मलासुद्धा गत ५० पेक्षा अधिक वर्षांपासून साफसफाई आणि स्वच्छतेची आवड आहे. मला इंग्रजांची फार निंदा करावी लागलेली आहे. परंतु स्वच्छतेचे नियम मी इंग्रजांपासूनच शिकलो हे सांगताना मला आनंद होतो. नोआखालीत मी पाहिले की पाणी पिण्याकरिता आणि आंघोळ आणि इतर साफसफाईची कामे करण्याकरिता एकाच तळ्याचे पाणी वापरतात. हे चूक आहे. लोक अविचाराने ठीकठिकाणी थुंकून आणि नाक शिंकून रस्ते, गल्ल्या आणि पादपथ घाणेरडे करतात. हिंदुस्थानातील अनेक रोगांचे हे कारण आहे. परंतु आरोग्याच्या नियमांचा सतत केला जाणारा भंग याकरिता काही कमी जबाबदार नाही. अजूनही हिंदुस्थान जगून राहिला हेच आश्चर्य आहे. परंतु आपला मृत्यूदर अतिशय वाईट आहे. अमेरिकेत हा दर बहुधा सर्वात कमी आहे. आणि हिंदुस्थानात जे लोक जिवंत आहेत तेसुद्धा मृत असल्यासारखेच आहेत. यामुळे नोआखालीतील लोक आरोग्याचे आणि साफसफाईचे नियम जितक्या लवकर पाळू लागतील तितके चांगले होईल. परिपूर्ण स्वच्छतेकरिता गरिबीचा अडथळा येत नसतो.

याशिवाय दूरच्या आणि जवळच्या पत्रकारांनी इथे धाडच घातली आहे. पत्रकार शिबिर हे नाव अतिशय आकर्षक आहे परंतु तेथील वातावरण माझ्या शिबिरातील वातावरणाशी आणि गावातील वातावरणाशी मिळतेजुळते आहे. माझ्या आजूबाजूच्या जगात भडकपणाला कोणतेही स्थान नाही. माझ्याबरोबर असलेले पत्रकार अतिशय कठीण परिस्थितीत राहतात. गावातील लोक देतील त्या झोपड्यात त्यांना राहावे लागते. त्यांना राहण्याकरिता पुरेशी जागा मिळत नाही. बाहेर फिरण्याचा धोका न पत्करता पाचसहा लोक त्यांना ज्या बातम्या देतील त्यावरच त्यांनी समाधान मानले पाहिजे. माझ्या अनवाणी पदयात्रेमुळे लोकांमध्ये कोणतीही उत्तेजना निर्माण व्हायला नको. इथे चालणे माझ्याकरिता कठीण नाही. नोआखालीची माती मखमलीप्रमाणे मऊशार आहे आणि त्यावर गालीचा पसरल्यासारखी हिरवळ आहे. यावरून मला इंग्लंडमधील मऊ गवताची आठवण झाली. नोआखालीतील मातीवरून आणि गवतावरून चालताना पायात वहाणा घालण्याची मुळीच आवश्यकता नसते. गुजरातमध्ये मी बहुधा असे करू शकणार नाही. आणि याशिवाय माझ्यामागे

**आपल्या देशातील परंपरा आहे. यात्रा नेहमीच पादत्राण न घालता केली जात असते. सरळ आणि साधी गोष्ट सांगायची तर माझ्याकरिता हा दौरा एक यात्राच आहे. परंतु पत्रकारांना आणि इतरांना त्याचे आकर्षण वाटायला नको. अनवाणी चालण्याचा मला कोणताही त्रास होत नाही. आणि ईश्वराची कृपा असली तर मी यातून पार पडेन.**

पत्रकारांनी आपला वेळ आणि पैसा वाचवावा आणि तो पैसा ते नोआखाली मदत निधीकरिता देऊ शकतात.

**यानंतर विचारण्यात आलेल्या प्रश्नांकडे गांधीजी वळले -**

**प्रश्न - एका वा दुसऱ्या प्रांताने जर आपले स्वातंत्र्य घोषित केले तर त्या प्रांताना तुम्ही कशा प्रकारची घटना तयार करण्याकरिता सुचवाल? १९२५ साली तुम्ही घोषित केले होते की तुमच्या स्वप्नातील स्वतंत्र हिंदुस्थानात शारीरिक श्रम करून राज्याची सेवा करणारांनाच मतदान अधिकार राहील. अशा प्रांताच्या बाबतीत तुमचा अजूनही तोच सल्ला राहील काय?**

उत्तर - संपूर्ण हिंदुस्थानकरिता जसे स्वातंत्र्य असेल तसेच या प्रांतांकरिताही स्वातंत्र्य असेल. १९२५ साली मी जे म्हणालो होतो त्यावर मी अजूनही कायम आहे, म्हणजे एका विशिष्ट वयावरील सर्व तरुण स्त्री-पुरुषांना तेव्हाच मताधिकार मिळेल जेव्हा ते राज्याकरिता काही शारीरिक श्रम करून मदत करतील. अशा प्रकारे एखादा साधा मजूर सहज मतदार होऊ शकेल जेव्हा की एखादा लक्षाधीश वा वकील जोपर्यंत शारीरिक श्रम करून राज्याला काही मदत करत नाही तोपर्यंत त्याला मतदार होणे कठीण जाईल.

**प्रश्न - हिंदुस्थानातील एकमेकांच्या सीमेला लागून असलेल्या प्रांतांनी स्वातंत्र्य घोषित केले नाही परंतु इकडेतिकडे विखुरलेल्या प्रांतांनी जर तसे केले तर असे विखुरलेले प्रांत एकसंघ असलेल्या प्रांतांच्या सामूहिक कामकाजात अडथळा निर्माण करणार नाहीत काय?**

उत्तर - माझ्या कल्पनेतील म्हणजे अंहिसेवर आधारित समाज असेल तर अशी कोणतीही अडचण येईल असे मला वाटत नाही. कल्पना करा की रविंद्रनाथ ठाकूर आणि सुऱ्हावर्दीसारख्या प्रतिभाशाली लोकांनी भरलेला आणि दाट लोकसंख्या असलेला बंगाल स्वातंत्र्यावर आधारित एखादी घटना तयार करील आणि अफूच्या नशेत झिंगलेला आसाम स्वप्नरंजनात दंग राहील, हाडबंडल लोक राहत असलेल्या ओरिसाला काही करण्याची इच्छाच नसेल आणि बिहार आपल्या यादवीतच गुंग राहिला तर बंगाल या तिघांनाही प्रभावित करून त्यांना व्यापून टाकेल. अशा प्रकारची सर्वांबद्दल मैत्रीभाव ठेवणारी आणि कोणाबद्दलही शत्रूभाव न बाळगणारी संसर्गजन्यता माझ्या स्वातंत्र्याच्या योजनेत अध्याहृत आहे. शक्य आहे की हा माझा एकट्याचाच आवाज असेल. असे असेल तर ते हिंदुस्थानचे दुर्दैव असेल.

**प्रश्न - स्वतंत्र प्रांताची घटना इतकी आकर्षक असावी की इतरांनाही त्यात सामील होण्याची इच्छा व्हावी असे तुम्हाला वाटते काय?**

उत्तर - जी गोष्ट मूलतःच चांगली असते ती मूलतः आकर्षकसुद्धा असते.

**प्रश्न - कल्पना करा की संपूर्ण अ समूहाने एक घटना तयार केली तर जे प्रांत ब वा क समूहात आहेत त्यांची इच्छा असली तर त्यांना अ समूहात सामील होणे शक्य होईल काय?**

अ समूहाला चांगली घटना तयार करण्यात जर यश आले तर ब वा कला अ समूहात सामील होण्याची सूट तर असेलच आणि शिवाय त्यांना अ समूहात सामील होण्याचा मोहसुद्धा आवरणार नाही.

**प्रश्न - संस्थानांबद्दल काय? संस्थानांनी संघराज्यात सामील व्हावे की होऊ नये हे कोण ठरवील : सध्याचे संस्थानिक की जनता? जर जनता यासंबंधी निर्णय घेणार असेल तर सध्याच्या संस्थानांच्या घटनेत आधी कोणता बदल केला पाहिजे अशी तुमची अपेक्षा आहे?**

उत्तर - संस्थानांचा मी अतिशय नम्र सेवक असलो तरी मी देशातील कोट्यवधी लोकांचाही आहे. म्हणायला तर हिंदुस्तानात ६४० राजे आहेत पण खऱ्या अर्थाने तर ते १०० पेक्षाही कमी असतील. त्यांची संख्या किती का असली तरी ते इतके नगण्य आहेत की जागृत हिंदुस्थानात त्यांचे अस्तित्व जनतेचे सेवक होऊनच टिकू शकते. ब्रिटिश अप्रामाणिकपणाने राजे विरुद्ध जनता असे भांडण लावतील ही जी भावना या प्रश्नामागे आहे तिच्याशी मी सहमत नाही. कॅबिनेट मिशनच्या प्रपत्रात असे नाही. परंतु हिंदुस्थानने कॅबिनेट मिशवर का विसंबून राहावे? हिंदुस्थान जेव्हा तयार होईल तेव्हा हिंदुस्थानला आपल्या ध्येयापर्यंत म्हणजे लोकमान्यांच्या (बाळ गंगाधर टिळक) भाषेत आपल्या जन्मसिद्ध अधिकारापर्यंत पोहोचण्यापासून ब्रिटिश वा संस्थानिक वा कोणत्या तरी सत्ताधाऱ्यांचा गट अडवू शकणार नाही.

हरिजन, मार्च २, १९४७

# ४३३. निर्मल कुमार बोस यांना पत्र

फेब्रुवारी ७, १९४७

चि. निर्मल बाबू,

तुमच्या पहिल्या व्यक्तिगत पत्राचे उत्तर लिहिणे मला शक्य झाले नाही. आता 'ब'चे अशी जे संबंध आहेत त्यासंबंधी तुमचे दुसरे पत्र आले. आज मी दुसरे पत्र घेतले पाहिजे. मी तुमचे पत्र 'अ'ला पाठवले आहे. असे करण्याची तुम्ही मला मोकळीक दिली होती. त्यांच्याबद्दलची निष्ठा हे पत्र त्यांच्याकडे पाठवण्याची मागणी करते.

'ब'च्या सांगण्यावरून 'अ'वर तुम्ही अन्याय केला आहे. मी त्याबद्दल तिच्याशी बोललो. तिच्या लक्षात त्यातील सत्य आले. 'अ'चे प्रेम पाशवी इच्छांपासून पूर्णपणे मुक्त आहे. मी त्याला काव्यात्म प्रेम म्हणेन. हे चपखल बसणारे विशेषण नाही परंतु मला दुसरे चांगले आढळले नाही. 'अ' ज्या भावनेने 'ब' वर प्रेम करतो त्याच भावनेने त्याने पूर्वी एका मुलीवर प्रेम केले आहे. या दोन्ही बाबतीत त्याने परोपकाराच्या भावनेने प्रेम केलेले आहे. पहिले पाहता क्षणी झाले होते तर दुसऱ्याचा शोध लागण्याकरिता २ वर्षे लागली. त्याला वाटले की शिक्षणाच्या रूपात आपण आपल्यामधील सर्वोत्तम 'ब'ला देऊ शकतो. त्याच्या मते या दोन्ही प्रकरणी माझ्या प्रारंभिक विरोधामुळे बिघाड झाला. पहिल्या प्रकरणी माझे मत जेव्हा अनुकूल झाले तेव्हा फार वेळ झाला होता. दुसऱ्या प्रकरणीही फार वेळ झाला होता. पहिली मुलगी विवाहित होती. जोपर्यंत 'ब'चा विवाह अन्यत्र कुठे होत नाही तोपर्यंत त्याला आशा ठेवण्याचा अधिकार आहे. 'ब'ला स्वतःबद्दल जितकी माहिती आहे त्यावरून हे पुस्तक आता बंद झालेले आहे असे 'ब'ला वाटते. आता यातील गंमत पाहा. 'अ' म्हणतो की जोपर्यंत 'ब' आपले मन बदलत नाही तोपर्यंत ती माझ्याकरिता बहिणीसारखी वा मुलीसारखी असेल आणि यापुढे मी तिच्याकडे कधीही वेगळ्या दृष्टीने पाहणार नाही. 'ब'चा या आश्वासनावर विश्वास आहे. परंतु तिच्या मताप्रमाणे तो जो सतत तिच्या मागेमागे राहतो त्यावर तिचा आक्षेप आहे.

'ब'ला ती जर पत्नी म्हणून मिळणार नसेल तर तो इतर कोणाही मुलीवर प्रेम करणार नाही असे 'ब'चे म्हणणे आहे. असा कोणताही विचार मनात न येण्याइतका तो पवित्र आहे. तुम्हाला जर माझे विश्लेषण मान्य असेल तर तुम्ही 'अ'ला न्याय द्याल आणि 'ब'ला योग्य मार्गावर न्याल.

अहिंसक आचरण वैयक्तिक असो वा सार्वजनिक त्यात खाजगी वैयक्तिक जीवन आणि सार्वजनिक जीवन यात अविभाज्य संबंध असतो हे तुमच्या लक्षात यावे अशी माझी किती इच्छा आहे! लोकांना पारखण्यात तुम्ही कितीही उदार आणि मोठ्या मनाचे असला तरी खाजगी जिवनात माणूस जर योग्य मार्गावरून विचलीत होत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करता येऊ शकत नाही. तुम्हाला जर हे विधान मान्य असेल तर तुम्ही माझ्या आणि मनूच्या संबंधाचा मागोवा घ्यावा आणि त्यात जर तुम्हाला काही दोष दिसत असेल तो मला दाखवून देण्याचा प्रयत्न करा.

मी हे सर्व तुमचा वेळ वाचवण्याकरिता आणि विचारप्रवृत्त करण्याकरिता लिहिले आहे. परंतु तुमची इच्छा असेल तर चर्चेचे स्वागत करीन.

आशीर्वाद,

बापू

'माय डेज विथ गांधी', पृष्ठ १५६-७

-------------

## ४३४. प्यारेलाल यांना पत्र

फेब्रुवारी ७, १९४७

चि. प्यारेलाल,

तुझ्या अस्वस्थतेमुळे मी अस्वस्थ होतो. तुझे मन ज्या दिशेने काम करते अगदी त्या विरुद्ध दिशेने माझे मन काम करते. अशा परिस्थितीत माणसाने त्याचे स्वतःचे मन सांगेल तसेच वागायला पाहिजे. यामुळे ये. सुशीला पै अनपेक्षितपणे नुकताच आली आहे. याहून मी अधिक काय लिहू?

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

----------------

# ४३५. प्रार्थना प्रवचन

("गांधीजीज वाकिंग टूर डायरी"मधून उद्धृत)

प्रसादपूर,

फेब्रुवारी ७, १९४७

**प्रश्न - तुम्ही नेहमीच फुकट देण्याच्या विरोधात असता आणि भाकरीकरिता श्रमाच्या नियमापासून एकाही माणसाचा अपवाद नसतो असा उपदेश तुम्ही करत असता. जे लोक बैठे काम करत होते परंतु नुकताच झालेल्या दंगलींमध्ये ज्यांनी सर्व काही गमावले आहे त्यांना तुम्ही कोणता उपदेश कराल? त्यांनी स्थलांतर करून अशा ठिकाणी जावे काय की जिथे त्यांना त्यांच्या सवयीचे काम करायला मिळेल? वा भाकरीकरिता श्रम या तुम्ही सांगितलेल्या आदर्शाप्रमाणे जीवन व्यतीत करता येईल अशा प्रकारे त्यांनी आपल्या जीवनाला नव्याने आकार द्यावा? अशा परिस्थितीत त्यांच्यात जे विशेष कौशल्य आहे त्याचा उपयोग काय?**

उत्तर देताना गांधीजी म्हणाले की फुकट काही देण्याचा मी जो अर्थ घेत होतो त्या अर्थाप्रमाणे मी फुकट देण्याच्या विरोधात होतो आणि वर्षांपासून मी भाकरीकरिता श्रमाचा उपदेश करतो आहे हे खरे आहे. पोलीस अधिकाऱ्यांसह जिल्हा दंडाधिकारी आणि जमान साहेब मला भेटायला आले होते. निर्वासितांना शिधा देण्यासंबंधी ते मला सल्ला विचारत होते. जलपर्णी काढणे, रस्त्यांची दुरुस्ती, गावांची पुनर्रचना वा स्वतःच्या जागेच्या वा जमिनीच्या वा इमारतीच्या सीमारेषा सरळ करणे इत्यादी कामांचा कार्यक्रम निर्वासितांसमोर त्यांनी आधीच ठेवला आहे. जे लोक यापैकी कोणतेही एक काम करतील त्यांचा रेशनवर पूर्ण हक्क असेल. मला ही कल्पना आवडली. परंतु एक व्यावहारिक आदर्शवादी म्हणून मी निर्वासितांना एकाएकी या वादळात ढकलणार नाही. लोकांसमोर विविध प्रकारचे काम ठेवले पाहिजे आणि त्यांना एक महिन्याची सूचना देऊन त्या काळात त्यांनी जर कोणत्याही कामाची निवड केली नाही वा त्यांना मान्य असेल असे कोणतेही काम त्यांनी सुचवले नाही आणि शारीरिक काम करण्याकरिता त्यांचे शरीर सक्षम असतानाही त्यांनी कोणतेही शारीरिक काम करण्याकरिता नकार दिला तर एक महिन्याच्या कालावधीनंतर आम्ही तुम्हांला कोणतेही रेशन देऊ शकणार असे त्यांना सांगायला पाहिजे. निर्वासितांनी आणि त्यांच्या मित्रांनी सरकारला अशा प्रकारच्या कामात पूर्ण सहकार्य द्यावे असा माझा सल्ला आहे. कोणतेही श्रम केल्याशिवाय नागरिकांनी रेशनची अपेक्षा करणे चूक आहे.

घर सोडून जाण्याचा सल्ला मी लोकांना कधीही देऊ शकत नाही. एकट्या हिंदूलासुद्धा कोणत्याही परिस्थितीत सुरक्षित वाटले पाहिजे आणि त्याला पूर्णपणे सुरक्षित वाटेल अशी परिस्थिती मुसलमानांनी निर्माण केली पाहिजे. लोकांना आपापल्या पद्धतीने ईश्वराची पूजा करण्याची सूट असली पाहिजे.

सट्ट्यात मिळवलेला पैसा माझ्या मते खऱ्या अर्थाने वैध मार्गाने मिळवलेला पैसा नसतो. तसेच माणूस आपल्या वाईट सवयी कधीही सोडू शकत नाही असेही मी समजत नाही. प्रत्येक जण जर आपल्या निढळाच्या घामावर जगेल तर

**ही धरा स्वर्ग होईल. विशेष कौशल्याचा वेगळा विचार करण्याची आवश्यकता क्वचितच असू शकेल. परंतु प्रत्येक जण जर भाकरीकरिता शारीरिक श्रम करील तर कवी, डॉक्टर, वकील इत्यादी लोकांनी आपल्या कौशल्याचा उपयोग मानवतेच्या सेवेकरिता निःशुल्क केला पाहिजे असे स्वाभाविकपणेच वाटेल. मग त्यांच्या श्रमाचे फळ अधिक चांगले आणि अधिक प्रमाणात मिळेल कारण ते काम त्यांनी निस्वार्थ कर्तव्यभावनेने केलेले असेल.**

'हरिजन', मार्च २, १९४७

---------------

# ४३६. इ. एफ. मॅकनर्नी यांना पत्र

(निर्मल कुमार बोस लिहितात: “. . . यामुळे निर्वासित शिबीर बंद करण्याचा एक प्रस्ताव होता. गांधीजी रात्री उठले आणि त्यांनी जिल्हा दंडाधिकाऱ्याला ... एक पत्र लिहिले.”)

फेब्रुवारी ८, १९४७

काल कृपापूर्वक तुम्ही मला भेटला तेव्हा मी तुम्हाला कबूल केल्याप्रमाणे हे पत्र पाठवत आहे.

माझे स्पष्ट मत आहे की एकाएकी रेशन बंद करू नये. ते बंद करण्यापूर्वी (कमीतकमी एक महिना) तुम्ही निर्वासितांना सांगितले पाहिजे की जे काम ठरवण्यात आलेले आहेत त्यांतील कोणतेही एक काम केले नाही तर तुमचे रेशन बंद केले जाईल. कामाच्या बदल्यात देण्यात येणारे रेशन पुरेसे आणि पोष्टिक तत्त्वांनी युक्त असले पाहिजे. निर्वासितांसमोर पुढील काम करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात यावा :

१. रस्ता बांधणे वा रस्ता दुरुस्त करणे, दररोज कमीतकमी दोन तास.

२. निरीक्षकाच्या देखरेखीखाली २ तास जलपर्णी काढणे.

३. आधीच्या कलमातील वेळेप्रमाणेच २ तास आपल्या रिकाम्या पडलेल्या जमिनीवर सरकारने दिलेल्या साहित्याने व साधनांनी घर बांधणे

४. कलम एक इतकाच वेळ ग्रामपुनर्रचनेचे काम

५. कलम एक इतकाच वेळ तळे साफ करण्याचे काम

६. हातकताई दररोज दुप्पट वेळ. कापूस आणि चरखा अथवा टकळी सरकार पुरवील. कताईमध्ये धुनाई आणि पेळू तयार करण्याचा समावेश असेल.

७. इतकाच वेळ विणाई. साधने, आवश्यक साहित्य आणि हाताने कताई केलेली असेल तर दुहेरी केलेले सूत. हे सर्व साहित्य सरकार पुरवील.

८. पहिल्या कलमात सांगितले इतकाच वेळ ढेणकीने धान कुटणे. ढेणकी सरकार पुरवील.

९. सरकारने पुरवलेले खोबरे वा तेलबिया यांच्यापासून तेल काढणे.

१०. पहिल्या वा सहाव्या कलमात दिलेल्या वेळेपर्यंत असे कोणते तरी हस्तकौशल्याचे काम. या कामाची निवड सरकार वा निर्वासित करतील व त्याला सरकारची मान्यता लागेल.

सरकारने पूर्ण विचार करून तयार केलेल्या योजनेवर व तिचे योग्य पद्धतीने संचालन करण्यावर या सर्व गोष्टीचे यश अवलंबून आहे. ही काही दुष्काळातील उपाययोजना नाही. श्रम नाही, खायला नाही या तत्त्वाला अनुसरून ही योजना तयार करण्यात आली आहे.

परिवहन वा इतर शासकीय व्यवस्थेत अडचण निर्माण झाल्यामुळे रेशन पुरवण्याच्या कामात अडचण यायला नको.

जे निर्वासित काम करण्याकरिता तयार नसतील वा काम करण्यासारखी ज्यांची प्रकृती नसेल त्यांना ठरलेल्या किंमतीवर रेशन देण्यात यावे अशी माझी सूचना आहे.

येत्या हंगामाकरिता नांगरणीचा काळ लवकरच संपणार आहे. यामुळे शेतीला लागणारी आऊतभांडी, बैल आणि बी इत्यादी साहित्य जलदगतीने उपलब्ध करून देण्यात यावे, नाही तर फार मोठ्या संकटाचा सामना करण्याची वेळ येईल.

हे मी सकाळी २ वाजता लिहिले आहे आणि खादी प्रतिष्ठानचे सतीश चंद्र दास गुप्ता यांनी हे पाहिले आहे. तुम्ही त्यांच्याशी भेटून या संबंधात चर्चा करावी अशी माझी इच्छा आहे कारण स्थानिक परिस्थितीतीची मला मुळीच कल्पना नाही.

'माय डेज विथ गांधी', पृष्ठ १४१-२

-----------------

# ४३७. निरंजन सिंग गिल यांना पत्र

प्रसादपूर छावणी,

फेब्रुवारी ८, १९४७

प्रिय सरदारजी,

मला तुमचे पत्र आणि सोबतची कागदपत्रे मिळाली. मुख्यमंत्र्यांचे पत्र (पाहा "हसन शहीद सुऱ्हावर्दी यांना पत्र", जानेवारी २८, १९४७. बिहारमधील मुस्लिम लीगचे झफर इमाम यांना बिहारमधील कामाकरिता गिल यांना मदत करण्याविषयी सुऱ्हावर्दींनी लिहिले होते.) परिस्थितीनुसार ठीक वाटते. आता तुम्ही पटण्याला जाल आणि लीगच्या सदस्यांना जे काही दाखवायचे असेल ते तुम्ही पाहाल आणि मंत्रिमंडळातील लोकांना भेटाल. कृपाकरून डॉ. महमूद, प्रा. बारी (अब्दुल बारी, अध्यक्ष बिहार प्रांतिक काँग्रेस कमिटी) आणि इतर मुसलमान मंत्र्यांची (कयूम अन्सारी, सार्वजनिक बांधकाम आणि कुटिरोद्योग मंत्री, बिहार.) भेट घेण्यात चुकू नका. ते काय म्हणतात त्याची लेखी टिपणे घ्या. निर्वासितांना मिळणाऱ्या अन्नवस्त्राची काटेकोर नोंद करा. निर्वासितांच्या शिबिरातील साफसफाईच्या कामाची तपासणी करा. अशा प्रकारे तुम्ही बराचसा विस्तृत अहवाल तयार करू शकाल. वृत्तपत्रांना कोणतेही वक्तव्य देऊ नका. लवकर परतण्याची घाई करू नका आणि कामात अनावश्यक वेळही घालवू नका.

हजारा प्रकरण (पाहा "अमतुस्सलाम आणि आभा गांधी यांना पत्र", जानेवारी १५, १९४७) दुःखद आहे. अजून मी तळापर्यंत पोहोचलेलो नाही. परंतु याबद्दल आपण भेटू तेव्हा. परिस्थिती जशी असायला पाहिजे तशी नाही. तेसुद्धा नंतर.

तुमचा,

बापू

इंग्रजी फोटोप्रतीवरून. जी. एन. ८०७

-------------

# ४३८. प्यारेलाल यांना पत्र

फेब्रुवारी ८, १९४७

चि. प्यारेलाल,

मला तुझे पत्र मिळाले. आज डायरी तयार झाली नाही. पत्र नेणाराला मला थांबवून ठेवायचे नाही. याशिवाय मला तुझे पत्र काळजीपूर्वक वाचायचे आहे. यामुळे डायरी आणि उत्तर उद्या पाठवेन. पूर्णपणे शांत राहा आणि आता या विषयावरील चर्चा पूर्णपणे थांबवू या. आपण केवळ कामाबद्दल बोलू.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

----------------

# ४३९. प्रार्थना प्रवचन

("गांधीजीज वाकिंग टूर डायरी"मधून उद्धृत.)

नंदीग्राम,

फेब्रुवारी ८, १९४७

**प्रश्न - मुसलमान हिंदूंचा बहिष्कार करत आहेत. ज्या हिंदूंजवळ स्वतः लागवड करता येण्यापेक्षा जास्त जमीन आहे ते अडचणीत आहेत. तुमचा त्यांना काय सल्ला आहे? ज्या जमिनीचे ते मालक आहेत त्या जमिनीची त्यांनी स्वतः जरी नांगरणी केली तरी ते सर्व जमिनीची मशागत करू शकत नाही. त्यांनी त्या जमिनीचे काय करावे?**

**उत्तर देताना गांधीजी म्हणाले की मी या बहिष्काराबद्दल ऐकले आहे व मागील सभेत मी त्यासंबंधी काही बोललोही आहे. मला आशा आहे की हा बहिष्कार संपूर्ण नोआखालीत खरोखरच सुरू नसेल. तो बहुधा काही लोकांपर्यंतच मर्यादित असावा. ते काहीही असले तरी ही चूक आहे याबद्दल मला मुळीच शंका नाही आणि या बहिष्कारामुळे ज्यांच्या विरोधात हा बहिष्कार टाकला जात आहे त्यांचे जसे भले होणार नाही तसेच बहिष्कार टाकणारांचेही भले होणार नाही. माझे हे मत अनेक वर्षांपासून म्हणजे असे म्हणा ना की साठ वर्षांपासून आहे. परंतु एका परिस्थितीत हे शक्य आहे असे समजता येऊ शकते. मुसलमान जर हिंदूंना शत्रू मानत असतील आणि त्यांना नोआखालीत हिंदूंची उपस्थितीसुद्धा नको असे वाटत असेल तर मात्र हे शक्य आहे. याचा अर्थ युद्धाची घोषणा असा होईल. ती ऐकून प्रत्येक हिंदुस्थानी घाबरून अस्वस्थ होईल. एखाददुसऱ्या ठिकाणी बहिष्कार होत असेल तर त्याबद्दल माझे मत मी आधीच दिले आहे. ऑस्ट्रेलियातील लोकांप्रमाणे हिंदूंनी आपली जमीन पडीत पडू द्यावी वा त्यांनी अतिरिक्त जमीन विकून टाकावी. सर्वात चांगली गोष्ट तर ही आहे स्वतः कसता येईल यापेक्षा कोणीही जास्त जमीन ठेवू नये. या आदर्शापर्यंत पोहोचण्याकरिता समाज प्रयत्नशील राहिला पाहिजे.**

**प्रश्न - तुम्ही इथे गेल्या तीन महिन्यापासून काम करत आहा. हिंदूंच्या मानसिकतेने काही स्वागतार्ह बदल दिसून आला काय?**

उत्तर - या प्रश्नाचे उत्तर संबंधित हिंदूच देऊ शकतात. हिंदूंनी काही प्रमाणात आणि काही काळापुरता का असेना आपला भित्रेपणा सोडला आहे या विश्वासाने मी मात्र खुश होत असतो.

**प्रश्न - मुसलमानांमध्ये शांतताप्रेमी समूह नक्कीच आहेत. तुम्ही त्यांच्यामध्ये उपस्थित असल्यामुळे त्यांच्यावर तुमचा इतका प्रभाव पडला आहे काय की ते त्यांच्या समुदायातील लोकांमधील दुराचारी लोकांच्या विरोधात उभे राहू शकतील?**

उत्तर - या तिसऱ्या प्रश्नाबद्दल बोलायचे तर नोआखालीतील मुसलमानांमध्येही शांतताप्रेमी लोक आहेत हे प्रश्नकर्त्यांने मान्य केले याबद्दल मला आनंद होतो. तसे नसते तर ती फार भयानक गोष्ट झाली असती. आपल्यामधील दुराचारी लोकांवर प्रभाव टाकण्याइतके साहस त्यांच्यात आले की नाही याचे उत्तर तेच असेल जे मी दुसऱ्या प्रश्नाला दिले होते. मुसलमान बांधवच याचे खात्रीपूर्वक उत्तर देऊ शकतील. कदाचित हा भ्रम असेल परंतु मुसलमानांवर प्रभाव पडला असेल असे मी समजतो. उदाहरण द्यायचे तर ज्या ध्वस्त मंदिराचे दार मी उघडले (जानेवारी १४ला) त्याचे रक्षण ते आपल्या जीवाची बाजी लावून करतील अशी घोषणा भटियालपूर येथील मुसलमान साक्षीदारांनी केली आहे. माझ्या यात्रेत अशी अजूनही उदाहरणे दिसून आली आहेत.

**प्रश्न - तुमच्या निदेशानुसार अनेक कार्यकर्ते खेड्यांमध्ये काम करत आहेत. त्यांच्या कामाचा स्थानिक हिंदूंवर वा मुसलमानांवर किती प्रभाव पडला? तुम्ही इथे नसता तर आज जो प्रभाव दिसतो आहे तितका प्रभाव दिसला असता काय? तुमच्या कार्यकर्त्यांचा प्रभाव टिकाऊ असेल काय?**

**उत्तर - या चौथ्या प्रश्नाचे उत्तर देताना गांधीजी म्हणाले की मी जर शुद्ध असेन व माझ्या मनात आणि बाहेर एकच भावना असेल तर माझे काम माझ्या मृत्यूनंतरही टिकणे अपरिहार्य आहे. सार्वजनिक आणि वैयक्तिक वागणुकीत पूर्ण सुसंवाद असला पाहिजे यावर माझा विश्वास आहे. याचप्रमाणे माझे सहकारी जर खरोखरच सेवाभावनेने प्रेरित झालेले असतील आणि ते अंतर्बाह्य शुद्ध असतील तसेच माझ्याभोवती असलेल्या वलयाने ते प्रभावित झालेले नसतील तर ते न थकता उत्साहाने प्रयत्न करत राहतील. जसजसा काळ जाईल तसतसे त्यांचे सामूहिक कार्य विकसित होत राहील. कोणतेही चांगले काम ते करणाराच्या मृत्यूबरोबर संपते असे मला कधीली वाटले नाही. उलटपक्षी कोणतेही खरे आणि ठोस काम कार्यकर्त्याच्या मृत्यूनंतरही जिवंत राहून त्याला अमर करते.**

'हरिजन', मार्च २, १९४७

-------------

# ४४०. प्यारेलाल यांना पत्र

फेब्रुवारी ९, १९४६

चि. प्यारेलाल,

तू मनूला जे पाठ देतो ते फार लांब असतात. मी ते आज वाचले. आजचा पाठसुद्धा लांब आहे. असे लांब पाठ ती पचवू शकत नाही. तिला लहानलहान पाठ दिले पाहिजे आणि अक्षर मोठे आणि मोत्यासारखे सुंदर असले पाहिजे. मलासुद्धा ते वाचता आले नाही. त्यात फार जास्त खाडाखोड नसावी. तिने ही तक्रार यापूर्वी तीनचारदा केली आहे. तू स्वतःच लिही असे मी तिला सांगितले आहे. मी जे लिहिले आहे ते माझ्यातर्फे लिहिले आहे. परंतु मनूने हे पाहिले आहे आणि तिला हे मान्य आहे. तिची आकलनशक्ती अल्प आहे. याशिवाय तिच्यासंबंधी तिला आलेली सर्व पत्रे वाचण्याचीसुद्धा तिला इच्छा नसते. असे असले तरी तिच्यावर त्यांचा परिणाम होतो. आता वर्तमानपत्रे वाचण्याकरिता शैलेन आला आहे. यामुळे मी थांबायला पाहिजे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

--------------

# ४४१. अमतुस्सलाम यांना पत्र

फेब्रुवारी ९, १९४७

प्रिय बेटी,

आता सकाळचे ६.३० वाजले आहेत. मी आभाबद्दल समजू शकतो. हे खरे आहे की मला मुळीच वेळ नाही. मग तू माझ्याकडून पत्राची अपेक्षा कशी काय करतेस? तू समजू शकत असशील तर मी तुझ्याबरोबरच आहे. घाई करू नकोस. तुझ्याकडून होईल तितकेच काम कर. तू बसून कातत राहिली आणि सूत दुहेरी करत राहिली तरी तितके पुरे आहे.

आशीर्वाद,

बापू

ता. क. मनू माझ्याबरोबर झोपत असते. तुला जर याबद्दल काही म्हणायचे असेल तर तू म्हणू शकते.

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५७८

--------------

# ४४२. प्रार्थना प्रवचन

(हे “सम इम्पॉर्टंट क्वेश्चन्स” या शीर्षकाखाली प्रकाशित झाले होते. आणि त्याच्याखाली पुढील संपादकीय टीप होती: “गांधीजींना दिवसाकाठी जे प्रश्न विचारण्यात आले होते त्यांतील काहींची चर्चा गांधीजींनी या प्रार्थना प्रवचनात केली. आज त्यांचे मौन असल्यामुळे त्यांनी उत्तर लिहून काढले आणि ते प्रार्थनासभेत वाचून दाखवण्यात आले.”)

बिजॉयनगर,

फेब्रुवारी ९, १९४७

**प्रश्न - काही काळानंतर कार्यकर्त्यांना सत्तेचे प्रेम वाटू लागते असा आमचा अनुभव आहे. अशा अवस्थेत त्याच्या इतर सहकाऱ्यांनी त्याच्यावर नियंत्रण कसे ठेवावे? वेगळ्या शब्दांत आपण संघटनेचे लोकशाहीवादी स्वरूप कसे टिकवून ठेवावे? संबंधित पक्षाशी असहकार केल्याने काही विशेष लाभ होत नाही असे आमच्या निदर्शनास आले आहे. असे केल्यामुळे उलट संघटनेच्या कामाचीच हानी होते.**

हा काही तुमचा एकट्याचा अनुभव नाही; ही जवळपास सर्वत्र घडणारी गोष्ट आहे. माणसात मुळातच सत्ताकांक्षा असते व ती त्याच्या मृत्यूबरोबरच मरते. यामुळे सहकाऱ्यांमध्येही जर हा मानवी दोष असेल तर त्यांना आपल्या सहकाऱ्यांना नियंत्रणात ठेवणे कठीण होते; परिपूर्ण अहिंसा पाठीशी असल्याशिवाय परिपूर्ण लोकशाही अस्तित्वात असूच शकत नसल्यामुळे आपल्याला जगात जोपर्यंत एकही पूर्णपणे अहिंसक संघटना दिसत नाही तोपर्यंत आपल्याला परिपूर्ण लोकशाही संघटनेचे स्वरूप माहीत आहे असा दावा आपण करू शकत नाही. असहकार नेहमीच हिंसक असणे आवश्यक नसले तरी तो जर हिंसक असेल तर हा प्रश्न योग्य ठरेल. अहिंसक असहकाराचे अनुभवाने जे काही स्वरूप कळल्याचा माझा दावा आहे त्यावरून मी म्हणेन की योग्य कारण असेल तर अहिंसक असहकार यशस्वी झालाच पाहिजे. आणि अहिंसक असहकार केल्याने कोणत्याही संघटनेची हानी होऊ शकत नाही. प्रश्न विचारणाराला अडचणीचा अनुभव येत आहे कारण त्याला अहिंसक असहकाराचा अनुभव नाही आणि जर असेलच तर चांगल्यात चांगल्या स्वरूपात तो आंशिक अहिंसक असहकाराचा अनुभव असू शकेल आणि वाईट स्वरूपात तर तो अहिंसेच्या नावावर चालणारा हिंसाचारच असतो. ‘हरिजन’ आणि ‘यंग इंडिया’ची पाने या दोन दोषांच्या उदाहरणांनी म्हणजे आंशिक अहिंसक असहकारामुळे वा अहिंसेचा पूर्ण अभाव असल्यामुळे असफल झालेल्या उदाहरणांनी भरलेली आहेत. माझ्या प्रदीर्घ अनुभवात माझ्या असेही लक्षात आले आहे की जे लोक इतरांवर सत्ताप्राप्तीच्या महत्त्वाकांक्षेचा आरोप करतात ते स्वतःही काही कमी सत्ताकांक्षी नसतात. आणि अर्धा डझन आणि सहा यांच्यात वा नागनाथ आणि सापनाथ यांच्यात तुलना करण्याला काहीही अर्थ नसतो.

**प्रश्न - जवळपास प्रत्येक गावात पक्ष आणि गटबाजी आहे. आपण जेव्हा स्थानिक लोकांची मदत घेतो तेव्हा आपली इच्छा असो वा नसो आपण सत्तेच्या स्थानिक राजकारणात गुंतले जातो. या अडचणीतून आपण मार्ग कसा काढावा? आपण दोन्ही पक्षांना डावलून बाहेरच्या कार्यकर्त्यांच्या मदतीने आपले काम करावे काय? आमचा अनुभव असा आहे की असे काम जेव्हा पूर्णपणे बाहेरील कार्यकर्त्यांवर अवलंबून असते आणि ते निघून जातात तेव्हा ते काम अस्तव्यस्त होऊन जाते. यामुळे अशा कामात स्थानिक लोकांनी पुढाकार घेऊन सहकार्य करावे म्हणून आम्ही काय केले पाहिजे?**

उत्तर - हिंदुस्थानचे दुर्दैव हे आहे की इथे शहरांप्रमाणेच खेड्यांमध्येही पक्ष आणि गटबाजी आढळते. आणि जेव्हा गावखेड्यांत सत्तेच्या राजकारणाचा प्रवेश होतो तेव्हा त्यात गावाच्या हिताचा विचार कमी असतो आणि पक्षाची स्वतःची शक्ती वाढवण्याचा विचार जास्त असतो. यामुळे गावांच्या प्रगतीत मदत होण्याऐवजी अडथळाच जास्त होतो. मी तर म्हणेन की परिणाम काहीही जरी झाला तरी आपण स्थानिक मदतीचा जास्तीतजास्त उपयोग केला पाहिजे, आणि आपण जर सत्तेच्या राजकारणापासून मुक्त असू तर आपण चुकीच्या मार्गाने जाण्याची शक्यता नसते. लक्षात ठेवा की शहरातील इंग्रजी शिक्षण घेतलेले स्त्री-पुरुष देशाच्या कण्याप्रमाणे असलेल्या आपल्या खेड्यांकडे अपराधाच्या सीमेपर्यंत दुर्लक्ष करत आहेत. ही जी खेड्यांची आपण उपेक्षा केली आहे तिची आपण आठवण ठेवली तर आपण धीराने काम करू. मला असे एकही खेडे आढळले नाही की जिथे एकही प्रामाणिक कार्यकर्ता नाही. आपल्याला आपल्या खेड्यांमधील लोकांचे गुण दिसत नाहीत कारण त्याची ओळख पटावी इतका नम्रपणा आपल्यामध्ये नसतो. आपल्याला स्थानिक राजकारणापासून मुक्त राहायचे आहे आणि आपल्याला कोणत्याही पक्षाकडून वा अपक्षाकडून खरोखरीची चांगली मदत मिळत असेल आणि आपण जेव्हा तिचा स्वीकार करू तेव्हाच आपण हे शिकू शकतो. गावकऱ्यांकडे दुर्लक्ष करणे यशाकरिता घातक होईल असे मी समजतो. हीच अडचण लक्षात घेऊन मी एका गावात एक कार्यकर्ता ठेवण्याच्या नियमाचे काटेकोरपणे पालन करण्याचा  प्रयत्न केला. परंतु ज्या कार्यकर्त्याला बंगाली येत नसेल त्या कार्यकर्त्याला दुभाष्याची मदत देण्यात येते. मी इतकेच म्हणू शकतो की या व्यवस्थेने माझा हेतू सिद्ध झाला. यामुळे मी तुमच्या अनुभवाला महत्त्व देणार नाही. मी तर असेही म्हणेन आम्हांला घाईगडबडीत निर्णय घेण्याची घाणेरडी सवय लागली आहे.

"काम पूर्णपणे बाह्य कार्यकर्त्यांच्या मदतीवर अवलंबून असते आणि बाहेरचे कार्यकर्ते निघून जाताच ते काम अस्तव्यस्त होऊन जाते" या वाक्यात सांगितल्याप्रमाणे एकाच झटक्यात सर्व गोष्टींच्या विरोधात निर्णय घेण्यापूर्वी मी इथपर्यंत म्हणेन की एकाच गावात राहून स्थानिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातून काम करण्याच्या काही वर्षांच्या अनुभवावरून स्थानिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातून काम करता येत नाही आणि ते

स्वतःही काम करू शकत नाही या गोष्टीचा अंतिम पुरावा मानण्यात येऊ नये. याउलट गोष्टच खरी आहे हे स्पष्ट आहे. आता शेवटच्या वाक्यावर सविस्तर विचार करण्याची मला आवश्यकता वाटत नाही. मुख्य कार्यकर्त्याला मी स्पष्टपणे सांगू शकतो की तुम्हांला कोणी बाहेरून मदत करणारा असेल तर त्याच्यापासून मुक्त व्हा. तुम्हांला जी कोणती स्थानिक मदत मिळेल तिच्या आधारे हिंमत आणि बुद्धिमत्तापूर्वक एकट्याने काम करा आणि जर तुम्हांला यश मिळाले नाही तर दुसऱ्या कोणत्या व्यक्तीला वा गोष्टीला दोष देऊ नका.

**प्रश्न - नोआखालीच्या उद्धवस्त झालेल्या भागात आपल्याला खादीचे काम सुरू करायचे असेल तर आपण बाहेरून आर्थिक आणि तांत्रिक साहाय्य घेऊन कामाला सुरुवात केली पाहिजे की स्थानिक लोक आणि पैसा केवळ यांच्या आधारावर हा सगळा सांगाडा हळूहळू उभारायला पाहिजे?**

उत्तर - तुमच्याच शब्दांत मी म्हणेन : ‘हळूहळू स्थानिक लोक आणि पैसा यांच्या आधारावर हा संपूर्ण सांगाडा उभारा’. परंतु तुम्ही या गोष्टीकडे लक्ष ठेवले पाहिजे की तुम्हांला कताईच्या कलेचे त्या व्यापकतम अर्थाने संपूर्ण ज्ञान असले पाहिजे ज्याचा समावेश मी या पदात केला आहे. तो अर्थ काय आहे हे या विषयावर हरिजनमध्ये मी जे लेखन केले आहे त्यावरून अभ्यासायला पाहिजे. तुमच्यात जर आवश्यक जिज्ञासा असेल तर तुम्ही हे काम कराल.

**प्रश्न - शेतकरी आणि जमीनदार आपल्या शेतीची मशागत मुसलमान मजुरांकडून करून घेत असत. शेतीची अवजारे आणि बैल लूटून नेल्यामुळे तसेच मुसलमान मजूर मिळत नसल्यामुळे ते मिरची, सरसो, तीळ इत्यादींचे दोन पीक घेऊ शकले नाही. बोरो आणि जवससच्या पिकाकरिता नांगरणी करण्याची वेळ जवळ आलेली आहे आणि शेतकऱ्यांना या गोष्टी १५ दिवसांच्या आत मिळाल्या नाही तर ते हे पीकही गमावतील.**

उत्तर - हे जर खरे असेल तर हे दुर्दैवी आहे. ही सर्व जमीन जमीनमालकांकरिताच नाही तर राज्याकरिताही लागवडखाली आणली पाहिजे कारण खाद्यपदार्थांची काळजी जमीन मालकांपेक्षाही राज्याला जास्त असली पाहिजे वा असायला पाहिजे. यामुळे मालकांनी अधिकाऱ्यांना या कामाकरिता मदत मागितली पाहिजे आणि ही सर्व जमीन फायदेशीर पद्धतीने लागवडीखाली येईल हे राज्याने पाहिले पाहिजे. मुसलमान मजुरांना ही आवश्यक सेवा करण्याकरिता सांगणे आणि त्यांना याकरिता प्रोत्साहित करणे राज्याचे कर्तव्य आहे. याकरिता जमीनमालक मुसलमान असला वा हिंदू असला तरी काही फरक पडत नाही. मजुरी ठरवून प्रत्येक मजुराला ती मजुरी मिळेल हे राज्याने पाहिले पाहिजे.

‘हरिजन’, मार्च २, १९४७

-------------

# ४४३. जीवनजी डा. देसाई यांना तार

(स्रोतानुसार ही आणि यापुढील तार जीवनची देसाई यांनी फेब्रुवारी ९, १९४७ला रात्री उशिरा पाठवलेल्या तारेच्या पावतीवर लिहिलेली आहे.)

[फेब्रुवारी ९, १९४७ला वा त्यानंतर] (पाहा याआधीची टीप.)

अशीच तार किशोरीलाल भाईकडून आलेली आहे. (पाहा पुढील विषय.) दुःख आहे पण काही करू शकत नाही. नवीन व्यवस्था होईपर्यंत ते निश्चितच आवश्यक मदत करतील. विश्वस्त संस्था तुमची संस्था आहे. नवजीवन पत्रिकांच्या संचालनाकरिता माझी मदत घ्यायची की नाही हे तुम्ही आणि विश्वस्तांनी ठरवायचे आहे. माझ्या कामामुळे कोणी जर वेगळा होत असेल तर मी त्याचा चुकीचा अर्थ लावणार नाही. तुम्हाला आणि विश्वस्त संस्थेला शुद्ध अंतःकरणाने माझे सहकार्य हवे असेल तर मी येथून पत्रिकांचे संपादन करीन. हे विश्वस्तांना दाखवा आणि तार करा.

बापू

'माय डेज विथ गांधी', पष्ठ १५८

-------------

# ४४४. किशोरीलाल घ. मश्रूवाला यांना तार

(किशोरीलाल मश्रूवाला यांची तार अशी होती - तुमचे १ तारखेचे पत्र मिळाले. आम्ही हरिजन पत्रिका आणि पत्रव्यवहार यांची जबाबदारी सोडली आहे. गैरसमज स्पष्ट झाल्यानंतर जयसुखलालवर लादण्यात आलेला आरोप परत घेण्यात आला आहे. किशोरीलालआणि नरहरी लिहीत आहेत.)

[फेब्रुवारी ९, १९४७ला वा त्यानंतर]

किशोरीलाल,

हरिजन आश्रम,

साबरमती.

तुझ्या निर्णयामुळे दुःख झाले. तुला अधिकार आहे. घाईत घेतला असे समजतो. काहीही झाले तरी नवीन व्यवस्था होईपर्यंत तुम्ही आवश्यक मदत कराल. जीवनजींना तार केली आहे.

बापू

'माय डेज विथ गांधी', पृष्ठ १५८

--------------

# ४४५. विनोबा भावे यांना पत्र

फेब्रुवारी १०, १९४७

चि. विनोबा,

तुझा वेळ घेणे मला मुळीच आवडत नाही, परंतु तू यात ओढला गेला आहेस.

मनू माझ्याबरोबर झोपत असल्यामुळे आपल्या वर्तुळातील मित्र फार अस्वस्थ झाले आहेत. किशोरलालचे दुःख तर पाहवत नाही. तुटून जाण्याची अवस्था यावी इतका तो व्याकूळ झाला आहे. हीच अवस्था नरहरी आणि स्वामीची (स्वामी आनंद) आहे. सेवाग्राम आणि इतर ठिकाणच्या स्त्रियांची काय अवस्था असेल ते मला माहीत नाही. उलट काय सुरू आहे हे इथे सर्वांना माहीत आहे परंतु त्याचा काही परिणाम झाल्याचे चिन्ह दिसत नाही. यामुळे लोकांवर याचा काय प्रभाव पडत आहे व त्यांची काय प्रतिक्रिया आहे याची मला पूर्ण कल्पना येत नाही. माझ्या मनात हे सर्व विचार येत राहतात कारण माझ्या सहकाऱ्यांच्या व्यथांमुळे मला स्वतःबद्दल शंका वाटू लागते. असे असले तरी या विषयात माझे मन पक्के होत चालले आहे. कारण अनेक वर्षांपासून माझे हे मत राहिले आहे की खरे ब्रह्मचर्य तेच असते ज्याला कोणत्याही प्रकारच्या कुंपणाची आवश्यकता नसते. माझ्या प्रयोगामागे हा विश्वास आहे. मी त्यात काही चुका केल्या आहेत. विचार न करता कोणी याची नक्कल केली तर त्यामुळे त्या व्यक्तीचीच हानी होईल. परंतु माझे अधःपतन झाल्याची मला जाणीव नाही.

माझ्याबरोबर मनूने झोपणे हा माझ्या प्रयोगाचा भाग नाही, तर माझ्या सध्याच्या यज्ञाचा भाग आहे. माझे मन दररोज निर्दोष भावनेने कोट्यवधी स्त्रियांबरोबर झोपत असते, त्यातीलच एक मनू आहे जी माझेच रक्त आहे व तशाच पद्धतीने ती माझ्याबरोबर झोपत असते.

परंपरेमुळे वा सहकाऱ्यांना खुश करण्याकरिता तिने असे करणे बंद केले तर (गीतेच्या) तिसऱ्या अध्यायात सांगितल्याप्रमाणे मी दांभिक ठरणार नाही काय? मी आतून जसा आहे तसाच नेमका मी लोकांना दिसलो नाही तर त्यामुळे माझा अहिंसेवरील प्रयोग कलंकित होणार नाही काय? मी तर इथपर्यंतसुद्धा जाईन कल्पना कर की येथील लोकांवर अहिंसेचा काहीही परिणाम होत नाही आणि मी मेलो आणि मनूला सोबत झोपवणे हे माझे कर्तव्य आहे असे मला वाटत असूनही लोकलज्जमुळे मी तसे केले नाही तर यातून माझ्या दुर्बलतेचाच परिचय होणार नाही काय? आणि अहिंसेचे पूर्ण साक्षात्कार करून घेण्यात मला आलेल्या

अपयशामुळे मी मरून जाणे उचित ठरणार नाही का? वेगळ्या शब्दांत सत्य आणि अहिंसेवरील माझा प्रयोग अपूर्ण आणि दुषित मानला जाणार काय? हा शेवटचा विचार कदाचित मी चांगल्या प्रकारे व्यक्त केला नसेल. माझ्या तीन भाषणात मी याचा उल्लेख केला आहे. (फेब्रुवारी १, २ आणि ३) त्यांचे संपूर्ण वृत्त हिंदीत आले आहे. त्याचा इंग्रजीतील वृत्तांत मी स्वतः तयार केला आहे. त्यांनी तो पूर्ण प्रकाशित केला असल्याचे दिसत नाही. यामुळे प्रकाशित झालेल्या वृत्ताच्या प्रती मी सहकाऱ्यांना पाठवल्या आहेत. त्यातील एक तुलाही पाठवत आहे. तुझे मत लिहून कळवशील. (विनोबा भावेंनी आपल्या फेब्रुवारी २५, १९४७च्या पत्रात लिहिले की या विषयावर मी तुमच्याशी सहमत नाही कारण स्त्री आणि पुरुष हे वेगळे आहेत ही जाणीवच ब्रह्मचर्याच्या आदर्शाच्या विरोधी आहे. परंतु या विषयावर मला वाद करायचा नाही.)

कृष्णचंद्रचे कसे सुरू आहे? त्याला मला लिहायला सांग. तू कसा आहेस?

मी हे पत्र स्थानिक वेळेनुसार सकाळी ६.१५ला म्हणजे आपल्या वेळेप्रमाणे ५.१५ला संपवले आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. सी. डब्ल्यू. १०५४५. सौजन्य - विनोबा भावे

-------------

# ४४६. प्रार्थना प्रवचन

("गांधीजीज वाकिंग टूर डायरी"मधून उद्धृत)

बिजॉयनगर,

फेब्रुवारी १०, १९४७

**सुरुवातीलाच गांधीजी म्हणाले की मला गोपीनाथपूरला जायचे होते आणि ते ठिकाण दीड मैल अंतरावर आहे असे मला सांगण्यात आले होते. मी चालायला सुरुवात केली आणि गोपीनाथपूर काही दिसायचे नाव घेई ना. आम्ही जेव्हा ४५ मिनीट चालून गेलो तेव्हा मी म्हणालो की आता मी चालायला नको, नाही तर मी चक्कर येऊन पडेन. यामुळे मी परत फिरलो. त्याकरिता मला पूर्ण एक तास वीस मिनीट** (हिंदी आवृत्तीत एक तास चोवीस मिनीट आहे.) **लागले. माझ्याकरिता इतके चालणे फार झाले होते. मला एखाद्या ठिकाणी चालत यायचे जे लोक निमंत्रण देतात त्यांनी घरून निघून त्या ठिकाणापर्यंत आरामात चालून किती वेळ लागतो ते पाहिले पाहिजे. गोपीनाथपूरच्या हिंदू आणि मुसलमानांची मी माफी मागतो आणि बरोबर व अचूक माहिती न देण्याकरिता गोपीनाथपूरच्या लोकांनी नोआखालीची माफी मागितली पाहिजे. प्रसंगोपात गांधीजी म्हणाले की लोक रस्त्यातवरच नाक शिंकताना आढळतात. ही धोकादायक आणि घाणेरडी सवय आहे, विशेषतः जे लोक अनवाणी चालतात त्यांच्याकरिता.**

एका मित्राने मला सांगितले की मुसलमान व्यापाऱ्यांजवळ बरोबर वजनमाप करणारे तराजू मला आढळतात तर हिंदू व्यापाऱ्यांजवळील तराजू चुकीचे वजनमाप करणारे आहेत असे आढळले. यावरून मुसलमान व्यापारी प्रामाणिकपणे व्यापार करणारे आहेत आणि हिंदू व्यापारी तसे नाहीत हे खरे नाही काय? माझी खात्री आहे की हा निष्कर्ष चुकीचा आहे. या अपूर्ण जगात कोणताही समुदाय पूर्णपणे प्रामाणिक वा अप्रामाणिक नाही. मी इतेकच म्हणेन की आपल्या ग्राहकांची फसवणूक करण्याकरिता ज्या माणसाने खोटा तराजू वापरला तो गुन्हेगार आहे. परंतु संपूर्ण समुदायाला अपराधी घोषित करण्याचे काम मी करू शकत नाही.

**प्रश्न - तुम्ही म्हणाला होता की जोपर्यंत इथे परिपूर्ण शांतता आणि एकोपा प्रस्थापित होत नाही तोपर्यंत तुम्ही इथे राहाल आणि आवश्यकता पडली तर मरणही पत्कराल. इतका दीर्घ काळ तुम्ही इथे मुक्काम केला तर त्यामुळे हिंदुस्थानचे आणि जगाचे लक्ष विनाकारण नोआखालीकडे वेधले जाईल आणि अनेक दिवसांत नोआखालीत कोणतीही अवांछित घटना घडली नसतानाही नोआखालीत अजूनही अत्याचार सुरू आहेत असा समज पसरणार नाही काय?**

उत्तर - कोणताही निष्पक्ष माणूस माझ्या उपस्थितीमुळे असा खोडसाळपणाचा निष्कर्ष काढू शकणार नाही. मी इथे तुमचा सेवक आणि मित्र म्हणून आहे. नोआखाली हे एक असे सुंदर ठिकाण आहे की इथे जर

हिंदू आणि मुसलमानाचे ऐक्य झाले व ते मैत्रीभावाने राहू लागले तर हे ठिकाण स्वर्गाचे रूप धारण करू शकेल अशी प्रसिद्धी माझ्या उपस्थितीमुळे निश्चितच झाली आहे. हे शक्य आहे की अखेरीस अहिंसेची माहिती नसलेला एक अपयशी माणूस अशी माझी नोंद होईल. याशिवाय हिंदूंनी आणि मुसलमानांनी आपसात अंतःकरणापासूनची मैत्री केली असल्याचे मला दाखवून दिले तर मला नोआखालीत राहण्याची आवश्यकताच राहणार नाही. परंतु मला हे सांगताना खेद होतो की अजूनही जशी पाहिजे तशी परिस्थिती निर्माण झालेली नाही.

**प्रश्न - मुसलमानांनी चांगल्या वर्तनाचे अभिवचन दिल्यानंतर आणि संधी मिळाल्यानंतर त्याप्रमाणे आचरण करून दाखवल्यानंतरही हिंदू जर आपल्या घरी परतत नाहीत तर यातून तणावपूर्ण वातावरणाचे नकली अस्तित्व दाखवण्याचा हिंदूंचा हेतू असावा असे तुम्हाला वाटत नाही काय?**

उत्तर - तणावपूर्ण वातावरणाचे नकली अस्तित्व दाखवण्याकरिता अनेक हिंदू जाणूनबुजून घरापासून दूर राहत आहेत यावर माझा विश्वास नाही. फार मोठे प्रलोभन दिल्याशिवाय कोणताही माणूस आपल्या घरापासून दूर राहणार नाही. अशा प्रकारच्या कोणत्याही प्रलोभनाबद्दल मी ऐकले नाही. भीती आणि संसार चालवण्याच्या साधनांचा अभाव त्यांना घरापासून दूर ठेवत आहे. असे असले तरी परतणारांची संख्या समाधानकारक आहे असे अधिकाऱ्यांनी मला सांगितले आहे. याहून जास्त लोकांना आम्ही सांभाळू शकणार नाही असेही ते म्हणाले. अशी स्पष्ट दिसणारी कारणे असताना सिद्ध करता येणार नाही असे निष्कर्ष काढण्याचे काही कारण नाही. आणि अशा प्रकारे त्यांना उत्तेजित करणारे काही लोक असतील तर त्यांना शिक्षा करण्याकरिता कायदा आहे. मिठाईच्या गोडव्याचा पुरावा खाण्यातून मिळतो. मुसलमान समाज खरोखरच हिंदूंना परत बोलावतो आहे हे जर खरे असेल तर ते आनंदाने परततील असा माझा पूर्ण विश्वास आहे. परंतु प्रश्न विचारणाराने जितके हे चित्र सुंदर रेखाटले आहे तितके ते सुंदर नाही.

**प्रश्न - सर्वांकरिता अहिंसा आणि मैत्रीचे आवाहन करताना मुसलमानांच्या विरोधातील खटले रद्द करणे वा काढून घेणे आवश्यक आहे असे तुम्हाला वाटत नाही काय?**

उत्तर - वातावरणात विशेष प्रमाणात अहिंसा आहे असे मला वाटत नाही. आणि अहिंसक वर्तनसुद्धा कायद्याचा मार्ग अवरुद्ध करू शकत नाही. आणि भयभीत लोकांची अहिंसा तोपर्यंत कार्यरत होऊ शकत नाही जोपर्यंत फरार झालेले अपराधी लोक स्वतःहोऊन बाहेर पडत नाहीत आणि त्यांना आपल्या वर्तनाचा पश्चात्ताप होत नाही. परंतु सत्य तर हे आहे की त्यांना पश्चात्ताप झालेलाच नाही आणि वरून ते फरार आहेत.

मला सामुहिक अटकेचा तिटकारा आहे. आणि जे लोक खोट्या तक्रारी करतात असे सिद्ध होईल त्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे.

**प्रश्न - लीग आणि काँग्रेसच्या भांडणाकरिता म्हणजे पर्यायाने हिंदू आणि मुसलमानांच्या सध्याच्या भांडणाकरिता कॅबिनेट मिशनची दुतोंडी भूमिका कारणीभूत नाही काय?**

उत्तर - दुतोंडीपणाकरिता मी कॅबिनेट मिशनला दोष देणार नाही. त्यांना जो उपाय न्याय्य वाटला तो त्यांनी प्रामाणिकपणे सुचवला आहे. या प्रपत्रात कशाचीही सक्ती नाही हे याचे सौंदर्य आहे. त्यातील कलम जो कोणी मान्य करील त्याच्यावर स्वाभाविकपणेच ते कलम बंधनकारक होतात. परंतु कोणताही पक्ष ते कलम मंजूर करण्याला नकार देऊ शकतो. अशा प्रकारे पूर्वेकडील आसाम पश्चिमेकडील बलुचिस्तान यांनी जर समूहाच्या योजनेला नकार दिला तर कॅबिनेट मिशनच्या प्रपत्राप्रमाणे त्या त्या समूहात सामील होण्याकरिता त्यांच्यावर जगातील कोणतीही शक्ती बळजबरी करू शकत नाही. शेवटचे सांगायचे तर कॅबिनेट मिशनचे प्रपत्र एक सापळा आहे असे जरी गृहीत धरले तरी काँग्रेसने आणि मुस्लिम लीगने त्या सापळ्यात का शिरावे?

**प्रश्न - पाकिस्तान म्हणजे मुसलमान बहुसंख्य प्रांतात मुसलमानांना संपूर्ण स्वातंत्र्य आणि हिंदू बहुसंख्य प्रांतात हिंदूंना तसेच स्वातंत्र्य. मग काँग्रेस यावर आक्षेप का घेते?**

उत्तर - उत्तर सोपे आहे. पाकिस्तानचा अर्थ मुसलमान बहुसंख्य प्रांतात केवळ मुसलमानांना स्वातंत्र्य असेल आणि हिंदू बहुसंख्य प्रांतात केवळ हिंदूंना संपूर्ण स्वातंत्र्य असेल तर ही गोष्ट एकदम फेटाळण्यासारखी होईल. आनंदाची गोष्ट ही की एकाही मुसलमान पुढाऱ्याने तर नाहीच पण कायदे आझम जिनांनीसुद्धा पाकिस्तानचा असा अर्थ लावलेला नाही. बिहारमधील हिंदू स्वतंत्र राहिले पाहिजे आणि मुसलमान गुलाम असले पाहिजे काय? वा बंगालमध्ये हिंदूंनी गुलाम असायला पाहिजे काय? आशा आहे की असे नाही.

**प्रश्न - हिंदू-मुसलमानांचे ऐक्य न होऊ शकण्याच्या मुळाशी प्रत्येक ठिकाणी काँग्रेस आणि लीगमधील मतभेद आहेत. हे मतभेद कायम असतानाही इथे हिंदू-मुसलमान ऐक्य होऊ शकण्याची आशा कितपत करता येऊ शकते? अशी एकी जरी झाली तरी ती कितपत टिकेल?**

उत्तर - काँग्रेस-मुस्लीम लीग मध्ये जर मतभेद कायम राहिले तर हिंदू-मुसलमानांचे ऐक्य टिकाऊ होऊ शकत नाही हे मला मान्य आहे. परंतु मला आशा आहे की पक्षीय राजकारण बाजूला ठेवून वेळ असेपर्यंत नोआखालीतील हिंदू-मुसलमान खऱ्या मित्राप्रमाणे एकमेकांबरोबर काम करतील. त्यांनी संपूर्ण हिंदुस्थानसमोर आणि विशेषेकरून काँग्रेस आणि लीगसमोर एक उदाहरण ठेवले पाहिजे. ते काहीही असले

तरी मला शुद्ध अहिंसेच्या या परीक्षेत उत्तीर्ण व्हायचे आहे. ती अहिंसा जर शुद्ध असेल तर तिच्या साहाय्याने ती शांतता स्थापित झालीच पाहिजे जी स्थापित व्हावी म्हणून मला अंतःकरणापासून वाटते. यामुळे ती जर प्रस्थापित झाली नाही तर ते अपयश माझे असेल. आणि अहिंसेला अपयश माहीत नसल्यामुळेच मी नोआखालीत करेन वा मरेन असे म्हणालो होते. प्रश्न विचारणाराने आणि माझ्यासारखा विचार करणारांनी माझ्या प्रयत्नांना यश यावे म्हणून मदत केली पाहिजे.

'हरिजन', मार्च ९, १९४७

--------------

# ४४७. प्रार्थना प्रवचन

हेमचंडी,

फेब्रुवारी ११, १९४७

**प्रश्न - बंगाल विधान सभेत एक विधेयक माडण्यात आले आहे. त्यानुसार काही प्रकरणी जमीन मालकाचा हिस्सा निम्मेवरून एकतृतियांश करण्यात आला आहे. नवीन प्रस्तावानुसार जो शेतकरी आपल्या मालकाच्या शेतीवर डिसेंबर २२, १९४६ला वा त्यानंतर काम करत असेल त्याला त्या जमिनीवरून तीन वर्षांपर्यंत काढून टाकता येणार नाही. चर भूमीवर काम करणाऱ्या मुसलमान शेतकऱ्यांना हिंदू जमीनदारांकडून बरगा पद्धतीवर जमीन मिळवण्यासंबंधात अचानक असाधारण उत्साह निर्माण झाला आहे. अशा चर जमीनीचे मालक अनेक प्रकरणी स्वतःच शेतकरी आहेत. इतकेच की गेल्या ऑक्टोबर महिन्यात दंगलीच्या काळात जमीनमालक जेव्हा पळून गेले तेव्हा त्यांनी ती जमीन बरगादारांना (लागवणीवर वा बटाईने जमीन कसणारा भाडेकरू) देखरेखीकरिता सोपवली होती. आता जून महिन्यापर्यंत पीक येऊ शकणार नसल्यामुळे जमीनमालक त्या शेतकऱ्यांना तोपर्यंत काढून टाकू शकत नाहीत. विधेयकाचे जर कायद्यात रूपांतर झाले तर यामुळे किमान येती तीन वर्षे हिंदू आपली ती जमीन गमावतील. आता हिंदू शेतकरी परत आपल्या जमिनीवर येत आहेत. अशा परिस्थितीत कायदा बदलल्यामुळे आपल्या जमिनीपासून मुकू नये म्हणून त्यांनी काय केले पाहिजे?**

उत्तर - माणसाने मृत्यूच्या अगोदर मरणे बरोबर नाही. जोपर्यंत विधेयकाचा कायदा होत नाही तोपर्यंत तुम्ही वाट पाहिली पाहिजे. तरीही जमीनमालकाचा हिस्सा निम्मेवरून एकतृतियांश करण्याला तुम्ही पाठिंबा दिला पाहिजे. सर्व जमीन राज्याची होण्याची वेळ येत आहे. याचा अर्थ त्या जमिनीवर मजुरी करणारांची ती होईल. याकडे सांप्रदायिक प्रश्न म्हणून पाहता येत नाही. शक्य आहे की नोआखालीत जमीनमालक हिंदू असतील. परंतु कायदा जर चांगला असेल तर त्यामुळे कोण प्रभावित होतो याला महत्त्व नाही. मजुरांना तीन वर्ष काढण्याच्या औचित्यासंबंधी मला गंभीर शंका आहेत. मला हे विधेयक पाहावे लागेल. जोपर्यंत मुसलमानांनी जमीन ताब्यात घेण्यासंबंधीचा मुद्दा आहे तो जर खरा असेल तर त्याला कोणत्याही परिस्थितीत योग्य म्हणता येऊ शकत नाही. यासंबंधीची प्रामाणिक उदाहरणे समोर आली तर या तक्रारी दूर केल्या जातील याबद्दल मला मुळीच शंका नाही. जनतेचे कोणतेही सरकार कोणाचीही संपत्ती हडप करण्याची गोष्ट क्षणभरसुद्धा मान्य करू शकत नाही. जर एखाद्या मुसलमानाने त्या जमिनीची मशागत केली असेल तर त्याने जे काम केले त्याची जास्तीत जास्त तो मजुरी मागू शकतो. खरे म्हणजे तो जर शेजारी असेल आणि शेजाऱ्याच्या अडचणीमुळे त्याने जर त्याला मदत केली असेल तर तो शेजारधर्म होईल आणि त्याची कोणतीही

मजुरी मागायला नको. अशा प्रकारे कोणीही जमीन बळकावत असेल तर त्यावर उपाययोजना होण्याकरिता त्याची तक्रार केली पाहिजे.

**प्रश्न - स्त्री-पुरुषांना स्वतःहोऊन मजूर होण्याचा आणि स्वतः कसता येईल त्यापेक्षा जास्त जमीन न ठेवण्याचा सल्ला तुम्ही दिला आहे. परंतु आपल्या सध्याच्या समाजव्यवस्थेत मुलांच्या शिक्षणाची तसेच वृद्ध आणि मानसिक वा शारीरिक दृष्टीने अपंग लोकांकडे पाहणारा कोणीही राहिला नसेल तर त्यांची जबाबजारी राज्य घेत नाही. अशा परिस्थितीत हे खर्च जमिनीची मिळणारी लागवड खाजगी मालकीच्या संपत्तीतून करण्यात येतात. अशा लोकांजवळील भांडवल जर काढून घेण्यात आले तर त्यांचे काय होईल*? या लोकांना होणारा हा त्रास टाळला जाऊ शकत नाही काय? मुलांचे शिक्षण आणि म्हातारे आणि लाचार लोकांच्या भरण-पोषणाची पुरेशी व्यवस्था करता येऊ शकत नाही काय?***

उत्तर - मला मान्य आहे की मी असा सल्ला दिला आहे आणि अजूनही मी त्यावर कायम आहे. आदर्श समाजाकरिता मी एक सार्वभौम कल्पना समोर ठेवली होती. असे म्हणतात की जमीनदारांना जमिनीची लागवड करण्याकरिता सध्याच्या परिस्थितीत मुख्यत्वेकरून मुसलमान मजूर मिळत नाहीत. त्यामुळे हे निरुपायाने ही जमीन पडीत राहू शकते. मुलांच्या शिक्षणाचा तसेच म्हातारे आणि लाचार लोकांच्या भरणपोषणाचा प्रश्न उपस्थित होऊ नये. मुलांना घरीच शिक्षण मिळेल आणि स्वतःहोऊन काम करणारे लोक म्हातारे आणि मानसिक व शारीरिक दृष्टीने अपंग असलेले लोक यांच्या भरणपोषणाकडे लक्ष ठेवतील.

परंतु मी मोकळेपणाने मान्य करतो की मुलांना शिक्षण देण्याचे आणि वृद्ध आणि मानसिक व शारीरिक दृष्टीने अपंग असलेल्या लोकांच्या भरणपोषणाकडे लक्ष देणे हे राज्याचे काम आहे. जमीनमालकांनी आपली जमीन फुकट द्यावी असेसुद्धा मी सुचवलेले नाही हे सुद्धा आपण लक्षात ठेवले पाहिजे. त्यांनी एक तर ती योग्य किंमतीत विकली पाहिजे वा ते ती तशीच पडीत राहू देतील. यामुळे कोणतेही नुकसान होणार नाही.

'द हिंदू', फेब्रुवारी १४, १९४७

------------------

# ४४८. अबुल कलाम आझाद यांना पाठवलेल्या पत्रातील उतारे

फेब्रुवारी १२, १९४७

ज्या अहिंसेबद्दल मी इतके काही लिहिले आहे आणि जिला व्यवहारात उतरवण्याकरिता इतकी सगळी वर्षे मी मेहनत केली आहे की तिचा जर या संकटाच्या वेळी काहीही उपयोग होणार नसेल तर माझ्या दृष्टीतून तिला कोणतेही मूल्य राहत नाही. तुम्ही प्रेमाने मला म्हणाला की मी जर तुमच्याजवळ असतो तर सर्व काही ठीक झाले असते. (तुम्ही दिल्लीला येऊ शकत नसाल तर निदान कलकत्त्याला तुमचे मुख्यालय करायला पाहिजे होते असे अबुल कलाम आझाद यांनी सुचवले होते.) परंतु सत्य तर हे की जोपर्यंत मी इथे काही चांगले करून दाखवत नाही तोपर्यंत इतरत्रही मी काही उपयोगाचा असू शकत नाही.

'महात्मा गांधी - द लास्ट फेज', खंड १, पुस्तक २, पृष्ठ २०७ ('महात्मा गांधी - अखेरचं पर्व', खंड २, पृष्ठ २४९)

------------------

# ४४९. अ. झमन यांना पत्र

काफिलटोली,

फेब्रुवारी १२, १९४७

प्रिय झमन साहेब (नोआखालीचे अतिरिक्त दंडाधिकारी, यांच्याकडे मदत आणि पुनर्वसन कार्याचा अधिभार होता.),

सोबत मी अतिशय विशेष परिस्थितीचा अहवाल पाठवत आहे. सरकारच्या वतीने करण्यात आलेल्या घोषणेनुसार निर्वासितांनी परतण्याकरिता सुरुवात केली आहे. या लोकांना अनुदान दिले पाहिजे याबद्दल काहीही संशय नाही; आणि तरीही मुख्याधिकारी आणि युनियन बोर्डाचे मुख्याधिकारी यांच्यातील कोणत्या तरी गोंधळामुळे ही गोष्ट रोखून ठेवण्यात आली आहे. आशा आहे की या बाबतीत तुम्ही त्वरित निर्णय घ्याल कारण अशा प्रकरणी जलद कार्यवाही करण्यात आली नाही तर सगळेच मुसळ केरात जाऊ शकेल.

तुमचा विश्वासू,

मो. क. गांधी

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेदादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

# ४५०. प्यारेलाल यांना पत्र

फेब्रुवारी १२, १९४७

चि. प्यारेलाल,

पहिल्या पानावरील तुझे हस्ताक्षर चांगले आहे. त्यानंतर ते बिघडत गेले आहे. पहिल्या पानाप्रमाणे लिहिण्याकरिता जरी वेळ लागला तरी तू तसे लिहीत राहिला तर तू चांगले लिहू शकशील. यामुळे किती तरी वेळ वाचेल आणि वाचणारा केवळ अक्षरांमुळेसुद्धा वाचेल. जैनचा चित्तवेधक अहवाल मी केवळ अक्षरांमुळे वाचला. लोकस्ट या शब्दाचा नवीन अर्थही मी शिकलो. आता याच गोष्टीची मी लक्ष घालून मनूचीसुद्धा परीक्षा घेईन. तू आज गोष्ट तर उद्या श्लोक असे आळीपाळीने पाठवशील तर चांगले होईल. या बाबतीत मनूपेक्षा मी अधिक लक्ष घातले तर अधिक चांगले होईल. सध्या मी मनूला घडवण्याचा प्रयत्न करतो आहे आणि मी म्हणतो तसे ती जोपर्यंत करत राहील तोपर्यंत मी हे करत जाणार आहे. किशोरीलाल इत्यादींचा हल्ला सुरूच आहे. (गांधीजींचा मनू गांधीबरोबर झोपण्याचा प्रयोग सुरू असल्यामुळे त्यांच्या गांधीजींना आपल्या मित्रांच्या टीकेचा भडिमार सहन करावा लागत होता. पाहा "वल्लभभाई पटेल यांना पत्र", फेब्रुवारी १। २, १९४७ आणि "विनोबा भावे यांना पत्र", फेब्रुवारी १०, १९४७) तू स्वतःला यात गुंतवून घेतले नाही हे चांगले केले. हे ओझे मलाच सहन करावे लागणार आहे.

आशीर्वाद,

बापू

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

------------------

# ४५१. प्रार्थना प्रवचन

काफिलतल्ली,

फेब्रुवारी १२, १९४७

गांधीजी म्हणाले की ४५ वर्षांपूर्वी मी लंडनमध्ये शिकत होतो. तेव्हा मी मणिपुरी लोकांच्या शौर्याबद्दल वाचले होते. प्रतिनिधीमंडळाच्या सदस्यांनी (कच्छर जिल्ह्यातून आलेले हे प्रतिनिधीमंडळ गांधीजींना फेब्रुवारी ११ला भेटले होते; आसाममधील दोन लाख मणिपुरी अल्पसंख्य लोकांकरिता आसाम विधानसभेत आरक्षण असावे अशी त्यांची मागणी होती.) माझ्याजवळ तक्रार केली आहे की आसाममधील सवर्ण हिंदू तसे तर आम्हांला त्यांच्यातील समजतात परंतु तरीही ते मणिपूरच्या लोकांच्या हिताकडे लक्ष देत नाहीत. आमची वेगळी भाषा आहे, वेगळी संस्कृती आहे आणि आमच्या परंपराही वेगळ्या आहेत. प्रतिनिधीमंडळाची तक्रार आहे की आपल्या मतदारांची संख्या फुगावी म्हणून सवर्ण हिंदू त्यांच्यामधील आमच्या उपस्थितीचा फायदा घेतात. परंतु मणिपुरी लोकांचे हित कशात आहे हे त्यांना माहीतही नाही आणि त्याकरिता ते प्रयत्नशीलही नाहीत. यामुळे आमच्या हिताचे रक्षण व्हावे म्हणून काही तरी व्यवस्था झाली पाहिजे असे आम्हाला वाटते.

गांधीजी म्हणाले की या विषयावर मी इतकेच म्हणेन की हिंदूधर्म टिकायचा असेल तर तो जातिविरहित असला पाहिजे. मी कोणत्या तरी जातीचा आहे हे मी कधीच विसरलो आहे. यामुळे मला भंगी म्हणवून घेण्यात आणि त्याप्रमाणे वागण्यात आनंद होतो. कोणत्याही कृत्रिम विभाजनावर माझा विश्वास नाही.

सवर्ण हिंदूचा अर्थ जर ब्राह्मण, क्षत्रीय आणि वैश्य असेल तर ब्रिटिश जेव्हा भारत सोडून जातील तेव्हा हे अतिशय अल्पसंख्य असतील आणि या तिन्ही उच्च जातींचा समूळ उच्छेद झाल्यामुळे खरेखरे स्वातंत्र्य मिळालेले असेल. गांधीजी म्हणाले की सर्व प्रकारची विषमता ही भूतकालीन गोष्ट झालेली असेल अशी मला आशा आहे. असे होईल तेव्हाच तथाकथित पददलित आपल्या खऱ्या स्तरावर येतील.

गांधीजी म्हणाले की अस्पृश्यता तेव्हाच जाईल जेव्हा खरोखरच कोणतीच जात नसेल. परंतु जोपर्यंत जातिव्यवस्था अस्तित्वात आहे तोपर्यंत अस्पृश्यांनाही स्वाभाविकपणेच उच्च जातीत सामील व्हावेसे वाटेल. परंतु ही असंभव गोष्ट आहे. याचा अर्थ होईल अस्पृश्य आणि सवर्ण हिंदू यांच्यातील संघर्ष. परंतु जाती जेव्हा नाहीशा होतील तेव्हा सर्व हिंदू असतील ही सरळसाधी गोष्ट आहे. अस्पृश्यांना मी म्हणेन की त्यांनी आपल्यामधील सर्व भेदभाव दूर करायला पाहिजे आणि साफसफाई आणि स्वच्छतेच्या नियमाचे

सवर्णांपेक्षाही जास्त चांगले पालन केले पाहिजे. आणि स्वतःकरिता कोणतीही वेगळी व्यवस्था करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी हिंदू समाजरूपी महासागरात विलीन व्हायला पाहिजे.

एका प्रश्नाचे उत्तर देताना गांधीजी म्हणाले की नोआखालीच्या हिंदूंनी नोआखालीतील एखाद्या विशेष ठिकाणी गोळा होऊन राहू नये आणि आपल्याला एका ठिकाणी राहून काम करता येईल या दृष्टीने त्यांनी कारखाने वा उद्योगही काढू नये. कुटिरोद्योगाबद्दल माझे जे विचार आहेत ते तर आहेतच. त्याशिवायही हिंदूंकरिता वेगळ्या वस्त्या आणि वेगळे उद्योग यांची मी कल्पना करू शकत नाही. त्याचा अर्थ हिंदुस्थानभर ठीकठिकाणी विषाक्त पाकिस्तान निर्माण करणे होईल.

या विचारधारेचे मी कधीही समर्थन करू शकत नाही. हा तर आपसात युद्ध घोषित करण्याचा मार्ग आहे. हा स्वातंत्र्याचा मार्ग नाही. वेगवेगळ्या धर्माच्या लोकांकरिता वेगवेगळ्या वस्त्यांचा पुरस्कार मी करू शकत नाही.

मी ज्या स्वतंत्र हिंदुस्थानची कल्पना केली आहे त्यात विविध धर्माचे हिंदुस्थानी मैत्रीभावाने सोबत राहतील. त्यात लखपती आणि कंगाल असणार नाहीत. सर्व राज्याचे असतील कारण राज्यसुद्धा त्यांचेच असेल. हे स्वप्न साकार करण्याकरिता मी मरण पत्करेन. हिंदुस्थानचे यादवीत तुकडेतुकडे झालेले पाहण्याकरिता मी जिवंत राहणार नाही.

'द हिंदू', फेब्रुवारी १३, १९४७ आणि फेब्रुवारी १५, १९४७

-------------------

# ४५२. चौकशी आयोगाच्या विचारार्थ असलेल्या विषयांवरील टिपण

(हे टिपण बिहारच्या मंत्र्यांना पाठवण्यात आले होते. फेब्रुवारी १३ला विधानसभेत मांडण्यात आलेल्या अविश्वासाच्या ठरावाला उत्तर देताना बिहारचे मुख्यमंत्री श्रीकृष्ण सिन्हांनी बिहारमधील सांप्रदायिक दंगलींच्या चौकशीकरिता चौकशी आयोगाच्या स्थापनेची घोषणा केली.)

[फेब्रुवारी १३, १९४७ला वा त्यापूर्वी] (वरील टिपेप्रमाणे)

...(स्रोतानुसार इथे रिकामी जागा आहे) ला सुरू झालेल्या सांप्रदायिक दंगली सुरू होण्याच्या कारणांची आणि ते थांबवण्याकरिता बिहार सरकारने उचललेल्या पावलांची चौकशी करून त्याचा अहवाल देणे आणि क्षतिग्रस्त मुसलमानांमध्ये परत आत्मविश्वास निर्माण व्हावा म्हणून काय केले पाहिजे हे सांगणे.

२. चौकशी उघड होईल आणि न्यायाधीशांना कागदपत्रे मागण्याचा आणि साक्षीदारांना बोलावण्याचा अधिकार असेल. (या एक सदस्यीय चौकशी आयोगावर पटना उच्च न्यायालयाचे न्यायादीश न्यायमूर्ती रुबेन यांची नियुक्ती व्हायची होती. परंतु अखेरीस ३० ऑक्टोबर १९४७ला बिहार मंत्रिमंडलाने चौकशी आयोग बसवण्याचा निर्णय मागे घेतला.)

३. न्यायाधीश हा अहवाल ...या वा या तारखेच्या पूर्वी देतील.

'महात्मा गांधी - द लास्ट फेज', खंड २, पृष्ठ २८

---------------

# ४५३. एक पत्र

पूर्व केरवा,

फेब्रुवारी [१३] (स्रोतात १४ तारीख आहे, बहुधा तो मुद्रण दोष असावा.), १९४७

जो माणूस अनीतीच्या मार्गाने चालतो त्याची संगत करू नये. . . . (मुळात ही जागा रिकामी आहे.) तो कितीही उच्च पदावर असला तरी तो आदराला पात्र नसतो. आतापर्यंत तरी ईश्वराने माझा मान कायम ठेवला आहे. . . (मुळात ही जागा रिकामी आहे.) जोपर्यंत माणसांच्या निंदेचा प्रश्न आहे मी जाड कातडीचा झालो आहे.

गुजरातीवरून. 'एकलो जानो रे', पृष्ठ १३८

----------------

# ४५४. प्रार्थना प्रवचन

("गांधीजीज वाकिंग टूर डायरी"वरून)

पूर्व केवरा,

फेब्रुवारी १३, १९४७

रामधून सुरू असताना श्रोत्यांनी वेळेनुरूप दिलेल्या तालाबद्दल गांधीजींनी श्रोत्यांचे अभिनंदन केले. दिवसभरात गांधीजींसमोर जे दोन प्रश्न ठेवण्यात आले होते त्यांतील दोन प्रश्नांची चर्चा गांधीजींनी या प्रार्थना प्रवचनात केली.

**प्रश्न - आम्ही मान्य करतो की पिकातील जमीनमालकाचा हिस्सा निम्मेवरून एकतृतियांश करणे मूलभूत दृष्टीने न्याय्य आहे.** (पाहा "प्रार्थना प्रवचन", फेब्रुवारी ११, १९४७) **परंतु बंगालमधील तेभागा आदोलन तोपर्यंत स्थगित करता येऊ शकत नाही काय जोपर्यंत यामुळे प्रभावित होणार लोक सरकारने चालवलेल्या कोणत्या तरी योजनेनुसार इतर कोणता व्यवसाय सुरू करत नाहीत? असे क्रांतिकारक परिवर्तन अहिंसक मार्गानेच करता येऊ शकते असे तुम्ही म्हणाला असल्याचे आम्हांला माहीत आहे. परंतु हितसंबंधीय लोक तुमच्या सल्ल्यातील या भागाकडे दुर्लक्ष करतील आणि आमच्या मागणीला तात्त्विक पाठिंबा आहे असे म्हणून आपल्याच हिंसक मार्गाने हे आंदोलन सुरू ठेवतील. यामुळे सध्याच्या परिस्थितीत या आंदोलनामुळे बंगालमधील संपूर्ण मध्यमवर्गाचा विनाश होण्याची शक्यता असताना तुम्ही या आंदोलनाला पाठिंबा देणे अनुचित होणार नाही काय? इतकेच नाही तर सर्वसामान्य ग्रामीण माणसाचेसुद्धा यामुळे नुकसान होईल कारण हा मध्यमवर्ग त्यांना काम देऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला जो हातभार लावतो तो लावू शकणार नाही.**

उत्तर - सावधगिरीची सूचना देताना गांधीजी म्हणाले की मी केवळ मला माहीत असल्याप्रमाणे या प्रश्नामागील तत्त्वाची चर्चा केली आहे. मी स्थानिक प्रश्नाचा अभ्यास केलेला नाही. यामुळे माझ्या अज्ञानामुळे प्रश्नकर्त्यावर अन्याय होण्याचा धोका आहे.

मला वाटते की हा प्रश्न अतिशयोक्ती करून मांडण्यात आला आहे. जमीनदार विनाशाच्या काठावर मुळीच उभा नाही. त्याची जमीन जप्त करण्यात आलेली नाही. तेभागानंतरही त्याला त्याचा वाटा मिळणारच आहे, इतकेच की तो निम्मेवरून तिसरा हिस्सा इतका कमी झालेला असेल. या प्रस्तावात मला विनाशाचे कोणतेच बीज दिसत नाही. तुम्ही सांप्रदायिक प्रश्नाने आवश्यकतेपेक्षा अधिक त्रस्त आहा अशी मला भीती वाटते. तुम्ही यावर उठायला पाहिजे आणि प्रत्येक समस्येचा तिच्या गुणावगुणानुसार विचार केला पाहिजे. असे केल्यास तुम्ही कधीही चूक करणार नाही. जमीनमालकाचा वाटा कमी करण्याच्या मागणीमागील तत्त्व

तुम्ही समजून घेतले पाहिजे आणि मग अशा ठोस दुरुस्तीकरिता प्रयत्न केला पाहिजे की ज्यामुळे तुम्ही यशस्वी व्हाल. लागवण थोडीशी कमी मिळण्याच्या ठिकाणी त्यांनी जप्तीचा धोका पत्करू नये. त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की वर्षोगणिक हिंदुस्थान जप्तीच्याच वातावरणात राहिला आहे. एकानंतर एक उद्योग उध्वस्त करण्यात आले आहेत आणि कारागीर आणि त्याचबरोबर शेतकरी गरीब होत चालले आहेत.

हे बदल जर अहिंसक आंदोलनाद्वारे घडवून आणण्यात आले असते तर जग विविध वर्गातील लोकांच्या कौशल्याला मुकले नसते. अंतर इतकेच राहिले असते की त्यांनी आपल्या कौशल्याचा उपयोग मजुरांचे नुकसान होईल अशा प्रकारे केला नसता. भविष्यातील व्यवस्थेत सर्व भूमी राज्याची असेल, म्हटलेलेच आहे ना की 'सबै भूमी गोपालकी!' अशा प्रकारच्या विभाजनात प्रतिभा आणि श्रम वाया जाणार नाहीत. हिंसक पद्धतीने ही गोष्ट अशक्य आहे. यामुळे जमीनमालकांचा नाश केला गेला तर अखेरीस मजुरांचाही नाश होईल हे खरे आहे. यामुळे जमीनदार सुज्ञपणाने वागले तर कोणाचेही नुकसान होणार नाही.

**प्रश्न - काही स्त्रिया चटया विणून काही प्रमाणात आपली उपजिविका मिळवतात. हे काम सहकार्याच्या तत्त्वावर करा असा सल्ला तुम्ही त्यांना काल परवाच दिला आहे. शेतीचे फार लहानलहान तुकडे झाल्यामुळे बंगालमधील शेती फायदेशीर राहिलेली नाही. शेतकऱ्यांकरिताही तुम्ही सहकारी शेतीचा सल्ला द्याल काय? जर असे करायचे असेल तर सध्याच्या जमीनधारणेच्या नियमानुसार असे कसे करावे? राज्याने कायद्यात आवश्यक बदल केला पाहिजे काय? परंतु राज्याची याकरिता तयारी नसेल आणि जनतेची तशी इच्छा असेल तर खाजगी संघटनाद्वारे जनता हे कसे करू शकेल?**

**उत्तर - प्रश्नाच्या पहिल्या भागाचे उत्तर देत गांधीजी म्हणाले की चटई विणणारांपेक्षाही शेतकऱ्यांकरिता सहकारी पद्धती किती तरी जास्त आवश्यक आहे याबद्दल मला शंका नाही. मी आधीच म्हणालेलो असल्याप्रमाणे भूमी ही राज्याची असते; यामुळे शेती जेव्हा सहकाराने केली जाते तेव्हा ती सर्वात जास्त परतावा देते. हे सहकार्य पूर्णपणे अहिंसेवर आधारलेले असले पाहिजे हे तुम्ही लक्षात ठेवले पाहिजे. यशस्वी हिंसक सहकार्य अशी काही गोष्ट अस्तित्वातच असू शकत नाही. हिंसक सहकार्याचे जबरदस्त उदाहरण म्हणजे हिटलर. तोसुद्धा सहकार्याबद्दल व्यर्थ बोलायचा आणि जनतेवर सहकार्य लादायचा. त्याच्या सहकार्याने जर्मनी कुठे गेला हे आपण पाहतच आहो.**

**गांधीजी समारोप करत म्हणाले की हिंदुस्थानने नवीन समाजरचना जर हिंसेच्या आधारावरील सहकाराने केली तर तो हिंदुस्तथानकरिता दुर्दैवी दिवस असेल. बळजबरीने हिताची गोष्ट जरी केली तरी ती वैयक्तिकता नष्ट करते. परिवर्तन जेव्हा अहिंसक असहकाराच्या बळावर म्हणजे प्रेमाच्या बळावर समजूत घालून करण्यात येते तेव्हा वैयक्तिकतेचा पाया कायम राहतो आणि विश्वाची खरी आणि स्थायी प्रगती होईल याचा विश्वास बाळगता येतो.**

'हरिजन', मार्च ९, १९४७

-----------------

# ४५५. प्यारेलाल यांना पत्र

फेब्रुवारी १३, १९४७

चि. प्यारेलाल,

शाहपूरबद्दल तुला जे काही करायचे असेल ते कर. काम फार कठीण आहे. परंतु ते तसेच असणार होते. मनूचा पाठ जितका लहान असायला पाहिजे होता तितकाच लहान होता. अक्षरे मोठी आणि सुरेख नाहीत. मध्ये जागासुद्धा फार कमी सोडली आहे. असे नसावे. आज इतके पुरे.

आशीर्वाद,

बापू

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेदादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

------------------

# ४५६. प्रार्थना प्रवचन

("गांधीजीज वाकिंग टूर डायरी"मधून उद्धृत)

पश्चिम केवरा,

फेब्रुवारी १४, १९४७

अब्दुल्ला सुऱ्हावर्दी यांनी संकलित केलेल्या 'सेईंग्ज ऑफ महम्मद' या पुस्तकातील दोन उतारे गांधीजींनी वाचले. ते म्हणाले की गावातील तीन मुसलमान मित्र मला भेटले आणि म्हणाले की ईश्वराने या दोन्ही (हिंदू आणि मुसलमान) समुदायांना शांततेत आणि मैत्रीभावाने राहण्याची सद्बुद्धी द्यावी म्हणून तुम्ही प्रार्थना करा. ते मित्र आले तेव्हा मी महमदच्या वचनांचे हे पुस्तक वाचत होतो. त्यातील काही वचन मला तुम्हाला वाचून दाखवायचे होते. ते असे आहेत -

या जगात प्रवासी वा यात्रेकरू म्हणून राहा आणि स्वतःची गणना मृत माणसात करा.

हे अमूल्य रत्न आहे असे मी समजतो. कोणत्याही क्षणी आमचा मृत्यू होऊ शकतो हे आम्हांला माहीत आहे. आपण सर्व जर स्वतःला मृत समजू तर मरण्याची ही किती सुंदर तयारी असेल? दुसरा प्रश्न आहे जगात सर्वात चांगला माणूस कोण आणि वाईट माणूस कोण? पैगंबर साहेबांच्या मते सर्वात चांगला माणूस तो असतो जो सर्वात जास्त काळ जगतो आणि सर्वात चांगले काम करतो. आणि सर्वात वाईट तो असतो जो सर्वात वाईट काम करतो. पैगंबर साहेबांचे हे वचन लक्षात ठेवण्यासारखे आहे. माणसाची ओळख तो जे म्हणतो त्यावरून नाही तर तो जे करतो त्यावरून होत असते.

हे वचन स्वतःला जे मुसलमान म्हणवतात त्यांच्याकरिता आहे असे नसून सर्व स्त्री-पुरुषांकरिता आहे. सभेत आलेले सर्व हिंदू चांगले काम करणारे आहेत काय? अस्पृश्यता ही चांगली गोष्ट आहे काय? हा हिंदू धर्मावरील कलंक आहे हे मी जोरजोरात घोषणाकरून सांगत असतो. जोपर्यंत हा कलंक कायम राहील तोपर्यंत हिंदुस्थानकरिता शांतता आणि स्वातंत्र्य असू शकत नाही. ब्रिटिश जरी गेले तरी अस्पृश्यता समूळ घालवल्याशिवाय स्वातंत्र्य येणार नाही.

'हरिजन', मार्च ९, १९४७

# ४५७. मदालसा यांना पत्र

रायपुरा,

फेब्रुवारी १५, १९४७

चि. मदालसा (जमनालाल बजाज यांची मुलगी),

मला तुझे पत्र मिळाले. तू मला उत्तर मागितले नाही परंतु मी लिहीत आहे कारण अजूनही तू लहानलहान गोष्टींबद्दल फार चिंतित असते. मनू माझ्याजवळ झोपते यामुळे तू अस्वस्थ झाली नसशील आणि माझ्यावरील तुझी श्रद्धा नाहीशी झाली नसेल तर तू माझा सल्ला घे आणि श्रीमनशी एकरूप हो. मला माहीत आहे की त्याच्या मनात तुझ्याबद्दल पूर्ण भक्तिभाव आहे. तूसुद्धा त्याची पूजा करतेस. तू वसंतीला सर्व काही सांगतेस यात मला काही चूक दिसत नाही. ती सुज्ञ बाई आहे परंतु तुला मार्गदर्शन करण्याची क्षमता तिच्यात आहे असे मला वाटत नाही. तुझे सुख श्रीमनशी एकरूप होण्यात आहे याबद्दल मला शंका नाही. तू जर आध्यात्मिक प्रवृत्तीची स्त्री असतीस तर मी तुला श्रीमनला विरोध करण्याकरिता सांगितले असते. परंतु तुला असे कोणतेही ज्ञान नाही हे तू कबूल करतेस. हा सल्ला जर तुझ्या मनाला भावत असेल तर अंतःकरणपूर्वक त्याप्रमाणे वाग. तुला किंचितही शंका असेल तर हे पत्र विनोबांना दाखव आणि त्यांच्या सल्ल्याप्रमाणे वाग. तसेही हे पत्र विनोबांना दाखवले तर चांगलेच होईल. वसंतीलासुद्धा हे दाखव. रामच्या (रामकृष्ण बजाज, जमनालाल बजाज यांचा मुलगा.) सोयरिकीची गोष्ट मी समजू शकतो परंतु मी त्यात कोणताही रस दाखवला नाही. निस्वार्थ सेवेला वाहून घेऊन दोघेही सुखी होवो, आणि अजूनच वडिलांचे नाव काढो. हे रामला कळव. मला तुझे दुसरे पत्र मिळाले.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ५८५३

----------------

# ४५८. प्यारेलाल यांना पत्र

फेब्रुवारी १५, १९४७

चि. प्यारेलाल,

नुकताच तुझे पत्र मिळाले. अक्षरांच्या दृष्टीतून मनूकरिता तू पाठवलेला पाठ आकर्षक आहे. त्याकरिता अतिशय जागृत राहावे लागत असते. तू जसजसा याबद्दल सावधगिरी बाळगत जाशील तसतसे तुझे अक्षर मोत्यासारखे होत जातील. मग मीच केवळ तुझे पत्र वाचणार नाही तर मनूलाही ते वाचायला लावीन. या वेळी चार पाने आहेत माझ्या मते दोन पाने पुरेशी होतील. सध्या यापेक्षा मनू जास्त पचवू शकणार नाही कारण तिच्यावर कामाचे फार मोठे ओझे आहे आणि तिला त्यातील कोणतेही काम सोडायचे नाही. तुझ्या मनात काय आहे असेसुद्धा मी तिला विचारले नाही. आणि हे लिहीत असतानाही मी तिला हे विचारून राहिलेलो नाही. हा थोडासा वेळसुद्धा मी चोरून काढत आहे. मी शारीरिक आणि मानसिक दृष्टीने पूर्णपणे थकून गेलेलो आहे. शरीराला आराम हवा आहे. मनाचे असे नाही. मन बंगालीत गुंतलेले आहे. परंतु स्मृती बधीर झालेली असल्यामुळे प्रगती हळू आहे. स्वामीजी इथे नाहीत. यामुळे संस्कृत शिकवण्याकरिता मी एकटाच राहिलो आहे. आणि मी वेळ काढू शकत नाही. स्वामीजींनीसुद्धा फार वेळ दिला असे कोणी म्हणू शकत नाही. हे सर्व शिकण्यावर मनूचा विकास अवलंबून नाही. तो फार मोठ्या प्रमाणात माझ्यावर अवलंबून आहे, आणि म्हणून ती माझ्या क्षमतेवर आणि धैर्यावर अवलंबून आहे. किशोरीलाल वा अजून कोणाचे पत्र तुझ्यापासून लपवण्याचा विचार माझ्या स्वप्नातही आला नाही. परंतु तुला मानसिक त्रासापासून वाचवण्याची माझी इच्छा आहे. परंतु तुला तुझी उत्सुकता दाबता येत नसेल तर तू ते पाहू शकतोस. यामुळे मी ते पाठवत आहे. वाचल्यानंतर ते परत कर. माझ्या दृष्टिकोनातून त्यातून जितके अज्ञानाचे दर्शन होते तितकेच प्रेमाचे. त्याच्या दृष्टिकोनातून मी हे वासनेच्या ओढीमुळे करतो आहे असे समजणारा फार मोठा वर्ग आहे. या लोकांचा दृष्टिकोन चुकीचा आहे हे कोण कसे काय सांगू शकतो? कारण माणूस स्वतःला ओळखत नसतो. या सगळ्या पत्रांमध्ये कोणी उघडपणे असा आरोप केलेला तुला आढळणार नाही, परंतु देवदासच्या पत्रात सरळसरळ असा आरोप करण्यात आला आहे. मी शारीरिक वासनांपासून मुक्त होतो की नाही हे बहुधा माझ्या मृत्यूनंतरच कळेल. ‘बहुधा’ हा शब्द मी जाणीवपूर्वक वापरला आहे कारण मृत्यूनंतरही माणसाची खरी ओळख नेहमीच पटते असे नाही. केवळ ईश्वरालाच माणसाच्या अंतःकरणाची ओळख असते. मला स्वतःलाच माझ्याबद्दल निश्चितपणे

सांगता येत नसल्यामुळे जे काही घडते त्याचे ओझे माझ्या मनाला जाणवत नाही. परंतु हे मनूबद्दल कोण सांगू शकेल? तिला त्याचे काही वाटत नाही असे दिसते परंतु तिच्या मनात सुरू असलेल्या वादळाची तिलाच पूर्णपणे जाणीव नसू शकते. मी तिला यासंबंधी त्रास देत नाही. ईश्वराच्या हातात सर्व काही सोपवून मी माझे काम करत आहे. माझ्याकरिता हा यज्ञाचा अविभाज्य भाग आहे आणि माझा अनासक्तीभाव किती काळ टिकून राहू शकतो हे पाहायचे आहे. मी तुझे दोन्ही कागद वाचले. तू जरी म्हणाला की दुसरा कागद परत पाठवण्याची गरज नाही तरी मी दोन्ही कागद परत पाठवत आहे. तू सतीश बाबूंना दिलेले उत्तर बरोबर आहे. डॉ. चंद्र शेखरबद्दल दिलेले उत्तरही बरोबर आहे. त्यांना औषध वगैरे दिले पाहिजे. शक्य असेल तर औषधांवर कमी विसंबून राहण्याकरिता त्यांची समजूत घाल. औषधांपेक्षाही परिचर्येची आणि आश्वस्त करण्याची आवश्यकता जास्त आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

------------

# ४५९. घनश्यामदास बिर्ला यांना पत्र

रायपुरा,

फेब्रुवारी १५, १९४७

चि. घनश्यामदास,

तुला एक लांब पत्र लिहून मी ते सुशीलाबरोबर पाठवले होते. परंतु सरदारच्या पत्राने मी काहीसा अस्वस्थ झालो. देवदासच्या पत्रातील शब्दांचे तर अजूनही माझ्या कानात प्रतिध्वनी उमटत आहेत. मी तुला काय लिहिले याची प्रत मी माझ्याजवळ ठेवलेली नसल्यामुळे मी तुला काय लिहिले हे मला आठवत नाही. मला तुला इतकेच लिहायचे आहे की तू तटस्थता सोडायला पाहिजे. मी अकर्माला कर्म मानत आहे असे सरदारांच्या मनात स्पष्ट आहे. देवदास तर असे लिहीतच असतो. सरदारच्या बुद्धीवर माझा फार विश्वास आहे. देवदासच्या बुद्धीवरही आहे परंतु देवदास मोठा असूनही माझ्याकरिता मूल आहे. असे सरदार, किशोरीलाल, नरहरी यांच्याबद्दल म्हणता येत नाही. ते मोठे झालेले आहेत. परंतु त्यांचा विरोध समजून घेणे माझ्याकरिता कठीण नाही. माझे जीवन पवित्र आहे, निष्कलंक आहे आणि धर्माला पूर्णपणे वाहिलेले आहे ही माझ्यावरील तुझी श्रद्धा हा तुझ्यातील आणि माझ्यातील दुवा आहे. जर असे नसेल तर फार कमी शिल्लक राहते. यामुळे जाहीर जरी नाही, कारण तुझ्या व्यवसायाला धक्का लागावा अशी माझी इच्छा नाही, तरी या चर्चेत तू पूर्णपणे भाग घ्यावा अशी माझी इच्छा आहे. परंतु मी जर पापाचरण करत असेन तर मला जोरदार विरोध करणे हे सर्व मित्रांचे कर्तव्य असेल. सत्याग्रही जर असत्याला सत्य समजत असेल तर तो सत्याग्रही न राहता दुराग्रही ठरेल - या दोघांमध्ये इतकेच अंतर आहे. माझा विश्वास आहे की माझी अशी परिस्थिती नाही; परंतु त्याला फार कमी अर्थ आहे. अखेरीस मी काही ईश्वर नाही. मी चुका करत असतो; मी चुका केलेल्या आहेत. माझ्या जीवनाच्या अखेरच्या काळात मी केलेली कदाचित ही सर्वात मोठी चूक असेल. असे जर असेल तर माझ्या सर्व मित्रांनी मला विरोध करून माझे डोळे उघडले पाहिजे. त्यांनी जर असे केले नाही तर आज मी जिथे आहे तिथूनही खाली घसरेन. मी इथे जे काही करत आहे तो यज्ञाचाच भाग आहे. माझ्या यज्ञाचा भाग नसलेली कोणतीही गोष्ट मी जाणूनबुजून केलेली नाही. इतकेच नाही तर मी जी विश्रांती घेतो तीसुद्धा माझ्या यज्ञाचाच भाग असते.

माझ्या डोळ्यांवर आणि पोटावर मातीच्या पट्ट्या ठेवून मी या पत्राचा मजकूर सांगत आहे. त्यानंतर थोड्याच वेळात सायंकाळच्या प्रार्थना सभेकरिता जाईन. मनूचे काम माझा भरपूर वेळ घेते. पण मी ते मनावर घेत नाही कारण तिची येथील उपस्थितीसुद्धा त्या यज्ञाकरिताच आहे. तिची परीक्षा हा त्या यज्ञाचाच भाग आहे. मी कदाचित हे तुला स्पष्ट करून सांगू शकणार नाही ही वेगळी गोष्ट आहे. माझ्या मित्रांनी हा मुद्दा समजून घेतला पाहिजे : मी जेव्हा मनूला माझ्याजवळ घेतो तेव्हा पवित्र अंतःकरणाचा बाप म्हणून घेत असतो की आपल्या मार्गावरून भरकटलेला बाप म्हणून घेत असतो? मी जे करतो आहे ते माझ्याकरिता नवीन नाही; विचारात मी असे गत पन्नास वर्षांपासून करत आलो आहे, आचरणात वेगवेगळ्या प्रमाणात किती तरी वर्षांपासून मी करत आलो आहे. तूसुद्धा माझ्याबरोबरचे सर्व संबंध तोडले तरी मी दुखावला जाणार नाही. ज्याप्रमाणे मला माझ्या धर्माला चिकटून राहावेसे वाटते त्याचप्रमाणे तू तुझ्या धर्माला चिकटून राहायला पाहिजे.

वेगळ्या मुद्द्याकडे यायचे तर येथील हिंदू विणकर - तंती म्हणून ते ओळखले जातात - अतिशय संतापलेले आहेत. त्यांच्यातील बहुतेकांचे चरखे आणि घरे जाळण्यात आली आहेत. त्यांना जर सुताचा पुरवठा झाला नाही तर एक तर त्यांना बेकार बसावे लागेल वा त्यांना मजुरांप्रमाणे मातीतील काम करावे लागेल. येथील अधिकारी म्हणतो की जोपर्यंत केंद्र सरकार मदत करत नाही तोपर्यंत यांना आम्ही सूत पुरवू शकत नाही. मी त्याला सांगितले की तुम्ही किंमत द्यायला तयार असाल तर मी तुम्हाला आवश्यक तितके सूत पुरवू शकतो. त्यांनी ते मान्य केले आहे. तू सूत पुरवू शकशील काय? जर पुरवू शकशील तर किंमत काय असेल? त्याकरिता अंतरिम सरकारची मान्यता घ्यावी लागेल काय? कृपाकरून मला सविस्तर कळव.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. सी. डब्ल्यू. ८०८६. सौजन्य घनश्यामदास बिर्ला

-----------------

# ४६०. एक चर्चा

(मनू गांधी लिहितात की शहरातील मुसलमान, हिंदू आणि विणकर यांचे चार वा पाच प्रतिनिधी गांधीजींना भेटले होते.)

रायपुरा,

फेब्रुवारी १५, १९४७

ते मानपत्र मला इथेच आणि आताच द्या. अशा वेळी मानपत्र कसे घेता येऊ शकते? आणि प्रेम ही अंतःकरणाची गोष्ट आहे. तुमच्या अंतःकरणातील भावनांचे प्रदर्शन करण्याची आवश्यकता नाही. आणि अखेरीस मी केले तरी काय? जे काही चांगले झाले असेल ते ईश्वरी कृपेने झाले आहे. माझ्याबद्दलचे तुमचे प्रेम तुमच्या अंतःकरणात ठेवा आणि पुढे चालत राहा. तुमच्या अंतःकरणात माझ्याबद्दलचे प्रेम असेल तर मी करत असलेले काम करा. तसे करणे हे मला मानपत्र देण्यासारखेच आहे. इतरांना घाबरवू नका आणि कोणाला घाबरू नका.

गुजरातीवरून. 'एकलो जाने रे', पृष्ठ १४१

----------------

# ४६१. प्रार्थना प्रवचन

("गांधीजीज वाकिंग टूर डायरी"मधून उद्धृत)

रायपुरा,

फेब्रुवारी १५, १९४७

**पहिला प्रश्न होता : संपूर्ण नोआखली जिल्ह्यात सर्व मुसलमानांनी हिंदूंवर बहिष्कार टाकण्याची चर्चा सुरू आहे. ज्या काही मुसलमानांनी इतक्यातील दंगलीत हिंदूंकरिता काम केले होते त्यांच्यावरसुद्धा बहिष्कार टाकण्याची धमकी दिली जात आहे. अशा परिस्थितीत ज्या मुसलमानांना सामान्यपणे शांतता हवी आहे त्यांचे काय कर्तव्य आहे?**

**गांधीजींनी उत्तर दिले की बहिष्काराबद्दल मी आधीही ऐकले आहे. परंतु ही बाब फारशी व्यापक प्रमाणात नसेल अशी मी आशा करतो. तीन वा चार दिवसांपूर्वी गुजरातमधील एक मुसलमान बंधू मला भेटण्याकरिता आले होते. त्या वेळी त्यांनी असे एक प्रकरण माझ्या निदर्शनास आणून दिले होते. माझी भेट घेतल्याबद्दल त्यांना बरेच बरेवाईट म्हणण्यात आले होते परंतु ते आपल्या गोष्टीवर अढळ राहिले आणि या कठोर परीक्षेतून ते सुखरूपपणे बाहेर पडले होते. आज दुसरे एक मुसलमान बंधू माझ्याकडे आले आणि ते जर मला भेटायला आले तर त्याचे गंभीर परिणाम होतील अशी धमकी त्यांना देण्यात आली होती. या वृत्तांमध्ये कितपत सत्य आहे ते मला माहीत नाही. मुस्लिम पिटुनी** (हिंसक) **पक्षातर्फे धमकी देणारी पत्रके भिंतीवर चिकटवलेली आहेत. या उदाहरणातून बहिष्काराबद्दल सुरू असलेल्या गोष्टींना रंग येतो. यामुळे तुम्ही घाबरू नका अस्वस्थ होऊ नका असे मी मुसलमान मित्रांना आणि इतरांना सांगेन. या घटना एक्कटदुक्कट असतील तर तुम्ही त्याकडे दुर्लक्ष करा. आणि अशा घटना जर व्यापक प्रमाणात होत असतील तर सरकार या परिस्थितीतून मार्ग काढेल. दुर्दैवाने सरकारनेच बहिष्काराचे धोरण अवलंबिले तर ती गंभीर गोष्ट होईल. मी केवळ अहिंसेच्या पद्धतीने विचार करू शकतो. सरकार जर योग्य मोबदला देणार असेल तर तो स्वीकारण्याचा सल्ला मी कदाचित देऊ शकेन. परंतु याचे काय बरेवाईट परिणाम होतील याचा विचार करून मी आताच्याआता उत्तर देऊ शकत नाही. उलटपक्षी सरकारने जर जप्तीच्या मार्गाचा अवलंब केला तर तुम्ही तुमच्या भूमिकेवर अढळ राहा आणि मरण जरी पत्करावे लागले तरी तुम्ही तुमचे घरदार सोडू नका असाच सल्ला मी तुम्हांला देईन. मुसलमान बहुसंख्य प्रांत असो की हिंदू बहुसंख्य प्रांत मी हे सर्वांकरिता सांगतो आहे. असे असले तरी नुकसानभरपाई देऊन वा न देऊन कोणतेही सरकार बहिष्काराच्या धोरणाचा पुरस्कार करण्याइतके वेडे असेल असे मला वाटत नाही. युगांपासून जे जमिनीशी जुळलेले असतात ते केवळ अल्पसंख्य समाजाचे आहेत म्हणून त्यांना त्यांच्या घरादारांपासून विस्थापित करता येत नाही. हा हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन वा इतर कोणताही धर्म असू शकत नाही. ही असहिष्णुता आहे.**

**दुसरा प्रश्न होता : केवरा येथे शेतकऱ्यांना तुम्ही सल्ला दिला** (पाहा "प्रार्थना प्रवचन", फेब्रुवारी १३, १९४७) **की शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतीत मिळूनमिसळून सहकाराच्या पद्धतीने शेती करावी. त्यांनी आपली शेती एकत्रित करावी आणि**

**आपल्या शेतीच्या प्रमाणात पीक वाटून घेतले पाहिजे काय? सहकारी पद्धतीने त्यांनी नेमके कसे वागायला पाहिजे याची कल्पना तुम्ही आम्हांला देऊ शकाल काय?**

**गांधीजी म्हणाले की हा प्रश्न चांगला आहे आणि त्याचे उत्तर साधे आणि स्पष्ट असले पाहिजे. माझ्या सहकाराच्या कल्पनेप्रमाणे सर्व जमीनमालकांचा जमिनीवर सामूहिक ताबा असावा आणि त्यांनी जमिनीची लागवड, पेरणी,, पीक कापणे इत्यादी कामेही सहकारी तत्त्वावर करावी. यामुळे श्रम, भांडवल आणि अवजारे यांची बचत होईल. मालक सहकारी तत्त्वावर काम करतील आणि भांडवल, अवजारे, जनावरे, बीबियाणे इत्यादींवर त्यांचा सहकारी हक्क असेल. ज्या सहकारी शेतीची मी कल्पना केली आहे ती जमिनीचे स्वरूपच बदलून टाकील आणि त्यांची गरिबी तसेच आळशीपणा नाहीसा करील. हे सर्व तेव्हाच शक्य होईल जेव्हा लोक मित्र होतील आणि एका कुटुंबातील सदस्यांप्रमाणे राहू लागतील. अशी सुखद परिस्थिती जेव्हा निर्माण होईल तेव्हा सांप्रदायिकतेच्या समस्येचा नासूर शिल्लकच राहणार नाही.**

'हरिजन', मार्च ९, १९४७

----------------

# ४६२. प्रार्थना प्रवचन

("गांधीजीज वाकिंग टूर डायरी"मधून उद्धृत)

रायपुरा,

फेब्रुवारी १६, १९४७

**गांधीजींनी दोन जागांची** (गांधीजी सहभोजनाकरिता हजर राहिले आणि रायपुरा येथील मशिदीला त्यांनी भेट दिली होती.) **चर्चा केली आणि तिथे जाण्याची संधी दिल्याबद्दल त्यांनी आभार मानले आणि माजी मुख्यमंत्री फजलूल हक यांच्या तथाकथित भाषणाची चर्चा करत गांधीजी म्हणाले की वर्तमानपत्रांवरून दिसते त्याप्रमाणे ते म्हणाले की "एक मुसलमानेतर म्हणून त्यांनी मुसलमानांना इस्लामची शिकवण देऊ नये. हिंदू-मुसलमान ऐक्याऐवजी ते दोन्ही समाजात कटुताच निर्माण करत आहेत. ते जर बारीसालला** (फजलूल हक यांचे गाव) **आले तर तिथे मी त्यांना कालव्यात ढकलून देईन. नोआखाली आणि टिपरा येथील मुसलमान त्यांना किती काळ सहन करत राहतील हेच कळत नाही."**

**गांधीजी म्हणाले की वृत्ताच्या अचूकतेबद्दल मला फार शंका आहे. त्यांच्या भाषणाचा हा सार जर बरोबर असेल तर मौलवी साहेबांसारख्या जबाबदार आणि मुस्लिम लीगचा अध्यक्ष होण्याची आकांक्षा ठेवणाऱ्या व्यक्तीच्या तोंडून अशी भाषा निघणे ही गोष्ट मी अतिशय दुर्दैवी समजतो. दोन्ही समुदायात कटुता निर्माण होईल असे काही काम मी केल्याचे मला तरी आठवत नाही. इस्लामची शिकवण देण्याचा दावा मी कधीही केला नाही. पैगंबर साहेबांच्या उपदेशाचा अर्थ लावून तो केवळ मी माझ्या भाषणातून सांगितला आहे. मी लावलेला अर्थ स्वीकारण्याचा वा फेटाळण्याचा तुम्हाला अधिकार आहे.**

**याच भाषणात फजलूल हक साहेब म्हणतात की मी जेव्हा दक्षिण आफ्रिकेतून परतलो होतो तेव्हा त्यांनी मला इस्लामचा स्वीकार करण्याबद्दल विचारले असता मुसलमान या शब्दाच्या खऱ्या अर्थाने मी मुसलमानच आहे असे मी म्हणालो होतो. श्रीयुत हक म्हणाले की मग तसे जाहीर करा, परंतु मी तसे करण्याकरिता नकार दिला.**

**गांधीजी म्हणाले की हे संभाषण केव्हा आणि कसे झाले हे मला आठवत नाही आणि मी जे खाजगी ठिकाणी म्हणतो ते लोकांपासून दडवून ठेवण्याचीही मला सवय नाही. श्रोत्यांना माहीत आहे की जिल्ह्यातील अनेक ठिकाणी दिलेल्या भाषणांत मी म्हणालो आहे की मी स्वतःला जितका चांगला हिंदू समजतो तितकाच चांगला मुसलमान समजतो आणि याच दृष्टीने मी स्वतःला जितका चांगला ख्रिश्चन समजतो तितकाच चांगला पारसीही समजतो. मला माहीत आहे की अशा प्रकारचा दावा मान्य केला जाणार नाही, आणि काही ठिकाणी तो फेटाळण्यातसुद्धा आलेला आहे. परंतु यामुळे मी घेतलेल्या मूलभूत भूमिकेवर परिणाम होत नाही. आणि मी जे म्हणालो म्हणून मौलवी फजलूल हकसाहेब म्हणतात त्याप्रमाणे मी जर म्हणालोच असेन तर मी त्याबद्दल मी निःसंकोचपणे खेद व्यक्त करीन, परंतु त्याकरिता मी तसे म्हणालो असल्याचे मौलवी साहेबांनी मला पटवून दिले पाहिजे. हे खरे आहे की दक्षिण आफ्रिकेत असताना खरा मुसलमान असल्याचा मी दावा केला होता परंतु त्याच वेळी मी जगातील इतर धर्मांचाही चांगला अनुयायी असल्याचा दावा केला**

**होता. बंगालच्या भूतपूर्व मुख्यमंत्र्यांकरिता परत सांगतो की त्यांच्या भाषणाचे वृत्त चुकीचे जर छापण्यात आले असेल तर त्याचे बरोबर विवरण मला मिळाले तर मी त्याचे स्वागतच करीन.**

'हरिजन', मार्च ९, १९४७

------------

# ४६३. हिंदू कार्यकर्त्यांबरोबर चर्चा

नोव्हेंबर २१, १९४६

शांतता समित्या स्थापन होण्यापूर्वीच या मागण्या पूर्ण केल्या जाव्या या तुमच्या सूचनेवरून हाच अर्थ निघतो की शांतता प्रस्ताव ताबडतोब फेटाळून लावण्यात आलेला आहे. यामुळे लोकांच्या भावनेला धक्का लागेल. सरकारचा प्रस्ताव उपयोगितेच्या दृष्टीने मान्य करायला पाहिजे होता. तरीही कोणत्याही किंमतीवर शांतता स्थापित करण्यात यावी अशी वकिली मी करून राहिलेलो नाही, आणि प्रतिष्ठा पणाला लावून तर मुळीच नाही. आम्ही प्रामाणिकपणे काम केले पाहिजे आणि ते सर्व चूक आहेत हे सिद्ध केले पाहिजे. दक्षिण आफ्रिकेत असताना अगदी याच पद्धतीने फार मोठ्या युरोपीय समुदायाची सहानुभूती हिंदुस्थानी लोकांना मिळवता आली होती. बराच प्रयत्न करूनही समित्या योग्य प्रकारे काम करत नाहीत असे आढळले तर तुमच्या सन्मानाला कोणताही धक्का लागणार नाही. सन्मानाच्या या भावनेने तुमच्यात असे धैर्य निर्माण होईल की ज्याला जगातील कोणतीही शक्ती पराभूत करू शकणार नाही.

माझ्या योजनेत मला १०० टक्के यश मिळाले तर परिस्थितीत सुधारणा होईल. परंतु सध्याच्या क्षणी अशी कोणतीही शक्यता दिसत नाही. परंतु एक आशावादी माणूस म्हणून मी आशेची शक्यता नसताना आशा करतो आहे. मी मान्य करतो की सध्याच्या परिस्थितीच्या कटू अनुभवांवरून हृदयपरिवर्तनाचे कोणतेही चिन्ह मला दिसत नाही, परंतु योजनेत मात्र निश्चितच बदल झाला आहे. यामुळे या प्रस्तावाचा स्वीकार करणे ही आज व्यवहाराची मागणी आहे.

ते पुढे म्हणाले की आतापर्यंत आपली अहिंसा ही दुर्बलांची अहिंसा होती; परंतु आता ब्रिटिशांऐवजी आपल्याला तिचा अवलंब आपल्याच देशातील लोकांच्या एका गटाच्या विरोधात करायचा आहे ती सबळांची अहिंसा असणे आवश्यक आहे.

यानंतर एकेका मागणीचा विचार करण्यात आला. मुसलमान अधिकाऱ्यांच्या ठिकाणी हिंदू अधिकारी नेमण्यात यावे अशी एक मागणी होती. गांधीजी म्हणाले की ही अवास्तव आणि सांप्रदायिक मागणी आहे. बिहारमधील मुसलमानांनी अशीच मागणी केली तर आपल्याला काय वाटेल याचा विचार आपण असा प्रस्ताव मांडण्यापूर्वी केला पाहिजे. माझ्या मते ही मागणी असमंजसपणाची आहे आणि मी तिला कधीही

उत्तेजन देणार नाही. तुम्ही अर्थातच हिच्या ठिकाणी, “पक्षपाती अधिकाऱ्यांच्या ठिकाणी निष्पक्ष अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी” अशी मागणी करू शकता; ती न्याय्य मागणी होईल

याशिवाय पोलीस अधीक्षकांना हटवण्याची मागणी होती. गांधीजी तिच्या विरोधात होते. त्यांच्या मते दोष अन्यत्र होता. या अधिकाऱ्याने मुख्यमंत्र्याच्या इच्छेचे पालन केलेले असू शकते. तो स्वतःहोऊन अशा प्रकारे वागू शकत नाही. (“देवप्रकाश नाय्यर यांना पत्र”, नोव्हेंबर २१, १९४७) काही म्हणाले की अब्दुल्ला साहेबांना विवेकबुद्धी नाही.

गांधीजी ताबडतोब म्हणाले की विवेकबुद्धी असलेला पोलीस अधीक्षक मला अजून दिसलेला नाही. श्री सुऱ्हावर्दी तर केवळ साधन होते. आपण काय करू शकतो हे त्यांना सर्व जगाला दाखवून द्यायचे होते. परंतु त्यात त्यांना अपयश आले.

कोणी तरी गांधीजींच्या निदर्शनास आणून दिले की बिहारमध्ये दंगली शमवण्याकरिता तेथील मंत्रिमंडळाने सशस्त्र मुसलमान सैनिकांची नेमणूक केली होती. असे मुसलमानांना खुश करण्याकरिता करण्यात आले होते.

गांधीजींचे स्पष्ट मत होते की जर हे खरे असेल तर हे दुर्बलतेचे चिन्ह आहे.

शांतता समितीतील हिंदू सदस्यांसंबंधीचा शेवटचा मुद्दा होता. मनोरंजन चौधरींचे मत होते की हा मुद्दा सध्या स्थगित करण्यात यावा कारण जिल्ह्यातील बहुतेक हिंदू निघून गेलेले आहेत आणि केवळ गरीब विणकर, लोहार वा शेतकरीच मागे राहिलेले आहेत. हे लोक जर समितीवर असतील तर ते अधिक परिपक्व आणि शिक्षित मुसलमानांची बरोबरी करू शकणार नाही. गांधीजी जिव्हाळ्याने म्हणाले की जर ते आपल्याच बांधवांना त्यांच्या नशिबावर सोडून पळून गेलेले असतील तर ते पुढारी म्हणवण्याच्या लायकीचे नाहीत. या जागा न्हावी, धोबी आणि अशाच लोकांद्वारे भरण्यात याव्या. त्यांनासुद्धा आपल्या जीवनाच्या आणि संपत्तीच्या सुरक्षिततेची श्रीमंतांइतकीच काळजी आहे. ते मुसलमान सदस्यांच्या दडपणाला बळी पडण्याची शक्यता नाही असे नाही. परंतु आपल्याला जर लोकशाही विकसित करायची असेल तर हा धोका पत्करावाच लागेल.

यानंतर गांधीजींनी इंग्लंडमधील लोकशाहीचा इतिहास सांगितला आणि इंग्लंडमधील सर्वसामान्य माणूस आपल्या हक्काच्या रक्षणाकरिता प्रत्येक इंच कसा झगडला ते कौतुकाने सांगितले; आणि या संदर्भात त्यांनी वॅट टायलरच्या नावाचा उल्लेख केला.

‘माय डेज विथ गांधी’, पृष्ठ ६०-२

# महात्मा गांधी संकलित साहित्य खंड १३ मधील परिशिष्टे

## ४६४. घटना समितीचा प्रस्ताव

(पाहा "कार्यकारिणीत भाषण”, डिसेंबर १६, १९४६. हा ठराव जवाहरलाल नेहरूंनी डिसेंबर १३, १९४६ला मांडला होता आणि जानेवारी २२, १९४७ला तो एकमताने मंजूर झाला होता)

१. ही घटनासमिती घोषित करते की हिंदुस्थानला स्वतंत्र, प्रभुसत्तासंपन्न गणतंत्र बनवले जाईल आणि त्याच्या भावी शासनाकरिता ही घटनासमिती घटना तयार करण्याचा निर्धार व्यक्त करते;

२. त्यात ते सर्व प्रदेश असतील जे ब्रिटिश हिंदुस्थानात सामील आहेत, जे प्रदेश संस्थानांमध्ये सामील आहेत, आणि हिंदुस्थानचा तो भाग असेल जो ब्रिटिश हिंदुस्थान आणि संस्थाने यांच्याबाहेर आहे आणि त्याचबरोबर ते सर्व प्रदेश असतील ज्यांची स्वतंत्र प्रभुसत्तासंपन्न हिंदुसथानमध्ये सामील होण्याची तयारी असेल आणि

३. ज्यात वर सांगितलेला प्रदेश, जिथे त्यांच्या सध्याच्या सीमा असो वा घटनासमितीने तयार केलेल्या सीमा असो वा नंतर घटनेत ठरवण्यात आलेल्या सीमा असो त्यांना स्वायत्त घटकाचा दर्जा राहील. तसेच संघाकडे असलेल्या वा संघाकडे सोपवण्यात आलेल्या अधिकारांशिवाय राहिलेले अधिकार असतील तसेच त्यांना सरकार आणि प्रशासनाच्या सर्व कार्यात सहभागी होण्याचा अधिकारही असेल; आणि

४. प्रभुसत्ताप्राप्त स्वाधीन भारताला त्याच्या निर्वाचन भागांना आणि शासकीय भागांना सर्व सत्ता जनतेकडून मिळत असते; आणि

५. ज्यात हिंदुस्थानच्या संपूर्ण जनतेला सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाची, संधी, दर्जा आणि कायद्यासमोर समतेचा अधिकार, तसेच कायदा आणि सामाजिक नैतिकच्या अंतर्गत अभिव्यक्ती, श्रद्धा, पूजा, व्यवसाय आणि संघटना आणि कार्य करण्याच्या स्वातंत्र्याची ग्वाही देण्यात येत आहे; आणि

६. जिच्यात अल्पसंख्याक, मागासलेल्या आणि वन्यजातीय क्षेत्र, दलित वर्गीय आणि इतर मागासवर्गीय यांच्याकरिता पुरेसे आरक्षण दिले जाईल; आणि

७. ज्यात सुसंस्कृत राष्ट्रांच्या न्याय आणि कायद्यानुसार गणतंत्राच्या प्रदेशाच्या अखंडतेची तसेच त्याच्या जल, भू आणि वायू मार्गांची प्रभुसत्ता संपन्न अधिकार कायम ठेवण्यात येतील; आणि

८. या प्राचीन राष्ट्राला विश्वात एक योग्य आणि प्रतिष्ठित स्थान मिळावे म्हणून आणि मानवजातीचे कल्याण आणि विश्वशांततेचे प्रचारार्थ याचा सहर्ष आणि संपूर्ण सहभाग असावा.

# ४६५. निर्मल कुमार बोस यांच्याबरोबर चर्चा

(पाहा "प्रार्थना प्रवचन", डिसेंबर १७, १९४६" आणि "मौनाच्या दिवशी निर्मल कुमार बोस यांना पाठवलेली चिठ्ठी", डिसेंबर २३, १९४६)

श्रीरामपूर,

गुरुवार, डिसेंबर १९, १९४६

सकाळी मी जेव्हा त्यांना आंघोळ घालत होतो तेव्हा १७ तारखेला घडलेल्या घटनेसंबंधी गांधीजींनी स्वतःहोऊनच बोलायला सुरुवात केली. ती घटना घडलेल्या दिवसापासून त्यांच्यात आणि माझ्यात त्या घटनेसंबंधी शब्दानेही बोलणे झाले नव्हते.

त्या दिवशीच्या घटनेमुळे 'सुशीला नाय्यर तुमच्या दृष्टीतून पडली की काय (तुम्हारी नजर में गिर गई है?)' हे त्यांना माझ्याकडून तसेच परशुरामकडून जाणून घ्यायचे होते. मी म्हणालो की मी माझ्यासंबंधी बोलू शकतो, परशुरामसंबंधी नाही. ती निश्चितच पडली आहे आणि त्याचे कारण हे आहे. एखादी व्यक्ती कितीही मोठी असली तरी तिला तुमच्या कामात अडथळा आणण्याचा अधिकार नाही. सुशीलाने असे केले हे स्पष्ट आहे. यावर गांधीजी म्हणाले, 'कल्पना करा की तिने हे काम सद्हेतूने केले असेल, कदाचित माझ्या कामात मदत करण्याच्या दृष्टीने केले असेल तर? ती जे काही सुचवत होती ते कदाचित माझ्याकरिता सुचवत असावी, स्वतःकरिता नाही तर मग?'

मी म्हणालो, 'हो, तेव्हासुद्धा. तुम्ही चुकीचे पाऊल उचलत आहा असे जर त्यांना वाटले असेल तर त्यांनी तुम्हाला आपला सल्ला द्यायला पाहिजे होता आणि मग निर्णय तुमच्यावर सोडायला पाहिजे होता.'

गांधीजी म्हणाले, 'माझ्या सध्याच्या प्रकृतीच्या या परिस्थितीत ती माझ्या पदयात्रेविरुद्ध आहे. तिचे म्हणणे होते की तुमच्या प्रकृतीची संपूर्ण माहिती असलेला एखादा जुना सहकारी तरी या यात्रेत तुमच्याबरोबर असला पाहिजे आणि याकरिता तिने स्वतःची सेवा देऊ केली. तिचे म्हणणे होते की परशुरामसारख्या नवीन कार्यकर्त्यांना माझ्या शारीरिक गरजांबद्दल माहिती नसल्यामुळे त्याच्यासारख्या कार्यकर्त्यांवर या बाबतीत अवलंबून राहता येऊ शकत नाही.' मी म्हणालो, 'मी जर तिच्या ठिकाणी असतो तर मी माझा संपूर्ण दृष्टिकोन तुमच्यासमोर मांडला असता आणि तुम्हाला निर्णय घेण्याकरिता मोकळे सोडले असते. तुमचा निर्णय माझ्या म्हणण्यानुसार नसता तर तुमची चूक तुमच्या लक्षात येईपर्यंत मी शांतपणे वाट पाहिली असती.' मी हे

सांगितल्यानंतर माझे म्हणणे त्यांना नीटपणे कळले की नाही हे जाणून घेण्याकरिता गांधीजींनी माझ्या म्हणण्याचा आशय परत आपल्या शब्दांत सांगितला.

माय डेज विथ गांधी, पृष्ठ ११४-५

-----------------

# ४६६. डॉ. सुशीला नाय्यर यांचे निर्मल कुमार बोस यांना पत्र

(पाहा “प्रार्थना प्रवचन”, डिसेंबर १७, १९४६)

श्रीरामपूर,

रविवार, डिसेंबर २२, १९४६

काल रात्री बापूंची डायरी वाचत असताना मी वाचले “मला एक विलक्षण स्वप्न पडले”. सहजपणे मी त्यांना विचारले की  ते काय होते. परंतु ते काहीही बोलले नाही, ते गप्प राहिले.

दुसऱ्या दिवशी सकाळी तीन वाजता बापू आपल्या अंथरुणावर उड्या मारत असल्याच्या आवाजाने मी उठले. ते म्हणाले की मला फार थंडी वाजत होती म्हणून मी अंथरुणात उड्या मारून व्यायाम करत होतो. तू जागीच होती काय असे त्यांनी मला विचारले आणि मग ते आपले स्वप्न सांगू लागले. स्वप्न सांगितल्यानंतर ते म्हणाले की सध्या मी जे काही करत आहेत ती माझ्याकरिता तपश्चर्या असून तिच्याकरिता मी सर्व प्रकारच्या अडचणी सहन करत आहे. काल मी त्यांना म्हणाले होते की तुम्ही जे काही करता त्याकरिता मदत करणारे लोक ईश्वराने पाठवले आहेत आणि पाठवीलही . . . . तुमच्याबरोबर येण्याची परवानगी तुम्ही मला देऊ शकाल काय असे मी त्यांना थोडक्यात विचारले. मी त्यांना म्हणाले की तुम्ही जिला तपश्चर्या म्हणता ती आणि ईश्वर जी मदत पाठवतो ती यांत विरोध नाही असे मी म्हणाले आणि मी ते स्पष्ट करून सांगण्याचा प्रयत्न करू लागले. ते चिडून म्हणाले की मी तुला स्पष्ट करून सांगण्याचा प्रयत्न केला पण मला त्यात यश आले नाही. . . . . ते उत्तेजित होत असल्याचे माझ्या लक्षात आले. त्यामुळे मी तिथून निघून आले.. . . तितक्यातच ते कपाळावर थापडा मारून घेत असल्याचे मला ऐकू आले. मी धावत गेले आणि त्यांना थांबवले. . . .

मी काल अगदी घाबरून गेले होते. ... बापूंनी मला गीतेकरिता बोलावले होते. . . . . आज त्यांनी परत ती गोष्ट काढली परंतु मी स्वतःवर अजून ताबा मिळवू शकले नव्हते.

‘माय डेज विथ गांधी’, पृष्ठ ११९-२०

--------------

# ४६७. काँग्रेस कार्यकारिच्या वक्तव्याचा जवाहरलाल नेहरूंनी तयार केलेला मसुदा

(पाहा “जवाहरलाल नेहरू यांना चिठ्ठी”, डिसेंबर ३०, १९४६)

डिसेंबर २२, १९४६

ब्रिटिश सरकारने डिसेंबर ६ १९४६ला जे वक्तव्य जारी केले त्याचा आणि इतक्यात त्यांच्यातर्फे संसदेत सादर करण्यात आलेल्या विविध वक्तव्यांचा कार्यकारिणीने काळजीपूर्वक विचार केला. ही वक्तव्ये जरी अर्थ लावण्याकरिता आणि स्पष्टीकरण करण्याकरिता देण्यात आली होती तरी त्यामुळे ब्रिटिश कॅबिनेट मिशनच्या मे १६, १९४६च्या वक्तव्यात घटनासमितीबद्दलची जी योजना होती तिच्यात निश्चितपणे काही भर पडली आहे आणि काही बदल झाले आहेत.

२. मे १६, १९४६च्या वक्तव्यातील परिच्छेद १५(३) मध्ये घटनेच्या मूलभूत सिद्धांतासंबंधी असे सांगितले आहे की “केंद्राचे विषय सोडले तर इतर विषय आणि शिल्लक राहिलेले अधिकार प्रांतांकडे राहतील”, आणि कार्यपालिका आणि विधानसभांसह गट तयार करण्याकरिता प्रांत स्वतंत्र असतील”. अशा प्रकारे स्वतःकडे काही विषय ठेवून इतर विषयांत प्रांताना स्वायत्तता देण्याचा केंद्राचा हेतू होता. इतर गोष्टींशिवाय परिच्छेद १९मध्ये समूहांची सभा बोलावण्याची कार्यपद्धती सांगितली आहे. त्यानुसार समूह तयार करायचा की नाही याचा निर्णय घेण्याचा आणि ज्या समूहात प्रांतांना ठेवण्यात आले आहे त्या समूहात राहायचे की नाही हे ठरवण्याची प्रांतांना सूट असेल.

३. कार्यकारिणीने आपल्या मे २४, १९४६च्या प्रस्तावात निदर्शनास आणून दिले होते की मूलभूत सिद्धांत आणि सांगण्यात आलेली कार्यपद्धती यांत अंतर असल्याचे जाणवते कारण त्यात असे बंधन घालण्यात आले आहे की ज्यामुळे प्रांतांच्या मूलभूत स्वायत्ततेचे उल्लंघन होते. यावर कॅबिनेट मिशनने मे २५, १९४६ला एक वक्तव्य प्रसृत केले. त्यात सांगण्यात आले आहे की “वक्तव्यातील परिच्छेद १५चा कॉंग्रेसच्या ठरावात लावण्यात आलेला अर्थाप्रमाणे प्रांतांना ज्या समूहात ठेवण्यात आले आहे त्या समूहात राहायचे की नाही हे सुरुवातीलाच प्रांत ठरवू शकतात. ही गोष्ट प्रतिनिधीमंडळाच्या हेतूशी सुसंगत नाही. प्रांतांचे समूह करण्यामागील हेतू सर्वज्ञात आहे आणि योजनेचे हे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे आणि त्यात दोन्ही पक्षांच्या सहमतीनेच बदल करता येऊ शकेल”.

४. काँग्रेसने स्पष्ट केले आहे की काँग्रेसचा हेतू प्रांतानी समूहात प्रवेश करण्याला विरोध करण्याचा नाही. परंतु प्रांतांना बळजबरीचे एखाद्या समूहात टाकण्याला आणि समूहातील एखाद्या प्रांताने जर अशी घटना तयार केली की जी दुसऱ्या प्रांताला मान्य नसेल आणि तरीही ती मान्य करण्याकरिता प्रांताला भाग पाडले जात असेल तर त्याला काँग्रेसचा विरोध आहे. यामुळे मताधिकार, मतदारसंघ इत्यादीसंबंधी निवडणुकांकरिता असे नियम तयार केले जाऊ शकतात की ज्यामुळे प्रांतांना समूहातून बाहेर पडण्याचा जो अधिकार आहे त्या तरतुदीवर गंभीर परिणाम होऊ शकतो वा त्या तरतुदींचा लाभ निरस्त केला जाऊ शकतो. कॅबिनेट मिशनचा हा हेतू कधीही असू शकत नाही हे आम्ही निदर्शनास आणून दिले आहे. घटना निर्माण करण्यासंबंधात कोणतीही बळजबरी करण्यात येऊ नये आणि स्वतंत्र हिंदुस्थानची घटना सर्व पक्षाच्या सहकार्याने तयार करण्यात आली पाहिजे हा आमचा नेहमीच दृष्टीकोन राहिला आहे.

५. लॉर्ड वेव्हेल यांनी काँग्रेसचे अध्यक्ष मैलाना आझाद यांना जून १३, १९४६ला पाठवलेल्या पत्रात लिहिले आहे की "प्रतिनिधी मंडळाला आणि मला समूहनिर्मितीबद्दलच्या तत्त्वांवरील तुमच्या आक्षेपांची जाणीव आहे. तसे असले तरी मी तुमच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की मे १६चे वक्तव्य समूहाची सक्ती करत नाही. तो निर्णय प्रांतातून निवडून आलेले प्रतिनिधी एकत्रित बसल्यानंतर त्यांच्यावर सोडण्याता आला आहे. काही प्रांतांच्या प्रतिनिधींनी समूहात बसून गट बनवायचा की नाही हा निर्णय घ्यावा केवळ इतकीच तरतूद वक्तव्यात करण्यात आली आहे". अशा प्रकारे ज्या तत्त्वावर परत भर देण्यात आला आहे ते तत्त्व समूहाची सक्ती नाही आणि वर्गासंबंधी एक निश्चित कार्यपद्धती सांगण्यात आली आहे. ही कार्यप्रणाली स्पष्ट नव्हती आणि याचा अर्थ एकाहून अधिक प्रकारे लावला जाऊ शकत होता. आणि ते काहीही असले तरी कार्यप्रणालीचा कोणताही मुद्दा मूलभूत सिद्धांतावर मात करू शकत नाही. आम्ही त्यांच्या निदर्शनास आणून दिले की योग्य अर्थ तोच असू शकतो जो मूलभूत तत्त्वाचे हनन करत नाही. याशिवाय प्रस्तावित योजनेत काम करणाऱ्या सर्व संबंधितातील सहकार्याचा मार्ग सोपा करण्याच्या दृष्टीने आम्ही सुचवले की आम्ही लावलेला अर्थ जर स्वीकारला जाणार नसेल तर या मुद्द्यावर संघ न्यायालयाने लावलेला अर्थ स्वीकारण्याला आमची सहमती असेल.

६. सर्वांना माहीत आहे की समूहात (ग्रुपिंग) सामील होण्यासंबंधीच्या प्रस्तावामुळे आसाम, वायव्य सरहद्द प्रांत आणि त्याचबरोबर पंजाबमधील शीख यांच्यावर विशेषेकरून हानिकारक परिणाम होईल. त्यांच्या प्रतिनिधींनी या प्रस्तावाला प्रखर विरोध केला आहे. मास्टर तारासिंग यांनी हिंदुस्तानमंत्र्यांना मे २५, १८४६ला

लिहिलेल्या पत्रात यासंबंधात शिखांना वाटणारी चिंता आणि शंका व्यक्त करून काही बाबतीत स्पष्टीकरण मागितले आहे. हिंदुस्तानमंत्र्यांनी या पत्राचे जून १, १९४६ला उत्तर पाठवले आहे. त्या पत्रात ते म्हणतात, "यासंबंधात तुम्ही तुमच्या पत्रातून उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांचा मी सविस्तर विचार केला आहे. वक्तव्यात अजून काही भर घालता येणार नाही वा त्याचा काही वेगळा अर्थ मिशन लावू शकणार नाही अशी मला भीती वाटते."

७. या स्पष्ट वक्तव्यानंतरही ब्रिटिश सरकारने डिसेंबर ६ला असे एक वक्तव्य जारी केले आहे की जे मूळ वक्तव्यात भरही घालते आणि आणि मे १६, १९४६च्या वक्तव्याचा अर्थही लावते. त्यांनी असे साडेसहा महिन्याहून अधिक कालावधी लोटल्यानंतर केले आहे. मध्यंतरीच्या काळात मूळ वक्तव्याच्या परिणामामुळे अनेक घटना घडल्या आहेत. या संपूर्ण काळात ब्रिटिश सरकार वा त्यांच्या प्रतिनिधींसमोर काँग्रेस आपली भूमिका वारंवार स्पष्ट करत राहिली आहे आणि या भूमिकेची पूर्ण कल्पना असल्यानंतरच ब्रिटिश सरकारने कार्यवाही केली आहे. ही गोष्ट मे १६, १९४६च्या वक्तव्यात सांगितलेल्या मूलभूत सिद्धांताशी सुसंगत आहे आणि काँग्रेसने त्या वक्तव्याचा पूर्णपणे स्वीकार केला आहे. याशिवाय आवश्यकता निर्माण झाली तर या वक्तव्याच्या अर्थाबद्दलचा मुद्दा संघ न्यायालयासमोर नेण्याचा व त्याने दिलेला अर्थ सर्व संबंधित पक्षांनी स्वीकारावा अशी भूमिकाही कॉंग्रसेने घेतली आहे.

८. गेल्या नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस आपले प्रतिनिधी लंडनला पाठवण्याकरिता ब्रिटिश सरकारतर्फे जेव्हा काँग्रेसला आमंत्रण मिळाले तेव्हा काँग्रेसने परत आपली ही भूमिका स्पष्ट केली. ग्रेट ब्रिटनच्या प्रधानमंत्र्यांनी काही निश्चित आश्वासन दिल्यानंतरच काँग्रेसचे प्रतिनिधी लंडनला गेले होते.

९. मे १६, १९४६च्या वक्तव्यात ना तर कोणतेही परिवर्तन केले जाईल ना त्याचा कोणताही नवीन अर्थ लावला जाईल असे या विषयासंबंधी आधी दिलेल्या आश्वासनानंतरही ब्रिटिश सरकारने आता परत एक वक्तव्य जारी केले आहे. ज्या मूळ वक्तव्याच्या आधारावर इतकी प्रगती करण्यात आली होती त्या वक्तव्याच्या परीघाबाहेर स्पष्टपणे हे वक्तव्य आहे.

१०. स्वतःच दिलेल्या आश्वासनाशी अनुरूप नसलेली ही कार्यवाही ब्रिटिश सरकारने केली याचा कार्यकारिणीला अतिशय खेद होतो आणि यामुळे हिंदुस्तानच्या अनेक लोकांच्या मनात ब्रिटिश सरकारच्या हेतूबद्दल संशय निर्माण झाला आहे. काही काळापासून ब्रिटिश सरकारची आणि हिंदुस्थानातील त्यांच्या प्रतिनिधीची वृत्ती अशी राहिली आहे की ज्यामुळे देशासमोरील अडचणी आणि समस्या वाढत जातील.

घटनासमितीची बैठक होण्याच्या पूर्वसायंकाळी हा जो हस्तक्षेप करण्यात आला आहे आणि ज्या पद्धतीने तो करण्यात आला आहे त्यावरून असे दिसते की काँग्रेस ज्या देशात शांततापूर्वक सत्तेचे हस्तातंतरण व्हावे म्हणून काम करत होती ते होण्याची शक्यता क्षीण झाली आहे. यामुळे एक अशी नवीन परिस्थिती निर्माण झाली आहे की ज्यामुळे भविष्यात संकट निर्माण होऊ शकते. यामुळेच कार्यकारिणी चिंतित आहे आणि तिने यावर बराच विचार केला. ब्रिटिश संसदेत अनेक असे भाषण देण्यात आले आहेत की जे खोटे वक्तव्य आणि निष्कर्ष यांनी भरलेले आहेत आणि ते ब्रिटिश साम्राज्यवादाच्या निरंकुश आणि आक्रमक परंपरांच्या प्रतिनिधित्वाच्या भावना आणि विषय यांच्याशी जुळणारे आहे. आजचा हिंदुस्थान कोणत्याही विदेशीचा असा दृष्टिकोन सहन करू शकत नाही आणि विदेशी हस्तक्षेपावर त्याचा आक्षेप आहे.

११. ते काहीही असले तरी काँग्रेस अशा प्रकारचे उत्तेजक उद्गार आणि बाह्य हस्तक्षेप यांमुळे आपल्या मार्गावरून विचलित होऊ शकत नाही. तिला घटनासमितीच्या माध्यमातून स्वतंत्र आणि आत्मनिर्भर हिंदुस्थानची अशी घटना तयार करायची आहे की ज्यात हिंदुस्थानातील सर्व घटक आनंदाने सहभागी होतील. घटनासमितीच्या उद्घाटनपर सत्रात मुस्लिम लीगच्या सदस्यांनी भाग घेतला नाही याचे कार्यकारिणीला दुःख होते. असे असले तरी हिंदुस्थानमधील इतर सर्व हितसंबंधांचे आणि वर्गांचे प्रतिनिधी घटनासमितीच्या सत्रात उपस्थित राहिले याबद्दल ही समिती समाधान व्यक्त करते आणि आभार मानते आणि या सामूहिक कार्यात सहकार्याच्या भावनेने सभा सुरू असताना केलेल्या कार्याबद्दल आनंद व्यक्त करते. घटनासमिती हिंदुस्थानातील सर्व लोकांचे प्रतिनिधित्व करू शकावी म्हणून ही समिती आपले प्रयत्न सुरू ठेवील आणि मुस्लिम लीगचे सदस्य या महान कामात सहकार्य देतील अशी अपेक्षा व्यक्त करते. ही गोष्ट साध्य करण्याकरिता विवादास्पद प्रश्नांचा विचार पुढील सत्रापर्यंत पुढे ढकलावा असा सल्ला समितीने घटनासमितीतील काँग्रेसच्या प्रतिनिधींना दिला आहे.

१२. आपल्या डिसेंबर ६, १९४६च्या वक्तव्यात कामकाजाच्या प्रक्रियेच्या एका संदिग्ध मुद्द्याची व्याख्या करत असताना ब्रिटिश सरकारने त्याचा उल्लेख “मूलभूत मुद्दा” असा केला आहे, आणि तो संघ न्यायालयासमोर ठेवावा असे सुचवले आहे. ब्रिटिश सरकारतर्फे यानंतरही देण्यात आलेल्या वक्तव्यांवरून स्पष्ट होते की न्यायालयाचा निर्णय जर त्यांनी लावलेल्या अर्थाच्या विरोधात गेला तर ते हा निर्णय मान्य करणार नाहीत. संघ न्यायालयाचा निर्णय आमच्यावर बंधनकारक नसेल असे मुस्लीम लीगतर्फेसुद्धा सांगण्यात आले आहे. उलटपक्षी अशा प्रकारचे मुद्दे संघ न्यायालयासमोर ठेवून त्याने दिलेला निर्णय मान्य

करण्याकरिता काँग्रेसची नेहमीच तयारी होती, आता दुसरा कोणताही पक्ष अशा प्रकारे विवादास्पद मुद्दे संघ न्यायासमोर ठेवण्याकरिता तयार नसताना आणि त्याने दिलेला निर्णय बंधनकारक आहे असे मान्य करण्याकरिता तयार नसल्यामुळे हा मुद्दा न्यायालयात नेणे पूर्णपणे अनावश्यक आणि निरुपयोगी झाले आहे व असे करणे संघ न्यायालयाच्या वा काँग्रेसच्या प्रतिष्ठेकरिता योग्य होणार नाही. वारंवार वक्तव्य देऊन ब्रिटिश मुत्सद्द्यांनी ही गोष्ट नाकारली आहे.

१३. कार्यकारिणीचे अजूनही मत आहे की समूहातील (सेक्शन) मतदानपद्धतीबद्दल ब्रिटिश सरकारने जो अर्थ लावला आहे तो प्रांतांच्या स्वायत्ततेशी, प्रस्तावित घटनेचा मूलभूत आधार आहे, सुसंगत नाही. असे असूनही घटनासमितीच्या सफल संचालनात अडचण आणणारी कोणतीही गोष्ट टाळण्याकरिता समिती उत्सुक आहे. हे साध्य करण्याकरिता समिती जास्तीत जास्त सहकार्य मिळवण्याचा प्रयत्न करील, इतकेच की तसे करताना कोणत्याही मूलभूत सिद्धांताचे उल्लंघन व्हायला नको. यामुळे घटनासमितीतील काँग्रेसच्या प्रतिनिधींना आम्ही सल्ला देतो की त्यांनी सुचवण्यात आलेल्या मतदान पद्धतीचा स्वीकार करावा. परंतु कोणत्याही प्रांतावर दडपण आणण्याच्या कामात आम्ही सहभागी होऊ शकत नाही, तसेच शिखांवर जर समूहातील एखादा बहुसंख्य वर्ग अन्याय करणार असेल तर आम्ही तो मान्य करू शकत नाही. संबंधित प्रांताच्या बहुसंख्य प्रतिनिधींच्या इच्छेविरुद्ध प्रांतिक घटनेची मूलभूत घडण जसे मताधिकार, मतदार संघ इत्यादी लादण्याच्या प्रयत्नाचा विशेषेकरून विरोध केला जाईल. या गोष्टी जर लादण्यात आल्या तर प्रांतांना घटनासमितीत सामील होण्याचा वा न होण्याचा जो अधिकार देण्यात आला आहे तो निरर्थक होऊन जाईल.

१४. कार्यकारिणीला अंतःकरणापासून वाटते की ज्या लोकांनी आतापर्यंत घटनासमितीत सहकार्य देण्याला नकार दिलेला आहे त्यांच्याकडून योग्य प्रतिसाद मिळून घटनासमितीच्या कामात सहकार्य मिळवण्याच्या तिच्या प्रयत्नात तिला यश मिळेल आणि सुरू करण्यात आलेले हे महान कार्य त्वरेने पुढे जाईल व त्याची परिणती हिंदुस्थानातील प्रत्येक स्त्री-पुरुषाला न्याय देणारी व त्याला स्वातंत्र्य आणि संधी देणारी घटना तयार होण्यात होईल. ते काहीही असले तरी घटनासमितीचे काम तिचे उद्दिष्ट प्राप्त होईपर्यंत सुरू राहिलेच पाहिजे आणि तिच्या प्रयत्नाने स्वतंत्र, लोकशाहीवादी, प्रभुत्वसंपन्न गणराज्याचा उदय झाला पाहिजे.

अखिल भारतीय काँग्रेस कमेटी फाईल क्रमांक १४९९, १९४६-४७. सौजन्य नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय

---------------

# ४५८. अखिल भारतीय कॉंग्रेस कार्यकारिणीचा ठराव

(पाहा "भेटायला आलेल्या मुसलमानाला मुलाखत", जानेवारी १२, १९४७ आणि "प्रार्थना प्रवचन", जानेवारी १६, १९४७. हा ठराव जवाहरसाल नेहरूंनी मांडला होता आणि चार दिवसांच्या चर्चेनंतर तो मंजूर झाला होता.)

मागील नोव्हेंबरमध्ये मेरठ येथील कॉंग्रेसच्या अधिवेशनानंतर देशात घडलेल्या घटना, ब्रिटिश सरकारने डिसेंबर ६, १९४६ला प्रसृत् केलेले वक्तव्य आणि कॉंग्रेस कार्यकारिणीने डिसेंबर २२, १९४६ला जारी केलेले वक्तव्य या सर्वांचा विचार केल्यानंतर अखिल हिंदुस्थान कॉंग्रेस कमेटी कॉंग्रेसच्या लोकांना खाली दिलेला संदेश देत आहे -

अखिल भारतीय कॉंग्रेस कमेटी कार्यकारिणीच्या डिसेंबर २२, १९४६च्या वक्तव्याचे समर्थन करते व त्यात व्यक्त केलेल्या दृष्टिकोनाशी ती सहमत आहे.

विवादग्रस्त प्रश्न संघीय न्यायालयाकडे नेण्याकरिता कॉंग्रेसची जरी नेहमीच सहमती असते तरी ब्रिटिश सरकारतर्फे इतक्यात करण्यात आलेल्या घोषणांमुळे तसे करणे निरर्थक आणि अवांछनीय झाले आहे. आम्ही न्यायालयाचा निर्णय मान्य करू अशी संबंधित पक्षात सहमती होत असेल तरच ही बाब न्यायालयाकडे पाठवता येऊ शकते.

अखिल भारतीय कॉंग्रेस कमेटीचे ठाम मत आहे की स्वतंत्र आणि स्वावलंबी हिंदुस्थानची घटना शक्य तितक्या व्यापक बहुमताने हिंदुस्थानच्या जनतेनेच तयार केली पाहिजे. बाह्य सत्तेद्वारा यात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप नसावा आणि घटना तयार करताना एका प्रांताचे वा एखाद्या प्रांताच्या भागाचे दुसऱ्या प्रांतावर वा भागावर कोणत्याही प्रकारचे दडपण नसले पाहिजे. ब्रिटिश कॅबिनेट मिशनच्या मे १६, १९४६च्या योजनेमुळे आणि विशेषतः डिसेंबर ६, १९४६च्या वक्तव्यात त्या वक्तव्याची जी व्याख्या करण्यात आली आहे त्यामुळे काही प्रांत, विशेषतः आसाम आणि वायव्य सरहद्द प्रांत, बलुचिस्तान आणि पंजाबचे शीख यांच्यासमोर ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्यांची अखिल भारतीय कॉंग्रेस कमेटीला जाणीव आहे.

घटनासमितीने सर्व संबंधित पक्षांच्या सद्भावनेने स्वतंत्र हिंदुस्थानची घटना तयार करण्याचे काम सुरू केलेले आहे हे पाहण्याकरिता अखिल भारतीय कॉंग्रेस कमेटी उत्सुक आहे आणि वेगवेगळ्या अर्थांमुळे ज्या अडचणी निर्माण होत आहेत त्या दूर करण्याच्या उद्देशाने समूहात (सेक्शन) जी कार्यप्रणाली अवलंबिण्यात आली आहे तिच्याशी संबंधित कलमांचा ब्रिटिश सरकारने लावलेल्या अर्थानुसार कार्यवाही करावी असा

सल्ला देण्याकरिता काँग्रेसची ही समिती सहमत आहे. परंतु कोणत्याही प्रांतावर आणि पंजाबमधील शिखांवर कोणत्याही प्रकारचे दडपण येणार नाही ही गोष्ट स्पष्टपणे लक्षात ठेवली पाहिजे. (या वाक्याच्या ठिकाणी आणि यानंतरच्या दोन वाक्यांच्या ठिकाणी, "गांधीजींच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेल्या मसुद्यात": "५. याचा परिणाम असा होऊ शकतो की एखादा प्रांत वा प्रांतांचा समूह सुरुवातीलाच घटनासमितीतून बाहेर राहण्याचा निर्णय घेऊ शकतो. जे लोक घटनासमितीत वा वर्गात भाग घेतील ते कॅबिनेट मिशनच्या वक्तव्यानुसार घटना तयार करतील, आणि ती घटना केवळ त्यांच्यावरच बंधनकारक राहील. ६. घटना संपूर्ण हिंदुस्थानकरिता तयार केली पाहिजे आणि ज्यांनी घटनासमितीत भाग घेतला नसेल त्यांनाही या घटनेचा लाभ घेता येण्याची तरतूद घटनेत करण्यात आलेली असली पाहिजे." [सरदार पटेल्स कॉरस्पॉन्डन्स, "इंडियन्स इन लेडीस्मिथ"]) असे कोणतेही दडपण आणण्याचा जर प्रयत्न केला गेला तर प्रांताला वा प्रांताच्या भागाला आपल्या जनतेच्या इच्छेची परिपूर्ती करण्याकरिता जी कोणती कृती करणे आवश्यक वाटेल ती करण्याचा अधिकार असेल. पुढे कोणती कृती करायची हे पुढे काय घडते यावर अवलंबून राहील आणि यामुळे प्रांतांच्या स्वायत्ततेचा मूलभूत सिद्धांत लक्षात ठेवून त्यांना सल्ला द्यावा असा आदेश अखिल भारतीय काँग्रेस कमेटी कार्यकारिणीला देते.

'द इंडियन ऍन्युअल रजिस्टर', १९४७, खंड १, पृष्ठ ११४-५

-------------

# ४५९. सतीश चंद्र मुखर्जी यांचे पत्र

(पाहा "सतीश चंद्र मुखर्जी यांना पत्र", फेब्रुवारी १, १९४७)

जानेवारी १४, १९४७

साधकाचा रामनामाचा जप केवळ जाणीवपूर्वक कृतीचा वा इच्छेचा विषय न राहता स्वयंस्फूर्त आंतरिक प्रक्रिया, अंतःकरणातून बाहेर पडणारी सचेतन वा अचेतन रूपातील प्रक्रिया होत असेल तर माणसाला आपले आयुष्य अनिश्चित सीमेपर्यंत वाढवता येऊ शकते. माझ्या मते हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा ईश्वराच्या नावाचा जप माणसाच्या श्वासोच्छ्वासाच्या क्रियेशी जुळतो व त्याचाच भाग होऊन जातो.

यामुळे माझा दुसरा मुद्दा हा आहे की ईश्वराचे नाव म्हणजे रामनाम साधकाने काढलेला केवळ बाह्य ध्वनी राहत नाही तर आध्यात्मिक वा दैवी शक्तीचेच ते एक रूप होऊन जाते.

माझा तिसरा मुद्दा हा आहे की जेव्हा रामनामाचा जप साधकाच्या श्वासोच्छ्वास प्रक्रियेशी अविभाज्य पद्धतीने निगडित होऊन जातो तेव्हा त्याचा प्रभाव मानसिक संसाधनासह साधकाच्या संपूर्ण बाह्य तंत्रावर, ज्याला धर्मग्रंथांमध्ये लिंगशरीर वा सूक्ष्म शरीर म्हणतात, पडतो.

माझा चौथा मुद्दा हा आहे की चित् वा आध्यात्मिक दैवी शक्ती अशा प्रकारची प्रतिक्रिया जेव्हा करते तेव्हा संपूर्ण तंत्र - स्थूल वा सुक्ष्म शरीर - रामनामातून उत्पन्न वा निष्पन्न झालेल्या आध्यात्मिक शक्तीत सामावून जाते. यामुळे जेव्हा असे होते तेव्हा वर्तमानात आपल्याकरिता जे भौतिक (मग ते स्थूल प्रकारचे असो वा सूक्ष्म प्रकारचे) असते ते आध्यात्मिक शक्तीकडून (जी रामनामाचे सार आहे) अशी शक्ती मिळवते की पदार्थासंबंधीचे नियम, जे विघटन आणि ऱ्हासाच्या स्वरूपात अभिव्यक्त होत असतात, काही काळाकरिता स्थगित होतात. अशा प्रकारच्या स्थगितीमुळे साधक एका तटस्थ स्थितीत टिकून राहू शकतो. शक्तीमुळे पदार्थाच्या विघटन वा ऱ्हास या प्रक्रिया होत असतात. परंतु साधकावर शक्तीचा कोणताही प्रभाव पडत नसल्यामुळे त्याच्यावर या प्रक्रिया होत नाहीत.

शेवटचा आणि पाचवा मुद्दा असा की या अवस्थेत स्थितप्रज्ञता, तुम्ही उपयोजिलेला शब्द, असते परंतु तिला मानसिक म्हणता येत नाही, म्हणजे मानसिक नियंत्रणातून ती निर्माण होत नाही. ती साधकाच्या आत्मिक जीवनातून निर्माण होते. यामुळे तिचा जन्म त्यातून झाला असे म्हणता येऊ शकते. अशा अवस्थेत चर्चाधीन स्थितप्रज्ञा तटस्थ, गहन आणि स्वयंस्फूर्त असते.

वरील मुद्दा असे म्हणून अजून स्पष्ट करता येईल की रामनामाच्या जपाच्या प्रक्रियेतून जी स्थितप्रज्ञा प्रत्येक श्वास आणि उच्छ्वासाबरोबर निर्माण होते, तीचे स्वरूप त्या स्थितप्रज्ञेपेक्षा किती तरी श्रेष्ठ असते ज्याची या वेळी कल्पनाही करता येऊ शकत नाही. आधीच सांगितलेले असल्याप्रमाणे याचे कारण तशा प्रकारची स्थितप्रज्ञ वृत्ती मानसिक शक्तीने निर्माण होत नाही तर आत्मिक वा आध्यात्मिक जीवनाचे ते साधन असते. अशा प्रकारच्या उच्च श्रेणीच्या स्थितप्रज्ञेला शास्त्रांनी शांतता म्हणून संबोधले आहे. या शक्तीच्या उच्चतर श्रेणींना गीतेत पराशांती (४.३९) आणि नैष्ठिक शांती (५.१२) संबोधण्यात आले आहे.

'नंगाबाबा सतीश चंद्र मुखर्जी और गांधीजी', पृष्ठ ८२-८६

--------------

# ४६०. समूहीकरणासंबंधी ब्रिटिश मंत्रिमंडळाचे वक्तव्य

(पाहा "डायरीमधील उतारे", डिसेंबर २, १९४६ आणि "भेटायला आलेल्या मुसलमानांना मुलाखत", जानेवारी १२, १९४७)

डिसेंबर ६, १९४६

पंडित नेहरू, जिना, लियाकत अली खान आणि सरदार बलदेव सिंग यांच्याबरोबर महामहीम यांनी केलेली चर्चा आज सायंकाळी संपली. पंडित नेहरू आणि सरदार बलदेव सिंग उद्या हिंदुस्थानात परतत आहेत.

चर्चेचा उद्देश घटनासमितीत सर्वांना सामील करणे आणि त्यांचे सहकार्य मिळवणे हा होता. अंतिम निर्णय घेण्याकरिता आपल्या सहकाऱ्यांशी विचारविनिमय करण्याची आवश्यकता असल्यामुळे अंतिम तडजोड होण्याची शक्यता अपेक्षित नाही.

कॅबिनेट मिशनच्या १६ मेच्या वक्तव्यातील (पाहा "कॅबिनेट प्रतिनिधीमंडळ आणि व्हाईसराय यांचे वक्तव्य", मे १६, १९४६) परिच्छेद १९(५) आणि ७ चा अर्थ लावण्यासंबंधी मुख्य अडचण निर्माण झाली आहे. समूहातील घटकांनी (सेक्शन) सभेत सामील होण्यासंबंधीच्या वक्तव्यातील ते परिच्छेद असे आहेत :

परिच्छेद १९ (५) : हे समूह त्या त्या समूहातील प्रांतांकरिता घटना तयार करतील आणि त्या समूहातील गटाकरिता एखादी घटना तयार केली जाऊ शकते काय हेही पाहतील आणि जर तशी घटना तयार करता येऊ शकत असेल तर प्रांतातील कोणकोणत्या विषयांचा त्यात अंतर्भाव करता येऊ शकेल याचा विचार करणे. खालील उपकलम (८) प्रमाणे प्रांतांना गटाबाहेर (ग्रुप) पडण्याचा अधिकार असेल :

कलम १९ (८) : नवीन घटनेची व्यवस्था अस्तित्वात आल्याबरोबर प्रांतांला ज्या समूहात ठेवण्यात आलेले असेल त्या समूहाबाहेर पडण्याचा अधिकार. नवीन घटना तयार होऊन पहिल्या निवडणुका झाल्यानंतर असा निर्णय प्रांतातील विधानसभा घेईल.

कॅबिनेट मिशनचे सुरुवातीपासून मत राहिले आहे की वेगळ्या प्रकारची कोणतीही तडजोड झाली नाही तर समूहातील निर्णय समूहातील उपस्थित सदस्यांच्या साध्या बहुमताने घेतला जावा. मुस्लिम लीगने हे मत मान्य केले आहे परंतु काँग्रेसचे वेगळे मत राहिले आहे. तिचे असे दृढ मत आहे की संपूर्ण वक्तव्य वाचल्यानंतर प्रांतांना गटात सामील होण्याचा आणि आपली स्वतःची घटना तयार करण्याचा असे दोन्ही अधिकार आहेत.

सम्राटांच्या सरकारने कायदेशीर सल्ला घेतला आहे. त्यावरून असेच सिद्ध होते की १६ मेच्या वक्तव्याचा तोच अर्थ आहे जो कॅबिनेट मिशन नेहमीच लावत आले आहे. वक्तव्याच्या या भागाचा जो अर्थ लावण्यात आला आहे त्याच स्वरूपात हिंदुस्थानच्या जनतेकरिता घटना तयार करण्याच्या उद्देशाने १९मेच्या योजनेचा एक आवश्यक भाग समजायला पाहिजे आणि जी सम्राटांचे सरकार संसदेत सादर करण्याकरिता तयार असेल. यामुळे घटनासमितीतील सर्व पक्षांनी तिला मंजुरी दिली पाहिजे.

सम्राटांच्या सरकारने कायदेशीर सल्ला घेतला आहे आणि १६ मेच्या वक्तव्याचा तोच अर्थ आहे जो कॅबिनेट मिशनने लावला होता. वक्तव्याच्या या भागाचा जो अर्थ लावण्यात आला आहे त्याच स्वरूपात हिंदुस्थानच्या जनतेकरिता घटना तयार करण्याच्या उद्दिष्टाने १९ मेच्या योजनेचा तो आवश्यक भाग आहे असे समजले पाहिजे. आणि त्यानुसार हिंदुस्थानची जनता जी घटना तयार करील ती सम्राटांचे सरकार संसदेसमोर सादर करण्याकरिता तयार आहे. यामुळे त्या घटनेला घटनासमितीतील सर्व पक्षांची मान्यता मिळाली पाहिजे.

तसे पाहता स्पष्ट आहे की १६ मेच्या वक्तव्याच्या अर्थासंबंधी इतर प्रश्न उपस्थित होऊ शकतात आणि सम्राटांच्या सरकारला आशा आहे की मुस्लिम लीगची परिषद घटनासमितीत सामील होण्याकरिता तयार होत असेल तर काँग्रेसप्रमाणेच मुस्लिम लीगसुद्धा सहमत होईल की दोनपैकी कोणत्याही पक्षांतर्फे संघीय न्यायालयाकडे अर्थासंबंधी जे कोणते प्रकरण दिले जाईल त्याचा जो कोणता निर्णय संघीय न्यायालय लावील तो दोन्ही पक्ष मान्य करतील म्हणजे केंद्रीय विधान सभा आणि समूहात जी काही कार्यपद्धती अवलंबिली जाईल ती कॅबिनेट मिशनच्या योजनेनुसार असेल.

सध्याच्या वादग्रस्त विषयासंबंधी सम्राटाच्या सरकारने काँग्रेसला आग्रह केला की तिने कॉबिनेट मिशनचा दृष्टिकोन मान्य करावा म्हणजे मुस्लिम लीग आपल्या दृष्टिकोनासंबंधी पुनर्विचार करू शकेल. कॅबिनेट मिशनच्या या हेतूची परत पुष्टी झाल्यानंतरही जर घटनासमिती असे समजत असेल की या मुद्द्यावर संघीय न्यायालयाचा निर्णय घेणे आवश्यक आहे तर तो निर्णय लवकरात लवकर घेऊन टाकायला पाहिजे. अशा परिस्थितीत संघीय न्यायालयाचा निर्णय मिळेपर्यंत घटनासमितीच्या समूहांची सभा स्थगित ठेवणेच उचित होईल.

परस्परांच्या सहमतीवर आधारित कार्यपद्धतीशिवाय घटनासमिती यशस्वी होण्याची आशा कधीही नसेल. जर एखाद्या घटनासमितीने, जिच्यात अधिकांश हिंदुस्थानी लोकांचे प्रतिनिधीत्व नसेल तर मग दुसरी

कोणती तरी घटना जरी तयार करण्यात आली तरी सम्राटांचे सरकार ती घटना देशातील अनिच्छुक जनतेच्या माथी मारण्याचा विचार करू शकणार नाही, करणारही नाही.

'ट्रान्सफर ऑफ पॉवर', खंड ९, पृष्ठ २९५-६

----------------

# महात्मा गांधी संकलित साहित्य खंड १४ मधील काही विषय

## ४६१. काँग्रेस कार्यकर्त्यांना सल्ला

(देवीपूर येथे गांधीजींच्या भव्य स्वागताचे आयोजन करण्यात आले होते. खेड्याला झेंडे, पताका, सुताचे हार इत्यादींनी सजवण्यात आले होते. गांधीजींना ते आवडले नाही. त्यांचे साप्ताहिक मौन संपताच त्यांनी मुख्य कार्यकर्त्यांना बोलावले.)

देवीपूर,

फेब्रुवारी १७, १९४७

अशा प्रकारे व्यर्थ देखावा करून तुम्ही सांप्रदायिक भावना उद्दिपित कराल याची तुम्ही विचार आहे काय? माझ्याकरिता या देखाव्याला काहीही अर्थ नाही.... (स्रोतात इथे वगळलेले आहे.) परंतु यामुळे दुर्भावनेचा असा वारसा मागे सोडला जाईल की जो या गावातील सांप्रदायिक संबंध विषमय करत राहील. तुम्ही काँग्रेसचे लोक आहा. गिरणीच्या कापडाच्या पताका आणि फिती लावत असताना यामुळे मी दुखावला जाईन असा थोडासाही विचार तुम्ही केला नाही काय?

फुलांच्या हारांनी इतकी सजावट करण्याऐवजी तुम्ही जर मला सुताचा हार घातला असता तर मी इतका दुखावला गेलो नसतो. ते सजावटही करतात आणि त्यानंतर त्यांचे कापडही तयार करता येते. यामुळे काहीही वाया जात नाही. असे दिसते की या गावात भरपूर पैसा आहे. असे नसते तर तुमच्या मनात असा स्वागत समारोह करण्याचा विचार आलाच नसता. तुम्ही जर माझ्यावरील प्रेम व्यक्त करण्याकरिता असे केले असेल तर तुम्ही चूक केली आहे. यातून तुमचे प्रेम मुळीच दिसून पडत नाही. माझ्यावरील प्रेमामुळे मी म्हणेन तसे तुम्ही कराल तर तितके माझ्याकरिता पुरे असेल. तुमच्याच लोकांची अशी भयंकर कत्तल झालेली असताना फुलांवर अशा प्रकारे खर्च करण्याचा विचार तरी करू शकता हेच मला कळत नाही. (हा परिच्छेद एकलो जानो रेमधून अनुवाद करून घेतला आहे.)

आजच्या अनुभवाने मला खोलवर विचार करायला भाग पाडले आहे. माझे सहकारी जेव्हा मंत्री होतील तेव्हा हार वगैरेंकरिता ते असाच दुबळेपणा दाखवतील काय? माझ्या कार्यकर्त्यांमध्ये असामान्य गुण आहेत असा माझा दावा नाही. परंतु काँग्रेसने इतकी वर्षे ज्या तत्त्वांचा पुरस्कार केला त्यांना त्याचा विसर पडू नये इतकीच माझी किमान अपेक्षा आहे. परंतु आज मी जे पाहिले त्यानंतर मी मूर्खांच्या नंदनवनात तर जगत नाही

ना असे मला वाटायला लागले. असे वाटते की मी कुठे उभा आहे हे कळावे म्हणून देवाने मला खदखदा हलवून जागे केले आहे.

महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड २,पृष्ठ २३०; आणि एकलो जानो रे, पृष्ठ १४६

--------------------

# ४६२. प्रार्थना प्रवचन

("गांधीजीज वाकिंग टूर डायरी"मधून उद्धृत)

देवीपूर,

फेब्रुवारी १७, १९४७

गांधीजी म्हणाले की माझ्या नजरेत ज्या दोन गोष्टी आणून देण्यात आल्या त्या मी तुमच्या नजरेस आणून देऊ इच्छितो. पहिली गोष्ट ही की माझ्या तर्फे एक तक्रार पाठवण्यात आली होती. अधिकाऱ्यांनी चोकशी केल्यानंतर ती निराधार असल्याचे आढळून आले. ज्या वस्तू लुटल्या गेल्या म्हणून सांगण्यात आले होते त्यांतील बहुतांश वस्तू तिथेच सापडल्या जिथून त्या लुटल्या गेल्याचे सांगण्यात आले होते. ही गंभीर गोष्ट आहे. माझ्या लक्षात आलेले असे हे दुसरे प्रकरण आहे. काल माझ्याकडे काही मुसलमान मित्र आले होते आणि त्यांनी कबूल केले की गेल्या ऑक्टोबर महिन्यात मुसलमान नक्कीच वेड लागल्यासारखे वागले होते हे खरे परंतु त्यांनी इतके वाईट वर्तन केले नाही जितके बिहारमधील हिंदूंनी केले. परंतु तरीही नोआखालीचे हिंदू काही मुसलमानांच्या विरोधात सरकारकडे खोट्या तक्रारी करून मुसलमानांना अडचणीत आणून त्यांचा बदला घेऊ पाहत आहेत. ते म्हणाले की खऱ्या तक्रारींच्या तुलनेत खोट्या तक्रारी किती तरी जास्त आहेत. या दोघांना एकत्र आणण्याचा हा मार्ग नाही. मी त्यांना म्हणालो की खोट्या तक्रारी करणारांच्या विरोधात खटले भरले पाहिजे आणि ते सिद्ध झाल्यानंतर त्यांना कठोर शिक्षा केली पाहिजे. मी जर पोलीस अधीक्षक अथवा मंत्री असतो तर मी निश्चितच या लोकांविरुद्ध कारवाई केली असती व त्यांना शिक्षा केली असती. जोपर्यंत माझा संबंध आहे आपल्या देशाची सेवा करण्याची इच्छा ठेवणारा नागरिक म्हणून मी या बाबतीत तेव्हाच काही करू शकेन जेव्हा मला खोट्या तक्रारी करणारांचे नाव आणि पत्ते दिले जातील. आतापर्यंत तरी मला असे कोणतेही नाव मिळालेले नाही. माझ्याकडे पाठवण्यात आलेले हे एकच प्रकरण असे आहे की ज्यात तक्रार करणाराला आपल्या तक्रारीचा पुरावा देता आलेला नाही. सामान्यपणे मी म्हणेन की जे हिंदू खोट्या तक्रारी करत आहेत ते स्वतःचे, आपल्या हिंदू बांधवांचे आणि आपल्या देशाचे नुकसान करत आहेत.

अजून एका गोष्टीकडे मला तुम्हा लोकांचे लक्ष वेधायचे आहे. मला एका अशा जबाबदार व्यक्तीचे पत्र मिळालेले आहे की जी दोन्ही समाजात शांतता स्थापित करण्याचे काम करते आहे. त्यांनी लिहिले आहे की एका हिंदू मुलाचा काही मुसलमानांनी खूप छळ केला आहे आणि मी नोआखाली सोडून गेल्यानंतर म्हणा वा

मेल्यानंतर गेल्या ऑक्टोबर महिन्यापेक्षाही जास्त भयानक दिवस पाहावे लागणार असल्याची त्या मुसलमानांनी धमकी दिली आहे. हे खोटे असलेले मला आवडेल परंतु ते खरे असण्याची मला भीती वाटते. मला आशा आहे की हे विष काही थोड्याशा दुराचारी लोकांपर्यंतच पोहोचलेले असेल. ही गोष्ट काही थोड्याशा लोकांपर्यंतच सीमीत असो की व्यापक प्रमाणात पसरलेली प्रवत्ती असो ही गोष्ट ईस्लामविरोधी आहे असे म्हणण्याचे साहस मी करीन. फजलूल हक यांची क्षमा मागून परंतु संपूर्ण द्दढपणे मी हे म्हणतो आहे. इस्लाम म्हणा वा इतर कोणताही धर्म म्हणा ज्या बाहेरील टीकेमुळे अस्वस्थ होईल तो दिवस त्यांच्याकरिता दुर्दैवी आहे असे म्हणावे लागेल. मी स्वतःला इस्लामच्या बाहेरचा समजत नाही. इतर कोणत्याही धर्माप्रमाणेच मला इस्लामचा आदर आहे आणि यामुळे इस्लामबद्दल सहानुभूती आणि मैत्रीभाव असणारा मी टीकाकार आहे. माझ्या मते हा जो विषारी प्रचार सुरू आहे त्याविरुद्ध ठाम भूमिका घेणे प्रत्येक चांगल्या मुसलमानाचे कर्तव्य आहे.

हरिजन, मार्च १६, १९४७

----------------

## ४६३. एम. ए. अब्दुल्ला यांना पत्र

(पोलीस अधीक्षक एम. ए. अब्दुल्ला यांची मुर्शिदाबाद जिल्ह्यात बदली करण्यात आली होती. त्यांनी गांधीजींना फेब्रुवारी ११च्या पत्रात लिहिले : "... कलकत्त्यातील काही मुसलमानांनी मला सांगितले की मुख्यमंत्री माझ्यावर याकरिता नाराज आहेत की मुसलमानांवर पोलीस आणि सैन्य जो जुलूम करत होते तो थांबवण्याकरिता मी कोणतीही कारवाई केली नव्हती. ... . दुसऱ्या काही सूत्रांकडून कळते की माझ्या बदलीकरिता ब्रिटिश अधिकारी आणि माझ्यातील मतभेद कारणीभूत आहेत ... सरकार... वेगवेगळ्या पक्षांना वेगवेगळे कारण सांगत आहे.. . . जोपर्यंत माझी विवेकबुद्धा जागृत आहे ....मी फिकीर करत नाही.")

नोआखाली,

फेब्रुवारी १८, १९४७

आपल्यावर जेव्हा सर्व पक्ष नाराज असतात तेव्हा आपण आपले कर्तव्य केल्याचे ते चिन्ह असते. तुमच्याबद्दलही असेच असू शकेल.

महात्मा गांधी - अखेरचं पर्व खंड २

----------------

# ४६४. हरिसिंग गौर यांना पत्र

काझिरखिल,

पोस्ट रामगंज,

जिल्हा नोआखाली,

फेब्रुवारी १८, १९४७

प्रिय महोदय हरिसिंग गौर,

तुमचे ५ फेब्रुवारीचे पत्र आजच मिळाले. कृपाकरून मला कोणतेही जाहीर वक्तव्य देण्याकरिता म्हणू नका. तुम्ही उल्लेख केलेल्या इतक्या सगळ्या नामवंत लोकांचा पाठिंबा असल्यानंतर तुम्हाला अडचण जाऊ नये. ज्या गोष्टीला अंतर्गत मूल्य असते तिला उशिरा नाही तर लवकर यश मिळते. दोन बिंदूत सर्वात कमी लांब रेषा सरळ रेषा जशी असते तसेच हे आहे. तुम्हाला जर लीगचा पाठिंबा मिळाला तर तुमच्या प्रकल्पाचे काम सुलभ होईल. परंतु तुम्ही लिहेपर्यंत तुम्हाला कायदे आझम जिना यांच्याकडून पोचसुद्धा मिळालेली नव्हती. तुम्ही त्यांची मान्यता मिळवाल अशी आशा आहे.

तुमचा विश्वासू

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

---------------------

# ४६५. रुक्मिणी देवी अरुंडेल यांना पत्र

(प्रख्यात नर्तिका आणि इंग्रज प्रार्थना समाजी  जॉर्ज सिडनी अरुंडेल यांची पत्नी; संस्थापक कलाक्षेत्र, मद्रास)

काझिरखिल,

पोस्ट रामगंज,

जिल्हा नोआखाली,

फेब्रुवारी १८, १९४७

तुमचे ६ तारखेचे पत्र मला आज मिळाले. तुम्ही इथे यावे असे मला कितीही वाटत असले तरी इथे येणे किती त्रासदायक आहे याची तुम्हाला कल्पना नाही. तुम्ही विमानाने आला तर मात्र गोष्ट वेगळी. इतकेच नाही तर मी अशा भागात आहे की जिथे मोटर चालू शकेल असेसुद्धा रस्ते नाहीत. इथून सर्वात जवळचे विमानतळ कोमिला आहे पण तेसुद्धा किती तरी दूर आहे. नोआखालीतील ओझे वाहत असताना अजून कोणते ओझे शिरावर घेण्याची माझी इच्छा नाही. डॉ. अरुंडेलनी जो चांगला प्रकल्प सुरू केला आहे त्याची फलनिष्पत्ती झाली पाहिजे आणि त्यातही तो तुमच्या हातून पूर्ण व्हावा या तुमच्या मताशी मी पूर्णपणे सहमत आहे. विणा हातात घेतलेल्या आणि लोकांना सत्य आणि शांततेच्या मार्गाने नेत असलेले पाहताना मला निश्चितच आनंद होईल.

श्रीमती रुक्मिणी देवी

अध्यक्ष कलाक्षेत्र, अड्यार, मद्रास

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

------------

# ४६६. मणिभाई देसाई यांना पत्र

फेब्रुवारी १८, १९४७

चि. मणिलाल,

तुझे नोव्हेंबर १४, १९४६चे पत्र तीन की चार दिवसांपूर्वीच मिळाले. इथे इतका गोंधळ आहे. तू मला माझ्या काळज्यांमधून मुक्त केले आहे आणि त्यामुळे मला पूर्णपणे मोकळेपणा वाटत आहे. मला वाटते की तुझ्या सर्व प्रश्नांचे उत्तर मी तुला पाठवलेल्या मागील पत्रात दिले आहेत. जहांगीरजी आणि डॉ. दिनशा विश्वस्त संस्थेचे सदस्य असलेच पाहिजे कारण त्यांच्या मनात संस्थेबद्दल अतिशय निष्ठा आहे आणि मूळ विश्वस्त संस्थेचे ते सदस्यही होते. ते माझ्या दृष्टीकोनाशी पूर्णपणे सहमत नाहीत असा आक्षेप घेता येऊ शकतो. परंतु मला वाटते की त्याबद्दल काही करता येऊ शकत नाही. मला खात्री आहे की ते तिथे माझ्या इच्छेविरुद्ध काही करणार नाहीत वा आदेश देणार नाहीत. इतर ज्या व्यक्तींची विश्वस्त म्हणून निवड करायची आहे ते तिथेच राहणारे असले पाहिजे. मी गुलबाईचे नाव पसंत करतो. मगनभाईंबद्दलसुद्धा मी तुला लिहिलेले आहे.

तुला जर वाटत असेल की ४ वा ५ हजाराच्या दरम्यान विहीर खोदता येत असेल तर तो खर्च करण्यासारखा आहे. परंतु असे आश्वासन देण्याची कोणाची तयारी आहे काय हे आधी मला कळू दे. कोणी भागीदार शेतकरी ठेवण्याची माझी तयारी आहे परंतु बैल वा इतर आवश्यक साहित्य विकत घेण्याकरिता पैसे उधार देण्याची माझी तयारी नाही. आपण मालक नाही तर विश्वस्त आहो. विश्वस्त काही निश्चित उद्दिष्टांकरिताच नेमला जात असतो. आपला उद्देश निसर्गोपचार आहे. त्या उद्देशाच्या परिपूर्तीकरिता आपण असे खर्च करू शकत नाही. आपल्या स्वतःच्या श्रमाने आपल्याला जे काही करता येईल ते आपण करू शकतो. दोन्ही परिस्थितीत पाण्याची गरज पडणारच आहे. यामुळे ही योजना यशस्वी होईल असे कोणी आश्वासन देत असेल तर आपण खर्च करू. पिकाबद्दल बोलायचे तर आपल्या श्रमाने आपण जे पिकवू शकतो तेच पेरावे. आपण अन्नधान्य पिकवू शकत नाही. आपल्याला दूध लागेल म्हणून गाईची व्यवस्था आवश्यक आहे. त्याकरिता आवश्यक असलेला खर्च आपल्याला करावा लागेल. इमारत जर आणि जेव्हा तयार होईल तेव्हा आपल्याला काही सतरंज्या वगैरे विकत घ्याव्या लागतील. दातार स्वतः बांधकामाकडे पाहणार असतील तर ही समस्या सुटली म्हणून समज. आप्पासाहेबांनी पाठवलेल्या स्त्रीबद्दल काही गैरसमज झाले आहेत असे दिसते. परंतु ती एरव्ही चांगली असेल आणि मेहनत करण्याची तिची तयारी असेल तर ती खादी वापरत नाही

याकडे मी दुर्लक्ष करीन. हळूहळू खादी वापरण्याकरिता तू तिची समजूत घालू शकशील. तुझी इच्छा असेल तर मी आप्पासाहेबांना लिहिण्याकरिता तयार आहे. परंतु या बाबतीत काळजीपूर्वक विचार कर आणि मला सांग. तुझ्याकडून काही कळेपर्यंत मी वाट पाहीन. परशुरामबद्दल मी समजू शकतो. परशुराम मला सोडून गेला आहे. सध्या तो 'हरिजन'करिता काम करत आहे. सुशीला (डॉ.) सेवाग्रामच्या रुग्णालयाचे काम पाहण्याकरिता गेली आहे. सुशीला पै, अमतुस्सलाम, आभा, कनू आणि प्यारेलाल वेगवेगळ्या खेड्यांमध्ये काम करत आहेत आणि त्यांच्यापासून काही अंतरावर माझी छावणी आहे. यामुळे आमची वारंवार भेट होत नाही. माझ्या दौऱ्याचा नकाशा तिकडील वृत्तपत्रांमध्येही प्रकाशित झाला आहे. मला वाटते की तू वेळोवेळी तो पाहिला पाहिजे. मनू माझ्याबरोबर झोपते. ती माझी नात आहे कारण तिचे आजोबा हे माझ्या वडिलांचे मोठे भाऊ होते. यामुळे ती खरोखरच माझी नात आहे. अगदी लहान असताना ती सेवाग्रामला राहण्याकरिता आली होती. याबद्दल मी बाळकोबाला (बाळकृष्ण भावे, विनोबा भावे यांचे भाऊ.) लिहिले आहे. त्याला ती माहीत आहे. हे पत्र वाचल्यानंतर तुला याबद्दल काही भाष्य करायचे असेल तर तू मला लिहू शकतो. तू मला मोकळेपणाने लिहावे आणि तुला जे काही वाटते ते तू सांगावे असे मला वाटते.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७३१ : मणिलाल बी. देसाई

------------

# ४६७. बाळकृष्ण भावे यांना पत्र

फेब्रुवारी १८, १९४७

चि. बालकृष्ण,

तुझे नोव्हेंबर १४चे पत्र मला तीन दिवसांपार्वीच मिळाले. येथील डाकखात्याच्या व्यवस्थेतील गोंधळ हा असा आहे. त्याचबरोबर हेही खरे आहे की पत्रव्यवहाराच्या दृष्टीने मी जवळपास एकाकी ठिकाणी आहे. आता तुझ्या प्रकृतीत बरीचशी सुधारणा झाली आहे असे दिसते. तुला सही करण्यात काही अडचण येते काय? जर येत नसेल तर तुला मिळालेल्या देणगीचा उपयोग जनसेवेकरिता मोकळेपणाने केला पाहिजे. परंतु प्रकृतीची किंमत देऊन मुळीच नाही.

मणिभाईंना मी लिहिलेले पत्र तू पाहशील. तेथील समस्या बरीच क्लिष्ट झालेली आहे आणि ती सोडवण्यात तू महत्त्वाची भूमिका वठवू शकतो.

मनूबेन (जयसुखलालची) माझ्याबरोबर झोपत असते हे बहुधा तुला माहीत नसेल. यामुळे भाई किशोरीलाल, नरहरी, स्वामी आणि इतरांना दुःख झाले आहे आणि यामुळे त्यांनी 'हरिजन'शी संबंध तोडला आहे. सरदारसुद्धा माझ्यावर फार चिडलेले आहेत. मी माझ्याबरोबर मनूला झोपवतो हा मी माझा धर्म समजतो आणि माणसाकरिता जो धर्म असतो तो तो आपल्या स्नेही लोकांकरिता वा अजून कोणाच्या भीतीने सोडू शकत नाही हे दाखवून देण्याचा मी निर्धार केला आहे. हाच पाठ शिकवण्याकरिता मी इथे बसलो आहे. अशा कठीण प्रसंगी मी लाज, भीती वा प्रेम या कारणांनी मला जो धर्म वाटतो तो मी सोडून दिला तर हा यज्ञ अपूर्ण राहील व त्याचे कोणतेही फळ मिळणार नाही. या प्रकरणाची माझी ही बाजू आहे. किशोरीलालची बाजू मला कळू शकते त्याप्रमाणे ती उलट आहे. मी अधर्माला धर्म मानतो असे त्याला वाटते आणि असे केल्याने माझे ब्रह्मचर्य भंग पावले आहे आणि जनतेसमोर मी चुकीचा पाठ ठेवत आहे असे त्याला वाटते. माझ्यासारख्या माणसाने जनतेसमोर वाईट उदाहरण ठेवणे त्याला असह्य होते आणि यामुळे माझ्या या मित्रांनी माझ्याबरोबर असहकार सुरू केला आहे. त्यांना हवे ते पाऊल उचलण्याकरिता ते स्वतंत्र आहेत. विनोबा काय विचार करतो ते मला माहीत नाही. परंतु वर उल्लेखिलेल्या मित्रांनी त्याच्याबरोबर पत्रव्यवहार केला आहे आणि त्यामुळे मीसुद्धा त्याला पत्र लिहून त्याचे मत विचारले आहे. (पाहा "विनोबा भावे यांना पत्र", फेब्रुवारी १०, १९४७) एक तर माझ्या पत्राला विनोबांने दिलेल्या उत्तरावर तू विसंबून राहा वा स्वतंत्रपणे विचार करून तुला जे वाटते ते मला लिही.

या विषयाची चर्चा मी माझ्या तीन भाषणात केली आहे. त्यांच्या प्रती मी सोबत पाठवत आहे. त्या परत करण्याची आवश्यकता नाही. त्या तेथील मित्रांना दाखव. गोखलेंबद्दल बोलायचे तर मी त्यांना आधीच लिहिले आहे. त्यांनी उरुळी येथील प्रयोगात भाग घेतला नसेल असे मी गृहीत धरतो आणि यामुळे मी त्यांच्या नावाचा उल्लेख केला नाही. त्यांना टाळण्याचा माझा मुळीच हेतू नव्हता. परंतु हे केवळ तुझ्या चौकशीचे उत्तर म्हणून.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. सी, डब्ल्यू. ८२०. सौजन्य - बालकृष्ण भावे

-----------------

# ४६८. सरला यांना पत्र

फेब्रुवारी १८, १९४७

चि. सरला,

मला तुझे पत्र मिळाले. अक्षरे सुडौल आहेत आणि शब्दांमध्ये व्यवस्थित अंतर सोडले आहे. यामुळे हस्ताक्षर डोळ्यांना सुखद वाटते. असे असले तरी तुझे जोडाक्षर बरोबर नाहीत. तू 'ग्राम' हाशब्द चुकीचा लिहिला आहे.

तुला माझ्याजवळ यावेसे वाटते याचा मला आनंद होतो. परंतु मी दरदोज या गावातून त्या गावात हिंडत असताना समस्या निर्माण होणे अपिरहार्य आहे. खेड्यातून फिरत असताना अनेक गैरसोयी सहन कराव्या लागत असतात. लहानशी जागा, अतिशय घाणेरडे पाणी इत्यादी, इत्यादी. अशा परिस्थितीत तुला येण्याकरिता सांगण्याची माझ्यात हिंमत नाही. यामुळे तू थोडा धीर धर असे मी म्हणेन. ईश्वराची इच्छा असली तर तुला माझ्याजवळ राहता येईल अशी वेळ येईल.

तू दिलेल्या आढाव्यावरून तू फार चांगले काम करते आहेस असे दिसते. असेच करत राहा आणि प्रगती करत राहा. विणाईच्या कलेवर प्रभुत्व मिळव. कताईच्या कलेतही तू पहिल्या श्रेणीचे कौशल्य मिळवले तर तू अमूल्य होशील. मग तुझ्या सेवेची आवश्यकता प्रत्येक ठिकाणी जाणवेल. मराठी तर चांगली केलीच असशील.

तुझा अभ्यास पूर्ण कर आणि निसर्गोपचारासंबंधी सर्व काही शीक. उर्दू लिपी आणि भाषा यांच्यावर प्रभुत्व मिळव. संस्कृत शीक. आणि हे सर्व तू हसतखेळत कर. तू जर असे करशील तर वेळ कसा जातो हे कळणारसुद्धा नाही. पत्राद्वारे माझ्याशी संपर्कात राहा. शशीचा (रतिलाल मेहता यांचा मुलगा.) ताप अजून गेला नाही हे पाहून मला बरे वाटले नाही. तू जर परत निसर्गोपचाराचा अभ्यास केला - आणि तो करणे सोपे आहे - तर तू स्वतःच तो ताप बरा करू शकशील. त्याच्या आहाराची, कटीस्नानाची आणि घर्षण स्नानाची आणि मातीच्या पट्ट्यांचा लेप लावण्याची काळजी घेतली की पुरे आहे. इतके जर केले तर तो लगेच दुरुस्त होईल. त्याने अर्थातच शांत राहायला पाहिजे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. १०५२. सौजन्य - चंपा. र. मेहता

# ४६९. प्रार्थना प्रवचन

("गांधीजीज वाकिंग टूर डायरी"मधून)

अलुनिया,

फेब्रुवारी १८, १९४७

प्रश्न - दंगलग्रस्त लोकांना लीगचे सरकार वा बहुसंख्य समाज योग्य नुकसान भरपाई देत असेल तर दंगलग्रस्त क्षेत्रातील लोकांनी तो भाग सोडण्याला तुम्ही पाठिंबा द्याल काय?

उत्तर - मी या प्रस्तावाला अहिंसेच्या दृष्टीकोनातून पाठिंबा दिला आहे. ही गोष्ट सर्व प्रांतांना लागू होते, मग तिथे हिंदू बहुसंख्य असो की मुसलमान. बहुसंख्य समाजाचे वागणे इतके शत्रुत्वपूर्ण आणि असहिष्णूपणाचे झाले असेल की त्याला दुसऱ्या समाजाचे वास्तव्य तिथे सहन होत नसेल तर सरकार काय करू शकेल? माझ्या मते बहुसंख्याकांना याकरिता बळजबरीने तयार करणे सरकारकरिता योग्य होणार नाही आणि बंदुकीच्या बळावर ते अल्पसंख्याकांचे रक्षणही करू शकत नाही. उदाहरणार्थ कल्पना करा की बहुसंख्याक राम- (इलेक्ट्रॉनिक पुस्तकात हे प्रवचन इथपर्यंतच आहे. उर्वरित भाग संपूर्ण गांधी वाङ्मयमधून घेतला आहे.) धून वा ताल सहन करण्याच्या मनस्थितीत नाही, राम काही एखाद्या माणसाचे नाव नाही तर ईश्वराचे नाव आहे आणि हिंदूंची रामधूनमध्ये ताल देण्यावर श्रद्धा आहे आणि असेही समजा की मुसलमान हे सर्व सहन करण्याकरिता तयार नाहीत. असे असेल तर योग्य नुकसानभरपाई मिळत असेल तर अल्पसंख्याकांनी तो प्रदेश सोडायला हरकत नाही असे मी निःसंकोचपणे म्हणेन.

प्रश्न - इथे तीनचार महिन्यांपूर्वी आलेल्या कार्यकर्त्यांना फार मोठा शारीरिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागला होता आणि शिवाय त्यांना फार मोठ्या राजकीय नेत्यांकडून मार्गदर्शनही मिळाले नाही. आता जेव्हा दळणवळणाच्या परिस्थितीत थोडी सुधारणा झाली आहे तेव्हा त्यांना मार्गदर्शन करण्याची इच्छा असलेले लोक त्यांना वेगवेगळ्या दिशेने ओढत आहेत. अशा प्रकारच्या मतभेदांपासून कार्यकर्त्यांनी कशा प्रकारे दूर राहावे आणि आपले काम चांगल्यात चांगल्या पद्धतीने कसे पूर्ण करावे?

उत्तर - ज्या लोकांना थकवा जाणवतो त्यांना आराम करण्याचा पूर्ण अधिकार आहे. वेगवेगळ्या नेत्यांच्या वेगवेगळ्या मार्गदर्शनाच्या प्रश्नाबद्दल मी म्हणेन की कार्यकर्त्यांनी आपला नेता निवडावा आणि त्याच्या मार्गदर्शनाप्रमाणे चालावे. परंतु असेसुद्धा त्यांनी तेव्हाच केले पाहिजे जेव्हा त्यांनी निवडलेल्या नेत्याचे

मार्गदर्शन त्यांच्या मनाला आणि बुद्धीला रुचेल. जिथे दोघांत विरोध असेल तिथे त्यांनी आपल्या मनबुद्धीचे ऐकले पाहिजे. सर्व धर्मांचा हाच आदेश आहे. धर्मांबद्दल जर हे खरे असेल तर सांसारिक बाबतीत, आणि विशेषतः नोआखालीत जिथे हा प्रश्न अतिशय साधा आहे, ही गोष्ट अजूनच लागू होते. कार्यकर्त्यांचे काम एकदुसऱ्याला जवळ आणणे आहे, एकमेकांमध्ये फूट पाडणे नाही.

प्रश्न - मुसलमानांनी ज्या स्त्रियांना परत केले आहे त्यांच्यामध्ये आशा आणि साहसाचा संचार व्हावा म्हणून त्या कार्यकर्त्यांवर फार मोठ्या प्रमाणात अवलंबून असतात. या गोष्टीला कितपत पाठिंबा दिला पाहिजे? हळहळू बाहेरच्या सर्व कार्यकर्त्यांना काढून घ्यायला नको काय?

उत्तर - जी गोष्ट पुरुष कार्यकर्त्यांना लागू होते तीच गोष्ट स्त्री कार्यकर्त्यांनाही लागू होते. कार्यकर्ते इथे लोकांमध्ये ईश्वराबद्दलची श्रद्धा जागवण्याकरिता आणि साहस निर्माण करण्याकरिता आले आहेत. आपल्या अनुपस्थितीत लोकांना असहायतेची जाणीव निर्माण व्हावी म्हणून नाही. आपापल्या गावातील स्त्रियांना त्यांनी स्पष्टपणे सांगितले पाहिजे की आम्ही काहीच दिवस या गावात राहणार असल्यामुळे तुम्ही स्वतःवरच विश्वास ठेवणे शिकायला पाहिजे. तुम्ही तुमच्या धर्माकरिता आणि अब्रूकरिता मरण्याची कला शिकायला पाहिजे.

हरिजन, मार्च १६, १९४७

-------------------

# ४७०. फजलूल हक यांना तार

(फजलूल हक यांनी १८ फेब्रुवारीला तार करून गांधीजींना २३ तारखेनंतर मुलाखतीची मागणी केली होती आणि पुढे लिहिले होते: "बिहारमध्ये जा आणि तिथे दोन समुदायात मैत्रीसंबंध निर्माण करा आणि मग दिल्लीला लवकरात लवकर जाऊन हिंदुस्थानला वाचवा.")

[फेब्रुवारी १८, १९४७ला वा त्यानंतर]

तुमच्या तारेकरिता आभार. माझ्या प्रकाशित कार्यक्रमातील कोणत्याही वेळी भेटा. आपण आपल्या जुन्या परिचयाला उजळा देऊ आणि तुम्ही माझी खात्री पटवली तर मी तुमच्या मनाप्रमाणे वागेन.

द हिंदू, फेब्रुवारी २१, १९४७

-------------------

# ४७१. मृदुला साराभाई यांना पत्र

अलुनिया,

फेब्रुवारी १९, १९४७

चि. मृदू,

मला तुझ्या दोन तारा मिळाल्या आणि त्याही काल. उत्तरार्थ मी आज तुला तार पाठवत आहे. तू काळजी करते आहेस परंतु काळजी करण्यासारखे कोणतेही कारण नाही. सध्या तरी माझे जीवन सुरळीतपणे सुरू आहे. दिवसेंदिवस सर्व काही चांगल्याकरिता होत असल्याचे जाणवते. मी सेवाग्रामला जे काही केले ते एक प्रयोग म्हणून. प्रयोग केव्हाही थांबवता येत असतो. सहकाऱ्यांकरिता मी तो तात्पुरता स्थगित केला होता. तुझ्याकरिता वा बापांकरिता मी माझे वक्तव्य प्रकाशित केले नाही. इथे परिस्थिती अगदी वेगळी आहे. मनूबरोबर झोपणे हा माझ्या यज्ञाचा अविभाज्य भाग आहे. असे का हे या ठिकाणी स्पष्ट करून सांगण्याचे कारण नाही. तू जेव्हा येशील तेव्हा मी स्पष्ट करून सांगेन. या कृतीने बराच गोंधळ निर्माण केला आहे आणि माझ्या सहकाऱ्यांची समजूत घालण्याकरिता आणि त्यांना शांत करण्याकरिता भरपूर वेळ घेतला आहे. परंतु जोपर्यंत मला माझी ही कृती यज्ञाचा भाग वाटते तोपर्यंत त्याकरिता फार वेळ गेला तरी ती गोष्ट मला फारशी अखरत नाही. यामुळे तू अस्वस्थ न होता तुझे कार्य करत राहा. तू जर केवळ या गोष्टीकरिता येणार असशील तर तू येऊ नये अशी मी तुला विनंती करीन. या मार्गावरून मला परावृत्त करण्याकरिता किशोरीलालभाई एकटेच पुरेसे आहेत. परंतु असे जरी नसले तरी तुझी येण्याची इच्छा आहे. यामुळे मी तुला अडवणार नाही, मला मोकळेपणाने लिही. तुला जे काही मला विचारायचे असेल ते विचार.

आशीर्वाद,

बापू

मुळ गुजरातीवरून. सी. डब्ल्यू. १२६०. सौजन्य - साराभाई फौन्डेशन

-------------

# ४७२. मृदुला साराभाई यांना तार

[फेब्रुवारी १९, १९४७] (याआधीच्या विषयानुसार)

मृदुलाबेन

कॉन्स्टिट्युशन हाऊस

नवी दिल्ली

काल दोन्ही तारा मिळाल्या. प्रकाशनामुळे कोणतीही हानी झालेली नाही. ते अपरिहार्य होते. मित्रांना लिहिणे आवश्यक वाटले. परंतु तुला जेव्हा येणे सोयीस्कर असेल तेव्हा ये आणि चर्चा कर. मी चुकलो आहे असे जर माझ्या लक्षात आले तर मी आनंदाने पाऊल मागे घेईन. मध्यंतरी अस्वस्थ होऊ नको.

बापू

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

---------------------

# ४७३. प्रार्थना प्रवचन

("गांधीजीज वाकिंग टूर डायरी"मधून उद्धृत)

चारदुखिया,

फेब्रुवारी १९, १९४७

प्रश्न - नोआखालीतील काही हितसंबंधी लोक हिंदू कार्यकर्त्यांबद्दल जाणूनबुजून चुकीचे बोलत असतील तर त्यांनी काय करावे?

उत्तर - अहिंसेच्या दृष्टीकोनातून याचे उत्तर असेल आपल्या कामातून खरे काय ते जाहीर झाले पाहिजे. सर्वसामान्य दृष्टीकोनातून ही योग्य भूमिका असली तरी असेही प्रसंग येतात की जेव्हा बोलून स्पष्टीकरण करणे आणि काहीही असत्य ध्वनीत होणार नाही हे पाहणे आपले कर्तव्य ठरते. यामुळे कृतीला शब्दांची जोड देणे हा सुज्ञपणा ठरतो. अर्थात केवळ विचारच शब्दांची जागा घेतील अशी कल्पना आपण करू शकतो. सर्वशक्तीमानचा हाच गुण आहे आणि कोटीकोटी लोकांमध्ये एखाद्याला हे शक्य होऊही शकेल, परंतु असे उदाहरण मला माहीत नाही.

प्रश्न - तुम्ही म्हणाला की बहुसंख्य लोक जर शत्रूप्रमाणे वागू लागले आणि त्यांच्या या वृत्तीत बदल होण्याची शक्यता नसेल तर अल्पसंख्याकांनी ते ठिकाण सोडून दिले पाहिजे (पाहा याआधीचा विषय). परंतु तुम्ही असेही म्हणाला की खऱ्या अहिंसक माणसाने आपल्या विरोधकांत प्रेमाने बदल घडवून आणण्याची आशा कधीही सोडू नये. अशा परिस्थितीत अहिंसक माणूस पराभव स्वीकारून स्थलांतर कसे करू शकतो?

उत्तर - या प्रश्नाबद्दल बोलायचे तर हे अगदी बरोबर आहे की अहिंसक माणसाने आपले ठिकाण कधीही सोडायला नको. अशा माणसाकरिता नुकसानभरपाईचा प्रश्नसुद्धा उपस्थित होत नाही. त्याची उपस्थिती राज्याकरिता वा समुदायाकरिता धोकादायक नाही हे तो आपल्या ठिकाणी सरळसरळ मरण पत्करून दाखवून देईल. नोआखालीच्या हिंदूंनी असा कोणताही दावा केलेला नाही हे मला माहीत आहे. ते साधेसरळ लोक आहेत, त्यांचे या जगावर प्रेम आहे आणि त्यांना या जगात शांततापूर्वक सुरक्षितपणे राहायचे आहे. बहुसंख्य लोकांना शांततापूर्वक राहता यावे म्हणून अशा लोकांना सरकार जर सन्मानपूर्वक नुकसानभरपाई देत असेल तर आपली प्रतिष्ठा तिथेच राहण्यात आहे की तिथून निघून जाण्यात आहे याचा त्यांनी विचार केला पाहिजे. हिंदूंच्या केवळ उपस्थितीने मुसलमानांना जर चीड येत असेल तर सरकारने हिंदूंना

नुकसानभरपाई देणे हे सरकारचे कर्तव्य असेल आणि हिंदू बहुसंख्य प्रांतांत जर मुसलमानांच्या केवळ उपस्थितीने हिंदूंना चीड येत असेल तर मुसलमानांना सन्मानपूर्वक नुकसानभरपाई देणे तेथील सरकारचे कर्तव्य आहे.

प्रश्न - सरकार जर ते ठिकाण सोडण्याचा सल्ला देत असेल तर विस्थापित होणाऱ्या लोकांनी आपल्या (अ) संपूर्ण चलअचल संपत्तीबद्दल, (ब) व्यवसाय सोडावा लागत असल्याबद्दल नुकसानभरपाई मागायला पाहिजे काय? वेगळ्या शब्दांत तुम्हाला पुरेशी नुकसानभरपाई किती वाटते?

उत्तर - गांधीजी म्हणाले की विस्थापित होणारे लोक आपल्याबरोबर चल संपत्ती नेत नसतील वा नेऊ शकत नसतील तर चल-अचल अशा दोन्ही संपत्तीची नुकसानभरपाई देणे सरकारची जबाबदारी आहे. व्यवसाय बंद पडण्याचा प्रश्न कठीण प्रश्न आहे. कोणतेही सरकार अशा प्रकारच्या जबाबदारीचे ओझे उचलू शकेल असे मला वाटत नाही. नवीन ठिकाणी व्यवसाय सुरू करण्याकरिता एखादी निश्चित रक्कम देण्याची मागणी केली गेली तर ती गोष्ट मी समजू शकतो.

ठिकाण सोडण्याच्या सुचनेची मी चौकशी केली आहे आणि ते शक्य आहे असेही मी मान्य करतो. परंतु हिंदुस्तानभरचा माझा अनुभव मला सांगतो की हिंदू आणि मुसलमानांना आपसात शांततेने कसे राहावे हे माहीत आहे. लोकांनी आपल्या बुद्धीला तिलांजली दिली आहे आणि आता पिढ्यांपासून चालत होते त्याप्रमाणे ते एकमेकांबरोबर शांततेने राहू शकत नाहीत यावर माझा विश्वास नाही कारण युगांपासून उंचच उंच हिमालयाच्या सावलीत एकमेकांसोबत राहून आणि गंगा आणि यमुनेचे पाणी पिणाऱ्या हिंदू आणि मुसलमानांजवळ जगाला देण्याकरिता एक संदेश आहे या स्वर्गीय इकबाल यांच्या कथनावर माझा विश्वास आहे.

हरिजन, मार्च १६, १९४७

-----------------

# ४७४. रोजनिशीतील उतारा

फेब्रुवारी १९, १९४७

याच दिवशी (महाशिवरात्रीचा दिवस, माघ वद्य चतुर्दशी, परंपरेप्रमाणे या दिवशी लोक उपवास करतात आणि शंकराची पूजा करतात. गांधीजींनी हा दिवस उपवासाचा आणि प्रार्थनेचा दिवस म्हणून पाळला.) अगदी याच वेळी (सायंकाळी ७. ३५ वाजता) तीन वर्षांपूर्वी (फेब्रुवारी २, १९४४) बाने आपल्या पार्थीव देहाचा त्याग केला होता.

महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड २, पृष्ठ २३५

---------------

# ४७५. एम. ए. अब्दुल्ला यांना पत्र

(एम. ए. अब्दुल्ला यांनी फेब्रुवारी १५ला पाठवलेल्या पत्रात लिहिले होते: "नोआखालीत जितके दिवस मी तुमच्या मुल्यवान आणि शिक्षाप्रद सहवासाचा आनंद घेतला तो सोडला तर इथे इतर कोणतीही उणीव जाणवत नाही.)

नोआखाली,

फेब्रुवारी १९, १९४७

तुमचे पत्र वाचून जाणवते की दोन्ही जिल्ह्यात कोणतेही अंतर नाही. मला वाटते की पोलीस अधिकाऱ्याला अपराधाला तोंड द्यावे लागत असल्यामुळे तो कुठेही गेला तरी त्याला स्वाभाविकपणेच आधी समाजातील उणिवा दिसतात. बेहरामपूरमधील माझ्या सहवासाला मुकल्याची जाणीव होते हे ऐकून मला आनंद झाला. मला खात्री आहे की ही तात्पुरती अवस्था असेल, आणि पत्रव्यवहाराने ही उणीव आपण केव्हाही भरून काढू शकतो.

महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड ३, पृष्ठ ४५८

----------------

# ४७६. स्टॅनले जोन्स यांना पत्र

काझिरखिल,

पोस्ट रामगंज, जिल्हा नोआखाली,

फेब्रुवारी २०, १९४७

प्रिय डॉ. स्टॅनले जोन्स (अमरिकी मिशनरी. क्राईस्ट ऑन द इंडियन रोड या पुस्तकाचे लेखक.),

असे वाटते की तुम्ही कधी अमेरिकेत गेलाच नव्हता. आगगाड्या आणि जहाजांनी अंतर अगदी कमी करून टाकले आहे. आणि विमानवाहतुकीने तर हा वेळ अजूनच कमी झाला आहे. परंतु यामुळे माणसाच्या खऱ्या सुखात भर पडली आहे असे मी समाधानपूर्वक म्हणू शकत नाही.

तुम्ही नोआखालीतील माझ्या दौऱ्याचा कृपापूर्वक उल्लेख केला आहे. परिणाम ईश्वराच्या हातात आहे. याच ओघात तुम्ही बिहारचाही उल्लेख केला आहे. बिहारमधील अपराध नोआखालीच्या तुलनेत फार मोठे होते असे मला वाटत नाही. माझ्या मते दोन्हीही ठिकाणी माणूस पशू झाला होता. आशा आहे की तसा तो तात्पुरता झाला असेल. परंतु बिहारमध्ये जाण्याकरिता मला प्रकाश दिसत नाही. मला तो दिसला तर मी तिथे जाण्याकरिता संकोच करणार नाही. बिहारचे मंत्री आणि तेथील जनता यांच्या मी सतत संपर्कात आहे. मला दिसते त्याप्रमाणे तेथील लोकांना खरोखरच पश्चात्ताप झाला आहे. परंतु माझी दिशाभूल करण्यात आली नाही असे मी शपथपूर्वक सांगू शकत नाही. मला तिथे जाणे आवश्यक आहे असे जाणवताक्षणीच मी नोआखालीतील काम थांबवेन आणि बिहारमध्ये लगेच जाईन. माझे लक्ष आहे इतकेच आज मी सांगू शकतो.

मी अजून एक गोष्ट सांगेन. मी इथे माझ्या अहिंसेची परीक्षा घेण्याकरिता आलो आहे. अहिंसेच्या परिणामांबद्ल माझ्या मनात कोणताही संशय नाही. परंतु अहिंसेचे तंत्र मला पूर्णपणे अवगत नसावे आणि मला जे माहीत आहे त्यानुसारही मी आचरण करत नसेन याबद्दलची मला पूर्ण जाणीव आहे. यामुळे इथे मीच माझी परीक्षा घेत आहे. यामुळे त्या परीक्षेची बिहारमधील माझ्या उपस्थितीची मागणी असेल तर मी बिहारमध्ये जाईन. तुम्ही प्रार्थनापूर्वक जागता पहारा ठेवत आहा याचा मला आनंद होतो.

तुम्ही सोबत जोडलेल्या पत्राबद्दल (पुढील विषय पाहा) बोलायचे तर मी काही लेख लिहून काही सेवा करू शकतो असे मला वाटत नाही. मी काही प्रभावी पाठवू शकतो असे मला वाटत नाही.

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

# ४७७. रॉबर्ट ए. फ्रॅन्कनर यांना पत्र

काझिरखिल,

पोस्ट रामगंज, जिल्हा नोआखाली,

फेब्रुवारी २०, १९४७

प्रिय मित्र.

स्टॅन्ले जोन्स यांच्याद्वारे मला तुमचे पत्र मिळाले. सध्याच्या क्षणी कृपाकरून मला कोणत्याही लेखाबद्दल म्हणू नका. सध्याचे ओझे वाहत असताना इतर कोणतेही काम करण्याकरिता माझ्याजवळ ना तर वेळ आहे ना तशी काही इच्छा आहे. पारिश्रमिकाचा विचारच नाही कारण मी कधीही पारिश्रमिकाकरिता लिहीत नसतो.

तुमचा विश्वासू,

माननीय रॉबर्ट ए. फ्रॅन्कनर,

१२३६, ११वी बोळ,

एन. डब्ल्यू. वाशिंग्टन १, डी. सी.

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

---------------------

# ४७८. पी. एन. बॅनर्जी यांना पत्र

काझिरखिल,

पोस्ट रामगंज, जिल्हा नोआखाली,

फेब्रुवारी २०, १९४७

प्रिय मित्र.

डॉ. अमिया चक्रवर्तींना मला तुमचे जिव्हाळ्याने भरलेले पत्र दिले (पी. एन बॅनर्जींना पत्रातून गांधीजींना कलकत्ता विद्यापीठाच्या वार्षिक दीक्षांत समारोहाचे अध्यक्षपद भूषवण्याची विनंती केली होती.). मला तुम्हाला निर्णायक उत्तर देण्याची किती तरी इच्छा होती परंतु तसे मी करू शकत नसल्यामुळे सोयीस्कर तारीख ठरवण्याकरिता आणि निश्चित कार्यक्रम आखण्याकरिता देशाच्या या भागात येण्याकरिता मी तुम्हाला सांगणार नाही. माझे हात बांधलेले आहेत आणि खरी शांतता प्रस्थापित होईपर्यंत मी हे ठिकाण सोडण्याचे साहस करायला नको. शक्य आहे की माझ्या जिवंतपणी ही शांतता प्रस्थापित होणारही नाही. अशा परिस्थितीत त्याकरिता प्रयत्न करत मी वारंवार सांगितल्याप्रमाणे या भागातच मी माझे उर्वरित आयुष्य घालवीन. परंतु अखेरीस माणूस केवळ विचार करू शकतो, ईश्वरच सर्व काही ठरवतो. इथे सुरू असलेले काम अधिक चांगल्या प्रकारे करता यावे म्हणून शक्य आहे की मला बिहारमध्येही जावे लागू शकते. परंतु भविष्यात मी फारसा डोकावत नसतो. कार्डिनल न्यूमनच्या शब्दांत 'माझ्याकरिता एक पाऊल पुरे' (न्यूमनचे स्तोत्र "लीड काईंडली लाईट" असे आहे : "एक पाऊल पुरे मला, नको दूरचे दृश्य, कर त्याकरिता मार्गदर्शन."). बाकी तुम्हाला डॉ. चक्रवर्ती सर्व सांगतील कारण त्यांच्याशी माझी प्रदीर्घ चर्चा झाली आहे (पाहा "अमिया चक्रवर्ती यांच्याशी चर्चा", फेब्रुवारी २०, १९४७).

तुमचा विश्वासू,

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

---------------------

# ४७९. गोपीनाथ बार्डोलाई यांना पत्र

काझिरखिल,

पोस्ट रामगंज, जिल्हा नोआखाली,

फेब्रुवारी २०, १९४७

प्रिय बार्डोलाई (आसामचे मुख्यमंत्री),

या महिन्याच्या १४ तारखेचे तुमचे पत्र. निर्मल बाबूंनी तुमचे पत्र पाहिले आहे आणि त्यांचे म्हणणे आहे की तुम्ही उल्लेख केलेल्या कामाकरिता त्यांच्या एका विद्यार्थ्याला प्रेरित करता येऊ शकेल. त्यांच्या विद्यार्थ्याचे म्हणणे कळल्यानंतर ते लगेच तुम्हाला लिहितील. आशा आहे की तुमचा सर्व त्रास संपेल.

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

---------------------

# ४८०. चांदराणी यांना पत्र

फेब्रुवारी २०, १९४७

चि. चांद,

आज माझी देवशी (देव प्रकाश नाय्यर) चर्चा झाली. विषय होता तुम्ही दोघांनी एकमेकांना लिहायचे की नाही. त्याचे म्हणणे आहे की त्याने तुला लिहिण्याऐवजी मी तुला लिहिले आणि तुझ्या प्रकृतीची माहिती घेऊन ती त्याला कळवली तर ते त्याला अधिक आवडेल. यामुळे हे पत्र.

आता याबद्दल तुला काय वाटते ते तू मला लिही. तुझ्या प्रकृतीची पूर्ण माहिती दे. तू प्रकृतीची हयगय करू नको. तुझ्या कामाची प्रगती कशी आहे?

तुला गुजराती, मराठी आणि उर्दू चांगली यायला पाहिजे. तुला कारण माहीत आहे.

सुशीलाबेन तुला येथील सर्व माहिती देतील. प्यारेलाल माझ्याकरिता जे काम करत होता ते सर्व काम देव माझ्याकरिता करत आहे. तो माझ्याच खोलीत झोपतो.

मला वाटते की तुझी बहीण आपल्या प्रतिज्ञेवर कायम असेल.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. चांदराणी पेपर्स. सौजन्य - गांधी नॅशनल म्युझियम आणि लायब्ररी

-------------------

# ४८१. अमिया चक्रवर्ती यांच्याशी चर्चा

(कलकत्ता विद्यापीठात प्राध्यापक. एके काळी रविंद्रनाथ टागोर यांचे सचिव म्हणून काम केले.)

फेब्रुवारी २०, १९४७

मला जरी अपयश आले तरी सत्य अपयशी होणार नाही. हा विषय प्रकाशापर्यंत नेण्याचा मी प्रयत्न करायलाच पाहिजे. या प्रयत्नात मी जगू शकतो वा मरू शकतो. नोआखाली आणि टिपरा येथील समस्या वेगळ्या नाहीत, त्या अशा समस्या आहेत की ज्या हिंदुस्तानने स्वतःकरिता आणि मानवतेकरिता सोडवल्याच पाहिजे. सुदैवाने वा दुर्दैवाने मला माझ्या जीवनातील काही अतिशय कठीण कामात यश मिळाले आहे. परंतु या वेळी काय होईल हे मला माहीत नाही. आपली सर्वात कठीण परीक्षा सुरू आहे परंतु हिच्यात यशस्वी होणे आपल्या क्षमतेबाहेर नाही.

सत्यच ईश्वर आहे. आणि त्याचा शोध अहिंसा आणि तिचा जो काही अर्थ होतो त्यांच्या माध्यमातूनच लागू शकतो. इथे या प्रश्नाचा स्पष्ट निर्णय होईल. जे लोक वेगळेपणाचा विचार करतात त्यांना आमची परिस्थिती काय आहे ते कळले पाहिजे. आपण तथ्यांचा सामना केला पाहिजे. लोक जर धर्म, रीतीरिवाज, पोशाख, माणूस यातील भेद सहन करणार नसतील आणि बहिष्काराचा आग्रह ठेवतील तर ते जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सरकारच्या मदतीशिवाय असे करू शकत नाहीत.

सरकाचे धोरण जर बहिष्काराचे असेल तर ते आम्हाला कळले पाहिजे. कोणताही समुदाय आपल्या इच्छेने कारवाई करू शकत नाही. बंगाल आणि इतर प्रांतांनी ही गोष्ट समजून घेतली पाहिजे.

संधी मिळेपर्यंत मानवसमाज परत सामान्य होण्याचा प्रश्न आहे.

गांधीजी म्हणाले की माझा यावर विश्वास नसता तर मी इथे दिसलो नसतो.

अमृत बझार पत्रिका, फेब्रुवारी २४, १९४७

--------------------

# ४८२. प्रार्थना प्रवचन

("गांधीजीज वाकिंग टूर डायरी"मधून उद्धृत)

चर लरुआ,

फेब्रुवारी २०, १९४७

प्रश्न - तुम्हाला जर वाटत असेल की सरकार बहिष्कार टाकेल म्हणजे अल्पसंख्याकांना पुरेशी नुकसानभरपाई देऊन त्यांना काढून टाकील तर मग वेळ असतानाच सावध होऊन लोकांनी इथून का निघून जाऊ नये?

उत्तर - या प्रश्नाच्या उत्तरात गांधीजी म्हणाले की वेळ असताच आम्ही सावध होऊ आणि हिंदूंना घेऊन जाण्याकरिता एका हिंदू मंडळाची स्थापना करू असा जे विचार करतात त्यांच्या आणि माझ्या विचारात कोणतेही साम्य नाही. अशा कोणत्याही योजनेत मी सहभागी होऊ शकत नाही. याची संपूर्ण जबाबदारी बहुसंख्य समाजावर आणि सरकारवर आहे. माझा म्हणण्याचा अर्थ इतकाच होता की जेव्हा ते आपल्या बुद्धीच्या दिवाळखोरीची घोषणा करतील तेव्हा अल्पसंख्याकांना जर पुरेशी नुकसानभरपाई दिली तर त्यांनी निघून जायला पाहिजे. दुसरा मार्ग हिंसेचा म्हणजे गृहयुद्धाचा आहे, अहिंसेचा नाही.

प्रश्न - तुम्ही म्हणाला की जाती जायला पाहिजे. पण मग हिंदू धर्म अस्तित्वात राहील काय? असे असताना तुम्ही हिंदू धर्मात ख्रिश्चन धर्म वा इस्लाम सारख्या प्रगतीशील धर्माची भेसळ का करता?

उत्तर - गांधीजी म्हणाले की हिंदू धर्म जर टिकायचा असेल तर जातींचा जो काही आज अर्थ होतो त्या अर्थाप्रमाणे जाती जायलाच पाहिजे. ख्रिश्चन धर्म आणि इस्लाम प्रगतीशील धर्म आहेत आणि हिंदू धर्म स्थितीशील वा अवनतीशील धर्म आहे यावर माझा विश्वास नाही. खरे तर कोणत्याही धर्मात मला प्रगतीशीलता आढळली नाही. धर्म जर प्रगतीशील असते तर विश्वाची आज जी दुर्दशा झाली आहे ती झाली नसती. कर्तव्य म्हणून वर्णांना एक स्थान होते. ही गोष्ट इतर धर्मांकरिताही खरी होती, इतकेच की त्यांनी वर्णाऐवजी दुसरे नाव योजले असेल. मुसलमान मौलवी वा ख्रिश्चन प्रिस्ट जर आपल्या अनुयायांना पैशाकरिता नाही तर आपल्या धर्माचे मर्म समजून सांगण्याच्या कौशल्यामुळे शिकवत असतील तर ते ब्राह्मण नाही तर अजून काय आहे? आणि हीच गोष्ट इतर विभागांकरिताही खरी आहे.

प्रश्न - तुम्ही जातीनिर्मूलनाचे पुरस्कर्ते असल्यामुळे तुम्ही आंतरजातीय विवाहाचेही पुरस्कर्ते आहा असे आम्ही गृहीत धरले पाहिजे काय? अनेक व्यवसायांवर आज काही काही विशिष्ट जातींचा एकाधिकार आहे. या जातींचे निर्मूलन व्हायला नको काय?

उत्तर - मी निश्चितच आंतरजातीय विवाहाच्या बाजूचा आहे. समाजतील सर्व जेव्हा जातिविरहित होतील तेव्हा हा प्रश्नच उपस्थित होणार नाही. ही सुखद अवस्था निर्माण होईल तेव्हा हा एकाधिकारही जाईल.

प्रश्न - ईश्वर जर एकच असेल तर मग एकच धर्म असायला पाहिजे नव्हता काय?

उत्तर - हा विचित्र प्रश्न आहे. ज्याप्रमाणे एकाच झाडाला लक्षावधी पाने असतात त्याचप्रमाणे ईश्वर जरी एक असला तरी जितके स्त्री-पुरुष आहेत, आणि त्यांचे मूळ एकच ईश्वर असला तरी, तितके धर्म आहेत. हे साधे सत्य त्यांना दिसत नाही कारण ते वेगवेगळ्या पैगंबाराचे अनुयायी आहेत आणि त्यांचा समज असतो की जितके पैगंबर आहेत तितकेच धर्म आहेत. खरी गोष्ट तर ही आहे की मी जरी स्वतःला हिंदू समजत असलो तरी मी ज्या अर्थाने ईश्वराची पूजा करतो त्या अर्थाने इतर हिंदू करत नाहीत.

हरिजन, मार्च १६, १९४७

------------------

# ४८३. ई. डब्ल्यू. आर्यनायकम यांना पत्र

(सचिव, हिंदुस्तानी तालिमी संघ. हे “धार्मिक शिक्षण, सैनिकी प्रशिक्षण आणि रोमन लिपी या शिर्षकाखाली प्रकाशित झाले होते.”)

फेब्रुवारी २१, १९४७

मला आनंद होतो की तुम्ही थोड्या वेळेकरिता (१९ ते २१ फेब्रुवारीपर्यंत) इथे आला आणि अतिशय थोडक्यात समान उद्दिष्ट असलेल्या गोष्टींवर आपली चर्चा होऊ शकली. (हा परिच्छेद इलेक्ट्रॉनिक आवृत्तीत नाही, तो संपूर्ण गांधी वाङ्मय खंड ८७मधून घेतला आहे.)

तुम्ही मला हिंदुस्तान स्टॅंडर्डचे कात्रण पाठवले ज्यात मौलाना अबुल कलाम आझाद (सदस्य, शिक्षण आणि कला विभाग, अंतरिम सरकार, ते असे म्हणाल्याचे वृत्त होते : “हे शक्य आहे की राज्याच्या देखरेखीखाली धार्मिक शिक्षणसुद्धा गैर सरकारी नियंत्रणापेक्षा अधिक उदार भावनेने करता येऊ शकते. सर्व धार्मिक शिक्षणाचा उद्देश माणसाला अधिक सहिष्णू आणि उदारमतवादी बनवण्याचा असला पाहिजे. माझे मत आहे की राज्याने जर ही बाब गैर सरकारी प्रयत्नांवर सोडण्याऐवजी आपल्या देखरेखीखाली ठेवली तर हे काम अधिक कार्यक्षमतेने करता येऊ शकते.”) यांचे शिक्षणासंबंधीचे विचार होते. प्रकाशित वृत्त बरोबर आहे असे गृहीत धरून मी स्पष्टपणे सांगतो की ते हिंदुस्तानी तालिमी संघाच्या विचारधारेशी ते विसंगत आहेत. भारत आपल्या गावात राहतो, पाश्चात्य रंगात रंगलेल्या त्या थोड्याशा शहरात नाही जे विदेशी सत्तेचे बालेकिल्ले आहेत.

राज्याने धार्मिक शिक्षणात पडणे योग्य राहील वा ते ते काम चांगल्या पद्धतीने पूर्ण करू शकेल असे मला वाटत नाही. धार्मिक शिक्षण पूर्णपणे धार्मिक संस्थांवर सोडले पाहिजे असा माझा विश्वास आहे. धर्म आणि नीतीची भेसळ करू नका. माझा विश्वास आहे की मूलभूत नैतिकता सर्व धर्मांमध्ये समान आहे. मूलभूत नैतिकता शिकवणे हे अर्थातच राज्याचे काम आहे. धर्माचा माझा अर्थ मूलभूत नीती नाही तर तो धर्म आहे जो वेगवेगळ्या संप्रदायांच्या नावाने ओळखला जातो. राज्याकडून मदत मिळालेला धर्म आणि राजकीय चर्च यांच्यामुळे आपल्याला बराच त्रास सहन करावा लागला आहे. जो समाज वा समूह आपल्या अस्तित्वाकरिता राज्याच्या आंशिक वा पूर्ण मदतीवर अवलंबून असतो तो त्या धर्माकरिता योग्य नसतो वा असेही म्हणता येईल की तो खरा धर्मच नाही. मला स्पष्ट दिसणाऱ्या या सत्याकरिता मला काही पुरावा देण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही.

या वृत्तात लक्ष देण्यासारखी दुसरी गोष्ट उर्दू आणि देवनागरी लिपीच्या ठिकाणी रोमन लिपी आणण्याचा प्रश्न. ही सूचना कितीही आकर्षक दिसत असली तरी आणि भारतीय सैनिकांविषयी जे काही खरे

असले तरी माझ्या मते असा बदल करणे घोडचूक होईल आणि आपली अवस्था कढईतून आगीत पडल्यासारखी होईल. या संबंधात मी गत २१ जानेवारीला वृत्तपत्रांना जे वक्तव्य दिले आहे ते वाचा (पाहा "वृत्तपत्रांना वक्तव्य", फेब्रुवारी २, १९४७).

तिसरी गोष्ट, जी वाचून मला दुःख झाले, सैनिक शिक्षणाची आहे. मला वाटते या संबंधात राष्ट्रीय पातळीवर निर्णय घेण्यापूर्वी आपण बराच काळ वाट पाहिली पाहिजे. असे झाले नाही तर जगाकरिता आपण वरदान होण्याऐवजी शाप होऊ. पुढारी तयार केले जात नसतात, ते जन्मजात असतात. पूर्ण स्वातंत्र्य मिळालेले नसतानाचा राज्याने इतकी घाई करण्याची आवश्यकता आहे काय? यामुळे केंदीय सल्लागार मंडळाने अशा व्यापक सुधारणांची शिफारस केल्याचे पाहून मला आश्चर्य वाटते. (केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाच्या शिफरशी अशा होत्या : "केंद्रीय शिक्षण मंडळ राष्ट्रीय युद्ध अॅकेडॅमीच्या कार्यकारिणीच्या या मताचे समर्थन करते की राज्य आणि प्रांत यांच्यातर्फे अशा निवासी शाळा सुरू केल्या जाव्या की जिथे मुलांना आपले चारित्र्य आणि नेतृत्वाचे गुण विकसित करण्याची पूर्ण संधी मिळेल. या शाळा राष्ट्रीय युद्ध अॅकॅडॅमीकरिता उपयुक्त विद्यार्थी उपलब्ध करून देतील. मंडळाचे मत आहे की राष्ट्रीय युद्धोत्तर शिक्षणाच्या योजनेत ज्या नवीन प्रकारच्या शिक्षणाच्या योजनेची कल्पना करण्यात आली आहे ते मुलांना उच्च पातळीवरील नेतृत्व, चरित्र बुद्धी, साहस आणि शारीरिक क्षमतेचे शिक्षण देईल ज्याची आवश्यकता स्थलसेना, नौसेना आणि वायूसेना यांच्या अधिकाऱ्यांना जाणवत असते. हे मंडळ प्रांतिक अधिकाऱ्यांचे लक्ष आपल्या शाळांचा विकास या पद्धतीने करण्याच्या आवश्यकतांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करते ज्याची कल्पना सैनिकी अधिकाऱ्यांच्या डोक्यात आहे...." ) (हे पत्र उपलब्ध नाही.).

हरिजन, मार्च २३, १९४७

---------------

# ४८४. पी. आर. चेंगलवरोया चेट्टियार यांना पत्र

काझिरखिल,

पोस्ट रामगंज,

जिल्हा नोआखाली,फेब्रुवारी २१, १९४७

प्रिय चेंगलवरोया,

तुमच्या पत्राकरिता अतिशय आभारी आहे. जो पश्चात्तापदग्ध असतो त्यालाच खरी क्षमा मिळते. हरिलालला (हरिलाल गांधी) माहीत आहे की तो जेव्हा आपल्या दुर्व्यसनांची सवय सोडेल तेव्हा त्याचे सेवाग्रामला स्वागतच होईल. जे चांगले लोक अनुचित दयाभावनेने त्याच्या दुर्व्यसनाला मदत करतात ते सर्व त्याचे शत्रू आहेत.

तुमचा विश्वासू,

मो. क. गांधी

पी. आर. चेंगलवरोया चेट्टियार

४०, वेंकटचला स्ट्रीट,

ट्रिप्लीकेन,

मद्रास

फोटोप्रतीवरून. जी. एन. १०२

---------------------

# ४८५. मुन्नालाल गं. शाह यांना पत्र

फेब्रुवारी २१, १९४७

चि. मुन्नालाल,

काल मला तुझे लांब पत्र मिळाले. मनूने (जयसुखलाल गांधी यांची मुलगी.) ते मला सायंकाळी वाचून दाखवले. लागवडीबद्दल तू म्हणतोस ते अगदी बरोबर आहे. आपण जास्तीत जास्त धान्य पिकवले पाहिजे आणि ते जनतेला दिले पाहिजे. एकदा साबरमतीला आपण असे केले होते. तू त्या वेळी व्याराला होता काय? हंगाम नसतानाही त्या वेळी आपण बाजरी पिकवली होती आणि गरीबांना ती दिली होती. त्यांच्याकडून अर्थातच काही किंमत घेतली होती. ब्रजलाल (एक आश्रमवासी) दिवसभर मजुरांना ते धान्य वाटत असायचा. असेच काही तरी सेवाग्रामलासुद्धा केले पाहिजे आणि तेही किती तरी मोठ्या प्रमाणात. पैशाची अडचण यायला नको. तुझी इच्छा असेल त्याला तू हे दाखवू शकतो.

कांचनबद्दल (मुन्नालाल शाह यांची पत्नी) कळल्यामुळे मला खरोखरच फार आनंद झाला. तिचे बाळंतपण सुखरूपपणे पार पडो. तिचा व्याराला जाण्याचा विचार बरोबर आहे की चूक हे मला माहीत नाही. सुशीलाबेन (सुशीला नाय्यर) तिथे जाणार आहे आणि ती तुला अधिक चांगले मार्गदर्शन करू शकेल. कांचनची बहीण तिथे आली आहे ही फार चांगली गोष्ट आहे. इमारतीच्या कामाकडे तू लक्ष देतो आहेस हीसुद्धा चांगली गोष्ट आहे. ते कामसुद्धा दुसऱ्या कोणीतरी करायला पाहिजे होते. तू या कामात तज्ज्ञ आहेस.

माझे नशीब केवळ ईश्वराच्या हातात आहे. येथील (शांतता आणि सांप्रदायिक सद्भावना स्थापन करण्याकरिता गांधीजी नोआखालीला नोव्हेंबर ६, १९४६ला गेले होते. आणि जानेवारी २, १९४७ पासून त्यांची गावोगावी पदयात्रा सुरू होती.) माझे कार्य जर मी पूर्ण करू शकलो तर मी बंगाल सोडेन आणि मग मी तिथे नक्की जाईन. परंतु मला यश येईल की नाही हेच मला माहीत नाही. येथील माझ्या प्रयत्नात मी जर मेलो तर मी अशा मृत्यूचे स्वागतच करीन. तू इथे धावपळ येऊन काहीही फायदा होणार नाही. तू जर माझ्याकडून काही शिकला असशील तर त्यात अजून भर घाल. तू जर या बाजूला आला आणि मग मला भेटला तर ती वेगळी गोष्ट. कांचनचे सुंदर पत्र आले होते. परंतु मला वेळ कुठे आहे. आता अंथरुणात पडल्यापडल्या मी मनूला पत्रांचा मजकूर सांगत आहे, आणि पत्र जर वेगळ्या भाषेत असेल तर इतरांना मी तो मजकूर सांगत असतो. अशा प्रकारे शरीराला मी पुरेशी विश्रांती देऊ शकतो आणि काही प्रमाणात पत्रव्यवहार पूर्ण करू शकतो. आमच्याबरोबर काही पत्रकारही आहेत आणि

तेसुद्धा मदत करत असतात. त्यांच्या मदतीमुळे परशुरामची (गांधीजींचा लघुलिपिक. नोआखालीच्या दौऱ्यात काही काळ ते गांधीजींबरोबर होते. पाहा "वृत्तपत्रांना वक्तव्य", नोव्हेंबर २०, १९४६ आणि "परशुराम यांना पत्र", जानेवारी २, १९४७) उणीव काही प्रमाणात भरून निघते. उर्दू पत्रांचा मजकूर मी देवला (देव्प्रकाश नाय्यर) सांगत असतो आणि बंगाली पत्रांचा निर्मल बाबूंना (निर्मल कुमार बोस, कलकत्ता विद्यापीठात प्राध्यापक, गांधीजींबरोबर ते "दुभाष्या आणि सहकारी" म्हणून दौरा करत होते. पाहा "मौन दिवशी निर्मल कुमार बोस यांना पाठवलेली चिठ्ठी", नोव्हेंबर १८, १९४६ आणि "वृत्तपत्रांना वक्तव्य", नोव्हेंबर २०, १९४६). अशा प्रकारे माझ्या पत्रव्यवहाराच्या कामाची चांगली सोय लागली आहे आणि माझ्या दोन्ही हातांना आणि डोळ्यांना थकवा येण्यापासून वाचवतो. मी कांचनला लिहीत नाही याचा अर्थ तिने लिहू नये असा होत नाही.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ८६२८. शिवाय सी. डब्ल्यू. ७२१०. सौजन्य - मुन्नालाल गं. शाह

-------------

# ४८६. प्रार्थना प्रवचन

("गांधीजीज वाकिंग टूर डायरी"मधून उद्धृत)

कमालपूर,

फेब्रुवारी २१, १९४७

गांधीजींनी आजूबाजूच्या गावातून आलेल्या लोकांचे गांधीजींनी अभिनंदन केले. त्या लोकांना उन्हात यावे लागल्याबद्दल त्यांनी त्यांच्याबद्दल सहानुभूतीही व्यक्त केली. तुम्ही लोक हिंदुस्तानच्या उन्हाला घाबरत नसाल अशी आशा व्यक्त करून ते म्हणाले की ईश्वराने भारताला दिलेली कदाचित ही सर्वात मोठी भेट असावी. हिंदुस्तानचे आकाश वर्षातून बराच काळ निळे असते ही भाग्याची गोष्ट आहे असे ते म्हणाले.

यानंतर गांधीजी म्हणाले की हिंदुस्तानचे सुपुत्र हरदयाल नाग (१८५३-१९४२); असहकार आंदोलन आणि मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतला होता; रचनात्मक कार्याला जीवन वाहून टाकले होते) जेव्हा जिवंत होते तेव्हा या भागात मी किती तरी वेळा आलेलो आहे. त्या वेळी मी त्यांचा पाहुणा होतो. यामुळे चांदपूरचे किती महत्त्व आहे ते मला माहीत आहे. निर्वासितांची काळजी घेण्यासंबंधात चांदपूरने आपली भूमिका बजावली याचा मला आनंद होतो. परंतु आरोग्याच्या आणि साफसफाईच्या नियमांची इथे जी हेळसांड होत आहे ती पाहून मला दुःख होते. तुम्ही या नियमांचे योग्य पद्धतीने पालन केले तर तुम्हाला प्लेग आणि इतर रोगांच्या भीतीत जगावे लागणार नाही. अशा प्रकारच्या घाणीतच या रोगराईची वाढ होत असते.

यानंतर गांधीजी श्रोत्यांना म्हणाले की तुम्ही तुमच्या मुसलमान शेजाऱ्यांबद्दल दुर्भावना ठेवू नका. गांधीजींनी दोन्ही समुदायाच्या लोकांना परस्परांशी शांततापूर्वक राहण्याची विनंती केली. परंतु गांधीजींचे म्हणणे होते की केवळ हिंदूंनी जरी आपल्या मनांत मुसलमानांबद्दल दुर्भावना ठेवली नाही वा केवळ मुसलमानांनी हिंदूंबद्दल दुर्भावना ठेवली नाही तरी हा संघर्ष थांबेल. परंतु असे न होता दोघेही एकमेकांबद्दल जर आपल्या मनात दुर्भावना ठेवतील तर परिणामी संघर्ष अटळ आहे. माणूस जसा विचार करतो तसा तो होतो असा उपनिषदात एक मंत्र आहे (माणूस जसे वर्तन करतो, जसा तो वागतो तसा तो होतो. चांगले वर्तन करणारा चांगला होतो, वाईट वर्तन करणारा वाईट होतो. सद्गुणाप्रमाणे आपण वागलो तर आपण सद्गुणी होतो. परंतु इतर लोक मात्र म्हणतात की माणूस इच्छांनी घडतो. जशी त्याची इच्छा असते तसा तो होतो; जशी त्याची इच्छा असेल तसा तो वागेल. आणि जसा तो वागेल तसा तो होईल." - बृहदारण्यकोपनिषद ४, ४.५). जीवनातील प्रत्येक क्षेत्रात हे किती खरे आहे! दुर्भावनेबद्दल आपण सावध राहू या.

यानंतर विचारण्यात आलेल्या दोन प्रश्नांकडे गांधीजी वळले. पहिला प्रश्न होता -

प्रश्न - तुम्ही आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार करता. त्याचप्रमाणे हिंदुस्तानातील विविध धर्माच्या लोकांमधील विवाहाचाही तुम्ही पुरस्कार करता काय? याकरिता आम्ही कोणत्याही धर्माचे नाही असे विवाह करणारांनी घोषित केले पाहिजे काय की ते आपापल्या धर्माचे पालन करत राहू शकतात आणि आंतरधर्मीय विवाह करू शकतात? जर असे असेल तर विवाह समारंभाचे स्वरूप कोणते असेल? तो शुद्ध नागरी समारंभ असेल की धार्मिक? धर्म ही शुद्ध वैयक्तिक बाब आहे असे तुम्ही मानता काय?

उत्तर - मी मान्य करतो की पूर्वीपासून माझे हे विचार नव्हते तरीही बऱ्याच दिवसांपूर्वी मी या निष्कर्षावर पोहोचलो आहे की विभिन्न धर्माच्या लोकांमध्ये विवाह होणे ही चांगली गोष्ट आहे. माझी इतकीच अट आहे की अशा प्रकारचे विवाह केवळ वासनेच्या परिपूर्तीकरिता नसावे. वासनेमुळे जर तसे होत असेल तर माझ्या मते तो विवाह विवाह नसतो. (अमृत बझार पत्रिकेत प्रकाशित एका वृत्तावरून.) तो अवैध संबंध होतो. माझ्या दृष्टीकोनातून विवाह एक पवित्र संस्था आहे. यामुळे दोघांमध्ये परस्परांबद्दल मैत्रीभावना असली पाहिजे, दोन्ही पक्षांना परस्परांच्या धर्माबद्दल सारखाच आदर वाटला पाहिजे. अशा विवाहात धर्मांतरणाचा प्रश्नच उपस्थित होत नाही. यामुळे विवाह समारंभ दोन्ही धर्माचे धर्मगुरू पार पाडतील. ही सुखद परिस्थिती तेव्हाच निर्माण होऊ शकते जेव्हा जेव्हा विविध समुदायातील लोकांच्या मनातील शत्रुत्वाची भावना निघून जाईल आणि जगातील सर्व धर्मांबद्दल त्यांना आदर असेल.

प्रश्न - राज्याने मान्य केल्याप्रमाणे धार्मिक शिक्षण नियमित अभ्यासक्रमाचा भाग असला पाहिजे काय? धार्मिक शिक्षण देणे सोयीस्कर व्हावे म्हणून तुम्ही वेगवेगळ्या धर्माच्या लोकांकरिता वेगवेगळ्या शाळा असणे पसंत कराल काय? की धार्मिक शिक्षणाची जबाबदारी खाजगी संस्थांवर सोडून दिली पाहिजे? असे असेल तर राज्याने अशा संस्थांना अनुदान देणे बरोबर राहील असे तुम्ही मान्य करता काय?

उत्तर - या प्रश्नाच्या उत्तरात गांधीजी म्हणाले की संपूर्ण समाजाचा जरी एकच धर्म असेल तरी राज्याच्या मदतीवर आधारलेल्या धर्मावर माझा विश्वास नाही. धर्मात राज्याने केलेला हस्तक्षेप केव्हाही स्वागतार्ह नसतो. धर्म ही शुद्ध वैयक्तिक बाब आहे. खरे सांगायचे तर जितके मन आहेत तितके धर्म आहेत. एकाच्या मनातील ईश्वराची संकल्पना दुसऱ्याच्या मनातील ईश्वराच्या संकल्पनेपेक्षा वेगळी असते. राज्याने धार्मिक संस्थांना आंशिक वा पूर्ण अनुदान देण्यालासुद्धा माझा विरोध आहे. कारण जी संस्था वा समूह आपल्या धर्माची आर्थिक तरतूद करू शकत नाही ती संस्था वा समूह त्या धर्माकरिता परक्यासारखे असतात

हे मला माहीत आहे. याचा अर्थ असा नाही शासकीय शाळांमध्ये नैतिक शिक्षण दिले जाणार नाही. मूलभूत नैतिकता सर्व धर्मांकरिता सारखी आहे.

हरिजन, मार्च १६, १९४६

---------------

# ४८७. हसन शहीद सुऱ्हावर्दी यांना पत्र

(या पत्रातील काही उतारे "अमृत कौर यांना पत्र" फेब्रुवारी २२, १९४७मध्येही आलेली आहेत.)

प्रिय मित्र,

बिहारमधून परतल्यानंतर काल माझ्याबरोबर सरदार निरंजन सिंग गिल (आझाद हिंद सेनेचे. त्यांच्या अंतर्गत आझाद हिंद सेनेचे काही लोक नोआखालीत काम करत होते.) होते. त्यांनी एक निवेदन तयार केले असून त्याच्यावर मी एक दृष्टीक्षेप टाकला आहे. ते निवेदन तुम्हाला द्यावे म्हणून मी त्यांना सांगितले आहे. अजूनपर्यंत तरी त्यांनी ते बिहारच्या मुख्यमंत्र्यांना दाखवलेले नाही. मी त्यांना सांगितले की जोपर्यंत तुम्ही हे निवेदन मुख्यमंत्र्यांना दाखवत नाही तोपर्यंत हे अपूर्ण आहे. माझ्या उद्गारातील औचित्य त्यांना पटले आणि ते मुख्यंमंत्र्यांना याची एक प्रत पाठवणार आहेत. त्यांनी काढलेल्या निष्कर्षात त्यांना जर काही दुरुस्ती करावी असे वाटले तर ते तशी दुरुस्ती करतील व ती तुम्हाला कळवतील. त्यांनी एका गोष्टीची शिफारस अवश्य केली आहे आणि ती म्हणजे मी काही दिवसांकरिता का होईना बिहारमध्ये जायला पाहिजे. त्यांनी दिलेला अहवाल बरोबर असेल तर डॉ. महमूदनासुद्धा असेच वाटत असल्याचे तुम्हाला आढळेल. माझा डॉ. महमूद यांच्याशी सतत पत्रव्यवहार सुरू आहे. त्यांच्याकडून मला वक्तव्यांचा पडताळा करून घ्यायचा आहे. मी बिहारच्या मुख्यमंत्र्यांनासुद्धा लिहीत आहे. त्यांचेसुद्धा असेच मत असेल तर येथील काम थांबवीन आणि बिहारमध्ये जाईन. तुमच्या नावाने असलेले एक वक्तव्य मला वृत्तपत्रांध्ये आढळले. त्यात तुम्ही मला टोमणा मारलेला आहे. (हसन शहीद सुऱ्हावर्दी यांनी गांधीजींच्या "आतील आवाजाचा" छचोरपणे उल्लेख केला होता.) मी तुमच्याकडून ही अपेक्षा केली नव्हती. यामुळे माझ्यात आतला आवाज आहे आणि तो मी ऐकत असतो यावर तुम्हाला विश्वास ठेवावाच लागेल. मानवजातीला आतला आवाज आहे असा माझा विश्वास आहे. परंतु बाहेरच्या गोधळामुळे आणि गोंगाटामुळे बहुतेक लोकांमध्ये तो जवळपास लुप्त झाल्यासारखा झाला आहे. तो आवाज जेव्हा बोलतो तेव्हा कोणाच्याही प्रोत्साहनाशिवाय मी तुम्हाला बिहारमध्ये आढळेन. हे तुम्हाला पाठवत असताना बिहारमधील परिस्थिती जशी असायला पाहिजे तशी नाही याचा उल्लेख केल्याशिवाय मी राहू शकत नाही. निकटच्या अधिकाऱ्याला त्रास होणार नाही अशा सावधगिरीने मी त्यांच्या संपर्कात आहे.

बंगालचे मुख्यमंत्री

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

# ४८८. अमृत कौर यांना पत्र

काझिरखिल,

पोस्ट रामगंज,

जिल्हा नोआखाली,

फेब्रुवारी २२, १९४७

चि. अमृत,

माझे मित्र रंगास्वामी (द हिंदूचे वार्ताहर) यांना मी पत्राचा मजकूर सांगत असतानाच तुझे पत्र आले. तुझे पत्र आले आणि तू काय लिहिले आहे ते पाहण्याकरिता मी मजकूर थांबवला. आता मी ते वाचले आहे आणि घाईघाईत त्याच्या उत्तराचा मजकूर सांगतो आहे. तू उल्लेख केलेली सर्व पत्रे मला मिळाली आणि मी त्यांचे उत्तरही पाठवले आहे. मला आता आठवत नाही तरी पण तारखा सांगण्याचा मी प्रयत्न करीन.

हे पत्र पोहोचेपर्यंत तुझा आवाज दुरुस्त झालेला असेल अशी आशा आहे. तुला तुझा हिंदी आणि रोमन-उर्दू कोश परत मिळण्याची पूर्ण शक्यता आहे. मी तो जवळ बाळगतो असे मला वाटत नाही. मी चौकशी करीन आणि मिळाल्याबरोबर सरदारांच्या (सरदार वल्लभभाई पटेल) पत्त्यावर तुला पाठवीन.

इथे थंडी नाही पण वाऱ्यात अजूनही ताजेपणा आहे. खरा उकाडा अजून सुरू व्हायचा आहे. रात्री चांगल्याच थंड आहेत आणि मी माझे ब्लॅन्केट वापरत असतो. परंतु माझ्याबद्दल काळजी करण्याचे कारण नाही. माझी प्रकृती चांगली आहे आणि मी माझे कार्यक्रम अगदी घड्याळाच्या काट्याबरहुकूम पाळत असतो.

माझ्या पदयात्रेचे दुसरे पर्व सोमवारी, या महिन्याच्या २४ तारखेला हेमचर येथे संपेल (गांधीजींच्या पदयात्रेच्या पहिल्या चरणाची सुरुवात श्रीरामपूर येथे जानेवारी २ ला झाली होती आणि दुसऱ्या चरणाची सुरुवात श्रीनगर येथे ५ फेब्रुवारीला झाली होती.). हे ठक्कर बापांचे (ठक्कर बापा, १८६९-१९५१; अध्यक्ष गुजरात सेवा मंदिर; सचिव, हरिजन सेवक संघ; महासचिव कस्तुरबा गांधी राष्ट्रीय स्मृती संस्था; भारतीय आदिमजाती संघाची स्थापना केली.) मुख्यालय आहे. तिसऱ्या चरणाची यात्रा सुरू करण्यापूर्वी हेमचर येथे काही दिवस थांबून प्रकृती कशी राहते हे मी पाहणार आहे. शक्य आहे की मला बिहारला लवकरच जावे लागेल. (बिहारमध्ये ऑक्टोबर २५ला सांप्रदायिक दंगली झाल्या होत्या आणि तो दिवस नोआखाली दिवस म्हणून पाळण्यात आला होता.) सरदार निरंजन सिंग गिल ३ दिवस बिहारमध्ये होते आणि त्यांनी तेथील दौरा केल्यानंतर परिस्थितीबद्दल आपले मत दिले आणि काही दिवसांकरिता का होईना मी बिहारमध्ये गेलो पाहिजे

अशी शिफारस केली आहे. मी बिहारच्या मुख्यमंत्र्यांच्या (श्रीकृष्ण सिंह) संपर्कात आहे आणि त्यांच्या उत्तराची वाट पाहत आहे.

मी दररोज सकाळी ७.३० ते ७.३५ वाजता माझी पदयात्रा सुरू करत असतो आणि दररोज मला सव्वा तासापेक्षा जास्त चालावे लागणार नाही अशा प्रकारे दौऱ्याची विभागणी करण्यात आली आहे. कमीत कमी मला अर्धा तास चालावे लागणार आहे. एकदा आणि फक्त एकदाच मला दीडतास चालावे लागले.

असे दिसते की शब्दकोशाच्या कामाचा तुला किती तरी त्रास होतो आहे (हा संदर्भ इंग्रजी-हिंदुस्तानी शब्दकोशाचा आहे व त्याचे १ सप्तेंबर १९४६ पासून हरिजनमध्ये दर पंधरवाड्याला प्रकाशन होत होते. मुळात सर्व सहकाऱ्यांनी मिळून हे काम करावे अशी योजना होती परंतु नंतर गांधीजींच्या आग्रहास्तव अमृत कौर यांनी या कामाची जबाबदारी घेतली; पाहा "इंग्रजी हिंदूस्तानी शब्दकोश" ऑक्टोबर २५, १९४६). तुला त्या कामातून मोकळे झालेले आवडेल काय? तुला जर ते आवडेल तर मी तुझा शब्दकोश काही दिवसांकरिता ठेवून घेईन.

खादीच्या संबंधातील परवान्याचे कलम काढून टाकण्यात आलेले आहे हे पाहून मला आनंद होतो. वनस्पतीच्या (उद्जन वायूच्या प्रक्रियेने तयार केलेले वनस्पती तेल.) संबंधीची परिस्थिती पंजाबच्या मुख्यमंत्र्यांना (खिज्र हयात खॉं तिवाना) समजावून सांगण्यात तू यशस्वी झाली आहे असे जर मला कळले तर मला किती तरी आनंद होईल! प्यारेलाल त्याच्या गावात आहे (गांधीजींबरोबर काम करणारे कार्यकर्ते नोआखाली जिल्ह्यातील वेगवेगळ्या खेड्यात विखुरले होते. पाहा "वृत्तपत्रांना वक्तव्य", नोव्हेंबर २०, १९४६) आणि आता मी जिथे आहे तिथून तो २०एक मैलांवर असेल. तिथे तो फार चांगले काम करत आहे. सूतिकागृह आणि रुग्णालयाची नीट व्यवस्था लावण्याकरिता सुशीला सेवाग्रामला गेली आहे. ते अतिशय वेगात वाढत आहे आणि फार लोकप्रिय झाले आहे. सेवाग्रामचे काम संपवल्याबरोबर ती आपल्या खेड्यात परतणार आहे. रेणुका (रेणुका रॉय) माझ्याबरोबर इथे गावात आहे. ती जशी दिसायची तशीच दिसते. तिला तिची फार काळजी घ्यावी लागते. एरव्ही ती चांगली आहे. आज सकाळीच तिने तुझी चौकशी केली होती. मी तिला सांगितले की मला तुझ्याकडून नियमितपणे माहिती कळत असते परंतु तू माझा वेळ वाचवण्याचा प्रयत्न करत असते. हिंदुस्तानातील या भागात तम्ही कधी याल काय म्हणून ती मला विचारत होती. मी तिला सांगितले की दररोज माझी ही जी या गावातून त्या गावात पदयात्रा सुरू आहे तोपर्यंत तरी नाही. परंतु मी जर एका ठिकाणी राहिलो आणि तुझी प्रकृती त्या वेळी चांगली असली आणि तुला विधानसभेच्या व इतर कामातून सवड असेल तर तू काही दिवसांकरिता यावे अशी माझी इच्छा असेल. हे ऐकून ती खुष झाली. ती आपल्या लहानशा चमूबरोबर काम करत असते.

मनूची गोष्ट मी अखेरकरिता ठेवली आहे. इथे प्रत्येकाला तिची प्रत्येक गोष्ट माहीत आहे. यामुळे तुझ्या माहितीकरिता मला तिच्याबद्दल एक दोन शब्द सांगायचे आहेत. परंतु त्याकरिता तुला वाट पाहावी लागेल कारण आता एक वाजत आला आहे आणि मला थोडी विश्रांती घेतली पाहिजे आणि तळव्यांमध्ये थोडी तेलमालीश करून घेतली पाहिजे.

स्नेह,

बापू

ता. क. दोन्ही शाली तू तुझ्याजवळच ठेव. आपण भेटू तेव्हा त्या मला दे. केंद्रीय सल्लागार मंडळाच्या सैनिकी प्रशिक्षणासंबंधीच्या शिफारसींना (पाहा टीप"पी. आर. चेंगलवरोया चेट्टीयार यांना पत्र", फेब्रुवारी २१, १९४७ ची तळटीप) तू संमती दिली काय?

आशीर्वाद,

बापू

मुळावरून. सी. डब्ल्यू. ४१९०. सौजन्य अमृत कौर. शिवाय जी. एन. ७८२६

--------------------

# ४८९. श्रीकृष्ण सिन्हा यांना पत्र

काझिरखिल,

पोस्ट रामगंज,

जिल्हा नोआखाली,

फेब्रुवारी २२, १९४७

श्रीकृष्ण सिन्ही,

या पत्राचा तुम्हाला जाहीर उपयोग करता यावा म्हणून मी याचा मजकूर इंग्रजीत सांगत आहे, परंतु मला आशा आहे की तशी आवश्यकता पडणार नाही. काल मला सरदार निरंजन सिंग भेटले आणि त्यांनी बिहारचा जो अल्प दौरा केला होता त्याचा अहवाल मला दिला. त्या अहवालात त्यांच्याकडून काही चुकीचे विधान केले गेले असेल तर ते तुम्हाला दुरुस्त करता यावे म्हणून त्या अहवालाची प्रत तुम्हाला पाठवण्याकरिता मी सांगितले आहे. त्यांना मी बंगालच्या मुख्यमंत्र्यांनाही अहवालाची प्रत पाठवण्याचा सल्ला दिला आहे आणि तुम्ही तो अहवाल तपासून त्यात काही चुका असल्यास त्या दुरुस्त कराव्या व त्या दुरुस्त्या मान्य करून अहवालाला अंतिम स्वरूप मिळेपर्यंत तो अहवाल गोपनीय ठेवण्याकरिताही मी त्यांना सांगितले आहे. मला आशा आहे की तो अहवाल तुम्हाला मिळाला असेल. त्यात एक गोष्ट अशी आहे की ज्यात माझा उल्लेख आहे. डॉ. सय्यद महमूद आणि इतरांना मी बिहारला भेट द्यावी अशी इच्छा आहे. सरदार निरंजन सिंग गिल यांचा त्या सूचनेला पाठिंबा आहे. तुम्हालाही तसेच वाटते काय? तुम्हाला काय वाटते ते निःसंकोचपणे सांगा. आता तुमच्या मंत्रिमंडळाने लवकरात लवकर निष्पक्ष चौकशी करण्याचा निर्णय जाहीर केलेला असल्यामुळे “जो वेळेवर देतो तो दुप्पट देतो” या म्हणीची आठवण करून देईन.

बिहारचे मुख्यमंत्री

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

---------------------

# ४९०. एक पत्र

फेब्रुवारी २२, १९४७

तुम्ही जर या मार्गावरील (ब्रह्मचर्याच्या) काटे, दगडधोंडे, आणि खाचखळगे यांना घाबराल तर तुम्ही या मार्गावरून चालू शकणार नाही. शक्य आहे की आपल्याला ठेचा लागतील, आपल्या पायातून रक्तस्त्राव होईल आणि कदाचित आपण मरूही. परंतु आपण माघार घ्यायला नको.

*   *   *

मला  जर यश आले तर माझ्या साहसाने जग संपन्न होईल. परंतु मी लबाड आहे वा भरकटलेला मूर्ख आहे असे आढळून आले तर मग जग मला नाकारील आणि माझा खोडसाळपणा उघड होईल. दोन्ही परिस्थितीत जगाचा लाभच होईल. दोन आणि दोन चार होतात हे जितके स्पष्ट आहे तितकेच हे स्पष्ट आहे.

महात्मा गांधी — द लास्ट फेज, खंड १ भाग २, पृष्ठ २२३

-------------------

# ४९१. प्यारेलाल यांना पत्र

फेब्रुवारी २२, १९४७

चि. प्यारेलाल,

आता ६.१५ वाजले आहेत आणि मी थोडा आडवा व्हायला पाहिजे. आणि जर माझा डोळा लागत असेल तर मी झोपेन. यामुळे या पत्राचा मजकूर मी सांगत आहे. मी तुझे पाठ वाचत असतो आणि मला ते आवडत असतात. आधी हस्ताक्षर बिघडवायचे आणि मग माफी मागायची हे चालणार नाही. उठता बसता क्षमा मागणे हे इंग्रजांची परंपरा पाळण्यासारखे आहे. ते योग्य नाही. क्षमा मागण्याची मुळीच आवश्यकता नसावी असे तुझे हस्ताक्षर असले पाहिजे. तू कमी लिहू शकतोस. आपण जे काही लिहू ते चांगल्याच अक्षरात लिहू असा जर तू निर्धार केला तर मनूकरिताचे पाठ तुझ्याकरिता ओझे होणार नाहीत. कर्तव्याचे कधीही ओझे व्हायला नको. आणि आपले अक्षर मोत्यासारखे सुंदर करणे हे आपले कर्तव्य असते. मला हे सगळे माहीत असूनही मी यानुसार वागत नाही. माझा हा दोष आहे असे तू समजायला पाहिजे आणि कोणी त्याचे अनुकरण करू नये.

मी तुझ्या दुसऱ्या रोटीचाही नमुना चाखून पाहिला आहे. ती कडक होती आणि तिच्यात काही तरी कमी होते. तू जर रोटी तयार करायला सुरुवात केली असेल आणि त्या करण्याचे तू ठरवले असेल तर तू पूर्वी करत होता त्याप्रमाणे का करत नाही? वेगळ्या शब्दांत तू तिच्यात लिंबू अथवा चिंचेचा वा टमाट्यांचा रस मिसळायला सुरुवात केली होती. जर तू असे केले तर रोटी हलकी व अगदी स्पंजासारखी नरम होईल. जर तुला तसे करायेच नसेल तर भाकरी करण्याबद्दल मी तुला आधीच सुचवले होते. तू जर कणिक भिजवलेल्या गोळ्यात पुरेसे तेल घातले तर ती सुरेख होईल. ती मला पाठवावी लागेल असा विचार करू नको. तुला जेव्हा ती पाठवणे सोयीस्कर असेल तेव्हा तू पाठवू शकतोस.

सुशीलाचे पत्र सोबत जोडलेले आहे. मी त्यामुळे फार प्रभावित झालो. या पत्रात व्यक्त केलेल्या इच्छेप्रमाणे ती वागू शकली तर तो या यज्ञातील फार मोठा विजय आहे असे मी समजेन. तूसुद्धा तिला प्रोत्साहन दिले पाहिजे. सुशीला आणि मनू या यज्ञात फार मोठी भूमिका बजावू शकतात हे मी तुला सांगितले नव्हते काय? आणि यातही मनूला फार मोठ्या कसोटीच्या प्रसंगातून जावे लागणार आहे. अजून तरी चांगली चिन्हे दिसत आहेत. त्याचे संपूर्ण यश फार मोठ्या प्रमाणात माझ्या स्वतःच्या कार्यक्षमतेवर अवलंबून आहे

यात काही शंका नाही. एकीकडे किशोरीलाल आणि इतरांना फार मोठी शंका आहे तर दुसरीकडे माझे सहकारी आहेत. माझे मन या दोघांमध्ये आंदोलत आहे. परंतु त्याचा जास्त कल कृतीकडे आहे.

केवळ कर्म करायचे आहे, फळाचा विचार करायचा नाही.

परशरामला लिहिलेले माझे पत्र उद्या जाईल. माझ्या बाजूने याबाबत पूर्ण दुर्लक्ष झाले होते. मी काय करू शकतो. एकदा का पत्र फाईलमध्ये गेले की मला त्याचा विसर पडतो. यावरून प्रत्येक गोष्ट वेळच्यावेळी केली पाहिजे. जे काही नंतर येते ते नंतर करावे.

कालच माझ्या हातात रोजनिशी पडली. आज मी मागील रोजनिशी पाठवत आहे.

रात्री, फेब्रुवारी २२, १९४७

मला तुझे दुसरे पत्र मिळाले. मी देवला आधीच सांगितले आहे की रोट्यांचा डबा पाठव. तो पाठवला की नाही हे मला माहीत नाही. आणि आता देव इथे नाही. मी विल्यमचे पत्र पाठवीन. कालू मिया दुरुस्त झाला तर तू फार मोठी गोष्ट साध्य केली असे म्हणावे लागेल. तू त्याला लिहीत आहे हीसुद्धा चांगली गोष्ट आहे. त्याच्याबद्दल मी कुलरंजनला लिहीत आहे. तो कदाचित काही सुचवू शकेल. तू त्याच्या डोळ्यांवरसुद्धा मातीच्या पट्ट्या ठेव. मी तसे दररोज करत असतो. सध्या मी कापडाच्या तुकड्याचा उपयोग करत नसतो तर सरळ मातीचा लेप लावतो. डोळे मिटलेले असले पाहिजे हे सांगण्याची आवश्यकता नाही. जयाचे पत्र सोबत जोडलेले आहे.

फेब्रुवारी २३, १९४७

मी फार घाईत आहे. मी हे तपासून न पाहता पाठवत आहे. आता माझ्या विषयाचे कागदपत्र पाठव.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

# ४९२. प्रार्थना प्रवचन

("गांधीजीज वाकिंग टूर डायरी"मधून उद्धृत)

चार कृष्णपूर,

फेब्रुवारी २२, १९४७

भाषणाच्या सुरुवातीलाच गांधीजी म्हणाले की मला बलुचिस्तानच्या एका मित्राने पाठवलेला एक मुद्रित कागद मिळाला आहे. त्यात मला वाटते की पैगंबर साहेबांची आणि इतर धर्मगुरूंचे वचन दिलेले आहेत. त्यात निवडलेली सर्वच वचने तशी तर चांगली आहेत परंतु माझे लक्ष महंमद पैगंबर यांच्या पुढील वचनाकडे विशेषेकरून वेधले गेले :

***ईश्वराने जेव्हा जमीन तयार केली तेव्हा ती इकडे तिकडे हलत होती,***

***तिला स्थिर करण्याकरिता त्याने तिच्यावर पर्वत ठेवले,***

***तेव्हा देवदुताने विचारले -***

***हे देवा तुझ्या निर्मितीत अजूनही अशी कोणती गोष्ट आहे काय***

***की जी या पर्वतांपेक्षाही अधिक शक्तिशाली आहे?***

***आणि ईश्वराने उत्तर दिले -***

***या पर्वतांपेक्षाही लोखंड श्रेष्ठ आहे कारण ते या पर्वतांना तोडते.***

***आणि तुझ्या निर्मितीत लोखंडापेक्षाही अधिक शक्तिशाली काही आहे काय?***

***होय, आग ही लोखंडापेक्षाही जास्त शक्तिशाली आहे कारण ती लोखंडाला वितळवते.***

***आगीपेक्षाही काही शक्तिशाली आहे काय?***

***होय, पाणी कारण तो आग विझवतो.***

***आणि पाणयापेक्षाही काही शक्तिशाली आहे काय?***

***होय वारा, कारण तो पाण्याला हलवतो.***

***हे आमच्या सर्वेसर्वा वाऱ्यापेक्षाही काही शक्तिशाली आहे काय?***

***होय, सज्जन माणसाने दिलेले दान. तो जर आपल्या उजव्या हाताने दान देत असेल***

***आणि डाव्या हाताला सांगत नसेल तर तो कोणत्याही गोष्टीवर विजय मिळवू शकतो.***

***प्रत्येक चांगले काम दानधर्म आहे. आपल्या भावासमोरील स्मितहास्य, भटकलेल्या माणसाला योग्य मार्गावर ठेवणे, तहानलेल्याला पाणी देणे हा सर्व दानधर्म आहे. यानंतर माणसाची खरी संपत्ती त्याने माणसांबरोबर केलेले सत्कर्म असेल. तो जेव्हा मरेल तेव्हा लोक विचारतील की त्याने आपल्या मागे कोणती संपत्ती ठेवली? परंतु देवदूत विचारतील की त्याने आपल्यापुढे कोणते सत्कर्म पाठवले आहे?***

यानंतर गांधीजींनी पुढील प्रश्नांची चर्चा केली -

प्रश्न - मंदिरप्रवेशाचा आग्रह का असावा? यावर कोणाचा आक्षेप असला तर यात अर्थातच सत्त्याग्रहाला वाव आहे हे आम्ही समजू शकतो. लोक जर आपल्या घरात सामाजिक प्रसंगात अस्पृश्यतेचा त्याग करत नसतील तर सहभोजनाला फार कमी अर्थ आहे, कारण जे लोक या सहभोजनात सहभागी होतात ते आपल्या घरात वा सामाजिक रीतीरिवाजात अस्पृश्यता सोडत नाहीत. कॉंग्रेसच्या लोकांनी वा पुरोगामी लोकांनी आयोजिलेल्या सहभोजनाकडे ते असा प्रसंग म्हणून पाहतात की ज्यात जातीचे नियम शिथिल केले जातात; माणूस जगन्नाथपुरीला जेव्हा जातो तेव्हा जगन्नाथाला वाहिलेल्या शिजलेल्या भातातील प्रसाद घेताना तो कोणत्या जातीच्या माणसाने दिला याचा ते विचार करत नाही तसेच हे असते. आपल्या सामाजिक जीवनावर प्रभाव टाकण्याइतकी अस्पृश्यताविरोधी भावना खोलवर गेलेली नाही. खाजगी घरातील हे अडथळे दूर करण्याकरिता आपण काय केले पाहिजे? मंदिर प्रवेशाबद्दलही एक प्रश्न आहे. स्वतंत्र भारतात लोकसेवा करत असलेल्या पुजाऱ्यांची निवड त्यांच्या जातीचा विचार न करता सक्षम स्त्री-पुरुषांमधून केली जाईल काय?

उत्तर - गांधीजी म्हणाले की मोठ्या प्रमाणात नामशुद्र राहत असलेल्या बंगालच्या या भागात हा प्रश्न अगदी समयोचित आहे. मी या प्रश्नाचे दुप्पट स्वागत करतो कारण त्याचा संबंध हिंदू समाजाच्या उतरंडीतील सर्वात खालच्या स्तरावर असलेल्या लोकांशी आहे आणि माझा जातीच्या उतरंडीवर विश्वास नाही. या शिडीच्या तळाच्या भागात येण्याकरिता मी सर्वांना आमंत्रित करतो. असे झाले तर आता जो प्रश्न मला विचारण्यात आला तशा प्रश्नाची आवश्यकताच राहणार नाही. मध्यंतरीच्या काळात मला या प्रश्नांची चर्चा करणे भाग आहे. मी या गोष्टीचे पूर्ण समर्थन करतो की जातीपातीच्या कारणामुळे कोणावरही जेव्हा कोणतेही बंधन नसेल तेव्हा अस्पृश्यतेला कोणतेच स्थान राहणार नाही आणि ती पूर्णपणे नाहीशी होईल. प्रतिबंध केवळ अस्वच्छता आणि दुराचरणावर राहील आणि तो सर्वांकरिता राहील. परंतु अस्पृश्यनिर्मुलनाच्या या

कार्यक्रमात मंदिरप्रवेशाचे पहिले स्थान आहे या विश्वासावर मी अढळ आहे आणि अस्पृश्यतेच्या दानवावर अंतिम विजयाची पार्श्वभूमी तयार करण्याकरिता आज आपण जसे करतो तसे सामाजिक सार्वजनिक सहभोजनांचे आयोजन करावे लागेल. स्पर्शास्पर्शतेचा त्याग केला गेला नाही तर हिंदू धर्माचे अस्तित्व राहणार नाही ही माझी भविष्यवाणी आहे. अशाच प्रकारे ब्रिटिश हिंदुस्तान जर पूर्णपणे स्वतंत्र झाला नाही तर ब्रिटिश वंश आपले नावसुद्धा गमावील. आणि पाहतापाहता ते आपल्या डोळ्यांसमोर नष्टसुद्धा होऊन राहले आहे.

प्रश्न - १९४१साली तुम्ही आर्थिक समतेसंबंधी लिहिले होते. समाजात उपयुक्त काम करणाऱ्या सर्व लोकांना - मग ते शेतकरी असो वा भंगी, स्थापत्यशास्त्रज्ञ असो की लेखापाल, डॉक्टर असो की शिक्षक - इतरांइतकेच पारिश्रमिक घेण्याचा नैतिक अधिकार आहे असे तुम्ही समजता काय? शिक्षण वगैरे सर्व गोष्टींच्या खर्चाची जबाबदारी राज्यावर राहील असे अर्थातच गृहीत धरण्यात आलेले आहे. सर्व माणसांना वैयक्तिक गरजांकरिता सारखाच पगार मिळायला नको काय हा आमचा प्रश्न आहे. आपण जर अशा प्रकारच्या समतेकरिता काम केले तर या प्रक्रियेत अस्पृश्यतेची पाळेमुळे लवकर छाटली जातील असे तुम्हाला वाटते काय?

उत्तर - या प्रश्नाच्या उत्तरात गांधीजी म्हणाले की स्वतंत्र हिंदुस्तानला जर असे आदर्श जीवन जगायचे असेल की ज्याची सर्व जगाला इर्षा वाटेल तर सर्व भंगी, डॉक्टर, वकील, शिक्षक, व्यापारी आणि इतरांना प्रामाणिकपणे दिवसभर केलेल्या कामाकरिता समान पगार मिळाला पाहिजे. हिंदुस्तानी समाज कदाचित कधीही या आदर्शापर्यंत पोहोचू शकणार नाही परंतु हिंदुस्तान जर सुखी व्हायचा असेल तर प्रत्येक हिंदुस्तानी माणसाने आपल्या जहाजाचे शीड या दिशेने, आणि इतर कोणत्याही दिशेन नाही, वळवले पाहिजे.

हरिजन, मार्च १६, १९४७

------------------

# ४९३. मौन दिवशी लिहिलेली चिठ्ठी

फेब्रुवारी २३, १९४७

आक्रमक आणि संरक्षणात्मक यातील अंतर पूर्णपणे न पटणारे आणि निरर्थक आहे. तुम्ही फुंकणीतून एकाच वेळी उष्ण आणि थंड हवा फुंकू शकत नाही. एक तर तुम्ही प्रेम करू शकता वा द्वेष करू सकता. इच्छांच्या बिजांना आणि साधनांना कसे हाताळायचे हे मी आधीच सांगितले आहे.

मो. क. गां.

मुळवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

---------------------

# ४९४. प्रार्थना प्रवचन

("गांधीजीज वाकिंग टूर डायरी"मधून उद्धृत. गांधीजींचे या दिवशी मौन असल्यामुळे प्रश्नोत्तरे वाचून दाखवण्यात आली होती.)

चारसोलादी,

फेब्रुवारी २३, १९४७

प्रश्न - नामशुद्र मुलींचा विवाह सामान्यपणे वयाच्या बाराव्या तेराव्या वर्षी केला जातो; पूर्वी हे वय सामान्यपणे ८-९ असायचे. वराला वधूकरिता १५० रुपये हुंडा द्यावा लागतो. या दोघांच्या वयातील अंतर सरासरी १२ ते १५ वर्षांचे असते. यामुळे नामशुद्र समाजात विधवांची संख्या जास्त असते. या जातीच्या एका भागात विधवाविवाह प्रचलित होता. परंतु स्वतःला श्रेष्ठ समजणाऱ्या दुसऱ्या भागाचे अनुकरण करत पहिल्या भागात अशा विवाहाची प्रथा बंद होऊ लागली आहे. बालविवाह आणि विधवाविवाह यांबद्दल तुमचा काय सल्ला आहे?

उत्तर - या प्रश्नाचे उत्तर देताना गांधीजी म्हणाले की माझे मत निश्चित आहे. पहिली गोष्ट तर ही आहे की समाजात बालविधवा निर्माणच होऊ नये. मी बालविवाहाचा विरोधक आहे. दुर्दैवाने नामशुद्रांनी बहुधा ही वाईट प्रथा तथाकथित उच्च जातींपासून घेतली आहे.

गांधीजी हुडाप्रथेच्यासुद्धा विरोधी होते. हुंडा म्हणजे मुलीची विक्री याहून अधिक काहीही नाही असे त्यांचे मत होते. ते म्हणाले की नामशुद्रातही जाती असाव्या ही दुःखद गोष्ट आहे आणि त्यांनी आपल्यामधील जातींचा समूळ नाश केला पाहिजे. तसेच केवळ एकच जात म्हणजे भंगी जात असावी आणि सर्व हिंदूंना भंगी असल्याचा आणि इतर कोणीही नसल्याचा अभिमान वाटला पाहिजे असा जो सल्ला मी वारंवार दिला आहे त्याची नामशुद्रांनी आठवण ठेवावी. ही गोष्ट नामशुद्रांनाही तितकीच लागू होते.

बालविवाह जेव्हा बंद होतील तेव्हा असल्याच तरी फार कमी तरुण विधवा असतील. एक सर्वसामान्य नियम म्हणून जीवनभराकरिता एक पुरुष एक पत्नी वा एक स्त्री एक पती असायला पाहिजे. परंपरेमुळे लादलेले वैधव्य तथाकथित उच्च जातीतील स्त्रियांना स्वाभाविक वाटू लागले आहे. पुरुषांकरिता मात्र हा नियम अगदी उलट आहे. ही लाजिरवाणी गोष्ट आहे परंतु समाजाची ही दयनीय अवस्था जोपर्यंत कायम आहे तोपर्यंत मी सर्वच तरुण विधवांच्या विवाहाचा पुरस्कर्ता झालो आहे. माझा स्त्री-पुरुष समतेवर विश्वास आहे आणि यामुळे पुरुषांना जे अधिकार आहेत तेच स्त्रियांना असले पाहिजे असाच विचार मी करू शकतो.

प्रश्न - तुम्ही म्हणता की तुम्ही आंतर्धर्मीय विवाहाच्या बाजूने आहा (पाहा "प्रार्थना प्रवचन", फेब्रुवारी २१, १९४७) आणि त्याचबरोबर तुम्ही म्हणता की प्रत्येक पक्षाने आपापल्या धर्मात राहिले पाहिजे आणि यामुळे तुम्ही नागरी विवाहसुद्धा सहन केले आहेत. अशी काही उदाहरणे आहेत काय की वेगवेगळ्या धर्माच्या लोकांनी विवाह करूनही ते अखेरपर्यंत आपापल्या धर्मातच राहिले; आणि नागरी विवाहाच्या संस्थेचा स्वीकार म्हणजे धर्म नाकारणे नाही काय आणि यामुळे धर्माचरणात शिथिलता येणार नाही काय?

उत्तर - गांधीजी म्हणाले की हे प्रश्न योग्य आहेत. दोन्ही पक्ष आपापल्या धर्मात कायम राहिल्याची उदाहरणे माझ्या डोक्यात नाहीत. कारण मला जी उदाहरणे माहीत आहेत ते मित्र अजून जिवंत आहेत. असे असले तरी मी अशी उदाहरणे पाहत आहे की जे स्त्री-पुरुष वेगवेगळ्या धर्माचे आहेत आणि तरीही ते आपापल्या धर्मांचे अनुसरण करत आहेत आणि त्यांची आपापल्या धर्मावरील निष्ठा कमी झालेली नाही. परंतु मी तर इथपर्यंत म्हणेन की याकरिता आपल्याला जुन्या इतिहासातील उदाहरणे शोधत बसण्याची आवश्यकता नाही. आपण नवीन उदाहरणे घडवली पाहिजे. असे केले तर जे लोक घाबरतात ते घाबरणे सोडून देतील. नागरी विवाहाबद्दल बोलायचे तर सुधारणेकरिता नागरी विवाहाची आवश्यकता आहे यावर माझा विश्वास नाही.

हरिजन, मार्च १६, १९४६

--------------

# ४९५. जवाहरलाल नेहरू यांना पत्र

काझिरखिल,

पोलीस स्टेशन - रामगंज,

जिल्हा नोआखाली

आज मौनवार असल्यामुळे मी हे लिहीत आहे. परंतु तुला वाचणे सोपे व्हावे म्हणून मी हे टाईप करून घेणार आहे.

मी ॲटलींचे भाषण वाचले (हाऊस ऑफ कॉमन्समध्ये फेब्रुवारी २०ला; त्यातील उताऱ्यांकरिता पाहा परिशिष्ट १.). एखाद्या अप्रिय शब्दाने वा वाक्प्रचाराने तुला कदाचित मी अडचणीत तर टाकणार नाही ना या भीतीमुळे सध्या मी याबद्दल काही बोलत नाही.

मी जर त्यांच्या भाषणाचा अर्थ बरोबर लावला असेल तर स्पष्ट आहे की येथील माझ्या सर्व भाषणांमधून या सर्व गोष्टींची मी पूर्वकल्पना दिली होती. मी लावलेला या भाषणाचा अर्थ हा आहे - ज्या भागांना स्वातंत्र्य हवे आहे आणि जे ब्रिटिशांच्या संरक्षणाशिवाय राहू शकतात त्या भागांच्या स्वातंत्र्याला मान्यता दिली जाईल. ज्यांना ब्रिटिश हवे आहे तिथे ते राहतील. ज्या प्रांताना वा प्रांतातील भागांना पाकिस्तान हवा आहे तिथे पाकिस्तान होईल. कोणावरही या बाजूने वा त्या बाजूने बळजबरी केली जाणार नाही. काँग्रेसच्या प्रांतात सुज्ञपणा असेल तर त्यांना जे हवे आहे ते मिळेल.

बरेचसे काही घटनासमिती काय करते यावर आणि अंतरिम सरकार म्हणून तू काय करतोस यावर अवलंबून राहील (जवाहरलाल नेहरू अंतरिम सरकारचे उपाध्यक्ष, विदेश मंत्री कॉमनवेल्थ रिलेशन्स मंत्री होते).

ब्रिटिश सरकार जर प्रामाणिक असेल आणि त्याला प्रामाणिक राहण्याची त्यांच्यात क्षमता असेल तर ही घोषणा चांगली आहे. नाही तर ती धोक्याची आहे.

आता सरदार निरंजन सिंग गिल यांच्याबद्दल. ते बिहारमध्ये होते आणि त्यांनी पाठवलेल्या अहवालात श्रीकृष्ण सिन्हा मंत्रिमंडळावर (पाहा "निरंजन सिंग गिल यांना पत्र", फेब्रुवारी ८, १९४७.) ठपका ठेवला आहे असे दिसते. तू त्यांना भेट आणि त्यांचा अहवाल पाठव. माझ्या सल्ल्याप्रमाणे तो सुऱ्हावर्दी आणि सिन्हा यांच्याकडे पाठवण्यात आला आहे. त्यांचे आणि सरदार निरंजन सिंग यांचे पटले नाही. ते संपूर्ण प्रकरण वाईट आहे.

आझाद हिंद फौजेत फूट पडली आहे हे तुला बहुधा माहीत असावे. वरील अहवाल पाहता मला कदाचित बिहारमध्ये जावे लागेल. देवाला माहीत. तू हे मित्रांना दाखवू शकतोस.

आशीर्वाद,

बापू (हे हिंदीत आहे.)

ता. क. - डॉ. दादू आणि डॉ. नायकर यांच्या विरोधात डरबन उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाबद्दलची तार तुला मिळालीच असेल. (दक्षिण आफ्रिका सरकारने युसूफ दादू आणि जी. एम. नायकर यांना पारपत्र (पासपोर्ट) नाकारले होते व त्यांचे ओळखपत्र जप्त केले होते.) तू तातडीने कृती केली असशील अशी आशा आहे. मी एफ. एम. स्मट्स यांना तार पाठवली आहे.

बापू

मुळावरून. जवाहरलाल नेहरू पेपर्स. (एम. ओ. मथाई). सौजन्य नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय

--------------------

# ४९६. जे. बी. कृपलानी यांना पत्र

(१८८८-१९८२; प्राचार्य, गुजरात विद्यापीठ, १९२०-२७; महासचिव भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, १९३४-४५; १९४६ साली काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवड झाली परंतु १९४७साली राजीनामा दिला; सदस्य घटनासमिती; १९५१साली काँग्रेसचा राजीनामा दिला.)

काझिरखिल,

रामगंज पोलिस स्टेशन,

जिल्हा नोआखाली,

फेब्रुवारी २४, १९४७

हे अत्यंत व्यक्तिगत पत्र आहे परंतु गुप्त नाही.

मनू गांधी रक्ताच्या नात्याने माझी नात आहे आणि माझ्या यज्ञाचा भाग म्हणून कदाचित हा माझ्या जीवनातील शेवटचाच प्रयोग असू शकेल. माझेच रक्त असावे अशा प्रकारे ती माझ्या अंथरुणात झोपत असते. यामुळे वल्लभभाई, किशोरीलाल, बहुधा सी. आर. (चक्रवर्ती राजगोपालाचारी) आणि इतर माझ्या काही जवळच्या मित्रांच्या मैत्रीला मला मुकावे लागले आहे. यात देवदासचाही समावेश आहे. या सर्वांनी माझा त्याग केला आहे. ते जे काही म्हणतात त्या दृष्टीकोनातून सरदार आणि किशोरीलाल यांच्याही पूर्वीचे माझे प्रिय मित्र आणि सहकारी म्हणून तुम्ही आता तुमच्या भूमिकेचा पुनर्विचार केला पाहिजे. कदाचित याबाबतीत सुचेता तुम्हाला काही मदत करू शकेल. या प्रकरणासंबंधी तिला काही माहिती आहे. इतक्या सगळ्या सहकाऱ्यांच्या मैत्रीकरिता मी पात्र आहे काय? या विषयावर मी सखोल विचार केला आहे. मला माझ्याकरिता जे सत्य आहे असे वाटते त्याला संपूर्ण जगाने जरी माझा त्याग केला तरी मी सोडण्याचे साहस करू शकत नाही. माझा हा मोह आणि भ्रम असण्याचीही शक्यता आहे. असे असेल तर त्याची मला स्वतःलाच प्रचिती यायला पाहिजे. याआधी मी सर्वनाशाचा धोका पत्करलेला आहे. जर तसे खरोखरच व्हायचो असेल तर होऊ दे.

मी या मुद्द्यावर युक्तिवाद करायला नको. माझ्या विचारातील तीव्रता केवळ मी तुम्हाला कळवली आहे.

तुम्ही याची चर्चा सरदार आणि राजाजींबरोबर करावी अशी माझी सूचना आहे. आणि मग तुम्ही निष्कर्षावर पोहोचा आणि मला कळवा. तुम्ही माझ्या संबंधाचा विचार केवळ मित्र म्हणूनच नाही तर अध्यक्ष म्हणूनही केला पाहिजे. तुम्ही अर्थातच याची चर्चा जवाहरलाल आणि मौलाना यांच्याशी करू शकता. या

बाबतीत माझ्या भावनांचा विचार करू नका. माझ्या कोणत्याच भावना नाहीत. कोणतीही किंमत द्यावी लागली तरी मला जे सत्य दिसते त्यानुसार मी आचरण केले पाहिजे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

--------------------

# ४९७ प्यारेलाल यांना पत्र

फेब्रुवारी १२, १९४७

चि. प्यारेलाल,

प्रोफेसरांना पाठवायच्या पत्राची प्रत सोबत आहे. (पाहा आधीचा विषय.) त्यावरून काय सुरू आहे ते तुला कळेल. हरिजनशी माझा असलेला संबंध तुटला असे दिसते. मला किंचितही काळजी वाटत नाही. मला मनूच्या मनस्थितीची काळजी वाटते. आणि माझ्याकरिता हीच मोठी परीक्षा आहे. केवळ सत्याचाच विजय होवो.

आशीर्वाद,

बापू

ता. क.  - माझ्याबद्दलची कागदपत्रे पाठव.

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

--------------------

# ४९८. अमृतलाल वि. ठक्कर यांच्याबरोबर चर्चा

फेब्रुवारी २४, १९४७

(फेब्रुवारी २७, १९४७च्या अमृत बझार पत्रिकेमधून. मात्र स्रोतात "फेब्रुवारी २५ ही तारीख आहे.")

बापा - नोआखालीत आताच हा प्रयोग कशासाठी?

गांधीजी - तुम्ही चुकताहात बापा. हा प्रयोग नाही, हा तर माझ्या यज्ञाचा अविभाज्य भाग आहे. माणूस प्रयोग सोडू शकतो, परंतु आपले कर्तव्य सोडू शकत नाही. आता मी जर ही गोष्ट माझ्या प्रयोगाचा भाग समजत असेन - माझे पवित्र कर्तव्य समजत असेन - तर संपूर्ण लोकमत जरी माझ्या विरोधात गेले तरी मी ती गोष्ट सोडू शकणार नाही. या वेळी मी आत्मशुद्धीच्या कार्याला लागलेलो आहे. पाच महाव्रते माझ्या साधनेचे पाच आधारस्तंभ आहेत. ब्रह्मचर्य हे त्यातीलच एक महाव्रत आहे. परंतु पाचही महाव्रते मिळून एक अखंड आणि अविभाज्य घटक तयार होतो. ही सर्व व्रते एकमेकांशी संबंधित आणि अन्योन्याश्रयी आहेत. यातील एका जरी व्रताचा भंग झाला तरी इतर व्रतांचा भंग होतो. यामुळे लोकलज्जेस्तव मी ब्रह्मचर्याच्या व्रतासंबंधातच माघार घेतली तर मी केवळ ब्रह्मचर्य व्रताचाच भंग करणार नाही तर सत्य, अहिंसा आणि अन्य व्रतांचाही भंग करीन. इतर व्रतांच्या संबंधात मी विचारात आणि आचारात भेदभाव करत नाही यामुळे परिस्थितीला वश होऊन मी माघार घेतली तर त्यामुळे माझ्या ब्रह्मचर्याची धार बोथट होणार नाही काय आणि माझे सत्याचरण दुषित होणार नाही काय? मी नोआखालीत आलो तेव्हापासूनच मी स्वतःला एक प्रश्न विचारत होतो - 'माझी अहिंसा काम का करत नाही? हिच्या जादूने लोक का प्रभावित होत नाहीत? ब्रह्मचर्याबद्दल मी जो सैलपणा दाखवला त्यामळे तर असे होत नसेल?'

बापा - तुमची अहिंसा अयशस्वी झालेली नाही. झाडाकरिता लाकूड गमावू नका.... (इथे मुळातच वगळलेले आहे.) तुम्ही नोआखालीला आला नसता तर नोआखालीची काय अवस्था झाली असती याचा थोडा विचार करा. परंतु ब्रह्मचर्याविषयी तुमच्याप्रमाणे लोक विचार करत नाहीत.

गांधीजी - तुमचा युक्तिवाद मान्य केला तर जी गोष्ट मला सत्य आणि योग्य वाटते ती मी जगाच्या नाराजीच्या भीतीमुळे सोडून दिली पाहिजे असा त्याचा अर्थ होईल. मी जर माझ्या जीवनात असा वागलो असतो तर आज मी कुठे असतो याचा विचार करूनच माझा थरकाप उडतो. कुठेतरी एखाद्या खड्ड्याच्या तळाशी मी आढळलो असतो. तुम्हाला याची कल्पना नाही बापा, परंतु माझ्या डोळ्यांसमोर याचे चित्र उभे

राहते. आताचे माझे हे साहस यज्ञ, त्याग, प्रायश्चित्त आहे असे मी म्हणालो आहे. याचा अर्थ सर्वोच्च आत्मशुद्धी. जोपर्यंत माझ्या मनातील गोष्ट मी उघडपणे प्रत्यक्षात आणण्याचे साहस करू शकत नाही तोपर्यंत आत्मशुद्धी कशी होऊ शकेल? माणसाला आपल्या संपूर्ण अस्तित्वाच्या दृष्टीने एखादी गोष्ट पवित्र आहे असे वाटत असेल तर त्यावेळी त्याला कुणाच्या समर्थनाची वा परवानगीची आवश्यकता असते काय? अशा परिस्थितीत माझ्या मित्रांकरिता दोनच मार्ग मोकळे आहेत. ते माझे अनुसरण करू शकत नसतील वा त्यांना माझा युक्तिवाद पटत नसेल तरी एक तर त्यांनी माझ्यावर, माझ्या हेतूंच्या शुद्धतेवर आणि प्रामाणिकपणावर श्रद्धा ठेवली पाहिजे वा त्यांनी माझ्यापासून दूर व्हायला पाहिजे. मधला कोणताही मार्ग नाही. सत्याचरणाच्या यज्ञाची मी सुरुवात केली असताना माझ्या विश्वासाच्या तर्कशुद्ध निष्कर्षांना व्यावहारिक स्वरूप देण्यापासून माझी सुटका होऊ शकत नाही. असे केले तर तो मित्रांशी विश्वासघात होईल. यामुळे अ, ब वा क हे त्यांनी निवडलेल्या मार्गाने जाऊ शकतात परंतु या कसोटीपासून मी दूर कसा पळू शकतो? माझ्या विश्वासांना मी लपवूनही ठेवू शकत नाही. असे केल्याने माझ्या मित्रांची मी प्रतारणा केल्यासारखे होईल. मी तर माझ्या मनाचा निर्धार केला आहे. ईश्वराच्या ज्या निर्जन मार्गावरून मी वाटचाल सुरू केली आहे त्या मार्गावर या जगातील सहकाऱ्यांची गरज नाही. यामुळे ते लोक कल्पना करतात तसा मी खरोखरच भोंदू असेन तर त्यांनी माझी भर्त्सना करायला पाहिजे. अशा शब्दांत जरी ते म्हणणार नसतील तरी त्यामुळे मला महात्मा मानणाऱ्या कोट्यवधी लोकांचा भ्रम दूर होईल. अशा रीतीने माझे पितळ उघडे पडले तर ते मला आवडेल. माझ्याकडे हजारो हिंदू आणि मुसलमान स्त्रिया येत असतात. त्या माझ्याकरिता माझ्या आया, बहिणी वा मुलींप्रमाणे असतात. परंतु त्यांच्याबरोबर एकाच अंथरुणात झोपण्याची वेळ येत असेल आणि माझा दावा आहे तसा मी खरोखर ब्रह्मचारी असेन तर मी संकोच करायला नको. या कसोटीतून मी पळ काढला तर मी भित्रा आणि तोतया आहे असे तुम्ही समजायला पाहिजे.

बापा - तुमच्या उदाहरणाची लोकांनी नक्कल केली तर?

माझ्या उदाहरणाचे अंधानुकरण करण्यात आले वा अविवेकाने त्याचा दुरुपयोग करण्यात आला तर समाज ती गोष्ट सहन करणार नाही आणि समाजाने ती सहन करूही नये. परंतु कोणी जर प्रामाणिकपणे आणि खरा प्रयत्न करत असेल तर त्याचे समाजाने स्वागतच केले पाहिजे आणि ते समाजाकरिता हितकारकही होईल. माझा शोध संपताच मी त्याचे संपूर्ण जगासमोर निष्कर्ष जाहीर करीन.

बापा - तुमच्यात असे काही वाईट असेल याची तर मी कल्पनाही करू शकत नाही. अखेरीस मनू ही तुमची नात आहे - तुमच्या हाडामासाची आहे. मी कबूल करतो की सुरुवातीला माझ्या मनात काही शंका आणि भ्रम या दोन्ही गोष्टी होत्या. तुमच्यासमोर माझ्या शंका व्यक्त करण्याकरिता मी अतिशय नम्रपणे आलो होतो. मला कळत नव्हते. आज आपली चर्चा झाल्यानंतरच तुम्ही काय करण्याचा प्रयत्न करता आहा याचा अर्थ मला कळू शकला.

गांधीजी - यामुळे खरोखर काही फरक पडतो काय? तो पडला नाही आणि पडायलाही नको. मनू आणि इतर स्त्रिया यांच्यात तुम्ही भेद करता असे दिसते. माझे मन असा भेदभाव करत नाही. माझ्या दृष्टीत त्या सर्व समान आहेत, माझ्या मुली आहेत. (स्रोतानुसार या संभाषणाचा एक अनपेक्षित परिणाम झाला. मनू आली आणि म्हणाली तुम्ही जे काही करत होता त्याबद्दल सुरुवातीला ठक्कर बापांच्या मनात शंका होती. परंतु सहा दिवसांच्या सहवासानंतर आणि सूक्ष्म निरीक्षणानंतर त्यांच्या सर्व शंका दूर झाल्या आहेत. यामुळे तुमची संमती असल्यास काही काळाकरिता हा प्रयोग स्थगित करण्याची ठक्कर बापांची विनंती मान्य करण्यात मला कोणतीही हानी दिसत नाही. याशिवाय पाहा "विनोबा भावे यांना पत्र", मार्च १०, १९४७)

महात्मा गांधी - द लास्ट फेज, खंड १, भाग २, पृष्ठ २२४-२६ (महात्मा गांधी - अखेरचे पर्व, खंड २, पृष्ठ २७०-७२)

---------------

# ४९९. प्रार्थना प्रवचन

("गाधीजीज वाकिंग टूर डायरी"मदून उद्धृत)

हेमचर,

फेब्रुवारी २४, १९४७

आपल्या पदयात्रेच्या दुसऱ्या भागाचा या अखेरच्या टप्प्याचा उल्लेख करत गांधीजी म्हणाले की माझ्या पदयात्रेचा हा दुसरा भाग निर्विघ्नपणे पार पाडल्याबद्दल मी ईश्वराचे आभार मानतो. बापा हरिजनांचे महापुरोहित आणि सेवक आहेत. माझ्या यात्रेच्या या टप्प्याच्या कार्यक्रमात मी हेमचरचाही समावेश करावा अशी त्यांची तीव्र इच्छा होती. दंगलग्रस्त गावांमध्ये एकेक कार्यकर्ता पाठवण्याचा विचार मी मांडला तेव्हा बापांनी आपले कार्यक्षेत्र म्हणून हेमचरची निवड केली होती.

यानंतर तार आणि इतर संपर्क माध्यमांद्वारे आलेल्या संदेशांचा उल्लेख करत गांधीजी म्हणाले की अॅटली यांच्या वक्तव्यावर (पाहा परिशिष्ट १) मला माझे मत काय आहे हे विचारण्यात येत आहे. यावर अधिकृत मत तर कॉँग्रेस, लीग आणि इतर संस्थासुद्धा देतील हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. तरीही इतके तर मी सांगूच शकतो की या वक्तव्यामुळे विविध पक्षांना जे काही सर्वोत्तम वाटेल ते करण्याची त्यांच्यावर जबाबदारी येऊन पडली आहे. ब्रिटिश सत्ता जून १९४८मध्ये वा त्यापूर्वी संपेल असे त्या वक्तव्यात घोषित करण्यात आले आहे. आता या गोष्टीतून काही सकारात्मक निघणे वा न निघणे हे या पक्षांवर अवलंबून आहे. जगातील कोणताही शक्ती त्यांची सामूहिक इच्छा डावलू शकत नाही. आणि जोपर्यंत माझा संबंध आहे माझे ठाम मत आहे की हिंदू आणि मुसलमान जर आपले मतभेद दूर करतील आणि कोणत्याही बाह्य दडपणाशिवाय एकत्र येतील तर यामुळे केवळ त्यांच्याच राजकीय परिस्थितीत सुधारणा होणार नाही तर त्यांचा प्रभाव संपूर्ण हिंदुस्तानवर आणि कदाचित जगावरही पडेल.

श्रोत्यांमध्ये सर्वात जास्त संख्या नामशुद्रांची होती. यामुळे त्या लोकांच्या मनात जो विषय होता त्या विषयावर गांधीजी स्वाभाविकपणेच आले. त्यांना सावध करत गांधीजी म्हणाले की तुम्ही लोकांनी स्वतःला कधीही पतित वा अस्पृश्य समजू नये. हे तथाकथित उच्च वर्गाचे लोकच खरे अपराधी आहेत; तुम्ही जे काही झाला आहा त्याकरिता ते जबाबदार आहेत. तुमच्या लक्षात जर हे सत्य येईल तर तुम्ही कधीही तथाकथित उच्चवर्णीयांच्या वाईट प्रथांचे अनुकरण करण्याची चूक करणार नाही.

तुमच्यामध्ये बालविवाहाची प्रथा आहे आणि उच्चवर्णियांचे पाहून तुम्ही त्यांना पुनर्विवाह करू देत नाही हे पाहून मला दुःख होते. मला असे कळले आहे की यामुळे व्यभिचारामुळे होणाऱ्या विकारांचे तुमच्यात प्राचुर्य आहे.

विधानसभा वा इतर कोणत्याही बाहेरील अधिकरणामुळे तुमचे कल्याण होणार नाही. ते तर तुमच्या प्रयत्नांवर अवलंबून आहे. स्वर्गीय मालवीयजींचे (मदन मोहन मालवीय, १८६१-१९४६; अध्यक्ष भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, १९०९ आणि १९१८; सदस्य विधान सभा; संस्थापक बनारस हिंदू विद्यापीठ आणि त्याचे कुलगुरू १९१९ ते १९३९) पुढील वचन लक्षात ठेवले पाहिजे - ईश्वराच्या संततीला प्रामाणिकपणाच्या कमाईने एक कवडी जरी मिळाली तरी त्यावर त्याने समाधान मानले पाहिजे. असे कराल तर तुम्ही लोक सुखी व्हाल आणि अस्पृश्यता नाहीशी होईल. मग तथाकथित उच्चवर्णियांनी तुमच्याविरुद्ध जे पाप केले आहे त्याची त्यांना लाज वाटेल.

जी विनाशक कृत्ये झाली होती त्यांचा निर्देश बापूंनी केला. बापू म्हणाले की मला याचा खेद होतो परंतु याकरिता मी अश्रू ढाळत बसणार नाही आणि विनाश करणारांच्या विरोधात दुर्भावनाही ठेवणार नाही. तुम्हीसुद्धा तुमच्या दुर्दैवावर रडायला नको. तुम्हाला कठोर परिश्रम करण्याची सवय आहे वा असायला पाहिजे. सरकारकडे तुम्ही न्यायाची मागणी केली पाहिजे आणि तो न्यायही वेळेवर मिळाला पाहिजे. परंतु तुम्हाला जरी ही मदत मिळाली नाही तरी तुम्ही हार मानायला नको. तुमचे जीवन नव्याने सुरू करण्याकरिता तुम्ही तुमच्या हातांवर आणि पायांवर विश्वास ठेवला पाहिजे. जे स्वतःला मदत करतात त्यांना ईश्वर नेहमीच मदत करत असतो. तुम्ही ईश्वरावर आणि सतत परिश्रम करणाऱ्या सर्वसामान्य माणसावर विश्वास ठेवला पाहिजे.

हरिजन, मार्च, १६, १९४७

-----------------

# ५००. रोजनिशीतून

फेब्रुवारी २४, १९४७

सकाळच्या प्रार्थनेनंतर बंगाली १ या अंकावरून हात फिरवला आणि २ हा अंक दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर निओ आणि नाओ या (बंगाली क्रियापदाचे घेणेचे हे भविष्यकालीन आणि वर्तमानकालीन रूप आहे.) यातील अंतर समजावून घेण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. एवढ्यात मनू संत्र्यांचा रस घेऊन आली. तिलाही मी हाच प्रश्न विचारला. तीसुद्धा समाधानकारक उत्तर देऊ शकली नाही. त्यात अजून १० मिनीट गेले. निर्मल बाबूंना बोलावून त्यांनाही मी हाच प्रश्न विचारला. त्यांनी काहीसे बरोबर उत्तर दिले परंतु अखेरीस तेसुद्धा गोंधळले आणि त्यांनी हार मानली. मध्येच त्यांनी सरदार गिलची फाईल दिली. त्यामुळे गिलबद्दलची चर्चा सुरू झाली. ही ६.३५पर्यंत सुरू होती. 'अ'ला पत्र लिहिले. त्यानंतर विश्रांतीकरिता १० मिनीट आडवा झालो; ७.२५ला उठलो, खड्ड्याच्या संडासाची तपासणी केली आणि दिवसाच्या पदयात्रेकरिता निघालो.

महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड २, पृष्ठ २४१-२

-----------------

# ५०१. केदारनाथ कुळकर्णी यांना तार

हेमचर

[फेब्रुवारी २४, १९४७ला वा त्यानंतर]

(गांधीजी हेमचरला २४ फेब्रुवारी ते २ मार्च १९४७पर्यंत होते.)

नाथजी

शांतिकुंज, नायगाव क्रॉस रोड,

दादर, मुंबई - १४

तुमचे पत्र काळजीपूर्वक वाचले. त्यात चुकीची विधाने आहेत. आपल्यात फार मोठे मतभेद आहेत असे त्यावरून दिसते. असे असले तरी तुम्हाला सोयास्कर असेल तर आणि प्रकृतीची हानी न होता येता येत असेल तर या. प्रवास लांब आणि थकवणारा आहे. (केदारनाथ कुळकर्णी आणि स्वामी आनंद बिहारमध्ये १४ मार्चला पोहोचले होते आणि त्यांनी गांधीजींशी मार्च १५ आणि १६ तारखेला चर्चा केली होती; पाहा “स्वामी आनंद आणि केदार नाथ यांच्याशी चर्चा”, १५।१६मार्च १९४७)

गांधी

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

---------------------

# ५०२.किशोरीलाल मश्रूवाला यांना तार

हेमचर (गांधीजी हेमचरला २४ फेब्रुवारी ते २ मार्च १९४७पर्यंत होते.),

तुझी तार. नाथजींना लांब तार पाठवली आहे.

बापू

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

## ५०३. हक यांना चिठ्ठी

(श्री हक यांनी फेब्रुवारी २४, १९४७च्या बंगालीतील पत्रात गांधीजींना लिहिले की तुम्ही इस्लामचा उपदेश करत असलेले मला स्वप्नात दिसला.)

[फेब्रुवारी २४, १९४७ला वा त्यानंतर] (गांधीजी हेमचरला २४ फेब्रुवारी ते २ मार्च १९४७पर्यंत होते.),

मला तुमची चिठ्ठी मिळाली. मी साधा माणूस आहे, मला स्वप्नांचा अर्थ करता येत नाही. “ईश्वराला घाबरा आणि तुमच्या शेजाऱ्यांवर स्वतःवर करतो त्याप्रमाणे प्रेम करा” हा माझा जीवनाबद्दलचा सिद्धांत आहे. (यानंतर सूचना होती “याचे बंगालीत रूपांतर करा आणि मग मी यावर सही करीन.”)

फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. १०२३१. सौजन्य - वसंत आपटे. शिवाय - जी. एन. ११३९८

-----------------

## ५०४. महेंद्र प्रताप यांना पत्र

काझिरखिल,
पोलिस स्टेशन रामगंज,
जिल्हा नोआखाली,
फेब्रुवारी २५, १९४७

प्रिय राजा साहेब,

मला तुमची तार मिळाली. तुम्ही केलेला युक्तिवाद बरोबर आहे म्हणून नाही तर त्यामागील खोलवर कारणांमुळे तुम्ही जवळपास बरोबर आहा. मी आधीच ‘बहुधा’ आणि ‘जवळपास’ हे क्रियाविशेषण योजिलेले आहेत.

तुमचा विश्वासू,

राजा महेंद्र प्रताप,

वृंदावन

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

# ५०५. अमतुस्सलाम यांना पत्र

फेब्रुवारी २५, १९४७

प्यारी बेटी,

तुझी दोन पत्रे माझ्याजवळ पडून आहेत. अतिशय काम असल्यामुळे मी तुला लिहू शकलो नाही. हेसुद्धा मी तुला अगदी मोठ्या सकाळी लिहीत आहे. मी तुझे बंगाली पत्र वाचले आहे आणि माझी सतीश बाबूंशी (सतीश चंद्र दास गुप्ता) चर्चा झाली आहे. तुला पैशाची गरज नाही. हे बोरकामता नाही (अमतुस्सलाम यांनी कस्तुरबा सेवा मंदिर, बोरकामता येथे १९४४ ते १९४६पर्यंत काम केले होते.). कताई करणारे कोण आहेत? ते हिंदू आहेत की मुसलमान? उपोषण सोडून तू कोणतीही चूक केलेली नाही (ऑक्टोबर १९४६पासून अमतुलस्सलाम नोआखालीत काम करत होत्या. हिंदूंचे पूजेचे खड्ग कोणी तरी चोरले होते. ते परत करावे म्हणून त्यांनी उपोषण केले होते. तो उपवास त्यांनी गांधीजींच्या सल्ल्याप्रमाणे २५व्या दिवशी म्हणजे २० जानेवारीला सोडला होता. पाहा “प्रार्थना प्रवचन”, जानेवारी २१, १९४७). तुला नवजीवन मिळाले की नाही हे केवळ ईश्वरालाच माहीत आहे. तू जर जीपमध्ये एका दिवसाकरिता येऊ शकत असशील तर ये. सतीश बाबू तुला घेऊन येऊ शकतात. मी हेमचरला सहा दिवस असेन. घाई करू नकोस. तुला जर ताण सहन होऊ शकत असेल तर ये. मी पूर्णपणे स्पष्ट करून सांगेन. परंतु जीपने प्रवास करणे तुला आवडत नसेल तर वाईट वाटून घेऊ नकोस. अशा परिस्थितीत मी तुला लिहीन आणि जे काही सांगायचे आहे ते सांगेन. जीपसुद्धा मोह आहे. मला तुला त्या मोहात पाडायचे नाही.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - तू पाठवलेले धोतर फार चांगले आहे. मी ते ताबडतोब नेसलो. आजसुद्धा मी ते नेसलेलो आहे. विणणारांना माझे आशीर्वाद.

बापू

हिंदू फोटोप्रतीवरून. जी. एन. ५७९

------------------

# ५०६. प्रश्न पेटी

[फेब्रुवारी २५, १९४७] (द हिंदूवरून)

प्रश्न - तुमचा असहकार आणि मित्र राष्ट्रांचे बंधुभावविरोधी धोरण यात काय अंतर आहे?

उत्तर - उत्तर स्पष्ट आहे. माझ्या असहकाराची संकल्पना पूर्णपणे अहिंसक होती व तिचा परिणामही अहिंसक होता. याचा अर्थ असा नाही की त्यानुसार वागताना पूर्णपणे तसेच आचरण झाले. युक्लिडच्या रेषेची व्याख्यासुद्धा जी देण्यात आली आहे तशी रेषा व्यवहारात काढता येत नाही. सिद्धांत आणि व्यवहार यांत १०० टक्के मेळ क्वचितच असतो.

मित्र राष्ट्रांच्या बंधूभावविरोधी धोरणाचे भयानक विनाशकारी परिणाम झाले आहेत हे कोणीही सहजपणे पाहू शकतो. आणि दयनीय गोष्ट ही आहे की हा विनाश अजून संपलेला नाही. तो कुठे घेऊन जाईल हे कोणालाही माहीत नाही.

हरिजन, मार्च १६, १९४७ आणि द हिंदू, फेब्रुवारी २७, १९४७

----------------------

# ५०७. देब नाथ दास यांच्याशी चर्चा

(सचिव आझाद हिंद सेना, शांतता समिती. गांधीजींना भेटून त्यांनी टिपरा आणि नोआखाली जिल्ह्यातील शांतता समितीच्या कार्याची माहिती दिली.)

फेब्रुवारी २५, १९४७

नेताजींनी (सुभाष चंद्र बोस, १८९७-१९४५; महासचिव भारतीय राष्ट्रीय काँग्रेस १९२७, तिचे अध्यक्ष १९३८ आणि १९३९; अखिल भारतीय फॉरवर्ड ब्लॉकची स्तापना केली; भारतीय स्वातंत्र्य लीगची आणि आझाद हिंद सेनेची स्थापना केली.) भारताची जी सेवा केली त्याकरिता ते अमर राहतील.

द हिंदू, फेब्रुवारी २७, १९४७

# ५०८. जाहीर सभेत भाषण

(हेमचर बाजारातील मैदानात दुपारी ही सभा झाली होती. ही सभा मदत आयुक्त चितगाव विभाग यांनी आयोजित केली होती.)

हेमचर,

फेब्रुवारी २५, १९४७

गावांचे पुनरुद्धाराचे काम सुगम करण्याकरिता आवश्यक असलेली पहिली गोष्टी हिंदू-मुसमानातील ऐक्य आहे आणि याशिवाय कोणतेही काम करता येऊ शकत नाही.

गांधीजी म्हणाले की मोठमोठ्या योजना तयार करण्याऐवजी शेतकऱ्यांकरिता चांगले रस्ते तयार करणे, तलावातील जलपर्णी काढणे अशा सारख्या लहानलहान योजनांपासून सुरुवात केली पाहिजे. रोगराई रोखण्याकरिता साफसफाईकडे लक्ष देणे आवश्यक आहे. ग्रामोद्धाराच्या कामाला लागलेल्या अधिकाऱ्यांना जनतेच्या सहकार्याने काम करायचे असेल तर आम्ही तुमचे सेवक आहो हे त्यांनी जनतेला सांगितले पाहिजे. शेवटी गांधीजी म्हणाले की मी जनतेचा सेवक आहे आणि याबाबतीत जी कोणती मदत करणे आवश्यक असेल ती करण्यात मला आनंद होईल..

अमृत बझार पत्रिका, फेब्रुवारी २८, १९४७

---------------

# ५०९. प्रार्थना प्रवचन

("गांधीजीज वाकिंग टूर डायरी"मधून उद्धृत)

हेमचर,

फेब्रुवारी २५, १९४७

गांधीजींनी श्रोत्यांचे लक्ष त्या सभेकडे (पाहा मागील विषय) वेधले ज्याकरिता मदत आयुक्त नुरेनाबी चौधरी यांनी त्यांना आमंत्रित केले होते. गांधीजी म्हणाले की इतर काय करतात याचा विचार न करता तिथे मी जो सल्ला दिला त्याचे तुम्ही ताबडतोब अनुसरण केले पाहिजे. मला या पृथ्वीवर देवाचे राज्य म्हणजे रामराज्य हवे आहे. असे करण्याकरिता आपण नक्कीच इतर कोणाची वाट पाहू शकत नाही.

यानंतर गांधीजींनी त्यांना विचारण्यात आलेल्या प्रश्नांची चर्चा केली.

प्रश्न - पडदा पद्धतीचा सक्तीने अंमल केला गेला तर स्त्रियांच्या नैतिक परिस्थितीत त्यामुळे सुधारणा होईल असे तुम्हाला वाटते काय?

उत्तर - पडदा पद्धतीबद्धतीविषयी बोलण्याबद्दल काही मुसलमान टीकाकारांनी मला इशारा दिला होता. यामुळे याविषयावर बोलण्याबद्दल मी थोडा संकोच करत होतो. परंतु आजूबाजूला मी नजर फिरवली असता अनेक हिंदू स्त्रिया पडदा पाळत असलेल्या मला आढळले आणि मलायातील बहुतेक मुसलमान स्त्रिया, ज्यांच्यात माझे अनेक मित्र आहेत, पडदा पाळत नाहीत असे मला आढळले. तेव्हा मला थोडा धीर आला. मला हिंदुस्तानातील अशा अनेक प्रसिद्ध मुसलमान स्त्रिया माहीत आहेत की ज्या पडदा पाळत नाहीत. आणि अखेरचे सांगायचे तर खरा पडदा अंतःकरणाचा असतो. जी स्त्री पडद्यातून डोकावून पाहते आणि एखाद्या पुरुषावर तिची नजर खिळते व मनातून त्याचाच विचार करते ती पडद्यामागे जी भावना असते तिचा भंग करत असते. स्त्रिया जर पडद्यामागील भावनांचे पालन करत असतील तर त्या महान पैगंबर साहेबांच्या वचनांचे पालन करत आहेत असे म्हणता येऊ शकते.

प्रश्न - ज्या लोकांनी आपला व्यापार गमावला त्यांनी स्वतःहोऊन मजूर व्हायला पाहिजे असे तुम्ही म्हणाला होता. असे झाले तर शिक्षण, व्यापार आणि अशाच इतर व्यवसायांकडे कोण पाहील? अशा प्रकारे तुम्ही जर श्रमविभागणी नष्ट केली तर संस्कृतीवर विपरीत परिणाम होणार नाही काय?

उत्तर - या प्रश्नातून मी सांगितलेल्या गोष्टीचा प्रश्नकर्त्याला अर्थ कळला नाही असे दिसून येते. एखादा माणूस जर आपला मूळ व्यापार करू शकत नसेल तर भंग्याचे काम वा दगड फोडण्यासारखे काम करण्याची त्याला केवळ सूटच नाही तर ते काम करणे त्याचे कर्तव्य होऊन जाते. माझा कामाच्या श्रमविभागणीवर विश्वास आहे. परंतु माझा समान पगाराकरिता आग्रह आहे. वकील, डॉक्टर वा शिक्षक यांना भंग्यापेक्षा जास्त पगार मिळण्याचा अधिकार नाही. असे झाले तरच श्रमविभागणीने देशाची वा या भूमीची प्रगती होऊ शकेल. खऱ्या संस्कृतीकरिता वा सुखाकरिता दुसरा कोणताही राजमार्ग नाही.

भावना जीवन देत असते तर शब्द तिला मारत असतात. केवळ शब्द जड असतात. हत्त्याचे शरीर असलेला गणपती हा राक्षस वाटतो परंतु ओमचे (प्रणवचे पवित्र प्रतीक) प्रतीक जोडल्या गेल्यानंतर तोच गणपती उद्धारक होतो. दशाशीष रावण हा महामूर्ख होता परंतु रावणचा अर्थ अशा धडावर डोके नसलेला असा माणूस असेल की जो मागचा पुढचा विचार न करता भावनावेगात येऊन वाटेल ते काम करत असेल तर तो अनेक डोकी असलेला रावण होतो.

प्रश्न - सवर्ण हिंदू अस्पृश्यांच्या हिताकडे कसे लक्ष देऊ शकतील? ज्या वर्गाकडून इतक्या दीर्घ काळापासून ते यातना सहन करत आहेत त्या वर्गाला त्यांच्या भावना कशा कळू शकतील? यामुळे अस्पृश्यांचे हित पाहण्याची जबाबदारी त्यांच्या स्वतःच्या वर्गातील लोकांकडे सोपवायला नको काय?

उत्तर - माझे मत आहे की सवर्ण हिंदूंचे तथाकिथत अस्पृश्यांबद्दल काही पवित्र कर्तव्य आहे. त्यांनी नाव आणि कर्म यांनी भंगी व्हायला पाहिजे. असे जेव्हा होईल तेव्हा अस्पश्य आपोआपोच वर उठतील आणि हिंदू धर्म जगाला एक संपन्न वारसा देईल. जर असे घडले तर संडास साफ करण्याची पद्धती अगदी बदलून जाईल. इंग्लंडमध्ये खरे भंगी प्रसिद्ध इंजिनिअर आणि सफाई विशेषज्ञ आहेत. जोपर्यंत हिंदुस्तानी समाज आळशी आणि सुस्त आहे तोपर्यंत असे होऊ शकत नाही.

हरिजन, मार्च २३, १९४७

## ५१०. जवाहरलाल नेहरू यांना पत्र

फेब्रुवारी [२६] १९४७

(स्रोतात "६"तारीख आहे. स्पष्टपणे ती चूक आहे. जवाहरलाल नेहरूंच्या २४ फेब्रुवारीच्या पत्राला दिलेले हे उत्तर आहे. त्यात २३ मार्चला नवी दिल्लीत होणाऱ्या आंतर आशियायी परिषदेला उपस्थित राहण्याकरिता गांधीजूंना आर्जवून विनंती केली होती.)

मार्चचा शेवटचा आठवडा आज माझ्याकरिता दूरच्या दिव्यांसारखा आहे. ईश्वराची इच्छा असेल तर तो या परिषदेला उपस्थित राहता यावे म्हणून माझ्याकरिता मार्ग शोधून काढील. (अखेरीस एप्रिल १ आणि २ तारखेला गांधीजी या परिषदेकरिता उपस्थित राहिले होते.)

महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड ३, पृष्ठ १०३

------------------

## ५११. वृत्तपत्रांना वक्तव्य

हेमचर,

फेब्रुवारी २६, १९४७

(दक्षिण आफ्रिकी) संघ सरकारने डॉ. दादू आणि डॉ. नायकर यांना पारपत्र नाकारणे आणि त्यांचे परिचय पत्र जप्त करणे याबद्दल गांधीजी म्हणाले : अशा कृतीने संघराज्य आपले आशियायीविरोधी धोरण चालवू शकणार नाही.

ते पुढे म्हणाले की यासंबंधात मला जी तार मिळाली आहे ती जर बरोबर असेल तर ही कृती पूर्णपणे अवांछित आणि अरेरावीची आहे. (पाहा "जवाहरलाल नेहरू यांना पत्र", फेब्रुवारी २४, १९४७ची तळटीप.)

गांधीजींनी आशा व्यक्त केली की या लोकांना पारपत्र न देण्याकरिता आणि त्यांचे ओळखपत्र जप्त करण्याकरिता काही न्याय्य आणि अपरिहार्य कारण असू शकेल अथवा या प्रकरणाचा पुनर्विचार केल्यानंतर आपण हे पाऊल घाईगडबडीत उचलले याची सरकारला जाणीव होईल व ते हा निर्णय रद्द करील.

अमृत बझार पत्रिका, फेब्रुवारी २८, १९४७

---------------

# ५१२. प्रार्थना प्रवचन

("गांधीजीज वाकिंग टूर डायरी"मधून उद्धृत)

हेमचर,

फेब्रुवारी २६, १९४७

प्रश्न - केंद्रातच चुकीच्या गोष्टी घडत असताना ऐक्य निर्माण होण्याकरिता सर्वसामान्य माणूस काय करू शकतो?

उत्तर - विज्ञानाचा एक नियम सांगतो की दोन शक्ती - केंद्राकडे नेणारी आणि केंद्रापासून दूर नेणारी - एकाच वेळी काम करत असतात. मी हा नियम जीवनालाही लागू करतो. केंद्र म्हणजे सरकार आपल्या सर्वांना आपल्याकडे आकर्षित करत असते आणि सरकार जर चांगले असेल तर आपण त्याला प्रतिसाद दिला पाहिजे. हीच गोष्ट केंद्रविरोधी शक्तीची असते. ती या हेमचर गावात राहणाऱ्या सर्वांनासुद्धा आपल्याकडे ओढत असते. अशा प्रकारे ही शक्ती जिथे चांगल्या प्रकारे काम करते तिथे परिघावर आणि केंद्रातही सुव्यवस्थित आणि अनुशासित शासन असते. परंतु जेव्हा केंद्रात काही तरी चुकीचे घडते तेव्हा सात लाख खेड्यांवर शासन करण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. उलटपक्षी गावकरी जेव्हा सुज्ञपणाने काम करत केंद्राला आपले उच्च दर्जाचे राजकारण करण्याकरिता मोकळे सोडून देतील व स्वतः आपले काम करू लागतील तेव्हा आपण एकोप्याने राहू शकू.

प्रश्न - जो माणूस आपल्या समुदायाकरिता आपल्या स्वार्थाचा त्याग करतो तो निदान त्या सीमेपर्यंत स्वार्थत्यागी असतो. अशा माणसाचे हृदयपरिवर्तन होऊन तो आपल्या समुदायाच्या हिताचा त्याग करून देशाहिताकरिता कसा काम करू लागेल?

उत्तर - ज्या माणसाची त्यागभावना आपल्या समुदायाच्या हिताच्या वर जात नाही तो स्वतःच स्वार्थी झालेला असतो आणि आपल्या समुदायालाही स्वार्थी करतो. माझ्या मते स्वार्थत्यागाचा तर्कनिष्ठ निष्कर्ष हाच आहे की व्यक्ती समुदायाकरिता त्याग करते, समुदाय जिल्ह्याकरिता त्याग करतो, जिल्हा प्रांताकरिता त्याग करतो, प्रांत देशाकरिता आणि देश जगाकरिता त्याग करतो. समुद्रातून बाहेर पडलेला थेंब कोणतेही चांगले काम न करता तसाच वाळून जात असतो. परंतु तो जर सागराचा भाग राहिला तर तो समुद्राच्या वैभवाचा वाटेकरी होतो व तो आपल्या छातीवरून मोठमोठे जहाज नेऊ शकतो.

प्रश्न - स्वतंत्र हिंदुस्तानात कोणाच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल? शेजारच्या राष्ट्राला जर कशाची गरज असेल तर स्वतंत्र हिंदुस्तानने काय केले पाहिजे?

उत्तर - गांधीजी म्हणाले की या प्रश्नाच्या पहिल्या भागाचे उत्तर वरील प्रश्नाच्या उत्तरात दिले आहे. खरोखर स्वतंत्र झालेला हिंदुस्तान आपल्या शेजाऱ्याच्या अडीअडचणीत निश्चितच धावून जाईल. अफगाणीस्तान, सिलोन (श्रीलंका) आणि ब्रह्मदेशाचे (म्यांमार) यांचे उदाहरण देऊन गांधीजी म्हणाले की हा नियम या तीन्ही राष्ट्रांनासुद्धा लागू होतो आणि आपणसुद्धा त्यांचे शेजारी होतो. आणि अशा प्रकारे व्यक्तीचा त्याग हा जर जिवंत त्याग असेल तर ते संपूर्ण जगाला आपल्या कवेत घेईल. (यानंतरचा भाग महात्मा गांधी - द लास्ट फेजमधून घेतला आहे.)

गांधीजींनी आपल्या आदर्श समाजाला रामराज्य नाव दिले. रामराज्य म्हणजे हिंदूंचे राज्य असा अर्थ कोणीही करू नये. माझा राम हा खुदा वा गॉडचेच दुसरे नाव आहे. मला खुदाई राज्य हवे आहे आणि ही गोष्ट आणि किंगडम ऑफ गॉड हे एकच आहेत. पहिल्या चार खलिफांचे राज्य बऱ्याचशा प्रमाणात तसे होते. अशा प्रकारच्या राज्याची स्थापना करणे म्हणजे केवळ हिंदुस्तानचेच कल्याण असा अर्थ होणार नाही तर सर्व जगाचे कल्याण असा होईल.

हरिजन, मार्च २३, १९४७, आणि महात्मा गांधी अखेरचं पर्व खंड २, पृष्ठ २२९

---------------------

# ५१३. सुधीर घोष यांना तार

फेब्रुवारी २७, १९४७

सुधीर घोष

१, औरंगजेब रोड,

नवी दिल्ली

ईश्वर तुझ्याबरोबर असो. (सुधीर घोष यांची नियुक्ती जनसंपर्क अधिकारी म्हणून भारतीय उच्चायुक्तांच्या लंडन येथील कार्यालयात झाली होती.)

बापू

सुधीर घोष पेपर्स. सौजन्य - नेहरू स्मृती संग्रहालय आणि संग्रहालय. शिवाय गांधीजीज एमिसरी, पृष्ठ २००

------------

# ५१४. सैय्यद महमूद यांना पत्र

जलद

फेब्रुवारी २७, १९४७

मंत्री सैय्यद महमूद,

पटना

तुमची तार. वर्तमानपत्रातील घोषणा अनधिकृत आहे. श्री बाबूंना लिहिले आहे (पाहा “सचिव, मुस्लिम लीग यांना पत्र”, एप्रिल २८, १९४७). दंगलग्रस्त लोकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने तुम्हा सर्वांना माझी उपस्थिती आवश्यक वाटत असेल तर माझी १८ तारखेच्या आधीसुद्धा येण्याची तयारी आहे. तुम्हा सर्वांची काही वेगळी इच्छा नसेल तर मला तुमच्या घरी राहणे आवडेल (फेब्रुवारीच्या शेवटच्या भागात गांधीजींना बिहारच्या विकास आणि दळणवळण खात्याचे मंत्री सैय्यद महमूद यांचा अहवाल मिळाला आणि त्यांनी लिहिले होते की बिहारची परिस्थिती खरोखरच गंभीर आहे. आणि तुमच्या वैयक्तिक उपस्थितीची आवश्यकता आहे; याशिवाय पाहा “प्रार्थना प्रवचन”, फेब्रुवारी २८, १९४७)

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

# ५१५. लुडविग बॉर्श यांना पत्र

काझिरखिल,

पोलिस स्टेशन रामगंज,

जिल्हा नोआखाली,

बेगाल,

फेब्रुवारी २७, १९४७

प्रिय मित्र,

मला तुमचे या महिन्याच्या ११ तारखेचे पत्र मिळाले (या पत्रात लुडविग बॉर्श यांनी हिंदुस्तानला भेट देण्याची इच्छा व्यक्त केली होती होती आणि लिहिले होते की "भौतिकतेचा मोह असलेल्या पाश्चात्त्य संस्कृतीमुळे मला माझ्याबद्दल कीव वाटू लागली आहे" आणि त्यांनी आहारासंबंधी गांधीजींचा सल्ला मागितला.). नदीचा दुसरा काठच सुंदर दिसत असतो. यामुळे हिंदुस्तानला भेट देऊन आपले जीवन समृद्ध करण्याबद्दल मी तुम्हाला सावध करीन. पूर्वेच्या सुज्ञपणाचे वर्णन करणाऱ्या ग्रंथात जे वर्णन करण्यात आले आहे त्यापेक्षा हिंदुस्तानात आढळणारे जीवन अगदी वेगळे आहे. तुमच्या आहारासंबंधी तुम्हाला निश्चित मार्गदर्शन करता यावे अशी माझी किती तरी इच्छा आहे. आम्ही हिंदुस्तानात राहणारे लोक, याला मीसुद्धा अपवाद नाही, इंग्रजी आणि अमेरिकी साहित्यातून आहाराच्या प्रश्नासंबंधी बरेच काही शिकलो आहो. सर्वसामान्य भारतीय आहार समतोल नाही व त्यात अतिशय मसाले असतात. यामुळे तुम्ही शाकाहारावरील आणि विशेषतः आहाराच्या प्रकारासंबंधीची इंग्रजीतील पुस्तके पाहावी असा माझा तुम्हाला सल्ला आहे. तुम्ही जर तुमचा विवेक वापरला तर मी देऊ शकेन त्यापेक्षा या पुस्तकांमधून तुम्हाला किती तरी अधिक मिळेल.

माननीय लुडविग बॉर्श,

६६, टेनिमोर स्ट्रीट, ब्रुकलीन,

न्यू यॉर्क

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

---------------------

# ५१६. प्यारेलाल यांना पत्र

फेब्रुवारी २७, १९४७

चि. प्यारेलाल,

मला तुझी दोन पत्रे मिळाली. तू जर मला सतीश बाबूंकरिता औषधोपचार आणि त्यांना लागणाऱ्या इतरा काही गोष्टी कळवू शकत असशील तर  मी आवश्यक ते करीन. डॉक्टरचे शुल्क देणे आवश्यक असेल तर ते दे. परंतु मला वाटते की बिहारमध्ये मी कशाप्रकारे वागलो हे तुला माहीत असले पाहिजे. आपल्याला जी काही मदत करता येईल ती आपण केली पाहिजे आणि त्यावर आपण समाधान मानले पाहिजे. काल्लू मियाकरिता तू जे करतो आहेस ती आदर्श गोष्ट आहे. आपण त्याची वैयक्तिक सेवा केली पाहिजे, त्याला योग्य आहार दे आणि त्यावर समाधान मान. त्याकरिता डॉक्टरची आवश्यकता नाही. चंपारणमध्ये मी सुरुवातीपासून तर शेवटपर्यंत असेच करत होतो. डॉक्टर आणि शिक्षक बा, दुर्गा, मणिबेन, पारीख वगैरे होते. ते फार प्रभावी आणि परिणामकारक झाले. हे सांगण्याचे कारण माझ्या दृष्टिकोनातून ही आदर्श गोष्ट आहे.

इथे येण्याच्या तुझ्या इच्छेवर लगाम घालण्यातच तुझे हित आहे याबद्दल माझी खात्री पटली आहे. अ आणि कनू काल आले. तू मागितलेले पत्र मी पाठवीन. त्याबद्दल घाई नाही. कनू आणि असुद्धा ते वाचतील.

हरिजनबद्दल तू जे लिहिले ते बरोबर आहे. अखेरीस सरदार काय करतात यावर ते सर्व अवलंबून आहे. आता ते स्वतंत्रपणे चालवतील ही गोष्ट जवळपास अशक्य आहे. परंतु ते जर असे करतील तर आपण तुझे नाव काढून घेऊ. आतापर्यंत आपण पूर्णपणे साधनेवर अवंलंबून राहिलो, विशेषतः माझ्या. मला कोणतीही भीती वाटत नाही. मला त्याचे काहीही वाटत नाही. परंतु ज्या प्रमाणात मी अनासक्तीभाव अंगी बाणवू शकायला पाहिजे होता त्या प्रमाणात मी अजून बाणवू शकलो नाही ही गोष्ट मला बोचते. परंतु अखेरीस मानवी प्रयत्नांना परमेश्वराचा पाठिंबा असला पाहिजे. त्याशिवाय मानवी प्रयत्न व्यर्थ जातात.

काल्लू मियाच्या तळव्यात जर गरम वाटत असेल तर तुला मातीच्या पट्ट्यांची उपयोगिता माहीत आहे. मला वाटते त्यांचा उपयोग करावा.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - हे पत्र जात असतानाच मला दुसरे पत्र मिळाले. ते गोड पत्र आहे. तुझ्या कामकाजाचा अहवाल आणि मनूकरिता तू पाठवलेला पाठ मी वाचू शकलो नाही. तुला जे पत्र वाचण्याची इतकी उत्सुकता आहे ते मी तुला पाठवीन. तू राजाजींबद्दल काय लिहिले हे मी पूर्णपणे विसरलो. तू जर त्याबद्दल मला पत्र लिहिले आणि माझ्याकडे पाठवले तर मी ते त्यांना पाठवीन. राजाजी, किशोरीलाल, नरहरीभाई, जाजूजी इत्यादींपैकी तू कोणालाही लिगू शकतोस. माझ्या प्रकृतीची मुळीच काळजी करू नकोस. ईस्वरावर श्रद्धा असलेल्या माणसाने काळजीपासून मुक्त असायला नको काय?

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

---------------------

# ५१७. फजलुल हक यांच्याशी चर्चा

फेब्रुवारी २७, १९४७

गांधीजी - अरे, तुम्ही उभे राहू नका. आपण मागे भेटलो तेव्हा तुम्ही मुख्यमंत्री होता.

हक - मी तुमच्याशी स्पष्ट बोलेन. मनात एक ठेवायचे आणि ओठांवर दुसरे असे करण्यात काही अर्थ नसतो.

गांधीजींनी संपूर्ण मान्यता देत मान डोलवली.

मौलवी साहेबांनी सुरुवात केली - गांधीजी तुम्ही बिहारमध्ये गेला नाही. नोआखालीपेक्षा तुमचे स्थान बिहारमध्ये होते; नोआखालीचे मुसलमान आक्रमक नव्हते तर पोलिसांच्या जुलमाचे बळी होते. हिंदू पोलीस अधिकारी निरपराध मुसलमानांचा छळ करत आहेत आणि त्यांना खोट्या खटल्यात फसवत आहेत. असे खटले मागे घेतले पाहिजे. मुसलमान गुन्हेगार वा स्त्रियांचे अपहरण करणारे नाहीत. इस्लाम असे कधीच शिकवत नाही.

इस्लामच्या शिकवणुकीत मौलवी साहेब म्हणतात त्याप्रमाणे काहीही नाही इथपर्यंत मौलवी साहेबांचे म्हणणे गांधीजींनी तत्त्वतः मान्य केले.

हक - फार कमी लोकांना इस्लाम कळतो. ते त्याला तलवारीचा धर्म म्हणतात. मुस्लिम राज्यात बहुसंख्याकांवर अल्पसंख्याकांची विशेष जबाबदारी असते. मुसलमानेतर हे झिमी (झिमींचे राज्य संरक्षण करते म्हणून त्यांना जिझिया कर द्यावा लागत असतो.) असतात. मौलवी साहेबांचा शेवटचा मुद्दा असा होता - हिंदूंना मुसलमानांच्या बहुसंख्येला घाबरण्याचे कोणतेही कारण नाही, उलट हिंदुंच्या प्रभावाच्या भीतीनेच मुसलमान ग्रस्त आहेत. हिंदूंनी भीती सोडून पाकिस्तान मान्य केला पाहिजे. सम्राटांच्या सरकारच्या २० फेब्रुवारीच्या वक्तव्याप्रमाणे (पाहा “क्लेमेन्ट ॲटली यांचे वक्तव्य”, फेब्रुवारी २०, १९४७) हिंदुस्तानात केवळ गृहयुद्धच होऊ शकते.

गांधीजी - किंचितसे स्मित करत गांधीजी म्हणाले - तर मी बारिसालला आलो तर तिथे माझ्याकरिता केवळ तीन कालव्यातच जागा आहे, नाही काय? (कालवा. फजलूल हक असे म्हणाल्याचे वृत्त होते की गांधीजी मुसलमानेतर असल्यामुळे त्यांनी इस्लाम शिकवायला नको, हिंदू-मुसलमान ऐक्याऐवजी ते या दोन समुदायांमध्ये कटुता निर्माण करत आहेत. गांधीजी जर बारीसालला आले तर मी त्यांना तेथील कालव्यात ढकलून देईन. पाहा “प्रार्थना प्रवचन”, फेबुवारी १६, १९४७)

हक - नाही, नाही, महात्माजी, तुमचे नेहमीच स्वागत आहे. तो केवळ विनोद होता. विनोदाची संधी मी कधीही सोडत नाही - माझ्या वडिलांवरसुद्धा विनोद करायला मी मागेपुढे पाहत नाही. तो माझा स्वभावच आहे!

गांधीजी - जिनांनी पाकिस्तानचा अर्थ आणि त्याचे परिणाम स्पष्ट करून सांगावे असे मी त्यांना नेहमीच म्हणत आलो आहे. माझी योजना (बहुधा राजाजींची योजना. पाहा "च. राजगोपालाचारी यांची योजना") मुस्लिम लीगचे पुढारी आणि देशासमोर आजही आहे आणि माझा जोपर्यंत संबंध आहे त्यावर मी आजही कायम आहे. गुन्हेगारी खटल्यांबद्दल बोलायचे तर ते बंगाल सरकारच्या अधिकार क्षेत्रात आहे.

गाधीजी मौलवी साहेबांना पुढे म्हणाले की राहता राहिला प्रश्न बिहारचा तर मी तिथे लवकरच जाण्याची शक्यता आहे. परंतु तुम्ही म्हणता म्हणून मी असे करत नाही. मी डॉ. महमूद (सैय्यद महमूद, विकास आणि दळणवळण मंत्री, बिहार) यांच्या तारेची वाट पाहत आहे. परंतु नोखालीतील बहुसंख्य समाज अल्पसंख्य समाजाच्या सुरक्षिततेची काळजी घेईल याची जबाबदारी तुम्ही घेत असाल तर मी ताबडतोब बिहारमध्ये जाण्याकरिता मोकळा होईन. तुम्ही असे आश्वासन देऊ शकता काय?

यावर मौलवी साहेबांनी कोणतेच उत्तर दिले नाही. उलट त्यांनी बंगालमध्ये संमिश्र मंत्रिमंडळ बनवण्याचीच चर्चा सुरू केली. बंगालमधील सर्व अडचणींवर तोच उपाय आहे असे त्यांचे मत होते.

या वेळी फजलूल हक यांचे सहकारी मध्येच म्हणाले - खिलापतच्या चळवळीत (हे आंदोलन १९१९मध्ये सुरू झाले होते."तुर्कस्तानचे काही भाग कापण्याच्या आणि खलिफाच्या अधिकार क्षेत्रावरील नियंत्रण काढून घेण्याच्या" विरोधात हे आंदोलन सुरू करण्यात आले होते.) मीही एक कार्यकर्ता होतो. राजकारणाचा पहिला धडा तुम्हीच मला दिला.

गांधीजी उत्तर देताना म्हणाले - राजकारणाचा पहिला धडा तुम्ही माझ्याकडून घेतला असता तर तुम्ही याहून किती तरी चांगले काम केले असते.

गांधीजी हक यांना - तुमच्यात आणि सुऱ्हावर्दी यांच्यातील भांडणाचे कारण काय? ते मला बरे वाटत नाही.

परंतु मौलवी साहेबांनी परत तो विषय टाळला आणि आपल्या व्यवसायातील अडचणी आणि पैशांची चणचण या जुन्याच विषयाबद्दल ते बोलू लागले. यावरून उधळपट्टी करणाऱ्या त्यांच्या स्वभावावरून गांधीजींनी त्यांची थट्टा केली आणि हसतहसत त्यांना निरोप दिला.

महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड २, पृष्ठ ३०३-५

# ५१८. प्रार्थना प्रवचन

("गांधीजीज वाकिंग टूर डायरी"तून हे प्रवचन उद्धृत केले आहे. त्यानुसार तोडफोड केलेल्या मंदिरांचा सरकारी खर्चाने जिर्णोद्धार करण्यात आल्यानंतर त्या देवळात गांधीजींनी प्रार्थना केली होती. मंदिराची जरी तोडफोड झाली होती तरी कल्पक पुजाऱ्याने ती मूर्ती आधीच सुरक्षित ठेवल्यामुळे मंदिरातील मूर्ती सुरक्षित राहिली होती. मंदिराच्या पुनर्बांधणीकरिता वापरलेल्या जुन्या आणि गंजलेल्या टिनांना रंग लावून काळजी घेतली जाईल म्हणजे हे टीन अजून खराब होणार नाहीत अशी आशा गांधीजींनी व्यक्त केली.)

हेमचर,

फेब्रुवारी, २७, १९४७

प्रश्न - माणूस आपल्या निकटतम शेजाऱ्याची सेवा करूनही संपूर्ण मानवतेची सेवा करू शकतो काय? स्वदेशीचा खरा अर्थ काय?

उत्तर - गांधीजी म्हणाले की या प्रश्नाचे उत्तर मी काल सायंकाळी दिलेले आहे (पाहा "प्रार्थना प्रवचन", फेब्रुवारी २६, १९४७). माझा विश्वास आहे की माणूस एकाच वेळी शेजाऱ्याची आणि मानवतेची सेवा करू शकतो. अट इतकीच आहे की शेजाऱ्याची सेवा कोणत्याही अर्थाने स्वार्थी हेतूने केलेली नसावी आणि केवळ शेजाऱ्याचीच सेवा करणारा तो माणूस नसावा. तसेच ती सेवा करत असताना इतर कोणत्याही माणसाची पिळवणूक व्हायला नको. असे झाले तर ही सेवा कोणत्या भावनेने करण्यात आली आहे हे शेजाऱ्यांना कळेल आणि त्याचबरोबर आपणही अशी सेवा आपल्या शेजाऱ्यांना दिली पाहिजे हेसुद्धा त्यांना कळेल आणि या सेवाकार्यात वृद्धी होत राहील आणि एक दिवस असा येईल की जेव्हा ही सेवा सर्व जगात पसरलेली असेल.

यावरूनच कळते की स्वदेशी ती भावना आहे की जी इतरांना वगळून माणसाला आपल्या निकटच्या शेजाऱ्याची सेवा करण्याकरिता प्रेरित करते. मी आधीच उल्लेख केलेला असल्याप्रमाणे आपण ज्या शेजाऱ्याची सेवा करतो त्याने आपल्या शेजाऱ्याची सेवा केली पाहिजे ही अट आहे. या अर्थाने स्वदेशी केवळ आपल्या शेजाऱ्याची सेवा नाही. माणसाची सेवा करण्याच्या क्षमतेची वैज्ञानिक मर्यादा ती लक्षात घेते इतकेच.

प्रश्न - आपल्या देशातील कच्च्या मालाचा जास्तीत जास्त उपयोग करता यावा म्हणून त्वरित उद्योगीकरण करण्याच्या दृष्टीने सरकार योजना आखत आहे, परंतु आपल्याकडे भरपूर प्रमाणात जी मानवसंपदा आहे ती तशीच पडून असल्यामुळे सडत आहे. तिच्या उपयोगाच्या दृष्टीने कोणतीही योजना आखत नाही. अशा योजनांना स्वदेशी म्हणता येऊ शकते काय?

उत्तर - हा प्रश्न चांगल्या पद्धतीने मांडला आहे. सरकारची नक्की योजना काय आहे हे मला माहीत नाही. परंतु जी योजना देशाच्या कच्च्या मालाचा उपयोग कसा करता येईल याचा विचार करते परंतु अधिक क्षमता असलेल्या मानवी शक्तीकडे दुर्लक्ष करते ती एकांगी असते व तिच्यामुळे मानवी समता कधीही स्थापित करता येऊ शकत नाही या मताशी मी सहमत आहे.

अमेरिका जगातील सर्वात जास्त उद्योगीकरण झालेला देश आहे आणि तरीही त्याला गरिबी आणि अधोगती टाळता आलेली नाही. याचे कारण वैश्विक मानवी शक्तीकडे अमेरिकेने दुर्लक्ष केले आणि अशा काही थोड्याशा लोकांच्या हातात सत्ता केंद्रित होऊ दिली की ज्यांनी अनेक लोकांच्या जिवावार ती प्रचंड संपत्ती गोळा केली होती. परिणामी तिचे उद्योगीकरण तिच्या गरीब लोकांकरिता आणि उर्वरित जगाकरिता संकटमय झाले आहे.

हिंदुस्तानला जर अशा विनाशापासून वाचायचे असेल तर त्याने अमेरिकेत आणि इतर पाश्चात्त्य राष्ट्रांत जे काही सर्वोत्तम असेल त्याचे अनुकरण केले पाहिजे आणि त्यांचे आकर्षक परंतु विनाशक धोरण बाजूला ठेवले पाहिजे. यामुळे खरी योजना तर ती होईल की जिच्यात हिंदुस्तानातील संपूर्ण मानवशक्तीचा जास्तीत जास्त उपयोग केला जाईल. यामुळे कच्चा माल बाहेर पाठवून त्याच्या बदल्यात अव्वाच्यासव्वा किमतीत तो परत विकत घेण्याऐवजी हिंदुस्तानातील लाखो खेड्यात तो वाटून टाकावा.

प्रश्नांचे उत्तर दिल्यानंतर गांधीजी म्हणाले की अनुसूचित जातीचे काही लोक मला भेटले होते. मी त्यांना सांगितले की शौर्याने कसे जगावे हे लोकांना शिकवण्याकरिता मी इथे आलो आहे. तथाकथित उच्चवर्णीय लोक अजून परतले नाहीत म्हणून तुम्हाला जर मृत्यूची भीती वाटत असेल तर ते बरोबर नाही. तुम्ही भीती सोडाल तर तुमचा कोणीही शत्रू राहणार नाही. मुसलमान जेव्हा तुमच्यातील शौर्य पाहतील तेव्हा तेसुद्धा तुमचे मित्र होतील. भित्र्या माणसाचे सर्व शत्रू होत असतात, मग ते मुसलमान असो की अजून कोणी. धैर्याकरिता जवळ तलवार असण्याची आणि विरोधकांना मारण्याचे कौशल्य असण्याची आवश्यकता नसून दुसरा कोणताही माणूस आपला शत्रू नाही आणि तलवारीच्या धाकावर कोणालाही शरण न जाता वेळ आली तर प्राण गेले तरी त्याकरिता तयारी ठेवली पाहिजे हे समजावून घेण्यात धैर्य आहे.

यानंतर बालविवाह, विधवाविवाहाला प्रतिबंध इत्यादी ज्या कुप्रथा त्या ठिकाणच्या समाजात पसरलेल्या होत्या त्यांचा उल्लेख करत गांधीजी म्हणाले की यामुळे लोकांचा नैतिक दर्जा खालावला आहे.

तुम्ही जर तुमच्या उणिवा दूर केल्या तर तुमच्या श्रद्धेकरिता आणि सन्मानाकरिता मृत्यू पत्करण्याची शक्ती तुमच्यात येईल.

हरिजन, मार्च २३, १९४७

------------

## ५१९. श्रीकृष्ण सिन्हा यांना तार

[फेब्रुवारी २८, १९४७]

(ही तार फजलुल हक गेल्यानंतर त्याच दिवशी म्हणजे फेब्रुवारी २७, १९४७ला पाठवण्यात आली होती. पाहा “प्रार्थना प्रवचन”, फेब्रुवारी २८, १९४७)

डॉ. सैय्यद महमूद आणि इतर यांना मी बिहारला भेट दिलेली आवडेल. . . (स्रोतात इथे रिकामी जागा आहे.) तुम्हालासुद्धा असेच वाटते काय?

महात्मा गांधी - अखरेचं पर्व, खंड २, पृष्ठ ३०६

-----------------

# ५२०. च. राजगोपालाचारी यांना तार

हेमचर,

टिपरा जिल्हा.

फेब्रुवारी २८, १९४७

मंत्री, राजगोपालाचारी,

नवी दिल्ली

तुमची तार. दरमहा १९०० बेल पाहिजे. बहुधा फार थोड्या वेळेकरिता बिहारला जात आहे.

बापू

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

---------------------

# ५२१. सचिव, नाताळ इंडियन कॉंग्रेसला तार

फेब्रुवारी २८, १९४७

सचिव, नाईसली,

डरबन

शाही अतिथींच्या संबंधात (पाहा खंड ८५) उचलत असलेल्या पावलांबद्दल जाहीर वक्तव्य दिले आहे.

गांधी

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

---------------------

# ५२२. रामदास मझहबी शीख फेडरेशन यांना पत्र

काझिरखिल,

पोलिस स्टेशन रामगंज,

जिल्हा नोआखाली.

फेब्रुवारी २८, १९४७

प्रिय मित्र,

तुमच्या गटाच्या ११ लोकांनी सह्या केलेले तुमचे पत्र मला मिळाले. त्यात ११ लोकांच्या स्वतःच्या सह्या असतानाही नावे टाईप केलेली आहेत. तुम्ही जी तक्रार करत आहा त्यासंबंधात मी काय करू शकतो हे मला माहीत नाही. मी असहाय आहे.

तुमचा विश्वासू,

द रामदास मझहबी सीख फेडरेशन,

द्वारा अध्यक्ष मिस्त्री हरनाम सिंग पी. बी.

समराला,

जिल्हा लुधियाना

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

---------------------

# ५२३. बट क्रिस्टो पॉल ऍन्ड कंपनीला पत्र

काझिरखिल,

रामगंज पोलिस स्टेशन,

जिल्हा नोआखाली,

फेब्रुवारी २८, १९४७

सद्गृस्थहो,

प्रथमोपचार पेटीबद्दल मी जी सूचना केली होती तिच्याकडे ताबडतोब लक्ष दिल्याबद्दल मी तुमचा आभारी आहे. तुम्ही पाठवलेल्या पेट्यांमधील काही पेट्यांतील साहित्य मी तपासले. माझे जे विचारपूर्वक मत झाले होते ते मी तुम्हाला पाठवणारच होतो तोच श्री सतीश चंद्र दास गुप्ता आले आणि त्यामुळे मी त्यांना एक पेटी तपासण्याकरिता दिली व तज्ज्ञ म्हणून तिच्यातील साहित्याबद्दल व पेटीच्या घडणीबद्दल मत देण्याकरिता मी त्यांना सांगितले. ते अतिशय व्यस्त गृहस्थ असल्यामुळे स्वाभाविकपणेच मी त्यांना घाई करू शकत नव्हतो. यामुळे माझा तुम्हाला सल्ला आहे की नवीन पद्धतीच्या पेट्या सध्याच करू नका आणि मी जे विचारपूर्वक उत्तर देईन त्याची वाट पाहा. मला काही महत्त्वाच्या सूचना करायच्या होत्या. परंतु सतीश बाबूंच्या उपस्थितीचा फायदा घेऊन मी माझ्या विचारांना त्यांच्या तज्ज्ञ सल्ल्याच्या आधारे अजून बळकटी आणू इच्छितो.

तुमचा विश्वासू

बट क्रिस्टो पॉल ऍन्ड कंपनी लिमिटेड,

कलकत्ता

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

---------------------

# ५२४. ए. जे. मस्टे यांना पत्र

काझिरखिल,

पोलीस स्टेशन रामगंज,

जिल्हा नोआखाली,

फेब्रुवारी २८, १९४७

प्रिय मित्र,

म्यरियल लिस्टरने मला तुमचे गत सप्टेंबर २७चे पत्र पाठवले. ते काही दिवसांपासून माझ्या फाईलमध्ये पडून होते. तिने तुमच्या निःस्वार्थ श्रमाचे संक्षिप्त वर्णनही मला कळवले होते. तुम्ही जिला समस्या म्हणून संबोधता, आणि ते योग्यच आहे, त्यात तुम्हाला मदत म्हणून काही सल्ला द्यावा असे मला किती वाटते! गत युद्धानंतर युद्धाचे जे परिणाम होत आहेत ते प्रत्यक्ष युद्धापेक्षाही किती तरी भयानक आहेत. परंतु त्यातील रक्तपात वास्तवात भयानक असूनही केवळ तो दृष्टीपासून दूर आहे म्हणून युद्ध सुरू होते तेव्हापेक्षा आता आपण किती तरी अधिक सुरक्षित आहो असा स्वतःचा समज करून घेऊन माणूस स्वतःची फसगत करून घेतो. हिंदूस्तान पूर्णपणे स्वाधीन झाल्यानंतर शस्त्रास्त्रांच्या स्पर्धेत भाग घेणार नाही असे आश्वासन तुम्हाला देता यावे अशी माझीसुद्धा किती तरी इच्छा आहे. मी केवळ इतकेच सांगू शकतो की अशी काही दुर्दैवी घटना घडू नये म्हणून जे काही करणे आवश्यक आहे ते करण्यात मी कसूर करणार नाही.

तुमचा विश्वासू

मो. क. गांधी

माननीय ए. जे. मस्टे

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

---------------------

# ५२५. टी. हेज यांना पत्र

काझिरखिल,

पोलीस स्टेशन रामगंज,

जिल्हा नोआखाली,

बंगाल,

फेब्रुवारी २८, १९४७

प्रिय मित्र,

मला तुमच या महिन्याच्या १६ तारखेचे पत्र मिळाले (या पत्रातून टी. हेन्स यांनी गांधजींना उपोषणासंबंधी आध्यात्मिक वा वैज्ञानिक लेख पाठवण्याची विनंती केली होती.). मी तुम्हाला काही उपयुक्त कसे पाठवू शकेन हे मला कळत नाही. यंग इडियाच्या - आणि नंतर ज्याचे रूपांतर हरिजनमध्ये झाले - स्तंभात मी उपोषणासंबंधी जे काही लिहिले त्याच्यावर तुम्ही नजर टाकावी इतकेच या वेळी मी तुम्हाला सांगू शकतो. या साप्ताहिकाच्या प्रती मिळवून देण्याकरिता श्री रिचर्ड ग्रेग (पुटनी स्कूल, पुटनी, व्हरमॉन्ट, यू. एस. ए.) तुम्हाला मदत करू शकतील.

तुमचा विश्वासू,

माननीय संपादक टी. हेज,

७६२२, रॉबिन रोड,

डॅलस ९, टेक्सास

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

---------------------

# ५२६. वर्तमानपत्रांना वक्तव्य

हेमचर,

फेब्रुवारी २८, १९४७

मला भूतपूर्व नाताळ इंडियन काँग्रेसच्या सचिवांची तार मिळाली आहे. त्यात सांगितले आहे की काँग्रेस, ट्रान्सवाल इंडियन काँग्रेस, कलर्ड पिपल्स ऑर्गनायझेशन आणि आफ्रिकी नॅशनल काँग्रेसने शाही अतिथींच्या सन्मानार्थ दक्षिण आफ्रिकेत होणाऱ्या कोणत्याही समारंभात भाग न घेण्याचा वा त्यात कोणत्याही प्रकारची मदत न करण्याचा निर्णय घेतला आहे. आशियायी, आफ्रिकी आणि इतर गोरेतर लोकांवर जे प्रतिबंध लावण्यात आले आहेत ते लक्षात घेता त्यांना दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्या लोकांच्या आनंद मानणाऱ्या समारंभात सहभागी होणे योग्य वाटत नाही. तारेत त्यांनी त्यांच्या या निर्णयाला, ज्याला ते बहिष्कार म्हणतात, पाठिबा देण्याकरिता सांगितले आहे. मी याला सार्वजनिक स्वरूपात पाठिंबा देतो. कोणताही स्वाभिमानी जनसमुदाय जसे पाऊल उचलेल तसे हे सन्माननीय पाऊल आहे.

द हिंदू, मार्च १, १९४७

----------------

# ५२७. प्रार्थना प्रवचन

("गांधीजीज वाकिंग टूर डायरी"मधून उद्धृत.)

हेमचर,

फेब्रुवारी २८, १९४७

*गांधजींनी काल सायंकाळी नामशुद्रांचा जो उलेलेख केला होता त्याचाच धागा त्यांनी आज पकडला. त्यांना शिक्षणाच्या प्रश्नाचा उल्लेख करण्याकरिता वेळ नव्हता. गांधीजी म्हणाले की नामशुद्रांमधील शिक्षणाच्या अभावाची संपूर्ण जबाबदारी तथाकथित उच्चवर्णीय हिंदूंवर आहे. ज्या लोकांना हिंदू समाजाने जाणीवपूर्वक दडपून ठेवले होते ते आता स्वतःहोऊन शिक्षणाकडे वळतील अशी अपेक्षा करणे हास्यास्पद आहे. असे असले तरी दुःखाची गोष्ट तर ही आहे की नामशुद्रांमध्ये असे लोक आहेत की जे तथाकथित उच्च वर्णीय हिंदूंकडून चांगल्या गोष्टी घेऊ नका म्हणून शिकवत असतात. माझे मत आहे की हा खोडसाळपणाचा प्रचार आहे. यामुळे मी आशा करतो की येथील नामशुद्र बंधू पाठशाळेकरिता जमिनीकरिता आणि तिच्यात आपल्या मुलामुलींना पाठवण्याकरिता आश्वासन देतील. मला आशा आहे की अशा परिस्थितीत आपल्या या चुकीबद्दल पश्चात्ताप करणारे बरेच हिंदू निघतील की जे या दुर्लक्षित मुलांना शिकवण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेतील. मी आशा करतो की नामशुद्र बंधू आपले आश्वासन ठक्करबापाकडे पाठवतील. बाकी सर्व ते करतील यावर तुम्ही विश्वास ठेवला पाहिजे. मला आशा आहे की इथे बरेच असे हिंदू असतील की जे आपल्या पैशाने आणि योग्यतेने या मुलांना शिकवण्याचे सन्मानपूर्ण कर्तव्य पार पाडतील.*

*यानंतर गांधीजी म्हणाले की मला काही काळ बिहारमध्ये जावे लागू शकते. बिहारच्या हिंदूंनी तेथील मुसलमानांवर जे अत्याचार केले आहेत त्यांच्यासमोर नोआखाली वा टिपरा येथील घटना क्षुल्लक ठरतात. मी बिहारमध्ये जावे म्हणून बंगालच्या मुसलमानांनी माझ्यावर बरेच दडपण आणले. आधी तर मी त्यांचा सल्ला मान्य केला नाही कारण मला आशा होती की इथे राहूनही मी बिहारच्या हिंदूंवर मी तितकाच प्रभाव टाकू शकेन. परंतु डॉ. सैय्यद महमूदचे सचिव मला भेटण्याकरिता आले होते. ते डॉ. महमूद यांचे एक लांब पत्र घेऊन आले होते. तुम्हाला माहीत असेल की डॉ महमूद माझे जवळचे मित्र आहेत. ते स्वतःही बिहार मंत्रिमंडलात विकास मंत्री आहेत. मी विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात डॉ. महमूद यांनी मला लिहिले की तुम्ही शक्य तितक्या लवकर बिहारला भेट द्या. ते म्हणाले की सर्व काही जितके चांगले असायला पाहिजे होते तितके चांगले नाही आणि तुमच्या येथील उपस्थितीने येथील परिस्थिती निवळेल आणि तुम्हाला जितकी हिंदूंची काळजी वाटते तितकीच मुसलमानांच्या हिताचीही काळजी वाटते असे कळल्यामुळे मुसलमान आश्वस्त होतील. डॉ. महमूदच्या पत्र वाचल्यानंतर मी स्वतःला अडवून ठेवू शकलो नाही. यामुळे मी बिहारला जलद तार पाठवली आहे* (पाहा "श्रीकृष्ण सिन्हा यांना तार", फेब्रुवारी २८, १९४७) *आणि मला बिहारला घाईगडबड करून जावे लागण्याची फार मोठी शक्यता आहे. अशा परिस्थितीत मला नोआखाली आणि टिपराचा दौरा मध्येच थांबवावा लागेल. परंतु माझ्या अपेक्षित अल्प अनुपस्थितीच्या काळातही माझा हिंदू आणि मुसलमानांना संदेश आहे की तुम्ही एकमेकांबरोबर भावाभावाप्रमाणे राहायला*

***पाहिजे. असे तुम्ही तेव्हाच करू शकाल जेव्हा तुम्ही तुमच्यामधील दुबळेपणाचा त्याग कराल आणि तुम्हाला जे पवित्र वाटते त्याच्या रक्षणाकरिता बदल्याच्या भावनेशिवाय प्राणार्पण करण्याकरिता तयार असाल.*** (पुढील दोन परिच्छेद अमृत बझार पत्रिकेमधून घेतले आहेत.)

***बिहारच्या परिस्थितीच्या संबंधात मी संबंधित अधिकाऱ्यांच्या सतत संपर्कात आहे आणि बिहारमधील हिंदूंच्या वेडेपणाबद्दल स्पष्ट शब्दांत बोलत राहिलो आहे. दोन्ही समाजांची सेवा करता येईल अशा परिस्थितीत मी आहे. नोआखालीत मी दोन्ही समाजांची सेवा करण्याकरिता आलो होतो, त्याच्यात कटुता निर्माण करण्याकरिता नाही.***

***दंगलग्रस्त लोकांमध्ये निर्भयता यावी म्हणून मी इथे आलो आहे. तुम्ही निराश होऊ नका. मी गेलो तरी माझे सहकारी इथे नेहमीप्रमाणे काम करत राहणार आहेत. येथील लोकांनी आपसात भांडू नये. तुम्ही मुसलमानांना डिवचू नये परंतु त्यांच्या धमक्यांसमोर शरणही जाऊ नये. त्यापेक्षा तुम्ही मरण पत्करायला पाहिजे. गांधीजी जोर देऊन म्हणाले की मी मुसलमानांना मदत करण्याकरिता नाही तर बिहारमधील हिंदूंच्या मनोवृत्तीत बदल घडवून आणण्याकरिता बिहारमध्ये जाण्याचे ठरवले आहे. संपूर्ण हिंदुस्तानातील हिंदू आणि मुसलमान एकोप्याने राहतील अशी मला आशा आहे.***

***यानंतर त्या सायंकाळी विचारण्यात आलेल्या एका प्रश्नांचे उत्तर गांधीजींनी दिले. तो प्रश्न मुसलमान बहुसंख्य असलेल्या आणि हिंदू बहुसंख्य असलेल्या बंगालमधील प्रदेशाची दोन भागात फाळणी करण्यासंबंधी होता. गांधीजी म्हणाले की एक काळ असा होता की जेव्हा आपल्या प्रांताच्या फाळणीच्या विरोधात बंगाली भांडलेले आहेत आणि त्यांनी ती फाळणी रद्द करायला लावली*** (१९०५ साली बंगालची जी फाळणी करण्यात आली होती ती १९११ साली रद्द करण्यात आली होती.). ***परंतु आता अशी वेळ आली आहे की शांतता स्थापित करण्याकरिता बंगालची फाळणी करणे काहींच्या मते आवश्यक झाले आहे. माझ्याबद्दल वैयक्तिक बोलायचे तर मी नेहमीच फाळणीच्या विरुद्ध राहिलो आहे. परंतु भावाभावातसुद्धा भांडणे होऊन ते वेगळे झाल्याची झाल्याची उदाहरणे काही आगळीवेगळी गोष्ट नाही. अशा अनेक गोष्टी आहेत की ज्या हिंदुस्तानला परिस्थितीच्या रेट्यासमोर भूतकाळात गाडून टाकाव्या लागतील. परंतु माझी घडण मात्र वेगळ्या प्रकारे झाली आहे.***

***अशाच प्रकारे जर हिंदू, ज्यांची संख्या संपूर्ण हिंदुस्तानात पाहिले तर जास्त आहे, बळजबरीने सर्वांना एक ठेवू पाहतील तर त्याविरुद्धही मी संघर्ष करीन. मी ज्याप्रमाणे बळजबरीच्या फाळणीविरुद्ध आहे त्याचप्रमाणे बळजबरीने कोणाला एकत्र ठेवण्याच्याही विरोधातही आहे.***

***गांधीजी पुढे म्हणाले की भूतकाळात इंग्रजी राज्याचा इतिहास जरी कसाही असला तरी जवळच्या भविष्यकाळात इंग्रज हिंदुस्तान सोडून जाणार आहेत यात काही शंका नाही. यामुळे हिंदू आणि मुसलमानांनी शांततापूर्वक आणि एकोप्याने राहण्याचा निर्धार केला पाहिजे. याला पर्याय गृहयुद्ध आहे. परंतु त्यामुळे देशाचे तुकडेतुकडे होण्यापेक्षा दुसरा काहीही परिणाम होणार नाही. आपल्याकरिता भविष्यात काय लिहिलेले आहे हे कोणालाही माहीत नाही. जनता जर खरोखरी, प्रामाणिकपणे एक होऊन एकच गोष्ट मिळवण्याचा प्रयत्न करेल तर साध्यासरळ शब्दांत असे म्हणता येईल की परमेश्वर, जो भक्तांचा दासानुदास आहे, स्वतःच जनतेची इच्छा पूर्ण करील.***

हरिजन, मार्च २३, १९४७ आणि अमृत बझार पत्रिका मार्च २, १९४७

# ५२८. एक चिठ्ठी

फेब्रुवारी १९४७

शैली आणि पद्धतीबद्दल निर्मल बाबूंनी माझ्या उत्तरांचा विचार करावा. ते समाधानकारक आहेत काय?

महात्मा, खंड ७, पृष्ठ ३८४ आणि ३८५च्या मधील चित्रात.

-------------------

# ५२९. धिरूभाई बी. देसाई यांना चिठ्ठी

(भुलाभाई देसाई यांचा मुलगा)

फेब्रुवारी १९४७

(ही चिठ्ठी फेब्रुवारी १९४७च्या पत्रावर लिहिलेली आहे.)

माधुरी (भुलाभाई देसाई यांची पत्नी.) कुठे आहे?

ते ताबडतोब करायला पाहिजे.

भुलाभाईंच्या (भुलाभाई देसाई, १८७७-१९४६; प्रख्यात वकील,; सदस्य, लिबरल पार्टी; १९३० काँग्रेसमध्ये प्रवेश; केंद्रीय विधानसभेत काँग्रेस पक्षाचे पुढारी.) क्षमतेचा मला कधीही विसर पडला नाही. माझ्या आग्रहामुळे ते राजकारणात शिरले होते हे मला माहीत आहे. आमच्यात निर्माण झालेले मतभेद हा प्रेमाचाच एक प्रकार होता. काँग्रेसमधीलही अनेक लोक मद्यपान करतात परंतु त्यांना मी काहीही म्हणू शकत नाही. परंतु भुलाभाईंच्या व्यसनाने मी व्यथीत होत असे आणि ते मी त्यांना सांगितले होते. काही दिवसांनी त्याकरिता ते माझ्याजवळ रडलेसुद्धा होते. मद्यपानाचे त्यांनी गुलाम व्हावे हे मी सहन करू शकत नव्हतो. आणि त्यांच्याबरोबर या विषयाची पहिल्यांदाच मी चर्चा केली होती. त्यांना कार्यकारिणीत घ्यायला लावण्यात माझा फार मोठा हात होता हे मी तुम्हाला सांगेन. त्यांच्या अंतर्भावाकरिता मला संघर्ष करावा लागला. घटनासमितीतील त्यांच्या अंर्भावातही माझा हात होता. याहून अधिक सांगण्याची आवश्यकता आहे काय? तुला राजदूत म्हणून नेमण्याबद्दलच्या प्रस्तावाचीही मला माहिती आहे. शांत हो आणि तुझे काम धैर्याने, सावधगिरीने आणि वेळच्यावेळी कर. मला माधुरीचे पुस्तक पाठव.

गुजरातीवरून. भुलाभाई देसाई पेपर्स. सौजन्य - नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय

# ५३०. हसन शहीद सऱ्हावर्दी यांना पत्र

काझिरखिल,

पोलीस स्टेशन रामगंज,

जिल्हा नोआखाली,

फेब्रुवारी २८, १९४७

प्रिय मित्र,

मी उद्या बिहारला जात आहे हे तुम्ही चांदपूर जिल्ह्यातील टिपराच्या एस. डी. ओ.कडून ऐकले असेल अशी आशा आहे. मी तिथे जाण्याचे साहस करतो आहे कारण फजलुल हक साहेबांना तुम्ही मला तसा आग्रहपूर्वक सल्ला देण्याकरिता सांगितले होते आणि त्यांनी तो अतिशय सौजन्यपूर्वक मला दिला होता आणि गत गुरुवारी त्यांनी तसे जाहीरपणे सांगितलेही होते. तुमच्या या सल्ल्यामुळे मी जात आहे असे तुम्हाला सांगता यावे अशी माझी किती इच्छा होती! सरदार निरंजन सिंग गिल यांच्या अहवालाने, ज्याबद्दल मी तुम्हाला फेब्रुवारी २२ला लिहिले होते, माझी अल्पकाळाकरिता बिहारमध्ये जाण्याकरिता आधीच मानसिकता तयार केली आहे. परंतु मी जो निर्णय घेतला तो डॉ. सैय्यद महमूद यांनी आपल्या स्वीय सचिवामार्फत पाठवलेल्या पत्रामुळे. अंतिम निर्णय घेण्याकरिता मी चांदपूर येथील एस. डी. ओ. खानसाहेब यांच्या कार्यालयाच्या माध्यमातून बिहारच्या मुख्यमंत्र्यांना संदेश पाठवला आहे आणि मी पटण्याला ताबडतोब आलो तर तुमचा काही आक्षेप आहे काय असे मी त्यांना विचारले आहे. त्याचे उत्तर कोणत्याही क्षणी येऊ शकते. मी जर गेलो तर मी काय पाहिले पाहिजे याबद्दल तुम्ही काही सूचीत करू शकाल तर ते मला हवे आहे. बिहारमधील हिंदूंचे मुसलमानांशी जे वर्तन आहे त्याचा विचार केला तर बिहारमध्ये सर्व काही बरोबर नाही अशी शंका माझ्या मनात निर्माण झाल्यामुळे बिहारमध्ये जाण्याची इच्छा माझ्या मनात निर्माण झाली. बिहार म्हणा की बंगाल दोन्हीकडे एकच कारण आहे. काल मी जेव्हा बिहारमध्ये ताबडतोब जाण्याच्या माझ्या हेतूची घोषणा केली तेव्हा हिंदूंमध्ये घबराट पसरली. ते म्हणाले की गेल्या ऑक्टोबर महिन्याप्रमाणे परत आमच्यावर अत्याचार होण्याची शक्यता आहे. मला आशा आहे की त्यांची भीती निराधार असल्याचे सिद्ध होईल आणि ही भीती दूर करण्याकरिता तुम्हाला जे काही करता येईल ते तुम्ही कराल. असे म्हणतात की या महिन्याच्या १५ तारखेपासून रेशनच्या स्वरूपात मिळणारी सर्व मदत बंद करण्यात येईल. ही माहिती जर खरी ठरली तर

लोकांना विनाकारण फार मोठा त्रास सहन करावा लागेल. मदतकार्याकरिता जी यंत्रणा आहे ती फार संथ आहे.

घरे बांधण्याकरिता तिथे पुरेसे साहित्य नाही. विणकरांजवळ विणाई करण्याकरिता सूत नाही. कोळ्यांजवळ जाळी नाहीत आणि जाळी तयार करण्याकरिता त्यांच्याजवळ साहित्य नाही. सुतारांजवळ अवजारे नाहीत. शेतकऱ्यांजवळ बैल नाहीत. पेरणी करण्याकरिता त्यांच्याजवळ बीबियाणे नाही. हेमचरमधील व्यापाऱ्यांना परत व्यापार सुरू करण्याकरिता कर्ज मिळण्याकरिता येणाऱ्या अडचणींची माहिती ठक्कर बापांनी सांगितली. तुम्हाला पाठवण्याकरिता त्यांनी एक अर्ज तयार केला आहे. तो व्यापारी प्रस्तावासारखा आहे. ज्या लोकांनी तिथे सर्वस्व गमावले आहे त्यांना आपला व्यवसाय परत सुरू करण्याकरिता पुरेसे अनुदान मिळाले पाहिजे याचा मी आधी विचार करायला पाहिजे होता. उलटपक्षी मी प्रस्तावित केलेल्या कर्जाकरिता आवश्यक असेल तर व्याजही घ्यावे असे मी सुचवले आहे. माझी कळकळची विनंती आहे की अशा प्रकरणी व्याज घेऊ नये.

लोकांचा पक्का विश्वास झाला आहे की मुसलमान मजुरांनी हिंदूंचा बहिष्कार सुरू केलेला आहे. कोणतेही सरकार एका समुदायाला दुसऱ्या समुदायाकडे बळजबरीने काम करायला लावू शकत नाही असे मी म्हणालेलो आहे. बळजबरीने काम घेण्याच्या माझ्या सूचनेशी माझे टीकाकारही सहमत आहेत. त्यांचे म्हणणे आहे की तुमच्या सरकारने बहिष्काराला केवळ संमतीच दिलेली नाही तर प्रोत्साहनही दिलेले आहे. मला मिळालेली माहिती पूर्णपणे चुकीची असेल अशी मला आशा आहे.

या पत्राची प्रत मी खादी प्रतिष्ठानचे सतीश बाबू यांच्याजवळ सोडून जात आहे. त्यांचा मुक्काम सध्या काझिरखिल येथे आहे आणि माझ्या अनुपस्थितीत ते माझे प्रतिनिधित्व करतील. आशा आहे की ही गोष्ट तात्पुरती असेल आणि ती यशस्वी होईल. माझी अनुपस्थिती जरी तात्पुरती असली तरी संपूर्ण कर्मचारी वर्ग माझ्याशी अतिशय सौजन्यपूर्वक वागला आणि या उल्लेखात माझ्या सुरक्षेकरिता तुम्ही नेमलेल्या पोलिसांचाही उल्लेख आहे. हा उल्लेख केल्याशिवाय मी राहू शकत नाही.

हसन शहीद सुऱ्हावर्दी साहेब,

मुख्यमंत्री बंगाल

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

# ५३१. अली हुसेन यांना पत्र

(अली हुसेन यांनी फेब्रुवारी १८, १९४७ला पाठवलेल्या पत्राचे उत्तर म्हणून गांधीजींनी हे पत्र लिहिले होते. ते पत्र असे होते: "बिहारला अजून पुढील संकटातून वाचवायचे असेल तर बिहारचे मंत्रिमंडळ बरखास्त करून ९३ कलम लावण्यात यावे आणि या भ्रष्ट मंत्रिमंडळाबरोबरच सध्याच्या राज्यपालांनाही बदलण्यात यावे.असे जाहीर करण्याचे तुमच्यात साहस असेल अशी मी आशा करतो.")

मार्च १, १९४७

बिहारच्या मंत्रिमंडळाचे म्हणणे न ऐकताच ते बरखास्त करावे ही तुमची मागणी पाहून मला आश्चर्य वाटले. आजच्या काळात तुम्ही ९३ कलमाची मागणी करावी याची मला लाज वाटते. भ्रष्टाचार उघड करण्याचे अनेक सन्माननीय मार्ग आहेत मग ते कुठेही का अस्तित्वात असेनात. ९३ कलमाचा वापर हा त्यातील एक मार्ग नाही.

महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड २, पृष्ठ ३०१

-------------------

# ५३२. विश्व युवक प्रतिनिधीमंडळाला मुलाखत

(हिंदुस्तानातील तरुणांच्या आंदोलनात मतभेद का आहेत असा प्रश्न प्रतिनिधी मंडलाच्या सदस्यांनी गांधीजींना विचारला होता.)

मार्च १, १९४७

विश्व युवक प्रतिनिधी मंडळाला गांधीजी म्हणाले की हिदुस्तानवर विदेशी तत्त्वज्ञानाचा फार जास्त प्रभाव आहे. त्यांचा हिंदुस्तानातील जनतेशी जिवंत संबंध नाही.

द हिंदू, मार्च ३, १९४७

-------------

# ५३३. प्रार्थना प्रवचन

("गांधीजीज वाकिंग टूर डायरी"मधून उद्धृत)

हेमचर,

मार्च १, १९४७

***गांधीजी म्हणाले की परतत असताना मी बाजपाटीलाही*** (गांधीजींच्या कार्यक्रमातून बाजपाटीला वगळण्यात आल्याबद्दल लोकांनी तक्रार केली होती.) ***जाण्याचा प्रयत्न करीन. मी वेळ नक्की सांगू शकत नाही. हृदयाचे ऐक्य निर्माण झाल्याशिवाय मी नोआखाली अथवा टिपरा सोडणार नाही. सर्व योग्य अपेक्षा त्यांच्या वेळेवर पूर्ण होतील.***

उद्या दुपारी मी बिहारकरिता निघेन अशी आशा आहे. उद्या दुपारी ३ वाजता मी हेमचर सोडेन. मी कलकत्त्याला जाईन आणि तेथून बिहारला जाईन. (हा परिच्छेद अमृत बझार पत्रिकेतून घेतला आहे.)

मी तिथे फार दिवस थांबेन अशी अपेक्षा नाही. (उद्या) मी हेमचरमध्ये प्रार्थना सभा घेऊ शकणार नाही, परंतु चांदपूरमध्ये घेण्याची शक्यता आहे.

***प्रश्न - आमच्यामधील अनेक कुप्रथांचा तुम्ही उल्लेख केला आहे. त्या आहेतच; परंतु पुरुष लोक जर आवश्यक बदल करण्याकरिता तयार नसतील तर आम्ही स्त्रिया त्याबद्दल काय करू शकतो?***

***गांधीजी म्हणाले की स्त्रियांनी स्वतःला पुरुषांपेक्षा दुय्यम वा कमी प्रतीच्या समजण्याचे काहीही कारण नाही. स्त्री अर्ध पुरुष आहे आणि पुरुष अर्ध स्त्री आहे असे सांगण्यात आले आहे. ते वेगवेगळे स्वतंत्र भाग नाहीत तर एकाच गोष्टीचे दोन भाग आहेत. इंग्रजी भाषा अजून पुढे गेली आणि तिला "पुरुषाचा अधिक चांगला भाग" असे संबोधण्यात आले. यामुळे स्त्रियांनी सर्व अवांछनीय आणि अयोग्य बंधनांविरुद्ध सविनय बंड पुकारले पाहिजे. हितावह असलेले सर्व निर्बंधसुद्धा स्वैच्छिक असले पाहिजे. सविनय बंडखोरीमुळे कोणतीही हानी होण्याची शक्यता नाही. ती पावित्र्य आणि विवेकपूर्ण प्रतिकार गृहीत धरते.***

***प्रश्न - ज्या लोकांनी आपल्या प्रियजनांना गमावले आहे वा वर्षानुवर्षे श्रम आणि त्याग करून आपली घरे उभारली होती ती त्यांनी गमावली आहे. त्यांना क्षमा करणे आणि विसरणे कठीण जाते. त्यांनी त्या भावनेवर कसा विजय मिळवावा आणि ज्या समाजातून गुंड आले होते त्या समुदायाकडे बंधुभावाच्या दृष्टीने कसे पाहावे?***

***उत्तर - गांधीजी म्हणाले की माफ करण्याचा एक मार्ग बिहारची आठवण करणे हा आहे. तिथे नोआखाली आणि टिपरापेक्षाही भयानक अत्याचार झाले आहेत. मुसलमानांनी हिंदूंच्या तेथील अत्याचाराचा त्याहूनही भयानक बदला घ्यावा अशी तुमची इच्छा आहे काय? तुमची अशी इच्छा असू शकत नाही. तुम्हाला जर पशुत्वाच्या हीनतम पातळीवर पोहोचायचे नसेल तर हे तुम्ही विसरा आणि माफ करायला शिकायला पाहिजे. याशिवाय तुमच्या मनात न्यूनगंड नसावा. तूम्ही शूर***

*व्हा. क्षमा करणे शूरपणाचे आभूषण आहे. तुम्ही खऱ्या अर्थाने शूर व्हा. खरे शौर्य हल्ला करण्याला नकार देत असते; ते आनंदाने आणि धैर्याने आघात सहन करत असते. विरोधाकाला निःशस्त्र करण्याचा हा सर्वात खरा मार्ग आहे.*

*प्रश्न - बंगालच्या प्रस्तावित फाळणीसंबंधात लोकसंख्येची कोणतीही अदलाबदल न करता बंगालच्या प्रशासनाचे दोन स्वतंत्र भाग करावे असा एक प्रस्ताव आहे. या व्यवस्थेमुळे प्रत्येक समुदाय आपापल्या ठिकाणी शांततापूर्वक राहू शकेल. अशा प्रस्तावावर तुमचा कोणता आक्षेप आहे?*

*उत्तर - गांधीजी म्हणाले की प्रशासनिक विभाजन हेसुद्धा तितकेच अव्यवहार्य असेल जितकी लोकसंख्येची अदलाबदल. यामुळे अशी सशस्त्र तटस्थता निर्माण होईल की ज्यामुळे सर्व निरोगी वाढ थांबेल. दोन्ही समुदायाच्या लोकांनी मित्रांप्रमाणे एकत्र यायला पाहिजे आणि आपसातील मतभेद कमी करून करून ते सहन केले पाहिजे. दुसरा कोणताही मार्ग रानटीपणाचा आणि तिसऱ्या शक्तीला शरण जाण्याचा असेल.*

हरिजन, मार्च २३, १९४७ आणि अमृत बझार पत्रिका, मार्च ४, १९४७

------------------

# ५३४. सतीश चंद्र दास गुप्ता यांना पत्र

चांदपूर,

मार्च २, १९४७

चि. सतीश बाबू (हे संबोधन देवनागरी लिपीत आहे.),

सरदार जीवन सिंग (आझाद हिंद फौजेचे) यांच्याशी माझी प्रदीर्घ चर्चा झाली. त्यांच्या माणसांची कामाकरिता खरोखरच गरज आहे असे तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही त्यांच्याशी यासंबंधात चर्चा करा तुम्हाला हवे ते करा. तुमच्या मते त्यांची जर खरोखरच आवश्यकता नसेल तर प्रत्येक व्यक्तीला पूर्ण पारिश्रमिक आणि घरी जाण्याकरिता ३० रुपये दिले पाहिजे. सरदारजी तुम्हाला खर्चाचे सविस्तर विवरण दाखवतील. (इथे मूळ स्रोतातील भाग खराब झालेला आहे.) ते स्वतः प्रत्येक प्रकरणी मदत करण्याकरिता तयार आहेत. मी परतल्यानंतर वा पत्रव्यवहार करून त्यांच्या प्रकरणाचा स्वतंत्रपणे निपटारा करता येईल.

आशीर्वाद,

बापू (सही देवनागरी लिपीत आहे)

फोटोप्रतीवरून. जी. एन. ८७१७

--------------

# ५३५. प्रार्थना प्रवचन

(गांधीजींची पूर्व बंगालमधील ही शेवटची प्रार्थसभा होती आणि तिला ३०, ००० श्रोते हजर होते.)

चांदपूर,

मार्च २, १९४७

पूर्व बंगालमधील काम थांबवून मला तातडीने बिहारमध्ये का जावे लागले हे गांधीजींनी स्पष्ट करून सांगितले. बिहारमध्ये जाण्याकरिता बंगालच्या मुख्यमंत्र्यांनी आणि श्री फजलुल हक यांनी आग्रपूर्वक विनंती करूनही मी त्याकडे कानाडोळा केला होता.

त्यांच्या वक्तव्यांना माझ्या अंतःकरणाकडून प्रतिसाद मिळू शकला नव्हता. बंगालमध्ये राहूनही मी बिहारमधील हिंदुंना प्रभावित करू शकतो असे गृहीत धरून मी स्वतःवरच खुश होत होतो. परंतु डॉ. सैय्यद महमूद यांनी आपल्या सचिवाला एक लांब पत्र घेऊन पाठवले. त्यावरून बिहारमधील मुसलमानांच्या मदतीकरिता बिहारमध्ये जायला पाहिजे हे माझ्या लक्षात आले. (यापुढील परिच्छेद महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड ३मधून घेतला आहे.)

तिथून शक्य तितक्या लवकर मी निवडलेल्या माझ्या कार्यक्षेत्रात म्हणजे नोआखालीला परतेन अशी अपेक्षा आहे. डॉ. महमूद यांचे सचिव म्हणाले की आम्ही तुम्हाला १५ दिवसांपेक्षा जास्त थांबवणार नाही. मुसलमान आम्हाला शांततेत राहू देणार नाहीत अशी जी भीती हिंदू निर्वासितांना वाटते ती मध्यंतरीच्या काळात मुसलमान खोटी ठरवतील अशी मला आशा आहे.

अखेरीस गांधीजींनी हिंदू आणि मुसलमानांना भावाभावाप्रमाणे मैत्रीच्या भावनेने शांततापूर्वक राहण्याची विनंती केली की आणि अधिकाऱ्यांना आणि पोलिसांना अशा प्रकारे राहण्याची विनंती केली की तुम्ही अशा प्रकारे वागा की ज्यामुळे लोक तुम्हाला आपला मित्र समजतील आणि तुमची निःस्वार्थ सेवा आणि चातुर्य यांमुळे दोन्ही समाजांना परस्परांशी मित्राप्रमाणे व्यवहार करणे सुलभ होईल.

द हिंदू मार्च ४, १९४७ आणि महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड २, पृष्ठ ३०८

--------------

# ५३६. जीवन सिंग यांना चिठ्ठी

(स्रोतानुसार रात्री सानऊ वाजता गांधीजींची मंडळी आगबोटीवर चढली. घाटावर फार मोठा जमाव गोळा झाला होता. निरोप घेणारात शेवटचे कर्नल जीवनसिंग होते. त्यांच्या आझाद हिंद सेनेच्या तुकडीला कोणत्या का कारणाने सतीश चंद्र दास गुप्ता यांच्याशी जुळवून घेता आले नाही. याबद्दल आधी अनेकदा चर्चा झाली होती. गांधीजींनी लेखी आदेश देऊन जीवन सिंग यांना आपल्या माणसांना परत पाठवण्याकरिता सांगितले तेव्हा जीवनसिंह दुखावले आणि एक प्रकारे ही आपली बडतर्फीच आहे असे त्यांना वाटले. जड अंतःकरणाने गांधीजींचा ते निरोप घेणारच होते तेव्हा गांधीजींनी ही चिठ्ठी कागदाच्या एका वेगळ्या तुकड्यावर लिहिली. पाहा “सतीश चंद्र दास गुप्ता यांना पत्र”,मार्च २, १९४७)

मार्च २, १९४७

व्यक्तीशः मला तुम्हाला गमावण्याची इच्छा नाही. (गांधीजींच्या मृत्यूपर्यंत जीवनसिंग नोआखालीलाच थांबले होते.)

महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड २, पृष्ठ ३०९

-------------

# ५३७. एक चिठ्ठी

[मार्च २। ३, १९४७]

(आगबोटीच्या संदर्भावरून. गांधीजी आगबोटीत मार्च २ला चांदपूर येथे बसले होते आणि ग्वालंदो येथे दुसऱ्या दिवसी पोहोचले होते.)

आपले जे कोणी लोक आगबोटीवर आहेत त्या सर्वांनी नियमाप्रमाणे भाडे आणि खर्च दिलेला असेल याकडे तू लक्ष ठेव. एक तर त्यांनी सरकारला द्यावे नाही तर आपण पैसे गोळा करून ते सरकारला पाठवू. आपण सर्वांनी फुकट प्रवास केला तर चे वाईट दिसेल. (यानंतरचा भाग गुजरातीत आहे.)

हे निर्मल बाबूंना दाखवा. मृदुलाबेननेसुद्धा (मृदुला साराभाई. अंबालाल साराभाई यांची मुलगी.) हे पाहावे.

महात्मा

महात्मा खंड ७, पृष्ठ ३८४-५मधील चित्रावरून

---------------

# ५३८. वल्लभभाई पटेल यांना पत्र

चांदपूरहून जाणाऱ्या आगबोटीतून,

मार्च ३, १९४७

चि. वल्लभभाई,

काल मला तुमचे पत्र चांदपूर येथे मिळाले. तुमचा वाढता आजार पाहून बरे वाटत नाही. तो मागेच नियंत्रणात आणण्यासारखा होता आणि कदाचित आताही नियंत्रणात आणता येईल. तुम्ही जर दिनशांबद्दल (दिनशा के. मेहता) अधिक विचार करणार नसाल तर माझ्या दृष्टीत दुसरा (निसर्गोपचारक) आहे. परंतु तुमची समजूत कोण घालू शकतो? तुम्हाला करायचे असेल तेच तुम्ही नेहमी करता. तुमच्यावर किती लोक विसंबून आहेत हे तुम्हाला माहीत आहे काय? मी सुधीरबद्दल समजू शकतो. त्याच्याकडून तार आली होती. . . .(मूळ स्रोतात वगळलेले आहे.) येथील कामाच्या आवश्यकतेबद्दल कदाचित मी तुमची खात्री पटवून देऊ शकणार नाही, परंतु ते अत्यंत महत्त्वाचे आहे याबद्दल माझी खात्री आहे. आज मी बिहारकरिता निघत आहे. ...(मूळ स्रोतात वगळलेले आहे.) कडून पत्र आले होते. आणि आता परत डॉ. महमूदकडून आले आहे. दोन्ही धक्कादायक आहेत आणि म्हणून मी जात आहे. तिथे तर तुम्ही सर्व महारथी हजर आहा आणि तुमचे काम करत आहा. इथे मी वृक्षविहीन भूमीवर एरंडीच्या झाडासारखा आहे. यामुळे मला इथे राहू द्या. जर काही साध्य करता आले तर देशाचा लाभ होईल. काहीच जर करता आले नाही तर काहीही गमावले जाणार नाही. डॉ. कानुनगो यांच्या आजाराबद्दल ऐकून वाईट वाटले. ईश्वर ठरवतो तसे राहायला आपण शिकलो पाहिजे.

आशीर्वाद,

बापू

गुजरातीवरून. बापूना पत्रो- २, : सरदार वल्लभभाईने, पृष्ठ ३५०

-------------------------

# ५३९. जे. बी. कृपलानी यांना तार

कलकत्ता,

मार्च ३, १९४७

आचार्य जे. बी. कृपलानी,

अध्यक्ष, कॉंग्रेस, नवी दिल्ली

तुमची तार (ती अशी होती : “आम्ही सर्व कार्यकारिणीची जी सभा येत्या ६ तारखेला होणार त्यात तुमची उपस्थिती आवश्यक आहे असे समजतो. कृपाकरून बिहारचा कार्यक्रम ९ तारखेपर्यंत पुढे ढकला.”). असमर्थतेबद्दल खेद होतो. संदेश वाहकाला बिहारमध्ये पाठवा.

बापू

मुळावरून. अखिल भारतीय कॉंग्रेस कमेटी फाईल, १९४६-४८. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय

------------------

# ५४०. प्यारेलाल यांना पत्र

मार्च ३, १९४७

चि. प्यारेलाल,

मला तुझे पत्र मिळाले. तू विनाकारण काळजी करतो आहेस. ज्याच्याकरिता रामबाण अमोघ उपाय आहे त्याला रक्तदाबाची समस्याही होणार नाही आणि त्याच्या कानांना नगाऱ्याचासुद्धा आवाज ऐकू येणार नाही. असे असूनही जर त्याला काही झाले तर ते तो शांतपणे सहन करील आणि तसे करत असताना मरेल. या मुद्द्याबद्दल मला मुळीच संशय नाही. मला (उच्च) रक्तदाब असतो आणि कानात भणभणही होत असते. यावरून असे दिसते की मी औषध घेण्यापेक्षा रामनामाचा काही उपयोग होणार नाही असा विचार करण्यापेक्षा मी रामनामावरच विसंबून राहायला पाहिजे. हे खरे आहे की असे सहजपणे करता येत नाही. येथील पवित्र कामात तर आपल्याला केवळ रामनामाचाच आधार आहे. असे असले तरी काल मी सर्पगंधा घेतले होते. त्याच्या क्षतेबद्दल मला शंका आहे. माझे कर्तव्य आवश्यकता असली तर शांतपणे मरणे आहे. मी जेव्हा मरेन तेव्हा तू अस्वस्थ का व्हायला पाहिजे? तसे झाले तर तू अजून जोर लावून काम करायला पाहिजे. तरीही केवळ रामनामाच्या मदतीने मी दुरुस्त होण्याचा प्रयत्न करतो आहे. परंतु मी आता काही उपयोगाचा राहिलो नसेन तर मी जाणेच चांगले होईल.

मला तुझी भाकरी फार आवडली.

तुला शक्य ती सर्व कागदपत्रे पाठवण्याकरिता मी देवला सांगितले आहे. तरीही मी त्यात लक्ष घालीन.

आज मी पटण्याकरिता निघेन. तिथे काहीच दिवस थांबण्याचा माझा विचार. देव, हुनर, मनू, आणि निर्मल बाबू माझ्याबरोबर असतील.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

--------------------

# ५४१. युनायटेड प्रेस ऑफ इंडियाच्या प्रतिनिधीला मुलाखत

[मार्च ३, १९४७]

(द इंडियन नेशनने मार्च ६, १९४७च्या अंकात लिहिले होते की यु. पी. आयच्या प्रतिनिधीने गांधीजींची सोदेपूरला पोहोचल्याबरोबर सायंकाळी भेट घेतली होती. गांधीजी सोदेपूरला मार्च ३, १९४७ला रात्री ९.३०वाजता पोहोचले होते.)

तुमच्या उपस्थितीने नोआखालीच्या परिस्थितीत काही सुधारणा झाली काय असा प्रश्न विचारण्यात आला असता गांधीजी म्हणाले -

हा प्रश्न खरे तर हितसंबंधितांना म्हणजे ज्या लोकांना त्रास सहन करावा लागला त्यांना विचारायला पाहिजे. मी लोकांमध्ये काम केले आणि प्रेमाचा व सामुदायिक ऐक्याचा संदेश दिला (गांधीजींनी आपल्या पदयात्रेच्या दरम्यान नोआखाली जिल्ह्यातील ४० गावांना आणि टिपरा जिल्ह्यातील ७ गावांना भेट दिली होती व ते ११६.५ मैल चालले होते.). व्यक्तिगत पातळीवर सांगायचे तर तेथील परिस्थितीत सुधारणा झाली आहे आज तेथील लोकांमधील आत्मविश्वास वाढला आहे. परंतु परिस्थितीत खरोखरच सुधारणा झाली की नाही हे केवळ दंगलग्रस्त लोकच तुम्हाला सांगू शकतील. त्यांना काय वाटते हेच खरोखर महत्त्वाचे आहे.

बिहारमधील मुक्कामाच्या काळासंबंधी विचारले असता गांधीजी म्हणाले -

मी तिथे किती दिवस राहीन हे निश्चितपणे सांगू शकत नाही. मी बिहारच्या दंगलग्रस्त लोकांमध्ये काम करीन आणि स्थानिक पुढाऱ्यांशी समस्येची चर्चा करीन. मला आशा आहे की माझा मुक्काम फार लांब नसेल.

गांधीजींनी नोआखालीला परत जाण्याचा निर्धार व्यक्त केला. परतल्यानंतर मी माझे तेथील काम सुरू ठेवीन.

अमृत बझार पत्रिका, मार्च ५, १९४७

---------------

# ५४२. अमिया चक्रवर्ती यांच्याशी चर्चा

(रविंद्रनाथ टागोर यांचे सचिव. स्रोतानुसार ते गांधीजींना सकाळी भटले होते.)

सोदेपूर,

[मार्च ४, १९४७]

(गांधीजी सोदेपूरला ३ तारखेला रात्री ९.३० वाजता पोहोचले होते मार्च ४ तारखेला सायंकाळी पटनाकरिता रवाना झाले होते.)

मी बिहारमध्ये जात आहे आहे परंतु नोआखाली आणि टिपरा येथील काम अर्धवट राहिले आहे. मी नोआखालीच्या भट्टीत परत जाणार आहे आणि तेथून जिवंत परतलो तर माझ्याजवळ नोआखाली आणि बिहारसंबंधी काही तरी सांगण्यासारखे असेल, आणि मी इतर कशाचाही विचार करू शकत नाही. बिहारमध्ये काय सुरू आहे हे पाहण्याकरिता मी बिहारमध्ये जात आहे. माझे समाधान होताच मी परतेन.

द इंडियन नेशन, मार्च ६, १९४७

* * * * *